# ५२. सूरह अत् तूर

**नावः** सूरहच्या आरंभातच अत तूर (तूर पर्वता) ची शपथ घेतली गेली आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अत् तूर' असे आहे.

**अवतरण काळ :** मजकूरांवरून असे दिसून येते की ही सूरह मक्केच्या मध्ययुगात अवतरली असावी

**मध्यवर्ति कल्पनाः** पैगंबर कियामतीच्या आगमना ची व कर्माचा मोबदला दिला जाण्याची जी खबर देत आहे ती अपरिहार्यतः घडून येणारी हकीगत आहे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते १६ मध्ये मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरविणाऱ्यांना खबरदार केले गेले आहे की अल्लाहचा प्रकोप त्यांच्यावर ओढवल्या शिवाय राहणार नाही. याची खात्री करून देण्यासाठी साक्षी ही दिल्या गेल्या आहेत; व अजाब (ईश-प्रकोपा) चे चित्र ही रेखाटले गेले आहे.

आयत क्र. १७ ते २८ मध्ये खोटे ठरविणाऱ्यांच्या तुलनेत अल्लाहचे भय अंगिकारणाऱ्यांना व जबाबदारींच्या जाणीवेसह जीवन व्यतीत करणाऱ्यांना ज्या बक्षीसाने व उत्कृष्ट मोबदल्याने उपकृत केले जाईल त्याचे चित्र रेखाटले गेले आहे.

आयत क्र. २९ ते ४७ मध्ये आक्षेप घेणाऱ्यांसमोर असे प्रश्न उभे केले गेले आहेत की ज्यामुळे त्यांच्या शंकाकुशंकाचे आपोआप निरसन होते.

आयत क्र. ४८ व ४९ सूरहच्या समोरोपाच्या आयती होत; ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना धैर्य बाळगण्याचा उपदेश आणि आपल्या पालन कर्त्याची स्तुति प्रशंसा व गुणगान करण्याची ताकीद केली गेली आहे.

**हदीस** :- हजरत उम्मे सलमा (रजि.) फर्मावितात की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विनविले की मी आजारी आहे (तेव्हा काबागृहाला प्रदक्षिण कशी घालू) पैगंबरानी फर्माविले स्वार होऊन लोकांच्या मागून प्रदक्षिण घाला. यास्तव मी प्रदक्षिणा घातली. त्या वेळी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) काबागृहाच्या एका बाजूला नमाज पढत होते ज्यात सूरह तूरचे पठण करीत होते.

(बुखारी-किताबुत्तफसीर)

# ५२- सूरह अत् तूर

سُوْرَةُ الطُّوْرِ

आयती - ४९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ [१] आहे तूर ची. [२]

وَالطُّوْرِ ۙ﴿١﴾

२. आणि एका अशा ग्रंथाची, जो लिहिलेला आहे.

وَكِتٰبٍ مَّسْطُوْرٍ ۙ﴿٢﴾

३. पातळ चर्म च्या खुल्या पृष्ठांवर.[३]

فِيْ رَقٍّ مَّنْشُوْرٍ ۙ﴿٣﴾

४. आणि आबाद घराची.[४]

وَّالْبَيْتِ الْمَعْمُوْرِ ۙ﴿٤﴾

५. आणि बुलंद छताची.[५]

وَالسَّقْفِ الْمَرْفُوْعِ ۙ﴿٥﴾

६. आणि काठोकाठ भरलेल्या समुद्राची. [६]

وَالْبَحْرِ الْمَسْجُوْرِ ۙ﴿٦﴾

७. की तुमच्या पालन कर्त्याचा प्रकोप निश्चितच होईल. [७]

اِنَّ عَذَابَ رَبِّكَ لَوَاقِعٌ ۙ﴿٧﴾

८. कोणी ही त्याला टाळणारा नाही. [८]

مَّا لَهٗ مِنْ دَافِعٍ ۙ﴿٨﴾

९. ज्या दिवशी आकाश कंपायमान होईल.

يَّوْمَ تَمُوْرُ السَّمَآءُ مَوْرًا ۙ﴿٩﴾

१०. आणि पर्वत चालू लागतील. [९]

وَّتَسِيْرُ الْجِبَالُ سَيْرًا ۭ﴿١٠﴾

११. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

فَوَيْلٌ يَّوْمَىِٕذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ۙ﴿١١﴾

१२. जे विवादात पडून खेळत आहेत. [१०]

الَّذِيْنَ هُمْ فِيْ خَوْضٍ يَّلْعَبُوْنَ ۘ﴿١٢﴾

१३. ज्या दिवशी यांना जहन्नमकडे धक्के देऊन नेले जाईल.

يَوْمَ يُدَعُّوْنَ اِلٰى نَارِ جَهَنَّمَ دَعًّا ۭ﴿١٣﴾

१. या ठिकाणी शपथ साक्ष या अर्थाने आहे. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तकवीर टीप क्र. १४

२. अभिप्रेत तूर पर्वत होय, जिथे हजरत मूसा यांना प्रेषित्व पदाने उपकृत केले गेले व शरीअत (धर्मशास्त्र) प्रदान केले जात असे.

३. अभिप्रेत तौरात हा ईश-ग्रंथ होय, ज्याच्या प्रती चामडयाच्या पातळ आवरणावर लिहिल्या जात मग त्याची पाने उघडून पठण केले गेले.

४. अभिप्रेत काबागृह होय जे प्रदक्षिणा करणाऱ्यांनी आणि हज्ज व उमरा करणाऱ्यांनी व्याप्त असते. बैते मअमूर जसे हदीस वचनात उल्लेख आहे आकाशात आहे. त्याची उपमा काबागृहास ही लागू पडते आणि ज्या अर्थी इथे याला एक ऐतिहासिक साक्ष म्हणून सादर केले जात आहे म्हणून यास अभिप्रेत अवलोकनात येणारे बैते मअमूर (अर्थात काबागृह) च असू शकते.

५. अभिप्रेत आकाश होय ज्याचे छत अतिशय उंच आहे.

६. म्हणजे पाण्याने ओतप्रोत भरलेल्या समुद्राची.

७. हीच ती गोष्ट होय जिच्या साक्षी करीता उपरोक्त बाबी सादर केल्या गेल्या आहेत. कुरआन सादर करणारे पैगंबर मोबदल्याच्या दिवसा विषयी जी खबर देत आहे तर ही काही नवीन गोष्ट नाही की जिला कवी कल्पना किंवा वेडसरपणा समजले जावे, किंबहुना एक अशी वस्तुस्थिती आहे जी पैगंबरीय शिकवणीचा एक आवश्यक भाग राहीला आहे. आणि इतिहास या गोष्टीला साक्षी आहे. यास्तव तूर पर्वताच्या शिखरांवरून हाच व उंचावला होता. आणि तौरातच्या खुल्या पृष्ठांमध्ये ही शिकवण आहे. त्याच प्रमाणे काबागृह जे प्राचीनतम उपासना गृह आहे आणि उपासकांनी सदैव व्यापून राहीले आहे त्याचा पाया एकेश्वरवाद व मोबदल्याच्या दिवसा विषयीच्या श्रद्धेवरच ठेवला गेला आणि म्हणूनच हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांच्या शिकवणीचे अतिशय प्रकट असे पैलू होते. यास्तव हे आबाद घर मोबदल्याच्या दिवसा विषयीच्या श्रद्धेस क्रमबद्धतेने लोकांपावेतो पोहचवित राहीले.

हे आहेत मोबदल्याच्या दिवसाच्या समर्थनार्थ ऐतिहासिक अवशेष राहीले त्याचे भय तर ते अल्लाहच्या महानतेच्या कल्पनेनेच निर्माण होते. आणि त्याच्या महानतेची कल्पना सृष्टीच्या अवशेषांच्या अवलोकनाने कायम होते. उदाहरणार्थ आकाशाचे अति विशाल छत, ज्याच्या उंचीचे काहीही अनुमान लावले जाऊ शकत नाही, अल्लाहच्या कमालीच्या सामर्थ्यास प्रमाणिक करते आणि त्याच्या अवलोकनाने मनात त्याची महानता प्रस्थापित होते. तद्वतच जमीनीवर पाण्याने तुडूंब भरलेले व उचंबळणारे समुद्र, सर्व विश्वासच्या पालन कर्त्याचे (अर्थात अल्लाहचे) भय निर्माण करतात. तात्पर्य या सृष्टीचे संपूर्ण वातावरण माणसा करीता एक प्रशिक्षण स्थळ आहे, जिथे अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या महानतेची खात्री निर्माण होते. आणि त्याची भिती मनात ठसते. परंतु मनुष्य मात्र या प्रशिक्षण स्थळी राहूनही कसलाही धडा घेत नाही आणि अल्लाहशी निडर होऊन व मोबदल्याच्या दिवसाशी बेपर्वा होऊन जीवन जगत असतो.

८. म्हणजे कियामतीचे घडून येणे अगदी अटळ बाब आहे आणि अशी कोणती ही शक्ति नाही जी मोबदल्यांच्या दिवसाला येण्यापासून रोखील.

९. पर्वत जमीनीतून उखडून हवेत धुलीकणांसारखे पसरतील. घराची जेव्हा नव्याने उभारणी करावयाची असते, तेव्हा जुने बांधकाम तळा सकट पाडले जाते अशाच प्रकारे या जगाची तोड फोड अशासाठी केली जाईल की एक नविन विश्व निर्माण केले जावे. असे विश्व ज्यात मनुष्य त्या पिकाची जे त्याने या जगात पेरले होते, कापणी करावी व आपल्या कर्माचे फळ प्राप्त करावे आणि याचेच नाव आखिरत आहे.

जे लोक असे समजतात की जमीन व आकाश नेहमी याच अवस्थेत राहतील ते निव्वळ भ्रमात पडले अहेत. शास्त्रज्ञ या सृष्टीचे आयुष्य अति दीर्घ सांगत असले तरी ते या गोष्टीचा इन्कार करू शकत नाही की कोणत्याही क्षणी ही सृष्टी अकस्मात अपघाताला बळी पडू शकते. जमीनीवर बाहयत: शांततेची कैफियक असते परंतु जमीनीच्या आतल्या भागातील वायू (गॅस) जेव्हा हालचाल करतात तेव्हा भूकंपाच्या धक्क्याने जमीनीचा पृष्ठभाग विदीर्ण होतो.

१०. म्हणजे आखिरत विषयी यांनी विविध प्रकारचे वाद उभे केले आहेत.आणि जन्नत व दोजखची थट्टा उडवित आहेत.

१४. ही आहे ती जहन्नम जिला तुम्ही खोटे ठरवित असत.

هذه النار التي كنتم بها تكذبون ﴿١٤﴾

१५. काय ही जादू आहे कि तुम्हाला सुचेनासे झाले आहे ?[११]

أفسحر هذا أم أنتم لا تبصرون ﴿١٥﴾

१६. दाखल व्हा यात.आता संयम पाळा किंवा पाळू नका तुमच्या करीता सारखेच आहे.[१२] तुम्हाला मोबदल्यात तेच दिले जात आहे, जे तुम्ही करीत राहीलात. [१३]

اصلوها فاصبروا أو لا تصبروا سواء عليكم إنما تجزون
ما كنتم تعملون ﴿١٦﴾

१७. नि:संशय मुत्तकी [१४] (अल्लाहचे भय बाळगून वागणारे) बागांमध्ये व ईश-देणग्यांमध्ये असतील.[१५]

إن المتقين في جنات ونعيم ﴿١٧﴾

१८. आनंद घेत असतील त्या ईश देणग्यांचा ज्या त्यांच्या पालन कर्त्याने त्यांना प्रदान केल्या असतील; आणि त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना जहन्नमच्या अजाब (ईश-शिक्षे) पासून सुरक्षित ठेवले असेल.

فاكهين بما آتاهم ربهم ووقاهم ربهم عذاب الجحيم ﴿١٨﴾

१९. खा आणि प्या मजेने आपल्या कर्मांच्या मोबदल्यास जे तुम्ही करीत राहीलात.

كلوا واشربوا هنيئا بما كنتم تعملون ﴿١٩﴾

२०. ते रांगे रांगेने आसनांवर टेका लावलेले असतील.[१७] आणि सुंदर नयनांच्या हूरां (अत्यंत रूपवान स्त्रीयां) शी यांचा विवाह करून देऊ.[१८]

متكئين على سرر مصفوفة وزوجناهم بحور عين ﴿٢٠﴾

२१. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व त्यांची संतती ही ईमानासह त्यांच्या मागोमाग चालली, आम्ही त्यांच्या संततीचाही त्यांच्याशी मिलाप करून देऊ.[१९] आणि यांच्या कर्मामधून काहीही कमी करणार नाही.[२०] प्रत्येक मनुष्य आपल्या कमाईच्या बदली गहाण आहे.[२१]

والذين آمنوا واتبعتهم ذريتهم بإيمان ألحقنا بهم
ذريتهم وما ألتناهم من عملهم من شيء
كل امرئ بما كسب رهين ﴿٢١﴾

११. म्हणजे जेव्हा पैगंबर तुमच्या समोर जहन्नमचे चित्र रेखाटत तेव्हा तुम्ही याला शब्दांची जादूगिरी सांगत आता बघा, जहन्नम एक वास्तविक हकीगत महणून हजर आहे की नाही? काय अजूनही तुम्हाला ही जादू असण्याची किंवा काही समजून न येण्याची शंका वाटते?

१२. म्हणजे आता शांततेने ईश-प्रकोप सहन करीत रहा किंवा किंचाळत राहा, तुमची कसलीही खबर घेतली जाणार नाही.

१३. म्हणजे जे तुम्ही पेरले होते तेच आज कापीत आहात. हा तुमच्या आचरणाचाच परिणाम होय जो तुम्हाला भोगणे क्रमप्राप्त आहे.

१४. खोटे ठरविणाऱ्यांच्या तुलनेत ईश भीरू लोकांचा उल्लेख केला जात आहे ज्यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की ईश भय बाळगणाऱ्यांशी अभिप्रेत ते लोक होत जे अल्लाह आणि मोबदल्याच्या दिवसावर ईमान बाळगून त्या दिवसाच्या उत्तरदायित्वाचे भय बाळगतात आणि दुराचारा पासून अगदी अलिप्त राहतात.

१५. म्हणजे जन्नतच्या बागांमध्ये व ईश देणग्यां मध्ये असतील.

१६. जहन्नमच्या ईश शिक्षे पासून सुरक्षित राखले जाणे हीच फार मोठी ईश देणगी होय.

१७. म्हणजे यांची आसने एकमेकांसमोर असतील अशासाठी की त्यांनी परस्पर वार्तालाप करावा. आणि ही आसने अतिशय आराम दायक असतील.

१८. याचे स्पष्टीकरण सूरह दुखान टीप क्र. ५५ मध्ये केले गेले आहे.

१९. ही ईमान बाळगणाऱ्या करीता शुभवार्ता आहे की त्यांची ती संतती जिने ईमान बाळगून त्यांच्या मागे चालून इस्लामची अनुयायी बनली त्यांची जन्नत मध्ये यांच्याशी गाठ घातली जाईल जेणेकरून यांच्या नेत्रांना शीतलता लाभवी त्यांना मानसिक सुख शांती प्राप्त व्हावी.

आता संततीशी गाठ कोणत्या प्रकारे घालून दिली जाईल ते जन्नत मध्ये पोहचल्यावरच कळेल. या संदर्भात अनुमानाच्या गोष्टी करणे योग्य नाही.

राहीली ईमान बाळगणाऱ्यांची अबोध संतती, ज्यांचा मृत्यु ते वयात येण्यापूर्वीच झाला तर हदीस वचनात हा संकेत मिळतो की ते जन्नत मध्ये असतील. (पहा बुखारी किताबुल जनायज बाब मा क़ाला फी औलादुल-मुस्लमीन).

ही आयत ईमान बाळगणाऱ्यांचे या गोष्टीकडे ही लक्ष वेधते की जर ते आपल्या संततीला आपल्या सोबत जन्नत मध्ये बघू इच्छितात तर त्यांच्या अंगी ईमानाचे तेज निर्माण करावे व त्यांना इस्लामचा सच्चा अनुयायी बनविण्याचा प्रयत्न करावा आजच्या काळातील मुसलमान आपल्या मुलाबाळांचे ऐहीक भवितव्य उज्वल बनविण्या करीता तर सर्व काही करण्यास तत्पर असतो परंतु त्यांची आखिरत सुधारण्या साठी मात्र काहीच काळजी घेत नाही आणि काही लोक आपल्या मुलांना धार्मिक शिक्षण देतात तर ते ही केवळ प्रथा म्हणून. आणि या गोष्टीकडून बेपर्वा होतात की यांच्यात सूज्ञतापूर्वक धार्मिकता निर्माण केली जावी व त्यांना असे प्रशिक्षण दिले जावे की त्यांनी अल्लाहचे भय बाळगावे व धर्माला पूर्णत: अंगिकारावे.

२०. म्हणजे संततीशी गाठ घालून देण्या करीता त्यांचा दर्जा घटविला जाणार नाही, किंबहुना ते आपल्या आचरणा नुसार ज्या दर्जास प्रात्र असतील त्यांना तोच दर्जा बहाल केला जाईल.

२१. म्हणजे कोणी ही या गोड भ्रमात राहू नये की संतती, मग ती कर्महीन का असेना, आई बाप सदाचारी आहेत म्हणून त्यांच्या योगे ते ही जन्नत मध्ये प्रवेश करतील. कदापि नव्हे; किंबहुना प्रत्येक मनुष्य आपल्या कर्माच्या बदली गहाण आहे; व आपल्या कृत कर्माना स्वत: जबाबदार आहे. मुत्त्की याच स्वरूपात होऊ शकते जेव्हा तो सत्कर्मासह हजर होईल आणि सत्कर्मा करीता ईमान अत्यावश्यक आहे. जर ईमान व सत्कर्म विरहीत जीवन तो जगला आहे तर कियामतीच्या दिवशी तो स्वत:ला सोडवू शकणार नाही आणि जहन्नमच्या महाभयंकर ईश शिक्षे पासून मुक्ति प्राप्त करू शकणार नाही.

२२. आणि ते ज्या प्रकारच्या मेव्यांची व मांसाची अभिलाषा करतील आम्ही त्यांना सतत देत राहू.[२२]

وَأَمْدَدْنَٰهُم بِفَٰكِهَةٍ وَلَحْمٍ مِّمَّا يَشْتَهُونَ ﴿٢٢﴾

२३. ते पुढे होऊन एकमेकांपासून अशा मद्याचे प्याले घेत असतील ज्यात ना वाहयातपणा (निरर्थकपणा) असेल आणि ना दुराचाराची एखादी गोष्ट.[२३]

يَتَنَٰزَعُونَ فِيهَا كَأْسًا لَّا لَغْوٌ فِيهَا وَلَا تَأْثِيمٌ ﴿٢٣﴾

२४. अशी सुंदर मुले त्यांच्या सेवेस लागलेली असतील की जणू लपवून ठेवलेली मौक्तिके होत ![२४]

وَيَطُوفُ عَلَيْهِمْ غِلْمَانٌ لَّهُمْ كَأَنَّهُمْ لُؤْلُؤٌ مَّكْنُونٌ ﴿٢٤﴾

२५. हे लोक एकमेकांकडे लक्ष देऊन (एकमेकांचा) हाल अहवाल विचारतील.

وَأَقْبَلَ بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ يَتَسَآءَلُونَ ﴿٢٥﴾

२६. म्हणतील, यापूर्वी आम्ही आपल्या कुटुंबियांमध्ये (अल्लाहचे) भय बाळगून राहात होतो.[२५]

قَالُوٓا إِنَّا كُنَّا قَبْلُ فِىٓ أَهْلِنَا مُشْفِقِينَ ﴿٢٦﴾

२७. तेव्हा अल्लाहने आमच्यावर उपकार केला आणि आम्हाला होरपळून टाकणाऱ्या ईश शिक्षे पासून वाचविले.[२६]

فَمَنَّ ٱللَّهُ عَلَيْنَا وَوَقَىٰنَا عَذَابَ ٱلسَّمُومِ ﴿٢٧﴾

२८. या पूर्वी आम्ही त्याला पुकारीत होतो.[२७] खरोखर तो मोठा उपकार कर्ता आणि दयाळू आहे.[२८]

إِنَّا كُنَّا مِن قَبْلُ نَدْعُوهُ ۖ إِنَّهُۥ هُوَ ٱلْبَرُّ ٱلرَّحِيمُ ﴿٢٨﴾

२९. तेव्हा (हे पैगंबर !) तुम्ही ताकीद करा. आपल्या पालनकर्त्याच्या कृपेने ना तुम्ही ज्योतिषी आहात आणि ना वेडसर.[२९]

فَذَكِّرْ فَمَآ أَنتَ بِنِعْمَتِ رَبِّكَ بِكَاهِنٍ وَلَا مَجْنُونٍ ﴿٢٩﴾

३०. काय हे लोक म्हणतात की हा कवी आहे, ज्याच्या करीता आम्ही कालचक्राची प्रतिक्षा करीत आहोत.[३०]

أَمْ يَقُولُونَ شَاعِرٌ نَّتَرَبَّصُ بِهِۦ رَيْبَ ٱلْمَنُونِ ﴿٣٠﴾

३१. (यांना) सांगा, तुम्ही प्रतिक्षा करा. मी देखील तुमच्या सोबत प्रतिक्षा करतो.[३१]

قُلْ تَرَبَّصُوا فَإِنِّى مَعَكُم مِّنَ ٱلْمُتَرَبِّصِينَ ﴿٣١﴾

२२. म्हणजे हे उत्कृष्ट खाद्य आम्ही त्यांना देतच राहू आणि ज्या प्रकारचे मेवे व मांस ते पसंत करतील ते त्यांना दिले जाईल.

या आयती वरून हे ही स्पष्ट झाले की मांसाहार जन्नत मध्ये ही असेल.

२३. म्हणजे नि:संकोच होऊन शुद्ध मद्याचे प्याले एकमेकांकडून घेतील ज्यावरून त्यांच्या परस्पर प्रेमाची कल्पना येते. जन्नतचे हे मद्य वाईट परिणामां पासून अगदी अलिप्त असेल. हे पिऊन मनुष्य ना वाहयात बडबड करील आणि ना एखादे दुष्कर्म. जगातल्या मद्यापासून ते अगदी वेगळे असे राहील आणि याने धुंदीची ती कैफियत निर्माण होईल ज्याचे अनुमान या जगात केले जाऊ शकत नाही.

२४. म्हणजे ज्या प्रकारे सुरक्षित ठेवलेले मोती स्वच्छ आणि चमकदार असतात त्याच प्रमाणे ही मुले स्वच्छ शुद्ध व सुंदर असतील जे जन्नत निवासी करीता स्नेह कारक असतील.

जन्नतचे विवरणात्मक चित्र जे कुरआनाने रेखाटले आहे ते वास्तव असल्याची खात्री मनात निर्माण करतो आणि हे कुरआनाचेच वैशिष्टय होय की त्याने एवढया खुलाशासह आणि तपशील वारपणे जन्नतचा अहवाल सादर केला आहे. या उलट जन्नतचा एवढा तपशीलवार व हृदयस्पर्शी परिचय, ना बायबल प्रस्तुत करते आणि ना अन्य धर्मांचे ते ग्रंथ जे पवित्र समजले जातात.

२५. म्हणजे आखिरतच्या उत्तरदायित्वा पासून गाफील होऊन आपल्या कुटुंबियांना ऐहिक सुख समृद्धि देण्यात मग्न नव्हते, तर आपली व आपल्या कुटुंबियांची आखिरत फलदायी करण्यात मग्न होते. आणि सावधगिरीने जीवन जगत होते की एखाद्या शरीअत विषयक आदेशाचे उल्लंघन न व्हावे.

२६. म्हणजे जहन्नमच्या ईश शिक्षे पासून ज्याची होरपळून टाकणारी शिक्षाच फार मोठी शिक्षा आहे.

२७. म्हणजे अल्लाहला एकमेव उपास्य समजून पुकारीत. त्याची उपासना करीत व त्यांच्याशी प्रार्थना (दुआ) करीत.

२८. जन्नतमध्ये ईमान बाळगणारे अल्लाहच्या त्या देणग्यांची कदर करतील ज्या त्याने दिल्या असतील आणि कृतज्ञतेच्या या भावने पोटी त्यांच्या मुखातून ही वचने निघतील.

२९. हे अनेकेश्वरवाद्यांच्या आरोपांचे खंडन आहे; जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ज्योतिषी व वेडा वगैरे म्हणत स्पष्टीकरणा करीता पहा सूरह शुअरा टीप क्र. १८० आणि सूरह हिज्र टीप क्र.८

३०. म्हणजे आम्ही असे बघू इच्छितो की परिस्थिती कोणते वळण घेते आणि या माणसाने प्रेषित्वाचा जो दावा केलेला आहे, त्याचा काय शेवट होतो.

३१. कुरआनाने ही गोष्ट अगदी दृढता पूर्वक सांगितली होती की जर तुम्ही या गोष्टीची वाट बघत असाल की पैगंबराचा या जगात कसा शेवट होतो तर वाट बघा. त्याचे सत्यत्व सिद्ध झाल्या खेरीज राहणार नाही आणि खोटे ठरविणारे दुष्परिणतीस पोहचल्या विना राहणार नाहीत. या घोषणे नंतर थोडयाच वर्षांनी कुर्आनाचे हे भाकित शब्द न शब्द खरे ठरले. पैगंबरास प्रतिष्ठा आणि वर्चस्व लाभले आणि त्यास खोटे ठरविणारे अपमानित होऊन मेले.

३२. काय यांची बुद्धि यांना असल्याच गोष्टी शिकविते कि हे आहेतच बंडखोर लोक?[३२]

أَمْ تَأْمُرُهُمْ أَحْلَامُهُم بِهَٰذَا ۚ أَمْ هُمْ قَوْمٌ طَاغُونَ ﴿٣٢﴾

३३. काय हे म्हणतात की या (कुरआना) ला याने स्वतःच रचले आहे? वस्तुस्थिती अशी की हे ईमान बाळगू इच्छित नाही.[३३]

أَمْ يَقُولُونَ تَقَوَّلَهُ ۚ بَل لَّا يُؤْمِنُونَ ﴿٣٣﴾

३४. जर हे (आपल्या कथनात) सच्चे आहेत तर या सारखी वाणी आणून दाखवावी.[३४]

فَلْيَأْتُوا بِحَدِيثٍ مِّثْلِهِ إِن كَانُوا صَادِقِينَ ﴿٣٤﴾

३५. काय हे एखाद्याने निर्माण केल्या विनाच निर्माण झालेत, कि हे स्वतःच (आपले) निर्माते होत?[३५]

أَمْ خُلِقُوا مِنْ غَيْرِ شَيْءٍ أَمْ هُمُ الْخَالِقُونَ ﴿٣٥﴾

३६. काय आकाशांना व जमीनीला यांनी निर्माण केले ? वास्तविक हे विश्वास बाळगत नाही.

أَمْ خَلَقُوا السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ ۚ بَل لَّا يُوقِنُونَ ﴿٣٦﴾

३७. काय तुमच्या पालन कर्त्याचे खजीने यांच्या जवळ आहेत कि त्यावर यांचा कब्जा आहे? [३६]

أَمْ عِندَهُمْ خَزَائِنُ رَبِّكَ أَمْ هُمُ الْمُصَيْطِرُونَ ﴿٣٧﴾

३८. काय यांच्या जवळ एखादी शिडी आहे की ज्यावर चढून ते (आकाशातील गोष्टीं ) ऐकतात? जर असे आहे तर ऐकणाऱ्याने स्पष्ट प्रमाण प्रस्तुत करावे.[३७]

أَمْ لَهُمْ سُلَّمٌ يَسْتَمِعُونَ فِيهِ ۖ فَلْيَأْتِ مُسْتَمِعُهُم بِسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿٣٨﴾

३९. काय त्याच्या करीता मुली आहेत आणि तुम्हा लोकांकरीता मुले ![३८]

أَمْ لَهُ الْبَنَاتُ وَلَكُمُ الْبَنُونَ ﴿٣٩﴾

४०. काय तुम्ही यांच्या कडून काही मोबदला मागता,[३९] की ते या दंडाच्या ओझ्याने दाबले जात आहे ?

أَمْ تَسْأَلُهُمْ أَجْرًا فَهُم مِّن مَّغْرَمٍ مُّثْقَلُونَ ﴿٤٠﴾

४१. काय यांच्या जवळ अपरोक्ष ज्ञान आहे की हे लिहीत असावेत ?[४०]

أَمْ عِندَهُمُ الْغَيْبُ فَهُمْ يَكْتُبُونَ ﴿٤١﴾

३२. म्हणजे पैगंबराच्या व्यक्तिमत्वास ज्योतिषी, वेडा, व कवी वगैरे म्हणून ज्या प्रकारे डागाळण्याचा हे लोक प्रत्यत्न करीत आहेत तर काय यांची बुद्धि खरोखर यांना हेच शिकवते? असे मात्र मुळीच नाही कारण विवेक बुद्धि अशा माणसाला वेडसर ठरवू शकत नाही ज्याच्या मुखातून बुद्धिकौशल्ययुक्त वचने निघत असावीत आणि ना हृदयस्पर्शी सत्यांना सादर करणाऱ्या व्यक्तिमत्वास ज्योतिषी ठरवू शकते. आणि ना प्रेषिताच्या मिशनला ज्याच्या सोबत जबरदस्त प्रमाण असते, कवीत्व म्हणून लेखू शकते. अर्थात हे की इन्कार करणाऱ्यांचे हे आरोप बुद्धिच्या चुकीच्या मार्गदर्शना मुळे नाही, किंबहुना त्यांच्या अंतरीचे अमांगल्य त्यांना अशा गोष्टी बोलण्यास उद्युक्त करीत आहे आणि ते आपल्या चुकीच्या भावना व इच्छा आकांक्षांच्या आहारी जाऊन अवज्ञा आणि विद्रोह करण्यास पवृत्त झाले आहेत.

३३. म्हणजे कुरआन अल्लाहची वाणी असणे एक स्पष्ट हकीगत आहे. परंतु ज्या अर्थी हे ईमान बाळगूच इच्छित नाही म्हणून यास पैगंबराचा स्वरचित ग्रंथ ठरवित आहेत.

आज देखील किती तरी लोक कुरआनास हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे लिखित अशासाठी ठरवितात की या ग्रंथाला अल्लाहची वाणी मानल्यास त्यांना ईमान बाळगणे व इस्लाम धर्माचा स्विकार करणे क्रमप्राप्त ठरेल.

३४. हे आव्हान होते त्या लोकांना ज्यांनी कुरआन मनोरचित असल्याचा दावा केला होता. आणि या आव्हानाची नंतरही अनेक सूरतींमध्ये पुनरावृत्ती केली गेली आहे परंतु या आव्हानाला प्रत्युत्तर ना त्या काळात कोणी देऊ शकले आणि ना नंतरच्या एखाद्या काळात. आणि ही वस्तुस्थिती आहे की कुरआन एक असा ग्रंथ आहे की ज्याला कोणतेही उदाहरण नाही. आणि ना पुढे प्रस्तुत केले जाऊ शकते. शब्दांची रचना, आयतींची बद्धता, वाणीचा प्रवाह, शैलीचा आगळेपणा आणि हृदयांना आकर्षित करणारे व आत्म्यास जागृत करणारे निवेदन हा अल्लाहचा चमत्कार असल्याचे डोळस प्रमाण होय.

कुरआन अल्लाहचा चमत्कार असल्याच्या वैशिष्टयां करीता पहा सूरह बकरा टीप क्र. ३०.

३५. हा मोठा बोचणारा प्रश्न आहे की मनुष्य निर्मात्या शिवाय निर्माण झाला आहे; कि तो स्वत:च आपला निर्माता आहे? उघड आहे, या दोन्ही गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट उचित नाही. मनुष्य एक निर्मिती आहे ही एक वस्तुस्थिती (Fact)आहे. आणि कोणतीही निर्मिती निर्मात्या शिवाय कशा प्रकारे अस्तित्वास येऊ शकते? दुसरी गोष्ट मनुष्य स्वत:च आपला निर्माता असावा ही कल्पना न करण्याजोगी व वस्तुस्थितीच्या विपरीत अशी बाब होय. जेव्हा माणूस अस्तित्वात ही नव्हता तेव्हा तो स्वत:च आपला निर्माता कसा बनला आणि जर मनुष्य आपला निर्माता आहे तर मग तो रचनेत नाविन्य कां निर्माण करीत नाही? काय एका साच्यात घडविल्यानंतर त्यांची निर्माण शक्ति संपुष्टात आली?

स्पष्ट झाले की समस्त ईश्वरीय गुण विशेषां सह एका रचयित्याचे अस्तित्व इन्कार न करण्याजोगी हकीगत आहे. आणि प्रत्येक माणसाच्या विवेकाची साद ही. आणि म्हणूनच कुरआनाच्या या आयती मनात खोलवर रूजत गेल्या. बुखारी या हदीस संग्रहात जुबेर बिन मुतअम यांचा प्रसंग सांगितला गेला आहे. ते फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मग़रीबच्या (सायंकालीन) नमाज मध्ये सूरह तूरचे पठण करीत होते. जेव्हा ते या आयतींप्रत पोहचले तेव्हा हृदयाची अशी अवस्था झाली की जणू ते धडधडू लागले आहे. (बुखारी किताबुत्तफसीर)

३६. म्हणजे जेव्हा हे ना अल्लाहच्या खजीन्यांचे मालक आहेत आणि ना त्यावर यांची काही सत्ता चालते की वाटेल त्याला वाटेल तितके द्यावे, तर मग यांचा गर्व, यांची घमेंड कशावर आहे? जेव्हा ते अल्लाहच्या योजनेनुसारच आपल्या वाटयाची उपजिविका प्राप्त करतात तेव्हा त्यांच्या अंगी अल्लाह उपास्य व खराखुरा ईश्वर असल्याची जाणीव निर्माण व्हावयास हवी.

३७. म्हणजे, काय यांच्याजवळ एखादे असे साधन आहे की ज्याद्वारे आकाशातल्या गोष्टी माहीत करून घेणे त्यांना शक्य व्हावे. जर कोणी या गोष्टीचा दावेदार आहे व त्याने आकाश विश्वातील गोष्टी ऐकून घेतल्या आहेत तर त्याने त्याबाबतचे स्पष्ट प्रमाण सादर करावे आणि जर असे नाही आणि वास्तविक पणे असे मुळीच नाही, तर मग ते ईश्वर, फरिश्ते व धर्म- संबंधाने ज्या गोष्टी बोलतात त्यांचे निष्पन्न काय?

३८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह साफात टीप क्र. १३१.

३९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह शूअरा टीप क्र.९८.

४०. काय यांच्यावर ईश-संदेश अवतरीत होतो ज्याला ते लिहून ग्रंथाचे स्वरूप देत असावेत. असे जर नाही आणि वस्तुत: असे मुळीच नाही, तेव्हा कोणत्या आधारावर ते या मार्गदर्शना पासून बेपर्वा होत आहेत जे कुरआनाच्या रूपाने अवतरीत होत आहे?

४२. काय हे एखादी चाल खेळू इच्छितात? जर असे आहे तर कुफ्र करणारेच या खेळीत अडकतील.[४१]

أَمْ يُرِيدُونَ كَيْدًا ۖ فَالَّذِينَ كَفَرُوا هُمُ
الْمَكِيدُونَ ﴿٤٢﴾

४३. काय अल्लाह खेरीज यांच्या करीता अन्य एखादे उपास्य आहे ? पवित्रतम आहे अल्लाह त्या गोष्टींपासून ज्यांना हे त्याचा सहभागी ठरवतात.

أَمْ لَهُمْ إِلَٰهٌ غَيْرُ اللَّهِ ۚ سُبْحَانَ اللَّهِ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿٤٣﴾

४४. हे लोक आकाशाचा एखादा तुकडा ही कोसळतांना पाहतील तरी म्हणतील, हे थरावर थर ढग आहेत.[४२]

وَإِنْ يَرَوْا كِسْفًا مِنَ السَّمَاءِ سَاقِطًا يَقُولُوا سَحَابٌ مَرْكُومٌ ﴿٤٤﴾

४५. तेव्हा यांना सोडा, येथपावेतो की हे आपल्या त्या दिवसाप्रत पोहोचावेत ज्यात त्याचा शुद्धी हरपेल.[४३]

فَذَرْهُمْ حَتَّىٰ يُلَاقُوا يَوْمَهُمُ الَّذِي فِيهِ يُصْعَقُونَ ﴿٤٥﴾

४६. ज्या दिवशी ना यांची एखादी चाल यांच्या कामी येईल आणि ना त्यांना एखादी मदत लाभेल.

يَوْمَ لَا يُغْنِي عَنْهُمْ كَيْدُهُمْ شَيْئًا وَلَا هُمْ يُنْصَرُونَ ﴿٤٦﴾

४७. आणि अत्याचारी करीता याच्या आधी ही ईश प्रकोप आहे [४४] परंतु यांच्या पैकी अधिकांश जाणत नाहीत.

وَإِنَّ لِلَّذِينَ ظَلَمُوا عَذَابًا دُونَ ذَٰلِكَ وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ
لَا يَعْلَمُونَ ﴿٤٧﴾

४८. (हे पैगंबर!) तुम्ही धैर्य पूर्वक आपल्या 'रब्ब' (स्वामी) च्या निर्णयाची प्रतिक्षा करा.[४५] तुम्ही आमच्या नजरेत आहात [४६] आणि आपल्या 'रब्ब' (पालन कर्त्या) चे प्रशंसे सह गुण गान करा, जेव्हा तुम्ही (झोपेतून) उठता.[४७]

وَاصْبِرْ لِحُكْمِ رَبِّكَ فَإِنَّكَ بِأَعْيُنِنَا ۖ وَسَبِّحْ بِحَمْدِ
رَبِّكَ حِينَ تَقُومُ ﴿٤٨﴾

४९. आणि रात्री ही त्याचे गुणगान करा [४८] आणि त्या वेळी ही जेव्हा तारे अस्तास जातात.[४९]

وَمِنَ اللَّيْلِ فَسَبِّحْهُ وَإِدْبَارَ النُّجُومِ ﴿٤٩﴾

४१. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फातिर टीप क्र. ७८ आणि सूरह तलाक टीप क्र. १७.

४२. म्हणजे यांचा हटवादीपणा असा की ते कोणत्याही ईश चमत्कारावर विश्वास ठेवणार नाहीत. जर आकाशाचा एखादा तुकडा खाली कोसळतांना त्यांना दाखविला गेला तरी त्याचा खुलासा ते असे करतील की हा थरावर थर असलेला ढग आहे. ते त्याच वेळी विश्वास करतील जेव्हा अल्लाहचा प्रकोप त्यांच्यावर कोसळेल.

४३. म्हणजे जेव्हा तुमचा उपदेश ऐकण्याकरीता हे तयार नाहीत तर त्यांना त्यांच्या दशेवरच सोडा कियामतीच्या दिवशी त्यांना माहीत पडेल, त्या दिवसाच्या भयानकतेने त्यांची शुद्धी हरपून जाईल.

काफिरांना त्यांच्या दशेवर सोडून देण्याचा हा आदेश उपदेशाच्या संबंधाने आहे अन्यथा जेहादच्या स्थितीत त्यांची मुस्कट दावी आवश्यक आहे. यास्तव मदनी काळात ठोशास ठोसा दिला गेला.

४४. म्हणजे कियामतीच्या अजाबा (ईश - प्रकोपा) आधी या जगातही अजाब आहे. अभिप्रेत तो अजाब जो पैगंबराना खोटे ठरविणाऱ्या जन समूहावर अवतरीत होतो. यास्तव अरबच्या अनेकेश्वर वाद्यांवर अल्लाहचा प्रकोप मुसलमानांच्या तरवारी द्वारे झाला आणि ते अपमानित होऊन मेलेत.

४५. ह्या सूरहच्या समारोपाच्या आयती होत आणि यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांत्वना ही दिली गेली आहे आणि अल्लाहचे प्रशंसापूर्ण गुणगान करण्याची ताकीद ही.

निर्णयाशी अभिप्रेत अल्लाहचा तो निर्णय होय जो काफिरांना शिक्षा देण्याकरीता दृगोचर होईल.

४६. म्हणजे हे पैगंबर! सर्वश्रेष्ठ अल्लाह तुमची देखरेख करीत आहे तेव्हा तुम्ही यांच्या कट कारस्थानांची काळजी करू नका.

४७. म्हणजे झोपेतून उठता क्षणी तुम्ही अल्लाहचे स्मरण करा त्याचे पावित्र्यासह गुणगान करा. यात संकेत आहे 'तहज्जुद' च्या नमाजकडे.

४८. यासत मग़रीब ईशा या दोन्ही नमाजींचा ही समावेश आहे आणि रात्रीच्या कालावधीत अल्लाहची स्तुतिप्रशंसासह गुणगानाची वचने मुखाने बोलणे ही की ही उपासना आहे आणि यामुळे अल्लाकडे मनाचा कल कायम राहतो.

४९. अभिप्रेत फज्र (प्रात:काळ) ची वेळ होय जेव्हा तारे अस्त पावतात. आकाशातील तारांगण ओस पडते. ही वेळ माणसाला व त्याच्या अचेत आत्म्याला जागृत करणारी असते. म्हणून या क्षणी गुणगान करण्याचा आदेश दिला गेला आहे ज्यात प्रात:कालीन (फज्र) नमाज सामील आहे.

# सूरह अन्-नज्म

# ५३. सूरह अन् नज्म

**नावः** सूरहचा आरंभ नज्म (ताऱ्यां)च्या शपथेने झाला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अन् नज्म' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. या सूरह मध्ये मेअराजच्या घटनेचा महत्वपूर्ण पैलू निवेदिला गेला आहे. यास्तव ही सूरह बनी इस्राईलच्या नंतरच अवतरली असावी.

बुखारी या हदीस संग्रहात हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद यांचे कथन उल्लेखिले गेले आहे की सर्वात पहीली सूरह ज्यात सजदा ए तिलावत (पठण करतांना करावयाचा सजदा) चा आदेश दिला गेला ती सूरह नज्म होय. यास्तव जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मसजिदे हराम मध्ये या सूरहच्या सजद्याच्या आयतीचे पठण करताना सजदा केला तेव्हा अनेकेश्वर वादींनी ही आपोआप सजदा केला. (बुखारी- किताबुत्तफसीर) या कथनाला तंतोतंत मान्य केले जाऊ शकता नाही. कारण सूरह इकरा याच्या फार आधी अवतरीत झाली होती ज्यात सजद्याची आयत आहे. आणि हब्श (ॲबिसिनिया) हून हिजरत (स्थलांतर) करण्यापूर्वी सूरह मरीयम ही अवतरीत झाली होती. ज्यात सजदाची आयत आहे. संभवत: हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद यांचा हा हेतु असावा की सूरह नज्म ही ती पहिली सूरह होय जिच्यातील सजद्याच्या आयतीवर अनेकेश्वरवाद्यांनी ही सजदा केला. असे दिसून येते की यांच्या या निवेदनाचा उल्लेख करण्यात कथन कर्त्याकडून काही भूल चूक झाली आहे.त्या भाष्य कर्त्यांच्या मताशी ही सहमत होता येणार नाही, जे सूरह नज्म ५ नबवीचे अवतरण सांगतात. त्यांच्या निवेदनातील विसंगति यावरून जाहीर होते की ते एकीकडे तर या सूरहला मेअराजच्या घटनेशी संबंधित मानतात जी यांच्या मते मदीनेहून हिजरतच्या काही वर्षे आधीची घटना आहे आणि दुसरीकडे सूरह नज्मला ज्यात मेअराजचा उल्लेख आहे ५ नबवीचे अवतरण दर्शवितात.

**मध्यवर्ति कल्पनाः** वही (ईश संदेश) आणि प्रेषित्वा संदर्भात त्या वस्तुस्थितींना सादर करणे ज्यांच्याद्वारे ईमान व विश्वास निर्माण होतो. आणि ज्योतिषी असल्याच्या आरोपाचे खंडन होते.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते १८ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी त्या शंकाचे निरसन केले गेले आहे ज्या 'वही' च्या संबंधाने अनेकेश्वरवादी सादर करीत होते आणि पैगंबरांच्या डोळयांनी केलेल्या अवलोकनास जे आकाश विश्वाशी संबंधित होते, एक सत्य घटना म्हणून सादर केले गेले आहे.

आयत क्र. १९ ते ३० मध्ये ईश-संदेशाला सोडून इच्छा आकांक्षांच्या मागे लागण्या बद्दल. आणि परिणामी शिर्क ग्रस्त होण्या व मोबदला आणि शिक्षेचा इन्कार करण्या बद्दल तंबी दिली गेली आहे. अशा रीतीने की या श्रद्धा तत्वांचे खोटे असणे अगदी स्पष्ट होते.

आयत क्र.३१ व ३२ मध्ये सत्कर्म करणाऱ्यांना अल्लाह तर्फे माफी व देणग्यांची शुभवार्ता ऐकविली गेली आहे.

आयत क्र ३३ ते ५५ मध्ये इन्कार करणाऱ्यांना विचार चिंतनाचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. ५६ ते ६२ सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची नज़ीर (भय दाखविणारा) असल्याची पात्रता स्पष्ट करताना कियामतीच्या दिवसा पासून खबरदार केले गेले आहे; आणि अल्लाहलाच सजदा करण्याचा व त्याचीच उपासना करण्याचा आदेश दिला गेला आहे.

# ५३- सूरह अन् नज्म

سورة النجم

(आयती - ६२)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. शपथ[१] आहे ताऱ्याची[२] जेव्हा तो अस्त पावेल.[३]

وَالنَّجْمِ إِذَا هَوَىٰ ①

२. तुमचा सोबती ना मार्गभ्रष्ट आहे आणि ना बहकलेला [४]

مَا ضَلَّ صَاحِبُكُمْ وَمَا غَوَىٰ ②

३. तो आपल्या इच्छेने बोलत नाही.

وَمَا يَنطِقُ عَنِ الْهَوَىٰ ③

४. हा तर एक ईश-संदेश आहे जो त्यावर (अवतरीत) केला जातो.[५]

إِنْ هُوَ إِلَّا وَحْيٌ يُوحَىٰ ④

५. त्याला जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्याने शिक्षण दिले आहे [६]

عَلَّمَهُ شَدِيدُ الْقُوَىٰ ⑤

६. जो मोठा शक्तिशाली आहे [७] तो सरळ उभा राहीला.[८]

ذُو مِرَّةٍ فَاسْتَوَىٰ ⑥

७. आणि तो अत्युच्च क्षितिजावर होता.[९]

وَهُوَ بِالْأُفُقِ الْأَعْلَىٰ ⑦

८. मग जवळ आला आणि अधांतरी राहीला .[१०]

ثُمَّ دَنَا فَتَدَلَّىٰ ⑧

९. येथपावेतो की दोन कमानी इतके, किंबहुना याहून ही कमी अंतर राहीले.[११]

فَكَانَ قَابَ قَوْسَيْنِ أَوْ أَدْنَىٰ ⑨

१०. तेव्हा त्याने ईश संदेश अवतरीत केला त्याच्या (अल्लाहच्या) दासाकडे जो काही अवतरीत केला.[१२]

فَأَوْحَىٰ إِلَىٰ عَبْدِهِ مَا أَوْحَىٰ ⑩

१. शपथ या ठिकाणी साक्ष या अर्थाने आहे. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तकवीर टीप क्र. १४

२. नज्म (तारा) या ठिकाणी वस्तू या अर्थाने आहे म्हणून यास अभिप्रेत तारे होत. केवळ एक तारा नव्हे.

३. ताऱ्यांच्या अस्तास जाण्याचे दृश्य माणसाला वैचारीक आवाहन करते. तारे जेव्हा अस्त पावू लागतात तेव्हा आकाशाची सजलेली मैफल समाप्त होते. यावरून एकीकडे तर ताऱ्यांचे ईश्वर असण्याचे, ते नशीबावर प्रभावशाली असण्याची आणि जगाच्या घडामोडीत व घटनांमागे त्यांचा हात असण्याचे खंडन होते, कारण जेव्हा ते स्वत:एका नियमास बद्ध व एका व्यवस्थेस बांधलेले आहेत तेव्हा ते ईश्वर आणि कर्ता करविता कसे होऊ शकतात. यास्तव ना तारका पूजा करीता एखादी शास्त्र विहीतता आहे आणि ना प्रमाण ची काही वास्तविकता आहे ज्यांच्या आधारे ताऱ्यांना शुभ अशुभ ठरविले जाते; व ज्योतिष विद्येचा कारभार चालवून लोकांना मार्गभ्रष्ट केले जाते. हा गोरखधंदा आज ही चालला आहे.

यास्तव वृत्तपत्रांच्या रकमान्यांमध्ये 'तारे काय म्हणतात? 'What Stars fore tell ?' आहे. च्या शिर्षकान्वये भविष्य काळाचा अहवाल, सांगितला जातो; आणि खोटी नाटी भाकिते केली जातात.

दुसरीकडे ताऱ्यांच्या अस्ताना जाण्याचे हे दृश्य सर्व सृष्टीच्या स्वामी व पालनकर्त्याचा परिचय प्रदान करते की या समस्त सृष्टीवर एका अशा शक्तिची अधिसत्ता आहे ज्याच्या महानतेपुढे सर्व काही तुच्छ आहे आणि तो मोठया बुद्धिकौशल्याने ही सृष्टी व्यवस्था सांभाळीत आहे. त्याच्या खेरीज अन्य एखाद्या पालनकर्त्याचे, उपास्याचे व घडामोडी करणाऱ्याचे या सृष्टीत कसले ही अस्तित्व नाही.

४. म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) तुमच्या करीता अनोळखी नाहीत, किंबहुना तुमच्या सोबतच त्यांनी जीवन व्यतीत केले आहे तेव्हा तुम्ही हे चांगल्या प्रकारे जाणता की ते चुकीच्या मार्गावर चालणारे व बहकलेल्या गोष्टी करणारे मनुष्य नाहीत. त्यांना तुम्ही केवळ या आधारावर चुकीच्या मार्गास लागलेला, व बहकलेला ठरविता की ते तुम्हाला एकेश्वरवाद व आखिरतवर ईमान बाळगण्याचे आवाहन करतात व स्वत:ला अल्लाहचा पैगंबर या नात्याने सादर कतात. वस्तुत: सृष्टीच्या चिन्हांवरून या गोष्टीची सत्यता स्पष्ट होते ज्याचे उदाहरण ताऱ्यांचे अस्त पावणे.

स्पष्ट असावे की मार्गभ्रष्टता, मार्गदर्शनाच्या विरूद्ध आणि बहकणे, सूज्ञतेच्या विरूद्ध बोलले जाते.

५. या ठिकाणी कुरआन संबंधी चर्चा आहे. म्हणून त्या बाबत असे म्हटले गेले आहे की हे कुरआन या माणसाने आपल्या इच्छेने रचले नाही; किंबहुना हा नखशिखान्त, अवतरीत झालेला ईश संदेश आहे जो कुरआनाच्या स्वरूपात याच्यावर अवतरला आहे.

यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे पद पैगंबराचे पद आहे तेव्हा त्यांच्या मुखातून निघालेली कोणतीही गोष्ट आत्मीय इच्छा आकांक्षांच्या आधारावर असू शकत नाही, किंबहुना त्या ज्ञानाच्या आधारावरच असू शकते जे सर्वश्रेष्ट अल्लाहने त्यांना प्रदान केले होते.

६.अभिप्रेत हजरत जिब्रील होते; जे फरिश्त्यांचे सरदार आहेत (पहा सूरह तक्वीर टीप क्र. २१ व २३)

७. म्हणजे हजरत जिब्रील अतिशय मजबूत व शक्तिशाली आहेत आणि त्यांना अल्लाहने असे सामर्थ्य व बळ प्रदान केले आहे की ते क्षणार्धात आकाशातून जमीनीवर येतात आणि त्यांच्या कार्यात जिन्न किंवा सैतान कोणी ही हस्तक्षेप करू शकत नाही.

८. हजरत जिब्रील पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समोर अशा प्रकारे प्रकट झाले की अगदी सरळ उभे राहीले यासाठी की पैगंबरांनी त्यांना चांगल्या प्रकारे बघावे.

९. ते आकाशाच्या अत्युच्च क्षितिजावर प्रकटले होते. अशासाठी की पैगंबरांनी त्यांना प्रकाशमय वातावरणात बघू शकावे.

१०. मग हजरत जिब्रील पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निकट आले व जमीनीवर पाय न टेकता आधांतरी उभे राहीले अर्थात जमीनीवर पाय टेकण्याची त्यांना गरज भासली नाही. ते फरिश्ता होते म्हणून हवेतच लोंबकळत उभे राहीले.

११. 'दोन कमानी इतके किंवा त्याहूनही कमी' हा अरबी भाषेचा वाक्प्रचार आहे. याचा अर्थ असा की हजरत जिब्रील क्षितीजावर प्रकटले होते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या इतक्या जवळ आले की दोन कमानी इतके वा त्याहून कमीच अंतर राहीले होते अशा प्रकारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हजरत जिब्रील ना त्यांच्या मूळ स्वरूपात स्पष्टत: पाहण्याची संधी मिळाली आणि यात कसल्याही संशयाला जागा उरली नाही.

स्पष्ट असावे की अरबी भाषेत اَو (अव) بَل किंवा (किंबहुना)च्या अर्थात ही येते (लिसानुल अरब खंड १४ पृ. ५४) यासाठी आम्ही यी आयतीत (اَو) 'अव'चा अनुवाद किबहुना केला आहे .

हजरत जिब्रील सर्वप्रथम गारे हिरा या गुफेत वही (ईश संदेश) घेऊन अवतरले होते आणि त्यानंतर पुन्हा पुन्हा

पैगंबरांजवळ वही घेऊन येत राहीले परंतु ज्या घटनेचा या ठिकाणी उल्लेख केला गेला आहे, तो जिब्रील यांना आपल्या मूळ स्वरूपात उड्डान शक्तिसह पाहण्याचा आहे. यास्तव हदीस वचनात असा उल्लेख आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत जिब्रील यांना पाहिले की त्यांचे सहाशे पंख आहेत. (मुस्लिम किताबुल ईमान)

१२. म्हणजे हजरत जिब्रील यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर इतक्या जवळ येऊन जो ईश संदेश द्यावयाचा होता तो दिला. अब्दाशी अभिप्रेत अल्लाहचे दास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत जसे प्रसंगोक्ति वरून स्पष्ट आहे आणि या ठिकाणी हे शब्द याच अर्थाने योग्य आहेत.

जे काही त्याने पाहिले, हृदयाने त्याला खोटे म्हटले नाही. तर काय तुम्ही या गोष्टीबाबत त्याच्याशी भांडता ज्याचे तो अवलोकन करतो. आणि याने आणखी एकदा त्याला अवतरतांना पाहिले आहे. सिद्रतुल मुन्तहा जवळ. (अल-कुर्आन)

مَا كَذَبَ الْفُؤَادُ مَا رَاٰى ﴿١١﴾

११. जे काही त्याने पाहिले, हृदयाने त्याला खोटे म्हटले नाही.[१३]

اَفَتُمٰرُوْنَهٗ عَلٰى مَا يَرٰى ﴿١٢﴾

१२. तर काय तुम्ही या गोष्टीबाबत त्याच्याशी भांडता ज्याचे तो अवलोकन करतो. [१४]

وَلَقَدْ رَاٰهُ نَزْلَةً اُخْرٰى ﴿١٣﴾

१३. आणि याने आणखी एकदा त्याला अवतरतांना पाहिले आहे.[१५]

عِنْدَ سِدْرَةِ الْمُنْتَهٰى ﴿١٤﴾

१४. सिद्रतुल मुन्तहा जवळ. [१६]

عِنْدَهَا جَنَّةُ الْمَاْوٰى ﴿١٥﴾

१५. ज्याच्या निकट 'जन्नतुल मावा' आहे. [१७]

اِذْ يَغْشَى السِّدْرَةَ مَا يَغْشٰى ﴿١٦﴾

१६. जेव्हा सिद्रा (जन्नत मधील बोरीच्या झाडा ) वर आच्छादित होत होते जे काही आच्छादित होत होते. [१८]

مَا زَاغَ الْبَصَرُ وَمَا طَغٰى ﴿١٧﴾

१७. दृष्टी ना वळली आणि ना मर्यादेच्या पुढे गेली.[१९]

لَقَدْ رَاٰى مِنْ اٰيٰتِ رَبِّهِ الْكُبْرٰى ﴿١٨﴾

१८. त्याने आपल्या पालन कर्त्याच्या मोठ मोठया निशाण्या पाहिल्या. [२०]

اَفَرَءَيْتُمُ اللّٰتَ وَالْعُزّٰى ﴿١٩﴾

१९. काय तुम्ही 'लात' व 'उज्जा'ला पाहीले?

وَمَنٰوةَ الثَّالِثَةَ الْاُخْرٰى ﴿٢٠﴾

२०. आणि आणखी एका 'मनात'ला जो तिसरा आहे ?[२१]

اَلَكُمُ الذَّكَرُ وَلَهُ الْاُنْثٰى ﴿٢١﴾

२१. काय तुमच्या करीता मुले आहेत आणि त्याच्या करीता मुली ?

تِلْكَ اِذًا قِسْمَةٌ ضِيْزٰى ﴿٢٢﴾

२२. ही तर मोठी अन्याय पूर्ण (तुच्छतेची) विभागणी झाली ![२२]

१३. म्हणजे हजरत जिब्रील यांच्या या प्रत्यक्ष अवलोकनाची पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अंत:करणाने सत्य समर्थन केले, त्यांना पूर्ण खात्री पटली की हे फरिश्ता हजरत जिब्रील हेच होते ज्यांना ते आपल्या उघडया डोळयांनी पाहात आहेत. यात नजरेला धोका असण्याचा किंचित मात्र संशय नव्हता.

१४. म्हणजे सर्व सामान्य मनुष्य फरिश्त्यास प्रत्यक्ष पाहू शकत नाही आणि ना त्याला 'वही'च्या अवतरणाचा अनुभव असतो. परंतु अल्लाह आपल्या पैगंबरास फरिश्त्याचे दर्शन ही घडवितो आणि त्याच्यावर 'वही'चे अवतरण ही करतो. आणि पैगंबराच्या निवेदनाच्या सत्यते बद्दल त्याचे पूर्ण व्यक्तिमत्व आणि ----ज्याची वही केली गेली प्रमाण असते.

१५. म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत जिब्रील यांना दुसऱ्यांदा ही त्यांच्या मूळ स्वरूपात पाहीले, ज्यावरून पहिल्या अवलोकनाचे समर्थन होते. दुसऱ्यांदा हजरत जिब्रील यांना त्यांच्या मूळ स्वरूपात पाहण्याची घटना मेअराजच्या प्रसंगी उद्भवली.

१६. 'सिद्रा'चा अर्थ बोरीचे झाड होय आणि मुन्तहाचा अर्थ पराकोटी असा आहे. अर्थात बोरीचे ते झाड, जे या सृष्टीच्या अंतिम टोकावर आहे. हदीस वचनातील उल्लेख असा की या झाडाला पैगंबरांनी मेअराज प्रसंगी सातव्या आकाशावर पाहिले.

बोरीचे झाड दाट व सावली देणारे असते. त्याची पाने सुगंधित असतात. यावरून या झाडा संबंधी, जे या विश्वाच्या अंतिम टोकावर आहे, पुसटशी कल्पना ध्यानी येते अन्यथा वरच्या विश्वाच्या गोष्टी आमच्या करीता संदिग्ध गोष्टींपैकी आहेत. ज्याची खरी हकीगत ना आमच्या बुद्धिच्या कक्षेत येऊ शकते आणि ना ते जाणून घेण्यास अगदी खोलवर जाण्याचा प्रयत्न करणे आमच्या करीता योग्य आहे.

१७. मूळ शब्द 'जन्नतुल मावा' याचा अर्थ ती जन्नत जी ईमान बाळगणाऱ्यांचे निवास स्थान असेल. यास्तव सूरह सजदा मध्ये फर्माविले गेले आहे की :-

اَمَّا الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَ عَمِلُوا الصّٰلِحٰتِ فَلَهُمْ جَنّٰتُ الْمَاْوٰى نُزُلًاۢ بِمَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ۔ (السجدہ:١٩)

''ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केली त्यांच्या करीता जन्नतच्या बागां (निवासस्थाना) आहे. त्यांच्या आचरणाचा मोबदला म्हणून आतिथ्य या नात्याने.'' (अस्सजदा-१९)

कुरआनाची ही आयत खुलासा करते की जन्नत आकाशात सिद्रतुल मुन्तहा जवळ आहे. आणि सिद्रतुल मुन्तहा जवळ जन्नतुल मआवा असण्यावरून ही गोष्ट लक्षात येते की ज्या ठिकाणी या विश्वाची मर्यादा संपते, तिथूनच जन्नतची हद्द सुरू होते आणि मेअराज मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहिं वसल्लम) या स्थळा पावेतो पोहोचले होते.

१८. ही अल्लाहची रहस्ये होती जी प्रकट झाली होती. जसे पुढे आयत क्र. १८ वरून संकेत मिळतो आणि ही गोष्ट की 'आच्छादीत होत होते जे काही त्यावर आच्छादित होत होते' ही रहस्ये अति भव्य असल्याचे जाहीर करते.

१९. अर्थात पैगंबरांची दृष्टी यथोचित रित्या त्या वस्तूंवर खिळून राहीली ज्या अल्लाहने त्यांना दाखविल्या आणि त्यांनी त्या गोष्टींना दृष्टीच्या निकोपतेसह पाहीले. त्यांना ना नजरेचा धोका झाला आणि ना त्यांची दृष्टी इकडे तिकडे ढळली. किंबहुना अगदी एकाग्रतेने त्यांनी त्या गोष्टींचे अवलोकन केले.

यावरून हे स्पष्ट झाले की मेअराज प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जे काही पाहीले ते त्यांचे प्रत्यक्ष अवलोकन होते; स्वप्न किंवा भास नव्हे आणि ही मेअराज केवळ आत्मीक नव्हती तर सशरीर होती.

२०. म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी वरच्या विश्वास अल्लाहच्या सामर्थ्याच्या आश्चर्यकारक गोष्टी पाहील्या ज्यात हजरत जिब्रील यांना त्यांच्या मूळ स्वरूपात त्यांच्या अत्युच्च उड्डाणाचे स्थळ सिद्रतुल मुन्तहा वर पाहणे ही सामील आहे. मेअराजच्या या घटनेच्या तपशील वार वृत्तांत हदीस वचनामध्ये निवेदिला गेला आहे. सूरह बनी इस्राईल मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना एका रात्रीत मसजिदे हराम पासून मसजिदे अकसा नेण्याचा उद्देश्य हा सांगितला गेला आहे की -

لِنُرِيَهٗ مِنْ اٰيٰتِنَا۔ (بنی اسرائیل:١)

''यासाठी की आम्ही त्यांना आपल्या निशाण्या दाखवाव्या'' (बनी इस्राईल - १)

لَقَدْ رَاٰى مِنْ اٰيٰتِ رَبِّهِ الْكُبْرٰى

'' नि:संशय त्याने आपल्या पालन कर्त्याच्या मोठमोठया निशाण्या पाहील्या.''

या निशाण्या पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रत्यक्षत: अशासाठी दाखविण्यात आल्या की अंतिम पैगंबर या नात्याने कियामती पावेतो लोकांवर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित व्हावे जेणेकरून पैगंबरांनी वही (ईश संदेशा) च्या माध्यमाने ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यात तिळमात्र

संशयाला ही जागा नाही. त्या गोष्टी विश्वासपूर्ण ज्ञानाच्या आधारावर आहेत. आणि पैगंबरांनी वरच्या विश्वाचे आपल्या डोळयांनी अवलोकन केले आहे म्हणून सृष्टीच्या रहस्य भेदांवरील आवरण ते दूर सारीत आहेत. ज्यावरून एकेश्वरवादाचा पैलू आणखी स्पष्टपणे समोर येतो व त्यासोबत आखिरतच्या साक्षी ही. हेच ते व्यक्तिमत्व होय जे सातव्या आकाशा पावेतो पोहचले. म्हणूनच त्याच्या ज्ञानाशी तुम्ही आपल्या ज्ञानाची तुलना करू शकत नाही यास्तव तो आपल्या या असामान्य ज्ञानाच्या प्रकाशात तुम्हाला जे मार्गदर्शन करीत आहे त्याला स्विकारणे म्हणजे आपले ध्येय उद्दिष्ट गाठणे होय.

या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आपल्या पालनकर्त्या (अल्लाह) ला पाहण्याचा कसलाही उल्लेख नाही किंबहुना त्याच्या निशाण्यांना पाहण्याचा उल्लेख आहे. म्हणून ज्या महाशयांचे हे म्हणणे आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मेअराज प्रसंगी अल्लाहला पाहीले होते, योग्य नव्हे. असे असते तर याचा उल्लेख या आयतींमध्ये निश्चितपणे केला गेला असता. कारण एवढी महत्वाची बाब या निवेदनातून कशी वगळली गेली असती. तसेच हजरत आयशा यांनी या गोष्टीचे जोरदार खंडन केले आहे. यास्तव बुखारी या हदीस संग्रहात या कथनाचा उल्लेख आहे :-

''हजरत आयशा यांनी मसरूक यांना फर्माविले की तीन गोष्टी अशा आहेत की ज्याने या मान्य केल्या त्याने अल्लाह बाबत फार मोठे असत्य रचले. मसरूक म्हणतात, मी विचारले, त्या कोणत्या? हजरत आयशा यांनी फर्माविले, (यापैकी एक ही की) जो मनुष्य असे समजेल की मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या पालन कर्त्यास पाहीले त्याने अल्लाहशी फार मोठे असत्य बांधले/जोडले.

(मुस्लिम किताबुल ईमान)

२१. हे अनेकेश्वर वाद्यांच्या मूर्तिंची नावे आहेत; ज्यांची ते पूजा करीत कुरआनाने यांच्या नावाचा उल्लेख करून शिर्क (अनेकेश्वरवादा) च्या या अभिव्यक्तिवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले आहे, अशासाठी की यांचे अवास्तव असणे स्पष्ट व्हावे आणि यांच्या भक्तगणांचे डोळे उघडावेत.

ही तिन्ही ही कुरेश व इतर कबिल्यांचा मोठया मूर्त्या (दैवते) होत्या. यांना ते आपले आराध्य दैवत मानत व त्यांची पूजा अर्चा करीत सूरह निसा मध्ये फर्माविले गेले आहे की -

اِنْ يَّدْعُوْنَ مِنْ دُوْنِهٖٓ اِلَّآ اِنٰثًا ۔ (نساء:۱۱۷)

'' हे लोक त्याला सोडून देवी-देवतांना पुकारतात'' (निसा - ११७)

आणि जसे पुढे आयत क्र. २१ व २६ वरून स्पष्ट आहे. हया फरिश्त्यांच्या मूर्त्या होत्या ज्याबाबत अनेकेश्वर वाद्यांची ही श्रद्धा होती की त्या ईश्वराच्या मुली आहेत. या नावांच्या हकीगतीविषयी खात्रीपूर्वक काही सांगणे कठीण आहे तरी ही यांच्या शाब्दिक स्वरूपावरून असे दिसून येते की :-

اللات 'अल् लात' हा शब्द الالٰہ अल-इलाह (ईश्वर,उपास्य) या शब्दातून काही अक्षरे वगळून आणि ت 'त' हे स्त्रीलींग वाचक अक्षर वाढवून बनविला गेला आहे. या शब्दावरून हे समजणे योग्य नव्हे की हा शब्द अल्लाह या शब्दाचे स्त्रीलींग रूप आहे. कारण 'अल्लाह' हे विशेषनाम व अद्वितीय आहे. आणि यापासून दुसरा कोणताही शब्द बनलेला (Derived) नाही. कुरआनातील उल्लेख असा -

هَلْ تَعْلَمُ لَهٗ سَمِيًّا (سورہ مریم:۶۵)

''काय तुमच्या माहीती प्रमाणे याच्या नावा सारखे नाव असलेला कोणी आहे?'' (मरीयम - ६५)

आणि अरबच्या अनेकेश्वर वाद्यांच्या ठायी ही अल्लाहचे नाव त्या अस्तित्वा करीता विशेषत्वाने होते जे सृष्टीला निर्माण करणारे व समस्त निर्मितीचे उपास्य आहे. ते याच्या करीता पत्नी म्हणून देवी मानणारे नव्हते किंबहुना ते फरिश्त्यांना याच्या मुली ठरवित असत.

'अल "اَلْعُزّٰى ، الاَعَزّ" हे चे स्त्रीलींगी रूप आहे. ज्याचा अर्थ आतीशय प्रतिष्ठा व वर्चस्व बाळगणारा. त्यांच्या मते ही मदत व वर्चस्वाची देवी होती, जिची त्यांनी मूर्ति बनविली होती. उहदच्या युद्धात अबू सुफीयान याने या मूर्तिचा जय जयकार करीत म्हटले होते :-

لَنَا الْعُزّٰى وَلَا عُزّٰى لَكُمْ

''आमच्या करीता उज्जा (देवी) आहे आणि तुमच्या करीता एक ही उज्जा नाही.''

आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी यांचे उत्तर अशा प्रकारे देण्यास फर्माविले :-

اللّٰهُ مَوْلَانَا وَلَا مَوْلٰى لَكُمْ

''आमचा स्वामी अल्लाह आहे आणि तुमचा कोणी ही स्वामी नाही.'' (तफसीर इब्ने कसीर खंड - ४ पृ २५३)

अल मनात मक्का व मदीना यांच्या दरम्यान कुदीर या स्थानी असलेली मूर्ति होती. ज्याच्या ठिकाणाहून अनेकेश्वरवादी एहराम बांधत असत. (बुखारी किताबुत्तफसीर)

ही तिसरी मोठी मूर्ति होती आणि कुरआनाने याला तिसरा संबोधून तीन ईश्वरांच्या वाईट श्रद्धेकडे संकेत केला आहे. त्रिमूर्ति (Trinity) ची श्रद्धा ख्रिश्चनांमध्ये होती. म्हणून त्यांनी पिता पुत्र आणि रूहूल कुदुसच्या नावाने तीन ईश्वर बनवले होते. आणि अरबच्या अनेकेश्वर वाद्यांनी लात. उज्जा व मनात या मूर्त्या घडवून देवींची श्रद्धा मनाने रचली होती.

भारतातील अनेकेश्वरवादी ही या बाबतीत मागे नाहीत, किंबहुना आणखीन जास्त या श्रद्धेत गुरफटलेले आहेत. यास्तव त्यांच्या ठायी तीन प्रमुख देवता ब्रम्हा, विष्णू व शिव' ची कल्पना आढळून येते. ज्यांनी त्रिमूर्तिचे स्वरूप धारण केले आहे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांनी मक्का विजयाच्या प्रसंगी आपल्या सहकाऱ्यांना पाठवून लात, उज्जा व मनात या तिघी ही मूर्त्या तोडविल्या होत्या. येथपावेतो की त्यांचे काही चिन्ह ही नावाला उरले नाही. या मूर्त्यांच्या ठायी जर खरोखर देवी वसत होत्या तर त्या आपल्या बचाव का करू शकल्या नाहीत?

२२. म्हणजे प्रथम तर एखाद्यास अल्लाहचा सहभागी ठरविणे वास्तवतेच्या विरूद्ध गोष्ट आहे. द्सरे म्हणजे त्याची अयोग्यता यावरून जाहीर होते की तुम्ही जी गोष्ट स्वत:करीता अप्रिय जाणता, तिला ईश्वरा करीता खास ठरविता. तुम्ही स्वत:करीता मुले पसंत करता आणि जेव्हा एखादी मुली तुमच्या घरी जन्माला येते तेव्हा तुम्ही तिला आपल्या साठी लज्जास्पद समजता. परंतु अल्लाह करीता मात्र हे समजता की फरिश्ते त्याच्या मुली आहेत. त्यानुसार लात, उज्जा व मनात या स्त्रीलींगी नावानी त्यांच्या मूर्त्या घडविल्या आहेत. ही अशी मूर्खतापूर्ण गोष्ट आहे की प्रत्येक समंजस मनुष्याला ती जाणवल्या शिवाय राहणार नाही.

२३. ही केवळ नावे होत जी तुम्ही व तुमच्या वाड वडीलांनी ठेवली आहेत. अल्लाहने यांच्या करीता कसली ही सनद अवतरीत केली नाही.[२३]हे लोक केवळ भ्रम व स्वेच्छा आकांक्षाचे अनुसरण करीत आहेत.[२४] वस्तुतः यांच्याजवळ यांच्या पालन कर्त्या तर्फे मार्गदर्शन येऊन पोहोचले आहे.[२५]

إِنْ هِيَ إِلَّآ أَسْمَآءٌ سَمَّيْتُمُوهَآ أَنتُمْ وَءَابَآؤُكُم مَّآ أَنزَلَ
ٱللَّهُ بِهَا مِن سُلْطَٰنٍ ۚ إِن يَتَّبِعُونَ إِلَّا ٱلظَّنَّ وَمَا تَهْوَى
ٱلْأَنفُسُ ۖ وَلَقَدْ جَآءَهُم مِّن رَّبِّهِمُ ٱلْهُدَىٰٓ ﴿٢٣﴾

२४. काय मनुष्य ज्या गोष्टीची ही अभिलाषा करील ती त्याला मिळेल ?

أَمْ لِلْإِنسَٰنِ مَا تَمَنَّىٰ ﴿٢٤﴾

२५. हे विश्व आणि आखिरत तर अल्लाहच्या अधिकार कक्षेत आहे.[२६]

فَلِلَّهِ ٱلْءَاخِرَةُ وَٱلْأُولَىٰ ﴿٢٥﴾

२६. आकाशात किती तरी फरिश्ते आहेत ज्यांची शिफारस काहीच उपयोगी पडू शकणार नाही मात्र या उपरान्त की अल्लाहने परवानगी द्यावी ज्याला तो इच्छिल व ज्याच्या हक्कात तो पसंत करील.[२७]

وَكَم مِّن مَّلَكٍ فِى ٱلسَّمَٰوَٰتِ لَا تُغْنِى شَفَٰعَتُهُمْ شَيْـًٔا إِلَّا مِنۢ
بَعْدِ أَن يَأْذَنَ ٱللَّهُ لِمَن يَشَآءُ وَيَرْضَىٰٓ ﴿٢٦﴾

२७. जे लोक आखिरत वर ईमान राखत नाही ते फरिश्त्यांना स्त्रीयांची नावे देतात.[२८]

إِنَّ ٱلَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِٱلْءَاخِرَةِ لَيُسَمُّونَ ٱلْمَلَٰٓئِكَةَ
تَسْمِيَةَ ٱلْأُنثَىٰ ﴿٢٧﴾

२८. वास्तविक यांना त्याचे काहीच ज्ञान नाही.[२९] ते केवळ भ्रमाचे अनुसरण करीत आहेत. आणि भ्रम सत्याच्या ठायी किंचित ही लाभ दायक नाही.[३०]

وَمَا لَهُم بِهِۦ مِنْ عِلْمٍ ۖ إِن يَتَّبِعُونَ إِلَّا ٱلظَّنَّ ۖ وَإِنَّ ٱلظَّنَّ
لَا يُغْنِى مِنَ ٱلْحَقِّ شَيْـًٔا ﴿٢٨﴾

२९. तेव्हा त्या लोकांकडे लक्ष देऊ नका ज्यांनी आमच्या स्मरणा[३१] पासून तोंड फिरवले आहे. आणि ज्यांचे उद्दिष्ट केवळ ऐहीक जीवन होय.

فَأَعْرِضْ عَن مَّن تَوَلَّىٰ عَن ذِكْرِنَا وَلَمْ يُرِدْ إِلَّا ٱلْحَيَوٰةَ
ٱلدُّنْيَا ﴿٢٩﴾

३०. यांच्या ज्ञानाची धाव येथपावेतोच आहे.[३२] तुमचा पालनकर्ताच अधिक चांगले जाणतो की कोण त्याच्या मार्गा पासून विचलीत झाला आहे आणि तोच अधिक चांगले जाणतो की कोण सन्मार्गावर आहे.

ذَٰلِكَ مَبْلَغُهُم مِّنَ ٱلْعِلْمِ ۚ إِنَّ رَبَّكَ هُوَ أَعْلَمُ بِمَن
ضَلَّ عَن سَبِيلِهِۦ وَهُوَ أَعْلَمُ بِمَنِ ٱهْتَدَىٰ ﴿٣٠﴾

२३. म्हणजे ही केवळ नावेच होत यांचे वास्तव स्वरूपात नाव अस्तित्वात नाही. या मूर्त्या खरे पाहता देवी नाहीत. त्यांच्या अंगी कसलाही ईश्वरी गुणधर्म नाही. मग त्यांना उपास्य बनविण्याचा काय अर्थ?

भारताच्या अनेकेश्वरवाद्यांनी ही अनेक देवी देवतांच्या मूर्त्या बनविल्या आहेत आणि ते असे समजतात की यांची पूजा अर्चा केल्याने ती दैवते प्रसन्न होतात; व यांच्या गरजा भागवितात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की ही केवळ काल्पनिक नावे मात्र होत. ना एखाद्या देवाचे अस्तित्व आहे आणि ना एखाद्या देवीचे आणि ना या मूर्त्यांमध्ये ईश्वराचा एखादा गुणधर्म आहे.

२४. जे लोक मूर्त्यांना उपास्य बनवितात त्यांच्या जवळ याच्या शास्त्रविहीततेचे कोणते प्रमाण आहे? त्यांना कसे ठाऊक की त्यांनीच आपल्या हातांनी घडविलेल्या मूर्त्यांमध्ये ईश्वरी गुणविशेष आहे? आणि यांना हे कसे ठाऊक की देवी देवतांचे ही अस्तित्व आहे? माणसाचा आणि समस्त सृष्टीचा निर्माता तर अल्लाह आहे त्याने याची कोणतीही सनद अवतरीत केली नाही. अल्लाहच्या कोणत्याही ग्रंथात आणि पैगंबरांच्या शिकवणीत या बाबत कसला ही निर्देश केला जाऊ शकत नाही. यास्तव मूर्तिपूजे करीता कसलाही ज्ञान विषयक आधार नाही, किंबहुना या केवळ भ्रमाच्या गोष्टी होत आणि आपल्या इच्छा-आकांक्षांच्या मागे आंधळेपणाने धावत आहेत.

श्रद्धा, खरे पाहता एखाद्या ठोस ज्ञान विषयक आधारावरच असू शकतो. परंतु अनेकेश्वरवाद्यांनी देवी-देवतांचे जे तत्व ज्ञान रचले आहे ते केवळ भ्रम व अटकळीच्या गोष्टींवर आधारीत आहे आणि ज्याअर्थी त्यांनी आपल्या धर्माचा पाया याच गोष्टींवर रचला आहे, म्हणून त्यांच्या इच्छा आकांक्षांनी त्यांना त्या गोष्टींने श्रद्धाळू बनविले आहे.

२५. म्हणजे जेव्हा त्यांच्या पालन कर्त्या तर्फे स्पष्ट मार्गदर्शन कुरआनच्या स्वरूपात उपलब्ध आहे तेव्हा आता मूर्तिपूजेला हे का म्हणून कवटाळू इच्छितात?

२६. म्हणजे मनुष्य जर आशा आकांक्षा व अभिलाषांच्या विश्वात जगू इच्छितो तेव्हा त्याला हे ठाऊक असले पाहीजे की कोणाच्या ही हातात काही ही नाही. या जगा संबंधीचे व आखिरतचे समस्त अधिकार अल्लाहच्या हाती आहे म्हणून त्याच्याशीच अपेक्षा बाळगल्या जाऊ शकतात. आणि या अपेक्षा त्याच्या मार्गदर्शनास कबूल करतांनाच बाळगल्या जाऊ शकतात.

२७. म्हणजे आकाशात असंख्य फरिश्ते आहेत. परंतु जो पर्यंत सर्वश्रेष्ठ अल्लाह यांच्यापैकी एखाद्यास शिफारस करण्याची अनुमति देत नाही व ज्याच्या करीता शिफारस, करणे पसंत करीत नाही तो पर्यंत यांची शिफारस कोणाच्या ही हक्कात लाभप्रद ठरणार नाही.

अरबचे अनेकेश्वरवादी फरिशत्यांना अल्लाह समोर शिफ़ारस करणारे समजत असत. अर्थात त्यांची अशी धारणा होती की जर आम्ही यांची पूजा अर्चा केली तर ते आपल्या भक्तगणां करीता अल्लाहजवळ शिफ़ारस करतील की त्याने आम्हाला अजाब-ग्रस्त न करावे. यास्तव जर आखिरतचा मामला उद्भवला तर हे फरिश्ते ज्यांची आम्ही पूजा करीत आहोत ते आम्हाला अल्लाहच्या शिक्षेपासून निश्चितपणे सोडतवतील. त्यांच्या या खोटया धारणेचे या ठिकाणी खंडन केले गेले आहे आणि हे स्पष्ट केले आहे की एखाद्या फरिश्त्याची ही अल्लाह समोर मजाल नाही की त्याने आपले म्हणणे स्विकारण्यास भाग पाडावे. कियामतीच्या दिवशी केवळ तेच फरिश्ते शिफारसी करीता आपले तोंड उघडू शकतात ज्यांना तशी अनुमति दिली जाईल व अशाच लोकांच्या करीता ते शिफारस करू शकतील ज्यांच्यासाठी शिफ़ारस करणे अल्लाहला पसंत पडेल. ही एक अपवादात्मक स्थिती असेल, जिचा लाभ अनेकेश्वर वादी व काफिर लोकांना कदापि पोहचू शकत नाही कारण शिर्क (अनेकेश्वरभक्ति) एक माफ न करम्या जोगा अपराध आहे. शिफारसीच्या आधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मरीयम टीप क्र. १११.

२८. जसे लात, उज्जा व मनात ही सर्व स्त्रीलींगी नावे होत. जसे की शब्द संदर्भा (Context) वरून स्पष्ट आहे. हया फरिशत्यांच्या मूर्त्या होत्या.

२९. अर्थात यांचे हे म्हणणे की फरिश्ते स्त्रीलींग आहेत व त्या देवी आहेत, ज्ञानावर आधारीत नाही, तर अज्ञानावर आधारीत आहे. यांना शेवटी हे कसे कळाले की फरिश्ते स्त्रीलींग आहेत व देवी आहेत?

३०. मूळ शब्द ظن **ज़न** अरबी भाषेत अनेक अर्थाने वापरला जातो या ठिकाणी भ्रम या अर्थाने वापरला गेला आहे. अनेकेश्वरवाद्यांची दैवते भ्रमातून निर्माण झाली आहेत. या उलट कुरआन एक ईश्वराची जी श्रद्धा सादर करीत आहे ती एक इन्कार न करण्याजोगी वस्तुस्थिती आहे. अर्थात भ्रमाच्या पोटी जन्मलेल्या या गोष्टींना सत्य व वास्तव गोष्टींच्या तुलनेत प्राधान्य देणे निरर्थक नव्हे तर काय?

स्पष्ट झाले की श्रद्धेची बाब अतिशय महत्वाची व मूलभूत बाब आहे जी सत्य-ज्ञानावर आधारीत असली पाहिजे. केवळ कयास व भ्रम कल्पनेवर नव्हे. अर्थात सत्य ज्ञानाच्या प्राप्तीचे साधन कुरआन होय. परंतु मुसलमानांच्या विविध

संप्रदायांनी श्रद्धेच्या बाबतीत ही प्रमाण दृष्टया कमकुवत व मनाने रचलेल्या हदीस वचनांच्या आधार घेतला आहे व त्यानुसारच कुरआनाच्या आयतीचा खुलासा करतात. अशा प्रकारे शिर्कने कबर पूजा व अवलीया भक्तिच्या स्वरूपात मुसलमानांमध्ये शिरकाव केला जर ते श्रद्धा बाबत कुरआनावर विसंबून राहीले असते, ज्याचे मार्गदर्शन अगदी काटेकोर आहे व त्याच्याशी विसंगत असलेल्या कथनांना रद्द ठरवले असते तर शिर्कच्या गुंतावळयात अडकले नसते कारण कुरआनात श्रद्धा स्पष्टपणे सांगितले गेले आहे व स्वत: कुरआनाने त्यास-----या अर्थाने घेतले आहे.

३१. अभिप्रेत कुरआन होय.

३२. म्हणजे ते नाही जाणत की या जगानंतर एक दुसरे जग ही (आखिरत) आहे. इहलोकाच्या कोठडीत त्यांनी स्वत:ला असे बंदिस्त करून घेतले आहे की ते एका दुसऱ्या विश्वाची, जिथे आचरणाचा चांगला वाईट मोबदला मिळेल, कल्पना देखील करत नाहीत. आखिरत विश्वाची जी झळक कुरआन यांना दाखवित आहे, त्यांना बघण्यास यांची संकुचित दृष्टी असमर्थ आहे. आणि म्हणूनच आज देखील मोठे मोठे शास्त्रज्ञ व आधुनिक ज्ञानाचे तज्ञ आखिरत बाबत अगदीच कोरे सिद्ध होत आहेत.

**आणि जे काही आकाशांमध्ये व जे काही जमीनीवर आहे सर्व अल्लाहचेच आहे (आणि त्याने अशासाठी निर्माण केले आहे) की ज्या लोकांनी दुष्कृत्ये केलीत, त्यांना त्यांच्या कर्माचा मोबदला द्यावा आणि ज्या लोकांनी सत्कृत्ये केलीत, त्यांना चांगला मोबदला प्रदान करावा. *(अल-कुर्आन)***

३१. आणि जे काही आकाशांमध्ये व जे काही जमीनीवर आहे सर्व अल्लाहचेच आहे (आणि त्याने अशासाठी निर्माण केले आहे) की ज्या लोकांनी दुष्कृत्ये केलीत, त्यांना त्यांच्या कर्माचा मोबदला द्यावा आणि ज्या लोकांनी सत्कृत्ये केलीत, त्यांना चांगला मोबदला प्रदान करावा.[३३]

وَلِلّٰهِ مَا فِى السَّمٰوٰتِ وَمَا فِى الْاَرْضِ ۙ لِيَجْزِىَ الَّذِيْنَ اَسَآءُوْا بِمَا عَمِلُوْا وَيَجْزِىَ الَّذِيْنَ اَحْسَنُوْا بِالْحُسْنٰى ۚ ﴿٣١﴾

३२. जे मोठ मोठे अपराध [३४] व उघड निर्लज्जतेच्या कामां [३५] पासून अलिप्त राहतात,या खेरीज की काही चुका त्यांच्या कडून घडतात [३६] नि:संशय तुमच्या पालन कर्त्याची क्षमा शीलता अति विशाल आहे.[३७] तो तुम्हाला अधिक चांगल्या प्रकारे जाणतो, जेव्हा त्याने तुम्हाला जमीनीतून निर्माण केले [३८] आणि जेव्हा तुम्ही आपल्या मातांच्या उदरात अर्भक होते.[३९] तेव्हा स्वत:ला स्वच्छ शुद्ध ठरवू नका. तोच अधिक चांगले जाणतो की कोण ईश भय बाळगून आहे.[४०]

اَلَّذِيْنَ يَجْتَنِبُوْنَ كَبٰٓئِرَ الْاِثْمِ وَالْفَوَاحِشَ اِلَّا اللَّمَمَ ؕ اِنَّ رَبَّكَ وَاسِعُ الْمَغْفِرَةِ ؕ هُوَ اَعْلَمُ بِكُمْ اِذْ اَنْشَاَكُمْ مِّنَ الْاَرْضِ وَاِذْ اَنْتُمْ اَجِنَّةٌ فِىْ بُطُوْنِ اُمَّهٰتِكُمْ ۚ فَلَا تُزَكُّوْٓا اَنْفُسَكُمْ ؕ هُوَ اَعْلَمُ بِمَنِ اتَّقٰى ﴿٣٢﴾

३३. काय तुम्ही त्याला पाहीले, ज्याने तोंड फिरविले.[४१]

اَفَرَءَيْتَ الَّذِىْ تَوَلّٰى ﴿٣٣﴾

३४. आणि थोडेसे दिले व थांबला.[४२]

وَاَعْطٰى قَلِيْلًا وَّاَكْدٰى ﴿٣٤﴾

३५. काय याच्या जवळ अपरोक्ष ज्ञान आहे की (ज्यामुळे) यास पाहात आहे.[४३]

اَعِنْدَهٗ عِلْمُ الْغَيْبِ فَهُوَ يَرٰى ﴿٣٥﴾

३६. काय याला त्या गोष्टींची खबर नाही पोहोचली ज्या मूसाच्या पोथींमध्ये आहे.[४४]

اَمْ لَمْ يُنَبَّاْ بِمَا فِىْ صُحُفِ مُوْسٰى ﴿٣٦﴾

३७. आणि इब्राहीमच्या [४५] ज्याने आपले वचन पूर्ण करून दाखवले. [४६]

وَاِبْرٰهِيْمَ الَّذِىْ وَفّٰٓى ﴿٣٧﴾

३८. (पोथींमधील) ही गोष्ट की कोणी ही ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही. [४७]

اَلَّا تَزِرُ وَازِرَةٌ وِّزْرَ اُخْرٰى ﴿٣٨﴾

३३. म्हणजे त्याने या सृष्टीला, जिचा तो एकमेव स्वामी आहे, या साठी निर्माण केले की त्याचा न्याय व दया गुणविशेष दिसून यावा, म्हणून हे आवश्यक ठरते की एक असा दिवस उगवावा जेव्हा माणसाने आपल्या कृत कर्माचे फळ भोगावे.

३४. मोठ मोठया अपराधांच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह निसा टीप क्र. ७९,

३५. निर्लज्जतेच्या गोष्टींच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अनआम टीप क्र. २७७.

३६. मूळ शब्द 'लमम' वापरला गेला आहे. ज्याच्या अर्थ अपराधाच्या जवळ जाणे असा आहे. लिसानुल अरब या शब्द कोषात हा उल्लेख आहे-

وَاللَّمَمُ:۔مقاربةالذنب۔ (لسان العرب ج ١٢ ص ٥٤٩)

''लमम म्हणजे अपराधाच्या जवळ जाणे'' (लिसानुल अरब खंड. १२ पृ. ५४९)

यास अभिप्रेत लहान लाहन अपराध व चूका होत, ज्या नकळत किंवा भावनेच्या आहारी जाऊन घडतात. आयतीचा अर्थ असा की सत्कर्म करणारे, ज्यांना अल्लाह चांगला मोबदला देईल, असे लोक होत जे मोठ मोठया अपराधात व निर्लज्जतेच्या कामात गुरफटत नाहीत, किंबहुना स्वत:ला अशा भयंकर अपराधांपासून दूर ठेवतात. तरी देखील दक्षता न घेतल्यामुळे अपराधांची किंचित सावट त्यांच्यावर पडण्याची शक्यता असू शकते. मात्र ते अपराधाच्या चिखलात अगदी खोलवर रूतत जातील हे कदापि शक्य नाही.

३७. म्हणजे मोठ मोठे अपराध व निर्लज्जतेच्या गोष्टींपासून स्वत:ला अलिप्त राखणाऱ्यांच्या हातून लहान सहान चूका घडल्या असतील म्हणून अल्लाह त्यांच्याशी अगदी सक्तीने वागणार नाही किंबहुना त्यांच्या चूकांवर आपल्या क्षमेचे पांघरूण घालील. कारण त्याची क्षमा शीलता अतिशय व्यापक आहे. ईश भय बाळगून दुराचारा पासून अलिप्त राहणाऱ्या सदाचारी लोकांसाठी ही फार मोठी शुभ वार्ता आहे.

या ठिकाणी ही गोष्ट ही विचाराधीन असावी की कुरआन व प्रेषित आचरणात स्पष्टत: असे सांगितले गेले नाही की अमुक अमुक अपराध लहान आहेत, या खेरीज की कोठे एखादा संकेत दिसून यावा. आणि याचे स्पष्टीकरण न करणेच बुद्धिकौशल्याची निकड होती अन्यथा लोकांनी या अपराधांना सौम्य जाणून सतत करू लागले असते. यास्तव लहान अपराधांच्या विवादात पडणे व त्यांना निर्धारीत करणे बुद्धिकौशल्य विपरीत बाब होय.

३८. म्हणजे मातीद्वारे निर्माण केले. तौरात मध्येही याचा उल्लेख आहे :-

'मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडिला व त्याच्या नाकपुडयांत जीवनाचा श्वास फुकिला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला.'(उत्पत्ति २:७)

३९. म्हणजे जेव्हा तुम्ही आपल्या मातेच्या उदरात जीवनाच्या प्रथमावस्थेत होता, तुम्हाला भान ही नव्हते; आणि एका खोळ,पिशवीत बंदीस्त होते. त्यावेळी तुमची जी अवस्था होती तिला अल्लाहच चांगल्या प्रकारे जाणत होता.

४०. ही तंबी होय की कोणी ही आपण अगदी स्वच्छ शुद्ध व पवित्र असल्याचे गृहीत धरू नये, किंबहुना स्वत:ला अपराधी समजून हा विश्वास बाळगावा की अल्लाहच आपल्या स्थितीचे अधिक चांगले ज्ञान बाळगतो. तो माणसाच्या अवस्थेशी त्या वेळी ही परिचित होता जेव्हा मातीद्वारे त्याची निर्मिती केली गेली आणि मग तो गर्भावस्थेत मातेच्या उदरात असतो. जेव्हा तो स्वत: आपल्या स्थितीशी अनभिज्ञ आहे तेव्हा कोणत्या आधारावर आपण निरपराधी व निरागस असल्याचा दावा करू शकतो? अल्लाहच त्याच्या स्थितीला त्याच्या जन्माच्या वेळी ही अधिक चांगले जाणून होता. मनुष्यत्वाच्या वैगुण्यांना ही तो चांगल्या प्रकारे जाणतो म्हणून त्याला चांगले ठाऊक आहे की कोण खऱ्या अर्थाने पाप भीरू आहे व कोणत्या पातळीचे ईश भय त्याच्या अंगी आहे.

४१. म्हणजे कुरआन व पैगंबरांच्या मार्गदर्शनास मान्य करण्या पासून तोंड फिरविले.

४२. म्हणजे गरजवंताना, दीन दुबळयांना काही दिले मग हात रोखला. ही अशा माणसाची वृत्ती आहे जो आपली धन संम्पत्ति दीन दुबळया गरजवंतांवर, आपल्या ऐपती प्रमाणे खर्च करीत नाही, उलट काही अल्प से 'दान' देऊन पीडा टाळण्याचे काम करतो, मनाची ही कृपणता त्याला ईमान बाळगण्यास प्रवृत्त करीत नाही जे त्याग व बलीदानाची अपेक्षा करतो.

यावरून हे दिसून आले की कृपाणता एक मानसिक रोग आहे जो माणसाला संचित दृष्टीचा बनवितो आणि हीच संकुचित दृष्टी त्याला सत्य स्विकारण्यापासून रोखते.

४३. म्हणजे असा मनुष्य हे समजतो की जर आखिरत प्रस्थापित झाली तर त्याची ही पारंपारीकय वरकरणी धार्मिकता त्यांना मुक्तिदायक ठरेल. अशा लोकांना हे आवाहन केले जात आहे की, त्यांनी मोकळया मनाने हा विचार करावा की त्यांचा हा दावा कोणत्या आधारावर आहे. काय त्यांनी अपरोक्षात झाकून पाहीले आहे की कियामतीच्या दिवशी यश कोणत्या गोष्टीवर अवलंबून असेल. जर असे नाही तर हे सर्व धार्मिक दावे पोकळ आहेत आणि सत्य तेच आहे ज्याला कुरआन व त्याचा पैगंबर सादर करीत आहे. कारण पैगंबर जे काही सादर करीत आहे ते त्या ईश संदेशाच्या आधारावर आहे, ज्यास

अल्लाह त्याच्यावर अवतरीत करीत आहे. आणि हा ईश संदेशच होय जो अपरोक्ष ज्ञानाचे साधन होय.

४४. मूसाच्या पोथींशी अभिप्रेत ‘तौरात’ होय.

४५. हजरत इब्राहीम यांची पोथी अतिशय प्राचीनतम पोथी होय. ज्यांचा कुरआनाने उल्लेख केला आहे. त्यांच्यापूर्वी जे पैगंबर होऊन गेलेत त्यांच्यावर ईश संदेश तर जरूर अवतरला आणि त्यांनी आपली शिकवण देखील आपल्या अनुयायांना दिली परंतु लिखि स्वरूपात त्यांना काही दिले गेल्याचा उल्लेख कुरआनात आढळत नाही. यावरून हे स्पष्ट होते की हजरत इब्राहीम यांच्या पोथींनाच सर्वात प्रथम स्थान प्राप्त राहीले. याद्वारे अन्य धर्मावलंबींच्या त्या दाव्यांचे खंडन होते जे आपल्या ‘पवित्र ग्रंथांना’ हजरत इब्राहीम यांच्या ही पूर्वीचे आकाशातून अवतरीत झालेले ईश-ग्रंथ असण्याचा दावा करतात.

हजरत इब्राहीम यांच्या पोथ्या तर आता राहील्या नाहीत आणि ना तौरात आपल्या मूळ स्वरूपात बाकी आहे.परंतु कुरआनाने यांच्या मूलभूत शिकवणींना आपल्या अंतरी सुरक्षित करून घेतले. पुढे या शिकवणींचा उल्लेख अतिशय चित्तवेधक शैलीत केला गेला आहे जो वाचतांना असे जाणवते की जणू हजरत मूसा व हजरत इब्राहीम यांच्या पोथ्याच वाचत आहोत.

४६. म्हणजे जे वचन हजरत इब्राहीम यांनी आपल्या पालनकर्त्याशी केले होते ते त्यांनी अगदी पूर्ण केले. त्यांची अनेक बलीदाने त्यांच्या एकनिष्ठतेचा पुरावा होय.

४७. म्हणजे कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाला आपल्या अपराधांचे ओझे स्वत:लाच उचलावे लागेल. त्या दिवशी कोणी ही दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही. लोकांनी या गोड भ्रमात राहू नये की ते ज्या धार्मिक प्रमुखांच्या व नेत्यांच्या मागे चालत आहेत, ते जर यांना मार्गभ्रष्ट करीत आहेत तर या मार्गभ्रष्टतेचे संकट त्यांच्यावरच कोसळेल व त्यांचे अनुयायी ईश शिक्षेपासून वाचतील. नव्हे, किंबहुना या मार्गभ्रष्ट नेत्या व प्रमुखांच्या मागे चालणारे आपल्या मार्गभ्रष्टतेस स्वत: जबाबदार ठरतील व याची शिक्षा ही त्यांना भोगावी लागेल कारण यांना अल्लाहने डोळे ही दिले होते, बुद्धि ही दिली होती व त्यांना मार्गदर्शनाचा मार्ग स्पष्टत: दर्शविला होता. मग का म्हणून ते आंधळे बनून मार्गभ्रष्टतेकडे बोलाविणाऱ्यांच्या मागे चालत राहीले.

आणि हे की माणसा करीता तेच आहे ज्याचा त्याने प्रयत्न केला. आणि हे की त्याचा प्रयत्न लवकरच पाहीला जाईल. मग त्याला पूरेपूर मोबदला दिला जाईल. आणि हे की शेवटी तुम्हाला आपल्या पालन कर्त्या जवळच पोहचायचे आहे. आणि हे की तोच हसवितो आणि रडवितो. *(अल-कुर्आन)*

३९. आणि हे की माणसा करीता तेच आहे ज्याचा त्याने प्रयत्न केला. [४८]

وَأَن لَّيْسَ لِلْإِنسَانِ إِلَّا مَا سَعَىٰ ٣٩

४०. आणि हे की त्याचा प्रयत्न लवकरच पाहीला जाईल. [४९]

وَأَنَّ سَعْيَهُ سَوْفَ يُرَىٰ ٤٠

४१. मग त्याला पूरेपूर मोबदला दिला जाईल.

ثُمَّ يُجْزَاهُ الْجَزَاءَ الْأَوْفَىٰ ٤١

४२. आणि हे की शेवटी तुम्हाला आपल्या पालन कर्त्या जवळच पोहचायचे आहे. [५०]

وَأَنَّ إِلَىٰ رَبِّكَ الْمُنتَهَىٰ ٤٢

४३. आणि हे की तोच हसवितो आणि रडवितो.[५१]

وَأَنَّهُ هُوَ أَضْحَكَ وَأَبْكَىٰ ٤٣

४४. आणि तोच मारतो आणि जिवंत करतो.[५२]

وَأَنَّهُ هُوَ أَمَاتَ وَأَحْيَا ٤٤

४५. आणि तोच होय ज्याने पुरूष व स्त्री ची जोडी निर्माण केली.

وَأَنَّهُ خَلَقَ الزَّوْجَيْنِ الذَّكَرَ وَالْأُنثَىٰ ٤٥

४६. एका थेंबा पासून जेव्हा तो टाकला जातो.[५३]

مِن نُّطْفَةٍ إِذَا تُمْنَىٰ ٤٦

४७. आणि हे की दुसऱ्यांदा निर्माण करणे ही त्याच्याच अधीन आहे.[५४]

وَأَنَّ عَلَيْهِ النَّشْأَةَ الْأُخْرَىٰ ٤٧

४८. आणि हे की त्यानेच श्रीमंत केले व धन सम्पत्ति दिली.[५५]

وَأَنَّهُ هُوَ أَغْنَىٰ وَأَقْنَىٰ ٤٨

४९. आणि हे की तोच ताऱ्याचा पालन कर्ता आहे.[५६]

وَأَنَّهُ هُوَ رَبُّ الشِّعْرَىٰ ٤٩

५०. आणि हे की त्यानेच आधीच्या आदचा विनाश केला.[५७]

وَأَنَّهُ أَهْلَكَ عَادًا الْأُولَىٰ ٥٠

५१. आणि समूदचा की कोणाला शिल्लक सोडले नाही. [५८]

وَثَمُودَ فَمَا أَبْقَىٰ ٥١

४८. ही आयत या बाबतीत परिपूर्ण पुरावा आहे की माणसाला त्याच कर्माचा मोबदला मिळेल जे त्याने केले असेल. अन्य एखाद्याच्या कर्माचा मोबदला त्याला प्राप्त होऊ शकत नाही. पुण्य त्याच माणसाला मिळेल ज्याने सत्कर्म केले असेल आणि याचे परिणाम जेथपावेतो पोहचतील त्या सर्वांबाबत मोबदल्यास तो पात्र ठरेल. यास्तव दुसऱ्या एका ठिकाणी फर्माविले गेले :-

مَنْ يَّشْفَعْ شَفَاعَةً حَسَنَةً يَّكُنْ لَّهٗ نَصِيْبٌ مِّنْهَا

''जो चांगल्या गोष्टींची शिफारस करील त्याला त्यात एक हिस्सा लाभेल''(निसा - ८५)

आणि हदीस वचनातील उल्लेख असा :-

مَنْ دَعَا اِلىٰ هُدًى كَانَ لَهٗ مِنَ الْاَجْرِ مِثْلُ اُجُوْرِ مَنْ تَبِعَهٗ لَا يَنْقُصُ ذٰلِكَ مِنْ اُجُوْرِهِمْ شَيْئًا۔ (مسلم کتاب العلم)

''ज्याने लोकांना ईश मार्गदर्शनाकडे बोलावले तर त्याला त्या लोकांप्रमाणे मोबदला मिळेल जे याचे अनुसरण करतील. त्यांच्या मोबदल्यात कसलीही कमतरता न करता. (मुस्लिम किताबुल इल्म)

आणखी एका हदीस वचनात स्पष्टत: फर्माविले गेले की-

اِذَا مَاتَ الْاِنْسَانُ اِنْقَطَعَ عَنْهُ عَمَلُهٗ اِلَّا مِنْ ثَلَاثَةٍ مِنْ صَدَقَةٍ جَارِيَةٍ اَوْ عِلْمٍ يُنْتَفَعُ بِهٖ وَ وَلَدٍ صَالِحٍ يَدْعُوْ لَهٗ۔ (مسلم کتاب الوصیۃ)

''जेव्हा मनुष्य मरण पावतो तेव्हा त्याचे आचरण वा कर्म स्थागित होते. तीन गोष्टी खेरीज, पैकी एक सदका जारीया (सतत चालत राहणारे) दुसरी, ते ज्ञान ज्या पासून लोकांनी लाभ घ्यावा आणि तिसरी, सदाचारी व सत्कर्मी संतती, जी त्याच्यासाठी प्रार्थना करील.'' (मुस्लिम -किताबुल वसीयत)

या तिन्ही गोष्टी अशा होत ज्यात माणसाच्या स्वत:च्या कर्माचा हस्तक्षेप आहे. सदका ए जारीया त्याचे स्वत:चेच कर्म होय ज्ञान विषयक सेवा की ज्यापासून लोक त्याच्या मृत्युनंतर लाभ घेतील, त्याच्या प्रयत्नांचा परिणाम होय आणि सदाचारी संतती जी त्याच्या करीता दुआ (प्रार्थना) करते त्यानेच संगोपन व शिक्षण दिलेली आहे. दुसऱ्या स्थितीत तो मोबदल्यास कसा पात्र ठरेल?

कुरआनाच्या या तात्विक शिकवणी नंतर ही जी स्पष्ट प्रमाणां पैकी आहे व ज्या संदर्भात हजरत इब्राहीम व हजरत मूसा यांच्या पोथींचा ही हवाला दिला गेला आहे, मुसलमानांमध्ये इसाले सवाबची प्रथा जी अगदी या शिकवणीच्या विरूद्ध आहे, प्रचलीत झाली आहे. आणि दावा असा केला जातो की एखादा मनुष्य आपल्या सत्कर्माचे पुण्य दुसऱ्या मुसलमानास देऊ शकतो. परंतु हा दावा प्रमाण विरहीत आहे. कारण ना कुरआनात असे काही सांगितले गेले आहे आणि ना हदीस वचनात. ज्या हदीस वचनांनी युक्तिवाद केला जातो, त्यांच्या द्वारे इसाले सवाब मुळीच सिद्ध होत नाही, किंबहुना जी गोष्ट सिद्ध होते, ती ही की मरणाऱ्याच्या वारसदारांना अशा कामांच्या पूर्ततेची अनुमति दिली गेली ज्यात त्याचा संकल्प व कर्म अध्यारूत होते. उदाहरणार्थ मृत्युपत्र, नजराणे इ. हा इसाले सवाब नव्हे तर त्या माणसाचे प्रतिनिधित्व आहे जो एक कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ राहीला अन्यथा जर पुण्याच्या स्थानांतरास योग्य ठरवले गेले तर मग जिवितां करीता ही इसाले सवाब योग्य ठरेल.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे 'तफहीमुल कुरआन'च्या रचयित्यानी ही इसाले सवाबच्या संदर्भात परस्परविरोधी विधाने केली आहेत. एकीकडे विद्वान भाष्यकार आयतीचे स्पष्टीकरण करतांना लिहीतात :-

''या कथनाद्वारे ही तीन महत्वपूर्ण तत्वे दिसून येतात एक हे की प्रत्येक मनुष्य जे काही प्राप्त करील आपल्या कर्माचे फळ पावेल. दुसरे हे की एका माणसाच्या कर्माचे फळ दुसऱ्याला लाभू शकणार नाही. या खेरीज की त्या कर्मात त्याचा स्वत:चा काही सहभाग असावा. तिसरे हे की कोमताही मनुष्य प्रयत्न व कर्मा शिवाय काही ही साध्य करू शकत नाही.''

(तफहीमुल कुरआन खंड - ५ पृ. २१५)

आणि दुसरीकडे ते काही हदीस वचनांना युक्तिवाद म्हणून सादर करून इसाले सवाबला उचित ठरवितात. आम्ही दीर्घता टाळत या ठिकाणी त्यांनी प्रस्तुत केलेल्या हदीस वचनांचे निरीक्षण सादर करीत आहोत.

(१) बुखारी, मुस्लिम इत्यादींमध्ये कथन उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी दोन मेंढरे घेऊन एक आपल्या तर्फे व आपल्या कुटुंबियां तर्फे कुर्बान केले (बळी दिला) आणि दुसरे आपल्या समस्त मुस्लिम जनसमूहा तर्फे. परंतु यात इसाले सवाब करीता कोणतेही प्रमाण नाही. कारण संपूर्ण मुस्लिम जनसमूहा तर्फे मेंढरू कुर्बान करणे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता खास होते आणि समस्त मुस्लिमांचा पालक या नात्याने त्यांनी ही कुर्बानी केली होती, जी जिवंत असलेल्या तर्फे ही होती आणि भविष्यात जन्माला येणाऱ्या मुस्लिमां तर्फे ही. जर याला इसाले सवाबचे प्रमाण ठरविले जावे तर मग असंख्य जिवित व मृत तसेच पुढे जन्माला येणाऱ्या मुस्लिमां

तर्फे एक मेंढरूची कुर्बानी योग्य ठरेल. वास्तविक हे कोणालाही मान्य नाही.

(२) बुखारी, मुस्लिम या हदीस संग्रहात कथन उल्लेखित आहे की एका माणसाने पैगंबराना विचारले, माझ्या आईचा अचानक मृत्यु झाला आहे. माझा असा विचार आहे की जर त्यांना बोलण्याची संधी मिळाली असती तर त्यांनी जरूर सदका (दान) करण्यास सांगितले असते आता जर मी त्यांच्या तर्फे सदका करेन तर काय त्यांच्या करीता मोबदला आहे? पैगंबर म्हणाले, हो.

या हदीस वचनातील शब्दच हे दर्शवितात की त्या माणसाच्या आईला बोलण्याची संधी लाभली असती तर तिने आपल्या धन सम्पत्तितून सदका करण्याची वसीयत केली असती; आणि ज्याअर्थी तशी संधी मिळाली नाही म्हणून तिच्या इराद्यास वसीयतच्या जागी समजून सदका करण्याची अनुमति दिली गेली. या वरून ज्या गोष्टीची शास्त्रविहीतता दिसते ती ही की जर एखाद्याचा अचानक मृत्यु व्हावा आणि हे गृहीत धरले जावे की त्याला संधी मिळाली असती तर त्याने आपल्या धन सम्पत्तितून काही दान करण्याची ताकीद जरूर केली असती, तर त्याचे वारसदार त्याच्या तर्फे सदका (दान) करू शकतात. कारण यात मरणाऱ्याचा इरादा व त्याने मागे सोडलेली धनसंपदा दोन्ही सामील आहेत. परंतु यावरून इसाले सवाबचा पुरावा मिळत नाही.

(३) मस्नद अहमद या हदीस संग्रहात अब्दुल्लाह बिन अमर व बिन आस आसचे कथन उल्लेखित आहे की त्यांचे आजोबा आस बिन वाईल यांनी अज्ञानकाळात शंभर उंट बळी देण्याचा नवस मानला होता. त्यांचे काका हिशाम बिन अल आस यांनी आपल्या हिश्श्याचे पन्नास उंट बळी दिले. हजरत अमर बिन अल आस यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले की मी काय करावे. त्यावर पैगंबरानी फर्माविले, जर तुमच्या पित्याने एकेश्वर वाद मान्य केला होता तर तुम्ही त्यांच्यातर्फे रोजा पाळा किंवा दानधर्म करा. तो त्यांच्या करीता लाभदायक ठरेल.

हे हदीस वचन ही निकोपतेच्या अटीवर नवसाशी संबंधित आहे आणि याचा लाभ हाच की मुलगा, बापाच्या मरणा नंतर त्याचा मानलेला नवस पूर्ण करू शकतो, जर तो (तौहीद (एकेश्वर वादा) वर कायम राहून मेला होता. यात प्रथम तर नवस मानणाऱ्याच्या इराद्याचा हस्तक्षेप आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या नवसाला त्याचा वारसदार पूर्ण करीत आहे. वास्तविक तो मरण पावल्यामुळे आपला नवस पूर्ण करण्यास असमर्थ आहे. आता याचा इसाले सवाबशी काय संबंध? मग हे हदीस वचन प्रमाण दृष्टया कमकुवत आहे. मस्नद अहमद या हदीस संग्रहात (खंड - २ पृ. १८२) हे कथन अमर बिन शुएब द्वारे उल्लिखित आहे आणि अमर बिन शुएब यांच्या विश्वसनीय व्यक्ती असण्या बद्दल हदीस ज्ञात्यांमध्ये मतभेद आहे. हाफिज इब्ने हजर यांनी यांच्या विषयी विविध कथने उल्लेखिली आहेत. इब्ने मुईन म्हणतात ते स्वत: विश्वसनीय आहेत परंतु जेव्हा ते आपले पिता व त्यांच्याकरवी आपल्या आजोबांतर्फे कथन उल्लेखितात तर ते प्रमाण ठरण्या जोगे राहात नाही आणि ना निकटचे असते किंबहुना प्रमाण दृष्टया कमकुवत असते जे 'मुर्सल' सारखी आहे. (तहजीबुत-तहजीब खं.८ पृ५४)

यास्तव या हदीस वचनाने युक्तिवाद करणे उचित नव्हे.

(४) मस्नद अहमद, अबू दाऊद, नसाई आणि इब्ने माजा इ. हदीस संग्रहात हजरत हसन बसरी द्वारे उल्लेखित आहे की हजरत सअद बिन उबैदा यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले, की माझ्या आईचे निधन झाले आहे तर काय मी तिच्या तर्फे सदका (दान धर्म) करावा? पैगंबरांनी फर्माविले, हो.

हे कथन हजरत हसन बसरी यांचे आहे आणि हसन बसरी सअद बिन उबैदा यांच्या मृत्युनंतर जन्मास आले म्हणून यांच्या दरम्यानचा एक कथनकर्ता सुटला आहे. म्हणून हे हदीस वचन 'मुर्सल' आहे जे प्रमाण ठरू शकत नाही. मात्र सही बुखारी मध्ये हजरत आयशा यांच्याद्वारे उल्लेखित आहे की एका माणसाने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर होऊन म्हटले. हे अल्लाहचे प्रेषित, माझ्या आईचे अचानक निधन झाले आहे आणि मी असे समजतो की जर ती काही बोलली असती तर तिने निश्चित दानधर्म केला असता. आता जर मी तिच्या तर्फे सदका करीन तर काय तिला याचा मोबदला मिळेल? पैगंबर म्हणाले, हो. (बुखारी किताबुल जनायज)

या हदीस वचनावर इमाम बुखारी यांनी

مَوْتُ الْفَجْأَةِ بَغْتَةً

''अकस्मात मृत्यु'' चे प्रकरण रचले आहे. इसाले सवाबचे नव्हे. अशा प्रकारे त्यांनी 'किताबुल वसाया' मध्ये प्रकरण रचले आहे.

مَا يُسْتَحَبُّ لِمَنْ يُتَوَفَّى فَجْأَةً اَنْ يَتَصَدَّقُوا عَنْهُ وَقَضَاءِ النُّذُوْرِ عَنِ الْمَيِّتِ۔

''ज्याचा अकस्मात मृत्यु झाला असेल, त्याच्या तर्फे सदका करणे व मयत इसमा तर्फे नवस पूर्ण करणे पुण्यकर्म

होय' या अनुषंगाने इमाम बुखारी यांनी दोन हदीस वचने उल्लेखिली आहेत. एक तर तेच हजरत आयशा यांचे कथन होय, जे वर उल्लेखिले गेले आहे आणि दुसरे इब्ने अब्बास द्वारे की सअद बिन उबैदा यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना फतवा (शरीअतचा आदेश) विचारला की माझ्या आईचे निधन झाले आहे व तिच्यावर नवसाचे ओझे आहे. त्यावर पैगंबरांनी फर्माविले, तुम्ही तिच्या तर्फे नवस पूर्ण करा. विचार करण्या सारखी गोष्ट अशी की इमाम बुखारी यांनी या हदीस वचनावर इसाले सवाबचे प्रकरण नाही रचले, किंबहुना मयत व्यक्ति कडून नवस वगैरे पूर्ण करण्या संबंधीचे प्रकरण रचले. थोडक्यात म्हणजे या हदीस वचनांना इसाले सवाबच्या समर्थनार्थ प्रस्तुत केले जाऊ शकत नाही.

(५) दार कुतनी या हदीस संग्रहात हजरत अली द्वारे उल्लेखित आहे की, ज्यात ते निवेदन करतात की पैगंबरानी असे फर्माविले, ज्या माणसाचे कब्रस्तानातून जाणे झाले आणि त्याने अकरा वेळा قل هو الله احد 'कुलहुव अल्लाहु अहद' ही सूरह पठन करून तिच्या पठणाचे पुण्य मृत इसमाला पोहचविले तर जेवढे मृत माणसे असतील तेवढेच पुण्य प्रदान केले जाईल.

हे हदीस वचन दार-कुतनी या हदीस संग्रहात कोठे ही आढळून आले नाही आणि अल्लामा नासिरूद्दीन अल बानी यांनी ही 'सिलसिलतुल अहादीसुल ज़ओफा या ग्रंथात हाफिज सखावीचे हे कथन उल्लेखित आहे की दार कुतनीच्या 'सुनन' मध्ये याचे काहीच अस्तित्व नाही. अल्लामा अल्बानी म्हणतात की दियाल्मी व अबुयल्मी यांनी हे कथन उल्लेखिले आहे परंतु हे हदीस वचन मौजू (मनाने रचलेले) आहे. याचा एक कथन कर्ता अब्दुल्लाह बिन अहमद बिन आमीर आहे ज्याच्या संदर्भात 'मिजानुल एतेदाल' मध्ये असा उल्लेख आहे की तो हदीस वचन मनाने रचत असे. 'सीवती' ने ही यात मनाने रचलेली ठरविले आहे आणि हाफीज सखावीने लिहीले आहे की याचे कथन कर्ता अब्दुल्लाह व त्यांचे पिता दोघे ही खोटारडे आहेत. आणि जर या वचनात काही वास्तविकता असती तर ते या मतभेदाच्या समस्येत प्रमाण ठरले असते आणि मतभेद राहीला नसता.

(सिलसिलतुल अहादीसतुल ज़ओफा खंड ३ पृ. ४५२)

सर्वश्रेष्ठ अल्लाह माफ करो मौलाना मौदूदीना. त्यांनी इसाले सवाबला सिद्ध करण्या करीता एक मनोरचित हदीसचा आपल्या भाष्यात उल्लेख केला व त्याच्या निकोपते बाबत संशोधन करण्याची तसदी घेतली नाही.

इसाले सवाब विषयी त्यांनी सूरह बकरा-आयत क्र २८६ चे भाष्य करतांना लिहीले आहे-

'कोणत्याही स्थितीत हे शक्य नाही की ज्या सत्कृत्यात वा ज्या दृष्कृत्यात माणसाचा संकल्प, प्रयत्न व कर्माचा काही हिस्सा नसावा, त्याचा मोबदला वा शिक्षा त्याला मिळावी कारण आचरण ही स्थानांतरीत करण्या जोगी वस्तू नाही'

(तफ्हीमुल कुरआन खंड १ पृष्ठ - २२४)

परंतु सूरह नज्मच्या भाष्यात त्यांनी मोठया दिलेरीने इसाले सवाबला उचित ठरविले आहे.

इसाले सवाबचे एक स्वरूप 'कुरआन ख्वानी' आहे ज्याचा रिवाज सध्या सर्व सामान्य झाला आहे. कुरआनाचा अर्थ समजून घेण्यात आणि त्याच्या मार्गदर्शना पासून लाभ घेण्यात मुसलमानांना तेवढे स्वारस्य नाही जेवढे कुरआन ख्वानीची बैठक भरवून मृतांना बख्शविण्यात आहे. त्यांनी या पारंपारीक धार्मिकतेला सोडून इस्लामचे प्रामाणिकपणे अनुसरण केले असते तर त्यांच्या किती हिताचे झाले असते!

'इसाले सवाब' वर अधिक चर्चे करीता पहा सूरह हा मीम अस्सजदा टीप क्र. ७१.

४९. माणसाकरीता हे शक्य झाले आहे की तो आपल्या किंवा अन्य एखाद्याच्या हालचालींना विडीओ कॅसेट मध्ये सुरक्षित करून पुन्हा पुन्हा त्या बघाव्यात. तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने तर याहून अधिक उच्च रित्या प्रत्येक माणसांच्या चांगल्या वाईट कृत्यांचे चित्रिकरण करण्याचा इतमान केला असेल. आणि कियामतीच्या दिवशी निश्चितच त्याच्या आचरणांची विचारपूस केली जाईल.

५०. म्हणजे माणसाचे अंतिम ध्येय अल्लाह समोर पोहोचणे आहे. म्हणून माणसाने याची काळजी घेतली पाहीजे. यावरून त्या अनेकेश्वरवादी श्रद्धेचे खंडन होते की मनुष्य मेल्यानंतर अल्लाह मध्ये विलीन होतो. अल्लाहचे अस्तित्व या गोष्टी पासून पवित्र आहे की त्याच्यात एखादी गोष्ट वा अस्तित्व विलीन व्हावे.

५१. सर्वश्रेष्ठ अल्लाहने जनावराच्या तुलनेने माणसाला ही श्रेष्ठता प्रदान केली आहे की तो हसतो ही आणि रडतो ही. ती एक सूज्ञ अशी ईश-निर्मिती आहे म्हणून जेव्हा माणूस आनंदित होतो, तेव्हा हसू लागतो आणि जेव्हा दु:खी होतो तेव्हा त्याचे नेत्र सजल होतात. ही संवेदना अल्लाहनेच प्रदान केली आहे, अन्य एखाद्याने नव्हे. परंतु देवी-देवता मानणाऱ्यांची श्रद्धा मोठी विचित्र आहे. खालील उद्धृत केलेल्या परिच्छेदा वरून त्यांच्या खोटया श्रद्धेची कल्पना येते -

"There is a Deva for every organ, for every function, for every limb and for every disease. In fact as we have said

the whole of the Body will be found to have been exhaustively partitioned among the Devas''

(Out lines of Vedanta by R. Krishna Swamy Aiyar. Chetna Publications Mumbai P. 152)

म्हणजे प्रत्येक अवयव, त्याचे प्रत्येक कर्म, प्रत्येक बाजू व प्रत्येक आजारा करीता एक वेगळा देव आहे आणि या देव-गणांच्या दरम्यान संपूर्ण शरीर विभागले गेले आहे.

سُبْحَانَهٗ وَتَعَالٰى عَمَّا يُشْرِكُوْنَ۔

अल्लाह पवित्रतम आहे अशा गोष्टींपासून ज्या त्याच्या सहभागी ठरविल्या जातात.

५२. जीवन-मृत्यु त्याच्याच हाती आहे. मनुष्य इतका अगतिक आहे की-

**''अपनी खुशी न आए , न अपनी खुशी चले''**

मग तो घमेंड कोणत्या गोष्टीवर करतो!

५३. म्हणजे मनुष्य फक्त एक थेंब गर्भाशयात टाकण्याचे काम करतो आणि तो अल्लाहच होय जो या पाण्याच्या तुच्छ थेंबा पासून मानवा सारखी उच्चतम निर्मिती तयार करतो.

५४. म्हणजे माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करणे अल्लाहने आपल्या जबाबदारी वर घेतले आहे म्हणून तो निश्चितच आपला वायदा पूर्ण करील.

५५. म्हणजे दारिद्याच्या स्थितीतून बाहेर काढणारा ही तोच आहे. आणि धन संपदा प्रदान करणारा ही तोच आहे.

५६. मूळ शब्द 'शिअरा' हे एका सफेद चमकदार ताऱ्याचे नाव होय याला इंग्रजीत Sirius म्हणतात. तारका-पूजक जन समूह आपल्या अंधश्रद्धे पायी याची पूजा करीत आला होता. आणि अरबस्तानातील काही अनेकेश्वरवादी कबीले याची पूजा वगैरे करीत. म्हणून कुरआनाने विशेषत्वाने याचा उल्लेख केला की हा तारा रब्ब (पालनकर्ता) नव्हे की याला उपास्य बनविले जावे, किंबहुना याचा पालनकर्ता ही अल्लाहच आहे आणि तोच सर्वांचा खरा पालनकर्ता व उपास्य आहे. अर्थात हजरत इब्राहीमच्या पोथी मध्ये हीच हकीगत सांगितली गेली आहे.

५७. अभिप्रेत हूद जनसमूह होय जो अल्लाहच्या प्रकोपाने नष्ट झाला . (स्पष्टीकरणा साठी पहा-सूरह एहकाफ टीप क्र.४०-४१)

५८. समूद जनसमूहाच्या विनाशाचा उल्लेख ही तपशीलासह सूरह हूद आणि इतर अनेक सूरतींमध्ये केला गेला आहे.

आणि त्यांच्या पूर्वीच्या नूह जन समूहाचा. ते अतिशय जुलमी व बंडखोर होते.आणि पालथलेल्या वस्त्यांना ही पाडून टाकले. तेव्हा यांच्यावर आच्छादित केले जे काही आच्छादित केले. तेव्हा, आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या निशाण्यांबाबत तुम्ही शंका धराल. *(अल-कुर्आन)*

५२. आणि त्यांच्या पूर्वीच्या नूह जन समूहाचा.[५९] ते अतिशय जुलमी व बंडखोर होते.

وَقَوْمَ نُوحٍ مِّن قَبْلُ ۖ إِنَّهُمْ كَانُوا هُمْ أَظْلَمَ وَأَطْغَىٰ ﴿٥٢﴾

५३. आणि पालथलेल्या वस्त्यांना ही पाडून टाकले.[६०]

وَالْمُؤْتَفِكَةَ أَهْوَىٰ ﴿٥٣﴾

५४. तेव्हा यांच्यावर आच्छादित केले जे काही आच्छादित केले.[६१]

فَغَشَّاهَا مَا غَشَّىٰ ﴿٥٤﴾

५५. तेव्हा, आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या निशाण्यांबाबत तुम्ही शंका धराल.[६२]

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكَ تَتَمَارَىٰ ﴿٥٥﴾

५६. हा खबरदार करणारा आहे, त्या खबरदार करणाऱ्यां पैकी, जे पूर्वी येऊन गेलेत.[६३]

هَٰذَا نَذِيرٌ مِّنَ النُّذُرِ الْأُولَىٰ ﴿٥٦﴾

५७. येणारी वेळ (घटिका) जवळ येऊन ठेपली आहे.[६४]

أَزِفَتِ الْآزِفَةُ ﴿٥٧﴾

५८. अल्लाह खेरीज तिला जाहीर करणारा कोणी नाही. [६५]

لَيْسَ لَهَا مِن دُونِ اللَّهِ كَاشِفَةٌ ﴿٥٨﴾

५९. काय या गोष्टी बद्दल तुम्हाला आश्चर्य वाटते.[६६]

أَفَمِنْ هَٰذَا الْحَدِيثِ تَعْجَبُونَ ﴿٥٩﴾

६०. हसता आणि रडत नाही.[६७]

وَتَضْحَكُونَ وَلَا تَبْكُونَ ﴿٦٠﴾

६१. आणि गफलतीत पडला आहात. [६८]

وَأَنتُمْ سَامِدُونَ ﴿٦١﴾

६२. तर (ऐका) अल्लाहला सजदा करा आणि त्याचीच इबादत (उपासना) करा.[६९]

فَاسْجُدُوا لِلَّهِ وَاعْبُدُوا ۩ ﴿٦٢﴾

५९. नूह जनसमूहाच्या विनाशाचा उल्लेख ही सूरह हूद आणि इतर अनेक सूरतींमध्ये केला गेला आहे.

६०. अभिप्रेत लूत जनसमूहाच्या वस्त्या होत ज्या भूकंपा द्वारे पालथ्या घातल्या गेल्या होत्या. आणि जमीनीच्या आतल्या स्फोटाने जो लाव्हा रूपात उसळला, त्याने वस्तींना वर उचलून खाली पाडले. आज त्या ठिकाणी समुद्रच समुद्र आहे. ज्याला मृत सागर म्हणतात.

६१. म्हणजे भाजलेल्या दगडांचा वर्षाव झाला.पाहा सूरह हूद टीप क्र. ११९

६२. मूळ शब्द آلاء ‘आलाय’ याचा अर्थ सर्वसामान्यत: ‘ईश देणग्या’ असा केला जातो परंतु वर जनसमूहांच्या विनाशाचा उल्लेख केला गेला आहे. म्हणून हा अनुवाद या ठिकाणी उचित नाही. आम्ही अरबी काव्यात या शब्दाचा वापर व प्रसंगोक्तिस ध्यानी घेत याचा अनुवाद ‘निशाण्या’ असा केला आहे. या शब्दाचे अधिक स्पष्टीकरण सूरह रहमान मध्ये अल्लाहने इच्छिल्यास केले जाईल. या आयती सोबत हजरत मूसा यांच्या पोथींचे निवेदन संपले.

६३. म्हणजे हा पैगंबर ही त्या पैगंबरां सारखाच आहे , जे पूर्वी होऊन गेलेत, खबरदार करणारा आहे आणि त्या सावध करणाऱ्यांच्या समूहाशीच संबंधित आहे.

६४. अभिप्रेत कियामतीची वेळ, जिच्या विषयी कोणीही असे समजू नये की अजून फार लांब आहे. नव्हे, किंबहुना ती अगदी जवळ येऊन ठेपली आहे आणि दिवसे. दिवस जवळ येत चालली आहे. जगातील सद्य स्थितीचे वातावरण असे आहे की चोहोकडून कियामतीच्या अलार्म (Alarm) ऐकू येतो.

६५. म्हणजे कियामत त्याच वेळेस प्रकट होईल जेव्हा अल्लाह तिला प्रकट करू इच्छिल. अल्लाहखेरीज कोणी ही तिला प्रकट करू शकत नाही.

६६. म्हणजे कियामत घडून येण्याबद्दल तुम्हाला आश्चर्य वाटत आहे आश्चर्य तर तिचा इन्कार करणाऱ्यांबद्दल वाटले पाहीजे कारण कियामतीचे घडून येणे उचित ही आहे व न्यायाची निकड ही.

६७. म्हणजे कियामतीची वार्ता ऐकून तुम्ही हास्य-विनोद करता वास्तविक तुम्हाला हे ऐकून रडायला हवे, या विचाराने की न जाणो त्या दिवशी आमची काय दशा होईल.

कुरआन अंत:करणात कंप निर्माण करतो आणि विशेषत: तो कियामतीच्या ज्या भयानक अवस्थे विषयी सावध करतो, तिला जर मनावर घेतले तर त्याच्या अंगी भयकंप निर्माण होईल व आपल्या मुक्तिची काळजी तो घेईल. ज्या योगे डोळयातून नकळत अश्रूधारा वाहू लागतील.

६८. म्हणजे तुमच्या गफलतीची ही हद्द झाली की मनाचा थरकाप उडविणाऱ्या गोष्टी ऐकून ही तुम्ही पालथ्या घडया सारखेच राहतात.

६९. म्हणजे शुद्धीवर या आणि अल्लाह समोर मन:पूर्वक झूका सजदा करा व त्याचीच उपासना करा केवळ त्याचीच उपासना. बायबल मध्ये ही हीच गोष्ट सांगितली गेली आहे-

> ‘‘परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर व त्याचीच सेवा कर.’’ (लूका-४:८)

ही सजद्याची आयत होय म्हणून हिचे पठण केल्यानंतर सजदा केला पाहीजे. बुखारी या हदीस संग्रहात कथन उल्लेखित आहे की ‘‘पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सूरह नज्मच्या पठणावर सजदा केला आणि त्यांच्या सोबत मुसलमान, अनेकेश्वरवादी जिन्न व मानवांनी ही सजदा केला.’’

(बुखारी-किताबुत्तफसीर)

# सूरह अल् कमर

# ५४. सूरह अल् कमर

**नावः** पहिल्या आयतीत कमर (चंद्रा) च्या विदीर्ण होण्याचा उल्लेख केला गेला आहे. त्या अनुषंगाने या सूरहचे नाव कमर आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. हजरत आयशा यांचे निवेदन आहे की जेव्हा आयत

بل الساعة موعدهم والساعة ادهى وامر

'किंबहुना यांच्याशी कियामतीचा वायदा आहे आणि कियामत मोठी सक्त आणि मोठी कडवट आहे'. (आयत क्र. ४६) अवतरली, तेव्हा मी अल्पवयीन मुलगी होते व खेळत होते. (बुखारी - किताबुत्तफसीर) यावरून असे दिसून येते की या सूरहचे अवतरण सन १० नबवीच्या सुमारास झाले असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** कियामत आणि अल्लाहच्या प्रकोपा पासून खबरदार करणे आणि पैगंबरास खोटे ठरविणाऱ्यांना सावध करणे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ५ मध्ये काफिरांना (इन्कार करणाऱ्यांना) ठणकावून विचारले गेले आहे की आता ज्याअर्थी कियामतीची चिन्हे जाहीर झाली आहेत आणि त्या ऐतिहासिक घटना ही की ज्यात बोध प्रद गोष्टी आहेत. यांना कळाल्या आहेत तरी देखील ते आपल्या कुफ्र नितीवर अटळ कसे?

आयत क्र. ६ ते ८ मध्ये स्पष्ट केले गेले आहे की हे कट्टर काफिर त्याच वेळी शुद्धीवर येतील जेव्हा कियामतीचा उदय होईल.

आयत क्र. ९ ते ४२ मध्ये संक्षिप्तपणे त्या जन समूहांची परिणति सांगितली गेली आहे ज्यांनी पैगंबरांना खोटे ठरविले होते की ते कशा प्रकारे या जगातच ईश-प्रकोपाच्या तावडीत सापडले.

आयत क्र. ४३ ते ५३ मध्ये कुरेश जन समूहाला संबोधून त्यांना कियामतीच्या कटूते बाबत खबरदार केले आहे.

आयत क्र. ५४ व ५५ सूरहच्या समोरोपाच्या आयती होत ज्यात ईश भय अंगिकारून दुराचारा पासून दूर राहणाऱ्या लोकांना जन्नतची खुश खबर दिली गेली आहे.

# ५४. सूरतुल कमर

سُورَةُ الْقَمَرِ

आयती-५५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. कियामतची वेळ जवळ आली आणि चंद्र दुभंगला.[१]

اقْتَرَبَتِ السَّاعَةُ وَانْشَقَّ الْقَمَرُ ﴿١﴾

२. आणि या लोकांची दशा अशी आहे की एखादी निशाणी पाहतात तर त्या पासून तोंड फिरवितात आणि म्हणतात, ही तर जादू आहे जी चालत आली आहे.[२]

وَإِنْ يَرَوْا آيَةً يُعْرِضُوا وَيَقُولُوا سِحْرٌ مُسْتَمِرٌّ ﴿٢﴾

३. त्यांनी खोटे ठरविले आणि आपल्या इच्छा-आकांक्षाचे अनुसरण केले. आणि प्रत्येक मामल्या करीता एक वेळ निर्धारीत आहे.[३]

وَكَذَّبُوا وَاتَّبَعُوا أَهْوَاءَهُمْ ۚ وَكُلُّ أَمْرٍ مُسْتَقِرٌّ ﴿٣﴾

४. यांच्या जवळ त्या ऐतिहासिक घटनांच्या खबरी पोहचल्या आहेत ज्यात तंबीची पुरेशी सामग्री आहे.[४]

وَلَقَدْ جَاءَهُمْ مِنَ الْأَنْبَاءِ مَا فِيهِ مُزْدَجَرٌ ﴿٤﴾

५. अतिशय प्रभावशाली बुद्धिकौशल्य, परंतु तंबींचा यांच्यावर काही परिणाम होत नाही.[५]

حِكْمَةٌ بَالِغَةٌ ۖ فَمَا تُغْنِ النُّذُرُ ﴿٥﴾

६. तेव्हा यांच्या पासून तुम्ही अलिप्त व्हा.[६] ज्या दिवशी पुकारणारा यांना एका अत्यंत अप्रिय गोष्टीकडे बोलाविल.[७]

فَتَوَلَّ عَنْهُمْ ۘ يَوْمَ يَدْعُ الدَّاعِ إِلَىٰ شَيْءٍ نُكُرٍ ﴿٦﴾

७. त्यांच्या नजरा अपमानाने झुकलेल्या असतील.[८] आणि अशा प्रकारे कबरींमधून निघतील की जणू इतस्ततः पसरलेले टोळ.[९]

خُشَّعًا أَبْصَارُهُمْ يَخْرُجُونَ مِنَ الْأَجْدَاثِ كَأَنَّهُمْ جَرَادٌ مُنْتَشِرٌ ﴿٧﴾

१. चांद्राच्या दुभंगण्याची घटना जी मक्केपासून जवळ मीना या ठिकाणी सुमारे ८ नबवी मध्ये घडली. कुरआन व अहादीस सहीह दोघांद्वारे सिद्ध आहे. आणि समस्त भाष्यकारांचे या बाबत एक मत आहे. कुरआनाची ही आयत या संदर्भात स्पष्ट करते की चंद्र दुभंगला होता; जे या गोष्टीचे लक्षण होय की कियामत जवळ येऊन ठेपली आहे आणि हे लक्षण कियामतीचे द्योतक बनून प्रकट झाले आहे. परंतु एवढया स्पष्ट निशाणीस बघून काफिरांनी सत्य स्विकृति पासून तोंड फिरविले आणि घटनेचा खुलासा असा केला की ही या माणसाची (अर्थात पैगंबरांची) जादू आहे ज्याने आमच्या नजरा बांधल्या आहेत आणि ही जादू नेहमी पासून चालत आली आहे.

आणि जेथपावेतो अहादीस सहीहचा संबंध आहे; बुखारी मुस्लिम, तिर्मिजी, व इतर हदीस ग्रंथांमध्ये अनेक कथने आहेत. जे या घटनेचे स्पष्टीकरण करतात बुखारी’ तील उल्लेख असा-

عَنِ ابْنِ مَسْعُوْدٍ قَالَ: اِنْشَقَّ الْقَمَرُ عَلٰى عَهْدِ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ فِرْقَتَيْنِ فِرْقَةٌ فَوْقَ الْجَبَلِ وَفِرْقَةٌ دَوْنَهٗ فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِشْهَدُوْا۔ (صحیح البخاری کتاب التفسیر)

‘‘हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात चंद्र दुभंगून त्याची शकले झाली होती. एक पर्वताच्या वर राहीला आणि दुसरा त्याच्या मागे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, साक्षी रहा.’’(सहीहुल बुखारी-किताबुत्तफसीर)

हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. अशा प्रकारे या घटनेला हजरत अली, हजरत हुजैफा आणि हजरत जुबेर बिन मुतअम यांनी वर्णन केले आहे; ज्यांनी या घटनेला स्वत: आपल्या डोळयांनी पाहीले होते. इतर सहाबा (प्रेषितांच्या सहवासातील अनुयायी)च्या कथनांद्वारे ही, त्यांनी प्रत्यक्ष अवलोकन केले नसले तरी त्यांच्या निवेदना बद्दल संशय घेण्यास जागा नाही, या घटनेचे समर्थन होते.

स्पष्ट असावे की सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा एखाद्या पैगंबरास पाठवितो तेव्हा अशी लक्षणे दिसून येतात, जी त्याच्या सत्यतेला प्रमाणित करणारी असतात. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ज्या काळात पैगंबर म्हणून पाठविले गेले, त्या काळात आकाशात विशेष सुरक्षा व्यवस्था राखण्या साठी उल्का चा मोठया प्रमाणात इतमाम केला गेला, ज्याचा उल्लेख सूरह जिन मध्ये जिन्नांच्या तोंडून केला गेला आहे. म्हणून ही काही विचित्र गोष्ट नव्हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात चंद्र दुभंगण्याची घटना घडली. कियामतींचा इन्कार करणारे कियामतीस अशक्य गोष्ट समजत. अल्लाहने एक क्षणापुरते चंद्राची शकले करून त्यांना कियामतीची एक झळक दाखवून दिली. आणि ही गोष्ट जाहीर झाली की जेव्हा चंद्र विदीर्ण होऊ शकतो, तेव्हा ग्रह नक्षत्रे ही क्षत विक्षत होऊ शकतात. यास्तव कियामतीचा इन्कार करण्यास काही एक कारण नाही. आणि चंद्राच्या दुभंगण्याने तिचे घडून येणे अधिक समीप झाले आहे. असे दिसून येते की कियामतीच्या भयानकतेचा आरंभ ही चंद्र ग्रहणाने होईल. सूरह कियामता मधील उल्लेख असा :-

يَسْئَلُ اَيَّانَ يَوْمُ الْقِيَامَةِ فَاِذَا بَرِقَ الْبَصَرُ وَخَسَفَ الْقَمَرُ۔ (القیامۃ:٦تا٨)

‘‘मनुष्य विचारतो कियामतीचा दिवस केव्हा उजाडेल? तर जेव्हा डोळे दिपून जातील आणि चंद्राला ग्रहण लागेल.’’ (अल् कयामह ६ ते ८)

जेथपावेतो चंद्राच्या पृष्ठभूमीचा संबंध आहे शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की त्यावर अनेक ज्वालामुखींची खळगे (Craters)आहेत. आणि चंद्राच्या पृष्ठभागाची जी चित्रे समोर आली आहेत त्यावरून ही हेच दिसून येते म्हणून नवल नव्हे की ज्वालामुखी उद्रेकाचा परिणाम म्हणून चंद्राची दोन शकले झाली असावीत. आणि नंतर गुरूत्वाकर्षणाच्या नियमाने दोन्ही भाग लगेच जुळली असावीत.

या ठिकाणी हे ही समजून घेतले पाहीजे की चंद्राच्या दुभंगण्याची ही घटना अल्लाहने एक चमत्कार म्हणून दाखविली आणि जी गोष्ट एक ईश-चमत्कार म्हणून प्रकट होते, तिचे स्वरूप अगदी असामान्य असते. म्हणजे ती सर्व सामान्य भौतिक नियमांना अपवाद असते. उदाहरणार्थ बिल्कीस राणीचे सिंहासन हजरत सुलेमान यांची पापणी लवण्या आधी त्यांच्या दरबारात पोहोचले होते (सूरह नमल - ४०) वास्तविक त्या सिंहासनाला अवकाशात उडतांना कोणी ही पाहीले नाही. आम्ही हे म्हणू शकत नाही की त्याचे नेमके काय स्वरूप असेल. हजरत मूसा यांच्या काठीचा साप बनत असे परंतु या सापने कोणाला चावा घेतला नाही, उलट जादूगारांच्या जादूला त्याने गिळंकृत केले. आणि सापाचा तर एक वंश असतो परंतु काठीचा साप बनण्याची व त्या सापाची पुन्हा काठी बनण्याची घटना उघड आहे, निसर्ग-नियमांना एक अपवाद (Exception) म्हणूनच होती. अशाच प्रकारे चंद्राचे दुभंगणे असामान्य रित्या घडले होते म्हणून ना जगात याचे स्फोट ऐकू आले आणि ना संपूर्ण जगातील लोकांना एकाच वेळी याची जाणीव झाली. चंद्राच्या गतीतही काही फरक पडला नाही आणि ना याचा जगाच्या नैसर्गिक परिस्थितीवर काही परिणाम झाला. ईश-चमत्कार या नात्याने कियामती पावेतो राहणारी ही निशाणी त्या

लोकांना दाखविण्याचा उद्देश होता ज्यांच्या दरम्यान पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रेषित म्हणून अल्लाहने पाठविले होते. यास्तव मुस्लिम व मुस्लिमेतर या दोघांनी ही पाहीले की चंद्राचा एक भाग 'हिरा' पर्वताच्या वर आणि दुसरा भाग त्याच्या मागे चालला गेला. ईमान बाळगणाऱ्यांच्या ईमान मध्ये तर यामुळे वाढ झाली पण काफिरांनी मात्र याला जादू ठरविले.

हे ही स्पष्ट असावे की चंद्राच्या दुभंगण्याचा चमत्कार काफिरांच्या मागणी नुसार दाखविला गेला नाही कारण कुरआनाने कितीतरी ठिकाणी त्यांच्या मागणीला पूर्ण करण्यास नकार दिला आहे आणि हे उत्तर दिले आहे की ईमान बाळगण्या करीता कुरआनाचा चमत्कारच पुरेसा आहे. हा चमत्कार काठीचा साप बनण्याच्या चमत्कारा सारखा नव्हता की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करवी दिसला असता, किंबहुना याचे स्वरूप इतर पैगंबरांना लाभलेल्या चमत्काराहून भिन्न होते. हा आकाश विश्वात घडला होता आणि उद्देश कियामतीचे लवकर घडून येणे जाहीर करणे आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सत्यतेस उज्वल करणे हा होता. हा चमत्कार दिसून येण्याच्या व कुरआनाच्या त्या आयतींच्या दरम्यान कसलीही परस्पर भिन्नता नाही, ज्यात काफिरांच्या या मागणीस की पैगंबराने एखादा चमत्कार दाखवावा, रद्द केले गेले आहे.

२. म्हणजे चंद्राच्या दुभंगण्याच्या एवढया मोठया निशाणी पासूनही त्यांनी काही धडा घेतला नाही, उलट त्यास जादू ठरविले.

३. म्हणजे यांच्या खोटे ठरविण्याचा परिणाम वेळेवर दिसून येईल सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येक मामल्या करीता, जो माणसाशी संबंधित आहे, वेळ निर्धारीत केलेली आहे. म्हणून उशीर होत असलेला पाहून कोणी असे समजू नये ही दुनिया अंधेर नगरी आहे आणि कर्माची परिणति म्हणून चांगले किंवा वाईट परिणाम कधीही दिसणार नाहीत.

४. म्हणजे त्या जन समूहांच्या दुष्परिणतिच्या खबरी, ज्यांनी विद्रोह केला होता. अर्थात हा संकेत आहे पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्या जन समूहांकडे.

५. म्हणजे कुरआन या नाश पावलेल्या जन समूहांच्या घटनांचे अशासाठी प्रभावी शैलीत निवेदन करीत आहे की मन मस्तिष्काची गवाक्षे उघडावीत आणि बुद्धिमत्तेच्या गोष्टींचा त्यात शिरकाव व्हावा. परंतु याचा हेकेखोर पणा असा आहे की या बुद्धिकौशल्य युक्त तंबींचा ही त्यांच्यावर काही परिणाम होत नाही. यास्तव हे काफिर ईश-प्रकोपाला पाहील्यावरच शुद्धीवर येतील.

६. म्हणजे जेव्हा ते समजून घेऊ इच्छित नाही तर त्यांना त्यांच्या दशेवरच सोडा.

७. म्हणजे त्यांचे डोके त्याच वेळी ठिकाणावर येईल जेव्हा ते कयामतीच्या दिवशी हश्रच्या मैदानात एकत्र होण्या करीता बोलाविणाऱ्या फरिश्त्याची पुकार ऐकतील. हश्रच्या मैदानात त्यांना आपल्या कर्म विषयक जीवनाचा हिशेब द्यावा लागेल. जी त्यांच्याकरीता अतिशय अप्रिय बाब असेल.

८. आपल्या कुफ्र व दुष्कर्मांपायी.

९. ज्या प्रकारे टोळ थवा वातावरणात पसरतो त्याच प्रकारे हे लोक कबरीमधून ------- अर्थात जिथे कोठे मेले ----- -----असतील निघून चोहींकडे पसरतील. हा माणसांचा उचंबळून येणारा समुद्र असेल जो सर्वत्र दिसून येईल.

बोलाविणाऱ्या कडे भयभीत होऊन धावत असतील. त्यावेळी काफिर म्हणतील हा मोठा कठीण दिवस आहे. यांच्या आधी नूहच्या जन समूहाने खोटे ठरविले होते. त्यांनी आमच्या दासाला खोटे ठरविले व म्हटले हा वेडा आहे आणि तो झिडकारला गेला. तेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास पुकारले, की मी वर्चस्वाखाली आहे. आता तू यांचा सूड घे. *(अल-क़ुर्आन)*

८. बोलाविणाऱ्या कडे भयभीत होऊन धावत असतील.[१०] त्यावेळी काफिर म्हणतील हा मोठा कठीण दिवस आहे.[११]

مُّهْطِعِيْنَ اِلَى الدَّاعِ ؕ يَقُوْلُ الْكٰفِرُوْنَ هٰذَا يَوْمٌ عَسِرٌ ۝٨

९. यांच्या आधी नूहच्या जन समूहाने खोटे ठरविले होते.[१२] त्यांनी आमच्या दासाला [१३] खोटे ठरविले व म्हटले हा वेडा आहे आणि तो झिडकारला गेला.[१४]

كَذَّبَتْ قَبْلَهُمْ قَوْمُ نُوْحٍ فَكَذَّبُوْا عَبْدَنَا وَقَالُوْا مَجْنُوْنٌ وَّازْدُجِرَ ۝٩

१०. तेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास पुकारले, की मी वर्चस्वाखाली आहे. आता तू यांचा सूड घे.[१५]

فَدَعَا رَبَّهٗۤ اَنِّیْ مَغْلُوْبٌ فَانْتَصِرْ ۝١٠

११. तेव्हा आम्ही आकाशाची द्वारे मुसळधार पावसाने उघडलीत.[१६]

فَفَتَحْنَاۤ اَبْوَابَ السَّمَآءِ بِمَآءٍ مُّنْهَمِرٍ ۝١١

१२. आणि जमीनीवर झरे प्रवाहीत केले, [१७] तर पाणी त्या कामा करीता मिळाले जे प्रारब्ध ठरले होते.[१८]

وَّفَجَّرْنَا الْاَرْضَ عُيُوْنًا فَالْتَقَى الْمَآءُ عَلٰۤى اَمْرٍ قَدْ قُدِرَ ۝١٢

१३. आणि आम्ही त्याला अशा नौकेत चढविले जी तत्त्के आणि मेखा असलेली होती.[१९]

وَحَمَلْنٰهُ عَلٰى ذَاتِ اَلْوَاحٍ وَّدُسُرٍ ۝١٣

१४. ती आमच्या देखरेखी खाली चालत होती. हा मोबदला होता त्या माणसा करीता ज्याची कदर केली गेली नव्हती.[२०]

تَجْرِیْ بِاَعْيُنِنَا ۚ جَزَآءً لِّمَنْ كَانَ كُفِرَ ۝١٤

१५. आम्ही या (नौके) ला एक निशाणी बनवून सोडून दिले.[२१] तेव्हा, आहे कोणी बोध प्राप्त करणारा?

وَلَقَدْ تَّرَكْنٰهَاۤ اٰيَةً فَهَلْ مِنْ مُّدَّكِرٍ ۝١٥

१६. बघा कसा होता माझा प्रकोप आणि कशी होती माझी तंबी.

فَكَيْفَ كَانَ عَذَابِیْ وَنُذُرِ ۝١٦

१०. बोलाविणाऱ्याशी अभिप्रेत तो फरिश्ता, जो यांना उभे राहण्याच्या जागेकडे बोलावित असेल आणि ते भयग्रस्त होऊन त्या बोलावणाऱ्याच्या दिशेने धावत असतील. आज ते सत्याचे आवाहन करणाऱ्याची हाक ऐकण्यास त्यार नाहीत. परंतु कियामतीच्या दिवशी आपल्या कर्माचा हिशेब देण्या करीता उभे राहण्याच्या ठिकाणी बोलाविणाऱ्याकडे धावत जाण्यास विवश असतील.

११. कियामतीच्या दिवशी त्या लोकांना जे याचा इन्कार करीत राहीले व यासाठी काहीच तयारी केली नाही हे जाणवेल की ही तर मोठया कठीण दिवसाशी गाठ आहे. परंतु त्या वेळी ही जाणीव होण्यात काय लाभ!

१२. नूह जन समूहाचा वृत्तांत सूरह हूद आणि इतर अनेक सूरतीं मध्ये केला गेला आहे. या ठिकाणी संक्षिप्त रित्या त्याचा हा पैलू सांगितला गेला आहे की कशा प्रकारे या जन समूहाने अल्लाहच्या प्रेषिताची उपेक्षा केली व त्याचा परिणाम म्हणून त्यांना कशी ईश-शिक्षा भोगावी लागली. पुढे इतर बंडखोर जन समूहांच्या घटना ही याच पैलूने थोडक्यात सांगितल्या गेल्या आहेत.

१३. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत नूह यांचा उल्लेख 'आमचा बंदा' (म्हणजे आमचा दास) या शब्दात केला आहे. ज्या द्वारे त्यांच्या दास्यत्वाची शान ही दिसून येते आणि अल्लाहतर्फे आपल्या दासावरील कृपादृष्टी ही.

१४. हा त्या जन समूहाचा अत्याधिक पातळीचा विद्रोह होता की त्याने हजरत नूह यांच्या महान व्यक्तिमत्वाची उपेक्षा केली. व त्यांना धमक्या दिल्या, एवढेच नव्हे तर त्यांना दगडांचा वर्षाव करून जीवे मारण्याची ही धमकी दिली गेली. याचा उल्लेख सूरह शुअरा आयत क्र. ११६ मध्ये केला गेला आहे.

१५. म्हणजे हे वाईटास प्रवृत्त झाले आहेत, आणि माझ्या अवाक्यात नाही की यांचे सामर्थ्य कमी करू शकावे. यास्तव आता तूच यांच्यावर आपला प्रकोप अवतरीत करून माझ्या सुटकेची उपाय योजना कर.

हे उदारहण या गोष्टीचे होय की पैगंबरांना देखील अशा कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले की स्वत:ला वर्चस्वाखाली असल्याचे त्यांना जाणवत राहीले परंतु अशाने त्यांच्या स्थैर्यशीलतेत काही फरक पडला आणि ना त्यांची उमेद खचली; किंबहुना अल्लाहवर भरवसा करीत त्याच्याकडे मदतीची प्रार्थना केली. यात त्या मुसलमानां करीत मार्गदर्शन आहे जे काफिरांच्या सत्ताधिकारा खाली स्वत:ला निष्प्रभ समजत आहेत.

१६. ही अलंकारीक शैली आहे. अर्थात हे की ढगातून विपुल प्रमाणात व मुसळधार पर्जन्य वृष्टी झाली.

१७. म्हणजे पाणी जमीनीचे खालून ही उकळू लागला आणि सर्वत्र स्त्रोत वाहू लागले होती.

१८. म्हणजे पाणी त्या पातळी प्रत पोहचले जी या कामाकरीता निर्धारीत केली गेली होती.

१९. म्हणजे ही नौका फार साधी होती. लाकडाच्या तक्त्यांनी व मेखांनी बनलेली, जी या भयंकर वादळात टिकणे असंभव होते. परंतु अल्लाहने तिलाच हजरत नूह यांच्या करीता मुक्तिचे साधन बनविले. खरी गोष्ट अल्लाहचा संकल्प व त्याची मदत होय, बाहय साधने नव्हे.

२०. म्हणजे काफिरांनी हजरत नूह यांची कदर केली नव्हती वास्तविक ते अल्लाहचे पैगंबर व अतिशय प्रतिष्ठीत व्यक्तिमत्व होते. अल्लाहने त्यांना हा मोबदला दिला की जिथे त्यांचा काफिर समूह पाण्यात बुडत होता, तिथे त्यांची नौका मुक्तिचे साधन बनली.

२१. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अन्कबूत टीप क्र. २६

१७. आणि आम्ही कुरआनास उपदेश मानण्या करीता सोपे बनविले. तेव्हा, आहे कोणी उपदेश प्राप्त करणारा ?[२२]

وَلَقَدْ يَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِن مُّدَّكِرٍ ﴿١٧﴾

१८. आद [२३] ने खोटे ठरविले तर बघा, कसा राहीला माझा प्रकोप आणि कशा होत्या माझ्या तंब्या !

كَذَّبَتْ عَادٌ فَكَيْفَ كَانَ عَذَابِي وَنُذُرِ ﴿١٨﴾

१९. आम्ही एक सतत दुदैवाच्या दिवशी [२४] त्यांच्यावर वादळी वारा पाठविला.

إِنَّا أَرْسَلْنَا عَلَيْهِمْ رِيحًا صَرْصَرًا فِي يَوْمِ نَحْسٍ مُّسْتَمِرٍّ ﴿١٩﴾

२०. जो लोकांना उखडून अशा प्रकारे फेकत होता की जणू ते उखडलेल्या खजुरींचे ओंडके होत.[२५]

تَنزِعُ النَّاسَ كَأَنَّهُمْ أَعْجَازُ نَخْلٍ مُّنقَعِرٍ ﴿٢٠﴾

२१. तेव्हा बघा कसा होता प्रकोप आणि कशा होत्या माझ्या ताकीदी!

فَكَيْفَ كَانَ عَذَابِي وَنُذُرِ ﴿٢١﴾

२२. आणि आम्ही कुरआनास उपदेश मानण्या करीता सोपे बनविले, तर आहे कोणी उपदेश प्राप्त करणारा ?

وَلَقَدْ يَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِن مُّدَّكِرٍ ﴿٢٢﴾

२३. समूदने ही तंबींना खोटे ठरविले.[२६]

كَذَّبَتْ ثَمُودُ بِالنُّذُرِ ﴿٢٣﴾

२४. म्हणू लागले, काय आम्ही एका माणसाचे अनुसरण करणार, जो आमच्या पैकीच आहे? जर आम्ही असे केले तर आम्ही चुंकीच्या मार्गाला लागलो आणि विक्षिप्त पणात पडलो.[२७]

فَقَالُوا أَبَشَرًا مِّنَّا وَاحِدًا نَّتَّبِعُهُ إِنَّا إِذًا لَّفِي ضَلَالٍ وَسُعُرٍ ﴿٢٤﴾

२५. काय आमच्या मधून याच्या वरच उपदेश अवतरीत केला गेला ?[२८] नव्हे, किंबहुना हा मोठा खोटारडा आणि घमेंडी आहे.[२९]

أَؤُلْقِيَ الذِّكْرُ عَلَيْهِ مِن بَيْنِنَا بَلْ هُوَ كَذَّابٌ أَشِرٌ ﴿٢٥﴾

२६. उद्या यांना माहीत पडेल की कोण मोठा खोटारडा आणि घमेंडी आहे.[३०]

سَيَعْلَمُونَ غَدًا مَّنِ الْكَذَّابُ الْأَشِرُ ﴿٢٦﴾

२२. कुरआनातील शब्द न शब्द अल्लाहची वाणी आहे, ज्यात सखोल अर्थ ही आहे आणि बुद्धिकौशल्याची अमूल्य मौक्तिके ही तो सृष्टीच्या रहस्य भेदांवरील आवरण ही हटवितो आणि मनुष्य स्वभावाच्या भेदांना ही अनावरीत करतो. तो परिपूर्ण मार्गदर्शनाचा ग्रंथ आहे म्हणून त्यातले मजकूर अतिशय व्यापक आहेत. त्यात ज्ञान व ईश परिचयाचे खजीने ही आहेत आणि आत्मोन्नति व आत्मोकर्षाची सामग्री ही. ही विविध वैशिष्टये असल्या खेरीज तो आपल्या उद्देश्याची कारण मिमांसा व माणसाला मार्गदर्शन घडविण्याच्या पैलूने असा सोपा ग्रंथ आहे की प्रत्येक सामान्य-असामान्य त्यापासून लाभान्वित होऊ शकतो. ताकीद व बोध ग्रहणा करीता समजण्यास अवघड अशा विषयांना ही अतिशय सोप्या शैलीत सादर केले गेले आहे. हा ग्रंथ 'मानव' म्हणून जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला संबोधून आहे. आणि याला केवळ मोठ मोठे विद्वानच समजू शकतात असे समजणे अगदी चुकीचे आहे. कुरआन प्रत्येक माणसाला त्याचा सरळ सरळ अभ्यास करण्याचे, त्यावर विचार चिंतन करण्याचे व त्याचा उपदेश ग्रहण करण्याचे आवाहन करतो. जे लोक अरबी भाषा जाणत नसतील, ते एखाद्या विश्वसनीय अनुवादा पासून लाभ घेऊ शकतात परंतु कुरआनाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न न करणे, त्याच्याशी फार मोठी असंबंधता व फार मोठी वंचितता आहे. खेदाची बाब अशी की ही गफलत मुसलमानां मध्ये सार्वत्रिक आहे आणि धर्माचे ज्ञान बाळगणाऱ्या विद्वज्जनांनी जिथे अनुवाद व भाष्याची अनमोल सेवा पार पाडली आहे व दर्से कुरआनाचा क्रम सुरू ठेवला आहे, तिथे काही विद्वान असेही आहेत जे अनुवादाच्या सहाय्याने कुरआन समजून घेणे पसंत करीत नाही आणि कुरआनाच्या पठणाचा व त्यास तोंडी पाठ करण्याचा लाभ वर्णन करून लोकांना या दोनच गोष्टीत मग्न ठेवू इच्छितात. या संदर्भात हदीस वचनांद्वारे सिद्ध असलेल्या लाभांचा कदापि इन्कार केला जाऊ शकत नाही परंतु हे विद्वान या गोष्टीवर ही जोर का देत नाही. की लोकांनी कुरआनाचा अर्थ जाणावा आणि आश्चर्याची बाब अशी की काही सज्जन तर या आयतीचा अनुवादच अशा प्रकारे करतात की उपदेशाच्या ठिकाणी पाठांतरावरच लक्ष केंद्रित होते. यास्तव एका विद्वान महाशयानी सूरह कमर च्या या आयतीचा अर्थ असा लावला आहे :-

'आम्ही कुरआनास तोंडीपाठ करण्या करीता सोपे करून ठेवले आहे. आहे कोणी तोंडीपाठ करणारा? (तबलीगी निसाब-फजाइले कुरआन पृ. ५५)

या आयतीत 'जिक्र' हा शब्द उपदेश, बोध या अर्थाने आणि 'मुजक्कीर' हा शब्द उपदेश प्राप्त करणारा या अर्थाने वापरला गेला आहे. तोंडपाठ करण्याच्या अर्थाने नव्हे आणि यावर संदर्भ शैली ही प्रमाण आहे आणि या प्रकारच्या इतर आयती देखील. सूरह कमर मध्ये काफिरांना संबोधिले गेले आहे. कियामतीचा इन्कार करण्याबद्दल त्यांना सक्त तंबी दिली गेली आहे व कुरआनाच्या उपदेशास ग्रहण करण्याचे आवाहन केले गेले आहे. या संदर्भात नूह जन समूह आणि इतर बंडखोर जन समूहांची परिणति सांगितली गेली आहे. जेणेकरून इन्कार करणाऱ्यांनी बोध घ्यावा. यास्तव फर्माविले,

"आम्ही कुरआनास उपदेश प्राप्त करण्यास्तव सोपे बनविले, तेव्हा आहे कोणी उपदेश प्राप्त करणारा?"

जर मूळ शब्द 'जिक्र' चा अनुवाद पाठांतर असा केला गेला तर अर्थ हा होईल की काफिरांना हे सांगितले जात आहे की कुरआन तोंडीपाठ करण्यास्तव सोपे बनविले गेले आहे तर आहे कोणी तोंडीपाठ करणारा ? तात्पर्य क़ुर्आन काफिरांना कुरआन तोंडीपाठ करण्याचे आवाहन करीत आहे. वास्तविक त्यांनी अद्याप ना कुरआनाचा उपदेश मान्य केला आहे आणि ना त्यावर ईमान बाळगले आहे. उघड आहे अशी बिनबुडाच्या गोष्टीचा संबंध कुरआनाशी जोडला जाऊ शकत नाही. या संदर्भात शब्दकोषाचा ही आश्रय घेतला जातो की याचा एक अर्थ तोंडीपाठ करणे असा ही आहे. यास्तव 'लिसानुल अरब' या अरबी शब्दकोषातील उल्लेख असा :-

الذکر الحفظ لشی تذکرہ

"जिक्रचा अर्थ एखाद्या गोष्टीला सुरक्षित करून घेणे जिला तुम्ही राखून ठेवू शकावे"

परंतु प्रथम तर लिसानुल अरबच्या रचनाकाराने तोंडीपाठ करणे हा शब्द अर्थाशी संबंध न ठेवता तोंडीपाठ करण्याच्या अर्थाने वापरला नाही. म्हणून याला उर्दूच्या हिफ्ज शब्दाच्या मर्यादीत अर्थाने घेणे योग्य ठरणार नाही. दुसरे असे की जर शब्दकोषात 'जिक्र' चे वेगवेगळे अर्थ आहेत त्यापैकी एक अर्थ केवळ तोंडीपाठ करण्याचा असला तरी संबंधित आयतीत जिक्रच्या व्यापक आशयात ही गोष्ट गौणत्वानेच सामील होऊ शकते अन्यथा याचा व्यक्त होणारा अर्थ उपदेश हाच आहे. आणि याचे समर्थन या गोष्टीने ही होते की अन्य एका ठिकाणी कुरआनास 'जिक्र' या अर्थाने घेतले गेले आहे. या आधारावर की तो नितांत उपदेश आहे :-

اِنَّا نَحۡنُ نَزَّلۡنَا الذِّکۡرَ وَاِنَّا لَہٗ لَحٰفِظُوۡنَ۔ (الحجر:٩)

"नि:संशय आम्ही हा जिक्र (बोध) अवतरीत केला आहे आणि आम्हीच याचे रक्षण करणारे आहोत." (हिज्र-९)

सूरह दुखान मधील उल्लेख असा :-

فَاِنَّمَا یَسَّرۡنٰہُ بِلِسَانِکَ لَعَلَّہُمۡ یَتَذَکَّرُوۡنَ۔ (دخان۔٥٨)

" आम्ही (हे पैगंबर) तुमच्या भाषेत याला सोपे बनविले

आहे; यासाठी की लोकांनी बोध-ग्रहण करावा.'' (दुख्खान-५८)

या आयतीत कुरआनास सोपे बनविण्याचा अर्थ स्पष्टत: बोध आणि उपदेश प्राप्त करणे निवेदिला गेला आहे. यास्तव सूरह कमरच्या चर्चाधीन आयतीला ही याच अर्थाने घेणे योग्य ठरेल.

इब्ने जरीर तबरी यांनी ही याचा हाच अर्थ सांगितला आहे:-

وَلَقَدْ سَهَّلْنَا الْقُرْآنَ بَيَّنَاهُ وَفَصَّلْنَاهُ لِلذِّكْرِ لِمَنْ أَرَادَ أَنْ يَتَذَكَّرَ وَيَعْتَبِرَ وَيَتَعَظَّ وَهَوَّنَّاهُ۔ (تفسیر طبری جلد ۲۷ ص ۵۷)

''आम्ही कुरआनास सोपे बनविले, त्याला विशद केले, स्पष्टत: निवेदिले आणि सोपे बनविले उपदेशा करीता. म्हणजे त्याच्या करीता जो बोध उपदेश प्राप्त करू इच्छितो.'' (तफसीर तबरी खंड २७ पृ. ५७)

कुरआनाच्या पारीभाषिक शब्दांचा अर्थ केवळ शब्दकोषाद्वारे निश्चित केले जाऊ शकत नाही, किंबहुना कुरआनातील यांच्या प्रयोजनास विचाराधीन राखणे ही आवश्यक आहे. उदाहरणार्थ 'इबादत' हा शब्द घ्या. लिसानुल अरब मध्ये याचा एक अर्थ आज्ञापालन असा सांगितला गेला आहे-

**والعبادة: الطاعة** (لسان العرب ج ۳ ص ۲۷۲)

''इबादत म्हणजे आज्ञापालन'' (लिसानुल अरब खंड - ३ पृ. २७२)

वास्तविक कुरआनात याचा व्यक्त होणारा अर्थ उपासना असा आहे. यास्तव मूर्त्यांच्या उपासने करीता हाच शब्द वापरला गेला आहे. मात्र याच्या व्यापक अर्थात आज्ञापालन ही सामील आहे. परंतु हे योग्य ठरणार नाही की आम्ही इबादतच्या व्यक्त होणाऱ्या अर्थावर म्हणजे उपासनेवर जोर न द्यावा किंवा याला दृष्टीआड करून याचा 'आज्ञापालन' हाच अर्थ घ्यावा. या संदर्भातील दुसरे उदाहरण **'सलात' صلوٰة** या शब्दाचे आहे ज्याचा अर्थ शब्द कोषात दुआ (प्रार्थना) असा आहे. परंतु कुरआनाने याला शरीअत बद्ध रित्या अदा केली जाणारी एक विशेष उपासना जिला 'नमाज' म्हणतात या अर्थाने वापरले आहे. तर काय केवळ शब्दकोषाच्या सहाय्याने اقيموا الصلوٰة **'आकीमुस्सलात'चा** अर्थ 'दुआ कायम करा' असा करणे उचित ठरेल? जर नाही तर जिक्रचा अर्थ ही कुरआनाच्या प्रयोजनास दृष्टी आड करून केवळ शब्दकोषाद्वारे निश्चित करणे योग्य ठरणार नाही व ही गोष्ट ही निश्चितपणे सांगितली जाऊ शकते की कुरआनात 'जिक्र' हा शब्द कोठे ही अर्थाला सोडून केवळ तोंडपाठ करण्याच्या अर्थाने वापरला गेला नाही.

या आयतीची या सूरतीत वारंवार पुनरावृत्ति केली गेली आहे, हेतु या गोष्टीची ताकीद करणे होय की लोकांनी कुरआना पासून उपदेश प्राप्त करावा.

२३. आदचा वृत्तांत ही सूरह हूद मध्ये सविस्तर अथवा इतर अनेक सूरतींमध्ये निवेदिला गेला आहे.

२४. अशुभ दिवसाशी अभिप्रेत ईश-प्रकोपाचा दिवस होय आणि हा अजाब (ईश-प्रकोप) सूरह हाक्का मध्ये सांगितल्या प्रमाणे आठ दिवसापावेतो सतत राहीला. दिवस अर्थ कोणताही अशुभ नाही भ्रम पूजक लोक दिवस शुभ-अशुभ असण्याची श्रद्धा बाळगतात परंतु कुरआनाच्या दृष्टीने अशुभ दिवस तो होय ज्या दिवस अल्लाहचा भयंकर प्रकोप अवतरीत होईल. आद जन समूहावर सतत आठ दिवस वादळी वाऱ्यांचा आघात होत राहीला वास्तविक आठवडा सात दिवसांचा असतो. स्पष्ट झाले की या जन समूहा करीता आठवडयाचा प्रत्येक दिवस अजाबचा दिवस या नात्याने अशुभ होता. आणि जेव्हा संपूर्ण आठवडा अशुभ ठरला तेव्हा भ्रम पूजकांकरीता कोणता दिवस शुभ ठरविण्यास बाकी राहीला?

२५. म्हणजे या वादळी वाऱ्याने या जनसमूहास अगदी मुळासकट उपटून फेकले. सर्वत्र त्यांच्या प्रेतांचा खच पडला.

२६. समूद जनसमूहाचा वृत्तांत सूरह अअराफ, सूरह हूद, आणि इतर अनेक सूरतींमध्ये निवेदिला गेला आहे.

२७. त्यांच्या मते पैगंबरास मनुष्य नव्हे, किंबहुना फरिश्ता असायला हवे होते. हीच विचार सरणी मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांची होती. समूद जन समूहाचे म्हणणे होते की हा मनुष्य मार्गदर्शनाच्या नावाने आम्हाला चुकीच्या मार्गाला लावत आहे आणि याचे म्हणणे मान्य करून जर आम्ही याचे अनुसरण करू लागलो तर आमच्या अकलेचे दिवाळेच निघाले म्हणावे.

२८. ते म्हणत असत की जर अल्लाहतर्फे उपदेश अवतरला असता तर या माणसावर का अवतरला असता, जेव्हा आमच्यात एकाहून एक अधिक चांगली माणसे आहेत. त्यांच्या मते उत्कृष्टतम होण्याचे स्तर चारित्र्य नव्हे किंबहुना ऐहीक थाट माट होता.

२९. त्यांनी साक्षात सत्य असलेल्या व ज्याच्या प्रामाणिकते बद्दल शंका घेतली जाऊ शकत नाही अशा पैगंबरावर, तो खोटारडा व घमेंडी असल्याचा आरोप ठेवला.

३०. उद्याशी अभिप्रेत ईश-प्रकोपाचा दिवस होय आणि कियामतीचा दिवस ही; जो इतका जवळ आहे की जणू उद्याच घडून येईल. त्या दिवशी त्या लोकांना, जे पैगंबरावर आरोप ठेवत राहीले कळून येईल की खोटारडा व घमेंडी कोण होता, अल्लाहचा प्रेषित कि ते स्वत:

**आणि यांना सांगा की पाणी यांच्या दरम्यान विभागले जाईल प्रत्येकाला आपल्या पाळीच्या दिवशी पाण्यावर यायचे आहे. परंतु त्यांनी आपल्या साथीदाराला बोलाविले आणि त्याने पुढे येऊन तिच्या घोड शिरा कापल्या.*(अल-कुर्आन)***

२७. आम्ही सांडणीला यांच्या करीता कसोटी बनवून पाठवित आहोत.[३१] तेव्हा यांना बघत राहा आणि धैर्य पाळा.

إِنَّا مُرْسِلُوا النَّاقَةِ فِتْنَةً لَّهُمْ فَارْتَقِبْهُمْ وَاصْطَبِرْ ﴿٢٧﴾

२८. आणि यांना सांगा की पाणी यांच्या दरम्यान विभागले जाईल प्रत्येकाला आपल्या पाळीच्या दिवशी पाण्यावर यायचे आहे.

وَنَبِّئْهُمْ أَنَّ الْمَاءَ قِسْمَةٌ بَيْنَهُمْ ۚ كُلُّ شِرْبٍ مُّحْتَضَرٌ ﴿٢٨﴾

२९. परंतु त्यांनी आपल्या साथीदाराला बोलाविले आणि त्याने पुढे येऊन तिच्या घोड शिरा कापल्या.[३२]

فَنَادَوْا صَاحِبَهُمْ فَتَعَاطَىٰ فَعَقَرَ ﴿٢٩﴾

३०. तर बघा, कसा होता माझा प्रकोप आणि कशा होत्या माझ्या ताकीदी!

فَكَيْفَ كَانَ عَذَابِي وَنُذُرِ ﴿٣٠﴾

३१. आम्ही त्यांच्यावर, एकच भयानक चित्कार पाठविला, तर ते कुंपण वाल्याच्या कुंपणाच्या चूऱ्या प्रमाणे होऊन गेले.[३३]

إِنَّا أَرْسَلْنَا عَلَيْهِمْ صَيْحَةً وَاحِدَةً فَكَانُوا
كَهَشِيمِ الْمُحْتَظِرِ ﴿٣١﴾

३२. आणि आम्ही कुरआनास उपदेश ग्रहणा करीता सोपे बनविले आहे, तर आहे कोणी उपदेश ग्रहण करणारा?

وَلَقَدْ يَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِن مُّدَّكِرٍ ﴿٣٢﴾

३३. लूतच्या जन समूहाने ही तंबींना खोटे ठरविले.[३४]

كَذَّبَتْ قَوْمُ لُوطٍ بِالنُّذُرِ ﴿٣٣﴾

३४. आम्ही त्यांच्यावर दगडांचा वर्षाव करणारी हवा पाठविली.[३५] केवळ लूतशी संबंधित असलेले या पासून वाचले [३६] आम्ही त्यांना पहाटेच्या वेळी मुक्ति दिली.[३७]

إِنَّا أَرْسَلْنَا عَلَيْهِمْ حَاصِبًا إِلَّا آلَ لُوطٍ ۖ نَّجَّيْنَاهُم بِسَحَرٍ ﴿٣٤﴾

३५. आपल्या विशेस कृपेने. अशा प्रकारे आम्ही मोबदला देतो त्यांना जे कृतज्ञता व्यक्त करतात.[३८]

نِّعْمَةً مِّنْ عِندِنَا ۚ كَذَٰلِكَ نَجْزِي مَن شَكَرَ ﴿٣٥﴾

३६. त्याने यांना आमच्या पकडी पासून खबरदार केले होते, परंतु ते तंबी बाबत संशय करीत राहीले.

وَلَقَدْ أَنذَرَهُم بَطْشَتَنَا فَتَمَارَوْا بِالنُّذُرِ ﴿٣٦﴾

३१. ही सांडणी अल्लाहचा एक चमत्कार म्हणून प्रकट झाली होती आणि त्या जन समूहां करीता कसोटीचे कारण होती की ते तिच्या पाणी पिण्याच्या पाळीचे ध्यान ठेवतात किंवा नाही. आणि तिला काही त्रास तर देत नाही.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह शुअरा टीप क्र. १३१.

३२. असामान्य उंचीच्या सांडणीला मारणे सोपे नव्हते, म्हणून त्या दुष्ट माणसाने तिचे पायच कापून टाकले या साठी की ती गतप्राण व्हावी. समूद जनसमूहाने या कामाकरीता एका माणसाला पुढे केले होते म्हणून तो संपूर्ण जनसमूहच गुन्हेगार ठरला व त्याने अल्लाहच्या प्रकोपास आमंत्रण दिले.

३३. कुंपण घालणारा आपल्या जनावरांच्या संरक्षणा करीता काटेरी फांद्यांचे कुंपण लावतो जे तात्पुरत्या स्वरूपाचे असते. मग सुकल्यावर चूरा होतो. हीच दशा समूद जन समूहाची झाली की त्यांना अल्लाहच्या प्रकोपाने अशा प्रकारे तुडविले की त्यांचा सगळा दमखम हवेत उघाला.

३४. लूत जन समूहाचा वृत्तांत सूरह हूद आणि इतर अनेक सूरतींमध्ये निवेदिला गेला आहे.

३५. लूत जन समूहावर दगडांचा वर्षाव झाला होता. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. ११९.

३६. लूतशी संबंधित म्हणजे ज्यांनी ईमान बाळगले होते.

३७. मूळ शब्द ‘सहर’ म्हणजे रात्रीचा अंतिम हिस्सा. लूतच्या संततीला रात्रीच्या शेवटच्या हिश्श्यात अर्थात पहाटे पहाटे मुक्ति मिळाली. हदीस वचनातील उल्लेख असा की रात्रीचा अंतिम हिस्सा ईश कृपेच्या अवतरणाचा व प्रार्थनेच्या स्विकृत होण्याचा समय असतो आणि कुरआनात ईमान बाळगणाऱ्यांचा हा गुणविशेष सांगितला गेला आहे की-

وَبِالْأَسْحَارِ هُمْ يَسْتَغْفِرُونَ (الذاريات:١٨)

‘‘ते पहाटेच्या वेळी (अल्लाहजवळ) क्षमा याचना करतात.’’ (अज्जारीयात-१८)

३८. म्हणजे जे अल्लाहच्या देणग्या व त्याच्या मार्गदर्शनाची कदर करतात.

३७. आणि त्यांनी याला आपल्या अतिथींची अब्रू
वाचविण्या पासून मागे ठेवू इच्छिले, तेव्हा आम्ही
त्यांचे डोळे निस्तेज केलेत [३९] की चाखा माझा
प्रकोप व माझ्या तंबींची गोडी !

وَلَقَدْ رَاوَدُوهُ عَنْ ضَيْفِهِ فَطَمَسْنَا أَعْيُنَهُمْ فَذُوقُوا عَذَابِي وَنُذُرِ ﴿٣٧﴾

३८. लवकर सकाळी त्यांना चिरस्थायी ईश शिक्षेने
घेरले.[४०]

وَلَقَدْ صَبَّحَهُمْ بُكْرَةً عَذَابٌ مُسْتَقِرٌّ ﴿٣٨﴾

३९. तेव्हा चाखा माझा प्रकोप व माझ्या तंबींची
गोडी !

فَذُوقُوا عَذَابِي وَنُذُرِ ﴿٣٩﴾

४०. आणि आम्ही कुरआनास उपदेश ग्रहणा करीता
सोपे बनविले आहे, तर आहे कोणी उपदेश
ग्रहण करणारा?

وَلَقَدْ يَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِنْ مُدَّكِرٍ ﴿٤٠﴾

४१. आणि फिरऔन लोकां जवळ ही ताकीदी
पोहचल्या होत्या.

وَلَقَدْ جَاءَ آلَ فِرْعَوْنَ النُّذُرُ ﴿٤١﴾

४२. परंतु त्यांनी आमच्या सर्व निशाण्यांना खोटे
ठरविले, तेव्हा आम्ही त्यांना पकडले, जी एक
वर्चस्वशाली व सामर्थ्य शालीची पकड होती.[४१]

كَذَّبُوا بِآيَاتِنَا كُلِّهَا فَأَخَذْنَاهُمْ أَخْذَ عَزِيزٍ مُقْتَدِرٍ ﴿٤٢﴾

४३. काय तुमच्या जन समूहाचे काफिर त्या जन
समूहांच्या काफिरांहून श्रेष्ठ आहेत [४२] कि तुमच्या
करीता आकाशातल्या ग्रंथांमध्ये सुटका लिहीलेली
आहे ? [४३]

أَكُفَّارُكُمْ خَيْرٌ مِنْ أُولَٰئِكُمْ أَمْ لَكُمْ بَرَاءَةٌ فِي الزُّبُرِ ﴿٤٣﴾

४४. किंवा ते असे म्हणतात की आम्ही सर्व मिळून
याचा प्रतिकार करू.

أَمْ يَقُولُونَ نَحْنُ جَمِيعٌ مُنْتَصِرٌ ﴿٤٤﴾

४५. लवकरच यांचा जथा हार खाईल आणि हे
पाठ फिरवून पळ काढतील.[४४]

سَيُهْزَمُ الْجَمْعُ وَيُوَلُّونَ الدُّبُرَ ﴿٤٥﴾

४६. किंबहुना यांच्याशी खरा वायदा तर कियामतीचा
आहे [४५] आणि कियामतीची वेळ मोठी कठीण
आणि कटू असेल.[४६]

بَلِ السَّاعَةُ مَوْعِدُهُمْ وَالسَّاعَةُ أَدْهَىٰ وَأَمَرُّ ﴿٤٦﴾

३९. अतिथी फरिश्ते होते जे लूत जन समूहा करीता कसोटी म्हणून मनुष्य रूपाने आले होते. हजरत लूत यांनी त्यांना आपल्या घरी राखले होते परंतु उपद्रव प्रिय लोकांनी दुराचारा करीता त्यांना पळवून नेण्याचा प्रयत्न केला. जेव्हा त्यांनी वाईट हेतुने हजरत लूत यांच्या घरात शिरण्याचा प्रयत्न केला तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांचे डोळेच आंधळे करून टाकले. वासना भक्तिच्या नजरेने त्या पाहूण्यांना पाहण्याची, जे सुंदर नव युवकांच्या स्वरूपात असावेत, ही तत्काळ शिक्षा त्यांना मिळाली.

४०. त्यानंतर सकाळ होताच त्या दुराचारी जन समूहावर अल्लाहच्या प्रकोपाचा पहाड कोसळला.

४१. म्हणजे अशी जबरदस्त पकड होती की फिरऔन वाल्याचे सर्व सामर्थ्य लयाला गेले आणि तो अल्लाहच्या प्रकोपा पुढे अगदी लाचार झाला.

४२. अरब जनसमूहाला संबोधिले गेले आहे की तुमच्यात जे लोक काफिर आहेत, त्यांचे ही तेच वर्तन आहे जे पूर्वी होऊन गेलेल्या काफिर जनसमूहांचे होते. तेव्हा यांच्यात असा कोणता गुण आहे की यांची ती दुष्परिणति न व्हावी जी पूर्वी होऊन गेलेल्या काफिरांची झाली. काफिर (अल्लाहचा इन्कार करणारा) तर अल्लाहचा विद्रोही आणि सर्वात निकृष्ट दर्जाचा गुन्हेगार असतो यास्तव एक काफिर जन समूह अपरिहार्यपणे शिक्षेला पात्र ठरतो.

४३. म्हणजे काय एखाद्या आकाशातून अवतरीत झालेल्या ग्रंथामध्ये हे लिहीले आहे की तुमचे आचरण चांगले वाईट कसे ही असो, तुम्हाला शिक्षा दिली जाणार नाही. असे जर नाही आणि सुटकेचा परवाना तुम्हाला लाभलेला नाही तर अल्लाहच्या मार्गदर्शना पासून तोंड फिरविण्याचे धारिष्टय का म्हणून करता?

४४. कुरआनाने ही गोष्ट मक्केत सांगितली होती. वास्तविक कुरेश जनसमूहाच्या पराभवाचे बाहयत: कोणतेही लक्षण दिसत नव्हते. परंतु कुरआनाचे हे भाकित काही वर्षानंतर बद्र येथे खरे ठरले. हदीस वचनातील उल्लेख असा की बद्र युद्धा (हि. स. २) च्या प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी चिलखत घातले होते; आणि या आयतीचे पठण करीत ते बाहेर पडले :-

سَيُهْزَمُ الْجَمْعُ وَيُوَلُّوْنَ الدُّبُرَ۔

''लवकरच यांचा जथा हार खाईल आणि हे पाठ फिरवून पळ काढतील.''

आणि थोडयाच वेळात काफिरांची त्रेधा उडाली आणि त्यांचा मोठा वाईट रित्या पराभव झाला. अशाच प्रकारे खंदक युद्धात (हि. स.५) ही त्यांनी पळ काढला.

४५. म्हणजे जगात त्यांचा अल्लाहच्या पैगंबराच्या विरोधात जो पराभव होईल तो तर होईलच. त्या खेरीज खरी शिक्षा त्यांना कियामतीच्या दिवशी मिळेल, जी जबरदस्त आणि कायम स्वरूपी शिक्षा असेल.

४६. म्हणजे कियामतीने फार मोठे संकट व अनेक प्रकारच्या असहय गोष्टींना आपल्यात सामावलेले असेल. यास्तव सावध व्हा आणि त्या दिवसाच्या संकटापासून स्वत:ला वाचविण्याची उपाय योजना करा.

४७. अपराधी मार्गभ्रष्टता व बुद्धिच्या विकृतित पडले आहेत. [४७]

إِنَّ الْمُجْرِمِينَ فِي ضَلَالٍ وَسُعُرٍ ﴿٤٧﴾

४८. ज्या दिवशी हे आपल्या तोंडावर आगीत फरफटत नेले जातील आता चाखा जहन्नम [४८] च्या स्पर्शाची गोडी !

يَوْمَ يُسْحَبُونَ فِي النَّارِ عَلَىٰ وُجُوهِهِمْ ذُوقُوا مَسَّ سَقَرَ ﴿٤٨﴾

४९. आम्ही प्रत्येक गोष्ट विधिलिखित (योजने) सह निर्माण केली आहे.[४९]

إِنَّا كُلَّ شَيْءٍ خَلَقْنَاهُ بِقَدَرٍ ﴿٤٩﴾

५०. आणि आमचा आदेश तर एक वेळ पापणी लवण्या प्रमाणे अमलात येईल.[५०]

وَمَا أَمْرُنَا إِلَّا وَاحِدَةٌ كَلَمْحٍ بِالْبَصَرِ ﴿٥٠﴾

५१. आम्ही तुमच्या पद्धतीचा अवलंब करणाऱ्यांना [५१] नष्ट केले आहे तर आहे कोणी धडा घेणारा?

وَلَقَدْ أَهْلَكْنَا أَشْيَاعَكُمْ فَهَلْ مِن مُّدَّكِرٍ ﴿٥١﴾

५२. जे काही यांनी केले आहे ते सर्व रेकॉर्डात सुरक्षित आहे.

وَكُلُّ شَيْءٍ فَعَلُوهُ فِي الزُّبُرِ ﴿٥٢﴾

५३. आणि प्रत्येक लहान मोठी गोष्ट लिहीली गेली आहे .[५२]

وَكُلُّ صَغِيرٍ وَكَبِيرٍ مُّسْتَطَرٌ ﴿٥٣﴾

५४. निःसंशय ईश भय बाळगणारे बागांमध्ये व प्रवाहां मध्ये असतील.[५३]

إِنَّ الْمُتَّقِينَ فِي جَنَّاتٍ وَنَهَرٍ ﴿٥٤﴾

५५. खऱ्या स्थानी.[५४] एका सत्ताधारी बादशहा जवळ. [५५]

فِي مَقْعَدِ صِدْقٍ عِندَ مَلِيكٍ مُّقْتَدِرٍ ﴿٥٥﴾

४७. हे उत्तर आहे काफिरांच्या त्या म्हणण्याला जे आयत क्र. २४ मध्ये सांगितले गेले आहे.

४८. मूळ शब्द 'सकर' वापरला गेला आहे. हे जहन्नमचे नाव आहे ज्याचा अर्थ अत्याधिक प्रखर उष्णता बाळगणारी.

४९. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येक गोष्टीस योजनाबद्ध रितीने निर्माण केले आहे. तिला काय काम करावयाचे आहे व किती काळ करायचे आहे व कोणत्या उद्दिष्टाप्रत तिला पोहचायचे आहे.

अशा प्रकारे संपूर्ण सृष्टीचे एक विधिलिखित आहे. म्हणून अगदी ठरलेल्या वेळीच तिच्यात ती क्रान्ती घडून येईल जिचे नाव कियामत आहे. एखाद्याने घाई माजवली म्हणून कियामत निश्चित वेळेपूर्वी येऊ शकत नाही.

५०. म्हणजे कियामत प्रस्थापित करण्यात अल्लाहला किंचितही वेळ लागणार नाही. त्याचा तसा आदेश होताच पापणी लवण्या पूर्वी ती प्रस्थापित होईल. पापणी इतक्या लवकर लवते की तिला काहीच वेळ लागत नाही. अशा प्रकारे कियामतीचा आदेश होता क्षणीच ती प्रस्थापित होईल.

५१. म्हणजे तुमच्या वर्तनाचा अवलंब करणाऱ्यांना आम्ही नष्ट केले अभिप्रेत काफिर आणि अनेकेश्वरवादी जनसमूह.

५२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह कहफ टीप क्र. ७०.

५३. या ठिकाणी ईश भय बाळगणाऱ्यांना उल्लेख अपराधींच्या तुलनेत केला गेला आहे. म्हणजे ते लोक जे अल्लाह समोर जाव द्यावा लागेल या भावनेने भयभीत राहीले त्याचे मार्गदर्शन स्विकारले, व अपराद्यां पासून अलिप्त राहीले त्यांचा मोबदला असा सांगितला गेला आहे की ते आखिरत मध्ये जन्नतच्या बागांमध्ये असतील जिथे प्रवाह वाहत असतील.

५४. म्हणजे अशा ठिकाणी जिथे त्यांना खरे बक्षीस मिळेल व त्यांना खरी प्रतिष्ठा व मान लाभेल.

५५. अर्थात त्यांना खऱ्याखुऱ्या बादशहा असलेल्या अल्लाहचे, ज्याचे सामर्थ्य व सत्ताधिकार सर्वावर आहे, सान्निध्य प्राप्त होईल. आणि हे सर्वात मोठे बक्षीस असेल.

# सूरह अर् रहमान

# ५५. सूरह अर् रहमान

**शिर्षकः** सूरहचा आरंभ परम दयाळू ईश्वराच्या नावाने केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव अर् रहमान असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे; आणि मजकूरांवरून असे दिसून येते की ही मक्केच्या मध्ययुगात सूरह एहकाफ नंतर अवतरली असेल कारण सूरह एहकाफ मध्ये जिन्नांच्या एका समूह द्वारे कुरआन ऐकण्याचा व आपल्या जनसमूहा कडे जाऊन त्यास खबरदार करण्याचा उल्लेख केला गेला आहे. आणि या सूरह मध्ये जिन्नांना संबोधून त्यांना खबरदार केले गेले आहे म्हणून ही तंबी त्यानंतरचीच असू शकते.

**मध्यवर्ति कल्पनाः** नव्या व्यवस्थेसह एका नवीन विश्वाची अस्तित्वात येण्याची व त्यात मोबदला व शिक्षेचा मामला उद्भवण्याची जी खबर कुरआन देत आहे, तिला अशक्य समजणाऱ्यां व तिचा इन्कार करणाऱ्या मनुष्य व जिन्नांचे अल्लाहच्या अमर्याद सामर्थ्य शक्तिकडे लक्ष वेधले गेले आहे, या साठी की त्यांचे आश्चर्य नाहीसे व्हावे व त्यांना कुरआनाच्या म्हणण्याची खात्री वाटावी.

**आयात रचनाः** आयत क्र. १ ते ४ प्रास्ताविक स्वरूपाच्या आयती होत. ज्यात परम दयाळू ईश्वराच्या सर्वात मोठया कृपेचा उल्लेख केला गेला आहे. ती म्हणजे त्याने माणसाला मार्गदर्शन कारक ग्रंथा (कुरआना) चे ज्ञान प्रदान केले आहे. आणि हा त्याच्या कृपेचाच लाभ होय की माणसाला बोलण्याची शक्ति लाभली आहे; जो मानवाचा एक विशेष गुण आहे.

आयत क्र. ५ ते १३ मध्ये जमीन व आकाशातील अद्भूत सामर्थ्याचा उल्लेख करून हा प्रश्न प्रस्थापित केला गेला आहे की तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या सामर्थ्याचा इन्कार कराल?

आयत क्र. १४ ते ३० मध्ये मनुष्य व जिन्न यांची निर्मिती, दोन पश्चिम व दोन पूर्व यांचा अधिपति, दोन समुद्रांचे मिलन आणि या प्रकारच्या इतर आश्चर्य जनक निशाण्या, तसेच अल्लाहच्या महद कृपेकडे लक्ष वेधले गेले आहे.

आयत क्र. ३१ ते ४५ मध्ये मानव आणि जिन्नांना त्यांच्या अपराधी वर्तना बद्दल कठोर ताकीद केली गेली आहे की तो दिवस लवकरच उगवेल जेव्हा तुम्हाला आपल्या कर्माची शिक्षा लाभेल आणि ती शिक्षा मोठी दु:खदायक असेल.

आयत क्र. ४६ ते ७८ मध्ये त्या लोकांची सुखद परिणति निवेदिली गेली आहे, जे अल्लाह समोर जाब देण्यापासून भितात या संदर्भात जन्नतच्या देणग्यांची एक झळक दाखविली गेली आहे, ज्यामुळे जन्नतची ओढ मनात निर्माण होते.

# ५५.सूरह अर् रहमान

سُوْرَةُ الرَّحْمٰنِ

आयती ७८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. रहमान ने,[१]

اَلرَّحْمٰنُ ۙ﴿۱﴾

२. कुरआनाची शिकवण दिली.[२]

عَلَّمَ الْقُرْاٰنَ ؕ﴿۲﴾

३. त्याने माणसाला निर्माण केले.[३]

خَلَقَ الْاِنْسَانَ ۙ﴿۳﴾

४. आणि त्याला बोलणे शिकविले.[४]

عَلَّمَهُ الْبَيَانَ ﴿۴﴾

५. चंद्र आणि सूर्य एका हिशेबाचे पालन करतात.[५]

اَلشَّمْسُ وَالْقَمَرُ بِحُسْبَانٍ ۙ﴿۵﴾

६. आणि तारे व वृक्ष सजदा करतात.[६]

وَّالنَّجْمُ وَالشَّجَرُ يَسْجُدٰنِ ﴿۶﴾

७. आकाशाला त्याने उंच केले आणि तुला प्रस्थापित केली.[७]

وَالسَّمَآءَ رَفَعَهَا وَوَضَعَ الْمِيْزَانَ ۙ﴿۷﴾

८. की तुम्ही तोलण्यात (मर्यादेचे) उल्लंघन करू नका.[९]

اَلَّا تَطْغَوْا فِي الْمِيْزَانِ ﴿۸﴾

९. आणि न्यायासह उचित तोला आणि वजनात कमी करू नका.[१०]

وَاَقِيْمُوا الْوَزْنَ بِالْقِسْطِ وَلَا تُخْسِرُوا الْمِيْزَانَ ﴿۹﴾

१०. जमीनीला त्याने जीव सृष्टी करीता पसरविले[११]

وَالْاَرْضَ وَضَعَهَا لِلْاَنَامِ ۙ﴿۱۰﴾

११. तिच्यात मेवे आहेत आणि खजूर आहे आवरण चढविलेले.[१२]

فِيْهَا فَاكِهَةٌ ۙ وَّالنَّخْلُ ذَاتُ الْاَكْمَامِ ۖ﴿۱۱﴾

१. 'अर् रहमान' या शब्दाचे स्पष्टीकरण सूरह फातेहा टीप क्र. ५ आणि सूरह बनी इस्राईल टीप क्र. १४५ मध्ये केले गेले आहे. रहमान हे नाव अल्लाह करीता हिब्रू भाषेत ही आहे, जी अगदी प्राचीन काळापासून यहूदी लोकांची धार्मिक भाषा राहीली आहे हिब्रू भाषेत हा शब्द अशा प्रकारे लिहीला जातो-

**अर्-रहमान** הָרַחְמָן-

(अल मुअज:मुल हदीस इबरी अरबी, दारूल मलाईन बैरूत - पृ. ४४६)

तात्पर्य अगदी पुरातन काळा पासून अल्लाह करीता 'अर् रहमान' हे नाव एक परिचित नाव आहे.

या सूरहचा आरंभ अल्लाहच्या दयाळू या गुण विशेषाने झाला आहे. ज्याच्या स्मरणाने माणसाच्या मनात त्याच्या दयेची अनुभूति होते. आणि या अनुभूतिच्या परिणाम स्वरूपी तो आपल्या पालन कर्त्याच्या देणग्यांची कदर करणारा बनतो.

२. परम दयाळू ईश्वराच्या कृपेस ही निकड जाणवली की त्याने मानवाच्या मार्गदर्शना साठी आपल्या तर्फे एक बुद्धि कौशल्य युक्त ग्रंथ अवतरीत करून माणसाला त्याचे ज्ञान व समज प्रदान करावी. यास्तव त्याने आपल्या पैगंबरावर कुरआन अवतरीत करून माणसाच्या शिकवण व मार्गदर्शनाची व्यवस्था केली. कुरआन त्याची फार मोठी कृपा आहे.

अल्लाहची महद कृपा असण्या सोबतच तो ज्ञानाचा फार मोठा खजीना आहे. अर्थात अल्लाहचा माणसावर हा फार मोठा उपकार होय की त्याने माणसाला ईश ग्रंथाचे ज्ञान प्राप्त करण्याची पात्रता दिली व त्याचे आकलन प्रदान केले.

३. कुरआनाच्या शिकवणीचा उल्लेख प्रथम केला गेला आणि मानवाच्या निर्मितीचा उल्लेख नंतर केला. अशासाठी की हे स्पष्ट व्हावे की कुरआनाची शिकवणच अशी गोष्ट होय जी त्याच्या अस्तित्वाच्या उद्दिष्टास पूर्ण करते.

४. माणसाला बोलण्याचे सामर्थ्य प्रदान करून अल्लाहने त्यावर आपल्या फार मोठा अनुग्रह केला आहे. वाक् सामर्थ्य त्याच्या स्वभावाचे प्रतिनिधित्व करते आणि याचा संबंध त्याच्या सूज्ञ असण्याशी आहे. माणसाचे वैशिष्टय हे की तो एक सूज्ञ निर्मिती आहे, ज्याला बोलण्याचे सामर्थ्य प्रदान केले गेले, ज्याची निकट ही की माणसाने आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञ व्हावे व या उच्चतम वैशिष्टयाला कुरआन शिकण्या करीता उपयोगात आणावे. त्याच्या जीभेवर अल्लाहची वाणी असावी व त्याने सतत अल्लाहच्या नाम: स्मरणात लीन असावे. हे आणि या प्रकारच्या इतर उच्चतम उद्दिष्टां करीताच त्याला बोलण्याची शक्ति प्रदान केली गेली आहे.

५. मग माणसाने ज्या सृष्टीत डोळे उघडले आहेत, त्यात सर्वत्र तो आपल्या पालन कर्त्याच्या अद्‌भूत सामर्थ्याचे देखावे पाहू शकतो. सूर्य आणि चंद्रासारख्या ग्रह नक्षत्रांना कशा प्रकारे त्याने एका गतिविधीच्या ठराविक हिशेबाचे पालन करणारे बनविले आहे की ते आपल्या सीमेचे किंचित मात्र उल्लंघन करू शकत नाही. यांना जमीनी पासून जेवढया अंतरावर राखले गेले आहे, त्या अंतरावर राहील्यानेच जमीनीवर मानव-जीवन शक्य झाले आहे. जर सूर्य जमीनीच्या जवळ आला किंवा अधिक दूर अंतरावर गेला तर जमीनीवरील उष्णतेचे संतुलन पार बिघडेल. परिणामी मनुष्य व अन्य सजीव जिवंत राहूच शकणार नाहीत. त्याच प्रमाणे चंद्राच्या आपल्या कक्षे पासून विचलीत होण्याचा जबरदस्त परिणाम समुद्राच्या भरती ओहोटीवर पडेल. ज्यामुळे वेगवेगळया प्रकारच्या समस्या उद्‌भवतील. तेव्हा माणसाने हे ध्यानी घ्यावे की सूर्य व चंद्राचे आपापल्या कक्षेत राहाणे आणि त्याचा नियमित पणे उदय व अस्त, मग तो पृथ्वीच्या भ्रमणाचा परिणाम म्हणून का असेना अल्लाहच्या सामर्थ्याचा केवढा विस्मय कारक नमुना आहे.

६. तारे अतिशय उंचीवर असून ही अल्लाहच्या पुढे झुकलेले आहेत आणि त्यांचे झुकणे वाह्यात: अल्लाहच्या आदेशापुढे झुकणे होय. उदाहरणार्थ त्यांना आकाशात ज्या कोनात ठेवले गेले आहे, त्याच कोनावर राहून भ्रमण करीत राहणे याचे स्पष्ट उदाहरण होय तसेच जमीनीवर झाडे त्याच्या आदेशापुढे नतमस्तक आहेत. येथे पावेतो की एक पान ही त्याच्या आदेशाविना हलत नाही. त्यांच्या सावल्या त्याच्या पुढयात सजदा करीत असल्याचे व्यक्त करतात. ही अल्लाहच्या सामर्थ्याची केवढी नवलपूर्ण निशाणी होय!

तारे आणि वृक्षांच्या सजद्याचा उल्लेख सूरह हज्ज (आयत क्र. १८) मध्ये ही केला गेला आहे.

७. आकाशाला अल्लाहने इतके उंच केले आहे की आधुनिक विज्ञान ही आपल्या प्रगत साधना नंतर ही, त्याच्या उंची पर्यंत पोहचू शकले नाही. हा त्याच्या जबरदस्त सामर्थ्याचा असा पुरावा होय की प्रत्येक मनुष्य उघडया डोळयांनी त्याचे अवलोकन करू शकतो.

८. तुला (तराजू) न्यायया अर्थाने प्रयोजिला जातो, आणि या ठिकाणी तोच अर्थ अभिप्रेत आहे. आकाशाच्या उंचीकडे जेव्हा दृष्टी जाते तेव्हा ग्रह नक्षत्रांची एक अशी व्यवस्था अवलोकनात येते; जी अगदी संतुलीत आहे आणि कोणतीही गोष्ट वा वस्तू संतुलना बाहेर नाही. जर एखादी गोष्ट संतुलना बाहेर गेली तर ही संपूर्ण व्यवस्था फार मोठया अपघातास बळी पडेल. या द्वारे बुद्धि सृष्टी रचयतिच्या 'न्याय' गुण विशेषाकडे वळते की तो न्याय करणारा आहे आणि न्याय प्रिय आहे. म्हणूनच त्याने सृष्टीच्या व्यवस्थेत अत्याधिक स्वरूपाचे संतुलन राखले आहे. तात्पर्य ज्यांचे डोळे पाहू शकतात अशांना

आकाश व जमीनीच्या दरम्यान एक तुला (तराजू) लोंबकळत असलेली दिसून येईल अर्थात ती म्हणजे न्याय-तुला, आणि ही अभौतिक तुला देखील अल्लाहच्या चमत्कृति पैकी होय.

९. ही न्याय तुला, जी जमीन व आकाशाच्या दरम्यान कायम आहे आणि डोळस दृष्टीने पाहीली जाऊ शकते. माणसाला न्यायाचा धडा शिकविते की त्याने सन्मार्गावर कायम रहावे आणि न्याय विपरीत कोणते ही काम करू नये. ना आपल्या पालन कर्त्याच्या संबंधाने आणि ना ईश्वराच्या दासांच्या संबंधाने.

१०. जेव्हा न्याय-तुलेचा उल्लेख केला गेला तेव्हा त्या तराजूकडे लक्ष वेधविले गेले ज्याचा मनुष्य वस्तू तोलण्यासाठी (वजन करण्या साठी) वापर करतो. अल्लाह फर्माविले, ही न्याय तुला एवढया साठी प्रस्थापित केली गेली आहे की तुम्ही आपल्या दैनंदिन जीवनात या पासून मार्गदर्शन प्राप्त करा व न्यायपूर्ण रित्या तोल-वजन करा. तोलण्यात दांडी मारू नका की यात दुसऱ्याचा हक्क हिरावून घेणे ही आहे व धोकेबाजी ही. तसेच हा फार मोठा गुन्हा होय. सूरह मुत्तफिकीन मध्ये वजन तोल मध्ये कमी करणाऱ्यांना सक्त ईश शिक्षेची तंबी दिली गेली आहे.

११. म्हणजे जमीनीला या योग्य बनविले की तिच्यावर प्राणी मात्रांचे वास्तव्य राहावे. विज्ञानाच्या प्रगतीने मानवाला चंद्रावर नेऊन पोहचविले परंतु वास्तव्य करण्याच्या दृष्टीने तेथले वातावरण योग्य दिसून आले नाही. हीच अवस्था अन्य ग्रहांची ही आहे, की तिथे मनुष्य वस्ती करून राहील अशी परिस्थिती नाही. परंतु पृथ्वी असा ग्रह आहे की जिथे जीवन-यापनाच्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. हा या गोष्टीचा पुरावा होय की सृष्टि निर्मात्याने जमीनीला (म्हणजेच पृथ्वीला) आपल्या सृष्टी निर्मिती करीता विशेषत्वाने बनविले आहे.

१२. जमीनीवर माणसाला जी उपजिविका लाभते ती देखील त्याच्याच मेहरबानीचे फळ होय आणि यात ही त्याच्या ईशत्वाच्या व अद्वितीय सामर्थ्याच्या निशाण्या आहेत. या ठिकाणी केवळ उदाहरण म्हणून काही मोजक्या ईश देणग्यांचा उल्लेख केला गेला आहे सुके मेवे कसे स्वादिष्ट, रंगीबेरंगी आणि विविध प्रकारचे निमार्ण केले गेले आहे. खजूरीचेच उदाहरण घ्या. तिचा गर अशा प्रकारे आवरणाला चिकटून असतो की स्पष्टत: हे दिसून येते की उपजिविका प्रदान करणाऱ्याने एवढा इतमाम अशासाठी राखला आहे की गर सुरक्षित रहावा आणि माणसाला ईश्वराची ही देणगी उत्कृष्ट स्वरूपात मिळावी.

*आणि धान्ये आहेत भुसा वाले आणि सुवासिक फूले ही. तेव्हा (हे जिन्न समूह आणि मानव समूह !) तुम्ही आपल्या 'रब्ब' (पालन कर्त्या) च्या कोण कोणत्या उपकारांचा इन्कार कराल ? माणसाला त्याने ठिकरी सारख्या खणखण वाजणाऱ्या माती पासून निर्माण केले.(अल-क़ुरआन)*

१२. आणि धान्ये आहेत भुसा वाले [१३] आणि सुवासिक फूले ही.[१४]

وَالْحَبُّ ذُو الْعَصْفِ وَالرَّيْحَانُ ﴿١٢﴾

१३. तेव्हा (हे जिन्न समूह आणि मानव समूह !)[१५] तुम्ही आपल्या 'रब्ब' (पालन कर्त्या) च्या कोण कोणत्या उपकारांचा इन्कार कराल ?[१६]

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿١٣﴾

१४. माणसाला त्याने ठिकरी सारख्या खणखण वाजणाऱ्या माती पासून निर्माण केले.[१७]

خَلَقَ الْإِنْسَانَ مِنْ صَلْصَالٍ كَالْفَخَّارِ ﴿١٤﴾

१५. आणि जिन्ना ला अग्नि शिखे पासून [१८]

وَخَلَقَ الْجَانَّ مِنْ مَارِجٍ مِنْ نَارٍ ﴿١٥﴾

१६. तेव्हा (हे मनुष्य व जिन्नांच्या समूहानो ) तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या चमत्कृतिंचा इन्कार कराल?[१९]

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿١٦﴾

१७. तो दोन्ही उदयाचलांचा आणि दोन्ही अस्ताचलांचा स्वामी आहे.[२०]

رَبُّ الْمَشْرِقَيْنِ وَرَبُّ الْمَغْرِبَيْنِ ﴿١٧﴾

१८. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण काणत्या सामर्थ्याचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿١٨﴾

१९. त्याने दोन समुद्राना सोडले की आपसात मिळावेत.

مَرَجَ الْبَحْرَيْنِ يَلْتَقِيَانِ ﴿١٩﴾

२०. त्यांच्या दरम्यान एक पडदा असतो ज्याचे ते उल्लंघन करीत नाही.[२१]

بَيْنَهُمَا بَرْزَخٌ لَا يَبْغِيَانِ ﴿٢٠﴾

२१. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या सामर्थ्याच्या कोणकोणत्या आश्चर्यांचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٢١﴾

२२. त्यांच्यातून मोती आणि प्रवाळ निघतात.[२२]

يَخْرُجُ مِنْهُمَا اللُّؤْلُؤُ وَالْمَرْجَانُ ﴿٢٢﴾

२३. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या सामर्थ्याच्या कोणकोणत्या चमत्कृतिंचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٢٣﴾

१३. धान्याच्या प्रत्येक दाण्यावर अगदी पातळ पापुद्रयाचे आवरण चढलेले असते ज्यामुळे तो सुरक्षित असतो आणि हे पातळ आवरण कुटार म्हणून उपयोगी पडते जे जनावरांचे खाद्य होय. उदाहरणार्थ गव्हाच्या दाण्यावर जो पातळ पापुद्रा चढलेला असता तो दळल्या नंतर भूसा बनतो. तांदुळाच्या दाण्यावर तर वेष्टनच असते आणि याच प्रकारे हरबऱ्याच्या दाण्यावर ही आवरण असते. तात्पर्य अन्नधान्याच्या प्रत्येक दाण्याला पॅक करून सुरक्षित रित्या मानसाप्रत पोहचविले जात आहे. हा इतमाम केवढा आश्चर्य जनक आहे। उपजिविकीची ही सामुग्री केवढी उत्कृष्ट आहे .

१४. मूळ शब्द ''रैहान'' जो सुगंधित वनस्पती करीता ही वापरला जातो आणि फूलां करीता ही. माणसाला सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक अभिरूची ही देखील प्रदान केली आहे की सुगंधा मुळे त्याला आनंद व उल्हास जाणवतो. त्याची ही रूची भागविण्याकरीता सुगंधित झाडे, वेली आणि इतर वनस्पती उदाहरणार्थ लवंग, विलायची, दालाचिनी आणि वेगवेगळया प्रकारची फुले, उदा. गुलाब, जाई जुई इत्यादि निर्माण केले गेले आहेत. ही फुले किती कोमल व सुंदर असतात आणि त्याचा सुवास मनाला केवढी प्रसन्नता देणार असतो. माणसाच्या सौंदर्याभिरूचीच्या तृप्तीची उपाय योजना किती चांगल्या प्रकारे केली गेली आहे.

१५. संबोधन दोन समूहांशी म्हणजे मनुष्य व जिन्नांशी आहे. जसे की पुढे आयत ३३ मध्ये स्पष्टत: हे मनुष्य व जिन्नाच्या समूहांनो असे फर्माविले गेले आहे.

१६. मूळ शब्द 'आला' हा सर्व सामान्य पणे ईश देणग्या या अर्थाने वापरला जातो; जो हा अर्थ शब्दकोषाच्या दृष्टीने योग्य आहे परंतु हा या शब्दाचा मूळ आशय नव्हे. खरे पाहता हा शब्द अरबी काव्यातील प्रयोजना नुसार त्या कामांसाठी वापरला जातो जे वैशिष्टय पूर्ण असावे; आणि बुद्धिकौशल्य आणि चांगल्या उपाय योजने मुळे आश्चर्य कारक असावेत. यास्तव तबरी मध्ये याचा एक अर्थ सामर्थ्य ही उल्लेखित आहे. (पहा - तफसीर तबरी खंड - २७ पृष्ठ- ७३)

आणि इमाम राजी यांनी ही आयतीची एक व्याख्या ही निवेदिली आहे की -

'संबंधित आयत सामर्थ्याच्या निवेदनात आहे. ईश देणग्यांच्या निवेदनात नव्हे. (तफसीर राजी खं. ९ पृष्ठ ९८)

आणि अल्लामा फराही यांनी यावर संशोधनात्मक चर्चा केली आहे आणि याचा अर्थ ईश-चमत्कार असा सांगितला आहे (पहा - मुफर्रदातुल कुरआन-फराही पृ,११)

या सूरह मध्ये आयतीची ३१ वेळा पुनरावृत्ति केली गेली आहे. आणि प्रत्येक ठिकाणी ईश देणग्यांचाच उल्लेख केलेला नाही किंबहुना अजाब (ईश-प्रकोपा) चा ही उल्लेख केला गेला आहे. तसेच सूरहचा मध्यवर्ति विषय ही कियामतीच्या घडून येण्या संबंधी आहे. यास्तव अल्लाहच्या असीम सामर्थ्याच्या चमत्कृतिंकडे वारंवार लक्ष वेधविले गेले आहे. म्हणूनच या आयतीचा अनुवाद करतांना याच अर्थावर विशेष भर दिला गेला आहे.

खोटे ठरविण्याचा संबंध जेव्हा एखाद्या गोष्टीशी येतो तेव्हा त्याचा अर्थ इन्कार करणे असा होतो. 'कामूस' मधील उल्लेख नुसार

وَ كَذَّبَ بِالْاَمْرِ تَكْذِيْبًا وَ كِذَّابًا اَنْكَرَه

'एखाद्या गोष्टीला खोटे ठरविले म्हणजे तिचा इन्कार केला' (अल्कामूस लिलफिरोजा-आबादी खंड. १ पृ. १२७)

१७. म्हणजे अशा माती पासून जी ठिकरी प्रमाणे भाजलेली असावी माणसाचा पुतळा, जसे इतर ठिकाणी स्पष्टीकरण दिले गेले आहे, सडलेल्या कूजलेल्या माती पासून तयार केला गेला होता नंतर त्याला कोरडे करून भाजलेल्या माती सारखे कडक बनविले गेले आणि जेव्हा त्यात आत्मा फूंकला गेला तेव्हा तो हाडा मांसाचा मनुष्य बनला. अल्लाहच्या सामर्थ्याचा किती आश्चर्य कारक नमुना आहे मनुष्य !

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र.२४

१८. ज्या प्रकारे माणसाला जमीनीच्या मातीपासून निर्माण केले गेले आहे. त्याच प्रकारे जिन्नांना याच जमीनवर आढळून येणाऱ्या अग्निशिखे पासून निर्माण केले अर्थात आगीच्या ज्योती पासून म्हणूनच जिन्न एक सूक्ष्म ईश निर्मिती होय जी डोळयांनी दिसत नाही व जिचे उड्डाण अतिवेगवान असते. जिन्नांची या प्रकारे निर्मिती, अल्लाहच्या अद्‌भूत व असीम सामर्थ्याचा चमत्कारच होय.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र.२५

१९. या आयतीची या सूरह मध्ये वारंवार पुनरावृत्ति केली गेली आहे जी केवळ द्विरूक्ती नव्हे, किंबहुना अल्लाहच्या अनुग्रहाकडे, त्याच्या अनुपमेय गुणवैशिष्टयांकडे व चमत्कृतिकडे लक्ष केंद्रित करण्या करीता आणि आत्म्याला जागृत करण्या करीता फर्माविले गेले आहे. या द्विरूक्तीचे उदाहरण जबूर मध्ये ही आढळून येते. या ग्रंथाच्या १३६ क्रमांकाच्या प्रकरणात, 'की त्याची दया निरंतर आहे' हे वाक्य २६ वेळा म्हटले गेले आहे.

''परमेश्वराचे उपकार-स्मरण करा, कारण तो चांगला आहे; कारण त्याची दया सनातन आहे. प्रभूंच्या प्रभूंचे उपकार-स्मरण करा; कारण त्याची दया सनातन आहे.

जो एकटाच मोठी अद्‌भुत कृत्यें करितो त्याचे कारण त्याची

दया सनातन आहे.

ज्याने बुद्धि चातुर्याने आकाश केले त्यांचे; कारण त्याची दया सनातन आहे.

ज्याने पृथ्वी जलांवर विस्तारिली त्याचें; कारण त्याची दया सनातन आहे.

ज्याने मोठ मोठया ज्योति निर्माण केल्या त्याचें; कारण त्याची दया सनातन आहे.

ज्याने दिवसावर प्रभुत्व चालविण्या साठीं सूर्य निर्माण केले त्याचे; कारण त्याची दया सनातन आहे.

ज्याने रात्रीवर प्रभुत्व चालविण्या साठीं चंद्र व तारे निर्माण केले त्याचें; कारण त्याची दया सनातन आहे.'' (स्त्रोत्र संहिता १३६: १ ते ९)

यावरून असे दिसून येते की द्विरूक्तीची शैली, आकाशातून अवतरलेल्या ईश-ग्रंथांच्या वैशिष्टयां पैकी आहे. आणि शिकवण व प्रशिक्षणाच्या दृष्टीने हिचे फार महत्व आहे.

२०. खऱ्या अर्थाने जमीनीवर एकच पूर्व आणि एकच पश्चिम आहे परंतु हिवाळयात सूर्याचा उदय व अस्त क्षितीजाच्या अगदी अंतिम टोकाकडे होतो तर उन्हाळयात दुसऱ्या टोकाकडे होतो. ज्यामुळे ऋतुबदल घडून येतो आणि हे सर्व व्यवस्थितरित्या होत असते. या अनुषंगाने सूर्याच्या उदय व अस्ताच्या दोन पूर्व व दोन पश्चिम दिशा ठरल्या. अर्थात ही देखील अल्लाहच्या सामर्थ्याची फार मोठी निशाणी होय.

अन्य एका पैलूने ही दोन पूर्व व दोन पश्चिम दिशांचे अस्तित्व सिद्ध होते. उत्तर ध्रृवावर जिथे सहा महीने दिवस असतो तिथे सूर्य मध्यान्ही नसतो तर क्षितीजाच्या एका कडेला असतो. पूर्वेकडून निघून जेव्हा पश्चिमेस पोहचतो तेव्हा बुडत नाही, किंबहुना पुन्हा पूर्वेकडे मार्गाभ्रमण करतो अशा प्रकारे तो एका दिशेकडून दुसऱ्या दिशेकडे भ्रमण करीत राहतो. उत्तर ध्रृवाच्या अगदी जवळच्या प्रदेशात, जिथे माणसाचे दळण वळण आहे, हे दृश्य दिसून येते. या दिवसात पश्चिम ही पूर्व बनते. अशा प्रकारे दुसऱ्या सहामाहीत जेव्हा सतत रात्रच असते पूर्व दिशा ही पश्चिम बनते. याच प्रमाणे दक्षिण ध्रृवावर ही सहा महीने दिवस आणि सहा महीने रात्र असते. हे अल्लाहच्या असीम सामर्थ्याचे द्योतकच होय.

२१. याच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फुर्क़ान टीप क्र.७१

२२. मूळ शब्द मर्जान अर्थात प्रवाळ (Coral) एक पाण्यातील झाड असते ज्याला समुद्राचे किटक तयार करतात. हे दगडासारखे कठोर असते आणि रंग सुंदर गुलाबी व अन्य इतर रंग असतात. याची गणना रत्नांमध्ये होते. व आभुषणांसाठी याचा वापर केला जातो. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हा इतमाम एवढया साठी केला आहे की माणसाच्या सौंदर्याभिरूची तृप्ति व्हावी अर्थात हा इतमाम ज्या पद्धतीने केला आहे तो त्याच्या सामर्थ्याचा चमत्कारच होय.

या आयतीच्या संबंधाने एक शंका ही मांडली जाते की मोती व प्रवाळ फक्त समुद्रातुनच निघतात, वास्तविक आयतीत समुद्र आणि नदी दोघांतून निघत असल्याचा उल्लेख आहे. म्हणून काही भाष्यकारांनी याचा खुलासा असा केला आहे की दोघांच्या मिश्रणाने, संयुक्तिकरणाने या वस्तू निघतात. मूल मातेच्या उदरातून जन्माला येत असले तरी ते माता व पिता दोघांचे ही अपत्य ठरते परंतु हा दावा उचित नव्हे की मोती फक्त समुद्रातुनच निघतात; किंबहुना अशा नदीतून ही निघतात जिचे पाणी गोड असते. या संदर्भात आम्ही इन्सायक्लोपिडीया ऑफ मिनरल्स ॲंड जेम स्टोन्स चा खालील उतारा प्रस्तुत करीत आहेत-

"They are found in both sea water and fresh water---------pearls are found in the persion Gulf, the Gulf of Manaar between Ceylone and India, the Red sea, The Gulf of Mexico and Panama, and the water of Australia and Venezuela. Fresh - Water Pearls are found in many rivers including those of Scotland and North America------in particular the Mississipi river."

(The Encyclopedia of Minerals and Gem stones by Michal O'Donaghne-----Orbis. Publ. London P. 286)

''मोती समुद्र आणि नदी या दोघांच्या ही पाण्यात आढळून येतात ----- मोती पर्शियन आखात, मिनार आखात, जे लंका आणि भारत यांच्या दरम्यान आहे, लाल समुद्र मॅक्सीको व पनामा आखात आणि ऑस्ट्रेलिया व वेनेझूला पासून लांबवर असलेल्या गोडे पाण्याचे मोती बहुतेक नद्यांमध्ये आढळून येतात. स्कॉटलॅंड व उत्तर अमेरीकाच्या नद्यांसहीत. विशेषत: मिसीसीपी नदीत''

रत्नांच्या या इन्सायक्लोपिडीयाच्या पृष्ठ क्र. १२७ वर ही हा खुलासा दिला गेला आहे.

" Pearls may be obtaind from both fresh water and salt water molluses" (P. 127)

अर्थात मोती गोड पाण्याच्या शिपल्यातून ही प्राप्त केले जाऊ शकतात आणि खारे पाण्याच्या शिपल्यातून ही.

*समुद्रात पर्वतां सारखे उंच उभे असलेली जहाजे त्याच्याच अधिकार कक्षेत आहेत. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या चमत्कारांचा इन्कार कराल ! जमीनीवर जे काही आहेत (सर्व) नाश पावणार आहेत. आणि तुमच्या पालन कर्त्याचे अस्तित्वच बाकी राहणार आहे, जो मोठा प्रताप व प्रतिष्ठा बाळगणारा आहे. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या गुणांचा इन्कार कराल !(अल-क़ुर्आन)*

२४. समुद्रात पर्वतां सारखे उंच उभे असलेली जहाजे त्याच्याच अधिकार कक्षेत आहेत.[२३]

وَلَهُ الْجَوَارِ الْمُنْشَـٰتُ فِي الْبَحْرِ كَالْأَعْلَامِ ﴿٢٤﴾

२५. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या चमत्कारांचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٢٥﴾

२६. जमीनीवर जे काही आहेत (सर्व) नाश पावणार आहेत.[२४]

كُلُّ مَنْ عَلَيْهَا فَانٍ ﴿٢٦﴾

२७. आणि तुमच्या पालन कर्त्याचे अस्तित्वच बाकी राहणार आहे, जो मोठा प्रताप व प्रतिष्ठा बाळगणारा आहे.[२५]

وَيَبْقَىٰ وَجْهُ رَبِّكَ ذُو الْجَلَالِ وَالْإِكْرَامِ ﴿٢٧﴾

२८. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या गुणांचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٢٨﴾

२९. आकाशां मध्ये आणि जमीनीवर जे जे आहेत सर्व त्याच्या कडेच याचना करतात.[२६] दररोज तो एका नव्या वैभवात आहे.[२७]

يَسْأَلُهُ مَنْ فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ كُلَّ يَوْمٍ هُوَ فِي شَأْنٍ ﴿٢٩﴾

३०. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या गुण वैशिष्टयांचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٣٠﴾

३१. हे दोन महान समुदायांनो ! [२८] आम्ही तुमच्या करीता मोकळे होत आहोत.[२९]

سَنَفْرُغُ لَكُمْ أَيُّهَ الثَّقَلَانِ ﴿٣١﴾

३२. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या चमत्कृतिंचा इन्कार कराल ! [३०]

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٣٢﴾

३३. हे मनुष्य व जिन्नांच्या समूहानो ! जर तुम्ही आकाशांच्या व जमीनीच्या सीमे बाहेर जाऊ शकत असाल तर जा- (पण) सामर्थ्या शिवाय निघू शकत नाही.[३१]

يَا مَعْشَرَ الْجِنِّ وَالْإِنْسِ إِنِ اسْتَطَعْتُمْ أَنْ تَنْفُذُوا مِنْ أَقْطَارِ
السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ فَانْفُذُوا ۚ لَا تَنْفُذُونَ إِلَّا بِسُلْطَانٍ ﴿٣٣﴾

२३. पाण्यात बऱ्याचशा वस्तू बुडतात परंतु मोठ मोठी जहाजे जी पर्वता समान उंच उभी असतात समुद्रात तरंगत असतात काय हा अल्लाहच्या सामर्थ्याचा अविष्कार नव्हे? या जहाजांवर त्याचे निमंत्रण असे आहे की तो जेव्हा इच्छितो जहाज पाण्यात बुडवितो.

आयतीवरून हे ही कळाले की कुरआन अवतरणाच्या काळातही मोठमोठी जहाजे होती.

२४. अरबी भाषेतील 'मन' (जो) हा शब्द सजीवा करीता वापरला जातो. अर्थात जमीनीवर जी ईश निर्मिती (प्राणी मात्र) जिवित आहे. त्याला एक न एक दिवस मरून समाप्त व्हावयाचे आहे. आता कियामतीच्या दिवशी अल्लाह समस्त मृतांना पुन्हा जिवंत करील ही गोष्ट वेगळी. त्या वेळी मनुष्य आणि जिन्नांच्या दोन्ही समूहांना तो कर्माचा जाब घेण्यासाठी आपल्या समोर हजर करील. नंतरच्या आयतींमध्ये ही गोष्ट स्पष्टत: निवेदिली गेली आहे.

२५. म्हणजे सर्वाधिक महानता व प्रतिष्ठा बाळगणारे अल्लाहचे अस्तित्व सदैव बाकी राहणारे आहे. तो चिरस्थायी व निरंतर आहे. आपल्या चिरस्थायीत्वा करीता तो कोणाचा गरजवंत नाही. आणि ना त्याच्या महानतेत व प्रतिष्ठेत कसल्याही प्रकारची उणीव होईल. राहीली सृष्ट-निर्मिती तर तिचे अस्तित्व तिच्या पालन कर्त्याच्या मर्जीवरच अवलंबून आहे.

२६. अर्थात फरिश्ते असोत की मनुष्य असोत वा जिन्न सर्वच त्याचे गरजू आहेत आणि त्याच्या पुढे आपली गरज मांडतात.

२७. म्हणजे प्रत्येक वेळी तो एक वेगळयाच वैभवात आहे. की तो आपल्या निर्मितीच्या विविध गरजा भागवितो. त्यांच्या प्रार्थना व विनवण्या ऐकतो; रोग्यांना स्वास्थ प्रदान करतो, दुर्बलांचे सहाय्य करतो, अत्याचार पिडीतांचे गाऱ्हाणे ऐकतो, अगतिकांची मदत करतो, विपदा ग्रस्त लोकांना वाचवितो. त्रासापासून मुक्ति देतो; संकटाचे निवारण करतो, अपराधांना क्षमा करतो, ईश-दासांना सन्मार्गाचे मार्गदर्शन करतो आणि त्यांना आपल्या कृपेने व देणग्यांनी उपकृत करतो. यश, प्रतिष्ठा व वर्चस्व प्रदान करतो. तात्पर्य अशी अगणित कामे आहेत जी पार पाडण्यात तो असा मग्न आहे की एक ही दिवस खाली जात नाही.

२८.मूळ शब्द **ثقل** 'सकल' अर्थात भारदस्त वजनदार अरबी भाषेच्या प्रसिद्ध शब्दकोष 'कामूस' मधील उल्लेख असा-

**والثّقل ---- كل شئ نفيس مصون ومنه الحديث**

**الى تارك فيكم الثقلين۔** (القاموس جلد ۳ ص ۲۵۲)

**ثقل** ''सक़ल'' म्हणजे प्रत्येक उमदा व सुरक्षित वस्तू वा गोष्ट. या आशयात ते हदीस वचन आहे ज्यात सांगितले गेले आहे की मी तुमच्या दरम्यान दोन भारदस्त गोष्टी सोडत आहे.'' (अल्कामूस खंड ३ - पृ. २५२)

जिन्न आणि मनुष्य जमीनीवर दोन महान समूह आहेत, जे इतर समस्त ईश-निर्मिती हून भिन्न आहेत म्हणून त्यांना या अर्थाने घेतले गेले आहे.

२९. ही गोष्ट ताकीद म्हणून आहे, म्हणजे आम्ही लवकरच तुमच्या कडे हिशेब घेण्या करीता लक्ष केंद्रित करीत आहोत आणि तुमच्या समाचार घेत आहो.

३०. कियामतीच्या दिवशी जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह आपले न्यायालय प्रस्थापित करील आणि दोन्ही समूहांना हजर केले जाईल तेव्हा तुम्ही त्याच्या अद्‌भूत सामर्थ्याचे आपल्या डोळयांनी अवलोकन कराल, जरी आज तुम्ही त्याचा इन्कार करीत आहात.

३१. आकाश व जमीनीच्या हद्दी शी अभिप्रेत या विश्वाच्या हद्दी होत; आणि मनुष्य व जिन्न अगतिक आहेत की ते याच विश्वात त्यांनी सदैव रहावे. आकाशात जिन्न उड्डाण करतात आणि आता मनुष्य देखील अवकाशात उड्डाण करीत आहे परंतु दोघांचे ही उड्डाण या विश्वाच्या हद्दी च्या पलीकडे नाही. अर्थात ते या विश्वाच्या बाहेर जाऊ शकत नाही. ते त्याच स्थितीत या हद्दी बाहेर जाऊ शकतात, जेव्हा अल्लाह त्यांना तसा अधिकार प्रदान करील. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर अल्लाह तर्फे या गोष्टीचा परवाना (पासपोर्ट) प्राप्त होईल. हेतु, या ठिकाणी मनुष्य व जिन्नांची विवशता जाहीर करणे होय की जेव्हा ते अल्लाहने रचलेल्या या विश्वात काही काळ राहण्यास अगतिक आहेत तर मग त्याच्याशी विद्रोह करून त्यांना आणखी कोठे आश्रय मिळू शकतो.

या ठिकाणी त्या शंकेचे ही निरसन झाले पाहीजे की मानवाने अवकाशात भरारी घेऊन जमीनीच्या हद्दीतून اقطار बाहेर पडण्यात यश प्राप्त केले आहे. आयतीत जमीनीच्या आधी आकाशांचा उल्लेख केला गेला आहे. यास्तव

**اقطار السمٰوٰتِ والارض**

'आकाश व जमीनीच्या सीमा' असे फर्माविले गेले आहे आणि अभिप्रेत ही समस्त सृष्टी होय. अन्यथा जर जमीनीच्या गुरुत्वाकर्षणा बाहेर जाणे अभिप्रेत असते तर हे आव्हान जिन्नांना कसे केले जाऊ शकत होते जे आधी पासून च आकाशात भ्रमण करीत आहेत.

३४. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या निशाण्यांचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٣٤﴾

३५. तुमच्यावर आगीचे लोळ आणि धूर [३२] सोडला जाईल मग तुम्ही आपला बचाव करू शकणार नाही.[३३]

يُرْسَلُ عَلَيْكُمَا شُوَاظٌ مِّن نَّارٍ وَنُحَاسٌ فَلَا تَنتَصِرَانِ ﴿٣٥﴾

३६. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या सामर्थ्याच्या कोणकोणत्या अद्‌भूत बाबींचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٣٦﴾

३७. (काय दशा होईल) जेव्हा आकाश विदीर्ण होईल आणि चामडया सारखे लल भडक होईल.[३४]

فَإِذَا انشَقَّتِ السَّمَاءُ فَكَانَتْ وَرْدَةً كَالدِّهَانِ ﴿٣٧﴾

३८. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या चमत्कृतिंचा इन्कार कराल!

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٣٨﴾

३९. त्या दिवशी कोणत्याही मनुष्य व जिन्नास त्याच्या अपराधा बाबत विचारले जाणार नाही.[३५]

فَيَوْمَئِذٍ لَّا يُسْأَلُ عَن ذَنبِهِ إِنسٌ وَلَا جَانٌّ ﴿٣٩﴾

४०. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या अद्‌भूत सामर्थ्याचा इन्कार कराल!

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٤٠﴾

४१. अपराधी आपल्या चेहऱ्यां वरून ओळखले जातील आणि त्यांना कपाळा वरचे केस व पाय धरून फरफटत नेले जाईल.

يُعْرَفُ الْمُجْرِمُونَ بِسِيمَاهُمْ فَيُؤْخَذُ بِالنَّوَاصِي
وَالْأَقْدَامِ ﴿٤١﴾

४२. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या अद्‌भूत सामर्थ्याचा इन्कार कराल !

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٤٢﴾

४३. हीच ती जहन्नम होय जिचा अपराधी इन्कार करीत राहीले.

هَٰذِهِ جَهَنَّمُ الَّتِي يُكَذِّبُ بِهَا الْمُجْرِمُونَ ﴿٤٣﴾

४४. ते याच्या व उकळत्या पाण्याच्या दरम्यान फेरा मारत राहतील. [३६]

يَطُوفُونَ بَيْنَهَا وَبَيْنَ حَمِيمٍ آنٍ ﴿٤٤﴾

३२. मूळ शब्द 'नहास' शब्द कोषात याचा अर्थ 'धूर' असा आहे आणि बहुतेक भाष्यकारांनी धूर हाच अर्थ घेतला आहे अर्थात हाच अर्थ या ठिकाणी योग्य आहे.

३३. ही कियामतीच्या दिवसाची स्थिती सांगीतली जात आहे की बंडखोर मनुष्य व जिन्नांवर आकाशातून आगीचे निखारे वर्षविले जातील आणि धूर सोडला जाईल मग अल्लाह च्या प्रकोपा चा कशा प्रकारे इन्कार कराल.

३४. म्हणजे कियामतीच्या दिवशी असे वाटेल की जणू आकाशात आग लागली आहे आणि हे निळसर आकाश लाल भडक आकाशात परिवर्तित होईल. हा संकेत आहे जबरदस्त आसमानी परिवर्तना कडे जेव्हा आकाश अग्नि-दृश्य सादर करीत असेल तेव्हा माणसाचे भान ही ठिकाणावर नसेल. अल्लाहच्या या अद्‌भूत सामर्थ्याचे अवलोकन मनुष्य एक दिवस निश्चित करील परंतु आज मात्र तो याचा इन्कार करीत आहे आणि असे समजत आहे की हे आकाश व जमीन नेहमी अशाच स्थितीत राहील.

३५. याचा अर्थ असा नव्हे की अपराध्यांना जाब विचारला जाणार नाही. कुरआनाने इतर ठिकाणी स्पष्ट केल्या प्रमाणे त्यांना सक्तपणे जाब विचारला जाईल. या ठिकाणी जी गोष्ट अभिप्रेत आहे, ती ही की अपराध्यांना हश्र च्या मैदानात त्यांच्या अपराधाचे स्वरूप विचारण्याची गरज पडणार नाही, किंबहुना त्यांच्या अपराधांचा प्रभाव त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येईल आणि त्यांचा अवतार पाहताच त्यांना अपराधी म्हणून ओळखले जाईल. यास्तव पुढे आयत क्र. ४१ मध्ये या बाबत सस्पष्टीकरण निवेदन दिले गेले आहे.

३६. म्हणजे जहन्नम मध्ये जळत असतांना जेव्हा यांना अत्याधिक तहान जाणवेल, तेव्हा ते पाण्या कडे धाव घेतील, परंतु पाणी ही इतके उष्ण असेल की अगदी उकळणारे अशा प्रकारे ते जहन्नम मध्ये आग आणि उकळते पाणी यांच्या दरम्यान ये जा करतील.

अल्लाहने जहन्नम ला आपल्या प्रकोपाचे कसे निशाण बनविले आहे आणि यात कशी दु:खदायक शिक्षा ठेवली आहे अर्थात हे देखील अल्लाहच्या अद्‌भूत सामर्थ्या पैकीच होय.

४५. तेव्हा तुम्ही आपल्या 'रब्ब' (पालन कर्त्या) च्या कोणकोणत्या अद्‌भूत सामर्थ्याचा इन्कार कराल !

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٤٥﴾

४६. आणि त्याच्या करीता, जो आपल्या 'रब्ब' (पालन कर्त्या) समोर उभे राहण्यास भ्याला, दोन बागा असतील. [३७]

وَلِمَنْ خَافَ مَقَامَ رَبِّهٖ جَنَّتٰنِ ﴿٤٦﴾

४७. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या कृपेचा इन्कार कराल ?[३८]

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٤٧﴾

४८. दोन्ही (बागा) विपुल फांद्या बाळगणाऱ्या असतील.[३९]

ذَوَاتَاۤ اَفْنَانٍ ﴿٤٨﴾

४९. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या कृपेचा इन्कार कराल ?

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٤٩﴾

५०. दोन्ही मध्ये दोन झरे वाहत असतील.[४०]

فِيْهِمَا عَيْنٰنِ تَجْرِيٰنِ ﴿٥٠﴾

५१. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या मेहरबानींचा इन्कार कराल?

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٥١﴾

५२. यात प्रत्येक मेव्याचे दोन प्रकार असतील. [४१]

فِيْهِمَا مِنْ كُلِّ فَاكِهَةٍ زَوْجٰنِ ﴿٥٢﴾

५३. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या दयेचा इन्कार कराल?

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٥٣﴾

५४. ते अशा बिछान्यांवर तक्के लावून बसतील ज्यांची अस्तरे जाड रेशमाची असतील [४२] आणि बागांची फळे खाली लोंबकळत असतील.[४३]

مُتَّكِـِٕيْنَ عَلٰى فُرُشٍۢ بَطَاۤىِٕنُهَا مِنْ اِسْتَبْرَقٍ ۗ وَجَنَا
الْجَنَّتَيْنِ دَانٍ ﴿٥٤﴾

५५. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या मेहरबानींचा इन्कार कराल?

فَبِاَيِّ اٰلَاۤءِ رَبِّكُمَا تُكَذِّبٰنِ ﴿٥٥﴾

३७. आपल्या पालन कर्त्या समोर हजर होण्या विषयीचे भय माणसाला दुराचारा पासून वाचविते आणि आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यास प्रवृत्त करते. हे भय जेवढे जास्त असेल तेवढे चारित्र्य सदाचार पूर्ण असेल.

अल्लाह समोर हजर होण्यास भिणारे जन्नतमध्ये दाखल होतील जेथे प्रत्येक माणसाला दोन बागा दिल्या जातील. दोन्ही बागा दोन प्रकारच्या असतील यासाठी की त्यांनी अतिशय आनंदित व्हावे.

३८. अल्लाहच्या मेहेरबानींचा, त्याच्या कृपा स्वरूप देणग्यांचा इन्कार करणारे इन्कारच करीत राहीले, परंतु बघा अल्लाह कस कशा देणग्यांनी आपल्या या दासांना जे त्याचे भय बाळगत राहीले प्रतिष्ठीत करणार आहे.

३९. ज्याअर्थी झाडे व त्यांच्या फांद्या अत्याधिक प्रमाणात असतील तर फळे ही मोठया प्रमाणात असतील. तसेच बागांच्या सौंदर्यात ही भर पडेल.

४०. म्हणजे प्रत्येक बागेत एक झरा असेल, जो तिला हिरवी टवटवीत राखील.

४१. ज्या प्रकारे बाग दोन प्रकारचे असतील, त्याच प्रमाणे फळफळादि मेवे ही दोन प्रकारचे असतील. स्वाद व इतर वैशिष्टयांच्या दृष्टीने भिन्न भिन्न असतील.

४२. जेव्हा अस्तर जाड रेशमाचे असतील तर वरचा भाग किती छान असेल.

४३. म्हणजे या बागांच्या फाद्यांवरील फळे खालपर्यंत लोबकळत असतील यासाठी की सहजगत्या त्यांना तोडणे शक्य व्हावे. जगात किती तरी झाडांची फळे अगदी उंचावर असतात व ती हस्तगत करण्यासाठी मोठे कष्ट उचलावे लागतात. परंतु जन्नतच्या झाडांची व त्यांच्या फळांचा थाटच निराळा आहे.

५६. यात लज्जाशील नजरा बाळगणाऱ्या (हूर) असतील, ज्यांना यांच्या पूर्वी एखाद्या माणसाने किंवा जिन्नाने स्पर्श केला नसेल.[४४]

فِيهِنَّ قَٰصِرَٰتُ ٱلطَّرْفِ لَمْ يَطْمِثْهُنَّ إِنسٌ قَبْلَهُمْ وَلَا جَآنٌّ ﴿٥٦﴾

५७. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या दयेचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٥٧﴾

५८. जणू त्या माणिक व प्रवाळ होत.[४५]

كَأَنَّهُنَّ ٱلْيَاقُوتُ وَٱلْمَرْجَانُ ﴿٥٨﴾

५९. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या मेहेरबानींचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٥٩﴾

६०. भलेपणाचा मोबदला भलेपणा खेरीज आणखी काय असेल ! [४६]

هَلْ جَزَآءُ ٱلْإِحْسَٰنِ إِلَّا ٱلْإِحْسَٰنُ ﴿٦٠﴾

६१. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या अनुग्रहांचा इन्कार कराल ?

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٦١﴾

६२. यांच्या खेरीज आणखी दोन बागा असतील.[४७]

وَمِن دُونِهِمَا جَنَّتَانِ ﴿٦٢﴾

६३. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या देणग्यांचा इन्कार कराल?[४८]

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٦٣﴾

६४. दोन्ही खूप हिरव्यागार.[४९]

مُدْهَآمَّتَانِ ﴿٦٤﴾

६५. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या चमत्कृतिंचा [५०] इन्कार कराल?

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٦٥﴾

६६. यांच्यात उचंबळणारे दोन झरे असतील.[५१]

فِيهِمَا عَيْنَانِ نَضَّاخَتَانِ ﴿٦٦﴾

६७. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या नैपुण्यांचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ ءَالَآءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٦٧﴾

६८. यांच्यात मेवे आणि खजुरी व डाळींब असतील.[५२]

فِيهِمَا فَٰكِهَةٌ وَنَخْلٌ وَرُمَّانٌ ﴿٦٨﴾

४४. खाली दृष्टी ठेवणे हे लज्जा शीलतेचे द्योतक आहे आणि लज्जा व संकोच स्त्रीयांचा उच्च गुण व त्यांचे खरे सौंदर्य आहे. जन्नतच्या स्त्रीया अगदी निष्कलंक आणि लज्जा संकोचाचे प्रतिक असतील. जन्नत मध्ये दाखल होणाऱ्या माणसां करीता ज्या हूर (पऱ्या) असतील त्यांना या पूर्वी कोणत्याही माणसाने व जिन्नाने स्पर्श ही केलेला नसेल त्या अगदी कुमारीका असतील. अशा प्रकारे जिन्नांना ज्या हूर लाभतील त्यांना यांच्या पूर्वी कोणत्याही जिन्नाने हात लावला नसेल या हूर (पऱ्या) मनुष्य व जिन्न यांच्या करीता वेगवेगळया असतील कारण मनुष्य व जिन्न दोन विभिन्न प्रकार होत. आणि प्रत्येक सजीव आपल्या सजातीयाकडेच आकृष्ट होतो. या आयती वरून ही गोष्ट ही स्पष्ट झाली की जन्नत ज्या प्रकारे अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना लाभेल, तद्वतच त्याचे भय बाळगणाऱ्या जिन्नांना देखील.

४५. जन्नतच्या हूर (पऱ्यां) ना रत्नमाणके व मोत्यांची उपमा दिली गेली आहे. मूळ शब्द याकूत (Ruby)अर्थात माणिक अतिशय मौल्यवान असे रत्न आहे ज्याचा रंग लाल असतो. हे रत्न अतिशय स्वच्छ, तेजस्वी व सुंदर असते. मोती देखील रत्नांपैकी एक होय आणि दागिन्यांमध्ये गुलाबी रंगाचे मोती वापरले जातात. तात्पर्य जन्नतच्या या हूर (पऱ्या) आपल्या सौंदर्य, गौरवर्ण, आणि अप्रतिम लावण्या बाबत रत्न माणके व मोत्यांसमान असतील.

४६. म्हणजे सत्कर्माचा मोबदला अल्लाहजवळ चांगलाच आहे. सदाचाराचे वर्तन अंगिकारणाऱ्याचा अंत वाईट व्हावा असे होऊच शकत नाही. सदाचारी माणसाला त्याच्या सत्कर्माचे उत्कृष्ट फळच लाभेल.

४७. या आधी ज्या दोन बागांचा उल्लेख केला गेला आहे. त्या दोन बागांहून श्रेष्ठतम असतील ज्यांचा या ठिकाणी उल्लेख केला जात आहे. यावरून असे दिसून येते की अल्लाह समोर हजर होण्याचे भय बाळगणाऱ्यांना त्यांच्या दर्जानुसार जन्नत मध्ये बाग प्रदान केले जातील. आधीच्या दोन बागा अल्लाहचे सान्निध्य लाभलेल्या करीता असतील तर नंतरच्या दोन बागा सर्वसामान्य सदाचारी लोकांकरीता या गोष्टीचे समर्थन सूरह वाकेआच्या स्पष्टीकरणान्वये होते ज्यात अल्लाहचे निकटवर्ति आणि उजव्या बाजूकडील यांच्या करीता वेगवेगळया देणग्या सांगितल्या गेल्या आहेत.

४८. म्हणजे जे मोबदल्यास मानणारे नाहीत,ते त्या देणग्यांचा, ज्या अल्लाहने आपल्या सदाचारी दासांना प्रदान करण्याचा वायदा केला आहे, इन्कारच करतील.

४९. अतिशय हिरव्यागार बागा म्हणजे त्या अतिशय हिंरव्या टवटवीत व नयनरम्य अशा बागा असतील.

५०. जन्नतच्या या बागांचे सदैव हिरवे टवटवीत राहणे अल्लाहच्या सामर्थ्याचा केवढा मोठा चमत्कार असेल.

५१. म्हणजे जन्नतच्या या बागांमध्ये पाण्याची कसलीही कमतरता नसेल; किंबहुना असे झरे वाहत असतील ज्यांचे पाणी उंचवळणारे असेल आणि खरे पाहता ही अल्लाहची रहमत (कृपा) च असेल जी उंचबळत असेल.

५२. खजुरी आणि डाळींब यांचा ही समावेश सुक्या मेव्यात होतो परंतु यांचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला आहे कारण खजूर सर्वाधिक गोड व स्वादिष्ट मेवा होय आणि डाळींब उत्साहदायक.

६९. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٦٩﴾

७०. यांच्यात सौजन्यशील सुंदर स्त्रीया असतील [५३]

فِيهِنَّ خَيْرَاتٌ حِسَانٌ ﴿٧٠﴾

७१. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या कृपा लाभांचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٧١﴾

७२. हूर तंबूं मध्ये थांबलेल्या (असतील).[५४]

حُورٌ مَقْصُورَاتٌ فِي الْخِيَامِ ﴿٧٢﴾

७३. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोणकोणत्या देणग्यांचा इन्कार कराल ? [५५]

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٧٣﴾

७४. त्यांना या (जन्नती) च्या आधी ना एखाद्या माणसाने स्पर्श केला असेल आणि ना एखाद्या जिन्नाने.

لَمْ يَطْمِثْهُنَّ إِنْسٌ قَبْلَهُمْ وَلَا جَانٌّ ﴿٧٤﴾

७५. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या उपहारांचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٧٥﴾

७६. अतिशय सुंदर व हरित बिछायतीवर टेका लावून बसलेले असतील.[५६]

مُتَّكِئِينَ عَلَىٰ رَفْرَفٍ خُضْرٍ وَعَبْقَرِيٍّ حِسَانٍ ﴿٧٦﴾

७७. तेव्हा तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कोण कोणत्या देणग्यांचा इन्कार कराल?

فَبِأَيِّ آلَاءِ رَبِّكُمَا تُكَذِّبَانِ ﴿٧٧﴾

७८. मोठे समृद्ध शाली आहे तुमच्या पालन कर्त्याचे नाव जो प्रतापशाली आणि महानता बाळगणारा आहे.[५७]

تَبَارَكَ اسْمُ رَبِّكَ ذِي الْجَلَالِ وَالْإِكْرَامِ ﴿٧٨﴾

५३. म्हणजे यांच्यात आंतरीक वैशिष्टये ही असतील आणि बाह्य सौदर्य देखील.

५४. हूरचे स्पष्टीकरण सूरह दुखान टीप क्र. ५५ मध्ये केले गेले आहे. जन्नतचे खेमे (तंबू) अतिशय सुंदर असतील जगातल्या तंबूवरून त्यांचा कयास केला जाऊ शकत नाही या खेम्या मध्ये हूर (पऱ्या) स्थानापन्न असतील ज्या आपल्या पतींशीच संबंध राखतील राहील्यात जन्नती लोकांच्या सदाचारी पत्न्या तर त्या आपल्या पती समवेत महालात राहतील.

५५. आज देखील आखिरतचा इन्कार करणारे जेव्हा जन्नतच्या हूर (परी) विषयी ऐकतात तेव्हा थट्टा उडवितात. ते समजतात की हया केवळ मनोरंजनाच्या गोष्टी आहेत वास्तविक पाहता मनुष्य स्वभाव अशाच प्रकारच्या जन्नतची अभिलाषा बाळगतो आणि अल्लाहचा वायदा आहे की तो आपल्या पापभीरू दासांना देणग्यांनी युक्त अशा जन्नत मध्ये दाखल करील, जिथे त्याच्या समस्त इच्छा अभिलाषा पूर्ण होतील.

५६. हिरवा रंग सुंदर आणि नयनांच्या शीतलतेस कारक असतो जन्नतच्या बिछायती, तिच्या सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना सादर करीत असतील आणि त्यावर जन्नती लोकांचे टेका लावून बसणे त्यांच्या राजेशाही थाटाची जणू अभिव्यक्तिच असेल.

५७. अल्लाह प्रतापशाली आहे म्हणून त्याच्या समोर हजर होण्याबाबत तुम्ही भय बाळगले पाहीजे. आणि तो महानता बाळगणारा आहे म्हणून त्याच्या चमत्कृतिंवर ही विश्वास ठेवला पाहीजे.

त्याच्या नावाची ही समृद्धी होय की जेव्हा त्याचे नाम:स्मरण केले जाते तेव्हा कृपेचा वर्षाव होऊ लागतो.त्याच्या हाती मांगल्याच्या खाणी आहेत आणि त्याने आपल्या नेक दासांकरीता आखिरत मध्ये जे मांगल्य व जी समृद्धी राखली आहे ती अशीच आहे की तिच्या लाभाने ते सुखावून जातील. त्यांच्या चमत्कारांना व अदभूततेली कसलीही मर्यादा नाही आणि याचा इन्कार केवळ तेच लोक करतात ज्यांना त्याची खरी ओळख झाली नाही व जे त्याच्या उपकारांची जाण बाळगत नाही.

# सूरह
# अल् वाकेअः

# ५६. सूरह अल् वाकेअः

**नाव:** पहिल्या आयतीत अल वाकेअ: अर्थात निश्चितपणे घडून येणारी (कियामत) चा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अल् वाकेअ:' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे; आणि मजकूरांवरून असे दिसून येते की मक्काच्या मध्ययुगात अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** कियामत आणि मोबदला व शिक्षेचा अहवाल प्रस्तुत करणे आणि त्या संबंधीचा विश्वास निर्माण करणे होय.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ६ मध्ये कियामतीच्या महाभयंकर घटने पासून सावध केले गेले आहे.

आयत क्र. ७ ते ५६ मध्ये सावध केले गेले आहे की कियामतीच्या दिवशी लोकांना तीन समूहात विभागले जाईल आणि प्रत्येक समूहाची परिणति स्पष्टीकरण सादर केली गेली आहे.

आयत क्र. ५७ ते ७४ मध्ये अशा वास्तव गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत ज्यावरून मोबदला व शिक्षे विषयी खात्री वाटते.

आयत क्र. ७५ ते ९६ सूरहच्या समारोपाच्या आयती आहेत, ज्यात कुरआना बाबत निरसता दर्शविणाऱ्यांना शुद्धीवर आणले गेले आहे की जरा डोळे उघडा आणि बघा कुरआन तुम्हाला कियामतीच्या अहवाल आणि मोबदला व शिक्षे बाबत खबरदार करीत आहे, नितांत अल्लाहचे आदेश आहे. ज्यात सैतानाच्या हस्तक्षेपाचा तिळमात्र देखील लवलेश नाही.

शेवटी मृत्यु समयीच्या अगतिकतेची दशा निवेदितांना अंतिम परिणति पासून सावध केले गेले आहे.

# ५६. सूरतुल् वाकेअः

سُورَةُ الْوَاقِعَةِ

आयती- ९६

| | |
|---|---|
| परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने | بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ |
| १. जेव्हा घडून येणारी घडून येईल.[१] | إِذَا وَقَعَتِ الْوَاقِعَةُ ﴿١﴾ |
| २. तिच्या घडून येण्यात काही ही असत्य नाही.[२] | لَيْسَ لِوَقْعَتِهَا كَاذِبَةٌ ﴿٢﴾ |
| ३. अवनत करणारी आणि उन्नत करणारी.[३] | خَافِضَةٌ رَّافِعَةٌ ﴿٣﴾ |
| ४. जेव्हा जमीन अत्याधिक अस्वस्थतेने थरथरेल.[४] | إِذَا رُجَّتِ الْأَرْضُ رَجًّا ﴿٤﴾ |
| ५. आणि पर्वत क्षत विक्षत केले जातील. | وَبُسَّتِ الْجِبَالُ بَسًّا ﴿٥﴾ |
| ६. आणि ते धूळ बनून उडू लागतील. [५] | فَكَانَتْ هَبَاءً مُّنبَثًّا ﴿٦﴾ |
| ७. आणि तुम्ही तीन समूहात विभागले जाल.[६] | وَكُنتُمْ أَزْوَاجًا ثَلَاثَةً ﴿٧﴾ |
| ८. तेव्हा उजवे हातवाले [७] काय आहेत उजवे हातवाले ! | فَأَصْحَابُ الْمَيْمَنَةِ مَا أَصْحَابُ الْمَيْمَنَةِ ﴿٨﴾ |
| ९. आणि डावे हातवाले [८] काय पण डावे हातवाले ! | وَأَصْحَابُ الْمَشْأَمَةِ مَا أَصْحَابُ الْمَشْأَمَةِ ﴿٩﴾ |
| १०. आणि पुढे जाणारे तर आहेतच पुढे जाणारे.[९] | وَالسَّابِقُونَ السَّابِقُونَ ﴿١٠﴾ |
| ११. ते निकटतम आहेत.[१०] | أُولَٰئِكَ الْمُقَرَّبُونَ ﴿١١﴾ |
| १२. देणगी युक्त बागांमध्ये. [११] | فِي جَنَّاتِ النَّعِيمِ ﴿١٢﴾ |
| १३. मोठा समूह पूर्वी होऊन गेलेल्या पैकी असेल. | ثُلَّةٌ مِّنَ الْأَوَّلِينَ ﴿١٣﴾ |
| १४. आणि थोडेसे नंतर झालेल्यां पैकी.[१२] | وَقَلِيلٌ مِّنَ الْآخِرِينَ ﴿١٤﴾ |

१. अभिप्रेत कियामत होय जी अपरिहार्यत: घडून येईल.

२. कियामतीच्या घडून येण्यात ना एखादी गोष्ट अडसर बनू शकते आणि ना एखादे सामर्थ्य वा शक्ति तिला टाळू शकते. आणि ना ही वार्ता खोटी असू शकते. तिचे घडून येणे अगदी सत्य आहे.

कियामत केवळ संभवनीयच नव्हे तर वस्तुस्थितीच्या रूपाने समोर येईल. यास्तव प्रत्येकाने आपल्या भविष्याची काळजी घेतली पाहीजे परंतु आजच्या काळातील शैक्षणिक, नागरी, आर्थिक व राजकीय व्यवस्था माणसाला ऐहिक वादातच गुरफटून ठेवू इच्छिते; म्हणून जो पर्यंत कियामतीच्या प्रखरतेची जाणीव होत नाही, तोपर्यंत त्याचा दृष्टीकोन बदलू शकत नाही.

३. म्हणजे कियामत कितीतरी लोकांना अधोगतीच्या गर्तेत लोटेल आणि कित्येक लोकांना शाश्वत यशाच्या शिखरावर नेऊन बसवील. जे लोक जगात उच्च पदस्थ होते, वास्तविक पाहता ते त्या पदास पात्र नव्हते, त्यांना कियामत अवनत करील आणि जे लोक जगात उच्च पद प्राप्त करू शकले नाहीत, वास्तविक ते या गोष्टीस पात्र होते; त्यांना कियामत पदाची उच्चता प्रदान करील. अशा प्रकारे कियामतीची वेळ आपल्या आगमनाने मानव-समाजात विलक्षण क्रांती घडवील आणि प्रतिष्ठा व अप्रतिष्ठेचे नवे मूल्यमापन व स्तर कायम होतील.

४. कियामतीचा भूकंप जमीनीला अशा प्रकारे हादरवून सोडील की ती अक्षरश: थरथर कापू लागेल आणि अत्याधिक विमनस्कतेचे वातावरण असेल. सूरह हज्जच्या सुरवातीच्या आयती मध्ये या विमनस्कतेचे चित्र रेखाटले गेले आहे. तसेच सूरह जिलजाल मध्ये ही भूकंपाच्या परिणाम स्वरूपी उद्‌भवणाऱ्या घटना निवेदिल्या गेल्या आहेत.

५. मोठमोठया पर्वतांना पाहून संकुचित दृष्टी बाळगणारा मनुष्य असे समजतो की जमीन सदैव याच स्थितीत राहील परंतु कुरआन एका न भूतो न भविष्यति अशा क्रान्तीची खबर देत आहे, जी या जमीनीवर घडून येईल. कियामतीची वेळ येताच हे उत्तुंग पर्वत पिंजलेल्या कापसा प्रमाणे होऊन धुळीकणां सारखे हवेत उडू लागतील. पर्वत एवढया साठी हटविले जातील की जमीनीचे एक सपाट मैदान व्हावे आणि हश्र (कर्मलेखांचा हिशेब) घडून यावा.

६. हे तीन समूह कोणकोणते असतील याचा उल्लेख पुढे केला गेला आहे.

७. अभिप्रेत सदाचारी ईमान धारक होते; ज्यांच्या उजव्या हातात त्यांचा कर्म लेख असेल.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह इन्शिकाक टीप क्र. ७ स्पष्ट असावे की कुरआनाने या ठिकाणी ही गोष्ट स्पष्ट केली नाही की दुराचारी मुसलमानांशी कोणता व्यवहार केला जाईल कारण एक तर ज्या काळात ही सूरह अवतरली त्या काळात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयायींमध्ये दुराचारी मुसलमानांचा एक ही समूह नव्हता, दुसरे असे की प्रोत्साहन व प्रशिक्षणाच्या दृष्टीने प्रामाणिक ईमान धारकांचा मोबदला आणि अपराधी काफिरांच्या शिक्षेला एकमेकांच्या तुलनेत निवेदणे बुद्धिकौशल्याची निकड होती कुरआनाने अन्य ठिकाणी विशिष्ट अटीं सह शिफारस कबूल केली जाण्याचा उल्लेख केला आहे आणि अशा लोकांचा मामला अगदी वेगळा आहे. आणि कोण जाणे, कियामतीच्या दिवशी कस कशा कठीण अवस्था व शिक्षा भोगल्यानंतर या लोकांकरीता शिफारसीची वेळ येईल.

८. अभिप्रेत काफिर आणि अपराधी होत. ज्यांच्या डाव्या हातात त्यांच्या कर्म लेख दिला जाईल.

९. म्हणजे ज्या लोकांनी ईमान बाळगल्यानंतर सत्कर्म करण्यात पुढाकार घेतला म्हणजे इतरांपेक्षा पुढेच राहीले व इस्लाम करीता सर्वतोपरि बलीदान देण्यात अग्रसर राहीले ते मोबदला प्राप्त करणाऱ्या मध्ये प्रथम दर्जाचे लोक असतील. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तौबा टीप क्र. १८०.

१०. म्हणजे या लोकांना अल्लाहचे सर्वाधिक सान्निध्य प्राप्त होईल अर्थात अल्लाहचे सर्वाधिक सान्निध्य लाभण्याचा मान हा सर्वात मोठा मान असेल.

११. म्हणजे जन्नतच्या देणग्यांनी युक्त अशा बागांमध्ये ते मोठया ऐष आरामात राहतील.

१२. अल्लाहचे सान्निध्य लाभलेल्यांचा उल्लेख आल्यावर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निष्कपट व प्रामाणिक अनुयायींना या गोष्टीची शुभवार्ता दिली गेली की या उम्मत (जन-समूहा) च्या सुरवातीच्या काळातील लोकांपैकी एक मोठी संख्या अल्लाहचे सान्निध्य प्राप्त झालेल्यांची असेल. आणि नंतरच्या लोकांमध्ये असे लोक असतील परंतु संख्येत कमी. यास्तव पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींमध्ये, प्रामाणिक, सदाचरणी असण्याच्या व धर्मा (इस्लाम) करीता त्याग बलीदान देण्याच्या दृष्टीने उच्च स्थान बाळगणारे लोक अधिक होते आणि नंतरच्या काळात या पातळीचे लोक कमी होत गेले. एका हदीस वचनाद्वारे ही या गोष्टीचे समर्थन होते.

خَيْرُ الْقُرُوْنِ قَرْنِىْ ثُمَّ الَّذِيْنَ يَلُوْنَهُمْ ثُمَّ الَّذِيْنَ يَلُوْنَهم۔

"सर्वोत्कृष्ट लोक माझ्या काळातील होत. मग ते, जे यांच्या नंतर होतील, मग ते, जे यांच्या नंतर होतील."

१५. रत्नजडीत आसनांवर.[१३]

عَلٰى سُرُرٍ مَّوْضُوْنَةٍ ۙ ﴿۱۵﴾

१६. समोरा समोर तक्के लावून.[१४]

مُّتَّكِـِٕيْنَ عَلَيْهَا مُتَقٰبِلِيْنَ ﴿۱۶﴾

१७. यांच्या जवळ अशी मुले ये -जा करत राहतील, जी सदैव त्याच अवस्थेत राहतील.[१५]

يَطُوْفُ عَلَيْهِمْ وِلْدَانٌ مُّخَلَّدُوْنَ ۙ ﴿۱۷﴾

१८. प्याले आणि मद्य व वाहत्या मद्याचे प्याले घेऊन.[१६]

بِاَكْوَابٍ وَّاَبَارِيْقَ ۙ۬ وَكَاْسٍ مِّنْ مَّعِيْنٍ ۙ ﴿۱۸﴾

१९. ज्यामुळे न कैफ चढावा आणि ना बुद्धि लयाला जावी.[१७]

لَّا يُصَدَّعُوْنَ عَنْهَا وَلَا يُنْزِفُوْنَ ۙ ﴿۱۹﴾

२०. आणि मेवे जे ते पसंत करतील.[१८]

وَفَاكِهَةٍ مِّمَّا يَتَخَيَّرُوْنَ ۙ ﴿۲۰﴾

२१. आणि पक्ष्यांचे मांस जे त्यांना आवडत असावे.[१९]

وَلَحْمِ طَيْرٍ مِّمَّا يَشْتَهُوْنَ ۭ ﴿۲۱﴾

२२. आणि यांच्या करीता सुंदर नयनांच्या हूर असतील.[२०]

وَحُوْرٌ عِيْنٌ ۙ ﴿۲۲﴾

२३. जणू सुरक्षित ठेवलेले मोती ![२१]

كَاَمْثَالِ اللُّؤْلُؤِ الْمَكْنُوْنِ ۚ ﴿۲۳﴾

२४. मोबदला त्यांच्या त्या कर्मांचा, जे ते करीत राहीले.[२२]

جَزَاۗءًۢ بِمَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿۲۴﴾

२५. तिथे त्यांना ना एखादी निरर्थक गोष्ट ऐकू येईल आणि ना एखादी अपराधाची बाब.[२३]

لَا يَسْمَعُوْنَ فِيْهَا لَغْوًا وَّلَا تَاْثِيْمًا ۙ ﴿۲۵﴾

२६. केवळ शांती सुबत्तेच्याच गोष्टी असतील.[२४]

اِلَّا قِيْلًا سَلٰمًا سَلٰمًا ﴿۲۶﴾

२७. आणि उजव्या हातवाले तर काय थाट आहे उजव्या हातवाल्यांचा ![२५]

وَاَصْحٰبُ الْيَمِيْنِ ڏ مَآ اَصْحٰبُ الْيَمِيْنِ ۭ ﴿۲۷﴾

१३. म्हणजे ही आसने राजेशाही आसने असतील जे रत्नमाणकांनी जडलेले असतील.

१४. म्हणजे राजेशाही थाटात या आसनांवर टेका लावून एकमेकांसमोर बसलेले असतील. यावरून असे दिसून येते की जन्नती लोकांच्या बैठकी केवढया सुशोभित व राजेशाही थाटाच्या असतील. कोणी कोणाकडे ना तोंड फिरवील, ना पाठ,किंबहुना सर्व मनमोकळया व प्रसन्नतापूर्ण मैत्रीच्या वातावरणात राहात असतील.

१५. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तूर टीप क्र.२४

१६. म्हणजे यांच्या आदरातिथ्या करीता ही मुले सरबतांनी काठोकाठ भरलेली पेय पात्र घेऊन हजर होतील व प्याल्यांमध्ये यांना देतील आणि काठोकाठ भरलेले चषक देखईल जे शुद्ध मद्याच्या वाहत्या झऱ्यातून भरलेले असतील.

१७. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह साफ्फात टीप क्र. ३९

१८. म्हणजे जन्नत मध्ये सर्व प्रकारचे मेवे असतील, ज्यातून ते आपापल्या आवडीचे व पसंतीचे मेवे निवडतील.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तूर टीप क्र.२२

१९. म्हणजे ज्या पक्ष्यांचे मांस त्यांच्या आवडीचे असेल ते त्यांना मिळेल.

२०. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तूर टीप क्र. १८

२१. म्हणजे अशा प्रकारचे मोती ज्यांना अद्याप कोणी स्पर्श ही केलेला नसेल अतिशय स्वच्छ व चमकदार.

२२. हे सर्व काही यांना त्यांच्या सत्कर्मांचा व सदाचरणाचा मोबदला म्हणून दिले जाईल. आणि जेव्हा त्यांना आपल्या आचरणाचा मोबदला म्हणून जन्नतच्या या चिरस्थायी देणग्या लाभतील तेव्हा ते आनंद विभोर होतील की आमचे परिश्रम वाया गेले नाहीत.

२३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह नबा टीप क्र. २२

२४. अर्थात चोहीकडून त्यांना 'सलाम' जा नजराणा सादर केला जाईल आणि त्या ठिकाणी ज्या काही गोष्टी बोलल्या जातील त्या सर्व सलामतीच्याच गोष्टी असतील. दोषपूर्ण किंवा एखाद्याला त्रास यातना देण्यासारखी कोणती ही गोष्ट नसेल. ही फार मोठी ईश-देणगी असेल. वास्तविक या जगात असे वातावरण कोठे ही नाही.

२५. उजवा हात डाव्या हाताच्या तुलनेने मजबूत असतो. याला सद्भाग्याचे लक्षण ठरविले गेले आहे. कियामतीच्या दिवशी ज्या लोकांना त्यांच्या उजव्या हातात कर्म लेख दिला जाईल ते मोठे भाग्यशाली लोक असतील.

२८. ते काटे विरहीत बोरी मध्ये असतील.[२६]

فِىۡ سِدۡرٍ مَّخۡضُوۡدٍ ۙ ﴿٢٨﴾

२९. आणि थरांवर थर असलेल्या केळीत.[२७]

وَّطَلۡحٍ مَّنۡضُوۡدٍ ۙ ﴿٢٩﴾

३०. आणि विस्तीर्ण अशा सावलीत. [२८]

وَّظِلٍّ مَّمۡدُوۡدٍ ۙ ﴿٣٠﴾

३१. आणि वाहत्या पाण्यात. [२९]

وَّ مَآءٍ مَّسۡكُوۡبٍ ۙ ﴿٣١﴾

३२. आणि विपुल अशा फळांमध्ये.

وَّفَاكِهَةٍ كَثِيۡرَةٍ ۙ ﴿٣٢﴾

३३. जी कधी ही संपणार नाहीत आणि ना त्यांच्यापासून रोखले जाईल.[३०]

لَّا مَقۡطُوۡعَةٍ وَّلَا مَمۡنُوۡعَةٍ ۙ ﴿٣٣﴾

३४. आणि उंच बिछायतीत असतील. [३१]

وَّ فُرُشٍ مَّرۡفُوۡعَةٍ ؕ ﴿٣٤﴾

३५. यां (च्या पत्न्यां) ना आम्ही विशेषत्वाने उभारले असेल.

اِنَّاۤ اَنۡشَاۡنٰهُنَّ اِنۡشَآءً ۙ ﴿٣٥﴾

३६. आणि त्यांना कुमारीका बनविले असेल.[३२]

فَجَعَلۡنٰهُنَّ اَبۡكَارًا ۙ ﴿٣٦﴾

३७. प्रिय [३३] आणि समवयस्क [३४]

عُرُبًا اَتۡرَابًا ۙ ﴿٣٧﴾

३८. उजव्या हाताच्या लोकांकरीता [३५]

لِّاَصۡحٰبِ الۡيَمِيۡنِ ؕ ﴿٣٨﴾

३९. ते पूर्वी होऊन गेलेल्यां पैकी मोठया संख्येत असतील.

ثُلَّةٌ مِّنَ الۡاَوَّلِيۡنَ ۙ ﴿٣٩﴾

४०. आणि नंतरच्या (लोकां) पैकी ही मोठया संख्येत.[३६]

وَثُلَّةٌ مِّنَ الۡاٰخِرِيۡنَ ؕ ﴿٤٠﴾

४१. आणि डावे हातवाले ! [३७] काय दशा होईल डावे हात वाल्यांची.

وَاَصۡحٰبُ الشِّمَالِ ۙ مَاۤ اَصۡحٰبُ الشِّمَالِ ؕ ﴿٤١﴾

२६. बोरीच्या ज्या झाडाला काटे कमी प्रमाणात असतात त्याची फळे अधिक गोड असतात. तेव्हा जन्नतच्या काटयां विरहीत बोरी विषयी काय सांगणे. या जगातल्या बोरी जन्नतच्या बोरांच्या तुलनेने अगदी नगण्य!

२७. केळी एक गोड आणि स्वादीष्ट फळ आहे तेव्हा जन्नतच्या केळी बद्दल सांगणे नको! आणि त्याचे थरांवर थर असणे त्याच्या विपुल निर्मितीस जाहीर करीत असेल आणि दृष्टीला ही मोहक वाटणारे असेल.

२८. जन्नतच्या झाडाची सावली कितपत लांब असेल याची कल्पना पैगंबर वचनावरून येते. एका हदीसच्या उल्लेखा नुसार :-

اِنَّ فِی الْجَنَّةِ شَجَرَةً یَسِیْرُ الرَّاکِبُ فِیْ ظِلِّهَا مِأَةَ عَامٍ لَا یَقْطَعُهَا۔ (بخاری کتاب التفسیر)

'जन्नत मध्ये एक झाड असे आहे की जर स्वार याच्या सावलीत शंभर वर्षे चालत राहीला तरी ही त्याची सावली संपणार नाही.' (बुखारी - किताबुत्तफसीर)

२९. म्हणजे जन्नत मध्ये पाण्याची खूप रेलचेल असेल. तिथे पाणी सदैव वाहत राहील.

३०. जन्नतच्या फळांचा क्रम कधीही न संपणारा असेल. या जगात ठराविक फळ ठराविक हंगामातच उत्पन्न होतात, परंतु जन्नतमध्ये सदाबहार फळझाडे असतील आणि त्यांची फळे नित्य मिळत राहतील. तसेच तिथे फळ प्राप्त करण्या करीता कसलीही रोखथाम नसेल आणि ना एखादा कायदा त्यांच्या प्राप्तीत अडसर बनू शकेल आणि ना मालकत्वाचा तिथे प्रश्न उदभवेल. प्रत्येक जन्नती कसल्याही प्रतिबंधा शिवाय वाटेल ते फळ वाटेल तेवढया प्रमाणात प्राप्त करू शकेल.

३१. ज्यावरून त्यांच्या उच्च थाटाची अभिव्यक्ति होत असेल.

३२. म्हणजे जन्नतच्या स्त्रीयांना साजेलसे शरीर प्रदान केले जाईल त्यांना कुमारीका बनविले जाईल, मग त्या जगात मुलांच्या माता म्हणून का राहील्या असेनात.

३३. म्हणजे आपल्या पतींशी प्रेम करणारी व मोहक चेहऱ्याची, पतीच्या नजरेत प्रिय.

३४. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह साद टीप क्र. ७६

३५. अर्थात या रूपसम्पन्न स्त्रीया उजव्या हाताच्या लोकांकरीता असतील ज्या सदाचारी स्त्रीया सदाचारी पुरूषांच्या निकाहमध्ये होत्या, त्या जन्नतमध्येही त्यांना भेटतील आणि ज्या पुरूषांच्या स्त्रीया सदाचारी नव्हत्या त्यांच्या विवाह बंधनात इतर सदाचारी स्त्रीया दिल्या जातील. अधिक खोलवर न जाता समजण्यास्तव एवढी गोष्ट पुरेशी आहे.

३६. म्हणजे उजव्या हाताचे या जन समूहाच्या सुरवातीच्या लोकांपैकी ही मोठया संख्येने असतील आणि नंतर झालेल्या पैकी ही मोठया संख्येत असतील. हा संकेत या गोष्टीकडे आहे की या जन-समूहात कियामती पावेतो सदाचारी लोक जन्माला येत राहतील. जे जन्नतीस पात्र होतील. ही गोष्ट ही स्पष्ट असावी की कुरआनने जन्नतची शुभवार्ता केवळ सदाचारी व ईश-भय बाळगणाऱ्यांनाच दिली आहे. अर्थात उजव्या हाताचे लोक हे अल्लाहचे भय बाळगणारे सदाचारी लोकच असतील.

३७. म्हणजे ज्यांच्या डाव्या हातात त्यांचा कर्म लेख दिला जाईल त्यांची दशा मोठी वाईट असेल.

४२. ते उष्ण वायू च्या लपेटीत, उकळत्या पाण्यात.

فِيْ سَمُوْمٍ وَّحَمِيْمٍ ﴿٤٢﴾

४३. आणि काळयाकुट्ट धुराच्या सावलीत असतील.

وَّظِلٍّ مِّنْ يَّحْمُوْمٍ ﴿٤٣﴾

४४. जो ना शितल असेल आणि ना लाभदायक.[३८]

لَّا بَارِدٍ وَّلَا كَرِيْمٍ ﴿٤٤﴾

४५. हे लोक यापूर्वी सुस्थितीत होते.[३९]

اِنَّهُمْ كَانُوْا قَبْلَ ذٰلِكَ مُتْرَفِيْنَ ﴿٤٥﴾

४६. आणि फार मोठया अपराधावर आग्रह करीत राहीले.[४०]

وَكَانُوْا يُصِرُّوْنَ عَلَى الْحِنْثِ الْعَظِيْمِ ﴿٤٦﴾

४७. आणि म्हणत होते, काय जेव्हा आम्ही मरण पावणार व माती आणि हाडे होऊन राहणार, तेव्हा पुनश्च उठविले जाणार ?[४१]

وَكَانُوْا يَقُوْلُوْنَ ەۙ اَىِٕذَا مِتْنَا وَكُنَّا تُرَابًا وَّعِظَامًا ءَاِنَّا لَمَبْعُوْثُوْنَ ﴿٤٧﴾

४८. आणि काय आमचे वाड वडील देखील?

اَوَاٰبَاۤؤُنَا الْاَوَّلُوْنَ ﴿٤٨﴾

४९. सांगा, निश्चितच, पूर्वीचे आणि नंतरचे.

قُلْ اِنَّ الْاَوَّلِيْنَ وَالْاٰخِرِيْنَ ﴿٤٩﴾

५०. सर्व एका निर्धारीत दिवसाच्या ठराविक वेळेवर एकत्र केले जातील. [४२]

لَمَجْمُوْعُوْنَ ەۙ اِلٰى مِيْقَاتِ يَوْمٍ مَّعْلُوْمٍ ﴿٥٠﴾

५१. मग हे मार्गभ्रष्ट झालेल्यांनो व खोटे ठरविणाऱ्यांनो !

ثُمَّ اِنَّكُمْ اَيُّهَا الضَّاۤلُّوْنَ الْمُكَذِّبُوْنَ ﴿٥١﴾

५२. तुम्ही जक्कूमच्या [४३] झाडाचे खाद्य खाल.

لَاٰكِلُوْنَ مِنْ شَجَرٍ مِّنْ زَقُّوْمٍ ﴿٥٢﴾

५३. त्याच्याने पोट भराल.

فَمَالِـُٔوْنَ مِنْهَا الْبُطُوْنَ ﴿٥٣﴾

५४. मग त्यावर उकळते पाणी प्याल.

فَشٰرِبُوْنَ عَلَيْهِ مِنَ الْحَمِيْمِ ﴿٥٤﴾

५५. तहानलेल्या उंटा प्रमाणे. [४४]

فَشٰرِبُوْنَ شُرْبَ الْهِيْمِ ﴿٥٥﴾

५६. हा होय त्यांचा पाहुणचार, मोबदल्याच्या दिवशी. [४५]

هٰذَا نُزُلُهُمْ يَوْمَ الدِّيْنِ ﴿٥٦﴾

३८. सावली थंडगार आणि सुखकारक असते. परंतु ही सावली काळया कुट्ट धुराची असेल, ज्यामुळे ना शितलता प्राप्त होईल आणि ना ती सुखकारक असेल. सूरह मुर्सलात मध्ये फर्माविले गेले :-

لَّا ظَلِيلٍ وَّلَا يُغْنِي مِنَ اللَّهَبِ (المرسلات-٣١)

'अशी सावली जी सावली देणारी नसेल आणि ना निखाऱ्यां पासून वाचवू शकेल.' (मुर्सलात - ३१)

३९. म्हणजे जगात ते सुखवस्तु होते म्हणून त्यांनी वास्तविक अल्लाहच्या या देणगी बद्दल कृतज्ञता व्यक्त करावयास हवी होती. परंतु त्यांनी आपल्या सुस्थितीस कुफ्र (नास्तिकते)चे माध्यम बनविले.

४०. मोठया अपराधाशी अभिप्रेत शिर्क (अनेकेश्वर भक्ति) होय हे लोक शिर्क व मूर्तिपूजा करण्या पासून कोणत्याही प्रकारे परावृत्त झाले नाहीत. किंबहुना हे योग्य असण्याबद्दल आग्रह धरीत राहीले व यावर मरेपर्यंत अटळ राहीले.

४१. कबरीमध्ये दफन झाल्यानंतर शरीरावरचे मांस थोडयाच दिवसात मातीत मिळते आणि फक्त हाडे शिल्लक राहतात. या वस्तुस्थितीस पाहता त्या लोकांना या गोष्टीचे नवल वाटत होते की जेव्हा मरणाऱ्याचे शरीरच बाकी राहात नाही तेव्हा त्याला कशा प्रकारे कियामतीच्या दिवशी (जिवंत) उठवून उभे केले जाईल. त्यांनी अल्लाहच्या सामर्थ्य शक्ती विषयी चुकीचा समज बाळगला होता; आणि अल्लाह आपल्या पैगंबरा द्वारे यांच्या पुनश्च जिवित केले जाण्याची जी खबर देत होता तिला ही मान्य करण्यास ते तयार झाले नाहीत. अशा प्रकारे त्यांनी अपराधांवर अपराध केला.

डाव्या हाताच्या लोकांच्या दोन भयंकर अपराधांचा या ठिकाणी उल्लेख केला गेला आहे एक शिर्क व कुफ्र आणि दुसरा आखिरतचा इन्कार.

४२. म्हणजे हजरत आदम पासून कियामती पावेतो जन्माला येणारे समस्त मानव अर्थात संपूर्ण मानव जातिला कियामतीच्या दिवशी उठवून उभे केले जाईल. हे दुसऱ्यांदा जीवन त्यांना एवढया साठी दिले जाईल की त्यांनी आपल्या पहिल्या जीवनात जे काही कर्म केले त्याचे फळ त्यांना प्राप्त व्हावे.

४३. जक्कूमचे स्पष्टीकरण सूरह साफ्फात टीप क्र. ५१ मध्ये केले गेले आहे.

४४. الْهِيمِ तृपार्त म्हणजे असे उंट ज्यांना अत्याधिक तहानेचा रोग जडलेला असावा. असा उंट कितीही पाणी प्याला, त्याची तहान भागत नाही. हीच अवस्था जहन्नमी लोकांची होईल. ते वारंवार उकळते पाणी पीत राहतील. परंतु त्यांची तहान शमणारच नाही.

४५. म्हणजे या अपराध्यांचे स्वागत कियामतीच्या दिवशी या शिक्षेने केले जाईल. ही उपरोधात्मक उक्ती या गोष्टीस स्पष्ट करण्या करीता की या लोकांचे अपराध एवढे भयंकर होते की त्यांना ईश देणगी लाभण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यांना तर कठोर शिक्षा भोगणे क्रमप्राप्त उद्भवत होय.

५७. आम्ही तुम्हाला निर्माण केले आहे तर तुम्ही खरे का नाही मानत ?[४६]

نَحْنُ خَلَقْنٰكُمْ فَلَوْلَا تُصَدِّقُوْنَ ﴿٥٧﴾

५८. काय तुम्ही विचार चिंतन केले की जे वीर्य तुम्ही टाकता.

اَفَرَءَيْتُمْ مَّا تُمْنُوْنَ ﴿٥٨﴾

५९. त्याला (माणसाचे) स्वरूप तुम्ही देता कि आम्ही देतो ?[४७]

ءَاَنْتُمْ تَخْلُقُوْنَهٗۤ اَمْ نَحْنُ الْخٰلِقُوْنَ ﴿٥٩﴾

६०. आम्ही तुमच्या दरम्यान मृत्यु निश्चित केला आहे [४८] आणि आम्ही अगतिक नाही.

نَحْنُ قَدَّرْنَا بَيْنَكُمُ الْمَوْتَ وَمَا نَحْنُ بِمَسْبُوْقِيْنَ ﴿٦٠﴾

६१. या गोष्टीस की तुमचे स्वरूप बदलून टाकावे आणि तुम्हाला अशी निर्मिती बनवावे, जिला तुम्ही जाणत नाहीत.[४९]

عَلٰۤى اَنْ نُّبَدِّلَ اَمْثَالَكُمْ وَنُنْشِئَكُمْ فِيْ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿٦١﴾

६२. आपल्या पहिल्या निर्मितीस तुम्ही जाणता, मग तरीही बोधग्रहण का करीत नाही?[५०]

وَلَقَدْ عَلِمْتُمُ النَّشْاَةَ الْاُوْلٰى فَلَوْلَا تَذَكَّرُوْنَ ﴿٦٢﴾

६३. काय तुम्ही विचार चिंतन केले त्या गोष्टींवर जे तुम्ही पेरता ?

اَفَرَءَيْتُمْ مَّا تَحْرُثُوْنَ ﴿٦٣﴾

६४. त्या पासून शेत तुम्ही उगविता कि उगविणारे आम्ही आहोत ?[५१]

ءَاَنْتُمْ تَزْرَعُوْنَهٗۤ اَمْ نَحْنُ الزّٰرِعُوْنَ ﴿٦٤﴾

६५. आम्ही इच्छिले तर त्याचा चूराचूरा करून टाकावे आणि तुम्ही बढाया मारीतच राहावे.

لَوْ نَشَآءُ لَجَعَلْنٰهُ حُطَامًا فَظَلْتُمْ تَفَكَّهُوْنَ ﴿٦٥﴾

६६. की आम्ही तर भुर्दंडात पडलो,

اِنَّا لَمُغْرَمُوْنَ ﴿٦٦﴾

६७. किंबहुना वंचित होऊन राहीलो.[५२]

بَلْ نَحْنُ مَحْرُوْمُوْنَ ﴿٦٧﴾

६८. काय तुम्ही या पाण्या बाबत विचार चिंतन केले जे तुम्ही पितात?

اَفَرَءَيْتُمُ الْمَآءَ الَّذِيْ تَشْرَبُوْنَ ﴿٦٨﴾

६९. काय तुम्ही त्यास ढगातून अवतरीत केले आहे कि त्याला अवतरीत करणारे आम्ही आहोत ?[५३]

ءَاَنْتُمْ اَنْزَلْتُمُوْهُ مِنَ الْمُزْنِ اَمْ نَحْنُ الْمُنْزِلُوْنَ ﴿٦٩﴾

४६. म्हणजे ज्याअर्थी ही एक इन्कार न करण्याजोगी वस्तुस्थिती आहे की तुमचा निर्माता, रचयिता केवळ अल्लाह आहे, तेव्हा तो मोबदल्याच्या दिवसा पासून तुम्हाला सावध करीत, तुमच्या मार्गदर्शना करीता जो संदेश अवतरीत करीत आहे तो सत्य का नाही जाणत?

या आयतीं पासून आयत क्र. ७१ पावेतो तौहीद (एकेश्वरवाद) व मोबदल्याच्या दिवसाचा इन्कार करणाऱ्यांना अनेक प्रश्न विचारले गेले आहेत. जेणेकरून त्यांनी विचार चिंतन करून उचित निष्कर्षाप्रत पोहचावे.

४७. म्हणजे तुम्ही तर गर्भाशयात तुच्छ पाण्याचा फक्त थेंब टाकता, त्यानंतर या वीर्य बिंदूला ज्या अवस्थां मधून पार पाडून मूलाचा आकार दिला जातो, मग त्यात ज्या प्रकारे जीव टाकला जातो आणि क्रमशः त्याला सक्षम मनुष्य बनविले जाते, तर हे सर्व काय तुमचे कार्य आहे कि तुमच्या पालन कर्त्याचे?

४८. मृत्यु अपरिहार्यतः प्रत्येक माणसाला येतो, जो त्याच्या अगतिक असण्याचा व अल्लाहच्या सामर्थ्य व वर्चस्वाचा स्पष्ट पुरावा होय.

४९. म्हणजे जी शक्ति (अर्थात अल्लाह) तुमच्या मृत्युवर समर्थ आहे तो तुमचा चेहरा मोहरा बदलविण्यास व तुम्हाला एका वेगळया निर्मितीचे रूप देण्यास ही समर्थ आहे.

५०. अर्थात जेव्हा पहिल्यांदा माणसाला निर्माण करणे अल्लाहला शक्य झाले, तेव्हा दुसऱ्यांदा निर्माण करणे का अशक्य होईल? जर मातीतून माणूस घडविला जाऊ शकतो तर दुसऱ्यांदा त्याच मातीतून त्याला का उभारले जाऊ शकत नाही.

५१. म्हणजे तुम्ही तर केवळ बी पेरण्याचे काम करता, त्या पासून डोलणारे शेत निर्माण करणे हे तुमचे नव्हे, अल्लाहचे काम आहे.

५२. म्हणजे पीक नष्ट करून टाकावे; मग तुम्ही कुढत बसावे की आम्ही या हानी मुळे तोटयात पडलो किंबहुना लाभाला अगदी वंचित झालो.

५३. ढगांमधून पिण्या करीता पाण्याचा वर्षाव घडवून आणणे हे अल्लाहचेच काम होय. आजच्या काळात विज्ञानाच्या प्रगतीने माणसाला ढगातून पर्जन्य वृष्टी घडवून आणणे शक्य झाले असले तरी ही देखील अल्लाहनेच प्रदान केलेली पात्रता आहे. मात्र याचा अर्थ हा नव्हे की ढगांना समुद्रातून वर नेण्यात, त्यांना वाऱ्यांच्या सहाय्याने वातावरणात पसरवून, जगातल्या विविध भागात पर्जन्य वृष्टि करण्यात मनुष्य समर्थ झाला आहे. ही व्यवस्था माणसाच्या अगदी अवाक्या बाहेरची आहे. त्याला आपल्या प्रयत्नांमध्ये जे यश लाभते ते एवढेच की जणू एखाद्याने फुग्यात हवा भरावी, मग हा दावा करावा की मी हवे वर ताबा मिळविला आहे.

७०. आम्ही इच्छिले तर त्यास खारे बनवून टाकू, मग तुम्ही कृतज्ञता का बाळगत नाही ?[५४]

لَوْ نَشَآءُ جَعَلْنٰهُ اُجَاجًا فَلَوْلَا تَشْكُرُوْنَ ﴿٧٠﴾

७१. तुम्ही या आगीवर ही विचार चिंतन केले जी तुम्ही पेटविता.

اَفَرَءَيْتُمُ النَّارَ الَّتِيْ تُوْرُوْنَ ﴿٧١﴾

७२. तिचे झाड [५५] तुम्ही निर्माण केले आहे कि तिला निर्माण करणारे आम्ही आहोत?

ءَاَنْتُمْ اَنْشَاْتُمْ شَجَرَتَهَآ اَمْ نَحْنُ الْمُنْشِـُٔوْنَ ﴿٧٢﴾

७३. आम्ही तिला बोध (स्मरणिके) चे माध्यम [५६] आणि प्रवाशां करीता फायदेशीर गोष्ट बनविली.[५७]

نَحْنُ جَعَلْنٰهَا تَذْكِرَةً وَّمَتَاعًا لِّلْمُقْوِيْنَ ﴿٧٣﴾

७४. तेव्हा (हे पैगंबर !) तुम्ही आपल्या महिमावान पालन कर्त्याच्या नावाचे गुणगान (तस्बीह) करा.[५८]

فَسَبِّحْ بِاسْمِ رَبِّكَ الْعَظِيْمِ ﴿٧٤﴾

७५. नव्हे.[५९]मी शपथ घेतो ताऱ्यांच्या अस्तास जाण्याच्या स्थानांची. [६०]

فَلَآ اُقْسِمُ بِمَوٰقِعِ النُّجُوْمِ ﴿٧٥﴾

७६. आणि ही फार मोठी शपथ आहे, जर तुम्ही जाणाल. [६१]

وَاِنَّهٗ لَقَسَمٌ لَّوْ تَعْلَمُوْنَ عَظِيْمٌ ﴿٧٦﴾

७७. नि:संशय हा एक प्रतिष्ठा सम्पन्न कुरआन आहे.[६२]

اِنَّهٗ لَقُرْاٰنٌ كَرِيْمٌ ﴿٧٧﴾

७८. एका सुरक्षित ग्रंथात. [६३]

فِيْ كِتٰبٍ مَّكْنُوْنٍ ﴿٧٨﴾

७९. याला स्पर्श करीत नाही, परंतु स्वच्छ शुद्ध , [६४]

لَّا يَمَسُّهٗٓ اِلَّا الْمُطَهَّرُوْنَ ﴿٧٩﴾

८०. हे सर्व विश्वांच्या पालन कर्त्याने अवतरीत केलेले आहे.

تَنْزِيْلٌ مِّنْ رَّبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٨٠﴾

८१. मग काय तुम्ही या (ग्रंथा) बाबत उपेक्षा दर्शविता ?[६५]

اَفَبِهٰذَا الْحَدِيْثِ اَنْتُمْ مُّدْهِنُوْنَ ﴿٨١﴾

८२. आणि (या देणगीमध्ये) आपला हिस्सा राखता की यास खोटे ठरवावे ?

وَتَجْعَلُوْنَ رِزْقَكُمْ اَنَّكُمْ تُكَذِّبُوْنَ ﴿٨٢﴾

८३. तर का नाही (काही करीत) जेव्हा प्राण कंठाशी येतो.[६६]

فَلَوْلَآ اِذَا بَلَغَتِ الْحُلْقُوْمَ ﴿٨٣﴾

५४. समुद्राचे पाणी खारे व कडवट असते परंतु जेव्हा वाफ बनून ते वर जाते व ढगाचे स्वरूप धारण करते तेव्हा त्यात मीठाचा किंचितही अंश राहात नाही. म्हणून ढगातून ज्या पाण्याचा वर्षाव होतो ते अगदी क्षारविरहीत असते. ही अल्लाहची केवढी मोठी कृपा व देणगी होय. जी माणसाला अहोरात्र दिसून येते.तरी ही त्याच्या मनात आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञतेची भावना जागृत का होत नाही? अल्लाहने इच्छिले तर समुद्रातून बाष्पीभवन होणाऱ्या पाण्यातही मीठाचे अंश राखू शकतो. आणि अतिशय खारट व कडवट पाण्याचा पाऊस पडू शकतो.

५५. त्या काळात मजख व अफार या नावाची दोन झाडे आढळून येत, ज्यांच्या फांद्या एकमेकांना घासून आग निर्माण केली जात असे हिरव्या झाडातून आग निर्माण करणे अल्लाहच्या अद्‌भूत सामर्थ्यांचा चमत्कारच होय.

५६. ही आग जहन्नमच्या आगीची आठवण घडविते. माणसाने आगीला पाहील्यावर अल्लाहच्या शिक्षेचे भय बाळगले पाहीजे.

५७. त्या काळात आग पेटविण्या करीता 'आगपेटी' चा शोध लागलेला नव्हता. यास्तव वर उल्लेखित झाडांच्या फांद्यांचा प्रवाशी आग पेटविण्यास्तव वापर करीत, जी स्वयंपाकासाठी ही उपयोगी पडत असे व तिच्या पासून ते शेकत ही असत. प्रवाशांकरीता ही केवढी मोठी देणगी होती. आजच्या काळात आग पेटविण्याकरीता निरनिराळया प्रकारच्या वस्तू संशोधिल्या गेल्या आहेत. त्या देखील ईश देणग्याच होत ज्या अल्लाहने दिलेल्या बुद्धि कौशल्यामुळे लाभल्या म्हणून त्याबाबतही अल्लाहशी कृतज्ञता बाळगणे आवश्यक आहे.

५८. हे मागदर्शन, ताकीद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमाने त्यांच्या अनुयायींना दिली गेली आहे या उघड वस्तुस्थितीकडे लोक जर मुद्दाम बघण्याचे टाळून डोळे मिटत असतील तर मिटावेत. तुम्ही आपल्या महान पालन कर्त्याचे पावित्र्य वर्णन करा की तो प्रत्येक प्रकारच्या व्यंग दोष व शिर्क पासून अलिप्त आहे व त्याच्या नावाचे गुणगान करा. अल्लाहच्या नावाचे गुणगान. उदाहरणार्थ 'सुबहानल्लाह' किंवा

سُبۡحَانَ اللهِ किंवा سُبۡحَانَ رَبِّیَ الۡعَظِیۡم

'सुबहान रब्बियल अज़ीम' म्हणणे श्रद्धेच्या निकोपतेस ही जाहीर करते व उत्कृष्ट उपासना ही.

५९. शपथे पूर्वी जे 'ला' (नव्हे) प्रयोजिले जाते, ते चुकीची गोष्ट रद्द करण्यासाठी वापरले जाते. या ठिकाणी इन्कार करणाऱ्यांच्या चुकीच्या श्रद्धांचे खंडन करण्या साठी हे प्रयोजिले गेले आहे.

६०. ताऱ्यांच्या अस्तास जाण्यांच्या स्थानांशी अभिप्रेत त्यांचे आपापल्या ठिकाणी अस्त पावणे होय.

६१. प्रात:काळी जेव्हा तारे अस्त पावू लागतात तेव्हा आकाशातील सुशोभित मैफल बरखास्त होण्याचे ऐलान होते. हे दृश्य प्रत्येक डोळस माणसाला विचार चिंतनाचे आवाहन करते. म्हणून याला तौहीद (एकेश्वरवाद) आणि मोबदला व शिक्षेच्या समर्थनार्थ प्रस्तुत केले गेले आहे. कुरआनाचे आवाहन याच मूलभूत गोष्टीचे आवाहन आहे. म्हणून याद्वारे त्याची ती सत्यता स्पष्ट होते. सूरह नजममध्ये ही ताऱ्यांच्या अस्त पावण्याची शपथ या गोष्टीबद्दल घेतली गेली आहे आणि सूरह तक्वीर मध्ये ही ताऱ्यांचा वेग, त्यांचे लपणे, रात्रीचे निरोप घेणे आणि प्रात:काळाच्या प्रकट होण्यास मोबदल्याच्या दिवसाची साक्ष म्हणून प्रस्तुत केले गेले आहे, ज्या द्वारे कुरआनाची सत्यता ही प्रकट होते. या ठिकाणी या शपथेला महान शपथ या अर्थाने घेतले गेले आहे. अर्थात आकाशाचे हे अवशेष एकेश्वरवाद व मोबदल्याच्या दिवसाच्या हक्कात फार मोठे प्रमाण आहे, कारण या अवशेषांचे प्रत्येक मनुष्य अवलोकन करू शकतो व अगदी सहजगत्या योग्य निष्कर्षा प्रत पोहचू शकतो. या साठी तर्क वितर्क लढविण्याची लहान मोठे जोडण्याची गरज नाही. तुमच्या अंगी जर सत्य प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे, तर तुम्ही या ताऱ्यांच्या अवलोकनात सत्य प्राप्त करून घ्याल आणि ताऱ्यांच्या अस्त पावण्यात ही तुम्हाला अल्लाहचा फार मोठा चमत्कार दिसून येईल.

६२. कुरआनचा अर्थ अत्याधिक पठण केला जाणारा ग्रंथ होय. कुरआन अल्लाहची वाणी असल्यामुळे व आपल्या सर्वोत्कृष्ट वैशिष्टयांमुळे या योग्य आहे की त्यास वारंवार पठण केले जावे आणि याचा इतमाम शरीअतने अशा प्रकारे केला आहे की प्रत्येक नमाजमध्ये किंबहुना नमाजच्या प्रत्येक रकअतीत कुरआनाचे पठण होते. या खेरीज याचे पठण एवढया मोठया प्रमाणात होते की जगातला दुसरा कोणताही ग्रंथ याच्या तुलनेत सादर केला जाऊ शकत नाही याच्या पठणाचा अतिशय रम्य आणि आत्मवर्धक दृश्य रमजानच्या रात्रींमध्ये आढळून येते.

कुरआनाचा गुणविशेष 'करीम' असा निवेदिला गेला आहे ज्याचा अर्थ प्रतिष्ठा सम्पन्न असा ही आहे व लाभ प्रदान करणारा असा ही आहे. कुरआन अतिशय उच्च व श्रेष्ठतम ग्रंथ आहे. यात जे काही सांगितले गेले आहे; ते उच्च पातळीचेच आहे. या ग्रंथाची व त्याच्या वाणीचे एक विलक्षण वैभव आहे आणि ती प्रत्येक दृष्टीने सन्माननीय आहे. अधिक हे की त्याची लाभदायकता अशी आहे की जणू शुभ मांगल्याचे स्त्रोत वाहत आहेत. मोठे दुर्भाग्य शाली आहेत ते लोक जे याची कदर जाणत नाहीत.

६३. सुरक्षित ग्रंथाशी अभिप्रेत 'लोहे महफूज' होय. जसे सूरह बुरूज मध्ये सांगितले गेले आहे.

بَلْ هُوَ قُرْآنٌ مَّجِيدٌ فِي لَوْحٍ مَّحْفُوظٍ۔

'किंबहुना हे उच्चतम कुरआन आहे हे लोहे महफूजमध्ये आहे.' (बुरूज - २१,२२)

म्हणजे आकाशात हा ग्रंथ अतिशय इतमामाने सुरक्षित केला गेला आहे जिथे फरिश्त्यां खेरीज अन्य कोणी ही पोहचू शकत नाही.

६४. مُطَهَّرِينَ स्वच्छ शुद्ध शी अभिप्रेत फरिश्ते होत जे प्रत्येक प्रकारच्या गुन्हा व अमंगल कृत्या पासून अलिप्त आहेत. तबरी व इतर भाष्यकारांनी ही यास अभिप्रेत फरिश्तेच घेतले आहेत सूरह अबस मध्ये स्पष्टीकरण आहे :-

فِي صُحُفٍ مُّكَرَّمَةٍ مَّرْفُوعَةٍ مُّطَهَّرَةٍ

بِأَيْدِي سَفَرَةٍ كِرَامٍ بَرَرَةٍ۔(عبس ١٣، ١٦)

''हे अशा पानांमध्ये आहे जे अतिशय सन्माननीय आहेत. उच्च दर्जा व स्वच्छ शुद्धता बाळगणारे आहे. अशा लिहीणाऱ्यांच्या हाती आहे जे प्रतिष्ठीत व एकनिष्ठ आहेत.'' (अबस : १३ ते १६)

आणि या ठिकाणी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की कुरआना बाबत इन्कार करणाऱ्यांची ही शंका की ते सैतानाने अवतरीत केले आहे, अगदी चुकीची व नितांत खोटी गोष्ट होय. कुरआन अक्षरशः अल्लाहची वाणी आहे आणि याचा स्त्रोत (Sources)लोहे महफूज होय जो आकाशात आहे. त्या ठिकाणी एखाद्या सैतानाला पोहचणे कदापि शक्य नाही की त्याने यास घेऊन पळ काढावा व त्यात मिश्रण करावे. तिथे स्वच्छ शुद्ध फरिश्तेच पोहचतात, तेच या ग्रंथाला स्पर्श करतात आणि तेच अल्लाहच्या आदेशानुसार कुरआनाच्या आयतींना जशीच्या तशी घेऊन अवतरीत होतात. त्यांचे सरदार हजरत जिब्रील पैगंबरांवर वहय (संदेश-अवतरण) करतात. कुरआन अवतरणाचे हे कार्य स्वच्छ शुद्ध व पावित्र्यशील फरिश्त्यां द्वारेच पार पडले. म्हणून यात ना फरिश्त्यांच्या हस्तक्षेपाची संभावना आहे आणि ना सैतानाच्या एखाद्या कथनाची.

आयतीचा मूळ आशय तोच होय जो वर निवेदिला गेला आहे परंतु धर्मशास्त्र वत्त्यांनी या आयतीवरून कुरआनास वुजू केल्या खेरीज स्पर्श करण्याच्या बाबतीत युक्तिवाद केला आहे व याचा समर्थनार्थ ते मूताचे हे हदीस वचन ही प्रस्तुत करतात.

عَنْ عَبْدِاللهِ بْنِ أَبِي بَكْرِ بْنِ حَزْمٍ أَنَّ فِي الْكِتَابِ الَّذِي كَتَبَ رَسُولُ اللهِ ﷺ لِعَمْرِو بْنِ حَزْمٍ أَنْ لَا يَمَسَّ الْقُرْآنَ إِلَّا طَاهِرٌ۔

''अब्दुल्लाह बिन अबी बकर बिन हजम द्वारे उल्लेखित आहे की की त्या लेखात, जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी उमर बिन हजम यांना लिहून दिला, हा आदेश होता की कुरआनास त्यांनीच स्पर्श करावा जे स्वच्छ शुद्ध असतील.

या ठिकाणी या संदर्भात धर्मशास्त्रीय चर्चा विवादाचा प्रसंग नाही, म्हणून आम्ही संक्षिप्तपणे काही गोष्टी नमूद करतो :-

१) या आयतीत कोणताही आदेश दिला गेला नाही, किंबहुना ही वास्तविकता सांगितली गेली आहे की कुरआनाचे अवतरण अगदी त्या ग्रंथानुसार होत आहे जो आकाशात सुरक्षित आहे आणि त्याला केवळ स्वच्छ शुद्ध व पावित्र्यशील आणि प्रामणिक असे फरिश्ते स्पर्श करतात. आणि त्याच्यानुसारच वही (अल्लाहचा संदेश) घेऊन पैगंबरावर अवतरीत होतात. सैतानांचे ना तिथे येणे जाणे आहे आणि ना या अशुभ व अमंगलांचा त्याला स्पर्श ही होऊ शकतो. आणि ना ते फरिश्त्यांच्या कामात हस्तक्षेप करू शकतात. यावरून हा आदेश गृहीत धरणे की वुजू केल्या खेरीज कुरआनाला स्पर्श करू नये. एक असंबंधित बाब होय. 'ताहीर' व मुतहर्रीन' चा फरक ही ध्यानी घेतला पाहीजे. जर कुरआनाला स्पर्श करण्यासाठी वुजू करणे आवश्यक असते तर 'ताहीरीन' हा शब्द प्रयोग केला गेला असता. مطهرين 'मुतहर्रीन' नव्हे या आयतीत ज्या प्रमाणे फरिश्त्यांच्या कुरआनास स्पर्श करण्याचा उल्लेख आहे, त्याच प्रमाणे सूरह अबस मध्ये त्यांच्या लिहिण्याचा ही :-

بِأَيْدِي سَفَرَةٍ كِرَامٍ بَرَرَةٍ۔

'यास लिहीणाऱ्यांच्या हातांनी जे प्रतिष्ठीत व नेक आहेत.' (अबस - १५-१६)

तर काय यावर कयास करून कुरआन किंवा त्याच्या एखाद्या आयतीस लिहीण्या करीता प्रतिष्ठीत व नेक (सदाचारी) असण्याची अट लावली जाऊ शकते? जर हे गृहीत धरणे योग्य नव्हे तर 'मुतहर्रीन' प्रयोजिलेल्या आयतीने जे गृहीत धरले जाते ते ही योग्य नव्हे.

२) आणि जेथपावेतो मूताच्या या हदीसचा संबंध आहे की

أَنْ لَا يَمَسَّ الْقُرْآنَ إِلَّا طَاهِرٌ۔

'कुरआनाला त्यांनीच स्पर्श करावा जे स्वच्छ शुद्ध असतील तेव्हा प्रथम तर हे हदीस वचन मुर्सल आहे. (औनुल मबवूद शरह सुनन अबी दाऊद खंड १ पृ. ३८४) दुसरे असे की 'ताहीर' शी अभिप्रेत अपरिहार्यतः वुजू केलेला मनुष्य नव्हे किंबहुना यास अभिप्रेत तो मनुष्य होय जो संभोगानंतर स्वच्छ शुद्ध झालेला आसावा. यास्तव याचे समर्थन त्या हदीस वचनांद्वारे

होते ज्यात संभोगांनतर स्नान न केलेल्यास कुरआन पठणाची मनाई केली आहे. तात्पर्य या हदीस वचनांमध्ये संभाषणाची जागा आहे.

وَفِىْ كُلِّهَامَقَال

(औनुल मबवूद खंड- १ पृष्ठ ३८३) आणि कुरआनात संभोग केलेल्यास स्नान करून स्वच्छ शुद्ध होण्याचा आदेश दिला गेला आहे.

وَاِنْ كُنْتُمْ جُنُبًافَاطَّهَّرُوْا۔

'जर संभोगानंतरच्या अवस्थेत असाल तर स्नान करून स्वच्छ शुद्ध व्हा.' (मायदा-६)

कुरआन व हदीस वचनाच्या या स्पष्टीकरणात्मक आदेशांना लक्षात घेता उपरोक्त हदीसचा हाच अर्थ निश्चित होतो की कोम्त्याही माणसाने संभोग केल्यानंतर किंवा स्त्रीने मासिक पाळी नंतर स्वच्छ शुद्धता पत्करली नसेल म्हणजे स्नानादि विधी करून शुचिर्भूत झाला किंवा झाली नसेल तर त्याने कुरआनाला स्पर्श करू नये.

३) काही धर्मशास्त्र वेत्त्यांनी तर कुरआनास वुजू शिवाय हात न लावण्याचा आदेश देत या संदर्भात एवढी प्रखरता निर्माण केली आहे की ज्या पुस्तकात कुरआनाच्या आयती असतील किंवा ज्या एखाद्या पानावर कुरआनाची आयत लिहीली असेल त्याला ही वुजू शिवाय स्पर्श न करणे अनुचित ठरविले. याचा अर्थ असा झाला की माणूस वुजू केल्या खेरीज एखाद्या पत्रावर 'बिस्मिल्लाह' लिहू शकत नाही, आणि ना त्यात एखादी आयत लिहू शकतो कारण 'बिस्मिल्लाह' सुद्धा कुरआनाचीच एक आयत होय. तसेच त्या मासिकांनाही हात लावू शकत नाही ज्यात कुरआनाच्या आयती असाव्यात. या अतिरेकाचे खंडन बुखारीच्या त्या प्रकरणाद्वारे होते ज्यात त्यांनी इब्राहीम नखअीचे हे कथन उल्लेखिले आहे. की 'वुजू न करता पत्र लिहीण्यास काही हरकत नाही.' (बुखारी-किताबुल वुजू बाब-किरातुल कुरआन बअदल हदीस वगैरे)

उघड आहे पत्राच्या आरंभी बिस्मिल्लाह ही लिहीले जाईल आणि गरज भासल्यास कुरआनाच्या आयती ही लिहिल्या जातील.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी रोमच्या कैसरला पत्र लिहीले होते. त्यात कुरआनाच्या आयती ही होत्या तर काय पत्र नेऊन पोहचविणाऱ्या माणसाला ही ताकीद केली गेली होती की त्याने वुजू केल्या खेरीज या पत्राला हात लावू नये.

४) हजरत इब्ने अब्बास, शअबी, ज़हाक जैद बिन अली मोइद बिल्लाह, दाऊद, इब्ने हजम, आणि हमाद बिन सुलेमान इत्यादि मान्य करतात की वुजू न करता कुरआनास स्पर्श केला जाऊ शकतो.

(फिकहुस्सिना अस्सय्यद साबिक खंड १ पृ. ५७)

५) कुरआनाचे पठण व त्याच्या अभ्यासा करीता वुजू सह असणे निश्चित अतिशय चांगली व समृद्धी कारक गोष्ट आहे कारण वुजू केलेल्या अवस्थेत स्वच्छ शुद्धतेची व पावित्र्याची अधिक जाणीव होते. आणि विचारांना स्वच्छ व पवित्र ठेवण्यात अधिक मदत मिळते परंतु वुजू खेरीज कुरआनाला स्पर्श करण्यास हराम ठरविणे धर्मशास्त्रीय बाबतीत टोक गाठणे होय याखेरीज आणखी काही नाही. ही प्रखरता आजच्या काळात लोकांना मोठया अडचणीत टाकणारी आहे. कारण कुरआनाच्या प्रती विकणे वा खरेदी करणे, त्यांची बाईंडींग करणे या सर्व कामांसाठी वुजूचे बंधन ही आचरणीय बाब नव्हे. ही गोष्ट कुरआनाच्या प्रकाशन संदर्भात फार मोठा अडथळा होय. हा ग्रंथ सुंदर अशा वेष्टनांमध्ये गुंडाळून ठेवण्यासाठी नाही, किंबहुना अशासाठी आहे की या पासून पावलो पावली मागदर्शन प्राप्त केले जावे आणि त्याचा जास्तीत जास्त प्रसार केला जावा. वस्तुस्थिती अशी की धर्म-संदर्भात जी सहज सुलभता होती ती धर्मशास्त्रीय अतिरेकामुळे कायम राहू शकली नाही.

६५. म्हणजे याच्या महानतेची जाणीव करीत नाही व यास खात्रीत आणत नाही.

६६. म्हणजे प्राण निघत असतांना तुमची जी विवशता असते त्याबद्दलही विचार करा.

८४. आणि तुम्ही त्या क्षणी बघत असता. [६७]

وَأَنتُمْ حِينَئِذٍ تَنظُرُونَ ﴿٨٤﴾

८५. आणि आम्ही तुमच्या तुलनेने त्याच्या अधिक जवळ असतो परंतु तुम्हाला दिसून येत नाही.[६८]

وَنَحْنُ أَقْرَبُ إِلَيْهِ مِنكُمْ وَلَٰكِن لَّا تُبْصِرُونَ ﴿٨٥﴾

८६. तेव्हा जर तुम्ही शासित नाहीत तर का नाही-

فَلَوْلَا إِن كُنتُمْ غَيْرَ مَدِينِينَ ﴿٨٦﴾

८७. या प्राणाला परतवून घेत जर तुम्ही सच्चे आहात.[६९]

تَرْجِعُونَهَا إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٨٧﴾

८८. मग जर तो असेल अल्लाहचे सान्निध्य प्राप्त झालेल्यां [७०] पैकी.

فَأَمَّا إِن كَانَ مِنَ الْمُقَرَّبِينَ ﴿٨٨﴾

८९. तेव्हा त्याच्या करीता ऐष आराम व सुगंध आणि देणग्यांनी युक्त अशी जन्नत आहे.[७१]

فَرَوْحٌ وَرَيْحَانٌ وَجَنَّتُ نَعِيمٍ ﴿٨٩﴾

९०. आणि जर तो उजव्या हात वाल्यांपैकी असेल.[७२]

وَأَمَّا إِن كَانَ مِنْ أَصْحَابِ الْيَمِينِ ﴿٩٠﴾

९१. तर सलामती आहे तुझ्या करीता की तू उजव्या हात वाल्यां पैकी आहेस.[७३]

فَسَلَامٌ لَّكَ مِنْ أَصْحَابِ الْيَمِينِ ﴿٩١﴾

९२. आणि जर तो खोटे ठरविणाऱ्या मार्गभ्रष्ट लोकांपैकी असेल.

وَأَمَّا إِن كَانَ مِنَ الْمُكَذِّبِينَ الضَّالِّينَ ﴿٩٢﴾

९३. तर त्याचा पाहुणचार गरम पाण्याने होईल.

فَنُزُلٌ مِّنْ حَمِيمٍ ﴿٩٣﴾

९४. आणि त्याच्या प्रवेश जहन्नम मध्ये होईल. [७४]

وَتَصْلِيَةُ جَحِيمٍ ﴿٩٤﴾

९५. हे सर्व निश्चितपणे सत्य आहे. [७५]

إِنَّ هَٰذَا لَهُوَ حَقُّ الْيَقِينِ ﴿٩٥﴾

९६. तेव्हा (हे पैगंबर !) आपल्या महिमावान पालन कर्त्याच्या नावाचे गुणगान (तस्बीह) करा.[७६]

فَسَبِّحْ بِاسْمِ رَبِّكَ الْعَظِيمِ ﴿٩٦﴾

६७. म्हणजे तुमच्या डोळयादेखत मृत्यु पावणाऱ्यांचे प्राण काढला जातो.

६८. अर्थात तुमच्या तुलनेत अल्लाह मरणाऱ्या माणसाशी अधिक जवळ असतो.

स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कॉफ टीप क्र. २१

६९. म्हणजे जर तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या अधीन व त्याचे शासित नाही तर मेल्यानंतर आपल्या आत्म्याला परत का नाही आणत? वास्तविक मेल्यानंतर शरीरातून बाहेर पडलेल्या आत्म्याला कोणीही परत आणू शकत नाही. ना आपल्या स्वत:च्या आत्म्याला आणि ना अन्य एखाद्याच्या. असे असतांना तो या वस्तुस्थितीस का मान्य करीत नाही की तो आपल्या पालन कर्त्याच्या अधीन व त्याच्या शासित आहे. आणि ज्याअर्थी तो अल्लाहच्या अधीन व त्याचा शासित आहे तर त्याने अल्लाहची उपासना व त्याचे आज्ञापालन केले पाहीजे. मग त्याच्याशी इन्कार व विद्रोह कसा?

७०. अल्लाहचे सान्निध्य लाभलेले याचे स्पष्टीकरण वर टीप क्र. १० मध्ये केले गेले आहे.

७१. म्हणजे मरणारा जर अल्लाहचे सान्निध्य लाभलेल्या पैकी आहे तर त्याच्या आत्म्या करीता आरामच आराम होय. त्याला असा सुगंध प्रदान केला जातो, जो त्याच्यासाठी आनंद व उत्साहवर्धक असतो. आणि त्याला देणग्यांनी युक्त अशा जन्नतची शुभ वार्ता दिली जाते. सूरह हा मीम सजदा (आयत-३०) मध्ये ही उल्लेखिले गेले की जे लोक स्थैर्यशीलतेचा पुरावा देतात त्यांच्यावर फरिश्ते जन्नतची शुभवार्ता घेऊन अवतरतात.

७२. उजव्या हात वाल्यांशी अभिप्रेत सर्व सामान्य सदाचारी लोक होत, ज्यांना त्यांचा कर्म लेख त्यांच्या उजव्या हातात दिला जाईल.

७३. म्हणजे जर मरणारा सदाचारी आहे तर फरिश्ते त्याचा आत्मा काढतांना त्याला हा शुभ समाचार देतात की तुझ्यासाठी अगदी सलामती आहे. तुझी कोणत्याही संकटाशी वा दु:ख यातनेशी गाठ पडणार नाही.

७४. म्हणजे मरणारा जर आखिरत व एकेश्वरवादास खोटे ठरविणारा व मार्गभ्रष्ट होता तर त्याचे स्वागत उकळत्या पाण्याने केले जाईल व त्याला ही वाईट वार्ता संगितली जाईल की कियामतीच्या दिवशी त्याचा दाखला (प्रवेश) जहन्नम मध्ये होईल.

७५. म्हणजे या सर्व गोष्टी ज्या निवेदिल्या गेल्या आहेत अगदी सत्य आहेत. यात तिळमात्र शंकेला जागा नाही.

७६. स्पष्टीकरणा करीता पहा टीप क्र. ५८

हदीस मध्ये उल्लेख आहे की जेव्हा ही आयत अवतरली, तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, यास आपल्या रूकूअ मध्ये ठेवा आणि जेव्हा आयत

سَبِّحِ اسْمَ رَبِّكَ الْأَعْلَى

अवतरली तेव्हा त्यांनी फर्माविले, यास आपल्या सजद्यात राखा. (अबु दाऊद-किताबुस्सलात)

यास्तव रूकूअ मध्ये

سُبْحَانَ رَبِّيَ الْعَظِيمِ

**'सुबहाना रब्बियल अज़ीम** (पवित्र आहे माझा पालन कर्ता महान) आणि सजद्यामध्ये

سُبْحَانَ رَبِّيَ الْأَعْلَى

**'सुबहान रब्बियल आला'** (पवित्र आहे माझा पालनकर्ता उच्चतम) या आदेशाचे पालन म्हणून म्हटली जातात.

यावरून ही गोष्ट स्पष्ट झाली की नमाज़ मधील नाम: स्मरण कुरआनाच्या संकेतांवर आधारीत आहेत.

# सूरह
# अल-हदीद

# ५७. सूरह अल हदीद

**नावः** आयत क्र. २५ मध्ये हदीद अर्थात लोह अवतरीत केले जाण्याचा उल्लेख आहे. तद्नुषंगे या सूरह चे नाव 'अल-हदीद' आहे.

**अवतरण काळः** मदनी आहे आणि आयत क्र. १० मध्ये विजया पूर्वी अल्लाहच्या मार्गात खर्च व जेहाद करणाऱ्यांच्या उच्च दर्जाचा उल्लेख केला गेला आहे. त्यावरुन हा संकेत मिळतो की ही सूरह मक्का विजया पूर्वी अवतरली होती. संभवत: हिजरी सन ५ किंवा हि. स. ६ मध्ये.

**मध्यवर्ति कल्पनाः** या सूरह मध्ये मना पासून ईमान बाळगण्याचे आवाहन केले गेले आहे आणि त्याची उद्‌भवलेली निकड अशी सादर केली गेली आहे की अल्लाह खातीरच्या युद्धा करीता आपले धन खर्ची पाडले जावे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ६ मध्ये अल्लाहचे पावित्र्य आणि त्याची गुणवैशिष्टये निवेदिली गेली आहेत.

आयत क्र. ७ ते ११ मध्ये निष्कपट पणे ईमान बाळगण्याचे व त्याच्या निकडी भागविण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. १२ ते १५ मध्ये प्रमाणिक ईमान धारकांना हा शुभ समाचार देत की त्यांचे ईमान कियमतीच्या दिवशी त्यांच्या करीता नूर (प्रकाश) असेल. दांभिक मुसलमानांचे या दिव्य तेजा पासून वंचित राहणे, व अल्लाहच्या प्रकोपाला त्यांना सामोरे जावे लागण्याचे दृश्य सादर केले गेले आहे.

आयत क्र. १६ ते २४ मध्ये ईमानाच्या निकडी सादर केल्या गेल्या आहेत आणि जगाच्या तुलनेत आखिरतला ध्येय उदिष्ट बनाविण्या चे प्रोत्साहन दिले गेले आहे.

आयत क्र. २५ ते २७ मध्ये न्याय प्रस्थापने करीता सामर्थ्याचा वापर आवश्यक ठरवित जेहाद चे प्रोत्साहन दिले गेले आहे आणि धर्मा च्या रहबानी (सन्यासी) कल्पनेचे खंडन केले गेले आहे.

आयत क्र. २८ व २९ सूरहच्या समोरोपाच्या आयती होत ज्यात पापभीरू व प्रामणिक ईमान बाळगणाऱ्यां करीता प्रकाश व महत्कृपेने उपकृत केले जाण्याची शुभवार्ता दिली गेली आहे.

# ५७. सूरतुल हदीद

سُورَةُ الْحَدِيدِ

आयती-२९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान करतात समस्त वस्तू ज्या आकाशात व जमीनीवर आहेत [१] आणि तो वर्चस्वशाली आहे,[२] बुद्धि कौशल्य बाळगणारा. [३]

سَبَّحَ لِلَّهِ مَا فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۖ وَهُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ①

२. आकाशांची व जमीनी ची राज्यसत्ता त्याच्याच करीता आहे.[४] तोच जिवंत करतो आणि मारतो आणि तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.

لَهُ مُلْكُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۖ يُحْيِي وَيُمِيتُ ۖ وَهُوَ عَلَىٰ كُلِّ
شَيْءٍ قَدِيرٌ ②

३. तोच आद्य आहे आणि अंतिम ही, उघड ही आहे व गुप्त ही [५] आणि तो प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे.[६]

هُوَ الْأَوَّلُ وَالْآخِرُ وَالظَّاهِرُ وَالْبَاطِنُ ۖ وَهُوَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمٌ ③

४. तोच होय ज्याने आकाशांना व जमीनीला सहा दिवसात निर्माण केले, मग तो (आपल्या) सिंहासनावर उंचावला.[७] तो जाणतो, जी गोष्ट देखील जमीनीत शिरते [८] व तिच्यातून निघते, [९] आणि जे काही आकाशातून अवतरीत होते व जे काही त्याच्या दिशेने वर चढते [१०] तो तुमच्या सोबत आहे, तुम्ही असाल तिथे.[११] आणि तुम्ही जे काही करता, अल्लाह ते पाहतो.

هُوَ الَّذِي خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ فِي سِتَّةِ أَيَّامٍ ثُمَّ اسْتَوَىٰ
عَلَى الْعَرْشِ ۚ يَعْلَمُ مَا يَلِجُ فِي الْأَرْضِ وَمَا يَخْرُجُ مِنْهَا وَمَا يَنْزِلُ
مِنَ السَّمَاءِ وَمَا يَعْرُجُ فِيهَا ۖ وَهُوَ مَعَكُمْ أَيْنَ مَا كُنْتُمْ ۚ وَاللَّهُ بِمَا
تَعْمَلُونَ بَصِيرٌ ④

५. आकाशांची व जमीनीची राज्य सत्ता त्याचीच होय. आणि सर्व कार्ये त्याच्याच कडे परततात.[१२]

لَهُ مُلْكُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ وَإِلَى اللَّهِ تُرْجَعُ الْأُمُورُ ⑤

६. तोच रात्रीला दिवसात दाखल करतो, आणि दिवसाला रात्रीत [१३] आणि तो मनातली रहस्ये ही जाणतो. [१४]

يُولِجُ اللَّيْلَ فِي النَّهَارِ وَيُولِجُ النَّهَارَ فِي اللَّيْلِ ۚ وَهُوَ عَلِيمٌ
بِذَاتِ الصُّدُورِ ⑥

१. سَبَّحَ 'सब्बह' भूतकालीन धार्मिक आचार होय. ज्याच्या शाब्दिक अर्थ आहे तस्बीह (अल्लाहचे पावित्र्यासह गुणगान) केले. आणि अन्य आयतीत 'युसब्बिहु' يُسَبِّحُ हा धार्मिक आचार ही आला आहे, जो वर्तमान आणि भविष्य दोघां करीता आहे. म्हणजे अल्लाहचे पावित्र्यासह गुणगान करते व गुणगान करील या दोन्ही भक्ति मार्गाच्या वापरा वरून ही हकीगत उघड करण्याचा हेतु आहे की सृष्टीतील प्रत्येक वस्तु काळाच्या बंधना शिवाय अल्लाहचे पावितत्र्या व स्तुति प्रशंसे चे गुणगान करण्यात रममाण आहे. स्थिती आणि उक्ती दोघांनीही अल्लाहचे गुणगान करतात.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. ५८.

२. म्हणजे त्याची सत्ता व त्याचे वर्चस्व प्रत्येक गोष्टीवर प्रत्येक वस्तू वर आहे. कोणतीही गोष्ट वा चीज वस्तू त्याच्या काबू बाहेर नाही.

३. तो आपल्या सत्ताधिकारा व वर्चस्वाचा बुद्धिकौशल्य पूर्वक वापर करतो. म्हणून ही सृष्टी व्यवस्था एक गांभीर्य पूर्ण वास्तविकता आहे. ती हेतुविरहीत नाही आणि ना अल्लाहच्या साम्राज्यात अंधेर नगरी आहे.

४. म्हणजे तो सृष्टीचा शासन कर्ता आहे. त्याच्या राज्य सत्तेत कोणीही सहभागी नाही. तो संपूर्ण सत्ताधिकारा सह आपल्या साम्राज्यावर शासन करीत आहे.

५. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले आहे :-

اَنْتَ الْاَوَّلُ فَلَیْسَ قَبْلَکَ شَیْءٌ وَاَنْتَ الْاٰخِرُ فَلَیْسَ بَعْدَکَ شَیْءٌ وَاَنْتَ الظَّاهِرُ فَلَیْسَ فَوْقَکَ شَیْءٌ وَاَنْتَ الْبَاطِنُ فَلَیْسَ دُوْنَکَ شَیْءٌ۔ (مسلم کتاب الذکر)

''तू आद्य आहेस तुझ्या आधी कोणीहि नाही तूच अंतिम आहेस. तुझ्या नंतर कोणीही नाही तू उघड आहेस. तुझ्याहून वर कोणी नाही तू सुप्त आहेस. तुझ्याहून अधिक अध्यारूत कोणी ही नाही.''

(मुस्लिम किताबुज्जिक्र)

अर्थात अनादि अनंत आहे. प्रत्येक गोष्टी चे अस्तित्व, त्याच्या अस्तित्वा नंतर आहे. प्रत्येक गोष्ट नाश पावणारी आहे. चिर स्थायीत्व व अविनाश फक्त त्याच्या करीता आहे आणि त्याच्या स्थायी ठेवल्यानेच एखादी गोष्ट टिकून राहू शकते. त्याच्या अस्तित्वा पेक्षा अधिक कोणत्याही गोष्टीचे अस्तित्व ही उघड नाही. संपूर्ण सृष्टी त्याच्या अस्तित्वास जाहीर करीत आहे. आणि तो प्रत्येक ठिकाणी दृगोचर आहे परंतु तो असा गुप्त आहे की या डोळयांना दिसून येत नाही. ज्ञानेंद्रियांना याची अनुभूति होऊ शकत नाही. बुद्धि त्याच्या तथ्याला (वास्तविकतेला) स्पर्श करू शकत नाही. यास्तव त्याच्या स्वत्वा बाबत व त्याच्या गुणविशेषां बाबत जी ओळख 'वही' (अवतरीत संदेशा) द्वारे लाभली आहे. त्यावरच समाधान मानावे आणि अशा गुढ प्रश्नांमध्ये बुद्धिला गुरफटून टाकू नये जे अमच्या आकलना बाहेर असावेत.

जे लोक (अल्लाह माफ करो) अल्लाह व सृष्टी निर्मिती सर्वाचे एकच अस्तित्व आहे असे मानतात त्यांनी इथेच ठेच खाल्ली आहे. त्यांनी अल्लाहच्या स्वत्वात बुद्धि आणि स्वभावाच्या मर्यादा ओलांडून विचार केला, परिणाम स्वरूपी त्यांची श्रद्धा चुकीची ठरली आणि मार्गभ्रष्टतेच्या भोवऱ्यात त्यांची श्रद्धा नौका बुडाली. मनुष्य जो पर्यंत पाण्यात पोहत असतो सलामती पूर्वक असतो, परंतु जेव्हा जमीनीवर पोहायला सुरवात करतो तेव्हा मात्र आपले गुडधे फोडून घेतो. अकलेच्या घोडयाला लगाम असणे अत्यावश्यक आहे.

६. मनुष्य आपल्या ज्ञानावरून अल्लाहच्या ज्ञानाचा कयास करू शकत नाही. अल्लाहचे ज्ञान म्हणजे एक अथांग अमर्याद सागर आहे आणि माणसाचे ज्ञान समुद्रातला एक थेंब ही नाही.

७. याचे स्पष्टीकरण सूरह एअराफ टीप. ८२, ८३ मध्ये केले गेले.

८. उदाहरणार्थ धान्याचे दाणे, पाणी व मृत शरीर जे यात गाडले जाते.

९. उदाहरणार्थ अंकूर, पाण्याचे स्रोत, धातू मौल्यावान दगड, आणि तेल, पेट्रल, गॅस इत्यादि.

१०. याचे स्पष्टीकरण सूरह सबा टीप क्र. ५ मध्ये केले गेले आहे.

११. तुम्ही कोठेही असा, अल्लाह तुम्हाला जाणतो, पाहतो, तुमच्या गोष्टी ऐकतो. तुमच्यावर सामर्थ्य बाळगतो आणि तुमचा आत्मा ताब्यात घेतो. त्याच्या अस्तित्वात असण्याची व पहात असण्याची कल्पनाच माणसाचा थरकाप उडविण्यास पुरेशी आहे.

१२. तो सर्वसत्ताधिकारी आहे म्हणून आकाशामंध्ये व जमीनीवर त्याची राज्यसत्ता चालते आणि तो केंद्रबिंदू आहे म्हणून समस्त कार्ये त्याच्याच कडे परततात.

१३. याचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र. ३९ मध्ये केले गेले आहे.

१४. तो अत्याधिक गुप्त गोष्टींना ही जाणतो, येथपावेतो की मनात लपलेले भेद ही तो चांगल्या प्रकारे जाणतो.

७. ईमान बाळगा अल्लाह व त्याच्या रसूल (पैगंबर) वर [१५] आणि खर्च करा त्या धन सम्पत्ति तून जिच्यावर त्याने तुम्हाला अधिकार प्रदान केला आहे.[१६] जे लोक तुमच्या पैकी ईमान बाळगतील आणि खर्च करतील, त्यांच्या करीता मोठा मोबदला आहे.

آمِنُوا بِاللَّهِ وَرَسُولِهِ وَأَنْفِقُوا مِمَّا جَعَلَكُمْ مُسْتَخْلَفِينَ فِيهِ ۖ
فَالَّذِينَ آمَنُوا مِنْكُمْ وَأَنْفَقُوا لَهُمْ أَجْرٌ كَبِيرٌ ﴿٧﴾

८. तुम्हाला काय झाले आहे की तुम्ही अल्लाह वर ईमान बाळगत नाही, खरे पाहता, पैगंबर तुम्हाला आपल्या पालन कर्त्यावर ईमान बाळगण्याचे आवाहन करीत आहे आणि त्याने तुमच्या कडून वचन घेतलेले आहे, जर तुम्ही ईमान बाळगणारे असाल.[१७]

وَمَا لَكُمْ لَا تُؤْمِنُونَ بِاللَّهِ ۙ وَالرَّسُولُ يَدْعُوكُمْ لِتُؤْمِنُوا بِرَبِّكُمْ
وَقَدْ أَخَذَ مِيثَاقَكُمْ إِنْ كُنْتُمْ مُؤْمِنِينَ ﴿٨﴾

९. तोच होय, जो आपल्या दासांवर स्पष्ट आयती अवतरीत करीत आहे, या साठी की तुम्हाला अंध:कारातून काढून उजेडात आणावे. नि:संशय अल्लाह तुमच्यावर अतिशय स्नेहशील व मेहेरबान आहे. [१८]

هُوَ الَّذِي يُنَزِّلُ عَلَىٰ عَبْدِهِ آيَاتٍ بَيِّنَاتٍ لِيُخْرِجَكُمْ مِنَ
الظُّلُمَاتِ إِلَى النُّورِ ۚ وَإِنَّ اللَّهَ بِكُمْ لَرَءُوفٌ رَحِيمٌ ﴿٩﴾

१०. तुम्हाला काय झाले आहे की अल्लाहच्या मार्गात खर्च करीत नाही, वस्तुत: आकाशांची व जमीनीची मीरास अल्लाह करीताच आहे .[१९] समान नाहीत, तुमच्या पैकी ज्या लोकांनी विजया पूर्वी खर्च केला आणि लढलेत यांचा दर्जा त्या लोकां पेक्षा मोठा आहे जे नंतर खर्च करतील व लढतील. जरी अल्लाह ने दोघांशी ही चांगला वायदा केला आहे.[२०] आणि तुम्ही जे काही करता त्यापासून अल्लाह अनभिज्ञ नाही.

وَمَا لَكُمْ أَلَّا تُنْفِقُوا فِي سَبِيلِ اللَّهِ وَلِلَّهِ مِيرَاثُ السَّمَاوَاتِ
وَالْأَرْضِ ۚ لَا يَسْتَوِي مِنْكُمْ مَنْ أَنْفَقَ مِنْ قَبْلِ الْفَتْحِ وَقَاتَلَ ۚ
أُولَٰئِكَ أَعْظَمُ دَرَجَةً مِنَ الَّذِينَ أَنْفَقُوا مِنْ بَعْدُ وَقَاتَلُوا ۚ
وَكُلًّا وَعَدَ اللَّهُ الْحُسْنَىٰ ۚ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرٌ ﴿١٠﴾

११. कोणी आहे जो अल्लाह ला कर्ज देईल, चांगले कर्ज ? की त्याने याच्या करीता यास कित्येक पटींनी करावे आणि त्याच्या करीता उत्कृष्ट मोबदला आहे.[२१]

مَنْ ذَا الَّذِي يُقْرِضُ اللَّهَ قَرْضًا حَسَنًا
فَيُضَاعِفَهُ لَهُ وَلَهُ أَجْرٌ كَرِيمٌ ﴿١١﴾

१५. हे, कलमा पढणाऱ्या समस्त मुसलमानांना संबोधून आहे की केवळ कलिमा पढणे पर्याप्त नाही, किंबहुना अगदी सच्चा मनाने अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगा. ईमान तेच अधिक विश्वसनीय होय जे मन:पूर्वक बाळगले गेले असावे आणि त्यात शंका-संशय नसावा किंबहुना त्यांच्या सत्यते बद्दल पूर्ण खात्री असावी.

१६. म्हणजे जी धनसंपदा त्याने अनामत म्हणून तुमच्या हवाली केली आहे आणि तुम्हाला शरीअत विषयक मर्यादेचा वापर करण्याचा अधिकार दिला आहे. खर्च करण्याशी अभिप्रेत अल्लाहच्या मार्गात खर्च करणे होय आणि या सूरह मध्ये खर्च करण्याचा जो आदेश दिला गेला आहे जेहाद च्या गरजा लक्षात घेता आहे जेणेकरून कुफ्र व इस्लामच्या ओढाताणीत इस्लामला श्रेष्ठत्व प्राप्त व्हावे.

१७. हे त्या मुसलमानांना संबोधून आहे, ज्यांनी बाह्यत: इस्लाम धर्म स्वीकारला होता परंतु ईमानाचा खऱ्या अर्थाने त्यांच्या मनात शिरकाव झालेला नव्हता. त्यांना ताकीद केली गेली की जेव्हा प्रत्यक्ष रसूल तुम्हाला व्यक्तिश: ईमान बाळगण्याचे आवाहन करीत आहे, तेव्हा काय कारण आहे की तुम्ही सच्चा मनाने ईमान बाळगत नाही? वस्तुत: पैगंबरानी तुमच्या कडून वचन घेतले आहे. वचन या गोष्टीचे की तुम्ही अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञा पालन कराल जेव्हा एखादा मनुष्य कलिमा शहादत चा उच्चार करून इस्लाम मध्ये दाखल होतो तर तो खरे पाहता या गोष्टी चे वचन देतो की अल्लाह व त्याच्या पैगंबरांचे आज्ञापालन करील. सूरह मायदा मध्ये फर्माविले गेले की :-

وَاذْكُرُوْا نِعْمَةَ اللّٰهِ عَلَيْكُمْ وَمِيْثَاقَهُ الَّذِيْ وَاثَقَكُمْ بِهٖ
اِذْ قُلْتُمْ سَمِعْنَا وَاَطَعْنَا ۔ (مائدہ:۷)

'आणि अल्लाहने जी कृपा तुमच्यावर केली आहे तिचे स्मरण राखा आणि त्याच्या त्या वचनाचे ही जे त्याने तुमच्या कडून घेतले आहे जेव्हा तुम्ही म्हणाले होते, आम्ही ऐकले आणि आज्ञा पालन केले.' (मायदा : ७)

यास्तव जर तुम्ही आपल्या ईमान विषयक दाव्यात सच्चे असाल तर त्याच्या निकडींना पूर्ण करा

१८. म्हणजे अल्लाह हे इच्छित नाही की त्याचे दास अज्ञान व इच्छा आकांक्षांच्या अंध:कारात भटकत रहावेत, म्हणून त्याने स्पष्ट आयती (कुरआनाची वचने) अवतरीत करून त्यांना उजेडात आणण्याचा इतमाम केला तो आपल्या दासां करीता प्रेमळ आहे आणि म्हणूनच त्यांना दूष्परिणती पासून वाचवू इच्छितो आणि तो रहीम आहे म्हणून यांनी कृपा पात्र व्हावे असे इच्छितो.

१९. म्हणजे तुम्हाला जी धनसंपदा प्रदान केली गेली आहे ती शेवटी अल्लाहच्याच ताब्यात जाणार आहे. सदैव तुमच्या सोबत राहणार नाही. मग तुम्ही स्वहस्ते अल्लाहच्या मार्गात खर्च का नाही करीत की हा खर्च तुमच्या साठी मोबदला कारक ठरावा.

२०. विजयाशी अभिप्रेत मक्का विजय होय. मक्का विजया पूर्वी परिस्थिती अतिशय बिकट व कसोटीची होती. त्या वेळी इस्लाम च्या यशोशिखरावर जाण्या करीता प्राणवित्तादि अर्पण करण्याची नितांत गरज होती. अशा परिस्थितीत केवळ तेच लोक बलीदाना साठी पुढे सरसावले जे मोठे साहसी व धैर्यवान होते म्हणून त्यांचा दर्जा देखील अल्लाह जवळ उच्च आहे, त्या लोकांच्या तुलनेत जे मक्का विजयानंतर जेव्हा परिस्थिती एवढी प्रतिकूल व बिकट राहणार नाही, प्राणवित्तादि बलीदान प्रस्तुत करतील. दर्जाच्या दृष्टीने तर दोन्ही समान असू शकत नाही परंतु दोघांची ही बलीदाने कदर करण्याजोगी आहेत आणि अल्लाहने चांगल्या मोबदल्याचा वायदा दोघांशीही केलेला आहे.

या आयती वरून हा निष्कर्ष ही निघतो की इस्लामच्या बाबतीत जेव्हा जेव्हा परिस्थिती प्रतिकूल होईल तेव्हा त्याची मान उंचाविण्या करीता आपले धन खर्च करणे व आपले प्राण पणाला लावणे मोठया धैर्याचे काम असेल तेव्हा जे लोक हे धोके पत्करून पुढे जातील, त्यांचा दर्जा निश्चितच उंच होईल त्या लोकांच्या तुलनेत जे सर्वसामान्य परिस्थितीत इस्लाम चा ध्वज उंचाविण्यासाठी धन खर्च करतील व जेहाद करतील.

२१. मूळ शब्द 'कर्जे हसन' यास अभिप्रेत तो खर्च होय जो आपल्या उचित कमाई मधून निव्वळ अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुने केला जावा ना त्यात देखावा असावा आणि ना त्यानंतर उपकार दर्शाविण्याची किंवा त्रास देण्याची एखादी गोष्ट असावी. हा खर्च जेहादच्या उद्दिष्टांना, विशेषत: अपेक्षित आहे. म्हणून याची मागणी हृदयस्पर्शी शैलीत केली गेली आहे आणि अल्लाहच्या कृपेचे हे वैभव होय की तो या खर्चाला स्वत: साठी कर्ज ठरवित आहे ज्याची परतफेड तो आखिरत मध्ये कित्येक पटानी करील आणि फार मोठया मोबदल्याने उपकृत करील.

१२. ज्या दिवशी तुम्ही ईमान बाळगणारे पुरुष आणि ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांना पाहाल की त्यांचे तेज त्यांच्या पुढे व त्यांच्या उजवी कडे धावत असेल.[२२] आज तुमच्या करीता शुभ समाचार आहे जन्नतींचा, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील त्यात सदैव राहाल. हीच मोठी सफलता होय.

يَوْمَ تَرَى الْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَاتِ يَسْعَىٰ نُورُهُم بَيْنَ أَيْدِيهِمْ
وَبِأَيْمَانِهِم بُشْرَاكُمُ الْيَوْمَ جَنَّاتٌ تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ
فِيهَا ۚ ذَٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿١٢﴾

१३. त्या दिवशी दांभिक (मुनाफिक) पुरुष आणि दांभिक स्त्रीया ईमान बाळगणाऱ्यांना म्हणतील, थोडे तरी थांबा की आम्ही तुमच्या प्रकाशापासून लाभ घ्यावा.[२३] त्यांना सांगितले जाईल, मागे फिरा, आणि तिथे प्रकाश शोधा [२४] मग त्यांच्या दरम्यान एक भिंत उभी केली जाईल [२५] ज्यात एक दरवाजा असेल. त्याच्या आतल्या भागात रहमत (अल्लाहची कृपा) असेल आणि त्याच्या बाहेरील भागात अजाब (अल्लाहचा प्रकोप) असेल. [२६]

يَوْمَ يَقُولُ الْمُنَافِقُونَ وَالْمُنَافِقَاتُ لِلَّذِينَ آمَنُوا انظُرُونَا
نَقْتَبِسْ مِن نُّورِكُمْ قِيلَ ارْجِعُوا وَرَاءَكُمْ فَالْتَمِسُوا نُورًا
فَضُرِبَ بَيْنَهُم بِسُورٍ لَّهُ بَابٌ بَاطِنُهُ فِيهِ الرَّحْمَةُ وَظَاهِرُهُ
مِن قِبَلِهِ الْعَذَابُ ﴿١٣﴾

१४. ते यांना हाक मारून म्हणतील, काय आम्ही तुमच्या सोबत नव्हतो? ते उत्तर देतील, होय पण तुम्ही स्वत:ला उपद्रव ग्रस्त केले. [२७] (आमच्या करीता दुष्परिणती ची) प्रतिक्षा करीत राहीले. [२८] संशय ग्रस्त राहीलेत [२९] आणि खोट्या आकांक्षांनी तुम्हाला धोक्यात ठेवले.[३०] येथपावेतो की अल्लाहचा आदेश आला.[३१] आणि या फसव्या (सैताना) ने तुम्हाला अल्लाहच्या बाबतीत धोक्यातच ठेवले.

يُنَادُونَهُمْ أَلَمْ نَكُن مَّعَكُمْ ۖ قَالُوا بَلَىٰ وَلَٰكِنَّكُمْ فَتَنتُمْ أَنفُسَكُمْ
وَتَرَبَّصْتُمْ وَارْتَبْتُمْ وَغَرَّتْكُمُ الْأَمَانِيُّ حَتَّىٰ جَاءَ أَمْرُ اللَّهِ
وَغَرَّكُم بِاللَّهِ الْغَرُورُ ﴿١٤﴾

१५. तेव्हा आज ना तुमच्या कडून (दांभिकां कडून) काही फिदीया (सुटकेसाठी दिले जाणारे द्रव्य) स्वीकारले जाईल. [३३] आणि ना त्या लोकांकडून ज्यांनी कुफ्र केले.[३४] तुमचे ठिकाण जहन्नम होय. तीच तुमची मैत्रीण होय.[३५] आणि ते मोठे वाईट ठिकाण आहे.

فَالْيَوْمَ لَا يُؤْخَذُ مِنكُمْ فِدْيَةٌ وَلَا مِنَ الَّذِينَ كَفَرُوا ۚ مَأْوَاكُمُ
النَّارُ ۖ هِيَ مَوْلَاكُمْ ۖ وَبِئْسَ الْمَصِيرُ ﴿١٥﴾

२२. हे तेज ईमान व सदाचरणाचे असेल. हदीस वचनात नमाज ला तेज या अर्थात घेतले गेले आहे.

الصلوٰة نور۔ (مسلم کتاب الطہارۃ)

'नमाज प्रकाश आहे'

(मुस्लिम किताबुत्तहारत)

हाच तो प्रकाश होय जो कियामतीच्या दिवशी ईमान बाळगणाऱ्यांना जन्नत चा मार्ग दाखविल. हे सद्‌भाग्य ज्या प्रकारे ईमान बाळगणाऱ्या पुरुषांना लाभेल, त्याच प्रमाणे ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांना ही लाभेल.

२३. दांभिक म्हणजे ते लोक होत, जे बाह्यत: मुसलमान तर झाले होते, परंतु आपल्या ईमान संदर्भात प्रामाणिक नव्हते. पुढे आयत क्र. १४ मध्ये याचे स्पष्टीकरण केले गेले आहे. हे लोक ज्याअर्थी मुसलमान समूहात सामील होते म्हणून कियामतीच्या दिवशी ते ईमान बाळगणाऱ्या मागो माग असतील, परंतु ज्याअर्थी त्यांचे जीवन ईमान व सदाचरण विरहीत होते म्हणून कियामतीच्या दिवशी त्यांना या प्रकाशा पासून वंचित राखले जाईल ते स्वत:ला या प्रकाशा पासून वंचित असलेले पाहून ते ईमान बाळगणाऱ्यांना हाक मारून म्हणतील, जरा थांबा की जेणेकरून तुमच्या या प्रकाशाचा आम्हाला ही लाभ व्हावा परंतु त्यांचे काही एक ऐकले जाणार नाही.

२४. म्हणजे ते जग, जे तुम्ही मागे सोडून आलात नूर (तेज) प्राप्तीचे स्थळ होते. आता परतून तुम्ही त्या जगात जाऊ शकत असाल तर जा आणि तिथे हा प्रकाश शोधा. परंतु हे अशक्य प्राय होय. आखिरत मध्ये प्रकाश त्याच माणसा सोबत असेल, जो जगातून ईमान व सदाचरणाचा प्रकाश घेऊन आला असेल.

२५. म्हणजे मोमीन (ईमान धारक) व दांभिक यांच्या दरम्यान एक भिंत उभी केली जाईल अशा प्रकारे दोन्ही समूह वेगळे होतील. या साठी की त्यांनी आपल्या वेगवेगळया मजली प्रत पोहचावे.

२६. या भिंतीच्या दरवाजातून ईमान बाळगणारे आत प्रवेश करतील, तिथे अल्लाहची अपार कृपा असेल अर्थात जन्नत आणि हे द्वार वस्तुत: अल्लाहचे कृपा द्वार असेल.

या दरवाजाच्या बाहेरील बाजूस अजाब (अल्लाहचा प्रकोप) असेल जो दांभिकाना आपल्या विळख्यात घेईल.

२७. ईमान बाळगणऱ्यांना आपल्या प्रकाशासह विभक्त होतांना पाहून दांभिक त्यांना ओरडून म्हणतील की आम्हाला मागे सोडून का जाता? काय जगात आम्ही तुमच्या सोबत नव्हतो? यावर ते उत्तर देतील. जगात तुम्ही आमच्या सोबतीला जरूर होते म्हणजे मुस्लिम समाजात सामील होते परंतु तुम्ही जहन्नम मध्ये जाण्यासारखे वर्तन आंगिकारून स्वत:ला फार मोठया उपद्रवात टाकले. एकीकडे आपण मुसलमान असल्याचा दावा करीत राहिले तर दुसरीकडे काफिरांशी स्नेह संबंध राखत राहीले. उघडपणे ईमान व आतून कुफ्र ही फार वाईट निती जी तुम्ही बाळगली होती.

२८. या प्रतिक्षेत राहिले की केव्हा मुसलमानांवर अशी आपत्ति कोसळते की पुन्हा ते उठू न शकावेत.

يَتَرَبَّصُ بِكُمُ الدَّوَائِرَ عَلَيْهِمْ دَائِرَةُ السَّوْءِ۔ (توبہ:۹۸)

"आणि या गोष्टीची वाट बघत आहे की तुम्ही कोणत्या ना कोणत्या विपत्तित सापडावे (आणि वस्तुस्थिती अशी की) वाईट विपत्तित ते स्वत:च सापडले आहेत."

२९. म्हणजे तुम्हाला ना पैगंबराच्या प्रेषित्वा वर विश्वास होता आणि ना आखिरत वर. या संदर्भात तुम्ही संशय ग्रस्तच राहीलात.

३०. म्हणजे या गोड भ्रमात राहीले की आमची ही पॉलीसी सफल ठरेल आम्ही आपला स्वार्थ अशाच रीतीने साध्य करू शकू. आणि जर आखिरत प्रस्थापित झाली तर मुसलमानांच्या सोबत राहील्या मुळे आम्हाला माफ केले जाईल.

३१. अल्लाहच्या हुकुमा शी अभिप्रेत मृत्यु होय म्हणजे मरेपावेतो तुम्ही दांभिकच राहीलात.

३२. अभिप्रेत सैतान होय जो कुफ्र आणि दुष्कृत्यास प्रवृत्त करतो. आणि प्रलोभन दाखवितो.

३३. म्हणजे जर तुमच्या जवळ जगातील समस्त धन दौलत असेल आणि आपल्या सुटके करीता, ही प्रचंड दौलत तुम्ही दंड म्हणून देऊ इच्छित असाल तरी ती कबूल केली जाणार नाही. जगात जी काही सम्पत्ति तुम्हाला लाभली होती, त्यातला एक हिस्सा अल्लाहच्या मार्गात प्रामाणिक पणे, सच्चे ईमान धारक बनून खर्च केला असता तर आज तुमच्या करीता तो निश्चितच मुक्ति दायक ठरला असता. परंतु आता सुटका नाही.

३४. म्हणजे ज्यांनी उघडपणे कुफ्र केले त्यांच्या कडून ही काहीच दंड म्हणून स्वीकारले जाणार नाही.

३५. म्हणजे या वेळी तुमचा जर कोणी मित्र असेल तर ही जहन्नम च बघा. आता ती कशी तुमचा समाचार घेते.

१६. काय ईमान बाळगणाऱ्यां करीता ती वेळ आलेली नाही की त्यांची हृदये अल्लाहचे नाम:स्मरण आणि त्याने अवतरीत केलेल्या सत्या पुढे झुकावीत.[३६] आणि त्यांनी त्या लोकांसमान होऊ नये, ज्यांना या पूर्वी ग्रंथ दिला गेला होता, मग त्यांच्यावर दीर्घ मुदत लोटली तेव्हा त्यांची हृदये कठोर झालीत आणि यांच्या पैकी बहुतेक दुराचारी आहेत.[३७]

الم يان للذين امنوا ان تخشع قلوبهم لذكر الله وما نزل
من الحق ولا يكونوا كالذين اوتوا الكتب من قبل فطال
عليهم الامد فقست قلوبهم وكثير منهم فسقون ﴿١٦﴾

१७. जाणून असा की अल्लाह जमीनीला ती मृत झाल्या नंतर जिवीत करतो [३८] आम्ही निशाण्या तुमच्या साठी स्पष्ट केल्या आहेत. या साठी की तुम्ही बुद्धीचा वापर करावा.

اعلموا ان الله يحي الارض بعد موتها قد بينا لكم الايت
لعلكم تعقلون ﴿١٧﴾

१८. नि:संशय दान देणारे पुरूष व स्त्रीया आणि ते लोक ज्यांनी अल्लाह ला चांगले कर्ज दिले, त्यांना कित्येक पटींनी दिले जाईल.[३९] आणि त्यांच्या करीता उत्कृष्ट मोबदला आहे.

ان المصدقين والمصدقت واقرضوا الله قرضا حسنا يضعف
لهم ولهم اجر كريم ﴿١٨﴾

१९. आणि ज्या लोकांनी अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगले, तेच आपल्या पालन कर्त्या जवळ सच्चे आणि साक्षी आहेत.[४०] त्यांच्या करीता त्यांच्या मोबदला ही असेल आणि तेज देखील. आणि ज्या लोकांनी कुफ्र केले आणि आमच्या आयतींना खोटे ठरविले, ते जहन्नमी होत.

والذين امنوا بالله ورسله اولئك هم الصديقون
والشهداء عند ربهم لهم اجرهم ونورهم والذين كفروا
وكذبوا بايتنا اولئك اصحب الجحيم ﴿١٩﴾

२०. जाणून असाकी ऐहिक जीवन खेळ, आणि निरर्थक शोभा, एकमेकां वर अभिमान बाळगणे आणि सम्पत्ति व संतती मध्ये एक मेकाहून वरचढ होण्याची अभिलाषा आहे.[४१] याचे उदाहरण असे आहे जणू पाऊस,ज्याच्या वनस्पतींना पाहून काफिर आनंदित होतात; मग ती डोलू लागते आणि तुम्ही पाहता की ती पिवळी झाली आहे. मग ती चूर चूर होऊन जाते.[४२] आणि आखिरत मध्ये सक्त अजाब (अल्लाहची शिक्षा) ही आहे आणि अल्लाह तर्फे माफी व प्रसन्नता देखील [४३] आणि हे ऐहिक जीवन तर फक्त धोक्याची सामुग्री आहे.

اعلموا انما الحيوة الدنيا لعب ولهو وزينة وتفاخر بينكم
وتكاثر في الاموال والاولاد كمثل غيث اعجب الكفار
نباته ثم يهيج فتره مصفرا ثم يكون حطاما وفي الاخرة
عذاب شديد ومغفرة من الله ورضوان
وما الحيوة الدنيا الا متاع الغرور ﴿٢٠﴾

३६. हे त्या ईमान धारकांना सबोधून आहे, ज्यांची मने नम्रता रहित होती. विनम्रता मनाची ती अवस्था होय जी अल्लाहची महानता व त्याच्या समोर उत्तरदायित्वाच्या कल्पनेने निर्माण होते. जो पाया आहे अल्लाहशी दास्यत्व भाव बाळगण्याचा, त्याच्या पुढे नत मस्तक होण्याचा. प्रामाणिक व सचोटी पूर्ण ईमान चा हा गाभा होय. या आयतीत त्या लोकांना ज्यांचे ईमान केवळ तोंडी जमाखर्चाच्या मर्यादे प्रत होते. आणि ज्यांच्या मनात ते रुजले नव्हते, त्यांची कान उघाडणी केली गेली आहे की काय इस्लाम व कुफ्रच्या या दीर्घ संघर्षात जो कित्येक वर्षांपासून चालत आला आहे आणि ज्याच्या कालखंडात ते ईमान धारकांची अत्याचार पिडीतता ही बघत राहीले आणि इस्लामची वास्तविकता आणि पैगंबराच्या सत्यतेच्या निशाण्यां ना अजून यांची मने पाझरत नाहीत आणि अल्लाहचे स्मरण करून झुकत नाही आणि कुरआनाच्या रूपाने अवतरलेल्या सत्यास पाहून त्यांच्या अंगी त्याच्या संबंधी जाब देण्याची जाणीव निर्माण होत नाही आणि त्याच्या करीता नम्रता व शालीनतेची कैफीयत यांच्या ठायी निर्माण होत नाही!

३७. ईश-ग्रंथ बाळगणाऱ्यांवर जेव्हा ग्रंथ अवतरल्या नंतर व पैगंबर निघून गेल्यानंतर एक दीर्घ मुदत लोटली तेव्हा त्यांचा संबंध ईश-ग्रंथा शी दुरावत गेला, परिणामी मनातली विनम्रता लोप पावली आणि विनम्रता लोपल्या नंतर मने कठोर झालीत मग त्यांचे जीवन दुराचारात लिप्त झाले. या ठिकाणी त्यांच्या या अवस्थे पासून बोध घडविला गेला आहे. हेतु हे स्पष्ट करण्याचा आहे की अजून कुरआन अवतरीत होत आहे आणि अल्लाहचा पैगंबर तुमच्या दरम्यान आहे, तेव्हा तुमची दशा त्या ईमान बाळगणाऱ्यां समान होता कामा नये.

आजच्या काळातील मुसलमानांची दशा देखील एक अल्पसे प्रमाण वगळता, तशीच आहे, जशी ग्रंथ बाळगणाऱ्यांची सांगितली गेली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना या जगाचा निरोप घ्यायला चौदा शतके लोटली आहेत. या दीर्घ मुदतीत त्यांचा ईश ग्रंथ शी (अर्थात कुरआनाशी) असलेला संबंध कमकुवत होत गेला. ज्याचे फार मोठे कारण म्हणजे धर्माशी असंबंधित बाबीं मध्ये त्याचे स्वारस्य राखणे होय आणि वास्ता व वशील्याच्या खोट्या कल्पनेने त्यांना मोकळे रान सोडले आहे. यास्तव आपल्या मुक्तिच्या संदर्भात ते मोठया गोड भ्रमात आहेत. वास्तविक त्यांचे जीवन उघडपणे दुराचाराचे आहे. त्याच्यावर उपदेशाचा परिणाम अशासाठी होत नाही की दुराचारात सदैव गुरफटून राहील्यामुळे त्यांची मने अगदी कठोर झाली आहेत.

३८. हे मेल्यानंतर पुनश्च जिवित होऊन उठण्या संबंधीचे प्रमाण आहे, ज्याबाबत दांभिक संशय ग्रस्त होते. आणि या गोष्टीकडे संकेत ही की मृत मनांना ही अल्लाह नवजीवन प्राप्त करू शकतो आणि ती मार्गदर्शनाचा लाभ प्राप्त करू शकतात. या अटीवर की त्यांनी अल्लाहच्या निशाण्यांवर विचार चिंतन करावे. ज्यापैकी एक फार मोठी निशाणी म्हणजे जमीनीचे मृत म्हणजे अगदी कोरडी झाल्यानंतर जिवित होणे अर्थात ताजे टवटवीत होणे.

३९. दान शी अभिप्रेत सर्वसामान्यत: दिले जाणारे दान होय आणि कर्ज हसन शी अभिप्रेत तो खर्च होय जो इस्लामच्या युद्ध विषयक गरजा भागविण्या साठी केला जात; व ज्यात देखावा करण्याचा हेतु नसावा कारण हा खर्च उद्‌भवलेल्या गरजाच्या पोटी मागणी स्वरूपात होता म्हणून याला कर्ज या अर्थाने घेतले गेले आहे. ज्याला कित्येक पटींनी वाढवून आखिरत मध्ये परत केले जाईल असा वायदा अल्लाहने केलेला आहे. अशा प्रकारे दान करणाऱ्यांनाही अल्लाह वाढवून देईल.

४०. म्हणजे अल्लाहजवळ सत्यवचनी व साक्षी चा दर्जा प्राप्त करणारे प्रामाणिक ईमान धारकच असतील. आपल्या मनात कुफ्र लपवून उघडपणे मुसलमान गणले जाणारे नामधारी मुसलमान कोणताही दर्जा प्राप्त करू शकणार नाहीत, आयती-चा हा आशय तिचे शेवटचे वाक्य स्पष्ट करीत आहे. ज्यात कुफ्र करणाऱ्यांचे स्थान जहन्नम दाखविले गेले आहे. मूळ शब्द सिद्दिक म्हणजे अतिशय सच्चा, सत्य भाषी, सत्यप्रिय, मूळ शब्द शहीद म्हणजे साक्षी. अभिप्रेत इस्लामच्या सत्यते ची साक्ष देणारा होय. सूरह बकरा मध्ये फर्माविले गेले-

وَكَذٰلِكَ جَعَلْنٰكُمْ اُمَّةً وَّسَطًا لِّتَكُوْنُوْا شُهَدَآءَ عَلَى النَّاسِ۔ (بقرہ:۱۴۳)

"अशा प्रकारे आम्ही तुम्हाला उत्कृष्ट जन समूह बनविले, या साठी की तुम्ही लोकांवर साक्षी रहावे." (बकरा - १४३)

या अर्थाने सत्य धर्माची साक्ष देणारा प्रत्येक ईमान बाळगणारा शहीद (साक्षी) आहे. आणि शहादत चे उच्च स्थान ते होय ज्याला एक सच्चा मुसलमान अल्लाहच्या मार्गात आपला प्राण अर्पण करुन प्राप्त करतो.

४१. या आयतीत ऐहिक जीवनाला, जेव्हा तिला आखिरत च्या यशाचे साधन बनविले जावे, निरर्थक ठरविले गेले आहे. जे लोक ऐहिकतेस आपले ध्येय उद्दिष्ट बनवितात त्यांचे जीवन निव्वळ खेळ तमाशा बनून राहते. ते जगाला केवळ हिंडण्या फिरण्याचे ठिकाण समजतात; आणि सहली चे सामान प्राप्त करण्यातच मग्न राहतात.

मूळ शब्द **"लअीब"** अर्थात खेळ जो केवळ मनोरंजना

साठी असतो.

मूळ शब्द **''लाह्व''** म्हणजे मूळ हेतु पासून गाफील करणारी गोष्ट. जगातली ती समस्त व्यस्तता जी आखिरत पासून गाफिल करणारी असावी, मग ती सुख विलास करीता असो किंवा प्रतिष्ठा व पद प्राप्ती साठी असो किंवा जनसमूहाला ऐहिक वादात व्यस्त ठेवण्या साठी असो.

**''ज़ीनत''** शोभेशी अभिप्रेत जगाची बाह्यत:दिसणारी चकाकी व मनमोहकता होय. ज्याची अभिरूची माणसाला अपराधी बनविते आणि जिच्यासाठी केलेले प्रयत्न इच्छा अभिलाषेचा गुलाम बनवितात.

**''तफ़ाख्खुर''** एकमेकांवर अभिमान बाळगणे. अभिमान हा की मनुष्याने गोत्र वंश, धन सम्पत्ति आणि पद प्रतिष्ठा इत्यादिंच्या आधारे आपला मोठेपणा इतरांना दाखवून द्यावा. एक कलाकार आपल्या कलेतील नैपुण्यावर, एक कवी आपल्या प्रोत्साहन मिळणाऱ्या कवितां वर, एक पत्रकार, आपल्या पत्रकारीतेच्या गुणवैशिष्टयांवर, एक लेखक आपल्या योग्यतेवर आणि एक राजकारणी आपल्या डाव पेच युक्त राजकारणावर अभिमान बाळगतो आणि हा विचार करीत नाही की आपल्या मोठेपणाचा हा देखावा त्याला शोभत नाही. देणग्या आणि अंगी असलेली योग्यता सर्व अल्लाहने च प्रदान केलेल्या गोष्टी होत. आणि कसोटी ची साधने म्हणून आहेत म्हणून यांच्या संबंधाने आपल्या जबाबदारींची जाणीव निर्माण झाली पाहिजे. आपल्या स्वत:च्या मोठेपणाची नव्हे.

**''तकासुर''** एकमेकाहून सम्पत्ति संतती त वरचढ होण्याची इच्छा म्हणजे तो अधाशी पणा होय जो ऐहिक गरजां करीता जास्तीत जास्त, धन कमविण्यास माणसाला प्रवृत करतो. आणि त्या काळात जेव्हा संततीची विपुलता एक सामर्थ्य व जथ्थाचे काम करीत असे एक ध्येय बनत असे. आणि हा हेतु लक्षात घेता पुरुष अनेक स्त्रीयांशी विवाह ही करीत असे. परंतु आजच्या काळात स्वार्थी मनुष्य हे इच्छितो की त्याला कमीत कमी संतती असावी.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तकासुर टीप क्र.१

४२. म्हणजे ऐहिक जीवनाची सजावट व शोभा, जिच्यावर लोक खुश होतात, अशी आहे जणू शेती ची सजावट पाऊस पडल्यावर हिरवळीचा बहर येतो । परंतु हा बहर काही दिवसांचाच असतो. यानंतर तो चूर चूर होतो. यास्तव ही बुद्धिमानता नव्हे की माणसाने ऐहिक जीवनाच्या वरवर दिसणाऱ्या चकाकीने इतके प्रभावित व्हावे की यानंतर आपल्या पुढयात काय येईल, त्याला अगदी दृष्टीआड करावे. हे उदाहरण इतर ठिकाणी ही दिले गेले आहे. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कहफ टीप क्र.६३

स्पष्ट असावे की ऐहिक जीवनाचे व्यर्थ व निरर्थक असणे या पैलू ने होय की त्यास आखिरतवर प्राधान्य दिले जावे; व आपले ध्येय उदिष्ट बनविले जावे. कुरआनात या पैलू ने ऐहिक जीवनाची निर्भत्सना केली गेली आहे. यास्तव सूरह इब्राहीम आयत क्र. ३ मध्ये फर्माविले गेले की :-

اَلَّذِیۡنَ یَسۡتَحِبُّوۡنَ الۡحَیٰوۃَ الدُّنۡیَا عَلَی الۡاٰخِرَۃِ۔

'जे आखिरत च्या तुलनेत ऐहिक जीवनास पसंत करतात.'

आणि सूरह 'आला' आयत क्र. १६ मध्ये फर्माविले गेले -:

بَلۡ تُؤۡثِرُوۡنَ الۡحَیٰوۃَ الدُّنۡیَا۔

'परंतु तुम्ही ऐहिक जीवना ला प्राधान्य देता'

आणि सूरह नजम आयत क्र. २९ मध्ये स्पष्ट सांगितले आहे की काफिर ऐहिक जीवनालाच आपले ध्येय उद्दिष्ट बनवितात.

وَلَمۡ یُرِدۡ اِلَّا الۡحَیٰوۃَ الدُّنۡیَا۔

'आणि त्याने ऐहिक जीवनालाच ध्येय उद्दिष्ट बनविले'

परंतु या उलट जे लोक ऐहिक जीवनाला आखिरतच्या यशाचे साधन बनवितात व शरीअत च्या मर्यादेत राहून जीवन व्यतीत करतात, त्यांचे ऐहिक जीवन अतिशय गांभीर्य पूर्ण असते खेळ तमाशा नव्ह आणि ते या परिक्षा स्थळातून 'यशस्वी' झाल्याचे प्रमाण पत्र घेऊन बाहेर पडतात.

४३. म्हणजे आखिरत मध्ये दोन प्रकारची परिणति दिसून येईल एक महाभयंकर अजाब म्हणजे जहन्नम ची शिक्षा जी त्या लोकांना निरंतर भोगावी लागेल ज्यांनी ऐहिक जीवनाला आपले ध्येय उद्दिष्ट बनविले होते व जे आखिरतचा इन्कार करणारे होते.

दुसरी परिणति अल्लाह तर्फे दिले जाणारे क्षमादान व त्याच्या प्रसन्नतेच्या स्वरुपात दिसून येईल. ही त्या लोकांची परिणति असेल, ज्यांनी जगाला एक कसोटी स्थान समजून आखिरत च्या यशाला आपले जीवन ध्येय ठरविले होते.

अल्लाहच्या प्रसन्नतेची अभिव्यक्ति जन्नत होय. जसे नंतरच्या आयती वरून स्पष्ट आहे.

*एकमेकाहून पुढे जा आपल्या पालन कर्त्याची क्षमा व त्या जन्नत कडे, जिचा विस्तार आकाश व जमीनी च्या विस्तारा समान आहे. ती अशा लोकांसाठी तयार केली गेली आहे. जे अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान राखतात. ही अल्लाहची कृपा होय, ज्याला इच्छितो प्रदान करतो आणि अल्लाह मोठा कृपावंत आहे. कोणती ही आपत्ति जमीनीवर अवतरत नाही आणि ना तुमच्या आत्म्यास पोहचते, परंतु हे की ती एका ग्रंथात लिहीलेली आहे, या आधी की आम्ही तिला निर्माण करावे. हे अल्लाह करीता अतिशय सोपे आहे. (अल-कुर्आन)*

२१. एकमेकाहून पुढे जा आपल्या पालन कर्त्याची क्षमा व त्या जन्नत कडे, जिचा विस्तार आकाश व जमीनी च्या विस्तारा समान आहे.[४४] ती अशा लोकांसाठी तयार केली गेली आहे.[४५] जे अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान राखतात.[४६] ही अल्लाहची कृपा होय, ज्याला इच्छितो प्रदान करतो आणि अल्लाह मोठा कृपावंत आहे.

سابقوا إلى مغفرة من ربكم وجنة عرضها كعرض السماء و
الأرض أعدت للذين آمنوا بالله ورسله ذلك فضل الله
يؤتيه من يشاء والله ذو الفضل العظيم ﴿٢١﴾

२२. कोणती ही आपत्ति जमीनीवर अवतरत नाही आणि ना तुमच्या आत्म्यास पोहचते, परंतु हे की ती एका ग्रंथात लिहीलेली आहे, या आधी की आम्ही तिला निर्माण करावे.[४७] हे अल्लाह करीता अतिशय सोपे आहे.[४८]

ما أصاب من مصيبة في الأرض ولا في أنفسكم إلا في كتاب من
قبل أن نبرأها إن ذلك على الله يسير ﴿٢٢﴾

२३. (या हकीगती पासून तुम्हाला सचेत केले गेले आहे) अशा साठी की तुम्ही त्या गोष्टी बद्दल दुःख करू नका जी तुमच्या पासून विभक्त व्हावी आणि त्या गोष्टी बद्दल वृथाभिमान बाळगू नका जी तुम्हाला प्रदान केली जावी. [४९] अल्लाह शेफारून जाणाऱ्यांना व अभिमान बाळगणाऱ्यांना पसंत करीत नाही. [५०]

لكيلا تأسوا على ما فاتكم ولا تفرحوا بما آتاكم والله لا يحب كل
مختال فخور ﴿٢٣﴾

२४. जे कृपणता करतात आणि इतरांना कृपणता करण्यास सांगतात [५१] (या उपदेशा पासून) जो तोंड फिरविल, तर (त्याने लक्षात असू द्यावे की) अल्लाह निःस्पृह आणि गुणविशेषांनी युक्त आहे.

الذين يبخلون ويأمرون الناس بالبخل ومن يتول فإن
الله هو الغني الحميد ﴿٢٤﴾

२५. आम्ही आपल्या पैगंबरांना स्पष्ट निशाण्यां सह पाठविले आणि त्यांच्या सोबत ग्रंथ [५४] व तुला [५५] (तराजू) अवतरीत केला अशा साठी की लोकांनी न्यायावर कायम रहावे [५६] आणि लोखंड अवतरीत केले ज्यात जबरदस्त भयानकता आहे आणि लोकां करीता इतर फायदे ही [५७] हे सर्व अशासाठी केले गेले आहे की अल्लाह ला कळून यावे की कोण त्याला न पाहता त्याचे व त्याच्या पैगंबराचे सहाय्य करतो.[५८] निःसंशय अल्लाह अति सामर्थ्यवान व वर्चस्वशाली आहे.[५९]

لقد أرسلنا رسلنا بالبينات وأنزلنا معهم الكتاب
والميزان ليقوم الناس بالقسط وأنزلنا الحديد
فيه بأس شديد ومنافع للناس وليعلم الله من ينصره
ورسله بالغيب إن الله قوي عزيز ﴿٢٥﴾

४४. म्हणजे ऐहिक धनाच्या प्राप्ती करीता एकमेकात चढाओढ करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा अल्लाहची माफी आणि जन्नत प्राप्त करण्या साठी एकमेकावर मात द्या कारण खरी गोष्ट अल्लाहच्या अजाब पासून स्वत:ला सुरक्षित ठेवणे आणि जन्नत मध्ये दाखल होणे ही आहे.

जन्नतच्या विस्तारा शी अभिप्रेत तिचे परिक्षेत्र होय जे आकाश व जमीनीच्या परिक्षेत्रा प्रमाणे असेल. अर्थात जन्नत काही मर्यादित ठिकाण नसेल किंबहुना एक विशाल विश्व असेल जिथे ईमान बाळगणारे सहजगत्या संचार करु शकतील आणि अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या कृपेची दृश्ये त्यांना प्रत्येक ठिकाणी आढळतील जे त्यांच्या करीता आनंद दायक, नेत्रांना सुख कारक ठरतील.

४५. कुरआन असे सांगत नाही की जन्नत तयार केली जाईल किंबहुना असे सांगतो की जन्नत तयार केली गेली आहे, ज्यावरुन तिच्या अस्तित्वाची खात्री पटते.

४६. म्हणजे ही जन्नत ईमान बाळगणाऱ्यांच्याच हिश्श्यात येईल. काफिरांना याचा गंध ही लाभणार नाही.

४७. जमीनीवर आपत्ति अवतरीत होण्याची उदाहरणे अवर्षण, महापूर, विनाशकारी वादळ वगैरे होत आणि जीवा ला आपत्ति पोहचण्याचे उदाहरण व्याधी, शारीरिक व मानसिक क्लेश यातना आणि मृत्यु होय.

या आयतीत आपत्तिच्या संदर्भात अतिशय महत्वपूर्ण गोष्ट सांगितली गेली आहे आणि ती अशी की संकट तेच पोहचते जे आधी लिहून दिले गेले आहे म्हणजे अगदी अल्लाहच्या योजने नुसार यास्तव एखादे संकट अल्यावर एखाद्याने असे समजू नये की हे संकट अकस्मात आले आहे आणि या पासून बचाव करणे माझ्या अवाक्यात होते.

जो मनुष्य आपत्ति बाबत खात्री बाळगतो तो आपल्या धार्मिक जबाबदाऱ्या पार पाडण्यात संकटाना घाबरणार नाही आणि जेहाद करीता आपल्या प्राणाची बाजी लावण्यात संकोच करणार नाही.

४८. म्हणजे समस्त संकटांना आधीपासूनच लिखित स्वरुपात ठेवणे अल्लाह करीता काहीच कठीण नव्हते. ज्याच्या केवळ इशाऱ्यावर संकट अवतरीत होते, त्याच्या साठी हे कोणते कठीण काम आहे की या बाबत आधीच योजना आखून त्यांना ग्रंथ बद्ध केले जावे.

४९. म्हणजे त्या वास्तविकतेशी जी संकटाच्या संबंधाने निवेदिली गेली आहे यास्तव सचेत केले गेले आहे की संकट आल्यावर तुम्ही दु:ख व्यक्त करु न लागावे की हे टाळले जाऊ शकत होते आणि एखादी ईश देणगी लाभल्यावर हर्षातिरेकाने उडया मारु लागावे की हे आमच्या स्वत:च्या योग्यतेचे फळ आहे, किंबहुना संकटात धैर्यशील व ईश देणगी लाभल्यावर कृतज्ञशील होऊन रहावे कारण सर्व काही अल्लाह तर्फे आहे. अल्लाह वरील हा भरवसाच माणसाच्या अंगी धैर्य निर्माण करतो. आणि त्याला आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास प्रवृत्त करतो.

एखादे संकट आल्यावर माणसाला स्वाभाविकपणे दु:ख होते.परंतु जर तो याची तक्रार करीत नाही आणि धैर्य बाळगून राहतो तर केवळ हे दु:ख होण्यास काही हरकत नाही.

अशा प्रकारे एखादी ईश देणगी लाभल्यानंतर माणसाला स्वभाविक पणे आनंद होतो; परंतु जर हा आनंद घमेंड बनू लागतो तर तो निंदनीय होय.

५०. याचे स्पष्टीकरण सूरह लूकमान टीप क्र. २९ व ३० मध्ये केले गेले आहे.

५१. डिंग मारणे व घमेंड करणे संकुचित बुद्धी निर्माण करते असा मनुष्य ना इतरांचे हक्क अदा करतो आणि ना त्याला या बाबत खरी सहानुभूति असते. तो धनसंचय करुन ठेवतो या साठी की त्याला इतरांवर श्रेष्ठत्व लाभावे व त्याला आपल्या धनसंम्पत्तीचा अभिमान बाळगता यावा.

५२. म्हणजे या ईश देणगीत तुमचा स्वत:चा फायदा आहे. अन्यथा अल्लाहला तुमच्या कोणत्याही गोष्टीची गरज नाही आणि तुम्ही त्याच्याशी कृतज्ञता व्यक्त करा अथवा करु नका तो उत्कृष्ट गुणवैशिष्टयांनी यूक्त व प्रशंसनीय आहे.

५३. अर्थात अशा निशाण्या ज्या द्वारे स्पष्ट होत होय की ते अल्लाहचे रसूल (पैगंबर) आहेत. या निशाण्या त्यांचे जीवन व त्यांच्या शिकवणीत ही होत्या; आणि त्या चमत्कारां मध्ये ही जे त्यांना दिले होते.

५४. आकाशातून अवतरलेला ग्रंथ जो मार्गदर्शना चे साधन होता ग्रंथ हा शब्द एकवचनी आहे जो वस्तू म्हणून वापरला गेला आहे अभिप्रेत समस्त ईश ग्रंथ होत.

५५. तुला (तराजू) म्हणजे शरीअत जो व्यक्तिगत व सामूहीक जीवनात न्याय स्थापनेचे साधन आहे व ज्यामुळे आचरणात संतुलन निर्माण होते. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह रहमान टीप क्र.८

५६. न्यायावर कायम राहण्याचा अर्थ न्याय व सदाचाराचा मार्ग अंगिकारणे होय. मनुष्याने आपल्या श्रद्धा व कर्मात ही हाच मार्ग पत्करावा आणि इतरांशी व्यवहार करण्यात ही.

या आयती वरुन सामूहीक जीवनात न्याय प्रस्थापित करण्याची महत्ता स्पष्ट होते की हे पैगंबरांना अल्लाहतर्फे पाठविले जाण्याच्या उद्देश्या पैकी आहे आणि यावरुन ही गोष्ट ही स्पष्ट होते की इस्लाम मानव समाजा करीता न्यायपूर्ण व्यवस्था प्रस्थापित करण्याचे आवाहन करतो जो अल्लाहच्या

शरीअतीस कायम केल्या खेरीज शक्य नाही. शासन, राजकारण, आर्थिक व न्याय सर्वांना अल्लाहच्या न्यायविषयक नियमाचे पालन केले पाहीजे ही गोष्ट इस्लामच्या सामूहीक पैलूस ही प्रकट करते आणि त्याच्या व्यापक धार्मिक कल्पनेस ही.

५७. 'लोखंड अवतरीत केले' लोखंड निर्माण करण्याच्या अर्थाने आहे ज्या प्रकारे चतुष्पाद प्राण्यांच्या बाबत फर्मावीले गेले आहे की 'आम्ही चतुष्पाद अवतरीत केले' हे निर्माण करण्याच्या अर्थाने आहे. निर्माण करण्यास अवतरीत करण्याच्या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की माणसात ही जाणीव निर्माण व्हावी की लोखंड अल्लाहच्या आदेशाने निर्माण झाले आहे आणि त्याला प्रदान केल्या मुळे माणसाला ही देणगी लाभली.

लोखंडात जबरदस्त भयानकता असण्याचा **بأس شديد** अर्थ असा की यात ते सामर्थ आहे जे युद्धविषयक उद्देश्यां करीता आवश्यक होते. या पासून तरवार, तोफ आणि टँक सारखी आयुधे तयार केली जाऊ शकतात, जे शत्रूला भयभीत करणारे व त्याची ताकत घटविणारे आहेत. अशा प्रकारे अपराध्यांना शिक्षा देण्या करीता ही अशा वेळी वापरले जाऊ शकते. या खेरीज लोखंड सर्व सामान्यांच्या फायद्याची वस्तू आहे. यास्तव सनद व व्यापार उदीमात याचा वापर सार्वजिक आहे.

५८. म्हणजे अल्लाहने लोखंड, ज्यापासून युध्दविषयक असे निर्माण केली जातात, अशासाठी उपलब्ध करुन दिले आहे की त्याने हे जाणून घ्यावे की कोण आहे जो याचा सत्य उद्दिष्टा करीता वापर करतो, अर्थात अल्लाहचा कलिमा (वचन) उंचाविण्यात व त्याच्या पैगंबरांच्या समर्थनार्थ व त्यांचे सहाय्य करण्यात. तात्पर्य या युद्ध विषयक सामर्थ्याचा मूळ वापर अल्लाहकरीता केले जाणारे युद्ध व प्रयत्न होते. ज्याद्वारे न्याय व्यवस्था कायम होते.

५९. या गुण वैशिष्टयांना निवेदिण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की अल्लाह तुमच्या मदतीचा मुकेला नाही. तो या गोष्टीची संधी देत आहे की त्याच्या धर्माचे समर्थन व मदत करुन व त्याला वर्चस्वशाली करण्या साठी शक्तिचा वापर करुन त्याची प्रसन्नता प्राप्त करा हीच खरी सफलता आहे.

*आम्ही नूह आणि इब्राहीम ला पैगंबर बनवून पाठविले आणि या दोघांच्या वंशा मध्ये प्रेषित्व आणि ग्रंथ राखले तेव्हा यांच्या पैकी काही लोकांनी मार्गदर्शन पत्करले आणि बहुतेक दुराचारी झाले. (अल-कुर्आन)*

२६. आम्ही नूह आणि इब्राहीम ला पैगंबर बनवून पाठविले आणि या दोघांच्या वंशा मध्ये प्रेषित्व आणि ग्रंथ राखले [६०] तेव्हा यांच्या पैकी काही लोकांनी मार्गदर्शन पत्करले आणि बहुतेक दुराचारी झाले. [६१]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا نُوحًا وَإِبْرٰهِيمَ وَجَعَلْنَا فِي ذُرِّيَّتِهِمَا النُّبُوَّةَ
وَالْكِتٰبَ فَمِنْهُمْ مُّهْتَدٍ ۚ وَكَثِيرٌ مِّنْهُمْ فٰسِقُونَ ﴿٢٦﴾

२७. मग आम्ही त्यांच्या पाऊल खुणांवर आणखी पैगंबर पाठविले आणि मग मरीयम पुत्र ईसा (येशू) ला पाठविले आणि त्याला इंजील (गोसपल) प्रदान केले. [६२] आणि ज्या लोकांनी याचे अनुसरण केले त्यांच्या हृदयांत नम्रत: व दया टाकली.[६३]आणि वैराग्याचा (रहबानियतचा) नवा मार्ग (बिदअत) त्यांनी स्वत: काढला आम्ही त्यांच्यावर अनिवार्य केला नव्हता परंतु अल्लाहच्या प्रसन्नतेच्या इच्छेने त्यांनी हा नवा मार्ग काढला मग त्याचे [६४] कर्तव्य पूर्ण करू शकले नाही जसा की कर्तव्य पूर्ण करण्याचा हक्क होता, तेव्हा यांच्या पैकी ज्या लोकांनी ईमान बाळगले होते त्यांचा मोबदला आम्ही,त्यांना प्रदान केला [६५] परंतु यांच्यात अधिकांश लोक दुराचारी आहेत.[६६]

ثُمَّ قَفَّيْنَا عَلٰٓى اٰثَارِهِمْ بِرُسُلِنَا وَقَفَّيْنَا بِعِيسَى ابْنِ مَرْيَمَ وَاٰتَيْنٰهُ
الْإِنْجِيلَ ۙ وَجَعَلْنَا فِي قُلُوبِ الَّذِينَ اتَّبَعُوهُ رَأْفَةً وَّرَحْمَةً ۚ
وَرَهْبَانِيَّةَ ابْتَدَعُوهَا مَا كَتَبْنٰهَا عَلَيْهِمْ إِلَّا ابْتِغَآءَ رِضْوَانِ
اللّٰهِ فَمَا رَعَوْهَا حَقَّ رِعَايَتِهَا ۚ فَاٰتَيْنَا الَّذِينَ اٰمَنُوا مِنْهُمْ
أَجْرَهُمْ ۚ وَكَثِيرٌ مِّنْهُمْ فٰسِقُونَ ﴿٢٧﴾

२८. हे ईमान बाळगणाऱ्या लोकांनो ! अल्लाह चे भय बाळगा आणि त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगा.[६७] तो तुम्हाला आपल्या कृपे मधून दोन हिस्से देईल [६८] आणि तुम्हाला नूर (तेज) प्रदान करील ज्यासह तुम्ही चालाल आणि तुम्हाला माफ करील. अल्लाह मोठा माफ करणारा अतिशय दयाळू आहे.

يٰٓأَيُّهَا الَّذِينَ اٰمَنُوا اتَّقُوا اللّٰهَ وَاٰمِنُوا بِرَسُولِهٖ يُؤْتِكُمْ
كِفْلَيْنِ مِنْ رَّحْمَتِهٖ وَيَجْعَلْ لَّكُمْ نُورًا
تَمْشُونَ بِهٖ وَيَغْفِرْ لَكُمْ ۚ وَاللّٰهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٢٨﴾

२९. या साठी नव्हे [६९] ग्रंथ धारकांनी जाणून घ्यावे की ते अल्लाहच्या कृपेवर कोणताही अधिकार बाळगत नाही आणि हे की कृपा अल्लाहच्या च हाती आहे. ज्याला इच्छितो प्रदान करतो [७०] आणि अल्लाह मोठी कृपा बाळगणारा आहे.

لِئَلَّا يَعْلَمَ أَهْلُ الْكِتٰبِ أَلَّا يَقْدِرُونَ عَلٰى شَيْءٍ مِّنْ فَضْلِ اللّٰهِ
وَأَنَّ الْفَضْلَ بِيَدِ اللّٰهِ يُؤْتِيهِ مَنْ يَّشَآءُ ۚ وَاللّٰهُ ذُو الْفَضْلِ
الْعَظِيمِ ﴿٢٩﴾

६०. म्हणजे या प्रेषित्व-क्रमात हजरत नूह व हजरत इब्राहीम विशेषत्वाने उल्लेखण्या जोगे आहेत की यांच्या वंशात पैगंबर ही पाठविले गेले व अल्लाहचे ग्रंथ ही अवतरीत केले गेले. ही आयत हे स्पष्ट करते की प्रेषित्व व ईश ग्रंथाचा क्रम या दोन पैगंबरांच्या वंशात राहीला. यास्तव हजरत हूद, हजरत सालेह, हजरत इब्राहीम व हजरत लूत हे सर्व हजरत नूह च्या वंशापैकी होते. मग हजरत इब्राहीम यांच्या वंशाला हा सन्मान प्रदान केला गेला की त्यांच्या वंशाच्या दोन शाखा झाल्या. एक बनी इस्राईल ज्यात अनेक पैगंबर पाठविले गेले आणि तौरात, जबूर व ईंजील हे ग्रंथ ही त्यांच्यात अवतरले, दुसरी बनी इस्माईल, ज्यात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अंतिम प्रेषित या नात्याने पाठविले गेले आणि ज्यांच्यावर कुरआन अवतरले.

कुरआनाच्या या स्पष्टीकरणास लक्षात घेता ते कयास बांधणे चुकीचे ठरते जे वेगवेगळया व्यक्तिंच्या पैगंबर असण्या विषयी म्हटले जाते. जेव्हा या व्यक्तिंचा काळ हजरत इब्राहीम यांच्या नंतरचा आहे आणि त्याचे हजरत इब्राहीम चे बंशज असणे सिधू नाही.

६१. म्हणजे या दोन्ही पैगंबरांच्या वंशात मार्गदर्शनाचा मार्ग अंगिकार करणारे फार थोडे निघाले आणि बहुसंख्य दुराचारी राहीले.

आज हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जन समूहाची हीच दशा आहे. यांच्यात मार्गदर्शनाच्या मार्गावर चालणारे थोडे च आहेत आणि बहुसंख्य दुराचारात मग्न आहेत. जेव्हा कुरआनाचा प्रकाश त्यांच्या मार्गदर्शना करीता हजर आहे.

६२. म्हणजे शेवटी हजरत ईसा (येशू) यांना पाठविले व त्यांना बायबल प्रदान केले. यासाठी की या द्वारे लोकांनी मार्गदर्शन प्राप्त करावे. स्पष्ट असावे की हे बायबल आता आपल्या मूळ स्वरुपात अस्तित्वात नाहीत मात्र त्याचे विविध भाग चार बायबल (मत्तय, लूका, मरकस आणि यूहन्ना) मध्ये आढळतात.

६३. **राफ़ः** म्हणजे मनाची कोमलता व कृपाशीलता हे दोन्ही गुणविशेष हजरत ईसा यांच्या चारित्र्यात प्रकट होते. त्यांच्या मसहित्वाने ईश्वराच्या दासांशी सहानुभूति करण्या चा व त्यांच्यावर दया करण्याची भावना उंचबळते. याचा प्रभाव त्यांच्या अनुयायांवर ही पडला आणि त्यांच्यातही स्नेह दया भाव निर्माण झाला. हे भाव आपल्या चांगल्या मर्यादे प्रत अपेक्षित होते. परंतु यांनी त्यात अतिरेक करून संन्यासाश्रम अंगिकारला ज्याच्या परिणाम स्वरूपी जेहाद टळले.

**मर्यादा** (व्यापार विषयक नियम) लागू करण्या संदर्भात नरमीचे धोरण आंगिकारण्यास मनाई केली गेली आहे.

وَلَا تَأْخُذْكُمْ بِهِمَا رَافَةٌ فِي دِيْنِ اللّٰهِ ۔ (نور:٢)

‘आणि अल्लाहच्या धर्माच्या संदर्भात तुम्हाला यांच्यावर दया येऊ नये. (नूर - २)

आणि लोखंडाचा वापर न्याय प्रस्थापित करण्या करीता आवश्यक आहे. तसेच इस्लामच्या वैरींशी मुकाबला करण्या करीता जेहाद ही अत्यावश्यक आहे ही कामे सक्तीची आहेत. या जबाबदाऱ्या कडे तोंड फिरवून नरमी आणि दयेच्या भोवऱ्यात स्वत:ला अडकवून घेणे म्हणजे न्यायमार्गापासून हटणे होय. धर्माने एकीकडे स्वभाविक भावनांच्या वाढीची उपाय योजना ही केली गेली आहे आणि दुसरी कडे सामूहीक उद्दिष्टये व धर्माच्या वर्चस्वच्या निकडींना ही दृष्टीपथात ठेवले गेले आहे. याचा एक पैलू स्विकारल्याने व दुसरा पैलू दृष्टीआड केल्याने अफरा तफरी ची स्थिती निर्माण होते.

६४. संन्यासी शी अभिप्रेत तो भक्तिमार्ग होय जो ख्रिश्चनांनी शोधून काढला होता. म्हणजे जगाची व्यस्तता व त्याच्या गोडीचा त्याग करून एकांतवास पत्करला. या उद्दिष्टा करीता त्यांनी अविवाहीत जीवन पत्करले आणि पर्वतांमध्ये, गुफांमध्ये व मठां मध्ये राहू लागले संन्यासी पणात त्यांनी अगदी अतिरेक केला होता. ज्याने त्यांना स्वाभाविक निकडी ही भागवू दिल्या नाहीत आणि धार्मिक निकडींना पूर्ण करण्या पासून रोखले. विशेषत: अल्लाह करीता लढले जाणारे युद्ध आणि कुफ्र व इस्लाम च्या संघर्षात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात हयगय केली. कुरआन त्यांच्या याच पद्धतिला बिदअत (नवा मार्ग) ठरवित आहे आणि स्पष्ट सांगत आहे की संन्यासाची ही पद्धत अल्लाहने त्यांच्या करीता अनिवार्य केली नव्हती परंतु त्यांनी अल्लाह च्या प्रसन्नती खातीर हा नवा मार्ग प्रचलीत केला अशा प्रकारे त्यांनी संन्यासाच्या बाबत स्वत:ला मोठ्या कष्टात टाकले, ज्यास ते सहन करु शकले नाहीत. तात्पर्य हा नवीन मार्ग त्यांनी अल्लाहच्या प्रसन्नते करीता अंगिकारला होता. परंतु बिदअत शेवटी बिदअत (धर्मात नवीन मार्ग) आहे. मग ती कितीही सद बुद्धीने केली जात असो कुरआन संन्यास मार्गाला बिदअत ठरवितो व त्यावर अधिक टिका या पैलूने ही करतो की याला ते पूर्ण रित्या निभावू शकले नाहीत. म्हणजे जगाशी नाते तोडण्याची ही पद्धत यांनी शोधून तर काढली, पण ते यावर आचरण बद्ध राहू शकले नाहीत. उघड आहे, जेव्हा स्वभावा विरुद्ध एखादा युद्ध करतो तेव्हा स्वभाव त्याच्याशी युद्ध करती आणि संन्यास पद्धतीचा इतिहास साक्षी आहे की लग्न विवाहाचा तिटकारा करणारे व्यभिचारास बळी पडले आणि संन्यासी व सन्यासिनींच्या एकच भेटी गाठी ने मठांना व्यभिचाराचे अड्डे बनविले अशा प्रकारे जेव्हा त्यांनी अर्थोपार्जना चे योग्य

मार्ग सोडून दिला तेव्हा हराम कमाई त्यांच्यात सार्वत्रिक झाली. सूरह तौबा आयत क्र.३४ मध्ये ग्रंथ धारकांचे विद्वान व संन्यासीच्या या निंदनीय हरकतीचा उल्लेख केला गेला आहे. ते अनुचित मार्गाने लोकांचा माल हडप करतात आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखतात.

भारतातील अनेकेश्वरवाद्यां मध्ये ही जगाचा मोह त्याग व तपस्येची कल्पना चालत आली आहे. या पद्धति चा ज्यांनी अवलंब केला ते साधू व जोगी गणले गेले. शोभा सजावटीच्या त्यागाने एवढी प्रखरता अंगिकारली आहे की त्यांनी आपला पोषाखही उतरवून फेकला. मग मंदीरांमध्ये त्यांच्या सेवा चाकरी करीता देवदासी ही राहू लागल्या. परिणामी ते वाईट रित्या निर्लज्जता, व्याभिचार व हराम ग्रस्त झाले. मोहत्यागाच्या नावाने ही स्पष्टत: ऐहिक भक्ति होय.

मुसलमानांमध्ये ही तसव्वुफच्या मार्गाने मठ वगैरे निघाले. ज्यात एकांतवास, बैठक, जापताप व मन मारणे या सारख्या गोष्टी सामील होत्या मग जेव्हा त्यांनी तरीकत हा भक्तिमार्ग शोधून काढला तेव्हा त्याने शरीअत ची जागा घेतली अशा प्रकारे धर्मात नवनवीन प्रथांची रेलचेल झाली व धर्माचे स्वरुपच पालटून गेले.

वास्तविक हदीस वचनात प्रत्येक नव्या गोष्टीला जी धर्मात काढली जावे, मर्दूद (तिरस्कृत रद्द बातिल) ठरविला गेला होता.

مَنْ اَحْدَثَ فِیْ اَمْرِنَاھٰذَامَالَیْسَ مِنْہُ
فَھُوَرَدٌّ۔ (بخاری کتاب الصلح)

'जो आमच्या या धर्मात एखादी नवीन गोष्ट काढेल जी यात नाही तर तो मर्दूद (तिरस्कृत) आहे.' (बुखारी किताबुस-सलाह )

وَشَرَّالْاُمُوْرِ مُحَدَّثَاتُھَا وَکُلَّ بِدْعَۃٍ
ضَلَالَۃٌ۔ (مسلم کتاب الجمعۃ)

'आणि निकृष्टतम गोष्टी त्या आहेत ज्या नव्याने काढल्या जाव्यात आणि प्रत्येक बिदअत (मार्गभ्रष्टता) आहे.' (मुस्लिम किताबुल जुमआ)

या हदीस वचनात प्रत्येक बिदअती ला, मार्गभ्रष्ट ठरविले गेले आहे. परंतु धर्म-ज्ञान बाळगणाऱ्या विद्वानांच्या एका समूहाने बिदअतीचे दोन प्रकार चांगला आणि वाईट ठरवून अनेक नव्या गोष्टी करीता मार्ग सोयीस्कर केला आणि आज उम्मत (मुस्लिम जनसमूहा) चा फार मोठा वर्ग बिदअतीच्या मार्ग भ्रष्टतेत फसलेला आहे.

६५. म्हणजे हजरत ईसा यांच्या अनुयायी मध्ये जे लोक उचित श्रद्धा बाळगणारे व आपल्या ईमाना संदर्भात प्रामाणिक होते त्यांना त्यांच्या आचरणाच्या दृष्टीने मोबदला प्रदान केला.

पुढच्या वाक्यांशा वरुन स्पष्ट होते की जे मोबदल्याने उपकृत केले गेले दुराचारी नव्हते, किंबहुना ईमानाच्या निकडी पूर्ण करणारे होते.

६६. म्हणजे ईसा यांच्या अनुयायींची विपुल संख्या, दुराचारात ग्रस्त आहे. ज्याचे फार मोठे कारण धर्माचे प्रामाणिक अनुसरण न करणे व त्यात नवनव्या गोष्टी काढणे आज मुसलमानांची दशा हीच आहे की यांच्यापैकी बहुतेक दुराचार ग्रस्त आहेत आणि धर्माचे प्रामाणिक अनुसरण करणारे फार थोडेच होत.

६७. हे त्या लोकांना संबोधून आहे ज्यांनी हजरत ईसा वर ईमान बाळगले होते. त्यांना सांगितले जात आहे की जेव्हा तुम्ही ईमाना चा दावा करता तर पैगंबर (मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान बाळगा. अशा स्थितीतच तुमचे ईमान अधिक विश्वसनीय ठरेल.

६८. अल्लाहच्या कृपेचा एक हिस्सा या आधारे की तुम्ही आधी ही ईमान बाळगले होते आणि दुसरा हिस्सा या साठी की पैगंबर (मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर ही ईमान बाळगावे. सूरह कसस (आयत क्र. ५३, ५४) मध्ये फर्माविले गेले की :-

وَاِذَا یُتْلٰی عَلَیْھِمْ قَالُوْٓا اٰمَنَّا بِہٖٓ اِنَّہُ الْحَقُّ مِنْ رَّبِّنَآ اِنَّا کُنَّا
مِنْ قَبْلِہٖ مُسْلِمِیْنَ۔

'आणि जेव्हा हे कुरआन यांना ऐकविले जाते तर म्हणतात, आम्ही याच्यावर ईमान बाळगले नि:संशय हे आमच्या पालन कर्त्या तर्फे सत्य आहे. आम्ही आधी पासूनच मुस्लिम आहोत.

اُولٰٓئِکَ یُؤْتَوْنَ اَجْرَھُمْ مَّرَّتَیْنِ بِمَا صَبَرُوْا وَیَدْرَءُوْنَ
بِالْحَسَنَۃِ السَّیِّئَۃَ وَمِمَّا رَزَقْنٰھُمْ یُنْفِقُوْنَ۔

'हे असे लोक होत ज्यांना त्यांचा मोबदला दोन वेळा दिला जाईल या कारणास्तव की ते स्थैर्यशील राहीले. ते वाईट गोष्टींना चांगल्या गोष्टीनी दूर करतात आणि जी उपजिविका आम्ही त्यांना दिलेली आहे त्यातून ते खर्च करतात.'

'आणि हदीस वचनात उल्लेखित आहे की तीन माणसे अशी आहेत की त्यांच्या करीता दुप्पट मोबदला आहे, ज्यापैकी एक :-

رَجُلٌ مِّنْ اَھْلِ الْکِتَابِ اٰمَنَ بِنَبِیِّہٖ وَاٰمَنَ
بِمُحَمَّدٍ۔ (بخاری، مسلم)

'ग्रंथ धारकां पैकी तो मनुष्य आहे जो आपल्या पैगंबरा वर ही ईमान बाळगत होता आणि मुहम्मद वर ही ईमान बाळगले.' (बुखारी-मुस्लिम)

६९. हे 'नव्हे' खंडनार्थ अधिक ताकीदी करीता आहे. ज्या प्रकारे उर्दू भाषेत 'नाही नाही' असे म्हटले जाते.

७०. आयतीचा अर्थ असा की सर्वश्रेष्ठ अल्लाह ने मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जे बनी इस्माईल वंशा पैकी आहेत. यासाठी पैगंबर बनवून पाठविले आहे की ग्रंथ धारकांवर हे स्पष्ट व्हावे की या पूर्वी बनी इस्राईल वंशात पैगंबरांचा जो क्रम चालला तर याचा हा अर्थ नव्हे की या वंशाची एकाधिकार आहे. वस्तुस्थिती ही की प्रेषित्वाचे पद अल्लाहची कृपा होय आणि ते पूर्णत: त्याच्याच अखत्यारीत आहे, तो ज्याला इच्छिल प्रदान करील या पूर्वी त्याचा हेतु बनी इस्राईल वंशात पैगंबर पाठविण्याचा होता आणि आता त्याचा उद्देश्य असा की बनी इस्राईल वंशात पैगंबर पाठविला जावा. त्याच्या दूरदार्शितेवर कोणालाही आक्षेप घेण्याचा काही हक्क नाही. तो ज्याला इच्छिल प्रेषित्वाचे सन्माननीय पद प्रदान करील आणि ज्या समूहाला इच्छिल आपल्या या कृपेने उपकृत करील की पैगंबर त्यांच्यातून निवडला गेला आहे.

# सूरह
# अल मुजादला

# ५८. सूरह अल मुजादला

**नावः** सूरह चा आरंभ एका स्त्री च्या तक्रार-प्रसंगाने झाला आहे. या अनुषंगाने या सूरह चे नाव 'अल मुजादला' असे आहे.

**अवतरण काळः** मदनी आहे; आणि सूरह अहजाब नंतर म्हणजे हि. स. ५ नंतर अवतरली.

**मध्यवर्ति कल्पनाः** ईमान बाळगणाऱ्यांना त्यांच्या विवाहीक जीवना संबंधी उद्‌भवलेल्या समस्येत अल्लाहचा कायदा स्पष्ट करीत, तसेच बैठकीच्या शिष्टाचारा संबंधी मार्गदर्शन करीत विशुद्ध व प्रामाणिक ईमान आणि दांभिकता या दोहो मधील फरक स्पष्ट केला गेला आहे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ४ मध्ये जिहार (पत्नी ला आपल्या आईची पाठ संबोधून तिला स्वत:साठी हराम (निषिद्ध) करुन घेण्याच्या) शरीअत विषयक आदेशांचे निवेदन केले गेले आहे.

आयत क्र. ५ व ६ मध्ये अल्लाहच्या शरीअत विषयक आदेशांचे इन्कार करणाऱ्यांना सक्त शिक्षेची तंबी दिली गेली आहे.

आयत क्र. ७ ते ११ मध्ये दांभिकांच्या प्रवृत्तीस आणि त्यांच्या उपद्रवी कारवायांचा उल्लेख करीत ईमान बाळगणाऱ्यांना बैठकीच्या शिष्टाचारांचा उपदेश दिला गेला आहे.

आयत क्र. १२ व १३ मध्ये पैगंबराशी कानगोष्टी करण्या संदर्भात विशेष आदेश दिला गेला आहे.

आयत क्र. १४ ते २२ मध्ये दांभिकांना तावडीत घेत सच्चा ईमान बाळगणाऱ्यांची ओळख सांगितली गेली आहे.

# ५८.सूरतुल मुजादला

سورة المجادلة

आयती- २२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. अल्लाहने ऐकले त्या स्त्रीचे म्हणणे, जी (हे पैगंबर !) तुमच्याशी आपल्या पती बाबत वाद घालीत असे आणि अल्लाह समोर गाऱ्हाणे मांडत होती आणि अल्लाह तुम्हा दोघांचे संभाषण ऐकत होता. निःसंशय अल्लाह सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे. [१]

قد سمع الله قول التي تجادلك في زوجها و
تشتكي إلى الله والله يسمع تحاوركما إن الله سميع بصير ①

२. तुमच्या पैकी जे लोक आपल्या पत्नींशी ‘जिहार’ करुन बसतात [२] (अर्थात त्यांना आईच्या पाठी ची उपमा देतात )त्या त्यांच्या आया नव्हेत. त्यांच्या माता तर त्याच होत, ज्यानी त्यांना जन्म दिला आहे. [३] हे लोक एक अगदी अप्रिय आणि असत्य गोष्ट बोलतात. [४] आणि निःसंशय अल्लाह मोठा माफ करणारा व क्षमाशील आहे.[५]

الذين يظهرون منكم من نسائهم ما هن أمهاتهم إن أمهاتهم
إلا الئي ولدنهم وإنهم ليقولون منكرا من القول وزورا و
إن الله لعفو غفور ②

३. जे लोक आपल्या पत्नींशी ‘जिहार’ करुन बसतील, मग आपल्या कथना (म्हणजे जिला त्यांनी हराम ठरविले तिच्या) कडे परततील तर त्यांना एक मान (गुलाम किंवा दासी) मुक्त करावी लागेल, या पूर्वी की दोघांनी एकमेंकास हात लावावा.[६] या गोष्टीची तुम्हाला ताकीद केली जात आहे.[७] आणि तुम्ही जे काही करता, त्यास अल्लाह जाणून आहे.

والذين يظهرون من نسائهم ثم يعودون لما قالوا
فتحرير رقبة من قبل أن يتماسا ذلكم توعظون به والله
بما تعملون خبير ③

१. या आयतीत ज्या घटने कडे संकेत निर्देश केला गेला आहे. याचा तपशील हदीस च्या कथनां मध्ये सांगितला गेला आहे. ज्याचा खुलासा हा आहे की खौला बिन्त शाअलबा, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाली आणि तिने आपले हे गाऱ्हाणे मांडले की तिचा पती औस बिन सामित याने तिच्या तारुण्याचा तर लाभ घेतला परंतु आता ज्याअर्थी ती म्हातारी झाली आहे व तिला मुले बाळे ही आहेत, भावनातिरेकाने सांगितले की तू मला आईच्या पाठी सारखी आहेस (म्हणजे तू माझ्या करीता हराम (निषिद्ध) आहेस). परिणामी मला मोठया संकटाला तोंड द्यावे लागत आहे. प्रामुख्याने आपल्या मुलाबाळांच्या पायी. यास्तव मी अल्लाह समोर आपले हे गाऱ्हाणे मांडते. तिने आपला तंटा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पुढे जोरदार पणे सादर केला आणि हे स्पष्टीकरण देत की त्यांच्या पती चा इरादा तलाक देण्याचा नव्हता. या गोष्टीचा आग्रह धरला गेला की त्यांच्या पती करीता रुजू करण्याचा मार्ग काढला जावा. पैगंबरांनी यावर विलंब घेतला आणि थोड्याच वेळाने ही सूरह अवतरली; जिचा आरंभच अशा प्रकारे होतो की जणू अल्लाहने या स्त्री ची फिर्याद ऐकली, जी तुमच्याशी आपल्या पती बाबत वाद घालत होती; आणि अल्लाह समोर आपले गाऱ्हाणे मांडत होती; व अल्लाह तुम्हा दोघांचे बोलणे ऐकत होता. आणि नंतरच्या आयती मध्ये 'कफ्फारा' (प्रायश्चिता) चा आदेश देऊन मिलाप ची परवानगी दिली गेली आहे. मात्र या अटीवर की कफ्फारा आधी अदा केला जावा. या कथनां करीता पहा तफसीर इब्ने कसीर खंड ४ पृ. ३१९, ३२०

या स्त्रीने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समोर आपला तंटा ज्या शैलीत सादर केला, त्यास वाद या अर्थाने घेतले गेले आहे. हे वाद घालणे प्रामाणिक ईमानासह एका हेतु पोटी होते व यात अल्लाह कडे गाऱ्हाणे मांडले गेले होते म्हणूनच तिच्यावर अल्लाहची कृपा दृष्टी झाली. आणि तिची अडचण दूर सारण्या करीता अल्लाहचा संदेश अवतरला, ज्याने 'जिहार' संदर्भात शरीअत विषयक आदेश स्पष्ट केले आणि 'जिहार' करुन बसणाऱ्यांकरीता सुटकेचा मार्ग काढला.

आणि हे जे फर्मावले की 'अल्लाह तुमचे बोलणे ऐकत होता तर याने ही जाणीव करुन देणे अभिप्रेत आहे की अल्लाह आपल्या दासां कडे सतत लक्ष देऊन असतो. व त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकतो, त्यांचे गाऱ्हाणे ऐकतो. तो आपल्या दासांच्या मदती करीता सदैव व सर्व ठिकाणी हजर आहे.

२. मूळ शब्द ''जिहार'' अर्थात एखाद्याने आपल्या पत्नीस म्हणावे की तू मला आईच्या पाठीसारखी आहे. त्या काळात अरब लोकांत ही रुढी प्रचलीत होती की जो मनुष्य हे शब्द उच्चारीत असे, त्याची पत्नी आयुष्यभर त्याच्या करीता निषिद्ध (हराम) ठरत असे. आणि याला ते तलाक ठरवित ''ज़िहर'' (पाठ) हा शब्द वाहन या अर्थाने आहे.

३. अर्थात पत्नीला आई म्हटल्याने ती आई ठरत नाही. त्याची आई तर तीच होय जिने त्याला जन्म दिला.

४. पत्नीला आई ठरविणे अतिशय अप्रिय गोष्ट होय आणि असत्य देखील. अप्रिय अशासाठी की ही एक अगदी अनुचित गोष्ट आहे व पत्नीचे मन दुखवणारी ही. आणि असत्य या साठी की ती वस्तुस्थितीच्या विपरीत गोष्ट होय.

५. म्हणजे ज्या माणसाने पत्नीला स्वत: करीता हराम ठरविण्याचा गुन्हा केला असेल त्याने अल्लाह जवळ क्षमा याचना करावी. कारण अल्लाह माफ करणारा व क्षमाशील आहे. माफी त्या अपराधा ची जो हातून घडला व क्षमा याचना सर्व अपराधां साठी.

६. हे ''जिहार'' चे प्रायश्चित होय जे आयतीत व या नंतरच्या आयतीत सांगितले गेले आहे. ''जिहार'' नंतर हे प्रायश्चित अपरिहार्य पणे घ्यावे लागेल जेणेकरुन त्या अपराधाची भरपाई व्हावी, जो त्याच्या हातून घडला अर्थात पत्नीच्या संबंधाने एक असत्य गोष्ट बोलण्याचा.

'आपल्या कथना कडे परततात' चा अर्थ असा की त्यांनी आपल्या पत्नीला स्वत: करीता हराम ठरविले, या नंतर ते तिच्याशी पत्नी संबंध कायम करु इच्छितात, या ठिकाणी शब्द يَعُوْدُوْنَ'परततात' परंतु इच्छितात च्या अर्थाने आहे.

(अर्थाच्या पडताळ्या साठी पहा अल्लामा इब्ने कय्यीम लिखित जादुल मिआद खंड ४ पृ. ८५)

जिहार नंतर स्त्रीला अधांतरी सोडले जाऊ शकत नाही कारण शरीअत ने याची मनाई केली आहे. तसेच जे असत्य तो बोलला त्यावर अटळ राहणे ही उचित नव्हे. म्हणून अपरिहार्य पणे त्याला कफ्फारा (प्रायश्चित) अदा करावेच लागेल. या साठी की त्याने आपल्या पत्नीला खरोखर पत्नीचा दर्जा द्यावा.

कफ्फारा एकमेकास स्पर्श करण्या पूर्वी अदा करावा लागेल. एकमेकांना स्पर्श करण्याशी अभिप्रेत يَتَمَاسَّا'समागम' होय कफ्फाराचे तीन प्रकार सांगितले गेले आहेत. त्यापैकी एक हा की पत्नीला आईच्या पाठीची उपमा देऊन टाकून देणाऱ्याने एक मान अर्थात एक गुलाम किंवा दासी मुक्त करावी. कारण त्याला किंवा तिला गुलामी च्या जोखंडातून सोडविणे, त्याची मान सोडविण्या सारखेच होय. दुसरे दोन प्रकार पुढील आयतीत निवेदिले गेले आहेत.

७. म्हणजे तुम्हाला ताकीद केली जात आहे की या शरीअत विषयक आदेशांचे पालन करा. आदेश सांगत असतांना मध्येच हे कथन ताकीद म्हणून आहे की या आदेशांचे नेक इराद्याने पालन करण्यातच तुमची भलाई आहे. याच्या विरुद्ध वागणे किंवा त्यास खेळ समजणे विनाशाचे कारण ठरु शकते.

فَمَنْ لَّمْ يَجِدْ فَصِيَامُ شَهْرَيْنِ مُتَتَابِعَيْنِ مِنْ قَبْلِ اَنْ يَّتَمَآسَّا
فَمَنْ لَّمْ يَسْتَطِعْ فَاِطْعَامُ سِتِّيْنَ مِسْكِيْنًا ذٰلِكَ لِتُؤْمِنُوْا بِاللّٰهِ
وَرَسُوْلِهٖ وَتِلْكَ حُدُوْدُ اللّٰهِ وَلِلْكٰفِرِيْنَ عَذَابٌ اَلِيْمٌ ﴿٤﴾

४. आणि ज्याला गुलाम आढळून न यावा त्याने दोन महीने सतत रोजे पाळावेत, [८] या आधी की दोघांनी एकमेकास हात लावावा आणि जो हे सामर्थ्य बाळगत नसेल, त्याने साठ गरीबांना जेऊ घालावे.[९] हे अशा साठी की तुम्ही अल्लाह आणि त्याच्या पैगंबरा वर ईमान राखावे.[१०] या अल्लाह ने निर्धारीत केलेल्या मर्यादा आहेत. [११] आणि काफिरां करीता दु:ख दायक अजाब (शिक्षा) आहे.[१२]

اِنَّ الَّذِيْنَ يُحَآدُّوْنَ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ كُبِتُوْا كَمَا كُبِتَ الَّذِيْنَ مِنْ
قَبْلِهِمْ وَقَدْ اَنْزَلْنَآ اٰيٰتٍۢ بَيِّنٰتٍ وَلِلْكٰفِرِيْنَ عَذَابٌ مُّهِيْنٌ ﴿٥﴾

५. जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराचा विरोध करतात [१३] ते अशा प्रकारे अपमानित होतील, ज्या प्रकारे त्यांच्या पूर्वीचे लोक अपमानित झाले. [१४] आम्ही अगदी स्पष्ट आयती (वचने) अवतरीत केली आहेत. आणि काफिरां करीता अपमान कारक अजाब (शिक्षा) आहे.

يَوْمَ يَبْعَثُهُمُ اللّٰهُ جَمِيْعًا فَيُنَبِّئُهُمْ بِمَا عَمِلُوْا اَحْصٰىهُ اللّٰهُ
وَنَسُوْهُ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَيْءٍ شَهِيْدٌ ﴿٦﴾

६. ज्या दिवशी अल्लाह या सर्वांना जिवंत करुन उठवील आणि त्यांना सांगेल की त्यांनी कोणती कृत्ये केली होती, अल्लाहने सर्व काही मोजून ठेवले होते आणि हे लोक त्यास खोटे ठरवून बसले होते. अल्लाह प्रत्येक गोष्टीस साक्षी आहे.

اَلَمْ تَرَ اَنَّ اللّٰهَ يَعْلَمُ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ مَا يَكُوْنُ مِنْ
نَّجْوٰى ثَلٰثَةٍ اِلَّا هُوَ رَابِعُهُمْ وَلَا خَمْسَةٍ اِلَّا هُوَ سَادِسُهُمْ وَلَآ اَدْنٰى
مِنْ ذٰلِكَ وَلَآ اَكْثَرَ اِلَّا هُوَ مَعَهُمْ اَيْنَ مَا كَانُوْا
ثُمَّ يُنَبِّئُهُمْ بِمَا عَمِلُوْا يَوْمَ الْقِيٰمَةِ اِنَّ اللّٰهَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿٧﴾

७. काय तुम्हाला माहीत नाही की अल्लाह ती प्रत्येक गोष्ट जाणतो जी आकाशां मध्ये व जमीनीवर आहे,[१५] असे नाही होत की तिन माणसां मध्ये कुजबुज व्हावी आणि त्यांच्या दरम्यान चौथा अल्लाह नसावा. आणि ना पाच माणसां मध्ये कुजबुज व्हावी व त्यांच्या दरम्यान सहावा अल्लाह नसावा. कुजबुज करणारे याहून कमी असोत वा जास्त तो त्यांच्या सोबत असतो, मग ते कोठे ही असोत.[१६] मग कियामतीच्या दिवशी तो त्यांना दाखवील की त्यानी कोणती कृत्ये केली. नि:संशय अल्लाह प्रत्येक गोष्टी चे ज्ञान बाळगतो.

८. म्हणजे जर मुक्त करण्या करीता गुलाम किंवा दासी न मिळाल्यास सतत दोन महीने रोजे पाळावेत.

आजच्या काळात गुलामगिरीची प्रथाच अस्तित्वात राहीली नाही यास्तव कफ्फारा अदा करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे दोन महिन्याचे सतत रोजे आणि तिसरा प्रकार जो पुढे सांगितला जात आहे. सतत रोजे म्हणजे रोजा पाळण्याचा क्रम उचित कारणा शिवाय तुटता कामा नये.

९. कफ्फारा अदा करण्याचा तिसरा प्रकार असा की साठ गरीबांना जेऊ घातले जावे. कुरआनाने यासाठी एखादे प्रमाण निश्चित केलेले नाही, मात्र शपथ भंगाचा कफ्फारा सांगतांना हे स्पष्टीकरण दिले आहे.

مِنْ اَوْسَطِ مَا تُطْعِمُوْنَ اَهْلِيْكُمْ۔ (مائدہ:۸۹)

''मध्यम दर्जाचे जेवण जे तुम्ही आपल्या कुटुंबियानां खाऊ घालता.'' (मायदा-८९)

यास्तव मनुष्य आपल्या कुटुंबियांना जे खाऊ घालतो तसे जेवण गरीबांना पोट भर दिल्यास या आदेशाचा हेतु पूर्ण होतो हदीस वचनांनी हे ही सिद्ध आहे की खाद्य पदार्था पैकी कोणतीही एक वस्तू अर्धा साअ (१किलो ८८ ग्रॅम) प्रत्येकी दिली जावी.

आजच्या काळात रोख अदायगी कफ्फारा देणाऱ्याच्या सवलती करीता आहे. आणि गरीब लोक ही यास पसंत करतात म्हणून या प्रमाणा एवढ्या खाद्यपदार्थाची किंमत ही गरीबांना दिली जाऊ शकते. या साठी की त्यांनी आपल्या आवडीचे जेवण घ्यावे.

जिहार च्या समस्ये वर काही भाष्यकारांनी लांब लचक धर्मशास्त्रीय चर्चा विवादांचा उल्लेख केला आहे. या प्रकारची चर्चा विवाद कुरआनाचा अभ्यास करणाऱ्या करीता मानसिक गोंधळ ठरतो. आचरणाचे चैतन्य लोप पावते. धर्मशास्त्रीय बंधनां मध्ये वाढ होते. परिणामी मानसिक व वैचारीक पातळीवर योग्य प्रशिक्षण लाभत नाही. कारण लक्ष त्या मूलभूत गोष्टी कडून वळते ज्या संबंधित आयतीत सांगितल्या गेल्या आहेत. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांच्या सहवासातील अनुयायी ना मानसिक व आचरण विषयक पातळीवर असे प्रशिक्षण दिले होते की ते ना लांबलचक धर्मशास्त्रीय चर्चा विवाद उभे करीत आणि ना काल्पनिक समस्या उभ्या करीत किंबहुना जेव्हा एखादी समस्या उदभवत असे तेव्हा ते तिच्या निवारणा चा मार्ग शोधित यात मोठी शांती सुविधा होती. परंतु नंतरच्या लोकां मध्ये धर्मशास्त्रीय वैचारीकता वाढत गेली आणि ते समस्यांना कोरुन काढू लागले. या प्रसंगी बनी इस्राईल वंशा द्वारे गायी ला जिबह करण्याची ती घटना ही डोळ्यासमोर ठेवली पाहीजे जी सूरह बकरा मध्ये सांगितली गेली आहे की जेव्हा त्यांना एक गाय जिबह करण्याचा आदेश दिला गेला, तेव्हा त्यांनी या ठोस आदेशाना अंमलात आणण्या ऐवजी,गायीचा रंग कसा असावा, तिचे वय किती असावे या सारखे प्रश्न विचारुन हे कार्य आपल्या करीता कठीण बनवून घेतले. तात्पर्य जे लोक धर्म संदर्भात अवघडता निर्माण करतात त्यांना दुष्करतेत टाकले जाते.

या आयतीच्या अनुरोधाने ही गोष्ट ही लक्षात घ्यावी की कुरआन ने जिहार ला तलाक ठरविले नाही, किंबहुना यास एक अप्रिय व असत्य गोष्ट ठरविले. या उलट अज्ञान काळात जिहार ला तलाक समजले जात असे तात्पर्य ज्या पद्धतिला शरीअत ची सनद प्राप्त नाही, ती विश्वासाही नाही. हे या गोष्टी चे उदाहरण होय की एकाच वेळी दिलेले तीन तलाक ही तीन तलाकच्या आदेशात बसत नाही कारण तलाकच्या या पद्धतीला शरीअत ची सनद प्राप्त नाही.

१०. अर्थात अल्लाहचे हे आदेश अज्ञानाचा अंध:कार दूर करुन मार्गदर्शनाचा मार्ग उज्वल करीत आहेत आणि मार्गदर्शनाचा हा मार्ग अल्लाह आपल्या पैगंबरा द्वारे उज्वल करीत आहे अर्थात या प्रकाशात चालण्या करीता अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान व श्रद्धा बाळगणे आवश्यक आहे.

११. अल्लाहने निश्चित केलेल्या मर्यादांशी अभिप्रेत शरीअत विषयक आदेश व नियम होत. ज्यांचे संरक्षण व पालन ईमानाची निकड आहे. याच्या विरुद्ध अज्ञान काळाच्या प्रथा किंवा स्वत: रचलेल्या नियमांना प्राधान्य देणे ईमानाच्या अगदी विपरीत आहे.

१२. शेवटी ही ताकीद की जे लोक अल्लाहच्या आदेशांना व नियमांना मान्य करण्या पासून इन्कार करतील त्यांच्या करीता दु:खदायक शिक्षा आहे आणि याच अनुषंगाने पुढील आयतीत काफीर व दांभिक मुसलमानांचे आचरण व त्यांची परिणति सांगितली गेली आहे.

१३. आज मुसलमानां मध्ये ही अशा लोकांची कमतरता नाही जे शरीअत विषयक कायद्यांच्या विरोधात उठून उभे राहतात त्यांचे हे वर्तन अल्लाह व त्याच्या पैगंबराचा विरोध करण्या समान आहे.

१४. अभिप्रेत पूर्वी होऊन गेलेले ते जनसमूह होत ज्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराचा विरोध केला होता.

१५. अर्थात अल्लाहचे ज्ञान सर्वव्यापी असणे एक स्पष्ट हकीगत आहे ज्यास प्रत्येक मनुष्य स्वाभाविक पणे जाणतो.

१६. अर्थात कानगोष्टी करणारे तीन असोत वा जास्त किंवा याहून कमी, अल्लाह आपले ज्ञान, आपले श्रवण व दृष्टी व आपल्या सामर्थ्यान्वये तिथे हजर असतो आणि म्हणूनच गुप्त बैठकीत झालेल्या गोष्टी त्याच्या पासून लपून राहू शकत नाही.

८. काय तुम्ही त्या लोकांना पाहीले नाही, ज्यांना कानगोष्टी करण्याची मनाई केली गेली होती, तरी ही ते तेच काम करीत आहेत ज्या पासून त्यांना मनाई केली गेली होती.[१७] हे लोक गुन्हा, अतिरेक आणि पैगंबराच्या अवज्ञेच्या गोष्टी गुप्त रित्या करतात.[१८] आणि जेव्हा (हे पैगंबर !) तुमच्या जवळ येतात, तेव्हा तुम्हाला त्या वचनाने सलाम करतात, ज्याने अल्लाहने तुमच्या वर सलाम पाठविला नाही.[१९] आणि आपल्या मनात म्हणतात की आमच्या या गोष्टी बद्दल अल्लाह आम्हाला अजाब (शिक्षा) का नाही देत.[२०] यांच्या करीता जहन्नम च पुरेशी आहे.[२१] ते याच्यातच पडतील आणि ते मोठे वाईट ठिकाण होय.

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ نُهُوا عَنِ النَّجْوَىٰ ثُمَّ يَعُودُونَ لِمَا نُهُوا عَنْهُ
وَيَتَنَاجَوْنَ بِالْإِثْمِ وَالْعُدْوَانِ وَمَعْصِيَتِ الرَّسُولِ وَإِذَا جَاءُوكَ
حَيَّوْكَ بِمَا لَمْ يُحَيِّكَ بِهِ اللَّهُ وَيَقُولُونَ فِي أَنفُسِهِمْ لَوْلَا يُعَذِّبُنَا
اللَّهُ بِمَا نَقُولُ ۚ حَسْبُهُمْ جَهَنَّمُ يَصْلَوْنَهَا ۖ فَبِئْسَ الْمَصِيرُ ٨

९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुम्ही कानगोष्टी कराल, तेव्हा गुन्हा, अतिरेक व पैगंबराच्या अवज्ञेच्या गोष्टी बोलू नका किंबहुना सत्कर्म व पापभीरुतेच्या गोष्टी बोला.[२२] आणि अल्लाहचे भय बाळगा, ज्याच्या समोर तुम्ही सर्व एकत्रित केले जाल.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِذَا تَنَاجَيْتُمْ فَلَا تَتَنَاجَوْا بِالْإِثْمِ وَالْعُدْوَانِ
وَمَعْصِيَتِ الرَّسُولِ وَتَنَاجَوْا بِالْبِرِّ وَالتَّقْوَىٰ ۖ وَاتَّقُوا اللَّهَ الَّذِي
إِلَيْهِ تُحْشَرُونَ ٩

१०. या कानगोष्टी सैताना तर्फे आहेत, या साठी की ईमान बाळगणारे दुःखी व्हावेत.[२३] वास्तविक अल्लाहच्या हुकुमा शिवाय त्या यांना किंचितही नुकसान पोहचवू शकत नाहीत. आणि ईमान बाळगणाऱ्यांनी अल्लाह वरच भरवसा राखला पाहीजे.[२४]

إِنَّمَا النَّجْوَىٰ مِنَ الشَّيْطَانِ لِيَحْزُنَ الَّذِينَ آمَنُوا وَلَيْسَ بِضَارِّهِمْ
شَيْئًا إِلَّا بِإِذْنِ اللَّهِ ۚ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُونَ ١٠

११. हे ईमान बाळगणाऱ्यांनो जेव्हा तुम्हाला सांगितले जाईल की आपल्या बैठकी मध्ये विस्तार निर्माण करा अल्लाह तुम्हाला व्यापकता प्रदान करील.[२५] आणि जेव्हा तुम्हाला सांगितले जाईल की उठा तर उठून जा.[२६] अल्लाह तुम्हा लोकां पैकी त्या लोकांचे, जे ईमान बाळगतात व ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे. दर्जे उंचावील [२७] आणि जे काही तुम्ही करता अल्लाह ते जाणून आहे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِذَا قِيلَ لَكُمْ تَفَسَّحُوا فِي الْمَجَالِسِ
فَافْسَحُوا يَفْسَحِ اللَّهُ لَكُمْ ۖ وَإِذَا قِيلَ انشُزُوا فَانشُزُوا يَرْفَعِ
اللَّهُ الَّذِينَ آمَنُوا مِنكُمْ وَالَّذِينَ أُوتُوا الْعِلْمَ دَرَجَاتٍ ۚ وَاللَّهُ
بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرٌ ١١

१७. ''नजवा'' चा अर्थ कानगोष्टी करणे व एखाद्या बैठकीत काही माणसांचे आपसात खलबत करणे होय. यासाठी की इतरांना याचा थांगपत्ता लागू नये. हे त्याच स्थितीत योग्य ठरु शकते जेव्हा एखादे चांगले उद्दिष्ट उदा. उपद्रवाचा नायनाट करण्या साठी लोकांच्या दरम्यान समझोता घडवून आणण्या साठी केले जात असेल अन्यथा ही कृति अप्रिय आहे. कारण कानगोष्टी सर्वसामान्यत: वाईट हेतु साठी होतात. उदा एखाद्याचा धि:क्कार करण्या साठी किंवा एखाद्याच्या विरुद्ध कट कारस्थान वगैरे रचण्या साठी सूरह निसा मध्ये अल्लाहने फर्माविले आहे की :-

لَاخَيْرَ فِىْ كَثِيْرٍ مِّنْ نَّجْوَاهُمْ اِلَّامَنْ اَمَرَبِصَدَقَةٍ

اَوْ مَعْرُوْفٍ اَوْاِصْلَاحٍ بَيْنَ النَّاسِ۔ (نساء:۱۱۴)

'यांच्या अधिकांश कानगोष्टीं मध्ये कसलीही भलाई नसते. मात्र जो मनुष्य गुप्तपणे दान किंवा चांगली गोष्ट किंवा लोकांच्या दरम्यान समझोता घडवून आणण्या ची गोष्ट करील तर यात निश्चित पणे भलाई आहे.' (निसा-११४)

१८. अभिप्रेत दांभिक मुसलमान होत; जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बैठकीत भाग घेत, मग आपसातच कानगोष्टी करु लागत. त्यांच्या या कानगोष्टी धर्मात शंका संशय निर्माण करण्यासाठी, ईमान बाळगणाऱ्यांच्या विरूद्ध कारस्थान करण्यासाठी आणि पैगंबराची अवज्ञा करण्यास प्रवृत्त करण्या साठी होत असत.

१९. सूरह अहजाब मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर रहमत व सलाम पाठविण्याचा आदेश दिला गेला आहे.

يَااَيُّهَاالَّذِيْنَ اٰمَنُوْا صَلُّوْا عَلَيْهِ وَسَلِّمُوْا تَسْلِيْمًا۔

(احزاب:۵۶)

''हे ईमान बाळगणाऱ्यांनो! तुम्ही ही पैगंबरा वर दरुद व सलाम पाठवा.'' (अहजाब-५६)

या सलाम करीता अस्सलाम अलैक किंवा अस्सलामु अलैकूम हे शब्द शास्त्र संमत आहेत परंतु यहूदी व त्यांचे दांभिक धर्म पंडीतनी सलाम चा उच्चार असा करीत की तो 'साम' होत असे ज्याचा अर्थ मृत्यु असा आहे. यास्तव हजरत आयशा (रजि.) यांचे कथन आहे की :-

''यहूदींची एक जमात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना भेटण्या साठी आली. ते म्हणाले 'अस्साम अलैकूम म्हणजे तुमच्यावर मृत्यु येवो' हजरत आयशा म्हणतात मी समजले आणि उत्तरा दाखल म्हटले 'व अलैकूमस्साम वलअनत' म्हणजे तुमच्यावर मृत्यु व निर्भत्सना होवो. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे ऐकून म्हणाले, जाऊ दे आयशा! अल्लाह प्रत्येक कामात नरमीचे धोरण पसंत करतो. मी म्हणाले, हे अल्लाहचे प्रेषित, आपण ऐकले नाही ते काय म्हणाले.पैगंबर (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) यांनी फर्माविले, मी म्हणालो होतो व अलैकूम अर्थात तुमच्यावर असो (म्हणजे अशा प्रसंगी उत्तरा दाखल व अलैकूम म्हणणे पुरेसे आहे).

(बुखारी किताबुल अदब)

त्यांच्या या कृति बद्दल या आयतीत त्यांची कानउघाडणी केली गेली आहे.

२०. म्हणजे जर खरोखर हा मनुष्य पैगंबर आहे तर आमच्या या अपशब्दा बद्दल आमच्या वर अल्लाहचा प्रकोप का नाही होत. हा त्यांचा फार मोठा भ्रम होता अन्यथा वस्तुस्थिती अशी की अल्लाह अपराध्यांना सवड देतो आणि अजाब वेळेवरच येतो.

२१. म्हणजे यांच्या या हरकती मुळे या जगात त्यांच्यावर अजाब येवो अथवा न येवो. खरा अजाब (अल्लाहचा प्रकोप) तर जहन्नमचा आहे जो अपरिहार्य पणे त्यांना भोगावा लागेल आणि तो पुरेसा आहे.

२२. म्हणजे कानगोष्टी लोकांची भलाई व धार्मिक हेतुं साठी व्हावयास हवी, उपद्रव व उत्पात आणि अपराधाच्या कामां साठी नव्हे.

२३. म्हणजे या कानगोष्टी ज्या वाईट हेतुंसाठी केल्या जात आहेत, सैताना द्वारे प्रेरित केल्या मुळे केल्या जात आहेत. ईमान बाळगणारे जेव्हा दांभिक मुसलमानांना कान गोष्टी करतांना पाहतात तेव्हा त्यांना दु:ख होते की हे मुसलमानांना हानी पोहचविण्यासाठी कशी घृणास्पद हरकत करीत आहे.

२४. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांनी निश्चित रहावे की या उपद्रव कारक कानगोष्टी यांना कसलीही हानी पोहचवू शकत नाही यांना त्याच स्थितीत कोणी नुकसान पोहचवू शकतो जेव्हा अल्लाह ची मर्जी असावी. हा अल्लाहवरचा भरवसाच होय जो धैर्यशील बनवितो.

२५. पैगंबरांच्या बैठकीत अत्याधिक लोकांचे आगमन होत असे ज्यामुळे बसायला जागा राहात नसे; या साठी आदेश दिला गेला की बैठकीत अशा प्रकारे बसा की नंतर येणाऱ्या लोकांना ही जागा मिळावी आणि याचा हा मोबदला ही सांगितला गेला की विस्तृतता निर्माण करणाऱ्यांना अल्लाह व्यापकता प्रदान करील अल्लाह तर्फे व्यापकता दिली जाण्यात मांगल्या ची वाढ ही सामील आहे आणि जन्नत च्या विस्तृत बागा देखील.

विस्तार निर्माण करणे सभा किंवा बैठकीच्या शिष्टाचारां पैकी आहे म्हणून या आदेशास केवळ पैगंबरांच्या बैठकी साठी खास ठरविले गेले नाही किंबहुना सर्वसाधारण पणे मुसलमानांच्या

समस्त सभा व बैठकी करीता हा आदेश दिला गेला आहे मग ती धार्मिक सभा-सम्मेलने असोत किंवा सल्ला मसलतीच्या बैठकी असोत किंवा इतर उपयुक्त कार्याच्या बैठकी असोत.

२६. म्हणजे जेव्हा बैठक किंवा सभा बरखास्त झाल्याचे ऐलान केले जावे तेव्हा उठत जा. तसेच जर सभेच्या अध्यक्षांना बैठकीत फेरबदल करण्याची गरज भासली तर तुम्ही व्यवस्थापनेचे पालन केले पाहीजे.

२७. संकेत या गोष्टी कडे आहे की कोणताही मनुष्य आपले ज्ञान व प्रतिष्ठेने कितीही उच्च दर्जा चा असो सभेच्या व्यवस्थापनेचे पालन कोणत्याही स्थितीत त्याने केले पाहीजे सभेत स्थान, मग एखाद्या कोपऱ्यात मिळावे किंवा अध्यक्षा च्या सांगण्या वरुन त्याला उठून जावे लागावे. तर यास त्याने आपल्या प्रतिष्ठेला धक्का पोहचला असे समजू नये. उलट निमूटपणे पालन करण्यातच दर्जा उंचावेल. हदीस वचनात उल्लेख आहे की :-

مَاتَوَاضَعَ اَحَدٌ لِلّٰهِ اِلَّا رَفَعَهُ اللّٰهُ۔ (مسلم کتاب البر)

''जो दास अल्लाह करीता विनम्रता अंगीकारतो. अल्लाह त्याचा दर्जा उंचावितो.'' (मुस्लिम)

हजरत मसीह (येशू) यांनी त्या लोकांची सक्त कान उघाडणी केली आहे जे आसना साठी आतुर असतात.

''आणखी तो आपल्या शिकवणी त्यांना म्हणाला, शास्त्र्या विषयी जपून राहा त्यांना लांब लांब झगे घालून मिरविणे, बाजारात नमस्कार घेणे आणि सभा स्थानात मुख्य आसने व मेजवानीत मुख्य मुख्य बैठकी ह्यांची आवड असते. ते विधवांची घरे खाऊन टाकातात व ढोंगाने लांबलांब प्रार्थना करितात, त्यांना अधिकच शिक्षा होईल''

(मार्क :१२:३८ ते ४०)

आणि आजच्या काळात पुढारी खूर्चीच्या मागे धावत आहेत आणि धार्मिक विद्वानांची ही दशा सर्व साधारण पणे अशी आहे की ते सभा-बैठकीत उच्च स्थाना ची अभिलाषा बाळगतात ज्यामुळे ते प्रतिष्ठा हीन होत आहेत परंतु त्यांना याची जाणीव नाही.

*हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुम्हाला पैगंबराशी कानगोष्टी करावयाची असेल तेव्हा आपल्या कान गोष्टी पूर्वी दान करा हे तुमच्या करीता अधिक चांगले व अधिक निर्मळ आहे. परंतु जर (दान देण्या करीता) काहीच उपलब्ध नसेल तर अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे. (अल-क़ुर्आन)*

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِذَا نَاجَيْتُمُ الرَّسُولَ فَقَدِّمُوا بَيْنَ يَدَيْ
نَجْوَاكُمْ صَدَقَةً ۚ ذَٰلِكَ خَيْرٌ لَّكُمْ وَأَطْهَرُ ۚ فَإِن لَّمْ تَجِدُوا فَإِنَّ اللَّهَ
غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٢﴾

१२. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुम्हाला पैगंबराशी कानगोष्टी करावयाची असेल तेव्हा आपल्या कान गोष्टी पूर्वी दान करा [२८] हे तुमच्या करीता अधिक चांगले व अधिक निर्मळ आहे. [२९] परंतु जर (दान देण्या करीता) काहीच उपलब्ध नसेल तर अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.[३०]

أَأَشْفَقْتُمْ أَن تُقَدِّمُوا بَيْنَ يَدَيْ نَجْوَاكُمْ صَدَقَاتٍ ۚ فَإِذْ لَمْ
تَفْعَلُوا وَتَابَ اللَّهُ عَلَيْكُمْ فَأَقِيمُوا الصَّلَاةَ وَآتُوا الزَّكَاةَ
وَأَطِيعُوا اللَّهَ وَرَسُولَهُ ۚ وَاللَّهُ خَبِيرٌ بِمَا تَعْمَلُونَ ﴿١٣﴾

१३. काय तुम्ही भ्याले या गोष्टी पासून की आपल्या कानगोष्टींच्या आधी दान द्यावे [३१] तर जेव्हा तुम्ही असे केले नाही आणि अल्लाहने तुम्हाला माफ केले [३२] तर नमाज इतमाम पूर्वक अदा करीत रहा आणि जकात (कर्तव्य-दान) देत रहा आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञा पालन करीत रहा [३३] तुम्ही जे काही करता, ते अल्लाह जाणून आहे.

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ تَوَلَّوْا قَوْمًا غَضِبَ اللَّهُ عَلَيْهِم مَّا هُم مِّنكُمْ وَلَا
مِنْهُمْ وَيَحْلِفُونَ عَلَى الْكَذِبِ وَهُمْ يَعْلَمُونَ ﴿١٤﴾

१४. काय तुम्ही त्या लोकांना पाहीले नाही ज्यांनी अशा जन समूहास मित्र बनविले ज्यावर अल्लाहचा प्रकोप झाला [३४] ते ना तुमच्यापैकी आहेत आणि ना त्यांच्या पैकी [३५] ते जाणून बुजून खोटया गोष्टी वर शपथ घेतात. [३६]

أَعَدَّ اللَّهُ لَهُمْ عَذَابًا شَدِيدًا ۖ إِنَّهُمْ سَاءَ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٥﴾

१५. अल्लाह ने त्यांच्या करीता सक्त अजाब (शिक्षा) तयार करुन ठेवला आहे. अतिशय वाईट आहे, जे काही ते करीत आहेत.

اتَّخَذُوا أَيْمَانَهُمْ جُنَّةً فَصَدُّوا عَن سَبِيلِ اللَّهِ فَلَهُمْ عَذَابٌ
مُّهِينٌ ﴿١٦﴾

१६. त्यांनी आपल्या शपथांना ढाल बनविले आहे [३७] आणि अल्लाहच्या मार्गा पासून रोखतात.[३८] त्यांच्या करीता अपमाना ची शिक्षा आहे.[३९]

لَّن تُغْنِيَ عَنْهُمْ أَمْوَالُهُمْ وَلَا أَوْلَادُهُم مِّنَ اللَّهِ شَيْئًا ۚ أُولَٰئِكَ
أَصْحَابُ النَّارِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿١٧﴾

१७. ना त्यांची धन सम्पत्ति त्यांना अल्लाह च्या शिक्षे पासून वाचवू शकेल आणि ना त्यांची संतती ते जहन्नम वाले आहेत. सदैव त्यात राहतील.[४०]

२८. दान करण्याचा आदेश अशासाठी दिला गेला की जे लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी एकांतात बोलू इच्छित असतील त्यांना ही जाणीव व्हावी की ते एका अतिशय महान व्यक्ति शी बोलत आहेत. ही जाणीव त्यांना चुकीच्या बोलण्या पासून ही रोखील आणि अनावश्यक व वेळ वाया घालविणाऱ्या संभाषाणा पासून ही.

२९. अधिक चांगले या दृष्टीने की तुम्हाला याचा मोबदला मिळेल आणि अधिक निर्मळ या दृष्टीने की पैगंबरांच्या सेवेत तुम्ही स्वच्छ शुद्ध भावनेने आला.

३०. म्हणजे जर वेळेवर दान देण्याकरीता तुमच्या जवळ काहीच नसेल तर दान न देता पैगंबरांशी एकांतात बोलू शकता या आशेवर की अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे.

ही मुभा केवळ नादार किंवा गरीब दुबळ्यां करीताच नव्हती कारण जर केवळ गरीबां करीता असती तर 'ज्या व्यक्ति ला दान देण्यास काहीच उपलब्ध नसेल' असे फर्माविले गेले असते. परंतु आयतीत सर्वसामान्यत: फर्माविले गेले आहे की, 'परंतु जर तुम्हाला दान देण्या करीता काही उपलब्ध नसेल' याचा उघड अर्थ हाच की ज्या माणसाला देखील वेळेवर दान देण्या करीता काही प्राप्त न व्हावे त्याला अल्लाह माफ करणारा आहे.

३१. दान देण्या विषयीच्या उपरोक्त आदेशात मुभा राखली गेली होती, तरी ही याचे पालन करण्यात पैगंबराच्या सह वासातील अनुयायींना दुष्करता जाणवली कारण वेळेवर दान देण्याचा इतमाम राखणे कठीण आहे आणि दान न देता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी एकांतात बोलणे योग्य नाही. त्यांच्या या मन:स्थितीस भयाच्या अर्थाने घेतले गेले आहे अन्यथा ही गोष्ट कृपणतेच्या आधारावर नव्हती.

३२. म्हणजे अल्लाहने दान देण्याच्या उपरोक्त आदेशात तुमच्या करीता अधिक नरमी आणली की असे न केल्यास तुम्च्यावर काहीच दोष नाही. यावरुन ही गोष्ट आपोआप स्पष्ट झाली की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी एकांतात बोलण्यापूर्वी दान देणे अधिक चांगले व अधिक निर्मळ जरुर आहे परंतु याचे पालन अत्यावश्यक नाही.

भाष्यकारांनी या ठिकाणी रद्द बातील चा विवाद निर्माण केला आहे. ते पहिल्या आयतीत ज्यात कानगोष्टी पुर्वी दान देण्याचा आदेश दिला गेला आहे, या दुसऱ्या आयतीने ज्यात माफ करण्याचे स्पष्टीकरण आहे रद्द मानतात. वास्तविक दुसऱ्या आयतीत पहिल्या आयती च्या रद्द केले जाण्याचे कोणतेही स्पष्टीकरण नाही आणि ना कुरआनाची एखादी आयत रद्द झाली आहे. वस्तुत: दुसऱ्या आयतीने पहिल्या आदेशात सौम्यताय/संक्षेप केला आहे; रद्द केले नाही रद्द याच स्थितीत केले जाऊ शकत होते जेव्हा दुसऱ्या आदेश कानगोष्टी करण्या पूर्वी दान करण्यास मनाई कारक ठरला असवा. परंतु या दुसऱ्या आयतीने याची मनाई केलेली नाही, किंबहुना त्यात सौम्यता निर्माण केली आणि सौम्यतेचा हा आदेश अशा वेळी अवतरला जेव्हा पहिल्या आदेशान्वये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शी एकांतात गोपनीय वार्तालाप चे असाधारण महत्व चांगल्या प्रकारे स्पष्ट झाले होते. आणि याची जाणीव ही पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींना झाली होती. राहीले ते कथन ज्यात हे सांगितले गेले आहे की दुसरा आदेश पहिल्या आदेशाच्या काही तासानंतर अवतरला तर हे कथन अविश्वसनीय आहे.

३३. म्हणजे या सहजसुलभते नंतर तुम्ही आपल्या नेहमीच्या कर्तव्यांचे चांगल्या प्रकारे पालन केले पाहीजे आणि अल्लाह व त्याच्या पैगंबरांच्या आज्ञा पालनात मग्न झाले पाहीजे. याच गोष्टी ईमान मध्ये निर्भेळता व प्रामाणिकता निर्माण करतात.

३४. अल्लाह चा प्रकोप यहूदींवर झाला या जनसमूहास दांभिक मुसलमानांनी आपला मित्र बनविले होते. ते ईमान बाळगणाऱ्या च्या तुलनेत यहूदींच्या लाभास प्राधान्य देत असत.

३५. म्हणजे हे दांभिक मुसलमान ना आपल्या ईमानात सच्चे आहेत की ईमान बाळगणाऱ्यांच्या समूहा पैकी गणले जावेत. आणि ना यहुदीच्यां समूहा शी खऱ्या अर्थाने एकनिष्ठ आहेत; किंबहुना ते संधी-साधू आहेत म्हणून त्यांच्याशी ही संबंध बाळगून आहेत व तुमच्याशी ही.

३६. म्हणजे खोट्या शपथा घेऊन आपण मुसलमान असल्याचा दावा करतात व मुसलमानांचे हितचिंतक असल्याची खात्री पटवितात.

३७. म्हणजे प्रत्येक गोष्टीवर खोटया शपथा घेऊन आपला बचाव करण्याचा प्रयत्न करतात.

३८. म्हणजे अशा हरकती व अशी कारस्थाने करतात जी इस्लामच्या मार्गाला प्रतिबंध घालणारी असावीत.

३९. वर फर्माविले गेले होते की यांच्या करीता सक्त अजाब आहे, आणि या ठिकाणी फर्माविले की यांचा करीता अपमानाचा अजाब (शिक्षा) आहे. सक्त अजाब त्यांच्या दांभिक पणा मुळे आणि अपमानाची शिक्षा त्यांच्या त्या हीन कृत्यांमुळे, जी ते इस्लाम व मुसलमानांच्या विरोधात करीत राहीले.

४०. दांभिक मुसलमान ही जहन्नम मध्ये अशा प्रकारे सदैव अजाब भोगत राहतील ज्या प्रकारे खुले काफिर भोगतील.

१८. ज्या दिवशी अल्लाह त्यांना उठविल ते याच्या समोर ही अशाच प्रकारे शपथा घेतील, ज्या प्रकारे तुमच्या समोर घेतात.[४१] आणि समजतील की ते कोणत्या आधारावर आहेत. [४२] ऐका, ते अगदी खोटारडे आहेत.

يَوْمَ يَبْعَثُهُمُ اللّٰهُ جَمِيْعًا فَيَحْلِفُوْنَ لَهٗ كَمَا يَحْلِفُوْنَ لَكُمْ
وَيَحْسَبُوْنَ اَنَّهُمْ عَلٰى شَيْءٍ ۗ اَلَآ اِنَّهُمْ هُمُ الْكٰذِبُوْنَ ﴿١٨﴾

१९. सैतान यांच्यावर आरुढ झाला आहे [४३] आणि त्याने यांना अल्लाहचे विस्मरण घडविले आहे [४४] हे लोक सैतानाच्या पक्षाचे आहेत.[४५] ऐका, सैतानाचा पक्ष च नाश पावणार आहे.

اِسْتَحْوَذَ عَلَيْهِمُ الشَّيْطٰنُ فَاَنْسٰىهُمْ ذِكْرَ اللّٰهِ ۭ اُولٰۗىِٕكَ حِزْبُ
الشَّيْطٰنِ ۭ اَلَآ اِنَّ حِزْبَ الشَّيْطٰنِ هُمُ الْخٰسِرُوْنَ ﴿١٩﴾

२०. जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबराचा विरोध करतात ते अपमानित होणाऱ्या पैकी असतील.

اِنَّ الَّذِيْنَ يُحَاۗدُّوْنَ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗٓ اُولٰۗىِٕكَ فِي الْاَذَلِّيْنَ ﴿٢٠﴾

२१. अल्लाहने लिहून टाकले आहे की मी आणि माझे पैगंबर वर्चस्व शाली झाल्या खेरीज राहणार नाहीत.[४६] नि:संशय अल्लाह सामर्थ्य शाली, वर्चस्वशाली आहे.

كَتَبَ اللّٰهُ لَاَغْلِبَنَّ اَنَا وَرُسُلِيْ ۭ اِنَّ اللّٰهَ قَوِيٌّ عَزِيْزٌ ﴿٢١﴾

२२. जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबरा वर ईमान बाळगतात त्यांना तुम्ही कधी ही त्या लोकांशी मैत्री ठेवतांना पाहणार नाही, जे अल्लाह व त्याच्या पैगंबरा शी वैर बाळगतात.[४७] मग ते त्यांचे बाप असोत किंवा त्यांचे पुत्र, अथवा त्यांचे भाऊ किंवा त्यांच्या कुटुंबातील लोक.[४८] हेच लोक होत, ज्यांच्या मनात अल्लाह ने ईमान अंकित केले आहे आणि आपल्या तर्फे आत्म्या द्वारे त्यांची मदद केली आहे.[४९] तो त्यांना अशा जन्नती मध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. त्यात ते सदैव राहतील. अल्लाह त्यांच्या शी राजी झाला आणि ते अल्लाह शी राजी झाले.[५०] हे लोक अल्लाह च्या पक्षाचे आहेत. [५१] ऐका, अल्लाह च्या पक्षाचे च लोक यशस्वी होणार आहेत.

لَا تَجِدُ قَوْمًا يُّؤْمِنُوْنَ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ يُوَاۗدُّوْنَ مَنْ حَاۗدَّ اللّٰهَ
وَرَسُوْلَهٗ وَلَوْ كَانُوْٓا اٰبَاۗءَهُمْ اَوْ اَبْنَاۗءَهُمْ اَوْ اِخْوَانَهُمْ اَوْ عَشِيْرَتَهُمْ ۭ
اُولٰۗىِٕكَ كَتَبَ فِيْ قُلُوْبِهِمُ الْاِيْمَانَ وَاَيَّدَهُمْ بِرُوْحٍ مِّنْهُ ۭ وَيُدْخِلُهُمْ
جَنّٰتٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَا ۭ رَضِيَ اللّٰهُ عَنْهُمْ
وَرَضُوْا عَنْهُ ۭ اُولٰۗىِٕكَ حِزْبُ اللّٰهِ ۭ اَلَآ اِنَّ حِزْبَ اللّٰهِ هُمُ
الْمُفْلِحُوْنَ ﴿٢٢﴾

४१. म्हणजे कियामतीच्या दिवशी ही ते स्वत:ला निर्दोष ठरविण्या करीता खोट्या शपथा घेतील, सूरह अनआम मध्ये आहे की ते शिर्क (अनेकेश्वरवादा)शी आपला संबंध नसल्याचे शपथपूर्वक सांगतील.

وَاللّٰهِ رَبِّنَا مَا كُنَّا مُشْرِكِيْنَ۔ (انعام:٢٣)

'अल्लाह आमच्या पालन कर्त्याची शपथ आम्ही अनेकेश्वर वादी नव्हतो.' (अनआम : २३)

४२. म्हणजे ते समजतील की खोटया शपथा घेऊन ते स्वत:ला ईमान बाळगणारे सिद्ध करु शकतील, व त्यामुळे यांची सुटका होऊ शकेल.

४३. सैतान केवळ मनात कुविचारांचा उद्रेक करतो, परंतु जेव्हा मनुष्य याने प्रभावित होऊन आपले कर्म सूत्र त्याच्या हाती सोपवितो तेव्हा तो त्याच्या वर पूर्ण नियंत्रण मिळवितो व त्याला मार्गभ्रष्ट करुन सोडतो. यालाच सैतानाचे आरुढ होणे म्हणतात.

४४. सैतान एखाद्यास मार्गभ्रष्ट करण्या साठी जे मूलभूत कार्य करतो, ते म्हणजे मनातून अल्लाहचे स्मरण मिटविणे आणि अल्लाह कडून ध्यान हटविणे. या गफलतीत पडल्या नंतर कोणत्याही दुष्कृत्यास अंगिकारणे माणसाला अवघड राहात नाही.

४५. म्हणजे हे दांभिक मुसलमान सैतानाचे साथीदार आहेत व त्याच्या इशाऱ्यावर काम करणारे आहेत.

४६. म्हणजे अल्लाहने हा फैसला केलेला आहे की जे लोक अल्लाह त्याच्या पैगंबरा विरुद्ध उभे राहतील त्यांना अपरिहार्यत: पराभूत व्हावे लागेल. एकतर आकाशातून कोसळणाऱ्या अजाब द्वारे त्यांचा सर्वनाश केला जाईल किंवा जेहादच्या मैदानात पैगंबर व त्याच्या साथीदारां द्वारे त्यांना वाईटरित्या पराभूत केले जाईल. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरोधकांना या दुसऱ्या अवस्थेशी तोंड द्यावे लागले. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मोमीन टीप क्र. ७५

४७. म्हणजे कोणताही सच्चा ईमान बाळगणारा (मुसलमान) अल्लाहच्या वैरीस आपला मित्र बनवित नाही. एकाच हृदयात अल्लाहचे प्रेम व एकनिष्ठता आणि त्याच्या शत्रू शी प्रेम व एकनिष्ठता एकत्र राहू शकत नाही.

आजच्या काळात समाजवादाच्या प्रभावाखाली कितीतरी मुसलमानांनी दांभिक मार्ग अंगिकारला आहे. परंतु समाजवादाची सुंदर घोषणा वस्तुस्थिती बदलू शकत नाही.

४८. आयतीचा उदेश्य हा की कुफ्र व इस्लामच्या युद्धात ईमान बाळगणाऱ्यांनी निडर पणे लढले पाहीजे. मग त्यांच्या विरोधात त्यांचे अगदी जवळचे नाते वाईक का असेनात. ते ज्या अर्थी अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या विरोधात उभे राहतात आणि त्याच्या धर्माविरुद्ध एकजुटपणे आघाडी उभारतात तेव्हा त्यांच्या विषयी च्या प्रेमाला ईमान बाळगणाऱ्यांच्या मनात जागा कोठून राहील आणि ते यांच्याशी कोणत्या प्रकारे मैत्री व सलोख्याचे संबंध राखू शकतील. ईमाना ची निकड हीच की अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या शत्रूला आपला शत्रू जाणावे मग तो कोणी ही असो. पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींनी याचे मोठे उच्च उदाहरण मांडले यास्तव बद्रच्या युद्धात त्यांनी आपल्या अगदी जवळच्या नातेवाईकांना ठार करण्यात संकोच बाळगला नाही जेव्हा त्यांनी (नातेवाईकांनी) इस्लाम व पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या विरुद्ध आघाडी उभारली होती.

४९. म्हणजे जेव्हा त्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबरा शी खऱ्याखुऱ्या एकनिष्ठतेचे वर्तन अंगिकारले तेव्हा अतिशय नाजुक प्रसंगी त्यांना अपरोक्ष-समर्थन लाभले. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या अंगी असे स्पिरीट निर्माण केले की कोणाची ही तमा न बाळगता अल्लाहच्या शत्रूंशी मर्दुमकीने सामना करण्यास तयार झाले जेहाद च्या या स्फूर्तिला رُوْحٍ مِّنْهُ 'आपल्या तर्फे आत्मा' या अर्थाने घेतले गेले आहे.

५०. ज्यांच्याशी अल्लाह राजी झाला त्यांनी सर्व काही लाभले त्यांच्या कोणती ही गोष्ट बाकी राहीले नाही. ''जन्नत'' अल्लाहच्या प्रसन्नतेचीच अभिव्यक्ति होय आणि ते अल्लाहशी राजी झाले की त्याने यांना जन्नतचा मार्ग दाखविला.

५१. आयत क्र. १९ मध्ये सैतानाच्या पक्षाचा उल्लेख होता या ठिकाणी त्याच्या उलट अल्लाहच्या पक्षाचा उल्लेख केला गेला आहे जो सफल होणारा आहे.

# सूरह अल् हश्र

# ५९. सूरह अल् हश्र

**नावः** दुसऱ्या आयतीत 'बनी नजीर' या यहूदी कबिल्यास हद्पार केले जाण्याच्या स्थितीत त्यांच्या पहिल्या हश्र चा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरह चे नाव 'अल हश्र' असे आहे.

**अवतरण काळ :** मदनी आहे आणि हि. स. ४ मध्ये अवतरली.

**मध्यवर्ति कल्पनाः** अल्लाह व त्याच्या पैगंबरा विरूद्ध उभे राहणाऱ्यांना बनी नज़ीर च्या अपमान कारक परिणति ने बोध घडविणे आणि ईमान बाळगणाऱ्यांना त्या समस्यां बाबत, ज्या बनी नजीर शी युद्ध संदर्भात उद्भवल्या होत्या, मार्गदर्शन करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ प्रस्तावना स्वरुप आयत आहे. ज्यात हे सांगितले गेले आहे की आकाशां मधील व जमीनीवरील प्रत्येक चीज वस्तू अल्लाहची तस्बीह (पावित्र्या सह गुणगान) करते.

आयत क्र. २ ते ४ मध्ये ग्रंथ धारकांचा (अर्थात यहुदींचा) एक समूह 'बनी नजीर' याची, जो अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या विरोधात उभा ठाकला होता, बोधकारक परिणती सांगितली गेली आहे.

आयत क्र.५ ते १० मध्ये उद्भवलेल्या समस्यां बाबत ईमान बाळगणाऱ्यांना मार्गदर्शन केले गेले आहे.

आयत क्र. ११ ते १७ मध्ये दांभिकांच्या वर्तना बद्दल कानउघाडणी केली गेली आहे जे इस्लाम व मुस्लामानांच्या विरुद्ध यहुदींशी मिळून कट कारस्थान करीत होते.

आयत क्र. १८ ते २४ सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात प्रभावपूर्ण उपदेश व अल्लाह चे भय निर्माण करणाऱ्या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत.

# ५९. सूरतुल हश्र

سُوْرَةُ الْحَشْرِ

आयती - २४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अल्लाहचे पावित्र्या सह गुणगान करतात त्या समस्त वस्तू ज्या आकाशात व जमीनीवर आहेत [१] आणि तोच वर्चस्वशाली व बुद्धिमान आहे.[२]

سَبَّحَ لِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ ۚ وَهُوَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ ①

२. तोच होय, ज्याने त्या लोकांना, जे ग्रंथ धारकां पैकी काफीर झालेत, त्यांच्या घरातून पहिल्या हश्र (आपत्ति) करीता बाहेर घालविले [३] तुम्हाला कल्पना ही नव्हती की ते निघून जातील [४] आणि ते समजत होते की त्यांचे किल्ले त्यांना अल्लाह (च्या पकडी) पासून वाचवतील [५] परंतु अल्लाहची पकड त्यांच्यावर त्यादिशेने झाली जिकडे त्यांनी कल्पना ही केली नव्हती. आणि त्याने त्यांच्या मनात रोब (दबदबा) निर्माण केला [६] ते स्वत: आपल्या हातांनी आपली घरे ओसाड करीत होते आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या हस्ते ही. [७] तेव्हा बोध ग्रहण करा हे डोळस असलेल्यांनो ![८]

هُوَ الَّذِيْٓ اَخْرَجَ الَّذِيْنَ كَفَرُوْا مِنْ اَهْلِ الْكِتٰبِ مِنْ دِيَارِهِمْ
لِاَوَّلِ الْحَشْرِ ۗ مَا ظَنَنْتُمْ اَنْ يَّخْرُجُوْا وَظَنُّوْٓا اَنَّهُمْ مَّانِعَتُهُمْ حُصُوْنُهُمْ
مِّنَ اللّٰهِ فَاَتٰىهُمُ اللّٰهُ مِنْ حَيْثُ لَمْ يَحْتَسِبُوْا ۙ وَقَذَفَ فِيْ
قُلُوْبِهِمُ الرُّعْبَ يُخْرِبُوْنَ بُيُوْتَهُمْ بِاَيْدِيْهِمْ وَاَيْدِي الْمُؤْمِنِيْنَ ۙ
فَاعْتَبِرُوْا يٰٓاُولِي الْاَبْصَارِ ②

३. जर अल्लाह ने यांच्या करीता हद्दपारी लिहीली नस्ती तर त्याने जगात त्यांना अजाब दिला असता [९] आणि आखिरत मध्ये त्यांच्या करीता दोजख चा अजाब आहे.[१०]

وَلَوْلَآ اَنْ كَتَبَ اللّٰهُ عَلَيْهِمُ الْجَلَاۗءَ لَعَذَّبَهُمْ فِي الدُّنْيَا ۭ وَلَهُمْ
فِي الْاٰخِرَةِ عَذَابُ النَّارِ ③

४. हे अशासाठी की ते अल्लाह व त्याच्या पैगंबरा विरुद्ध उभे राहीले आणि जो अल्लाहच्या विरुद्ध उभा राहीला [११]तर अल्लाह शिक्षा देण्यात मोठा सक्त आहे.

ذٰلِكَ بِاَنَّهُمْ شَاۗقُّوا اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ ۚ وَمَنْ يُّشَاۗقِّ اللّٰهَ فَاِنَّ اللّٰهَ
شَدِيْدُ الْعِقَابِ ④

१. याचे स्पष्टीकरण सूरह हदीद टीप क्र. १मध्ये केले गेले आहे.

२. यास्तव बनी नजीर शी झालेल्या युद्धात अल्लाहचे वर्चस्व व त्याची बुद्धि कौशल्य युक्त उपाय योजना दिसून आली.

३. अभिप्रेत बनी नजीर होय, ज्यांचे मदीनेहून स्थलांतर झाले हा यहूदी कबीला होता जो मदीनेच्या परिसरात वास्तव्य करुन होता. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा हिजरत करुन मदीना येथे गेले तेव्हा त्यांच्या व या कबिल्याचा दरम्यान तह-करार झाला होता. परंतु ते याचा उघड भंग करीत राहीले त्यांचा नेता कअब बिन अशरफ याने मक्का येथे जाऊन अनेकेश्वर वाद्यांना मुसलमानां विरुद्ध भडकाविले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रतिष्ठेला गालबोट लावत राहीला आणि मुस्लिम स्त्रीयांच्या विरुद्ध लज्जास्पद प्रचार करीत राहीला. शेवटी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आदेशान्वये त्याची हत्या करण्यात आली. तरी देखील या लोकांनी कुरापती काढण्याचे थांबविले नाही. त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या येथे बोलावून भिंतीवरून एक मोठा दगड त्यांच्या अंगावर टाकून त्यांना ठार करण्याचा कट रचला. तेव्हा पैगंबराना वेळेवर अल्लाहने या बाबत सचेत केले ज्यामुळे ते अगदी सुरक्षित राहीले. तेथून मदीना परत येऊन त्यांनी आदेश दिला की बनी नजीर काबिल्या च्या लोकांनी बीस दिवसाच्या आत मदीने बाहेर निघून जावे परंतु त्यांनी इन्कार केला शेवटी पैगंबरांनी आपल्या सहवासातील अनुयायींसह त्यांना वेढा घातला. ते प्रभावहीन झाले व त्यांची लढण्याची हिंमत खचली. शेवटी या गोष्टीस तयार झाले की ते आपले घरदार सोडून मदीने बाहेर निघून जातील म्हणून जेवढे सामान आपल्या सोबत ते घेऊन जाऊ शकत होते तेवढे नेण्याची त्यांना अनुमती दिली जावी. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या गोष्टीची अनुमति दिली यास्तव त्यांनी स्वत: आपल्या हातांनी आपल्या घरांची तोडफोड केली. या साठी की दरवाजे वगैर सोबत नेता यावेत. बनी नजीर कबिल्याच्या स्थानांतराची ही घटना रबिउल अव्वल हि. स. ४ मध्ये घडली.

आयतीत त्यांच्या या प्रमाणास प्रथम हश्र या अर्थाने घेतले गेले आहे. हश्र चा अर्थ एकत्र करणे ज्या अर्थी त्यांना मदीने बाहेर घालवून आपल्या कुफ्र चारित्र्या प्रत पोहचविण्या साठी एकत्र केले गेले होते. म्हणून यास हश्र या अर्थाने घेतले गेले आहे आणि प्रथम हश्र संबोधून या गोष्टी कडे संकेत केला गेला आहे की त्यांचा दुसरा हश्र देखील होणार आहे यास्तव हजरत उमर यांनी आपल्या खिलाफत च्या काळात त्यांना अरब जजीरा बाहेर काढले.

४. म्हणजे बाह्यत: परिस्थिती तुम्ही विचार करु शकत नव्हते की ते एवढ्या सहजपणे मदीना सोडून निघून जातील.

५. म्हणजे त्यांचा विश्वास साधनांवर होता व ते समजत होते की त्यांचे मक्कम किल्ले त्यांच्या बचाव करीता पुरेसे ठरतील.

६. अल्लाहची उपाय योजना अशी झाली की त्यांच्या मनावर असा रोब टाकला गेला की ते मोठेपणा ची घमेंड विसरले; ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आपल्या सहकाऱ्यांसह एवढया साहसाचे पाऊल उचललेले पाहून भयभीत झाले आणि म्हणूनच त्यांना मुकाबला करण्याची हिमंत झाली नाही.

तात्पर्य, अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांची असामान्य मदत अशा प्रकारे ही करतो की त्यांच्या शत्रूंच्या मनावर रोब पाडून त्यांचे धैर्य कमी करतो. विशेषत: अशा प्रसंगी जेव्हा शत्रू शक्तीशाली असावा व ईमान बाळगणाऱ्यां जवळ साधनांची कमतरता असावी; परंतु असे असतांना ही ते ईश आदेशाची अमल बजावणी करण्यासाठी शिर हातावर घेऊन जेहाद साठी निघावेत.

७. ते आपल्याच हातांनी आपल्या घरांना अशासाठी भग्न करीत होते की आपल्या घरांचे दरवाजे वगैरे काढून सोबत न्यावेत तसेच या साठी ही की मुसलमानांना ही घरे चांगल्या स्थितीत मिळू नयेत. राहीले मुसलमानां द्वारे यांच्या घरांना नेस्तनाबूत करणे तर ते युद्धविषयक गरजेनुसार होते.

८. बनी नजीर च्या या परिणती पासून प्रत्येक डोळस माणसाला बोध ग्रहण करण्याचे आवाहन केले गेले आहे. ते एवढे सामर्थ्य व वैभव बाळगून ही पैगंबरांच्या विरोधात टिकू शकले नाहीत आणि त्यांना अपमानाला तोंड द्यावे लागले. अल्लाहची मदत पैगंबरा सोबत असते. यास्तव जो समूह देखील पैगंबराशी दोन हात करण्याचा प्रयत्न करतो, त्याला तोंड घशी पडावे लागते.

९. म्हणजे अल्लाहतर्फे हा निर्णय लागलेला होता की बनी नजीर कबिल्याला हद्दपार केले जावे, ज्यात त्यांच्या करीता ही संधी बाकी आहे की या घटने पासून बोध ग्रहण करावा व अल्लाह समोर क्षमा याचना करुन आपल्या आचरणात सुधारणा करावी. अन्यथा अल्लाह त्यांना अशा शिक्षा देऊ शकत होता की त्यांचा समूळ नाश झाला असता. एकतर त्यांना ठार केले गेले असते, जसे नंतर बनी कुरेजाच्या बाबतीत झाले. बनी कुरेजाच्या सर्व पुरुषांना ठार केले गेले.

स्पष्ट असावे की बनी नजीर ईश-ग्रंथ बाळगणारे होते ज्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी करार केला होता, आणि नंतर प्रतारणा केली म्हणून त्यांना याची

शिक्षा दिली गेली की त्यांना हद्दपार केले जावे, जेणे करुन इस्लामाचे केंद्रस्थान असलेले मदीना शहर, यांच्या कट कारस्थान पासून सुरक्षित रहावे. जिझिया घेण्याचा जो आदेश दिला गेला आहे तो सर्व सामान्य ग्रंथ धारकां बाबत आहे आणि हा आदेश नंतर अवतरला जो सूरह तौबा मध्ये आहे.

१०. म्हणजे आखिरत मध्ये तर यांना आपल्या कुफ्र ची शिक्षा भोगण्या करीता जहन्नम मध्ये जावेच लागेल.

११. अल्लाहच्या विरुद्ध उभे राहण्याचा अर्थ इस्लाम च्या विरुद्ध दंड थोपटणे कारण 'इस्लाम' अल्लाहने अवतरीत केलेला धर्म आहे; जो समस्त माणसां करीता त्याचे फर्मान आहे. या फर्माना विरुद्ध इस्लाम शी मुकाबला करण्यास्तव उभे राहणे, अल्लाहच्या विरोधात उभे राहणे होय.

*खजूरींची झाडे, जी तुम्ही कापली किंवा ज्यांना मुळ सकट उभे सोडले तर हे अल्लाहच्या आदेशाने झाले (आणि त्याने हा आदेश अशा साठी दिला) जेणे करुन दुराचाऱ्यांना त्याने अपमानित करावे.(अल-क़ुर्आन)*

५. खजूरींची झाडे, जी तुम्ही कापली किंवा ज्यांना मुळ सकट उभे सोडले तर हे अल्लाहच्या आदेशाने झाले [१२] (आणि त्याने हा आदेश अशा साठी दिला) जेणे करुन दुराचाऱ्यांना त्याने अपमानित करावे.

مَا قَطَعْتُمْ مِّنْ لِّيْنَةٍ اَوْ تَرَكْتُمُوْهَا قَآئِمَةً عَلٰٓى اُصُوْلِهَا فَبِاِذْنِ اللّٰهِ
وَلِيُخْزِيَ الْفٰسِقِيْنَ ۝٥

६. आणि अल्लाहने जी सम्पत्ति त्यांच्या ताब्यातून काढून आपल्या पैगंबरास दिली [१३] तर या बाबत तुम्ही ना आपले घोडे दामटविले होते आणि ना उंट. [१४] किंबहुना अल्लाह आपल्या पैगंबरांना ज्यांच्यावर इच्छितो वर्चस्व प्रदान करतो.[१५] आणि अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

وَمَآ اَفَآءَ اللّٰهُ عَلٰى رَسُوْلِهٖ مِنْهُمْ فَمَآ اَوْجَفْتُمْ عَلَيْهِ مِنْ خَيْلٍ
وَّلَا رِكَابٍ وَّلٰكِنَّ اللّٰهَ يُسَلِّطُ رُسُلَهٗ عَلٰى مَنْ يَّشَآءُ ۗ وَاللّٰهُ عَلٰى
كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ۝٦

७. जे काही अल्लाह वसाहती वाल्यां तर्फे आपल्या पैगंबराला देवविल, [१६] ते अल्लाह आणि रसूल व नातेवाईक व अनाथ आणि गोर गरीब व प्रवाशां करीता आहे.[१७] अशा साठी की हे (धन) तुमच्यातल्या धनवानांच्याच दरम्यान फिरत राहू नये.[१८] आणि पैगंबर जे तुम्हाला देईल ते घ्या व ज्या पासून रोखेल, त्या पासून आलिप्त रहा [१९] आणि अल्लाह चे भय बाळगा. नि:संशय अल्लाह सक्त शिक्षा देणारा आहे.

مَآ اَفَآءَ اللّٰهُ عَلٰى رَسُوْلِهٖ مِنْ اَهْلِ الْقُرٰى فَلِلّٰهِ وَلِلرَّسُوْلِ
وَلِذِى الْقُرْبٰى وَالْيَتٰمٰى وَالْمَسٰكِيْنِ وَابْنِ السَّبِيْلِ ۙ كَيْ لَا
يَكُوْنَ دُوْلَةً ۢ بَيْنَ الْاَغْنِيَآءِ مِنْكُمْ ۗ وَمَآ اٰتٰىكُمُ الرَّسُوْلُ فَخُذُوْهُ ۚ وَ
مَا نَهٰىكُمْ عَنْهُ فَانْتَهُوْا ۚ وَاتَّقُوا اللّٰهَ ۗ اِنَّ اللّٰهَ شَدِيْدُ الْعِقَابِ ۝٧

८. हे (धन) त्या गरजवंत मुहाजिरीन (स्वदेश त्याग केलेल्या मुसलमानां) करीता आहे ज्यांना आपल्या घरां पासून व धन सम्पत्ति पासून विभक्त केले गेले आहे.[२०]जे अल्लाह ची कृपा व त्याची प्रसन्नता इच्छितात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराची मदत करतात. हेच लोक सदाचारी आहेत.[२१]

لِلْفُقَرَآءِ الْمُهٰجِرِيْنَ الَّذِيْنَ اُخْرِجُوْا مِنْ دِيَارِهِمْ وَاَمْوَالِهِمْ
يَبْتَغُوْنَ فَضْلًا مِّنَ اللّٰهِ وَرِضْوَانًا
وَّيَنْصُرُوْنَ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ ۗ اُولٰٓئِكَ هُمُ الصّٰدِقُوْنَ ۝٨

९. आणि जे लोक यांच्या पूर्वीच (मदीना येथे) स्थायिक होऊन व ईमान बाळगून होत. ते या लोकांशी प्रेम करतात जे हिजरत (देश-त्याग) करुन यांच्या जवळ आले आहेत.आणि जे काही यांना दिले जावे, त्याची कसलीही गरज त्यांना आपल्या मनात जाणवत नाही. आणि ते यांना आपल्या वर प्राधान्य देतात. मग ते स्वत: गरजवंत असले तरी. [२२] आणि जे लोक आपल्या मनाच्या संकुचित पणा पासून सुरक्षित ठेवले गेले तेच यश प्राप्त करणारे आहेत.[२३]

وَالَّذِيْنَ تَبَوَّءُو الدَّارَ وَالْاِيْمَانَ مِنْ قَبْلِهِمْ يُحِبُّوْنَ مَنْ هَاجَرَ
اِلَيْهِمْ وَلَا يَجِدُوْنَ فِيْ صُدُوْرِهِمْ حَاجَةً مِّمَّآ اُوْتُوْا وَيُؤْثِرُوْنَ
عَلٰٓى اَنْفُسِهِمْ وَلَوْ كَانَ بِهِمْ خَصَاصَةٌ ۗ وَمَنْ يُّوْقَ شُحَّ نَفْسِهٖ
فَاُولٰٓئِكَ هُمُ الْمُفْلِحُوْنَ ۝٩

१२. बनी नजीर कबिल्याच्या बागेत खजूरींची जी झाडे होती त्यांच्या पैकी काही झाडांना युद्धाविषयक गरजे पोटी मुसलमानांनी कापून टाकले आणि काही झाडांना राहू दिले. अर्थात हे सर्व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या उपस्थितीत व त्याच्या मार्गदर्शनानुसार झाले. यास्तव हे कार्य अल्लाहच्या आदेशानुसार पार पडले आणि म्हणूनच युद्धविषयक गरजे पोटी केल्या गेलेल्या या विध्वंसक कार्या बाबत मनात शंका कुशंका आणण्याचे काही एक कारण नाही.

आजच्या काळात फार मोठया प्रमाणात शत्रूपक्षाच्या ठिकाणांवर बॉम्ब वर्षाव करावा लागतो, त्याची विमाने पाडावी लागतात आणि त्याच्या अन्न-शस्त्रादि पुरवठा खंडीत करावा लागतो. या संदर्भात या आयतीद्वारे हे आकलन होते की जेहादच्या उद्दिष्टा करीता ही सर्व कारवायी केली जाऊ शकते असे न केले गेले तर जेहाद ला काही अर्थच राहणार नाही व शत्रू उलट वरचढ होईल.

१३. या प्रकारच्या सम्पत्तिला अरबी परिभाषेत 'फै' म्हणतात. ज्याचा अर्थ परतविणे असा आहे. अर्थात सम्पत्ति काफिरांच्या ताब्यातून घेऊन मुसलमानां कडे स्थानांतरीत करणे.

१४. बनी नजीर कबिल्या शी झालेले युद्ध रक्तपाता विना च जिंकले गेले होते. यात मुसलमानांना आपल्या घोडे व उंटा सह धावपळ करावी लागली नाही. किंबहुना मदीने पासून फार जवळ असल्या मुळे ते पायी चालत आले होते म्हणून त्यांची जी धनसंपदा मुसलमानांच्या हाती लागली तिचे स्वरूप युद्धात जिंकलेल्या सम्पत्ति हून वेगळे होते. यालाच माले गनीमत म्हणतात जो युद्धात शत्रूशी लढून त्याला पराभूत करुन मिळविला जातो व ज्यात मुसलमानांना आपले घोडे उंट वगैरे वापरावे लागतात. सूरह अन्फाल आयत क्र. ४१ मधील निवेदनानुसार माले गनीमत चा ४/५ हिस्सा लढणाऱ्या सैनिकां मध्ये विभागून दिला जातो. परंतु न लढता मिळविलेली सम्पत्ति सैनिकां मध्ये वाटली जात नाही. तिचा विनिमय पुढच्या आयतीत सांगितला गेला आहे.

१५. म्हणजे अल्लाहच्या विशेष मदती मुळे पैगंबरांना आपल्या शत्रूवर वर्चस्व प्राप्त होत राहीले आणि या प्रसंगी ही त्याची विशेष मदत दिसून आली अर्थात ही मदत रोब, दबदबा च्या स्वरुपात दिसून आली. अर्थात बनी नजीर कबिल्याच्या मनावर मुसलमांनचा दबदबा बसला परिणामी रक्तपाताची वेळ आली नाही.

१६. म्हणजे ज्या वस्त्या देखील जिंकल्या गेल्या आणि त्यांची धन संपदा 'फै' म्हणून तुमच्या ताब्यात आली तर या विषयीचा जो आदेश आहे पुढे निवेदिला जात आहे.

१७. 'माले फै' चा पहिला विनिमय अल्लाहच्या खातीर खर्च करणे, अर्थात त्याच्या धर्माच्या प्रचार व प्रसारास्तव व जेहाद करीता खर्च करणे

दुसरा विनिमय हा की पैगंबराचा यात हक्क आहे, या साठी की पैगंबर आपल्या ज्या गरजांवर किंवा ज्या कारणांवर खर्च करु इच्छितील करु शकतात. स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) प्रेषित पदाच्या जबाबदारी मुळे अर्थापार्यनास्तव ना धावपळ करु शकत होते आणि ना त्यांनी स्वत:साठी व आपल्या कुटुंबिया साठी जकात कर्तव्य-दान) ला योग्य ठरविले होते यास्तव अल्लाहने माले फै मध्ये त्यांचा हिस्सा निर्धारित केला. हा हिस्सा प्रेषित पदाच्या आधारावर म्हणून त्यांच्या नंतर बाकी रीहीला नाही. हे ही स्पष्ट असावी की समस्त पैगंबर आपल्या मागे वारसा सोडत नाहीत, त्यांनी जे काही आपल्या पश्चात सोडले ते दान होते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले :-

لَانُوْرَثُ مَاتَرَكْنَا صَدَقَةٌ ـ (بخاری کتاب الخمس)

'आमचा कोणी ही वारसदार नाही आम्ही जे काही सोडले ते दान होय'. (बुखारी)

तिसरा विनिंमय नातेवाईकांसाठी होय. यास अभिप्रेत पैगंबरांचे नातेवाईक होत. यात बनू हाशीम आणि बनू मुत्तलीब होते, यांच्या करीता पैगंबरांनी जकात (कर्तव्य-दान) निषिद्ध ठरविले होते या कुटुंबियांनी पैगंबरांना साथ दिली होती म्हणून अल्लाहने माले फै द्वारे त्यांना लाभान्वित करण्याची उपाय योजना केली.

चौथा, पाचवा व सहावा विनियम अनाथ, गोर गरीब व प्रवाशां करीता खर्च करणे होय अर्थात हा खर्च त्यांचे दारिद्र व त्यांची अगातिकता दूर करण्या करीता आहे. हा वर्ग आर्थिक दृष्टया कूमकुवत व गरीबीने गांजलेला आहे, जो सर्व प्रकारच्या मदतीस पात्र आहे. यास्तव माले फै मध्ये त्यांचा हिस्सा राखला गेला.

१८. ही फार मोठी तात्विक बाब होय, जी या प्रसंगी सांगितली गेली आणि ती अशी की सम्पत्ति चा ओघ केवळ श्रीमंता कडेच झुकलेला राहू नये. इस्लामी अर्थशास्त्रा (Islamic Economy) चा रोख सम्पत्तिच्या फैलाव कडे आहे. ती केंद्रिभूत (Concentration) होण्याकडे नव्हे. जकात, सदका (दान) कफ्फारा (प्राश्चिश्चित्त) अदा करणे आणि माले गनिमत व माले फै मध्ये गरीब वर्गाला हिस्सेदार बनवून त्याची आर्थिक स्थिती अधिक चांगली करण्याची उपाय योजना केली गेली आहे. तसेच व्याजा ला हराम (निषिद्ध) ठरवून गरीबांचे शोषण करण्या पासून श्रीमंतांना रोखले गेले आहे. या व्यतिरिक्त वारसाच्या वाटणी द्वारे ही सम्पत्ति ला व्यापक करण्याचा मार्ग अंगिकारला गेला आहे. ही आणि या प्रकारच्या

इतर ताकीदी द्वारे इस्लामने एका अशा आर्थिक व्यवस्थे (Economic System) ची स्थापना केली आहे, ज्यात समतोल ही आहे आणि समाजातील विविध वर्गांशी न्याय ही व अत्याधिक संतुलन ही. त्याने त्या पद्धति चा नायनाट केला आहे ज्यामुळे गरीब अधिकाधिक गरीब आणि श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत जातात त्याची आर्थिक व्यवस्था ना श्रीमंतांच्या लाभाची आहे आणि ना एखाद्याचा हक्क हिरावून घेणारी. यात ना एकाच प्रकारची निरसता आहे आणि ना अतिशय टोकाची भूमिका आहे, किंबहुना ती सत्य व न्यायाचा एक परिपूर्ण आदर्श आहे.

१९. हे आणखी एक तात्विक मार्गदर्शन आहे; जे या प्रसंगी केले गेले उक्ति-संदर्भाच्या दृष्टीने याचा अर्थ असा की माले फै मधून पैगंबर ज्याला जे काही देतील ते त्याने स्विकारावे आणि ज्याला देणार नाहीत त्याने ना मागणी करावी, ना आक्षेप घ्यावा. परंतु या वाक्यांशाचा अर्थ एवढया पुरताच मर्यादित नाही, किंबहुना याच्या व्यापक अर्थात ही गोष्ट ही सामील आहे की पैगंबर जो आदेश देतील त्याचे पालन करा व ज्या गोष्टी ची मनाई करतील तिच्या पासून आलिप्त रहा. हदीस वचनात ही याचे स्पष्टीकरण केले गेले आहे.

اِذَا اَمَرْتُكُمْ بِاَمْرٍ فَاْتُوْ مِنْهُ مَااسْتَطَعْتُمْ وَمَانَهَيْتُكُمْ
عَنْهُ فَاجْتَنِبُوْهُ۔ (بخاری۔مسلم)

''जेव्हा मी तुम्हाला एखाद्या गोष्टीचा आदेश देईन तेव्हा जेवढे तुमचे सामर्थ्य असेल तेवढे पालन करा व ज्या गोष्टीस प्रतिबंध घालीन तिच्यापासून अलिप्त व्हा.'' (बुखारी-मुस्लिम)

आता ही गोष्ट की पैगंबर (सल्लल्लहु अलैहि वसल्लम) यांनी कोणकोणती कामे करण्याचा आदेश दिला व कोणत्या गोष्टीची मनाई केली, त्यांच्या आचरणाद्वारेच कळू शकते. अर्थात त्यांचा आचरणाला जाणून घेण्याचे माध्यम अहादीसे सहीह (सत्य प्रेषित वचनांचे संकलन) आहे. म्हणून अहादीसे सहीह ची आवश्यकता, महत्व व ते प्रमाण असण्या बद्दल इन्कार केला जाऊ शकत नाही अन्यथा कुरआनाच्या या आदेशाची अवज्ञा होईल. येथे हे ही लक्षात घेतले पाहीजे की प्रमाण अहादीसे सहीह च होय कमकुवत सनद बाळगणारी वचने, व बिनवुडाची कथने नव्हते. परंतु या जन समूहात निराधार कथनांनी मूळ धरले आहे ज्याने धर्माचे मूळ स्वरुप बदलून टाकले आहे. हे पैगंबरांचे आज्ञापालन कदापि नव्हे की सर्व प्रकारच्या कथनांना, ज्यांचा पैगंबरांशी संबंध जोडला जावा, त्यांना मात्र स्वीकार केले जावे, मग ती कथने कुरआन व पैगंबरांच्या आचरणा विरुद्ध का असेनात अशा प्रकारच्या कथनांचा इन्कार करणे हे पैगंबरांचे आज्ञा पालन होय, स्विकारणे नव्हे.

२०. अर्थात गरीब मुहाजिरीन (जे मक्केहून हिजरत करुन मदीना आले आहेत) या गोष्टीस प्रामुख्याने पात्र आहेत की माले फै मधून त्यांच्यावर खर्च केला जावा. कारण हिजरत करण्यास विवश झाल्यामुळे त्यांना आपले घरदार व मालमत्ता सोडावी लागली आणि खाली हातांनी त्यांना मदीना येथे जावे लागले.

२१. म्हणजे हे मुहाजीर केवळ देशत्याग केलेले लोक नव्हते, तर उच्च चारित्र्याचे स्वामी होते. अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे हेच त्यांचे ध्येय उद्दिष्ट होते. अल्लाहचा धर्म व त्याच्या प्रेषिता चे सहाय्य करण्यात ते सदैव पुढे राहतात आणि सदाचार हा त्यांचा बाणा आहे. जेव्हा त्यांनी धर्मा करीता ही बलीदाने दिलीत तेव्हा ते या गोष्टीस पात्र आहेत की अल्लाहच्या या असामान्य देणगीने जो माले फै च्या स्वरुपात इस्लामी शासनास लाभला आहे यांची भरपूर मदत केली जावी. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी बनी नजीर कबिल्या पासून लाभलेल्या सम्पत्तिचा मोठा हिस्सा मुहाजिरीन च्या दरम्यान विभागून दिला.

२२. हे मदीनेच्या अन्सार चे कदर करणे होय की मुहाजिरीन लोकांचे मदीनेत आगमन होण्या पूर्वी त्यांनी ईमान बाळगून या शहराला आपले निवास-स्थान बनविले होते जे नंतर 'दारुल हिजरत' ठरले त्यांनी या मुहाजिरीन लोकांना आपल्या शिरावर ओझे म्हणून जाणले नाही, किंबहुना त्यांचे मन:पूर्वक स्वगात केले व आपल्या मनात त्यांना स्थान दिले. बनी नजीर कबिल्या कडून हस्तगत केलेल्या सम्पत्ति मधून अन्सार वगळता मुहाजिरीन लोकांना जे काही दिले गेले त्याबद्दल त्यांनी आपल्या मनात ना संकोच बाळगला आणि ना आक्षेपाचा शब्द तोंडातून काढला. वास्तविक त्या सम्पत्तित त्यांनाही सामील केले जाऊ शकत होते. परंतु त्यांनी स्वत:वर त्या गरीब मुहाजीर लोकांना प्राधान्य दिले अर्थात हा त्यांचा फार मोठा त्याग होता.

२३. मनाचा संकुचितपणा संपूर्ण कर्मविषयक जीवना वर प्रभाव पाडतो आणि माणसाला विनाशाच्या मार्गाला लावते यास्तव या संकोच वृत्ती पासून सुरक्षित राहण्याची सुबुद्धि ज्याला लाभली त्याला जणू यशाची हमी मिळाली.

*आणि जे लोक यांच्या नंतर आले ते दुआ (प्रार्थना) करतात की हे आमच्या पालन कर्त्या ! आम्हाला ही माफ कर आणि आमच्या या बांधवांना ही, ज्यांनी आमच्या पूर्वी ईमान बाळगले आहे. आणि आमच्या मनात ईमान बाळगणाऱ्यां करीता कसले ही कपट राखू नको. हे आमच्या पालन कर्त्या ! तू मोठा स्नेहशील व दयाळू आहेस. (अल-क़ुर्आन)*

१०. आणि जे लोक यांच्या नंतर आले [२४] ते दुआ (प्रार्थना) करतात की हे आमच्या पालन कर्त्या! आम्हाला ही माफ कर आणि आमच्या या बांधवांना ही,ज्यांनी आमच्या पूर्वी ईमान बाळगले आहे. आणि आमच्या मनात ईमान बाळगणाऱ्यां करीता कसले ही कपट राखू नको.[२५] हे आमच्या पालन कर्त्या ! तू मोठा स्नेहशील व दयाळू आहेस.

وَالَّذِينَ جَاءُوا مِنْ بَعْدِهِمْ يَقُولُونَ رَبَّنَا اغْفِرْ لَنَا وَلِإِخْوَانِنَا
الَّذِينَ سَبَقُونَا بِالْإِيمَانِ وَلَا تَجْعَلْ فِي قُلُوبِنَا غِلًّا لِلَّذِينَ
آمَنُوا رَبَّنَا إِنَّكَ رَءُوفٌ رَحِيمٌ ١٠

११. तुम्ही त्या दांभिकांना नाही पाहीले,[२६] जे आपल्या त्या भावांना जे ग्रंथ धारकां पैकी काफिर झाले, म्हणतात [२७]की जर तुम्हास बाहेर घालविले गेले तर आम्ही ही तुमच्या सोबत निघू आणि तुमच्या बाबतीत आम्ही कदापि कोणाचे म्हणणे मानणार नाहीत आणि जर तुम्हा लोकांशी युद्ध केले गेले तर आम्ही अवश्य तुमची मदत करु, परंतु अल्लाह साक्ष देतो की हे लोक अगदी खोटारडे आहेत.

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ نَافَقُوا يَقُولُونَ لِإِخْوَانِهِمُ الَّذِينَ كَفَرُوا
مِنْ أَهْلِ الْكِتَابِ لَئِنْ أُخْرِجْتُمْ لَنَخْرُجَنَّ مَعَكُمْ وَلَا نُطِيعُ
فِيكُمْ أَحَدًا أَبَدًا وَإِنْ قُوتِلْتُمْ لَنَنْصُرَنَّكُمْ وَاللَّهُ يَشْهَدُ إِنَّهُمْ
لَكَاذِبُونَ ١١

१२. जर त्यांना बाहेर घालविले गेले तर हे त्यांच्या सोबत निघणार, नाहीत; आणि जर त्यांच्याशी युद्ध केले गेले तर हे त्यांची मदत करणार नाहीत [२८] आणि जर मदत करतील ही तर पाठ फिरवतील मग त्यांची [२९] मदत नाही केली जाणार.

لَئِنْ أُخْرِجُوا لَا يَخْرُجُونَ مَعَهُمْ وَلَئِنْ قُوتِلُوا لَا يَنْصُرُونَهُمْ وَلَئِنْ
نَصَرُوهُمْ لَيُوَلُّنَّ الْأَدْبَارَ ثُمَّ لَا يُنْصَرُونَ ١٢

१३. तुमचे भय त्यांच्या मनात अल्लाह पेक्षा अधिक आहे, या साठी की हे लोक सुज्ञता बाळगत नाहीत.[३०]

لَأَنْتُمْ أَشَدُّ رَهْبَةً فِي صُدُورِهِمْ مِنَ اللَّهِ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ
قَوْمٌ لَا يَفْقَهُونَ ١٣

१४. हे कधी ही एकत्रित होऊन तुमच्याशी लढणार नाहीत, किंबहुना किल्लेबंद वस्त्यां मध्ये किंवा भिंतींच्या आडून लढतील.[३१] यांची लढाई आपसात मोठी-सक्त आहे, तुम्ही यांना संघटीत जाणता, परंतु यांची मने विदीर्ण आहेत.[३२] याचे कारण असे की हे लोक बुद्धि चा वापर करीत नाही.[३३]

لَا يُقَاتِلُونَكُمْ جَمِيعًا إِلَّا فِي قُرًى مُحَصَّنَةٍ أَوْ مِنْ وَرَاءِ
جُدُرٍ بَأْسُهُمْ بَيْنَهُمْ شَدِيدٌ تَحْسَبُهُمْ جَمِيعًا وَقُلُوبُهُمْ
شَتَّىٰ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَوْمٌ لَا يَعْقِلُونَ ١٤

२४. म्हणजे जे लोक मुहाजीरीन व अन्सार नंतर आले, त्यात या सूरह च्या अवतरणाच्या वेळे पासून कियामती पावेतो चे ईमानधारक सामील आहेत. त्यांचा उल्लेख या ठिकाणी ज्या प्रकारे केला गेला आहे त्यावरुन हा निष्कर्ष निघतो की माले फै चा लाभ त्यांना ही पोहचला पाहीजे. यास्तव हजरत उमर यांनी आपल्या खिलाफतीच्या काळात जेव्हा इराक व सिरीया देश जिंकले, तेव्हा त्यांच्या जमीनी विजेत्यां मध्ये वाटून दिल्या नाहीत, किंबहुना या आयतीने युक्तिवाद करीत त्याना समस्त मुसलमानां करीता देऊन टाकल्या या साठी की भावी काळातील वंशजा निही यापासून लाभ घ्यावा. हे उद्दिष्ट लक्षात घेता त्या जमीन त्याच स्थानिक रहिवाश्यांच्या ताब्यात राहू दिल्या आणि त्यांच्यावर खिराज लागू केला. खिराज च्या मिळकती चा फार मोठा फायदा हा ही झाला की यामुळे सीमांच्या संरक्षण व्यवस्थेत सवलत झाली आणि जेहाद करीता धन संपदा उपलब्ध झाली. (अधिक तपशील - करीता पहा किताबुल खिरज - अबुयूसुफ - प्रकरण. ३)

२५. हे या गोष्टीचे प्रोत्साहन होय की नंतर येणाऱ्यांनी आपल्या या पूर्वजा करीता प्रार्थना करीत राहीले पाहीजे कारण यांच्याच अनमोल बलीदानां मुळे व अल्लाहची कृपा ने इस्लाम चे शिर उंचाविण्यास कारणीभूत ठरले आणि ही त्यांचीच जीवआड धावपळ होती जिच्या परिणाम स्वरुपी धर्माच्या प्रसाराचे क्षेत्र अतिशय व्यापक आणि पुढच्या वंशा पावेतो पोहचले.

ही शिकवण आहे या गोष्टीची की मुसलमानांनी सहाबा ची कदर जाणली पाहीजे व त्यांच्या बाबतीत कसलीही कपट भावना मनात ठेवू नये जरी त्यांची एखादी भूल चूक ध्यानी आली असावी. यात मार्गदर्शन आहे सहाबांच्या मतभेद व दृष्टीकोना विषयी जे नंतरच्या काळात निर्माण झाले. त्यांना बरे वाईट बोलण्या पासून संयम पाळला पाहीजे परंतु मुसलमानांचा एक संप्रदाय जो हजरत अली यांच्या इमामतीची श्रद्धा बाळगतो तो चार खलीफांना, खिलाफतीस बळजबरीने हिरावून घेणारे ठरवून सहाबांना बरे वाईट बोलतो व अप शब्दांचा प्रयोग करुन त्यांचा उल्लेख करतो, म्हणजे कुरआनने ज्यांच्या हक्कात प्रार्थना करण्यास सांगितले होते, या संप्रदायाचे लोक त्यांना शिव्या शाप देतात. पक्षपाती वृत्ती ने त्यांना इतके आंधळे केले आहे की कुरआनाच्या या स्पष्ट आयती पासून ही त्यांना आकलनाचा उजेड लाभत नाही.

२६. मदीनेचे दांभिक मुसलमान ज्यांचे यहुदी लोकांशी मैत्री-संबंध होते, गुप्तरित्या त्यांचा पाठपुरावा करीत होते. म्हणून या प्रसंगी त्यांची दशा निवेदन करुन मुसलमानांना यापासून सावध केले गेले व त्यांना धीर दिला गेला की हे नेबळट लोक आहेत. तुमच्या शी लढण्या ची कधी ही हिंमत करणार नाहीत.

२७. अभिप्रेत मदीनेच्या आसपास चे यहूदी लोक होत बनी नजीर, बनी कुरेजा, इत्यादी यांना दांभिकांचे भाऊ अशासाठी म्हटले गेले आहे की यहुदी व दांभिक दोघे ही एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या.

२८. बनी नजीर ला तर त्यांनी कसलीही मदत केली नाही, राहीलेत बनी कुरेजा, तर कुरआनने हे भाकित केले आहे की ते यांच्या ही मदतीला येणार, नाहीत. यास्तव नंतर बनी कुरेजा कबिल्याशी जेव्हा मुसलमानांचा संघर्ष उद्‌भवला तेव्हा हे भाक्ति शब्दश: खरे ठरले.

२९. अर्थात यहूदीना.

३०. ही मदीनेच्या यहुदींची अवस्था सांगितली गेली आहे की ते अल्लाहपेक्षा मुसलमानांचे अधिक भय बाळगतात. कारण त्यांना अल्लाहचा विसर पडला आहे आणि मुसलमान ज्याअर्थी शिर तळहाता वर घेउन मरण्या-मारण्यास तयार असतात म्हणून त्यांच्या विरोधात येण्यास भितात. वास्तविक खरे भय अल्लाहचेच असले पाहीजे. ज्याच्या सामर्थ्याधिकारात सर्व काही आहे. परंतु नादान लोक एवढया मोठ्या हकीगतीस समजले नाहीत.

३१. यास्तव यहुदींचे हे कबीले मुसलमानांशी मुकाबला करण्यास कधीही समोर आले नाहीत. रणक्षेत्रात येऊन लढण्याची त्यांना कधी हिंमत झाली नाही. बनी नजीर कबिल्याचे लोक किल्ल्यात वेढलेले राहीले. आणि नंतर जेव्हा बनी कुरेजा व यहुदी नी खैबर येथे मुसलमानांवर हल्ला चढाविला तेव्हा त्यांनी ही मैदानात येऊन युद्ध केले नाही, किंबहुना आपल्या किल्ल्यां मध्ये बंदिस्त होऊन मुसलमानांना हानी पोहचविण्याचा प्रयत्न करीत राहीले, ज्यात ते वाईटरित्या अपयशी ठरले. आणि अशा प्रकारे कुरआनाच्या निवेदना ची सत्यता अगदी जाहीरपणे दिसून आली.

३२. म्हणजे बाह्यत: हे यहूदी एक संघ दिसून येतात, परंतु आपसातल्या शत्रूत्वा मुळे यांची मने क्षतविक्षत आहेत. त्यांनी जेव्हा अल्लाहच्या ग्रंथाला पाठीमागे टाकले आणि श्रद्धा व आचरणात नवनवीन गोष्टी (बिदआत) निर्माण केल्या तेव्हा ते गटबाजीला बळी पडले आणि या सांप्रदायिक ते मुळे एकमेकांचा द्वेष करु लागले ज्याने त्यांच्या मनांना एकमेकां पासून विभक्त केले. परिणामी त्यांच्या एकसंघतेची अनेक शकले झालीत.

३३. म्हणजे बुद्धिचा वापर करण्या ऐवजी व समंजसपणा चा पुरावा देण्या ऐवजी स्वत:ला भावना व इच्छा आकांक्षांच्या ताब्यात दिले. आणि जेव्हा एखादा समूह धर्माच्या संदर्भात सुज्ञता दर्शावित नाही तेव्हा इच्छा आकांक्षांचा अनुयायी बनून धर्माचे स्वरुप विकृत करुन टाकतो. परिणामी आपसातील मतभेद एवढया स्तराला पोहचतात की जनसमूहाची एकसंघता तुटलेल्या माळे प्रमाणे इतस्तत: विखरते.

१५. यांची ही तीच दशा होईल, जी त्या लोकांची झाली, जे यांच्या थोडयाच पूर्वी आपल्या कृत-कर्मा ची गोडी चाखून बसले आहेत [३४] आणि यांच्या साठी दु:खदायक शिक्षा आहे.[३५]

كَمَثَلِ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ قَرِيبًا ذَاقُوا وَبَالَ أَمْرِهِمْ
وَلَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١٥﴾

१६. यांचे उदाहरण [३६] सैताना सारखे आहे जो माणसाला म्हणतो की कुफ्र (इन्कार) कर आणि जेव्हा तो कुफ्र करुन बसतो, तेव्हा म्हणतो, मी तुझ्या पासून विभक्त आहे. मला सर्व विश्वांच्या पालन कर्त्या अल्लाहचे भय वाटते.[३७]

كَمَثَلِ الشَّيْطَٰنِ إِذْ قَالَ لِلْإِنسَانِ اكْفُرْ فَلَمَّا كَفَرَ قَالَ إِنِّي
بَرِيٓءٌ مِّنكَ إِنِّيٓ أَخَافُ اللَّهَ رَبَّ الْعَٰلَمِينَ ﴿١٦﴾

१७. तेव्हा दोघांची परिणती ही व्हायची आहे की ते जहन्नम मध्ये जातील, ज्यात ते सदैव राहतील.[३८] आणि अत्याचारींचा हाच मोबदला आहे.

فَكَانَ عَٰقِبَتَهُمَآ أَنَّهُمَا فِي النَّارِ خَٰلِدَيْنِ فِيهَا ۚ وَذَٰلِكَ
جَزَٰٓؤُا الظَّٰلِمِينَ ﴿١٧﴾

१८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो !अल्लाहचे भय बाळगा [३९] आणि प्रत्येक माणसाने हे बघितले पाहीजे की त्याने उद्या करीता पुढे काय पाठविले आहे.[४०]अल्लाहचे भय बाळगत रहा.[४१] नि:संशय अल्लाह या पासून अनभिज्ञ नाही, जे तुम्ही करता.[४२]

يَٰٓأَيُّهَا الَّذِينَ ءَامَنُوا اتَّقُوا اللَّهَ وَلْتَنظُرْ نَفْسٌ مَّا قَدَّمَتْ
لِغَدٍ ۖ وَاتَّقُوا اللَّهَ ۚ إِنَّ اللَّهَ خَبِيرٌۢ بِمَا تَعْمَلُونَ ﴿١٨﴾

१९. त्या लोकां समान होऊ नका, जे अल्लाह ला विसरले,तेव्हा अल्लाहने त्यांना स्वत:चेच विस्मरण घडविले.[३४] हेच लोक दुराचारी आहेत.[४४]

وَلَا تَكُونُوا كَالَّذِينَ نَسُوا اللَّهَ فَأَنسَىٰهُمْ أَنفُسَهُمْ ۚ أُولَٰٓئِكَ
هُمُ الْفَٰسِقُونَ ﴿١٩﴾

२०. दोजख मध्ये जाणारे आणि जन्नत मध्ये जाणारे एकसमान होऊ शकत नाही. जन्नत मध्ये जाणारेच सफल होणारे आहेत.[४५]

لَا يَسْتَوِيٓ أَصْحَٰبُ النَّارِ وَأَصْحَٰبُ الْجَنَّةِ ۚ أَصْحَٰبُ
الْجَنَّةِ هُمُ الْفَآئِزُونَ ﴿٢٠﴾

२१. जर आम्ही या कुरआनास एखाद्या पर्वता वर अवतरीत केले असते, तर तुम्ही पाहीले असते की तो अल्लाहच्या भयाने अवनत होत आहे व विदीर्ण होत आहे. ही उदाहरणे आम्ही लोकां करीता निवेदन करीत आहोत या साठी की त्यांनी विचार-चिंतन करावे.[४६]

لَوْ أَنزَلْنَا هَٰذَا الْقُرْءَانَ عَلَىٰ جَبَلٍ لَّرَأَيْتَهُۥ خَٰشِعًا
مُّتَصَدِّعًا مِّنْ خَشْيَةِ اللَّهِ ۚ وَتِلْكَ الْأَمْثَٰلُ نَضْرِبُهَا
لِلنَّاسِ لَعَلَّهُمْ يَتَفَكَّرُونَ ﴿٢١﴾

३४. म्हणजे यहूदींची अवस्था ही तीच होईल जी मक्काच्या अनेकेश्वरवाद्यांचे झाली. हा संकेत बद्र युद्धाकडे आहे, ज्यात अनेकेश्वरवाद्यांची कित्येक नेते ठार केले गेले आणि त्यांना वाईटरित्या पराभूत व्हावे लागले ही घटना हि. स. २ मध्ये घडली. जी यहूदी करीता अगदी जवळच घडलेली घटना होती.

३५. म्हणजे आखिरतचा दु:खदायक अजाब.

३६. अभिप्रेत दांभिक मुसलमान होत जे यहूदींना मुसलमानां विरुद्ध लढण्या साठी भडकावित होते.

३७. म्हणजे सैतान माणसाला कुफ्र (सत्याचा इन्कार) करण्यास बहकवितो परंतु त्याने कुफ्र केल्यानंतर तो या बाबत कसलीही जबाबदारी स्विकारत नाही. यास्तव कियामतीच्या दिवशी सैतान आपण किंचितही जबाबदार नसल्याचे जाहीर करील व म्हणेल की मी कुफ्र करण्यासाठी विवश केले नव्हते.

राहीले सैतानाचे हे कथन की मला सर्व विश्वांच्या पालन कर्त्याचे भय वाटते तर ही गोष्ट तो त्या अजाब च्या तावडी तून स्वत:ला वाचविण्या साठी सांगतो, ज्याच्या लपेटीत कुफ्र करणारा सापडतो तो जर खरोखर अल्लाहचे भय बाळगणारा असता तर सैतान का बनला असता. हे ही स्पष्ट असावे की सैतानाच्या या गोष्टी इशाऱ्यान्वये अर्थात मनात कुविचार निर्माण करण्याच्या स्वरुपात होतात.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अन्फाल टीप क्र. ७३.

३८. म्हणजे सैतान ही जहन्नम मध्ये टाकला जाईल आणि त्याच्या इशाऱ्यावर कुफ्र करणारा मनुष्य ही. त्याच प्रकारे हे दांभिक मुसलमान ही जहन्नम मध्ये जातील आणि त्यांच्या इशाऱ्यावर कुफ्र करणारे यहूदी लोक ही.

३९. वर दांभिक मुसलमानांच्या वर्तना बदल त्यांची कानउघाडणी केली गेली होती आता या पुढे ईमान बाळगणाऱ्यांना संबोधिले जात आहे. त्यांना 'तकवा' (ईश-भय व दुराचारा पासून अलिप्तता) अंगिकारण्याची ताकीद केली जात आहे. त्या सोबतचे तकवा च्या वाढीची उपाय योजना ही केली जात आहे. हा उपाय दांभिकतेच्या रोगाचे ही निवारण करणारा आहे आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या चारित्र्यास ही मजबूत करणारा आहे.

४०. कियामतीच्या दिवसाला 'उद्या' च्या अर्थाने घेतले गेले आहे. जणू ऐहिक जीवन केवळ 'आज' आहे आणि कियामत उद्याच घडून येणार आहे. जे लोक कियामती ला लांबवर समजून त्याविषयी गफलत दाखवितात ते फार मोठया भ्रमात आहेत जेव्हा कियामत उदयास येईल तेव्हा प्रत्येकाला हे जाणवेल की ती अगदी जवळ होती; आणि फार लवकर प्रकट झाली.

कियामत प्रस्थापित होताच हिशेबाचा मामला समोर येणार आहे. यासाठी प्रत्येक माणसाने आजच आपला हिशेब करुन घेतला पाहीजे; की त्याने आखिरत करीता काय करुन ठेवले आहे. त्याने आपल्या भावी (आखिरतच्या) जीवना ला सफल बनविण्याचा पूरेपूर प्रयत्न केला पाहीजे जर त्याने आखिरत ची काळजी घेतली नाही आणि या नश्वर जगाच्या व्यस्ततेच गुरफटून राहीला तर त्याचा भविष्यकाळ (अर्थात मरणोत्तर जीवन) अगदी अंध:कारमय राहीला. मग तेव्हा त्याला जाणीव होईल की तो जगातून लहान मोठया अपराधांचे पार्सलच आपल्या साठी पाठवित राहीला.

४१. एकाच आयतीत तकवा (ईश-भय) अंगिकारण्याची दोन वेळ ताकीद केली गेली आहे. या साठी की महत्प्रयासाने निर्माण होणाऱ्या 'तकवा' वर लक्ष केंद्रित व्हावे.

तकवाचा अर्थ अल्लाहचे भय बाळगणे व त्याच्या अवज्ञे पासून स्वत:ला वाचविणे. यात अल्लाहच्या महानते ची कल्पना ही आहे आणि ती जाणीव ही जी अपराधा पासून दूर ठेवते व कर्तव्यांच्या पालनास प्रवृत्त करते.

४२. तकवा ची वाढ या जाणीवेने होते की अल्लाह आमच्या कर्मांना पाहत आहे.

४३. अल्लाहला विसरण्याचा अर्थ, त्याच्या बाबत गाफिल होणे त्याच्या आदेशांची पर्वा न करणे आणि एक दिवस त्याच्या समक्ष हजर होण्या बाबत निर्धास्त होणे. अल्लाहच्या विस्मरणाचा अपरिहार्य परिणाम स्वत: चे विस्मरण अर्थात स्वत:ला विसरणे असे की माणसाने आपल्या या पात्रतेस विसरणे की तो अल्लाहचा दास आहे. मनाला येईल ते करण्यास तो स्वतंत्र नाही. आपल्या अस्तित्वाच्या उद्दिष्टास दृष्टीआड करणे व आपल्या दुष्परिणति बाबत गाफिल होणे.

यहूदींची हीच अवस्था होती; ज्याकडे संकेत करुन ईमान बाळगणाऱ्यांना सचेत केले गेले आहे की त्यांनी ही यांच्या सारखे बनू नये. या ताकीद नंतर ही आज बहुसंख्य मुसलमान यहुदींच्या पावलावर पाऊल ठेवून चालत आहेत. ते मुस्लिम असल्याचा दावा तर करतात, परंतु अल्लाहला अशा प्रकारे विसरले आहेत की त्यांचा जीवनात अल्लाहचे भय राहीले नाही. येथपावेतो की ते 'नमाज' सारख्या उच्च उपासनेला ही सोडून बसले आहेत.

४४. अल्लाहला विसरलेल्या 'ईमान' च्या या दावेदारांना कुरआन दुराचारी ठरवितो अर्थात दुराचाऱ्यांची परिणति ठाऊकच आहे.

४५. जे लोक जन्नत व जहन्नम ला खात्रीत न घेता जीवन व्यतीत करीत आहेत ते असे समजतात की त्यांचे जीवन मोठे सफल जीवन आहे; आणि धर्माच्या बंदिस्त चौकटीतून बाहेर

पडल्या वर प्रगतीचे मार्ग त्यांना मोकळे झाले आहेत. खरे तर या कसोटीपूर्ण जीवनात ते असफल होणारे लोक आहेत. ज्यांच्या करीता खऱ्याखुऱ्या व शाश्वत प्रगतीचे सर्व मार्ग बंद होतात. आणि ज्यांची परिणति जहन्नम मध्ये शिक्षा भोगण्या करीता खितपत पडून राहणे होय. या उलट जे लोक 'जन्नत' ला जीवनाचे ध्येय उद्दिष्ट ठरवून स्वत: ला त्या योग्य बनवितात ते या कसोटी पूर्ण जीवनात यशस्वी होतात आणि आखिरत मध्ये ते जन्नत मध्ये दाखल होऊन सफल व सम्मानित होणारे लोक आहेत.

४६. हे कुरआनाच्या प्रभावाचे उदाहरण सांगितले जात आहे की कुरआन अल्लाहची वाणी असल्यामुळे इतका प्रभावशाली आहे की एखाद्या पहाडास सुज्ञता प्रदान करुन त्यावर अवतरीत केले जाते तर अल्लाहच्या भया ने तो दबला असता व फाटला गेला असता परंतु माणसाच्या कठोर मनाची दशा अशी की ही वाणी ऐकून त्याचे मन द्रवत नाही. तात्पर्य कुरआनाचा इन्कार करणाऱ्यां चे मन दगडाहून ही अधिक सक्त झाले होते. याचा उल्लेख सूरह बकरा मध्ये केला गेला आहे.

ثُمَّ قَسَتْ قُلُوْبُكُمْ مِنْ بَعْدِ ذٰلِكَ فَهِيَ كَالْحِجَارَةِ اَوْ اَشَدُّ قَسْوَةً ـ (بقره:٧٤)

'मग तुमची मने कठोर झाली, दगडां सारखी किंबहुना त्याहूनही अधिक कठोर.' (बकरा-७४)

आणि अल्लाहच्या भयाने पाषाणांचे कोसळणे ही एक वस्तुस्थिती आहे :-

وَاِنَّ مِنْهَا لَمَا يَهْبِطُ مِنْ خَشْيَةِ اللّٰهِ ـ (بقره:٧٤)

'आणि काही पाषाण असे असतात जे अल्लाहच्या भयाने खाली कोसळतात.'

(बकरा-७४)

या प्रसंगी सूरह हदीद आयत क्र. १६ व तिचे स्पष्टीकरण ही विचाराधिन असावे.

तो अल्लाहच होय निर्माण करणारा नव्याने अस्तित्वात आणणारा, आकार बनविणारा त्याच्या करीता उत्कृष्ट नावे आहेत आकाश व जमीनी च्या सर्व वस्तु त्याचे पावित्र्या सह गुणगान करतात आणि तो वर्चस्वशाली, बुध्दीकौशल्य युक्त आहे.*(अल-कुर्आन)*

२२. तो अल्लाहच होय, [४७] ज्याच्या खेरीज कोणी ही उपास्य नाही. [४८] अदृश्य सर्व काही जाणणारा. [४९] तो परम कृपाळू व परम दयाळू आहे.[५०]

هُوَ اللّٰهُ الَّذِيْ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۚ عٰلِمُ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ ۚ
هُوَ الرَّحْمٰنُ الرَّحِيْمُ ﴿٢٢﴾

२३. तो अल्लाहच होय ज्याच्या खेरीज कोणी ही ईश्वर नाही [५१] तो बादशहा (शासक) आहे. [५२] अतिशय पवित्र [५३] परिपूर्ण सलामती [५४] शांती प्रदान करणारा, [५५] रक्षण करणारा [५६] वर्चस्व शाली [५७] जबरदस्त,[५८] महा महिमा शाली.[५९] पवित्र आहे अल्लाह त्या गोष्टीं पासून ज्यांना लोक त्याचा सहभागी ठरवितात.[६०]

هُوَ اللّٰهُ الَّذِيْ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۚ اَلْمَلِكُ الْقُدُّوْسُ السَّلٰمُ
الْمُؤْمِنُ الْمُهَيْمِنُ الْعَزِيْزُ الْجَبَّارُ الْمُتَكَبِّرُ ۗ سُبْحٰنَ اللّٰهِ
عَمَّا يُشْرِكُوْنَ ﴿٢٣﴾

२४. तो अल्लाहच होय निर्माण करणारा [६१] नव्याने अस्तित्वात आणणारा, [६२] आकार बनविणारा [६३] त्याच्या करीता उत्कृष्ट नावे आहेत [६४] आकाश व जमीनी च्या सर्व वस्तु त्याचे पावित्र्या सह गुणगान करतात [६५] आणि तो वर्चस्वशाली, बुध्दीकौशल्य युक्त आहे.[६६]

هُوَ اللّٰهُ الْخَالِقُ الْبَارِئُ الْمُصَوِّرُ لَهُ الْاَسْمَآءُ الْحُسْنٰى ۗ
يُسَبِّحُ لَهٗ مَا فِى السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۚ وَهُوَ الْعَزِيْزُ
الْحَكِيْمُ ﴿٢٤﴾

४७. या सूरहच्या समारोपाच्या आयती होत ज्यात अल्लाहची शुभ नामे (अस्माए हुसना) सर्वकषरित्या व चांगल्या क्रमबद्धते सह निवेदीली आहेत, ज्याने अल्लाहच्या महानतेची कल्पना निर्माण होते परिणामी, मनात अल्लाहचे भय वृद्धिगत होऊ लागते. या आयतींचा प्रभाव इतका जबरदस्त आहे की त्यांच्या पठणानेच अल्लाहचा दबदबा मनावर बसतो आणि कुरआन चमत्कार पूर्ण वाणी असल्या चा हा पुरावा आहे.

अल्लाह या शब्दाचे स्पष्टीकरण सूरह फातेहा टीप क्र. ३ मध्ये केले गेले.

४८. म्हणजे उपासना अल्लाह करीता विशेषत्वाने आहे. त्याच्या खेरीज उपासनेस पात्र असा कोणी ही नाही आणि ना कोणी या योग्यतेचा आहे ज्याच्या पुढे उपासनेचे विधी पार पाडले जावेत.

४९. म्हणजे ज्या गोष्टी मनुष्य व इतर ईश-निर्मिती पासून लपलेल्या आहेत, त्यांनाही तो जाणतो आणि जे त्यांना माहीत आहेत त्याही जाणतो अल्लाहला भूत, वर्तमान व भविष्य सर्वांचे ज्ञान आहे आणि त्याचे ज्ञान स्थळ-काळ सर्वांना व्यापून आहे.

५०. मूळ शब्द 'रहमान व रहीम' याच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फातीहा टीप क्र. ५

५१. मूळ शब्द 'इलाह' अर्थात उपास्य आणि उपास्थ खऱ्या अर्थाने तोच असू शकतचो, जो सामर्थ्याधिकार बाळगत असावा. यास्तव कुरआनात हा शब्द 'सत्ताधिकरी' अर्थात अल्लाह या अर्थाने ही वापरला गेला आहे. सूरह बनी इस्राईल मधील उल्लेख असा :-

قُلْ لَّوْ كَانَ مَعَهٗۤ اٰلِهَةٌ كَمَا يَقُوْلُوْنَ اِذًا لَّابْتَغَوْا اِلٰى ذِى الْعَرْشِ سَبِيْلًا۔ (بنی اسرائیل:۴۲)

"सांगा, जर याच्या सोबत दुसरे ईश्वर ही असते, जसे हे लोक सांगतात तर अर्शच्या स्वामी कडे त्यांनी मार्ग अवश्य काढला असता." (बनी इस्राईल-४२)

उघड आहे अर्शच्या स्वामी कडे मार्ग काढण्याचा संबंध सत्तेशी आहे म्हणून इलाह च्या अर्थात या ठिकाणी सत्ताधिकाराचा पैलू ही ठळक पणे दिसतो म्हणून या ठिकाणी भाषांतर करतांना उपास्य ऐवजी ईश्वर हा शब्द अधिक योग्य वाटतो कारण ईश्वर हा शब्द प्रयोजिल्याने सामर्थ्य व अधिकार बाळगणारा ही कल्पना कायम होते.

काही विद्वान ईश्वर हा शब्द अल्लाह करीता वापरण्या बद्दल आक्षेप घेतात कारण त्यांच्या मते या फारसी शब्दाचा मूळ अर्थ काहीतरशी वेगळाच आहे परंतु हा आक्षेप काहीच महत्व बाळगत नाही कारण हा शब्द दीर्घकाळा पासून चांगल्या अर्थाने वापरला जात आहे आणि विद्वान व इतर सर्व लोकां मध्ये प्रचलीत आहे आणि कुरआनच्या उर्दू भाषांतरां मध्ये ही 'खुदा' या नावाने मोठ्या प्रमाणात वापरला गेला आहे आणि अल्लामा (विद्वान) फखरूद्दीन राजी यांनी आपल्या एका ग्रंथात जो अल्लाहच्या नावां संबंधी अरबी भाषेतील एक वैशिष्टय पूर्ण व संशोधनात्मक ग्रंथ आहे, अल्लाह करीता खुदा अर्थात ईश्वर ह्या शब्दाचा वापर उचित सांगितला आहे (पहा लवामअल बय्यनात - पृ. २१)

५२. मूळ शब्द اَلْمَلِكُ 'अल मलीक' अर्थात बादशहा, (शासक) अल्लाह माणसांचा वा संपूर्ण सृष्टीचा खराखुरा बादशहा आहे. त्याची सत्ता दाही दिशांना व्यापून आहे आणि तोच शरीअत प्रदान करणारा व सर्व सत्ताधिकारी बाळगणारा शासक आहे. माणसाचे बादशहा व शासक असणे लाक्षणिक अर्थाने आहे आणि सशर्त व मर्यादित आहे. जे लोक आपल्या राज्य शासनास अल्लाहच्या राज्य शासनाच्या अधीन असल्याची कल्पना करीत नाही, आणि त्याच्या शरीअती पासून स्वतंत्र होऊन विधिनियम (कायदे) तयार करतात ते अल्लाह शी विद्रोह करणारे होत आणि त्यांचे शासकत्वा विषयी चे दावे अगदी मिथ्या होत.

५३. मूळ शब्द اَلْقُدُّوْسُ 'अल कुद्दुस' म्हणजे सर्व प्रकारच्या व्यंग दोषां पासून मुक्त तसेच यात समृध्दशाली असण्याचा ही अर्थ समाविष्ट आहे. यास्तव 'लिसानुल अरब' या शब्दकोषात एक अर्थ 'मंगलदायी' असा ही सांगितला गेला आहे. 'बादशहा' सोबत पावित्र्या चा गुणविशेष या गोष्टीस जाहीर करतो की तो असा शासक आहे ज्याच्या कडून भूल चूक होत नाही व त्याचे कोणतेही फर्मान (आज्ञा-आदेश) चुकुची ठरु शकत नाही.

५४. اَلسَّلٰمُ 'अस्सलाम' म्हणजे नखाशिखान्त सलामती तो असा शांती आणि सुबत्ता बाळगणारा आहे की त्यावर कधी कोणती ही आपत्ति येऊ शकली नाही. तो सदैव बाकी राहणारा आहे. तोच होय जो आपल्या दासांना शांती सुबता प्रदान करतो.

५५. اَلْمُؤْمِنُ 'अल मोमीन' हे शुभनाम या ठिकाणी शांती-सुरक्षितता प्रदान करणारा या अर्थाने आहे. तोच होय जो भय दूर करणारा व सुरक्षितता प्रदान करणारा आहे.

५६. اَلْمُهَيْمِنُ 'अलमुहैमिन' म्हणजे देखरेख करणारा, संरक्षण करणारा तोच होय जो आपल्या निर्मिती ची देखरेख करतो, तिचे संरक्षण करतो.

५७. اَلْعَزِيْزُ 'अल अज़ीज' चा सर्वाधिक ठळक अर्थ वर्चस्वशाली असा आहे, दुसरा अर्थ अनुपमेय असा आहे, तिसरा अर्थ प्रखर व शक्तीशाली असा आहे आणि चौथा अर्थ मान प्रतिष्ठा प्रदान करणारा असा आहे. (पहा लवामअल

बय्यनात -इमाम राजी पृ- १४७, तसेच लिसानुल अरब-खंड ५ पृ. ३७५)

अल्लाह वर्चस्वशाली असण्याचा अर्थ असा की समस्त सृष्टीवर त्याचे वर्चस्व असे आहे की कोणतीही चीज वस्तू वा प्राणी मात्र त्याच्या कब्ज्याबाहेर नाही. समस्त सजीवांचे सुत्र त्याच्याच हाती आहे. आणि ज्या कोणाला त्याने एखाद्या प्रकारचा अधिकार प्रदान केला आहे, त्याला तो वाटेल त्या क्षणी हिरावून घेऊ शकतो. त्याच्याशी बंड करुन कोणताही मनुष्य त्याच्या तावडीतून आपली सूटका करुन घेऊ शकत नाही.

५८. اَلْجَبَّارُ 'अल जब्बार' म्हणजे जबरदस्त आपले आदेश समस्त निर्मिती वर सामर्थ्यानिशी लागू करणारा. अल्लाहच्या या गुण विशेषापुढे समस्त सृष्टी लाचार आहे. त्याच्या इच्छेविरुद्ध काही करण्याची कोणाची हिम्मत नाही. उदाहरणार्थ मनुष्य नाका द्वारेश्वास घेण्यास अगतिक आहे. डोळ्यांनी श्वास घेण्याचा प्रयत्न ही करु शकत नाही आणि ना कानांनी पाहण्याची क्रिया करु शकतो. माणसाची अगतिकता या गोष्टी चे प्रमाण होय की त्याच्यावर एका जबरदस्त आस्तित्वाचे शासन आहे, ज्याने आपले आदेश बलपूर्वक त्याच्यावर लागू केलेले आहेत. यास्तव माणसाने आपल्या अगतिकतेची जाणीव बाळगत त्याच्या पुढे नतमस्तक झाले पाहीजे आणि नम्रता व दीनतेचा मार्ग अंगिकारला पाहीजे.

५९. اَلْمُتَكَبِّرُ 'अल मुतकब्बिर' म्हणजे महत्ता व श्रेष्ठत्व बाळगणारा त्याच्या करीता महानताच आहे. अर्थात ईश-निर्मिती पैकी कोणी असा नाही जो महानतेच्या पदास पोहचू शकेल आणि आपली थोरवी गण्णे ज्याला शोभत असेल. कारण वास्तविक रित्या अल्लाह पेक्षा महान कोणीही नाही. यास्तव एखाद्याचे गर्व करणे वाईट होय. आणि अल्लाहच होय ज्याच्या करीता खरोखर महानता व श्रेष्ठत्व आहे.

६०. म्हणजे अल्लाहच्या स्वत्वात व त्याच्या गुण विशेषात कोणीही सहभागी नाही. यास्तव तोच एकमेव ईश्वर व खराखुरा उपास्य आहे.

६१. اَلْخَالِقُ 'अल खालीक' म्हणजे शून्यातून निर्माण करणारी मूलतत्व आधी पासून अस्तित्वात नव्हते, अल्लाहनेच ते अस्तित्वात आणले व समस्त सृष्टीची निर्मिती केली. तो सृष्टी निर्माता असल्याची गुण विशेष भारतातल्या अनेकेश्वर वाद्यांच्या या कल्पनेचे खंडन करतो की मूलतत्व सूरवाती पासून आहेत, त्याला कोणी निर्माण केले नाही. कुरआन या श्रद्धेला मिथ्या ठरवितो.

६२. اَلْبَارِئُ 'अल बारी' चा अर्थ ही निर्माण करणारा असा आहे. परंतु नव्याने निर्माण करण्याचा पैलू उठून दिसतो अर्थात कोणत्याही भूतपूर्व उदाहरणा विना निर्माण करणारा अल्लाहचे निर्माण करणे एवढ्या कमालीचे आहे की त्याने सृष्टीतील समस्त चीजवस्तू व प्राणी मात्र अशा प्रकारे निर्माण केले आहेत की कोणत्याही वस्तू वा प्राण्या चा कोणताही नमुना पूर्वी पासून अस्तित्वात नव्हता. प्रत्येक वस्तू वा सजीव प्राणी त्याचाच शोध आहे.

मूळ शब्द بَرَأَ 'बंराअ' ज्यापासून 'बारी' हा शब्द तयार झाला आहे अरबी व हिब्रु भाषेत याचा अर्थ निर्माण करणारा असा आहे तौरात या ईश ग्रंथात असलेल्या हिब्रु भाषेत पहिल्याच वचनात بَرَأَ 'बरअ' ( ...ברא ) हा शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

'प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. (उत्पति १:१)

६३. اَلْمُصَوِّرُ 'अल मुसव्विर' म्हणजे चेहरा मोहरा बनविणारा तोच आपल्या निर्मितीला योग्य तो आकार देतो आणि त्याने माणसाला एक विशेष चेहरा प्रदान केला आहे.

هُوَ الَّذِىْ يُصَوِّرُ كُمْ فِى الْاَرْحَامِ كَيْفَ يَشَاءُ۔ (آل عمران:٦)

'तोच होय जो मातांच्या उदरात, ज्या प्रकारे इच्छितो चेहरा मोहरा घडवितो'. (आले इमरान - ६)

وَلَقَدْ خَلَقْنَاكُمْ ثُمَّ صَوَّرْنَاكُمْ۔ (اعراف:١١)

'आम्ही तुम्हाला निर्माण केले, मग तुमचा चेहरा मोहरा घडविला.' (अअराफ- ११)

तसेच फर्माविले :-

وَصَوَّرَكُمْ فَاَحْسَنَ صُوَرَكُمْ۔ (المؤمن:٦٤)

'आणि तुमचा चेहरा मोहरा घडविला तेव्हा चांगले चेहरे बनविले.' (अल मोमीन-६४)

आणि त्याचे चेहरा मोहरा घडविणे व आकार देणे इतक्या कमालीचे आहे की अब्जावधि माणसांचे चेहरे एकमेकांहून भिन्न आहेत तो दररोज जन्माला येणाऱ्या असंख्य मुलांना नवे नवे रुप (Shapes) प्रदान करीत राहतो त्याच्या जवळ 'नक्षी' (Design)ची कमतरता नाही. तो एकाच डिजाईन ची पुनरावृत्ती करीत नाही, किंबहुना त्यात फरक करतो. अशासाठी की लोकांनी एकमेकांना ओळखू शकावे आणि त्याच्या अनुपमेय निर्मिती-नैपुण्याचे चिन्ह ठरावे.

६४. اَلْاَسْمَاءُ الْحُسْنٰى ''अल अस्माऊल हुस्ना'' म्हणजे गुण विशेषांनी युक्त अशी नावे. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र. २७८, २७९, २८०

अस्माऐ हुस्ना संबंधीचा तपशील तिर्मिजीच्या एका हदीस मध्ये निवेदिला गेला आहे. ज्यात अल्लाहची नव्याण्णव शुभनामे गणली गेली आहेत. हे हदीस सर्वश्रूत व सर्व परिचित आहे. (पहा तिर्मिज - अबवाबुल दअवात) परंतु हे हदीस वचन काही कारणास्तव प्रमाण स्तराप्रत पोहचत नाही.

एक हे की तिर्मिजी या हदीस-संकलकाने हे हदीस वचन उल्लेखून म्हटले आहे.

هَذَا حَدِيثٌ غَرِيبٌ

'की हे हदीस प्रमाण दृष्टया दुबळे आहे.

दुसरे असे की याचा एक कथन कर्ता वलीद बिन मुस्लिम आहे ज्यांच्या विषयी, मिजानुल एतेदाल मध्ये परस्परविरोधी मते आहेत. काही हदीस-ज्ञात्यांचे म्हणणे आहे की ते अध्यापना द्वारे खोट्या कथनकर्त्या करवी उल्लेखितात. त्यांनी इमाम मालिक द्वारे दहा हदीस वचने अशी उल्लेखिली आहेत ज्यांचे काही मूळ नाही. (मिजानुल एतेदाल-इमाम जहबी-खंड-४ पृ. ३४७) तिसरे असे की नव्वयाण्णव नावांचा जो तपशील तिर्मिजीच्या या हदीस मध्ये निवेदिला गेला आहे त्यात 'रब', 'मौला', व नसीर या नावांचा काहीच उल्लेख नाही आणि ना नामांच्या क्रमबध्दतेत वैशिष्टय आढळून येते उदाहरणार्थ 'अल हय्यी' (चिरसजीव) च्या आधी 'अलमुहयी' (जिवंत करणारा) या नावाचा उल्लेख आहे.

अधिक हे की इब्ने माजा वगैरेंच्या हदीस वचनात नामांचा जो तपशील सांगितला गेला आहे तो प्रमाण दृष्टया कमकुवत आहे आणि ज्या अर्थी बहुतेक कथना मध्ये ज्यांचे कथन कर्ते अबु हुरैरा आहेत, नावांचा तपशील नाही, आणि त्यात फक्त एवढेच वर्णन आहे की अल्लाहचे नव्याण्णव नामे आहेत यास्तव हदीस- ज्ञात्यांच्या एका समूहाचे नावांच्या या तपशीलास ओघाओघाने घेतले आहे. म्हणजे मूळ हदीस वर्णन करुन कथन कर्त्या ने आपल्या तर्फे एक स्पष्टीकरण म्हणून ही नावे निवेदिली आहेत हे विवरण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविलेले नाही. (या चर्चे करीता पहा फतहुल बारी खंड- ११ पृ. १७८ ते १९० आणि तफ्सीर इब्ने कसीर खंड २ पृ. २६९)

६५. याचे स्पष्टीकरण सूरह हदीद टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे.

**''अल हकीम''** म्हणजे हिकमत (बुद्धिकौशल्य) बाळगणारा. बुद्धिकौशल्य चा आधार ज्ञानावर असतो. तेव्हा अल्लाह बुद्धिकौशल्य युक्त असल्या चा अर्थ हा आहे की त्याचे निर्णय विद्वत्ता पूर्ण असतात. त्याच्या उपाय योजना दृढ व मजबुत असतात आणि त्याने आपल्या चांगल्या उपाय योजनांनी प्रत्येक गोष्टीला हेतुनुसार योग्य त्या ठिकाणी राखले आहे.

६६. सूरहच्या सुरवातीला ही अल्लाह वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य युक्त असल्याचा उल्लेख केला गेला आणि सूरह चा समारोप ही याच गुणविशेषांवर झाला आहे. हा संकेत आहे या गोष्टी कडे की या सूरह मध्ये जे विषय निवेदिले गेले आहेत ते या दोन सर्वकष गुणविशेषांवर लक्ष केंद्रित करवितात. अल्लाह वर्चस्वशाली आहे, म्हणून त्याचे फैसले लागू झाल्या खेरीज राहात नाही यास्तव अल्लाहशी कोणत्याही स्थितीत चांगला ग्रह बाळगला पाहीजे. मग त्याला कितीही कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले तरी.

# सूरह
# अल् मुम्तहिना

# ६०. सूरह अल् मुम्तहिना

**नावः** आयत क्र. १० मध्ये हिजरत करुन मदीना येथे येणाऱ्या स्त्रीयां बाबत आदेश दिला गेला आहे. فَامۡتَحِنُوۡهُنَّ ''फ़मतहिनुहुन्ना''(त्यांची परीक्षा घ्या की खरोखर त्यांनी ईमान बाळगले आहे किंवा नाही) या अनुषंगाने या सूरहचे नाव ''अलमुम्तहिना'' अर्थात परीक्षा घेणारी असे आहे. अभिप्रेत ती सूरह ज्यात परीक्षा घेण्याचा आदेश दिला गेला आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे; आणि हुदैबिया तहाच्या काळात (संभवत: हि. स. ७) मध्ये अवतरली, जेव्हा स्त्रीया मक्केहून हिजरत करून मदीना येत होत्या आणि त्यांच्या महरच्या परती वगैरेच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. जसे आयत क्र. १० व ११ द्वारे स्पष्ट आहे.

**मध्यवर्ति कल्पनाः** इस्लामच्या शत्रूंशी मैत्री संबंध जोडण्यापासून आणि व्यक्तिगत उद्दिष्टांसाठी त्यांना युद्धविषयक भेदाच्या गोष्टींशी अवगत करण्या पासून मुसलमानांना रोखले.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ३ मध्ये इस्लामच्या शत्रूंशी मैत्री-संबंध राखण्यास सक्तीने मनाई केली गेली आहे. आणि त्या मुसलमानांना सक्त ताकीद केली गेली आहे. जे आपल्या फायद्या खातीर त्यांच्याशी गुप्त मैत्री ठेवतात भेदाच्या गोष्टी त्यांच्या पर्यंत पोहचवितात.

आयत क्र. ४ ते ७ मध्ये हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या आपल्या काफीर जन-समूहा पासून सुटकेच्या घोषणेला आदर्श निती म्हणून प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. ८ व ९ मध्ये स्पष्ट केले गेले आहे की, अशा काफीरांशी ज्यांच्याशी युद्ध नाही न्याय व सद्व्यवहार करण्यास मनाई नाही.

आयत क्र. १० ते १२ मध्ये मक्केहून हिजरत करून येणाऱ्या स्त्रीया, तसेच त्या स्त्रीयां बाबत ज्या मुसलमानांच्या निकाह (विवाह-बंधना) मध्ये होत्या, आणि पतींनी मदीना हिजरत केल्या नंतर मक्का येथेच राहील्या होत्या, मार्गदर्शन केले गेले आहे.

आयत क्र. १३ सूरहच्या समारोपाची आयत होय ज्यात या गोष्टीची ताकीद केली गेली आहे, ज्याचे मार्गदर्शन सूरहच्या आरंभातच केले गेले आहे.

# ६०.सूरतुल मुम्तहिना

سورة الممتحنة

आयती-१३

بسم الله الرحمن الرحيم

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

يايها الذين امنوا لا تتخذوا عدوي وعدوكم اولياء تلقون
اليهم بالمودة وقد كفروا بما جاءكم من الحق يخرجون الرسول
واياكم ان تؤمنوا بالله ربكم ان كنتم خرجتم جهادا في سبيلي و
ابتغاء مرضاتي تسرون اليهم بالمودة وانا اعلم بما اخفيتم وما
اعلنتم ومن يفعله منكم فقد ضل سواء السبيل ①

१. हे ईमान बाळगणाऱ्या लोकांनो ! माझ्या आणि आपल्या शत्रूंना मित्र बनवू नका.[१] तुम्ही त्यांच्याशी मैत्रीचे संबंध वाढविता.[२] वास्तविक त्यांनी या सत्याचा इन्कार केलेला आहे जे तुमच्या जवळ आले आहे. त्यांनी पैगंबरास व तुम्हाला या कारणास्तव (आपल्या देशा) बाहेर घालविले की तुम्ही आपल्या पालन कर्त्या अल्लाहवर ईमान बाळगले.[३] जर तुम्ही माझ्या मार्गात जिहाद व माझ्या प्रसन्नते खातीर निघाला आहात (तर यांना मित्र बनवू नका).[४] तुम्ही लपून छपून यांच्याशी मैत्री-संबंध वाढविता.[५] वास्तविक जे काही तुम्ही लपून करता आणि जे उघडपणे करता ते मी जाणतो. आणि जो कोणी तुमच्या पैकी असे करेल तो सन्मार्गा पासून विचलीत झाला.[६]

ان يثقفوكم يكونوا لكم اعداء ويبسطوا اليكم ايديهم
والسنتهم بالسوء وودوا لو تكفرون ②

२. जर तुम्ही त्यांच्या तावडीत सापडलात तर तुमच्याशी शत्रूत्वाने वागतील आणि वाईटरित्या तुमच्यावर हात उचलतील व जीभ चालवतील आणि इच्छितील की तुम्ही काफीर व्हावे.[७]

لن تنفعكم ارحامكم ولا اولادكم يوم القيمة يفصل بينكم
والله بما تعملون بصير ③

३. तुमचे आप्तसंबंध आणि तुमची संतती कियामतीच्या दिवशी तुमच्या काहीच कामी येणार नाही.[८] तो तुमच्या दरम्यान फैसला करील आणि तुम्ही जे काही करता ते अल्लाह पाहात आहे.

१. अल्लाहच्या शत्रूशी अभिप्रेत त्याच्या धर्माचे (इस्लामचे) शत्रू. अर्थात जे लोक इस्लाम व मुसलमानांचे शत्रू बनलेले आहेत. त्यांना आपला शत्रूच समजले पाहीजे आणि त्यांच्याशी तोच व्यवहार केला पाहीजे जो एखाद्या शत्रू-पक्षाशी योग्य ठरतो. इस्लामच्या शत्रूंशी ना मनापासून मैत्री ठेवली जाऊ शकते आणि ना त्यांच्या हिंसाचाराचे उतर कोमलतेने दिले जाऊ शकते. आणि ना एखादे असे काम केले जाऊ शकते जे इस्लाम व मुसलमानांच्या विरोधात काफिरांना लाभ पोहचविणारे असावे विशेषत: युद्धविषयक कारवायी चालू असतांना मुसलमानांना त्यांच्या बाबतीत फार सावधगिरी बाळगली पाहीजे. काफिरांना मित्र न बनविण्याच्या ताकीदीचे स्पष्टीकरणा करीता पहा सूरह आले इमरान टीप क्र. ४१ व सूरह मायदा टीप क्र. १६४.

२. ही त्या मुसलमानांची कान उघाडणी आहे जे या उद्देश्याने की मक्का येथे त्यांच्या आप्त स्वकीयांचे रक्षण होऊ शकेल मक्काच्या अनेकेश्वर वाद्यां सोबत उघडरित्या मैत्री-संबंध बाळगून होते. हा मामला ते दुष्ट बुद्धिने करीत नव्हते. असे असले तरी ही त्यांची कमजोरी होती आणि याचा परिणाम काफिरांच्या विरूद्ध केल्या जाणाऱ्या कारवायींवर होऊ शकत होता. म्हणून सक्ति पूर्वक या पासून रोखले गेले.

३. ही मक्केच्या काफिरांच्या शत्रूत्वाची स्थिती निवेदिली गेली आहे की ते सत्य-धर्माचा इन्कार करणारे बनून त्यांनी अत्याचार व अतिरेकाचे एवढे स्तर गाठले की पैगंबराना तसेच मुसलमानांना मक्का सोडून जाण्यास भाग पाडले. आणि हे फक्त या कारणास्तव की मुसलमान केवळ अल्लाहलाच आपला 'रब' (पालनकर्ता) मानत होते; आणि त्यांनी अल्लाह खेरीज इतर सर्व उपास्यांचा इन्कार केला होता. त्यांचे हे ईमान काफिरांच्या नजरेत अपराध होता. आणि जे लोक ईमानाला अपराध ठरवितात ते मैत्री-संबंध जोडण्यास कसे पात्र ठरतील?

४. म्हणजे जेव्हा तुम्ही अल्लाहच्या मार्गात जेहाद करीता उठून उभे राहीला आहात व केवळ त्याच्या प्रसन्नतेची अभिलाषा बाळगतात तर काफिरांशी वागतांना तुम्ही निरंकुश असले पाहीजे. त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची मृदुता व नरमीचे धोरण अंगिकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

५. ही गोष्ट सर्वसामान्य पणे सांगितली गेली आहे ज्यावरून हे स्पष्ट होते की हा एखाद्या एकटया माणसाचा किस्सा नाही, किंबहुना अनेकां कडून ही उणीव घडली आणि ती केवळ एखादी भेदाची गोष्ट पोहचविण्याचीच गोष्ट नव्हती, तर वेगवेगळया मार्गानी मैत्री निभविण्याची गोष्ट होती. राहीला हातब बिन बल्तआचा किस्सा जो हदीस वचनात निवेदिला गेला आहे, तोही याच अनुरोधाने उल्लेखिला गेला आहे. यास्तव कथन कर्त्यांनी या आयतीच्या अवतरणाच्या वैभवा दाखल तो किस्सा सादर केला आहे. ही घटना हुदैबिया तहाचा भंग झाल्यानंतर घडून आली; आणि ही सूरह या आधी अवतरली होती. तात्पर्य की पैगंबरांच्या सहवासातील एक अनुयायी हातीब बिन बत्लआ, ज्यांने हिजरत ही केली होती व बद्रच्या युद्धात ही भाग घेतला होता. त्यांने मक्केच्या कांफीर लोकांना पत्र लिहीले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मक्कावर आक्रमणाची तयैरी करीत आहेत. हे पत्र त्यांने एका म्हातारीच्या हाती देऊन मक्का येथे पाठविले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'वहय' द्वारे याची सूचना मिळाली. तेव्हा त्यांनी हजरत अली, हजरत जुबेर आणि हजरत मिक्दाद यांना तिचा पाठलाग करण्यासाठी रवाना केले आणि फर्माविले की 'रोजा ए खाख' या ठिकाणी एक म्हातारी आढळून येईल तिच्या जवळ एक गुप्त-पत्र आहे ते घऊन या. पैगंबरांच्या आदेशानुसार या अनुयायींनी घोड-दौड करून त्या म्हातारीला गाठले व तिच्या जवळून ते पत्र प्राप्त करून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत अर्पण केले. नंतर पैगंबरांनी हातीबला बोलावणे पाठविले. तेव्हा त्यांनी विनंती केली :-

'हे अल्लाहचे प्रेषित,आपण माझ्या बाबत घाईघाईने निर्णय घेऊ नका. मी कुरेश वंशापैकी नाही आणि जे मुहाजीर (देश त्याग केलेले मुसलमान) आपल्या सोबत आहेत, त्यांचे काही नाते वाईक मक्केत आहेत आणि ते यांच्या कुटुंबियांचा व धन-सम्पत्तिची काळजी वाहतात. ज्याअर्थी माझा त्यांच्याशी नाते संबंध नाही, म्हणून मी त्यांच्याशी भलाई करू इच्छिले यासाठी की त्यांनी माझ्या नातेवाईकांची काळजी घ्यावी मी हे काम कुफ्र निती मुळे केले नाही.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांचे हे म्हणणे खरे मानले व त्यांचे महान बलीदान लक्षात घेता, जे त्यांच्या प्रामाणिक ईमानाचे प्रमाण होते, त्यांना माफ केले. (पहा-बुखारी- किताबुत्तफसीर- सूरतुल मुम्तहिना)

६. इस्लाम आणि मुसलमानांच्या शत्रूंशी मैत्री संबंध जोडण्याला मार्गभ्रष्टता म्हटले गेले आहे,ज्यावरून हा केवढा भयंकर अपराध आहे हे स्पष्ट होते.आजच्या काळातील अशा मुसलमानांनी जे इस्लाम व सर्व सामान्य मुसलमानांच्या भल्या विरूद्ध त्यांच्या शत्रूंशी हात मिळवितात,त्यांनी आपला चेहरा या आयतीच्या दर्पणात निरखून पहावा.

७. म्हणजे इस्लामच्या या शत्रूंची स्थिती अशी आहे की जर मुसलमान कोठे यांच्या तावडीत सापडले तर त्यांना सोडणार नाहीत किंबहुना त्यांच्यावर अत्याचार व अतिरेक करतील आणि त्यांना मानसिक इजा पोहचवतील आणि याच प्रयत्नात राहतील की या मुसलमानांनी आमच्या सारखे काफीर व्हावे, तेव्हा त्यांच्या या दुष्ट निर्धारास लक्षात घेता, तुम्ही त्यांच्याशी मऊ मेणा सारखे का वागावे?

८. म्हणजे जर काफिरांशी तुमचे आप्त संबंध आहेत, तर तुम्हाला हे संबंध इस्लामहून अधिक प्रिय नसावेत की त्यांचा बचाव करण्यासाठी इस्लामच्या लाभांना तिलांजली द्यावी. ही नाती-गोती कियामतीच्या दिवशी तुमच्या काहीच उपयोगी पडणार नाहीत. त्या दिवशी जी गोष्ट कामी येईल ती म्हणजे इस्लाम करीता तुमच्या मनातील प्रामाणिक भाव व तुमची बलीदाने होत.

नवल नव्हे की अल्लाहने तुमच्या व त्या लोकांच्या दरम्यान, ज्यांच्याशी तुमचे शत्रूत्व आहे, मैत्री निर्माण करावी. अल्लाह मोठा सामर्थ्य शाली आहे आणि अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे. *(अल-कुर्आन)*

४. तुम्हा लोकां करीता इब्राहीम आणि त्याच्या साथीदारांमध्ये उत्कृष्ट नमुना आहे.[९] जेव्हा ते आपल्या जन समूहास म्हणाले की, आम्ही तुमच्या पासून आणि तुमच्या त्या उपास्यां पासून, ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून पूजा-अर्चना करता, अगदी विभक्त आहोत. आम्ही तुमच्याशी कुफ्र (इन्कार) केला आणि आमच्या व तुमच्या दरम्यान नेहमी करीता वैरभाव आणि उद्विग्नता प्रकट झाली, जोपर्यंत तुम्ही एकमेव अल्लाहवर ईमान बाळगत नाही.[१०] परंतु इब्राहीमचे आपल्या पित्यास हे सांगणे (आदर्श नव्हे ) की मी तुमच्या करीता क्षमेची प्रार्थना करीन.[११] आणि मी तुमच्या करीता अल्लाह तर्फे कसला ही अधिकार बाळगत नाही.[१२] हे आमच्या पालन कर्त्या !आम्ही तुझ्या वरच भरवसा केला आणि तुझ्या कडेच रूजू झालो आणि तुझ्या कडेच परतायचे आहे.[१३]

قَدْ كَانَتْ لَكُمْ أُسْوَةٌ حَسَنَةٌ فِيٓ إِبْرٰهِيمَ وَالَّذِينَ مَعَهُۥٓ إِذْ قَالُوا
لِقَوْمِهِمْ إِنَّا بُرَءٰٓؤُا مِنكُمْ وَمِمَّا تَعْبُدُونَ مِن دُونِ اللّٰهِ كَفَرْنَا
بِكُمْ وَبَدَا بَيْنَنَا وَبَيْنَكُمُ الْعَدٰوَةُ وَالْبَغْضَآءُ أَبَدًا حَتّٰى تُؤْمِنُوا
بِاللّٰهِ وَحْدَهُۥٓ إِلَّا قَوْلَ إِبْرٰهِيمَ لِأَبِيهِ لَأَسْتَغْفِرَنَّ لَكَ وَمَآ
أَمْلِكُ لَكَ مِنَ اللّٰهِ مِن شَيْءٍ رَّبَّنَا عَلَيْكَ تَوَكَّلْنَا وَإِلَيْكَ
أَنَبْنَا وَإِلَيْكَ الْمَصِيرُ ﴿٤﴾

५. हे आमच्या पालन कर्त्या ! आम्हाला काफिरां करीता उपद्रव बनवू नको.[१४] आणि हे आमच्या पालन कर्त्या आम्हाला माफ कर. नि:संशय तू वर्चस्वशाली आणि बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

رَبَّنَا لَا تَجْعَلْنَا فِتْنَةً لِّلَّذِينَ كَفَرُوا وَاغْفِرْ لَنَا رَبَّنَآ إِنَّكَ أَنتَ
الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٥﴾

६. नि:संशय त्या लोकांमध्ये तुमच्या करीता उत्कृष्ट नमुना आहे अशा त्या प्रत्येक माणसासाठी, जो अल्लाह व अंतिम दिना बाबत आशा बाळगत असावा.[१५] या पासून जो तोंड फिरविल तर अल्लाह नि:स्पृह आहे, प्रशंसनीय.[१६]

لَقَدْ كَانَ لَكُمْ فِيهِمْ أُسْوَةٌ حَسَنَةٌ لِّمَن كَانَ يَرْجُوا اللّٰهَ وَالْيَوْمَ
الْآخِرَ وَمَن يَتَوَلَّ فَإِنَّ اللّٰهَ هُوَ الْغَنِيُّ الْحَمِيدُ ﴿٦﴾ ع

७. नवल नव्हे की अल्लाहने तुमच्या व त्या लोकांच्या दरम्यान, ज्यांच्याशी तुमचे शत्रूत्व आहे, मैत्री निर्माण करावी.[१७] अल्लाह मोठा सामर्थ्य शाली आहे आणि अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.

عَسَى اللّٰهُ أَن يَجْعَلَ بَيْنَكُمْ وَبَيْنَ الَّذِينَ عَادَيْتُم مِّنْهُم مَّوَدَّةً
وَاللّٰهُ قَدِيرٌ وَاللّٰهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٧﴾

९. यावरून हे स्पष्ट होते की हजरत इब्राहीम यांच्यावर, त्यांच्या उद्विग्नता व पृथक होण्याच्या घोषणे पूर्वी, काही लोकांनी ईमान बाळगले होते आणि त्यांच्या साथीदारांनी उत्कृष्ट नमुना सादर केला होता.

१०. हजरत इब्राहीम व त्यांच्या सहकाऱ्यांची ही घोषणा आपल्या अनेकेश्वरवादी जन-समूहाशी सत्य घोषणेचे प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर केली गेली. त्यातल्या प्रत्येक शब्दातून उद्विग्नता दिसून येत आहे आणि ज्या निर्धास्त व निडरपणे ही घोषणा केली गेली ती दृढनिश्चय व फार मोठया धाडसाचे उच्च उदाहरण होय.

या ठिकाणी हे उदाहरण प्रस्तुत करण्याचा हेतु या गोष्टीकडे लक्ष वेधणे की मुसलमानांनी इस्लामशी शत्रूत्व बाळगणाऱ्या अनेकेश्वर वाद्यांशी मैत्री-संबंध वाढवू नयेत.

आजच्या काळातील मुसलमान जर अनेकेश्वरवादी जन-समूहांना निर्भय पणे एकेश्वरवादाचे आवाहन करतील व शिर्क (अनेकेश्वरवाद) मिथ्या असल्याचे स्पष्ट करतील तर त्यांची ही भूमिका योग्य ठरेल परिणामी कितीतरी मार्गभ्रष्ट लोकांना सन्मार्गाचे द्वारे खुले होईल.

११. म्हणजे हजरत इब्राहीम यांचे आपल्या अनेकेश्वरवादी पित्या करीता क्षमेची प्रार्थना करणे आदर्श नव्हे की तुम्ही त्याचे अनुसरण करावे. अनेकेश्वरवाद्यां करीता अल्लाहकडे क्षमा याचना करण्याची कुरआनने मनाई केलेली आहे आणि हजरत इब्राहीम यांच्या क्षमा याचने बाबत सूरह तौबा (आयत क्र. ११४) मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की त्यांनी आपल्या पित्याला तसे वचन दिले होते म्हणून त्याच्यासाठी अल्लाहजवळ क्षमेची प्रार्थना करीत राहीले परंतु जेव्हा त्यांना ही गोष्ट कळाली की तो अल्लाहचा वैरी आहे तेव्हा त्याच्या साठी क्षमा याचना करणे सोडून दिले, स्पष्टीकरणा करीता पहा सूरह तौबा टीप क्र. २०९, २१०, २११.

१२. अल्लाहच्या पुढे हजरत इब्राहीम सारखे अतिशय प्रतिष्ठीत व्यक्तित्व देखील कसलाही अधिकार बाळगत नव्हते तर एखाद्याला अल्लाहतर्फे माफी देवविणारा आणखी कोण असू शकतो?

१३. ही ती दुआ (प्रार्थना) होय, जी हजरत इब्राहीम यांनी आपल्या विभक्त होण्याच्या घोषणे प्रसंगी केली होती.

१४. म्हणजे काफिरांना एवढी मोकळीक देऊ नकोस की त्यांनी आम्हाला पायदळी तुडवावे मग या भ्रमात रहावे की जर हे लोक 'सत्या' वर असते तर अत्याचाराला बळी पडले नसते.

१५. म्हणजे या आदर्शाचे अनुसरण करण्याची सुबुद्धि त्याच लोकांना लाभू शकते जे अल्लाह कडून मोबदल्याची अपेक्षा बाळगतात व आखिरत (मरणोत्तर जीवना) चे अभिलाषी आहेत जे लोक ऐहिक लाभांनाच प्रिय जाणतील ते हे साहस दाखवू शकणार नाहीत.

१६. म्हणजे जर तुम्ही या मार्गदर्शनाकडे पाठ फिरवाल तर अल्लाहचे काहीही बिघडणार नाही. त्याला कोणत्याही गोष्टीची गरज नाही आणि तो स्वयंस्तुत्य आहे.

१७. म्हणजे इस्लामच्या शत्रूंना मित्र न बनविण्याची जी ताकीद दिली गेली आहे याचा अर्थ असा नव्हे की त्यांचे इस्लामशी असलेले वैर कधी संपणारच नाही. बहुधा त्यांना आपल्या चुकीच्या वर्तनाची भविष्यात जाणीव होऊ शकते व अल्लाह त्यांना मार्गदर्शन प्रदान करू शकतो, ज्यामुळे ते तुमचे मित्र व्हावेत. यास्तव जेव्हा मक्केवर विजय मिळाला तेव्हा इस्लामच्या याच शत्रूंनी इस्लाम धर्माचा स्विकार केला व मुसलमानांचे दोस्त बनले.

८. अल्लाह तुम्हाला त्या लोकांशी सद्व्यवहार व न्याय करण्या पासून रोखत नाही, ज्यांनी धर्म-संदर्भात तुमच्याशी युद्ध केले नाही आणि ना तुम्हाला तुमच्या घराबाहेर घालविले. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.[१८]

لَا يَنْهٰىكُمُ اللّٰهُ عَنِ الَّذِيْنَ لَمْ يُقَاتِلُوْكُمْ فِي الدِّيْنِ
وَلَمْ يُخْرِجُوْكُمْ مِّنْ دِيَارِكُمْ اَنْ تَبَرُّوْهُمْ وَ تُقْسِطُوْٓا اِلَيْهِمْ
اِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الْمُقْسِطِيْنَ ۝٨

९. अल्लाह तुम्हाला फक्त अशा लोकांशी मैत्री करण्यापासून रोखतो, ज्यांनी धर्माच्या बाबतीत तुमच्याशी युद्ध केले आहे. आणि तुम्हाला तुमच्या घराबाहेर घालविले आहे आणि तुम्हाला घालविण्यात मदत केली आहे.[१९] आणि जे लोक यांच्याशी मैत्री करतील, तेच अत्याचारी आहेत.[२०]

اِنَّمَا يَنْهٰىكُمُ اللّٰهُ عَنِ الَّذِيْنَ قٰتَلُوْكُمْ فِي الدِّيْنِ وَاَخْرَجُوْكُمْ مِّنْ
دِيَارِكُمْ وَظٰهَرُوْا عَلٰٓى اِخْرَاجِكُمْ اَنْ تَوَلَّوْهُمْ ۚ وَمَنْ يَّتَوَلَّهُمْ
فَاُولٰٓئِكَ هُمُ الظّٰلِمُوْنَ ۝٩

१०. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा ईमान धारक स्त्रीया हिजरत करुन तुमच्या जवळ येतील, तेव्हा त्यांची चौकशी करा.[२१] ----अल्लाह त्यांच्या ईमानास अधिक चांगल्या प्रकारे जाणतो.[२२] ---- मग जर तुम्हाला हे कळाले की त्या ईमान बाळगणाऱ्या आहेत तर त्यांना काफिरांकडे परत पाठवू नका [२३] ना या त्यांच्या (काफिरां) करीता हलाल आहेत आणि ना ते यांच्या करीता हलाल. [२४] आणि त्यांनी (काफिर पतींनी) जे काही खर्च केले होते ते त्यांना देऊन टाका. [२५]आणि या स्त्रीयांशी निकाह करण्यात तुमच्यावर गुन्हा नाही, जेव्हा तुम्ही त्यांचा मेहर (पत्नी-धन) त्यांना अदा कराल.[२६]आणि काफिर स्त्रीयांना आपल्या निकाह मध्ये अडवून ठेवू नका.[२७] जे काही तुम्ही खर्च केले होते; त्याची तुम्ही (काफिरां जवळ) मागणी करा, आणि जे काही त्यांनी खर्च केले होते, त्याची त्यांनी (तुमच्याजवळ) मागणी करावी [२८]हा अल्लाहचा फैसला आहे, जो तुमच्या दरम्यान तो करीत आहे आणि अल्लाह ज्ञानी, बुध्दि कौशल्य बाळगणारा आहे.[२९]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِذَا جَآءَكُمُ الْمُؤْمِنٰتُ مُهٰجِرٰتٍ فَامْتَحِنُوْهُنَّ ؕ
اَللّٰهُ اَعْلَمُ بِاِيْمَانِهِنَّ ۚ فَاِنْ عَلِمْتُمُوْهُنَّ مُؤْمِنٰتٍ فَلَا تَرْجِعُوْهُنَّ
اِلَى الْكُفَّارِ ؕ لَا هُنَّ حِلٌّ لَّهُمْ وَلَا هُمْ يَحِلُّوْنَ لَهُنَّ ؕ وَاٰتُوْهُمْ مَّآ
اَنْفَقُوْا ؕ وَلَا جُنَاحَ عَلَيْكُمْ اَنْ تَنْكِحُوْهُنَّ اِذَآ اٰتَيْتُمُوْهُنَّ اُجُوْرَهُنَّ ؕ
وَلَا تُمْسِكُوْا بِعِصَمِ الْكَوَافِرِ وَسْـَٔلُوْا مَآ اَنْفَقْتُمْ وَلْيَسْـَٔلُوْا مَآ
اَنْفَقُوْا ؕ ذٰلِكُمْ حُكْمُ اللّٰهِ ؕ يَحْكُمُ بَيْنَكُمْ ؕ وَاللّٰهُ عَلِيْمٌ حَكِيْمٌ ۝١٠

१८. ही आयत हे स्पष्ट करते की त्या मुस्लिमेतरांशी जे इस्लाम व मुस्लिमांशी शत्रूत्व दाखवत नाही, त्यांच्याशी चांगले वर्तन ठेवण्यास व त्यांच्या मामल्यात न्यायाचे वर्तन अंगिकारण्यास रोखले गेले नाही. अर्थात अशा मुस्लिमेतरांशी सद्व्यवहार राखावा त्यांचा त्रास व त्यांच्यावर ओढवलेले संकट दूर सारण्याचा भरसक प्रयत्न करावा. जसे पैगंबर यूसुफ यांनी दुष्काळाच्या भयंकर आपत्ति पासून सर्व सामान्य इजिप्त वासींना वाचविण्याची उपाय योजना केली होती. मदत कार्यापासून त्यांना ही लाभान्वित होण्याची संधी द्यावी आणि सर्वात मोठी बाब ही की त्यांच्या प्राण, वित्त, व प्रतिष्ठे वर हात उचलू नये आणि शरीअतीच्या मर्यादेत राहून त्यांच्याशी जेवढी भलाई करता येणे शक्य आहे तेवढी अवश्य करावी. तसेच त्यांच्याशी जो काही व्यवहार ठरला असेल त्यात न्यायाने वागावे. ज्या वेळी ही आयत अवतरली त्यावेळी ती खजाआ सारख्या जनसमूहांना लागू पडत होती ज्यांनी मुसलमानां विरूद्ध ना हिंसात्मक कारवायी केली आणि ना या बाबतीत कुरेश जनसमूहाला साथ दिली.

स्पष्ट असावे की या आयतीत हिंसाचारी (Agressive) नसलेल्या मुस्लिमेतरांना आपला जीवा भावाचा मित्र बनविण्यास आणि इस्लाम व मुसलमानांच्या हितां विरुद्ध त्यांच्याशी मैत्री-संबंध वाढविण्यास अनुमति दिली गेली नाही; परंतु त्यांच्याशी भलेपणाचा व्यवहार करण्याची, नैतिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची व त्यांच्या संदर्भात न्यायाच्या निकडी पूर्ण करण्याची अनुमतिच नव्हे तर तशी ताकीद ही केली गेली आहे. यास्तव या गोष्टीस अमलात आणतांना आपल्या योग्य त्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.या संदर्भात दुसऱ्या संबंधित आयती ही विचाराधीन असाव्यात. उदाहरणार्थ, सूरह आले इमरान आयत क्र. २८ टीप क्र. ४१, सूरह मायदा आयत क्र. ५१ टीप क्र. १६४, सूरह तौबा आयत क्र. २३ टीप क्र. ४४ इत्यादि.

यावरून आजच्या काळाती मुस्लिमेतर राज्यांमध्ये राहणाऱ्या मुसलमानांना हे मार्गदर्शन लाभते की मुस्लिमेतरांशी त्यांच्या संबंधांचे स्वरूप काय असले पाहीजे आणि त्यांनी यांच्याशी कसे वर्तन राखावे. विशेषत: ही गोष्ट विचाराधीन असावी की ज्या मुस्लिमेतरांचे वर्तन वा आचरण इस्लाम आणि मुसलमानांशी हिंसाचारात्मक नाही, त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा अत्याचार वा अतिरेक योग्य नाही. मात्र जर एखाद्या मुस्लिमेतर जनसमूहाचे वर्तन,जनसमूह या नात्याने हिंसाचारात्मक आहे तर त्याच्याशी वर्तन अंगिकारण्यात संपूर्ण जन समूहाचेच वर्तन विचारात घेतले जाईल, एकटया दुकटया व्यक्तिच्या वर्तनास नव्हे.

१९. म्हणजे ते कबीले ही, ज्यांनी तुमच्या विरूद्ध कारवायी करण्यात कुरेश जनसमूहाला साथ दिली.

२०. स्पष्ट झाले की इस्लामशी शत्रूत्व राखणारे घटक जे मुसलमानांवर अत्याचार करीत राहतात, त्यांच्याशी मैत्रीचे संबंध कायम करणे हा फार मोठा अपराध आहे.

२१. हुदेबिया तहात असे ठरले होते की मक्केहून जर एखादा मनुष्य मदीनेस जाईल तर त्याला परत केले जाईल. परंतु स्त्रीयांच्या बाबतीत कसली ही गोष्ट ठरली नव्हती आणि स्त्रीयांच्या समस्येचे स्वरुप ही वेगळे होते. यास्तव निर्धारीत नियम स्त्रीयांना लागू होऊ शकत नव्हता. जेव्हा स्त्रीया इस्लाम धर्म स्विकारून मदीना येथे येऊ लागल्या तर या देशत्याग केलेल्या मुस्लिम स्त्रीयां संबंधी प्रश्न उद्भवला की यांच्याशी कोणता व्यवहार केला जावा. या प्रसंगी अल्लाहने हे आदेश अवतरीत केले. हे स्वदेश-त्याग केलेल्या मुस्लिम स्त्रीयांच्या समस्येचे निराकरण ही होते आणि काफिरांशी न्यायाची निकड भागविणे ही होते.

या संदर्भात सर्वात प्रथम त्या मुसलमान स्त्रीयांना पारखून घेण्याचा आदेश दिला गेला, ज्या हिजरत करून मदीना येथे येतील. म्हणजे हे बघितले जावे की काय खरोखर यांनी इस्लाम धर्माचा अंगिकार केला आहे व त्यांचा देश-त्याग खरोखर अल्लाह व त्याच्या प्रेषिता खातीर आहे की एखाद्या ऐहिक स्वार्थ व आपल्या स्वत:च्या गरजे पोटी त्या मदीनेस आल्या आहेत. यापैकी जर पहीली अवस्था आहे तर त्यांना काफिरांकडे पुन्हा परत पाठविले जाऊ नये आणि जर दुसरी स्थिती आहे तर त्यांना अडवून धरण्याचे काही एक कारण नाही.

२२. म्हणजे त्यांच्या मनाची अवस्था तर अल्लाहलाच माहीत आहे यास्तव त्यांच्या ईमानास अधिक चांगल्या प्रकारे जाणणारा तोच होय. तुमचे काम लक्षणे व पुरावे यांच्या आधारावर मत कायम करणे. यापेक्षा अधिक जबाबदारी तुमची नाही.

२३. म्हणजे चौकशी केल्यानंतर तुम्हाला हे कळून येईल की त्या खरोखर ईमान बाळगणाऱ्या स्त्रीया आहेत. अशा स्थितीत त्यांना काफिरांकडे परत पाठवू नका, किंबहुना आपल्याच समाजात स्थान द्या.

२४. म्हणजे अशा मुस्लिम स्त्रीयांना काफिरांकडे परत पाठविणे एवढयासाठी योग्य नव्हे की ना त्या काफिरांकरीता वैध आहेत आणि ना काफिर त्यांच्या करीता वैध आहेत. हा आदेश आपल्या जागी एक तात्विक आदेश आहे, ज्यानुसार ना एखादी मुस्लिम स्त्री काफिर पुरूषाच्या विवाह -बंधनात राहू शकते आणि ना एखाद्या काफिर माणसाला हा हक्क प्राप्त होतो की त्याने मुस्लिम स्त्रीला आपल्या विवाह बंधनात ठेवावे. जर पत्नीने इस्लाम धर्म स्विकारला व पतीने तो स्विकारला नाही तर त्या दोघांच्या दरम्यान विभागणी होणारच आणि इद्दत संपल्यानंतर पत्नी दुसरा निकाह करण्यास मोकळी होईल.

२५. म्हणजे या मुसलमान स्त्रीयांच्या काफिर पतीनी जे महर अदा केले होते ते त्यांना परत करा. ही ताकीद हुदेबिया तहास लक्षात घेता न्यायाची निकड भागविण्या करीता दिला गेली होती. महर परत करणे मुसलमानांची सामूहीक जबाबदारी होती.

२६. म्हणजे या देशत्याग केलेल्या मुसलमान स्त्रीयांशी मदीनाचे मुसलमान निकाह करू शकतात, मात्र या अटीवर की त्यांनी नव्या महरनिशी त्यांच्याशी निकाह करावा.

२७. म्हणजे ज्या काफिर स्त्रीया आतापर्यंत तुमच्या निकाह बंधनात येत गेल्या, त्यांना आता सोडून द्या. कथनांमध्ये उल्लेख आहे की हजरत उमर यांनी आपल्या दोन पत्न्यांना , ज्यांनी ईमान बाळगले नव्हते व त्या मक्केतच राहील्या होत्या, या आयतीचे अवतरण झाल्यानंतर सोडून दिले. हे तात्विक मार्गदर्शन आहे. यास्तव एखादा मनुष्य जर मुसलमान झाला व त्याची पत्नी काफिर असेल तर तो तिला आपल्या निकाह मध्ये ठेवू शकत नाही. मात्र हे की ती जर ग्रंथ धारक (म्हणजे ख्रिश्चन, यहूदी) असेल तर ठेवू शकतो. (पहा - सूरह मायदा आयत क्र. ५) काफिर स्त्रीयांमध्ये अनेकेश्वरवादी स्त्रीयांचाही समावेश आहे व नास्तिक स्त्रीयांचा ही.

२८. म्हणजे मुसलमानांच्या ज्या पत्न्या मक्केत राहील्या आणि यांनी त्या काफिर असल्यामुळे सोडून दिले तर जे महर यांनी अदा केले होते, त्यांच्या परताव्याची मागणी काफिरांकडे करावी आणि ज्या मुसलमान स्त्रीया देशांतर करून मदीनेस येतील, त्यांचे काफिर पती जे मक्केत राहीले, त्यांनी आपल्या महरची मागणी मुसलमानांजवळ करावी अशा प्रकारे महर परत करण्या संबंधी मुसलमान व काफिर दोघांच्या जबाबदाऱ्या समान ठरतात आणि अदायगीची ही व्यवस्था जनसामूहीक वा राज्य पातळीवर झाली पाहीजे.

२९. म्हणजे हुदेबिया तहाच्या संबंधाने देशत्याग केलेल्या मुस्लिम स्त्रीयांच्या परतीची जी समस्या निर्माण झाली होती, तिचा निर्णय अल्लाहने या आदेशांच्या स्वरूपात दिला अर्थात त्याचा निर्णय ज्ञान व बुद्धिकौशल्यावर आधारीत आहे. यास्तव दोन्ही पक्षांच्या दरम्यान तणावाची कोणतीही स्थिती बाकी राहावयास नको.

आणि जर तुमच्या पत्नींच्या महर पैकी काही (रक्कम) काफिरांकडे बाकी राहील आणि मग तुमची पाळी येईल, तेव्हा ज्यांच्या पत्न्या चालल्या गेल्यात, त्यांना तेवढे अदा करा, जेवढा त्यांनी खर्च केला आहे आणि अल्लाहचे भय बाळगत रहा, ज्यावर तुम्ही ईमान बाळगता. *(अल-कुर्आन)*

११. आणि जर तुमच्या पत्नींच्या महर पैकी काही (रक्कम) काफिरांकडे बाकी राहील आणि मग तुमची पाळी येईल, तेव्हा ज्यांच्या पत्न्या चालल्या गेल्यात, त्यांना तेवढे अदा करा, जेवढा त्यांनी खर्च केला आहे [३०] आणि अल्लाहचे भय बाळगत रहा, ज्यावर तुम्ही ईमान बाळगता.

وَإِنْ فَاتَكُمْ شَيْءٌ مِّنْ أَزْوَاجِكُمْ إِلَى الْكُفَّارِ فَعَاقَبْتُمْ فَآتُوا
الَّذِينَ ذَهَبَتْ أَزْوَاجُهُم مِّثْلَ مَا أَنفَقُوا ۚ وَاتَّقُوا اللَّهَ الَّذِي
أَنتُم بِهِ مُؤْمِنُونَ ﴿١١﴾

१२. हे पैगंबर ! जेव्हा तुमच्या जवळ ईमान धारक स्त्रीया बैअत करण्या (इस्लामची दिक्षा घेण्या) साठी येतील, या गोष्टीवर की त्या कोणत्याही गोष्टीस अल्लाहचा सहभागी ठरविणार नाहीत, चोरी करणार नाहीत, व्यभिचार करणार नाहीत, आपल्या संततीची हत्या करणार नाहीत, आपल्या हाता पायांपुढे एखादे कुभांड रचणार नाहीत, आणि एखाद्या सत्कर्माच्या गोष्टीत तुमची अवज्ञा करणार नाहीत तर त्यांच्या कडून बैअत घ्या. [३१] आणि त्यांच्या करीता अल्लाहकडे क्षमेची प्रार्थना करा [३२] निःसंशय अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.

يَا أَيُّهَا النَّبِيُّ إِذَا جَاءَكَ الْمُؤْمِنَاتُ يُبَايِعْنَكَ عَلَىٰ أَن لَّا يُشْرِكْنَ
بِاللَّهِ شَيْئًا وَلَا يَسْرِقْنَ وَلَا يَزْنِينَ وَلَا يَقْتُلْنَ أَوْلَادَهُنَّ
وَلَا يَأْتِينَ بِبُهْتَانٍ يَفْتَرِينَهُ بَيْنَ أَيْدِيهِنَّ وَأَرْجُلِهِنَّ
وَلَا يَعْصِينَكَ فِي مَعْرُوفٍ ۙ فَبَايِعْهُنَّ وَاسْتَغْفِرْ لَهُنَّ اللَّهَ ۖ إِنَّ
اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٢﴾

१३. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! त्या लोकांना मित्र बनवू नका ज्यांच्यावर अल्लाहचा प्रकोप झाला. [३३] ते आखिरत (मरणोत्तर जीवना) बाबत निराश झाले आहेत ज्या प्रकारे काफिर कबरी वाल्यां पासून निराश आहेत. [३४]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَتَوَلَّوْا قَوْمًا غَضِبَ اللَّهُ عَلَيْهِمْ
قَدْ يَئِسُوا مِنَ الْآخِرَةِ كَمَا يَئِسَ الْكُفَّارُ مِنْ
أَصْحَابِ الْقُبُورِ ﴿١٣﴾ ع

३०. म्हणजे जर परिस्थिति अशी उद्‌भवली की ज्या काफिरांसह तह-करार झाला आहे, त्यांच्याजवळ मदीनेच्या मुसलमानांपैकी एखाद्याची काफिर पत्नी राहून जावी किंवा मदीना येऊन परत जावी व निकाह तुटल्यामुळे तिचा महर काफिरांनी मदीनेच्या मुसलमान पतीला परत न करावा, तर जेव्हा तुमची पाळी येईल आणि एखाद्या मुसलमान स्त्रीचे मदीना येथे हिजरत केल्यामुळे तिचा महर मक्केच्या काफिरांना परत करावयाचा असेल तर याची तडजोड (Adjust-ment) अशा प्रकारे केली जावी की महरची जी रक्कम काफिरांकडे बाकी असेल तेवढीच रक्कम या महर मधून मदीनेच्या मुसलमान पतीला अदा केली जावी.

३१. वर देश त्याग केलेल्या स्त्रीयांना पारखून घेण्याची ताकीद केली गेली होती. या आयतीत याच पार्श्वभूमीवर स्त्रीयांकडून बैअत (दिक्षा) घेण्याची ताकीद केली गेली आहे यासाठी की ज्या निरक्षर व अज्ञानी समाजातून बाहेर पडून त्या इस्लामी समाजात प्रवेश करीत आहेत, त्या (त्यागलेल्या सामाजा) च्या वाईट गोष्टींना त्यांनी आपल्या सोबत आणू नये आणि स्वत:च्या जीवनास व इस्लामी समाजास त्या वाईट गोष्टींपासून आलिप्त राखावे. ही गरज विशेषत: यासाठी भासली की इतर ईमान धारक स्त्रीयांप्रमाणे यांना इस्लामी समाजात राहण्याची व आपले प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली नव्हती. तसेच ज्या स्त्रीयांनी या आधी इस्लाम धर्म पत्करला होता त्या सत्कर्मात पुढाकार घेणाऱ्या स्त्रीया होत्या परंतु नंतर इस्लाम मध्ये दाखल होणाऱ्या स्त्रीया त्यांच्याशी समतुल्य ठरु शकत नव्हत्या.

ही बैअत (दिक्षा) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हातावरच घेण्याकरीता होती आणि वर स्पष्ट केल्याप्रमाणे एका विशेष प्रसंगी ईमान धारक स्त्रीयांकडून बैअत घेण्याची ताकीद केली गेली होती. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी या दिक्षा-विधीचे विशेषत्वाने असणे या आयती वरून चांगले स्पष्ट होते म्हणून यात फर्माविले गेले आहे की

وَلَا يَعْصِيْنَكَ فِي مَعْرُوْفٍ

'त्या सत्कर्माच्या गोष्टीत तुमची अवज्ञा करणार नाहीत.' आणि जे स्थान पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आहे ते अन्य कोणाचे असू शकत नाही. यास्तव अन्य एखाद्याच्या हातावर अपराधां पासून अलिप्त राहण्या वगैरेची शपथ घेण्याचा प्रश्न उद्‌भवू शकत नाही आणि तसव्वुफच्या मार्गाने जी पीरी मुरीदी इस्लाम मध्ये दाखल केली गेली आहे आणि एक पीर आपल्या मुरीदा कडून जी बैअत घेतो ते सर्व बिदअत आहे. याचे अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फतह टीप क्र. १७

हदीस वचनात उल्लेखित आहे की, जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) स्त्रीयांकडून बैअत (दिक्षा) घेत तेव्हा त्यांच्या हातांना स्पर्श करीत नसत, किंबहुना फर्मावित, मी तुमच्या कडून बैअत घेतली. (बुखारी किताबुत्तफसीर)

या बैअत मध्ये शिर्क पासून स्वत:ला वाचविण्यास प्राथमिकता दिली गेली आहे अज्ञान व निरक्षरतेने गांजलेल्या स्त्रीयांमध्ये शिर्क व अनेकेश्वरवादी भ्रम सहजगत्या शिरकाव करतात म्हणून त्यांनी या बाबतीत सतर्क राहीले पाहीजे.

चोरी करण्याची सवय ही स्त्रीयांमध्ये आढळून येते आणि त्या पुरुषांना आपल्याकडे आकृष्ट करून व्यभिचार ही करीत असतात. म्हणून मुस्लिम स्त्रीयांनी या गोष्टीचे भान राखले पाहीजे की त्यांनी या मोठ मोठया दुष्कर्मात गुरफटून न जावे.

संतती-हत्येचे एक स्वरूप हे होते की गरीबीच्या भयाने लहान बालकांना जीवे मारले जात होते आणि दुसरे स्वरुप असे होते की अनेकेश्वरवादी अंधश्रद्धे पायी बालकांना मूर्तींना किंवा देवी देवतांना भेट म्हणवून चढवत. यांच्या खेरीज तिसरा ही एक प्रकार होता जो आजच्या काळात ही प्रचलीत आहे. तो असा की अवैध व अनौरस संततीला गळा दाबून ठार मारणे व कोठेतरी फेकून देणे. ही सुद्धा हत्याच होय जी स्पष्टत: हराम आहे. आपल्या हाता पायांपुढे कुभांड रचण्याचा अर्थ इतराच्या संततीचा आपल्या पतीशी संबंध जोडणे. म्हणजे अनौरस व अवैध गर्भ राहील्यावर तिने याचा संबंध सरळ पतीशी जोडावा.

सत्कर्माच्या गोष्टीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची अवज्ञा न करण्याचा अर्थ हा नव्हे की त्यांचे आज्ञा पालन सत्कर्मासह सशर्त आहे. कारण कोणताही पैगंबर मूळात वाईट गोष्टीचा आदेश देतच नाही आणि पवित्र कुरआनात पैगंबरांच्या اَطِيْعُوا الرَّسُوْلَ आज्ञा पालनाचा आदेश अटीविना दिला गेला आहे. म्हणून यास येथे 'अट' या अर्थाने घेण्याचे काही एक कारण नाही वर अनेक तिरस्कृत गोष्टींशी अलिप्त राहण्याचे वचन घेण्याची ताकीद केली गेली होती. आता ही सर्वकष बाब सांगितली गेली आहे ज्यात उपासना व आज्ञापालनाची सर्व कर्मे येतात. ज्यांचा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आदेश द्यावा नमाज,जकात, इत्यादि सर्व सत्कर्मे यात समाविष्ट आहेत.

३२. म्हणजे त्यांच्या मागील अपराधां करीता अल्लाहजवळ क्षमेची प्रार्थना करा. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या तर्फे क्षमा याचनेची ही प्रार्थना त्या ईमान धारक स्त्रीयांकरीता मन:शांतीची उपाय योजना होती.

३३. अभिप्रेत यहुदी होत ज्यांच्यावर अल्लाहचा प्रकोप झाला. त्यांना मित्र बनविण्यास मनाई त्याच प्रमाणे आहे जशी काफिरांना मित्र बनविण्यास मनाई आहे. ही ताकीद लक्षात घेता आज मुसलमानांनी इस्राईलशी संबंध राखण्या बाबत सावधगिरी बाळगली पाहीजे आणि त्यांच्याशी दोस्तीचे संबंध कदापि प्रस्थापित करू नये.

३४. म्हणजे ज्या प्रकारे काफिर लोक मृतांच्या जिवित होण्या बाबत निराश आहेत; त्याच प्रकारे यहुदी आखिरतला मान्य करणारे असले तरी, आपल्या कृत्यांमुळे आखिरत वर अटळ विश्वास व त्याच्या यशाबद्दल निराश आहेत. ते आकांक्षा व अभिलाषा जरूर व्यक्त करतात, परंतु त्यांची मने आखिरत पासून फिरलेली आहेत आणि ते ऐहिक भक्तित अगदी मग्न आहेत. यास्तव कुरआनात त्यांच्या आखिरत संबंधीच्या दाव्यास अवास्तव ठरवितांना फर्माविले गेले आहे की:-

قُلْ اِنْ كَانَتْ لَكُمُ الدَّارُ الْاٰخِرَةُ عِنْدَاللّٰهِ خَالِصَةً مِّنْ دُوْنِ النَّاسِ فَتَمَنَّوُا الْمَوْتَ اِنْ كُنْتُمْ صَادِقِيْنَ ـ وَلَنْ يَّتَمَنَّوْهُ اَبَدًا ۢ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْهِمْ وَاللّٰهُ عَلِيْمٌ ۢ بِالظّٰلِمِيْنَ ـ (بقره: ۹۴ـ۹۵)

‘यांना सांगा, जर आखिरतचे घर तमाम लोकांना सोडून फक्त तुच्या करीता खास करून आहे तर मरणाची इच्छा बाळगा जर तुम्ही (आपल्या दाव्यात) सच्चे असाल. परंतु त्यांनी जे काही पुढे पाठविले आहे त्याच्यापायी ते मुळीच ही इच्छा बाळगणार नाहीत आणि अल्लाह अत्याचारींना चांगल्या प्रकारे जाणतो.’

(बकरा-९५-९७)

# ६१. सूरह अस्सफ

**नावः** आयत क्र. १ मध्ये अल्लाहच्या मार्गात पंक्ति बद्ध होऊन लढणाऱ्यांचा उल्लेख केला गेला आहे. या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अस्सफ' असे आहे.

**अवतरण काळः** मदनी आहे; आणि मजकूरांवरून असे दिसून येते की उहद युद्धानंतर हि. स. ३ मध्ये अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** मुसलमानांना अल्लाहच्या मार्गात जेहाद करण्यास प्रेरित करणे.

**आयत रचनाः** पहिली आयत प्रस्तावना स्वरुप आहे, ज्यात आकाश व जमीनीच्या समस्त चीज वस्तूंचे अल्लाहची तस्बीह (पावित्र्यासह गुणगान) करण्यात रममाण असण्याचा उल्लेख केला गेला आहे.

आयत क्र. २ ते ४ मध्ये त्या मुसलमानांची कानउघाडणी केली गेली आहे, जे आपल्या कथना नुसार आचरण करीत नाही व आपल्या वचनाची पूर्तता करीत नाही आणि त्या मुसलमानांची स्तुती केली गेली आहे जे योजनाबद्ध रित्या अल्लाहच्या मार्गात लढतात आणि वचनाला जागण्याचा पुरावा देतात.

आयत क्र. ५ व ६ मद्ये मुसलमानांना सावध केले गेले आहे की त्यांनी यहुदींच्या पदचिन्हांचे अनुसरण करू नये, ज्यांनी आपल्या पैगंबरास त्रास-यातना दिल्या व वाकडेपणा अंगिकारला, परिणामी त्यांची मने वाकडी झालीत मग त्यांनी आपल्यातूनच उदयास येणाऱ्या एका अशा पैगंबराचा इन्कार केला ज्याचा उदय स्पष्ट चमत्कारांसह झाला होता.

आयत क्र. ७ ते ९ मध्ये इस्लामचा विरोध करणाऱ्यांना सावध करीत ऐलान केले गेले आहे की अल्लाहचे तेज पूर्ण झाल्या खेरीज राहणार नाही आणि त्याचा धर्म समस्त धर्मांवर वर्चस्व शाली झाल्या खेरीज राहणार नाही मग ही गोष्ट काफिराना व अनेकेश्वर वाद्यांना कितीही अप्रिय वाटो.

आयत क्र. १० ते १३ मध्ये मुसलमानांना ईमान विषयक निकडींना पूर्ण करण्याची व अल्लाहच्या मार्गात जेहाद करण्याची ताकीद केली गेली आहे आणि यांचा आखिरत विषयक मोबदला ही सांगितला गेला आहे. तसेच अल्लाहच्या मदतीची व त्याच्यातर्फे विजयाची शुभवार्ता ही दिली गेली आहे.

आयत क्र. १४ मध्ये हजरत ईसा (येशू) यांच्या प्रामाणिक साथीदारांचे उदाहरण प्रस्तुत करून ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहशी आशा बाळगणारे (म्हणजे त्याच्या धर्माशी आशा बाळगणारे) बनण्याचे आवाहन केले गेले आहे.

# ६१.सूरतुस्सफ

سُورَةُ الصَّفِّ

आयती - १४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ

१. आकाशांच्या व जमीनीच्या समस्त वस्तु अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान करतात.[१]आणि तो वर्चस्व शाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

سَبَّحَ لِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْأَرْضِ ۚ وَهُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿١﴾

२. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ![२] तुम्ही ती गोष्ट का सांगता, जी तुम्ही करीत नाही ! [३]

يٰٓأَيُّهَا الَّذِينَ ءَامَنُوا لِمَ تَقُولُونَ مَا لَا تَفْعَلُونَ ﴿٢﴾

३. अल्लाहच्या जवळ ही गोष्ट सक्त अप्रिय आहे की तुम्ही ती गोष्ट बोलावी जी करीत नाहीत.[४]

كَبُرَ مَقْتًا عِندَ اللّٰهِ أَن تَقُولُوا مَا لَا تَفْعَلُونَ ﴿٣﴾

४. अल्लाह तर त्या लोकांना पसंत करतो, जे त्याच्या मार्गात अशा प्रकारे पंक्ति-बद्ध होऊन लढतात, जणू ते एक शिसे पाजलेली भिंत होय.[५]

إِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الَّذِينَ يُقٰتِلُونَ فِي سَبِيلِهِۦ صَفًّا كَأَنَّهُم
بُنْيٰنٌ مَّرْصُوصٌ ﴿٤﴾

५. आणि स्मरण करा, जेव्हा मूसाने आपल्या जन समूहास म्हटले होते की हे माझ्या जन-समूहातील लोकांनो ! मला कलेश यातना का देता, वास्तविक तुम्ही चांगल्या प्रकारे जाणता की मी तुमच्याकडे अल्लाहचा पैगंबर आहे.[६] मग जेव्हा ते वक्र झाले तेव्हा अल्लाहने त्यांची मने वाकडी करून टाकली.[७] अल्लाह दुराचाऱ्यांना मार्गदर्शन करीत नाही.[८]

وَإِذْ قَالَ مُوسٰى لِقَوْمِهِۦ يٰقَوْمِ لِمَ تُؤْذُونَنِي وَقَد تَّعْلَمُونَ أَنِّي
رَسُولُ اللّٰهِ إِلَيْكُمْ ۖ فَلَمَّا زَاغُوٓا أَزَاغَ اللّٰهُ قُلُوبَهُمْ ۚ وَاللّٰهُ لَا يَهْدِي
الْقَوْمَ الْفٰسِقِينَ ﴿٥﴾

६. आणि जेव्हा मरीयम-पुत्र ईसाने म्हटले की हे बनी इस्राईल ! मी तुमच्याकडे अल्लाहचा पैगंबर आहे [९]आणि तौरात पैकी जे काही माझ्या समोर हजर आहे त्याचे सत्य समर्थन करणारा आहे. [१०]आणि शुभवार्ता देणारा आहे एका पैगंबराची, जो माझ्या नंतर येईल. त्याचे नाव अहमद असेल.[११] तर जेव्हा तो त्यांच्या जवळ स्पष्ट निशाण्या घेऊन आला तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

وَإِذْ قَالَ عِيسَى ابْنُ مَرْيَمَ يٰبَنِيٓ إِسْرٰٓءِيلَ إِنِّي رَسُولُ اللّٰهِ إِلَيْكُم
مُّصَدِّقًا لِّمَا بَيْنَ يَدَيَّ مِنَ التَّوْرٰىةِ وَمُبَشِّرًۢا بِرَسُولٍ يَأْتِي
مِنۢ بَعْدِي اسْمُهُۥٓ أَحْمَدُ ۖ فَلَمَّا جَآءَهُم بِالْبَيِّنٰتِ قَالُوا
هٰذَا سِحْرٌ مُّبِينٌ ﴿٦﴾

१. याचे स्पष्टीकरण सूरह हदीद टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे.

२. खरे पाहता हे नैतिक दृष्टया कमकुवत असलेल्या लोकांना उद्देशुन आहे. असे असले तरी हे सर्व सामान्य मुसलमानांना संबोधून आहे

३. हा प्रश्न या गोष्टीची जाणीव करून देण्या करीता आहे की माणसाने 'बोले तैसा चाले' ही वृत्ती अंगिकारली पाहीजे. एखादे काम करायचेच नाही तर त्याबाबत वल्गना व घोषण करण्यात अर्थ काय? ही गोष्ट सर्व सामान्य पणे सांगितली गेली आहे, ज्यात वचनभंग सारख्या गोष्टी सामील आहेत, तरी ही येथे संकेत विशेषत: त्या लोकांकडे आहे, जे म्हणत की जर काफिरांशी युद्ध करण्याची संधी आम्हाला लाभली तर आम्ही शौर्याने लढू, परंतु अशी संधी लाभल्यावर मात्र निर्भयपणे लढण्यास मागे पुढे करू लागले.

४. म्हणजे अल्लाच्या नजरेत असे लोक तिरस्कृत होत जे कथन व कृतीत विसंगति ठेवतात. जे लोक केवळ बोलाचीच कढी व बोलाचाच भात अथवा निव्वळ वाचावीर असतात त्यांची अल्लाहच्या नजरेत काडीमात्र किंमत नाही. कथन व कृतीत सुसंगती अत्यावश्यक आहे. इस्लामच्या दृष्टीत शब्दांच्या उच्चाराला नव्हे तर ते कृतीत आणण्याला अधिक महत्व आहे. वाष्फळ बडबड आणि एखाद्या कामाचे उंच उंच दावे करणे आणि नंतर पळ काढणे, अतिशय घृणास्पद हरकत होय.

५. म्हणजे अल्लाहला चारित्र्याशील लोक पसंत आहेत जे संघटीत व सुसज्ज होऊन त्याच्या मार्गात जेहाद करतील आणि आपल्या प्राणाची बाजी लावतील. युद्धात शत्रूच्या मुकाबल्या साठी पंक्ति बद्धता आपले सामर्थ्य व निश्चयाची अभिव्यक्ति आहे. तसेच या गोष्टीचा इतमाम ही की शत्रूने मुसलमानांच्या रांगांमध्ये शिरकाव करू नये.

अल्लाहच्या मार्गात जीवाची पर्वा न करता लढणारे तेच लोक असू शकतात, ज्यांचे युद्ध निव्वळ सत्य धर्माचा ध्वज उंचाविण्या करीता व अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्या करीता असावे. मुसलमानांचे ते युद्ध जे ऐहिक गरजे पोटी असते 'जिहाद फी सबिलिल्लाह' च्या व्याख्येत बसत नाही.

६. बनी इस्राईल वंश या गोष्टीस जाणून ही की हजरत मूसा अल्लाहचे रसूल आहेत, त्यांना क्लेश यातना देत राहीला, ज्याची अनेक उदाहरणे कुरआनात सांगितली गेली आहेत. जेहादच्या संबंधाने हजरत मूसा यांनी त्यांना 'अर्दे-मुकद्दस' या स्थानी प्रवेश करण्याचा आदेश दिला तेव्हा त्यांनी उत्तर दिले की तेथे जबरदस्त लोक राहतात. म्हणून जोपर्यंत ते तेथून निघून जात नाही, आम्ही तेथे प्रवेश करणार नाही आणि येथपावेतो बोलू लागले की :-

فَاذْهَبْ اَنْتَ وَرَبُّکَ فَقَاتِلَا اِنَّا هٰهُنَا قَاعِدُوْنَ۔ (مائدہ:۲۴)

'तुम्ही आणि तुमचा पालनकर्ता दोघे ही जा आणि लढा, आम्ही तर येथेच बसून राहू'. (मायदा - २४)

बनी इस्राईलच्या या यातना देण्याकडे संकेत करण्याचा हेतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयायींचे या गोष्टीकडे लक्ष वेधणे की त्यांनी आपल्या पैगंबरांशी त्रास देण्याचे वर्तन अंगिकारू नये, किंबहुना त्यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवित जीवाची पर्वा न करता लढावे.

७. जो मनुष्य सरळ धर्म पसंत करीत नाही आणि वेडया वाकडया गोष्टी करू लागतो. अल्लाह त्याच्या मनात तेढ (वकता) निर्माण करतो. मग त्याची समग्र विचार सरणी वेडी वाकडी होऊन जाते. परिणामी तो अगदी चुकीच्या मार्गाला लागतो. आणि म्हणूनच ईमान बाळगणाऱ्यांना ही दुआ (प्रार्थना) करण्याची ताकीद केली गेली आहे :-

رَبَّنَا لَا تُزِغْ قُلُوْبَنَا بَعْدَ اِذْ هَدَيْتَنَا۔ (آلِ عمران۔۸)

'हे आमच्या पालन कर्त्या! जेव्हा तू आम्हाला मार्गदर्शन प्रदान केले आहेस, तेव्हा यानंतर आमच्या मनात वक्रता निर्माण करू नकोस'. (आले-इमरान:८)

८. म्हणजे जे लोक अवज्ञाकारी बनून राहू इच्छितात, त्यांच्या करीता मार्गदर्शनाचे द्वारे उघडत नाही. मार्गदर्शन तर त्याला लाभते, जो याचा अभिलाषी व कदर जाणणारा असावा.

बनी इस्राईल वंशाने जेव्हा जेहादच्या आदेशांचा उघड भंग केला, तेव्हा त्यांना दुराचारी ठरविले गेले. (पहा-सूरह मायदा - आयत क्र. २५, २६)

९. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. ७२

१०. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह आले इमरान टीप क्र. ७४.

'तौरात पैकी जे काही माझ्या समोर हजर आहे' या शब्दावरून स्पष्ट होते की तौरात आपल्या मूळ स्वरूपात पूर्णत: हजरत ईसा (येशू) यांच्या काळत ही अस्तित्वात नव्हते, किंबहुना त्यांचे काही अंश बाकी होते, म्हणून त्या उरलेल्या अंशांचे पैगंबर ईसा यांनी सत्य समर्थन केले.

११. हे अंतिम प्रेषित हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या) विषय अगदी स्पष्ट भाकित आहे, जे हजरत ईसा यांनी फर्माविले आणि ज्या अर्थी हजरत ईसा बनी इस्राईल वंशाचे अंतिम प्रेषित होते, ज्यांच्या नंतर बनी इस्माईल वंशात सर्वात शेवटच्या प्रेषिताचे आगमन होणार होते, म्हणून ही शुभवार्ता देण्याचे काम अल्लाहने विशेषत्वाने हजरत ईसा यांना सोपविले. यास्तव त्यांनी स्पष्टत: जगाला हा शुभ समाचार दिला

की माझ्या नंतर येणारा पैगंबर केवढा महान असेल.

भाकिते, मग ती कोणत्याही प्रकारची असोत, सर्व साधारण पणे संकेताने सांगितली गेली आहेत आणि जर एखादे भाकित एखाद्या पैगंबराशी संबंधित आहे तर त्याच्या मूळ नावा ऐवजी त्याचे गुणवाचक नाव सांगितले गेले आहे. (हजरत यहया यांच्या खेरीज) या साठी की हा गुणविशेष त्याच्या प्रेषित्वास प्रमाणभूत ठरावा.

'अहमद' पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे दुसरे नाव होते. यास्तव हदीस वचनात उल्लेखित आहे की :-

عَنْ جُبَيْرِ بن مُطْعَمٍ اَنَّ النَّبِىَّ ﷺ قَالَ ـ
اَنَامُحَمَّدٌوَ اَنَااَحْمَدُ۔۔۔۔ (مسلم کتاب الفضائل)

'जुबेर बिन मुतअम द्वारे उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्ल) यांनी फर्माविले मी मुहम्मद आहे आणि मी अहमद आहे'. (मुस्लिम-किताबुल फजाईल)

'अहमद' हा शब्द 'हम्द' पासून बनला आहे आणि या नावाचे स्पष्टीकरण इमान राग़िब यांनी अशा प्रकारे केले आहे-

فَاَحْمَدُ اِشَارَةٌ اِلَى النَّبِى ﷺ بِاسْمِهٖ وَ فِعْلِهٖ تَنْبِيْهًا اَنَّهٗ
كَمَا وُجِدَ اِسْمُهٗ اَحْمَدُ يُوْجَدُ، وَهُوَ مَحْمُوْدٌ فِى اَخْلَاقِهٖ
وَاَحْوَالِهٖ ـ (المفردات، ص ۱۳۰)

"अहमदचा संकेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे नाव व शील-स्वभावाकडे आहे आणि हेतु या गोष्टीशी अवगत करणे की ते आपल्या निती व चारित्र्यात महमूद (प्रशंसनीय) असतील." (अल-मुफ़ररिदात पृष्ट १३०)

या शब्दाचा दुसरा अर्थ अत्याधिक ईश-स्तवन करणारा असा ही आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ज्या विपुल प्रमाणात अल्लाहची स्तुति-प्रशंसा केली आहे. जेवढया विवरण व तपशीला सह त्याच्या स्तुत्य गुणांना प्रस्तुत केले आहे, नमाजचा आरंभ ज्या प्रकारे हम्द (सूरह फातेहा) ने फर्माविला, अल्लाहच्या पावित्र्य पूर्ण स्तुति प्रशंसेवर आधारीत जप-जाप्याचा जो अनमोल खजीना मुस्लिम जन समूहाला प्रदान केला आहे आणि अल्लाहच्या स्तुति प्रशंसेने ज्या प्रकारे संपूर्ण आसमंत व्यापून टाकले आहे तो त्यांच्या मानाच्या तुराच होय आणि ते खऱ्या अर्थाने 'अहमद' असण्याचा स्पष्ट पुरावा होय.

त्यांचे हे शुभनाम सर्वपरिचित राहीले आहे. यास्तव प्रेषितदरबाराचे कवी हस्सान बिन साबित (रजि). यांच्या एक शेरचा अनुवाद असा :-

صَلىَّ الالٰهُ وَمَنْ يَحُفُّ بِعَرْشِهٖ
وَالطَّيِّبُوْنَ عَلىَ الْمُبَارَكِ اَحْمَد

"अल्लाह आणि त्याच्या सिंहासनाच्या भोवताली राहणारे फरिश्ते आणि पावित्र्याशील लोक, शुभ व समृद्धशील अशा मुहम्मदांवर दरूद पाठवितात."

जेथपावेतो आजच्या काळातील बायबलच्या मत्तय, मरकस, लूका योहन्ना इ. चा संबंध आहे, ते हजरत ईसा (येशू) यांच्या परिस्थिती व त्यांच्या शिकवणीला निकृष्ट स्वरूपात प्रस्तुत करतात. कारण यांच्या संकलकांनी या ग्रंथांना पैगंबर ईसा यांचे जगातून निर्गमन झाल्या नंतर बऱ्याच वर्षांनी संकलीत केले होते आणि हे संकलन मत्तय खेरीज, जो हजरत ईसा यांचे सहचारी नव्हते की त्यांनी प्रत्यक्षत: ऐकले असावे.

यास्तव हे ते बायबल नव्हे जे पैगंबर ईसा यांच्यावर अवतरले होते, मात्र त्यातले काही अंश निश्चितपणे त्याच्यात आहेत मात्र मूळ स्वरूपात नाही. बनी इस्राईलची धार्मिक भाषा हिब्रू भाषा होती. आणि तौरात व इतर सहीफे (लघू-ग्रंथ) हिब्रू भाषेत आहेत, त्यात परिवर्तन झालेले आहे. परंतु बायबल मात्र हिब्रू भाषेत नाही. आजचे बायबल यूनानी (Greek) भाषेतून अनुवाद केलेले आहे आणि मग अनुवादाचा अनुवाद होत राहील्याने गोष्ट मूळ मुद्यापासून बरीच दूर झाली आहे. तसेच हे ग्रंथ स्वत: ही या गोष्टीचा दावा करीत नाही की ते शब्दश: अल्लाहची वाणी आहेत; किंबहुना त्यात घट वर्णनाची शैली अगदी स्पष्ट आहे. बायबलचा भाष्यकार स्वत:ही गोष्ट मान्य करतो, लूका कृत बायबलच्या निवेदना नुसार घटना वर्णन हाच त्याचा हेतु आहे. आणि यात त्याच्या इल्हामी (ईश्वरातर्फे अवतरित ) असण्याचा कोठेही दावा केला गेला नाही.

" The motive and method of the writing of a gospel are described in the prologue of the Gospel of Luke, without any claim to inspiration, the writer set out to get the best information that he could and to use the previous attempts which had been made; the narrative was not designed to be sacred scripture. It was a record of events where in the sacred scriptures were fulfilled."

(pealk's Commentary on the Bible-London-1962 P.4)

तरीही आजच्या बायबल मध्ये भविष्यात येणाऱ्या प्रेषिता

संबंधी स्पष्ट संकेत मिळतात; जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याचकडे अंगुली निर्देश करतात.

'हयापुढे मी तुम्हांबरोबर फार बोलणार नाही, कारण जगाचा अधिकारी येतो; तरी माझ्यावर त्याची काही सत्ता नाही.' (योहान:१४:३०)

''तरी मी तुम्हाला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे, कारण मी न गेलो तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही.'' (योहान १६:७)

''मला अद्याप तुम्हाला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत, परंतु आतांच तुमच्याने त्या सोसवणार नाहीत; तरी तो सत्याचा आत्मा येईल, तेव्हा तो तुम्हाला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल कारण तो आपल्या स्वत:चे सांगणार नाही तर जे काही ऐकेल ते सांगेल, आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हाला कळवील.'' (योहान: १६:१२-१३)

''बायबलच्या उर्दू अनुवादात 'मददगार हा शब्द प्रयोग केला गेला आहे. परंतु इब्ने हिशाम यांनी स्पष्ट केले आहे की योहन्ना कृत जे बायबल सर्यानी भाषेत आहे त्यात 'मुनहमन्ना' हा शब्द प्रयोजिला गेला आहे; ज्याचा अर्थ 'मुहम्मद' असा आहे.'' (इब्ने हिशाम खंड - १ पृ. २५१)

आणि मत्तय कृत बायबल मध्ये अंतिम पैगंबरा बाबत अशा प्रकारचे भाकित आहे-

'येशू त्यास म्हणाला,'जो दगड बांधणाऱ्यांनी नापसंत केला तोच कोनशिला झाला; हे परमेश्वराकडून झाले आणि ते आमच्या दृष्टीने आश्चर्य कारक आहे' असे शास्त्रात तुमच्या वाचण्यात कधी आले नाही काय? म्हणून मी तुम्हास सांगतो की देवाचे राज्य तुम्हापासून काढून घेतले जाईल व जी प्रजा त्याचे फळ देईल तिला ते दिले जाईल (जो ह्या धोंडयावर पडेल, त्याचा चुराडा होईल, परंतु ज्या कोणावर हा पडेल त्याचा हा भुगा भुगा करून टाकील)'. (मत्तय २१:४२ते ४५)

राहीले बर्नाबास (Barnabbas)कृत बायबल तर यात नावाच्या स्पष्टीकरणा सह भाकित केले गेले आहे:-

'येशूने उत्तर दिले, विश्वास ठेव बर्नाबास.-----ईश्वराची मर्जी झाली की जगात लोकांनी यहूदाच्या मरणावर माझे हंसे करावे आणि सर्वांनी हे जाणावे की मी क्रासावर मेलो आणि हंसे होत राहील जो पर्यंत मुहम्मद ईश्वराचा पैगंबर येत नाही की जेव्हा तो येईल तेव्हा त्या भ्रमाचा उलगडा करील त्या लोकांना जे ईश्वराच्या शरीअतीवर ईमान आणतील.' (प्रकरण-२२०)

परंतु हे बायबल कोणत्याही प्रकारे विश्वासनीय नाही आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे प्रेषित्व सूर्यापेक्षा आधिक तेजस्वी आहे. त्याच्या प्रेषित्वास सिद्ध करण्या करीता कमकुवत व दुबळया प्रमाणांचा आधार घेण्याची गरज नाही. बार्नाबास कृत बायबलची भाकिते ख्रिश्चनांकरीता प्रमाण ठरू शकत नाही. कारण ते याला सप्रमाण (सनद प्राप्त असलेले) मानीत नाही. या बायबलच्या अभ्यासा वरून जाहीर होते की याला एखाद्या मुसलमानाने संकलीत करून बार्नाबासशी त्याचा संबंध जोडला आहे. ते बनावटी असण्या बद्दल चर्चा विवादाची गरज आहे; ज्याला या ठिकाणी वाव नाही. म्हणून संक्षिप्तपणे काही गोष्टी सादर केल्या जात आहेत:-

१) बार्नाबासचे पैगंबर ईसा यांच्या समर्थकांपैकी असणे सिद्ध नाही. बायबलचे पुस्तक 'कृत्ये' (Acts)कृत वरून असे दिसून येते की तो पॉल (Paul) सोबत धर्म-प्रचारा करीता अन्ताकिया येथे गेला होता (कृत्ये २२: १५) परंतु त्याच्या स्थिती विषयी अनभिज्ञता आहे.

२) बार्नाबासने आपल्या पुस्तकाच्या सुरवातीलाच ते लिहीण्याचा हेतु सांगितला आहे की बोल्हस जी दूषित श्रद्धा पसरवित आहे तिचे खंडन केले जावे व खऱ्या गोष्टी समोर आणल्या जाव्यात. परंतु पुस्तकाच्या शेवटी लिहीतो की हजरत ईसा ने त्याला म्हटले,

'हे पहा बर्नाबास तू निश्चित अगदी निश्चित माझे बायबल लिहावे.' (प्रकरण: २२१)

जर हजरत ईसा यांनी बर्नाबासला बायबल लिहीण्याचा आधीच आदेश दिला होता तर मग त्याने अगदी सुरवातीलाच हे काम करावयास हवे होते आणि हे पुस्तक हिलीण्याचा हेतु हाच सांगितला पाहीजे होता परंतु तो पॉलच्या दूषित श्रद्धा पसरण्या पावेतो गप्प राहीला.

३) बर्नाबास कृत बायबल संबंधी असे म्हटले जाते की याची फक्त एक प्रत जी इटालीयन भाषेत होती, पोप सिक्स्टस (Sixtus) च्या संग्रही होती आणि अठराव्या शतकात------मध्ये ती लोकांसमोर आली. जर हे खरोखर बर्नाबास लिखित बायबल आहे तर ते मूलत: कोणत्या भाषेत होते आणि संपूर्ण जगा पासून कशा प्रकारे अनभिज्ञ राहीले?

४) या इंजिल (बायबल) मध्ये हजरत मरीयम विषयी निवेदन केले गेले आहे की जेव्हा ती गर्भवती झाली तेव्हा या भयाने की कदाचित व्यभिचाराच्या आरोपा खाली दगडांचा मारा करून ठार न केले जावे, स्वत:साठी आपल्याच जमातीचा एक साथी निवडला ज्याचे नाव यूसुफ होते. (प्रकरण-२)

ही गोष्ट कुरआनाच्या निवेदनाच्या अगदी विपरीत आहे आणि हजरत मरीयम यांच्या चारित्र्याविषयी शंका निर्माण करते. हजरत मरीयम तर साक्षात पावित्र्य होते आणि अल्लाह वर त्यांचा भरवसा असामान्य होता मग तिने स्वत: अशा माणसाशी जो तिचा पती नाही, संबंध का म्हणून जोडला असता?

५) यात पैगंबर ईसा (येशू) यांचा एक चमत्कार सांगितला गेला आहे की त्यांनी एका भोजनाच्या आमंत्रण प्रसंगी पाण्याला मद्य बनविले होते (प्रकरण-१५) केवढी वाहयात गोष्ट आहे, जिचा पैगंबर ईसाशी संबंध जोडला गेला आहे.

६) यात पैगंबरांची संख्या हजरत ईसा यांच्या तोडून एक लाख चोबीस हजार सांगितली गेली आहे (प्रकरण-१७) याच प्रकारची गोष्ट जईफ हदीस मध्ये ही सांगितली गेली आहे आणि असे दिसते की हे हदीस वचन यावरूनच घेतले गेले आहे.

या प्रकरणात पुढे असे सांगितले गेले आहे की एलयाहच्या वेळी इजबिलने दहा हजार पैगंबराना ठार केले ही उघड अतिशयोक्ति आहे.एकाच वेळी एवढया मोठया संख्येत पैगंबरांना पाठविले जाण्यात कसलेही प्रमाण नाही. याचे समर्थन ना कुरआना द्वारे होते आणि ना हदीस वचना द्वारे.

७) यात हजरत ईसा यांच्याशी या कथनाचा संबंध जोडला गेला आहे की, 'सैतान जो जणू फरिश्त्यांचा ज्योतिषी व सरदार होता' (प्रकरण -२५) ही गोष्ट देखील कुरआनाच्या निवेदनाशी सुसंगत नाही.

८) यात हजरत आदमचा हा किस्सा सांगितला गेला आहे.

'जेव्हा आदम उठून उभा राहीला तेव्हा त्याने हवेत एक लेख पाहीला जो सूर्या सारखा चमकत होता, की ईश्वर एक आहे आणि मुहम्मद ईश्वराचे रसूल आहेत. यावर आदमने आपले तोंड उघडले व म्हटले हे ईश्वर, माझ्या ईश्वरा मी तुझा आभारी आहे की तू माझ्या निर्मितीचे भाग्य फर्माविले परंतु मी आर्जव करतो, मला सांग या शब्दांचा अर्थ काय आहे. 'मुहम्मद ईश्वराचा रसूल आहे' काय माझ्या आधी आणखी काही माणसे होऊन गेलीत? तेव्हा ईश्वराने म्हटले, शाबास हे माझ्या दासा आदम, मी तुला सांगतो की तू पहिला मानव आहेस ज्याला मी निर्माण केले आणि तो ज्याला तू (मुंदर्ज) पाहीलेस तुझा पुत्र आहे, जो जगात आतापासून अनेक वर्षांनी येईल आणि माझा रसूल असेल. ज्याच्या करीता मी समस्त चीज वस्तू निर्माण केल्या आहेत------- आदमने ईश्वराला विनवणी केली की हे ईश्वरा हे लिखाण माझ्या हातांच्या बोटांच्या नखांवर अंकित कर. तेव्हा ईश्वराने पहिल्या माणसाच्या अंगठयांवर हे लिखाण अंतिक केले. उजव्या अंगठयाच्या नखावर लिहिले होते, ईश्वर एक आहे आणि डाव्या अंगठयाच्या नखावर लिहीले होते मुहम्मद ईश्वराचा रसूल आहे. तेव्हा पहिल्या मानवाने पित्याच्या मायेने त्या शब्दांचे चुंबन घेतले व आपल्या डोळयांवर चोळले आणि म्हटले, समृद्धशाली ठरो तो दिवस जेव्हा तू जगात येशील (प्रकरण:२९) आणि प्रकरण ४१ मध्ये सांगितले गेले आहे की हजरत आदम यांनी जन्नतच्या फाटकावर लिहीलेले पाहीले की, 'ईश्वर एक आहे आणि मुहम्मद त्याचा रसूल आहे.'

या अशा गोष्टी होत ज्या आमच्या येथे मौजू (स्वरचित) हदीस रचनांमध्ये सांगितल्या गेल्या आहेत.आश्चर्य म्हणजे मौलाना मौदूदीनी एका अशा बायबलला जे अज्ञात आहे व ज्यात निराधार गोष्टी आणि शाब्दिक चर्चा आहेत,सनदशीर ठरविले आणि यावर विश्वास ठेवित त्या भाकितांचा उल्लेख केला, जी त्यात सांगितली गेली आहेत. मौलाना फर्मावितात की :-

''या चर्चेवरून ही गोष्ट स्पष्ट होते की बर्नाबास कृत बायबल, वास्तविकपणे चार बायबलां पेक्षा अधिक विश्वसनीय बायबल आहे. पैगंबर मसीह (येशू ख्रिस्त) यांच्या शिकवणी व चारित्र्याचे योग्य प्रतिनिधित्व करते.'' (तफ्हीमुल कुरआन खंड-५ पृ. ४७१)

परंतु एखाद्या अशा ग्रंथाला ज्यात ईश्वरातर्फे प्रेरित केल्या गेलेल्या गोष्टी सांगण्याचा दावा केला गेला असावा, त्याला केवळ सुखद पैलूं वर दृष्टी टाकून प्रभावित होणे योग्य नव्हे. ॅयाचा प्रभाव आमच्या भूमिकेवर पडतो आणि इतर समस्या ही निर्माण होतात.

१२. म्हणजे बनी इस्त्राईलने हजरत ईसा यांनी सादर केलेल्या चमत्कारांना जादू ठरविले. हाच मजकूर सूरह मायदा मध्ये ही सांगितला गेला आहे.

وَاِذْ كَفَفْتُ بَنِىٓ اِسْرَائِيْلَ عَنْكَ اِذْجِئْتَهُمْ
بِالْبَيِّنَاتِ فَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْامِنْهُمْ اِنْ
هَذَااِلَّاسِحْرٌمُّبِيْنٌ۔ (مائدہ:١١٠)

'आणि जेव्हा मी बनी इस्त्राईलच्या हातांना तुमच्या पासून रोखले होते जेव्हा तुम्ही त्यांच्या जवळ उघड निशाण्या घेऊन आले होते आणि जे लोक यांच्या पैकी काफिर होते, ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.'

(मायदा - ११०)

तो तुमचे अपराध माफ करील आणि तुम्हाला अशा बागांमध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील आणि उत्कृष्ट घरांमध्ये. जे निरंतर राहणाऱ्या बागांमध्ये असतील. ही आहे महान सफलता. *(अल-कुर्आन)*

७. आणि त्याहून मोठा अत्याचारी कोण असेल जो अल्लाह वर खोटे कुभांड रचेल, वास्तविक ......................................................[१३] अल्लाह अत्याचारी लोकांना मार्गदर्शन करीत नसतो.[१४]

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ الْكَذِبَ وَهُوَ يُدْعَىٰ إِلَى
الْإِسْلَامِ ۚ وَاللَّهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ الظَّالِمِينَ ﴿٧﴾

८. हे इच्छितात की अल्लाहचे तेज आपल्या तोंडाच्या फूंकरीने विझवून टाकावे, परंतु अल्लाह आपले तेज पूर्ण केल्या खेरीज राहणार नाही. मग काफिरांना अप्रिय का वाटेना.[१५]

يُرِيدُونَ لِيُطْفِئُوا نُورَ اللَّهِ بِأَفْوَاهِهِمْ وَاللَّهُ مُتِمُّ نُورِهِ
وَلَوْ كَرِهَ الْكَافِرُونَ ﴿٨﴾

९. तोच होय, ज्याने आपल्या पैगंबरास मार्गदर्शन व सत्य-धर्मासह पाठविले, या साठी की यास समस्त धर्मांवर वर्चस्वशाली करावे,मग अनेकेश्वर वाद्यांना किती ही अप्रिय वाटो.[१६]

هُوَ الَّذِي أَرْسَلَ رَسُولَهُ بِالْهُدَىٰ وَدِينِ الْحَقِّ لِيُظْهِرَهُ عَلَى الدِّينِ
كُلِّهِ وَلَوْ كَرِهَ الْمُشْرِكُونَ ﴿٩﴾

१०. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! काय मी तुम्हाला तो व्यापार दर्शवू, जो तुम्हाला दु:खदायक अजाब (ईश-शिक्षे) पासून वाचवील?[१७]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا هَلْ أَدُلُّكُمْ عَلَىٰ تِجَارَةٍ تُنْجِيكُمْ مِنْ عَذَابٍ أَلِيمٍ ﴿١٠﴾

११. ईमान बाळगा अल्लाह आणि त्याच्या पैगंबरा वर [१८] आणि जिहाद करा अल्लाहच्या मार्गात आपल्या धन व आपल्या प्राणाने. [१९] हे तुमच्या साठी अधिक चांगले आहे, जर तुम्ही जाणाल.[२०]

تُؤْمِنُونَ بِاللَّهِ وَرَسُولِهِ وَتُجَاهِدُونَ فِي سَبِيلِ اللَّهِ بِأَمْوَالِكُمْ
وَأَنْفُسِكُمْ ۚ ذَٰلِكُمْ خَيْرٌ لَكُمْ إِنْ كُنْتُمْ تَعْلَمُونَ ﴿١١﴾

१२. तो तुमचे अपराध माफ करील [२१] आणि तुम्हाला अशा बागांमध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील आणि उत्कृष्ट घरांमध्ये. [२२] जे निरंतर राहणाऱ्या बागांमध्ये असतील. [२३] ही आहे महान सफलता.[२४]

يَغْفِرْ لَكُمْ ذُنُوبَكُمْ وَيُدْخِلْكُمْ جَنَّاتٍ تَجْرِي مِنْ تَحْتِهَا الْأَنْهَارُ
وَمَسَاكِنَ طَيِّبَةً فِي جَنَّاتِ عَدْنٍ ۚ ذَٰلِكَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿١٢﴾

१३. आणि अन्य गोष्टी ही ज्या तुम्ही इच्छिता, अल्लाह तर्फे मदत आणि लवकरच प्राप्त होणारा विजय. [२५] आणि (हे पैगंबर !) ईमान बाळगणाऱ्यांना याचा शुभ समाचार द्या.

وَأُخْرَىٰ تُحِبُّونَهَا ۖ نَصْرٌ مِنَ اللَّهِ وَفَتْحٌ قَرِيبٌ ۗ وَبَشِّرِ الْمُؤْمِنِينَ ﴿١٣﴾

१३.अर्थात ज्यांच्यावर कुरआन अवतरले त्या पैगंबरांचे आवाहन इस्लामकडे आहे.परंतु हे यहूदी वगैरे आपल्या खोटया धार्मिक श्रद्धा पायी,त्यांना विरोध करीत आहेत, वास्तविक अल्लाहतर्फे सनद न लाभलेली कोणतीही धार्मिक श्रद्धा, अल्लाहवर खोटे नाटे रचण्याच्याच अर्थाने आहे. उदा. यहूदींचा हा दावा की पैगंबर केवळ बनी इस्राईल वंशापैकी असू शकतो. ख्रिश्चनांचा हा दावा की हजरत ईसा (येशू) अल्लाहचे पुत्र आहेत आणि अनेकेश्वर वाद्यांचा हा दावा की उपास्ये अनेकविध आहेत आणि अल्लाहने या व्यक्तिला अर्थात हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना) रसूल बनवून पाठविले नाही. ही आणि या सारख्या इतर इस्लाम विरोधी गोष्टी ज्यांना त्या धर्माचे लोक आपली धार्मिक श्रद्धा समजतात; आणि या कारणास्तव इस्लामचा स्विकार करीत नाही ते अल्लाहशी उघड असत्याचा संबंध जोडतात, मग ते अल्लाहचे नाव घेऊन या गोष्टी बोलत असोत किंवा नसोत,कारण श्रद्धा व धर्माचा संबंध अपरिहार्यपणे ईश्वराशी आहे. तेव्हा ईश्वरा बाबत (म्हणजेच अल्लाहच्या संदर्भात) खोटे बोलणे हा काही सामान्य अपराध ठरू शकत नाही, किंबहुना हा अपराध भयंकर स्वरूपाचा आहे.

१४. म्हणजे जो पर्यंत ते या अत्याचारा (चुकीच्या वर्तना) पासून परावृत्त होत नाही, त्यांना मार्गदर्शन लाभू शकत नाही.

१५. याचे स्पष्टीकरण सूरह तौबा टीप क्र. ६४ मध्ये केले गेले आहे.

१६. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तौबा टीप क्र. ६५ आणि सूरह फतह टीप क्र. ५८

१७. मनुष्य व्यापार अशासाठी करतो की नफा कमवावा परंतु हा नफा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो जो जगापुरताच राहतो. याच्या विरोधात तो सौदा जो अल्लाहशी केला जातो आणि ज्यात आपली मूल्यवान सम्पत्ति प्राण, वित्त लावले जाते आणि ज्याच्या करीता अहोरात्र परिश्रम केले जातात खराखुरा व निरंतर टिकणारा नफाचा सौदा आहे. याचा सर्वात प्रथम लाभ आहे की हा सौदा करणारा अल्लाहच्या दु:खदायक अजाब (प्रकोपा) पासून सुरक्षित राहील आणि त्याला निरंतरचे यश प्राप्त होईल, जे पुढे सांगितले गेले आहे.

या प्रसंगी सूरह तौबा आयत क्र.१११ व स्पष्टीकरणात्मक टीप १९९ ही विचाराधीन असावी.

ही आयत बुद्धिला या गोष्टीवर केंद्रित करते की माणसाच्या जीवनाची मूळ समस्या आखिरतच्या मुक्तिची समस्या आहे आणि याची सामग्री माणसाने या जगातच जुटवली पाहीजे. ही काळजी माणसावर जोपावेतो आपला पगडा बसवित नाही, तो ऐहिक समस्यांच्या जाळयातच गुरफटून राहील आणि यश-अपयशा करीता चुकीचे स्तर कायम करील.

१८. ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून ही ताकीद या अर्थाने आहे की स्वत:ला प्रामाणिक व सच्चे मोमीन (ईमान धारक) बनवा आणि ईमान विषयक निकडींना पूर्ण करा.

१९. जेहाद ईमानची महत्वपूर्ण निकड आहे. धर्माचे रक्षण व त्याच्या ध्वज उंचाविण्या करीता जेव्हा जेव्हा प्राणाची बाजी लावण्याची गरज पडेल, ईमान बाळगणाऱ्यांनी प्राण,वित्ताचे बलीदान द्यावे. आणि त्या काळच्या परिस्थितीत तर जेहाद अनिवार्य झाले होते आणि मसजिदे हराम (काबा गृहा) ला अनेकेश्वर वाद्यांच्या कब्जयातून सोडविणे सर्वात मोठी मोहीम होती. तसेच हे जेहाद अल्लाहच्या पैगंबरांच्या नेतृत्वात केले जात होते. म्हणून याचे महत्व असामान्य होते.

२०. म्हणजे याचा जो उत्कृष्ट मोबदला मिळणार आहे, त्यावर जर तुमची दृष्टी आहे तर तुम्ही याला आपल्या हक्कात उत्कृष्टच समजाल.

२१. अपराधांची क्षमा हा फार मोठा मोबदला आहे. जर एकटया दुकटया अपराधा बद्दल ही अल्लाह शिक्षा देईल तर माणसाची काय दशा होईल. परंतु जे लोक अल्लाहच्या मार्गात बलीदान देतात, त्यांच्या त्या बलीदानांची कदर जाणत अल्लाह त्यांच्या अपराधाना माफ करतो.

२२. म्हणजे पावित्र्य पूर्ण व उत्कृष्ट घरे,ज्यांच्यापुढे या जगातील भव्य महाल ही कस्पटा समान आहेत.

किती नादान आहेत ते लोक जे ऐहिक ऐश्वरर्याच्या नादी लागून 'अन्न, वस्त्र व निवारा' ही घोषणा करतात आणि याच्या प्राप्ती साठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात, परंतु जिथे सदैव राहायचे आहे, तिथल्या ठिकाणा करीता किंचितही काळजी त्यांना वाटत नाही की या वस्तू तिथे कशा प्रकारे लाभतील जर त्यांनी या समस्येवर विचार चिंतन केले असते तर या जगालाच सर्व काही समजले नसते.

२३. म्हणजे घर ही शाश्वत, बाग ही शाश्वत आणि रहिवाशी ही शाश्वत.

२४. म्हणजे हा आहे या व्यापाराचा खरा नफा की भविष्य उज्वल आणि उत्कृष्ट ईश देणग्यांसह निरंतर जीवन, केवढी महान व केवढी वैभवशाली सफलता आहे ही.

२५. महणजे या आखिरतच्या यशा खेरीज त्या गोष्टी ही लाभतील ज्या तुम्हाला प्रिय आहेत. अर्थात अल्लाहची मदत व लवकर प्राप्त होणारा विजय. जवळच्या विजयाचा संकेत मक्का विजयाकडे आहे, जो लवकर प्राप्त करण्या करीता ईमान धारक बेचैन होते.या प्रसंगी त्या जेहाद करणाऱ्यांना अल्लाहच्या मदतीच्या उदया सोबतच ही शुभवार्ता ही दिली गेली आहे की मक्का लवकरच जिंकले जाईल. यास्तव या सूरहच्या अवतरणा नंतर फार लवकर मक्केवर विजय प्राप्त झाला आणि कुरआन व पैगंबरांची सत्यता अशी सिद्ध झाली की इस्लामचे कट्टर विरोधक ही त्याला मानणारे झालेत.

१४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाहचे सहाय्यक बना, [२६] ज्या प्रकारे मरीयम-पुत्र ईसाने हवारींना म्हटले होते, कोण आहे अल्लाहच्या मार्गात माझा मदतनीस? हवारींनी उत्तर दिले होते, आम्ही आहोत अल्लाहचे मदतनीस, [२७] तेव्हा बनी इस्राईलच्या एका समूहाने ईमान बाळगले आणि दुसऱ्या गटाने कुफ्र केले [२८] तर आम्ही ईमान बाळगणाऱ्यांची त्यांच्या शत्रूंच्या विरोधात मदत केली आणि ते वर्चस्व शाली झाले.[२९]

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ كُونُوٓا۟ أَنصَارَ ٱللَّهِ كَمَا قَالَ عِيسَى ٱبْنُ مَرْيَمَ
لِلْحَوَارِيِّـۧنَ مَنْ أَنصَارِىٓ إِلَى ٱللَّهِ ۖ قَالَ ٱلْحَوَارِيُّونَ نَحْنُ أَنصَارُ
ٱللَّهِ ۖ فَـَٔامَنَت طَّآئِفَةٌ مِّنۢ بَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ وَكَفَرَت طَّآئِفَةٌ ۖ
فَأَيَّدْنَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ عَلَىٰ عَدُوِّهِمْ فَأَصْبَحُوا۟ ظَٰهِرِينَ ﴿١٤﴾

२६. अल्लाहचे सहाय्यक बनण्याशी अभिप्रेत अल्लाहच्या धर्माचे सहाय्यक बनणे होय. वास्तविक अल्लाह कोणाच्या मदतीचा भुकेला नाही. परंतु तो त्या लोकांना,जे त्याच्या धर्माची मदत करतात आणि विशेषत: अगदी कठीण परिस्थितीतही मदत करतात, त्यांना 'अल्लाहचे सहाय्यक' हा मान प्रदान करतो. या साठी की त्यांची कदर व हिंमत वाढविली जावी आणि त्यांच्या मनात अल्लाह खातीर काम करण्याची भावना निर्माण व्हावी.

२७. मूळ शब्द हवारी. याचा अर्थ प्रामाणिक व नि:स्वार्थ मित्र असा होय. हजरत ईसा यांनी जेव्हा असे पाहीले की त्यांचे प्रेषित्व आणि धर्माचे योग्य आवाहन प्रस्तुत करणे जीव धोक्यात टाकल्या विना शक्य नाही, तेव्हा त्यांनी आपल्या साथीदारांना हाक दिली की, असा कोण आहे जो या परिस्थितीत ही माझ्या समर्थनावर तत्पर राहतो आणि अल्लाहच्या धर्माच्या निभर्य प्रचारा करीता उठून उभा राहतो. त्यावर साथीदारांनी उत्तर दिले. आम्ही आहोत अल्लाहचे मदतनीस आणि ही मोहीम सर करण्यासाठी तयार. हे उत्तर हजरत ईसा यांच्या प्रामाणिक साथी दारांनी दिले होते; ज्यांना 'हवारी' म्हटले गेले. इथे ही घटना निवेदन करण्याचा हेतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयायींना त्यांचे समर्थन, सहाय्यक, आणि धर्माच्या प्रचार व प्रसारा वर उद्युक्त करणे.

हजरत ईसा यांना तरवारीने जिहाद करण्याची संधी लाभली नव्हती, परंतु ज्या परिस्थितीला त्यांना तोंड द्यावे लागले,त्यात धर्माला आपल्या मूळ स्पिरीट मध्ये सादर करणे. दिखाऊपणा व पारंपारीक धार्मिकते ऐवजी खऱ्याखुऱ्या धार्मिकतेकडे आवाहन करणे आणि अल्लाहच्या संदेशास सार्वत्रिक करणे हे ही जेहाद पेक्षा कमी नव्हते.

आजच्या परिस्थितीत ही धर्माचे आवाहन व त्याच्या प्रसाराचे कार्य निर्भयता पूर्वक आणि उचित रित्या पार पाडणे, अनेकेश्वर वादी वातावरणात एकेश्वर वादास उज्वलपणे प्रस्तुत करणे, नवनवीन प्रथा व रिवाजांनी धर्मावर ज्या परती चढविल्या आहेत त्यांना खरडून टाकणे, जेणेकरून इस्लाम आपल्या मूळ स्वरूपात समोर यावा, मिथ्या विचार सरणींना रद्द करीत इस्लामी विचार सरणीला प्रकट करणे इस्लामेतर कायद्यांच्या जागी शरीअतच्या कायद्यांचे समर्थन व संरक्षण करणे आणि असा प्रयत्न करणे जो धर्माला उंचाविण्यास कारक ठरावा, अल्लाहच्या धर्माची फार मोठी मदत आणि फार मोठे जेहाद (धर्म-युद्ध) होय. अल्लाहचे फर्मान आहे की :-

وَالَّذِيْنَ جَاهَدُوْا فِيْنَا لَنَهْدِيَنَّهُمْ سُبُلَنَا۔ (عنکبوت:٦٩)

'जे लोक आमच्या मार्गात जिहाद करतील आम्ही त्यांच्यावर आपले मार्ग मोकळे करू.' (अन्कबूत : ६९)

२८. हजरत ईसा यांचे आवाहन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या धर्म प्रसाराच्या परिणामी बनी इस्राईलचा एका समूहाने हजरत ईसा यांच्या प्रेषित्वावर ईमान बाळगले. जो मुसलमान होता परंतु नंतर हजरत ईसा यांचे अनुयायी 'ख्रिश्चन' म्हटले गेले. राहीला दुसरा समूह, ज्याने हजरत ईसा यांच्या प्रेषित्वाला आणि 'बायबल'ला अल्लाहचा ग्रंथ मानण्यास इन्कार केला, म्हणून ते 'कफिर' ठरले. हा यहूदींचा समूह आहे.

स्पष्ट असावे की अल्लाहच्या कोणत्या ही पैगंबरास व कोणत्या ही ग्रंथास मान्य करण्यास इन्कार केल्या पायी मनुष्य काफीर ठरतो. मग तो इतर गोष्टींवर ईमान बाळगण्याचा दावा करीत असो व एखाद्या अशा धर्माशी संबंधित असो, ज्याचा संबंध एखाद्या पैगंबराकडे जोडला गेला असेल.

२९. ही आयत स्पष्ट करते की हजरत ईसा यांच्यावर ईमान बाळगणारे शेवटी वर्चस्वशाली झाले. जेथपावेतो प्रमाणाच्या वर्चस्वाचा संबंध आहे तो तर त्यांना आधी पासूनच प्राप्त होता. म्हणून या ठिकाणी ज्या वर्चस्वाचा उल्लेख केला गेला आहे तो सत्ताधिकाराचा उल्लेख असू शकतो. आणि 'जाहीरीन' हा शब्द कुरआनात दुसऱ्या ठिकाणी सत्ताधिकाराचे वर्चस्व या अर्थानेच प्रयोजिला गेला आहे. फिरऔनच्या दरबारात एका ईमान धारक मर्दाने म्हटले होते.

يٰقَوْمِ لَكُمُ الْمُلْكُ الْيَوْمَ ظَاهِرِيْنَ فِى الْاَرْضِ فَمَنْ
يَّنْصُرُنَا مِنْ بَأْسِ اللّٰهِ اِنْ جَاءَنَا۔ (مؤمن:٢٩)

"हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो! आज तुम्हाला शासन लाभले आहे आणि तुम्ही या भूभागावर वर्चस्व शाली आहात, परंतु जर अल्लाहचा अजाब आमच्यावर आला तर असा कोण आहे जो आमची मदत करील? (मोमीन: २९)

या प्रसंगी सूरह तौबा टीप क्र. ६५ ही विचाराधीन असावी.

या आयतीचा हेतु खरे पाहता हे स्पष्ट करणे होय की ज्या प्रकारे अल्लाहचे पैगंबर ईसा यांच्यावर ईमान बाळगणारे वर्चस्व शाली झाले, त्याच प्रमाणे कुरआनाचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान बाळगणारे ही वर्चस्वशाली झाल्याखेरीज राहणार नाही. आणि इतिहास साक्षी आहे की असेच घडले.

कुरआनात हे ही स्पष्टीकरण आहे की अल्लाहने पैगंबर ईसा यांना हा शुभ-संदेश दिला होता की :-

وَجَاعِلُ الَّذِيْنَ اتَّبَعُوْكَ فَوْقَ الَّذِيْنَ كَفَرُوْا
اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ۔ (آل عمران:٥٥)

" ज्या लोकांनी तुमचे अनुसरण अंगिकारले, त्यांना त्या

लोकांवर ज्यांनी कुफ्र केले कियामती पावेतो वर्चस्वशाली राखणार आहे.'' (अले इमरान-५५)

जो पर्यंत इतिहासाचा संबंध आहे, त्याची पृष्ठे अधिक स्पष्ट नाहीत, तरीही ही गोष्ट स्पष्ट आहे की हजरत ईसा यांचे आकाशात वर उचलले जाण्यानंतर त्यांचे अनुयायी विरोधाच्या वादळाला तोंड देत यहूदींवर, ज्यांनी हजरत ईसावर ईमान बाळगण्यापासून इन्कार केला होता, वर्चस्वशाली होत गेले. त्यांचे आवाहन पसरत गेले आणि रोमन साम्राज्याच्या मोठमोठया शहरांमध्ये त्यांची आवाहन-केंद्रे प्रस्थापित झाली. यहूदी मत संकुचित होत गेले येथपावेतो की इ. स. ७० मध्ये टायटस (Titus) ने बैतुल मक्दसवर हल्ला करून यहूदीची पांगापंग केली आणि मग यहूदींचे सामर्थ्य असे लयाला गेला की ते पैगंबर ईसा यांच्या अनुयायी पुढे अगतिक झाले. परिणामी हजरत ईसांच्या अनुयायींची संख्या वाढत गेली.

रोमन शासक टायटसच्या हल्ल्यानंतर रोमन लोकांनी हजरत मसीह (येशू) यांचा धर्म स्विकारणे सुरू केले आणि पैगंबर मसीह यांच्या अनुयायींना वर्चस्व प्राप्त होत गेले यास्तव इब्ने खल्दून लिहितात :-

'मग रोमन पैगंबर मसीह यांचा धर्म कबूल करू लागले व त्याचा आदर सन्मान करू लागले. मग रोमन शासकांची दशा भिन्न भिन्न राहीली. ते कधी ख्रिश्चनांचा धर्म कबूल करीत तर कधी सोडून देत येथपावेतो की कुस्तनतीन आले.' (मुकद्दमा - इब्ने खल्दून पृ. ३५५)

इ. स. ३१३ मध्ये जेव्हा रोमन सम्राट कुस्तनतीन सत्तारूढ झाला तेव्हा ख्रिश्चन मताचा समर्थक बनला आणि हजरत ईसा यांच्या अनुयायींना सत्ताधिकाराचे असे वर्चस्व लाभले की आज तागात यहूदी मताच्या विरोधात ख्रिश्चन मताचे वर्चस्व टिकून आहे.

(Interpreters One Volume Commentary on Bible P. 1051)

# ६२. सूरह अल् जुमुआ

**नावः** आयत क्र. ९ मध्ये जुमुआच्या नमाजचे महत्व विशद केले गेले आहे. या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अल जुमुआ' असे आहे.

**अवतरण काळः** मदनी आहे आणि हिजरतच्या काही काळा नंतर अवतरली. जसे या घटनेवरून जाहीर आहे जो शेवटी जुमुआच्या संबंधाने सांगितला गेला आहे.

राहीले अबु हुरैरा यांचे कथन जे बुखारी वगैरे मध्ये निवेदिले गेले आहे की आम्ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत होतो की ही आयत अवतरली आणि हजरत अबु हुरैरा बाबत ज्ञात झाले की त्यांनी हुदेबिया तहा नंतर ईमान बाळगले तेव्हा असे दिसून येते की कथन कर्त्यांनी शब्द ठीक ध्यानात ठेवले नाहीत. हजरत अबु हुरैरा यांनी संभवत: हे फर्माविले असेल की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आमच्या समक्ष या आयतींचे पठण केले परंतु कथन कर्त्यांनी या गोष्टीस आयतींच्या अवतरण होण्या अर्थाने घेतले, अन्यथा खात्री करणे कठीन आहे की जेव्हा सहाबां (पैगंबरांच्या सहवासातील अनुयायीं) ची संख्या विपुल झाली होती तर त्यांच्या उपस्थितीत जुमुआची ती घटना उद्भवली होती, ज्याकडे या सूरह मध्ये संकेत केला गेला आहे.

**मध्यवर्ति कल्पनाः** अल्लाहच्या त्या कृपेची जाणीव करणे की त्याने केवढया महान योग्यतेचा पैगंबर पाठविला आहे आणि तो कशी उत्कृष्ट शिकवण व प्रशिक्षण देत आहे. त्याची कदर जाणा आणि त्याच्या शिकवणींना आचरणात आणाल तर तुमचे जीवन सुशोभित होईल आणि तुम्हाला शास्वत यशाचा लाभ घडेल.

**आयत रचनाः** आयत क्र. १ प्रास्ताविक स्वरूपाची आयत होय. ज्यात अल्लाहचे पावित्र्य व स्तुति-गाना सह त्याची गुण वैशिष्टये सांगितली गेली आहेत. आयत क्र.२ ते ४ मध्ये अल्लाहच्या महान कृपेचे वर्णन आहे की निरक्षरात केवढा महान प्रेषित उदयास आला आहे.

आयत क्र.५ ते ८ मध्ये यहूदींच्या निष्कर्मता आणि चुकीच्या दाव्यांबद्दल कान उघाडणी केली गेली आहे.

आयत क्र.९ ते ११ मध्ये मुसलमानांना जुमुआच्या नमाजचा इतमाम राखण्याची ताकीद केली गेली आहे. वर यहूदींच्या ज्या वर्तनाचा उल्लेख केला गेला आहे; त्यावरून या गोष्टीकडे संकेत करण्याचा ही हेतु आहे की त्यांनी सब्त (शनिवार) च्या आदेशाची ज्या प्रकारे पायमल्ली केली त्या प्रकारे मुसलमानांनी जुमुआच्या आदेशांची पायमल्ली करू नये.

**हदीसः** हदीस मध्ये उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जुमुआच्या नमाज मध्ये सूरह जुमुआ व सूरह मुनाफिकूनचे पठण करीत असत.

(तिर्मिजी- अबवाबुल जुमुआ)

# ६२. सूरतुल् जुमुआ

سُورَةُ الْجُمُعَةِ

आयत-११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अल्लाहच्या पावित्र्याचे गुण गान करतात समस्त वस्तू ज्या आकाशांमध्ये व जमीनीवर आहेत. तो बादशहा (शासक), पवित्र, वर्चस्वशाली आणि बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.[१]

يُسَبِّحُ لِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْأَرْضِ الْمَلِكِ الْقُدُّوْسِ الْعَزِيْزِ الْحَكِيْمِ ①

२. त्यानेच निरक्षरांमध्ये एक पैगंबर त्यांच्यातूनच उभारला, जो त्यांना याच्या आयती ऐकवितो, त्यांना स्वच्छ शुद्ध (शुचिर्भूत) करतो आणि त्यांना ग्रंथ व बुद्धि कौशल्याची शिकवण देतो [३] यांच्या पूर्वी हे लोक उघड मार्गभ्रष्टतेत पडलेले होते.[४]

هُوَ الَّذِيْ بَعَثَ فِي الْأُمِّيّٖنَ رَسُوْلًا مِّنْهُمْ يَتْلُوْا عَلَيْهِمْ اٰيٰتِهٖ وَيُزَكِّيْهِمْ وَيُعَلِّمُهُمُ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ وَإِنْ كَانُوْا مِنْ قَبْلُ لَفِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ②

३. आणि (याचे अल्लाह तर्फे पाठविले जाणे) या (निरक्षरां) पैकी त्या इतर लोकां करीता ही आहे जे अद्याप त्यांना सामील झाले नाहीत.[५] आणि अल्लाह वर्चस्वशाली, बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

وَّاٰخَرِيْنَ مِنْهُمْ لَمَّا يَلْحَقُوْا بِهِمْ ۭ وَهُوَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ ③

४. ही अल्लाहची कृपा होय, ज्या पासून तो ज्याला इच्छितो उपकृत करतो [६] आणि अल्लाह मोठा कृपावंत आहे.

ذٰلِكَ فَضْلُ اللّٰهِ يُؤْتِيْهِ مَنْ يَّشَآءُ ۭ وَاللّٰهُ ذُو الْفَضْلِ الْعَظِيْمِ ④

५. त्या लोकांचे उदाहरण, ज्यांच्यावर तौरातचा भार टाकला गेला होता; परंतु त्यांनी तो उचलला नाही, त्या गाढवा सारखे आहे, जो ग्रंथांचे ओझे बाळगून असावा.[७] मोठे वाईट उदाहरण आहे त्या लोकांचे ज्यांनी अल्लाहच्या आयतींना खोटे ठरविले [८]अल्लाह अशा जालीम लोकांना मार्गदर्शन करीत नाही.

مَثَلُ الَّذِيْنَ حُمِّلُوا التَّوْرٰىةَ ثُمَّ لَمْ يَحْمِلُوْهَا كَمَثَلِ الْحِمَارِ يَحْمِلُ أَسْفَارًا ۭ بِئْسَ مَثَلُ الْقَوْمِ الَّذِيْنَ كَذَّبُوْا بِاٰيٰتِ اللّٰهِ ۭ وَاللّٰهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ الظّٰلِمِيْنَ ⑤

१. या गुणविशेषांचे स्पष्टीकरण सूरह हश्र मध्ये केले गेले आहे. या प्रास्ताविक आयतीत अल्लाहच्या या गुण वैशिष्टयांचा उल्लेख या अनुषंगाने केला गेला आहे की पैगंबराला पाठविणाऱ्या हस्ती (अस्तित्व) ची खरी ओळख प्राप्त व्हावी; आणि लोकांनी चांगल्या प्रकारे लक्षात घ्यावे की हा पैगंबर सृष्टीच्या सत्ताधीशा कडून हा संदेश घेऊन आला आहे. यास्तव त्यावर ईमान बाळगणे ईश दासां करीता अनिवार्य, आवश्यक बंधनकारक कर्तव्य आहे. तो दोष व्यंग विरहीत आहे, म्हणून त्याचे समस्त फैसले अचूक व निर्दोष असतात. यास्तव ज्या व्यक्तीला त्याने प्रेषित्वा करीता निवडले आहे ती या पदा अगदी योग्य अशी व्यक्ति आहे आणि त्याचा फैसला अगदी उचित व बुद्धि कौशल्य युक्त असा आहे.

२. 'उम्मी' या शब्दाच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. २९, सूरह अअराफ टीप क्र. २२४ आणि सूरह अन्कबूत टीप क्र. ९१

३. स्पष्टीकरण करीता पहा सूरह बकरा टीप क्र. १४९.

४. म्हणजे या पैगंबराच्या आगमनापूर्वी हे अरब जे अगदी निरक्षर होते आणि ज्यांच्या जवळ अल्लाहचा ग्रंथ नव्हता, अगदी उघड स्वरूपाच्या मार्ग भ्रष्टतेत पडले होते परंतु अल्लाहने त्यांच्यावर हा अनुग्रह केला की त्यांच्यातूनच एक पैगंबर त्यांच्या मार्गदर्शनास्तव उभा केला. ही हजरत इब्राहीम यांच्या प्रर्थनेची व हजरत ईसा यांच्या भाकिताची अभिव्यक्तिच होय. आणि त्याचे वैशिष्टय असे की तो निरक्षर असून ही अल्लाहच्या वचनांना (आयतींना) जी त्याच्यावर अवतरीत झाली आहेत. ऐकवितो, ज्यामुळे मनात ईमानाचे तेज निर्माण होते. या निरक्षरांना असे प्रशिक्षण देतो की त्यांचे जीवन सुशोभित होते आणि उत्कृष्ट गुण त्यांच्या अंगी निर्माण होतात. ईश-ग्रंथाची अशी शिकवण देतो की ते याचे धारक बनतात आणि बुद्धिकौशल्याची रत्ने अशी विखरून टाकतो की यांची झोळी ती वेचत असतांना भरते. म्हणून या पैगंबराचे प्रेषित्व: संदर्भात तिळमात्र शंका संशयाला जागा नाही आणि त्याचे जन समूहाकडे पाठविले जाणे अल्लाहचा फार मोठा अनुग्रह आहे ज्याची अवहेलना करणे म्हणजे स्वत:ला अनुग्रहा पासून वंचित राखणे.

५. ही या गोष्टीची शुभवार्ता आहे की, पैगंबरांच्या अनुयायींचा परिघ व्यापक होत जाईल आणि यात इतर अरब कबीले ही सामील होत जातील. कुरआनाचे हे भाकित खरे ठरले आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जीवनातच अरबांचे सर्व कबीले मुसलमान झाले.

स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहने निरक्षर अरब लोकांमध्ये पाठविले असले तरी कुरआनाच्या स्पष्टीकरणा नुसार त्यांना केवळ अरब लोकां करीता पाठविले गेले नव्हते, किंबहुना 'अरब' व 'अरबेतर' निरक्षर व ग्रंथधारक सर्वांच्याच करीता आणि एखाद्या विशिष्ट काल खंडा पुरते नव्हे तर कियामती पावेतो समस्त कालखंडा करीता आहे.

६. निरक्षर अरबांवर अल्लाहची ही विशेष कृपा होय की त्याने यांच्यात असा महान पैगंबर उभारला. या आयतीचा संकेत या गोष्टीकडे ही आहे की यहूदींना ही गोष्ट कोणत्याही प्रकारे प्रिय नाही की पैगंबरास बनी इस्राईल खेरीज अन्य एखाद्या जनसमूहात पाठविले जावे. परंतु प्रेषित्वाच्या पदाची नियुक्ति यांच्या इच्छेवर अवलंबून नाही; किंबहुना ती अल्लाहची कृपा आहे, तो ज्याला इच्छिल या कृपेने उपकृत करील. या बद्दल आक्षेप घेण्याचा कोणाला ही काडीमात्र अधिकार नाही.

७. 'सफीर'चा अर्थ अरबी व हिब्रू दोन्ही भाषेत ग्रंथ असा आहे. यहूदींची धार्मिक भाषा हिब्रू आहे आणि तौरात साठी त्यांच्या ठायी अस्फार हा शब्द सुपरिचित होता म्हणून यहूदींचे आपल्या अवतरीत ग्रंथाकडे लक्ष वेधण्यासाठी हा शब्द आधिक योग्य ठरला.

यहुदींचे अज्ञान व त्यांच्या निष्कर्मतेस जे तौरात ग्रंथ बाळगून ही खितपत पडले होते, गाढवाची उपमा दिली गेली आहे ज्यावर ग्रंथांचे ओझे लादले गेले असावे आणि त्याला या ग्रंथांचे महत्व व मूल्य ठाऊक नसावे. यहूदी ही असेच नादान व मुर्ख आहेत की त्यांनी 'तौरात' सारख्या ईश-ग्रंथाची कदर स्वत:जवळ बाळगून ही जाणली नाही. जर त्यांनी याची कदर जाणली असती तर कुरआनाची ही कदर जाणली असती कारण दोघांचा ही अवतरण-कर्ता अल्लाहच आहे.

येथे जे उदाहरण दिले गेले आहे ते फार अलंकारीक आहे आणि त्या मुसलमानांना ही लागू पडते ज्यांना कुरआना सारखी महान ईश-देणगी लाभली आहे. परंतु त्यांनी याची कदर जाणली नाही. ना त्यांनी याचे ज्ञान प्राप्त केले आणि ना त्याच्या मार्गदर्शना नुसार आचरण केले.

८. यहूदींच्या या नादानपणाचा परिणाम असा झाला की ते आज कुरआनास , जो अल्लाहचाच ग्रंथ आहे, खोटे ठरविण्यात मग्न आहेत.

६. सांगा, हे यहूदी झालेल्या लोकांनो ![९] जर तुम्ही असे समजत असाल की इतरांना सोडून तुम्हीच अल्लाहचे आवडते आहात, तर मरणाची इच्छा बाळगा जर तुम्ही आपल्या दाव्यात सच्चे असाल.[१०]

قُلْ يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ هَادُوْٓا اِنْ زَعَمْتُمْ اَنَّكُمْ اَوْلِيَآءُ لِلّٰهِ مِنْ دُوْنِ النَّاسِ فَتَمَنَّوُا الْمَوْتَ اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ۝٦

७. परंतु हे कदापि याची अभिलाषा करणार नाहीत, त्या दुष्कर्मांपायी, जी त्यांनी केली आहेत.[११] आणि अल्लाह या अत्याचारींना चांगल्या प्रकारे जाणतो.

وَلَا يَتَمَنَّوْنَهٗٓ اَبَدًا ۢ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْهِمْ ۭ وَاللّٰهُ عَلِيْمٌ ۢ بِالظّٰلِمِيْنَ ۝٧

८. (त्यांना) सांगा, ज्या मरणा पासून तुम्ही पळ काढता ते तुम्हा (प्रत) आल्या खेरीज राहणार नाही.[१२] मग तुम्हाला त्याच्या समोर हजर केले जाईल, जो अपरोक्ष व परोक्ष सर्व काही जाणणारा आहे. तो तुम्हाला दर्शवील की तुम्ही काय काय करीत राहीलात.

قُلْ اِنَّ الْمَوْتَ الَّذِيْ تَفِرُّوْنَ مِنْهُ فَاِنَّهٗ مُلٰقِيْكُمْ ثُمَّ تُرَدُّوْنَ اِلٰى عٰلِمِ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ فَيُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ۝٨

९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जुमुआच्या दिवशी जेव्हा नमाज करीता पुकारले जाईल (अजान दिली जाईल) तेव्हा अल्लाहच्या नाम:स्मरणाकडे धाव घ्या आणि खरेदी-विक्री सोडून द्या.[१३] हे तुमच्या करीता अधिक चांगले आहे जर तुम्ही जाणाल.[१४]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِذَا نُوْدِيَ لِلصَّلٰوةِ مِنْ يَّوْمِ الْجُمُعَةِ فَاسْعَوْا اِلٰى ذِكْرِ اللّٰهِ وَذَرُوا الْبَيْعَ ۭ ذٰلِكُمْ خَيْرٌ لَّكُمْ اِنْ كُنْتُمْ تَعْلَمُوْنَ ۝٩

१०. मग जेव्हा नमाज संपेल तेव्हा जमीनीवर (इतस्तत:) विखरून जा आणि अल्लाहची कृपा शोधा [१५] आणि अल्लाहचे स्मरण अत्याधिकतेने करा या साठी की तुम्हाला सफलता प्राप्त व्हावी.[१६]

فَاِذَا قُضِيَتِ الصَّلٰوةُ فَانْتَشِرُوْا فِي الْاَرْضِ وَابْتَغُوْا مِنْ فَضْلِ اللّٰهِ وَاذْكُرُوا اللّٰهَ كَثِيْرًا لَّعَلَّكُمْ تُفْلِحُوْنَ ۝١٠

११. हे लोक जेव्हा व्यापार किंवा व्यर्थ गोष्टी पाहतात तर त्याकडे धावतात आणि (हे पैगंबर !) तुम्हाला उभा सोडून देतात. [१७] सांगा, जे अल्लाह जवळ आहे ते निरर्थक व व्यापारा पेक्षा अधिक चांगले आहे. आणि अल्लाह सर्वोत्कृष्ट अन्नदाता आहे.[१८] पारा२८

وَاِذَا رَاَوْا تِجَارَةً اَوْ لَهْوَا ۨ انْفَضُّوْٓا اِلَيْهَا وَتَرَكُوْكَ قَاۗىِٕمًا ۭ قُلْ مَا عِنْدَ اللّٰهِ خَيْرٌ مِّنَ اللَّهْوِ وَمِنَ التِّجَارَةِ ۭ وَاللّٰهُ خَيْرُ الرّٰزِقِيْنَ ۝١١

९. संकेत या गोष्टीकडे आहे की बनी इस्राईलला जो धर्म प्रदान केला गेला होता तो इस्लामच होता परंतु नंतरच्या काळात त्यांनी त्यात फेरफार करून स्वत:ला मुस्लिम म्हणवून घेण्या ऐवजी यहूदी म्हणवून घेऊ लागले.

१०.यहूदींचा दावा होता की तेच अल्लाहच्या नजरेत इतर सर्वाहून अधिक प्रिय आहेत; परंतु या दाव्याचे पितळ त्या वेळी उघडे पडले जेव्हा कुरआनने त्यांना म्हटले की तर मग मरणाची इच्छा बाळगा. कारण जे अल्लाहचे प्रिय आहेत त्यांच्याकरीता जन्नत आहे. आणि जेव्हा तुम्हाला स्वत:च्या जन्नती असण्याची पूर्ण खात्री आहे तेव्हा तर तुम्हाला आखिरतचेच अभिलाषी बनले पाहीजे, या नश्वर जगाचे अधाशी नव्हे. परंतु तुम्ही तर या जगात जास्तीत जास्त काळ जीवन घालवू इच्छितात (सूरह बकरा-आयत क्र.९६) आणि भेकडपणा तर तुमचा नितिमत्ताच झाली आहे. तुमचे हे वर्तनच तुमच्या त्या दाव्याचे खंडन करीत आहे.

११. म्हणजे यांचे जीवन अपराधांनी डागाळलेले आहे. म्हणून त्यांचा हा दावा असतांना ही की ते अल्लाहचे प्रिय आहेत,त्यांच्या मनाला हे जरूर बोचते की आम्ही आपल्या करतूती पायी कदाचित धरले न जावोत म्हणून ते आखिरतच्या तुलनेत ऐहिक ऐश्वर्यालाच पसंत करतात. आणि याच जगात सुखाच्या राशीवर लोळू इच्छितात.

कुरआनाच्या या आव्हानास की त्यांनी मरणाची इच्छा बाळगावी यहूदींनी कबूल केले नाही, ज्याने त्यांच्या दाव्याचे खंडन ही होते आणि कुरआनाची सत्याता ही स्पष्ट होते.

१२. म्हणजे मृत्युपासून कोणत्याही परिस्थितीत सुटका नाही. तुम्ही इच्छा बाळगा अथवा बाळगू नका, अपरिहार्यपणे मृत्युला सामोरे जावेच लागणार आहे मग तुम्ही मरणाच्या भितीने आपल्या जबाबदाऱ्यां पार पाडण्यापासून मागे का हटता?

१३. वर यहुदींच्या चारित्र्याबद्दल कान उघाडणी केली गेली होती. आता ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून यांच्यावर जुमुआच्या नमाजचे महत्व आणि अनिवार्यता स्पष्ट केली गेली आहे. हा या गोष्टीकडे संकेत आहे की यहूदींना सब्त (शनिवारचा दिवस) साजरा करण्याचा आदेश दिला गेला होता. परंतु त्यांनी या आदेशाचा भंग केला. आता मुसलमानांना सोपी (आचरणात आणण्याजोगी) शरीअत दिली जात आहे आणि त्यांच्यावर शुक्रवारच्या दिवशी फक्त जुमुआच्या नमाजचे बंधन आहे. या संक्षेपाची कदर जाणत त्याचे पालन तत्परतेने करावे आणि यहूदी सारखे वर्तन अंगिकारू नये. या प्रसंगी सूरह नहल टीप क्र. १८४ ही विचाराधीन असावी ज्यात सब्त आणि जुमुआच्या संबंधाने हदीस उल्लेखिले गेले आहे.

जुमुआच्या नमाजचा आरंभ सहीह कथनांच्या नुसार मदीना मध्ये अशा वेळी झाला जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मक्केहून हिजरत करून मदीना येथे गेले आणि कूबा येथे मुक्काम केल्यानंतर जेव्हा शहराकडे जात होते तेव्हा कबीला बनी सालमच्या वस्तीवरून शुक्रवारच्या दिवशी जाणे झाले आणि त्यांनी तिथेच जुमुआची नमाज अदा केली. ही पहिली जुमुआची नमाज होती. आणि जेथपावेतो या सूरहचा संबंध आहे त्याच्या काही वर्षांनी अवतरली जेव्हा ती घटना घडली जिचा उल्लेख पुढे येत आहे.

कुरआनाच्या या आयती जुमुआच्या नमाजची ताकीद म्हणून अवतरल्या आहेत जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आधीच कायम केली होती. यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की शरीअतचे आदेश केवळ तेच नव्हते, जे कुरआनात सांगितले गेले आहेत, किंबहुना ते ही आहेत, जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी दिले आहेत. आणि आता त्यांचे आदेश जाणून घेण्याचे साधन त्यांचे आचरण व सहीह अहादीस मध्ये संकलीत असलेली त्यांची वचने होत.

जुमुआची नमाज रोजच्या जुहर नमाजच्या जागी आहे आणि तिची वेळ सूर्य माध्यान्हा पासून खाली सरकल्या नंतरची आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा सूर्य ढळू लागत असे तेव्हा मिंबर वर शुभागमन करीत, त्यानंतर अजान म्हटली जात असे आणि जुमुआ करीता हीच एक अजान त्यांच्या काळात दिली जात होती. त्यानंतर ते उभे राहून खुतबा (प्रवचन) देत. प्रवचने दोन असत, ज्यांच्या दरम्यान पैगंबर थोडा वेळ खाली बसत. प्रवचनात उपस्थितांना संबोधून हम्द व सना (ईश स्तुति व गुणगान), कुरआनाची तिलावत, आणि सदुपदेशाच्या गोष्टी सांगितल्या जात. नंतर ते जुमुआची फर्ज नमाज दोन रकअत जमाअत सह अदा करीत असत.

जुमुआची नमाज जमातच्या स्वरूपात अदा केली जाऊ शकते, परंतु त्या करीता संख्येचे काही बंधन अथवा अट ना कुरआनाद्वारे सिद्ध आहे आणि ना हदीस द्वारे तसेच शहराचे ही काही बंधन नाही. ग्रामीण भागात ही, ही नमाज अदा केली जाऊ शकते मात्र लोकांनी एकाच ठिकाणी जास्तीत जास्त संख्येत एखत्र होण्याचा प्रयत्न केला पाहीजे. हदीस वचनां मध्ये उल्लेख आहे की मदीनेच्या परिसरातील लोक जुमुआच्या नमाज करीता मसजिदे नबवी मध्ये हजर होण्याचा विशेष इतमाम राखत असत.

जुमुआची व्यवस्था कायम करणे इस्लामी शासनाची जबाबदारी आहे. परंतु याचा अर्थ हा नव्हे की जुमुआ या खेरीज अदा केला जाऊ शकत नाही. याचा अभाव असेल तर ही जबाबदारी मुसलमानांची आहे की त्यांनी याची व्यवस्था कायम करावी

जुमुआ प्रत्येक मुसलमानावर अनिवार्य आहे. मात्र हदीस वचनातील स्पष्टीकरणा नुसार स्त्रीया, आजारी, प्रवासी याला अपवाद होत. परंतु यांच्या पैकी जर कोणी जुमुआच्या नमाज मध्ये सहभागी होईल तर ती अदा होईल मग त्याला जुहरची नमाज अदा करण्याची गरज नाही. जुमुआ करीता स्नान करण्याचा; दात घासण्याचा, चांगले स्वच्छ कपडे घालण्याचा व अतर वगैरे सुगंधित लावण्याचा आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी दिलेला आहे. हा इतमाम जुमुआचे श्रेष्ठत्व व्यक्त करण्या करीता ही आहे आणि यासाठी ही की जुमुआचा इज्तिमा (सम्मेलन) स्वच्छ शुद्ध आणि प्रसन्न वातावरणात पार पडावे, तसेच लोकांमध्ये पावित्र्याची भावना जागृत व्हावी म्हणून ही.

या आयतीत आदेश दिला गेला आहे की जेव्हा जुमुआच्या नमाज करीता अजान दिली जाईल तेव्हा खरेदी विक्री सोडून नमाजकडे धाव घ्यावी. ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात एकच अजान दिली जात होती म्हणून यास अभिप्रेत ती अजान होय जी इमाम मिंबरवर बसल्या नंतर दिली जाते. या अजानच्या वेळेपासून नमाज संपेपर्यंत खरेदी-विक्रीची मनाई आहे. अर्थात मनाईच्या या आदेशात प्रत्येक प्रकारचा कारभार व व्यस्तता सामील आहे. मात्र हे की एखादी अशी अगतिक अवस्था यावी जी शरीअत दृष्टया योग्य सबब ठरत असावी. उदा. एखाद्या अपघाताला तोंड देणे, डॉक्टरने रोग्याचे आपॅरेशन करावयाचे जे लवकरात लवकर झाले पाहीजे इत्यादि. मुसलमानांची ही जबाबदारी ही आहे की त्यांनी आपल्या नोकर वर्गाला ही जुमुआच्या नमाज करीता सुटी द्यावी आणि इस्लामी शासन नसल्यास तर त्याच्याकडे या सुटीची मागणी करावी. कोणत्याही स्थिती नोकरी करणाऱ्या मुसलमानांची ही जबाबदारी आहे की त्यांनी जुमुआची नमाज कदापि सोडू नये.

आयतीत 'जिक्र' (स्मरणा) शी अभिप्रेत नमाज ही आहे व खुत्बा (प्रवचनही) जो जुमुआच्या नमाज पूर्वी दिला जातो. या वरून खुत्बाची हकीगत स्पष्ट होते की ते अल्लाहचे नाम:स्मरण व उपासना आहे. याच सोबत या वस्तुस्थितीला ही लक्षात घेतले पाहीजे की खुत्बा जमलेल्या श्रोत्यांना संबोधून आहे म्हणून त्यांच्याशी संबोधितांना त्या गोष्टी समोर आणल्या जाव्यात ज्या अल्लाहचे स्मरण ताजे करणाऱ्या असाव्यात आणि आपल्या अंगी शुचिर्भूतता आणि ताकीदीचा पैलू ही बाळगत असावी, आणि जेव्हा हे लोकांना संबोधून आहे तर त्याचे उद्दिष्ट याच स्वरूपात पूर्ण होऊ शकते, जेव्हा खुत्बा अरबी भाषे सोबतच श्रोत्यांना अवगत असलेल्या भाषेत दिला जावा.

فَاسْعَوْا اِلٰى ذِكْرِ اللّٰهِ 'अल्लाहच्या स्मरणाकडे धाव घ्या' चा अर्थ नमाज करीता उत्स्फूर्तपणे जा व लगबगीने निघा. हदीस वचनात इतर कोणत्याही नमाज करीता शांततेने व शालीनतेने जाण्याची ताकीद केली गेली आहे.

१४. म्हणजे व्यवसाय सोडून जाणे बाहयत: नुकसान आहे परंतु मांगल्य व समृद्धी यातच आहे आणि शाश्वत सफलता अल्लाहचे आज्ञापालन व उपासने द्वारेच प्राप्त केली जाऊ शकते.

१५. म्हणजे नमाज संपल्यानंतर खरेदी-विक्रीचा मनाई आदेश ही संपतो. यानंतर तुम्ही आपल्या अर्थोपार्जनाची धावपळ करू शकता आणि तुमची ही अर्थोपार्जनाची धावपळ अल्लाहच्या कृपेच्या शोधार्थ असली पाहीजे. ज्यामुळे कृतज्ञतेची भावना वाढीस लागते.

यावरून ही गोष्ट ही स्पष्ट झाली की जुमुआचे आदेश सब्तच्या आदेश प्रमाणे सक्त नाहीत की व्यावसायिक व्यस्तता संपूर्ण दिवस बंद व्हावी; किंबहुना फक्त एवढया वेळे पुरती याची मनाई केली गेली आहे जो खुतबा ऐकण्या करीता व जमात सह नमाज अदा करण्यासाठी लागतो ही घट व सहजता असतांना ही जर मुसलमान शुक्रवारच्या नमाजचे बंधन स्वत:साठी जाचक समजतील तर ही अल्लाहच्या प्रति मोठी कृतघ्नता होय.

१६. म्हणजे असे समजू नका की अल्लाहचे मसजिदीत स्मरण केले व नमाज अदा केली तर पुरेसे झाले; किंबहुना अल्लाहचे प्रत्येक वेळी स्मरण राखणे आवश्यक आहे. यासाठी तोंडाने त्याचे नाम:स्मरण, स्तवन आणि गुणगानाच्या वचनांच्या स्वरूपात विपुल प्रमाणात झाले पाहीजे. चालत फिरत, घरात-बाजारात, घेण्या देण्याच्या व्यवहार प्रसंगी ही. याने तुम्हाला निरंतर यशाची प्राप्ती होऊ शकेल.

१७. हा संकेत त्या घटनेकडे आहे जो या सूरहच्या अवतरण प्रसंगी उदभवली होती. जुमुआच्या दिवशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) प्रवचन देत होते की तेवढयात सिरीयाहून एक काफिला धान्य घेऊन मदीनेच्या बाजारात आला आणि ढोल वाजवू लागला. धान्याची त्यावेळी अत्याधिक टंचाई असल्यामुळे जे लोक खुतबा ऐकत होते त्यांच्यापैकी काही जण हा विचार करून धान्य खरेदी करण्यास गेले की ते हा व्यवहार आटोपून परत नमाज मध्ये सहभागी होऊ. त्या वेळ पावेतो जुमुआच्या खुतबाचे लोकांना स्पष्टत: कळू शकले नाही तरी देखील जुमुआचा खुतबा सोडून जाणे चुकीचे होते आणि यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या संबंधाने शिष्टाचाराचा पैलू ही होता म्हणून या चुकीबद्दल सक्त तंबी दिली गेली आहे. ही घटना बुखारीच्या 'किताबुल जुमुआ' आणि इतर हदीस ग्रंथातही उल्लेखित आहे.

स्पष्ट असावे की ही घटना त्या वेळी उद्‌भवली जेव्हा जुमुआच्या नमाजचा क्रम नुकताच सुरू झाला होता व तिचे महत्व लोकांना पूर्णत:उमजू शकले नव्हते. नंतर ही परिस्थिती

उद्‌भवली नाही आणि प्रशिक्षणात्मक अवस्थां मधून पार पडल्यावर पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींची ती महानता होती जी कुरआनात पुढील शब्दात वर्णिली गेली आहे :-

رِجَالٌ لَّا تُلْهِيهِمْ تِجَارَةٌ وَّلَا بَيْعٌ عَنْ ذِكْرِ اللّٰهِ۔ (نور:٣٧)

‘असे लोक ज्यांना व्यापार व करेदी-विक्रीने अल्लाहच्या स्मरणा पासून गाफील केले नाही.’ (नूर - ३७)

आयतीत ‘ढोल’ला लह्‌व अर्थाने घेतले गेले आहे.यावरून गायन वादन व त्याच्याशी संबंधित वाद्य वगैरेची निकृष्टता स्पष्ट होते. लह्‌वचा अर्थ गाफिल करणारी गोष्ट अर्थात शरीअत दृष्टया त्या समस्त गोष्टी वा चीज-वस्तू ज्या अल्लाहचे विस्मरण घडविणाऱ्या आहेत ‘लहव’ होत. गायन, वादन, वाद्ये आणि शतरंज, कॅरम सारखे खेळ लह्‌वच्या व्याख्येत बसतात. या गोष्टी आपल्याकडे अशा प्रकारे आकर्षित करतात की मनुष्य अल्लाहच्या स्मरणा पासून गाफील होतो.

१८. म्हणजे जुमुआच्या अनिवार्य कर्तव्याच्या अदायगीला जर तुम्ही आपल्या अर्थोपार्जनावर प्राधान्य द्याल तर तुमचे हे बलीदान व्यर्थ जाणार नाही, किंबहुना याचा उत्कृष्ट मोबदला अल्लाहजवळ तुम्हाला लाभेल. राहीली ऐहिक उपजिविका तर तुम्ही अल्लाहवर भरवसा ठेवला पाहीजे; कारण खराखुरा अन्नदाता तोच होय आणि त्याच्या आज्ञा पालनाच्या स्थितीत तोच तुम्हाला उत्कृष्ट उपजिविका प्रदान करील. अर्थात उत्कृष्ट उपजिविका ती होय जी थोडयाशा प्रमाणात असली तरी मांगल्य व समृद्धी कारक असावी.

# सूरह मुनाफिकून

# ६३. सूरह मुनाफिकून

**नाव:** सूरहचा आरंभ मुनाफिकां (दांभिक मुसलमानां) च्या खोट्या स्विकृतिने झाला आहे आणि पुढे त्यांच्या इस्लामशी असलेल्या शत्रूत्वास स्पष्ट केले गेले आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अल मुनाफिकून' असे आहे.

**अवतरण काळ:** मदनी आहे; आणि कथनां वरून असे दिसून येते की ही सूरह त्या वेळी अवतरली जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) बनी अलमुस्तलक (ह.स.६) युद्धातून मोकळीक मिळाल्यावर मदीना परत आले होते.

**मध्यवर्ति कल्पना:** दांभिकतेचे आवरण दूर करणे, मूळ रोगाचे निदान करणे व त्याच्या योग्य तो उपचार करणे

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ८ पावेतो दांभिकांच्या या वर्तनाचा उल्लेख आहे जे त्यांनी इस्लामशी शत्रूत्व बाळगण्यात अंगिकारले होते. ज्यामुळे ते माफ न करण्याजोगे अपराधी ठरले.

आयत क्र. ९ ते ११ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून अल्लाहचे स्मरण व त्याच्या मार्गात खर्च करण्याची ताकीद केली गेली आहे, ज्याने दांभिकतेच्या रोगाचे निदान ही होते आणि तो निवारण्याचा उपाय ही कळतो.

# ६३.सूरतुल मुनाफिकून

سُورَةُ الْمُنَافِقُونَ

आयती - ११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. जेव्हा दांभिक तुमच्या जवळ येतात आणि म्हणतात की आम्ही साक्ष देतो की आपण निःसंशय अल्लाहचे रसूल आहात. आणि अल्लाह जाणतो की निःसंशय तुम्ही त्याचे रसूल आहात परंतु अल्लाह साक्ष देतो की हे दांभिक अगदी खोटारडे आहे.[१]

إِذَا جَاءَكَ الْمُنَافِقُونَ قَالُوا نَشْهَدُ إِنَّكَ لَرَسُولُ اللَّهِ وَاللَّهُ يَعْلَمُ
إِنَّكَ لَرَسُولُهُ وَاللَّهُ يَشْهَدُ إِنَّ الْمُنَافِقِينَ لَكَاذِبُونَ ①

२. त्यांनी आपल्या शपथांना ढाल बनविले आहे [२] आणि हे अल्लाहच्या मार्गा पासून थांबले आहेत. [३] फार वाईट आहे,जे काही हे करीत आहेत.

اتَّخَذُوا أَيْمَانَهُمْ جُنَّةً فَصَدُّوا عَنْ سَبِيلِ اللَّهِ إِنَّهُمْ
سَاءَ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ②

३. हे अशासाठी झाले की त्यांनी ईमान बाळगले मग त्यांनी कुफ्र (सत्याचा इन्कार) केला. तेव्हा त्यांच्या अंतःकरणावर मोहर लावली गेली. आता त्यांना काहीच समजत नाही.[४]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ آمَنُوا ثُمَّ كَفَرُوا فَطُبِعَ عَلَىٰ قُلُوبِهِمْ فَهُمْ لَا يَفْقَهُونَ ③

४. त्यांना जेव्हा तुम्ही पाहाल तर त्यांची शरीरे तुम्हाला चांगली (नयन रम्य) वाटतील आणि जेव्हा ते बोलतील तेव्हा तुम्ही त्यांच्या गोष्टी ऐकू लागाल परंतु ते जणू लाकडाचे ओंडके होत ज्यांना टेका लावला गेला आहे [५] दचकविणाऱ्या प्रत्येक ध्वनीस ते आपल्या साठीच समजतात [६] हे खरे वैरी होत; यांच्या पासून सावध रहा.[७] अल्लाह यांचा नायनाट करो [८] हे कोणी कडे बहकून जात आहेत ?[९]

وَإِذَا رَأَيْتَهُمْ تُعْجِبُكَ أَجْسَامُهُمْ وَإِنْ يَقُولُوا تَسْمَعْ لِقَوْلِهِمْ كَأَنَّهُمْ
خُشُبٌ مُسَنَّدَةٌ يَحْسَبُونَ كُلَّ صَيْحَةٍ عَلَيْهِمْ هُمُ الْعَدُوُّ فَاحْذَرْهُمْ
قَاتَلَهُمُ اللَّهُ أَنَّىٰ يُؤْفَكُونَ ④

५. आणि जेव्हा त्यांना म्हटले जाते की या, अल्लाहच्या रसूलने तुमच्या करीता माफीची प्रार्थना करावी, तेव्हा ते आपल्या माना (डोकी) फिरवितात आणि तुम्ही पाहता की ते गर्वाने काढता पाय घेतात.[१०]

وَإِذَا قِيلَ لَهُمْ تَعَالَوْا يَسْتَغْفِرْ لَكُمْ رَسُولُ اللَّهِ لَوَّوْا رُءُوسَهُمْ
وَرَأَيْتَهُمْ يَصُدُّونَ وَهُمْ مُسْتَكْبِرُونَ ⑤

१. दांभिक मुसलमान तोंडाने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वाला मान्यता दर्शावित परंतु मनाने मानत नसत. आणि ईमान करीता केवळ तोंडी मान्यता पर्याप्त नाही, किंबहुना याच्या सोबत मन:पूर्वक समर्थन आवश्यक आहे. जर मनुष्य कलिमा पढणारा आहे परंतु त्याचे अंत:करण ईमान रहित आहे तर असे ईमान अल्लाहच्या ठायी विश्वसनीय नाही तो मुसलमान नव्हे, तर मुनाफिक (दांभिक) आहे कारण तो वरुन आगळा तर आतून वेगळाच आहे म्हणून तो साक्ष देण्यात खोटा आहे. वास्तविक ज्या गोष्टीची तो साक्ष देत आहे म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वाची जी आपल्या ठायी एक ठोस वास्तविकता आहे.

मदीनेत ज्या अंतर्भूत शत्रूंशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची गाठ होती ते हेच दांभिक मुसलमान होते जे खजरज कबिल्या वगैरेशी संबोधित होते आणि यहूदींशी यांचे गाढ मैत्री-संबंध होते. यहूदींच्या इशाऱ्यावर ते मुसलमानां मध्ये एक ना एक उपद्रव निर्माण करीत यास्तव कुरआनाने यांची अनेक सूरतीं (अध्यायां) मध्ये कानडघाडणी केली आहे आणि या सूरह मध्ये तर विशेषत्वाने त्यांनाच विषय बनविले गेले आहे. या साठी की इस्लामी समाजात हे उपद्रवी घटक वाढीस लागू नयेत.

२. या ठिकाणी 'साक्ष' शपथ या अर्थाने घेतली गेली आहे ज्यावरून हे स्पष्ट होते की शपथ साक्षच्या समानार्थी आहे आणि कुरआनात आकाश, जमीन व हवा इत्यादिंच्या ज्या शपथा घेतल्या गेल्या आहेत त्या साक्ष या अर्थानेच आहेत अर्थात या गोष्टी एकेश्वरवाद व मोबदल्याच्या दिवसाला प्रमाणित करतात.

दांभिक मुसलमान आपल्या बचावा करीता पदोपदी खोट्या शपथा वाहून आपण सच्चे असल्याची खात्री पटवितात अशा प्रकारे त्यांनी शपथाना आपल्या संरक्षणाची ढाल बनवून घेतले होते.

३. अल्लाहच्या मार्गापासून थांबण्याचा अर्थ अल्लाहचा धर्म म्हणजेच इस्लाम पासून थांबणे. खोट्या शपथांचा आधार घेण्याचा परिणाम हा झाला की ते सारवा सारवच करीत राहीले आणि इस्लामच्या दिशेने पुढे जाऊ शकले नाहीत. जणू त्याचा मार्गच त्यांना बंद झाला.

४. म्हणजे इस्लाम स्विकारल्या नंतर ते काफिर बनून राहीले त्यांच्या या कृतघ्नतेचा परिणाम असा झाला की त्यांच्या अंगी सत्य स्विकृतिची क्षमता उरली नाही आणि विचार सरणी अशी बिघडली की साधी सरळ गोष्ट देखील त्यांच्या ध्वनीमनी येत नाही.

मनावर मोहर लागण्याच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र. १५

५. म्हणजे या दांभिकांची ही दशा आहे की ते धिप्पाड शरीर यष्टीचे व वाक्‌चतुर आहेत. बोलतांना असे बोलतात की माणसाने ऐकतच रहावे परंतु आतून मात्र पोकळ वासा असतो आणि असे टाकाऊ आहेत की जणू लाकडाचे ओंड के ज्याना भिंतीच्या आधारे ठेवलेले असावे. अर्थात हे लोक बुध्दिने अगदी कोरे आहेत आणि पैगंबरांच्या बैठकीत येऊन काही लाभ प्राप्त करीत नाहीत किंबहुना भिंतीला टेका लावून लाकडाच्या त्या ओंडक्या सारखे बसतात ज्यांना किंचितही आकलन बुद्धि नसते.

६. हे त्यांच्या भेकड पणाचे चित्र आहे की जेव्हा एखादा भयंकर आवाज कानावर आला किंवा सावध करणारी गोष्ट समोर आली तेव्हा त्यांनी ती आपल्या विरुद्ध जाणली. हा त्यांच्या मनातला चोर आहे जो त्यांना शंका-कुशंका ग्रस्त करतो.

७. म्हणजे हे मुनाफिक खरे पाहता इस्लाम व मुसलमानांचे शत्रू आहेत. म्हणून त्यांच्याशी तेवढेच सावध राहीले पाहीजे जेवढे मनुष्य एखाद्या वैऱ्याशी सावध राहतो.

असे समजू नये की इस्लामचे हे वैरी फक्त त्याच काळात होते, नव्हे, किंबहुना आजच्या काळातही विपुलतेने अस्तित्वात आहेत आणि ते मुस्लिम समाजात राहून इसलाम आणि मुसलमानां विरुद्ध काहीना काही उपद्रव निर्माण करीत राहतात. त्यांच्या कट कारस्थानां पासून सतर्क राहणे अत्यावश्यक आहे.

८. ही अल्लाह तर्फे त्यांची निर्भत्सना आहे.

९. संकेत या गोष्टीकडे आहे की यांचे सूत्र संचालन सैतानाच्या हाती आहे आणि तो वाईट रित्या यांना भटकवितो.

१०. म्हणजे कोठे यांच्या ईमान विषयक दावा आणि कोठे यांच्या या हरकती की जेव्हा त्यांचे या गोष्टी कडे लक्ष वेधले जाते की दुष्कर्म तुम्ही करुन बसलात, त्यासाठी पैगंबरांच्या सेवेत उपस्थित होऊन अल्लाह जवळ क्षमा मागा या साठी की अल्लाहच्या पैगंबराने तुमच्या करीता अल्लाह जवळ क्षमेची प्रार्थना करावी तेव्हा हे डोके वळवितात, जणू याला काही महत्व च नाही आणि त्यांची ही घमेंड त्यांना आत्म-नियंत्रणा पासून रोखते.

६. तुम्ही त्यांच्या करीता माफी ची प्रार्थना करा किंवा करु नका त्यांच्या करीता सारखेच आहे. अल्लाह त्यांना कदापि माफ करणार नाही.[११] अल्लाह दुराचारी लोकांना मार्गदर्शन करीत नाही.[१२]

سَوَآءٌ عَلَيْهِمْ أَسْتَغْفَرْتَ لَهُمْ أَمْ لَمْ تَسْتَغْفِرْ لَهُمْ لَن يَغْفِرَ ٱللَّهُ لَهُمْ ۚ
إِنَّ ٱللَّهَ لَا يَهْدِى ٱلْقَوْمَ ٱلْفَٰسِقِينَ ﴿٦﴾

७. हेच लोक होत जे सांगतात की तुम्ही रसूलच्या सोबत्यांवर खर्च करु नका, या साठी की त्यांनी अस्ताव्यस्त व्हावे.[१३] वस्तुतः आकाशांच्या व जमीनीच्या खजिन्यांचा स्वामी अल्लाह च आहे, परंतु हे दांभिक ध्यानी घेत नाहीत.[१४]

هُمُ ٱلَّذِينَ يَقُولُونَ لَا تُنفِقُوا۟ عَلَىٰ مَنْ عِندَ رَسُولِ ٱللَّهِ حَتَّىٰ
يَنفَضُّوا۟ ۗ وَلِلَّهِ خَزَآئِنُ ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ وَلَٰكِنَّ
ٱلْمُنَٰفِقِينَ لَا يَفْقَهُونَ ﴿٧﴾

८. सांगतात की आम्ही मदीना परत गेलो तर जो प्रतिष्ठा बाळगणारा आहे तो अपमानितास तेथून बाहेर घालविल्या खेरीज राहणार नाही.[१५] वास्तविक प्रतिष्ठा अल्लाह आणि त्याचा पैगंबर व ईमान-धारकां करीता आहे. परंतु हे दांभिक जाणत नाहीत.[१६]

يَقُولُونَ لَئِن رَّجَعْنَآ إِلَى ٱلْمَدِينَةِ لَيُخْرِجَنَّ ٱلْأَعَزُّ مِنْهَا ٱلْأَذَلَّ ۚ
وَلِلَّهِ ٱلْعِزَّةُ وَلِرَسُولِهِۦ وَلِلْمُؤْمِنِينَ وَلَٰكِنَّ ٱلْمُنَٰفِقِينَ
لَا يَعْلَمُونَ ﴿٨﴾

९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुमच्या सम्पत्तिने व तुमच्या संततीने तुम्हाला अल्लाह पासून गाफिल न करावे.[१७] जे लोक असे करतील,तेच तोट्यात राहणारे आहेत.

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ لَا تُلْهِكُمْ أَمْوَٰلُكُمْ وَلَآ أَوْلَٰدُكُمْ عَن ذِكْرِ ٱللَّهِ ۚ
وَمَن يَفْعَلْ ذَٰلِكَ فَأُو۟لَٰٓئِكَ هُمُ ٱلْخَٰسِرُونَ ﴿٩﴾

१०. आणि जी उपजिविका आम्ही तुम्हाला प्रदान केली आहे त्यातून खर्च करा [१८]या आधी की तुमच्या पैकी एखाद्यास मरण यावे आणि त्याने म्हणावे की, हे माझ्या पालन कर्त्या ! तू मला थोडी सवड आणखी का नाही दिलीस की मी दान पुण्य केले असते आणि नेक (सत्कर्मी) बनलो असतो.[१९]

وَأَنفِقُوا۟ مِن مَّا رَزَقْنَٰكُم مِّن قَبْلِ أَن يَأْتِىَ أَحَدَكُمُ ٱلْمَوْتُ
فَيَقُولَ رَبِّ لَوْلَآ أَخَّرْتَنِىٓ إِلَىٰٓ أَجَلٍ قَرِيبٍ فَأَصَّدَّقَ
وَأَكُن مِّنَ ٱلصَّٰلِحِينَ ﴿١٠﴾

११. अल्लाह कदापी कोणत्याही जीवास सवड देणार नाही जेव्हा त्याची निर्धारीत वेळ येऊन ठेपावी. [२०]आणि जे काही तुम्ही करता अल्लाह त्या पासून अनभिज्ञ नाही.

وَلَن يُؤَخِّرَ ٱللَّهُ نَفْسًا إِذَا جَآءَ أَجَلُهَا ۚ وَٱللَّهُ خَبِيرٌۢ
بِمَا تَعْمَلُونَ ﴿١١﴾

११. मुनाफिक (दांभिक) खरे पाहता काफिर आहेत म्हणून त्यांच्या संबंधी अल्लाहचा फैसला हा आहे की तो त्यांना कदापि माफ करणार नाही. मग अल्लाहचा पैगंबर त्यांच्या करीता माफीची प्रार्थना मागत असला तरी. त्यांना माफ केले जाण्याची एक स्थिती ही असू शकत होती की त्यांनी पश्चाताप दग्ध मनाने क्षमायाचना करुन आपल्या वर्तनात सुधारणा केली असती, परंतु ज्या अर्थी ते आपल्या दांभिकतेत कट्टर आहेत ज्यामुळे त्यांच्या मनावर मोहर लावली गेली आहे म्हणून त्यांना पश्चातापाची व क्षमा याचना करण्याची ही सुबुद्धि लाभणार नाही.

कुरआनाने ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की अपराध माफ करणे अल्लाहचेच काम आहे आणि कोणत्याही पैगंबराला याचा अधिकार नाही. यास्तव ख्रिश्चनांची ही श्रद्धा आहे की हजरत ईसा आपल्या अनुयायींची पापे धूवून टाकतील, अगदी चुकीची आहे. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तौबा टीप क्र. १४७

१२. मार्गदर्शन त्यांनाच लाभते जे अल्लाहच्या पुढे झुकण्यासाठी त्याचे आज्ञापालन कबूल करण्या साठी तयार असतील परंतु ज्यांची स्वत: विषयीची घमेंड त्यांना या पासून रोखत असेल आणि ते आज्ञाकारी बनून राहू इच्छितात त्यांना अल्लाह मार्गदर्शन करीत नाही.

१३. मदीनाच्या अन्सार लोकांनी मक्केच्या स्थलांतरीत (मुहाजीर) लोकांना आपल्या कडे आश्रर दिला आणि त्यांच्यावर मुक्ताहस्ते खर्च करीत होते. देशत्याग करुन आलेल्या मुसलमानांची मदत पैगंबरांच्या समर्थकांची मदत होती परंतु ही गोष्ट मुनाफिक लोकांना, जे अन्सार पैकीच होते मुळीच पसंत नव्हती आणि ते हे इच्छित होते की हे लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जवळून दूर व्हावेत म्हणून ते त्यांची मदत करण्या पासून ईमान धारकांना रोखत असत.

१४. म्हणजे उपजिविका कोणाच्याही हातात नाही; किंबहुना अल्लाहच्या हाती आहे जो आकाशांच्या व जमीनीच्या खजीन्यांचा मालक आहे. तो जर मुहाजीर लोकांची मदत करु इच्छितो तर त्या साठी काहीना काही साधन निर्माण करील. हे दांभिक लोक अल्लाहच्या मर्जी विरुद्ध एखाद्याची उपजीवीका रोखू शकत नाही परंतु एवढी ढोबळ गोष्ट ही यांच्या ध्यानी मनी येत नाही. आता ते लाकडाचे ओंडकेच असल्याने त्यांना समज येणार तरी कशी?

१५. ही गोष्ट दांभिकांचा सरदार अब्दुल्लाह बिन उबी यांच्या तोंडून निघाली होती जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या सहकाऱ्यां समवेत बनी मुस्तलक युद्धाहून परत येत होते. या प्रसंगी एक मुहाजीर आणि अन्सारी यांच्या दरम्यान पाण्याच्या समस्ये वरुन भांडण झाले. अबदुल्लाह बिन उबीला हे कळाले त्याने याला अन्सारीचा अपमान वाटला व तो चिढून म्हणाला की तुम्ही या मुहाजीरीन (स्थलांतरीत) लोकांची मदत करणे बंद करा. या साठी की ते विस्कळीत व्हावेत तसेच तो म्हणाला, मदीना पोहचल्या नंतर जो मान प्रतिष्ठा बाळगणारा आहे तो अपमानितास बाहेर घालवील त्याच्या दृष्टी मुहाजीरीन अवमानित होते आणि तो एक गोष्ट अशी बोलला जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रतिष्ठेला गालबोट लावणारी होती. त्याचे हे बोलणे तरुण सहाबी जैद बिन अरकम यांनी ऐकले आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जाऊन सांगितले. त्यावर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अब्दुल्लाह बिन उबी ला या बाबत विचारले तेव्हा त्याने इन्कार केला व म्हणाला की मी असे काही बोललो नाही. जेव्हा पैगंबर मदीना पोहचले तेव्हा ही सूरह अवतरली त्यांनी जैद बिन अरकम ला बोलावून फर्माविले अल्लाहने तुम्हाला सत्यावचनी ठरविले (बुखारी)

अब्दुल्लाह बिन उबीच्या या निंदनीय कृत्या बद्दल हजरत उमर त्याना ठार करु इच्छित होते, परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याची अनुमती दिली नाही. ते याला व इतर दांभिकांना सदोदित माफ करीत राहीले कारण मुसलमान अद्याप आपल्या बाहेरच्या शत्रूंशी म्हणजे अनेकेश्वरवादी व यहूदींशी मुकाबला करीत होते आणि ही गोष्ट प्रसंगोचित नव्हती की आतल्या शत्रूंशी ही रक्तपाताचा मामला केला जावा. परंतु तबुक युद्धानंतर जेव्हा संपूर्ण अरब देशावर इस्लाम ची छाया पसरली तेव्हा दांभिकांच्या विरुद्ध सक्त कारवायी करण्याचा आदेश अवतरला यास्तव सूरह तौबा मध्ये अल्लाने फर्माविले,

يٰٓاَيُّهَاالنَّبِىُّ جَاهِدِ الْكُفَّارَ وَالْمُنٰفِقِيْنَ
وَاغْلُظْ عَلَيْهِمْ ۔ (توبہ:٧٣)

'हे पैगंबर काफिरांशी व मुनाफिकांशी जेहाद करा आणि त्यांच्याशी सक्तीने वागा'.

(तौबा - ७३)

परंतु त्या काळात अब्दुल्लाह बिन उबी मरण पावला होता. इतर मुनाफिक जे आपल्या खोडसाळ पणा पासून परावृत झाले नव्हते त्यांच्याशी कठोर व्यवहार केला गेला. येथपावेतो की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जगाचा निरोप घेतल्या नंतर जेव्हा हजरत अबू बकर खलीफा बनले आणि या दांभिकांनी डोके वर काढले व जकात

देण्यास इन्कार केला आणि कितीतरी उघडपणे इस्लाम शी प्रतारणा करु लागले म्हणजे इस्लाम धर्म सोडू लागले तेव्हा खलीफांनी त्यांच्या विरुद्ध शस्त्र उचलले आणि त्यांचा नि:पात केला. अशा प्रकारे या मुनाफिकांना मुसलमानांच्या हस्ते अपमानाची गोडी चाखावी लागली. ही होती अल्लाह तर्फे शिक्षा जी या जगीच त्यांना मिळाली.

१६. म्हणजे हे मुनाफिक खोट्या प्रतिष्ठे लाच सर्व काही समजले आहेत. वास्तविक खरी प्रतिष्ठा अल्लाह करीताच आहे की तो वर्चस्वशाली, महान व उच्चतम अस्तित्व आहे. त्यानंतर प्रतिष्ठा त्याच्या करीता ज्याला तो सान्निध्य प्रदान करील. पैगंबर प्रेषित्व पदावर आरुढ असतो म्हणून निश्चितच तो सन्माननीय आहे. आणि ईमान बाळगणारे ज्या अर्थी अल्लाहचे एकनिष्ठ दास आहेत म्हणून त्यांच्या करीता ही अल्लाह तर्फे मान प्रतिष्ठा आहे.

१७. प्रसंगानुषंगाने सर्वसामान्य मुसलमानांना संबोधून हा उपदेश केला गेला आहे की त्यांनी सम्पत्ति व संततीच्या मोहात अडकून अल्लाहच्या समरणा पासून गाफील होऊ नये. याने या गोष्टी कडे अंगुलीनिर्देश ही होतो की मुनाफिकांना ज्या गोष्टीने चुकीच्या मार्गाला लावले ती म्हणजे सम्पत्ति व संततीचा मोह धनोपार्जनात इतकी व्यस्तता आणि संततीला भौतिक लाभ पोहचविण्यात व त्यांच्या ऐहिक भवितव्यास वैभवशाली बनविण्यात इतकी मग्नता की माणसाला अल्लाहचे स्मरण ही होऊ नये. ना नमाज विषयी गोडी, आणि ना शरीअत विषयक जबाबदारींची जाणीव आणि ना आखिरतची पर्वा की मनुष्य ऐहीक समस्या मध्येच गुरफटून राहतो. व त्याच्यावर सद्भाग्य आणि यशाचे मार्ग द्वारा उघडत नाही.

१८. अल्लाहच्या मार्गात अंत:करण पूर्वक खर्च केल्याने अल्लाहचे प्रेम वाढते व मनुष्य पैशाचा पुजारी बनत नाही. मुनाफिकांच्या स्थिती विषयी हे सांगितल्या नंतर ईमान बाळगणाऱ्यांना दान खैरात करण्याची ताकीद या महत्वपूर्ण उपाय कडे बोट दाखविते जी मनाच्या व्याधींना दूर करते व ईमानास वृद्धिंगत करते.

१९. हे चित्र मरणासन्न असतांनाचे आहे की जेव्हा मरण समोर उभे येऊन ठाकते तेव्हा माणसाला हे जाणवते की ज्या दौलतीस मी सांभाळून ठेवले आहे. येथपावेतो की आपल्या शरीअत विषयक जबाबदाऱ्या ही पार पाडू शकलो नाही, ती दौलत आता काय कामी येणार आहे या जाणीवे मुळे तो ही इच्छा करु लागतो की हे माझ्या पालन कर्त्या तू मला आणखी थोडी सवड दिली असती तर बरे झाले असते, जेणेकरुन मी दान धर्म केला असता व सत्कर्मे करुन सज्जन बनलो असतो. तात्पर्य मरणाची चाहूल लागताच जगापासून विरक्ति व आणि धन सम्पत्ति चे निरर्थक असणे प्रखरतेने जाणूवू लागते आणि दान करण्याची व अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याची जाणीव उचंबळते. परंतु शेवटच्या क्षणाला या जागीवेच्या उचंबळून येण्याने काय लाभ. म्हणून ही आयत सावध करते की मरणाची वेळ येण्यापूर्वी माणसाने आपल्या आर्थिक जबाबदाऱ्या ज्या शरीअत ने लागू केल्या आहेत, पार पाडाव्यात आणि मोकळया मनाने अल्लाह खातीर खर्च करावा. त्याच सोबत स्वत:ला सन्मार्गी लावावे.

दान म्हणजे केवळ एखाद्या भिकारी किंवा याचकाला दिले जाते तेच नव्हे, किंबहुना कुरआनाच्या व्यापक अर्थानुसार असा तो प्रत्येक खर्च 'दान' होय जो अल्लाहचे सान्निध्य व त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यास्तव केला जावा. हा अर्थ जकात ला ही लागू पडतो. इतर आवश्यक व अनावश्यक दानांना ही तसेच अल्लाहचा कलिमा उंचाविण्या साठी खर्च करण्याला ही.

आयतीवरून हा संकेत ही मिळतो की दान पुण्य केल्याने सत्कर्मा कडे मनाचा कल वाढतो आणि माणसाला नेक बनणे सोपे जाते. म्हणून या उपायाचा अवलंब करून माणसाने स्वत:ला सत्शील व सदाचारी बनवावे अन्यथा सदाचारी नसलेल्या मुसलमानाचा मृत्यु ही आश्चर्यजनक मृत्यु ठरतो.

२०. म्हणजे चांगले लक्षात घ्या की मृत्यु समयी पश्चाताप करणे व्यर्थ ठरेल. जी सवड ज्या माणसाला दिली गेली आहे त्याच्या त्या सवडीत तिळमात्र वाढ कदापि होणार नाही यास्तव मृत्यु येण्या पूर्वीच ती सामग्री जमवा जी मेल्यानंतर उपयोगी पडेल.

# ६४. सूरह अत् तगाबून

**नावः** आयत क्र. ९ मध्ये 'अत्तागाबून' (तो दिवस की जेव्हा आखिरतचा इन्कार करणारे भयंकर हानीला सामोरे जातील) चा उल्लेख केला गेला आहे. या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अत्तगाबून' असे आहे.

**अवतरण काळः** मजकूरां वरून असे दिसून येते की मदीनाच्या आरंभ-काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** या गोष्टीचा विश्वास निर्माण करणे की आखिरत (मरणोत्तर जीवना)ची सफलता हीच खरी सफलता आहे. म्हणून तिला दृष्टी-पथात ठेवून आपले आचरण सुधारले पाहीजे. जे लोक या गोष्टीला दृष्टीआड करतील ते फार मोठया तोटयात पडणार आहेत.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ४ मध्ये अल्लाहची ओळख दर्शविली गेली आहे; आणि हे स्पष्ट केले गेले आहे की सृष्टीची रचना सत्य-हेतु स्तव झाली आहे.

आयत क्र. ५ ते ७ मध्ये प्रेषित्व आणि आखिरतचा इन्कार करणाऱ्यांना याच्या दुष्परिणती बाबत सावध केले गेले आहे.

आयत क्र. ८ ते १० मध्ये ईमान बाळगण्याचे आवाहन केले गेले आहे आणि हानी (तोटया) च्या दिवसापासून सावध केले गेले आहे. या हानी पासून ईमान बाळगणारे पूर्णत: सुरक्षित राहतील आणि त्यांना फार मोठी सफलता लाभेल; परंतु इन्कार करणाऱ्यांना व खोटे ठरविणाऱ्यांना जहन्नमची निरंतर ईश-शिक्षा (अजाब) भोगणे क्रम प्राप्त ठरेल.

आयत क्र. ११ ते १३ मध्ये ताकीद केली गेली आहे की ऐहिक संकटांच्या भयाने अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पालना पासून तोंड फिरविणे म्हणजे आपल्याच हक्कात चुकीचा निर्णय घेणे होय, ज्याचा परिणाम अतिशय विनाश कारक असेल.

आयत क्र.१४ ते १८ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना प्रसंगानुरोधाने काही ताकीदी केल्या गेल्या आहेत.

एक ही की त्यांनी आपल्या पत्नी व मुलाबाळां कडून सतर्क रहावे की ते त्यांना चुकीच्या मार्गाला लावत तर नाही ना. दुसरी अशी की सम्पत्ति व संतती कसोटी आहे म्हणून यांच्या मोहपाशात अडकू नये की आखिरतचे भान ही न रहावे. तिसरी अशी की अल्लाह चे भय व दुष्कर्मा पासून अलिप्तता अंगिकारावी जेवढे शक्य होईल आणि चौथी ही की मनाच्या संकुचितपणा पासून अलिप्त रहावे आणि मुक्त हस्ते अल्लाहच्या मार्गात खर्च करावा.

# ६४. सूरतुत्तगाबून

سُورَةُ التَّغَابُنِ

आयती: १८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान करतात त्या सर्व वस्तु ज्या आकाशांमध्ये आहेत आणि ज्या जमीनीवर आहेत.त्याचीच राज्य-सत्ता आहे आणि त्याच्याच करीता प्रशंसा आहे आणि तो प्रत्येक गोष्टीस समर्थ आहे.[१]

يُسَبِّحُ لِلّٰهِ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْأَرْضِ ۚ لَهُ الْمُلْكُ وَلَهُ الْحَمْدُ ۖ وَهُوَ عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ①

२. तोच होय ज्याने तुम्हाला निर्माण केले. मग तुमच्या पैकी कोणी काफिर आहे तर कोणी मोमीन (ईमान बाळगणारा)[२] तुम्ही जे काही करता, अल्लाह ते पाहत आहे.[३]

هُوَ الَّذِيْ خَلَقَكُمْ فَمِنْكُمْ كَافِرٌ وَّمِنْكُمْ مُّؤْمِنٌ ۚ وَاللّٰهُ بِمَا تَعْمَلُوْنَ بَصِيْرٌ ②

३. त्याने आकाशांना व जमीनीला सत्यासह निर्माण केले [४] आणि तुमचे चेहरे-मोहरे घडविले, तेव्हा चांगले चेहरे बनविले [५] आणि त्याच्याच कडे परतावे लागेल.

خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضَ بِالْحَقِّ وَصَوَّرَكُمْ فَأَحْسَنَ صُوَرَكُمْ ۚ وَإِلَيْهِ الْمَصِيْرُ ③

४. तो जाणतो जे काही आकाशांमध्ये व जमीनीवर आहे, आणि तुम्ही जे काही लपविता आणि जे काही जाहीर करता ते ही तो जाणतो आणि अल्लाह अंत:करणाच्या अध्यारूत गोष्टींना ही जाणतो.

يَعْلَمُ مَا فِي السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ وَيَعْلَمُ مَا تُسِرُّوْنَ وَمَا تُعْلِنُوْنَ ۚ وَاللّٰهُ عَلِيْمٌ ۢ بِذَاتِ الصُّدُوْرِ ④

५. काय तुम्हाला त्या लोकांची खबर नाही पोहचली, ज्यांनी याच्या आधी कुफ्र केले, तेव्हा त्यांनी आपल्या कर्माचे फळ चाखले आणि त्यांच्या करीता दु:खदायक शिक्षा आहे.[६]

أَلَمْ يَأْتِكُمْ نَبَؤُا الَّذِيْنَ كَفَرُوْا مِنْ قَبْلُ ۖ فَذَاقُوْا وَبَالَ أَمْرِهِمْ وَلَهُمْ عَذَابٌ أَلِيْمٌ ⑤

१. ही सूरहची प्रस्तावनाची आयत होय. ज्यात अल्लाहचा परिचय दिला गेला आहे. अल्लाहवर ईमान व त्याचे आज्ञा पालन त्याच्या परिचया विना शक्य नाही, म्हणून कुरआन ईमान बाळगण्याचा व आज्ञापालन करण्याचा केवळ आदेशच देत नाही तर या सोबत ज्ञानाचा प्रकाश ही प्रदान करतो. या साठी की मन-मस्तिष्क या गोष्टीस पूर्णत: तयार व्हावे.

जेव्हा ही हकीगत चांगल्या प्रकारे माणसा समोर येते की सृष्टीची संपूर्ण मैफल अल्लाहची प्रशंसा व पावित्र्यासह गुणगान करण्यात लीन आहे तर ही वास्तवता त्याच्या अंत:करणावर प्रभाव सोडते आणि तो ही या मैफलीच्या स्वरात स्वर मिळवून अल्लाहचे पावित्र्यासह गुणगान करण्यात रममाण होते. आणि ही फार मोठी उपासना होय.

२. म्हणजे जेव्हा ही इन्कार न करण्या जोगी वस्तुस्थिती आहे की अल्लाहने तुम्हाला निर्माण केले आहे तर तुम्ही त्याच्यावर ईमान बाळगले पाहीजे परंतु परिस्थिती अशी आहे की तुमच्या पैकी काही ईमान बाळगणारे आहेत, तर काही काफिर.

३. तो तुमच्या आचरणास पाहत आहे म्हणून आचरणा नुसार तो मोबदला किंवा शिक्षा देईल.

४. म्हणजे सत्य उद्दिष्टा करिता निर्माण केले आहे आणि तो म्हणजे न्याय-निवाडा व मोबदला आणि शिक्षेचा मामला जो पूर्णत: कियामतीच्या दिवशी दिसून येईल.

५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह मोमीन टीप क्र. ९१

६. संकेत आहे विनाश पावलेल्या जन समूहांकडे उदा. नूह जनसमूह, आद व समूद जनसमूह वगैरे. या जन-समूहांना त्यांनी केलेल्या सत्याच्या इन्काराची शिक्षा जगात ही मिळाली आणि आखिरत मध्ये तर त्यांना दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल.

६. हे अशासाठी की त्यांच्या जवळ त्यांचे पैगंबर स्पष्ट निशाण्यांसह येत राहीले परंतु ते म्हणाले, काय मनुष्य आमचे मार्गदर्शन करतील ?[७] अशा प्रकारे त्यांनी इन्कार केला व तोंड फिरवले (यास्तव)अल्लाह देखील त्यांच्याशी बेपर्वा झाला. आणि अल्लाह निःस्पृह व स्तुत्य आहे.[८]

ذٰلِكَ بِاَنَّهٗ كَانَتْ تَّاْتِيْهِمْ رُسُلُهُمْ بِالْبَيِّنٰتِ فَقَالُوْٓا
اَبَشَرٌ يَّهْدُوْنَنَا فَكَفَرُوْا وَتَوَلَّوْا وَّاسْتَغْنَى اللّٰهُ ۚ
وَاللّٰهُ غَنِيٌّ حَمِيْدٌ ۝٦

७. ज्या लोकांनी सत्याचा इन्कार केला ते दावा करतात की (आम्हाला) मुळीच उठविले जाणार नाही. सांगा, का नाही? माझ्या पालन कर्त्याची शपथ. तुम्ही निश्चित उठविले जाल [९]मग तुम्हाला सांगितले जाईल, जे काही तुम्ही करीत राहीलात. आणि हे काम अल्लाह करीता अतिशय सोपे आहे.

زَعَمَ الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اَنْ لَّنْ يُّبْعَثُوْا ۚ قُلْ بَلٰى وَرَبِّيْ
لَتُبْعَثُنَّ ثُمَّ لَتُنَبَّؤُنَّ بِمَا عَمِلْتُمْ ۚ وَذٰلِكَ
عَلَى اللّٰهِ يَسِيْرٌ ۝٧

८. तेव्हा ईमान बाळगा अल्लाहवर आणि त्याच्या पैगंबरावर आणि या तेजा (प्रकाशा) वर जे आम्ही अवतरीत केले आहे.[१०] तुम्ही जे काही करता अल्लाह त्या पासून अनभिज्ञ नाही.

فَاٰمِنُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ وَالنُّوْرِ الَّذِيْٓ اَنْزَلْنَا ۚ وَاللّٰهُ
بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرٌ ۝٨

९. ज्या दिवशी अल्लाह तुम्हाला एकत्रित करील, (सर्वांना) एकत्रित करण्याच्या दिवशी.[११] तो तोटा जाहीर होण्याचा दिवस असेल.[१२] ज्यांनी ईमान बाळगले असेल आणि जे सत्कर्म करीत राहीले असतील, त्यांच्या अपराधांना तो दूर करील, आणि त्यांना आपल्या बागां मध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. ते सदैव तेथे राहतील. हीच मोठी सफलता आहे.[१३]

يَوْمَ يَجْمَعُكُمْ لِيَوْمِ الْجَمْعِ ذٰلِكَ يَوْمُ التَّغَابُنِ ۗ وَمَنْ يُّؤْمِنْ بِاللّٰهِ
وَيَعْمَلْ صَالِحًا يُّكَفِّرْ عَنْهُ سَيِّاٰتِهٖ وَيُدْخِلْهُ جَنّٰتٍ تَجْرِيْ
مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَآ اَبَدًا ۚ ذٰلِكَ الْفَوْزُ الْعَظِيْمُ ۝٩

१०. आणि ज्या लोकांनी सत्याचा इन्कार केला असेल आणि आमच्या आयतींना खोटे ठरविले असेल ते जहन्नमी (नरक वासी) असतील, सदैव त्यात राहणारे आणि ते फार वाईट ठिकाण आहे.[१४]

وَالَّذِيْنَ كَفَرُوْا وَكَذَّبُوْا بِاٰيٰتِنَآ اُولٰٓئِكَ اَصْحٰبُ النَّارِ خٰلِدِيْنَ فِيْهَا ۗ
وَبِئْسَ الْمَصِيْرُ ۝١٠

११. कोणते ही संकट येत नाही, परंतु अल्लाहच्या आज्ञेने [१५] जो अल्लाहवर ईमान राखतो,तो त्याच्या मनाला मार्गदर्शन करतो [१६] आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीस जाणतो.

مَآ اَصَابَ مِنْ مُّصِيْبَةٍ اِلَّا بِاِذْنِ اللّٰهِ ۗ وَمَنْ يُّؤْمِنْ بِاللّٰهِ
يَهْدِ قَلْبَهٗ ۗ وَاللّٰهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ۝١١

७. पैगंबरांना अल्लाहने माणसांच्या मार्गदर्शनास्तव पाठविले होते, परंतु ज्या अर्थी हे पैगंबर मनुष्य होते. म्हणून गर्विष्ठ लोकांना यात आपली मान हानी वाटली की एका माणसाला रसूल (पैगंबर) व आपला मार्गदर्शक मानावे त्यांच्या मते मार्गदर्शन करण्यासाठी अल्लाहने फरिश्त्यांना रसूल बनवून पाठवावयास होते. एकीकडे तर यांना मनुष्य असण्या पायी रसूलला मार्गदर्शक मानण्यास इन्कार होता तर दुसरी कडे त्यांची अवस्था ही होती की, ते मार्गभ्रष्ट लोकांना त्यांनी आपल्या मार्गदर्शक बनवून ठेवले होते तसेच दगड वीटा, सारख्या वस्तूंना त्यांनी आपला ईश्वर बनवून ठेवले होते. या उघड मूर्खपणा बद्दल ना त्यांना काही संकोच वाटत होता आणि ना ते या गोष्टीत आपली मानहानी समजत होते. अर्थात डोळे असून आंधळा असलेल्याला मार्ग दिसणार तरी कसा?

८. म्हणजे जेव्हा यांनी मार्गदर्शनाकडे पाठ फिरवली तेव्हा अल्लाहलाही त्यांच्या मार्गदर्शनाची पर्वा उरली नाही कारण अल्लाह मार्गदर्शन त्यालाच देतो जो ते कबूल करण्यास मना पासून तयार असेल.

९. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही ताकीद की आपल्या पालन कर्त्या (अल्लाह) ची शपथ घेऊन हे घोषित करा की लोकांना अवश्य दुसऱ्यांदा जिवंत करून उठविले जाईल; दृढता व्यक्त करण्या करीता आहे. म्हणजे मी आपल्या पालन कर्त्यास साक्षी ठेवून म्हणतो की तुमचे दुसऱ्यांदा जिवंत उठविले जाणे अगदी खात्रीचे व अपरिहार्य आहे. यात तिळमात्र संशयाला जागा नाही.

१०. 'तेजा' शी अभिप्रेत पवित्र कुरआन होय, जो साक्षात ज्ञान-प्रकाश होय. या आयतीत अल्लाह, त्याचे पैगंबर आणि कुरआनावर ईमान बाळगण्याचे प्रत्यक्षत: अवाहन केले गेले आहे. अर्थात हे आवाहन मनुष्य म्हणून जन्माला येणाऱ्या समस्त मानवां करीता आहे.

११. म्हणजे कियामतीचा दिवस समस्त मागच्या पुढच्या मानवांना एकत्रित करण्याचा दिवस असेल आणि या दिवशी तो तुम्हा सर्वांना एकत्रित करील. तात्पर्य या अभूतपूर्व सम्मेलनाच्या दिवशी भुतलावर माणसांचा उचंबळणारा महासागर असेल असा कोणी ही नसेल जो मेल्या नंतर जिवंत झाला नसेल.

१२. मूळ शब्द 'तगाबून प्रयोजिला गेला आहे ज्याचा शाब्दिक अर्थ खरेदी-विक्रीत तोटा व हानी असा आहे. अरबीचा शब्दकोष 'लिसानुल अरब' मधील उल्लेख असा-

وَالْغُبْنُ فِى الْبيعِ والشراءِ الوكس (ج١٣ ص ٣١٠)

'खरेदी-विक्रीत तोटा (हानी)' (खंड-१३ पृ. ३१०)

या जगात मनुष्य जी आपली आयुष्य रूपी पूंजी लावतो त्याला कुरआनाने व्यापार या अर्थाने घेतले आहे. काफिर आपली आयुष्य रूपी पूंजी ऐहिक ऐश्वर्य संपादण्यात व मार्गभ्रष्टता खरेदी करण्यावर लावतो म्हणून तो तोटयाचा सौदा करतो, अर्थात हा तोटा कियामतीच्या दिवशी उघडपणे समोर येईल. मग त्या वेळी त्याला जाणीव होईल की त्याने अगदी चुकीच्या कामात आपले सोन्यासारखे आयुष्य खर्ची घातले आणि त्याचा परिणाम आज (कियामतीच्या दिवशी) हा आहे की त्याला कधीही न भरून येणाऱ्या तोटयाला व विनाशाला तोंड द्यावे लागत आहे.

أُولٰئِكَ الَّذِينَ اشْتَرَوُا الضَّلٰلَةَ بِالْهُدٰى فَمَا رَبِحَتْ تِجَارَتُهُمْ وَمَا كَانُوا مُهْتَدِينَ۔ (بقره:١٦)

'हेच ते लोक होत, ज्यांनी मार्गदर्शनाच्या ऐवजी मार्गभ्रष्टता खरेदी केली तर त्यांचा हा व्यापार त्यांच्या करीता काहीच नफा दायक ठरला नाही आणि ना ते मार्गदर्शन प्राप्त करणार आहेत? (बकरा-१६)

कियामतीचा दिवस काफिरां करीता तगाबून अर्थात तोटयाला सामोरे जाण्याचा दिवस असेल. हे त्याच प्रकारे आहे ज्या प्रकारे सूरह कमर मध्ये फर्माविले गेले आहे :-

يَقُولُ الْكٰفِرُونَ هٰذَا يَوْمٌ عَسِرٌ۔

'काफिर म्हणतील, हा मोठा सक्त दिवस आहे.' (सूरह कमर-८)

१३. म्हणजे ज्या लोकांनी ईमान बाळगून सदाचाराचे जीवन व्यतीत केले ते कियामतीच्या दिवशी प्रत्येक प्रकारच्या तोटया पासून सूरक्षित राहतील आणि त्यांना प्रचंड यश प्राप्त होईल अर्थात जन्नत प्राप्तीचे यश. कारण त्यांनी आपले आयुष्य या कामापायी वेचले होते जे आखिरत मध्ये लाभदायक ठरणार होते.

१४. ज्या तोटयाला काफिर कियामतीच्या दिवशी सामोरे जातील हे याचे स्पष्टीकरण आहे.

१५. याचे स्पष्टीकरण सूरह हदीद मध्ये केले गेले.

या ठिकाणी ही गोष्ट या अनुषंगाने सांगितली गेली आहे की संकटांचा थवा पाहून मुसलमानाने अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञा-पालन सोडून देऊ नये. संकटे अल्लाहच्या आज्ञेने येतात आणि यात ईमान बाळगणाऱ्यांची परीक्षा ही होते आणि या परिक्षेत ते त्याच वेळी सफल होऊ शकतात जेव्हा ते अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पालनाचा पुरावा देतील.

१६. म्हणजे जो मनुष्य अल्लाहवर अटळ ईमान राखतो, सर्वश्रेष्ठ अल्लाह संकटांच्या भोवऱ्यात त्याच्या त्रस्त मनाला मार्गदर्शनाचा प्रकाश प्रदान करतो आणि त्याला अशा प्रकारे

मार्ग दाखवितो की अल्लाह विषयी त्याच्या मनात किंचितही गैरसमज निर्माण होत नाही आणि ना तो शंका संशय धरू लागतो. अल्लाह त्याच्या भावनांना व विचारांना योग्य दिशा दाखवितो ज्यामुळे ईमान विषयक कैफियत निर्माण होते आणि त्याला अल्लाहने निर्धारीत केलेल्या भाग्यावर राजी राहण्याची सुबुद्धि प्रदान करतो.

**अल्लाहचे आज्ञा पालन करा आणि रसूलचे आज्ञापालन करा. जर तुम्ही तोंड फिरवित असाल तर आमच्या पैगंबरावर स्पष्टपणे (संदेश) पोहचविण्याची जबाबदारी आहे. अल्लाह, तो होय की ज्याच्या खेरीज कोणी उपास्य नाही. आणि ईमान बाळगणाऱ्यांनी अल्लाहवरच भरवसा केला पाहीजे. *(अल-कुर्आन)***

१२. अल्लाहचे आज्ञा पालन करा आणि रसूलचे आज्ञापालन करा. जर तुम्ही तोंड फिरवित असाल तर आमच्या पैगंबरावर स्पष्टपणे (संदेश) पोहचविण्याची जबाबदारी आहे.

وَأَطِيعُوا اللَّهَ وَأَطِيعُوا الرَّسُولَ ۚ فَإِن تَوَلَّيْتُمْ فَإِنَّمَا
عَلَىٰ رَسُولِنَا الْبَلَاغُ الْمُبِينُ ﴿١٢﴾

१३. अल्लाह, तो होय की ज्याच्या खेरीज कोणी उपास्य नाही. आणि ईमान बाळगणाऱ्यांनी अल्लाहवरच भरवसा केला पाहीजे.

اللَّهُ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۚ وَعَلَى اللَّهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُونَ ﴿١٣﴾

१४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुमच्या पत्न्या व तुमच्या संतती पैकी काही तुमचे शत्रू आहेत, तर त्यांच्या पासून सतर्क रहा [१७] आणि जर तुम्ही माफ कराल, कानाडोळा कराल, व क्षमा कराल तर अल्लाह क्षमाशील, दया करणारा आहे.[१८]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِنَّ مِنْ أَزْوَاجِكُمْ وَأَوْلَادِكُمْ عَدُوًّا لَّكُمْ
فَاحْذَرُوهُمْ ۚ وَإِن تَعْفُوا وَتَصْفَحُوا وَتَغْفِرُوا فَإِنَّ
اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٤﴾

१५. तुमची सम्पत्ति व तुमची संतती कसोटी आहे. [१९] आणि अल्लाहच होय, ज्याच्या जवळ मोठा मोबदला आहे.

إِنَّمَا أَمْوَالُكُمْ وَأَوْلَادُكُمْ فِتْنَةٌ ۚ وَاللَّهُ عِندَهُ أَجْرٌ عَظِيمٌ ﴿١٥﴾

१६. यास्तव शक्यतोवर, अल्लाहचे भय बाळगून रहा [२०]आणि ऐका व आज्ञापालन करा [२१] आणि खर्च करा आपल्या भल्याकरीता [२२] ज्यांना आपल्या मनाच्या संकुचितते पासून वाचविले गेले, तेच यशस्वी होणार आहेत.[२३]

فَاتَّقُوا اللَّهَ مَا اسْتَطَعْتُمْ وَاسْمَعُوا وَأَطِيعُوا وَأَنفِقُوا
خَيْرًا لِّأَنفُسِكُمْ ۗ وَمَن يُوقَ شُحَّ نَفْسِهِ
فَأُولَٰئِكَ هُمُ الْمُفْلِحُونَ ﴿١٦﴾

१७. जर तुम्ही अल्लाहला चांगले कर्ज द्याल [२४] तर तो तुमच्या करीता त्यास कित्येक पट करील आणि तुम्हाला माफ करील.अल्लाह मोठा कदर करणारा (गुणग्राहक) व सहनशील आहे.[२५]

إِن تُقْرِضُوا اللَّهَ قَرْضًا حَسَنًا يُضَاعِفْهُ لَكُمْ وَيَغْفِرْ لَكُمْ ۚ
وَاللَّهُ شَكُورٌ حَلِيمٌ ﴿١٧﴾

१८. अपरोक्ष आणि परोक्ष सर्वांचा ज्ञाता, वर्चस्व व बुद्धिकौशल्य बाळगणारा.

عَالِمُ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿١٨﴾

१७. या ठिकाणी शत्रू हा शब्द या अर्थाने वापरला गेला आहे की काही पत्न्या व मुले बाळे मुसलमान असूनही आपले अज्ञात, असामंजस्य, किंवा अवज्ञाकारीता इत्यादिमुळे अधिकाधिक धन अर्जित करण्यावर आणि आर्थिक दृष्टया जीवन-स्तर उंचाविण्यावर अशा प्रकारे प्रेरित करतात की माणूस ऐहिकतेतच गुरफटून राहतो परिणामी धर्मविषयक निकडी भागवणे त्याला दुरापास्त होते. त्याच प्रमाणे जेव्हा धर्म संदर्भात बलीदान व त्याग करण्याची वेळ येते तेव्हा या पत्न्या व मुळे हिंमत खचवितात आणि कधी असे ही घडते की केवळ ऐहिक लाभा करीता ते शरीअत विरोधी काम करण्याचा आग्रह करू लागतात. अशाच प्रसंगा करीता अल्लाहने ईमान बाळगणाऱ्यांना ताकीद केली आहे की त्यांनी यांच्या पासून सतर्क रहावे आणि त्यांच्या कथनाला व सल्ला मसलतीला शरीअतच्या भिंगातून पहावे. डोळे मिटून त्यांच्या म्हणण्या नुसार वागू नये. ही सावधगिरी बायका व मुला बाळांच्या संदर्भात आवश्यक आहे.

स्पष्ट असावे की आयतीत असे फर्माविले गेले नाही की प्रत्येक माणसाची पत्नी व संतती अशीच असते किंबहुना असे फर्माविले गेले आहे की काही पत्न्या व मुले अशी असतात. यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की कितीतरी लोकांच्या पत्न्या व मुळे सदाचारी असतात. अशा पत्न्या आपल्या पतीच्या धर्म-कार्यात सहाय्यक बनतात आणि उत्कृष्ट जीवन-साथी ठरतात. त्याच प्रकारे सदाचारी संतती आपल्या पित्याच्या धार्मिक-निकडींना पूर्ण करण्यात सहाय्यक ठरतात आणि माता पित्याच्या नेत्रांना शीतलता पोहचवितात.

१८. म्हणजे सतर्क राहण्याचा अर्थ हा नव्हे की आपल्या पत्न्या व मुला बाळांच्या चुकीच्या वर्तना बद्दल अगदी कठोर व्हावे किंवा सूड घेण्याची भाषा बोलू लागावे. नव्हे, किंबहुना तुमचे वर्तन माफ करण्याचे, दुर्लक्ष करण्याचे व क्षमादान करण्याचे असले पाहीजे. या ठिकाणी एकच नव्हे तर तीन तीन शब्दांचा वापर करण्यात आला आहे. या साठी की माफ करण्यात व काना डोळा करण्यात अधिक चांगला पैलू दिसून यावा. माफ करा याचा अर्थ असा की यांची सक्ती पूर्वक पकड करू नका. काना डोळा करण्याचा अर्थ असा की त्यांच्या चुकीच्या गोष्टींना दृष्टीआड करा व त्याचा कोणताही प्रभाव स्वत:वर होऊ देऊ नका आणि क्षमा करण्याचा अर्थ हा की त्यांना मन:पूर्वक माफ करा.

ही व्यापक सहृदयता तुम्हाला अल्लाहच्या नजरेत प्रिय बनविल आणि तो ही तुम्हाला माफ करील आणि आपल्या देणग्यांनी उपकृत करील आणि नवल नव्हे की तुमच्या या वर्तनाने प्रभावित होऊन तुमच्या पत्न्या व मुले आपल्या आचरणात सुधारणा करण्यास प्रवृत्त होतील.

१९. कसोटी या गोष्टीची की सम्पत्ति व संततीच्या मोहात अडकून तुम्ही अल्लाहच्या आदेशांना पाठीमागे टाकता कि त्याच्या (अल्लाहच्या) प्रेमाला वर्चस्व शाली ठेवित त्याच्या आज्ञा पालनात जीवन व्यतीत करतात.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मुनाफिकून टीप क्र. १७

२०.सम्पत्ति व संततीचे आकर्षण ईश-भय अंगिकारणाऱ्या करीता पावलो पावली अडसर बनते. परंतु जर एक ईमान बाळगणारा जेवढे त्याला सामर्थ्य असेल तेवढे ईश भय त्याने अंगिकारीले तर अल्लाह सक्ती करणार नाही आणि अपराधांनाही माफ करील हे फर्मान मुत्तकी (ईश-भय बाळगून दुष्कर्माचा अव्हेर करणाऱ्या) लोकां करीता आशेचा किरण होय कुरआनात अन्य एका ठिकाणी फर्माविले गेले :-

اِتَّقُوا اللّٰهَ حَقَّ تُقَاتِهٖ ۔ (آل عمران ۔ ۱۰۲)

'अल्लाहचा तकवा (भय व दुष्कर्मा पासून अलिप्तता) अंगिकारा जसा की तकवा अंगिकारण्याचा हक्क आहे.' (आले इमरान :१०२)

आणि इथे फर्माविले गेले की -

فَاتَّقُوا اللّٰهَ مَا اسْتَطَعْتُمْ

'जेथ पावेतो तुमच्या अवाक्यात असेल अल्लाहचा तकवा अंगिकारा.'

यावरून हे दिसून आले की एक मनुष्य आपल्या सामर्थ्या नुसार शक्य तेवढे ईश-भय अंगिकारतो, तो एका परीने तकवाचा हक्क अदा करतो. त्याच्याकडून तेवढीच अपेक्षा केली गेली आहे आणि अशी कोणतीही जबाबदारी त्याच्यावर टाकली गेली नाही जी त्याच्या अवाक्या बाहेर असावी.

हे कथन की, 'जेथ पावेतो तुमच्या अवाक्यात आहे, अल्लाहचा तकवा अंगिकारा' फार मोठे मार्गदर्शक तत्व आहे ज्या वरून प्रत्येक प्रकारच्या प्रतिकूल परिस्थिती आणि पेच समस्या मध्ये मार्गदर्शन प्राप्त केले जाऊ शकते आणि आजच्या वातावरणात, जेव्हा सर्वत्र शिर्क (अनेकेश्वर वादा) चे आक्रमाण आहे आणि असत्य-व्यवस्थांनी शरीअतचे पालन करणे दुरापास्त केले आहे, या मार्गदर्शक तत्वाच्या उजेडातच मुसलमान तकवाचा मार्ग पार पाडू शकतो.

२१. विवशता आपल्या परिघात, परंतु मुसलमानाचे सर्व सामान्य वर्तन अल्लाहच्या आदेशांना मन:पूर्वक ऐकण्याचे व त्यांचे पालन करण्याचेच असले पाहीजे.

२२. अल्लाह करीता खर्च केल्याने सम्पत्तिचा मोह कमी होतो व अल्लाह विषयीचे प्रेम वाढते.

२३. याचे स्पष्टीकरण सूरह हश्र टीप क्र. २३ मध्ये केले गेले आहे.

२४. अभिप्रेत अल्लाहच्या मार्गात विशेषत: जेहाद करीता खर्च करणे.

२५. अल्लाह गुणग्राहक आहे. तो आपल्या दासांच्या प्रत्येक सत्कर्माची कदर जाणतो आणि तो शांत व सहनशील आहे म्हणून अपराधा बद्दल लगेच शिक्षा देत नाही, किंबहुना सुधारणेची संधी देतो.

# ६५. सूरह अत्तलाक

**नाव:** या सूरह मध्ये तलाक संबंधीचे आदेश सांगितले गेले आहेत. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अत्तलाक' असे आहे.

**अवतरण काळ :** मदनी आहे आणि संभवत:हि. स. ५ मध्ये अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** आयत क्र. १ ते ७ मध्ये तलाक संबंधीचे आदेश सांगितले गेले आहेत.

आयत क्र. ८ ते १२ मध्ये मुसलमानांना ताकीद दिली गेली आहे की त्यांनी अल्लाहच्या आदेशांची पायमल्ली करू नये आणि लक्षात असू द्यावे की अवज्ञा करणाऱ्या जन समूहांची काय परिणति झाली. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर इस्लामच्या कौटुंबिक कायद्यां (Family Laws)च्या पालना करीता हा सक्तिचा ताकीदपूर्ण आदेश आहे.

# ६५. सूरतुत्तलाक

سُورَةُ الطَّلَاقِ

आयती-१२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हे पैगंबर ! जेव्हा तुम्ही लोक स्त्रीयांना तलाक द्याल, तेव्हा त्यांना इद्दत करीता तलाक द्या [१] आणि इद्दतची गणना करा [२] आणि अल्लाहचे भय बाळगा जो तुमचा पालन कर्ता आहे.[३] त्यांना त्यांच्या घरातून बाहेर घालवू नका आणि ना त्यांनी स्वत:हून निघावे; मात्र हे की त्या उघडरित्या निर्लज्जतेचे काम करणाऱ्या असाव्यात.[४] या अल्लाहने निर्धारीत केलेल्या मर्यादा आहेत. आणि जो अल्लाहच्या मर्यादांचे उल्लंघन करील तो स्वत:वर अत्याचार करील [५] तुम्ही नाही जाणत कदाचित अल्लाह या नंतर अन्य एखादी स्थिती निर्माण करील.[६]

يٰٓأَيُّهَا النَّبِيُّ إِذَا طَلَّقْتُمُ النِّسَآءَ فَطَلِّقُوهُنَّ لِعِدَّتِهِنَّ وَأَحْصُوا
الْعِدَّةَ ۚ وَاتَّقُوا اللّٰهَ رَبَّكُمْ ۚ لَا تُخْرِجُوهُنَّ مِنْ بُيُوتِهِنَّ وَلَا يَخْرُجْنَ
إِلَّآ أَنْ يَأْتِينَ بِفَاحِشَةٍ مُّبَيِّنَةٍ ۚ وَتِلْكَ حُدُودُ اللّٰهِ ۚ وَمَنْ يَتَعَدَّ
حُدُودَ اللّٰهِ فَقَدْ ظَلَمَ نَفْسَهُ ۚ لَا تَدْرِي لَعَلَّ
اللّٰهَ يُحْدِثُ بَعْدَ ذٰلِكَ أَمْرًا ﴿١﴾

२. मग जेव्हा त्या आपल्या मुदतीस पोहचतील तेव्हा त्यांना एक तर भलेपणाने (आपल्या निकाह - बंधनात) राखा किंवा भलेपणाने विभक्त करा. [७] आणि आपल्या पैकी दोन न्यायी पुरूषांना साक्षी करा.[८] आणि साक्ष अल्लाह करीता कायम राखा.[९] हा उपदेश त्यांना दिला जातो, जे अल्लाह आणि आखिरत वर ईमान बाळगतात.[१०] जो अल्लाहचे भय बाळगील, अल्लाह त्याच्या करीता मार्ग काढील.[११]

فَإِذَا بَلَغْنَ أَجَلَهُنَّ فَأَمْسِكُوهُنَّ بِمَعْرُوفٍ أَوْ فَارِقُوهُنَّ
بِمَعْرُوفٍ وَأَشْهِدُوا ذَوَيْ عَدْلٍ مِّنْكُمْ وَأَقِيمُوا الشَّهَادَةَ لِلّٰهِ ۚ ذٰلِكُمْ
يُوعَظُ بِهِ مَنْ كَانَ يُؤْمِنُ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ ۚ وَمَنْ يَتَّقِ اللّٰهَ
يَجْعَلْ لَّهُ مَخْرَجًا ﴿٢﴾

३. आणि त्याला त्या ठिकाणाहून उपजिविका देईल, जेथून त्याला कल्पना देखील नसेल.[१२] जो अल्लाहवर भरवसा करील, तर तो त्याच्या करीता पुरेसा आहे.[१३] अल्लाह आपले कार्य पूर्ण केल्या खेरीज राहात नाही. अल्लाहने प्रत्येक गोष्टी करीता एक अनुमान (काळ) निश्चित करून ठेवला आहे.[१४]

وَيَرْزُقْهُ مِنْ حَيْثُ لَا يَحْتَسِبُ ۚ وَمَنْ يَتَوَكَّلْ عَلَى اللّٰهِ فَهُوَ حَسْبُهُ ۚ
إِنَّ اللّٰهَ بَالِغُ أَمْرِهِ ۚ قَدْ جَعَلَ اللّٰهُ لِكُلِّ شَيْءٍ قَدْرًا ﴿٣﴾

१. सूरवातीला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधिले गेले आहे; आणि त्या सोबतच ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून म्हटले गेले आहे की जेव्हा तुम्ही तलाक द्याल तर इद्दत करीता द्या. ही संबोधन शैली या गोष्टीकडे संकेत करते की हा आदेश एवढा सक्तीचा आहे की पैगंबरांचे व्यक्तिमत्व देखील याच्या पालनास अपवाद नाही आणि त्यांच्या माध्यमातून हा आदेश संपूर्ण मुस्लिम-जन समूहाला दिला जात आहे. जेव्हा तलाक देण्याचा हा आदेश की इद्दत करीता तलाक द्या, या ताकीदी सह दिला गेला आहे, तेव्हा याकडे पाठ फिरवून तलाक देण्याची दुसऱ्या एखाद्या पद्धतीचा अंगिकार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

طَلِّقُوْهُنَّ لِعِدَّتِهِنَّ

'इदत करीता तलाक द्या'

चा अर्थ हा हेतु त्याच वेळी द्या, जेव्हा इद्दतचा आरंभ करू शकाल. हा हेतु त्याच वेळी पूर्ण होऊ शकतो जेव्हा मनुष्य एका वेळी एकच तलाक देईल, या साठी की त्या तलाकच्या इद्दतचा आरंभ व्हावा आणि जेव्हा ती इद्दत पूर्ण होईल तेव्हा ती स्त्री, पुरूषा पासून (पती पासून) वेगळी होईल परंतु दुसऱ्यांदा निकाह होण्याचा अवसर राहील. आणि जर इद्दतच्या अवधित नवऱ्याने रूजू करून घेतले तर त्याच्या साठी ही संधी राहील की पुढे जर आवश्यकता भासली तर दुसरा तलाक द्यावा आणि त्याच्या इद्दत काळात ही त्याला रूजू करण्याचा हक्क राहील. तर तो रूजू करून घेईल तर पत्नी त्याच्या निकाह मध्ये राहील. यानंतर जर त्याने पुढे कधी तरी तिसरा तलाक दिला तर स्त्रीला इद्दत अवधि पार पाडावा लागेल परंतु पतीला पुन्हा रूजू करण्याचा हक्क राहणार नाही आणि हा तलाक परिपूर्ण (absolute) ठरेल.

तलाकची हीच खरी पद्धत होय ज्या विषयी कुरआन व पैगंबर आचरणात शिकवण दिली गेली आहे; व ज्याबाबत ताकीद दिली गेली आहे. राहीला एकाच वेळी तिनदा तलाक देण्याची समस्या तर ही पद्धत कुरआन व पैगंबर आचरणाच्या अगदी विरूद्ध आहे. अशा स्थितीत फक्त एकच तलाक होतो; तीन तलाक नव्हे. कारण शरीअतने इद्दत करीता तलाक देण्याचा अधिकार दिला आहे. यास्तव पहिल्या तलाकचा आरंभ तर इद्दत ने होईल. परंतु दुसऱ्या व तिसऱ्या तलाकचा आरंभ इद्दतने होऊ शकणार नाही. वास्तविक प्रत्येक तलाक करीता भिन्नपणे इद्दतचा आरंभ होणे आवश्यक आहे म्हणून एकाहून अधिक तलाक व्यर्थ आणि खोटे ठरतील. कारण अशा प्रकारे तलाक देण्याचा शरीअतने पुरूषाला अधिकारच दिलेला नाही. आणि विचार करण्या सारखी बाब म्हणजे प्रत्येक तलाक करीता इद्दतच्या बंधनामध्ये शरीअतची फार मोठी दूर दर्शिता ही आहे आणि ती ही की पतीला फेरविचार करण्याची संधी मिळावी व पत्नीला रूजू करून घेण्याच्या दोन संधी लाभाव्यात. थोडक्यात म्हणजे ही आयत या बाबतीत अगदी स्पष्ट आहे की प्रत्येक तलाक साठी इद्दतचा आरंभ होणे आवश्यक आहे. ज्या तलाक साठी इद्दतचा आरंभ होत नसेल, तो तलाक शरीअत दृष्टया विश्वसनीय नाही. राहीली एकाच वेळी तीन तलाक देण्याची गोष्ट तर ती ना कुरआना द्वारे सिद्ध आहे आणि ना पैगंबर वचना द्वारे.

या संदर्भात अल्लामा इब्ने तैमिया असे फर्मावितात

**وامامن اخذ بمقتضى القرآن ومادلت عليه الاثارفانه يقول ان الطلاق الذى شرعه الله هومايتعقبه العدة : وماكان صاحبه مخيرا فيها بين الامساكِ بمعروف والتسريح باحسان : وهذامنتف فى ايقاع الثلاث فى العدة قبل الرجعة ، فلايكون جائز فلم يكن ذلک طلاق للعدة۔** (مجموع فتاوىٰ ابن تیمیہ ج ۳۳ ص ۷۹)

''कुरआन ज्या गोष्टीची निकड बाळगतो आणि पैगंबर वचने जिला प्रमाणित करतात, तिला ज्या लोकांनी दृष्टी पथात राखले आहे ते म्हणतात की ज्या तलाकला अल्लाहने शरीअत-निष्ठ ठरविले आहे तो तोच तलाक होय, ज्या सोबत इद्दतचा आरंभ होतो आणि तलाक देणार भलेपणाने पत्नीला ठेवण्याचा किंवा भलेपणाने सोडून देण्याचा अधिकार बाळगत असेल. आणि यामुळे इद्दत-काळात रूजू करण्यापूर्वी तीन तलाक होण्यास नकार ठरतो. म्हणून हे योग्य नव्हे आणि अशा प्रकारचा तलाक इद्दत करीता नसेल''.

मुस्नद अहमदचे भाष्यकार अहमद मुहम्मद शाकीर यांनी आपल्या 'निजामुत्तलाक फिल् इस्लाम' मध्ये स स्पष्टीकरण लिहीले आहे:-

**ولذلک أوردت الادلة التى ذكرتهاوالتى نقلتها عن غيرى فى معرض احتجاج على بطلان الطلقتين التاليتين للطلقةالاولى فى العدة۔ وعلى ان الطلاق لايلحق الطلاق وعلى ان المعتدة لايلحقها طلاق۔** (نظام الطلاق فی الاسلام لاحمد شاکر مطبعۃ النہضۃ بمصر۔ص ۱۱۳)

''या साठी मी आपली प्रमाणे ही सांगितली आणि इतरांकरवी ही उल्लेखिली,या गोष्टीच्या युक्तिवादात की

इद्दत मध्ये पहिल्या तलाक नंतर दोन तलाक खोटे आहेत; आणि हे की एका तलाकने दुसरा तलाक लागू होत नाही, आणि हे की इद्दत घालविणाऱ्या स्त्रीला एखादा (दुसरा) तलाक लागू होत नाही''

अर्थात हे की एक तलाक सोबत जी इद्दत सुरू झाली त्यात दुसरा तलाक पडू शकत नाही कारण प्रत्येक तलाक करीता एक इद्दत असणे आवश्यक आहे.

मौलाना मुहम्मद रईस नदवी यांनी आपला संशोधनात्मक पुस्तक, 'तन्वीरूल आफाक फी मसअलतित्तलाक' (जामीआ सलफीया बनरास द्वारे प्रकाशित) यात लिहीले आहे.

'म्हणजे जेव्हा तलाक करीता तुहरची वेळ विशेष आहे आणि या विशेष कालावधित एका वेळी एकच तलाकाची अनुमति आहे जर या विशेष काळात एकाहून अधिक वेळा तलाक दिला गेला तर अधिकचे तलाक रद्द बातील आणि फक्त एकच तलाक घडीत ठरेल ज्याची शरीअतने अनुमति दिली आहे. (पृ. ३१५)

आयतीचा जो आश्य आम्ही सांगितला आहे. उपरोक्त विद्वानांच्या मतांनी त्याचे समर्थन होते आणि हे स्पष्ट होते की आयतीचा आम्ही एखादा वेगळा अर्थ लावलेला नाही, किंबहुना आमच्या पूर्वी संशोधक विद्वान हाच अर्थ सांगत आले आहेत. म्हणजे प्रत्येक तलाक करीता वेगळी इद्दत असणे आवश्यक आहे आणि एका इद्दत मध्ये दुसरा किंवा तिसरा तलाक दिला जाऊ शकत नाही. यास्तव एकत्रित तीन तलाक शरीअत दृष्टया एक तलाकच्या आदेशात येतात. कारण खऱ्या अर्थाने एकच तलाक झाला दुसरा किंवा तिसरा तलाक मुळात घडलाच नाही परंतु सर्वसामान्य विद्वान व धर्मशास्त्रवेत्ते तीन एकत्रीत तलाक घडून येण्यास मान्यता देतात. ते अशा प्रकारच्या तलाकला हराम व बिदअती तलाक जाणत असतांना ही लागू ठरवितात, परंतु सर्वसामान्य धर्मा बाबत वाद नाही. चर्चा-वाद केवळ कुरआन व पैगंबर आचरणाच्या आदेश व त्यांच्या प्रमाणा बाबत आहे. इस्लाम मध्ये :-

فَإِنْ تَنَازَعْتُمْ فِي شَيْءٍ فَرُدُّوهُ إِلَى اللهِ

وَالرَّسُولِ-(نساء:٥٩)

''मग जर तुमच्या दरम्यान एखाद्या बाबतीत मतभेद झाले तर त्याला अल्लाह (म्हणजे त्याच्या ग्रंथ) व रसूल (म्हणजे त्याचे आचरणा) कडे वळवा''. (निसा-५९)

आणि 'जम्हूर' (सर्वसामान्यांच्या) कथनाला इज्माच्या अर्थाने घेणे अगदी चुकीचे व वस्तुस्थितीच्या विपरीत आहे.

आजच्या काळात, विशेषत: भारताच्या मुसलमानां मध्ये एकाच वेळी तीन तलाक देण्याची प्रथा सर्वसामान्य आहे. लोक असे समजतात की तीनदा तलाक दिल्या खेरीज तलाक होत नाही. हे त्यांचे अज्ञान आहे. परंतु वकील आणि काजी देखील जेव्हा एखादा तलाक नामा लिहीतात तेव्हा तीन तलाक लिहून, तलाक देणाऱ्याची सही त्यावर घेतात आणि त्याला हे ठाऊक नसते की तलाक देण्याची खरी पद्धति कोणती आहे व अनुचित पद्धति कोणती आहे. मग जेव्हा राग शांत होतो आणि तो मनुष्य आपल्या पत्नीला रूजू करू इच्छितो तेव्हा मुफ्ती महाशय ज्यांनी अनुकरणाची शपथ वाहीली आहे, म्हणतात, आता रूजू करण्याचा मार्गच उरला नाही, शिवाय हलाला करण्याचा. वास्तविक हलाला करविण्याचा धि:क्कार केला गेला आहे. अशा प्रकारे लोक तलाकच्या बाबतीत मोठया गोंधळात पडून जबरदस्त अडचणींना तोंड देत आहेत. या पासून सुटकेचा मार्ग हाच की कुरआन व पैगंबर आचरणाच्या स्पष्ट आदेशा नुसार त्यांचे मार्गदर्शन केले जावे आणि त्यांनी विशिष्ट संप्रदायांच्या बंधनातून मुक्त होऊन या मार्गदर्शनास कबूल करावे.

(या समस्ये वरील अधिक तपशीला करीता पहा आमची उर्दू पुस्तिका 'इकठ्ठी तीन तलाकें किताब व सुन्नत की रोशनी में ')

आयती वरून हे ही स्पष्ट झाले की तलाक तुहरच्या अवस्थेतच दिला जाऊ शकतो म्हणजे जेव्हा पत्नीला मासिक पाळी आलेली नसावी आणि त्या अवस्थेत पतीने सहवास केलेला नसावा कारण मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक दिल्याने इद्दतची गणना उचितपणे होऊ शकणार नाही आणि संभोग केल्याच्या अवस्थेत ही शंका राहील की कदाचित गर्भ धारणा तर झाली नाही.

एका हदीस वचनातील उल्लेखा नुसार:-

'हजरत अब्दुल्लाह बिन उमर यांनी आपल्या पत्नीला मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक दिला. हजरत उमर यांनी या बाबत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले, तेव्हा पैगंबरांनी फर्माविले, त्यांना सांगा की त्यांनी आपल्या पत्नीला परत घ्यावे. आणि त्याच स्थितीत राहू द्यावे. येथपावेतो की जेव्हा ती स्वच्छ शुद्ध होईल मग जेव्हा दुसरी मासिक पाळी येईल आणि मग ती स्वच्छ शुद्ध होईल तेव्हा वाटल्यास पत्नी नात्याने राखावे किंवा वाटल्यास संभोगा पूर्वी तलाक द्यावा. हेच ते हदीस-वचन होय ज्याचा आदेश अल्लाहने स्त्रीयांच्या तलाक संदर्भात दिला आहे'.(मुस्लिम-किताबुत्तलाक)

तात्पर्य, शरीअतने पुरूषाला हा हक्क दिलेला नाही की त्याने स्त्रीला मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक द्यावा. यास्तव जर एखादा मनुष्य आपल्या पत्नीला मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक देतो तर हा तलाक शरीअत- नियमा विरूद्ध

व खोटा आहे. खऱ्या अर्थाने ठरणार नाही.

२. इद्दतची गणना करण्याची ताकीद केली गेली आहे. कारण इद्दत संपण्यापूर्वी स्त्री दुसऱ्या पुरूषाशी निकाह करू शकत नाही आणि तिने केलाच तर तो शास्त्र-संमत ठरणार नाही. तलाक दिला गेलेल्या स्त्रीची इद्दत (अवधि) सामान्यत: तीन मासिक पाळी इतका आहे. सूरह बकरा मधील निवेदनानुसार-

وَالْمُطَلَّقَاتُ يَتَرَبَّصْنَ بِاَنْفُسِهِنَّ ثَلَاثَةَ قُرُوْٓءٍ ـ (بقرہ:۲۲۸)

''आणि ज्या स्त्रीयांना तलाक दिला गेला असेल त्यांनी तीन मासिक पाळी पर्यंत स्वत:ला रोखून ठेवावे.'' (बकरा: २२८)

याचा अर्थ असा की ज्या 'तुहर' शुध्दीच्या अवस्थेत स्त्रीला तलाक दिला गेला, त्यानंतर पहील्या मासिक पाळीचा काळ यावा, मग स्वच्छ शुद्ध झाल्यावर दुसरी मासिक पाळी यावी, मग पुन्हा स्वच्छा शुद्ध झाल्यावर तिसरी मासिक पाळी ज्या दिवशी संपेल, त्या दिवशी त्या स्त्रीची इद्दत संपेल आणि मग ती दुसऱ्या पुरूषाशी निकाह करण्यास मोकळी होईल.

ज्या स्त्रीयांना मासिक पाळी येत नसेल किंवा ज्या गर्भवती असतील त्यांच्या इद्दत विषयीचे आदेश याहून वेगळे आहेत. पुढे आयत क्र. ४ मध्ये हे आदेश सांगितले गेले आहेत.

३. तलाकच्या बाबतीत आल्लाहचे भय बाळगण्याची विशेषत्वाने ताकीद दिली गेली आहे. कारण प्रथम तर तलाक, धर्मात सक्त अप्रिय अशी बाब आहे, दुसरे हे की जेव्हा तलाक देणे क्रमप्राप्त ठरेल तेव्हा त्याच रीतीने तलाक दिला पाहीजे जी शरीअतने निर्धारीत केली आहे. रागाच्या भरात अशा रीतीने तलाक देणे की समस्त शरीअत विषयक आदेशांचे उल्लंघन व्हावे, हे ईश-भयाच्या अगदी विपरीत आहे आणि जो मनुष्य आपल्या व्यवहारांमध्ये अल्लाहचे भय बाळगत नाही, उलट आपल्या भावना व इच्छा आकांक्षांच्या आहारी जातो, तो स्वत:ला दुष्परिणतीच्या खाईकडे लोटतो.

४. पुरूषाची जबाबदारी आहे की स्त्रीला तलाक दिल्या नंतर इद्दत पावेतो आपल्या घरी ठेवावे आणि स्त्रीची ही जबाबदारी आहे की इद्दतचा काळ पतीच्या घरात पार पाडावा. रागाच्या भरात माहेरी निघून जाऊ नये. घराबाहेर पडू नये याचा हा अर्थ नव्हे की आपल्या गरजे पोटी ती बाहेर पडू शकत नाही. किंबहुना याचा अर्थ हा की पतीचे घर सोडून तिने दुसऱ्या ठिकाणी जाऊ नये.

मात्र हे की त्या उघडपणे निर्लज्ज पणाचे काम करणाऱ्या असतील शी अभिप्रेत व्यभिचार करणाऱ्या होत. या परिस्थितीत पतीला हक्क आहे की त्याने इद्दतच्या अवधित ही पत्नीला आपल्या घरातून बाहेर घालवावे.

'فاحشةمبينة''निर्लज्जतेच्या कामां' शी ज्या लोकांनी दुर्वचनी वगैर जो अर्थ घेतला आहे, त्यांच्या या मताशी सहमत होता येणार नाही आणि एवढयाशा कारणा वरून तर पती वाटेल तेव्हा पत्नीला घराबाहेर काढू शकतो. कुरआनात तर हे शब्द व्यभिचारा साठीच वापरले गेले आहेत.

५. म्हणजे तलाक एखाद्या अपरिहार्य गरजे शिवाय देणे, तलाक देण्यात इद्दतचा विचार न करणे, एकाच वेळी अनेक तलाक देणे, इद्दतची गणना न करणे. हे सर्व प्रकार म्हणजे अल्लाहने निर्धारीत केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणे आणि अशा प्रकारची कृत्ये उघडरित्या अत्याचार पूर्ण होत. अर्थात अत्याचाराचे कृत्य करणारा स्वत:ला अल्लाहच्या शिक्षेस पात्र ठरवितो.

याचा उलट अर्थ काही भाष्यकारांनी घेतला आहे. ते म्हणतात की, तीन एकत्रित तलाक दिल्याने तलाक होतो. म्हणूनच याला अत्याचार या अर्थाने घेतले गेले आहे. वास्तविक या ठिकाणी चुकीची पद्धत अंगिकारल्या बद्दल कानउघडणी केली गेली आहे. तीन तलाक घडून येण्या संबंधी काही ही सांगितले गेले नाही आणि जेव्हा हे मान्य आहे की एकत्रित तीन तलाक अत्याचार पूर्ण असतात तर काय इस्लाम धर्म या अत्याचारस स्त्रीच्या हक्कात उचित राखू इच्छितो? केवढी विचित्र गोष्ट आहे, जी हे भाष्यकार सांगत आहेत !

६. याचा संबंध अल्लाहच्या मर्यादांच्या पालनाशी आहे म्हणजे जर तुम्ही तलाकच्या बाबतीत अल्लाहच्या सीमा रेषांचे पालन केले तर नवल नव्हे की अल्लाह तलाक नंतर अधिक चांगुल पणाची एखादी स्थिती निर्माण करील म्हणजे रूजू करण्याची सुबुद्धि प्रदान करील किंवा इद्दत संपल्यानंतर स्त्री करीता दुसऱ्या निकाहची अधिक चांगली स्थिती निर्माण करील. काही ही असो. अल्लाहच्या मर्यादांचे पालन करण्याचा परिणान केव्हा ही सुखद ठरू शकतो एवढे मात्र निश्चित.

७. आपल्या मुदतीस पोहचण्याशी अभिप्रेत इद्दत अवधि संपण्याप्रत पोहचणे होय. या प्रसंगी पतीने एकतर रूजू करण्याचा निर्णय घ्यावा किंवा सोडून देण्याचा मात्र दोन्ही ही स्थितीत भलेपणाची कास बाळगली पाहीजे. यावरून उघड आहे की कुरआनने तलाक नंतर रूजू करण्याची संधी राखली आहे आणि सूरह बकरा आयत क्र. २२९ मधील निवेदना नुसार ही संधी दोन वेळच्या तलाक करीता आहे. तिसऱ्या वेळच्या तलाक नंतर रूजू करण्याची कसलीही संधी राहात नाही. परंतु एकत्रित तीन तलाकला तलाक मानण्याच्या परिस्थितीत रूजू करण्याची संधी मूळातच राहात नाही, जे उघडपणे कुरआनाच्या उद्दिष्टा

विरूद्ध आहे. म्हणूनच असा तलाक 'तलाक' म्हणून मानला जाऊ शकत नाही.

८. हा ताकीद पूर्ण आदेश आहे म्हणून त्याचे पालन केले गेले पाहीजे मदभेदां पासून अलिप्त राहण्या करीता ही ते आवश्यक आहे आणि हा आदेश दोन्ही प्रकारच्या स्थितीत आहे. तलाक दिल्या नंतर रूजू करण्याच्या स्थितीत ही आणि पत्नीला सोडून देण्याच्या स्थितीत ही. अर्थात ही गोष्ट सर्वांना कळली पाहीजे की अमुक एक स्त्री अमक्या एका माणसाची पत्नी राहील किंवा नाही अन्यथा दोघांची ही अवस्था लोकांच्या नजरेत संशयास्पद ठरू शकते.

९. ही साक्षीदारांना ताकीद आहे की त्यांनी साक्ष देण्याचा प्रसंग आल्यावर नि:पक्षपाती पणे सत्य साक्ष द्यावी आणि केवळ अल्लाह करीताच साक्ष द्यावी.

१०. 'हा उपदेश' शी अभिप्रेत अल्लाहचे ते समस्त आदेश होत जे वर तलाक संबंधी सांगितले गेले आहे. या आदेशांचे पालन करण्याचा अल्लाहने उपदेश केला आहे कारण शुभ-मांगल्य यात अंतर्भूत आहे आणि याला अल्लाह व अंतिम दिनावर ईमान बाळगण्याची निकड सांगितले गेले आहे. याचा अर्थ असा की जे लोक तलाक बाबत शरीअतच्या नियमांची पर्वा करीत नाही ते ईमानाच्या निकडी विरूद्ध काम करतात. आणि कियामतीच्या दिवशी त्यांना याचा सक्तपणे जाब विचारला जाईल.

११. ही आयत तकवा (अल्लाहचे भय व दुराचारा पासून अलिप्तता) अंगिकारणाऱ्यांना आशेचा जणू किरण होय. अल्लाह अशा लोकांकरीता अशी साधने करतो की संकंटानी घेरलेल्या माणसाला त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मिळतो आणि त्याच्या कलेश यातना दूर होतात. या ठिकाणी विशेषत्वाने संकेत कौटुंबिक अडचणीकडे आहे की त्यांना घाबरून तकवा सोडून देऊ नये. किंबहुना त्यास अधिक दृढपणे बाळगावे कारण समस्त समस्या तकवानेच सुटतात.

१२. गृह-जीवन कधी कधी उपजिविकेच्या टंचाई मुळे असहय होते. यास्तव पती-पत्नी दोघांना हा दिलासा दिला गेला आहे की जर त्यांनी तकवा (अल्लाहच्या भया) चा मार्ग सोडला नाही तर अल्लाह त्यांच्यासाठी उपजिविकेचा एक ना एक मार्ग जरूर उघडेल. असा मार्ग की ज्याची त्यांनी कल्पना ही केलेली नसेल. आणि ही वस्तुस्थिती आहे की तो उपजिविकेचे अशी साधने ही करतो जी माणसाच्या ध्यानी-मनी ही नसतात. महणून उपजिविकेच्या केवळ बाहय साधनांनाच सर्व काही समजू नये, किंबहुना अल्लाहच्या अति विशाल हातांवर भरवसा ठेवाला पाहीजे.

१३. साधनांवर भरवसा करण्या ऐवजी, साधनांना निर्माण करणाऱ्या अल्लाहवर भरवसा ठेवला पाहीजे. बाहयत: परिस्थिती अगदी निराशा जनक का असेना, परंतु अल्लाहवर मन:पूर्वक विश्वास आणि त्याच्या पासून मांगल्याची आशा माणसाला कधी ही असफल होऊ देत नाही. पर्वता सारखी संकटे ही अल्लाहच्या केवळ एका इशाऱ्याने दूर होतात. आणि ही आयत याच गोष्टीची हमी देते की जो कोणी अल्लाहवर दृढ विश्वास राखील. त्याच्या संकट-निवारणा करीता अल्लाह अगदी पुरेसा आहे.

१४. म्हणजे अल्लाहची मर्जी पूर्ण झाल्या विना राहात नाही मात्र हे चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहीजे की हे जग कसोटीचे आहे. म्हणून त्याने प्रत्येक दु:ख दूर करण्या करीता व प्रत्येक संकट निवारण्या करीता वेळ निश्चित केलेली आहे. हे त्याने निर्धारीत केलेले भाग्य होय. यास्तव माणसाने उतावळे पणा व घाई गर्दीने वागू नये. अल्लाहवर भरवसा करण्याचा हा अर्थ नव्हे की इकडे भरवसा करून दुआ (प्रर्थना) केली आणि लगेच संकट दूर झाले किंबहुना यात विलंब ही होऊ शकतो. या साठी की जी कसोटी अभिप्रेत आहे ती पूर्ण व्हावी. मात्र विश्वास बाळगला पाहीजे की अल्लाह संकटांना दूर करण्यास्तव पुरेसा ठरेल. अल्लाहवर भरवसा ठेवण्याचा हाच खरा अर्थ होय.

आणि तुमच्या स्त्रीयां पैकी ज्या मासिक पाळी बाबत निराश झाल्या असतील, त्यांच्या विषयी जर काही शंका असेल तर त्यांची इद्दत तीन महीने आहे. आणि त्यांची ही ज्यांना मासिक पाळी आलेली नसेल. आणि गर्भवती स्त्रीयांची इद्दत ही की त्यांची प्रसूती व्हावी.जो मनुष्य अल्लाहचे भय बाळगील तर तो त्याच्या बाबतीत सहजता निर्माण करील.*(अल-कुर्आन)*

४. आणि तुमच्या स्त्रीयां पैकी ज्या मासिक पाळी बाबत निराश झाल्या असतील, त्यांच्या विषयी जर काही शंका असेल तर त्यांची इद्दत तीन महीने आहे.[१५] आणि त्यांची ही ज्यांना मासिक पाळी आलेली नसेल.[१६] आणि गर्भवती स्त्रीयांची इद्दत ही की त्यांची प्रसूती व्हावी.[१७] जो मनुष्य अल्लाहचे भय बाळगील तर तो त्याच्या बाबतीत सहजता निर्माण करील.[१८]

وَالّٰٓـِٔيْ يَىِٕسْنَ مِنَ الْمَحِيْضِ مِنْ نِّسَآئِكُمْ اِنِ ارْتَبْتُمْ فَعِدَّتُهُنَّ
ثَلٰثَةُ اَشْهُرٍ وَّالّٰٓـِٔيْ لَمْ يَحِضْنَ ۚ وَاُولَاتُ الْاَحْمَالِ اَجَلُهُنَّ اَنْ يَّضَعْنَ
حَمْلَهُنَّ ۚ وَمَنْ يَّتَّقِ اللّٰهَ يَجْعَلْ لَّهٗ مِنْ اَمْرِهٖ يُسْرًا ﴿٤﴾

५. हा अल्लाहचा आदेश आहे. जो त्याने तुमच्या कडे अवतरीत केला आहे.[१९] जो अल्लाहचे भय बाळगील, त्याच्या दुष्कर्मांना तो दूर कारील आणि त्याच्या मोबदल्यास वृद्धिंगत करील.[२०]

ذٰلِكَ اَمْرُ اللّٰهِ اَنْزَلَهٗٓ اِلَيْكُمْ ۚ وَمَنْ يَّتَّقِ اللّٰهَ يُكَفِّرْ عَنْهُ سَيِّاٰتِهٖ
وَيُعْظِمْ لَهٗٓ اَجْرًا ﴿٥﴾

६. त्यांना (इद्दत-काळात) अशा ठिकाणी राखा, जेथे तुम्ही राहात असाल, जी काही तुमची ऐपत असेल. त्यांचा कोंडमारा करण्या करीता त्रास देऊ नका.[२१] आणि जर त्या गर्भवती असतील, तर त्यांच्यावर खर्च करा, येथ पावेतो की त्या प्रसूत व्हाव्यात.[२२] मग जर त्या तुमच्या करीता बाळाला दूध पाजतील तर त्यांना त्यांचे पारिश्रमिक द्या. आणि भलेपणाने एकमेकांच्या सल्ला-मसलतीने मामला ठरवून घ्या [२३] जर तुम्हाला काही अडचण जाणवत असेल तर दुसरी एखादी स्त्री त्याला दूध पाजील.[२४]

اَسْكِنُوْهُنَّ مِنْ حَيْثُ سَكَنْتُمْ مِّنْ وُّجْدِكُمْ وَلَا تُضَآرُّوْهُنَّ لِتُضَيِّقُوْا
عَلَيْهِنَّ ۚ وَاِنْ كُنَّ اُولَاتِ حَمْلٍ فَاَنْفِقُوْا عَلَيْهِنَّ حَتّٰى يَضَعْنَ حَمْلَهُنَّ ۚ
فَاِنْ اَرْضَعْنَ لَكُمْ فَاٰتُوْهُنَّ اُجُوْرَهُنَّ ۚ وَاْتَمِرُوْا بَيْنَكُمْ بِمَعْرُوْفٍ ۚ وَاِنْ
تَعَاسَرْتُمْ فَسَتُرْضِعُ لَهٗٓ اُخْرٰى ﴿٦﴾

७. ऐपत बाळगणाऱ्याने आपल्या ऐपती नुसार खर्च करावा, आणि ज्याला उपजिविका कमी दिली गेली त्याने त्यातून खर्च करावा, जे अल्लाहने त्याला दिले आहे. अल्लाहने ज्याला जेवढे दिले आहे त्याहून अधिक भार तो कोणावर ही टाकत नाही. [२५] अल्लाह अडचणी नंतर सहजता निर्माण करील.[२६]

لِيُنْفِقْ ذُوْ سَعَةٍ مِّنْ سَعَتِهٖ ۚ وَمَنْ قُدِرَ عَلَيْهِ رِزْقُهٗ فَلْيُنْفِقْ مِمَّآ اٰتٰىهُ
اللّٰهُ ۚ لَا يُكَلِّفُ اللّٰهُ نَفْسًا اِلَّا مَآ اٰتٰىهَا ۚ سَيَجْعَلُ اللّٰهُ بَعْدَ
عُسْرٍ يُّسْرًا ﴿٧﴾

१५. या आयतीत त्या घटस्फोटीत स्त्रीयांची इद्दत सांगितली गेली आहे, ज्यांच्याशी निकाह नंतर पतीने सहवास केला असेल. ज्या स्त्रीयांना सहवास करण्यापूर्वी तलाक दिला गेला त्यांच्या करीता कसली ही इद्दत नाही. जसे सूरह अहजाब आयत क्र. ४९ मध्ये सांगितले गेले आहे हे ही स्पष्ट असावे की सूरह बकरा आयत क्र. २२८ मध्ये तलाक दिला गेलेल्या स्त्रीयांची इद्दत, ज्यांच्याशी पतीने सहवास केला असेल, तीन मासिक पाळी इतकी सांगितली गेली आहे. या ठिकाणी काही विशिष्ट परिस्थितीतले आदेश निवेदिले गेले आहेत.

स्त्री जर फार वयस्कर झाली असेल. जेव्हा मासिक पाळी येण्याची तिला आशा राहू नये तर तिची इद्दत तीन महीने आहे. आणि जर तुम्हाला काही शंका असेल चा अर्थ हा की मासिक पाळी पासून निराश होण्याच्या वयास पोहचल्या नंतर जर एखाद्या प्रसंगी रक्तस्त्राव होईल, ज्यामुळे माणसाने शंका धरावी की ही मासिक पाळी समजावी की दुसऱ्या प्रकारचे रक्त, तर असल्या शंकेला मनात थारा देऊ नका आणि सरळ सरळ तीन महिन्यांची इद्दत मोजा आणि जर शंका नसेल आणि स्त्री मासिक पाळी बाबत निराश झाली असेल, तर तिची ही इद्दत तीन महीने राहील.

१६. 'ज्यांना मासिक पाळी आलेली नसेल' शी अभिप्रेत त्या स्त्रीया होत, ज्यांना आजारपण वगैरे मुळे मासिक पाळी येत नसावी. वास्तविकत्या वयात पोहचल्या असाव्यात. अशा स्त्रीयांची इद्दत ही तीन महीने आहे.

आयतीच्या या वाक्यांशात की 'ज्यांना मासिक पाळी आलेली नसेल' वयात न आलेल्या मुलींच्या निकाहच्या शास्त्र विहीतते करीता एखादे प्रमाण नाही. कारण समजा, एखाद्याने जर वयात न आलेल्या मुलीशी निकाह केला तर तिच्याशी सहवास तर तो करू शकणार नाही कारण याची अनुमति ना शरीअतने दिली आहे, ना मानवी बुद्धि व स्वभावाने. मग जर तो या मुलीला तलाक देतो तर सहवास न करू शकण्याच्या आधारावर तिची काहीच इद्दत राहणार नाही. (पहा सूरह अहजाब - आयत - ४९०) जेव्हा की या ठिकाणी त्या स्त्रीयांची इद्दत ज्यांना मासिक पाळी येत नसेल तीन महीने सांगितली गेली आहे. तात्पर्य याचा संबंध वयात न आलेल्या मुलीशी नाही आणि ना अशा मुलीच्या निकाह संदर्भात ही आयत प्रमाण ठरू शकते. या खेरीज पवित्र कुरआनात अनाथ मुले व मुलींच्या विषयी फर्माविले गेले आहे :-

وَابْتَلُوا الْيَتَامىٰ حَتّٰى إِذَا بَلَغُوا النِّكَاحَ۔ (نساء:٦)

'आणि अनाथांचे निरीक्षण करीत रहा, येथपावेतो की ते निकाहच्या वयास पोहचावेत'. (निसा:६)

स्पष्ट आहे की निकाहच्या वयास पोहचण्याशी अभिप्रेत मुलगा किंवा मुलगीचे वयात येणे. यास्तव निकाहचे वय सुज्ञतेचे वय असते, त्या आधी निकाहचा प्रश्नच उद्‌भवत नाही आणि जेव्हा निकाहचा प्रश्न उद्‌भवत नाही तेव्हा तलाकचा प्रश्नच नाही याखेरीज शरीअतने मुलीच्या निकाह करीता तिची स्विकृती आवश्यक ठरविली आहे. ही स्विकृति एखाद्या अल्पवयीन मुलीकडून कोणत्या प्रकारे प्राप्त केली जाऊ शकेल? इस्लामने या गोष्टीची मुळीच अनुमति दिलेली नाही की मुलीला जबरदस्ती पूर्वक एखाद्याच्या गळयात बांधले जावे. राहीले हे कथन की हजरत आयशा यांचे वय पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी निकाह करतांना सहा वर्षाचे होते तर या कथनाला खरे मानता येणार नाही कारण घटनांद्वारे या गोष्टीचे समर्थन होत नाही. या ठिकाणी सविस्तर चर्चेला वाव नाही. संशोधन कर्त्यांनी यावर बरेच काही लिहीले आहे.

१७. गर्भवती स्त्रीची इद्दत ती प्रसूत होई पावेतो आहे, मग प्रसूती तलाक दिल्यानंतर थोडया अवधिनंतर होवो किंवा अनेक महिन्या नंतर होवो. अशा प्रकारे इद्दत-अवधि कमी ही होऊ शकतो किंवा वाढू ही शकतो, आणि हीच इद्दत त्या गर्भवती स्त्रीची आहे जिच्या पतीचे निधन झाले असावे. कारण तिची इद्दत चार महीने दहा दिवस असती आणि या कालावधीत ती प्रस्तूत झाली नसती तर ती ही इद्दत पूर्ण केल्यानंतर गर्भवती असतांना दुसऱ्या पुरूषाशी निकाह करण्यास मोकळी झाली असती; आणि हे फार चुकीचे झाले असते की एका पुरुषाचा गर्भ असतांना तिने दुसऱ्या पुरूषाशी निकाह करून घ्यावा म्हणून शरीअतने प्रत्येक गर्भवती स्त्री करीता हा नियम निश्चित केला आहे की तिची इद्दत प्रसूत होण्या पावेतो आहे. मग यात वेळ कमी लागो अथवा जास्त. हदीस वचनाने ही याचे समर्थन होते:-

''सुबैइआ असलमीया फर्मावितात की मी सअद बिन खौला यांच्या निकाह मध्ये होती. समारोपाच्या हज्ज प्रसंगी माझ्या पतीचे निधन झाले, तेव्हा मी गर्भवती होते पती-निधनाच्या काही दिवसानंतर माझ्या घरी मूल जन्माला आले. एकाने सांगितले, तुम्ही चार महीने दहा दिवस पार पाडल्या शिवाय निकाह करू शकत नाही मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले, तेव्हा पैगंबरानी फर्माविले, तुम्ही प्रसूत होताच हलाल (वैध) झालात. आता वाटल्यास दुसरा निकाह करू शकता.'' (मुस्लिम किताबुत्तलाक)

१८. अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना दिलासा दिला गेला आहे की तकवा (अल्लाहच्या भया) च्या मार्गावर चालणे, विशेषत: कौटुंबिक जीवनात जिथे कटूता निर्माण होते, तकवा बाळगून राहणे अगदी कठीण असले तरी जो मनुष्य तकवाला चिकटून राहील अल्लाह त्याच्या करीता या मार्गावर चालणे

सोपे करील आणि वस्तुस्थिती ही आहे की जे लोक या गोष्टीचा निर्धार करतात की कोणत्याही परिस्थितीत अल्लाहचे भय बाळगून आपले व्यवहार पार पाडायचे आहेत, अल्लाह त्यांना तशी सुबुद्धि प्रदान करतो आणि ते ईश-भयाने युक्त असे जीवन-जगण्यात यशस्वी होतात.

१९. म्हणजे चांगले जाणून असा की इद्दतचा हा आदेश अल्लाहने - अवतरीत केलेला आदेश आहे म्हणून अपरिहार्यपणे तुम्हाला त्याचे पालन केले पाहिजे. याच्या विरूद्ध जाणे सरळ अपराध होय आणि जर एखाद्याने या कौटुंबिक कायद्याच्या जागी स्वरचित कौटुबिक कायदा आणण्याचा प्रयत्न केला किंवा तो प्रचलीत केला वा लागू केला, तर हा फार गंभीर अपराध ठरेल.

२०. हा अल्लाहशी भय बाळगणाऱ्यांचा व त्याच्या आदेशांचे पालन करणाऱ्यांचा मोबदला सांगितला गेला आहे की तो त्यांच्या दुष्कर्मांना ही मिटवील आणि त्यांना फार मोठया मोबदल्याने उपकृत करील जेवढी मोठी सहनशीलता तेवढा मोठा मोबदला, किंबहुना याहून फार फार मोठा.

२१. म्हणजे तलाक दिला गेलेल्या स्त्रीयांना इद्दत पावेतो आपल्याच घरात राहू द्या; आणि आपल्या ऐपती नुसार त्यांना चांगल्या जागी ठेवा. असे होता कामा नये की चांगली जागा उपलब्ध असतांना ही घाणेरडया जागी त्यांना सोडून द्यावे की ही वाईट वागणूक ठरेल व अशाने त्यांच्या मान प्रतिष्ठेला धक्का पोहचेल. तसेच इद्दतच्या कालावधीत तुमची वागणूक ही आपल्या पत्नींशी यथासंभव चांगली असली पाहीजे. त्यांना क्लेश यातना देऊन त्यांचा कोंडमारा करणे, जेणेकरून पतीचे घर सोडून जाण्यास त्यांनी विवश व्हावे, कदापि योग्य नव्हे.

अतिशय खेदाची बाब म्हणजे एवडा सक्तीचा आदेश असतांना ही सातत्याने मुसलमान आपल्या पत्नींना तलाक देत असतात आणि त्यांच्याशी त्रासदायक वर्तन करतात आणि त्यांना त्वरीत आपल्या घराबाहेर घालवितात. याचे मोठे कारण असे की मुसलमान जर कुरआनाशी संबंध ठेवतात तर तो केवळ तिलावत (पठणा) पुरताच. जेव्हा कुरआनास अर्थासह वाचण्यात त्यांना स्वारस्य वाटत नाही तेव्हा त्यांच्या वर ना अल्लाहचे आदेश स्पष्ट होतात आणि ना त्यानुसार आचरण करण्याची चळवळ होते. केवढी विचित्र गोष्ट आहे की माणसाने सूरह तलाकचे पठण तर श्रद्धाभावाने करावे, परंतु त्यात जे आदेश सांगितले गेले आहेत त्यांना समजून घेण्याचा कधी प्रयत्न ही करू नये. वास्तविक त्यांना समजून घेण्याचे माध्यम उपलब्ध आहे. असे लोक जर अल्लाहच्या आदेशांची अवज्ञा करतात तर तिलावत केल्यावर ही त्यांना कुरआनाशी या बेप्रवाई व त्याच्या आदेशांनुसार आचरण न केल्या बद्दल अल्लाह समोर सक्त जाब द्यावा लागेल.

२२. तलाक दिलेली स्त्री जर गर्भवती आहे तर ती प्रसूत होई पावेतो तिच्यावर खर्च करण्याची जबाबदारी पतीवर आहे. अर्थात यात खाणे पिणे, कपडालत्ता, आणि औषधोपचार या सर्व बाबींचा समावेश आहे. मग हा पहिला तलाक असो वा तिसरा तलाक असो. ज्याअर्थी गर्भाची मुदत दीर्घ असू शकते. यास्तव विशेषत्वाने गर्भवती स्त्रीयांच्या पोषणाचा उल्लेख केला गेला आणि हा आदेश त्या घटस्फोटीत स्त्रीयांकरीता ही आहे ज्यांना रजअी तलाक दिला गेला असेल किंवा तिसऱ्या खेपेचा निर्णायक तलाक दिला गेला असेल या प्रकारच्या सर्व घटस्फोटीत स्त्रीयां करीता त्यांचा इद्दत - अवधि पूर्ण होई पावेतो निवास व भोजनादि खर्चाची जबाबदारी पतीवर लागू होते. ही गोष्ट या पैलूने ही योग्य वाटते की जेव्हा इद्दत संपण्यापूर्वी स्त्री दुसरा निकाह करण्या करीता स्वतंत्र नसते तेव्हा इद्दत पूर्ण होई पर्यंत तिच्या निवास व भोजन वगैरे करीता कोण जबाबदार राहील. अर्थात पतीने, ज्याने निकाहचा करार तोडला आहे, तिची जबाबदारी घेतली पाहीजे.

परंतु विद्वान व धर्मशास्त्र वेत्त्यांचा एक गट या गोष्टीस मानतो की अशा घटस्फोटीत स्त्री करीता, जिला तिसरा तलाक दिला गेला असेल व ती गर्भवती नसेल, ना निवास आहे ना इतर खर्च. त्यांचा युक्तिवाद फातमा बिन्ते कैसच्या हदीस वचना वरून आहे. ज्यात त्यानी असे फर्माविले आहे की माझ्या पतीने मला तिसरा व अंतिम स्वरूपाचा तलाक दिला होता तेव्हा मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समोर निवास व भोजनादि खर्चाची समस्या मांडली परंतु पैगंबरांनी मला ना निवास देवविला ना इतर खर्च, किंबहुना फर्माविले, की तुम्ही इब्ने उम्मे मकतूमच्या घरात इद्दत अवधि पार पाडा. (मुस्लिम - किताबुत्तलाक)

वस्तुस्थिती अशी की फातिमा बिन्त कैसचे पती आपल्या घरी नव्हते, तर ते प्रवासात होते आणि यमनहून त्यांनी आपल्या पत्नीला तलाक पाठविला होता आणि जसे इतर कथनांवरून कळते, फातमा बिन्ते कैस स्वत: तेथे राहू इच्छित नव्हती म्हणून पैगंबरांनी त्यांना एका सुरक्षित स्थळी जाण्याचे मार्गादर्शन केले. राहीला भोजन वगैरेचा खर्च तर पतीने आपल्या वकीला मार्फत धान्य पाठविले होते परंतु फातमा बिन्ते कैसने त्याला अपर्याप्त जाणून अधिक धान्याची मागणी केली होती परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अधिक धान्य देवविले नाही, ज्याचे कारण, संभवत: पतीची अनुपस्थिती असावी किंवा जे धान्य त्याने पाठविले होते ते पुरेसे जाणले असावे. काही असो पैगंबरांनी त्यांची समस्या सोडवली आणि एवढेच नव्हे तर त्यांना इब्ने उम्मे मक्तूमच्या घरी जे आंधळे होते,

स्थलांतरीत होण्याचा आदेश दिला. किंबहुना इद्दत अवधि पूर्ण होताच त्यांचा निकाह उसामा बिन जैद यांच्याशी करून दिला परंतु फातमा बिन्त कैस या घटनेचे अशा प्रकारे निवेदन करीत होती की या घटस्फोटीते करीता जिला तिसरा तलाक दिला गेला, ना निवास आहे ना भोजनादि खर्च. या कथनातील शब्द सुरक्षित राखले गेले नव्हते आणि कुरआनाशी सुसंगत नव्हते. यास्तव हजरत उमर यांनी त्यांच्या या कथनास कबूल केले नाही व फर्माविले :

لَانَتْرُکُ كِتَابَ اللهِ وَسُنَّةَنَبِيِّنَا صلى الله عليه وآله وسلم لِقَوْلِ امْرَأَةٍ
لَانَدْرِیْ لَعَلَّهَاحَفِظَتْ اَوْنَسِيَتْ لَهَاالسُّكْنٰى وَالنَّفَقَةُ
قَالَ اللهِ عَزَّوَجَلَّ لَاتُخْرِجُوْ هُنَّ وَلَايَخْرُجْنَ اِلَّااَنْ
يَّاتِيْنَ بِفَاحِشَةٍمُّبَيِّنَةٍ۔ (مسلم كتاب الطلاق)

‘आम्ही अल्लाहचा ग्रंथ व आपल्या पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आचरणाला एका स्त्रीच्या सांगण्या वरून सोडणार नाही. आम्ही नाही जाणत की तिने हदीस वचनास सुरक्षित ठेवले कि तिच्याकडून भूलचूक झाली. घटस्फोटीत स्त्री (बाइना) करीता निवास ही आहे व भोजनादि खर्च ही. महीमाशाली व प्रतापशाली अल्लाहचे फर्मान आहे त्यांना आपल्या घरातून बाहेर घालवू नका आणि ना त्यांनी स्वत: आपल्या घरातून बाहेर व्हावे मात्र या खेरीज की त्या उघडपणे निर्लज्जतेचे काम करणाऱ्या असाव्यात’. (मुस्लिम किताबुत्तलाक)

अशा प्रकारे हजरत आयशा यांनी ही या कथनावर अंकूश ठेवला बुखारी या हदीस संकलनात हजरत आयशा फर्मावितात:-

اَمَّااَنَّهٗ لَيْسَ لَهَاخَيْرٌفِیْ ذِكْرِهٰذَاالْحَدِيْثِ۔

‘या हदीसचे निवेदन करण्यात तिच्या करीता कसलीही भलाई नाही’.

तसेच फर्माविले -

اِنَّ فَاطِمَةَ كَانَتْ فِیْ مَكَانٍ وَحُشٍ فَخِيْفَ عَلٰى
نَاحِيَّتِهَافَلِذٰالِكَ اَرْخَصَ لَهَاالنَّبِیُّ صلى الله عليه وآله وسلم۔

‘‘फातमा एका निर्जन - स्थानी होती, म्हणून भय जाणवले, याच कारणास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी तिला स्थलांतर करण्याची अनुमति दिली.’’

या हदीस वचनाचे स्पष्टीकरण करतांना हाफीज इब्ने हजर लिहीतात की निवासाची व्यवस्था मूळातच नष्ट झाली नव्हती किंबहुना उल्लेखित सबबीमुळे नष्ट झाली होती परंतु फातमा बिन्ते कैस तिसरा तलाक मिळालेल्या घटस्फोटीतेच्या निवास व भोजनादि खर्चास नकारार्थी ठरवित होती. म्हणून हजरत आयशा यांनी तिचे खंडन केले. (फतहुल बारी खंड - ९ पृ. २९६)

हजरत उमर यांच्या या कथनाने की ‘आम्ही आमच्या पैगंबराच्या आचरण शैलीस सोडणार नाही’ स्पष्ट होते की घटस्फोटीते करीता, मग तिला तिसरा तलाक दिला गेला का असेना, तिच्या निवास व भोजनादिची व्यवस्था करण्याची पद्धत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळापासूनच चालत येत होती, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ही पैगंबर आचरण शैली (सुन्नाह तकरीरी) आहे, आणि कुरआनाची ही आयत की त्यांना घराबाहेर घालवू नका च्या आशयात समाविष्ट आहे. यास्तव हजरत उमर यांनी फातिमा बिन्त कैसच्या हदीस वचनास कबूल केले नाही. चार खलीफांच्या या वर्तनाद्वारे हे मार्गदर्शन लाभते की हदीस वचनाच्या स्विकृति करीता केवळ कथन कर्त्याचे निवेदन पर्याप्त नाही, किंबहुना त्याचे कुरआन व पैगंबर आचरणाशी विसंगत नसणे ही आवश्यक आहे.

२३. प्रसूती नंतर इद्दत अवधि संपतो आणि स्त्रीच्या खर्चाची कसलीही जबाबदारी तिच्या भूतपूर्व पतीवर राहात नाही, परंतु जन्मलेल्या बाळाला दूध पाजण्याचे पारिश्रमिक त्याला द्यावे लागेल, पारिश्रमिक देण्याविषयीच्या व्यवहारा बाबत ते दोघे आपसात सल्लामसलत करून योग्य ते ठरवू शकतात. यासाठी की कोणाला तक्रार नसावी.

२४. परंतु जर तलाक मिळालेली स्त्री आपल्या बाळाला दूध येत नसल्यामुळे किंवा एवढा मोबदला मागत असेल जो देणे पतीला शक्य नसावे तर अशा प्रकारच्या परिस्थितीत अन्य एखाद्या स्त्रीकडून दूध पाजले जाऊ शकते.

आजच्या काळात पावडरच्या दुधाचा वापर लहान मुलांकरीता सर्वसामान्य झाला आहे. म्हणून अन्य एखाद्या स्त्रीचे दूध पाजण्याचा प्रसंगच येत नाही.

२५. याचा संबंध दूध पाजण्याच्या मोबदला देण्याशी ही आहे आणि इद्दत काळात स्त्रीचा पोषण खर्च देण्याशी ही. पतीची जी ऐपत असेल त्यानुसार त्याने खर्च करावा. ऐपत बाळगणाऱ्याने केवळ या कारणास्तव की आता पत्नीला तलाक दिला गेला आहे, म्हणून खर्च करण्यात कंजूसीचे धोरण अंगिकारू नये आणि ना ऐपत नसणाऱ्याने आपल्या ऐपती पेक्षा जास्त खर्च करावा. अल्लाह कोणावर ही त्याच्या ऐपती पेक्षा जास्त भार टाकत नाही.

२६. अर्थात नवल नव्हे की तकवा आणि न्यायाच्या वर्तनास पाहून अल्लाहने पुरूषाच्या संकुचित कमाईला व्यापकतेत परिवर्तित करावे. कोणत्याही स्थितीत अल्लाहशी मांगल्याचीच अपेक्षा बाळगावी आणि हे लक्षात घ्यावे की परिस्थिती सदैव सारखीच राहात नाही कोरडया व तप्त हवे नंतर अल्लाहच्या कृपा-वर्षावाचा शुभ समाचार देणारी हवा ही वाहू लागते.

८. अशा किती तरी वस्त्या आहेत ज्यांनी आपल्या पालन कर्त्याच्या आदेश आणि त्याच्या पैगंबरांशी बंड केले तेव्हा आम्ही त्यांचा सक्तीने हिशोब घेतला (पकड केली) आणि त्यांना वाईट रित्या अजाब (शिक्षा) दिला.[२७]

وَكَأَيِّنْ مِّنْ قَرْيَةٍ عَتَتْ عَنْ أَمْرِ رَبِّهَا وَرُسُلِهِ فَحَاسَبْنَاهَا حِسَابًا
شَدِيدًا وَعَذَّبْنَاهَا عَذَابًا نُّكْرًا ﴿٨﴾

९. त्यांनी आपल्या कृत कर्माची गोडी चाखली आणि त्यांची परिणति विनाश आहे.

فَذَاقَتْ وَبَالَ أَمْرِهَا وَكَانَ عَاقِبَةُ أَمْرِهَا خُسْرًا ﴿٩﴾

१०. अल्लाहने त्यांच्याकरीता सक्त शिक्षा तयार करून ठेवली आहे [२८] तेव्हा अल्लाहचे भय बाळगा हे बुद्धि बाळगणाऱ्यांनो ! ज्यांनी ईमान बाळगले आहे [२९] अल्लाहने तुमच्या कडे स्मरण (बोध) अवतरीत केला आहे.[३०]

أَعَدَّ اللَّهُ لَهُمْ عَذَابًا شَدِيدًا ۖ فَاتَّقُوا اللَّهَ يَا أُولِي الْأَلْبَابِ
الَّذِينَ آمَنُوا ۚ قَدْ أَنزَلَ اللَّهُ إِلَيْكُمْ ذِكْرًا ﴿١٠﴾

११. एक असा पैगंबर, जो अल्लाहच्या स्पष्ट आयती (वचने) तुम्हाला वाचून ऐकवितो, या साठी की, ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले, त्यांना अंधः कारातून बाहेर काढून प्रकाशात आणावे.[३१] आणि जो अल्लाहवर ईमान बाळगील आणि सत्कर्म करील,[३२] त्याला तो अशा जन्नतीं मध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. ते त्यात सदैव राहतील. अल्लाहने त्यांना उत्कृष्ट उपजिविका प्रदान केली आहे.[३३]

رَّسُولًا يَتْلُو عَلَيْكُمْ آيَاتِ اللَّهِ مُبَيِّنَاتٍ لِّيُخْرِجَ الَّذِينَ آمَنُوا
وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ مِنَ الظُّلُمَاتِ إِلَى النُّورِ ۚ وَمَن يُؤْمِن بِاللَّهِ وَيَعْمَلْ
صَالِحًا يُدْخِلْهُ جَنَّاتٍ تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ فِيهَا أَبَدًا ۖ
قَدْ أَحْسَنَ اللَّهُ لَهُ رِزْقًا ﴿١١﴾

१२. अल्लाहनेच सात आकाशांची रचना केली आणि जमीनीच्या प्रकारापैकी त्या सारख्याच.[३४] यांच्या दरम्यान त्याचे आदेश अवतरीत होत राहतात.[३५] (तुमच्या वर ही हकीगत स्पष्ट केली) यासाठी की तुम्ही जाणून घ्यावे की अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे, आणि हे की अल्लाहच्या ज्ञानाने प्रत्येक गोष्टीस वेढले आहे.[३६]

اللَّهُ الَّذِي خَلَقَ سَبْعَ سَمَاوَاتٍ وَمِنَ الْأَرْضِ مِثْلَهُنَّ يَتَنَزَّلُ
الْأَمْرُ بَيْنَهُنَّ لِتَعْلَمُوا أَنَّ اللَّهَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ وَأَنَّ اللَّهَ قَدْ
أَحَاطَ بِكُلِّ شَيْءٍ عِلْمًا ﴿١٢﴾

२७. ही मुसलमानांना सक्त ताकीद आहे की जर त्यांनी अल्लाहच्या आदेशांचा भंग केला तर लक्षात ठेवावे की पूर्वीच्या  विद्रोही जन समूहांची काय दुर्दशा झाली. बंडखोर जनसमूहांशी अभिप्रेत आद, समूद लूत, व फिरऔन जनसमूह होत. ही सक्त ताकीद मुसलमानांना तलाक विषयीचे आदेश दिल्यानंतर केली गेली आहे. जर मुसलमान आपल्या कौटुंबिक जीवनात अल्लाहच्या आदेशांची पर्वा करीत नाही तर ते सामूहीक जीवनात त्याच्या आदेशांची काय चाड बाळगतील? परिणामी व्यक्तिगत जीवनाचा कलह वाढत वाढत सामूहीक जीवनाला ही आपल्या विळख्यात घेतो आणि मग जेव्हा सामूहीक जीवन उपद्रव पूर्ण होते तेव्हा अशा समाजावर अल्लाहचा प्रकोप अवतरल्याविना राहात नाही.

तलाकशी संबंधित हे स्पष्ट आदेश व ताकीदी असतांना ही, ज्या या सूरह मध्ये निवेदिल्या गेल्या आहेत, आधिकांश मुसलमानांची दशा ही आहे की ते तलाक देण्या बाबत या आदेशांचा उघडपणे भंग करीत आहेत. पत्नीला एकाच वेळी तीन तलाक देऊन सोडणे, तिला त्रास देणे, घराबाहेर घालविणे, त्यांचा परिपाठ बनला आहे. आणि यांच्याशी दोन पावले पुढे असलेले ते मुक्त विचारांचे मुसलमान होत जे तलाकचा अधिकार मुसलमानां कडून हिरावून घेऊन कोर्टाला देऊ इच्छितात किंवा 'तफवीजे तलाक' च्या फिकही हुकमाचा आधार घेऊन निकाहच्या वेळीच स्त्रीला हा अधिकार देऊ इच्छितात की तिने वाटेल त्यावेळी आपल्यावर तलाक लागू करून घ्यावा. अशा प्रकारे ते समाजाच्या सुधारणे ऐवजी शरीअतची सुधारणा करू इच्छितात. हे इस्लामशी त्याचे उघड रित्या बंड होय आणि या विद्रोहाची या जगात ही वाईट परिणति आहे आणि आखिरत मध्ये ही. मुसलमानांनी वेळीच आपले डोके ठिकाणावर आणले तर किती चांगले होईल!

२८. म्हणजे या जगात त्यांची जी परिणति झाली असेल, आखिरत मध्ये अल्लाहने त्यांच्या साठी सक्त अजाब तयार करून ठेवला आहे.

२९. अर्थात ईमान बाळगून तुम्ही बुद्धिमत्तेचे प्रमाण दिले आहे आणि बुद्धिमत्तेची बाब ही की ईमान बाळगल्यानंतर अल्लाहचे भय बाळगून जीवन जगावे व असे कोणतेही कर्म करू नये जे तकवा म्हणजे अल्लाहच्या भया विरूद्ध असावे.

३०. अभिप्रेत कुरआन होय जो स्मरणिका (बोध) आणि उपदेश आहे.

३१. म्हणजे या स्मरणिके (कुरआना) सोबत एक असा पैगंबर पाठविला आहे जो कुरआनाच्या आयती वाचून ऐकवितो आणि त्या लोकांना, जे ईमान बाळगून सत्कर्माचे वर्तन अंगिकारतात, अज्ञान व दुराचाराच्या अंध:कारातून बाहेर काढून ज्ञान व सत्कर्मांच्या उज्वल प्रकाशात आणतो अशा प्रकारे तो त्याचे पूर्णत:मार्गदर्शन करतो.

३२. या सूरहच्या मजकूरावरून अगदी स्पष्ट होते की सत्कर्म करण्याच्या बाबतीत अल्लाहचे भय अंगिकारणे, त्याच्या आदेशानुसार आचरण करणे, आणि गृहस्थ-जीवनात त्याच्या मार्गदर्शनाचे पालन करणे या गोष्टी सामील आहेत. अशाच लोकांना या आयतीत जन्नतची शुभवार्ता दिली गेली आहे.

३३. संकेत या गोष्टीकडे आहे की ईमान व  सदाचाराचे जीवन जगणाऱ्यांना जर जगात अपर्याप्त उपजिविका लाभत असेल तर काळजी करण्या सारखी बाब नाही. अल्लाहने त्यांच्या करीता जन्नत मध्ये उत्कृष्ट उपजिविका उपलब्ध करून ठेवली आहे.

३४. ही सूरहच्या समारोपाची आयत होय आणि यात सृष्टीच्या एका महत्वपूर्ण रहस्याचा उलगडा केला गेला आहे आणि ते हे की ही सृष्टी हे आकाश व या जमीनी पुरती मर्यादित नाही, किंबहुना हे प्रथम आकाश होय ज्याला आम्ही पाहतो. अशा प्रकारे सात आकाशांची अल्लाहने रचना केली आहे आणि ज्या प्रकारे आम्हाला दिसणाऱ्या आकाशा खाली जमीन आहे, तद्‌वतच इतर आकाशांच्या खाली ही जमीनी आहेत, मात्र या जमीनी आमच्या जमीनीपेक्षा भिन्न स्वरूपाच्या आहेत. यास्तव फर्माविले, जमीनीच्या प्रकारच्या आता आमच्या अवलोकनात नसलेल्या त्या जमीनीचे स्वरूप केवळ अल्लाहला माहीत आहे. ते माहीत करून घेण्याचे कोणते ही माध्यम आमच्या जवळ नाही आणि विज्ञानाची झेप या क्षितिजा पलीकडे गेली नाही ज्याला आम्ही बघतो, अर्थात ही जमीन व वर दिसणारे प्रथम आकाश. कोंबडीचे पिलू जोपर्यंत अंडयात असते, त्याला अंडयाच्या आवरणातला भाग हेच विश्व वाटते. परंतु जेव्हा आवरणा बाहेर ते पडते तेव्हा एका विशाल सृष्टीत ते डोळे उघडते. अशाच प्रकारे आम्ही या जमीन व आकाशाच्या वेष्टनात बंदिस्त आहोत. परंतु अल्लाहची सृष्टी एवढया पुरतीच मर्यादित नाही. अल्लाहच्या वहयद्वारे या रहस्याचा उलगडा आम्हाला झाला आहे की सृष्टी आमच्या कल्पने पेक्षा अतिविशाल आहे. एका पाटोपाठ एक अशी सात विश्वे आहेत. आता या विश्वांमध्ये काय काय आहे, हे आम्हाला ज्ञात नाही आणि ना तो जणून घेण्याचे एखादे साधन आमच्या जवळ आहे आणि कुरआनाचे उद्दिष्ट केवळ ज्ञानात वाढ करणे नव्हे तर सृष्टीची विशाल कल्पना प्रस्तुत करून अल्लाहच्या व्यापक सामर्थ्याची जाणीव निर्माण करणे होय.

३५. म्हणजे या सात आकाश व सात जमीनीवर अल्लाहचा सत्ताधिकार कायम आहे आणि त्याचे आदेश या सर्वांवर अवतरीत होत राहतात आणि हे अल्लाहलाच ठाऊक आहे की या विश्वांमध्ये कस कशा प्रकारची सजीव-निर्जीव निर्मिती आहे आणि त्यांच्यावर कशा प्रकारचे आदेश अवतरीत केले जातात.

३६. म्हणजे सृष्टीच्या एका महत्वपूर्ण रहस्याचा उलगडा तुमच्यावर अशासाठी केला गेला आहे की तुम्ही अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या ज्ञाना विषयी योग्य कल्पना करू शकावे. ज्या अल्लाहचे सामर्थ्य एवढे व्यापक आहे आणि ज्याचे ज्ञान अथांग सागरा समान आहे तेव्हा त्याचा धर्म (इस्लाम) व त्याची शरीअत (आचार संहिता) माणसा करीता अनुसरणीय होऊ शकते आणि त्याच्या प्रसन्नतेचा मार्ग अंगिकारूनच मनुष्य खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकतो.

# ६६. सूरह अत्तहरीम

**नाव:** पहिल्या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एका हलाल (वैध) गोष्टीस स्वत:वर हराम (अवैध) करून घेण्याबद्दल विचारणा केली गेली आहे. या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अत्तहरीम' असे आहे.

**अवतरण काळ:** मदनी आहे, आणि आयत क्र.९ मध्ये दांभिकांशी जेहाद करण्याचा जो आदेश दिला गेला आहे,तो या गोष्टीची साक्ष होय की ही सूरह हि.स.९ मध्ये अवतरली कारण दांभिकांशी जेहाद करण्याचा आदेश तबूक युद्धानंतर दिला गेला होता, जसे सूरह तौबा आयत क्र. ७३ वरून स्पष्ट होते.

**मध्यवर्ति कल्पना:** आपल्या पत्नी विषयीच्या प्रेमाला एवढे प्रभावी होऊ देऊ नये की त्यांच्या खातीर एखाद्या हलाल गोष्टीस आपल्यावर हराम करून घ्यावे. तसेच त्यांच्या सुधारणे बाबत गाफील राहू नये आणि त्यांच्या संबंधीच्या जबाबदाऱ्यांची जाणीव बाळगावी. यासाठी की त्यांना आखिरतच्या दुष्परिणति पासून वाचविणे शक्य व्हावे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ५ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या एका भूल चूकी बद्दल जी त्यांच्याकडून आपल्या पत्नींच्या प्रेमा पायी घडली होती, विचारणा करीत पैगंबरांच्या पत्नींची, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी काही कौटुंबिक व्यवहारात नाराजी बद्दल अंकूश ठेवला गेला आहे आणि त्यांना आत्मपरिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगितले गेले आहे.

आयत क्र. ६ ते ८ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना आपल्या पत्नींच्या सुधारणे बाबत दुर्लक्ष न करण्याची आणि आपल्या या महत्वपूर्ण जबाबदारीस पार पाडण्याची ताकीद केली गेली आहे; की त्यांना आखिरतच्या अजाब पासून वाचविण्याचा पूर्ण प्रयत्न केला जावा.

आयत क्र. ९ मध्ये काफिर व दांभिक लोकांशी जेहाद करण्याचा आदेश दिला गेला आहे. हा आदेश या ठिकाणी या अनुषंगाने आहे की ते नेहमी काही ना काही उपद्रव निर्माण करीत असत. येथपावेतो की ते पैगंबरांच्या पत्नी विरूद्ध ही उपद्रव कारिळा करीत असत. तसेच या गोष्टीस टपून बसले होते की ईमान बाळगणाऱ्यांच्या पत्नींनी ही त्यांच्या मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टींनी प्रभावित व्हावे.

आयत क्र.१० मध्ये त्या स्त्रीयांच्या घटनां पासून बोध घडविला गेला आहे, ज्यांनी आपल्या पैगंबरांच्या निकाह मध्ये असतांना त्यांच्याशी निष्ठा राखली नाही.

आयत क्र.११ व १२ मध्ये दोन सत्शील स्त्रीयांचे उदाहरण प्रस्तुत केले गेले आहे. ज्यांच्या चारित्र्याच्या उंची पुढे आकाश ही ठेंगणे होईल.

# ६६. सूरतुत्तहरीम

سُورَةُ التَّحْرِيمِ

आयती-१२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. हे पैगंबर ! तुम्ही आपल्या पत्नींच्या प्रसन्नते खातीर त्या गोष्टीला का हराम ठरविता, जी अल्लाहने तुमच्या करीता हलाल केली आहे. अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.[१]

يَا أَيُّهَا النَّبِيُّ لِمَ تُحَرِّمُ مَا أَحَلَّ اللَّهُ لَكَ ۖ تَبْتَغِي مَرْضَاتَ
أَزْوَاجِكَ ۚ وَاللَّهُ غَفُورٌ رَّحِيمٌ ①

२. अल्लाहने (अशा) शपथांना तोडणे तुमच्यावर अनिवार्य केले आहे.[२] अल्लाह तुमचा मित्र आहे आणि तो ज्ञानी, बुद्धिकौशल्य युक्त आहे.

قَدْ فَرَضَ اللَّهُ لَكُمْ تَحِلَّةَ أَيْمَانِكُمْ ۚ وَاللَّهُ مَوْلَاكُمْ ۖ
وَهُوَ الْعَلِيمُ الْحَكِيمُ ②

३. आणि जेव्हा पैगंबराने आपल्या पत्नीला गोपनीयतेत एक गोष्ट सांगितली, मग जेव्हा त्या पत्नीने ती गोष्ट जाहीर केली आणि अल्लाहने पैगंबराना याची माहीती दिली, तेव्हा पैगंबरानी (त्या पत्नीला) काही मर्यादिप्रत खबरदार केले आणि काही मर्यादिप्रत माफ केले. जेव्हा पैगंबरानी पत्नीला ही गोष्ट सांगितली तेव्हा तिने विचारले, तुम्हाला याची खबर कोणी दिली? पैगंबरानी सांगितले, मला त्याने खबर दिली जो सर्व काही जाणणारा आणि खबर राखणारा आहे.[३]

وَإِذْ أَسَرَّ النَّبِيُّ إِلَىٰ بَعْضِ أَزْوَاجِهِ حَدِيثًا فَلَمَّا نَبَّأَتْ
بِهِ وَأَظْهَرَهُ اللَّهُ عَلَيْهِ عَرَّفَ بَعْضَهُ وَأَعْرَضَ عَن بَعْضٍ ۖ
فَلَمَّا نَبَّأَهَا بِهِ قَالَتْ مَنْ أَنبَأَكَ هَٰذَا ۖ قَالَ نَبَّأَنِيَ
الْعَلِيمُ الْخَبِيرُ ③

४. जर तुम्ही दोघे अल्लाहच्या समोर तौबा (क्षमा-याचना) कराल, तर (तुमच्या करीता अधिक चांगले आहे) तुमची मने त्याच्याकडे प्रवृत्त झाली आहेत आणि जर तुम्ही दोघे मिळून त्याला नाराज कराल तर (लक्षात ठेवा) अल्लाह त्याचा मित्र आहे आणि त्याच्यानंतर जिब्रील आणि सदाचारी मोमीन (ईमान धारक) व फरिश्ते त्याचे सहाय्यक आहेत.[४]

إِن تَتُوبَا إِلَى اللَّهِ فَقَدْ صَغَتْ قُلُوبُكُمَا ۖ وَإِن تَظَاهَرَا
عَلَيْهِ فَإِنَّ اللَّهَ هُوَ مَوْلَاهُ وَجِبْرِيلُ وَصَالِحُ الْمُؤْمِنِينَ ۖ
وَالْمَلَائِكَةُ بَعْدَ ذَٰلِكَ ظَهِيرٌ ④

१. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नीपैकी एकीने कोणत्या तरी गोष्टी विषयी आपली नावड जाहीर केली होती. यास्तव पैगंबरांनी त्यांच्या प्रेमाखातीर त्या गोष्टीला शपथ घेऊन स्वत:वर हराम करून घेतले होते. ही गोष्ट त्यांच्या व्यक्तिगत जीवनाप्रत मर्यादित होती व ती गोपनीय ठेवण्याची ताकीद ही त्यांनी आपल्या या पत्नीला केली होती, तरी ही पैगंबरांच्या अगदी लहान सहान भूल-चूकीबद्दल अल्लाह त्यांना वेळीच सावध करतो; यासाठी की वेळीच त्यांच्यात सुधारणा व्हावी, व त्यांच्या चारित्र्याला गालबोट लागू नये आणि लोकांना योग्य मार्गदर्शनाची उपाय योजना ही व्हावी.

ही केवळ एक भूल-चूक होती आणि स्वत:वर हराम निषिद्ध करून घेणे या अर्थाने नव्हते की अल्लाहने त्या गोष्टीला हराम ठरविले असावे; किंबहुना या अर्थाने होते की मी ही गोष्ट स्वत:करीता वर्ज्य केली आहे. अल्लाहने एकीकडे या भूल चूकी बद्दल सावध केले आहे, तर त्याच सोबत या भूल चूकीच्या माफीची घोषणा ही केली आहे. जसे आयतीच्या अंतिम वाक्यांशा वरून स्पष्ट आहे. तेव्हा ज्या गोष्टीस अल्लाहने माफ केले आहे तिच्या कडे अंगुली निर्देश करण्याचा कोणालाही हक्क नाही.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कोणती गोष्ट स्वत:वर हराम करून घेतली होती याचे स्पष्टीकरण कुरआनाने दिलेले नाही आणि ना स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या बाबत आपल्या वचनांद्वारे स्पष्टीकरण दिले आहे, तेव्हा आम्ही याबाबत जास्त खोलवर का म्हणून जावे? कुरआनाच्या निवेदनावर,जे मूळ उद्दिष्ट पूर्ण करते, आम्ही समाधान बाळगले पाहीजे. परंतु कथन कर्त्यांनी अनुयानांचा आधार घेऊन काही प्रसंग निवेदिले आहेत आणि भाष्यकारांनी त्यांचा उल्लेख केला आहे. यापैकी दोन घटना प्रसिद्ध आहेत एक घटना हजरत मारिया किब्तिया विषयी आहे, ज्यांच्या पासून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पुत्र इब्राहीम झाले होते आणि लहानपणीच ते मरण पावले. मारिया कब्तियाशी संबंधित एका अशा गोष्टीचा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी संबंध जोडला गेला, जी त्याच्या चारित्र्याहून अगदी विभिन्न आहे आणि इतकी निरर्थक आहे की तिचा उल्लेख करणे ही आम्ही पैगंबराच्या प्रतिष्ठेला गालबोट लावणे समजतो. इमाम नववी यांनी ही स्पष्ट सांगितले आहे की मारिया बाबत कोणतेही योग्य व खरे कथन उपलब्ध नाही आणि या संदर्भात अल्लामा शिबली नोमानी लिहितात:-

''ही चर्चा रिवायतच्या (कथन-तत्वाच्या) आधारावर होती 'दिरायत' (बुद्धी) चा विचार केल्यास किंचित मात्र प्रयत्नाची गरज नाही जी तुच्छ घटना या कथनांमध्ये सांगितली गेली आहे आणि प्रामुख्यांने तबरी वगैरे मध्ये जे अंश उल्लेखित आहेत त्यांच्या संबंध एखाद्या सामान्य माणसाशी ही जोडला जाऊ शकत नाही, मग त्या पवित्र व्यक्तिमत्वाशी जे पावित्र्य आणि शीला सच्चे रूप होते. कसे जोडले जाऊ शकते? (सीरतुलन्नबी-उर्दू खंड-१पृष्ठ - १५०)

दुसरी घटना मधाला आपल्या करीता हराम करून घेण्याची आहे. ज्याचा खुलासा असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपली पत्नी जैनब बिन्ते जहश यांच्या जवळ काही काळ राहात आणि त्यांच्या जवळ मध पीत असत. हजरत आयशा यांचे निवेदन आहे की मी आणि हफसा दोघींनी मिळून संगनमत केले की तेथून ते ज्या पत्नी जवळ येतील तिने म्हणावे की आपल्या तोंडातून मगाफिरचा वास येत आहे (मगाफिर एक जंगली फूल असते, ज्यांचा वास चांगला नसतो). यास्तव पैगंबर आपल्या दुसऱ्या पत्नी जवळ गेले तेव्हा त्यांनी हेच सांगितले. त्यावर पैगंबरांनी यापुढे मध खाण्यास नकार दर्शविला. हे कथन बुखारी व मुस्लिम या हदीस संकलनात असले तरी काही ना काही कारणास्तव विश्वसनीय नाही.

एक हे की मधा संबंधींच्या कथनांमध्ये मोठी तफावत आहे एका कथनात सांगितले गेले आहे की त्यांनी मध हजरत जैनब बिन्त जहश यांच्या जवळ घेतले होते तर दुसऱ्या कथनात हे सांगितले गेले आहे की मध हजरत हफ्सा यांच्या कडे घेतले होते. सहीह बुखारीच्या कथनांमध्ये ही हा मतभेद आहे (पहा बुखारी - किताबुत्तलाक) आणि सहीह मुस्लिमच्या कथनांमध्ये ही (पहा मुस्लिम-किताबुत्तलाक) जेव्हा कथनकर्त्याला या गोष्टी विषयी खात्री नाही, तेव्हा त्याच्या कथनावर कशा प्रकारे भरवसा केला जाऊ शकतो.

दुसरे असे की काही कथनांमध्ये असे सांगितले गेले आहे की हजरत आयशा यांनी फक्त हजरत हफ्सा यांना सांगितले होते की त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांगावे की मगाफिरचा वास येतो. परंतु इतर कथनांमध्ये असे सांगितले गेले आहे की ही हजरत आयशा यांनी ही गोष्ट पैगंबरांच्या इतर पत्नींना ही सांगितली होती आणि त्यांनी तसेच केले.

तिसरे हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची अभिरूची उच्च दर्जाची व उत्कृष्ट होती. त्यांनी असे मध का म्हणून खाल्ले असते, ज्यास न आवडणारा वास यावा? तसेच हा वास ही एवढा दीर्घकाळ टिकणारा नव्हता की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) पाळी पाळीने सर्व

पत्नीजवळ गेले आणि शेवट पावेतो वास कायम राहीला? ही काल्पनिक कथा नव्हे तर काय वस्तुस्थिती आहे?

चौथे असे की मध एक हलाल वस्तूच नव्हे तर या सोबतच त्याचा गुणधर्म कुरआनात हा सांगितला गेला आहे की ते लोकांकरीता रोग मुक्ति दायक आहे (सूरह नहल-आयत क्र. ६९) आणि स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) लोकांना ते पिण्यास प्रोत्साहीत करीत असत. असे असतांना ती वस्तू ते स्वत: करीताच हराम का ठरवतील?

पाचवे असे की बुखारीच्याच एका हदीस वचनात जे हजरत इब्ने अब्बास द्वारे उल्लेखित आहे आणि ज्यात नाराजी व्यक्त करण्यासाठी एकी करणाऱ्यांची नावे आयशा व हफ्सा अशी सांगितली आहेत परंतु यात मधाच्या घटनेचा कसला ही उल्लेख नाही, किंबहुना पैगंबरांच्या समस्त पत्नीकडून खर्चात वाढ करण्याच्या मागणी बद्दल पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मनस्ताप, आणि मग एक महिन्यापावेतो आपल्या पत्नी पासून विभक्ततेची घटना सांगितली गेली आहे आणि याच सोबत पैगंबरांच्या पत्नींना आपल्या प्रेमात राहू देण्याचा वा न राहू देण्याचा अधिकार देण्याच्या घटनेला ही जोडले गेले आहे. वास्तविक ही घटना हि. स. ५ ची आहे, ज्या विषयी सूरह अहजाबची आयत -२८ अवतरली आणि सूरह अहजाबचे अवतरण हि. स. ५ मध्ये झाले होते, या उलट सूरह तहरीम हि. स. ९ मध्ये अवतरली

यावरून असे दिसून येते की सूरह तहरीमच्या आयतींच्या भाष्यांतर्गत कथनांमध्ये फार मोठी गुंतागुंत आहे. यास्तव या कथनांना केवळ त्यांच्या सनदींच्या आधारावर मान्य केले जाऊ शकत नाही आणि कुरआनाच्या निवेदनावर समाधान करणेच सलामतीचे आहे, विशेषत: यासाठी ही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पावित्र्यपूर्ण व्यक्तिमत्वाला किंचित मात्र गालबोट लागू नये आणि ना पैगंबरांच्या पत्नीविषयी हे म्हटले जाऊ शकते की त्यांनी पैगंबरांविरूद्ध एखादे कारस्थान रचले होते. जी काही घटना उद्भवली आणि अल्लाह अधिक चांगले जाणतो की ती काय घटना होती. भूल-चूकी कोणत्या स्वरूपाची होती. परंतु या भूल-चूकी बद्दल पैगंबरांच्या पत्नींना पुढे जी सक्त ताकीद केली गेली आहे ती या साठी केली गेली की त्यांचा संबंध एका पैगंबरांशी, आणि त्यांचे स्थान समस्त मुस्लिमांच्या माता या दर्जाचे होय.

२. म्हणजे अशा शपथांना, ज्या अल्लाहने हलाल ठरविलेल्या वस्तूला स्वत: करीता हराम ठरविण्याच्या हेतुने घेतल्या गेल्या असाव्यात, त्यांना तोडणे शरीअत दृष्टया अगदी योग्य आहे म्हणून त्या तोडल्याच पाहिजेत. राहीला शपथ तोडण्याचा कफ्फरा (प्रायश्चित) तर याचा आदेश सूरह मायदा आयत क्र. ८९ मध्ये सांगितला गेला आहे.

स्पष्ट असावे की सूरह मायदा प्रथम अवतरली होती आणि सूरह तहरीम नंतर अवतरली.

३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या एका पत्नीला गोपनीयतेत एक गोष्ट सांगितली होती, परंतु तीने ही गोष्ट त्यांच्या एका दुसऱ्या पत्नीला सांगितली. अल्लाहने त्यांना याबाबत सूचित केले. पैगंबरांनी गोष्ट जाहीर करणाऱ्या पत्नीला या बाबत सचेत केले की तुम्ही ही गोपनीय गोष्ट जाहीर केली, परंतु त्यांनी आपल्या चांगल्या वागणूकी मुळे या गोष्टीचा साधारपणे उल्लेख केला व या बाबत सक्त कानउघडणी केली नाही, किंबहुना माफ केले. त्या पत्नी ने आश्चर्याने विचारले की तुम्हाला ही खबर कोणी दिली? पैगंबरांनी फर्माविले, मला सर्व काही जाणणाऱ्या अल्लाहने याची खबर दिली.

ही गोपनीय बाब कोणती होती या विषयी ना कुरआनने स्पष्टीकरण दिले आणि ना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या वचनांमध्ये याचा उलगडा केला आहे. अर्थात स्पष्टीकरणाचा प्रश्न ही उद्भवत नाही, कारण त्यांच्या एका पत्नीने दुसऱ्या पत्नीला गुपीत सांगितल्या बद्दल ताकीद अवतरली आहे, तेव्हा आम्ही त्या गुपीताचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे, त्याबाबत अंदाज लावणे कितपत योग्य ठरू शकते? परंतु कथनांमध्ये अनुमानाच्या गोष्टी आहेत आणि भाष्यांमध्ये ही त्यांचा उल्लेख आहे आम्ही त्या कथनांना विरोध करणे अनावश्यक समजतो. यांचे कसलेही महत्व वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे मान्य केले जाऊ शकत नाही. मात्र संभाषण क्रमा वरून ही गोष्ट आहे की या अनेक घटना नव्हत्या, किंबहुना एकच घटना होती; आणि ती म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे एका वस्तूस स्वत: करीता हराम ठरविणे आणि ती गोष्ट होती जी पैगंबरांनी गोपनीयरित्या आपल्या एका पत्नीला सांगितली होती. परंतु जसे आम्ही वर स्पष्टीकरण दिले आहे की ती नेमकी कोणती वस्तू होती ते अल्लाह ला च माहीत.

आयतीवरून ओघाओघाने हे ही कळते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर कुरआना खेरीज ही 'वहय' येत असे कारण गुपीत जाहीर करण्याची जी खबर अल्लाहने त्यांना दिली होती. त्याचा उल्लेख कुरआनात सूरह तहरीमच्या आधी कोठे ही नाही आणि ही गोष्ट अत्याधिक प्रमाणांनी सिद्ध आहे की पैगंबरावर कुरआना खेरीज ही 'वहय' येत असे.

४. 'तुम्ही दोघे' शी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि

वसल्लम) यांच्या दोन पत्न्या होत, ज्यापैकी एकीने दुसरीला गुपीत कळविले होते. अर्थात या दोन पत्न्या कोणत्या याचा उलगडा कुरआनाने केलेला नाही, कारण हे जाणून घेणे आमच्या करीता आवश्यक नाही. कथनांमध्ये एका कथन कर्त्याने दोन नावे सांगितली आहेत. दुसऱ्या कथन कर्त्याने याहून वेगळी दुसरी दोन नावे प्रस्तुत केली आहेत. यास्तव बुखारीच्या कथनात हजरत आयशा आणि हजरत हफ्सा यांची नावे घेतली गेली आहेत. (बुखारी- किताबुत्तलाक) तर मुस्लिमच्या कथनात हजरत आयशा, हजरत सौदा आणि हजरत सफीया यांची नावे सांगितली गेली आहेत.(किताबुत्तलाक) कथनांमधील ही तफावत लक्षात घेता पैगंबरांच्या आदर्श व सत्शील पत्नींपैकी एखादीचे नाव घेऊन त्यांच्यावर आरोप ठेवणे कदापि योग्य नाही.

काही असो. ज्या सन्मान्य पत्नीने गुपीत उघडे केले होते तिच्याकडून भूल चूक झाली होताच, परंतु त्यांनी ज्या दुसऱ्या पत्नीला हे गुपीत सांगितले तिने ही भूल चूक केली त्यांची भूल चूक संभवत: ही होती की त्यांना हे गुपीत ऐकून जाणवले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ही गोष्ट आपल्या पासून लपविली व या कारणास्तव पैगंबरांवर नाराज झाली. म्हणून दोघींना ही तौबा करण्याची ताकीद दिली गेली, ज्यात हा संकेत ही होता की त्यांचे उघड वर्तन असे असले तरी त्यांना आपल्या चूकी बद्दल पश्चाताप वाटतो आणि त्यांची मने तौबा कडे वळली आहेत. त्या सोबतच त्यांना सावध केले गेले आहे की तुम्ही दोघांनी मिळून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी नाराजी कायम राखली होती तेव्हा लक्षात ठेवा नाराजीचा हा व्यवहार एखाद्या माणसाशी नव्हे तर अशा व्यक्तिमत्वाशी आहे जो प्रेषित पदाने सम्मानित आहे आणि ज्याचा मित्र व सखा अल्लाह आहे व ज्याचे सहाय्यक जिब्रील, सदाचारी मोमीन व फरिश्ते आहेत. अशा अत्युच्च व्यक्तिमत्वाशी नाराज होऊन तुम्ही काय साध्य करणार आहेत आणि या नाराजी मुळे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची बैठक मुळीच ओस पडणार नाही.

सदाचारी ईमान धारकांचे सहाय्यक असणे चांगल्या अर्थाने आहे. तद्‌वतच फरिशत्यांचे सहाय्यभूत असणे ही भल्या अर्थाने आहे.

५. जर पैगंबर तुम्हा सर्व पत्नींना तलाक देईल तर नवल नव्हे की त्याचा पालन कर्ता तुमच्या ऐवजी तुमच्याहून अधिक चांगल्या पत्न्या त्याला प्रदान करील.[५] मुस्लिमा (इस्लाम धर्माच्या) मोमीन (ईमान बाळगणाऱ्या),आज्ञा धारक, तौबा करणाऱ्या (अल्लाहची) उपासना करणाऱ्या, उपासनेच्या हेतुने प्रवास करणाऱ्या [६] पती पाहिलेल्या आणि कुमारीका.

عَسٰى رَبُّهٗۤ اِنْ طَلَّقَكُنَّ اَنْ يُّبْدِلَهٗۤ اَزْوَاجًا خَيْرًا مِّنْكُنَّ
مُسْلِمٰتٍ مُّؤْمِنٰتٍ قٰنِتٰتٍ تٰٓئِبٰتٍ عٰبِدٰتٍ سٰٓئِحٰتٍ
ثَيِّبٰتٍ وَّاَبْكَارًا ﴿٥﴾

६. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! स्वतःला व आपल्या आप्त स्वकीयांना त्या आगी पासून वाचवा [८] ज्याचे इंधन मनुष्य आणि दगड असतील [९] जिच्यावर कठोर स्वभावाचे व सक्ति करणारे फरिश्ते नियुक्त असतील, जे अल्लाहच्या आदेशाचा भंग करीत नाही आणि जो काही आदेश त्यांना दिला जातो, त्याचे ते पालन करतात.[१०]

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا قُوْۤا اَنْفُسَكُمْ وَاَهْلِيْكُمْ نَارًا وَّقُوْدُهَا
النَّاسُ وَالْحِجَارَةُ عَلَيْهَا مَلٰٓئِكَةٌ غِلَاظٌ شِدَادٌ لَّا يَعْصُوْنَ
اللّٰهَ مَاۤ اَمَرَهُمْ وَيَفْعَلُوْنَ مَا يُؤْمَرُوْنَ ﴿٦﴾

७. हे इन्कार करणाऱ्यांनो ! आज (खोटया) सबबी पुढे करू नका. तुम्हाला असाच मोबदला दिला जात आहे जसे तुम्ही आचरण करीत राहीलात.[११]

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ كَفَرُوْا لَا تَعْتَذِرُوا الْيَوْمَ ؕ اِنَّمَا تُجْزَوْنَ
مَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٧﴾

८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाह समोर तौबा करा, निव्वळ तौबा.[१२] नवल नव्हे की तुमच्या पालनकर्त्याने तुमचे दोष तुमच्या पासून दूर करावेत आणि तुम्हाला अशा जन्नती मध्ये दाखल करावे ज्यांच्या खाली प्रवाह जारी असतील. [१३] ज्या दिवशी अल्लाह पैगंबराला व त्या लोकांना, ज्यांनी त्याच्या सोबत ईमान बाळगले आहे, अपमानित करणार नाही. त्यांचा प्रकाश त्यांच्यापुढे आणि त्यांच्या उजव्या बाजूला धावत असेल. ते दुआ (प्रार्थना) करीत असतील की, हे आमच्या पालन कर्त्या ! आमचे तेज आमच्या करीता परिपूर्ण कर.[१४] आणि आम्हाला माफ कर. तू प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا تُوْبُوْۤا اِلَى اللّٰهِ تَوْبَةً نَّصُوْحًا ؕ عَسٰى
رَبُّكُمْ اَنْ يُّكَفِّرَ عَنْكُمْ سَيِّاٰتِكُمْ وَيُدْخِلَكُمْ جَنّٰتٍ تَجْرِيْ
مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ ۙ يَوْمَ لَا يُخْزِى اللّٰهُ النَّبِيَّ وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا مَعَهٗ ۚ
نُوْرُهُمْ يَسْعٰى بَيْنَ اَيْدِيْهِمْ وَبِاَيْمَانِهِمْ يَقُوْلُوْنَ رَبَّنَاۤ اَتْمِمْ لَنَا
نُوْرَنَا وَاغْفِرْ لَنَا ۚ اِنَّكَ عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿٨﴾

५. ही गोष्ट ही ताकीद म्हणून होती जी सर्वसाधारणपणे पैगंबरांच्या सर्व पत्नींना दिली गेली, यासाठी की सर्वांनी यापुढे सावधगिरी बाळगावी. फर्माविले, जर तुम्हा सर्वांना तलाक दिला तर अल्लाह आपल्या पैगंबरास तुमच्याहून श्रेष्ठ अशा पत्न्या प्रदान करील आणि त्या गुणवैशिष्टयांनी युक्त असतील. हे या गोष्टीचे प्रोत्साहन होते की पैगंबरांच्या सन्मान्य पत्नींनी आपल्या अंगी ही गुणवैशिष्टये अत्याधिक स्वरूपात निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

६. मूळ शब्द सियाहत म्हणजे असा प्रवास जो उपासनेच्या हेतुने केला जातो (पहा - लिसानुल अरब खंड - २ पृ. ४९४) उदाहरणार्थ हिजरत, हज्ज, जेहाद इत्यादी करीता केलेला प्रवास.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तौबा टीप क्र. २०५

७. अर्थात त्या स्त्रीया ज्यांना तलाक दिला गेला असेल किंवा ज्यांच्या पतींचे निधन झाले असावे, ज्या असामान्य गुणांनी युक्त असाव्यात आणि या कारणास्तव त्या कदर करण्याजोग्या ठराव्यात.

८. म्हणजे जहन्नमच्या आगी पासून स्वत:लाही वाचविण्याचा उपाय करा आणि आपल्या कुटुंबियांनाही वाचविण्याचा प्रयत्न करा. एका मुसलमानाची आपल्या कुटुंबा संबंधाने जबाबदारी फार मोठी आहे. त्याने आपल्या बायका-मुलांना या गोष्टी बाबत खबरदार करावे ज्या जहन्नम मध्ये नेणाऱ्या आहेत. त्यांना धर्माचे योग्य ज्ञान पोहचवावे. अल्लाहच्या आदेशांशी त्यांना अवगत करावे. अनिवार्य कर्तव्य, विशेषत: नमाजच्या पालनाची त्यांना ताकीद करावी. वाईट गोष्टी व दुष्कर्मां पासून अलिप्त राहण्याची ताकीद करावी आणि घराचे वातावरण असे बनवावे की मुलाबाळांनी योग्य प्रकारे इस्लामी जीवन जगावे आजच्या काळात टी.व्ही. व विडीओने घरगुती वातावरण अगदी खराब करून टाकले आहे. या गोष्टींवर निमंत्रण राखण्याची फार आवश्यकता आहे, या साठी की एखाद्या वाईट गोष्टीने घरात शिरकाव करू नये.

मुलांचे असे शिक्षण की ज्यामुळे त्यांच्या अंगी धार्मिक सुज्ञता निर्माण व्हावी आणि त्यांचे असे संगोपन व प्रशिक्षण की त्यांच्या मनात ईमानाचा प्रकाश निर्माण व्हावा; सदाचारण अंगिकारावे आणि सभ्य व सुसंस्कृत बनून रहावे. प्रत्येक मुसलमानाची आपल्या घरा संबंधाने जबाबदारी आहे. परंतु मुसलमानांची दशा अशी की त्यांना आपल्या मुलांचे ऐहिक भविष्य उज्वल करण्याची जेवढी काळजी आहे तेवढी त्यांना जहन्नमच्या आगी पासून वाचविण्याची नाही. त्यांना कियामतीच्या दिवशी जाणीव होईल की त्यांनी मुलांबाबत केवढी गफलत केली व केवढया बेजबाबदारीने वागले.

९. जहन्नमचे इंधन एक तर तो मनुष्य असेल जो कुफ्रच्या स्थितीत मरेल. दुसरे ते दगड असतील ज्यांची पूजा अर्चा केली जाते. अर्थात अनेकेश्वरवादी आपल्या मूर्तीसह जहन्नममध्ये जळत राहतील. यासाठी की त्यांना ही जाणीव व्हावी की अल्लाहला सोडून ज्यांची ते भक्ति करीत राहीले तेच त्यांना जहन्नम मध्ये घेऊन आले व त्यांच्या करीता जहन्नमची आग भडकावित आहेत.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र. १४४

१०. फरिश्त्यांचे वैशिष्टय हे की ते अल्लाहचे एवढे आज्ञा धारक असतात त्यांच्या कोणत्याही आदेशाचा भंग करीत नाही. जहन्नम वर जे फरिश्ते नेमलेले असतील ते अगदी कठोर स्वभावाचे व सक्ती करणारे असतील. म्हणून ते जहन्नमवाल्यां करीता काहीच नरमीचे धोरण बाळगणार नाही आणि त्यांना अजाब देण्याचा जसा आदेश मिळेल ते तो अमलात आणतील.

११. म्हणजे जहन्नम मध्ये जाणारे काफिर आपल्या कुफ्र व शिर्क विषयी सबबी मांडू लागतील, परंतु त्यांना सांगितले जाईल की आता सबब मांडून उपयोग नाही. तुमच्यावर अत्याचार केला जात नाही, तर तुम्ही आपल्या कृत कर्माची शिक्षा भोगत आहात.

१२. 'निव्वळ तौबा' चा अर्थ जी मन:पूर्वक अपराधा बद्दल पश्चाताप दग्ध होऊन पुढे कधीही न करण्याच्या संकल्पाने केली गेली असावी. हा आदेश समस्त ईमान बाळगणाऱ्यांना दिला गेला आहे. यासाठी की त्यांनी आपल्या मागील चुका ज्या त्यांनी आपल्या मुलाबाळांच्या संबंधाने केल्या असतील, लक्षात घ्यावा व आपली सुधारणा करावी.

१३. सच्चा मनाने केलेल्या तौबाचा मोबदला ही असेल की अल्लाह त्यांचे दुर्गुण व दुष्कर्म मिटवील व जन्नत प्रदान करील.

१४. या नूरचे स्पष्टीकरण सूरह हदीद टीप क्र. २२ मध्ये केले गेले आहे.

९. हे पैगंबर ! काफिरांशी व दांभिकांशी जिहाद करा आणि त्यांच्यावर सक्ती करा.[१५] त्यांचे ठिकाण जहन्नम आहे आणि ते मोठे वाईट स्थान आहे पोहचण्याचे.

يٰٓاَيُّهَا النَّبِيُّ جَاهِدِ الْكُفَّارَ وَالْمُنٰفِقِيْنَ وَاغْلُظْ عَلَيْهِمْ ۚ
وَمَاْوٰىهُمْ جَهَنَّمُ ۚ وَبِئْسَ الْمَصِيْرُ ⑨

१०. अल्लाह काफिरां साठी उदाहरण देतो नूह आणि लूतच्या पत्नींचे दोघी ही आमच्या सदाचारी दासांच्या पत्न्या होत्या. परंतु त्यांनी त्यांच्याशी निष्ठा राखली नाही तर त्या अल्लाहच्या विरोधात त्यांच्या काहीच उपयोगी पडू शकल्या नाहीत, आणि दोघा स्त्रीयांना म्हटले, तुम्ही ही आगीत दाखल होणाऱ्यां सोबत दाखल व्हा.[१६]

ضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا لِّلَّذِيْنَ كَفَرُوا امْرَاَتَ نُوْحٍ وَّ امْرَاَتَ
لُوْطٍ ۚ كَانَتَا تَحْتَ عَبْدَيْنِ مِنْ عِبَادِنَا صَالِحَيْنِ
فَخَانَتٰهُمَا فَلَمْ يُغْنِيَا عَنْهُمَا مِنَ اللّٰهِ شَيْئًا وَّقِيْلَ
ادْخُلَا النَّارَ مَعَ الدّٰخِلِيْنَ ⑩

११. आणि ईमान बाळगणाऱ्यां करीता अल्लाह फिरऔनच्या पत्नीचे उदाहरण देतो, जेव्हा तिने दुआ (प्रार्थना) केली, हे माझ्या पालन कर्त्या! माझ्या करीता आपल्या जवळ जन्नत मध्ये एक घर बनव आणि फिरऔन व त्याच्या कर्मा पासून मला मुक्ति दे आणि सुटका कर माझी अत्याचारी जन-समूहा पासून.[१७]

وَضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا لِّلَّذِيْنَ اٰمَنُوا امْرَاَتَ فِرْعَوْنَ ۘ اِذْ قَالَتْ
رَبِّ ابْنِ لِيْ عِنْدَكَ بَيْتًا فِي الْجَنَّةِ وَنَجِّنِيْ مِنْ فِرْعَوْنَ وَعَمَلِهٖ
وَنَجِّنِيْ مِنَ الْقَوْمِ الظّٰلِمِيْنَ ۙ ⑪

१२. आणि मरीयम बिन्ते इमरान यांचे उदाहरण देतो, जिने आपल्या शीलाचे रक्षण केले. मग आम्ही तिच्यात आपला आत्मा फुंकला तिने आपल्या पालन कर्त्याच्या वचनांचे आणि त्याच्या ग्रंथांचे सत्य-समर्थन केले आणि ती आज्ञा धारक लोकांपैकी होती.[१८]

وَمَرْيَمَ ابْنَتَ عِمْرٰنَ الَّتِيْٓ اَحْصَنَتْ فَرْجَهَا فَنَفَخْنَا فِيْهِ
مِنْ رُّوْحِنَا وَصَدَّقَتْ بِكَلِمٰتِ رَبِّهَا وَكُتُبِهٖ وَكَانَتْ
مِنَ الْقٰنِتِيْنَ ⑫ ع

१५. काफिर व दांभिकांशी जेहाद करण्याचा व त्यांच्यावर सक्ती करण्याच्या आदेश या अनुषंगाने दिला गेला आहे की हेच ते लोक होत जे मुस्लिम समाजात उपद्रव माजविण्याचा प्रयत्न करीत. दांभिकांच्या संदर्भात ही सक्त आदेश अशा वेळी अवतरला जेव्हा त्यांची दांभिकता व इस्लामशी वैर उघडपणे दिसून आले. अशा उघड दांभिकांना जे समाजात उपद्रव व उत्पात माजवत होते जीवनाशी ठार करण्याची व यांची एखादी जमात असल्यास तिच्याशी युद्ध करण्याची ताकीद दिली गेली आहे,या साठी की इस्लामी समाजाला या दृष्ट घटकां पासून निकोप ठेवले जावे दांभिकांशी युद्ध करण्याचा आदेश तबूक युद्धानंतर हि. स. ९ मध्ये अवतरला होता पहा सूरह तौबा आयत क्र.७३ टीप क्र. १४२.

१६. हजरत नूह आणि हजरत लूत दोघे पैगंबर होते त्यांच्या पत्नींनी त्यांच्याशी प्रतारणा केली. अर्थात ही प्रतारणा धर्म-संदर्भात होती म्हणजे त्यांनी या पैगंबरांच्या धर्मास मन:पूर्वक स्विकारले नव्हते आणि काफिरांच्या समर्थक बनून राहील्या परिणामी त्या अल्लाहच्या प्रकोपास पात्र ठरल्या आणि हे पैगंबर त्यांना त्या प्रकोपा पासून वाचूव शकले नाहीत.

या दोन स्त्रीयांच्या उदाहरणात फार मोठा बोध आहे. तो हा की अल्लाहच्या ठिकाणी शिक्षा व मोबदल्याचा व्यवहार कर्मांच्या आधारे होतो. या बाबतीत नाती-गोती काहीच उपयोगी ठरत नाही येथपावेतो एखाद्या पैगंबरांची पत्नी देखील जर काफिर स्त्री आहे तर ती अजाब पासून वाचविली जाऊ शकत नाही. हजरत नूह आणि हजरत लूत यांच्या पत्नींनी इच्छिले असते तर या पैगंबरांच्या सान्निध्याने फार मोठा दर्जा प्राप्त करू शकले असते. परंतु कुफ्र आणि प्रतारणेने त्यांना जहन्नम मध्ये नेऊन पोहचविले.

१७. वर दोन काफिर स्त्रीयांचे उदाहरण दिले गेले. या ठिकाणी दोन अशा स्त्रीयांचे उदाहरण दिले जात आहे ज्यांनी ईमान बाळगून उच्च चारित्र्याचा पुरावा दिला आहे, ज्याचा परिपाक म्हणून त्यांना उच्च दर्जा प्राप्त झाला. यापैकी एक फिरऔनची पत्नी होय जी फिरऔन सह त्याच्या महालात राहात होती; जिथे सर्व प्रकारच्या सुख सोयींची रेलचेल होती. परंतु तिने ईमान बाळगले होते म्हणून कुफ्रचे हे वातावरण तिला पसंत नव्हते. यास्तव महालाच्या ऐश्वर्यात राहून ही ती गुदमरलेले जीवन जगत होती. तिच्या हृदयापासून जी प्रार्थना निघाली ती तिच्या ईमान विषयक भावना व आखिरत वरील श्रद्धेचे प्रतिनिधित्व करते. तिने प्रार्थना केली, हे माझ्या पालन कर्त्या ! मला आखिरतचे घर अपेक्षित आहे. तू माझ्यासाठी आपल्या जवळ घर बनव आणि या कुफ्र व अत्याचाराने युक्त अशा वातावरणातून माझी सुटका कर. ती फिरऔन जवळ अगतिकतेने राहात होती आणि त्याच्या सान्निध्यात राहील्याने बऱ्याचशा चुकीच्या गोष्टी तिला सहन करणे भाग पडत असावे. ही तिच्या करीता मोठी कसोटी होती म्हणून तिने फिरऔन व त्याच्या कर्मा पासून तसेच अत्याचारी जन समूहा पासून, ज्याचा सर्वेसर्वा फिरऔन होता मुक्ति लाभण्याची प्रार्थना केली.

या उदाहरणाने हे मार्गदर्शन लाभते की एखादा मुसलमान मग पुरुष असो कि स्त्री जर काफिर किंवा अत्याचारी लोकांच्या वातावरणात राहात असेल तर त्याचे ईमान त्याला यापासून अलिप्त राहण्या सोबतच अल्लाहशी मुक्तिची प्रार्थना करील.

१८. हे अन्य एका ईमान धारक स्त्रीचे उदाहरण आहे जी सत्य, शील व पावित्र्याचा नमुना होती, ती होती इम्रान यांची कन्या हजरत मरीयम त्यांना एका असामान्य कसोटीला तोंड द्यावे लागले ती कुमारीका होती, परंतु अल्लाहने फरिश्ता पाठवून त्यांच्यात आत्मा फुंकला. ज्यामुळे त्या गर्भवती झाल्या परिणामी हजरत ईसा पित्याविना जन्माला आले. हा अल्लाहचा फार मोठा चमत्कार होता जो हजरत मरीयमच्या माध्यमाने दिसून आला. परंतु या बाबत त्यांना जन-समूहाकडून फार काही ऐकावे व सोसावे लागले. त्यांनी या नाजुक प्रसंगी मोठया धैर्याने काम घेतले. आणि अल्लाहने त्यांचे पावित्र्य असामान्य रित्या जाहीर केले.

हजरत मरीयम यांनी त्या वचनांचे ही सत्य-समर्थन केले जी अल्लाहने फरिशत्या द्वारे त्यांच्यावर अवतरीत केली होती म्हणजे हजरत ईसा यांच्या जन्माची शुभवार्ता दिली होती आणि त्यांच्या जन्म-प्रसंगी तसेच त्याच्या नंतर लगेच त्यांना विशेष मार्गदर्शन केले गेले होते ज्याचा उल्लेख सूरह मरीयम मध्ये केला गेला आहे. हजरत मरीयम त्या ग्रंथांवर ही ईमान बाळगत होत्या जे पैगंबरांवर अवतरीत झाले होते आणि त्यांनी एक आज्ञाधारक मोमीन स्त्री या नात्याने जीवन घालविले, त्यांच्या महानतेचे चिन्ह त्यांचे हेच दृढ व उच्चतम चारित्र्य होय आणि या चारित्र्याने त्यांना उच्च स्थळा प्रत नेले.

# सूरह अल मुल्क

# ६७. सूरह अल मुल्क

**नाव :** सूरहच्या सुरवातीलाच अल्लाहच्या राज्य सत्तेचा उल्लेख केला गेला आहे. तद्‌नुषंगे या सूरहचे नाव 'अल मुल्क' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरा वरून असे दिसून येते की सुरवातीच्या काळात जेव्हा विरोधाचा आरंभ झाला होता, अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** अल्लाह आणि आखिरत बाबत गाफील असलेल्या माणसांना सचेत करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ५ मध्ये जीवन-मरणाचे उद्दिष्ट विशद करतांना आकाश व जमीनीची निर्मिती आणि तिच्या व्यवस्थापनेवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे. ज्यामुळे सृष्टीच्या रचयित्याची ओळखही पटते आणि या गोष्टीचे ही समर्थन होते की माणसाचे हे जीवन एक कसोटीमय जीवन आहे.

आयत क्र. ६ ते ११ मध्ये कुरआनाने प्रस्तुत केलेल्या हकीगतीचा इन्कार करणाऱ्यांची आखिरत विषयक परिणति निवेदिली गेली आहे.

आयत क्र. १२ ते १४ मध्ये त्या लोकांची सुपरिणति सांगितली गेली आहे, जे आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगून असतात आणि हे स्पष्ट केले गेले आहे की अल्लाह माणसाची प्रत्येक उघड किंवा लपलेली गोष्ट जाणतो आणि त्याच्या पासून कोणती ही गोष्ट वा कृत्य मग ते अगदी सुक्ष्मातिसुक्ष्म का असेना; लपून राहू शकत नाही.

आयत क्र. १५ पासून सूरहच्या शेवट पर्यंत माणसाला विचार चिंतनाचे आवाहन करीत त्याला गफलतीतून शुद्धीवर आणण्याची उपाय योजना केली गेली आहे. जर माणसाने डोळे नीट उघडे ठेवून या सृष्टीचे अवलोकन केले तर कुरआनाने प्रस्तुत केलेल्या हकीगतींची सत्यता त्याला कळून येईल आणि आपल्या जीवन उद्दिष्टाशी ही तो परिचित होईल.

# ६७. सूरतुल् मुल्क

سُورَةُ المُلْكِ

**आयती - ३०**

**परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने**

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

**१. मोठा समृद्धशाली [१] आहे तो, ज्याच्या हाती राज्यसत्ता आहे [२] आणि तो प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.**

تَبٰرَكَ الَّذِىۡ بِيَدِهِ الۡمُلۡكُ وَهُوَ عَلٰى
كُلِّ شَىۡءٍ قَدِيۡرُ ﴿۱﴾

**२. ज्याने मृत्यु आणि जीवन निर्माण केले,या साठी की तुमची कसोटी घ्यावी की तुमच्या पैकी कोण उत्कृष्ट कर्म करणारा आहे.[३] तो वर्चस्व शाली ही आहे आणि माफ करणारा ही.[४]**

اۨلَّذِىۡ خَلَقَ الۡمَوۡتَ وَالۡحَيٰوةَ لِيَبۡلُوَكُمۡ اَيُّكُمۡ اَحۡسَنُ
عَمَلًا ؕ وَهُوَ الۡعَزِيۡزُ الۡغَفُوۡرُ ﴿۲﴾

**३. ज्याने सात आकाश थरावर थर बनविलेत.[५] तुम्हाला रहमान (अल्लाह) च्या निर्मितीत कोणताही बिघाड आढळणार नाही.[६]**

الَّذِىۡ خَلَقَ سَبۡعَ سَمٰوٰتٍ طِبَاقًا ؕ مَا تَرٰى فِىۡ خَلۡقِ الرَّحۡمٰنِ
مِنۡ تَفٰوُتٍ ؕ فَارۡجِعِ الۡبَصَرَ ۙ هَلۡ تَرٰى مِنۡ فُطُوۡرٍ ﴿۳﴾

**४. मग दृष्टीक्षेप टाका, कोठे तुम्हाला दोष दिसून येतो ? मग वारंवार दृष्टीक्षेप टाका, तुमची दृष्टि थकून असफल होऊन परत येईल.[७]**

ثُمَّ ارۡجِعِ الۡبَصَرَ كَرَّتَيۡنِ يَنۡقَلِبۡ اِلَيۡكَ الۡبَصَرُ خَاسِئًا
وَّهُوَ حَسِيۡرٌ ﴿۴﴾

**५. आम्ही आकाशाला दिव्यांनी सजविले आहे; आणि त्यांना सैतानांवर मारा करण्याचे साधन बनविले आहे.[८] आणि त्यांच्या करीता धगधगत्या आगीची शिक्षा ही तयार करून ठेवली आहे.[९]**

وَلَقَدۡ زَيَّنَّا السَّمَآءَ الدُّنۡيَا بِمَصَابِيۡحَ وَجَعَلۡنٰهَا
رُجُوۡمًا لِّلشَّيٰطِيۡنِ وَاَعۡتَدۡنَا لَهُمۡ عَذَابَ السَّعِيۡرِ ﴿۵﴾

**६. ज्या लोकांनी आपल्या पालन कर्त्याशी कुफ्र (इन्कार) केला आहे,[१०] त्यांच्या करीता जहन्नमची शिक्षा आहे आणि ते फार वाईट स्थान आहे.**

وَلِلَّذِيۡنَ كَفَرُوۡا بِرَبِّهِمۡ عَذَابُ جَهَنَّمَ ؕ وَبِئۡسَ الۡمَصِيۡرُ ﴿۶﴾

**७. जेव्हा ते तिच्यात फेकले जातील, तेव्हा तिच्या गर्जनेचा स्वर ऐकतील. आणि ती उकळत असेल.[११]**

اِذَاۤ اُلۡقُوۡا فِيۡهَا سَمِعُوۡا لَهَا شَهِيۡقًا وَّهِىَ تَفُوۡرُ ﴿۷﴾

१. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फुर्कान टीप क्र. १

२. म्हणजे ज्याच्या हाती सृष्टीचे सूत्र संचालन आहे व ज्याचा सत्ताधिकार सर्वव्यापी आहे.

३. माणसाच्या जीवन-मरणाचा क्रम उगीचच चालत आला नाही किंबहुना अल्लाहने या दोन्ही बाबी निर्माण केल्या आहेत आणि त्यांच्या रचनेत फार मोठे उद्दिष्ट कार्यरत आहे. आणि ते हे की माणसाला या जगात कसोटी पूर्ण जीवनातून पार पाडले जावे. त्याला सदाचारी किंवा दुराचारी बनण्याची संधी दिली जावी, मग हे पाहीले जावे की कोण सदाचारी बनून दाखवितो. जे लोक सदाचारी वा सत्कर्मी बनतील ते मानवतेचे भूषण ठरतील. अल्लाह त्यांची कदर करील आणि तो त्यांना अशा देणग्यांनी उपकृत करील की ते कृतार्थ होतील. ते सदाबहार जन्नतमध्ये सदैव काळा करीता दाखल केले जातील. आणि जो मनुष्य आचरण दृष्टया जेवढा उत्कृष्ट असेल तेवढे उच्च स्थान तो अल्लाहच्या ठिकाणी प्राप्त करील. अर्थात हे फार मोठे उद्दिष्ट आहे, ज्याच्या करीता हे ऐहिक जीवन कसोटीमय बनविले गेले आहे.

आयतीत मृत्युचा उल्लेख जीवना पूर्वी केला गेला आहे जो प्रसंगानुकूल आहे. मृत्यु अतिशय कडवा असतो, उलट जीवन कडवे ही असते आणि मधुर ही असते. मृत्युच्या कडवट पणाची कल्पनाच माणसाला गफलतीतून शुद्धीवर आणण्याचे काम करते हदीस वचनातील उल्लेख असा :-

اَكْثِرُوْا ذِكْرَهَاذِمِ اللَّذَّاتِ يَعْنِى الْمَوْتَ ـ

(ترمذی ابواب الزھد)

"स्वादांना संपविणाऱ्या गोष्टीचे स्मरण करा अर्थात मृत्युचे." (तिर्मिजी)

तसेच मृत्युत या पैलूने ही कसोटी आहे की मनुष्य हराम मौतीने मरतो की हलाल मौतीने. संकंटांनी त्रस्त होऊन आत्महत्या करतो कि नैसर्गिक रित्या मरण पावतो. हराम गोष्टीसाठी आपला जीव देतो की अल्लाहच्या मार्गात शहीद होतो.

४. तो वर्चस्वशाली आहे म्हणून त्याच्या पकडीचे भय बाळगा आणि तो माफ करणारा आहे म्हणून त्याच्या माफीकडे धाव घ्या अर्थात त्याच्या प्रकोपाचे भय बाळगून त्याच्याकडे क्षमा याचना केली तर तो निश्चितपणे तुम्हाला माफ करील.

५. हे आकाश जे भूतला वर चोहीकडून पसरलेले आहे. पहिले आकाश होय. आम्ही याच्या आवरणात बंदिस्त आहोत, वास्तविक या आवरणात मोठ मोठया आकाश गंगा आहेत आणि असे ग्रह-नक्षत्रे ही आहेत जे सहस्त्रावधी प्रकाश वर्षाच्या अंतरावर आहेत. एवढा प्रचंड विस्तार असतांनाही ही सृष्टी केवळ या आवरणा पुरती मर्यादित नाही, किंबहुना अशा प्रकारे सात आकाशांची ही सृष्टी अत्याधिकत विशाल आहे. या सात आकाशांच्या कल्पनेवरून या सृष्टीच्या प्रचंड विस्ताराची पुसटशी कल्पना येते. अन्यथा तिच्या विस्ताराचे काटेकोर अनुमान करण्यास आम्ही सर्वथा असमर्थ आहोत. आजचे प्रगत विज्ञान या पहिल्या आकाशा पर्यंत ही पोहचू शकले नाही. ज्या आवरणात आम्ही बंदिस्त आहोत, त्याच्या आतच ते आपले कौशल्य दाखवित आहे.

६. 'रहमान' ची निर्मिती फर्माविण्यात ही गोष्ट अंतर्भूत आहे की आकाशांची ही निर्मिती अल्लाहच्या कृपेची अभिव्यक्ति होय आणि या निर्मितीचे वैशिष्टय हे की यात किंचित मात्र दोष-उणीव नाही. नभांगणाचे अवलोकन करा, अतिशय विस्तृत व सुंदर छत्र आहे जे ग्रह ताऱ्यांसह सुंदर दृश्य प्रस्तुत करते. यात असंख्य ग्रह नक्षत्रे आहेत. आणि प्रत्येक आपल्या ठिकाणी योग्य आहे. दोष किंवा उणीव दाखविण्या जोगे एक ही स्थान नाही.

हा मजकूर सूरह कॉफ आयत क्र. ६ मध्ये ही निवेदिला गेला आहे.

७. आकाशाचे अवलोकन करण्याचे आवाहन वारंवार केले गेले आहे आणि आव्हानपूर्वक सांगितले गेले आहे की तुमची दृष्टी थकून जाईल परंतु तुम्ही या खगोल विश्वात कोणताही दोष दाखवू शकणार नाही. खगोल शास्त्रज्ञ मोठमोठया दुर्बिणी द्वारे ग्रह-नक्षत्रांचे अवलोकन करीत असतात. परंतु कोठे ही दोष किंवा उणीव दाखवू शकले नाहीत.

तसेच या कौशल्याचे वैशिष्टय हे की या निर्मितीला कोटयावधी वर्षे होऊन गेल्यानंतर ही यात कसलीही जीर्णता किंवा बिघाड निर्माण झाला नाही. काय ही विश्व-रचयित्याच्या अत्याधिक सामर्थ्याचे स्पष्ट प्रमाण नव्हे?

८. तारे एकीकडे आकाशाचे सौंदर्यपूर्ण दृश्य प्रस्तुत करतात, तर दुसरीकडे त्यांच्याकडे त्यांच्यातून आगीचे झोत (आग्निशिखा) निघतात, जे आकाशाच्या दिशेने उड्डाण करणाऱ्या सैतानांचा पाठलाग करतात आणि त्यांचा मारा या सैतानांवर होतो.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हज्र टीप क्र.१६

९. म्हणजे सैतांना करीता आखिरत मध्ये घगधगत्या आगीची शिक्षा तयार करून ठेवली आहे. ते या जहन्नम मध्ये झोकून दिले जातील. सैतानांच्या या परिणति पासून खबरदार करण्याचा अर्थ असा की लोकांनी यांच्या धोक्यात येऊन व

त्यांच्या मार्गाचे अनुसरण करून याच परिणतीला पोहचू नये.

१०. आपल्या पालन कर्त्याशी कुफ्र करण्याचा अर्थ केवळ हा नव्हे की माणसाने अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करावा. किंबहुना याचा अर्थ अल्लाहला त्याच्या समस्त गुणविशेषांसह न मानणे. जगातील बहुसंख्य लोक ईश्वराच्या अस्तित्वास मान्य करतात परंतु कुरआन त्याचे जे गुणविशेष सांगतो, उदा. त्याचे सर्वसमर्थ असणे, शिक्षा व मोबदला देणारा असणे इत्यादिंचा इन्कार करतात. म्हणून त्यांचे ईश्वराला मानणे निरर्थक ठरते. ते त्याच्या गुणविशेषांचा इन्कार करून काफिर बनतात.

११. हे जहन्नमचे अंगावर शहारे आणणारे चित्र आहे. तिचे उचंबळणे व गर्जना करणे केवढे भयंकर असेल!

प्रकोपातिरेकाने विदीर्ण होण्याच्या स्थितीत असेल.प्रत्येक वेळी जेव्हा एखादा समूह तिच्यात (जहन्नम मध्ये) टाकला जाईल, तिचे संरक्षक त्यांना विचारतील, काय तुमच्या जवळ एखादा खबरदार करणारा आला नव्हता?ते उत्तर देतील, होय खबरदार करणारा आमच्या जवळ आला होता. परंतु आम्ही त्यास खोटे ठरविले आणि म्हटले, अल्लाहने काहीच अवतरीत केले नाही. तुम्ही लोक मोठया मार्गभ्रष्टतेत पडलेले आहात.*(अल-कुर्आन)*

८. प्रकोपातिरेकाने विदीर्ण होण्याच्या स्थितीत असेल.[१२] प्रत्येक वेळी जेव्हा एखादा समूह तिच्यात (जहन्नम मध्ये) टाकला जाईल, तिचे संरक्षक त्यांना विचारतील, काय तुमच्या जवळ एखादा खबरदार करणारा [१३] आला नव्हता?

تَكَادُ تَمَيَّزُ مِنَ الْغَيْظِ ۖ كُلَّمَا أُلْقِيَ فِيهَا فَوْجٌ سَأَلَهُمْ خَزَنَتُهَا
أَلَمْ يَأْتِكُمْ نَذِيرٌ ﴿٨﴾

९. ते उत्तर देतील, होय खबरदार करणारा आमच्या जवळ आला होता. परंतु आम्ही त्यास खोटे ठरविले आणि म्हटले, अल्लाहने काहीच अवतरीत केले नाही. तुम्ही लोक मोठया मार्गभ्रष्टतेत पडलेले आहात.

قَالُوا بَلَىٰ قَدْ جَاءَنَا نَذِيرٌ فَكَذَّبْنَا وَقُلْنَا مَا نَزَّلَ اللَّهُ مِن
شَيْءٍ إِنْ أَنتُمْ إِلَّا فِي ضَلَالٍ كَبِيرٍ ﴿٩﴾

१०. आणि ते म्हणतील, जर आम्ही ऐकले असते व समजून घेतले असते तर आम्ही दोजख वाल्यां मध्ये सामील झालो नसतो.[१४]

وَقَالُوا لَوْ كُنَّا نَسْمَعُ أَوْ نَعْقِلُ مَا كُنَّا فِي أَصْحَابِ السَّعِيرِ ﴿١٠﴾

११. अशा प्रकारे ते आपले अपराध मान्य करतील, तेव्हा धि:कार असो दोजख वाल्यांचा.

فَاعْتَرَفُوا بِذَنبِهِمْ فَسُحْقًا لِّأَصْحَابِ السَّعِيرِ ﴿١١﴾

१२. जे लोक न पाहता आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात, त्यांच्या करीता (अल्लाहतर्फे) माफी आणि महान मोबदला आहे.[१५]

إِنَّ الَّذِينَ يَخْشَوْنَ رَبَّهُم بِالْغَيْبِ لَهُم مَّغْفِرَةٌ
وَأَجْرٌ كَبِيرٌ ﴿١٢﴾

१३. तुम्ही आपल्या गोष्टीस लपवा किंवा जाहीर करा, तो तर मनाचे भेद ही जाणतो.[१६]

وَأَسِرُّوا قَوْلَكُمْ أَوِ اجْهَرُوا بِهِ ۖ إِنَّهُ عَلِيمٌ
بِذَاتِ الصُّدُورِ ﴿١٣﴾

१४. काय तो जाणणार नाही ज्याने निर्माण केले आहे ?[१७] तो मोठा सूक्ष्मदर्शी [१८] आणि खबर राखणारा आहे.

أَلَا يَعْلَمُ مَنْ خَلَقَ وَهُوَ اللَّطِيفُ الْخَبِيرُ ﴿١٤﴾

१५. तोच होय ज्याने तुमच्या करीता जमीनीला अधीन बनविले [१९] हिंडा फिरा तिच्या खांद्यांवर [२०] आणि खा अल्लाहच्या उपजिविके मधून [२१] त्याच्याच समोर उठून उभे राहायचे आहे.[२२]

هُوَ الَّذِي جَعَلَ لَكُمُ الْأَرْضَ ذَلُولًا فَامْشُوا فِي مَنَاكِبِهَا
وَكُلُوا مِن رِّزْقِهِ ۖ وَإِلَيْهِ النُّشُورُ ﴿١٥﴾

१२. या जगात मनुष्य एका बॉम्ब स्फोटाचा आवाज सहन करू शकत नाही, तेव्हा त्याची काय दशा होईल जर त्याला जहन्नम मध्ये फेकून दिले गेले, ज्यात असे प्रचंड स्फोट होतील की ती दुभंगून जाण्याच्या स्थितीत असेल.

१३. म्हणजे अल्लाहचा प्रेषित जो तुम्हाला या दिवसा पासून खबरदार करतो.

१४. काफिरांना जहन्नम मध्ये पोहोचून जाणवेल की आम्ही जगात पैगंबराचा उपदेश ऐकण्या ऐवजी आपले कान बंद करून घेतले होते. आणि बुद्धिला ही गुंडाळून ठेवले होते. जर या ऐकण्या-समजण्याच्या शक्तिचा आम्ही योग्य वापर केला असता तर आज या दशेला पोहचलो नसतो.

१५. वर काफिरांची परिणति सांगितली गेली. या आयतीत अल्लाहचे भय. बाळगणाऱ्यांना खुशखबर दिली गेली आहे की त्यांच्या करीता उत्कृष्ट मोबदला आहे.

दृष्टीला न दिसणाऱ्या आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगणे ईमान बाळगणाऱ्यांचे फार मोठे वैशिष्टय आहे.

अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह काफ टीप क्र.३९

१६. यास्तव त्याच्या पासून ना एखादे सूक्ष्मातिसूक्ष्म सत्कर्म लपून राहू शकते आणि ना अगदी लहान सहान दुष्कर्म. एवढेच नव्हे तर त्याच्या पासून ना मनातले सुप्त बेत व बऱ्या वाईट भावना लपून राहू शकतात.

१७. हे प्रमाण आहे या गोष्टीचे की अल्लाह आपल्या दासांची स्थिती पूर्णपणे जाणतो. प्रमाण हे की तो यांचा निर्माता आहे आणि ही गोष्ट कशा प्रकारे शक्य आहे की निर्माता आपल्याच निर्मितीशी अनभिज्ञ असावा.

१८. म्हणजे तो अगदी बारीक सारीक गोष्टींना ही जाणतो. त्याचे ज्ञान इतके अथांग आहे की एखादी सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्ट ही त्याच्या पासून लपून राहू शकत नाही. त्याच्या ज्ञानाने कणा पासून पहाडा पर्यंत सर्वांना व्यापले आहे.

१९. म्हणजे जमीनीला असे योग्य बनविले की तुम्ही तिच्यावर हिंडा, फिरा, रहा, व शेती करा.

२०. म्हणजे तिच्या उंचिवर हिंडा फिरा. जमीनीच्या उंच भागांना तिच्या खांद्यांची उपमा दिली गेली आहे आणि या उंच भागांवर हिंडण्या फिरण्याचा उल्लेख या अनुषंगाने केला गेला आहे की ही गोष्ट तिचे माणसाच्या अधीन असण्याच्या पैलूला चांगल्या प्रकारे स्पष्ट करते. अन्यथा जमीनीच्या सखोल भागातून हिंडणे फिरणे तर स्पष्टच आहे.

२१. म्हणजे उपजिविकेची जी सामुग्री अल्लाहने तुमच्या करीता जमीनीवर पसरवून ठेवली आहे त्यातून खा.

२२. परंतु हे विसरू नका की एक दिवस अल्लाह समोर हजर व्हायचे आहे आणि या देणग्या विषयी जाब द्यायचा आहे आणि मग आपापल्या कृतकर्मांनुसार मोबदला किंवा शिक्षा प्राप्त करायची आहे.

१६. काय तुम्ही त्याच्या पासून जो आकाशात आहे [२३] निर्भय झाले आहात की तुम्हाला जमीनीत धसवून टाकावे आणि ती अकस्मात हलू लागावी.[२४]

ءَأَمِنتُم مَّن فِي السَّمَاءِ أَن يَخْسِفَ بِكُمُ
الْأَرْضَ فَإِذَا هِيَ تَمُورُ ﴿١٦﴾

१७. काय तुम्ही त्याच्या पासून जो आकाशात आहे निर्भय झाले आहात की तुमच्या वर दगडांचा वर्षाव करणारी हवा पाठविली जावी ?[२५] मग तुम्हाला कळून यावे की माझी तंबी कशी असते.

أَمْ أَمِنتُم مَّن فِي السَّمَاءِ أَن يُرْسِلَ عَلَيْكُمْ حَاصِبًا ۖ
فَسَتَعْلَمُونَ كَيْفَ نَذِيرِ ﴿١٧﴾

१८. यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांनी ही खोटे ठरविले होते, तर बघा कशी होती माझी शिक्षा.[२६]

وَلَقَدْ كَذَّبَ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ فَكَيْفَ كَانَ نَكِيرِ ﴿١٨﴾

१९. काय यांनी आपल्यावर पक्ष्यांना पंख पसरवितांना व ते मिटवितांना पाहिले नाही ? रहमान खेरीज असा कोणी नाही जो त्यांना (सुखरूप पणे) थांबवून ठेवतो.[२७] तोच प्रत्येक गोष्टीचा निरीक्षक आहे.

أَوَلَمْ يَرَوْا إِلَى الطَّيْرِ فَوْقَهُمْ صَافَّاتٍ وَيَقْبِضْنَ ۚ
مَا يُمْسِكُهُنَّ إِلَّا الرَّحْمَٰنُ ۚ إِنَّهُ بِكُلِّ شَيْءٍ بَصِيرٌ ﴿١٩﴾

२०. सांगा, तुमच्या जवळ ते कोणते सैन्य आहे जे रहमानच्या विरोधात तुमची मदत करू शकेल?[२८] हे काफिर भ्रमात पडलेले आहेत.

أَمَّنْ هَٰذَا الَّذِي هُوَ جُندٌ لَّكُمْ يَنصُرُكُم مِّن دُونِ
الرَّحْمَٰنِ ۚ إِنِ الْكَافِرُونَ إِلَّا فِي غُرُورٍ ﴿٢٠﴾

२१. सांगा, असा कोण आहे जो तुम्हाला उपजिविका देईल जर तो (अल्लाह) आपली उपजिविका थांबवील ?[२९] वास्तविक पाहता, हे लोक बंडखोर आणि सत्या पासून उद्विग्नतेवर अडून बसले आहेत.[३०]

أَمَّنْ هَٰذَا الَّذِي يَرْزُقُكُمْ إِنْ أَمْسَكَ رِزْقَهُ ۚ بَل لَّجُّوا
فِي عُتُوٍّ وَنُفُورٍ ﴿٢١﴾

२२. काय तो मनुष्य जो तोंडघशी पडून चालत असावा, मार्ग प्राप्त करणार आहे किंवा तो जो एका सरळ मार्गावर सरळ चालत आहे ?[३१]

أَفَمَن يَمْشِي مُكِبًّا عَلَىٰ وَجْهِهِ أَهْدَىٰ أَمَّن
يَمْشِي سَوِيًّا عَلَىٰ صِرَاطٍ مُّسْتَقِيمٍ ﴿٢٢﴾

२३. सांगा, तोच होय, ज्याने तुम्हाला निर्माण केले आणि तुमच्या करीता कान, डोळे, व हृदय बनविले (परंतु) तुम्ही अत्यल्प कृतज्ञता व्यक्त करतात.[३२]

قُلْ هُوَ الَّذِي أَنشَأَكُمْ وَجَعَلَ لَكُمُ السَّمْعَ وَالْأَبْصَارَ
وَالْأَفْئِدَةَ ۖ قَلِيلًا مَّا تَشْكُرُونَ ﴿٢٣﴾

२३.अल्लाहचे आकाशात असणे त्याच्या अत्युच्च पदाच्या अर्थाने आहे. सर्वसामान्य माणूस देखील ईश्वराचा उल्लेख करतांना आकाशाकडेच संकेत करतो. आणि हा अर्थ या दृष्टीने ही योग्य आहे की अल्लाहचे सिंहासन आकाशांच्या ही वर आहे. अन्यथा दुसऱ्या पैलून पाहील्यास अल्लाह प्रत्येक ठिकाणी आहे. तो स्थळ आणि काळ दोघांना ही व्यापून आहे.

२४. या आयतीत आणि या नंतरच्या काही आयतींमध्ये लोकांना विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे आणि त्यांना गफलतीतून शुद्धीवर आणण्याची उपाय योजना केली गेली आहे. काय ही गोष्ट शक्य नव्हे की अल्लाहने कोणत्याही वेळी भूकंपाने जमीनीला हादरवून तिच्यावर राहणाऱ्यांना धसवून टाकावे? हे केवळ शक्यच नव्हे तर अशा प्रकारच्या घटनांनी मानव-इतिहास ओत प्रोत आहे आणि आज देखील कोणत्या न कोणत्या भागात भूकंपाचे हादरे जाणवत असतात; आणि वस्त्या उध्वस्त होत राहतात. आणि हे लिहीत असतांनाच, महाराष्ट्राच्या लातूर व उस्मानाबाद जिल्हयात भूकंपाची भीषण व विनाश कारक घटना घडून आली. केवळ काही सेकंदाच्या हादऱ्यांनी तीस हजार लोकांना मृत्युच्या खाईत लोटले आणि कित्येक वस्त्या नावालाही उरल्या नाहीत ज्यापैकी एकटया किल्लारी गावातच पाच हजार लोकांची घरे स्मशान सदृश्य झालीत आणि ते माती विटा व दगडांच्या प्रचंड ढिगाऱ्या खाली दाबले गेले ही आणि या प्रकारच्या घटना ज्या सदोदित कुठे ना कुठे घडत राहतात काय माणसाचे डोळे उघडण्यास पुरेशा नाहीत? परंतु माणसाची गफलत इतकी गाढ आहे की तो अशा घटनांचे विविध विश्लेषण करतो. आणि यात बोधाचा जो पैलू आहे त्याच्यावर दृष्टीक्षेप टाकण्या ऐवजी डोळे मिटून घेतो. अशा स्थितीत ईश-मार्गदर्शनाची प्राप्ती त्याला कशी होऊ शकते?

२५. लूत जन-समूहावर खडयांचा वर्षाव झाला होता. ईश-प्रकोप या अवस्थेत ही प्रकट होऊ शकतो; आणि भयंकर वादळाच्या स्वरूपात ही; ज्यात वाळू कण असावेत.

२६. हा संकेत आद जन समूह, समूद जनसमूह, लूत व फिरऔनच्या जनसमूहाकडे आहे.

२७. हवेत कोणत्याही आधाराविना पक्ष्यांचे पंख पसरवून उडत राहणे व उडता उडता पंखांना संकुचित करणे व त्या अवस्थेत त्यांचे जमीनीवर न पडणे किती आश्चर्यकारक आहे. बुद्धि आणि दृष्टी बाळगणाऱ्या माणसाला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही की ही कृपाळू रहमान अर्थात अल्लाहच्या असीम कृपेचीच अभिव्यक्ति होय.

२८. म्हणजे एखादा मनुष्य कितीही मोठे सैन्य बळ बाळगणारा असला तरी अल्लाहच्या प्रकोपा पासून तो कसा सुरक्षित राहू शकतो. फिरऔन सारख्या बलाढय शासकाला पाण्यात बुडून मरण्या पासून त्याचे एवढे मोठे सैन्य वाचवू शकले नाही, किंबहुना ते सैन्य देखील बुडून मरण पावले.

अनेकेश्वरवादी आपल्या उपास्यांना आपले रक्षणकर्ते समजतात. परंतु जेव्हा अल्लाहचा प्रकोप ओढवतो तेव्हा हे सर्व गायब होतात.

२९. उपजिविका प्रदान करणारा अल्लाहच आहे, जर त्याने उपजिविका देण्याचे थांबविले तर असा कोणी नाही जो उपजिविका देईल. उदाहरणार्थ अन्नधान्य पिकवण्यास अत्यावश्यक असलेला पाऊस जर अल्लाहने थांबविला तर त्याच्याच्या खेरीज पाऊस पाडणारा कोण आहे?

३०. म्हणजे या सर्व गोष्टींमध्ये ज्यांचे ते अहोरात्र अवलोकन करतात, एकेश्वरवादाची चिन्हे अगदी स्पष्ट दिसतात. परंतु हे लोक या गोष्टीवर अडून बसले आहेत की ते अल्लाहचे आज्ञा पलान मान्य करणार नाहीत; उलट मनाला येईल ते करतील. त्यांना सत्या बाबत काहीही गोडी नाही, किंबहुना त्याविषयी घृणा आहे कारण सत्य स्विकारण्याच्या स्थितीत ते आपल्या मनाला येईल तसे वागू शकणार नाहीत.

३१. हे उदाहरण त्या माणसाचे आहे जो मार्गभ्रष्टतेच्या मार्गावर चालतो आणि त्याचे जो अल्लाहने दाखविलेल्या मार्गावर चालतो. आपल्या स्वभावा विरूद्ध चालणारा मनुष्य नेहमी उलट चालतो आणि जनावरा सारखे खाली तोंड करून राहतो. मात्र आपल्या स्वभावानुसार (ज्यात एकेश्वरवादाचा पैलू आहे) चालणारा मनुष्य नेहमी सरळ चालतो आणि त्याची दृष्टी उच्चतेकडे वळते.

३२. म्हणजे अल्लाहने ऐकण्या पाहण्याची व आकलनाची शक्ति एवढयासाठी प्रदान केली आहे की तुम्ही यांची कदर जाणावी व या सामर्थ्यांचा योग्य वापर करून अल्लाहचे कृतज्ञ दास व्हावे. परंतु लोकांमध्ये ही जाणीव अत्यल्प आढळून येते. आधिकांशा या देणगीची कदर जाणत नाही आणि या सामर्थ्यांचा सत्य गोष्ट ऐकण्या, सत्य पाहण्या व सत्य गोष्ट समजून घेण्या करीता वापर करीत नाही.

२४. सांगा, तोच होय, ज्याने तुम्हाला जमीनीवर (इतस्तत:) पसरविले आहे आणि त्याच्याच कडे तुम्ही एकत्रित केले जाल.[३३]

قُلْ هُوَ الَّذِيْ ذَرَاَكُمْ فِي الْاَرْضِ وَاِلَيْهِ تُحْشَرُوْنَ ﴿٢٤﴾

२५. हे लोक असे म्हणतात की जर तुम्ही सच्चे आहात तर सांगा हा वायदा केव्हा पूर्ण होईल. [३४]

وَيَقُوْلُوْنَ مَتٰى هٰذَا الْوَعْدُ اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿٢٥﴾

२६. सांगा, याचे ज्ञान तर अल्लाह जवळच आहे [३५] मी तर केवळ उघड (रित्या) खबरदार करणारा आहे.

قُلْ اِنَّمَا الْعِلْمُ عِنْدَ اللّٰهِ ۪ وَاِنَّمَآ اَنَا نَذِيْرٌ مُّبِيْنٌ ﴿٢٦﴾

२७. जेव्हा ते याला [३६] जवळ पाहतील,तर त्या लोकांचे चेहरे बिघडतील ज्यांनी इन्कार केला आहे. आणि त्यांना सांगितले जाईल,हीच ती गोष्ट आहे, जिची तुम्ही इच्छा करीत होता.

فَلَمَّا رَاَوْهُ زُلْفَةً سِيْٓـَٔتْ وُجُوْهُ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَقِيْلَ
هٰذَا الَّذِيْ كُنْتُمْ بِهٖ تَدَّعُوْنَ ﴿٢٧﴾

२८. सांगा, तुम्ही हा ही विचार केला की जर अल्लाह मला व माझ्या साथीदारांना नष्ट करील किंवा आमच्यावर कृपा करील,तर काफिरांना दु:खदायक अजाब (शिक्षे) पासून कोण आश्रय देईल ?[३७]

قُلْ اَرَءَيْتُمْ اِنْ اَهْلَكَنِيَ اللّٰهُ وَمَنْ مَّعِيَ اَوْ رَحِمَنَا ۙ فَمَنْ
يُّجِيْرُ الْكٰفِرِيْنَ مِنْ عَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٢٨﴾

२९. सांगा तो रहमान आहे, ज्यावर आम्ही ईमान बाळगले आहे; आणि त्याच्यावरच आम्ही भरवसा केला आहे.[३८] तुम्हाला लवकरच कळून येईल की उघड मार्गभ्रष्टतेत कोण आहे!

قُلْ هُوَ الرَّحْمٰنُ اٰمَنَّا بِهٖ وَعَلَيْهِ تَوَكَّلْنَا ۚ فَسَتَعْلَمُوْنَ
مَنْ هُوَ فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ﴿٢٩﴾

३०. सांगा, तुम्ही हा ही विचार केला की जर तुमचे पाणी (जमीनीत) खोलवर उतरून गेल्यास कोण आहे जो तुमच्या करीता वाहते पाणी घेऊन येईल ? [३९]

قُلْ اَرَءَيْتُمْ اِنْ اَصْبَحَ مَآؤُكُمْ غَوْرًا فَمَنْ
يَّاْتِيْكُمْ بِمَآءٍ مَّعِيْنٍ ﴿٣٠﴾ ع

३३. अल्लाहनेच अब्जावधी माणसांना जमीनीवर आबाद केले आहे व ते अशासाठी की त्यांना कसोटीपूर्ण जीवनातून पार पाडले जावे आणि मग कियामतीच्या दिवशी सर्वांना जिवंत करून आपल्या समोर जाब देण्यासाठी एकत्रित केले जावे.

३४. म्हणजे कियामतीची वेळ केव्हा येईल?

३५. याचे स्पष्टीकरण सूरह लुकमान टीप क्र. ६० मध्ये केले गेले आहे.

३६. अर्थात अजाबला.

३७. काफिर लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या सहकाऱ्यांच्या विनाशाची इच्छा बाळगत होते आणि या गोष्टीची वाट बघत होते की केव्हा यांचा नायनाट होतो. याचे उत्तर म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हे सांगण्याचे मार्गदर्शन लाभले की जर अल्लाहने मला व माझ्या साथीदारांना मरण दिले ही तर तुम्ही आपल्या कुफ्रच्या शिक्षेपासून कशा प्रकारे सुरक्षित राहू शकता आमच्या लवकर किंवा उशीरा मरण पावल्याने तुम्ही अल्लाहच्या प्रकोपा पासून मुक्त होऊ शकत नाही, जेव्हा तुम्ही आपल्या कुफ्र नितीवर अडून बसलेले आहात.

३८. या सूरह मध्ये 'रहमान' हा शब्द अनेकदा आला आहे, जो या गोष्टीकडे लक्ष वेधतो की त्याच्या कृपा-चिन्हांकडे पहा जी सर्वत्र पसरलेली आहेत; आणि त्याच्यावर (अल्लाहवर) ईमान बाळगून त्याच्या कृपेस पात्र व्हा. शेवटी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने ही घोषित केले गेले की आम्ही त्या कृपावंत अल्लाहवर ईमान बाळगले आहे आणि त्याच्यावरच भरवसा करून स्वत:ला त्याच्या हवाली केले आहे. यास्तव त्याच्यातर्फे जे मार्गदर्शन लाभते, आम्ही त्याचेच अनुसरण करतो.

३९. सूरहच्या शेवटी अल्लाहच्या ईशत्वावर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे, जेणेकरून कृतज्ञता भावना वाढीस लागावी फर्माविले पाण्याचे हे वाहते प्रवाह जे तुमच्या करीता महान देणगी व तुमच्या जीवना करीता अत्यावश्यक आहेत, तर कोरडे पडतील व त्यांचे जमीनीत इतक्या खोलवर उतरावे की तुम्ही ते प्राप्त करू न शकावे तर असा कोण आहे जो तुमच्या करीता वाहत्या पाण्याचे प्रवाह सुरू करील? जर अल्लाह खेरीज इतर कोणाच्याही हे अवाक्यात नाही, आणि खरोखर असा कोणीच नाही तर मग आपल्या खऱ्या खुऱ्या पालन कर्त्यास सोडून इतरांना जे अगदी अधिकार शून्य आहेत, का म्हणून आपला पालनकर्ता व उपास्य बनविता?

# सूरह अल् कलम

# ६८. सूरह अल् कलम

**नाव :** सुरवातीला कलम (लेखणी) चा उल्लेख केला गेला आहे. त्या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अल् कलम' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे; आणि मजकूरां वरून असे दिसून येते की ही त्या वेळी अवतरली जेव्हा कुरेश जन समूहाने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना वही (ईश-संदेश) व प्रेषित्वाच्या दाव्यामुळे वेडसर ठरविले.

**मध्यवर्ति कल्पना :** जे लोक 'वही' व प्रेषित्वाची कदर जाणत नाही आणि पैगंबरांना वेडे ठरवितात, त्यांना, त्यांच्या ऐहिक व आखिरत विषयक परिणती पासून खबरदार करणे.

**आयत रचना :** आयत क्र.१ ते १६ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत स्पष्ट केले गेले आहे की ते किती उच्च दर्जाचे व्यक्तिमत्व आहे; आणि ते लोक जे त्यांच्या विरोधात पुढाकार घेत आहेत व त्यांना वेडा ठरवित आहेत किती हीन पातळीचे लोक आहेत व किती अध:पतित आहे.

आयत क्र. १७ ते ३३ मध्ये एका बाग वाल्यांचे उदाहरण बोध देण्या करीता प्रस्तुत केले गेले आहे; ज्यांनी अल्लाहशी कृतघ्नता दर्शविली; परिणाम स्वरूपी बागेच्या देणगी पासून ते वंचित झाले.

आयत क्र. ३४ ते ३६ मध्ये ईश-भय अंगिकारणाऱ्यांना जन्नतचा शुभ समाचार सांगितला गेला आहे; आणि या गोष्टीची अयोग्यता स्पष्ट केली गेली आहे की आखिरतचा इन्कार करणाऱ्यांच्या नजरेत अल्लाहशी निष्ठा राखणारे आणि वैर बाळगणारे सर्व समान आहेत.

आयत क्र. ३७ ते ४१ मध्ये इन्कार करणाऱ्यांची भूमिका चुकीचे असणे स्पष्ट केले गेले आहे.

आयत क्र. ४२ व ४३ मध्ये इन्कार करणाऱ्यांना सावध केले गेले आहे की आज त्यांना अल्लाहला सजदा करण्यास सांगितले जात आहे, तर ते इन्कार करतात, परंतु एक दिवस असा उजाडेल जेव्हा लोकांना सजदा करण्या करीता बोलाविले जाईल तेव्हा हे लोक सज्दा करू शकणार नाहीत आणि त्यांच्या वर अपमानाचे सावट पसरेल.

आयत क्र. ४४ ते ४७ मध्ये अल्लाहच्या उपाय योजने पासून त्यांना सचेत करीत त्यांची अयोग्यता त्यांच्यावर स्पष्ट केली गेली आहे.

आयत क्र. ४८ ते ५० मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना काफिरांच्या विरोधावर संयम पाळण्यास सांगितले गेले आहे.

आयत क्र.५१ व ५२ सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहिं वसल्लम) यांच्या बाबत स्पष्ट केले गेले आहे की ते जी वाणी प्रस्तुत करीत आहेत, तो वेडसरपणा नाही, किंबहुना ती अल्लाहची वाणी आहे,जो समस्त मानवां करीता नखशिखान्त उपदेश व बोध आहे.

# ६८. सूरतुल कलम

سُوْرَةُ الْقَلَمِ

आयती - ५२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. नून.[१] शपथ आहे लेखणीची आणि त्या गोष्टीची, जिला ते लिहितात.[२]

نٓ وَالْقَلَمِ وَمَا يَسْطُرُوْنَ ۙ ﴿١﴾

२. तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या कृपेने वेडे नाहीत.[३]

مَآ اَنْتَ بِنِعْمَةِ رَبِّكَ بِمَجْنُوْنٍ ۚ ﴿٢﴾

३. आणि तुमच्या साठी निश्चितच असा मोबदला आहे, जो कधी ही संपणार नाही.[४]

وَاِنَّ لَكَ لَاَجْرًا غَيْرَ مَمْنُوْنٍ ۚ ﴿٣﴾

४. आणि निःसंशय तुम्ही महान चारित्र्याच्या दर्जावर आहात.[५]

وَاِنَّكَ لَعَلٰى خُلُقٍ عَظِيْمٍ ﴿٤﴾

५. तेव्हा लवकरच तुम्ही ही पाहाल व ते ही पाहतील-

فَسَتُبْصِرُ وَيُبْصِرُوْنَ ۙ ﴿٥﴾

६. की तुमच्या पैकी कोणाला वेड लागले आहे.[६]

بِاَىيِّكُمُ الْمَفْتُوْنُ ﴿٦﴾

७. तुमचा पालन कर्ता चांगल्या प्रकारे जाणतो की कोण त्याच्या मार्गा पासून विचकीत झाला आहे आणि तो त्या लोकांना ही चांगल्या प्रकारे जाणतो, ज्यांनी (अल्लाहचे) मार्गदर्शन प्राप्त केले आहे.

اِنَّ رَبَّكَ هُوَ اَعْلَمُ بِمَنْ ضَلَّ عَنْ سَبِيْلِهٖ ۠
وَهُوَ اَعْلَمُ بِالْمُهْتَدِيْنَ ﴿٧﴾

८. यास्तव, तुम्ही या खोटे ठरविणाऱ्यांच्या कहयात येऊ नका.

فَلَا تُطِعِ الْمُكَذِّبِيْنَ ﴿٨﴾

९. हे तर इच्छितात की तुम्ही नरम पडावे तर ते ही नरम पडतील.[७]

وَدُّوْا لَوْ تُدْهِنُ فَيُدْهِنُوْنَ ﴿٩﴾

१. हे वेगवेगळया अक्षरांपैकी आहे, ज्यांचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. १ आणि सूरह यूनुस टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे.

या सूरह मध्ये आयतींचा क्रम असा आहे की अधिकांश आयतींचे शेवटचे अक्षर 'नून' आहे आणि या सूरहच्या याच वैशिष्टयाकडे हे 'नून' अक्षर जे सूरवातीला आले आहे संकेत करते. यात कुरआनाच्या मान प्रतिष्ठेचा पैलू ही आहे आणि तोंडीपाठ करण्यासाठी सहज सुलभतेचा पैलू ही आणि विशेष म्हणजे या अक्षराचे पठण एक आकर्षक स्वरताल निर्माण करते आणि लक्ष या दिव्य वाणीकडे केंद्रित होते.

२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर कुरआनाचा जो हिस्सा देखील अवतरीत होत असे, त्यास ते लिहवून घेण्याची व्यवस्था करीत ईश-संदेश लिहिणारे याला लेखणीने चामडयाच्या पातळ आवरण वगैरे वर लिहीत. अशा प्रकारे कुरआन लेखणी द्वारे लिखित स्वरूपात चालत आले आणि त्याची पाने वाचून ते पूर्णत: अल्लाहची वाणी असल्या बद्दल समाधान प्राप्त होऊ शकत असे. या ठिकाणी लेखणी व लेखनाची जी शपथ घेतली गेली आहे ती कुरआन अल्लाहची वाणी असल्याची साक्ष म्हणून आहे. आणि जसे इतर ठिकाणी स्पष्ट केले गेले आहे, अरबी भाषेत अशा प्रसंगी शपथ साक्ष व प्रमाण या अर्थाने प्रयोजिली जाते.

आयतीचा अर्थ असा की कुरआनाचे अवतरण एका निरक्षर जन समूहात झाले असले तरी या गोष्टीचा पूर्ण इतमाम राखला गेला आहे की ते लिखित स्वरूपात यावे आणि लोकांपर्यंत अल्लाहची वाणी आपल्या मूळ स्वरूपात पोहचावी आणि सदैव काळा करीता त्यातले अक्षर नि अक्षर सुरक्षित व्हावे. आता कोणताही मनुष्य या पृष्ठांचे वाचन मनन करू शकतो. याचे मजकूर स्वत: साक्ष देतात की ही अल्लाहची वाणी आहे.

३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हे काफिर वेडे ठरवित या कारणास्तव की ते या गोष्टीचा दावा करतात की आकाशातून त्यांच्यावर अल्लाहचा संदेश अवतरला आहे. त्यांच्या याच आरोपाचे अल्लाहने खंडन केले आहे की अल्लाहचा पैगंबर अल्लाहच्या कृपेने वेडा नाही, किंबहुना जी वाणी तो प्रस्तुत करीत आहे ती खरोखर ईश-वाणी होय जी अल्लाहने त्याच्यावर अवतरीत केली आहे आणि ते अल्लाहतर्फे असण्याचा पुरावा त्या वाणीची ओजस्विता आहे ज्याच्या लेखनाचा इतमाम केला गेला आहे.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ८

४. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांत्वना दिली गेली आहे की काफिरांच्या या आरोप वर आपण संयम पाळावा. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपणास असा मोबदला प्रदान करणार आहे की ज्याचा क्रम कधीही संपणार नाही म्हणजे असे इनाम जे सदैव बाकी राहील.

५. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) चारित्र्य व नितिमत्तेच्या दृष्टीने अतिशय उच्च दर्जा राखत होते. अशा अत्युच्च व महान व्यक्तिमत्वावर वेडे असण्याचा आरोप ठेवणे मोठी अयोग्य व वस्तुस्थितीच्या विपरीत अशी गोष्ट होती. याच्या खंडनार्थ या ठिकाणी त्यांच्या महान चारित्र्याच्या पैलूस स्पष्ट केले गेले आहे. काय एखादा वेडा मनुष्य चारित्र्याच्या उच्च स्तरावर असतो? जर नाही तर त्यांचे उच्च चारित्र्य व अत्युच्च नैतिकता या आरोपाचे खंडन करण्यास पुरेशी आहे.

कुरआन व हदीसच्या खेरीज इतिहासाच्या पृष्ठांमध्ये त्यांचे चारित्र्य अगदी सुरक्षित आहे आणि या विवरण सह सुरक्षित आहे की आज देखील आम्ही इतिहासाच्या पृष्ठांमध्ये त्यांचे व्यक्तिमत्व अशा प्रकारे पाहू शकतो की जणू ते आज ही आमच्या दरम्यान हजर आहेत इतिहासाची ही पृष्ठे एका अशा व्यक्तिमत्वास प्रस्तुत करतात, जे दृढ निर्धार बाळगणारे, उच्च चारित्र्याचे, दोष हीन नैतिकता व एवढे महान आहे की विश्व याचे उदाहरण देण्यास असमर्थ आहे.

६. म्हणजे लवकरच परिणति तुमच्या समोर येईल आणि तुम्ही पहाल की कोणाला खरोखर वेड लागले होते. काफिर जेव्हा आपल्या परिणतीस पाहतील तेव्हा त्यांना जाणीव होईल की ते स्वत:वेडेपणात धुंद होते की आपल्या सच्चा शुभचिंतकाचे म्हणणे ऐकले नाही व शेवटी या दुष्परिणतीस पोहचले.

७. म्हणजे हे खोटे ठरविणारे असे इच्छितात की तुम्ही आपल्या धर्माच्या संदर्भात नरमीचे धोरण अंगिकाराल तर ते ही नरम पडतील आणि देण्या-घेण्याच्या नियमानुसार एखादा समेट घडून यावा. परंतु धर्म-संदर्भात नरमीचे धोरण अंगिकारण्याचा व अन्य एखाद्या धर्माशी समजोता करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही कारण खरा व सत्य धर्म तोच होय जो अल्लाहने अवतरीत केला आहे. यात जे काही उणे-अधिक केले जाईल, ते अल्लाहशी असत्याचा संबंध जोडणे ठरेल आणि या नंतर हा धर्म निखालस विशुद्ध राहणार नाही.

या आदेशाचा हेतु काफिरांवर हे स्पष्ट करण्याचा होता की अल्लाहचा पैगंबर अल्लाहच्या आदेशांचे पालन करतो तेव्हा त्याच्या कडून ही अपेक्षा केली जाऊ नये की तो धर्म-संदर्भात एखाद्या समझोत्या करीता तयार होईल. ही जबाबदारी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयायींची ही आहे त्यांनी धर्म आणि शरीअतच्या बाबतीत सक्त रहावे आणि कोणत्याही परिस्थितीत काफिरांच्या पुढे झुकू नये.

१०. तुम्ही अशा माणसाच्या कहयात येऊ नका जो फार शपथा घेणारा [८] व अपमानित आहे.

وَلَا تُطِعْ كُلَّ حَلَّافٍ مَّهِينٍ ﴿١٠﴾

११. टोमणे मारणारा [९] व चहाडीखोर [१०]

هَمَّازٍ مَّشَّآءٍۭ بِنَمِيمٍ ﴿١١﴾

१२. भलाई पासून रोखणारा, [११] अतिरेक करणारा [१२] अपराधांमध्ये लिप्त.[१३]

مَّنَّاعٍ لِّلْخَيْرِ مُعْتَدٍ أَثِيمٍ ﴿١٢﴾

१३. कठोर आणि वरून बदनाम आहे.[१५]

عُتُلٍّۭ بَعْدَ ذَٰلِكَ زَنِيمٍ ﴿١٣﴾

१४. (त्याची घमेंड) या कारणास्तव आहे की तो सम्पत्ति व संतती बाळगणारा आहे.[१६]

أَن كَانَ ذَا مَالٍ وَّبَنِينَ ﴿١٤﴾

१५. जेव्हा आमच्या आयती त्याला ऐकविल्या जातात, तेव्हा म्हणतो या तर पूर्वीच्या लोकांच्या कथा आहेत.

إِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِ ءَايَٰتُنَا قَالَ أَسَٰطِيرُ ٱلْأَوَّلِينَ ﴿١٥﴾

१६. लवकरच आम्ही त्याच्या सोंडेवर डाग लावणार.[१७]

سَنَسِمُهُۥ عَلَى ٱلْخُرْطُومِ ﴿١٦﴾

१७. आम्ही यांना अशाच प्रकारे कसोटीत टाकले आहे, ज्या प्रकारे बाग वाल्यांना कसोटीत टाकले होते.[१८] जेव्हा त्यांनी शपथ घेतली की प्रात:काळी अवश्य यांची फळे तोडू.

إِنَّا بَلَوْنَٰهُمْ كَمَا بَلَوْنَآ أَصْحَٰبَ ٱلْجَنَّةِ إِذْ أَقْسَمُوا۟
لَيَصْرِمُنَّهَا مُصْبِحِينَ ﴿١٧﴾

१८. आणि अपवाद करीत नव्हते. [१९]

وَلَا يَسْتَثْنُونَ ﴿١٨﴾

१९. ते ही झोपेतच पडले होते की तुमच्या पालन कर्त्यातर्फे एक आपत्ति ओढवली. [२०]

فَطَافَ عَلَيْهَا طَآئِفٌ مِّن رَّبِّكَ وَهُمْ نَآئِمُونَ ﴿١٩﴾

२०. आणि तो कापणी झालेल्या शेता सारखा होऊन राहीला.[२१]

فَأَصْبَحَتْ كَٱلصَّرِيمِ ﴿٢٠﴾

२१. सकाळी त्यांनी एकमेकांना हाक मारली.

فَتَنَادَوْا۟ مُصْبِحِينَ ﴿٢١﴾

८. अत्याधिक शपथा खाणारा मनुष्य तोच असतो, जो आपला विश्वास गमावून बसला असेल. काफिरांचे नेते खोटया शपथा घेऊन लोकांची खात्री पटवत की त्यांचा अनेकेश्वरवादी व मूर्तिपूजक धर्म सच्चा आहे आणि प्रेषित्वाचा दावा करणाऱ्या या माणसावर अल्लाहचा संदेश मुळीच अवतरीत होत नाही.

९. टोमणे मारणे व व्यंग दोष काढणे ही फार वाईट सवय आहे असा मनुष्य इतरांना तुच्छतेने पाहतो. या ठिकाणी संकेत या गोष्टीकडे आहे की हा वाईट प्रवृत्तीचा मनुष्य सत्प्रवृत्तीच्या लोकांना ही टोमणे मारीत आहे.

१०. म्हणजे उत्पात माजविण्याच्या गरजेने इकडच्या गोष्टी तिकडे लावणारा, लोकांना आपसात लढविण्या करीता त्यांच्या गोष्टी उल्लेखिणे आणि एकमेकांविषयी मन कलुषित करणे फार वाईट सवय आहे; आणि दुराचार पूर्ण कृत्य आहे. आयतीचा विशेष संकेत या गोष्टीकडे आहे की अशा चारित्र्याचा मनुष्य ईमान बाळगणाऱ्यांच्या गोष्टींना चुकीच्या स्वरूपात लोकांपुढे मांडून त्यांना यांच्या विरूद्ध भडकावित आहे.

११. अर्थात सम्पत्तिला सत्कार्यासाठी खर्च करण्या पासून रोखणारा, अर्थात कृपण वृत्तीचा.

१२. म्हणजे अत्याचार अतिरेक करणारा.

१३. म्हणजे वैध-अवैध या दोहोत फरक न करणारा. निष्फळ व दुष्कर्मात लिप्त.

१४. म्हणजे कठोर स्वभावाचा व भांडखोर.

१५. म्हणजे आपले वाईट आचरण व उपद्रवां पायी बदनाम आहे आणि समाजात अतिशय हीन पातळीच्या मनुष्य आहे.

१६. अर्थात त्याच्या घमेंडीने त्याच्या अंगी हे वाईट गुण निर्माण केले आणि तो गर्विष्ठ अशा साठी झाला की अल्लाहने त्याला भरपूर धन आणि संतती प्रदान केली आहे. वास्तविक या बद्दल त्याने अल्लाहशी कृतज्ञशील व्हायला हवे होते.

या आयतींमध्ये कोणा एका विशिष्ट काफिरची स्थिती नव्हे तर काफिरांच्या नेत्यांची स्थिती वर्णिली गेली आहे की एकीकडे अशी वाईट प्रवृत्तीची व नीच पातळीचे नेतृत्व आहे तर दुसरीकडे अल्लाहच्या पैगंबराचे नेतृत्व आहे जे अतिशय उच्च चारित्र्याने व नितिमत्तेच्या महान पदावर आहे. आता तुम्हीच विचार करा की तुमचा सच्चा नेता व खराखुरा मार्गदर्शक कोण आहे?

१७. म्हणजे त्याच्या नाकावर अपमानाचे निशाण (डाग) लावू तो गर्वाने आपले नाक उंच ठेवू इच्छितो. परंतु अशा माणसाचे नाक मानवी-नाक नव्हे, तर जनावराची सोंड आहे आणि अशा लायकीचे आहे की त्याला अपमानाची गोडी चाखवली जावी.

१८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहतर्फे पाठविले गेल्याने मक्काच्या काफिरांना कसोटीत टाकले होते. जर ते पैगंबरांचे आवाहन स्विकारतात तर त्यांना ऐहिकता व आखिरतच्या यशाचा मार्ग मोकळा होईल आणि जर ते इन्कार करतात तर त्यांच्यावर या जगातही अल्लाहचा प्रकोप होईल आणि आखिरत मध्ये ही त्यांना निरंतर ईश शिक्षा भोगावी लागेल. या संदर्भात बोध-ग्रहणा करीता एका बागवाल्यांचे उदाहरण प्रस्तुत केले गेले आहे. हे उदाहरण एखादा काल्पनिक किस्सा नव्हे तर एक वास्तव-घटना आहे, जी खरोखर घडून आली होती. पुढे या बागवाल्यांचे जे संभाषण उल्लेखिले गेले आहे ते ही घटना सत्य असल्याची साक्ष देते.

१९. म्हणजे शपथ घेऊन अगदी खात्रीने त्यांनी म्हटले की ते, प्रात: काळी बागेतली फळे तोडतील आणि 'इन्शा अल्लाह' (अल्लाहने इच्छिल्यास) असे म्हटले नाही. ते अल्लाहला विसरले आणि अल्लाहवरील भरवशास सोडून आत्म-विश्वासाच्या भ्रमाला बळी पडले.

२०. म्हणजे त्या रात्री जेव्हा ते झोपेत ढाराढूर होते, अल्लाहने त्यांच्या बागेवर संकट कोसळविले.

२१. ते संकट असे होते की संपूर्ण बाग क्षत-विक्षत झाली.

२२. की जर फळे तोडायची आहेत तर सकाळी आपल्या शेतांवर [२२] पोहचा.

أَنِ اغْدُوا عَلَىٰ حَرْثِكُمْ إِن كُنتُمْ صَارِمِينَ ﴿٢٢﴾

२३. यास्तव ते निघाले आणि हळू बोलत जात होते.

فَانطَلَقُوا وَهُمْ يَتَخَافَتُونَ ﴿٢٣﴾

२४. की आज कोणी ही गोर गरीब यात तुमच्या जवळ येता कामा नये.[२३]

أَن لَّا يَدْخُلَنَّهَا الْيَوْمَ عَلَيْكُم مِّسْكِينٌ ﴿٢٤﴾

२५. ते प्रात:काळी दृढ निश्चया सह निघाले की ते असे करू शकतील. [२४]

وَغَدَوْا عَلَىٰ حَرْدٍ قَادِرِينَ ﴿٢٥﴾

२६. परंतु जेव्हा ती (बाग) पाहीली, तेव्हा म्हणू लागले, आम्ही रस्ता विसरलो.

فَلَمَّا رَأَوْهَا قَالُوا إِنَّا لَضَالُّونَ ﴿٢٦﴾

२७. किंबहुना आम्ही पारखे होऊन बसलो.[२५]

بَلْ نَحْنُ مَحْرُومُونَ ﴿٢٧﴾

२८. त्यांच्या पैकी जो मनुष्य सर्वात चांगला होता, तो म्हणाला,मी तुम्हाला सांगितले नव्हते की तुम्ही अल्लाहच्या पावित्र्याचे गुणगान का करीत नाही ?[२६]

قَالَ أَوْسَطُهُمْ أَلَمْ أَقُل لَّكُمْ لَوْلَا تُسَبِّحُونَ ﴿٢٨﴾

२९. ते उद्‌गारलेत, पवित्र आहे आमचा ‘रब्ब’ (पालनकर्ता) आम्हीच अपराधी होतो.[२७]

قَالُوا سُبْحَانَ رَبِّنَا إِنَّا كُنَّا ظَالِمِينَ ﴿٢٩﴾

३०. मग ते एकमेकांची निर्भत्सना करू लागले.[२८]

فَأَقْبَلَ بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ يَتَلَاوَمُونَ ﴿٣٠﴾

३१. ते म्हणाले, खेद असो आम्हावर ! आम्हीच बंडखोर झालो होतो.[२९]

قَالُوا يَا وَيْلَنَا إِنَّا كُنَّا طَاغِينَ ﴿٣١﴾

३२. आशा आहे की आमचा पालन कर्ता याच्या मोबदल्यात आम्हाला याहून अधिक चांगली बाग प्रदान करील. आम्ही आपल्या पालन कर्त्याकडे रूजू करतो. [३०]

عَسَىٰ رَبُّنَا أَن يُبْدِلَنَا خَيْرًا مِّنْهَا إِنَّا إِلَىٰ رَبِّنَا رَاغِبُونَ ﴿٣٢﴾

३३. अशा प्रकारे असतो अजाब [३१]आणि आखिरतचा अजाब तर याहून कित्येक पटींनी मोठा आहे. हे या लोकांनी जाणले असते तर !

كَذَٰلِكَ الْعَذَابُ ۖ وَلَعَذَابُ الْآخِرَةِ أَكْبَرُ ۚ
لَوْ كَانُوا يَعْلَمُونَ ﴿٣٣﴾

२२. बागेत शेती काम ही होते म्हणून तिला शेती म्हटले गेले.

२३. ही त्यांच्या तर्फे सक्त कंजूस पणाची अभिव्यक्ति होती. ते गोर गरीबांचा हक्क अदा करू इच्छित नव्हते, वास्तविक अल्लाहने शेतीच्या उत्पन्नात ही गोर गरीबांचा हक्क राखला आहे, जी मनुष्य स्वभावाची निकड आहे आणि तो याला एक सत्कर्म या नात्याने जाणतो. आणि शरीअतीत ते अदा करण्याची सक्त ताकीद केली गेली आहे ही ताकीद पूर्वीच्या शरीअतीमध्ये ही राहीली आहे.

२४. म्हणजे ते सर्व फळे तोडून स्वत:साठी राखून घेतील आणि कोणा गोर गरीबास आपल्याजवळ फिरकण्याची संधी देणार नाहीत.

२५. जेव्हा बागेला पाहीले, जी उध्वस्त झाली होती, सुरवातीला, त्यांना वाटले कदाचित वाट चुकून आम्ही चुकीच्या जागी पोहोचलो नंतर त्यांना जाणीव झाली की बाग तर आपल्याच मालकीची आहे परंतु ती इतकी उध्वस्त झाली आहे की कापणी करण्यास काहीच उरले नाही. मनातले मांडे मनातच राहीले.

२६. या बागवाल्यांमध्ये एक मनुष्य असा ही होता, ज्याला अल्लाहने सामजंस्य प्रदान केले होते आणि तो अल्लाहचे नाम:स्मरण व त्याचे पावित्र्यासह गुणगान करणारा होता त्याने त्यांना आठवण करून दिली की, मी तुम्हाला सांगितले नव्हते की तुम्ही अल्लाहची तस्बीह (पावित्र्यासह गुणगान) का करीत नाही? त्याने फार संक्षिप्त परंतु सर्वकष गोष्ट सांगितली जो मनुष्य अल्लाहचे पावित्र्यासह गुणगान करतो तो त्याची अपरिहार्यत: आठवण करतो, तो त्याचे पावित्र्य वर्णन करतो, तर तो स्वत: एक असमर्थ व विनम्र दास असल्याचे ही मान्य करतो. तो आत्म-प्रौढी मिरवित नाही किंबहुना समस्त कार्य अल्लाहच्याच भरवशावर करतो आणि आपल्या जबाबदारींची जाणीव बाळगत आपले कर्तव्य पार पाडतो.

२७. त्यावेळी त्यांना ही जाणीव झाली की बागेचा सर्वनाश हा अल्लाहचा अत्याचार नव्हे, तो पवित्र आहे या गोष्टी पासून की एखादे चुकीचे कार्य करावे. खरे पाहता अपराध आमचाच होता की आम्ही अल्लाहला विसरलो होतो. यास्तव आम्हाला आपल्या कृतकर्माची शिक्षा मिळाली.

२८. म्हणजे ते एकमेकांवर दोषरोपण करू लागले की तुम्ही चुकीचा सल्ला दिला आणि आम्ही तुमच्या कहयात आलो.

२९. शेवटी त्यांनी हे मान्य केले की आम्हीच बंडखोर झालो होतो ज्याची शिक्षा आम्हाला मिळाली आणि याचा त्यांना खेद ही वाटला.

३०. त्यांनी मन: पूर्वक क्षमा याचना केली आणि ते आपल्या पालन कर्त्याकडे आशावादी होऊन रूजू झाले.

३१. म्हणजे बंडखोरीच्या परिणाम स्वरूपी अल्लाहचा अजाब (प्रकोप) अवतरीत होतो. ज्या प्रकारे बागेवर आपत्ति आली बागवाले अरेरे करीतच राहीले. त्यांनी आपल्यातल्या चांगल्या माणसाचा उपदेश ग्रहण केला नाही आणि आपल्या दुष्परिणतीस आपल्या डोळयांनी पाहीले.

काफिरांनी (इन्कार करणाऱ्यांनी) या पासून बोध घ्यावा त्यांच्या दरम्यान अल्लाहचा पैगंबर सर्वाधिक चांगले व्यक्तिमत्व आहे. जे त्यांचे हितचिंतन करीत आहेत. परंतु जर त्यांनी पैगंबरांचे म्हणणे ऐकले नाही आणि एकेश्वरवाद कबूल करण्या करीता तयार झाले नाही तर त्यांना विद्रोहाची शिक्षा या जगात ही भोगावी लागेल आणि मरणोत्तर जीवनात तर याहून कित्येक पट अधिक शिक्षा भोगणे क्रमप्राप्त ठरेल.

إِنَّ لِلْمُتَّقِينَ عِندَ رَبِّهِمْ جَنَّٰتِ ٱلنَّعِيمِ ﴿٣٤﴾

३४. निःसंशय अल्लाहचे भय अंगिकारणाऱ्यां करीता, त्यांच्या पालन कर्त्या जवळ देणग्यांनी युक्त अशा जन्नती आहेत.[३२]

أَفَنَجْعَلُ ٱلْمُسْلِمِينَ كَٱلْمُجْرِمِينَ ﴿٣٥﴾

३५. काय आम्ही आज्ञा धारकांना अपराध्यां सारखे करू?

مَا لَكُمْ كَيْفَ تَحْكُمُونَ ﴿٣٦﴾

३६. तुम्हा लोकांना झाले तरी काय, कसा निर्णय घेता ?[३३]

أَمْ لَكُمْ كِتَٰبٌ فِيهِ تَدْرُسُونَ ﴿٣٧﴾

३७. काय तुमच्या जवळ एखादा ग्रंथ आहे, ज्यात तुम्ही वाचता.

إِنَّ لَكُمْ فِيهِ لَمَا تَخَيَّرُونَ ﴿٣٨﴾

३८. की तुमच्या करीता तेच काही आहे जे तुम्ही पसंत कराल ?[३४]

أَمْ لَكُمْ أَيْمَٰنٌ عَلَيْنَا بَٰلِغَةٌ إِلَىٰ يَوْمِ ٱلْقِيَٰمَةِ إِنَّ لَكُمْ لَمَا تَحْكُمُونَ ﴿٣٩﴾

३९. कि तुमच्या सोबत आमचे वचन-करार आहेत कियामती पावेतो बाकी राहणारे की, तुमच्या करीता तेच काही आहे, ज्याचा तुम्ही निर्णय घ्याल ?[३५]

سَلْهُمْ أَيُّهُم بِذَٰلِكَ زَعِيمٌ ﴿٤٠﴾

४०. यांना विचारा, तुमच्या पैकी कोण याची हमी घेणारा आहे ?[३६]

أَمْ لَهُمْ شُرَكَآءُ فَلْيَأْتُوا۟ بِشُرَكَآئِهِمْ إِن كَانُوا۟ صَٰدِقِينَ ﴿٤١﴾

४१. किंवा यांचे काही सहभागी आहेत तर आणावे आपल्या सहभागींना जर ते सच्चे आहेत.[३७]

يَوْمَ يُكْشَفُ عَن سَاقٍ وَيُدْعَوْنَ إِلَى ٱلسُّجُودِ فَلَا يَسْتَطِيعُونَ ﴿٤٢﴾

४२. ज्या दिवशी भयंकर संकट कोसळेल[३८] आणि या लोकांना सजद्या करीता बोलाविले जाईल, तेव्हा हे सजदा करू शकणार नाहीत.

خَٰشِعَةً أَبْصَٰرُهُمْ تَرْهَقُهُمْ ذِلَّةٌ وَقَدْ كَانُوا۟ يُدْعَوْنَ إِلَى ٱلسُّجُودِ وَهُمْ سَٰلِمُونَ ﴿٤٣﴾

४३. त्यांची दृष्टी खाली असेल, अपमान त्यांच्यावर आच्छादित असेल. सजद्या करीता त्यांना त्या वेळी बोलाविले जात होते, जेव्हा ते धष्टपुष्ट होते[३९] (परंतु त्यावेळी ते इन्कार करीत राहीले)

३२. वर काफिरां करीता अजाबचा उल्लेख होता, या आयतीत अल्लाहचे भय बाळगणाऱ्या करीता आखिरतच्या इनामाचा उल्लेख आहे. कुरआन शिक्षेच्या पैलू सोबतच मोबदल्याचा ही पैलू उल्लेखितो; यासाठी की लोकांनी शिक्षेचे भय बाळगावे व स्वत:ला इनामास पात्र बनवावे.

३३. काफिरांचे सरदार आपल्या सम्पन्न अवस्थे मुळे असे समजत की अल्लाह आमच्यावर प्रसन्न आहे म्हणून त्याने आम्हाला या देणग्या प्रदान केल्या आहेत, या उलट पैगंबर व त्यांच्या अनुयायींना अडचणीचे जीवन जगावे लागत आहे, जे या गोष्टीचे लक्षण होय की अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न नाही. यास्तव जर आखिरत प्रस्थापित झालीच तर तिथे ही आम्हाला ईश देणग्यांनी उपकृत केले जाईल आणि अल्लाहची नाराजी या लोकांच्या वाटयाला येईल. काफिरांच्या या विचाराचे खंडन करीत येथे फर्माविले गेले आहे की काय तुम्ही असे समजता की अल्लाह जवळ त्याच्या आज्ञाधारक दासांची काहीच कदर नाही आणि तो त्यांच्याशी अपराध्यांना साजेलसा व्यवहार करील? आणि तुम्ही कुफ्र व अवज्ञा करीत असतांना ही अल्लाहच्या इनामास पात्र ठराल? कशी अनुचित व अन्यायपूर्ण गोष्ट तुम्ही बोलता?

३४. म्हणजे काय तुमच्या जवळ आकाशातून अवतरलेला एखादा ग्रंथ आहे, ज्यात हे लिहीले आहे की आचरणावर नव्हे तर केवळ तुमच्या मर्जीवर सर्व काही अवलंबून आहे, जे तुम्हाला हवे ते मिळेल.

३५. संकेत आहे या गोष्टीकडे की जर तुम्ही या भ्रमात असाल की आम्ही इब्राहीमचे वंशज आहोत, ज्याच्याशी अल्लाहने वचन करार केले होते. म्हणून आम्ही अल्लाहचे आवडते आहोत. आम्ही वाटेल ते करू आमची काहीच पकड होणार नाही. तेव्हा अल्लाहने इब्राहीमशी त्यांच्या वंशा संबंधाने असे कोणतेही वचन दिले नव्हते. इमामतचा क्रम त्यांच्या वंशात चालविला जाणार होता. या बाबत हे स्पष्ट केले गेले होते की لَايَنَالُ عَهۡدِى الظّٰلِمِيۡنَ ''माझे हे वचन अत्याचारी बाबत नाही'' बकरा-१२४ आणि अल्लाहने कोणत्याही जन समूहास मुक्ति-पत्र लिहून दिलेले नाही की ज्यामुळे तो मनाला येईल तसे वागण्यास स्वतंत्र आहे. किंबुना पैगंबरांच्या माध्यमान्वये प्रत्येक मनुष्य आपल्या आचरणास जबाबदार आहे आणि आपल्या आचरणानुसार चांगला वाईट मोबदला त्याला भोगायचा आहे.

३६. म्हणजे तुमच्या पैकी कोण या प्रकारचे वचन-करार सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी स्विकारण्यास तयार आहे? उघड आहे, असे बिनबुडाचे दावे कधी ही सिद्ध करून दाखविले जाऊ शकत नाही.

३७. म्हणजे यांनी ठरविलेल्या सहभागींनी (अल्लाह खेरीजच्या उपास्यांनी) मुक्तिचा परवाना यांना लिहून दिला आहे तर त्यांना समोर आणावे, जेणेकरून वास्तविकता कळून यावी.

मुसलमानां मधील अज्ञानी वर्ग ही या गोड भ्रमात आहे की अमुक एका बुजुर्ग अवलीयाचे आम्ही श्रद्धाळू आहोत म्हणून आमचे आचरण कसे असो, आमची काहीच पकड होणार नाही. आमचे हे बुजुर्ग आम्हाला या जगातही संकटां पासून वाचवतील आणि आखिरत मध्येही आमच्या मुक्तिचे साधन ठरतील.

३८. मूळ ग्रंथात 'साक' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा शाब्दिक अर्थ पोटरी असाही आहे आणि वृक्षाचे खोड व एखाद्या गोष्टीचे मूलतथ्य असा ही आहे. या ठिकाणी हा शब्द सामान्य नाम म्हणून वापरला गेला आहे आणि एका विशिष्ट पद्धतीत. यास्तव शब्द कोषकार म्हणतात की हा अरबी भाषेचा वाक्प्रचार आहे, ज्याचा अर्थ घटनेची प्रखरता असा आहे. यास्तव लिसानुल अरब या शब्द कोषातील उल्लेख पुढील प्रमाणे :

**الساق فى اللغة الامر الشديد ، وكشفه مثل فى شدة الامر كمايقال للشحيح يده مغلولة لايدثم ولاغُلَّ وَاِنَّماهُوَمَثَلٌ فى شدة البخل ، وكذ الك هٰذا، لاساق هناك ولاكشف۔** (لسان العرب ج ا ص ١٦٨)

'' साक'' शब्द कोपात एखाद्या गोष्टीच्या तीव्रतेस म्हणतात आणि याचे प्रकट होणे गोष्टीच्या तीव्रते करीता उदाहरण म्हणून आहे. ज्या प्रमाणे कंजूस पणा करीता म्हटले जाते की याचा हात बांधलेला आहे, वास्तविक अशा प्रसंगी ना हात असतो आणि ना कसले बंधन किंबहुना अत्याधिक कंजूसपणा करीता हे एक उदाहरण दिले जाते. अशा प्रकारे या ठिकाणी (या वाकप्रचारत) ही ना साकचे कसले अस्तित्व आहे आणि ना प्रकटीकरणाचे.' (लिसानुल अरब खंड- १० पृ. १६८)

सर्व सामान्य भाष्यकारांनी ही यास गोष्टीच्या तीव्रतेच्या अर्थाने घेतले आहे म्हणून आम्ही याचा अनुवाद 'ज्या दिवशी भयंकर संकट कोसळेल' असा केला आहे. परंतु काही भाष्यकारांनी याचा अर्थ असा लावला आहे की 'कियामतीच्या दिवशी जेव्हा अल्लाह आपली पोटरी उघडेल' आणि याच्या समर्थनार्थ सहीहैनचे ते हदीस-वचन प्रस्तुत करतात ज्यात उल्लेखिले गेले की :-

**يَكۡشِفُ رَبُّنَاعَنۡ سَاقِهٖ۔** (بخارى كتاب التفسير)

'जेव्हा आमचा पालनकर्ता आपली पोटरी उघडेल' (बुखारी - किताबुत्तफसीर)

परंतु हे कथन कुरआनाच्या निवेदनाशी सुसंगत नाही कारण कुरआनाने अल्लाहच्या पोटरीचा कसलाही उल्लेख केलेला

नाही,किंबहुना सामान्य नाम साक (पोटरी) चा वापर केला गेला आहे आधिक हे की उल्लेखित हदीस वचन जर सहीहैनचे आहे,परंतु याचे एक कथनकर्ते जैद बिन अस्लम आहेत ज्यांच्या विषयी बोलण्यास वाव आहे इब्ने उऔना म्हणतात जैद बिन अस्लम सदाचारी मनुष्य होते परंतु पाठांतराच्या बाबतीत कमकुवत होते आणि अबुहातिम म्हणतात जैद यांचे अबुसईद पासून कथन 'मुर्सल' होते इब्ने हब्बान यांनी यांची गणना सिक़ह (विश्वसनीय) कथन कर्त्यां मध्ये केली आहे आणि इब्न अब्दुल बर यांनी प्रस्तावनेत जे सांगितले आहे त्यावरून असे दिसते की ते 'तदलास' करीत असत आणि ही गोष्ट, हदीसच्या सनदीमध्ये उणीव राखते. (तहजीबुत्तहज़ीब - खंड - ३ पृ. ३९७)

आणि उबैदुल्लाह बिन उमर म्हणतात की आम्ही त्यांच्या पासून कथन करण्यात संकोच बाळगत नाही परंतु ते कुरआनाचे भाष्य आपल्या मतानुसार करीत (मिजानुल एतेदाल खंड २ पृ. ९८)

असे दिसून येते की हे हदीस वचन मूळ शब्दा खेरीज निवेदिले गेले आहे. (म्हणजे मूळ शब्द सुरक्षित नाहीत म्हणून कुरआनाचे शब्दच मूल प्रमाण होत आणि ते गोष्टीच्या तीव्रतेच्या अर्थाने आहेत.

३९. म्हणजे हश्रच्या मैदानात एक प्रसंग असा असेल की जेव्हा या काफिरांना म्हटले जाईल की अल्लाहला सजदा करा आणि ते सजदा करू इच्छितील,परंतु त्यांची पाठ वाकू शकणार नाही; आणि ते विवश होऊन राहतील. हे अशासाठी दाखविले जाईल की त्यांना ही जाणीव व्हावी की जगात भलेचंगे असतांना ही त्यांनी अल्लाहला सजदा केला नाही किंबहुना अल्लाह खेरीजच्या उपास्यांपुढे, दैवतांपुढे झुकत होते, त्यांना साष्टांग प्रणिपात घालत होते. वास्तविक तेव्हा ही त्यांना अल्लाहला सजदा करण्यास सांगितले जात होते. त्यांना अल्लाहचा पैगंबर एक अल्लाहची उपासना करण्याचे आवाहन करीत होता, ज्यात त्याला सजदा करणे ही अंतर्भूत होते. या सजद्याला इन्कार करून त्यांनी स्वत:ची केवढी अवमानपूर्ण दशा करून घेतली!

**तेव्हा (हे पैगंबर !) सोडून द्या मला व त्यांना जे या वाणीला खोटे ठरवितात.आम्ही त्यांना अशा प्रकारे हळू हळू (दुष्परिणतीस) पोहचवू की त्यांना खबर ही होणार नाही. मी त्यांना ढील देत आहे. माझी उपाय योजना अतिशय मजबूत असते.*(अल-कुर्आन)***

४४. तेव्हा (हे पैगंबर !) सोडून द्या मला व त्यांना जे या वाणीला खोटे ठरवितात.[४०] आम्ही त्यांना अशा प्रकारे हळू हळू (दुष्परिणतीस) पोहचवू की त्यांना खबर ही होणार नाही.[४१]

فَذَرْنِي وَمَنْ يُكَذِّبُ بِهَٰذَا الْحَدِيثِ ۖ سَنَسْتَدْرِجُهُمْ مِنْ
حَيْثُ لَا يَعْلَمُونَ ﴿٤٤﴾

४५. मी त्यांना ढील देत आहे. माझी उपाय योजना अतिशय मजबूत असते.

وَأُمْلِي لَهُمْ ۚ إِنَّ كَيْدِي مَتِينٌ ﴿٤٥﴾

४६. काय तुम्ही त्यांच्या कडून एखादे पारिश्रमीक मागत आहात की हे त्या भुर्दंडाच्या (ओझ्या) खाली दाबले जात असावेत ?[४२]

أَمْ تَسْأَلُهُمْ أَجْرًا فَهُمْ مِنْ مَغْرَمٍ مُثْقَلُونَ ﴿٤٦﴾

४७. कि यांच्या जवळ अपरोक्ष-ज्ञान आहे, ज्यास हे लिहीत असावेत ? [४३]

أَمْ عِنْدَهُمُ الْغَيْبُ فَهُمْ يَكْتُبُونَ ﴿٤٧﴾

४८. तेव्हा (हे पैगंबर !) आपल्या पालन कर्त्याच्या निर्णया पर्यंत धीर धरा [४४] आणि मासे वाल्यां सारखे होऊ नका [४५] जेव्हा त्याने (आपल्या पालन कर्त्यास) पुकारले आणि तो दु:खाने गुदमरलेला झाला होता.[४६]

فَاصْبِرْ لِحُكْمِ رَبِّكَ وَلَا تَكُنْ كَصَاحِبِ الْحُوتِ
إِذْ نَادَىٰ وَهُوَ مَكْظُومٌ ﴿٤٨﴾

४९. जर त्याच्या पालन कर्त्याची कृपा त्या प्रत पोहचली नसती तर तो दुरावस्थेत उघडया मैदानातच टाकला गेला असता.[४७]

لَوْلَا أَنْ تَدَارَكَهُ نِعْمَةٌ مِنْ رَبِّهِ لَنُبِذَ بِالْعَرَاءِ
وَهُوَ مَذْمُومٌ ﴿٤٩﴾

५०. मग त्याच्या पालन कर्त्याने त्याला निवडले आणि त्याला सदाचारी लोकांमध्ये सामील केले.[४८]

فَاجْتَبَاهُ رَبُّهُ فَجَعَلَهُ مِنَ الصَّالِحِينَ ﴿٥٠﴾

५१. जेव्हा हे काफिर स्मरणिका (बोध) ऐकतात, तेव्हा अशा प्रकारे तुम्हाला पाहतात की जणू आपल्या नजरांनी तुम्हाला डगमगित करावे.[४९] आणि म्हणतात की हा निश्चितच वेडा आहे !

وَإِنْ يَكَادُ الَّذِينَ كَفَرُوا لَيُزْلِقُونَكَ بِأَبْصَارِهِمْ لَمَّا سَمِعُوا الذِّكْرَ
وَيَقُولُونَ إِنَّهُ لَمَجْنُونٌ ﴿٥١﴾

५२. वास्तविक हे (कुरआन) इहलोक वाल्यां करीता एक उपदेश आहे.[५०]

وَمَا هُوَ إِلَّا ذِكْرٌ لِلْعَالَمِينَ ﴿٥٢﴾

४०. म्हणजे आता तुम्ही या खोटे ठरविणाऱ्यांची काळजी करू नका आता मी आहे नि ते आहेत.

४१. म्हणजे अशी साधने निर्माण करीन की ते बाहय स्थितीस पाहून आपल्या करीता सुखशांती दायक जाणतील परंतु ती यांच्या विनाशाची सामुग्री असेल. काफिर स्वत:ला सुस्थितीत पाहून भ्रमात राहतात परंतु त्यांची ही सम्पन्नावस्थाच त्यांच्या दुरावस्थेला कारणीभूत ठरते. अशा प्रकारे ते अल्लाहच्या धर्माचा विरोध करण्यात ज्या युक्तया लढवितात त्या अंगलट येतात जे जाळे ते फेकतात त्यात स्वत: अडकून बसतात.

४२. याचे स्पष्टीकरण सूरह शोअरा टीप क्र. ९८ मध्ये केले गेले आहे.

४३. याचे स्पष्टीकरण सूरह तूर टीप क्र. ४० मध्ये केले गेले आहे.

४४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही ताकीद केली गेली की तुम्ही धैर्यपूर्वक अल्लाहच्या निर्णयाची प्रतिक्षा करा. जोपर्यंत तो आदेश देत नाही आपले स्थान सोडून इतरत्र जाऊ नका.

४५. मासे वाल्याशी अभिप्रेत पैगंबर हजरत यूनुस होत. त्यांना एका माशाने गिळले होते. त्यांच्या जनसमूहाने त्यांना खोटे ठरविले होते म्हणून ते संतप्त होऊन वस्ती सोडून निघून गेले होते आणि अल्लाहच्या आदेशाची वाट बघितली नव्हती. त्यांच्या या चुकीपायी त्यांना अल्लाहने माशाच्या पोटात पाठविले होते. ही घटना सूरह साफ्फात आयत क्र. १३९ ते १४८ मध्ये निवेदिली गेली आहे. या ठिकाणी या घटनेचा निर्देश करून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना फर्माविले गेले आहे की त्यांच्या सारखी घाई करू नका आणि जोपर्यंत अल्लाह स्थलांतराचा आदेश देत नाही आपले स्थान सोडू नका.

४६. म्हणजे पैगंबर यूनुस यांनी माशाच्या पोटात दु:खातिरेकाने क्षीण होत असतांना अल्लाहला पुकारले. त्यांनी अल्लाहचे पावित्र्यासह गुणगान केले. परिणामी अल्लाहने त्यांना माशाच्या पोटातून मुक्ति दिली त्यांच्या त्या तस्बीह (पावित्र्यासह गुणगाना) चा उल्लेख सूरह अंबिया आयत क्र. ८७ मध्ये केला गेला आहे.

४७. म्हणजे माशाने जेव्हा त्यांना ओकून बाहेर टाकले होते ते एक सपाट मैदान होते. तिथे ते मोठया वाईट अवस्थेत पडून राहीले असते परंतु अल्लाहची त्यांच्यावर कृपा झाली आणि त्या उघडया मैदानात ही अल्लाहने त्यांच्या करीता सावली असलेले झाड उगविले आणि त्यांचे सर्व प्रकारे सहाय्य केले. पहा सूरह साफ्फात टीप क्र. १२८

४८. म्हणजे त्यांच्या चुकीला माफ करून प्रेषित्वाचे कर्तव्य पार पाडण्या करीता त्यांना पुन्हा निवडले आणि त्यांना आत्म सुधाराची सुबुद्धि प्रदान केली; व त्यांना सदाचारी लोकांमध्ये सामील केले.

पैगंबर जीवन एक आदर्श असतो. जर एखाद्या वेळी त्यांच्या कडून लहान सहान चूक घडून येते तेव्हा अल्लाह त्यांना त्याबाबत सावध करतो आणि मग ते त्वरीत आपल्या आचरणात सुधारणा करून घेतात. अशा प्रकारे ना त्यांच्या सदाचरणावर आच येते आणि ना लोकांना चुकीचे मार्गदर्शन घडते.

४९. हा आशय आहे काफिरांच्या कपटपूर्ण नजरांनी पाहण्याचा. ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जेव्हा कुरआन ऐकवितांना पाहात, तेव्हा क्रोधित नजरेने पाहात व अशा प्रकारे त्यांना हतोत्साहीत करण्याचा प्रयत्न करीत की जेणेकरून त्यांनी डगमगून जावे. परंतु त्यांच्यावर अल्लाहची महत्कृपा अशी झाली की काफिरांच्या या हरकतींचा त्यांच्यावर काही प्रभाव पडू शकला नाही.

नजरेने डगमगित करण्याचा आशय तोच होय जो वर सांगितला गेला आहे आणि ही अशा स्वरूपाची गोष्ट होय जसे आपण म्हणतो, 'तो मला अशा प्रकारे पाहात होता की आता गिळून टाकील' याचा अर्थ खऱ्या अर्थाने गिळून टाकणे असा नव्हे, किंबहुना क्रोधातिरेकाने पाहणे असा आहे.

काही भाष्यकारांनी या आयती द्वारे दृष्ट लागणे (नजर लागणे) सत्य असण्याबद्दल युक्तिवाद केला आहे आणि या संदर्भातच اَلْعَيْنُ حَقٌّ 'दृष्ट लागणे खरे आहे' हे हदीस वचन ही प्रस्तुत केले आहे ज्यास बुखारी, मुस्लिम, अबु दाऊद यांनी उल्लेखिल आहे (पहा बुखारी किताबुत तिब्ब, मुस्लिम - किताबुस्सलाम, अबु दाऊद- किताबुत्तिब) परंतु दृष्ट लागणे ज्या अर्थाने बोलले जाते ते असे की एखाद्याने एखाद्याला वाईट किंवा जळजळीत नजरेने पहावे आणि या वाईट नजरेच्या प्रभावाने त्याची तब्बेत बिघडावी किंवा तो आजारी पडावा. परंतु आयतीत असे काहीच सांगितले गेले नाही यात जी गोष्ट सांगितली गेली आहे ती ही की हे काफिर पैगंबरांना जेव्हा ते कुरआन ऐकवित असतात, अशा रागाने पाहतात की जणू आपल्या तीव्र दृष्टीने (क्रोधित नजरेने) पैगंबरांना आपल्या स्थाना पासून हटवतील. कोठे ही गोष्ट जी अलंकारीक शैलीत सांगितली गेली आहे आणि कोठे 'दृष्ट लागण्याची' गोष्ट थोडक्यात म्हणजे या आयती वरून दृष्ट लागण्याच्या कल्पने वरील युक्तिवाद उचित नव्हे.

राहीले اَلْعَيْنُ حَقٌّ "दृष्ट लागण्या" संबंधीचे हदीस वचन तर याचा आशय देखील कुरआन व प्रेषित आचरण पद्धतिच्या स्पष्ट आदेशांच्या प्रकाशातच निश्चित केला पाहीजे. कुरआन

भ्रम पूजेची पाळेमुळे खणून काढतो आणि ज्ञानाच्या प्रकाशात चालण्याचे आवाहन करतो :-

وَلَا تَقْفُ مَا لَيْسَ لَكَ بِهِ عِلْمٌ۔ (بنی اسرائیل : ٣٦)

'त्या गोष्टीच्या मागे लागू नका ज्याचे तुम्हाला ज्ञान नाही.' (बनी इस्राईल -३६)

जर एखादा मनुष्य आजारी पडतो तर त्याच्या विषयी हा विचार केला जातो की त्याला दृष्ट लागली आहे. या ठिकाणी हा प्रश्न उद्‌भवतो की हे कसे कळाले की तो दृष्ट लागल्यामुळे आजारी पडला आहे. आणि अन्य एखाद्या कारणा मुळे आजारी पडला नाही? उघड आहे, हा निव्वळ भ्रम आहे आणि भ्रम पूजे करीता कसलीही शास्त्रविहीतता नाही. तसेच दृष्ट लागण्याची ही कल्पना ही विचित्र आहे की एखादा मनुष्य एखाद्याला देखणा पाहून प्रभावित होतो तर त्याची दृष्ट लागते आणि मग तो सुंदर पुरूष वा स्त्री आजारी पडते. प्रश्न हा उद्‌भवतो की दृष्ट एखाद्याच्या गुणविशेषाला बघून लागते कि त्याच्या कपट नितीमुळे? ही कल्पना सुद्धा आहे की एखादा मनुष्य जेवण करीत असेल तेव्हा दुसरा मनुष्य अधाशी नजरेने त्याला पाहतो तर त्याची दृष्ट लागते आणि जेवणाऱ्याला उलटी वगैरे होते. मात्र हे सर्व भ्रमात पडणाऱ्यांच्या बाबतीत होते. इतरां बाबत नाही. असे का? काय हजारो माणसे बाजारात, हॉटेलात जेवण घेत नाही आणि अधाशी लोकांचे त्यांच्या जवळून जाणे येणे होत नाही, मग त्यांना उलटया का होत नाही? यात विशेष भर म्हणजे दृष्ट लागणे हा ही श्रद्धेचाच भाग बनला आहे म्हणून दृष्ट काढण्यासाठी ही एक खास फार्म्युला प्रचलीत आहे. तो म्हणजे थोडीशी हळद, मीठ व राई वगैरे हातात घेऊन त्या (दृष्ट लागलेल्या) माणसाच्या डोक्यापासून पायापर्यंत फिरविले जाते मग आगीत या वस्तू जाळल्या जातात मग त्यांचा जळण्याचा वास आल्यावर असे समजले जाते की आता दृष्ट निघाली. यावरून असे दिसते की ही पद्धत हिंदूकडून घेतली गेली. कारण त्यांच्यात दृष्ट काढण्या करीता जाळण्याची प्रथा आहे. काही असो, दृष्ट लागण्याची व ती काढण्याची कल्पनाच मुळात अज्ञान जन्य आहे. इस्लाम धर्मात अशा भ्रामिक गोष्टींना वा कल्पनांना कसलेही स्थान नाही.

ज्या प्रकारे मनुष्य एखाद्याची करूण किंकाळी ऐकून विमनस्क होतो. भयंकर आवाज ऐकून तो प्रभावित होतो, तद्वतच दृष्टी ही माणसावर परिणाम कारक ठरते. उदाहरणार्थ एखादा मारेकरी ज्या भीषण नजरेने पाहतो, माणूस घाबरून घामाघुम होतो आणि काही भीषण नजरा अशा ही असू शकतात की अत्याधिक प्रभावामुळे माणसाच्या चेहऱ्याचा रंग बदलून जावा. अर्थात हे सर्व नैसर्गिक कारणां मुळे शक्य आहे आणि जेव्हा एखादे ठोस कारण असेल तर आम्ही त्यास या उपद्रव वा त्रासाचे कारण ठरवू जो एखाद्याला पोहोचला असेल दृष्ट लागण्या संबंधीचे हदीस वचन याच अर्थाने आहे. اَلْعَيْنُ حَقٌّ उपद्रवकारी नजरा वाईट प्रभाव पाडतात आणि मनुष्य कधी हतबल होतो तर कधी असा भयकंपित होते की त्याच्या चेहऱ्याचा रंग फिका पडतो. परंतु जर एखादे बाहय कारण नसेल तर एखादा त्रास वा यातना पोहचल्यावर त्याला दृष्ट लागणे समजणे केवळ भ्रम होय आणि एखाद्याच्या बाबतीत हे गृहीत धरणे की त्याची दृष्ट लागली, वास्तविक त्याचा काहीच पुरावा नसावा, दुराग्रह होय आणि हदीस वचनात उल्लेखित आहे की. فَإِنَّ الظَّنَّ أَكْذَبُ الْحَدِيثِ 'दुराग्रह निकृष्टतम (दर्जाचे) असत्य होय.'
اَلْعَيْنُ حَقٌّ दृष्ट लागण्या संबंधीचा जो अर्थ आम्ही वर सांगितला आहे त्याचे समर्थन सहीह मुस्लिमच्या या हदीस वचनाने ही होते.ज्यात हजरत जिब्रील यांनी पैगंबर आजारी असतांना जी दुआ (प्रार्थना) म्हटली होती; त्यात اَوْ عَيْنِ حَاسِدٍ اللّٰهُ يَشْفِيْكَ 'द्वेष करणाऱ्याच्या नजरेच्या उपद्रवापासून, आल्लाह आपणास स्वास्थ्य प्रदान करो.' (मुस्लिम-किताबुस्सलाम) हे शब्द आहेत, जे सूरह फलकची आयत وَمِنْ شَرِّ حَاسِدٍ اِذَا حَسَدَ 'द्वेष करणाऱ्याच्या उपद्रवा पासून, जेव्हा तो द्वेष करील'च्या शब्द व आशायाशी सुसंगत आहेत (या आयतीच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फलक टीप क्र. ७) म्हणूनच اَلْعَيْنُ حَقٌّ दृष्ट लागण्या संबंधीच्या हदीस वचनास अशा कोणत्याही अर्थाने घेणे योग्य ठरणार नाही जे बाहय कारणांच्या विरूद्ध असावा व भ्रमात पाडणारा असावा.

हदीस वचनात दृष्ट लागल्यामुळे स्वास्थ्य लाभा करीता ही तीच दुआ योजिली गेली आहे जी इतर आजारांपासून मुक्ति मिळविण्या करीता आहे :-

اَذْهِبِ الْبَأْسَ رَبَّ النَّاسِ وَاشْفِ اَنْتَ الشَّافِيْ۔ لَا شِفَاءَ اِلَّا شِفَاءُكَ شِفَاءً لَا يُغَادِرُ سَقَمًا۔

(بخاری کتاب الطب)

"हे माणसांच्या पालनकर्त्या! क्लेश-यातना दूर कर स्वास्थ्य प्रदान कर की तूच स्वास्थ्य प्रदान करणारा आहेस. तुझ्या स्वास्थ्या खेरीज कोणतेही स्वस्थ्य नाही. असे स्वास्थ्य प्रदान कर जे कोणत्याही रोगाला बाकी राहू देणार नाही." (बुखारी-किताबुत्तिब)

ही उत्कृष्ट दुआ आहे. हिला सोडून टोणे-टोटके करणे

म्हणजे निर्मळ श्रद्धेत माती कालवणे होय.

५०. म्हणजे कुरआनाला पैगंबरांच्या मुखाने ऐकून हे लोक त्यांना वेडा खुळा म्हणतात.वास्तविक हे कुरआन जगातल्या समस्त मानवां करीता साक्षात बोध आहे आणि त्यांना तो धडा आठवून देत आहे जो त्यांच्या स्वभावात भिनलेला आहे. ही आयत हे ही स्पष्ट करते की कुरआन केवळ अरबी लोकां करीता नाही, तर जगातील प्रत्येक जन-समूहासाठी 'बोध' स्वरूपात अवतरला आहे.

# सूरह
# अल् हाक्कः

# ६९. सूरह अल् हाक्कः

**नाव :** सूरहचा आरंभ ''अल् हाक्क:'' (सत्य होऊन राहणारी वेळ) च्या उल्लेखाने झाला आहे. तद्नुषंगे याच शब्दाला सूरहचे नाव दिले गेले आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि सुरवातीच्या काळात अवतरली आहे.

**मध्यवर्ति कल्पना:** कियामतीची भयानकता व शिक्षे विषयी भय निर्माण करणे, या साठी की लोकांनी शुद्धीवर यावे व त्यांनी मोबदला व शिक्षा या गोष्टींवर विश्वास बाळगावा.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ३ प्रस्तावना स्वरूपाच्या आयती होत, ज्यात कियामत निश्चितपणे असणारी व अपरिहार्यत: घडून येणारी असल्याचे सांगितले गेले आहे.

आयत क्र. ४ ते १२ मध्ये त्या जन समूहांच्या शिक्षेवरून बोध घडविला गेला आहे, ज्यांनी कियामतीचा इन्कार केला होता, व पैगंबरांना खोटे ठरविले होते.

आयत क्र. १३ ते १८ मध्ये कियामतीच्या भयानकतेचे चित्र रेखाटले गेले आहे.

आयत क्र. १९ ते ३७ मध्ये अल्लाहवर श्रद्धा ठेवणारे व श्रद्धा न ठेवणारे तसेच सदाचारी व दुराचारी लोकांची वेगवेगळी परिणती सांगितली गेली आहे.

आयत क्र. ३८ ते ५१ मध्ये काफिरांना संबोधून त्यांच्या वर कुरआन व पैगंबरांची सत्यता स्पष्ट केली गेली आहे.

आयत क्र. ५२ सूरहची समारोपाची आयत होय, ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या पालन कर्त्या (अल्लाह) चे पावित्र्यासह गुणगान करण्याचा आदेश दिला गेला आहे.

# ६९. सूरतुल् हाक्क:

سُورَةُ الْحَاقَّةِ

अयाती - ५२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. सत्य होऊन राहणारी ! [१]

الْحَاقَّةُ ﴿١﴾

२. काय आहे ती सत्य होऊन राहणारी ?

مَا الْحَاقَّةُ ﴿٢﴾

३. आणि तुम्ही काय जाणाल की काय आहे ती सत्य होऊन राहणारी.[२]

وَمَا أَدْرَاكَ مَا الْحَاقَّةُ ﴿٣﴾

४. समूद आणि आदने या खडकाविणाऱ्या आपत्तिस खोटे ठरविले.[३]

كَذَّبَتْ ثَمُودُ وَعَادٌ بِالْقَارِعَةِ ﴿٤﴾

५. तेव्हा समूद एका जबरदस्त चित्काराद्वारे नष्ट केले गेले.[४]

فَأَمَّا ثَمُودُ فَأُهْلِكُوا بِالطَّاغِيَةِ ﴿٥﴾

६. आणि आद वेगाने वाहणाऱ्या थंड वाऱ्यांनी नष्ट केले गेले.[५]

وَأَمَّا عَادٌ فَأُهْلِكُوا بِرِيحٍ صَرْصَرٍ عَاتِيَةٍ ﴿٦﴾

७. अल्लाहने यास सात रात्री व आठ दिवस त्यांना कापून फेकण्या करीता लावून ठेवले [६] तुम्ही त्यांना बघितले असते की अशा प्रकारे (नष्ट होऊन) पडले आहेत की जणू कोसळलेल्या खजुरांचे बुंधे.[७]

سَخَّرَهَا عَلَيْهِمْ سَبْعَ لَيَالٍ وَثَمَانِيَةَ أَيَّامٍ حُسُومًا فَتَرَى الْقَوْمَ فِيهَا صَرْعَىٰ كَأَنَّهُمْ أَعْجَازُ نَخْلٍ خَاوِيَةٍ ﴿٧﴾

८. काय यांच्या पैकी एखाद्यास तुम्ही शिल्लक असलेला पाहता ? [८]

فَهَلْ تَرَىٰ لَهُمْ مِنْ بَاقِيَةٍ ﴿٨﴾

९. आणि फिरऔन व त्याच्या पूर्वीच्या लोकांनी [९] आणि पालथ्या झालेल्या वस्त्यांनी [१०] फार मोठा अपराध केला.

وَجَاءَ فِرْعَوْنُ وَمَنْ قَبْلَهُ وَالْمُؤْتَفِكَاتُ بِالْخَاطِئَةِ ﴿٩﴾

१. अल् हाक्क: कियामतीचे नाव आहे. ज्याचा अर्थ खरे होऊन राहणारी, अपरिहार्यपणे घडून येणारी ती वेळ जेव्हा सत्य अनावरीत होऊन सामोरे येईल.

२. ही शैली याचे महत्व स्पष्ट करते. ही अतिशय असामान्य अशी घटना असेल म्हणून चांगल्या प्रकारे शुद्धीवर या.

३. ज्या जन समूहांनी कियामतीच्या खबरीला जी त्यांना पैगंबरांद्वारे मिळाली होती, खोटे ठरविले होते, परिणाम स्वरूपी त्यांच्यावर अल्लाहचा प्रकोप झाला होता यापैकी काही जन समूहांनचा उल्लेख या ठिकाणी उदाहरणा दाखल दिला गेला आहे या साठी की लोकांनी या पासून धडा घ्यावा.

या आयतीत कियामतीला 'खडकाविणारी आपत्ति' या अर्थाने घेतले गेले आहे. याच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अल्कारीया.

४. जसे की कुरआनाने अन्य स्थानी स्पष्टीकरण दिले आहे समूदला थरकाप उडविणाऱ्या व भयंकर चित्काराद्वारे नष्ट केले होते. असे दिसून येते की ढगांची असामान्य असा गर्जना आणि विजेच्या जबरदस्त कडाडण्याने त्यांच्यावर भयातिरेकाची कैफियत चढवली आणि ते बघता बघता कोसळून गतप्राण झाले.

५. असे दिसून येते की आद जन समूहाचा विनाश अतीशीत वादळी वाऱ्यांमुळे झाला.

६. म्हणजे थंड आणि वेगवान वाऱ्यांचा मारा त्यांच्यावर सतत सात रात्री आणि आठ दिवसां पावेतो होत राहीला आणि आठव्या दिवशी त्यांचा असा नि:पात झाला की ते नावाला ही उरले नाही.

७. खजूरींच्या झाडांचे बुंधे मोठे मजबूत असतात, परंतु जेव्हा वादळाच्या तडाख्यात सापडून धराशायी होतात तर त्यांना पाहून मनुष्य हतप्रभ होतो अगदी हीच अवस्था आद जनसमूहाची झाली, कारण ते ही मोठे शक्तिशाली होते. परंतु थंड आणि वादळी वाऱ्यांनी त्यांना असे धराशायी पाडले की सर्वत्र त्यांच्या प्रेतांचा खच पडला होता.

८. म्हणजे या खोटे ठरविणाऱ्यांना असे नष्ट करून टाकले की यांच्या पैकी एक ही मनुष्य वाचला नाही. अशा प्रकारे त्यांच्या वंशाचा समूळ नाश झाला.

९. म्हणजे फिरऔनच्या आधी अनेक बंदखोर जनसमूह होऊन गेले.

१०. अभिप्रेत लूत जन समूहाच्या वस्त्या होत, ज्या भूकंपाद्वारे पालथ्या घातल्या गेल्या.

१०. त्यांनी आपल्या पालन कर्त्याच्या पैगंबराची अवज्ञा केली,[११] तेव्हा त्याने त्यांना सक्त अजाब (शिक्षे) च्या तावडीत घेतले.

فَعَصَوۡا رَسُوۡلَ رَبِّهِمۡ فَاَخَذَهُمۡ اَخۡذَةً رَّابِيَةً ⑩

११. आम्ही तुम्हाला, जेव्हा पाण्याच्या वादळाने मर्यादा ओलांडली नौकेत चढविले.[१२]

اِنَّا لَمَّا طَغَا الۡمَآءُ حَمَلۡنٰكُمۡ فِى الۡجَارِيَةِ ⑪

१२. अशा साठी की या घटनेस तुमच्या करीता बोध कारक बनवावे [१३] आणि स्मरण राखणाऱ्या कानांनी याचे स्मरण राखावे.[१४]

لِنَجۡعَلَهَا لَكُمۡ تَذۡكِرَةً وَّتَعِيَهَاۤ اُذُنٌ وَّاعِيَةٌ ⑫

१३. मग जेव्हा सूर (तुतारी) मध्ये एक फूंक मारली जाईल.[१५]

فَاِذَا نُفِخَ فِى الصُّوۡرِ نَفۡخَةٌ وَّاحِدَةٌ ⑬

१४. आणि जमीन व पर्वतांना उचलून एका क्षणात त्यांचे तुकडे तुकडे केले जातील.[१६]

وَّحُمِلَتِ الۡاَرۡضُ وَالۡجِبَالُ فَدُكَّتَا دَكَّةً وَّاحِدَةً ⑭

१५. त्यादिवशी घडून येणारी घडूनच येईल.[१७]

فَيَوۡمَئِذٍ وَّقَعَتِ الۡوَاقِعَةُ ⑮

१६. आणि आकाश, विदीर्ण होईल, आणि त्या दिवशी ते अतिशय कमकुवत असेल.[१८]

وَانۡشَقَّتِ السَّمَآءُ فَهِىَ يَوۡمَئِذٍ وَّاهِيَةٌ ⑯

१७. फरिश्ते त्याच्या किनाऱ्यांवर असतील [१९] आणि तुमच्या पालन कर्त्या (अल्लाह) चे सिंहासन त्या दिवशी आठ फरिश्त्यांनी उचलून धरलेले असेल.[२०]

وَّالۡمَلَكُ عَلٰٓى اَرۡجَآئِهَا ؕ وَيَحۡمِلُ عَرۡشَ رَبِّكَ فَوۡقَهُمۡ يَوۡمَئِذٍ ثَمٰنِيَةٌ ⑰

१८. त्या दिवशी तुम्ही लोक हजर केले जाल.[२१] तुमची कोणती ही गोष्ट लपून राहणार नाही.

يَوۡمَئِذٍ تُعۡرَضُوۡنَ لَا تَخۡفٰى مِنۡكُمۡ خَافِيَةٌ ⑱

१९. तेव्हा ज्याचा कर्म लेख त्याच्या उजव्या हातात दिला जाईल [२२] तो म्हणेल, घ्या, वाचा माझा कर्म लेख.[२३]

فَاَمَّا مَنۡ اُوۡتِىَ كِتٰبَهٗ بِيَمِيۡنِهٖ ۙ فَيَقُوۡلُ هَآؤُمُ اقۡرَءُوۡا كِتٰبِيَهۡ ⑲

११. अल्लाहच्या पैगंबरांच्या गोष्टी न मानणे मोठी अवज्ञा व अपराध आहे.

१२. हा संकेत हजरत नूहच्या वृत्तांताकडे आहे जेव्हा पाण्याचे वादळ आले तेव्हा त्यांच्या जन समूहाला बुडविले गेले परंतु ज्या लोकांनी ईमान बाळगले होते, त्यांना हजरत नूह सोबत त्यांच्या नौकेत चढविले गेले व पाण्यात बुडण्या पासून वाचविले. तुम्ही त्यांचेच वंशज आहात. यास्तव त्यांना नौकेत चढविणे म्हणजे मानव जातीला चढविणे होते म्हणून अल्लाहचा हा अनुग्रह तुम्हा सर्वांवर आहे.

१३. या घटनेत हा धडा आहे की अल्लाहशी विद्रोह करणाऱ्यांना व त्याच्या पैगंबराचे म्हणणे न मानणाऱ्यांना केवढी भयंकर शिक्षा मिळते.

१४. म्हणजे मानव-इतिहासाची ही अतिमहत्वपूर्ण व बोधदायक घटना एक स्मरणात राहणारी घटना होय. परंतु हा धडा ते लोक स्मरणात राखतात ज्यांचे कान सत्य गोष्ट ऐकण्याची पात्रता बाळगतात.

१५. म्हणजे सूर (तुतारी) मध्ये एक फूंक मारताच कियामत प्रस्थापित होईल. कियामतीला प्रस्थापित करण्यासाठी अल्लाहला कसल्याही इतमामाची गरज भासणार नाही. फक्त सूर फूंकण्याचाच अवकाश की दुसऱ्याच क्षणी संपूर्ण सृष्टी-व्यवस्था अस्ताव्यस्त! हे सूर फूंकणे जणू कियामतीची नांदीच असेल!

१६. कोणीही या भ्रमाच्या भोपळयात राहू नये की ही जमीन आणि हे मोठ मोठे पर्वत बाकी राहतील. नव्हे, किंबहुना कियामतीचा झटका बसताच त्यांचे कण कण बिखुरले जातील. अल्लाह करीता जमीन व पर्वतांना उचलून (आदळून) क्षत विक्षत करणे अगदी सहज सुलभ आहे. अर्थात हा विध्वंस अशा साठी अंमलात आणला जाईल की माणसांच्या कर्मांचा जाब विचारण्यासाठी एक नवे भूतल अस्तित्वात आणले जावे.

१७. म्हणजे कियामतीचा उद्रेक होईल.

१८. आकाश अतिशय मजबूत आहे, परंतु कियामतीचा बिगुल वाजताच ते कमकुवत होईल. कियामत केवळ जमीनी वरच घडून येणार नाही किंबहुना आकाशांना ही आपल्या विळख्यात घेईल. हे सर्व अशासाठी होईल की एका नियोजना नुसार नवे विश्व उदयास आणले जावे. परंतु विध्वंसकारीतेची घटना एवढी भयंकर असेल की तिच्या केवळ कल्पनेनेच अंगावर शहारे उभे राहतात.

१९. म्हणजे फरिश्ते गोळा होऊन आकाशाच्या किनाऱ्यांशी येतील आणि दरम्यानच्या संपूर्ण वातावरणात विध्वंस; होईल.

२०. ही आयत वेगवेगळया सूक्तिंपैकी आहे आणि याचे स्पष्टीकरण करणे म्हणजे स्वत:ला फितना (उपद्रव) ग्रस्त करणे होय. आयतीत जी गोष्ट सांगितली गेली, आहे तिच्या द्वारे खरे पाहता, अल्लाहच्या न्यायालयाची कल्पना मांडणे अभिप्रेत आहे, जे कियामतीच्या दिवशी प्रस्थापित होईल आणि समस्त सृष्टीचा सत्ताधिकारी अल्लाह आपल्या साम्राज्याच्या सिंहासना वरून फैसले सादर करील. आता याची नेमकी काय कैफियत असेल व हे दृश्य कसे असेल ते कियामतीच्या आधी ध्यानी येऊ शकत नाही.

वेगवेगळया सूक्तिंच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. १३

२१. म्हणजे त्या दिवशी अल्लाह समोर तुम्हा सर्व लोकांना कर्माचा जाब देण्या करीता हजर केले जाईल.

२२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह वाकेआ टीप क्र. ७

२३. म्हणजे तो सदाचारी मनुष्य असेल आणि आपला कर्म लेख आपल्या उजव्या हातात मिळताच आनंद विभोर होईल की हे तर यशाचे लक्षण आहे आणि दुसऱ्यांना तो दाखविणे पसंत करील.

जेव्हा एखादा विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण होतो, तेव्हा आपला रिजल्ट इतरांना मोठया आनंदाने दाखवितो परंतु जो अनुतीर्ण होतो तो आपला रिजल्ट दुसऱ्यांना दाखविणे पसंत करीत नाही. कियामतीच्या दिवशी तेच लोक आपला कर्म लेख इतरांना दाखविणे पसंत करतील जे जगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले असतील.

إِنِّي ظَنَنتُ أَنِّي مُلَٰقٍ حِسَابِيَهْ ٢٠

२०. मी जाणून होतो की मला निश्चितच आपल्या (कर्मांच्या) हिशेबाला तोंड द्यावयाचे आहे.[२४]

فَهُوَ فِي عِيشَةٍ رَّاضِيَةٍ ٢١

२१. तर तो आवडत्या सुख-विलासात राहील.

فِي جَنَّةٍ عَالِيَةٍ ٢٢

२२. अत्युच्च अशा जन्नत मध्ये.

قُطُوفُهَا دَانِيَةٌ ٢٣

२३. जिच्या फळांचे घोस झुकलेले असतील.[२५]

كُلُوا وَاشْرَبُوا هَنِيٓـًٔا بِمَآ أَسْلَفْتُمْ فِي الْأَيَّامِ الْخَالِيَةِ ٢٤

२४. खा आणि प्या मजेने, आपल्या कर्मांच्या मोबदल्यात, जी तुम्ही गत दिवसां मध्ये केलीत.

وَأَمَّا مَنْ أُوتِيَ كِتَٰبَهُۥ بِشِمَالِهِۦ فَيَقُولُ يَٰلَيْتَنِي لَمْ أُوتَ كِتَٰبِيَهْ ٢٥

२५. आणि ज्याचा कर्म लेख त्याच्या डाव्या हातात दिला जाईल, [२६] तो म्हणेल, माझा कर्म लेख मला दिला गेला नसता तर बरे झाले असते.

وَلَمْ أَدْرِ مَا حِسَابِيَهْ ٢٦

२६. आणि मी नव्हतो जाणत की माझा हिशेब केलेला आहे.

يَٰلَيْتَهَا كَانَتِ الْقَاضِيَةَ ٢٧

२७. माझे तेच मरण निर्णायक ठरले असते तर बरे झाले असते.[२७]

مَآ أَغْنَىٰ عَنِّي مَالِيَهْ ٢٨

२८. माझी सम्पत्ति माझ्या उपयोगी पडली नाही.

هَلَكَ عَنِّي سُلْطَٰنِيَهْ ٢٩

२९. माझा सत्ताधिकार (सामर्थ्य - शासन अधिकार) संपला.[२८]

خُذُوهُ فَغُلُّوهُ ٣٠

३०. याला पकडा आणि याच्या गळयात जोखंड टाका.[२९]

ثُمَّ الْجَحِيمَ صَلُّوهُ ٣١

३१. मग याला जहन्नम मध्ये झोकून द्या.

ثُمَّ فِي سِلْسِلَةٍ ذَرْعُهَا سَبْعُونَ ذِرَاعًا فَاسْلُكُوهُ ٣٢

३२. मग याला एका साखळीत, जी सत्तर हात लांब आहे, जखडून टाका.[३०]

२४. म्हणजे मला या गोष्टीची पूर्ण खात्री होती की कियामतीच्या दिवशी मला आपल्या कर्मांचा हिशेब देणे भाग आहे. यास्तव मी या विचारानुसारच आपले जीवन पार पाडले होते.

२५. म्हणजे इतके जवळ असतील की सहजगत्या तोडले जावेत.

२६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह वाकेआ टीप क्र. ८

२७. म्हणजे मी जे मरण पावलो होतो तर सदैव काळा करीताच नष्ट झालो असतो तर बरे झाले असते. हिशेबाचा हा दिवस पाहण्याचा हा प्रसंग आला नसता. यावरून असे दिसते की किती हळहळ पूर्ण गोष्टी असतील ज्या कियामतीच्या दिवशी काफिरांच्या तोंडून निघतील. अल्लाहने याबाबत आधीच सावध केले आहे, जेणेकरून माणसाने तोल सावरावा आणि त्याच्यावर पश्चाताप करण्याची वेळ येऊ नये.

२८. जगात तर मनुष्य शासन व सत्तेच्या धुंदीत गर्विष्ठ बनतो, परंतु कियामतीच्या दिवशी त्याला ही जाणीव होईल की तो हश्रच्या मैदानात एकटा आहे. ना त्याचे अवाढव्य सैन्य त्याच्या सोबतीला आहे आणि ना त्याचे साम्राज्य बाकी आहे. समस्त शासनाधिकार त्याच्या कडून हिरावून घेतले गेले आहेत.

राजे महाराजे व शासन सत्ता बाळगणाऱ्या लोकांसाठी कशी मनाला धक्का देणारी गोष्ट आहे. त्यांनी या आयतीचे विचार पूर्वक पठण केले असते तर बरे झाले असते.

२९. काफिर इकडे पश्चातापाच्या गोष्टी करीतच असेल की तेवढयात फरिश्त्यांना आदेश दिला जाईल की याला पकडून याच्या गळयात जोखंड टाका. हे जोखंड त्यांच्या गर्वाची शिक्षा म्हणून असेल त्यानंतर त्याला जहन्नम मध्ये फेकून देण्याचा आदेश दिला जाईल जसे की पुढे सांगितले गेले आहे.

३०. जगात तो इच्छा अभिलाषांचा दास होता आणि इच्छा अभिलाषांचा हा क्रम मोठा दीर्घ होता; म्हणून त्याला सत्तर हात लांबीच्या शृंखलेत जखडून टाकले जाईल. माणसाला मोबदला त्याच्या कर्मानुरूपच लाभेल.

३३. हा महामहीम अल्लाहवर ईमान बाळगत नव्हता.[३१]

إِنَّهُ كَانَ لَا يُؤْمِنُ بِاللَّهِ الْعَظِيمِ ﴿٣٣﴾

३४. आणि ना गोर गरीबांना जेऊ घालण्यास उत्तेजन देत होता.[३२]

وَلَا يَحُضُّ عَلَىٰ طَعَامِ الْمِسْكِينِ ﴿٣٤﴾

३५. तेव्हा, आज याचा इथे कोणी मित्र नाही.

فَلَيْسَ لَهُ الْيَوْمَ هَاهُنَا حَمِيمٌ ﴿٣٥﴾

३६. आणि ना पू खेरीज याच्या साठी काही भोजन आहे. [३३]

وَلَا طَعَامٌ إِلَّا مِنْ غِسْلِينٍ ﴿٣٦﴾

३७. ज्याला फक्त अपराधीच खातील.

لَا يَأْكُلُهُ إِلَّا الْخَاطِئُونَ ﴿٣٧﴾

३८. नव्हे.[३४] मी शपथ घेतो त्या वस्तूंची, ज्यांना तुम्ही पाहता.

فَلَا أُقْسِمُ بِمَا تُبْصِرُونَ ﴿٣٨﴾

३९. आणि त्या वस्तूंची ही ज्यांना तुम्ही पाहत नाही.[३५]

وَمَا لَا تُبْصِرُونَ ﴿٣٩﴾

४०. की हे एका प्रतिष्ठीत संदेश वाहकाचे कथन आहे. [३६]

إِنَّهُ لَقَوْلُ رَسُولٍ كَرِيمٍ ﴿٤٠﴾

४१. एखाद्या कवीची कल्पना नव्हे . [३७] तुम्ही लोक फार थोडे ईमान बाळगता.[३८]

وَمَا هُوَ بِقَوْلِ شَاعِرٍ ۚ قَلِيلًا مَا تُؤْمِنُونَ ﴿٤١﴾

४२. आणि ना हे एखाद्या ज्योतिषाचे कथन आहे [३९] तुम्ही लोक फार थोडे समजता.

وَلَا بِقَوْلِ كَاهِنٍ ۚ قَلِيلًا مَا تَذَكَّرُونَ ﴿٤٢﴾

४३. हे सर्व विश्वांच्या पालन कर्त्या तर्फे अवतरीत झाले आहे .[४०]

تَنْزِيلٌ مِنْ رَبِّ الْعَالَمِينَ ﴿٤٣﴾

४४. आणि जर या ( पैगंबरा ) ने एखादी गोष्ट (मनाने ) रचून तिचा संबंध आमच्याशी जोडला असता.

وَلَوْ تَقَوَّلَ عَلَيْنَا بَعْضَ الْأَقَاوِيلِ ﴿٤٤﴾

३१. म्हणजे याचे धारिष्टय तर पहा की अल्लाहच्या महानतेस याने ओळखले नाही आणि त्या सर्वात महान अस्तित्वावर ईमान बाळगण्यास नकार दर्शविला. हा काही मामुली अपराध नव्हे तर भयंकर मोठा अपराध आहे कारण हा अल्लाहच्या विरूद्ध उघड उघड विद्रोह आहे.

३२. मनुष्य जेव्हा आपल्या पालन कर्त्याशी बेपर्वा होतो. तेव्हा त्या कामात त्याला काही गोडी वाटत नाही जे अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्या करीता आहेत. ज्याचे एक स्पष्ट उदाहरण गोरगरीबांना व गरजवंतांना जेऊ घालणे व त्यांना जेऊ घालण्याचे इतरांना ही उत्तेजन देणे.

३३. म्हणजे खायला प्यायला पूं सारखी घाणेरडी वस्तू मिळेल. हे अशासाठी की त्याची श्रद्धा व आचरण घाणेरडे होते.

३४. या ठिकाणी 'नव्हे' हा शब्द इन्कार करणाऱ्यांच्या विचारांचे खंडन करण्यासाठी प्रयोजिला आहे. म्हणजे तुमचा हा समज की कियामत घडून येणार नाही, वस्तुस्थितीला धरून नाही.

३५. शपथ साक्ष या अर्थाने आहे. अर्थात ज्या ज्या गोष्टी तुम्ही पाहता त्यात मोबदल्याच्या दिवसाच्या खाणा खुणा अगदी स्पष्ट दिसतात ज्यांना कुरआनाने उघडपणे निवेदिले आहे आणि ज्या गोष्टी तुमच्या दृष्टीला दिसत नाही, उदा. फरिश्ते, जन्नत, दोजख इत्यादी, त्यांच्या विषयी कुरआनाद्वारे तुम्हाला माहीतगार केले गेले आहे. या अपरोक्ष वस्तुस्थितींवर विचार चिंतन केल्याने मोबदल्याच्या दिवसाची खात्री पटते.

३६. अर्थात ही हजरत जिब्रील यांच्या मुखातून निघालेली वचने होत ते अल्लाहचे प्रतिष्टीत संदेश वाहक आहेत. आणि संदेश वाहक या नात्याने ते अल्लाहची वाणी त्याच्या पैगंबरावर अवतरीत करीत आहे. सूरह तक्वीर आयत क्र. १९ मध्ये ही हज़रत जिब्रील विषयी हेच सांगितले गेले आहे.

३७. म्हणजे पैगंबर जी वाणी सादर करीत आहे, ते काव्य नव्हे तर हजरत जिब्रील यांनी आणलेली ईश-वाणी आहे.

३८. म्हणजे ईमानाचा काहीसा प्रभाव स्विकारता आणि मग सोडून देता कुरआनाच्या गोष्टी सत्य असल्यामुळे तुमच्या आत्म्यास अपील करतात व मनात विश्वास निर्माण करतात. परंतु इच्छा अभिलाषांनचे प्राबल्य हा विश्वास आत्मसात करण्यात बाधा बनते.

३९. ज्योतिषीचे स्पष्टीकरण सूरह शूअरा टीप क्र.१८० मध्ये केले गेले आहे.

४०. म्हणजे कुरआन ना काव्य आहे आणि ना भविष्य कथन, किंबहुना अल्लाहची वाणी आहे. जी हजरत जिब्रीलच्या मुखाने पैगंबरांवर अवतरीत केली गेली आहे.

४५. तर आम्ही त्याचा उजवा हात धरला असता.

لَاَخَذْنَا مِنْهُ بِالْيَمِيْنِ ﴿٤٥﴾

४६. मग त्याची मानेची शीर कापून टाकली असती.[४१]

ثُمَّ لَقَطَعْنَا مِنْهُ الْوَتِيْنَ ﴿٤٦﴾

४७. मग तुमच्या पैकी कोणी ही (आम्हाला) या कामापासून रोखू शकला नसता.

فَمَا مِنْكُمْ مِّنْ اَحَدٍ عَنْهُ حٰجِزِيْنَ ﴿٤٧﴾

४८. आणि वस्तुस्थिती अशी की हा [४२] अल्लाहचे भय अंगिकारणाऱ्या करीता एक बोध आहे.

وَاِنَّهٗ لَتَذْكِرَةٌ لِّلْمُتَّقِيْنَ ﴿٤٨﴾

४९. आणि आम्ही जाणतो की तुमच्या पैकी याला खोटे ठरविणारे ही आहेत.

وَاِنَّا لَنَعْلَمُ اَنَّ مِنْكُمْ مُّكَذِّبِيْنَ ﴿٤٩﴾

५०. आणि हा काफिरां करीता दुःखकारक ठरेल.[४३]

وَاِنَّهٗ لَحَسْرَةٌ عَلَى الْكٰفِرِيْنَ ﴿٥٠﴾

५१. आणि हे अगदी खात्री पूर्वक सत्य आहे. [४४]

وَاِنَّهٗ لَحَقُّ الْيَقِيْنِ ﴿٥١﴾

५२. तेव्हा तुम्ही आपल्या महामहीम पालन कर्त्याच्या नावाची तस्बीह (जाप) करा.[४५]

فَسَبِّحْ بِاسْمِ رَبِّكَ الْعَظِيْمِ ﴿٥٢﴾

४१. म्हणजे पैगंबर आपल्या पदावर असतांना आपल्या तर्फे कोणत्याही गोष्टीचा संबंध सरळ अल्लाहशी जोडू शकत नाही. अल्लाहची वाणी जशीच्या तशी प्रस्तुत करण्यास तो जबाबदार आहे जर त्याने आपल्यातर्फे एखाद्या गोष्टीचा अल्लाहशी संबंध जोडला असता, तर या पदाचा गैरवापर झाला असता आणि हा एवढा भयंकर अपराध ठरला असता की आम्ही त्याच क्षणी त्याला नष्ट केले असते आणि ही बोधदायक शिक्षा अशासाठी ही दिली असती की लोकांना चुकीचे मार्गदर्शन लाभू नये.

या शिक्षेचे चित्र काहीच अशा प्रकारे रेखाटले गेले आहे, जणू बादशहाने आपल्या त्या संदेश वाहकाचा,जो त्यच्याशी खोटयानाटया गोष्टींचा संबंध जोडतो, उजवा हात पकडून मान उडवावी.

ही शिक्षा त्याच्या करीता आहे, जो प्रेषित पदावर असतांना आपल्या तर्फे काही गोष्टींचा अल्लाहशी संबंध जोडील याचा हा अर्थ कदापि नव्हे की प्रेषित्वाचा खोटा दावा करणाऱ्या प्रत्येकाला ही शिक्षा त्वरीत मिळेल आणि जर असा दावा करणाऱ्यास ही शिक्षा मिळाली नाही तर त्याचा तो दावा खरा असल्याचे ते प्रमाण ठरेल. आणि कोणतीही गोष्ट आयतीत सांगितली गेली नाही. यास्तव प्रेषित्वाचा खोटा दावा करणारे याचा आधार घेऊ शकत नाही. जगात प्रेषित्वाचा खोटा दावा करणारे तर काय, ईश्वर असण्याचा खोटा दावा करणारे ही होऊन गेलेत; आणि ईश्वराला बरे वाईट बोलणारे ही. परंतु अल्लाह त्यांना सवड देतो जेणेकरून त्यांनी आपला घडा भरून घ्यावा.

४२. म्हणजे कुरआन.

४३. कियामतीच्या दिवशी काफिर दु:ख प्रकट करतील आणि पश्चाताप करतील की कुरआनावर ईमान न बाळगून त्यांनी फार मोठी चूक केली आहे.

४४. म्हणजे कुरआन, जी मोबदल्याच्या दिवसाची खबर देत आहे अगदी सत्य व खात्रीची आहे.त्यात कसल्याही शंकेला वाव नाही. असे असतांना या उघड सत्याचा स्विकार का म्हणून करीत नाही?

४५. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमाने त्यांच्या अनुयायींना ताकीद आहे की ज्याअर्थी वस्तुस्थिती ती आहे, जी या सूरह मध्ये निवेदिली गेली तेव्हा तुम्ही काफिरांच्या बोलण्याला किंमत देऊ नका आणि आपल्या महिमावान पालनकर्त्या अल्लाहच्या नाम: स्मरण व उपासनेत व्यस्त रहा.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह वाकेआ टीप क्र. ५८ व ७६.

# सूरह
# अल मआरिज

# ७०. सूरह अल मआरिज

**नाव :** आयत क्र. ३ मध्ये 'जिल मआरिज' (उंची वाल्या) चा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अल मआरिज' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरां वरून असे दिसून येते की आरंभीच्या काळात शेवटी शेवटी अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पना :** कियामती करीता घाई माजविणाऱ्यांना सावध करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ७ मध्ये कियामतीच्या अजाब करीता घाई करणाऱ्यांना खबरदार केले गेले की तो अजाब आल्याशिवाय राहणार नाही आणि अगदी आपल्या वेळेवर येईल.

आयत क्र. ८ ते १८ मध्ये कियामतीच्या अहवाल सांगितला गेला आहे व तो सांगतांना हे स्पष्ट केले गेले आहे की ती केवढी कठीण वेळ असेल.

आयत क्र. १९ ते २५ मध्ये माणसाचे सर्वसामान्य वैगुण्य दर्शवितांना हे स्पष्ट केले गेले आहे की ही उणीव उपासना (नमाज) द्वारेच दूर होते आणि ते चांगले गुण निर्माण होतात जे माणसाला जन्नत पात्र बनवितात.

आयत क्र. २६ ते ४४ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची थट्टा उडविणाऱ्यांना व कुरआन ऐकविण्या पासून रोखण्या करीता त्यांच्यावर तुटून पडणाऱ्यांना सक्त तंबी दिली गेली आहे.

# ७०.सूरतुल मआरिज

سُوْرَةُ الْمَعَارِجِ

आयती - ४४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. मागणाऱ्याने मागितला तो अजाब (यातना) जो घडून येणार आहे.[१]

سَاَلَ سَآئِلٌۢ بِعَذَابٍ وَّاقِعٍ ۙ ﴿١﴾

२. काफिरांवर, कोणी त्याला टाळणारा नाही.[२]

لِّلْكٰفِرِيْنَ لَيْسَ لَهٗ دَافِعٌ ۙ ﴿٢﴾

३. तो (अजाब) अल्लाह तर्फे असेल, जो उंची वाला आहे.[३]

مِّنَ اللّٰهِ ذِي الْمَعَارِجِ ۭ ﴿٣﴾

४. फरिश्ते आणि रूह (जिब्रील) त्याच्या कडे चढून जातात. एका अशा दिवसात, ज्याचे प्रमाण पन्नास हजार वर्षे आहे.[४]

تَعْرُجُ الْمَلٰٓئِكَةُ وَالرُّوْحُ اِلَيْهِ فِيْ يَوْمٍ كَانَ مِقْدَارُهٗ خَمْسِيْنَ اَلْفَ سَنَةٍ ۚ ﴿٤﴾

५. तेव्हा धैर्य पाळा. उत्तम धैर्य.[५]

فَاصْبِرْ صَبْرًا جَمِيْلًا ﴿٥﴾

६. हे लोक त्याला दूर जाणतात.

اِنَّهُمْ يَرَوْنَهٗ بَعِيْدًا ۙ ﴿٦﴾

७. आणि आम्ही त्याला जवळ पाहात आहोत.[६]

وَّنَرٰىهُ قَرِيْبًا ۭ ﴿٧﴾

८. ज्या दिवशी आकाश वितळलेल्या धातु समान होईल.[७]

يَوْمَ تَكُوْنُ السَّمَاۗءُ كَالْمُهْلِ ۙ ﴿٨﴾

९. आणि पर्वत (पिंजलेल्या) लोकरी समान.[८]

وَتَكُوْنُ الْجِبَالُ كَالْعِهْنِ ۙ ﴿٩﴾

१०. आणि कोणताही मित्र आपल्या मित्राला विचारणार नाही.

وَلَا يَسْـَٔلُ حَمِيْمٌ حَمِيْمًا ﴿١٠﴾

१. काफिर लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना म्हणत की तुम्ही कियामतीच्या ज्या अजाब (यातना) चे भय दाखविता, तो आणा तरी अर्थात ते असे थट्टा उडविण्याच्या हेतुने बोलत. त्याच्या या मागणीचे उत्तर म्हणून फर्माविले गेले की जी शिक्षा तुम्ही इच्छिता, ती निश्चितपणे येईलच. तुम्हाला एका खात्रीपूर्ण गोष्टी बाबत खबरदार केले गेले आहे तरी ही तुम्ही त्याची थट्टा उडवू इच्छितात तर यथेच्छ उडवा. मात्र आपली परिणती ही पहाल.

२. म्हणजे कियामत हमखास उदयास येईल आणि त्या दिवशी काफिरांवर अपरिहार्यत: अल्लाहचा प्रकोप होईल अर्थात ही अगदी अटळ स्वरूपाची गोष्ट आहे. कोणत्याही स्थितीत टळू शकणार नाही.

३. म्हणजे अजाब (शिक्षे) चा हा फैसला अल्लाह तर्फे घेतला गेला आहे, ज्याच्या महानतेचे वैभव असे की त्याच्या दरबारा प्रत पोहचण्या करीता अनेक उंचींना पार करावे लागते. त्या अत्युच्च किंबहुना सर्वोच अस्तित्वाची जाणीव तुम्हाला असती तर निश्चितच तुम्ही त्याचे भय बाळगले असते व त्याच्या प्रकोपा पासून शरण मागितले असते.

४. ही आयत संदिग्ध सूक्तीं पैकी आहे ज्याचा आशय अल्लाह जाणे अर्थात अशा आयतींचे मूळ हकीगत जाणून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वत:ला उपद्रवात टाकणे होय. ईमान बाळगणाऱ्यांची रीत अशी की ते यावर ईमान बाळगतात व त्याच्या स्पष्टीकरणा मागे धावत नाहीत. हजरत इब्ने अब्बास यांना जेव्हा या आयतीचा अर्थ विचारला गेला तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले की मी नाही जाणत. (तफसीर तबरी खंड २९, पृ. ४५)

राहीला या आयतीचा उद्देश्य तर तो म्हणजे अल्लाहच्या महानतेची कल्पना सादर करणे आणि कियामतीची घाई माजविणाऱ्यांवर हे स्पष्ट करणे की या दिवसाचा अजाब त्या अस्तित्वा तर्फे असेल जो सर्वाधिक महान आहे. ज्याच्या दरबारा प्रत पोहचण्या साठी फरिश्त्यांना देखील कित्येक दर्जे व कितीतरी उंचींना पार करावे लागते त्या सर्वोच्च अल्लाह तर्फे जो अजाब होईल त्याच्या सक्तीच्या केवळ कल्पनेनेच माणसाचा थरकाप उडावा परंतु हे इन्कार करणारे मात्र त्याची थट्टा उडवून तो लवकर आणण्याची मागणी करीत आहेत.

या प्रसंगी सूरह हज्ज टीप क्र. ८४ आणि सूरह सजदा टीप क्र. ८ विचाराधीन असावी.

५. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ताकीद आहे की या इन्कार करणाऱ्यांच्या गोष्टीवर धीर धरा आणि असे धैर्य पाळा की जणू त्यांच्या बोलण्याचा तुमच्यावर काही प्रभाव पडलाच नाही.

६. म्हणजे कियमाती बाबत त्यांची धारणा अशी की प्रथम तर ती घडणार नाही आणि घडून आलीच तर ती फार लांबची गोष्ट आहे.

वास्तविक, अल्लाहच्या दृष्टीने ती अपरिहार्यपणे घडून येणार आहे, व ती लवकरच घडून येईल. अर्थात जी सवड माणसाला दिली गेली आहे ती अगदी थोडीशीच होय.

७. म्हणजे आकाशाचे मूलतत्व तप्त होऊन धातुप्रमाणे वितळू लागेल.

८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह कारिया टीप क्र. ५

११. वास्तविक ते यांना दाखविले जातील.[९] अपराधी असे इच्छा बाळगतील की त्या दिवसाच्या अजाब पासून सुटका मिळविण्या करीता फिदिया (मुक्ति साठी दिले जाणारे द्रव्य) म्हणून आपल्या पुत्रांना द्यावे.

يُبَصَّرُونَهُمْ ۚ يَوَدُّ الْمُجْرِمُ لَوْ يَفْتَدِي
مِنْ عَذَابِ يَوْمِئِذٍ بِبَنِيهِ ﴿١١﴾

१२. आपली पत्नी आणि आपल्या भावाला,

وَصَاحِبَتِهِ وَأَخِيهِ ﴿١٢﴾

१३. आणि आपल्या कुटुंबाला जे त्याला आश्रय देत होते.

وَفَصِيلَتِهِ الَّتِي تُؤْوِيهِ ﴿١٣﴾

१४. आणि भूतलावरील समस्त लोकांना - आणि स्वत:ला वाचवावे.[१०]

وَمَن فِي الْأَرْضِ جَمِيعًا ثُمَّ يُنجِيهِ ﴿١٤﴾

१५. कदापि नव्हे .[११] ती धगधगणारी आग असेल.

كَلَّا ۖ إِنَّهَا لَظَىٰ ﴿١٥﴾

१६. जी त्वचा सोलून काढील.

نَزَّاعَةً لِّلشَّوَىٰ ﴿١٦﴾

१७. ती आपल्या कडे बोलाविल, त्या प्रत्येक माणसाला ज्याने (सत्याकडे) पाठ फिरवली होती आणि विमुख झाला होता.

تَدْعُو مَنْ أَدْبَرَ وَتَوَلَّىٰ ﴿١٧﴾

१८. सम्पत्ति गोळा केली होती व साठवून साठवून ठेवली होती.[१२]

وَجَمَعَ فَأَوْعَىٰ ﴿١٨﴾

१९. मनुष्य उतावळा निर्माण केला गेला आहे.[१३]

إِنَّ الْإِنسَانَ خُلِقَ هَلُوعًا ﴿١٩﴾

२०. जेव्हा त्याला क्लेश-यातना पोहोचते तेव्हा भय चिंतीत होतो.

إِذَا مَسَّهُ الشَّرُّ جَزُوعًا ﴿٢٠﴾

२१. आणि जेव्हा त्याला सुख समृद्धि लाभते तेव्हा कंजूस बनतो.

وَإِذَا مَسَّهُ الْخَيْرُ مَنُوعًا ﴿٢١﴾

२२. परंतु नमाज पढणारे या पासून अलिप्त (सुरक्षित) आहेत.[१४]

إِلَّا الْمُصَلِّينَ ﴿٢٢﴾

९. म्हणजे कियामतीच्या दिवशी एक मित्र दुसऱ्या मित्राला पहात असेल परंतु त्याच्याकडे विशेष लक्ष देणार नाही; कारण त्याला आपल्याच काळजीने ग्रासले असेल.

१०. कियामतीच्या दिवशी अपराधी ही इच्छा करील की जर तो आपल्या आप्त स्वकीयांना, किंबहुना जगातल्या समस्त लोकांना फिदियात देऊन स्वत: ची सुटका करून घेऊ शकत असेल तर तसे करून मोकळे व्हावे. पण दुर्दैवाने फिदिया देण्याकरीता त्याच्याजवळ काहीही नसेल आणि ना त्याच्या कडून कसलाही फिदिया (दंड) स्विकारला जाईल.

अल्लाहने कियामतीच्या दिवशी माणसाच्या विवशतेची जी दशा असेल, त्याबाबत त्याला आधीच सावध केले आहे, यासाठी की जो मनुष्य आपल्या आप्त स्नेही व स्वकीय व आपल्या राष्ट्रा करीता आखिरतचे ध्येय डावलतो व ऐहिकतेस मजबूत करतो त्याने शुद्धीवर यावे.

११. म्हणजे कियामतीचा इन्कार करणाऱ्यांचा हा विचार अगदी चुकीचा व मिथ्या आहे की जहन्नम सारख्या गोष्टीला त्यांना तोंड देण्याची पाळी येणार नाही.

१२. हे त्याच्या कंजूस पणाचे चित्र आहे की धन जमा करण्या व वाढविण्याची काळजी तो अहोरात्र घेतो परंतु त्यात गरीब व गरजवंतांचा जो वाटा अल्लाहने निश्चित केला होता, त्याबाबत तो बेपर्वा राहीला धन अल्लाहने त्याला यासाठी दिले नव्हते की आपल्या तिजोऱ्या भरगच्च करून ठेवाव्यात, किंबहुना अशासाठी दिले होते की त्याद्वारे आवश्यक तो खर्च पूर्ण केला जावा, त्यात गरजू व गोरगरीबांचा ही हक्क आहे.

१३. म्हणजे माणसाचे हे स्वाभाविक वैगुण्य आहे की तो फार लवकर धीर सोडतो आणि हिम्मत राखत नाही. पुढील आयतीत त्याच्या याच वैगुण्यास स्पष्ट केले गेले आहे. मात्र हे वैगुण्य असे नाही की त्यास दूर करणे अशक्य प्राय असावे. अनुशासना द्वारे ते नक्कीच दूर केले जाऊ शकते आणि पुढे स्पष्ट केल्या प्रमाणे हे अनुशासन नमाजच्या माध्यमाने लाभते. कसोटी पूर्ण जीवनाची ही निकड होती की माणसाच्या अंगी उणीव राखली जावी, जी तो आचरणाने दूर करू शकेल अर्थात या उणीवा अशा नाहीत की त्यांच्यावर माणूस ताबा मिळवू शकत नाही व अगदी विवश होऊन राहतो. जर माणसाच्या रचना वा निर्मितीत अगतिकता स्वरूपाच्या उणीवा असत्या तर नमाजी लोकांना अपवाद ठरविले गेले नसते जसे आयत क्र. २२ मध्ये त्यांना अपवाद ठरविले गेले आहे.

१४. म्हणजे नमाज पढणारे आपल्या या स्वाभाविक वैगुण्यावर मात मिळवतात. ते ना क्लेश यातना पोहचल्यावर उर बडवितात आणि ना सुख समृद्धि लाभल्यावर गोरगरीबांचा हक्क विसरतात. स्पष्ट असावे की नमाजचा हा प्रभाव त्या लोकांच्या जीवनात प्रकट होतो जे सुज्ञता पूर्वक नमाज अदा करतात.

२३. जे आपल्या नमाजचे (वक्तशीर) पालन करतात.[१५]

الَّذِينَ هُمْ عَلَىٰ صَلَاتِهِمْ دَائِمُونَ ﴿٢٣﴾

२४. ज्यांच्या सम्पत्तित एक निर्धारीत हक्क आहे.[१६]

وَالَّذِينَ فِي أَمْوَالِهِمْ حَقٌّ مَّعْلُومٌ ﴿٢٤﴾

२५. याचक आणि वंचिताचा.[१७]

لِّلسَّائِلِ وَالْمَحْرُومِ ﴿٢٥﴾

२६. जे मोबदल्याच्या दिवसाला सत्य जाणतात.

وَالَّذِينَ يُصَدِّقُونَ بِيَوْمِ الدِّينِ ﴿٢٦﴾

२७. जे आपल्या पालन कर्त्याच्या अजाबचे भय बाळगतात.

وَالَّذِينَ هُم مِّنْ عَذَابِ رَبِّهِم مُّشْفِقُونَ ﴿٢٧﴾

२८. कारण त्यांच्या पालन कर्त्याचा अजाब, निर्भय होण्याची बाब नव्हे.[१८]

إِنَّ عَذَابَ رَبِّهِمْ غَيْرُ مَأْمُونٍ ﴿٢٨﴾

२९. आणि ते जे आपल्या लज्जा स्थानांचे रक्षण करतात.

وَالَّذِينَ هُمْ لِفُرُوجِهِمْ حَافِظُونَ ﴿٢٩﴾

३०. मात्र आपल्या पत्न्या व आपल्या ताब्यातील स्त्रीयां (दासीं) खेरीज, की या बाबत त्यांच्यावर कसलाही दोष नाही.[१९]

إِلَّا عَلَىٰ أَزْوَاجِهِمْ أَوْ مَا مَلَكَتْ أَيْمَانُهُمْ فَإِنَّهُمْ غَيْرُ مَلُومِينَ ﴿٣٠﴾

३१. मात्र, जे लोक या खेरीज ही आणखी काही इच्छितील तर ते मर्यादेचे उल्लंघन करणारे आहेत.[२०]

فَمَنِ ابْتَغَىٰ وَرَاءَ ذَٰلِكَ فَأُولَٰئِكَ هُمُ الْعَادُونَ ﴿٣١﴾

३२. जे आपल्या अनामती (ठेवी) व आपल्या वचनाची भीड राखतात. [२१]

وَالَّذِينَ هُمْ لِأَمَانَاتِهِمْ وَعَهْدِهِمْ رَاعُونَ ﴿٣٢﴾

३३. जे आपल्या साक्षींना अदा करतात.[२२]

وَالَّذِينَ هُم بِشَهَادَاتِهِمْ قَائِمُونَ ﴿٣٣﴾

३४. आणि जे आपल्या नमाजचे रक्षण करतात.[२३]

وَالَّذِينَ هُمْ عَلَىٰ صَلَاتِهِمْ يُحَافِظُونَ ﴿٣٤﴾

३५. हेच लोक जन्नतीमध्ये सन्मानपूर्वक राहतील.[२४]

أُولَٰئِكَ فِي جَنَّاتٍ مُّكْرَمُونَ ﴿٣٥﴾

१५. म्हणजे नमाज पढण्यातच खंड पाडीत नाहीत, किंबहुना वक्तशीर व नियमितपणे अदा करीत राहतात.

१६. अभिप्रेत जकात होय, ज्याचे विवरण नंतरच्या काळात सांगितले गेले असले तरी त्याचे आदेश पूर्वीपासून लागू होत राहीले होते तौरात मध्ये ही उत्पन्नाचा दशांश भाग अदा करण्याचा आदेश आहे. पैगंबर हजरत इस्माईल यांनी ही जकात (कर्तव्य दान) देण्याचा आदेश दिला होता म्हणून त्यांच्या वंशात ही हा आदेश चालत आला होता. या व्यतिरिक्त धनिकाच्या धनसम्पत्तित गरजवंतांचा हक्क एक परिचित हक्क आहे ज्यास मनुष्य स्वभाव आणि बुद्धीने जाणतो तात्पर्य, याचा तपशील जाणण्याचे साधन शरीअतच आहे. म्हणून ज्यावेळी हा तपशील अवतरला नव्हता, शरीअतचा संयुक्त आदेश अस्तित्वात होता आणि भूकेल्यांना जेऊ घालणे व गोर गरीबांना दान देणे एक असा हक्क आहे ज्याच्याशी मनुष्य स्वभाव चांगल्या प्रकारे परिचित आहे.

१७. याचे स्पष्टीकरण सूरह जारीयात टीप क्र. ३० मध्ये केले गेले आहे.

१८. म्हणजे माणसाने असे समजू नये की मी अल्लाहच्या अजाब पासून पूर्णतः सुरक्षित आहे, उलट त्याला ही धास्ती लागून रहावी की न जाणो माझ्या हातून कोणकोणता गुन्हा घडून यावा व अल्लाहचा प्रकोप माझ्यावर व्हावा. अल्लाहच्या प्रकोपाचे हे भय माणसाला सावधान करते.

१९. याचे स्पष्टीकरण सूरह मोमिनून टीप क्र. ६ मध्ये केले गेले आहे.

२०. याचे स्पष्टीकरण सूरह मोमिनून टीप क्र. ७ मध्ये केले गेले आहे.

२१. याचे स्पष्टीकरण सूरह मोमिनून टीप क्र.८व ९ मध्ये केले गेले आहे.

२२. म्हणजे आपली साक्ष न्यायपूर्वक अदा करतात. साक्ष देण्यामध्ये एकेश्वरवाद व प्रेषित्वाची साक्ष सर्वात उच्च दर्जाने सामील आहे. आणि त्या साक्षी ही आहेत जो माणसा-माणसाच्या दरम्यान व्यवहार संबंधाने दिली जाते.

२३. नमाजचे रक्षण करण्यात वेळेवर नमाज पढणे व कोणतीही नमाज कजा न करणे, ठीक वूजू करणे, नमाजचे विधी समाधानपूर्वक व गांभीर्यपूर्वक अदा करणे, आपले लक्ष अल्लाहकडे एकाग्र करणे, कुरआनाचे पठण व नमाज मधील सूक्तींवर लक्ष देणे, मन इतस्ततः भटकू न देणे आणि नम्रता व शालीनता पूर्वक नमाज अदा करणे व नमाज संबंधीच्या समस्त आवश्यक गोष्टींची पूर्तता करणे सामील आहे. उदाहरणार्थ पुरूषांकरीता जमात सह नमाज अदा करणे इत्यादी.

वर ईमान बाळगणाऱ्यांचे जे गुण विशेष सांगितले गेले आहे त्यांचा आरंभ नमाजने झाला व समारोप ही नमाजने झाला ज्यावरून हा संकेत मिळतो की हे गुणविशेष नमाजचाच लाभ होय आणि नमाजच याची हमी देते.

२४. म्हणजे जन्नत अगदी फुकटात मिळणारी गोष्ट नव्हे, तर अशाच लोकांना मिळेल जे स्वतःला सद्गुणांनी सजवून जन्नत योग्य बनवतील. फळ तोच खातो, जो मेहनतीने झाड लावतो केवळ इच्छा बाळगल्याने ना झाड उगवते आणि ना त्याचे फळ लाभते. जन्नत देखील सत्कर्मांचेच फळ आहे. म्हणून मेहनत आवश्यक आहे.

३६. तेव्हा (हे पैगंबर !) या काफिरांना झाले तरी काय की ते तुमच्याकडे धावत येत आहेत.[२५]

فَمَالِ الَّذِيْنَ كَفَرُوْا قِبَلَكَ مُهْطِعِيْنَ ﴿٣٦﴾

३७. उजव्या आणि डाव्या बाजूने गटा गटाने.

عَنِ الْيَمِيْنِ وَعَنِ الشِّمَالِ عِزِيْنَ ﴿٣٧﴾

३८. काय यांच्या पैकी प्रत्येक जण ही अपेक्षा बाळगतो की तो देणग्यांनी युक्त अशा जन्नत मध्ये दाखल केला जाईल ?

اَيَطْمَعُ كُلُّ امْرِئٍ مِّنْهُمْ اَنْ يُّدْخَلَ جَنَّةَ نَعِيْمٍ ﴿٣٨﴾

३९. कदापि नव्हे.[२६] आम्ही त्यांना निर्माण केले आहे त्या वस्तू पासून जी ते जाणतात.[२७]

كَلَّا ؕ اِنَّا خَلَقْنٰهُمْ مِّمَّا يَعْلَمُوْنَ ﴿٣٩﴾

४०. नव्हे.[२८] मी शपथ घेतो पूर्वेच्या व पश्चिमांच्या पालन कर्त्याची की आम्ही समर्थ आहोत.[२९]

فَلَاۤ اُقْسِمُ بِرَبِّ الْمَشٰرِقِ وَالْمَغٰرِبِ اِنَّا لَقٰدِرُوْنَ ﴿٤٠﴾

४१. या गोष्टीस की आम्ही यांच्या जागी यांच्याहून चांगले लोक आणावेत आणि आम्ही अगतिक राहणारे नाहीत.[३०]

عَلٰۤى اَنْ نُّبَدِّلَ خَيْرًا مِّنْهُمْ ۙ وَمَا نَحْنُ بِمَسْبُوْقِيْنَ ﴿٤١﴾

४२. यास्तव यांना (यांच्या दशेवर) सोडा की यांनी वल्गना करीत व खेळत रहावे, येथपावेतो की यांना आपल्या त्या दिवसाला तोंड द्यावे लागावे, ज्याचा त्यांच्याशी वायदा केला जात आहे.[३१]

فَذَرْهُمْ يَخُوْضُوْا وَيَلْعَبُوْا حَتّٰى يُلٰقُوْا يَوْمَهُمُ الَّذِىْ يُوْعَدُوْنَ ﴿٤٢﴾

४३. ज्या दिवशी हे आपल्या कबरी मधून अशा वेगाने बाहेर पडतील की जणू एका निशाणा कडे धावत जात आहेत.[३२]

يَوْمَ يَخْرُجُوْنَ مِنَ الْاَجْدَاثِ سِرَاعًا كَاَنَّهُمْ اِلٰى نُصُبٍ يُّوْفِضُوْنَ ﴿٤٣﴾

४४. त्यांच्या नजरा झुकलेल्या असतील. अपमान त्यांच्यावर पसरलेला असेल. हाच तो दिवस, ज्याचा त्यांच्याशी वायदा केला जात होता.

خَاشِعَةً اَبْصَارُهُمْ تَرْهَقُهُمْ ذِلَّةٌ ؕ ذٰلِكَ الْيَوْمُ الَّذِىْ كَانُوْا يُوْعَدُوْنَ ﴿٤٤﴾

२५. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा कुरआन वाचून ऐकवित, तेव्हा काफिर आवाज ऐकून कुरआनाची थट्टा उडविण्या करीता, त्यांच्याकडे धावत येत, त्यांच्या याच हरकतीचे चित्र या आयतींमध्ये सादर केले गेले आहे.

२६. हे काफिरांच्या या विचाराचे खंडन होय की आखिरत प्रस्थापित होणारच नाही आणि जर ती प्रस्थापित झाली तर त्यांना जन्नत लाभेल कारण जगात त्यांना धन सम्पत्तिच्या विपुलतेसह मान सन्मान ही मिळाला आहे आणि हे या गोष्टीचे लक्षण होय की अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न आहे, म्हणून ते आखिरत मध्ये ही अल्लाहच्या देणग्यांना पात्र ठरतील.

२७. म्हणजे जेव्हा आम्ही यांना पाण्याच्या एका तुच्छ थेंबा पासून निर्माण केले आहे तेव्हा यांच्यात ही घमेंड कोठून आली की ते अल्लाहच्या विरोधात ताठ होऊ लागतात? जर त्यांनी आपल्या निर्मितीवर नीट विचार केला असता तर त्यांना हीनतेची जाणीव झाली असती व ते आपल्या पालनकर्त्यापुढे नतमस्तक झाले असते.

२८. म्हणजे त्यांची आत्म प्रौढी व आपल्या निर्मात्याच्या विरोधात घमेंड अगदी कुचकामी आहे.

२९. पूर्व आणि पश्चिम दिशा एकच नव्हे तर अनेक आहेत, आणि त्या सर्वांचा स्वामी अल्लाहच आहे. ज्या प्रकारे जमीनीची पूर्व व पश्चिम दिशा आहे, तद्‌वतच चंद्र आणि ग्रह नक्षत्रांच्या ही पूर्व व पश्चिम दिशा आहेत. आता अल्लाहच जाणो की संपूर्ण सृष्टीत किती पूर्व आणि पश्चिम दिशा आहेत. अर्थात या सर्वांचा स्वामी अल्लाह खेरीज कोण असू शकतो? आणि ही वस्तुस्थिती तो सर्व समर्थ असल्याचे प्रमाणित करते.

३०. म्हणजे जेव्हा अल्लाहचे सामर्थ्य अमर्यादित आहे तेव्हा त्याच्या करीता हे कठीण नव्हे की माणसे मरण पावल्यानंतर त्यांना पुन्हा निर्माण करावे. तो त्यांना केवळ घडविण्यात (Model) पुनश्च निर्माण करू शकत नाही तर त्याने इच्छिल्यास त्यांच्या जागी त्यांच्याहून अधिक चांगल्या बनावटी (Model) चे लोक ही अस्तित्वात आणू शकतो. त्याचे सामर्थ्य माणसाला आजच्या स्वरूपात निर्माण करून संपुष्टात आले नाही की ज्यामुळे तो त्याला दुसऱ्यांदा निर्माण करण्यात किंवा याहून अधिक चांगली निर्मिती घडविण्यात विवश ठरावा.

३१. म्हणजे जर ते या स्पष्ट हकीगतींना कबूल करीत नाही व यांची थट्टा उडविण्यात मग्न आहेत तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडून द्या. कियामतीच्या दिवशी खरे काय ते कळून येईल.

३२. म्हणजे जेव्हा कियामतीच्या दुसरा सूर फुंकला जाईल तेव्हा हे लोक जे दुसऱ्यांदा जिवित होऊन उठण्याचा इन्कार करीत आहेत ते आपल्या कबरी मधून मोठया वेगाने बाहेर पडू लागतील आणि असे धावत असतील की जसे निर्धारीत निशाणा पर्यंत पोहचण्या करीता लोक धाव घेतात.

कबरी मधून निघण्याचा अर्थ जमीनीचे दुभंगणे व त्यातून यांचे बाहेर पडणे. कियामती पावेतो जन्माला येणारी माणसे जे मेल्यावर मातीत मिळाले होते, अल्लाहचा आदेश होताच पुन्हा जिवंत होऊन जमीनीतून बाहेर पडतील आणि घाबरलेल्या अवस्थेत धावत असतील.

# सूरह नूह

# ७१. सूरह नूह

**नाव :** ही सूरह पैगंबर नूह यांच्या आवाहनास सविस्तर पणे प्रस्तुत करते, यास्तव हिचे नाव 'सूरह नूह' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे; आणि अशा परिस्थितीत अवतरली जेव्हा मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या आवाहनाच्या विरोधात प्रखरता अंगिकारली होती.

**मध्यवर्ति कल्पना :** हजरत नूह यांचा वृत्तांत अशा शैलीत सादर केला गेला आहे की पैगंबराचा विरोध करणाऱ्यांनी शुद्धीवर यावे व या दर्पणात आपले प्रतिबिंब न्याहळून पहावे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ४ मध्ये निवेदिले गेले आहे की जेव्हा हजरत नूह यांना त्यांच्या जन-समूहाकडे पैगंबर म्हणून पाठविले गेले होते तेव्हा त्यांनी कोणते आवाहन प्रस्तुत केले.

आयत क्र. ५ ते २० मध्ये हजरत नूह यांच्या आवाहनात्मक प्रयत्नांना सादर करीत त्यांनी आपल्या जन समूहला जी ताकीद केली होती, ती सांगितली गेली आहे.

आयत क्र. २१ ते २४ मध्ये हजरत नूह यांचे अल्लाह समोर गाऱ्हणे मांडले गेले आहे; जे त्यांनी आपल्या जन समूहावर प्रमाण प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या हटवादीपणास लक्षात घेता मांडले होते.

आयत २५ मध्ये त्या अजाबचा उल्लेख आहे, जो नूह यांच्या जन समूहावर अवतरला.

आयत क्र. २६ ते २८ मध्ये हजरत नूह यांची ती दुआ (प्रार्थना) सादर केली गेली आहे, जी त्यांनी त्या अजाब प्रसंगी केली होती, जो त्यांच्या जन समूहावर अवतरला.

# ७१. सूरह नूह

سُورَةُ نُوحٍ

आयती - २८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. आम्ही नूह ला त्याच्या जन-समूहाकडे पाठविले [१] की आपल्या जन समूहास खबरदार करा, या आधी की त्यांच्यावर दु:खदायक अजाब यावा.[२]

إِنَّا أَرْسَلْنَا نُوحًا إِلَىٰ قَوْمِهِ أَنْ أَنذِرْ قَوْمَكَ مِن قَبْلِ أَن
يَأْتِيَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١﴾

२. तो म्हणाला, हे माझ्या लोकांनो ! मी तुमच्या करीता उघड (रित्या) खबरदार करणारा आहे.[३]

قَالَ يَا قَوْمِ إِنِّي لَكُمْ نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿٢﴾

३. की अल्लाहची उपासना करा, त्याचे भय बाळगा आणि माझे आज्ञा पालन करा.[४]

أَنِ اعْبُدُوا اللَّهَ وَاتَّقُوهُ وَأَطِيعُونِ ﴿٣﴾

४. तो तुमचे अपराध माफ करील [५] आणि तुम्हाला एका ठराविक वेळे पावेतो सवड देईल.[६] नि:संशय जेव्हा अल्लाहने निर्धारीत केलेली वेळ येईल तेव्हा ती टाळली जाऊ शकणार नाही.[७] तुम्हा लोकांनी हे जाणून घेतले असते तर बरे झाले असते !

يَغْفِرْ لَكُم مِّن ذُنُوبِكُمْ وَيُؤَخِّرْكُمْ إِلَىٰ أَجَلٍ مُّسَمًّى ۚ
إِنَّ أَجَلَ اللَّهِ إِذَا جَاءَ لَا يُؤَخَّرُ ۖ لَوْ كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿٤﴾

५. नूह ने विनविले, हे माझ्या पालन कर्त्या ! मी आपल्या जन समूहाला अहोरात्र पुकारले.[८]

قَالَ رَبِّ إِنِّي دَعَوْتُ قَوْمِي لَيْلًا وَنَهَارًا ﴿٥﴾

६. परंतु माझ्या पुकारण्याने तर त्यांनी अधिकच पळ काढला.[९]

فَلَمْ يَزِدْهُمْ دُعَائِي إِلَّا فِرَارًا ﴿٦﴾

७. आणि मी जेव्हा देखील त्यांना बोलाविले, या साठी की तू त्यांना माफ करावे.[१०] त्यांनी आपली बोटे आपल्या कानात खुपसली, वस्त्रांनी स्वत:ला झाकून घेतले.[११] आपल्या जिद्दीवर अटळ राहीलेत आणि मोठा गर्व केला.

وَإِنِّي كُلَّمَا دَعَوْتُهُمْ لِتَغْفِرَ لَهُمْ جَعَلُوا أَصَابِعَهُمْ
فِي آذَانِهِمْ وَاسْتَغْشَوْا ثِيَابَهُمْ وَأَصَرُّوا وَاسْتَكْبَرُوا
اسْتِكْبَارًا ﴿٧﴾

८. मग मी त्यांना उंच स्वरात आवाहन केले. [१२]

ثُمَّ إِنِّي دَعَوْتُهُمْ جِهَارًا ﴿٨﴾

१. हजरत नूह यांचा वृत्तांत सविस्तरपणे सूरह हूद मध्ये निवेदिला गेला आहे आणि इतर अनेक सूरतीं मध्ये ही यांचे अंश वर्णिले गेले आहेत. या सूरह मध्ये प्रामुख्याने त्यांच्या आवाहन विषयक प्रयत्नांना सादर केले गेले आहे.

स्पष्ट असावे की हजरत नूह हे प्रथम होऊन गेलेले. पैगंबर होत. जे हजरत आदम नंतर त्यांच्या वंशात, ज्यांच्या वस्त्या इराकच्या उत्तर भागात होत्या आणि ज्यांच्यात एक प्रदीर्घ काळ लोटल्यामुळे श्रद्धा व आचरण विषयक उत्पात निर्माण झाला होता, पाठविले गेले होते.

२. स्पष्ट झाले की एखाद्या पैगंबराचे आद्य कर्तव्य हे ठरते की त्याने लोकांना अल्लाहच्या अजाब पासून खबरदार करावे. समस्त पैगंबरांच्या आवाहनाचे हेच वैशिष्टय आढळून येते, ज्याला कुरआनाच्या परिभाषेत 'भय दाखविणे' म्हटले जाते, यात त्या लोकांकरीत, जे सत्याच्या आवाहनाचे कार्य करण्या करीता उभे राहतील, हे मार्गदर्शन आहे की त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात लोकांना अल्लाहच्या अजाबचे भय दाखवावे; जेणेकरून त्यांनी अल्लाहकडे वळावे.

३. अल्लाहच्या मार्गदर्शना नुसार हजरत नूह यांनी स्वत:ला या स्वरूपात प्रस्तुत केले की ते अल्लाहतर्फे स्पष्टत: खबरदार करणारे आहेत.

४. हजरत नूह यांचे आवाहन थोडक्यात हे होते की केवळ अल्लाहचीच उपासना करा, ज्याचा अर्थ हा होता की शिर्क आणि मूर्तिपूजा सोडा व एक अल्लाहलाच आपले उपास्य बनवा. दुसरे असे की अल्लाहचे भय बाळगा व त्याची अवज्ञा व दुराचार करण्या पासून अलिप्त रहा, ज्याचा अर्थ हा होता की अल्लाहचे भय बाळगत व त्याच्या समोर जाब द्यावा लागेल ही जाणीव बाळगत जबाबदारीचे जीवन पार पाडा. तिसरे असे की पैगंबराचे आज्ञा पालन करा, अर्थात पैगंबराच्या प्रत्येक आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे कारण अल्लाहचे आदेश पैगंबराच्या माध्यमानेच प्राप्त होतात. यास्तव पैगंबराचे आज्ञा पालन खरे पाहता अल्लाहचेच आज्ञा पालन होय.

हजरत नूह यांच्या आवाहनाची ही तीन कलमे होती, ज्यांना पुढे येणाऱ्या स्पष्टीकरणा नुसार, प्रमाणांच्या सामर्थ्यासह प्रस्तुत केले गेले होते.

५. म्हणजे या आवाहनास स्विकार कराल तर अल्लाह तुमचे मागील अपराध माफ करील. ईमान बाळगल्यावर काफिरांचे समस्त मागील अपराध माफ केले जातात, जसे सूरह अन्फाल मध्ये फर्माविले गेले आहे :-

قُلْ لِلَّذِيْنَ كَفَرُوْآاِنْ يَّنْتَهُوْ ا يُغْفَرْلَهُمْ
مَاقَدْسَلَفَ ۔ (انفال:۳۸)

'त्या लोकांना सांगा, ज्यांनी कुफ्र केले आहे, जर ते कुफ्र करण्याचे थांबवतील तर जे काही त्यांच्या हातून यापूर्वी झाले आहे, त्याकरीता त्यांना माफ केले जाईल.'(अन्फाल : ३८)

६. म्हणजे या स्थितीत तुमच्यावर अजाब येणार नाही, किंबहुना त्यावेळ पावेतो तुम्हाला या जगात सवड मिळेल, जी अल्लाहने तुमच्यासाठी निर्धारीत केली आहे.

७. म्हणजे अल्लाहने आचरणाची जी मुदत निर्धारीत केली आहे ती संपल्यानंतर कोणाला ही अधिक सवड लाभणार नाही. यास्तव या संधीला उत्तम जाणून आपले आचरण सुधारा.

८. हा त्या आवाहन विषयक प्रयत्नांचा खुलासा आहे, ज्याच्या करीता हजरत नूह यांनी दीर्घ काळा पावेतो रात्रंदिवस परिश्रम घेतले होते. आवाहन प्रस्तुत करण्यासाठी उचित समय तोच होय. जेव्हा लोक लक्षपूर्वक म्हणणे ऐकतील मग तो दिवसाचा समय असो वा रात्रीचा.

९. एका पैगंबराच्या आवाहनाचा ही प्रभाव लोकांनी आत्मसात केला नाही, उलट त्याच्यापासून अधिकाधिक दूर होत गेले कारण ते फार हट्टी लोक होते. आणि अज्ञानाच्या अंध:कारातून बाहेर पडू इच्छित नव्हते.

१०. हजरत नूह यांचे आवाहान स्विकारण्याचा अर्थ स्वत:ला अल्लाहकडून माफीस पात्र बनविले होते आणि अल्लाहतर्फे माफी ज्याला लाभली, निश्चितच त्याचे कल्याण झाले. परंतु हजरत नूह यांच्या जन समूहाने याची काहीच कदर जाणली नाही.

११. हे त्या प्रतिक्रियेचे चित्र होय जी त्या हट्टी लोकांकडून झाली. त्यांना हजरत नूह यांच्या गोष्टी ऐकणे पसंत नव्हते, म्हणून ते त्यांच्या  पासून तोंड लपवित.

१२. म्हणजे त्यांच्या जमावाला उंच स्वरात संबोधिले. आवाहनाची एक पद्धत लोकांना जाहीरित्या संबोधण्याची आहे, ज्याद्वारे एकाच वेळी उंच स्वरात समस्त जनांना आवाहन प्रस्तुत केले जाते.

९. मग मी त्यांना जाहीर रित्या ही समजाविले आणि एकांतात ही.[१३]

ثُمَّ إِنِّيٓ أَعۡلَنتُ لَهُمۡ وَأَسۡرَرۡتُ لَهُمۡ إِسۡرَارٗا ٩

१०. मी सांगितले, आपल्या पालन कर्त्या जवळ माफी मागा. निःसंशय तो मोठा माफ करणारा आहे.

فَقُلۡتُ ٱسۡتَغۡفِرُواْ رَبَّكُمۡ إِنَّهُۥ كَانَ غَفَّارٗا ١٠

११. तो तुमच्यावर खूप पर्जन्य वृष्टी करील.[१४]

يُرۡسِلِ ٱلسَّمَآءَ عَلَيۡكُم مِّدۡرَارٗا ١١

१२. तुम्हाला सम्पत्ति आणि संततीची विपुलता प्रदान करील. तुमच्या करीता बाग निर्माण करील आणि प्रवाह जारी करील.

وَيُمۡدِدۡكُم بِأَمۡوَٰلٖ وَبَنِينَ وَيَجۡعَل لَّكُمۡ جَنَّٰتٖ
وَيَجۡعَل لَّكُمۡ أَنۡهَٰرٗا ١٢

१३. तुम्हाला झाले तरी काय की अल्लाहच्या महानतेचे भय बाळगत नाही.[१५]

مَّا لَكُمۡ لَا تَرۡجُونَ لِلَّهِ وَقَارٗا ١٣

१४. वास्तविक त्याने तुम्हाला विविध अवस्थां मधून पार पाडून निर्माण केले आहे.[१६]

وَقَدۡ خَلَقَكُمۡ أَطۡوَارًا ١٤

१५. काय तुम्ही पाहत नाही की कशा प्रकारे अल्लाहने सात आकाश थरावर थर बनविले.[१७]

أَلَمۡ تَرَوۡاْ كَيۡفَ خَلَقَ ٱللَّهُ سَبۡعَ سَمَٰوَٰتٖ طِبَاقٗا ١٥

१६. आणि यांच्यात [१८] चंद्राला प्रकाश आणि सूर्याला दिवा बनविले.[१९]

وَجَعَلَ ٱلۡقَمَرَ فِيهِنَّ نُورٗا وَجَعَلَ ٱلشَّمۡسَ سِرَاجٗا ١٦

१७. आणि अल्लाहनेच तुम्हाला जमीनीतून विशेष रित्या उगविले.[२०]

وَٱللَّهُ أَنۢبَتَكُم مِّنَ ٱلۡأَرۡضِ نَبَاتٗا ١٧

१८. मग तो तुम्हाला तिच्यात परतवील [२१] आणि त्यातून बाहेर आणून उभा करील. [२२]

ثُمَّ يُعِيدُكُمۡ فِيهَا وَيُخۡرِجُكُمۡ إِخۡرَاجٗا ١٨

१९. आणि अल्लाहनेच तुमच्या करीता जमीनीला बिछाईत बनविले.[२३]

وَٱللَّهُ جَعَلَ لَكُمُ ٱلۡأَرۡضَ بِسَاطٗا ١٩

२०. या साठी की तुम्ही तिच्या उघडया मार्गांवर चालावे. [२४]

لِّتَسۡلُكُواْ مِنۡهَا سُبُلٗا فِجَاجٗا ٢٠

१३. म्हणजे त्यांच्या बैठकीत ही त्यांना समजाविले, व एकांतात ही त्यांच्या भेटी गाठी घेऊन.

अर्थात ताकीद करण्याचे विविध मार्ग अंगिकारले, अगदी जाहीर रित्या ही त्यांना समजाविले व व्यक्तिगत भेटीत ही, यासाठी की कोणत्या ही प्रकारे त्यांनी आवाहन समजून घेण्यास तयार व्हावे.

१४. असे दिसून येते की लोग पावसाच्या कमतरतेमुळे त्रस्त होते आणि ही अल्लाहतर्फे कसोटी होती, यासाठी की त्यांना आपल्या चुकीच्या वर्तनाची जाणीव व्हावी आणि त्यांनी अल्लाहकडे वळावे. हजरत नूह यांनी त्यांना अल्लाह जवळ क्षमा याचना करण्यास ही सांगितले आणि फर्माविले की या स्थितीत अल्लाह तुमच्यावर मुसळधार पाऊस पाडील.

हजरत नूह यांच्या या ताकीदी वरून स्पष्ट झाले की जो जनसमूह देखील अवर्षणाच्या संकटात सापडला असेल त्याच्या करीता स्विकृत प्रार्थना (दुवा) अस्तगफार (क्षमा याचना) होय. म्हणजे त्या जनसमूहाने आपल्या दुष्कर्माची अल्लाहजवळ माफी मागावी व आपले वर्तन सुधारावे.

१५. मूळ शब्द 'रजा' याचा खरा अर्थ आशा करणे असा आहे. परंतु जेव्हा हा शब्द 'ला' (नकारा) सोबत वापरला जातो, तेव्हा याचा अर्थ 'भय' असा ही होतो. यास्तव 'लिसानुल अरब' या शब्दकोषात पुढील स्पष्टीकरण आहे :-

الرجاء في معنى الخوف لا يكون الا مع الجحد۔

'' 'रजा' हा शब्द भय या अर्थाने याच स्थितीत येतो जेव्हा तो नकारा सोबत प्रयोजिला जावा.''

१६. म्हणजे विचार करा की तुम्ही काय होता व तुम्हाला काय बनविले गेले आहे. तुच्छ पाण्याच्या एका थेंबाला विविध अवस्थां मधून पार पाडून तुम्हाला एक परिपूर्ण मानव बनविले गेले आहे. यावरून काय ही गोष्ट जाहीर होत नाही की तुमचा निर्माता किती महान आहे. मग त्याच्या महानतेचे तुम्ही भय का नाही बाळगत?

१७. सात आकाशांचे थरावर थर असण्याचा अर्थ सात विश्वांचे अस्तित्व होय, ज्यापैकी प्रत्येक विश्वाचे एक स्वतंत्र आकाश आहे आम्हाला दिसणारे हे नीळे आकाश या जगाचे आकाश आहे. सप्त आकाशांचे ज्ञान माणसाला अति प्राचीन काळापासून पैगंबरीय मार्गदर्शनाद्वारे लाभले आहे. यास्तव याचे स्वरूप अखंडीत होय. हजरत नूह यांनी लोकांना आकाशांच्या रचनेवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले, यासाठी की त्यांना अल्लाहच्या अतिमहान सामर्थ्याची कल्पना यावी आणि हजरत नूह यांच्या आवाहनाच्या सत्यतेच्या निशाण्या आकाशातही त्यांनी पहाव्यात.

१८. चंद्र आणि सूर्य आकाश-विश्वात आहेत. यास्तव त्यांचा संबंध आकाशांशी दाखविला गेला आहे.

१९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह 'नबा' टीप क्र. ११

२०. म्हणजे ज्या प्रमाणे रोपटे जमीनीतून उगवते मग विकसित होते. तद्वतच माणसाला अल्लाहने मातीतून निर्माण करून त्याला विकसित केले आहे. तेव्हा हा वंश वृद्धिचा क्रम पाण्याच्या एका तुच्छ थेंबाने सुरू होतो मग तो त्याला अशा प्रकारे विकसित करतो की तो उत्तरोत्तर विकसित होत गुणसम्पन्न मनुष्य बनतो.

२१. म्हणजे पुन्हा तुम्ही मेल्यानंतर मातीतच मिळाल.

२२. म्हणजे कियामतीच्या दिवशी तो तुम्हाला दुसऱ्यांदा जिवंत करून जमीनीतून बाहेर काढील.

२३. म्हणजे असे अनुकूल बनविले की तिच्यावर माणसाचे राहाणे सहज सुलभ झाले.

२४. पहाडांमध्ये दरे-खोरे याच हेतुने राखले गेले आहेत की लोकांनी एका इलाक्यातून दुसऱ्या इलाक्यात जाऊ शकावे.

२१. नूहने विनविले,[२५] हे माझ्या पालन कर्त्या ! यांनी माझी अवज्ञा केली, आणि अशा लोकांचे अनुसरण केले, ज्यांच्या सम्पत्ति व संततीने त्यांच्या तोटयातच वृद्धि केली.[२६]

قَالَ نُوحٌ رَّبِّ إِنَّهُمْ عَصَوْنِي وَاتَّبَعُوا مَن لَّمْ يَزِدْهُ مَالُهُ وَوَلَدُهُ إِلَّا خَسَارًا ﴿٢١﴾

२२. आणि ते फार मोठी चाल खेळले.[२७]

وَمَكَرُوا مَكْرًا كُبَّارًا ﴿٢٢﴾

२३. आणि म्हणाले, कदापि सोडू नका आपल्या उपास्यांना आणि सोडू नका 'वद्द' ला व 'सुवाअ' ला आणि ना 'यगूस' व 'यवूक' आणि 'नस्त्र' ला [२८]

وَقَالُوا لَا تَذَرُنَّ آلِهَتَكُمْ وَلَا تَذَرُنَّ وَدًّا وَلَا سُوَاعًا وَلَا يَغُوثَ وَيَعُوقَ وَنَسْرًا ﴿٢٣﴾

२४. यांनी अधिकांश लोकांना मार्गभ्रष्ट केले आहे, आणि तू या अत्याचारी लोकांच्या मार्गभ्रष्टतेत वाढ कर.[२९]

وَقَدْ أَضَلُّوا كَثِيرًا ۖ وَلَا تَزِدِ الظَّالِمِينَ إِلَّا ضَلَالًا ﴿٢٤﴾

२५. अखेरीस त्यांना आपल्या अपराधां पायी पाण्यात बुडविले गेले.[३०] मग आगीत दाखल केले गेले.[३१] तेव्हा अल्लाहच्या विरोधात त्यांना कोणी सहाय्यक आढळला नाही.[३२]

مِّمَّا خَطِيئَاتِهِمْ أُغْرِقُوا فَأُدْخِلُوا نَارًا فَلَمْ يَجِدُوا لَهُم مِّن دُونِ اللَّهِ أَنصَارًا ﴿٢٥﴾

२६. आणि नूहने दुआ (प्रार्थना) मागितली.[३३] हे माझ्या पालन कर्त्या ! तू जमीनीवर या काफिरांपैकी एक ही वास्तव्य करणारा सोडू नकोस.

وَقَالَ نُوحٌ رَّبِّ لَا تَذَرْ عَلَى الْأَرْضِ مِنَ الْكَافِرِينَ دَيَّارًا ﴿٢٦﴾

२७. जर तू यांना सोडून दिले तर ते तुझ्या दासांना मार्गभ्रष्ट करतील; आणि त्यांच्या पासून जी संतती देखील निर्माण होईल ती दुराचारी व काफिरच असेल.[३४]

إِنَّكَ إِن تَذَرْهُمْ يُضِلُّوا عِبَادَكَ وَلَا يَلِدُوا إِلَّا فَاجِرًا كَفَّارًا ﴿٢٧﴾

२८. हे माझ्या पालन कर्त्या ! मला माफ कर व माझ्या माता पित्यास [३५] आणि त्यांना, जे माझ्या घरात ईमान बाळगणारे बनून दाखल होतील.[३६] आणि समस्त ईमान बाळगणाऱ्या पुरुषांना व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांना [३७] आणि अत्याचारींच्या विनाशात वाढ कर.

رَّبِّ اغْفِرْ لِي وَلِوَالِدَيَّ وَلِمَن دَخَلَ بَيْتِيَ مُؤْمِنًا وَلِلْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَاتِ وَلَا تَزِدِ الظَّالِمِينَ إِلَّا تَبَارًا ﴿٢٨﴾

२५. जेव्हा हजरत नूह यांनी शेकडो वर्षे आवाहन प्रस्तुत करून प्रमाण पूर्णत: प्रस्थापित केले आणि जन समूह कुफ्र करण्यातच रममाण राहीला तेव्हा त्यांनी अल्लाह समोर ते गाऱ्हाणे मांडले जे पुढे निवेदिले गेले आहे.

२६. अभिप्रेत जन समूहाचे ते नेते होत ज्यांना विपुल सम्पत्ति लाभली होती व अपत्ये ही मोठया संख्येने होती. या गोष्टींच्या घमेंडी मुळे ते अल्लाहचे बंडखोर दास बनले होते. त्यांच्या बाहय थाटमाटाने प्रभावित होऊन लोक त्यांच्या कहयात येत होते आणि मार्गभ्रष्ट होत होते.

२७. काफिरांनी हजरत नूह यांच्या विरूद्ध फार मोठे कारस्थान रचले होते, ज्याचा तपशील निवेदिला गेला असला तरी नंतरच्या आयती वरून असे दिसते की त्यांनी अज्ञान पूर्ण रीतीला प्रोत्साहन दिले आणि लोकांना भडकाविले की नूह तुम्हाला आपली उपास्ये सोडण्यास सांगत आहेत. जेणेकरून लोकांनी संतप्त होऊन नूह वर हल्ला करावा.

२८. ही नूह जनसमूहाच्या उपास्यांची (अर्थात मूर्त्यांची) नावे होत. या नावांच्या अर्था विषयी अल्लामा सैयद सुलेमान नदवी यांचे संशोधन पुढील प्रमाणे :-

''**वद्द**'' च्या बाबत माहीत झाले आहे की हा शब्द वुद्द पासून आहे. ज्याचा अर्थ प्रेम असा आहे.

''**सुवाअ**'' या शब्दाशी मिळता जुळता शब्द अरबी भाषेत आढळत नाही संभवत: सवाअच्या अपभ्रंश असावा ज्याचा अर्थ काळ असा आहे.

''**यअूक**'' 'औक' या शब्दा पासून बनला आहे. औक म्हणजे रोखणे अर्थात संकटांपासून रोखतो.

''**यगूस**'' हा शब्द देखील यअकच्या प्रमाणे विशेष नाम होय.

''**गौस**'' (गाऱ्हाणे ऐकणे) याचे विशेषण आहे यगूस म्हणजे गाऱ्हाणे ऐकून घेणारा.

''**नस्र**'' चा शब्दकोषातील अर्थ 'गरूड' असा आहे. याच आकारचा तेजस्वी ताऱ्यांचा एक संग्रह आकाशात आहे ज्याला नस्र म्हणतात नस्र देवता या नात्याने सामी जनसमूहां मध्ये दीर्घ काळापासून पूजला जातो. (अर्दुल कुरआन खंड -२ पृ. २३५, २३६)

या नावांमध्ये यगूस खास अरबी शब्द आहे, जो गौस या शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ गाऱ्हांणे ऐकणे. हे नूह जन-समूहाच्या मूर्तीचे नाव होते. परंतु मुसलमानांच्या एका गटाने ही आपल्या काही बुजुर्गांना 'गौस' पदवी देऊन ठेवली; आणि त्यांना सर्वसाक्षी, सर्वश्रुत आणि गरजपूर्ति करणारे समजून मदती साठी व गाऱ्हाणे ऐकण्यासाठी पुकारतात आणि असे समजतात की अशाने त्यांच्या एकेश्वर वादावर काही ही प्रभाव पडणार नाही. वास्तविक हे उघड शिर्क आहे जो माफ न करण्या जोगा गुन्हा आहे. परंतु जे मुसलमान बिदअतीत मग्न आहेत त्यांना याची जाण नाही. नूह यांचा जन समूह मूर्ति पूजेत मग्न होता आणि हे पीर-भक्तित मग्न आहेत. गाऱ्हाणे ऐकणारा व गरज पूर्ण करणारा (गौस) अल्लाह खेरीज आणखी कोणीही नाही म्हणून केवळ त्यालाच पुकारणे सत्य निष्ठ होय. त्यांनी एकेश्वरवाद व शिर्क मधील फरक जाणून घेतला असता तर बरे झाले असते!

नूह जन-समूहाच्या मूर्त्या त्यांच्या सोबतच वादळ पाण्यात बुडून नाहीसे झाले. तेव्हा त्यांचे अस्तित्वच राहीले नाही काफिर स्वत:बुडाले आणि आपल्या समेत आपल्या उपास्यांना ही घेऊन बुडाले.

मूर्तिपूजेचा आरंभ नूह जन-समूहात झाला होता. हा आरंभ कशा प्रकारे झाला या संबंधी हजरत इब्ने अब्बास यांनी खुलासा केला आहे, तो थोडक्यात असा की मूर्त्यांची ही नावे खरे पाहता नूह जनसमूहाच्या सदाचारी लोकांची नावे होत. जेव्हा ते मरण पावलेत, तेव्हा सैतानाने लोकांच्या मनात ही भावना निर्माण केली की त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांचे पुतळे उभारले जावेत अर्थात या पुतळयांची त्यांनी उपासना केली नाही परंतु त्यांच्या नंतरच्या लोकांनी या पुतळयांची उपासना सुरू केली. (बुखारी-किताबुत्तफसीर)

तात्पर्य हे पुतळे जे त्या थोर व्यक्तिंच्या स्मरणार्थ उभारले गेले होते, मूर्तिपूजेचे साधन ठरलेत. आणि याच कारणास्तव इस्लामने पुतळे घडविणे हराम (अवैध) ठरविले आहे.

२९. ही वचने हजरत नूह यांच्या मुखातून त्या वेळी निघालीत जेव्हा त्यांचा जनसमूह मार्गभ्रष्टतेवर कायम राहीला.

३०. म्हणजे पर्जन्याचे एवढे भयंकर वादळ आले की त्यात सर्व काफिर लोक बुडून गेले. जगात ही शिक्षा त्यांना त्यांच्या अपराधांपायी मिळाली.

३१. म्हणजे त्यांचे शरीर पाण्यात बुडाले असले तरी त्यांचा आत्मा आगीत दाखल झाला.हा अजाब त्यांच्यावर आलमे बर्जख (कबरींच्या विश्वात) होत आहे. आणि कियामतीच्या दिवशी त्यांना सशरीर जहन्नम मध्ये दाखल केले जाईल. या आयती वरून कबरीचा अजाब सिद्ध होतो. या प्रसंगी सूरह मोमीन टीप क्र. ७१ ही विचाराधीन असावी.

३२. ज्या उपास्य-दैवतांना त्यांनी सुखकर्ता, दुखहर्ता समजून घेतले होते, त्यांच्यापैकी कोणीही त्यांच्या मदतीला धावून आले नाही अशा प्रकारे अल्लाहच्या अजाब (शिक्षे) ने या उपास्य दैवतांचे मिथ्या असणे सिद्ध करून दाखविले.

३३. हजरत नूह यांनी ही दुआ (प्रार्थना) त्या वेळी केली, जेव्हा त्यांनी प्रमाण पूर्णत: प्रस्थापित केलेले होते.

यानंतर ही जे लोक काफिर अवस्थेत राहीले आणि त्यांच्याकडून ईमान बाळगतील अशी आशा राहीली नाही; तेव्हा त्यांनी ही दुआ केली. सूरह हूद मध्ये अल्लाहने फर्माविले आहे की:-

وَاُوْحِيَ اِلٰى نُوْحٍ اَنَّهٗ لَنْ يُّؤْمِنَ مِنْ قَوْمِكَ اِلَّا مَنْ قَدْ اٰمَنَ ۔ (ہود۔٣٦)

''आणि नूह वर वहय केले गेले की तुमच्या जन-समूहा मध्ये ज्या लोकांनी ईमान बाळगलेले आहे त्यांच्या खेरीज आता कोणी ही ईमान बाळगणार नाही.'' (हूद-३६)

३४. जन्माला येणारे प्रत्येक मूल (एकेश्वरवादी) स्वभावावर जन्मास येते, असे असले तरी हदीस वचनातील उल्लेखा नुसार त्याचे आई-वडील त्याला यहूदी, ख्रिश्चन, अग्निपूजक व मूर्ति पूजक बनवितात. म्हणजे मनुष्य सर्व सामान्य पणे ज्या वातावरणात वाढतो त्या वातावरणाचा प्रभाव आत्मसात करतो. जर तो अनेकेश्वरवादी वातावरणात राहतो तर अनेकेश्वरवादीच बनतो. आणि फार क्वाचितच असे घडते की त्याने आपल्या मूळ स्वभाव धर्मावर कायम रहावे व वातावरणाचा प्रभाव आत्मासात न करावा. आजच्या प्रगतीशील काळात ही माणसाची दशा अशी आहे की तो ज्या संप्रदाय व पंथात जन्माला आहे आणि जो त्याच्या वाड-वडीलांचा धर्म आहे, त्यालाच तो चिकटून राहतो आणि पक्षपाती वृत्ती त्याला ईश्वर व धर्मा विषयी विशुद्ध बुद्धीने विचार करण्यात प्रवृत्त करीत नाही.

यास्तव हजरत नूह यांनी ही दुआ फर्माविली की, हे ईश्वरा भूतला वरील काफिरांचे अस्तित्वच संपवून टाक, अन्यथा यांच्या पोटी ही काफिरच जन्मतील व या दुराचारी लोकांचा वंशावळ ही दुराचारीच राहील.

३५. हजरत नूह यांनी या प्रसंगी स्वत:साठी क्षमा याचनेची प्रार्थना केली. तसेच आपल्या माता पित्या करीता ही,यावरून हे दिसून येते की त्यांचे माता-पिता दोघेही ईमान धारक होते. आणि आपल्या ईमान धारक माता-पित्या करीता क्षमा याचनेची प्रार्थना करणे म्हणजे त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्याशी नेकीचा व्यवहार करणे होय. इस्लाम धर्माची हीच शिकवण आहे आणि हजरत नूह यांनी आपल्या पश्चात हाच आदर्श सोडला.

३६. तात्पर्य, जो मनुष्य देखील ईमान बाळगत असे, त्याला हजरत नूह यांच्या घरात आश्रय घ्यावा लागत असे, म्हणून हजरत नूह यांनी स्पष्टत: ही दुआ केली की जो मनुष्य देखील माझ्या घरात मोमीन (ईमान बाळगणारा) बनून दाखल होईल, त्याच्या अपराधांना तू माफ कर.

३७. या सोबतच त्यांनी समस्त ईमान बाळगणाऱ्या पुरूष व स्त्रीयां करीता क्षमा याचनेची प्रार्थना केली हजरत नूह यांची ही दुआ जी आयत क्र.२६ ते २८ मध्ये निवेदिली गेली आहे; जनसमूह पाण्यात बुडण्या पूर्वीची आहे. परंतु तिचा उल्लेख शेवटी केला गेला, यासाठी की, हे स्पष्ट व्हावे की ती अगदी प्रसंगानुरूप होती, जिथे काफिरांच्या नशीबी अल्लाहचा प्रकोप आला, तिथे ईमान बाळगणाऱ्यांच्या वाटयास अल्लाह तर्फे क्षमा-दान आले.

# ७२. सूरह अल् जिन्न

**नाव :** या सूरह मध्ये जिन्नांचे निवेदन उल्लेखिले गेले आहे; तद्नुषंगे या सूरहचे नाव 'सूरतुल् जिन्न' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे; आणि सूरह अहकाफच्या आधी अवतरली मजकूरांवरून असे दिसून येते की मक्केच्या सुरवातीच्या काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** हे स्पष्ट करणे की कुरआन आपल्या ईश वाणी असल्याबाबत स्वत:च साक्ष आहे. यास्तव जिन्नांच्या एका जमातीने ही वाणी ऐकल्यावर त्यांची विवेक बुद्धि जागृत झाली व ते उद्गारले, की ही खरोखर अल्लाहची वाणी आहे आणि तत्क्षणी त्यांनी ईमान बाळगले. त्यांनी शिर्क (अनेकेश्वर वादा) ला मिथ्या ठरवित तौहीद (एकेश्वर वादा) ला सत्य ठरविले, ज्याचे आवाहन कुरआन सादर करीत आहे. त्याच प्रमाणे मोबदला व शिक्षा आणि प्रेषित्वावर त्यांनी आपला विश्वास व्यक्त केला.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते १५ मध्ये जिन्नांच्या एका समूहाचे निवेदन उल्लेखिले गेले आहे ज्यात त्यांनी कुरआन अल्लाहची वाणी असल्या बद्दल व त्याचे आवाहन सत्य असण्या बद्दलची साक्ष दिली आहे.

आयत क्र. १६ ते १९ मध्ये संभाषणाचा रोख मक्काच्या अनेकेश्वर वाद्यांकडे वळला आहे आणि त्यांना तंबी दिली गेली आहे.

आयत क्र. २० ते २८ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शुभ मुखाने प्रेषित-पदा संदर्भात आवश्यक गोष्टींचा खुलासा केला गेला आहे; आणि पैगंबराची अवज्ञा करणाऱ्यांना जहन्नमच्या अजाब पासून खबरदार ही केले गेले आहे.

**वैशिष्टय :** ही सूरह अशी सुसंगत आहे आणि यात एवढा आश्चर्य कारक वाक् प्रवाह आहे की शेवट पावेतो माणूस तिला न थांबता वाचतच राहतो. याच्या प्रवाहा पुढे मोठयात मोठा जल प्रवाह ही फिका पडतो, जो पर्वतांशी तोंड देत पुढे जातो. कुरआनाचा वाक् प्रवाह असत्याच्या चिंधडया उडवित सत्याला वर्चस्वशाली करतो. तसेच या सूरहचे नादमाधुर्य असे विलक्षण आहे की एकीकडे ते कानाला प्रिय वाटते तर दुसरीकडे मनात व्यथा निर्माण करते. एवढेच नव्हे तर यात अपरोक्षाच्या त्या रहस्यांना सादर केले गेले आहे ज्यांना जाणून घेण्या करीता मन मस्तिष्क आपोआप आकार्षित होते आणि ज्यामुळे दृढ विश्वास निर्माण होतो.

# ७२.सूरतुल जिन्न

سُورَةُ الْجِنِّ

**आयती - २८**

**परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने**

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. (हे पैगंबर !) सांगा माझ्याकडे वहय (ईश-संदेश) केले गेले आहे की जिन्नांच्या [१] एका जमातीने (कुरआन) ऐकले तेव्हा म्हणाले, आम्ही मोठे आश्चर्य कारक कुरआन ऐकले आहे.[२]

قُلْ أُوحِيَ إِلَيَّ أَنَّهُ اسْتَمَعَ نَفَرٌ مِّنَ الْجِنِّ فَقَالُوا إِنَّا سَمِعْنَا قُرْآنًا عَجَبًا ۝١

२. जो सन्मार्ग दाखवितो.[३] आम्ही त्याच्यावर ईमान बाळगले [४] आणि आम्ही कदापि आपल्या पालन कर्त्याचा अन्य एखाद्यास सहभागी ठरवणार नाही. [५]

يَهْدِي إِلَى الرُّشْدِ فَآمَنَّا بِهِ ۖ وَلَن نُّشْرِكَ بِرَبِّنَا أَحَدًا ۝٢

३. आणि हे की आमच्या पालन कर्त्या (रब्ब) ची महानता अत्युच्च आहे त्याने आपल्या करीता ना एखादी पत्नी बनविली आहे आणि ना संतती. [६]

وَأَنَّهُ تَعَالَىٰ جَدُّ رَبِّنَا مَا اتَّخَذَ صَاحِبَةً وَلَا وَلَدًا ۝٣

४. आणि हे की आमचे नादान लोक अल्लाहच्या बाबतीत सत्याच्या विपरीत गोष्टी बोलत राहीलेत.[७]

وَأَنَّهُ كَانَ يَقُولُ سَفِيهُنَا عَلَى اللَّهِ شَطَطًا ۝٤

५. आणि हे की आम्हाला वाटले होते की मनुष्य व जिन्न अल्लाहच्या विषयी कधी ही खोटे बोलणार नाहीत.[८]

وَأَنَّا ظَنَنَّا أَن لَّن تَقُولَ الْإِنسُ وَالْجِنُّ عَلَى اللَّهِ
كَذِبًا ۝٥

६. आणि हे की माणसां पैकी काही लोक जिन्नांच्या काही लोकांचे शरण मागत राहीलेत. अशा प्रकारे त्यांनी आपल्या बंडखोरीत वाढ केली.[९]

وَأَنَّهُ كَانَ رِجَالٌ مِّنَ الْإِنسِ يَعُوذُونَ بِرِجَالٍ مِّنَ الْجِنِّ
فَزَادُوهُمْ رَهَقًا ۝٦

७. आणि हे की यांनी ही अशा प्रकारे गृहीत धरले ज्या प्रकारे तुम्ही धरले की अल्लाह कोणाला ही रसूल (पैगंबर) बनवून पाठविणार नाही.[१०]

وَأَنَّهُمْ ظَنُّوا كَمَا ظَنَنتُمْ أَن لَّن يَبْعَثَ اللَّهُ أَحَدًا ۝٧

१. जिन्नांच्या संदर्भात अनेक ठिकाणी स्पष्टीकरणात्मक टीपा सादर केल्या गेल्या आहेत. पहा सूरह अनआम टीप क्र. १९०, व २३७, सूरह हिज्र टीप क्र. २५, सूरह अहकाफ टीप क्र. ४८, ४९.

'जिन्न' एक अध्यारूत (दृष्टीला दिसून न येणारी) ईश-निर्मिती आहे. म्हणून त्यांचा संबंध अपरोक्षाशी आहे अर्थात अपरोक्ष बाबी विषयी आम्हास जाणून घेण्याचे साधन केवळ वही (अल्लाहचा अवतरीत संदेश) आहे. यास्तव कुरआन व पैगंबर वचनांवर आम्ही समाधान बाळगले पाहीजे. ज्या लोकांनी अनुमानाद्वारे त्यांच्या विषयी निरनिराळया प्रकारच्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांनी भ्रम आणि निरर्थक बाबींचा मार्ग उघडला आहे. आश्चर्य म्हणजे काही विद्वानांनी ही जिन्नांविषयीच्या ऐकण्यात आलेल्या व बिनबुडाच्या कथनांना व किश्शयांना खंडन न करता उल्लेखिले आहे ज्यावर विश्वास ठेवून लोकांनी चुकीच्या व शरीअत बाहय पद्धतिंचा अंगिकार केला आहे. या संदर्भातील काही गोष्टी संक्षिप्तरित्या आम्ही या ठिकाणी मांडत आहोत :-

(१) जेव्हा एखादा मनुष्य मिरगी किंवा मानसिक आजारात ग्रस्त होतो, विशेषत: जेव्हा एखादी स्त्री हिस्टेरीया रोगात ग्रस्त होते, तेव्हा डॉक्टर करवी तिचा इलाज करण्या ऐवजी तिला भूत-प्रेताने पछाडलेले ठरविले जाते. म्हणजे जिन्न त्याच्यावर आरूढ आहे आणि तोच त्या माणसाच्या वा स्त्रीच्या तोंडून बोलतो तात्पर्य त्या माणसाचे वा स्त्रीचे अस्तित्व अगदी लोप पावते. मग त्या जिन्नला उतारण्या करीता अज्ञानी बूवा-बाबांकडे रूजू केले जाते; दरगाह वर ये जा होते. अशा प्रकारे शिर्क आणि बिदआतचे डोस त्याला वेळोवेलो दिले जातात. तसेच त्याला यथेच्छ बडविले जाते आणि असे समजले जाते की या मारहाणीने प्रेत बाधा झालेल्या माणसाला काही त्रास होत नाही, किंबहुना त्या जिन्नाला त्रास पोहचतो जो त्यावर आरूढ झाला आहे. अशा परिस्थितीत तो त्या माणसाचे शरीर सोडून पळून जाण्यास विवश होतो. परंतु प्रसंगी हे सारे सोपस्कर वाया जाता आणि रोग मुक्त होत नाही. वस्तुस्थिती अशी की ही निव्वळ भ्रम-पूजा होय अन्यथा भूत-प्रेत बाधा ना कुरआनाने सिद्ध आहे आणि ना उचित गोष्ट होय. एखादा मनुष्य शारीरिक कारणास्तव आजारी आहे किंवा भूत-परीत बाधा झालेला आहे याचा निर्णय कोणत्या आधारे घेतला जावा? जर भूत-प्रेत बाधा झालेला समजून त्याला चोप दिला गेला आणि खरोखर तो आजारी असेल तर अशाने त्याच्या क्लेश-यातना वाढतील कि कमी होतील? आणि अशा प्रकारची मारहाण करण्यासाठी शरीअत दृष्टया कसली विहीतता आहे? काय आजारी माणसावर हा जुलूम नव्हे? ही धारणा नितांत चुकीची आहे की मारहाण केल्याने जिन्न बाधा झालेल्या माणसाला कसलाही त्रास पोहचत नाही, किंबहुना त्या परीत वा जिन्नास पोहचते जो त्याच्यावर आरूढ झाला आहे. हे खरे असेल तर जिन्न बाधा झालेल्या माणसाच्या अंगातून मार दिल्यामुळे रक्त निघावयास नको परंतु काय असे शक्य आहे? हा आणि या स्वरूपाचे इतर प्रश्न या गोष्टीची अयोग्याता सिद्ध करण्यास पुरेसे आहेत.

(२) जिन्नांना आपल्या ताब्यात करण्याचा विचार ही आढळून येतो. ज्याची काही वास्तविकता नाही. हे वैशिष्टय तर पैगंबर सुलेमान यांचेच होते की अल्लाहने जिन्नांना त्यांच्या ताब्यात दिले होते, ज्यांच्या कडून ते बांधकामा सारखी मोठी व अवजड कामे करवून घेत. हा अल्लाह तर्फे एक मोठा चमत्कार होता जो एका पैगंबराच्या माध्यमाने प्रकट झाला.

(३) एक वाईट विचार हा आढळून येतो की काही जिन्न काही मानव स्त्रीयांशी विवाह करतात; आणि त्यांच्या पासून त्यांना मुले बाळे ही होतात. ही मोठी मूर्खपणाची गोष्ट होय. कारण अशा स्थितीत तर एखादी स्त्री जिला अनौरस गर्भ राहीला असेल ती हा दावा करू शकते की एका जिन्नाने जबरदस्ती माझ्याशी सहवास केला तर काय तिचे हे म्हणणे मान्य केले जाऊ शकते? अथवा तिच्यावर शरीअतचा कायदा लागू केला जाईल?

(४) जिन्नांच्या बाबतीत एक कल्पना अशी ही आहे की ते धन चोरून नेतात; जर हे खरे असते तर मानव समाजात मोठी खळबळ माजली असती. कोणत्याही चोरी संदर्भात ही तपास लावणे मोठे कठीण झाले असते की हे धन जिन्नांनी चोरून नेले कि माणसातल्या चोरांनी स्वत: पहारेकरीच चोरी करून स्वत:ला निर्दोष ठरविण्यासाठी हे सांगून मोकळा होऊ शकतो की मी नव्हे तर जिन्नांनी ही चोरी केली आहे काय त्याच्या या म्हणण्याला खरे मानले जाऊ शकेल. जर नाही तर असे का? या संदर्भात अल्लाहने सैतानाला संबोधून फर्माविले होते-

وَشَارِكْهُمْ فِي الْأَمْوَالِ وَالْأَوْلَادِ۔ (بنی اسرائیل۔ ۶۴)

''धन आणि संतती मध्ये त्यांचा सहभागी हो'' (बनी इस्त्राईल:६४)

या आयतीद्वारे हा युक्तिवाद केला जातो की धन-संततीत जिन्न सहभागी होतात; व त्याची स्थिति अशी असते की जिन्न धन-सम्पत्ति ही चोरून नेतात व स्त्रीयांशी सहवास ही करतात, परिणाम स्वरूपी त्यांना संतती ही होते परंतु या दोन्ही गोष्टी अगदी निरर्थक होत. आणि आयतीचा हा अर्थ कदापि नाही. धन-संततीत सैतानाचे सहभागी होण्याचा अर्थ असा की या गोष्टींना माणसाने अल्लाह खेरीजच्या उपास्यांची देणगी व कृपा समजून शिर्क करावे. वास्तविक या सर्व गोष्टी अल्लाहनेच प्रदान केलेल्या आहेत.

(५) ही गोष्ट देखील लोकांमध्ये प्रसिद्ध आहे की जिन्न अपरोक्षाची वार्ता जाणतात. परंतु ही श्रद्धा अगदी मिथ्या आहे. अल्लाह खेरीज अपरोक्ष-ज्ञाता अन्य कोणी ही नाही. आणि कुरआनाने या गोष्टीचे सक्तीने खंडन केले आहे की जिन्न अपरोक्षाची खबर बाळगतात. यास्तव कुरआनाने यांच्या खंडनार्थ हजरत सुलैमान यांच्या मृत्युची घटना निवेदिली आहे की त्यांच्या मरणाची खबर जिन्नांना त्या वेळी झाली जेव्हा त्याची काठी कृमी किटकांनी पोखरल्यामुळे खाली पडली त्याच क्षणी हजरत सुलैमान ही खाली पडले. कुरआनाने या घटनेचा उल्लेख करून म्हटले आहे की :-

فَلَمَّا خَرَّ تَبَيَّنَتِ الْجِنُّ اَنْ لَّوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ الْغَيْبَ مَا لَبِثُوْا فِى الْعَذَابِ الْمُهِيْنِ۔ (سبا:١٤)

''जेव्हा सुलैमान खाली पडला तेव्हा जिन्नांना ही गोष्ट उमजली की जर ते अपरोक्ष जाणत असते तर या अवमानपूर्ण संकटांत पडून राहीले नसते.'' (सबा : १४)

२. बुखारी या हदीस ग्रंथात हजरत अब्दुल्लाह इब्ने अब्बास द्वारे जिन्नांच्या कुरआन ऐकण्याची घटना ज्या प्रमाणे उल्लेखित आहे त्याचा सार असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अकाजच्या बाजारात, (जो मक्का व तायफच्या दरम्यान होता) जात होते की नखला या ठिकाणी आपल्या सहकाऱ्यां समवेत फज्रची नमाज अदा केली त्यावेळी जिन्नांचा एक समूह तिकडून गेला तेव्हा त्यांनी कुरआनाचे पठण ऐकले. हा समूह, आकाशातील सक्त संरक्षक उपाय योजना व मारा करणाऱ्या पाठलाग करणाऱ्या अग्नि शिखांना पाहून या गोष्टीच्या शोधात निघाला होता की जमीनीवर काहीतरी महत्वपूर्ण घटना घडली आहे, ज्यामुळे एवढी कडक सुरक्षा व्यवस्था केली गेली आहे त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने कुरआन ऐकताच त्वरीत म्हटले की हीच ती गोष्ट होय ज्यामुळे आम्हाला आकाशात खबरगिरी करण्यापासून रोखले गेले आहे. हा समूह कुरआनाने इतका प्रभावित झाला की त्याच्या ईमान विषयक आवाहनास त्यांनी लगेच कबूल केले आणि आपल्या जनसमूहात जाऊन त्या गोष्टी सांगितल्या, ज्या आयतींमध्ये निवेदिल्या गेल्या आहेत आणि अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'वही' द्वारे याची खबर दिली. (बुखारी - किताबुत्तफसीर) तिर्मिजीच्या हदीस वचनात हे स्पष्टीकरण ही आहे की हजरत अब्दुल्लाह बिन अब्बास यांनी फर्माविले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जिन्नां समोर कुरआनाचे पठण केले नव्हते आणि ना त्यांना पाहीले होते. (म्हणजे जिन्नांनी पैगंबराचे कुरआन-पठण संयोगाने ऐकले होते व त्यांना याची सूचना 'वही' द्वारे मिळाली (पहा तिर्मिजी तफसीर सूरतुल जिन्न) जिन्नांच्या कथनांवरून हे स्पष्ट होते की ते अरबी भाषा जाणतात.यासाठी जेव्हा त्यांनी कुरआन ऐकले तेव्हा त्याची चमत्कारीक अलंकारीता आणि मनाला जिंकणाऱ्या गोष्टी त्यांना नवलाच्या वाटल्या आणि त्याची खास वैशिष्टये पाहून त्यांनी लगेच जाणले की ही अल्लाहची वाणी आहे. अर्थात आयतीचा उद्देश्य लोकांवर हे स्पष्ट करणे की कुरआन आपल्या ईश-वाणी असल्याचे स्वत:च प्रमाण होय. सत्याची अभिलाषा बाळगणारे माणसेच नव्हे तर जिन्न देखील यास ऐकतात. तेव्हा त्यांना आपल्या पालन कर्त्याची वाणी ओळखण्यात अडचण भासत नाही.

३. कुरआन-श्रवणाने जिन्नांवर सन्मार्गाचे द्वार खुले केले. त्यांनी हे मान्य केले की कुरआन दाखवित असलेला मार्ग परिपूर्ण सन्मानाचा मार्ग आहे. अर्थात सत्याकडे मार्गदर्शन करणारा व अल्लाह पावेतो पोहचविणारा.

४. जिन्नांच्या या समूहाने कुरआनावर ईमान बाळगले. तात्पर्य कुरआनाचे अवतरण मनुष्य व जिन्न दोघां करीता झाले आहे. दोघांकडून ईमान बाळगण्याची अपेक्षा आहे. यास्तव सूरह रहमान मध्ये तर दोघां समूहांशी सरळ सरळ संबोधिले गेले आहे; आणि ज्या अर्थी कुरआनावर ईमान बाळगण्यास जिन्न प्रवृत्त झाले तेव्हा पैगंबरावर ही ईमान बाळगणे ही त्यांच्या करीता आवश्यक आहे. याच उद्दिष्टा करीता अल्लाह अशी साधने निर्माण करतो की जिन्नांनी स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) जवळ जावे. व त्यांच्या मुखाने कुरआन ऐकण्याची त्यांना संधी लाभावी. या सूरह खेरीज सूरह अहकाफच्या आयत क्र. २९ ही प्रमाणित करते.

५. तात्पर्य, ज्या प्रमाणे माणसांमध्ये शिर्क (अनेकेश्वर वादा) ची श्रद्धा बाळगणारे आढळून येतात. त्याच प्रमाणे जिन्नामध्ये ही तसे आढळून येतात. जिन्नांच्या या समूहाने जेव्हा कुरआनाचे एकेश्वरवादी आवाहन ऐकले तेव्हा त्यांनी शिर्क पासून उद्विग्नता व्यक्त केली.या दृढ निश्चयासह की ते एकेश्वर वादावर कायम राहतील व अन्य कोणाला अल्लाहचा सहभागी ठरविणार नाही.अयती वरून ही गोष्ट ही स्पष्ट होते की सन्मार्गाची सुरूवात एकेश्वरवादाने होते आणि एकेश्वर वाद, शिर्कचा पूर्णत: नकार होय.

६. म्हणजे आमच्य पालन कर्त्याची महानता याहून अतिशय उच्च आहे की त्याला पत्नी व मुले बाळे असावीत. त्यानेच निर्माण केलेल्या निर्मिती वरून त्याचा विषयी कयास करणे म्हणजे त्याचा सर्वोच्च पदाला गौण लेखणे होय.

७.माणसां प्रमाणे जिन्नांमध्येही असे लोक आढळून येतात, जे बुद्धिचा वापर करीत नाहीत आणि अल्लाहच्या विषयी सत्य आणि न्यायाच्या विपरीत गोष्टी बोलतात.

८. म्हणजे आम्ही या भ्रमात राहीलो की मनुष्य व जिन्न अल्लाहच्या बाबतीत खोटे बोलण्याचे धारिष्टय करणार नाहीत. परंतु आमच्यावर हे स्पष्ट झाले की दोघे ही अल्लाहशी खोटया गोष्टींचा संबंध जोडतात. आणि या असत्यावरच शिर्कचा प्रसाद उभारला गेला आहे.

९. कथनांमध्ये उल्लेखित आहे की अरब लोकांचा एखादा काफिला जेव्हा एखाद्या भयानक ठिकाणी वास्तव्य करीत असे तेव्हा त्या खोऱ्याच्या सरदार जिन्नाचे शरण मागत, यासाठी की त्याने जिन्नांच्या उपद्रवा पासून यांना सुरक्षित राखावे. ही पूर्णत: अज्ञान जन्य व अनेकेश्वरवादी श्रद्धा होती, परंतु या गोष्टीने जिन्नांच्या आत्मप्रौढीत वाढ केली व ते बंडखोर झाले. आश्रयदाता केवळ अल्लाह आहे, तेव्हा जिन्नांचे शरण मागण्याची गोष्ट अगदी मिथ्या होय. परंतु आजच्या काळात ही किती तरी अज्ञानी लोक जिन्नांना साकडे घालतात. श्रद्धेचा हा प्रकार, फार मोठा उपद्रव होय; जो माणसांना मार्गभ्रष्टतेच्या गर्तेत लोटतो.

१०. या जिन्नांनी आपल्या जन समूहास सांगितले की ज्या प्रकारे तुम्ही समजून ठेवले होते की कोणी पैगंबर अल्लाह तर्फे पाठविला जाणार नाही, तद्‌वतच अनेकेश्वर वादी माणसांनी ही हे गृहीत धरले होते. परंतु दोघांचा ही समज चुकीचा ठरला आणि अल्लाहने सन्मार्ग दाखविण्या करीता पैगंबर पाठविला ज्यावर कुरआन अवतरले.

८. आणि हे की आम्ही आकाशाला शोधून पाहीले तर ते सक्त पहारेकऱ्यांनी व अग्नि शिखांनी व्यापून टाकलेले आढळले.[११]

وَّاَنَّا لَمَسْنَا السَّمَآءَ فَوَجَدْنٰهَا مُلِئَتْ حَرَسًا شَدِيْدًا وَّشُهُبًا ﴿٨﴾

९. आणि हे की आम्ही याच्या काही ठिकाणांवर ऐकण्या करीता बसत असो, परंतु आता जो ऐकण्याचा प्रयत्न करतो, त्याला एक अग्नि शिखा आपल्या पाळती वर टपून बसल्याचे आढळते.[१२]

وَّاَنَّا كُنَّا نَقْعُدُ مِنْهَا مَقَاعِدَ لِلسَّمْعِ ؕ فَمَنْ يَّسْتَمِعِ الْاٰنَ يَجِدْ لَهٗ شِهَابًا رَّصَدًا ﴿٩﴾

१०. आणि हे की आम्ही नव्हतो जाणत की जमीनीवर राहणाऱ्यांवर एखादी आपत्ति अवतरीत करण्याचा फैसला केला गेला आहे किंवा त्यांचा पालनकर्ता त्यांना मार्गदर्शनाने उपकृत करू इच्छितो.[१३]

وَّاَنَّا لَا نَدْرِيْۤ اَشَرٌّ اُرِيْدَ بِمَنْ فِى الْاَرْضِ اَمْ اَرَادَ بِهِمْ رَبُّهُمْ رَشَدًا ﴿١٠﴾

११. आणि हे की आमच्यात सदाचारी लोक ही आहेत व सदाचारी नसलेले ही. आमचे मार्ग भिन्न भिन्न आहेत. [१४]

وَّاَنَّا مِنَّا الصّٰلِحُوْنَ وَمِنَّا دُوْنَ ذٰلِكَ ؕ كُنَّا طَرَآئِقَ قِدَدًا ﴿١١﴾

१२. आणि हे की आम्ही समजत होतो की जमीनीवर आम्ही अल्लाहच्या कब्जा बाहेर जाऊ शकत नाही आणि ना (आकाशात) पळून जाऊन त्याच्या तावडीतून निसटू शकतो.[१५]

وَّاَنَّا ظَنَنَّاۤ اَنْ لَّنْ نُّعْجِزَ اللّٰهَ فِى الْاَرْضِ وَلَنْ نُّعْجِزَهٗ هَرَبًا ﴿١٢﴾

१३. आणि हे की जेव्हा आम्ही सन्मार्गाची गोष्ट ऐकली तेव्हा तिच्यावर ईमान बाळगले आणि जो देखील आपल्या पालन कर्त्यावर ईमान बाळगेल, त्याला ना कसला हक्क डावलला जाण्याचे भय राहील आणि ना कोणत्याही प्रकारच्या अतिरेकाचे.[१६]

وَّاَنَّا لَمَّا سَمِعْنَا الْهُدٰۤى اٰمَنَّا بِهٖ ؕ فَمَنْ يُّؤْمِنْۢ بِرَبِّهٖ فَلَا يَخَافُ بَخْسًا وَّلَا رَهَقًا ﴿١٣﴾

१४. आणि हे की आमच्यात मुस्लिम ही आहेत व जुलमी ही, तेव्हा ज्यांनी इस्लामचा अंगिकार केला, त्यांनी सन्मार्ग प्राप्त केला.[१७]

وَّاَنَّا مِنَّا الْمُسْلِمُوْنَ وَمِنَّا الْقٰسِطُوْنَ ؕ فَمَنْ اَسْلَمَ فَاُولٰٓئِكَ تَحَرَّوْا رَشَدًا ﴿١٤﴾

१५. आणि जे जुलमी आहेत, ते जहन्नमचे इंधन बनतील.[१८]

وَاَمَّا الْقٰسِطُوْنَ فَكَانُوْا لِجَهَنَّمَ حَطَبًا ﴿١٥﴾

११. जिन्नांचे उड्डाण आकाशाच्या वातावरणात होते जेव्हा अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाठविले, तेव्हा आकाशात फरिश्त्यांचे सक्त पहारे बसविले गेले. आणि अग्नशिखांनी ते व्यापून टाकले गेले. यासाठी की पैगंबरावर जो संदेश अवतरला त्यात त्यांनी हस्तक्षेप करू नये आणि ना एखादी गोष्ट (रहस्यभेद) जाणून घ्यावी.

१२. म्हणजे आकाशाच्या वातावरणात आम्ही अशी ठिकाणे तयार केली आहेत. जेथून आम्ही आकाशात राहणाऱ्यांच्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता परंतु आता ते शक्य नाही आणि जर तसा प्रयत्न करायचेच ठरविले तर आगीचे निखारे आमचा पाठलाग करतात.

स्पष्ट असावे की या अग्निशिखा आकाशात अतिश्य उंचीवर ताऱ्यांपासून निघणाऱ्या अग्निशिखा होत ज्या जिन्नांच्या करीता टपून बसतात. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. १६

१३. म्हणजे आकाशात ही सक्त सुरक्षा-व्यवस्था पाहून असे वाटत होते की जमीनवर एखादी क्रांतिकारक घटना निश्चित घडणार आहे संभवत: जमीनीवरच्या रहिवाश्यांवर अजाब अवतरीत केला जावा किंवा त्यांच्या करीता मार्गदर्शन अवतरीत केले जाणार असेल ज्याची पूर्व सूचना जिन्नांना कळू नये म्हणून हा इतमाम राखला गेला असावा. या दोहोंपैकी कोणती गोष्ट घडून येणार आहे हे जिन्नांना कळू शकले नाही, मात्र जेव्हा त्यांनी कुरआन ऐकले तर त्याचा परिणाम लांबवर पसरला व त्यांना हे कळून चुकले की आकाशात ही कडक सुरक्षा व्यवस्था जमीनीवर राहणाऱ्यांच्या मार्गदर्शना करीता केली गेली आहे.

१४. तात्पर्य जिन्नांमध्ये सर्वच वाईट नाहीत. त्यात सत्कर्मी व सदाचारी ही आहेत. माणसां प्रमाणे जिन्ना मध्येही श्रद्धा व कर्माचे मार्ग विभिन्न आहेत. ज्या अर्थी जिन्न देखील एक ईश-निर्मिती आहे आणि त्यांना ही कसोटीच्या मैदानात उभे केले गेले आहे म्हणून त्यांना ही हा अधिकार दिला गेला आहे की त्यांनी वाटल्यास सन्मार्गाचा अवलंब करावा किंवा वाटल्यास मार्गभ्रष्टतेचा.

१५. म्हणजे आम्ही हे निश्चितपणे समजत होतो की, आमचे उड्डाण आकाशात असले तरी अल्लाहच्या कब्ज्या बाहेर जाऊ शकत नाही त्याने आम्हाला तावडीत घ्यायचे ठरविल्यास ना जमीनीत कोठे आश्रय मिळू शकतो आणि आकाशाच्या ना अवाढव्य वातावरणात पळ काढून कोठे लपू शकतो. जिन्नांच्या या निवेदना वरून त्यांची अल्लाह समोर अगतिकता जाहीर होते; आणि त्यांना ईशत्वात जे सहभागी केले जाते त्याचे ही खंडन होते.

१६. जिन्नांनी आपल्या जन समूहां जवळ केवळ आपल्या ईमान बाळगल्याचाच उल्लेख केला नाही, तर त्यांना ईमान बाळगण्याचे आवाहन ही केले आणि ईमान बाळगण्याचे श्रेय हे सांगितले की त्याला पूरेपूर मोबदला लाभेल.

१७. जिन्नांच्या या निवेदना वरून इस्लामचे सत्य धर्म असणे अधिक स्पष्ट झाले व हे ही स्पष्ट झाले की मुस्लिम केवळ माणसां मध्येच नाही तर जिन्नां मध्ये ही आहेत. त्याच प्रमाणे अनेकेश्वर वादी व काफिर देखील.

ईमान बाळगणाऱ्या जिन्नांनी आपल्या जन समूहा समोर ही गोष्ट ही जाहीर केली की इस्लामचा स्विकार म्हणजेच सन्मार्गाचा स्विकार.

१८. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे जे सत्य धर्मा (इस्लाम) शी बंडखोर आहेत, ते जहन्नमची शिक्षा भोगणार आहेत. अशा प्रकारे मोबदला व शिक्षे बाबत त्यांनी आपले ईमान व विश्वास व्यक्त केला.

१६. आणि [१९](माझ्यावर वहय केले गेले आहे की) जर या लोकांनी सरळ मार्गाचा अवलंब केला असता तर आम्ही त्यांना अगदी तृप्त केले असते.[२०]

وَأَن لَّوِ اسْتَقَامُوا عَلَى الطَّرِيقَةِ لَأَسْقَيْنَاهُم مَّاءً غَدَقًا ﴿١٦﴾

१७. यासाठी की आम्ही यात त्यांची परीक्षा घ्यावी [२१] आणि जो आपल्या पालन कर्त्याच्या स्मरणा पासून तोंड फिरवील [२२] त्याला तो सक्त कष्ट दायक अजाब मध्ये दाखल करील.

لِّنَفْتِنَهُمْ فِيهِ ۚ وَمَن يُعْرِضْ عَن ذِكْرِ رَبِّهِ يَسْلُكْهُ عَذَابًا صَعَدًا ﴿١٧﴾

१८. आणि हे की मसजिदी अल्लाह करीता आहेत, तेव्हा अल्लाहच्या सोबत अन्य कोणास पुकारू नका.[२३]

وَأَنَّ الْمَسَاجِدَ لِلَّهِ فَلَا تَدْعُوا مَعَ اللَّهِ أَحَدًا ﴿١٨﴾

१९. आणि हे की जेव्हा अल्लाहचा दास त्याला पुकारण्या करीता उभा राहतो, तेव्हा हे लोक त्याच्यावर तुटून पडतात.[२४]

وَأَنَّهُ لَمَّا قَامَ عَبْدُ اللَّهِ يَدْعُوهُ كَادُوا يَكُونُونَ عَلَيْهِ لِبَدًا ﴿١٩﴾

२०. सांगा, मी आपल्या पालन कर्त्यालाच पुकारतो आणि अन्य कोणास त्याचा सहभागी ठरवित नाही.

قُلْ إِنَّمَا أَدْعُو رَبِّي وَلَا أُشْرِكُ بِهِ أَحَدًا ﴿٢٠﴾

२१. सांगा, मी तुमच्या करीता ना एखाद्या हानीचा अधिकार बाळगतो आणि ना मार्गदर्शनाचा.[२५]

قُلْ إِنِّي لَا أَمْلِكُ لَكُمْ ضَرًّا وَلَا رَشَدًا ﴿٢١﴾

२२. सांगा, मला अल्लाह पासून कोणी ही वाचवू शकणार नाही आणि ना मी त्याच्या खेरीज एखादे आश्रय-स्थान प्राप्त करू शकेन.[२६]

قُلْ إِنِّي لَن يُجِيرَنِي مِنَ اللَّهِ أَحَدٌ وَلَنْ أَجِدَ مِن دُونِهِ مُلْتَحَدًا ﴿٢٢﴾

२३. माझे कार्य फक्त एवढेच की अल्लाहची वाणी व त्याचे संदेश पोहचवून द्यावा.[२७]आणि जे अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करतील, त्यांच्या करीता जहन्नमची आग आहे, ज्यात ते सदैव राहतील.[२८]

إِلَّا بَلَاغًا مِّنَ اللَّهِ وَرِسَالَاتِهِ ۚ وَمَن يَعْصِ اللَّهَ وَرَسُولَهُ فَإِنَّ لَهُ نَارَ جَهَنَّمَ خَالِدِينَ فِيهَا أَبَدًا ﴿٢٣﴾

१९. जिन्नांचे निवेदन वर संपले. आता अल्लाहचे स्वत:चे निवेदन सुरू होत आहे.

२०. अभिप्रेत मक्केचे अनेकेश्वर वादी होत अर्थात जर हे लोक इस्लामच्या राजमार्गावर चालले असते तर त्यांना विपुल पाण्याच्या देणगीने समृद्ध केले गेले असते. पाण्यावर सर्व प्रकारचे उत्पन्न अवलंबून आहे आणि अरब देशाच्या वाळवंटी इलाक्यात तर याची आवश्यकता फार तीव्रतेने जाणवते. कुरआनाने या ठिकाणी व इतर ठिकाणी ही हे स्पष्ट केले आहे की जो जन समूह सन्मार्गावर चालतो अल्लाह त्याच्या उपजिविकेच्या साधनां मध्ये वृद्धि व समृद्धि प्रदान करतो.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १५२.

२१. म्हणजे ऐहिक देणग्यांमध्ये कसोटीचा पैलू निश्चितपणे असतो यास्तव की त्या लाभल्यानंतर लोक अल्लाहशी कृतज्ञता भाव राखतात कि कृतघ्नता दर्शवितात.

२२. आपल्या पालन कर्त्याच्या स्मरणा पासून तोंड फिरविण्याचा अर्थ असा की माणसाने अल्लाहशी बेपर्वा व्हावे अल्लाहच्या नाम:सम्रणात त्याला काही स्वारस्य नसावे व त्याच्या उपदेशाला त्याने खात्रीत घेऊ नये.

२३. या ठिकाणी मसजिदीशी अभिप्रेत ती उपासना स्थळे होत जी मूलत: अल्लाहच्याच उपासने करीता बनविली गेली असावीत काबागृह (मसजिदे हराम) व बैतुल मक्दस (मसजिदे अक्सा) तर यात अग्रगण्या आहेत. तसेच त्या सर्व मसजिदी ही ज्या नंतर मुसलमानांनी बनविल्या. या खेरीज ईश ग्रंथ बाळगणाऱ्यांची उपासना स्थळे ही कारण त्यांच्या उभारणीचा मूळ उद्देश अल्लाहची उपासना होय.

तात्पर्य, उपासना स्थळे अल्लाह करीता विशेषत्वाने आहेत यास्तव त्यात त्याचीच उपासना केली गेली पाहीजे. त्यात मूर्तिपूज्या व शिर्क वगैरे फार मोठी अपराध पूर्ण व अत्याचार पूर्ण हरकत आहे.

मसजिदींची एवढी प्रतिष्ठा असतांना ही मुसलमानांमध्ये अशी चुकीची श्रद्धा बाळगणारे लोक ही आहेत जे मसजिदी मध्ये अल्लाह खेरीज इतरांना गरजपूर्ति व तक्रार निवारणा करीता पुकारतात. त्यांच्या तोंडी 'या अल्लाह','या रब्ब' ऐवजी 'या गौस', 'या पीर दस्तगीर' हे शब्द असतात, अल्लाह खेरीज इतरांना आजर्वे करूनही ते समजतात की त्यांच्या एकेश्वरवादी श्रद्धेला तडा गेला नाही.

मसजिदी मध्ये नवनवीन बिदअत ही सुद्धा प्रचलीत केली जात आहे की ज्या दिशेकडे मदीना आहे त्या दिशेकडील मसजिदीच्या भिंती वर गुंबदे खिजरा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या पवित्र कबरी वरील हिरवा घुमटा) ची प्रतिमा लावली जावी व तिच्याकडे तोंड करून अदबशीर पणे उभे राहून 'या रसूलल्लाह' म्हणावे व त्यांच्या वर दरूद पाठविले जावे, जणू किब्ला एक नाही तर दोन आहेत. एक नमाज करीता असलेला किब्ला ज्याची दिशा काबागृहाची आहे तर दुसरा अल्लाहचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पुकारण्या करीता व त्यांच्यावर दरूद व सलाम पाठविण्या करीता, ज्याची दिशा मदीनेचा 'गुंबदे खिजरा' आहे. अल्लाह मुसलमानांना सद्बुद्धि प्रदान करो की त्यांनी आपल्या मसजिदींना शिर्क व बिदअत पासून अलिप्त राखावे.

२४. आयतीत अब्दुल्लाह (अल्लाहचा दास) शी अभिप्रेत पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम हे होत. पैगंबर जेव्हा मसजिदे हराम अर्थात काबा गृहात नमाज करीता उभे राहात आणि फक्त अल्लाहला पुकारीत तेव्हा अनेकेश्वर वादी रागाने लाल होऊन त्यांच्या अवती भोवती अशा प्रकारे जमा होत जणू त्यांच्यावर तुटून पडतील.

२५. हे पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना मार्गदर्शन दिले गेले की सांगा नुकसान पोहचविणे किंवा मार्गभ्रष्ट करणे व लाभ पोहचवणे किंवा सन्मार्ग दाखविणे हे सर्व अल्लाहच्याच हाती आहे. माझ्या अधिकार क्षेत्रात यापैकी कोणती ही गोष्ट नाही.

२६. म्हणजे मी स्वत: अल्लाहचे भय बाळगतो की जर मी त्याची अवज्ञा केली तर त्याच्या शिक्षेपासून मला कोणीही वाचवू शकत नाही; आणि ना मी एखादे आश्रय स्थान प्राप्त करू शकेन. अर्थात पैगंबर असून ही ते अल्लाहशी अगदी बेपर्वा व निर्भय नाहीत, तर तुम्ही कशा प्रकारे अल्लाहशी निर्भय आहात?

२७. म्हणजे पैगंबराच्या अधिकार कक्षेत ही गोष्ट नाही की त्याने लोकांना सन्मार्ग प्राप्ती घडवून आणावी, किंबहुना त्याच्या हाती जे काम सोपविले गेले आहे ते हेच की अल्लाहतर्फे जी काही गोष्ट असेल व त्याचे जे संदेश असतील ते लोकांपावेतो पोहचवावेत. यानंतर लोकांची ही जबाबदारी आहे की त्यांनी यांना स्विकारावे.

'बलाग' (गोष्ट पोहचविणे) यात सर्वसामान्यता आहे म्हणजे अल्लाहतर्फे जी काही गोष्ट असेल पोहचविली जावी आणि रिसालात (संदेश) विशेष होय. अभिप्रेत कुरआनची वचने होत.

२८. म्हणजे जे अल्लाहच्या संदेशांना कबूल करणार नाहीत आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे अवज्ञा कारी बनून राहतील त्यांच्या करीता सदैव कालीन जहन्नमची शिक्षा आहे.

२४. येथपावेतो की जेव्हा ते या गोष्टीस पाहून घेतील, जिचा यांच्याशी वायदा केला जात आहे, तेव्हा त्यांना कळून येईल की कोणाचे सहाय्यक कमजोर आहेत, आणि कोणाचा जत्था (समूह) संख्येने कमी आहे.[२९]

حَتّٰٓى اِذَا رَاَوْا مَا يُوْعَدُوْنَ فَسَيَعْلَمُوْنَ مَنْ اَضْعَفُ
نَاصِرًا وَّاَقَلُّ عَدَدًا ﴿٢٤﴾

२५. सांगा, मी नाही जाणत की ज्या गोष्टीचा वायदा तुमच्याशी केला जात आहे, ती समीप आहे की माझा पालन कर्ता तिला काही काळा करीता मोगे टाकील.[३०]

قُلْ اِنْ اَدْرِيْٓ اَقَرِيْبٌ مَّا تُوْعَدُوْنَ اَمْ يَجْعَلُ
لَهٗ رَبِّيْٓ اَمَدًا ﴿٢٥﴾

२६. अपरोक्ष-ज्ञाता केवळ तोच आहे आणि तो आपल्या अपरोक्ष (ज्ञाना) ने कोणाला सूचित करीत नाही.

عٰلِمُ الْغَيْبِ فَلَا يُظْهِرُ عَلٰى غَيْبِهٖٓ اَحَدًا ﴿٢٦﴾

२७. त्याच्या खेरीज, ज्याला त्याने पैगंबर म्हणून पसंत केले आहे.[३१] तेव्हा त्याच्या पुढे व मागे तो संरक्षक तैनात करतो.[३२]

اِلَّا مَنِ ارْتَضٰى مِنْ رَّسُوْلٍ فَاِنَّهٗ يَسْلُكُ
مِنْۢ بَيْنِ يَدَيْهِ وَمِنْ خَلْفِهٖ رَصَدًا ﴿٢٧﴾

२८. या साठी की त्याने हे बघावे की त्यांनी आपल्या पालन कर्त्याचे संदेश पोहचविलेत [३३] आणि त्याने त्यांच्या समस्त परिस्थितींना घेरून ठेवले आहे आणि प्रत्येक गोष्टीची त्याने गणना करून ठेवली आहे.[३४]

لِّيَعْلَمَ اَنْ قَدْ اَبْلَغُوْا رِسٰلٰتِ رَبِّهِمْ وَاَحَاطَ بِمَا لَدَيْهِمْ
وَاَحْصٰى كُلَّ شَيْءٍ عَدَدًا ﴿٢٨﴾

२९. म्हणजे मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांना या गोष्टीचा अभिमान आहे की त्यांचे सहाय्यक मोठे शक्तिशाली आहेत व त्यांच्या जत्था संख्येने मोठा आहे, या उलट पैगंबराचे सहाय्यक कमकुवत आहेत आणि त्यांच्या सहकाऱ्यांची संख्या ही अल्प आहे.

परंतु जेव्हा अल्लाहचा अजाब येईल, तेव्हा या अनेकेश्वर वाद्यांना कळून येईल की वास्तविकता याच्या अगदी उलट होती. आता सुरवाती पासूनच त्यांचा कोणी सहाय्यक नाही आणि ना त्यांचा जत्थ्याचे काही अस्तित्व आहे.

३०. म्हणजे पैगंबराला खोटे ठरविण्याच्या स्थितीत ज्या ऐहिक अजाबचा तुमच्याशी वायदा केला जात आहे तो अपरिहार्यपणे पूर्ण झाल्या खेरीज राहणार नाही. राहीली ही गोष्ट की तो केव्हा पूर्ण होईल तर याचे ज्ञान अल्लाह लाच आहे. मला नाही ठाऊक की लवकरच हा वायदा पूर्ण होईल कि काही काळा नंतर.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह यूनुस टीप क्र. ७५.

३१. म्हणजे पैगंबरास प्रेषित्व-कर्तव्य पार पाडण्या करीता जेवढया प्रमाणात अपरोक्ष गोष्टींची माहिती आवश्यक असते, तेवढी त्याला दिली जाते. याहून अधिक अपरोक्ष-ज्ञान पैगंबराला ही नसते. यास्तव पैगंबरास हे नाही ठाऊक की त्याच्या विरोधकांवर अजाब केव्हा अवतरीत होईल आणि ना त्याला हे माहीत आहे की कियामत केव्हा प्रस्थापित होईल. पैगंबराला जेवढे अपरोक्ष-ज्ञान प्रदान केले जाते त्याची हकीगत या आयती वरून स्पष्ट आहे. तरीही मुसलमानांच्या एका गटाने अतिशयोक्तित पडून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी अपरोक्ष ज्ञानाची चर्चा छेडली आहे. तात्पर्य त्यांना समस्त गोष्टींचे ज्ञान होते. आणि ते प्रत्येक ठिकाणी हजर व पाहणारे आहेत की प्रत्येकाची पुकार ऐकतात आणि प्रत्येकाच्या पुकार ऐकतात आणि प्रत्येकाच्या अंतबहिय स्थितीशी भिज्ञ आहेत. आणि याचे स्पष्टीकरण असे करतात की हे अपरोक्ष-ज्ञान अल्लाहनेच प्रदान केलेले होते. जणू अल्लाहने त्यांना ईशत्वच प्रदान केले होते कशी अनेकेश्वर वादी कल्पना आहे ही; मात्र त्यांच्या एकेश्वरी श्रद्धेला तरीही गालबोट लगत नाही !

३२. म्हणजे पैगंबरांच्या पुढे व मागे संरक्षक फरिश्ते नियुक्त करतो. यासाठी की अपरोक्ष गोष्टी (अल्लाहचे संदेश) यथोचित रित्या पैगंबरा पावेतो पोहचावेत; आणि सैतानांना यात किंचित मात्र हस्तक्षेप करण्याचा वाव मिळू नये.

३३. पैगंबरांच्या संरक्षणाची ही व्यवस्था अशा साठी केली जाते की पैगंबरानी अल्लाहच्या संदेशांना काहीही उणे-अधिक न करता लोकांपावेतो पोहचवावेत. अर्थात पैगंबराला ज्या अपरोक्ष-गोष्टींना सूचित केले जाते त्यांच्या रक्षणाची असामान्य उपाय योजना केली जाते; जेणेकरून पैगंबराच्या मन:पटलावर त्या अंकित व्हाव्यात. आणि सैतानाने त्यात कुविचाराचा उद्रेक करू नये आणि पैगंबराने हा संदेश जसेच्या तसे लोकांपर्यंत पोहचवावेत. या इतमामाने अल्लाह हे बघू इच्छितो की पैगंरानी अल्लाहच्या संदेशांना लोकांपर्यत कमी-जास्त न करता पोहचविलेत.

३४. म्हणजे अल्लाह पैगंबराच्या स्थितींना चांगल्या प्रकारे जाणतो. आणि त्याने प्रत्येक गोष्टीची गणना करून ठेवली आहे म्हणून यात काडीमात्र शंका नाही की पैगंबर त्याच्या संदेशांना पोहचविण्यात आळस किंवा कसल्याही प्रकारची कमी-अधिकता करील.असे असते तर अल्लाने त्वरीत याबाबत पकड केली असती.यास्तव रसूल अल्लाह तर्फे जे काही सांगेल ते समाधान व विश्वास बाळगून लोकांनी मान्य केले पाहीजे. कारण या अल्लाहने फर्माविलेल्या गोष्टी आहेत, ज्या त्याच्या पैगंबराने काहीही उणे-अधिक न करता आमच्या पर्यंत पोहचविल्या आहे.

# सूरह
# अल मुज़्ज़म्मिल

# ७३. सूरह अल मुज़्ज़म्मिल

**नावः** सूरहच्या आरंभात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'अल् मुज़्ज़म्मिल' (चादरीत लपेटून घेणारे) या नावाने संबोधिले गेले आहे. तद्नुषंगे या सूरह चे नाव 'अल मुज़्ज़म्मिल' असे आहे.

**अवतरण काळः** मक्केच्या सुरवातीच्या काळात अशा वेळी अवतरली, जेव्हा त्यांच्या विरोधाचा क्रम सुरु झाला होता, मात्र शेवटची आयत काही काळानंतर, जेव्हा पाच वेळच्या नमाजचा आदेश आलेला होता, तेव्हा अवतरली.

**मध्यवर्ति कल्पनाः** पैगंबर पदाच्या भारदस्त जबाबदाऱ्या लक्षात घेता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना रात्री उठून नमाज पढण्यात व्यस्त होण्याची ताकीद आणि पैगंबराचा इन्कार करणाऱ्यांना तंबी.

**आयत रचनाः** आयत क्र. १ त ९ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना रात्री करीता उठण्याची व नमाज पढण्यात व्यस्त होण्याची ताकीद केली गेली आहे आणि आत्म-प्रशिक्षणाच्या पैलूने याचा लाभ ही विशद केला गेला आहे.

आयत क्र. १० ते १४ मध्ये त्यांना विरोधकांच्या बोलण्यावर संयम पाळण्याचा उपदेश करीत त्या विरोधकांची परिणती सांगितली गेली आहे.

आयत क्र. १५ ते १९ मध्ये मक्केच्या काफिरांना खबरदार केले गेले आहे की आम्ही तुमच्या कडे पैगंबर पाठविला आहे, ज्या प्रकारे फिरऔन कडे पैगंबर पाठविला होता, तर बघा, फिरऔनने जेव्हा पैगंबराची अवज्ञा केली तर त्याची काय दुर्दशा झाली. तेव्हा तुम्ही कुफ्र करून आखिरतच्या अजाब (शिक्षे) पासून कशा प्रकारे सुरक्षित राहाल?

आयत क्र. २० मध्ये रात्री उठून नमाज पढण्याच्या या आदेशात, जो सुरवातीच्या आयती मध्ये दिला गेला, परिस्थितीला लक्षात घेता संक्षिप्तता केली गेली आणि फ़र्ज़ (आनिवार्य) नमाजांचा इतमाम आणि जकात (कर्तव्य-दान) देण्याची ताकीद केली गेली.

# ७३.सूरतुल् मुज़्ज़म्मिल

سُوْرَةُ الْمُزَّمِّلِ

आयती - २०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हे चादरीत लपेटून घेणाऱ्या ![1]

يٰۤاَيُّهَا الْمُزَّمِّلُ ۙ﴿۱﴾

२. रात्री (नमाज साठी) उभे राहा, थोडया भाग खेरीज [2]

قُمِ الَّيْلَ اِلَّا قَلِيْلًا ۙ﴿۲﴾

३. अर्धी रात्र किंवा यातून काही कमी करा.[3]

نِّصْفَهٗۤ اَوِ انْقُصْ مِنْهُ قَلِيْلًا ۙ﴿۳﴾

४. किंवा याहून काही जास्त करा [4] आणि कुरआन तरतील (स्पष्टपणे व शांतते) सह पढा.[5]

اَوْ زِدْ عَلَيْهِ وَرَتِّلِ الْقُرْاٰنَ تَرْتِيْلًا ؕ﴿۴﴾

५. आम्ही तुमच्यावर एक भारदस्त गोष्ट टाकणार आहोत.[6]

اِنَّا سَنُلْقِيْ عَلَيْكَ قَوْلًا ثَقِيْلًا ﴿۵﴾

६. खोरखर रात्रीचे उठणे आत्म-नियंत्रणा करीता अतिशय परिणाम कारक आणि कथनास अधिक दुरुस्त राखणारे आहे. [7]

اِنَّ نَاشِئَةَ الَّيْلِ هِيَ اَشَدُّ وَطْاً وَّاَقْوَمُ قِيْلًا ؕ﴿۶﴾

७. दिवसा तुमच्या करीता दिर्घ व्यस्तता आहे.[8]

اِنَّ لَكَ فِي النَّهَارِ سَبْحًا طَوِيْلًا ؕ﴿۷﴾

८. आपल्या पालन कर्त्याच्या नावाचा जाप करा [9] आणि सर्वांशी संबंध तोडून त्याचेच होऊन राहा.[10]

وَاذْكُرِ اسْمَ رَبِّكَ وَتَبَتَّلْ اِلَيْهِ تَبْتِيْلًا ؕ﴿۸﴾

९. तो पूर्व आणि पश्चिमेचा स्वामी आहे. त्याच्या खेरीज कोणी ही ईश्वर नाही. तेव्हा त्यालाच आपला कार्यसाधक, बनवा.[11]

رَبُّ الْمَشْرِقِ وَالْمَغْرِبِ لَاۤ اِلٰهَ اِلَّا هُوَ فَاتَّخِذْهُ وَكِيْلًا ﴿۹﴾

१. या सूरहच्या अवतरण प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अंगावर चादर लपेटलेली होती. म्हणून त्यांना अल् मुज़्ज़म्मिल या नावाने संबोधिले गेले. जे मोठे प्रेमपूर्ण संबोधन आहे, व ज्यात त्यांच्या मानसिक शांतीची सामुग्री ही आहे आणि या गोष्टी कडे निर्देश ही की त्यांच्या पालन कर्त्या अल्लाहने त्यांना प्रेषित्वाचा अत्युच्च पदाने सम्मानित केले आहे. यास्तव कृतज्ञता म्हणून त्यांनी रात्री नमाज करीता जागण्याचा इतमाम करावा अर्थात कुरआनाची ही अनुपमेय अलंकारीकता होय की तो बाह्यते कडून अंतरीकते कडे लक्ष वेधतो, ज्याचे उदाहरण सूरह अअराफच्या आयत क्र. २६ मध्ये आहे त्यात पोषाखाचा जेव्हा उल्लेख केला गेला तेव्हा. لِبَاسُ التَّقْوٰى ذٰلِكَ خَيْرٌ

''लिबासुत्तकवा जालिक खैर'' असे फर्मावून अल्लाहच्या भयाच्या पोषाखा कडे लक्ष वेधले गेले. यासाठी की माणसान बाह्य पोषाखा सोबतच आंतरिक पोषांखाने ही स्वत:ला सुशोभित करावे.

२. म्हणजे थोडा हिस्सा वगळता संपूर्ण रात्र इबादत (नमाज) मध्ये घालवा. थोड्या हिश्शाशी अभिप्रेत रात्रीचा एक तृतियांश हिस्सा होय. म्हणजे रात्रीच्या १/३ हिश्श्यात आराम करा व २/३ हिस्सा अल्लाहची उपासना करा. यास्तव आयत क्र २० मध्ये सांगितले गेले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) २/३ रात्र इबादत करण्यात घालवीत.

रात्रीच्या या दीर्घ जागरणा वरून ही गोष्ट स्पष्ट होते की रात्रीच्या या नमाजां करीता रकातींची कोणतीही संख्या निश्चित नाही. नमाज पढणारा जेवढ्या इच्छिल तेवढ्या रकाती (नमाज) पढू शकतो. मात्र ही अपेक्षा अल्लाहने आपल्या पैगंबरा कडून ही केली नाही की त्याने संपूर्ण रात्र इबादतीत घालवावी व रात्रीच्या कोणत्याही हिश्श्यात आराम करु नये. आणि अल्लाहच्या पैगंबरांचे आचरण, जसे की शेवटच्या आयती वरून स्पष्ट आहे त्या काळात २/३ रात्र किंवा याहून कमी अवधि उपासनेत व्यस्त असण्याचे राहीले. यास्तव ज्या बुजुर्गांची उदाहरणे रात्रभर इबादत करण्या संदर्भात दिली जातात की ते संपूर्ण रात्र (उसंत न घेता) इबादतेत घालवीत. ही त्यांची अत्याधिकता होती ज्याचा आदेश ना शरीअत ने दिला आहे आणि ना ते लोकांकरीता आचरणाचा नमुना ठरू शकते.

३. म्हणजे निम्मे रात्र इबादतीत (नमाज मध्ये) घालवा किंवा त्याहून कमी अर्थात एक तृतियांश रात्र.

४. किंवा निम्म्याहून अधिक म्हणजे दोन तृतियांश रात्र इबादत करा. या आदेशांचा खुलासा असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना रात्री इबादत करण्याचा जो आदेश सुरवातीला दिला गेला होता, त्यात ही सवड राखली गेली होती की त्यांनी कमीत कमी एक तृतियांश रात्र व जास्तीत जास्त दोन तृतियांश रात्र नमाज पढण्यात घालवावी.

५. मूळ शब्द 'तरतील' त्याचा अर्थ मफरदात रागिब या ग्रंथात अशा प्रकारे सांगितला आहे.

والترتيل ارسال الكلمةمن الفم

بسهولةواستقامة۔(ص ۱۸۶)

''तरतील म्हणजे मुखाने निघणारी वचने सावकाश गतीने व नीट उच्चारा सह अदा केली जावीत''. (इस्तेकामत. पृ. १८६)

आणि कुरआनास 'तरतील' सह पढण्याचा अर्थ असा की शब्द स्पष्टत: (योग्य उच्चारांसह ) अदा केले जावेत. कुरआनाच्या आयतींचे पठण करतांना आयती वर थांबून अशा प्रकारे पठण केले जावे की त्यांचे सौंदर्य खुलून दिसावे. व त्याचा प्रभाव पठण करणाऱ्याच्या मन मस्तिष्कावर अंकित व्हावा.

'तरतील' म्हणजे कुरआनास गायना सारखे पढणे नव्हे. जेणे करून आपले कला -नैपुण्य प्रकट करावे आणि ना त्याच्या पठणाचा वेग इतका सुस्त असावा की या वाणीत नदीच्या पाण्या सारखा जो प्रवाह आहे तो दिसून न यावा.

काही हुफ्फाज (हाफिज संपूर्ण कुरआन तोंडी पाठ असलेले) तरावीहच्या नमाजीत कुरआनास इतक्या शीघ्र गतीने पढतात की ऐकणाऱ्यांच्या काही ध्यानी येत नाही, परिणामी अल्लाहच्या वाणीची प्रतिष्ठा प्रभावित होते. त्यांचे हे पठण 'तरतील' च्या अगदी विपरीत असते, आणि ते केवळ शिरावरचे ओझे उतरविण्याचे काम करतात.

वास्तविक कुरआन पठण तर अशा रीतीने व्हायला हवे की त्याद्वारे मनात नम्रता, गांभार्य व अल्लाहच्या भयाने कंपीत होणे हे भाव निर्माण व्हावे. परंतु आजच्या काळातील काही कारी (कुरआनाचे यथोचित रित्या पठण करणारे) आपल्या गोड आवाजाचे च प्रदार्शन करतात जे औपचारिकता विर होत नसते.

६. قَوْلًا ثَقِيلًا 'भारदस्त गोष्ट' शी अभिप्रेत जिहाद चा आदेश होय. जी निश्चितच एक जबाबदारी आहे. आयतीचा अर्थ असा की, तुमच्या वर जिहादची फार मोठी जबाबदारी येण्यापूर्वी तुम्ही रात्रीच्या इबादतेत अधिक मग्न रहा कारण जिहादची अत्याधिक व्यस्तता रात्रीच्या इबादती मध्ये बाधा ठरेल.

७. रात्रीच्या उठण्याचा अर्थ रात्री झोपेतून जागे होणे व आराम त्यागून नमाज करीता उभे राहणे. त्या वेळी आराम त्यागणे मनाला मोठे अप्रिय वाटते. परंतु जेव्हा एखादा ईमान बाळगणारा अल्लाहच्या उपासने करीता उठण्याची हिम्मत करतो, तेव्हा याचा सर्वात मोठा लाभ असा की तर त्याच्या मनावर तो विजय मिळवितो. आणि मनावर ताबा मिळविल्या नंतर धर्माच्या जबाबदाऱ्या पार पाडणे सहज होते. याचा दुसरा महत्वपूर्ण लाभ असा की हे कथनाला अधिक दुरुस्त राखणारे आहे. रात्रीची वेळ नीरव शांततेची असल्यामुळे, ती कुरआन - आकलन व विचार चिंतन करण्या साठी अगदी योग्य वेळ असते. या वेळी जी वचने मुखातून निघतील, मग कुरआनाच्या आयती असोत किंवा दुआ जप-जाप्य, ते अगदी मनापासून निघतील, म्हणून ती वचने दृढता पूर्वक अदा होतील.

८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची व्यस्तता मक्केतही अधिक होती. आवाहन व धर्म प्रसाराच्या व्यस्तते खेरीज आपल्या साथीदारांना कुरआनाचे अध्याय तोंडीपाठ करवून घेण्यात ही त्यांना व्यस्त रहावे लागे म्हणून रात्रीची वेळच दीर्घ इबादती करीता योग्य ठरु शकत होता.

९. पालन कर्त्याच्या नावाचा जाप करण्यामध्ये मनासोबत जीभेचा जाप ही सामील आहे. जीभेने जेव्हा अल्लाहचे अत्याधिक नाम: स्मरण केले जाते तेव्हा त्याचे स्मरण मनात खोलवर रुजते. यास्तव जीभेद्वारे केल्या जाणाऱ्या नाम: स्मरण वा जाप चे धर्मात मोठे महत्व आहे.

१०. याचा अर्थ हा नव्हे की लोकांशी कसल्याही प्रकारचा संबंधच ठेवू नये, तर याचा अर्थ असा की अल्लाहशी असलेल्या संबंधाचे जे स्वरुप आहे आणि त्याचे जे क्षेत्र आहे तो त्याच्याच करीता विशेषत्वाने असते. उदाहरणार्थ त्यालाच गरजपूर्ति करणारा समजून आपेल्या गरजा त्याच्याच पुढे माडाव्यात त्यालाच अधिक स्थान समजून सर्वतोपरि त्याच्याच कडे वळावे, गाऱ्हाणे ऐकविण्या करीता त्यालाच साद घालावी, तोच एक उपास्य व आराध्य दैवत मानून सदा सर्वदा त्याचीच उपासना करावी,त्याचा नावाचा जप करावा व त्याच्याच कडून अपेक्षा बाळगाण्यात

११. म्हणजे आपले समस्त व्यवहार त्याच्या सुपूर्द करा व विश्वास बाळगा की खराखुरा कार्य साधक तोच आहे अन्य कोणीही नाही जो तुमचे कार्य सिद्धीस नेईल.

माणसाने एखाद्या कार्याचा संकल्प करावा व कितीही चांगली योजना तयार करावी, त्याची पूर्तता व सफलता प्राप्त करून देणे अल्लाहचेच काम होय. अन्यथा प्रयत्नांची पराकाष्ठा करून ही यश लाभत नाही. याचा अनुभव दैनंदिन जीवनात माणसाला येत असतो.

**हे लोक जे काही सांगतात, त्यावर संयम पाळा आणि त्यांना सुंदर रित्या सोडून द्या. आणि या खोटे ठरविणाऱ्या सुसम्पन्न लोकांचा मामला माझ्यावर सोपवा आणि त्यांना थोडी सवड द्या. आमच्या जवळ त्यांच्या करीता बेडया आणि जहन्नमची आग आहे.*(अल-क़ुर्आन)***

१०. हे लोक जे काही सांगतात, त्यावर संयम पाळा आणि त्यांना सुंदर रित्या सोडून द्या.[१२]

وَاصْبِرْ عَلَىٰ مَا يَقُولُونَ وَاهْجُرْهُمْ هَجْرًا جَمِيلًا ﴿١٠﴾

११. आणि या खोटे ठरविणाऱ्या सुसम्पन्न लोकांचा मामला माझ्यावर सोपवा आणि त्यांना थोडी सवड द्या.

وَذَرْنِي وَالْمُكَذِّبِينَ أُولِي النَّعْمَةِ وَمَهِّلْهُمْ قَلِيلًا ﴿١١﴾

१२. आमच्या जवळ त्यांच्या करीता बेडया आणि जहन्नमची आग आहे.

إِنَّ لَدَيْنَا أَنكَالًا وَجَحِيمًا ﴿١٢﴾

१३. आणि गळयात अडकणारे अन्न व दुःखदायक अजाब.

وَطَعَامًا ذَا غُصَّةٍ وَعَذَابًا أَلِيمًا ﴿١٣﴾

१४. त्या दिवशी जमीन व पहाड हादरू लागतील.[१३] आणि पर्वत विखुरलेल्या वाळू समान होतील.

يَوْمَ تَرْجُفُ الْأَرْضُ وَالْجِبَالُ وَكَانَتِ الْجِبَالُ كَثِيبًا مَّهِيلًا ﴿١٤﴾

१५. आम्ही तुम्हा लोकां कडे एक पैगंबर तुमच्यावर साक्षी बनवून पाठविला आहे.[१४] ज्या प्रमाणे आम्ही फिरऔन कडे पैगंबर पाठविला होता.

إِنَّا أَرْسَلْنَا إِلَيْكُمْ رَسُولًا شَاهِدًا عَلَيْكُمْ كَمَا أَرْسَلْنَا إِلَىٰ فِرْعَوْنَ رَسُولًا ﴿١٥﴾

१६. तेव्हा, फिरऔन ने पैगंबराची अवज्ञा केली. शेवटी आम्ही त्याला सक्ती पूर्वक पकडले.

فَعَصَىٰ فِرْعَوْنُ الرَّسُولَ فَأَخَذْنَاهُ أَخْذًا وَبِيلًا ﴿١٦﴾

१७. जर तुम्ही कुफ्र केला तर त्या दिवसा (त्या सक्ती) पासून कसे सुरक्षित राहाल जो बालकांना वृध्द करून टाकील.[१५]

فَكَيْفَ تَتَّقُونَ إِن كَفَرْتُمْ يَوْمًا يَجْعَلُ الْوِلْدَانَ شِيبًا ﴿١٧﴾

१८. आकाश त्या (दिवसाच्या सक्ती) ने विदीर्ण होईल. त्याचा वायदा (की कियामत प्रस्थापित होईल) पूर्ण झाल्या खेरीज राहणार नाही.

السَّمَاءُ مُنفَطِرٌ بِهِ ۚ كَانَ وَعْدُهُ مَفْعُولًا ﴿١٨﴾

१९. हा एक बोध आहे,[१६] तेव्हा जो इच्छिल त्याने आपल्या पालन कर्त्या कडे जाण्याचा मार्ग अंगिकारावा.[१७]

إِنَّ هَٰذِهِ تَذْكِرَةٌ ۖ فَمَن شَاءَ اتَّخَذَ إِلَىٰ رَبِّهِ سَبِيلًا ﴿١٩﴾

१२. म्हणजे विरोधकांच्या क्लेश दायक गोष्टींवर संयम पाळा आणि त्यांच्याशी वाद न घालता व संतप्त न होता त्यांना त्याच्या दशेवर सोडून द्या.

१३. अर्थात तीव्र भूकंपाद्वारे हादरवून सोडले जातील.

१४. شَاهِدً साक्षी बनवून पाठविण्याचा अर्थ असा की त्यांनी धर्माची साक्ष ही गोष्ट सूरह बकरा आयत क्र. १४३ मध्ये ही सांगितली गेली आहे आणि सूरह हज्रच्या शेवटच्या आयतीत ही आणि वाक्य संबंधा (Context)च्या दृष्टीने याचा ही अर्थ अगदी स्पष्ट आहे. परंतु ज्या लोकांनी धर्मात शिर्क व बिदअती चे मिश्रण केले आहे ते याचा अर्थ हजीर व नाजीर (उपस्थित व पाहणारे) असा लावतात, जेणे करून त्यांच्या या खोट्या श्रद्धेचे समर्थन व्हावे की अल्लाहचे पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम प्रत्येक ठिकाणी उपस्थित आहेत व सर्व काही पाहात आहेत. प्रत्येकाला पाहात आहेत आणि त्याच्या परिस्थितीशी परिचित आहेत, जेव्हा की ही श्रद्धा अल्लाह खेरीज कोणाच्याही बाबतीत राखली जाऊ शकत नाही.

शब्दकोषात 'शहीद' चा अर्थ साक्षी व उपास्थित असा असला तरी त्याचा हा अर्थ नव्हे की वाक्य - संबंधास दृष्टीआड करून त्याचा हाजीर व नाजीर हा अर्थ लावला जावा, वास्तविक हाजीर व नाजीर हे शब्द खास अर्थाने प्रयोजिले जातात. सूरह अंबिया मध्ये पैगंबर हजरत इब्राहीम यांचे कथन उल्लेखिले गेले आहे :-

قَالَ بَلْ رَّبُّكُمْ رَبُّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ الَّذِىْ فَطَرَهُنَّ وَاَنَا عَلٰى ذٰلِكُمْ مِّنَ الشّٰهِدِيْنَ۔(انبیاء:۵۶)

''इब्राहीम म्हणाला, नव्हे, किंबहुना खरोखर तुमचा पालन कर्ता तो आहे जो आकाशांचा व जमीनीचा स्वामी आहे. त्यानेच यांना निर्माण केले आहे आणि या बद्दल मी तुमच्या समोर साक्षी आहे.'' (अंबिया - ५६)

तात्पर्य مِنَ الشَّاهِدِيْنَ ''मिनश्शाहिदीन'' चा अर्थ साक्ष देणारा हाच असू शकतो हाजीर व नाजीर नव्हे. सूरह हज्ज मध्ये फर्माविले गेले :-

لِيَكُوْنَ الرَّسُوْلُ شَهِيْدًا عَلَيْكُمْ وَ تَكُوْنُوْا شُهَدَآءَ عَلَى النَّاسِ۔(حج:۷۸)

''या साठी की पैगंबराने तुमच्या वर साक्षी असावे आणि तुम्ही लोकांवर साक्षी रहावे.'' (हज्ज - ७८)

जर या ठिकाणी अर्थ पैगंबराने तुमच्यावर साक्षी असावे या ऐवजी पैगंबर तुमच्यावर हाजीर व नाजीर असावेत असा केल्यास 'तुम्ही लोकांवर साक्षी असावे' च्या ऐवजी 'तुम्ही लोकांवर हाजीर व नाजीर असावे' असा करावा लागेल. अशा प्रकारे समस्त ईमान बाळगणाऱ्यांना हाजीर व नाजीर मानावे लागेल. किती चुकीचा अर्थ आहे जो कुरआनाच्या आयतीचा केला जात आहे. यहूदी आपल्या ईश-ग्रंथाच्या वचनांचा अशा प्रकारे उलट सुलट अर्थ लावत होते. ज्यांच्या विषयी कुरआनात फर्माविले गेले आहे :-

يُحَرِّفُوْنَ الْكَلِمَ عَنْ مَّوَاضِعِهٖ۔(مائدہ:۱۳)

''ते वचनांना त्यांच्या मूळ जागे पासून हटवितात'' (मायदा - १३)

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अहजाब टीप क्र. ९९

१५. कश्शाफ चे रचयिते म्हणतात, हे अत्याधिकतेचे उदाहरण आहे. अतिशय कठीण दिवसा करीता म्हटले जाते.

يوم يشيب نواصى الاطفال

हा असा दिवस आहे की जो वालकांच्या मस्तकावरील केस पांढरे करील (तफसीर कशाक खंड. ५ पृ. १७८)

तात्पर्य दिवसाचे बालकांना वृद्ध करून टाकणे अरबी ची वाक्य रचना आहे. या अर्थाने की तो दिवस फार मोठ्या संकटाचा दिवस असेल.

१६. म्हणजे कुरआन बोध व उपदेश आहे.

१७. स्पष्ट झाले की कुरआनाचा उपदेश कबूल करुनच मनुष्य अल्लाह प्रत पोहचू शकतो. त्याच्या पर्यंत पोहचण्याचा हाच एक मार्ग आहे जो कुरआन दाखवित आहे.

إِنَّ رَبَّكَ يَعْلَمُ أَنَّكَ تَقُومُ أَدْنَىٰ مِن ثُلُثَيِ اللَّيْلِ
وَنِصْفَهُ وَثُلُثَهُ وَطَائِفَةٌ مِّنَ الَّذِينَ مَعَكَ ۚ وَاللَّهُ
يُقَدِّرُ اللَّيْلَ وَالنَّهَارَ ۚ عَلِمَ أَن لَّن تُحْصُوهُ فَتَابَ
عَلَيْكُمْ ۖ فَاقْرَءُوا مَا تَيَسَّرَ مِنَ الْقُرْآنِ ۚ عَلِمَ أَن
سَيَكُونُ مِنكُم مَّرْضَىٰ ۙ وَآخَرُونَ يَضْرِبُونَ فِي الْأَرْضِ
يَبْتَغُونَ مِن فَضْلِ اللَّهِ ۙ وَآخَرُونَ يُقَاتِلُونَ فِي
سَبِيلِ اللَّهِ ۖ فَاقْرَءُوا مَا تَيَسَّرَ مِنْهُ ۚ وَأَقِيمُوا الصَّلَاةَ
وَآتُوا الزَّكَاةَ وَأَقْرِضُوا اللَّهَ قَرْضًا حَسَنًا ۚ وَمَا تُقَدِّمُوا
لِأَنفُسِكُم مِّنْ خَيْرٍ تَجِدُوهُ عِندَ اللَّهِ هُوَ خَيْرًا
وَأَعْظَمَ أَجْرًا ۚ وَاسْتَغْفِرُوا اللَّهَ ۖ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ
رَّحِيمٌ ﴿٢٠﴾

२०. (हे पैगंबर !) तुमचा पालन कर्ता जाणतो की तुम्ही दोन तृतियांश रात्रीच्या जवळ पास किंवा अर्धी रात्र किंवा एक तृतियांश रात्र (नमाज मध्ये) उभे राहतात.[१८] आणि तुमच्या साथीदारां पैकी एक जमाअत देखील. [१९] अल्लाहच रात्र आणि दिवसाच्या वेळा निर्धारित करतो.[२०] त्याला ठाऊक आहे की तुम्ही याची यथा योग्य गणना करु शकत नाही.[२१] यास्तव त्याने तुमच्यावर अनुग्रह केला तेव्हा जेवढे कुरआन सहजगत्या पढू शकता पठण करीत जा.[२२] त्याला माहीत आहे की तुमच्या पैकी काही जण आजारी असतील आणि असे देखील जे अल्लाहच्या अनुग्रहच्या शोधात प्रवास करतील आणि असे देखील जे अल्लाहच्या मार्गात युद्ध करतील, तेव्हा जेवढे कुरआन सहजगत्या पठण करु शकता, पठण करीत जा.[२३] नमाज कायम करा [२४] जकात द्या आणि अल्लाह ला चांगले कर्ज द्या.[२५] जी काही भलाई तुम्ही आपल्या करीता पुढे पाठवाल, ती तुम्हाला अल्लाहच्या येथे दिसून येईल.[२६] ती अधिक चांगली व मोबदल्यात वाढलेली असेल. अल्लाह जवळ क्षमा-याचना करा.[२७] तो मोठा माफ करणारा, कृपा करणारा आहे.

१८. ही शेवटची आयत ही मक्कीच आहे. परंतु वरील आयती अवतरीत झाल्याच्या काही काळानंतर अवतरली आणि यात रात्रीच्या उपासनेच्या आदेशात कमी, संक्षिप्तता केली गेली.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना नमाज करीता रात्री काही काळ जागण्याचा जो आदेश सूरहच्या सुरवातीस दिला गेला त्यानुसार ते आचरण करीत होते. या वाक्यात त्यांच्या आदेश पालनाचा उल्लेख केला गेला आहे की ते कधी कधी सुमारे दोन तृतियांश रात्र उपासनेत घालवित तर कधी अर्धी रात्र तर कधी एक तृतियांश रात्र.

१९. रात्री नमाज साठी काही काळ जागण्याचा ताकीदपूर्ण आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता होता. परंतु त्यांच्या सहकाऱ्यां पैकी एक समूह आपल्या उपासना प्रियते मुळे रात्रीच्या या नमाज मध्ये सहभागी होत असे आणि संभवत: ही नमाज मस्जिदे हराम मध्ये अदा केली जात होती. या नमाज मध्ये प्रेषित सहवासातील अनुयायींच्या एका समूहाचे सहभागी झाल्याने हा निष्कर्ष निघतो की ही नमाज त्यांच्यावर बंधन कारक नव्हती किंबहुना त्यांच्या हक्कात नफ्ल नमाज होती. जर बंधनकारक असती तर सहवासातील समस्त अनुयायींनी सहभाग घेतला असता.

२०. म्हणजे रात्रीचे कधी लहान होणे व कधी मोठे होणे आणि अशा प्रकारे दिवसाचा कालावधि घटणे व वाढणे सर्व अल्लाहने बनविलेल्या व्यवस्थेनुसार होते. हे कोणाच्याही अधिकार क्षेत्रात नाही की रात्रीला लहान बनवावे व दिवसाला मोठा किंवा दिवसाला लहान बनवावे व रात्री ला मोठे.

२१. त्या काळात घडयाळे नव्हती, म्हणून हे माहीत करुन घेणे मोठे कठीण होते की ठीक अर्धी रात्र केव्हा होते आणि रात्रीचा शेवटचा एक तृतियांश हिस्सा ठीक केव्हा सुरु होत आहे. घडयाळ व अलार्म ची सोय नसतांना वेळेचे उचित अनुमान लावणे आणि झोपेतून योग्य त्या वेळी जागे होणे कठीण होते; यास्तव अल्लाहने पैगंबराच्या अनुयायींना या कष्टात टाकले नाही व सोपा आदेश दिला जो पुढे सांगितला गेला आहे.

२२. कुरआन पठण करणे नमाज चे महत्वपूर्ण अंग आहे. यास्तव या ठिकाणी, जसे की वाक्य - संबंधा (Context)वरुन स्पष्ट आहे कुरआन पठणाशी अभिप्रेत नमाज होय. अर्थात रात्रीची ही नमाज (तहज्जुद) सहजगत्या जेवढी पढू शकता तेवढी पढत जा अर्धी रात्र किंवा याहून कमी - अधिक जागणे बंधनकारक नाही. यावरून ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की रात्रीच्या या नफ्ल नमाज करीता रकातींच्या संख्येचे ही बंधन नाही. ना रमजान महिन्यात आणि ना इतर महिन्यात. मात्र पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आचरण जे त्यांच्या शेवटच्या काळात राहीले, ते असे होते की ते आठ रकअती चांगल्या प्रकारे अदा करीत ज्यात प्रदीर्घ किराअत (कुरआन - पठण) होत असे आणि रुकूअ व सजदे ही दीर्घ असत. सूरह बकरा सूरह आले इमरान व सूरह निसा या सारख्या दीर्घ सूरती (अध्याय) ते नमाज मध्ये पढत. या संदर्भात हजरत आयशा फर्मावितात की :-

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) रमजान व इतर महीन्यात अकरा रकअती पेक्षा जास्त पढत नसत. ते चार रकती अशा प्रकारे पढत असत की त्यांची उत्तम अदायगी व दिर्घते बद्दल विचारू नका. मग ते चार रकअती पढत ज्यांची उत्तम अदायगी व दीर्घते बाबत विचारू नका मग ते तीन रकअती (वित्र च्या) पढत'' (बुखारी-किताबुस्सलातुत्तरावीह)

तसेच हजरत आयशा यांचे एक कथन हे ही आहे की:-

''ते रात्रीच्या सुरवातीच्या हिश्शयात झोपी जात आणि शेवटच्या हिश्शयात उठत व नमाज पढत असत.'' (बुखारी अबवाबुत-तहज्जुद)

रात्रीच्या ही नफ्ल नमाज दोन दोन रकअतींच्या स्वरुपात वाटेल त्या संख्येत अदा केली जाऊ शकते.

हदीस वचनातील उल्लेख असा की, एका माणसाने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले,

'रात्रीची नमाज कशा प्रकारे अदा केली जावी?'

फर्माविले, दोन दोन रकअतींच्या अवस्थेत मग जेव्हा सकाळ होण्याचे भय असेल तेव्हा एक रकअत वित्र पढत'. (बुखारी - अबवाबुत-तहज्जुद)

जर एखादा मनुष्य रात्रीची नफ्ल नमाज तहज्जुद पढू शकला नाही, तेव्हा कुरआनाच्या जेवढ्या आयती सहजगत्या पढू शकतो तेवढ्या पठण कराव्यात हदीस वचनातील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले :-

'ज्याने रात्रीच्या वेळी सूरह बकराच्या शेवटच्या दोन आयतींचे पठण केले तर त्या त्याच्या करीता पुरेशा ठरतील.' (बुखारी-किताब फ़ज़ायलुल कुरआन)

२३. या आयतीत त्या परिस्थिती कडे संकेत केला गेला आहे, जी पुढे उद्भवणार होती, ज्यात सवड देत रात्रीच्या उपासनेच्या आदेशात संक्षिप्तता केली गेली. काही लोक आजारी असतील तर काही व्यापार विषयक प्रवासात असतील, तर काही असे देखील जे अल्लाहच्या मार्गात जेहाद करतील, या सर्व परिस्थितीं मध्ये दीर्घ काळ रात्रीच्या उपासनेत जागणे कष्ट दायक ठरेल, म्हणून ही सहजता निर्माण केली गेली की,

जेवढ्या प्रमाणात कुरआनाचे सहजगत्या पठण केले जाऊ शकते, पठण करावे आणि जेवढी नफ्ल नमाज सहजपणे अदा केली जाऊ शकते, अदा करावी.

२४. म्हणजे फर्ज नमाजी वक्तशीर पणे अदा करा.

२५. स्पष्टीकरणा साठी पाहा सूरह हदीद टीप क्र. २१

२६. म्हणजे जे सत्कर्म देखील तुम्ही आखिरतला ध्येये उद्दिष्ट जाणून कराल, ती तुमची सुरक्षित पूंजी असेल जी आखिरत मध्ये तुम्हाला मिळेल.

२७. हे या गोष्टीस उत्तेजन होय की सत्कर्म करीत आपल्या अपराधांची व चुकींची जाणीव बाळगून असले पाहीजे आणि त्या करीता अल्लाह जवळ क्षमा-याचनां करीत राहले पाहीजे. हदीस वचनातही अत्याधिकतेने क्षमा-याचना करण्याचे प्रोत्साहन दिले गेले आहे.

# ७४. सूरह अल् मुद्दस्सिर

**नाव:** सूरहच्या आरंभात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'अल मुद्दस्सिर' (चादर पाघरुन घेणारे ) या नावाने संबोधिले गेले आहे. या अनुषंगाने याचे नाव "अल् मुद्दस्सिर"असे आहे.

**अवतरण काळ:** ही सूरह मक्केच्या सुरवातीच्या काळात अवतरली. सुरवातीच्या आयती प्रथम अवतरल्या तर बाकी आयती नंतर अवतरल्या.

**मध्यवर्ति कल्पना:** पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रेषित पदाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची ताकीद देणे आणि त्यांनी खबरदार केल्या नंतर ही जे लोक सत्याचा इन्कार करण्यावर अटळ आहेत, त्यांना जहन्नमच्या दु:खदायक अजाबची तंबी दिली गेली आहे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते १० मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना लोकांना खबरदार करण्या करीता उठून उभे रहाण्याची ताकीद करीत, चारित्र्य श्रेष्ठत्व आणि उच्च नितीमत्तेचा उपदेश केला गेला आहे.

आयत क्र. ११ ते ३१ मध्ये विरोधावर अडलेल्या कुरेश जन समूहाच्या नेत्यांना, जहन्नमच्या अजाब ची तंबी दिली गेली आहे.

आयत क्र. ३२ ते ४८ मध्ये आखिरत विषयी सावधगिरीची सूचना आहे.

आयत क्र. ४९ ते ५६ मध्ये कुरआन बोध असण्याच्या पैलूस अशा प्रकारे सादर केले गेले आहे की त्याच्या निवेदना चा अंत: करणात शिरकाव होतो.

# ७४. सूरतुल् मुद्दस्सिर

سورة المدثر

आयती - ५६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. हे चादर पांघरूण घेणारे ![१]

يا أيها المدثر ﴿١﴾

२. उठा, आणि खबरदार करा. [२]

قم فأنذر ﴿٢﴾

३. आणि आपल्या पालन कर्त्याची महानता वर्णन करा.[३]

وربك فكبر ﴿٣﴾

४. आणि आपली वस्त्रे स्वच्छ शुद्ध राखा.

وثيابك فطهر ﴿٤﴾

५. आणि (मूर्ति पूजेच्या) घाणी पासून दूर रहा.[५]

والرجز فاهجر ﴿٥﴾

६. आणि अधिक प्राप्तीच्या उद्देश्याने उपकार करु नका, [६]

ولا تمنن تستكثر ﴿٦﴾

७. आणि आपल्या पालन कर्त्या साठी धीर धरा.[७]

ولربك فاصبر ﴿٧﴾

८. मग जेव्हा सूर फुंकला जाईल.[८]

فإذا نقر في الناقور ﴿٨﴾

९. तेव्हा तो दिवस अतिशय कठीण दिवस असेल

فذلك يومئذ يوم عسير ﴿٩﴾

१०. काफिरां करीता सोपा नसेल.[९]

على الكافرين غير يسير ﴿١٠﴾

११. सोडा मला व त्या माणसाला, ज्याला मी एकटे निर्माण केले. [१०]

ذرني ومن خلقت وحيدا ﴿١١﴾

१. सर्व प्रथम ईश-संदेश, जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्यावर अवतरला तो म्हणजे सूरह अलक ची पहीली आयत (اقْرَأْ بِاسْمِ رَبِّكَ الَّذِي---) ''इकरा बिइस्मि रब्बिकल्लज़ी खलक'' होय. यानंतर दुसरी 'वह्य' सूरह मुद्दस्सिरच्या प्रारंभिक आयतींच्या स्वरुपात अवतरली ज्या अर्थी अल्लाहच्या संदेशाचे अवतरण व फरिश्ते दृष्टीस दिसून येण्याचा हा पहिलाच प्रसंग होता, म्हणून एक मनुष्य या नात्याने पैगंबर भयकंपित झाले जसे की हदीस वचनां मध्ये सांगितले गेले आहे. (पहा बुखारी किताबुत्तफसीर प्रकरण सूरतुल मुद्दस्सिर) या भयातिरेकाने पैगंबरांनी अंगावर चादर पांघरून घेतली होती त्या प्रसंगी, त्यांच्या स्वाभाविक भयास दूर करण्या साठी व त्यांना अल्लाहच्या संदेशाशी परिचित करण्या साठी يَاأَيُّهَا الْمُدَّثِّرُ 'हे चादर पांघरुण घेणारे''! या प्रेमळ शब्दांनी संबोधिले गेले आहे.

स्पष्ट असावे की पैगंबरांवर जेव्हा पहिल्यांदा 'वही' अवतरते तेव्हा त्यांना तो अल्लाहचा संदेश असण्या बाबत तिळामात्र शंका नसते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही किंचित मात्र शंका वाटली नाही. मात्र फरिश्ता पहिल्यांदा दिसल्या मुळे मनुष्य या नात्याने ते भयभीत झाले अर्थात ही कैफियत तात्पुरती होती.

या प्रसंगी सूरह मुज़म्मिल टीप क्र. १ ही विचाराधीन असावी

२. या ठिकाणी 'उठा' याचा अर्थ हा नव्हे की पैगंबर आरामात झोपले होते व त्यांनी झोपेतून जागे होऊन उठावे, तर याचा अर्थ असा की अल्लाह व आखिरत बाबत गाफील असलेल्या माणसांना खबरदार करण्या करीता दृढनिश्चयाने व धैर्याने उभे रहा.

या आयती वरून हे स्पष्ट झाले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जी पहिली, ताकीद दिली गेली ती लोकांना खबरदार करण्याची होती; अर्थात समस्त पैगंबरांच्या आवाहनाचे हे महत्वपूर्ण वैशिष्ट्य होय की ते लोकांना सर्वप्रथम अल्लाहच्या अजाबचे भय दाखवितात; यासाठी की त्यांनी सावध व्हावे व आपल्या आचरणात सुधारणा करावी. त्यांच्या आवाहनाचे केन्द्रस्थान (Focus) लोकांचा आत्मा असतो. सामूहीक जीवनाच्या बिघाडास दूर करणे आणि सदाचाराची व्यवस्था कायम करणे समस्त शरीअतींची निकड आहे. परंतु पैगंबरीय आवाहन पद्धतिच्या प्रत्येक गोष्टींचे एक स्थान निर्धारित केले गेले आहे. म्हणून त्यास त्याच स्थानी राखण्याची गरज आहे. अन्यथा संतुलन बिघडेल; जे आजच्या काळात आवाहन विषयक कार्य करण्या संदर्भात दिसून येते. आणि असे वाटते की आवाहन विषयक कार्य करणाऱ्यांनी घोडया पुढे गाडी जुंपली आहे आणि म्हणूनच त्यांचे धर्मविषयक आवाहन प्रभावकारी ठरत नाही.

या प्रसंगी सूरह नूह आयत क्र. १ व २ विचाराधीन असाव्यात.

३. म्हणजे मोठेपणा केवळ अल्लाह करीताच आहे, म्हणून त्याच्या महानतेचा उल्लेख तुमच्या जीभेद्वारे व्हायला पाहीजे आणि त्याचीच चर्चा लोकांमध्ये केली पाहीजे. नमाजचा आरंभ तक्बीर म्हणजे अल्लाहु अकबर (अल्लाह सर्वाधिक महान आहे) या वचनांनी होतो आणि अज़ान मध्ये ही वारंवार या वचनांची पुनरावृत्ति होते, यासाठी की सर्व वातावरण अल्लाहु अकबरच्या घोषणे ने निनादून जावे. तक्बीर चा आदेश सूरह बनी इस्राईलच्या शेवटच्या आयतीत ही दिला गेला आहे.

وَكَبِّرْهُ تَكْبِيرًا

'' आणी त्याची महानता वर्णन करा, जशी महानता वर्णन करावयास हवी.''

अल्लाहची महानता वर्णन करण्यात शिर्क चे खंडन ही आहे आणि एकेश्वर वादाचा उद्घोष ही, अनेकेश्वरवाद्यांनी कोणाला महादेव बनविले तर कोणाला महात्मा, ज्यांची ते पूजा करतात परंतु हे पोकळ दावे आहेत. वस्तुस्थिती ही की महानता अल्लाह खेरीज अन्य कोणा साठी ही नाही, आणि ना त्याच्या खेरीज कोणी उपास्य आहे की ज्याची उपासना केली जावी.

४. बाह्यत: असणाऱ्या स्वच्छ शुध्दतेने अंतर्यामीच्या स्वच्छ शुद्धतेची जाणीव बळावते. यास्तव इस्लामने बाह्य स्वच्छ शुद्धतेस मोठे महत्व दिले आहे. म्हणून नमाज करीता वस्त्रांचे घाणविरहीत असणे म्हणजे स्वच्छ शुद्ध असणे आवश्यक आहे. आणि ज्या अर्थी कपड्यांना स्वच्छ शुद्ध राखण्याची ताकीद दिली गेली. त्याअर्थी शरीराला ही स्वच्छ शुद्ध राखणे अत्यावश्यक ठरते.

इस्लामने मूत्र व इतर घाणी पासून स्वच्छ शुद्धता प्राप्त करण्याचा व वस्त्रांना स्वच्छ शुद्ध राखण्याचा उत्कृष्ट मार्ग दाखविला आहे. आणि स्वच्छ शुद्धतेचा इतमाम नमाज पढणाऱ्यांचे सर्वात प्रथम वैशिष्टय होय. परंतु आजच्या काळातील बहुतेक सभ्य लोक, स्वच्छ शुद्धतेच्या या कल्पनेशीच अपरिचित आहेत.

५. मूळ शब्द 'रुजज' याचा अर्थ 'अल कामुसुल मुहीत'

القذر وعبادة الاوثان والعذاب والشرك

मध्ये मूर्तिची पूजा, अजाब व शिर्क (अनेकेश्वरवाद) असा सांगितले गेला आहे.

आणि हज्र चा अर्थ दूर राहणे असा आहे.

هجر الرجال هجرا اذا تباعد ونأى۔

अर्थात लोकाहून दूर व वेगळे राहणे. (लिसानुल अरब खंड

५ पृ. २५२)

या ठिकाणी विशेषत्वाने मूर्तिची घाण (अर्थात त्यांची पूजा) आणि शिर्क पासून दूर राहणे अभिप्रेत आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता या आदेशाचे स्वरुप एक ताकीदपूर्ण आदेशाचे होते, ज्या प्रमाणे हजरत इब्राहीम यांना आदेश दिला गेला होता की

وَلَا تُشْرِكْ بِي شَيْئًا

'अन्य कोणासही माझा सहभागी ठरवू नये' (सूरह हज्ज: २६) अन्यथा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अज्ञान काळात ही मूर्ति पूजे पासून अलिप्त राहीले. या व्यतिरिक्त हा आदेश या अर्थानेही होता की लोकांना स्पष्टत: कळून यावे की अल्लाह ने मूर्ति पूजा सोडून देण्याचा व त्यापासून दूर राहण्याचा आदेश दिला आहे.

६. मनुष्य दुसऱ्यावर उपकार अशा साठी करतो की त्याच्या कडून मोबदल्यात अधिक प्राप्त करावे किंवा त्याचा काही न काही स्वार्थ या मागे दडलेला असतो. अर्थात ही हलक्या प्रतीची नितीमत्ता होय उच्चतम नैतिकता ही की माणसाने नि:स्पृह वृत्तीने उपकार करावा. ही ताकीद विविध पैलूनी आहे. परंतु विशेषत: या ठिकाणी प्रेषित्वात्या कर्तव्यची अदायगी आणि या संदर्भात लोकांच्या भल्याचा व हितचिंतनाचा पैलू प्रकट आहे. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या चारित्र्याचा एक महत्वपूर्ण पैलू हा होता की त्यांनी अल्लाहचा संदेश पोहचविण्या बद्दल लोकांकडून कसल्याही प्रकारचा मोबदला किंवा पारिश्रमिक मागितले नाही.

قُلْ مَآ اَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ مِنْ اَجْرٍ ـ (ص:٨٦)

''सांगा, मी याबद्दल तुमच्या कडून कसलाही मोबदला मागत नाही.''(सॉद - ८६)

यावरून असे दिसून येते की कुरआनाची शिकवण किती महान आहे. ज्या शिकवणीचा आरंभ एवढ्या उच्च पातळी वरून व्हावा, तिची उच्चता व अमर्यादित भव्यता कशी असेल ! कुरआनाचे चमत्कार असणे त्याच्या शिकवणी वरुन जाहीर होत आहे.

७. म्हणजे जेव्हा लोकांना खबरदार करण्या करीता उभे राहाल तर पदोपदी धैर्याची कसोटी घेणाऱ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागेल यास्तव तुम्ही धैर्य व सहनशीलतेला आपला आदर्श बनवा आणि हे धैर्य अगदी मनापासून अल्लाह करीता असले पाहीजे. कारण तो याचा उत्कृष्ट मोबदला देईल.

८. म्हणजे कियामतीचा तुतारी वाजू लागेल.

९. अर्थात हा दिवस काफिरां करीता अतिशय कठीण दिवस असेल. इतका कठीण की कोणत्याही पैलूने सहज सुगमता नसेल.

१०. म्हणजे मी एकटाच याचा निर्माता आहे व त्याचा समाचार घेण्यास पुरेसा आहे. या कथनाद्वारे एकीकडे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांत्वना देण्याचा हेतु आहे की तुम्ही त्या लोकांची काळजी करु नका, जे तुमच्या विरोधात हिरीरीने पुढाकार घेत आहेत; तर दुसरी कडे विरोध करणाऱ्यांना ताकीद आहे की गाठ अल्लाहशी आहे आणि त्याची पकड मोठी सक्त आहे.

आणि त्या माणसाला विपुल धन सम्पत्ति प्रदान केली. आणि हजर राहणारे पुत्र दिले. आणि त्याच्या करीता साधन-सामुग्री उपलब्ध केली. मग तो अपेक्षा बाळगतो की मी त्याला आणखी जास्त देईन. *(अल-कुर्आन)*

१२. आणि त्या माणसाला विपुल धन सम्पत्ति प्रदान केली.[११]

وَّجَعَلْتُ لَهٗ مَالًا مَّمْدُوْدًا ۙ﴿۱۲﴾

१३. आणि हजर राहणारे पुत्र दिले. [१२]

وَّبَنِيْنَ شُهُوْدًا ۙ﴿۱۳﴾

१४. आणि त्याच्या करीता साधन-सामुग्री उपलब्ध केली.[१३]

وَّمَهَّدْتُّ لَهٗ تَمْهِيْدًا ۙ﴿۱۴﴾

१५. मग तो अपेक्षा बाळगतो की मी त्याला आणखी जास्त देईन.[१४]

ثُمَّ يَطْمَعُ اَنْ اَزِيْدَ ۙ﴿۱۵﴾

१६. मुळीच नव्हे. तो आमच्या आयतींशी वैर राखतो.[१५]

كَلَّا ؕ اِنَّهٗ كَانَ لِاٰيٰتِنَا عَنِيْدًا ؕ﴿۱۶﴾

१७. मी त्याला लवकरच एक कठीण चढ चढवीन [१६]

سَاُرْهِقُهٗ صَعُوْدًا ؕ﴿۱۷﴾

१८. त्याने विचार केला आणि एक गोष्ट योजिली.[१७]

اِنَّهٗ فَكَّرَ وَقَدَّرَ ۙ﴿۱۸﴾

१९. तेव्हा मारला जावो तो, कशी गोष्ट त्याने योजिली !

فَقُتِلَ كَيْفَ قَدَّرَ ۙ﴿۱۹﴾

२०. पुन्हा मारला जावो तो. कशी गोष्ट त्याने योजिली!

ثُمَّ قُتِلَ كَيْفَ قَدَّرَ ۙ﴿۲۰﴾

२१. मग त्याने नजर टाकली.

ثُمَّ نَظَرَ ۙ﴿۲۱﴾

२२. मग कपाळावर आठ्या घातल्या आणि तोंड वाकडे केले.

ثُمَّ عَبَسَ وَبَسَرَ ۙ﴿۲۲﴾

२३. मग पाठ फिरविली आणि घमेंड केली.[१८]

ثُمَّ اَدْبَرَ وَاسْتَكْبَرَ ۙ﴿۲۳﴾

२४. आणि म्हणाला ही तर निव्वळ जादू आहे, जी पहिल्या पासून चालत आली आहे.

فَقَالَ اِنْ هٰذَاۤ اِلَّا سِحْرٌ يُّؤْثَرُ ۙ﴿۲۴﴾

२५. ही मनुष्य-वाणीच होय.[१९]

اِنْ هٰذَاۤ اِلَّا قَوْلُ الْبَشَرِ ؕ﴿۲۵﴾

११. म्हणजे धनवान बनविले.

१२. म्हणजे असे पुत्र जे त्याच्या कारभारात व उद्योगात त्याला हातभार लावतील व त्याच्या सेवेसे हजर राहतील.

१३. अर्थात त्याच्या करीता ऐहिक प्रगती आणि राज्य व नेतृत्वाचे मार्ग सुलभ केले.

१४. अर्थात अल्लाहने प्रदान केलेल्या या देणग्यां बद्दल त्याच्याशी कृतज्ञशील होण्या ऐवजी आणखी जास्त धन व प्रतिष्ठेचा लोभी बनला आहे आणि या गोड भ्रमात आहे की जर आखिरत प्रस्थापित झाली तर तो शिर्क व कुफ्र करत असतांना देखील तिथे ही त्याला ईश-देणग्यांनी समुद्ध केले जाईल.

१५. म्हणजे हा त्याचा गोड भ्रम आहे. जेव्हा तो आमच्या आयतीं शी कुफ्र करीत आहे. आमच्या पैगंबरावर ईमान बाळगण्यास तयार नाही आणि ना आमच्या वाणी (अवतरीत ग्रंथ) वर, तेव्हा आखिरत मध्ये तो ईश-देणग्यांना कशा प्रकारे पात्र ठरु शकतो?

उपरोक्त आयतीत त्या नेत्यांचे चित्र रेखाटले गेले आहे, जे ऐहिक दृष्टया सुखवस्तु होते परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा विरोध करण्यात फार पुढाकार घेत. आणि वलीद बिन मुगीराला तर ही आयत तंतोतंत लागू पडते.

१६. चढण चढल्यामुळे माणसाला श्वासोच्छवास घेणे कठीण होते मग जेव्हा ती चढण अतिशय कठीण व दोजख मध्ये असेल तर किती कठीण व अतोनात श्रमाचा अजाब असेल.

१७. त्याचा हा विचार वाऱ्यावरच्या वराती सारखा होता आणि जी गोष्ट त्याने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) व कुरआनच्या संबंधाने योजिली तीचा उल्लेख पुढे आयत क्र. २४ व २५ मध्ये केला गेला आहे.

१८. या आयती मध्ये त्या काफिर नेत्याच्या हरकती सांगितल्या गेल्या आहेत, जो अल्लाहची वाणी ऐकल्यानंतर तिटकार स्वरुपात त्याने व्यक्त केली.

१९. म्हणजे त्याने लोकांना हे पटवून देण्याचा प्रयत्न केला की दिर्घ विचार चिंतना नंतर तो या निष्कर्षा प्रत पोहचला आहे की कुरआन मानव-वाणीच आहे. मात्र ही संभाषणाची जादू होय जी लोकांना प्रभावित करते. अर्थात बोलण्यातली जादू ही काही नवीन बाब नाही, उलट ती पूर्वीपासून चालत आली आहे.

कथनांमध्ये उल्लेख आहे की वलीद बिन मुगीरा ने अबु जहल ला हाच सल्ला दिला होता की लोकांमध्ये कुरआनाचे जादू असण्या संबंधीची चर्चा केली जावी.

२६. लवकरच मी त्याला दोजख [२०] मध्ये दाखल करीन.

سَأُصْلِيهِ سَقَرَ ﴿٢٦﴾

२७. आणि दोजख काय आहे ते तुम्ही समजलात काय ? [२१]

وَمَا أَدْرَاكَ مَا سَقَرُ ﴿٢٧﴾

२८. ना बाकी ठेवील आणि ना सोडील. [२२]

لَا تُبْقِي وَلَا تَذَرُ ﴿٢٨﴾

२९. त्वचेला भाजून टाकणारी. [२३]

لَوَّاحَةٌ لِّلْبَشَرِ ﴿٢٩﴾

३०. तिच्यावर एकोणावीस (फरिश्ते) नियुक्त आहेत.

عَلَيْهَا تِسْعَةَ عَشَرَ ﴿٣٠﴾

३१. आणि आम्ही दोजख चे निरिक्षक फरिश्ते बनविले आहेत. आणि त्यांच्या संख्येला काफिरां करीता उपद्रव बनविले आहे, या साठी की ग्रंथ धरकांना खात्री पटावी व ईमान बाळगणाऱ्यांचे ईमान वृध्दिंगत व्हावे. आणि ग्रंथ धारक व ईमान बाळगणाऱ्यांनी कसल्याही संशयात पडू नये. आणि ज्यांच्या मनात विकृति आहे, त्यांनी व काफिरांनी म्हणावे की या गोष्टीशी अल्लाह ला काय अभिप्रेत आहे. [२४] अशा प्रकारे अल्लाह ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो; आणि ज्याला इच्छितो सन्मार्ग दाखवितो आणि तुमच्या पालन कर्त्याच्या सैन्यांना त्याच्या खेरीज कोणी जाणत नाही. [२५] आणि हे कुरआन माणसां करीता नखशिखान्त बोध आहे. [२६]

وَمَا جَعَلْنَا أَصْحَابَ النَّارِ إِلَّا مَلَائِكَةً وَمَا جَعَلْنَا عِدَّتَهُمْ
إِلَّا فِتْنَةً لِّلَّذِينَ كَفَرُوا لِيَسْتَيْقِنَ الَّذِينَ أُوتُوا الْكِتَابَ
وَيَزْدَادَ الَّذِينَ آمَنُوا إِيمَانًا وَلَا يَرْتَابَ الَّذِينَ أُوتُوا
الْكِتَابَ وَالْمُؤْمِنُونَ وَلِيَقُولَ الَّذِينَ فِي قُلُوبِهِم مَّرَضٌ
وَالْكَافِرُونَ مَاذَا أَرَادَ اللَّهُ بِهَٰذَا مَثَلًا كَذَٰلِكَ يُضِلُّ
اللَّهُ مَن يَشَاءُ وَيَهْدِي مَن يَشَاءُ وَمَا يَعْلَمُ جُنُودَ
رَبِّكَ إِلَّا هُوَ وَمَا هِيَ إِلَّا ذِكْرَىٰ لِلْبَشَرِ ﴿٣١﴾

३२. मुळीच नाही. [२७] शपथ आहे [२८] चंद्राची.

كَلَّا وَالْقَمَرِ ﴿٣٢﴾

३३. आणि रात्री ची जेव्हा ती पालटते.

وَاللَّيْلِ إِذْ أَدْبَرَ ﴿٣٣﴾

३४. आणि प्रातः काळाची जेव्हा तो प्रकाशमान व्हावा.

وَالصُّبْحِ إِذَا أَسْفَرَ ﴿٣٤﴾

३५. की हे (कुरआन) फार मोठ्या निशाण्यां पैकी एक आहे. [२९]

إِنَّهَا لَإِحْدَى الْكُبَرِ ﴿٣٥﴾

२०. मूळ शब्द سَقَرَ 'सकरा' हे दोजखचे नाव आहे, 'सकर' سَقَرَ ज्याचा अर्थ अतिशय प्रखर उष्णता होय.

२१. म्हणजे दोजखला एखादी सामान्य वस्तू समजू नका, तर ते दु:खदायक शिक्षेचे ठिकाण आहे.

२२. म्हणजे दोजख ची आग माणसाला जाळण्यात कसलीही कसर बाकी ठेवणार नाही आणि जळल्या नंतर ही त्याला सोडून देणार नाही किंबहुना जाळण्याचा क्रम अखंड राहील, दोजख त्याला धड जगू देणार नाही आणि मरु ही देणार नाही; आणि ना आपल्या तावडीतून त्याला मोकळे होऊ देईल.

२३. त्वचा माणसाच्या शरीराचा अगदी नाजुक व संवेदनशील भाग असतो. कष्ट यातनेची अनुभूति त्वचेद्वारे होते, दोजख ची आग जेव्हा त्वाचा होरपळून काढील तेव्हा माणसाची काय दशा होईल. सर्व श्रेष्ठ अल्लाह, दोजख चा हा वृत्तांत ऐकवून खबरदार करीत आहे, जेणे करुन माणसाने त्या पासून स्वत:ला वाचविण्या ची उपाय योजना करावी.

२४. अल्लाहचे कोणते ही कार्य बुद्धि कौशल्य विरहित नाही. म्हणून त्याने दोजख वर जे एकोणावीस फरिश्ते नियुक्त केले आहेत तो देखील त्याचा बुद्धिकौशल्य युक्त निर्णय होय आम्ही या निर्णयाचा हेतु जाणत नाही आणि ना आम्हाला या एकोणावीस फरिश्त्यांच्या कामाचे स्वरुप अवगत आहे. मात्र एवढे आम्ही निश्चित जाणतो की फारिश्त्यांना ती सामर्थ्ये प्रदान केली गेली आहेत, ज्याचे अनुमान आम्ही लावू शकत नाही. उदाहरणार्थ आकाशातून त्यांचे अवतरणे मलकूल मौत (मृत्यु चा फरिश्ता) द्वारे आत्मा ताब्यात घेणे वगैरे म्हणून दोजख वर नियुक्त फरिश्त्यांची संख्येला नगण्य व तुच्छ जाणणे व हे समजणे की दोजखी लोकांच्या भरमसाठ संख्येला शिक्षा-यातना देण्या करीता १९ फरिश्ते कसे काय पुरे पडू शकतात, अगदी मूर्खतापूर्ण विचार होय. परंतु काफिरांनी कुरआनाच्या या खबरीस ऐकून ही मूर्खता दाखविली ज्या बद्दल या आयतीत त्यांची कान उघाडणी केली गेली आहे.

राहीला या संख्येच्या निवेदनाचा हेतु तर याचा एक हेतु हा सांगितला गेला आहे की ही काफिरांकरीता कसोटी कारक आहे. अर्थात सावध होण्या ऐवजी ते जहन्नमला थट्टेचा विषय बनवू इच्छितात तर त्यांनी आपली ही हौस पूरेपूर भागवून घ्यावी आणि मार्गभ्रष्टतेच्या अरण्यात दूरवर निघून जावे. दुसरा हेतु असा की ग्रंथ धारकांना ही खात्री व्हावी की या तपशील सह जहन्नमचा उल्लेख, 'कुरआन' अल्लाहचीच वाणी असल्याचा पुरावा होय. कारण जहन्नमचा उल्लेख तर त्यांच्या ग्रंथातही होता, परंतु याचे सविस्तर वृत्त कुरआनाने दिले आहे आणि तिसरा हेतु असा की ईमान बाळगणाऱ्यांच्या ईमानात वृद्धी व्हावी. कारण ईमान बाळगणाऱ्या ची ही रीत नव्हे की कुरआनाच्या प्रत्येक गोष्टीचे उद्दिष्ट व सहेतुकता जाणून घेतल्या नंतर त्यावर ईमान बाळगले जावे. किंबहुना जी गोष्ट देखील त्यात सांगितली गेली आहे त्यावर ते ईमान बाळगतात; मग त्याची सहेतुकता अल्लाहने स्पष्ट केलेली असो किंवा नसो दासाचे काम तर अल्लाहच्या कथनावर सहर्ष ईमान बाळगणे होय. त्याच्या ईमान बाळगण्या करीता ही गोष्ट पुरेशी आहे की हे अल्लाहचे फर्मान आहे. दृष्टी पासून दूर असलेल्या आखिरतच्या अहवालावर ईमान बाळगणारे विश्वास राखतात; तेव्हा त्यांच्या ईमानात आणखी वाढ होते आणि चौथा हेतु हा सांगितला गेला आहे की ग्रंथधारक ईमान बाळगणाऱ्यां करीता विरोधकांचे आक्षेप कि गोंधळग्रस्त ठरु नयेत, किंबहुना त्यांना हे समाधान असावे की अपरोक्षाच्या या गोष्टी एवढया खात्रीपूर्वक सांगणारा पैगंबरच असू शकते आणि पाचवा हेतु हा की जे लोक अविश्वासाच्या व्याधीत ग्रस्त आहेत त्यांनी व इन्कार करणाऱ्यांनी या बाबत आश्चर्य व्यक्त करीत रहावे.

स्पष्ट असावे की काही भाष्यकारांनी,१९ फरिश्त्यांचे जहन्नमवर नियुक्त केले जाण्याचे वेगवेगळे स्पष्टीकरण केले आहे परंतु त्या सर्व अनुमानाच्या गोष्टी आहेत. ज्या अर्थी अल्लाहने ही संख्या निश्चित केले जाण्याचा कसलेही कारण सांगितले नाही व संक्षिप्त बाब सांगून आमच्या ईमानाची कसोटी घेऊ इच्छिले आहे, तेव्हा आम्ही कां म्हणून संख्येच्या विवादात पडावे?

२५. म्हणजे असे समजून घेऊ नका की अल्लाह जवळ फरिश्त्यांच्या सैन्याची कमतरता आहे,म्हणून जहन्नमवर फक्त १९च फरिश्ते नियुक्त केले आहेत.ही संख्या बाह्यत: अत्यल्प असली तरी सामर्थ्य व साधनांच्या दृष्टीने संपूर्ण जहन्नम वर नियंत्रण राखण्यास पुरेशी ठरेल. जेव्हा माणसाची स्वत:ची ही दशा आहे की एक मनुष्य शस्त्रांचा वापर करुन हजारो सैनिकांना एकाच वेळी ठार करु शकतो आणि अणू बॉम्बचा वापर करुन लक्षावधी लोकांना मृत्युच्या खाईत लोटू शकतो, तेव्हा फरिश्ते शेवटी फरिश्ते आहेत.त्यांचे असामान्य सामर्थ्य व त्यांचे त्या साधनांचा, जी त्यांना अल्लाहने विशेषत्वाने अगणित जहन्नमी लोकांना शिक्षा देण्याकरीता, प्रदान केले असतील, कोण अनुमान लावू शकतो? मग जेव्हा माणसाच्या योग्यतेची ही दशा आहे की तो स्कड मिजाईल (Scud missile)आणि पेट्रोयाट (Petriot) सारख्या क्षेपणास्त्रांद्वारे हजारो मैल दूर असलेल्या ठिकाणांना 'लक्ष्य' बनविले, तेव्हा फरिश्त्यां करीता व्यापक जहन्नम मध्ये जहन्नमी लोकांना 'लक्ष्य'

बनविणे अवघड कसले?

अल्लाहची सैन्ये विपुल आहेत आणि त्यांच्या संख्येचे ज्ञान ही त्यालाच आहे. कोणताही मनुष्य त्याच्या सैन्यांचे अनुमान लावू शकत नाही.

२६. म्हणजे हे कुरआन जे जहन्नम चे अहवाल (वृत्तांत) सादर करीत आहे. लोकांकरीता उपदेश ग्रहणाची सामग्री आहे. बुद्धिमान आहेत ते लोक जे विवादाच्या भोवऱ्यात न अडकता याचा उपदेश मन:पूर्वक स्विकारातात.

२७. म्हणजे कुरआनास मनुष्य वाणी किंवा जादू समजणे कदापि योग्य नव्हे.

२८. ही शपथ साक्ष व प्रमाणाच्या अर्थाने आहे.

२९. अर्थात कुरआनाचे अवतरण अल्लाहची फार मोठी निशाणीची अभिव्यक्ति होय. जी माणसाला आपल्या पालनकर्त्याची खरी ओळख करुन देते व त्याच्या जीवनाचे ध्येय-उद्दिष्ट विशद करते., म्हणजे एकेश्वरवादासह आचरणाच्या मोबदल्या ची खबर देते. ही निशाणी अल्लाहच्या वाणीच्या स्वरुपात आहे यास्तव अतिशय महान आहे व तिचे समर्थन त्या निशाण्या द्वारे होते. ज्या आसमंतात पसरलेल्यचा आहेत. उदाहरणार्थ चंद्र, जो आपल्या, निर्मात्याच्या सौंदर्य गुणासह तो एकमेव उपास्य असल्याने घोषित करतो. आणि रात्र व दिवसाची व्यवस्था की रात्र आपल्या अंध:कारा सह निरोप घेते आणि प्रात:काळ आपल्या प्रकाशासह प्रकट होतो, अल्लाहच्या अति महान सामर्थ्यास ही प्रमाणित करते आणि या गोष्टीस ही की तो सत्य आणि न्यायासह या सृष्टीवर सत्ता चालवित आहे तसेच या गोष्टी कडे ही संकेत करते की या विश्वाच्या उदरातून कियामतीचा प्रात:काळ प्रकट होणार आहे. अशा प्रकारे सृष्टीचे हे संकेत व कुरआनाची भक्कम साक्ष दोघीही तुम्हाला अगदी सुसंगत आढळून येतील. आणि हा या गोष्टीचा पुरावा होय की कुरआनाचे अवतरण अल्लाहच्या अति महान निशाणी ची अभिव्यक्ति होय.

माणसांना खबरदार करणारा. तुमच्या पैकी अशा त्या प्रत्येक माणसाला जो पुढे जाऊ इच्छतो किंवा मागे राहू इच्छितो. प्रत्येक मनुष्य आपल्या कमाईच्या मोबदल्यात गहाण आहे. मात्र उजव्या हाताच्या लोकां खेरीज. ते जन्नती मध्ये असतील. तिथे ते विचारीत असतील. *(अल-कुर्आन)*

३६. माणसांना खबरदार करणारा.[३०]
نَذِيۡرًا لِّلۡبَشَرِ ۙ﴿۳۶﴾

३७. तुमच्या पैकी अशा त्या प्रत्येक माणसाला जो पुढे जाऊ इच्छतो किंवा मागे राहू इच्छितो.[३१]
لِمَنۡ شَآءَ مِنۡكُمۡ اَنۡ يَّتَقَدَّمَ اَوۡ يَتَاَخَّرَ ؕ﴿۳۷﴾

३८. प्रत्येक मनुष्य आपल्या कमाईच्या मोबदल्यात गहाण आहे.[३२]
كُلُّ نَفۡسٍۢ بِمَا كَسَبَتۡ رَهِيۡنَةٌ ۙ﴿۳۸﴾

३९. मात्र उजव्या हाताच्या लोकां खेरीज.[३३]
اِلَّاۤ اَصۡحٰبَ الۡيَمِيۡنِ ؕ﴿۳۹﴾

४०. ते जन्नती मध्ये असतील. तिथे ते विचारीत असतील.
فِىۡ جَنّٰتٍ ‌ۛؕ يَتَسَآءَلُوۡنَ ۙ﴿۴۰﴾

४१. अपराध्यां विषयी
عَنِ الۡمُجۡرِمِيۡنَ ۙ﴿۴۱﴾

४२. तुम्हाला कोणत्या गोष्टीने जहन्नम मध्ये नेले?[३४]
مَا سَلَـكَكُمۡ فِىۡ سَقَرَ ﴿۴۲﴾

४३. ते म्हणातील, आम्ही नमाज पढणाऱ्यां पैकी नव्हतो.[३५]
قَالُوۡا لَمۡ نَكُ مِنَ الۡمُصَلِّيۡنَ ۙ﴿۴۳﴾

४४. आणि ना दीन दुबळयांना जेऊ घालीत होतो.[३६]
وَلَمۡ نَكُ نُطۡعِمُ الۡمِسۡكِيۡنَ ۙ﴿۴۴﴾

४५. आणि वाद घालणाऱ्यांशी आम्ही ही वाद घालीत होतो.[३७]
وَكُنَّا نَخُوۡضُ مَعَ الۡخَآٮِٕضِيۡنَ ۙ﴿۴۵﴾

४६. आणि मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरवित होतो.
وَ كُنَّا نُكَذِّبُ بِيَوۡمِ الدِّيۡنِ ۙ﴿۴۶﴾

४७. येथपावेतो की खात्रीपूर्वक गोष्ट आमच्या समोर आली.[३८]
حَتّٰٓى اَتٰٮنَا الۡيَقِيۡنُ ؕ﴿۴۷﴾

४८. तेव्हा, शिफारस करणाऱ्यांची शिफारस त्यांच्या करीता किंचित ही लाभप्रद नसेल.[३९]
فَمَا تَنۡفَعُهُمۡ شَفَاعَةُ الشّٰفِعِيۡنَ ؕ﴿۴۸﴾

३०. अर्थात कुरआनाचे आद्य उद्दिष्ट लोकांना मोबदल्याच्या दिवसा पासून खबरदार करणे होय.

३१. म्हणजे या पासून सावध होऊन जे लोक अल्लाहच्या मार्गात पुढे जाऊ इच्छितील व आपल्या भविष्याची उपाय योजना करु इच्छितील, ती त्यांनी करावी आणि जे लोक या ताकीदी नंतरही मागे राहू इच्छितील म्हणजे अल्लाहच्या मार्गात चालू इच्छित नसतील आणि आपल्या भविष्या करीता कसलीही उपाय योजना करु इच्छित नसतील तर त्यांनी नादानपणाची शिक्षा भोगावी.

३२. याचे स्पष्टीकरण सूरह तूर टिप क्र. २१ मध्ये केले गेले आहे.

३३. उजव्या हातवाल्यांनी अभिप्रेत ते सदाचारी, ईमान बाळगणारे होत ज्यांचा कर्म लेख त्यांच्या उजव्या हातात दिला जाईल.

३४. ईमान बाळगणारे जन्नत मध्ये काफिरां विषयी आपसात वार्तालाप करीत असतील की त्यांची कय गत झाली? त्यांच्या या जिज्ञासेनुसार त्यांना जहन्नमी लोकांशी प्रत्यक्षत: बोलण्याची संधी दिली जाईल, ते जन्नत मध्ये राहात असतांना, जहन्नम मध्ये खितपत पडलेल्या गुन्हेगारांना प्रश्न करतील, ज्यांचे त्यांच्याकडून त्यांना उत्तर ही मिळेल, जे पुढे सांगितले गेले आहे. जन्नत पासून जहन्नम फार लांब अंतरावर असेल, तरीही त्यांच्याशी बोलणे सहज शक्य असेल. कुरआन अवतरणाच्या काळात ही गोष्ट तर माणसा करीता मोठ्या आश्चर्याची ठरु शकत होती. परंतु आजच्या काळात जेव्हा टेलिफोन द्वारे एकमेकां पासून हजारो मैल दूर असणाऱ्या माणसां मध्ये संभाषण करणे सहज सोपे झाले आहे. तसेच वायरलेस वगैरेच्या माध्यमान्वये ही हे शक्य झाले आहे की जमीनीवर राहून अवकाशात भ्रमण करणाऱ्या माणसाशी बोलावे. कुरआनाचे हे निवेदन की जन्नत मध्ये राहणारे, जहन्नम मध्ये खितपत पडलेल्या अपराध्यांशी वार्तालाप करतील, नवलपूर्ण बाब नव्हे. तात्पर्य आधुनिक यंत्रांच्या शोधा मुळे कुरआनाच्या निवेदनाची सत्यता अधिक स्पष्ट झाली आहे. कुरआनाचे हे भाकित की :-

سَنُرِيهِمْ اٰيٰتِنَا فِى الْاٰفَاقِ وَفِىٓ اَنْفُسِهِمْ حَتّٰى يَتَبَيَّنَ لَهُمْ اَنَّهُ الْحَقُّ۔ (حم السجدہ:۵۳)

“लवकरच यांना आम्ही आपल्या आसमंतातील निशाण्या (अवकाशा) मध्ये ही दाखवू आणि त्यांच्या स्वत: (अंतरी) च्या ही, येथपावेतो की त्यांना हे कळून येईल की हे सत्य आहे.”

आज वास्तविकता म्हणून दिसत आहे.

३५. यावरुन नमाज चे महत्व आणखी जास्त स्पष्टपणे दिसून येते की तिला व्यर्थ घालविण्याची जाणीव जहन्नमी लोकांना जहन्नम मध्ये होईल. नमाज इस्लामचा सर्वात मोठा व महत्वपूर्ण आधारस्तंभ होय आणि ईमान या करीता अट आहे. या खेरीज नमाज ‘नमाज’ म्हटली जाऊ शकत नाही आणि ना तिला अल्लाहच्या स्थायी, स्विकृतिचा दर्जा लाभू शकतो. याच प्रकारे जकात वगैरे अन्य उपासना पध्दतिचा ही मामला आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अल्लाहच्या शरीअतचे अनिवार्य पालन करण्याची जबाबदारी समस्त माणसांवर आहे. परंतु तिचे पालन व अल्लाहच्या नजरेत स्विकृति करीता ईमान एक अत्यावश्यक अट आहे.

या आयतीचे पठण करतांना त्या मुसलमानांनी ही शुद्धीवर यायला हवे जे नमाज पासून अगदी गाफील आहेत.

३६.स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अल हाक्का टीप क्र.३२

३७. जगात तर हे लोक अल्लाह व आखिरत आणि कुरआन व प्रेषित्वा बाबत वेगवेगळया प्रकारेचे वाद उभे करीत राहीलेत आणि धर्माच्या गोष्टींना त्यांनी आक्षेपांचे लक्ष्य बनविले परंतु आपल्या या भयंकर चुकीची जाणीव त्यांना जहन्नम मध्ये पोहचल्यावर होईल.

३८. अर्थात मृत्यु, ज्याचे येणे खात्रीपूर्वक होते आणि ज्या नेत्या गोष्टी समोर आणल्या, ज्या पाहून खात्री पटली की या गोष्टी खऱ्या होत्या.

३९. वर अपराधींचे निवेदन संपले आता सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावित आहे की ज्या लोकांनी अपराध पूर्ण वर्तन अंगिकारले आहे, ते शिफारसी वर भरवसा करुन बसले आहेत की जर आखिरतचा उद्रेक झाला तर अमुक एकाच्या शिफारसी मुळे मुक्ति प्राप्त करु. खरे पाहता मुक्ति साठी कोणाची ही शिफारस कामी येणार नाही. मुक्ति एखाद्याच्या शिफारसी वर अवलंबून नाही; तर ईमान व सदाचारावर अवलंबून आहे आणि हे लोक ज्या अर्थी आखिरतचा इन्कार करणारे बनून अपराधांवर अपराध करीत आहेत, तर त्यांच्या करीता शिफारसीचा दरवाजा अगदी बंद असेल आणि ज्यांना यांनी अल्लाह जवळ आपला शिफारस कर्ता समजून, उपास्य बनविले होते, ते यांच्या शिफारसी करीता मूळात नसतीलच.

४९. यांना झाले तरी काय की हे उपदेशा पासून तोंड फिरवित आहेत.

فَمَا لَهُمْ عَنِ التَّذْكِرَةِ مُعْرِضِينَ ﴿٤٩﴾

५०. जणू हे बिचकलेले गाढव होत.

كَأَنَّهُمْ حُمُرٌ مُّسْتَنفِرَةٌ ﴿٥٠﴾

५१. जे सिंहाला घाबरुन पळाले असावेत.[४०]

فَرَّتْ مِن قَسْوَرَةٍ ﴿٥١﴾

५२. किंबहुना यांच्या पैकी प्रत्येक जण असे इच्छितो की त्याला स्वतंत्र पोथी दिली जावी.[४१]

بَلْ يُرِيدُ كُلُّ امْرِئٍ مِّنْهُمْ أَن يُؤْتَىٰ صُحُفًا مُّنَشَّرَةً ﴿٥٢﴾

५३. कदापि नव्हे. किंबहुना हे आखिरत चे भय बाळगत नाहीत. [४२]

كَلَّا ۖ بَل لَّا يَخَافُونَ الْآخِرَةَ ﴿٥٣﴾

५४. कदापि नव्हे. हा तर एक उपदेश आहे.[४३]

كَلَّا إِنَّهُ تَذْكِرَةٌ ﴿٥٤﴾

५५. तेव्हा, ज्याला इच्छा होईल त्याने या पासून बोध ग्रहण करावा.

فَمَن شَاءَ ذَكَرَهُ ﴿٥٥﴾

५६. आणि हे बोध प्राप्त करु शकत नाहीत, मात्र अल्लाहने इच्छिल्यास. [४४] तो या गोष्टीस पात्र आहे की त्याचे भय बाळगले जावे,[४५] आणि तोच या गोष्टीस योग्य होय की माफ करावे.[४६]

وَمَا يَذْكُرُونَ إِلَّا أَن يَشَاءَ اللَّهُ ۚ هُوَ أَهْلُ التَّقْوَىٰ
وَأَهْلُ الْمَغْفِرَةِ ﴿٥٦﴾

४०. म्हणजे ज्या प्रमाणे भेदरट गाढवे सिंहाच्या भयाने बिचकून पळतात तद्‌वतच हे नादान लोक पैगंबरांच्या उपदेशा पासून घाबरुन पळ काढतात. कुरआन व त्याच्या पैगंबरा पासून त्यांचे हे पळ काढणे अगदी मूर्खपणाची गोष्ट होय.

४१. म्हणजे जे लोक ही गोष्ट मान्य करण्यास तयार नाहीत की अल्लाहने आपला ग्रंथ (कुरआन) त्याच्या पैगंबरावर अवतरीत केला आहे. किंबहुना ते असे इच्छितात की अल्लाहला जर ग्रंथ अवतरीत करावयाचा आहे तर त्याने आमच्यातल्या प्रत्येक जणाच्या हाती याची एकेक प्रत द्यावी त्यांच्या मते पैगंबराची गरजच नाही, किंबहुना अल्लाहने सरळ सरळ आम्हाला आपला ग्रंथ प्रदान करावा. ही होती त्यांची दर्पोक्ति आणि त्यांची ही मागणी अगदीच अयोग्य अशी होती.

४२. अर्थात असे नाही की कुरआन अल्लाहने अवतरीत केलेले असणे, एक स्पष्ट वस्तुस्थिती नसावी आणि या कारणा स्तव हे लोक त्या पासून अलिप्त रहात असावेत, किंबहुना या पासून अलिप्ततेचे कारण हेच की त्यांना आखिरतच्या उत्तरदायित्वाची काहीच जाणीव नाही. ते या बाबत अगदी बेपर्वा आहेत.

आखिरतचे भय कुरआनाच्या तंबी द्वारे निर्माण होते मात्र या अटीवर की माणसाने त्यावर लक्ष द्यावे. मग जेव्हा आखिरतचे भय निर्माण होते, तेव्हा उपदेशाच्या सर्व गोष्टी ऐकणे व स्विकारणे त्याला सहज सुलभ होते. परंतु जेव्हा मनुष्य स्वत:ला अल्लाहच्या समोर उत्तरदायी समजत नसेल आणि आखिरत चे भय दर्शाविल्या नंतर ही, त्याचावर काहीच परिणाम होत नसेल तर उपदेशाच्या अनमोल रत्नांनी भरलेला हा ग्रंथारुपी खजीना (अर्थात कुरआन) त्याचे वैचारिक दारिधदूर करु शकत नाही.

४३. म्हणजे कुरआन जादू मुळीच नव्हे, किंबहुना अल्लाहतर्फे बोध व स्मरणिका आहे.

४४. म्हणजे चांगल्या प्रकारे जाणून घ्या की तुमचे बोध ग्रहण करणे ही अल्लाहच्या मर्जीनुसार आहे. जर त्याची मर्जी नसेल तर तुम्ही बोध ही ग्रहण करु शकत नाही. तुम्हाला बोध ग्रहण करण्याचा जो अधिकार प्राप्त आहे, तो अल्लाहने प्रदान केल्यामुळेच लाभला आहे. अन्यथा तुमच्या स्वत:च्या अधिकार कक्षेत काही ही नाही.

४५. अल्लाह आपला प्रताप, आपले श्रेष्ठत्व व आपल्या उपास्य असण्या पायी या गोष्टीस पात्र आहे की दासांनी त्यांचे भय बाळगावे व दुराचारचा त्याग करून सदाचाराचे वर्तन अंगिकारावे.

४६. अपराधांना माफ करण्याची योग्यता ही तोच (अल्लाह) बाळगतो स्पष्ट आहे, जो निर्माता व पालनकर्ता आहे, तोच आपल्या दासांच्या अपराधांनाही माफ करु शकतो. त्याच्या खेरीज असा कोणी ही नाही जो अपराध माफ करु शकेल. या वरुन ख्रिश्चनांच्या या श्रद्धेचे खंडन होते की हजरत ईसा (येशू ख्रिस्त) आपल्या अनुयायींच्या अपराधांना माफ करतील.

# सूरह
# अल् क़ियामह

# ७५.सूरह अल् कियामह

**नावः** पहिल्या आयतीत कियामतीच्या दिवसाची शपथ घेतली गेली आहे आणि संपूर्ण सूरह मध्ये कियामतीचीच चर्चा आहे, त्या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अल् कियामह' असे आहे.

**अवतरण काळः** या सूरहच्या अवतरणाचा काळ मक्काचा सुरवातीचा काळ होय.

**मध्यवर्ति कल्पनाः** कियामती विषयी ज्या शंका कुशंका मांडल्या जात होत्या, त्या दूर करुन कियामती बाबत विश्वास निर्माण करणे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ६ मध्ये कियामतीच्या अनिवार्यतेस प्रस्तुत करताना शंकांचे निरसन केले गेले आहे.

आयत क्र. ७ ते १५ मध्ये कियामतीचे काही वृत्तांत सांगितले गेले आहेत.

आयत क्र. १६ ते १९ चा मजकूर ओघाओघाने उल्लेख म्हणून आहे; म्हणजे संभाषण क्रम तोडून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना 'वही' (अल्लाह चा अवतरीत संदेश) ग्रहण करण्या संबंधी त्याच वेळी ताकीद दिली गेले आहे.

आयत क्र. २० ते २५ मध्ये इन्कार करणाऱ्यांना त्यांच्या ऐहिक भक्ति बाबत सावध करीत कियामतीच्या दिवशी दिसून येणारी सदाचारी लोकांची यशस्विता आणि दुराचारी लोकांची अपयशताची एक झळक दाखविली गेली आहे.

आयत क्र. २६ ते ३० मध्ये मृत्युचे चित्र मांडले गेले आहे जी कियामतीची नांदी होय.

आयत क्र.३१ ते ३५ मध्ये कियामतीचा इनकार करणाऱ्यांना त्यांच्या वर्तणूका वा त्यांना निर्भत्सना केली गेली आहे.

आयत क्र. ३६ ते ४० मध्ये दुसऱ्यांदा जिवित केले जाण्या बद्दल अगदी स्पष्ट प्रमाण सादर केले गेले आहे.

# ७५. सूरतुल कियामह

سُوْرَةُ الْقِيَامَةِ

आयती - ४०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. नव्हे [१] मी शपथ घेतो कियामतीच्या दिवसाची.[२]

لَآ أُقْسِمُ بِيَوْمِ الْقِيٰمَةِ ﴿١﴾

२. आणि नव्हे. मी शपथ घेतो निर्भत्सना करणाऱ्या मना (आत्म्या) ची.[३]

وَلَآ أُقْسِمُ بِالنَّفْسِ اللَّوَّامَةِ ﴿٢﴾

३. काय मनुष्य असे समजतो की आम्हीं त्याच्या हाडांना एकत्रित करु शकणार नाही ? [४]

أَيَحْسَبُ الْإِنْسَانُ أَلَّنْ نَّجْمَعَ عِظَامَهٗ ﴿٣﴾

४. कां नाही ? आम्ही तर त्याच्या बोटांचे पेरे पेरे सुद्धा यथा योग्य घडविण्यास समर्थ आहोत.[५]

بَلٰى قٰدِرِيْنَ عَلٰٓى أَنْ نُّسَوِّيَ بَنَانَهٗ ﴿٤﴾

५. परंतु मनुष्य असे इच्छितो की आपल्या पुढे दुष्कर्मे करीत रहावे.[६]

بَلْ يُرِيْدُ الْإِنْسَانُ لِيَفْجُرَ أَمَامَهٗ ﴿٥﴾

६. विचारतो, केव्हा येईल कियामतीचा दिवस?

يَسْـَٔلُ أَيَّانَ يَوْمُ الْقِيٰمَةِ ﴿٦﴾

७. तर (ऐका) जेव्हा डोळे दिपून जातील. [७]

فَإِذَا بَرِقَ الْبَصَرُ ﴿٧﴾

८. आणि चंद्र निस्तेज होईल.

وَخَسَفَ الْقَمَرُ ﴿٨﴾

९. आणि सूर्य व चन्द्र एकत्रित केले जातील.[९]

وَجُمِعَ الشَّمْسُ وَالْقَمَرُ ﴿٩﴾

१०. त्या दिवशी मनुष्य म्हणेल, पळून कोठे जाऊ?[१०]

يَقُوْلُ الْإِنْسَانُ يَوْمَئِذٍ أَيْنَ الْمَفَرُّ ﴿١٠﴾

११. नाही. कोठे ही आश्रय नाही.[११]

كَلَّا لَا وَزَرَ ﴿١١﴾

१. शपथेआधी 'नव्हे' हा शब्द एखाद्या अशा गोष्टीच्या खंडना करीता येतो जी शपथ घेतल्या जाणाऱ्या गोष्टीच्या विरूद्ध असावी उदाहरणार्थ 'ला, वल्लाह' (नव्हे अल्लाहची शपथ) अशा प्रसंगी म्हटले जाते जेव्हा एखाद्या माणसाच्या एखाद्या विचाराचे खंडन करतानाना आपले कथन ताकीदीसह मांडण्याचा हेतु असावा.

२. या आयतीत कियामतीचा इन्कार करणाऱ्यांच्या या विचाराचे की, मोबदला व शिक्षेचा मामला उद्‌भवणार नाही, खंडन करीत कियामतीच्या दिवसाला अगदी खात्रीची घटना म्हणून प्रस्तुत केले गेले आहे. अर्थात तुम्ही कियामतीचा कितीही इन्कार करा, ती हमखास उदयास येईल कारण ती इन्कार न करण्या जोगी वस्तुस्थिती आहे.

३. मनुष्य जेव्हा एखादा गुन्हा किंवा दुष्कर्म करतो तेव्हा त्याचे मन त्याला धि:क्कारु लागते. उदाहरणार्थ एखाद्याशी अयोग्य वर्तन केल्यावर किंवा अत्याचार केल्यावर, खोटे बोलल्यावर किंवा अपव्यय केल्यावर माणसाचा विवेक, जर अगदीच मृतप्राय झाला नसेल तर त्याला नक्कीच प्रताडीत करतो की हे तू चांगले केले नाहीस, अपराध केलास तो सारखा त्याचा धि:क्कार करतो. काबील ने आपल्या सख्ख्या भावाची 'हाबील' ची हत्या करुन तर टाकली, पण नंतर मात्र त्याला पश्चाताप झाला की त्याने हे काम करावयास नको होते. अशा प्रकारे अत्म्याचे दुराचार व दुष्कर्मा बद्दल धि:क्कार करणे या गोष्टीचे प्रमाण होय की मांगल्य-अमांगल्य, सत्कर्म- दुष्कर्म यातला भेद जाणणे मानव स्वभावातच आहे. अर्थात आपल्या आचरणा बाबत तो आपल्या पालनकर्त्या (अल्लाह) समोर उत्तरदायी आहे. दुष्कर्म केल्याबद्दल तो शिक्षेस पात्र आहे आणि सत्कर्म केल्यास चांगल्या मोबदल्यास पात्र आहे. माणसाचे हे आत्म वैशिष्ट्य मोबदल्याच्या दिवसाची साक्ष देते. जर मोबदला व शिक्षेचा मामला उद्‌भवणारा नसता आणि मनुष्य आपल्या आचरणास जबाबदार राहीला नसता, तर दुष्कर्म केल्याबद्दल त्याच्या आत्म्याने त्याची निर्भत्सना केली नसती. आणि ना दुसऱ्या एखादा माणसाने अत्याचार केल्या बद्दल याच्या आत्म्याने त्या अत्याचारीची निर्भत्सना केली असती.

४. कियामतीचा इन्कार करणाऱ्यांची फार मोठी शंका ही होती की जेव्हा माणसाचे शरीर मेल्यानंतर सडून कुजते व जीर्ण हाडे नावाला उरतात व ती हाडे ही इतस्तत: विखुरली जातात. अशा स्थितीत त्यांना कशा प्रकारे एकत्रित करुन शरीराचा आकार दिला जाईल, परिणामी त्याला पुनश्च एक जिवंत माणूस बनविले जाईल? ही शंका खरे पाहता अल्लाहच्या सामर्थ्याचे उचित अनुमान न लावता येण्यामुळे निर्माण होत होती. यास्तव या शंकेच्या निरसना करीता हा प्रश्न केला गेला की मनुष्य काय असे समजतो की आम्ही त्याची हाडे एकत्रित करण्यास सामर्थ्य बाळगत नाही? उघड आहे. अल्लाहच्या सामर्थ्याची ही मर्यादित कल्पनाच मुळात चुकीची आहे आणि ही गोष्ट नित्य अवलोकनात येत असते की अल्लाह विखुरलेल्या अवयवांना ही एकत्रित करतो आणि एका निर्जीव गोष्टीत प्राण ही सोडतो. मग मृत माणसाचे विखुरलेले अवयव एकत्रित करणे व त्याला पुनश्च जिवित करणे त्याच्या करीता कठीण कसे?

५. अर्थात हाडे एकत्रित करुन पुन्हा त्यांचा सापळा उभा करण्यास च नव्हे तर माणसाच्या शरीराचा एकेक अवयव, येथपावेतो त्याच्या बोटांची पेरे जी अगदी नाजुक असतात, दुसऱ्यांदा यथायोग्य घडविण्यास आम्ही अगदी समर्थ आहोत. माणसाचे शरीर जसे होते तसेच. कियामतीच्या दिवशी प्रदान केले जाईल. या साठी की ज्या शरीरान्वये कर्मे पार पडलीत, त्याच शरीराने कर्मांच्या स्वरुपानुसार चांगला किंवा वाईट मोबदला प्राप्त करावा.

६. म्हणजे मोबदल्याच्या दिवसाचा इन्कार करण्याचे मूळ कारण हे की, तो जी दुष्कर्मे करीत राहीला आहे,पुढे ही करीत रहावे आणि एक नियमबध्द जीवन जगण्याची पाळी त्याच्यावर येऊ नये कारण दुष्कर्म व दुराचारात ऐहिक गोडी आहे, तर ईश-भय पूर्ण जीवनात क्लेश यातना व संयम-सहनशीलते ची रुक्षता.

७. प्रश्न कियामतीच्या तारखे बाबत होता. परंतु उत्तरा दाखल कियमतीचे वृत्तांत सादर केले जात आहेत. कारण ज्या प्रकारे मृत्यी येणे हे निश्चित आहे, वास्तविक त्याची तारीख कोणालाही माहीत नसते, त्याच प्रमाणे कियामतीचे येणे ही खात्रीपूर्वक आहे, वस्तुत: तिची ही तारीख अल्लाह खेरीज कोणालाही माहीत नाही, यास्तव मूळ बाब, जिची प्रत्येक माणसाने काळजी घेतली पाहीजे, ती ही की जेव्हा कियामत येईल तेव्हा ही घटना केवढी भयंकर असेल आणि त्या दिवशी मनुष्य कशा प्रकारे मुक्ति प्राप्त करु शकेल? कुरआनाने उत्तरा दाखल याच गोष्टी कडे लक्ष वेधिले आहे.

कियामत ज्यावेळी घडून येईल तेव्हा तिची भयानकता इतकी जबरदस्त असेल की माणसाला ते पाहण्याचे ही धाडस होणार नाही सूरह इब्राहीम मध्ये ही हा मजकूर आलेला आहे.-

اِنَّمَا يُؤَخِّرُهُمْ لِيَوْمٍ تَشْخَصُ فِيْهِ الْاَبْصَارُ ۔ (ابراہیم:۴۲)

"तो तर यांना त्या दिवसा पावेतो सवड देत आहे जेव्हा डोळे विस्फारलेलेच राहतील." (सूरह इब्राहीम - ४२)

८. कियामतीच्या दिवशी ज्या अर्थी सूर्याचा गाशा गुंडळला

जाईल जसे सूरह तक्वीर मध्ये फर्माविले गेले आहे

إِذَا الشَّمْسُ كُوِّرَتْ

(जेव्हा सूर्य गुंडाळले जाईल) तर चंद्र निस्तेज झाल्याखेरीज राहणार नाही. जणू त्याला ग्रहण लागले आहे.

९. या वेळी चंद्र आणि सूर्य आपापल्या कक्षेत आहेत. परंतु कियामत घडून आल्यावर हे संतुलन कायम राहणार नाही. परिणामी चंद्र सूर्य दोघेही एकत्रित होतील. आता त्यांच्या एकत्री करणाची नेमकी काय स्थिती असेल ते अल्लाहच चांगले जाणतो.

१०. म्हणजे आज तर मनुष्य कियामती बाबत अनावश्यक प्रश्नांच्या गुंतावळयात अडकला आहे, परंतु जेव्हा ती प्रत्यक्षत: दिसून येईल, तेव्हा मनुष्य तिचे महाभयंकर स्वरुप पाहून पळ काढू इच्छिल.

११. परंतु पळ काढण्या करीता त्याला कोणतेही आश्रय स्थान लाभणार नाही.

**त्या दिवशी तुझ्या पालनकर्त्या कडेच आश्रय असेल. त्या दिवशी माणसाला दाखविले जाईल की त्याने काय पुढे पाठविले आणि काय मागे सोडले.वास्तविक मनुष्य स्वतःच स्वतःवर प्रमाण आहे. किती ही सबबी पुढे करीत असला तरी.*(अल-क़ुर्आन)***

| | |
|---|---|
| १२. त्या दिवशी तुझ्या पालनकर्त्या कडेच आश्रय असेल.[१२] | إِلَىٰ رَبِّكَ يَوْمَئِذٍ الْمُسْتَقَرُّ ﴿١٢﴾ |
| १३. त्या दिवशी माणसाला दाखविले जाईल की त्याने काय पुढे पाठविले आणि काय मागे सोडले.[१३] | يُنَبَّأُ الْإِنسَانُ يَوْمَئِذٍ بِمَا قَدَّمَ وَأَخَّرَ ﴿١٣﴾ |
| १४. वास्तविक मनुष्य स्वत:च स्वत:वर प्रमाण आहे.[१४] | بَلِ الْإِنسَانُ عَلَىٰ نَفْسِهِ بَصِيرَةٌ ﴿١٤﴾ |
| १५. किती ही सबबी पुढे करीत असला तरी.[१५] | وَلَوْ أَلْقَىٰ مَعَاذِيرَهُ ﴿١٥﴾ |
| १६. (हे पैगंबर !) या (कुरआना)ला स्मरणात ठेवण्या साठी आपल्या जीभेला हरकत देऊ नका.[१६] | لَا تُحَرِّكْ بِهِ لِسَانَكَ لِتَعْجَلَ بِهِ ﴿١٦﴾ |
| १७. त्याला एकत्रित करविणे आणि पठण करविणे आमची जबाबदारी आहे. [१७] | إِنَّ عَلَيْنَا جَمْعَهُ وَقُرْآنَهُ ﴿١٧﴾ |
| १८. यास्तव जेव्हा आम्ही याचे पठण संपवू तेव्हा या पठणाचे अनुसरण करा. [१८] | فَإِذَا قَرَأْنَاهُ فَاتَّبِعْ قُرْآنَهُ ﴿١٨﴾ |
| १९. मग त्याचे स्पष्टीकरण करणे आमच्या जिम्मे आहे.[१९] | ثُمَّ إِنَّ عَلَيْنَا بَيَانَهُ ﴿١٩﴾ |
| २०. कदापि नव्हे.[२०] किंबहुना तुम्ही लोक लवकर प्राप्त होणाऱ्या जगा शी प्रेम बाळगता.[२१] | كَلَّا بَلْ تُحِبُّونَ الْعَاجِلَةَ ﴿٢٠﴾ |
| २१. आणि आखिरतला सोडून देता. | وَتَذَرُونَ الْآخِرَةَ ﴿٢١﴾ |
| २२. त्यादिवशी किती तरी चेहरे प्रफुल्ल टवटवीत असतील. | وُجُوهٌ يَوْمَئِذٍ نَّاضِرَةٌ ﴿٢٢﴾ |
| २३. आपल्या पालन कर्त्या कडे पाहात असतील.[२३] | إِلَىٰ رَبِّهَا نَاظِرَةٌ ﴿٢٣﴾ |

१२. म्हणजे अल्लाह समोर हजर होईल.

१३. पुढे पाठविण्याशी अभिप्रेत माणसाची चांगली वाईट कर्मे होत ज्यांचे परिणाम आखिरत मध्ये दिसून येतील आणि मागे सोडण्याशी अभिप्रेत ती कर्मे होत जी त्याने जगात राहून करावयास हवी होती. परंतु त्याने केली नाहीत. आणि आखिरत संबंधाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्या पासून अलिप्त राहीला.

१४. म्हणजे मनुष्य स्वत:च आपल्या वर प्रमाण आहे. त्याचे अस्तित्व अर्थात स्वत: सांगत आहे की तो एक नैतिक जबाबदारी बाळगणारी ईश-निर्मिती आहे. चांगले आणि वाईट दोघांचे प्रभाव व निष्कर्ष वेगवेगळे आहेत. आणि हे की तो आपल्या पालन कर्त्या समोर आपल्या आचरणा करीता उत्तरदायी आहे. बाह्य प्रमाणांना वगळता माणसाच्या आत्म्याची ही अंतर्भूत साक्ष, मोबदला व शिक्षेची अशी साक्ष आहे की ज्याचा इन्कार करणे कोणाही माणसाला शक्य नाही.

१५. म्हणजे मोबदला व शिक्षेचा इन्कार करण्या करीता मनुष्य अनेक सबवी रचू शकतो आणि विचारांची ढाल पुढे करु शकतो परंतु मोबदला व शिक्षेचे सत्यनिष्ठ असणे त्याला अगदी स्पष्ट उमजले आहे, कारण त्याच्या स्वभावाचा प्रकाश या वस्तुस्थिती कडे जाण्याचा मार्ग त्याला दाखवितो.

१६. आयत क्र. १६ ते १९ ओघाओघाने उल्लेख स्वरुपात आहेत. म्हणजे संदर्भ-क्रम तोडून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ऐन वेळी ही ताकीद दिली गेली. बुखारी या हदीस संकलनातील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हजरत जिब्रील यांच्या कडून 'वही' (अल्लाहचा अवतरीत संदेश) प्राप्त करण्यात घाई करीत आणि आयतींना आपल्या जीभेने पुन्हा पुन्हा उच्चारीत, या साठी की एखादी चूक होऊ नये. या प्रसंगी त्यांना ताकीद केली गेली की अल्लाहचा अवतरीत संदेश स्मरणात राखण्या साठी घाई करण्याची गरज नाही जिब्रील यांच्या मुखातून तो आधी पूर्णत: ऐकून घ्यावा त्या नंतर त्याची पुनरावृत्ति करावी. अशा प्रकारे त्यांना समाधान दिले गेले की 'वही' च्या बाबतीत कोणतीही भूलचूक आपल्या कडून होणार नाही कारण कुरआनास आपल्या मन:पटलावर अंकित करविण्याची जबाबदारी स्वत: अल्लाहने घेतली आहे.

एका गोष्टी विषयी संभाषण क्रम चालत असतांना, दुसऱ्या गोष्टीचा उल्लेख बाह्यत: विसंगत वाटतो परंतु संबोधनात जेव्हा प्रसंगानुसंधाने अथवा आवश्यकते पोटी अन्य एखादी गोष्ट सांगितली जाते, तेव्हा तिचा संभाषण क्रमावर काही परिणाम होत नाही. इमाम राजी यांनी या गोष्टीस मोठ्या चांगल्या उदाहरणा द्वारे स्पष्ट केले आहे. ते फर्मावितात की एक शिक्षक जेव्हा आपल्या विद्यार्थ्यास धडा शिकवित असेल आणि विधार्थी इकडे तिकडे बघू लागले, तेव्हा शिक्षक पाठ शिकवितानाच त्या विद्यार्थ्याला म्हणेल, 'इकडे तिकडे बघू नकोस' आणि पुन्हा पाठ शिकवायला लागतो. आता जर हा पाठ ओघाओघाने केलेल्या वक्तव्यासह उल्लेखिला गेल्यास तर ज्याला याचे कारण माहीत नसेल त्याला पाठ शिकविता शिक्षकाचे हे मध्येच बोलणे अयोग्य वाटेल. परंतु ज्याला घटनेचे ज्ञान असेल तो या पाठाखेरीजच्या वक्तव्याला अनाठायी न जाणता सयुक्तिक व उत्कृष्ट प्रशिक्षण समजेल.

( अत्तफसीरुल कबीर खंड - २९ पृ. २२३)

आणि वस्तुस्थिती ही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहचा संदेश अवतरीत होत असतांना ही ताकीद दिली जाणे की 'तुम्ही तो ग्रहण करण्यात घाई करु नका,' कुरआन आपल्या मूळ स्वरुपात सुरक्षित असण्याचा पुरावा आहे कारण जर संदर्भ क्रम तोडून अन्य एखादी गोष्ट अल्लाहने फर्माविली आहे तर ती ही डोळ्या देखत उल्लेखिली गेली आहे. जर कुरआन पैगंबरांचे लिखित असते तर त्यात या गोष्टींचा समावेश राहीला नसता.

१७. एकत्रित करण्याशी अभिप्रेत कुरआनाच्या आयती व सूरती (अध्यायां) चे संकलन होय उत्कृष्ट क्रमबध्दतेसह. आणि पठण करविण्याशी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने त्यांचे योग्य उच्चारासह वदवून घेणे, या दोन्ही गोष्टींची जबाबदारी अल्लाहने घेतली होती. यास्तव कुरआन ज्या ग्रंथ-स्वरुपात आमच्या समोर आहे ते अल्लाहनेच संकलीत केल्या प्रमाणे आहे आणि वाणी ची अंतरी ची साक्ष ही हीच आहे की हे अल्लाहचेच संकलन आहे कारण आयत रचनेवर विचार चिंतन केल्यास किती तरी रहस्ये उलगडतात.

आजच्या काळात काही लोकांनी कुरआनास त्याच्या अवतरण क्रम बद्धतेसह सादर करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु यात ते अगदी निष्फल ठरले आहेत कारण अवतरण क्रमास पूर्ण तपशीलासह जाणण्याचे आमच्या जवळ कसलेही साधन नाही आणि ना याची काही गरज आहे. आणि जेव्हा अल्लाहने बुद्धिकौशल्याच्या निकडी सह आपल्या ग्रंथास अवतरण क्रमा ऐवजी अन्य एका क्रम बद्धतेसह प्रस्तुत केले आहे तर त्यात फेरबदल करण्याचा कोणाला काय अधिकार आहे?

या ठिकाणी हा गैरसमज ही दूर झाला पाहीजे की कुरआनास प्रथम खलीफा हजरत अबूबक्र सिद्दीक यांनी किंवा तिसरे खलीफा हजरत उस्मान गनी यांनी एकत्रित केले होते. अन्यथा त्या आधी तो एक संकलित ग्रंथाच्या स्वरुपात नव्हता. वास्तविकता ही की कुरआन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळातच अल्लाहच्या मार्गदर्शनानुसार संकलीत केले गेले होते. यास्तव नमाज मध्ये याच क्रमा ने आयती व सुरतींचे पठण केले

जात होते आणि हदीस वचनातील उल्लेख असा की रमजान महिन्यात हजरत जिब्रील पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची भेट घेत आणि त्यांच्या सह कुरआनाची पुनरावृत्ति करीत (बुखारी-किताबुल वही) अर्थात पठणाची ही पुनरावृत्ति, स्पष्टत: एका संकलीत ग्रंथाचीच असू शकते. हजरत अबू बक्र सिद्दीक यांनी जी सेवा पार पाडली ती ही की कुरआनाचे जे अंश वेगवेगळ्या लेखनिखां कडे होते ते त्यांनी एकत्रित केले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) कुरआनाचे जे अंश लिहवून घेत राहीले ते अनेक सहाबा (सहवासातील अनुयायीं) कडे होते. त्या ग्रंथ-वध्द भागांना एकत्रित करण्याचे काम हजरत अबू बक्र यांनी काही सहाबांना सोपविले व त्यांनी ते एकत्रित केले मात्र असे करतांना आयती व सूरतींचा क्रम तोच ठेवला जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळा पासून चालत आला होता. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे कुरआन त्याच क्रमासह जो संतुलीत आहे कंठस्थ करणाऱ्यांच्या अंत:करणात सुरक्षित होते आणि नमाज मध्ये त्याच क्रमाने पढले जात होते. मात्र याचे लिखित स्वरुपातील अंश समग्र ग्रंथाच्या स्वरुपात एकत्र करण्याचे कार्य हजरत अबु बक्र यांनी पार पाडले. राहीले हजरत उस्मान यांचे कुरआनास एकत्रित करणे तर ते या दृष्टीने होते की त्यांनी कुरेश जन समूहाच्या अरबी उच्चराना लक्षात घेता ईश-ग्रंथाना चांगल्या लिहीणाऱ्या कडून लिहवून घेतले व ते प्रचलीत केले. कुरआनाच्या काही शब्दांचा उच्चार वेगवेगळ्या कबिल्यांमध्ये वेगवेगळा होता. ज्यामुळे अर्थात कसलाही फरक पडत नव्हता, परंतु त्यांच्या काळात जेव्हा अजमीयांची संख्या वाढली, उच्चारा मधील ही तफावत एक समस्या बनली. यास्तव हजरत उस्मान यांनी त्यांच्या दरम्यानचा हा फरक मिटवला आणि एकाच उच्चार पध्दतीनुसार सर्व आयतीचे एकत्रिकरण केले आणि त्याच्या नुसार कुरआनाच्या प्रती तयार करुन त्याच्या प्रसार अमलात आणला उच्चारातील फरकाचे उदाहरण 'मस्तर' हा शब्द होय. हा शब्द सूरह गाशिया आयत क्र. २२ मध्ये आला आहे. याचा उच्चार अरबी मूळाक्षर 'स्वाद' ने ही केला जाऊ शकतो आणि 'सीन' या मूळाक्षरानेही यासाठी या शब्दावर लहान 'सीन' लिहीला जातो परंतु अशाने अर्थात काही फरक पडत नाही. दोघांचाही एकत्र अर्थ आहे म्हणजे जोर जबरदस्ती करणारा.

१८. वही (अल्लाहचा संदेश) हजरत जिब्रील घेऊन अवतरत असले तरी वाणी ज्या अर्थी अल्लाहची होती म्हणून हजरत जिब्रील यांच्या पठणास अल्लाहने आपल्या पठणाच्या अर्थाने घेतले आहे. आयतीचा अर्थ हाच की जेव्हा जिब्रील वही (अल्लाहच्या संदेशा) चे अवतरण संपवतील तेव्हा हे पैगंबर तुम्ही त्या पठणाची पुनरावृत्ति करा.

१९. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता अधिक समाधानाची गोष्ट फर्माविली गेली की आयतीचा आशय स्पष्ट करण्याची ही जबाबदारी अल्लाहची आहे. यास्तव या पैलू ने ही काळजी करण्याची गरज नाही. यास्तव कुरआनात अशा कीतीतरी आयती आहेत ज्या व्याख्या व स्पष्टीकरणा दाखल अवतरीत झाल्या आहेत. तसेच त्यांच्यावर कुरआन खेरीज ही संदेश अवतरीत झाले होते ज्यात सविस्तर आदेश वगैरे दिले गेले आहेत. जे अहादीस सहीह: मध्ये सुरक्षित आहेत.

२०. येथून संभाषणा क्रम पुन्हा त्या गोष्टी कडे वळतो, जी या आधी चालली होती. कदापी नव्हे चा अर्थ हा की तुम्ही लोक मोबदल्याच्या दिवसाचा इन्कार या आधारावर नाही करीत की याचे प्रमाण स्पष्ट नाही.

२१. मोबदला व शिक्षेचे प्रमाण तर तुमच्या स्वत:च्या आत्म्यातही आहे. परंतु तुमच्या इन्काराचे खरे कारण ऐहिकते विषयीची आसक्ति व रोख लाभणारा फायदा होय. तुम्ही असे समजता की आखिरतचा फायदा उधार आहे. उधारी खातीर नकदी चा लाभ कोण सोडेल. परंतु हा विचार नाही करीत की या जगाचा लाभ फार थोडा व तात्पुरता आहे आणि आखिरतचा फायदा फार मोठा व निरंतर आहे.

२२ मोबदल्याच्या दिवसावर ईमान बाळगून सत्कर्म करणाऱ्यांचे हे चेहरे असतील.

२३. या आयतीचा स्पष्ट अर्थ हाच की कियामतीच्या दिवशी यशास्वी होणारे लोक आपल्या पालन कर्त्या (अल्लाह) ला प्रत्यक्ष बघण्याचे सद्भाग्य प्राप्त करीत असतील. हदीस वचनांनीही या गोष्टीचे समर्थन होते. बुखारी या हदीस संकलनातील उल्लेख असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले.

اِنَّكُمْ سَتَرَوْنَ رَبَّكُمْ عِيَانًا۔ (بخاری کتاب التوحید)

''तुम्ही लवकरच आपल्या पालन कर्त्यास उघडया डोळ्यांनी बघाल.'' (बुखारी किताबुत्तौहीद)

आणि या संदर्भात इतर हदीस वचनेही उलेखित आहेत. तसेच अल्लामा इब्ने कसीर यांनी अनेक हदीस वचनांचा उल्लेख करुन लिहीले आहे की अल्लाहच्या दर्शनाचा लाभ ईमान बाळगणाऱ्यांना कियामतीच्या दिवशी होईल. या बाबत पैगंबरांच्या सहवासातील अनुयायी, ताबईन आणि या समस्त मुस्लिम जनसमूहाच्या सदाचारी लोकांचे एकमत आहे. तसेच इस्लामचे ईमामांच्या दरम्यान ही, ही सर्वसांमत बाब होय. (तफसीर इब्ने कसीर. खंड - ४ पृ. ४५)

आणि कितीतरी चेहरे त्या दिवशी भकास असतील. ते समजत असतील की त्यांच्याशी कमर तोड मामला होणार आहे. कदापि नव्हे. जेव्हा प्राण गळ्या पावेतो पोहोचेल. आणि म्हटले जाईल, आहे कोणी झाड फूंक (तंत्र मंत्र ) करणारा ? आणि तो समजेल की ही निरोपाची वेळ आहे.*(अल-क़ुर्आन)*

| | |
|---|---|
| २४. आणि कितीतरी चेहरे त्या दिवशी भकास असतील. [२४] | وَوُجُوۡهٌ يَّوۡمَىِٕذٍۢ بَاسِرَةٌ ۙ﴿۲۴﴾ |
| २५. ते समजत असतील की त्यांच्याशी कमर तोड मामला होणार आहे.[२५] | تَظُنُّ اَنۡ يُّفۡعَلَ بِهَا فَاقِرَةٌ ؕ﴿۲۵﴾ |
| २६. कदापि नव्हे.[२६] जेव्हा प्राण गळ्या पावेतो पोहोचेल. [२७] | كَلَّاۤ اِذَا بَلَغَتِ التَّرَاقِىَ ۙ﴿۲۶﴾ |
| २७. आणि म्हटले जाईल, आहे कोणी झाड फूंक (तंत्र मंत्र ) करणारा ?[२८] | وَقِيۡلَ مَنۡ ٜ رَاقٍ ۙ﴿۲۷﴾ |
| २८. आणि तो समजेल की ही निरोपाची वेळ आहे.[२९] | وَّظَنَّ اَنَّهُ الۡفِرَاقُ ۙ﴿۲۸﴾ |
| २९. आणि पोटरी शी पोटरी बिलगून जाईल.[३०] | وَالۡتَفَّتِ السَّاقُ بِالسَّاقِ ۙ﴿۲۹﴾ |
| ३०. त्या दिवशी तुझ्या पालन कर्त्या कडे जावे लागेल. [३१] | اِلٰى رَبِّكَ يَوۡمَىِٕذِ اِلۡمَسَاقُ ؕ﴿۳۰﴾ |
| ३१. परंतु त्याने ना सत्याचा स्विकार केला आणि ना नमाज अदा केली. [३२] | فَلَا صَدَّقَ وَلَا صَلّٰى ۙ﴿۳۱﴾ |
| ३२. किंबहुना खोटे ठरविले आणि तोंड फिरविले.[३३] | وَلٰـكِنۡ كَذَّبَ وَتَوَلّٰى ۙ﴿۳۲﴾ |
| ३३. मग ताठपणाने आपल्या कुटुंबियां कडे चालला गेला.[३४] | ثُمَّ ذَهَبَ اِلٰٓى اَهۡلِهٖ يَتَمَطّٰى ؕ﴿۳۳﴾ |
| ३४. खेद आहे तुझ्या बद्दल खेद आहे ! | اَوۡلٰى لَكَ فَاَوۡلٰى ۙ﴿۳۴﴾ |
| ३५. पुनश्च खेद आहे तुझ्या बद्दल खेद आहे ! [३५] | ثُمَّ اَوۡلٰى لَكَ فَاَوۡلٰى ؕ﴿۳۵﴾ |
| ३६. काय मनुष्य असे समजतो की त्याला असेच सोडून दिले जाईल ?[३६] | اَيَحۡسَبُ الۡاِنۡسَانُ اَنۡ يُّتۡرَكَ سُدًى ؕ﴿۳۶﴾ |

२४. हे काफिरांचे चेहरे असतील आणि आपल्या अपराधांमुळे त्यांच्या वर औदासिन्य पसरलेले असेल.

२५. म्हणजे त्यांना कडक शिक्षा मिळणार आहे, जी त्यांचे कंबरडे मोडून टाकील. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अगदी असह्य स्वरुपाची आपत्ति त्यांच्यावर कोसळेल.

२६. म्हणजे तुम्हा लोकांचा हा विचार की मनुष्य मेल्या नंतर अगदी नष्ट होऊन जातो; मुळीच योग्य नाही मेल्यानंतर शरीर तर सडून कुजून जाते परंतु आत्मा कायम राहतो आणि शरीरा पासून वेगळे होताच आपल्या पालन कर्त्या कडे जातो.

२७. हे प्राण निघत असतांना चे चित्र आहे, जे मांडले गेले आहे या साठी की माणसामध्ये ही जाणीव निर्माण व्हावी की त्याला एक न एक दिवस मरावयाचे आहे व आपला प्राण, प्राणदात्याला सोपवायचा आहे.

२८. लोक जेव्हा एखाद्या रुग्णाला अंतिम स्थितीत पाहतात आणि औषधोपचारा पासून निराश होतात तेव्हा झाड फूंक (मंत्र तंत्र) करणाऱ्याला बोलवितात, या साठी की या उपायाने रोगी बरा व्हावा. परंतु जेव्हा मृत्यु-समय येऊन ठेपतो तेव्हा सर्व उपाय खुंटतात. त्या काळी अरब लोकात झाड फूंक,मंत्र तंत्राचा रिवाज होता म्हणून याचा विशेषत्वाने हवाला दिला गेला आहे. स्पष्ट असावे की इस्लामने मंत्र तंत्रादि कर्मास ज्यात अनेकेश्वरोपासने ची वचने असतात हराम व मिथ्या ठरविले आहे आणि रोग मुक्ति करीता प्रार्थनामय वचनांची शिकवण दिली ज्यात एकेश्वरवादाचा स्विकार व अल्लाहवरील भरवसा व्यक्त होतो.

२९. म्हणजे माणसाला खात्री पटेल की त्याची या जगाचा निरोप घेण्याची वेळ येऊन ठेपली.

३०. हे त्याच्या विवशतेचे चित्र होय. आपल्या ज्या पायांद्वारे तो मोठी धावपळ दाखवित होता, ते मरते वेळी इतके शक्तिहीन होतील की एक पोटरी दुसऱ्या पोटरीला जाऊन बिलगते.

३१. म्हणजे प्राण शरीरातून उडून जाऊन आपल्या पालन कर्त्या अल्लाह जवळ पोहचेल. अभिप्रेत कबरीच्या विश्वात पोहचणे होय, जे काफीरांच्या आत्म्यां करीत कारागृहा समान होय.

३२. आता त्या माणसाचे कर्म विषयक जीवन प्रस्तुत केले जात आहे की तो या जगाचा निरोप घेत असतांना आपल्या सोबत काय घेऊन जात आहे. मोबदल्याच्या दिवसाला त्याने खरे जाणले नव्हते आणि ना अल्लाहच्या उपासनेशी त्याला काही संबंध राहीला, म्हणून त्याने नमाज सारख्या अतिमहत्वपूर्ण कर्तव्याची ही पर्वा केली नाही.

स्पष्ट झाले की मोबदल्याचा दिवसावर ईमान बाळगण्याची सर्वात प्रथम निकड ही की माणसाने नमाज पढावी आणि कुरआन काफिरांची ही दशा सांगत आहे की ते नमाज न पढणारे असतात. परंतु खेदाची गोष्ट अशी की आजच्या काळात बहुसंख्य मुसलमान नमाज न पढणारे आहेत. जर त्यांनी कुरआनाच्या या आयतींचे विचारपूर्वक पठण केले तर त्यांना निश्चित धक्का बसेल व नमाज पढण्याची सुबुद्धि लाभेल.

३३. खोटे ठरविले आखिरतला व तोंड फिरविले अल्लाह ची उपासना व आज्ञा पालना पासून.

३४. म्हणजे ही त्याची घमेंड आहे, जी त्याला सत्याचा स्विकार करण्या पासून रोखत आहे. असा मनुष्य उपदेशाचा काही ही प्रभाव आत्मसात करीत नाही; किंबहुना त्या पासून तोंड फिरवून ताठ मानेने आपल्या कुटुंबियांकडे चालला जातो; आणि आपल्या सुस्थितीवर अभिमान बाळगतो.

३५. اَوْلٰی لَکَ जसे की जौहरीने स्पष्ट केले आहे की हा सावध व खबरदार करणारा शब्द आहे खरेतर हा وَلِی (वलिय) ने आहे ज्याचा अर्थ जवळ होणे असे आहे. अस्मई म्हणतात याचा अर्थ विनाश करणारी वस्तू जवळ येऊन ठेपली. म्हण्जे आपत्ती (संकटे) अवतरली.

या दोन आयती मध्ये त्या माणसाच्या वर्तना बद्दल खेद अधिक खेद प्रकट केला गेला आहे. हे वचन चार वेळा आहे. जे या गोष्टीस स्पष्ट आहे की अशा माणसा करीता विनाशा वर विनाश आहे.या जगात ही विनाश आणि कबरीच्या विश्वा मध्ये ही विनाश,मग हश्र च्या मैदानात ही विनाश. आणि सरते शेवटी जहन्नम जिथे चिरकाळ टिकणासा विनाशात रहावयाचे आहे.

३६. स्पष्टी करणा करीता पहा 'सूरह मोमिनून' टीप क्र. १०२

३७. काय तो वीर्याचा एक थेंब नव्हता, जो (उदरात) टाकला जातो. [३७]

اَلَمْ يَكُ نُطْفَةً مِّنْ مَّنِيٍّ يُّمْنٰى ﴿٣٧﴾

३८. मग तो रक्ताचा गोळा (अलकह ) झाला.[३८] मग (अल्लाहने ) त्याचे शरीर बनविले आणि त्याला दुरुस्त केले.[३९]

ثُمَّ كَانَ عَلَقَةً فَخَلَقَ فَسَوّٰى ﴿٣٨﴾

३९. मग,[४०] त्या पासून जोडी तयार केली पुरुष आणि स्त्री.[४१]

فَجَعَلَ مِنْهُ الزَّوْجَيْنِ الذَّكَرَ وَالْاُنْثٰى ﴿٣٩﴾

४०. काय तो या गोष्टीस समर्थ नाही की मृतांना जिवंत करावे ?[४२]

اَلَيْسَ ذٰلِكَ بِقٰدِرٍ عَلٰٓى اَنْ يُّحْيِۦَ الْمَوْتٰى ﴿٤٠﴾

३७. म्हणजे माणसाची घमेंड व दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनाशी त्याचा इन्कार कोणत्या आधारावर आहे? तो आपल्या या वस्तु स्थितीला विसरतो की तो वीर्याचा एक तुच्छ थेंब मात्र होता ज्याला मातेच्या उदरात टाकण्याचे कर्म माणसाने केले, त्यानंतर अल्लाहने त्याची रचना विविध अवस्थांमधून घडविली.

३८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र.९ आणि सूरह मोमिनून टीप क्र.१४

३९. म्हणजे रक्ताच्या गोळ्याला मनुष्य स्वरुप दिले आणि मग त्याचे नाकी टोकी नीट घडविले.

४०. म्हणजे तसेच

४१. जोडी बनविणे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की त्याच्या रचयित्याने त्याला बुध्दिकौशल्य, उद्दिष्ट, व एका योजने सह निर्माण केले आहे.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नबा टीप क्र. ६

४२. म्हणजे ज्याच्या उद्‌भूत सामार्थ्याचा एवढा प्रताप असावा त्याच्या करीता मेलेल्यांना पुन्हा जिवित करणे कोणते कठीण काम आहे?

# सूरह अल् इन्सान

# ७६. सूरह अल् इन्सान

**नाव:** पहिल्या आयतीत माणसाच्या त्या अवस्थेचा उल्लेख केला गेला आहे जेव्हा तो काही ही नव्हता. या अनुषंगाने या सूरहचे नाव ''अल् इन्सान'' असे आहे. याचे दूसरे सर्वपरिचित नाव ''अद दहर'' (काळ) असे आहे. ते या अनुषंगाने की हा शब्द पहिल्या आयतीत आला आहे. आम्ही या आधी हे स्पष्ट केलेच आहे की सूरती (अध्यायां) ची नावे विषयानुरोधाने नसतात, किंबहुना विशेष शब्दां (Significant words) च्या अनुरोधाने ओळखी साठी असतात.

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि मजकूरां वरून असे दिसून येते की सुरवातीच्या काळात अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** मोबदला व शिक्षा आहे. परंतु मोबदला (सुपरिणति)चा पैलू प्रभावी आहे. या साठी की त्या चिरकाळ स्वरुपाच्या देणग्या व बक्षीसांना प्राप्त करण्यास लोकांनी प्रोत्साहीत व्हावे, अर्थात त्यांनी सदाचारी बनावे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ३ मध्ये माणसाची निर्मिती व त्यामागचा उद्देश सांगितला गेला आहे.

आयत क्र. ४ मध्ये काफिरां करीता सक्त शिक्षेचे ऐलान आहे. आयत क्र.५ ते २२ मध्ये सत्कर्म करणाऱ्या लोकांचे अति भव्य प्रतिफळ सांगितले गेले आहे.

आयत क्र. २३ ते २६ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संयम धैर्य, नमाज व तस्बीह (अल्लाहचे गुणगान) इ. ची ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. २७ व २८ मध्ये अशा लोकांना जे ऐहिकते वर आसक्त होऊन आखिरतला दृष्टीआड करतात; सावध केले गेले आहे.

आयत क्र.२९ ते ३१ मध्ये कुरआनाच्या उपदेशास कबूल करण्यास उत्तेजन दिले गेले आहे जेणेकरुन लोकांनी अल्लाहच्या कृपा-छत्रा खाली यावे. परंतु जे लोक इन्कार करण्या वर अटळ आहेत, त्यांना दु:खदायक ईश-शिक्षेची तंबी दिली गेली आहे.

# ७६.सूरतुल इन्सान

سُورَةُ الإِنسَان

**आयती - ३१**

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. काय माणसा वर अनंत काळात एक वेळ अशी नाही आली जव्हा तो काहीच उल्लेखनीय वस्तु नव्हता ? [१]

هَلْ أَتَىٰ عَلَى الْإِنسَانِ حِينٌ مِّنَ الدَّهْرِ لَمْ يَكُن شَيْئًا مَّذْكُورًا ﴿١﴾

२. आम्ही माणसाला एका मिश्र थेंब पासून निर्माण केले,[२] या साठी की त्याची कसोटी घ्यावी. यास्तव आम्ही त्याला ऐकणारा व पाहणारा बनविले. [३]

إِنَّا خَلَقْنَا الْإِنسَانَ مِن نُّطْفَةٍ أَمْشَاجٍ نَّبْتَلِيهِ فَجَعَلْنَاهُ سَمِيعًا بَصِيرًا ﴿٢﴾

३. आम्ही त्याला मार्ग दाखविला [४] मग तो कृतज्ञ बनो अथवा कृतघ्न.[५]

إِنَّا هَدَيْنَاهُ السَّبِيلَ إِمَّا شَاكِرًا وَإِمَّا كَفُورًا ﴿٣﴾

४. काफिरां करीता आम्ही शृंखला आणि जोखंड व धगधगणारी आग तयार करुन ठेवली आहे.[६]

إِنَّا أَعْتَدْنَا لِلْكَافِرِينَ سَلَاسِلَ وَأَغْلَالًا وَسَعِيرًا ﴿٤﴾

५. सदाचारी लोक;[७] अशा मद्याचे प्याले पितील ज्यात कापूराचे मिश्रण असेल.

إِنَّ الْأَبْرَارَ يَشْرَبُونَ مِن كَأْسٍ كَانَ مِزَاجُهَا كَافُورًا ﴿٥﴾

६. हा एक झरा असेल [८] ज्यातून अल्लाहचे दास [९] पितील आणि त्याच्या शाखा (वाटेल तिथे) काढतील.[१०]

عَيْنًا يَشْرَبُ بِهَا عِبَادُ اللَّهِ يُفَجِّرُونَهَا تَفْجِيرًا ﴿٦﴾

७. हे लोक आपले नवस (नज्र) पूर्ण करतात [११] आणि त्या दिवसाचे भय बाळगतात, ज्याचे संकट चोहीकडे पसरलेले असेल.

يُوفُونَ بِالنَّذْرِ وَيَخَافُونَ يَوْمًا كَانَ شَرُّهُ مُسْتَطِيرًا ﴿٧﴾

८. आणि त्याच्या प्रेमा खातीर गरजवंत, अनाथ आणि कैद्यांना जेऊ घालतात. [१२]

وَيُطْعِمُونَ الطَّعَامَ عَلَىٰ حُبِّهِ مِسْكِينًا وَيَتِيمًا وَأَسِيرًا ﴿٨﴾

१. माणसाने जमीनीवर जेव्हा पासून डोळे उघडले तो उन्नति व नैपुण्याची शिखरे गाठत आहे. तात्पर्य जमीनीवर मनुष्य वस्तीचे हे युग भूतपूर्व युगांच्या तुलनेने विशेष स्थान बाळगतो. आणि मनुष्य आपल्या या ऐहिक प्रगतीचा अभिमान करु लागतो. परंतु आपल्या भूतकाळा वर कधी विचार करीत नाही की तो सुरवातीला कोणत्या अवस्थेत होता आणि त्याच्या निर्मात्याने त्याला कोणत्या योग्यतेप्रत पोहचाविले आहे. एक वेळ अशी होती की जेव्हा मनुष्य सडक्या कुजक्या मातीत फिरत होता. अर्थात सडकी कुजकी माती ही उल्लेखनीय वस्तू नव्हे. मग आदमच्या निर्मिती नंतर त्याच्या वंशाचा क्रम पाण्याचा तुच्छ थेंब असलेल्या वीर्या पासून चालविला गेला. प्रत्येक माणसावर एक वेळ अशी आलेली असते जेव्हा तो अशी न उल्लेखण्या जोगी वस्तू असतो. काय माणसाचा हा भूतकाळ व त्याची ही वास्तविकता या गोष्टीचे स्मरण घडवित नाही की त्याच्या पालन कर्त्याने आपल्या अद्‌भूत सामर्थ्याद्वारे राईला पर्वताचे स्वरुप दिले.

२. वीर्य बिंदू मूळातच एक मिश्रण असते अर्थात यात अनेक प्रकारचे द्रव (Liquids) असतात आणि आधुनिक शरीर विज्ञाना (Physiology) च्या अनुसार एक द्रव असा असतो ज्यात शुक्रजंतू (Spermatozoon) असतात आणि हे शुक्रजंतू अंडकोषा: मधून निघून वीर्य कोषा (Seminal Vesicles) मध्ये जमा होतात आणि तिसरा द्रव शुक्राशय पिंडा (Prostate gland) चा असतो, जो यात एक विशिष्ट गंध निर्माण करतो आणि चौथा द्रव तो पिंड निर्माण करतो जो मूत्रनलीके जवळ असतो व त्यास चिकट बनवितो. वीर्य बिंदू या सर्व घटकांचे मिश्रण असते. मग जेव्हा हा वीर्य बिंद उदरात बीजांडातील रजोगोला शी संयुक्त होतो तेव्हा ते अंड गर्भ मुक्त (Fertilzed)होते अर्थात गर्भ धारणा होते. अशा प्रकारे मानवाच्या उत्पत्तिचा आरंभ पुरुषाच्या वीर्या शी स्त्रीच्या बीजांडाच्या मिक्षणा द्वारे होतो.

३. म्हणजे माणसाची निर्मिती एवढ्या साठी झाली आहे की त्याची या जगात परिक्षा घेतली जावी. म्हणूनच त्याला दृष्टी व श्रवणाच्या देणग्या प्रदान केल्या गेल्या आहेत. या देणग्यांनी त्याला सूज्ञ अशी निर्मिती बनविले आहे आणि त्याला एवढी बुध्दि दिली आहे की तो बऱ्या-वाईटात तारतम्य करु शकतो.

४. म्हणजे आम्ही त्याच्या वर ईश-मार्गदर्शनाचे मार्ग मोकळे केले आहेत. स्वभावाच्या मार्ग-दर्शनाचे साधन ही स्पष्ट केले आहे. अवकाशात पसरलेल्या निशाण्यां द्वारे ही आणि वही प्रेषित्व क्रमा द्वारे ही.

५. आता त्याला हा अधिकार आहे की अल्लाहचा कृतज्ञशील दास बनावे किंवा कृतघ्न व काफिर बनावे. ज्या अर्थी माणसाची परीक्षा घेणे अभिप्रेत आहे तर त्याला आपल्या मर्जीनुसार कृतज्ञ किंवा कृतघ्न काफिर बनण्याचे स्वातंत्र्य दिले गेले.

६. काफिर बनण्याची मोकळीक तर दिली गेली आहे परंतु जे लोक काफिर बनतील त्यांनी लक्षात घ्यावे की ते परिक्षेत असफल झाले, आपल्या इच्छा-आकांक्षांच्या मागे धावून त्यांनी चुकीच्या मार्गाचा अवलंब केला म्हणून आखिरत मध्ये सक्त शिक्षेस पात्र ठरतील. साखळ दंडानी त्यांना जखडून टाकले जाईल. गळयात जोखंड असेल आणि भडकत्या आगीत त्यांना झोकून दिले जाईल. केवढी भयंकर व दु:खदायक शिक्षा आहे अल्लाहच्या मार्गदर्शना पासून तोंड फिरविणाऱ्यांची!

७. मूळ शब्द अबरार अर्थात 'बर्र' या शब्दाचे अनेक वचन होय बर्र चा अर्थ सत्य, निष्ठा आज्ञा पालन ज्या माणसाच्या अंगी हा गुण असेल त्याला सदाचारी (पुष्यशील) म्हटले जाते. आयतीच्या संदर्भा वरून दिसते की अबरारशी अभिप्रेत अल्लाहचे ते दास होत जे त्याचे कृतज्ञशील व आज्ञाधारक बनून राहतील आणि ज्यांनी आखिरतला ध्येय-उद्दिष्ट बनवून सत्कर्म पूर्ण जीवन घालविले.

८. कर्पूर (कापूर) जन्नत मधील एक निर्झर असेल. या जगातल्या कर्पूरा वरुन त्याचा कयास केला जाऊ शकत नाही. मात्र त्याची कल्पना अशा प्रकारे कायम होते की ते स्वच्छता व शितलतेत कर्पूरा समान असेल. तसेच त्याचा सुगंध व स्वाद असा असेल की पिणाऱ्याला एक निराळाच कैफ चढेल त्याचे थोडेस प्रमाणच मद्याला स्वादिष्ट करण्यास पुरेसे ठरेल. यास्तव मद्याच्या प्याल्यात याचे मिश्रण असेल.

९. मूळ शब्द 'इबाद' यास अभिप्रेत अल्लाहचे प्रामाणिक दास होत.

१०. म्हणजे हे आवश्यक नसेल त्यांनी या झऱ्या पर्यंत यावे व तृप्त व्हावे किंबहुना ही गोष्ट त्यांच्या अवाक्यात असेल की त्यांना इच्छा होईल तिथे ही झरा काढू शकतील.

११. नवस (नज्र) हा की माणसाने स्वत:वर अल्लाहच्या संबंधाने एखादे कार्य बंधनकारक करावे उदाहरणार्थ एखादी ईश - देणगी लाभल्यावर हा संकल्प करावा की मी अमुक इतके रोजे पाळीन किंवा नवस मानावा की जर रोग मुक्त झालो तर अमुक इतके धन दान करीन. अशा प्रकारचे नवस पूर्ण करणे आवश्यक आहे कारण अल्लाहला दिलेले वचन मोठे महत्वपूर्ण असते आणि ते पूर्ण करुनच मनुष्य आपली सत्यनिष्ठा व सत्कर्मी असण्याचा पुरावा देऊ शकतो.

इस्लाम ने नवस मानण्यास उत्तेजन दिले नाही 'अल् मुग्नी' या ग्रंथातील उल्लेख असा :-

وَلِاَنَّ النَّذْرَ لَوْكَانَ مُسْتَحَبًّا لَفَعَلَهُ النَّبِىُّ

صلى الله عليه وآله وسلم وَاَفَاضِلُ اَصْحَابِهِ۔ (المغنى ج ٩ ص١)

''आणि या साठी की नवस जर आवश्यक असती तर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांच्या सहवासातील प्रतिष्ठीत अनुयायींनी तो आचरणात आणला असता.'' (अल् मुग्नी - खंड - ९ पृ. १)

आणि फिकहुस्सुन्ना या शरीअत विषयक ग्रंथातील उल्लेख असा :-

وَالْاِسْلَامُ وَاِنْ كَانَ قَدْشَرَعَهُ اِلَّا اَنَّهُ لَايَسْتَحِبُّهُ، فَعَنْ ابْنِ عُمَرَ اَنَّ النَّبِيَّ صلى الله عليه وآله وسلم نَهٰى عَنِ النَّذْرِ وَقَالَ! اِنَّهُ لَا يَاْتِیْ بِخَيْرٍ وَّاِنَّمَا يُسْتَخْرَجُ بِهٖ مِنَ الْبَخِيْلِ رَوَاهُ الْبُخَارِیْ وَمُسْلِمٌ۔ (فقه السنه للسيد سابق ج ٣ ص ٣٥)

''इस्लामने नवसाला शास्त्रसंमत ठरविले असले तरी तो आवश्यक नाही. इब्ने उमर द्वारे उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी नवस मानण्यास मनाई केली आणि फर्माविले की तो मांगल्य कारक नाही. मात्र याद्वारे काही धन कंजूस व्यक्ति कडून काडले जाते. (फिकहुस्सुन्नह - खंड - ३ पृ. ३५)

आणि हे ही खरे की शरीअत विषयक आदेशांच्या पालना नंतर नवसा करीता फारच कमी वाव राहतो कारण त्या आदेशांचे पालन अत्यावश्यक व अग्रक्रमाचे आहे. त्याच प्रमाणे नफील नमाज व दान वगैरे ही बंधनाशिवाय अदा केले जाऊ शकतात. तेव्हा नवसाच्या स्थितीत आणखी काही गोष्टी स्वत:वर बंधनकारक करणे म्हणजे स्वत:ला अकारण अडचणीत टाकणे होय. यास्तव इस्लामने नवस मानण्यास उत्तेजन दिलेले नाही. मात्र जर कोणी नवस मानलाच असेल तर तो पूर्ण करण्याचा ताकीद पूर्ण आदेश दिला गेला आहे.

स्पष्ट असावे की 'नवस' देखील उपासना आहे, म्हणून केवळ अल्लाह करीता नवस मानला जाऊ शकतो. अन्य. एखाद्याच्या नावाचा नवस, मन्नत, मग तो देवी देवताच्या नावाचा असो किंवा पीर वलीच्या नावाचा, शिर्क आहे.

१२. म्हणजे अल्लाहच्या प्रेमा खातीर ते दीन दुबळयांची मदत करतात गरजवंताला जेऊ घालणे, त्यांची सर्वप्रथम गरज भागविणे होय म्हणून त्याचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला आहे. अन्यथा त्यांना कपडे लत्ते पुरविणे, त्यांचा औषधोपचार आणि ते बेघर असल्यास त्यांच्या निवासाची व्यवस्था करणे ही सर्व सत्कर्मे होत आणि अत्यावश्यक स्वरुपाची ही.

त्या काळात कैद्यां करीता आजच्या सारखे तुरुंग नव्हते की जिथे जेवणाची ही व्यवस्था असावी.यास्तव त्यांना जेऊ घालण्याचे विशेषत्वाने प्रोत्साहन दिले गेले आहे.कसलाही भेदभाव न पाळता. मग ते मुस्लिम असोत वा मुस्लिमेतर आणि युद्ध-कैदी असोत अथवा अन्य अपराधां पायी बंदिस्त केलेले असोत. निती आणि माणुसकीची निकड हीच की त्यांची तहान भूक शमविली जावी त्या साठी त्यांना जेऊ घालणे अगत्याचे आहे.

आम्ही तुम्हाला केवळ अल्लाहच्या प्रसन्नते खातीर जेऊ घालतो. ना तुमच्या कडून मोबदला इच्छितो आणि ना आभार. आम्ही आपल्या पालन कर्त्या तर्फे एका अशा दिवसाचे भय बाळगतो जो उद्विग्नतापूर्ण आणि अतिशय सक्त असेल. तेव्हा अल्लाहने त्यांना त्या दिवसाच्या संकटा पासून वाचविले; आणि त्यांना टवटवी आणि आनंद प्रदान केला. *(अल-क़ुर्आन)*

९. आम्ही तुम्हाला केवळ अल्लाहच्या प्रसन्नते खातीर जेऊ घालतो. ना तुमच्या कडून मोबदला इच्छितो आणि ना आभार.[१३]

إِنَّمَا نُطْعِمُكُمْ لِوَجْهِ اللَّهِ لَا نُرِيدُ مِنكُمْ جَزَآءً وَلَا شُكُورًا ﴿٩﴾

१०. आम्ही आपल्या पालन कर्त्या तर्फे एका अशा दिवसाचे भय बाळगतो जो उद्विग्नतापूर्ण आणि अतिशय सक्त असेल.[१४]

إِنَّا نَخَافُ مِن رَّبِّنَا يَوْمًا عَبُوسًا قَمْطَرِيرًا ﴿١٠﴾

११. तेव्हा अल्लाहने त्यांना त्या दिवसाच्या संकटा पासून वाचविले; आणि त्यांना टवटवी आणि आनंद प्रदान केला.[१५]

فَوَقَىٰهُمُ اللَّهُ شَرَّ ذَٰلِكَ الْيَوْمِ وَلَقَّىٰهُمْ نَضْرَةً وَسُرُورًا ﴿١١﴾

१२. आणि त्यांच्या सहनशीलतेचा मोबदला म्हणून त्यांना जन्नत आणि रेशमी पोषाक प्रदान केला.[१६]

وَجَزَىٰهُم بِمَا صَبَرُوا جَنَّةً وَحَرِيرًا ﴿١٢﴾

१३. तिथे ते आसनांवर तक्के लावून बसले असतील [१७] ना त्यांना उन्हाची प्रखरता जाणवेल आणि ना थंडीची तीव्रता.[१८]

مُّتَّكِـِٔينَ فِيهَا عَلَى الْأَرَآئِكِ لَا يَرَوْنَ فِيهَا شَمْسًا وَلَا زَمْهَرِيرًا ﴿١٣﴾

१४. तिच्या सावल्या त्यांच्या वर झुकलेल्या असतील [१९] आणि त्याचे गुच्छे झुकून लोंबकळत असतील .[२०]

وَدَانِيَةً عَلَيْهِمْ ظِلَٰلُهَا وَذُلِّلَتْ قُطُوفُهَا تَذْلِيلًا ﴿١٤﴾

१५. त्यांच्या पुढयात चांदीची भांडी [२१] आणि काचेचे प्याले ये जा करतील.

وَيُطَافُ عَلَيْهِم بِـَٔانِيَةٍ مِّن فِضَّةٍ وَأَكْوَابٍ كَانَتْ قَوَارِيرَا ﴿١٥﴾

१६. काच ही ती जी चांदी ची असेल [२२] आणि त्यांची परिमाणे ते स्वत:च निश्चित करतील [२३]

قَوَارِيرَا مِن فِضَّةٍ قَدَّرُوهَا تَقْدِيرًا ﴿١٦﴾

१७. त्यांना तिथे अशा मद्याचे प्याले पाजले जातील, ज्यात सूंठीचे मिश्रण असेल.

وَيُسْقَوْنَ فِيهَا كَأْسًا كَانَ مِزَاجُهَا زَنجَبِيلًا ﴿١٧﴾

१८. हा एक झरा असेल [२४] ज्याला 'सल्सबील' म्हटले जाते.[२५]

عَيْنًا فِيهَا تُسَمَّىٰ سَلْسَبِيلًا ﴿١٨﴾

१३. म्हणजे ते या गरजवंताची मदत अशा साठी करीत नाही की त्यांच्या कडून एखादा मोबदला मिळावा आणि ना या साठी की त्यांची स्तुति व्हावी व त्यांचे आभार मानले जावेत किंबहुना या सर्व गोष्टींची तिळमात्र अपेक्षा न करता अगदी निस्वार्थ पणे केवळ अल्लाहल्या प्रसन्नते खातीर ते गरजवतांना मदत करतात. अर्थात दान खऱ्या अर्थाने तेच होय जे केवळ अल्लाहच्या प्रसन्नते करीता दिले जावे. त्यामागे ना मोबदल्याची अपेक्षा असावी आणि ना नाव लौकिक मिळविण्याची. जिथे ही भावना असेल तिथे अल्लाहची प्रसन्नता व त्याच्यातर्फे मिळणारा मोबदला नसेल.

१४. म्हणजे जे सत्कर्म देखील आम्ही करतो आखिरतला ध्येय-उद्दिष्ट ठरवूनच करतो. कियामतीच्या दिवसाच्या महाभयंकर आपत्तिने आम्ही भय कंपित असतो आणि त्या दिवसाच्या आपत्ति पासून मुक्ति मिळविण्यास आम्ही आपली फार मोठी सफलता जाणतो.

कियामतीचा दिवस अगदी कडवट असेल म्हणजे तो असा दिवस असेल की प्रत्येक अपराध्याला कडवट करुन टाकील.

१५. म्हणजे अल्लाह त्या लोकांना ज्यांचे गुण विशेष वर सांगितले गेले आहे, कियामतीच्या दिवसाच्या संकटा पासून सुरक्षित ठेवील आणि त्यांना कसलाही त्रास नसेल किंबहुना त्यांचे चेहरे प्रफुल्लीत व टवटवीत असतील व त्यांची ह्रदये आनंद विभोर असतील की ते जगाच्या कसोटीत खरे उतरले.

१६. स्पष्ट असावे की जन्नत फुकटात मिळणारी वस्तु नाही, तर संयम व धैर्याच्या मोबदल्यात मिळेल. शरीअत विषयक आदेशांचे पालन आणि सत्कर्म व ईशभय पूर्ण जीवन निश्चितच मोठ्या धैर्य- संयमाची बाब होय. परंतु या कसोटीमय अवस्थेतून सफलता पूर्वक पार पडणाऱ्यांना निरंतर जन्नतीचे दरवाजे खुले होतात.

जन्नतची प्रत्येक वस्तु वा गोष्ट अत्युच्च दर्जाची असेल. पोषाख (वस्त्र-प्रावरणे) ही अतिशय उत्कृष्ट व निखलस रेशमाचा असेल.जन्नतच्या देणग्यां मध्ये ज्या पुढे सांगितल्या गेल्या आहेत, पोषाखाचा उल्लेख सर्वात प्रथम केला गेला आहे. तात्पर्य, सर्वात पहिला मान, जो जन्नत वाल्यांना दिला जाईल तो रेशमी वस्त्रे होय.

१७. या आयतीं मध्ये जन्नतची एक झळक दाखविली गेली आहे की किती वैभवशाली असेल ती जन्नत व केवढया थाटात राहतील त्यात हे जन्नती. जन्नतची ही झळक कुरआनानेच दाखविली आहे आणि ही या ग्रंथाची सर्वश्रेष्ठता होय की तो या जगीच जन्नतची नयनरम्य दृश्य दाखवितो.

जन्नत वाले आसनांवर तक्कयांना टेकून बसलेल असतील आणि हा आशय आहे त्यांच्या मोठया थाटात जन्नत मध्ये राहण्याचा.

१८. म्हणजे जन्नतचे वातावरण अगदी प्रसन्न व आल्हाद दायक असेल थंडी आणि उन्हाचा कसलाही त्रास तेथे जाणवणार नाही. प्रत्येक गोष्ट अत्याधिक स्वरुपात संतुलीत असेल.

१९. म्हणजे जन्नतच्या झाडांच्या सावल्या त्यांच्यावर झुकलेल्या असतील. यावरुन जन्नतचे प्रसन्न वातावरण,आल्हाददायक असल्याची कल्पना येते.

२०. जन्नतच्या झाडांचे घोंस अशा प्रकारे लोंबकळत असतील की त्यांना अगदी सहजगत्या तोडले जाऊ शकेल. त्यांची फळे प्राप्त करण्या करीता कसलाही त्रास वा कष्ट उचलावे लागणार नाही.

२१. सूरह जुखरुफच्या आयत क्र. ७१ मध्ये निवेदिले गेले आहे की जन्नत मध्ये सोन्याची भांडी असतील आणि या ठिकाणी चांदीच्या भांड्यांचा उल्लेख केला गेला आहे. तात्पर्य जन्नत मध्ये चांदी ची ही भांडी असतील व सोन्याची ही.

स्पष्ट असावे की इहलोकात (अर्थात या जगात) सोन्या - चांदीच्या भांडयांना इस्लामने हराम (अवैध) ठरविले आहे. ही ऐश्वर्य-सामुग्री जन्नत करीताच योग्य आहे.

२२. प्याले काचेचे असतील आणि काच ती जी चांदीची असेल. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणून अशा चांदीची भांडी असतील जे काचे सारखे पारदर्शी (Transparent) असतील. हे जन्नतच्या चांदीचे वैशिष्टय असेल या जगात अशा प्रकाराची चांदी अस्तीत्वात नाही. आणि ज्या गोष्टीचे या जगात अस्तित्व नाही, तिची कल्पना देऊन कुरआनाने आपल्या अनुयायींना केवढी अध्यात्मिक भरारी प्रदान केली आहे.

२३. याचा आशय काहीसा अशा प्रकारे लक्षात येतो की जन्नतचे प्याले ॲडजस्ट करण्या योग्य (Adjustable) असतील. ते आपल्या इच्छेनुसार याचे प्रमाण निश्चित करतील या साठी की त्यांनी आपल्या इच्छित परिमाणात पेच प्राप्त करावे.

२४. सूंठ एक सुवासिक व उष्णता वर्धक वस्तू आहे. या वरुन जन्नतच्या झाऱ्याची एक ओझरती कल्पना कायम होते.अन्यथा या जगातील सूंठीवरुन जन्नतच्या सूंठीचा कयास लावला जाऊ शकत नाही. सूठींच्या मिश्रणाने जन्नतचे मद्य मादक बनेल.

२५. सल्सबील चा शब्दकोषातील अर्थ सहजगत्या घशातून उतरणारा आणि प्रवाहीत.सूंठीच्या झऱ्याचे हे नाव त्याच्या वैशिष्ट्यास जाहीर करते की यात कसल्याही प्रकारची तीव्रता नसेल,किंबहुना तायचे पाणी अगदी सहजगत्या घशा खाली उतरेल.

जन्नतच्या इतर देणग्यां प्रमाणे या झऱ्यांच्या वैशिष्ट्यांचेही आम्ही उचित अनुमान लावू शकत नाही. या जगात तरी नाही. किंबहुना ज्या लोकांना जन्नतवासी होण्याचे सद्‌भाग्य लाभेल तेच या झऱ्याच्या गुण वैशिष्ट्यांशी परिचित होऊ शकतील.

وَيَطُوفُ عَلَيْهِمْ وِلْدَانٌ مُّخَلَّدُونَ
إِذَا رَأَيْتَهُمْ حَسِبْتَهُمْ لُؤْلُؤًا مَّنثُورًا ﴿١٩﴾

१९. त्यांच्या जवळ अशी मुले ये-जा करतील जे नेहमी त्याच वयात राहतील.[२६] तुम्ही त्यांना पहाल तर कल्पना कराल, हे (जणू) विखुरलेले मोती आहेत.[२७]

وَإِذَا رَأَيْتَ ثَمَّ رَأَيْتَ نَعِيمًا وَمُلْكًا كَبِيرًا ﴿٢٠﴾

२०. तिथे जिकडे पहाल तिकडे तुम्हाला अल्लाहच्या देणग्याच देणग्या आणि अतिमहान राज्यसत्ता दिसून येईल.[२८]

عَالِيَهُمْ ثِيَابُ سُندُسٍ خُضْرٌ وَإِسْتَبْرَقٌ وَحُلُّوا أَسَاوِرَ
مِن فِضَّةٍ وَسَقَاهُمْ رَبُّهُمْ شَرَابًا طَهُورًا ﴿٢١﴾

२१. त्यांच्या (अंगा) वर तलम रेशमाची हिरवी आणि अतलसची वस्त्रे असतील.[२९] त्यांना चांदीची कांकणे घातली जातील [३०] आणि त्यांच्या पालन कर्ता त्यांना अतिशय स्वच्छ शुद्ध पेये पाजील.[३१]

إِنَّ هَٰذَا كَانَ لَكُمْ جَزَاءً وَكَانَ سَعْيُكُم مَّشْكُورًا ﴿٢٢﴾

२२. हा आहे तुमचा मोबदला आणि तुमचे कार्य स्विकृत झाले.[३२]

إِنَّا نَحْنُ نَزَّلْنَا عَلَيْكَ الْقُرْآنَ تَنزِيلًا ﴿٢٣﴾

२३. (हे पैगंबर !)[३३] आम्ही तुमच्यावर कुरआन क्रमशः अवतरीत केले आहे.[३४]

فَاصْبِرْ لِحُكْمِ رَبِّكَ وَلَا تُطِعْ مِنْهُمْ آثِمًا أَوْ كَفُورًا ﴿٢٤﴾

२४. यासत्व, तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या निर्णयाची प्रतिक्षा करा [३५] आणि यांच्या पैकी एखाद्या गुन्हेगार किंवा कृतघ्नाचे म्हणणे ऐकू नका.[३६]

وَاذْكُرِ اسْمَ رَبِّكَ بُكْرَةً وَأَصِيلًا ﴿٢٥﴾

२५. आपल्या पालन कर्त्याचे नामः स्मरण सकाळ संध्याकाळ करा. [३७]

وَمِنَ اللَّيْلِ فَاسْجُدْ لَهُ وَسَبِّحْهُ لَيْلًا طَوِيلًا ﴿٢٦﴾

२६. रात्री ही त्याच्या पुढे सजदा करा [३८] आणि रात्रीच्या दीर्घ भागात त्याचे पावित्र्या सह गुणगान करा. [३९]

إِنَّ هَٰؤُلَاءِ يُحِبُّونَ الْعَاجِلَةَ وَيَذَرُونَ وَرَاءَهُمْ
يَوْمًا ثَقِيلًا ﴿٢٧﴾

२७. हे लोक लवकर प्राप्त होणाऱ्या जगाशी प्रेम राखतात आणि एका भारदस्त दिवसाला आपल्या मागे सोडत आहेत.[४०]

२६. याचे स्पष्टीकरण सूरह नूह टीप क्र.२२ मध्ये केले गेले आहे.

२७. अर्थात ही मुले आपले सौंदर्य व व्यवस्थापनाचे असे दृश्य सादर करतील की जणू ते विखुरलेले मोतीच होत !

२८. या जगा प्रमाणे जन्नत मध्ये मोजून मापून देणग्या मिळणार नाहीत तर प्रत्येक मनुष्य त्या ठिकाणी देणग्याच्या वर्षावाने व्हाऊन निघेल; आणि राजेशाही वैभव व ऐश्वर्य त्याला प्राप्त होईल आणि जन्नत चा कोपरा न कोपरा त्याला मान प्रतिष्ठा देणारा असेल.

२९. याचे स्पष्टीकरण सूरह कहफ टीप क्र. ४८ मध्ये केले गेले आहे.

३०. सूरह कहफ आयत क्र. ३१ मध्ये निवेदिले गेले आहे की त्यांना सोन्याची कांकणे घातली जातील आणि या ठिकाणी चांदीची काकणे घातली जाण्याचा उल्लेख केला गेला आहे. तात्पर्य जन्नतवासी लोकांना दोन्ही ही प्रकारची काकणे घातली जातील. सोन्याची ही आणि चांदीची ही.

३१. ही अल्लाहची विशेष कृपा असेल की तो त्या मद्यांखेरीज ज्यांचा वर उल्लेख केला गेला आहे, एक विशेष प्रकारचे पेये, जे अतिशय स्वच्छ शुद्ध असेल, त्यांना पाजले जाईल. त्याचा स्वाद आणि त्याची नशा कशी आगळी असेल याचे अनुमान कोण लावू शकतो?

३२. म्हणजे हा मोबदला व ईश देणगी आहे त्या आचरणा पायी जे जगात तुम्ही पार पाडले आणि तुमचे कार्य तुमच्या पालन कर्त्याच्या नजरेत कदर करण्या योग्य आणि स्विकृत ठरले अर्थात ही फार मोठी प्रतिष्ठा व सन्मान असेल ज्याद्वारे जन्नत वासींना उपकृत केले जाईल.

३३. आता संबोधनाचा रोख पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या कडे आहे. आणि त्यांना मार्गदर्शन केले जात आहे व त्यांच्या माध्यमातून समस्त अनुयायींना.

३४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. १४०.

३५. म्हणजे अल्लाह या काफिरांशी कसा व्यवहार करतो, त्याची संयमपूर्वक प्रतिक्षा करा.

३६. गुन्हेगार शी अभिप्रेत अनुचित कामे करणारा व कृतघ्न शी अभिप्रेत अल्लाहच्या देणग्यांची कदर न जाणणारा.

आयतीचा अर्थ असा की जो मनुष्य अपराध पूर्ण जीवन जगत असेल तो तुम्हाला अपराधाचे काम करण्यासच सांगेल आणि जो अल्लाहच्या देणग्यांची कदर न करणारा असेल तर तो देणग्यांचा इन्कार व कृतघ्नतेच्याच गोष्टी बोलेल तर अशा कोणत्याही माणसाच्या कह्यात येऊ नका व त्याच्या म्हणण्याला बळी पडू नका. या आयतीत हे फर्मान पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून असले तरी खऱ्या अर्थाने तो अनुयायींना संबोधून आहे.

३७. सकाळ संध्याकाळ अल्लाहचे नाम: स्मरण करण्याचा आदेश सर्व सामन्यत: दिला गेला आहे म्हणजे अल्लाहची प्रशंसा व पावित्र्य. गुणगानाची वचने सकाळ संध्याकाळ मन:पूर्वक उच्चारीत रहा. या आदेशाच्या पालना ची उत्कृष्ट अवस्था सकाळ संध्याकाळची नमाज होय.

३८. सजदा नमाजचा महत्वपूर्ण भाग होय यास्तव नमाजला सजदाच्या अर्थाने घेतले गेले आहे. अर्थात रात्रीच्या वेळी ही नमाज अदा करा.

३९. सुरवातीला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना रात्रीच्या काळात दीर्घ काळात अल्लाहची प्रशंसा व पावित्र्यासह गुणगान करण्याचा आदेश दिला गेला होता. त्यानंतर थोडयाच काळाने सूरह मुज्जम्मिल मध्ये रात्रीचा दीर्घ काळ नमाज पढण्यात घालविण्याचा आदेश दिला गेला. तपशील करीता पहा सूरह मुज्जाम्मिल टीप क्र. २ ते टीप क्र. ४

४०. म्हणजे या काफिरांना ऐहिक लाभ इतका प्रिय आहे की त्यांना कियामतीया दिवसाची काडीमात्र पर्वा नाही, वास्तविक तो दिवस मोठा कठीण दिवस असेल. प्रत्येक अपराधी आपापल्या अपराधांचे ओझे उचलून घेतलेला असेल आणि आपल्या सुटके साठी अतिशय विमनस्क असेल.

२८. आम्ही यांना निर्माण केले आहे आणि यांचे जोड बंद मजबूत केले आणि आम्ही वाटेल तेव्हा यांचे चेहरे बदलून टाकू.[४१]

نَحْنُ خَلَقْنٰهُمْ وَشَدَدْنَآ اَسْرَهُمْ ۚ وَاِذَا شِئْنَا بَدَّلْنَآ اَمْثَالَهُمْ تَبْدِيْلًا ﴿٢٨﴾

२९. हा एक उपदेश आहे, तेव्हा ज्याची इच्छा असेल त्याने आपल्या पालन कर्त्या कडे जाण्याचा मार्ग अंगिकारावा.[४२]

اِنَّ هٰذِهٖ تَذْكِرَةٌ ۚ فَمَنْ شَآءَ اتَّخَذَ اِلٰى رَبِّهٖ سَبِيْلًا ﴿٢٩﴾

३०. आणि तुम्ही इच्छा करु शकत नाही, जो पावेतो अल्लाह ना इच्छील.[४३] निःसंशय अल्लाह ज्ञानी व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

وَمَا تَشَآءُوْنَ اِلَّآ اَنْ يَّشَآءَ اللّٰهُ ۗ اِنَّ اللّٰهَ كَانَ عَلِيْمًا حَكِيْمًا ﴿٣٠﴾

३१. ज्याला इच्छितो आपल्या कृपेत दाखल करतो [४४] आणि अत्याचारी करीता त्याने दुःखदायक शिक्षा तयार करुन ठेवली आहे.[४५]

يُّدْخِلُ مَنْ يَّشَآءُ فِيْ رَحْمَتِهٖ ۭ وَالظّٰلِمِيْنَ اَعَدَّ لَهُمْ عَذَابًا اَلِيْمًا ﴿٣١﴾

४१. म्हणजे यांना जेव्हा आम्हीच निर्माण केले आहे व यांचे जोड बंद मजबूत केले आहेत तर आम्ही इच्छिल्यास यांचा चेहरा मोहरा विकृत ही करु शकतो, मग ते आपल्या पालन कर्त्याला विसरुन आपल्या सद्य-स्थितीवर गर्वोन्मत्त का आहेत व त्याचे भय का म्हणून बाळगत नाहीत?

या प्रसंगी सूरह यासीन आयत क्र. ६८ आणि टीप क्र. ७२ ही विचाराधीन असावी.

४२. म्हणजे कुरआन तंतोतंत उपदेश आहे आणि या उपदेशाचा स्विकार करुन मनुष्य आपल्या पालन कर्त्याप्रत पोहचण्याचा मार्ग पत्करु शकतो.

४३.स्पष्टीकरणा करीता पहा सूरह तक्वीर टीप क्र. ३०

४४. म्हणजे आपल्या कोणत्या दासाला कृपा-छत्रात दाखल करावे याचा निर्णय अल्लाह आपल्या ज्ञान व बुद्धिकौशल्याच्या निकडीनुसार करतो.

४५. अत्याचारींशी अभिप्रेत एकेश्वरवाद व अखिरत चा इन्कार करणारे लोक होत. ज्यांचे जीवन या इन्काराच्या परिणामी अगदी चुकीचे बनले आहे, आणि ते पथ भ्रष्ट झाले. अशा लोकांना दु:खदायक शिक्षा देणे, अल्लाहचे बुद्धि कौशल्य व त्याच्या न्याय नितीची निकड आहे. म्हणून त्याने यांच्या करीता जहन्नम तयार करुन ठेवली आहे.

# सूरह
# अल् मुर्सलात

# ७७. सूरह अल् मुर्सलात

**नाव:** पहिल्या आयतीत 'मुर्सलात' म्हणजे वाऱ्यांची शपथ घेतली गेली आहे. या अनुषंगाने या सूरह चे नाव 'अल मुर्सलात' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे; आणि मजकूरां वरुन असे दिसून येते की आरंभ काळाच्या शेवटच्या भागात अवतरली असावी, जेव्हा मक्केचे काफिर प्रखरपणे मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरवित होते, आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि इस्लामी आवाहना विरुद्ध कट कारस्थाने रचू लागले होते.

बुखारी चे हदीस वचन आहे. हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद फर्मावितात की आम्ही मीना च्या गुहेत होतो आणि सूरह मुर्सलात अवतरली. पैगंबर तिचे पठण करीत होते आणि आम्ही तिला त्यांच्या मुखाने शिकत होतो. (बुखारी किताबुत्तफसीर)

**मध्यवर्ति कल्पना:** मोबदल्याचा दिवसाचा इन्कार करणाऱ्यांना त्यांच्या दुष्परिणती बाबत सावध करणे आणि अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांच्या चांगल्या परिणतीस सादर करणे होय, या साठी की इन्कार करणाऱ्यांनी शुध्दीवर यावे आणि आपले भविष्य सुशोभित करण्याची काळजी घ्यावी. या सूरह मध्ये इन्कार करणाऱ्यां करीता तंबी चा पैलू वर्चस्वशाली आहे जेव्हाकी मागाच्या सूरह (अल इन्सान) मध्ये सदाचरण करणाऱ्यां करीता शुभ वार्तेचा पैलू वर्चस्वशील आहे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ७ मध्ये वेगवान वाऱ्यांना कियामतीच्या पुष्टयर्थ सादर केले गेले आहे.

आयत क्र. ८ ते १५ मध्ये कियामतीचे भयंकर चित्र प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. १६ ते २८ मध्ये मोबदल्याच्या दिवसाच्या समर्थनार्थ साक्षी प्रस्तुत करीत तो सत्य असण्या बद्दल विचार चिंतनाचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. २९ ते ४० मध्ये खोटे ठरविणाऱ्यांना कियामतीच्या दिवशाच्या परिस्थितींना तोंड द्यावे लागेल त्याचे चित्र मांडले गेले आहे.

आयत क्र. ४१ ते ४४ मध्ये ईश-भयाचे आचरण करणाऱ्यांच्या चांगल्या मोबदल्याचे चित्र प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. ४५ ते ५० मध्ये खोटे ठरविणाऱ्यांना अपराधात्मक वर्तना बद्दल सक्त तंबी दिली गेली आहे.

# ७७.सूरतुल मुर्सलात

سُوْرَةُ الْمُرْسَلٰتِ

आयती - ५०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे त्या वाऱ्यांची, जे निरंतर पाठविले जातात. [१]

وَالْمُرْسَلٰتِ عُرْفًا ①

२. मग जोरदार वेगाने वाहू लागतात. [२]

فَالْعٰصِفٰتِ عَصْفًا ②

३. आणि जे ढगांना पसरवितात.[३]

وَّالنّٰشِرٰتِ نَشْرًا ③

४. मग (त्यांना) वेग वेगळे करतात.[४]

فَالْفٰرِقٰتِ فَرْقًا ④

५. मग (हृदयात) स्मरणिके (ची गोष्ट) टाकतात.[५]

فَالْمُلْقِيٰتِ ذِكْرًا ⑤

६. प्रमाण प्रस्थापित करण्या किंवा सचेत करण्या करीता. [६]

عُذْرًا اَوْ نُذْرًا ⑥

७. ज्या गोष्टीचा तुमच्याशी वायदा केला जात आहे ती निश्चित पणे घडून येईल.[७]

اِنَّمَا تُوْعَدُوْنَ لَوَاقِعٌ ⑦

८. मग जेव्हा तारे निस्तेज होतील.[८]

فَاِذَا النُّجُوْمُ طُمِسَتْ ⑧

९. आणि आकाश विदीर्ण होईल.[९]

وَاِذَا السَّمَآءُ فُرِجَتْ ⑨

१०. आणि पर्वत चूर चूर केले जातील.[१०]

وَاِذَا الْجِبَالُ نُسِفَتْ ⑩

११. आणि जेव्हा पैगंबरां करीता वेळ निर्धारीत असेल.[११]

وَاِذَا الرُّسُلُ اُقِّتَتْ ⑪

१२. यात कोणत्या दिवसा साठी विलंब होत आहे.

لِاَيِّ يَوْمٍ اُجِّلَتْ ⑫

१. शपथ या ठिकाणी साक्ष या अर्थाने आहे म्हणजे हे वारे ज्यांची शपथ घेतली गेली आहे, ते मोबदल्याच्या दिवसाचे समर्थन करतात, ज्या बाबत कुरआन खबरदार करीत आहे.

वारे उगाच वाहत नाहीत, किंबहुना त्यांना वाहविले जाते आणि त्यांची ती स्थिती जेव्हा ते सातत्याने वाहतात, या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की त्यांना त्या अस्तित्वाने, ज्याचे यांच्यावर नियंत्रण आहे एका खास हेतुने पाठविले आहे अर्थात तो म्हणजे पाऊस पाडणे होय.

२. अर्थात, मग या वाऱ्यांचा वेग वाढतो आणि कधी तो वादळ, वावटळीचे स्वरुप धारण करतो.

३. वारे समुद्रातून वर जाणाऱ्या ढगांना वातावरणात अशा प्रकारे पसरवितात की ते शेकडो आणि हजारो मैल अंतरावर पोहचतात.

४. वारे ढगांना एकमेका पासून वेगळे करतात म्हणजे त्यांचा एक हिस्सा एका भू भागा कडे जातो तर दुसरा हिस्सा दुसऱ्या भू भूगाकडे जातो, अशा साठी की त्या योजनेनुसार पाऊस पडावा, जी वाऱ्यांना वाहविणाऱ्या अस्तित्वाने अर्थात अल्लाहने बनविली.

५. या वाऱ्यांचे स्थित्यंतर व कैफियत हृदयांना जागृत करते आणि विवेक बुद्धिला प्रताडीत करते, तसेच आपल्या खऱ्याखऱ्या पालन कर्त्याची ओळख करुन देते जेव्हा वारे वादळाचे रुप धारण करतात तर विवेक बुद्धि जागृत असलेल्या प्रत्येक माणसाला अल्लाहचे स्मरण होते. वीजेचे कडाडणे व तिचे डोळे दिपवून टाकणारे तेज मनात अल्लाहचे भय निर्माण करते की तो अजाब (प्रकोपा) चा आसूड मारु शकतो. दुसरी कडे वारे ढगांना ओढून आणतात व पर्जन्य वृष्टीच्या स्वरुपात प्रकट होतात अशा प्रकारे ते आपल्या मूक भाषेत या गोष्टीचे ऐलान करतात की समस्त सृष्टीचा स्वामी ज्याच्या इशाऱ्यावर ते एवढे मोठे कार्य करतात, तो एक जबरदस्त सामर्थ्य बाळगणारे अस्तित्व आहे. जो सक्त शिक्षा देण्यास पूरेपूर समर्थ आहे यास्तव त्याची अवज्ञा करणे म्हणजे त्याच्या प्रकोपाला नियंत्रण देणे होय अर्थात त्याचे आज्ञा पालन करुनच मनुष्य त्याची प्रसन्नता प्राप्त करु शकतो. यावरुन मोबदला व शिक्षेच्या त्या कल्पनेचे ही समर्थन होते, जे कुरआन सादर करीत आहे.

हे वारे सर्व विश्वांचा पालन कर्ता असलेल्या अल्लाहच्या सामर्थ्य व बुद्धिकौशल्याचे चिन्ह बनून प्रकट होतात. वाऱ्यांची ही सार्वभौमिक व्यवस्था या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की ही सृष्टी अनिश्वर नाही, किंबहुना तिचा एक ईश्वर आहे व ती एका व्यवस्थेत बध्द आहे. वारे देखील त्या योजनेच्या अंतर्गत कार्यरत आहेत. ही व्यवस्था अल्लाहचे परिपूर्ण सामर्थ्य व त्याच्या अत्युच्च बुद्धि कौशल्यास प्रमाणित करते. त्याच्या सामर्थ्या करीता हे किंचितही कठीण नाही की त्याने कियामत घडवून आणावी व माणसाला पुनश्च जिवीत उठवावे. आणि त्याच्या बुद्धि कौशल्यास ही निकड जाणवते की त्याने एक न्यायाच्या दिवस प्रस्थापित करावा. जेणेकरुन माणसाने आपल्या आचरणानुसार चांगला वाईट मोबदला प्राप्त करावा अन्यथा हे जीवन अगदी निरर्थक व निरुद्देश ठरेल, जे न्याय आणि बुद्धि कौशल्याच्या अगदी विपरीत आहे.

थोडक्यात हे की वेगाने वाहणारे वारे आपल्या या ना त्या व विस्मय कारक घडामोडींनी माणसाचे आपल्या पालन कर्त्या कडे लक्ष वेधवितात. आणि एका जबरदस्त व बुद्धिकौशल्य युक्त हस्ती (अस्तित्वा) ची जाणीव त्याला करुन देतात. आणि जाणीवे पोटीच मोबदला व शिक्षेची कल्पना दृगोचर होते.

६. हे वारे आपल्या वृति व कैफियतीने अल्लाहचे एकमेवत्व, त्याचे ईशत्व, त्याचे सामर्थ्य, त्याचे बुद्धिकौशल्य व त्याचे सुष्टी नियता असण्याची साक्ष देतात आणि त्यांचा आघात निद्रीस्त मानवतेला जागे करतो व त्यांचा निनाद कियामतीचा अलार्म वाजवतो. तात्पर्य वारे अल्लाहच्या एकमेवतेचे गीत गात आणि माणसाला जबाबदारींची जाणीव देत गर्जना करतात. अशा प्रकारे या वाऱ्यांद्वारे लोकांवर अल्लाहचे प्रमाण ही प्रस्थापित होते आणि त्यांना शुद्धिवर आणण्याची व खबरदार करण्याची सेवा ही पार पाडतात.

वाऱ्यांच्या वाहण्यात एकेश्वरवाद व आखिरतच्या ज्या निशाण्या आहेत, त्यांच्या कडे कुरआनात अनेक ठिकांणावर लक्ष वेधविले गेले आहे. उदाहरणार्थ पहा सूरह जारीयात आयत क्र.१ ते ६.

७. ही ती गोष्ट होय ज्या बद्दल वाऱ्यांची शपथ घेतली गेली आहे. वायदा कियामतीच्या दिवसाचा केला जात आहे की त्या दिवशी मनुष्य दुसऱ्यांदा जिवित करुन उठविला जाईल, या साठी की त्याने आपल्या कृतकर्माचा मोबदला प्राप्त करावा. अर्थात हा वायदा अपरिहार्य पणे होईल. आणि त्या गोष्टी सत्य घटनेच्या स्वरुपात दृगोचर होतील ज्या घडून येण्याची खबर कुरआन देत आहे.

८. आता कियामतीचे काही अहवाल सांगितले जात आहेत. जेव्हा सूर फूंकला जाईल तेव्हा जमीन व आकाश दोन्ही जबरदस्त घटनेला सामोरे जातील. असंख्य तारे जे आज प्रकाशित आहेत, त्या दिवशी त्यांचा प्रकाश अगदी नाहीसा होईल सूरह तक्वीर मध्ये फर्माविले गेले आहे.

وَاِذَا النُّجُوْمُ انْكَدَرَتْ

'जेव्हा तारे निस्तेज होतील' ती वेळ कशी असेल जेव्हा संपूर्ण सृष्टीत अंध:काराचे साम्राज्य पसरेल.

९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह इन्शिकाक - टीप क्र.१

१०. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह कहफ - टीप क्र.६६

११. आता त्या वेळचा उल्लेख केला जात आहे, जेव्हा दूसरा सूर फूंकला जाईल आणि समस्त मानवांना जिवित करुन हश्रच्या मैदानात आणले जाईल, त्या दिवशी न्यायालय प्रस्थापित होईल आणि पैगंबरांना बोलविले जाईल की त्यांनी आपल्या जन समूहां बाबत साक्ष द्यावी.

निर्णयाच्या दिवसा साठी. आणि तुम्हाला काय माहीत की निर्णयाचा दिवस काय आहे ? विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता. काय आम्ही पूर्वीच्या लोकांना नष्ट केले नाही? मग नंतरच्या लोकांना त्यांच्या पाठोपाठ नष्ट करीत राहलो. *(अल-कुर्आन)*

१३. निर्णयाच्या दिवसा साठी.[१२]

لِيَوْمِ الْفَصْلِ ﴿١٣﴾

१४. आणि तुम्हाला काय माहीत की निर्णयाचा दिवस काय आहे ?[१३]

وَمَا أَدْرٰىكَ مَا يَوْمُ الْفَصْلِ ﴿١٤﴾

१५. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.[१४]

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿١٥﴾

१६. काय आम्ही पूर्वीच्या लोकांना नष्ट केले नाही?[१५]

أَلَمْ نُهْلِكِ الْأَوَّلِيْنَ ﴿١٦﴾

१७. मग नंतरच्या लोकांना त्यांच्या पाठोपाठ नष्ट करीत राहलो.[१६]

ثُمَّ نُتْبِعُهُمُ الْاٰخِرِيْنَ ﴿١٧﴾

१८. अपराध्यां सोबत आम्ही असलाच व्यवहार करतो.[१७]

كَذٰلِكَ نَفْعَلُ بِالْمُجْرِمِيْنَ ﴿١٨﴾

१९. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.[१८]

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿١٩﴾

२०. काय आम्ही तुम्हाला तुच्छ पाण्यापासून निर्माण केले नाही ?[१९]

أَلَمْ نَخْلُقْكُّمْ مِّنْ مَّآءٍ مَّهِيْنٍ ﴿٢٠﴾

२१. आणि त्यास एका सुरक्षित स्थानी राखले.[२०]

فَجَعَلْنٰهُ فِيْ قَرَارٍ مَّكِيْنٍ ﴿٢١﴾

२२. एक निर्धारीत मुदती पावेतो.[२१]

إِلٰى قَدَرٍ مَّعْلُوْمٍ ﴿٢٢﴾

२३. तेव्हा आम्ही एक योजना तयार केली आणि आम्ही किती कुशल योजना बनविणारे आहोत.[२२]

فَقَدَرْنَا فَنِعْمَ الْقٰدِرُوْنَ ﴿٢٣﴾

२४. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٢٤﴾

२५. काय आम्ही जमीनीला साचवून ठेवणारी नाही बनविले ?

أَلَمْ نَجْعَلِ الْأَرْضَ كِفَاتًا ﴿٢٥﴾

२६. जिवितांना व मृतांना,[२३]

أَحْيَآءً وَّأَمْوَاتًا ﴿٢٦﴾

१२. म्हणजे हे जाणत काय की हे समस्त कार्य कोणत्या दिवसा करीता राखून ठेवले आहे? निर्णयाच्या दिवसा करीता. अर्थात आज जगात अल्लाहचे न्यायालय प्रस्थापित केले जात नाही, तेव्हा असे समजू नका की कधी ही अल्लाहचे न्यायालय प्रस्थापित होणारच नाही आणि अपराध्यांना शिक्षा न देता सोडू दिले जाईल. कदापि नाही, तर अल्लाहचे न्यायालय प्रस्थापित होण्या करीता कियामतीचा दिवस निर्धारीत आहे. त्या दिवशी प्रत्येकाला आपल्या कृतकर्माचा हिशेब देणे क्रमप्राप्त ठरेल.

१३. म्हणजे चांगले जाणून असा की निर्णयाचा दिवस अतिशय सक्त असेल.

१४. जे लोक आज मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरवित आहेत ते त्या दिवशी विनाश ग्रस्त होतील.

मूळ शब्द وَيل 'वैल' अर्थात प्रत्येक प्रकारचा विनाश लिसानुल अरब या शब्दकोषातील उल्लेख असा:-

واصل الويل فى اللغة العذاب والهلاک۔

''शब्दकोषात वैल' चा मूळ अर्थ अजाब आणि विनाश आहे'

الويل: الحزن الهلاک والمشقة من العذاب۔

'' वैल चा अर्थ दु:ख व त्रागा, सर्वनाश आणि अजाबच्या कष्ट यातना होय.

قال سيبويه ويلٌ له وويلاً له اى قبيحا۔

(لسان العرب ج ۱۱ص ۷۳۸)

''सैबवैयह म्हणतात की त्याच्या करीता वैल आहे म्हणजे त्याच्या करीता खराबी आहे. (लिसानुल अरब खंड - ११ पृ. ७३८)

कियामतीच्या दिवशी खोटे ठरविणाऱ्या करीता 'वैल' आहे म्हणजे हे की मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरविणारे अतिशय दु:ख दायक परिस्थितीला तोंड देतील, त्यांना सक्त अजाब भोगावा लागेल. ते विनाशाच्या गर्तेत कोसळतील आणि त्यांचा शेवट मोठा वाईट होईल.

ही आयत या सूरह मध्ये दहा वेळा आली आहे आणि हे या सूरह चे उघड वैशिष्टय होय. या पुनरावृत्तिचा हेतु खोटे ठरविणाऱ्यांचे वारंवार दुष्परिणती कडे लक्ष वेधणे, जेणे करुन त्यांनी शुध्दीवर यावे.

१५. अभिप्रेत अति प्राचीन काफिर जन समूह होत उदाहरणार्थ नूह जन समूह, आद व समूद जनसमूह इत्यादी.

१६. म्हणजे यांच्यानंतर येणाऱ्या इतर काफिर जनसमूहांना ही नष्ट करीत राहीलो. उदा. लूत जनसमूह, शुएब जनसमूह, फिरऔन जनसमूह इत्यादि.

१७. अपराध्यांशी अभिप्रेत काफीर आणि खोटे ठरविणारे जनसमूह होत. अल्लाहची पद्धत हीच की जेव्हा एखादा पैगंबर आला आणि त्याच्या जनसमूहाने त्याला खोटे ठरविले तर त्याला अजाब द्वारे नष्ट केले गेले या साठी की पैगंबराची सत्याता सिद्ध व्हावी. तसेच या साठी ही ज्या जन समूहावर अल्लाहच्या रसूलने प्रमाण प्रस्थापित केले असावे आणि त्यानंतर ही त्याने ईमान बाळगू नये तर असा जनसमूह मानवते करीता कलंक ठरतो आणि विशेष म्हणजे सत्य स्पष्ट झाल्या नंतर एखाद्या जन समूहाचे कुफ्र नितीवर अटळ राहणे अल्लाहच्या प्रकोपास कारक ठरते.

१८. जेव्हा जगात अपराध्यांना अशा चारित्र्या प्रत पोहचविले गेले तर कियामतीच्या दिवशी, जो न्यायाचा दिवस असेल, कशा प्रकारे ते शिक्षे पासून वाचू शकतील.

१९. म्हणजे एका नगण्य थेंबा पासून.

२०. अर्थात पोटात (गर्भाशयात).

२१. अभिप्रेत गर्भावस्थेचा काळ.

२२. म्हणजे माणसाच्या निर्मिती चे कार्य एका खास योजनेनुसार पार पडतो, आणि तो सुज्ञ व उत्कृष्ट ईश निर्मिती बनतो. ही योजना बद्धता अल्लाहचीच असते, तेव्हा जो अल्लाह एवढा उत्कृष्ट योजना बनविणारा व इतकी उत्कृष्ट उपाय योजना करणारा आहे, त्याच्या कडे या गोष्टीचा कशा प्रकारे संबंध जोडला जाऊ शकतो की त्याने माणसाला निरुद्देश निर्माण केले आहे व त्याची काही योजनाच नाही.

२३. जमीन जिवंत माणसांना आपल्या कुशीत वास्तव्य करण्यास जागा देते आणि मृतां करीता ही दफन भूमी बनते. अशा प्रकारे जमीन माणसाला त्याच्या जिवंतावस्थेतही साचवून ठेवते व तो मेल्यानंतर ही.

२७. आणि तिच्यात उंच पहाड ठेवले [२४] आणि तुम्हा लोकांना गोड पाणी पाजले.[२५]

وَّجَعَلْنَا فِيهَا رَوَاسِيَ شٰمِخٰتٍ وَّ اَسْقَيْنٰكُمْ مَّآءً فُرَاتًا ﴿٢٧﴾

२८. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٢٨﴾

२९. चला त्या गोष्टी कडे, जिला तुम्ही खोटे ठरवित राहीलात.[२६]

اِنْطَلِقُوْٓا اِلٰى مَا كُنْتُمْ بِهٖ تُكَذِّبُوْنَ ﴿٢٩﴾

३०. चला त्या सावली कडे,जी तीन शाखांची आहे.[२७]

اِنْطَلِقُوْٓا اِلٰى ظِلٍّ ذِيْ ثَلٰثِ شُعَبٍ ﴿٣٠﴾

३१. जिच्यात ना छाया आहे आणि ना ती अग्नि शिखां पासून वाचविल.[२८]

لَّا ظَلِيْلٍ وَّلَا يُغْنِيْ مِنَ اللَّهَبِ ﴿٣١﴾

३२. ती आग महाला सारख्या (उंच) चिंगाऱ्या फेकत असेल. [२९]

اِنَّهَا تَرْمِيْ بِشَرَرٍ كَالْقَصْرِ ﴿٣٢﴾

३३. जणू ते पिवळे उंट होत. [३०]

كَاَنَّهٗ جِمٰلَتٌ صُفْرٌ ﴿٣٣﴾

३४. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्या करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٣٤﴾

३५. हा तो दिवस होय की ते बोलू शकणार नाहीत.[३१]

هٰذَا يَوْمُ لَا يَنْطِقُوْنَ ﴿٣٥﴾

३६. आणि ना त्यांना अनुमति दिली जाईल की सबब मांडू शकतील.[३२]

وَلَا يُؤْذَنُ لَهُمْ فَيَعْتَذِرُوْنَ ﴿٣٦﴾

३७. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٣٧﴾

३८. हा निर्णयाचा दिवस आहे. आम्ही तुम्हालाही एकत्र केले आहे आणि तुमच्या पूर्वीच्या लोकांना ही. [३४]

هٰذَا يَوْمُ الْفَصْلِ جَمَعْنٰكُمْ وَالْاَوَّلِيْنَ ﴿٣٨﴾

३९. जर तुम्ही एखादी चाल खेळू शकत असाल तर माझ्या विरोधात खेळून पहा. [३५]

فَاِنْ كَانَ لَكُمْ كَيْدٌ فَكِيْدُوْنِ ﴿٣٩﴾

२४. उंच पहाड, ढगांना रोखतात, ज्यामुळे पर्वतीय क्षेत्रात भरपूर पाऊस पडतो परिणामी नद्या वाहू लागतात.

२५. नद्या-नाल्यांना प्रवाहीत केले, ज्या द्वारे गाड पाणी लाभते.

या सर्व देणग्या अल्लाहच्या ईशत्वाच्या निशाण्या नव्हेत काय? आणि त्याने तुमच्या पालन पोषणा ची उपाय योजना केली आहे तेव्हा तो तुम्हाला तुमच्या वर्तनाचा (आचरणाचा) जाब का म्हणून विचारणार नाही आणि आपल्या देणग्यांचा हिशेब तुमच्या कडून का घेणार नाही? त्याचे पालकत्व या गोष्टीची निकड बाळगते की त्याने हिशेबाचा दिवस आणावा आणि कृतज्ञ दासांना चांगला मोबदला द्यावा व कृतघ्न असलेल्यांना कठोर शिक्षा द्यावी.

२६. म्हणजे कियामतीच्या दिवसाचा अजाब.

२७. या छाये ला, जो धूराच्या स्वरुपात असेल काफिरांना हश्र च्या मैदानात तोंड द्यावे लागेल. याच्या तीन शाखा असतील. हा संकेत संभवत:त्याच्या तीन वैशिष्ट्यां (Characteristic) कडे आहे. आणि अपराधाचे स्वरुप लक्षात घेता अपराध्यावर त्या प्रकारचा धूर सोडला जाईल.

२८. म्हणजे जहन्नम पासून जे धगधगते निखारे निघतील ते हश्रच्या मैदानात अपराध्यांवर येऊन कोसळत असतील आणि ते ज्या छाये खाली असतील, ती त्यांना त्या निखाऱ्यांच्या माऱ्या पासून वाचूव शकणार नाही.

२९. म्हणजे जहन्नम पासून ज्या चिंगाऱ्या बाहेर पडतील त्या एखाद्या महाला प्रमाणे उंच असतील आणि त्यांची उष्णता ही कमालीची असेल या साठी की अपराध्यांना जगातील महाल आठवावेत ज्यात ते मोठ्या थाटात राहात होते.

३०. जहन्नम पासून निघणाऱ्या चिंगाऱ्या जणू क्षेपणास्त्रे असतील जे हश्रच्या मैदानात अपराध्यांना आपले लक्ष्य बनवतील या चिंगाऱ्यांचे स्वरुप महाला खेरीज पिवळ्या उंटाप्रमाणे असेल, या साठी की अपराध्यांना आपले मौल्यवान उंट आठवावेत ज्यांना त्यांनी जगात खरे खुरे धन समजून घेतले होते व त्यांच्या मोहात अडकून आखिरतला दृष्टीआड केले होते.

३१. हश्रच्या मैदानात अपराध्यांना विविध अवस्थां मधून जावे लागेल. एक अवस्था अशी असेल जेव्हा त्यांच्या तोंडावर मोहर लावली जाईल आणि त्यांचे अवयव बोलू लागतील की त्यानी जगात काय काम केले आहे.

اَلْيَوْمَ نَخْتِمُ عَلٰى اَفْوَاهِهِمْ وَتُكَلِّمُنَا اَيْدِيْهِمْ
وَتَشْهَدُ اَرْجُلُهُمْ بِمَا كَانُوْا يَكْسِبُوْنَ۔ (يٰسٓ:٦٥)

“आज आम्ही यांच्या तोंडावर मोहर लावून देऊ आणि त्यांचे हात आमच्याशी बोलू लागतील आणि त्यांचे पाय साक्ष देतील की ते काय करीत राहीले.”

(यासीन : ६५)

३२. त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी या पूर्वीच दिली गेली असेल यास्तव या अवस्थेत जेव्हा त्यांचे तोंड बंद केले जाईल, त्यांना सबब मांडण्याची अनुमति दिली जाणार नाही.

३३. म्हणजे विचार करा की हश्र च्या मैदानात खोटे ठरविणाऱ्यांची दशा किती वाईट होईल.

३४. ही गोष्ट प्रामुख्याने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरोधकांना उद्देशून म्हटली जाईल की तुम्ही निर्णयाच्या दिवसाचा इन्कार करीत होते तर पहा तुमचा विचार चुकीचा सिद्ध झाला आज निर्णयाचा दिवस आहे आणि निर्णया करीता आम्ही तुम्हाला ही हजर केले आहे व त्यांना ही, जे तुमच्या पूर्वी होऊन गेले होते. अभिप्रेत पूर्वीच्या काळातील मार्गभ्रष्ट लोक होत ज्यांच्या पावलो पावली हे लोक चालत राहीले. ही गोष्ट प्रसंगानुषंगाने सांगितली गेली आहे अन्यथा कियामतच्या दिवशी कसल्याही अपवादाविना समस्त मानवांना, जे जगात जन्मास आले होते, पुनश्च जिवित करुन उठविले जाईल. आशा प्रकारे संपूर्ण मानव जात या दिवशी हजर केली जाईल.

३५. म्हणजे जगात तर तुम्ही माझ्या कलिमा (वचना) ला तुच्छ लेखत होते आणि माझ्या पैगंबरास पराभूत करण्या करीता वेग वेगळ्या प्रकारच्या खेळी खेळत राहीले, कट-कारस्थाने रचत राहीले आणि हा विचार केला नाही की निर्णयाचा एक दिवस निश्चित आहे. आता जर तुमच्या अंगी थोडे फार सामर्थ्य आहे तर माझ्या विरोधात काही उपाय योजना करुन दाखवा याचे उत्तर ते काय देऊ शकतील,उलट लज्जित होऊन अधोमुख होतील, तेव्हा खोटे ठरविणाऱ्यां करीता त्या दिवशी अवमान व पश्चाताप असेल.

४०. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٤٠﴾

४१. मुत्तकी (अल्लाह चे भय बाळगणारे) छायांमध्ये व झऱ्यां मध्ये असतील.[३६]

اِنَّ الْمُتَّقِيْنَ فِيْ ظِلٰلٍ وَّعُيُوْنٍ ﴿٤١﴾

४२. आणि आपल्या आवडीच्या मेव्यां मध्ये.[३७]

وَّفَوَاكِهَ مِمَّا يَشْتَهُوْنَ ﴿٤٢﴾

४३. खा आणि प्या मजेत आपल्या आचरणाच्या मोबदल्यात.[३८]

كُلُوْا وَاشْرَبُوْا هَنِيْٓـًٔا بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٤٣﴾

४४. आम्ही सत्कर्म करणाऱ्यांना असाच मोबदला देतो.[३९]

اِنَّا كَذٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِيْنَ ﴿٤٤﴾

४५. विनाश आहे त्या दिवशी, खोटे ठरविणाऱ्यां करीता.[४०]

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٤٥﴾

४६. खा आणि मौज करा थोडे दिवस. तुम्ही अपराधी आहात.[४१]

كُلُوْا وَتَمَتَّعُوْا قَلِيْلًا اِنَّكُمْ مُّجْرِمُوْنَ ﴿٤٦﴾

४७. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٤٧﴾

४८. जेव्हा त्यांना सांगितले जाते की झुका तर झुकत नाहीत.[४२]

وَاِذَا قِيْلَ لَهُمُ ارْكَعُوْا لَا يَرْكَعُوْنَ ﴿٤٨﴾

४९. विनाश आहे त्या दिवशी खोटे ठरविणाऱ्यां करीता.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿٤٩﴾

५०. आता या नंतर ते कोणत्या वाणी वर ईमान बाळगतील ?[४३]

فَبِاَيِّ حَدِيْثٍۭ بَعْدَهٗ يُؤْمِنُوْنَ ﴿٥٠﴾

३६. आता खोटे ठरविणाऱ्यांच्या तुलनेत ईश-भय बाळगणाऱ्यांचा मोबदला सांगितला जात आहे आर्थात त्या लोकांचा जे आल्लाहचे भय बाळगतात आणि ज्यांनी या जाणीवे सह जीवन घालविले की कियामतच्या दिवशी त्यांना अल्लाह समोर जाब द्यायचा आहे. ते ज्या देणग्या व बक्षिसांनी उपकृत केले जातील त्यांचा संक्षिप्त उल्लेख या ठिकाणी दिला गेला आहे. ते खऱ्या छायेत असतील. या साठी त्यांना सर्व प्रकारचे समाधान व सुख लाभेल आणि ज्यांना अल्लाह आपल्या कृपा - छाया खाली घेईल त्यांच्या सुख - समाधाना बद्दल काय सांगणे ! दुसरी गोष्ट जी त्यांना तृप्त करील व तहाने चा त्रास त्यांना कदापि होऊ देणार नाही, ते जन्नत चे झरे असतील, जे त्यांना उच्चतम व अतिशय स्वादिष्ट अशी पेये उपलब्ध करुन देतील.

३७. तिसरी मोठी ईश-देणगी त्यांच्या करीता ही असेल की ते आपल्या आवडीचे मेवे खातील. जेव्हा त्यांच्या पसंतीनुसार त्यांना मेवे उपलब्ध होतील आणि ते ही विपुल प्रमाणात तर ते किती आनंद विभोर होतील!

३८. सदाचाराचा हा मोबदला की जन्नत चे जीवन ज्यात खाण्या पिण्याची विपुलता आणि वस्तू ही अशा ज्या अतिशय स्वदिष्ट व रुचकर असतील, केवढा उत्कृष्ट मोबदला आहे!

३९. हे उत्तेजन आहे लोकांना सत्कर्मी बनण्यास की त्यांनी स्वत:ला या उत्कृष्ट मोबदल्यास पात्र बनवावे.

४०. खोटे ठरविणाऱ्यांनी विचार करावा की कियामतीचा दिवस त्यांच्या करीता केवढ्या मोठ्या वंचिततेचा दिवस असेल. एकीकडे सत्कर्मी लोक जन्नतचा आनंद प्राप्त करीत असतील तर दुसरी कडे खोटे ठरविणारे जहन्नमच्या विनाश कारीतेला बळी पडतील.

४१. या सूरहच्या समारोपच्या आयती होत. काफिरांना संबोधून त्यांना शेवटचे म्हणून प्रताडीत केले जात आहे की हे अपराध्यांनो या सर्व उपदेशा नंतर ही जर तुम्हाला आपल्या काफिर नितीच्या वर्तनाचाच आग्रह आहे तर या जगात थोडे दिवस मौज करुन घ्या या नंतर तुम्हाला अपरिहार्यत:विनाशाला तोंड द्यावे लागेल.

४२. म्हणजे कुरआन व पैगंबर, यांना अल्लाह समोर नतमस्तक होण्याचे आवाहन करीत आहे, परंतु ते या साठी तयार नाहीत आणि जो अल्लाह पुढे नतमस्तक होणार नाही. त्याच्या करीता विनाश क्रम प्राप्त आहे.

अल्लाह पुढे नतमस्तक होण्याचा आशय अतिशय व्यापक आहे. त्याचे आज्ञापालन, व उपासना, रूकूअ व सजदा सर्व या आशयात अंतर्भूत आहे.

४३. म्हणजे कुरआन, जो अल्लाहचा अंतिम ग्रंथ आहे आणि ज्याने ठोस प्रमाणां द्वारे आपले प्रमाण प्रस्थापित केले आहे. आणि ज्याचे बुद्धिकौशल्य अत्युच्च बुद्धिकौशल्य आहे, ज्याची शैली प्रभावशाली व ज्याचा उपदेश हृदयावर अंकित होणारा आहे. तरी देखील जर हे लोक ईमान बाळगत नाही तर मग शेवटी ते कोणत्या ग्रंथाची (अर्थात वाणीची) प्रतिक्षा करीत आहेत? जर ते कुरआनाने ही उपदेश ग्रहण करीत नाही तर मग अन्य एखादा ग्रंथ असा असू शकत नाही जो यांना शुद्धिवर आणू शकेल आणि ना कुरआना नंतर दुसरा एखादा ग्रंथ अवतरीत होणार आहे. या साठी ज्याला ईमान बाळगावयाचे आहे त्याने कुरआनावर ईमान बाळगावे.

# सूरह अन्नबा

# ७८. सूरह अन्नबा

**नाव :** या सूरतीचे नाव अन-नबा आहे. याचा अर्थ महत्वाची बातमी-म्हणजे कियामत व पुन्हा उठविले जाण्याची बातमी. सूरतीच्या दुसऱ्या आयतीपासून हे नाव घेतलेले आहे.

**अवतरण काळ:** ही सुरह 'मक्की' आहे. म्हणजे ती पैगंबरांच्या (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मक्के मधील वास्तव्यकाळात अवतरली आहे. सुरवातीच्या आयतीवरून हे स्पष्ट होते की, पैगंबरांनी जेव्हा मक्केच्या लोकांना कियामत येणार असल्याबद्दलची बातमी दिली व त्यांना सदाचार व दुराचाराच्या फळाबद्दल खबरदार केले तेव्हा परिणाम स्वरुप या विषयांवर चर्चा सुरू झाली होती. आणि कियामतीला अशक्य ठरवून तिची थट्टा उडविली जात होती. त्यावेळी ही सूरह उतरली. स्पष्ट आहे की ही गोष्ट आवाहनाच्या सुरवातीच्या कालातच घडली होती.

**मध्यवर्ति विषय:** या सूरतीचा मध्यवर्ति विषय कियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयाचे भरणे आणि लोकांना त्यांच्या आचरणाचा मोबदला ईमान वा शिक्षेच्या स्वरूपात देणे हा आहे.

**ग्रंथ मांडणी :** आयत नं १ ते ५ मध्ये त्या लोकांना धमकविले गेले आहे जे कियामतीच्या महान व भयानक घटनेची वार्ता ऐकून तिची थट्टा उडवित आहेत. जणू कियामतीची वार्ता त्यांच्याजवळ शांतपणे व गंभीरपणे विचार करण्यायोग्य नाही. लोक जरी याबाबतीत विरोधाचे शिकार झालेले असले तरी तो दिवस दूर नाही जेव्हा कियामत वस्तु:स्थिती बनून त्यांच्या प्रत्यास येईल आणि विश्वाच्या शासकासमोर त्यांना जाब देण्यासाठी हजर केले जाईल.

आयत नं. ६ ते १६ मध्ये अल्लाहचे प्रभुत्व पालकत्व व बुद्धिमता यांच्या निशाण्या निवेदन केल्या गेल्या आहेत. ज्या निव्वळ मृत्यूनंतरचे जीवन हे प्रत्यक्षात येणार असल्याबद्दलचा पुरावा सादर करतात असे नव्हे तर निर्णयाचा दिवस अत्यंत आवश्यक आहे या गोष्टीचीही साक्ष देतात. कारण ही अल्लाहच्या पालकत्वाची व बुद्धिमतेची अनिवार्य अशी निकड आहे.

आयत नं. १७ ते २० मध्ये दाखविले गेले आहे की निर्णयाचा दिवस ठरल्यावेळी अमलात येईल. त्या दिवशी आकाशांच्या व जमीनीच्या व्यवस्थेत महान क्रांती घडून येईल आणि सर्व लोक जीवंत होऊन ईश्वरी न्यायालया कडे चालू लागतील.

आयत नं. २१ ते ३० मध्ये विद्रोही लोकांचा शेवट आणि आयत नं. ३१ ते ३६ मध्ये ईश्वरीचे भय बाळगून जीवन जगणाऱ्यांसाठी इनामांचा-देणग्याचा-उल्लेख आहे.

आयत नं. ३७ ते ४० मध्ये विषयाचा समारोप आहे. त्यामध्ये ईश्वरी न्यायालयासमोरील हजेरीचे चित्र रेखाटले गेले आहे. आणि स्पष्ट केले गेले आहे की लोक खोटया शिफारशीच्या जोरावर जाबदेण्यापासून वाचू शकत नाहीत.

# ७८. सूरह अन्नबा

سُوْرَةُ النَّبَإِ

आयती - ४०

परम दयालू व परम कृपाळू अल्लाहच्या नांवाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हे लोक कोणत्या गोष्टीबद्दल विचारपूस करीत आहेत ?

عَمَّ يَتَسَآءَلُوْنَ ۚ ﴿١﴾

२. त्या मोठया वार्तेसंबंधी ?[१]

عَنِ النَّبَاِ الْعَظِيْمِ ۙ ﴿٢﴾

३. जिच्या संबंधी ते वेगवेगळ्या गोष्टी करीत आहेत.[२]

الَّذِيْ هُمْ فِيْهِ مُخْتَلِفُوْنَ ۗ ﴿٣﴾

४. यांच्या गोष्टी चुकीच्या आहेत. यांना लवकरच समजेल

كَلَّا سَيَعْلَمُوْنَ ۙ ﴿٤﴾

५. पुन्हा ऐका. यांचे विचार खोटे आहे. यांना लवकरच समजेल. [३]

ثُمَّ كَلَّا سَيَعْلَمُوْنَ ﴿٥﴾

६. काय आम्ही जमीनीला बिछाईत नाही बनविली[४]

اَلَمْ نَجْعَلِ الْاَرْضَ مِهٰدًا ۙ ﴿٦﴾

७. आणि पर्वतांना मोखा ?[५]

وَّالْجِبَالَ اَوْتَادًا ۙ ﴿٧﴾

८. आणि काय आम्ही तुम्हाला जोडयाजोडयाच्या स्वरूपात निर्माण नाही केले ?[६]

وَّخَلَقْنٰكُمْ اَزْوَاجًا ۙ ﴿٨﴾

९. आणि काय तुमच्या झोपेला विसाव्याचे साधन. [७]

وَّجَعَلْنَا نَوْمَكُمْ سُبَاتًا ۙ ﴿٩﴾

१०. आणि रात्रीला आवरण. [८]

وَّجَعَلْنَا الَّيْلَ لِبَاسًا ۙ ﴿١٠﴾

१.मोठया वार्तेशी अभिप्रेत कियामत व निवाडयाचा दिवस निश्चित येणार ही वार्ता. पवित्र कुरआनने लोकांनी सावध होऊन जबाबदारीचे जीवन जगावे म्हणून जेव्हा ही वार्ता ऐकविली तेव्हा मक्केचे अनेकेश्वरवादी तिची थट्टा उडवू लागले आणि तिच्याविरूद्ध चर्चा करू लागले. आयतीचा इशारा या चर्चेकडे आहे.

२. निवाडयाच्चा दिवस व आखिरत संबंधी मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचा मते भिन्न होती माणूस पुन्हा जिवंत उठविला जाणार आहे या वस्तुस्थितीला ते अगदी अशक्य मानीत होते. ते म्हणत ''जीवन फक्त या जगातील जीवन आहे. मरणानंतर आम्हाला उठविले जाणार नाही.'' आणि काही लोकांना आखिरत संबंधी शंका व संशय होता. त्यांचे हे विचार कोणत्याही शास्त्रीय युक्तिवादावर आधारलेला नव्हता तर ती निव्वळ ऐक अटकळ पंचविशी होती. स्पष्ट असो की कियामत व निवाडयाच्या दिवसाच्या इन्कारा बाबतील अरब अनेकेश्वरवादी ऐकटे नव्हते. दुसरे अनेकेश्वरवादी धर्म सुद्धा त्यासंबंधी अत्यंत विसंगत गोष्टी सादर करतात. हे खालील उताऱ्यावरुन स्पष्ट होईल.

**Extract From The Encyclopaedia Of Religion And Ethics, Volume V :**

**Hindu :** Although in the Rigveda no clear statement of Judgement is found, and Yama appears mainly as king of the region of bliss, yet he is to some extent an object of terror, and a dark underground hell is spoken of as the fate of evil-doers (iv. 5.5, vii 104.3, ix-73.8)....... The later views differ widely from this, through the gradual introduction of the belief in transmigration, while Yama is now the judge of the dead......In the Upanishads re- birth in varios conditions, in heaven,hell or on earth, appears as the result of ignorance of the true end of existence ...... Hinduism in all its forms endorses this view. All go to Yama over a dreadful road, on which the pious fare better than the wicked. Yama or Dharma judges and allots the fate. Through endless existences and re-births --- in human, animal, or plant forms --- alternated with lives in the heavens or hells, the soul must pass.

**Buddhist :** In Buddhism the idea of karma afforded an automatic principle of judgement, whereby the person after death entered upon an existence, higher or lower, according to his actions. At death, the force resulting from actions combined with clinging to existence causes creation of the five skandhas, or constituent elements of being. This is so swift that there is hardly any break in the continuity of personality, which is thus re-created in one of the six states ---gods, men, asuras, animals,plants, pretas, or inhabitants of one of the hells. (p.375)

या सर्व विसंगत गोष्टी असल्या तरी ही ऐक इन्कार न करता येणारी अशी वस्तुस्थिती आहे की या जगाचा ऐक दिवस शेवट होणार आहे आणि सांप्रतचे विज्ञान पण याचे समर्थन करते.Encyclopaedia of religion and ethics चे लेखक पुढे लिहितात.

**Conclusion :** The ideas regarding the end of the world which are found in most eschatologies may be regarded as mythical speculations prompted by knowledge of actual catastrophes in Nature and of its phenomena. The world, as science teaches, and as the speculations of men suggested, must have an end; but they pictured that end in lurid colours, while generally anticipating after it a new order. (p. 391)

पवित्र कुरआन आचरणाच्या मोबदल्यासाठी ऐका नव्या व्यवस्थेबरोबर ऐक नवे जग अस्तित्वात येणार असलेल्या वार्तेला निव्वळ ऐक अंधश्रद्धा Dogma म्हणून नव्हे तर विश्वाच्या व त्यामध्ये परमेश्वरने केलेल्या निर्मितीच्या निशाण्यांच्या द्वारे (बौद्धिक युक्तिवादाने) इतक्या मनोवेधक स्वरूपात सादर करतो की कोणत्याही प्रकारच्या शंकेस वा विरोधास काही जागाच राहत नाही. आणि मन ग्वाही देते की निवाडयाच्या दिवसाचे अस्तित्वात येणे शक्यच नव्हे तर आवश्यक पण

आहे. आणि पवित्र कुरआन पुढे जाऊन अत्यंत ठामपणे हे जाहीर करीत आहे की निवाडयाचा दिवस अनिवार्यपणे अस्तित्वात येईल.

३. म्हणजे ती वेळ दूर नाही जेव्हा त्यांना कळून येईल की निवाडयाच्या दिवसाबद्दलचे त्यांचे तर्क चुकीचे होते. ही वस्तुस्थिती मृत्यू येताच 'आलमे बरजख' (मृत्यूपासून कियामतीपर्यंतचे आत्म्याचे ठिकाण) मध्ये त्यांना अवगत होईल आणि नंतर कियामतीच्या दिवशी जेव्हा सर्व मानवांना देहांसकट पुन्हा उठविले जाईल तेव्हा ते आपल्या डोळ्यांनी या सत्याला पाहतील. ''याना लवकरच समजेल'' या शब्दांची जी पुनरुकती केली गेली आहे ती दोन प्रसंगाकडे इशारा करते.

४. पृथ्वी वातावरणात अधांतरी आहे आणि ती सूर्या भोवती फिरत असते तरीसुद्धा तिच्यामध्ये अस्थिरता नाही. त्याचप्रमाणे तिच्या पृष्ठभागाला अशाप्रकारे पसरविण्यात आलेले आहे की त्यावर वसणे शक्य झाले आहे. इतकेच नव्हे तर असे वाटते की खास माणसाला वसविण्यासाठी जमिनीला बिछाईत बनवून त्या सर्व गोष्टींची व्यवस्था केली गेली आहे ज्या मानवी जीवनासाठी आवश्यक आहेत. याचाच अर्थ असा की माणसाला वसविण्याचे काम ऐका योजनेनुसार अंमलात आलेले आहे. या मध्ये अल्लाहच्या पालकत्वाची व त्याच्या ज्ञानाची स्पष्ट अशी निशाणी दिसून येत नाही काय?

५. जमीनीवर पर्वतांच्या मेखा रोवल्या गेल्याने पृथ्वीच्या गती व वेगामध्ये समतोल निर्माण झालेला आहे. आणि अस्थिरता नाहीशी झालेली आहे. त्याचप्रमाणे पर्वतापासून माणसाला निरनिराळे फायदे होत असतात. उदा. नद्यांचे स्वरूपात पाण्याचे साठे वगैरे.

६. असे झालेले नाही की फक्त पुरुषच पुरुष वा फक्त स्त्रियाच स्त्रिया निर्माण केल्या गेल्या. स्त्री व पुरुष यांच्या जोडयांच्या स्वरुपात मानवाना निर्माण केले गेले आहे. या जोडीमधील प्रत्येक घटक शारीरिक व मानसिक वैशिष्टयांच्या दृष्टीने भिन्न आहे. परंतु ही भिन्नता त्यांच्यामध्ये विरोध वैमनस्य नव्हे तर परस्पर अनुकूलता व सहकार्य निर्माण करते. जणू ते घटक ऐकदुसऱ्यामध्ये मिसळून परिपूर्ण होतात. माणसाच्या पूर्णत्वाचे हे साहित्य अल्लाहच्या पालकत्वाची व बुद्धिमत्तेची ऐखादी निशाणी स्पष्ट करीत नाही काय?

७. झोप माणसाच्या थकव्याला दूर करते आणि त्याला ताजातवाना बनविते ईश्वराने माणसाच्या प्रकृतीमध्ये झोप ठेविली नसती तर सततच्या श्रमाने त्याची शक्ती नाहीशी झाली असती व तो शांततेचे जीवन जगण्यास समर्थ राहिला नसता. माणसाला आराम पोहचविण्याची ही व्यवस्था किती आश्चर्य जनक आहे. काय हा पण ऐका योगायोगाने घडलेल्या घटनेचा परिणाम आहे की ही ऐका दूरदर्शी बुद्धिवंताची चतुर योजना आहे?

८. जमिनीवर दिवसच दिवस असता तर माणसाच्या संरक्षणाची व आरामाची व्यवस्था झाली नसती. सूर्याच्या अखंड उष्णतेने माणसाला चैन व आरामापासून वंचित केले असते परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने पृथ्वीला अशा ऐका कायद्याने बद्ध केलेले आहे की ती आपल्या कक्षेभोवती नियमित भ्रमण करीत असते. आणि त्यामुळे रात्र व दिवस या दोहोचा क्रम कायम राहतो. अशाप्रकारे रात्रीची चादर माणसाला आपल्यामध्ये अशाप्रकारे लपवून घेते जसा पोशाख. ऐका महान ध्येयाप्रत होणाऱ्या पृथ्वीच्या या भ्रमणामागे कोणा दूरदर्शी बुद्धिवंताचे सामर्थ्य प्रत्यास येत नाही काय?

आणि दिवसाला उपजीविकेचा समय नाही बनविले ? आणि काय तुमच्यावर सात मजबूत आकाश आणि ऐक तेजस्वी दीप नाही बनविले? आणि काय मेघांद्वारे भरपूर पाण्याचा वर्षाव नाही केला? यासाठी की याद्वारे पिकवावे धान्य आणि वनस्पती.*(अल-कुर्आन)*

११. आणि दिवसाला उपजीवीकेचा समय नाही बनविले ?[९]

وَّجَعَلْنَا النَّهَارَ مَعَاشًا ﴿١١﴾

१२. आणि काय तुमच्यावर सात मजबूत आकाश,[१०]

وَبَنَيْنَا فَوْقَكُمْ سَبْعًا شِدَادًا ﴿١٢﴾

१३. आणि ऐक तेजस्वी दीप नाही बनविले?[११]

وَّجَعَلْنَا سِرَاجًا وَّهَّاجًا ﴿١٣﴾

१४. आणि काय मेघांद्वारे भरपूर पाण्याचा वर्षाव नाही केला ?[१२]

وَّأَنْزَلْنَا مِنَ الْمُعْصِرٰتِ مَآءً ثَجَّاجًا ﴿١٤﴾

१५. यासाठी की याद्वारे पिकवावे धान्य आणि वनस्पती

لِّنُخْرِجَ بِهٖ حَبًّا وَّنَبَاتًا ﴿١٥﴾

१६. आणि घनदाट बागा.

وَّجَنّٰتٍ أَلْفَافًا ﴿١٦﴾

१७. नि:संशय ! निर्णयाचा ऐक दिवस निश्चित आहे.[१३]

إِنَّ يَوْمَ الْفَصْلِ كَانَ مِيْقَاتًا ﴿١٧﴾

१८. ज्यादिवशी सूर फूंकला जाईल तेव्हा तुम्ही झुंडीझुंडीने निधून याल.[१४]

يَّوْمَ يُنْفَخُ فِي الصُّوْرِ فَتَأْتُوْنَ أَفْوَاجًا ﴿١٨﴾

१९. आणि आकाशाला उघडले जाईल तेव्हा त्यामध्ये दारेच दारे बनतील.[१५]

وَّفُتِحَتِ السَّمَآءُ فَكَانَتْ أَبْوَابًا ﴿١٩﴾

२०. आणि पर्वतांना चालविले जाईल तेव्हा ते मृगजळ बनून राहतील.[१६]

وَّسُيِّرَتِ الْجِبَالُ فَكَانَتْ سَرَابًا ﴿٢٠﴾

२१. नि:संशय ! जहन्नम पाळतीवर आहे.

إِنَّ جَهَنَّمَ كَانَتْ مِرْصَادًا ﴿٢١﴾

२२. विद्रोही लोकांचे ठिकाण.[१७]

لِّلطّٰغِيْنَ مَاٰبًا ﴿٢٢﴾

२३. जेथे ते युगानुयुगे पडून राहतील.[१८]

لّٰبِثِيْنَ فِيْهَآ أَحْقَابًا ﴿٢٣﴾

९. जमिनीवर रात्रच रात्र असती तर उदरनिर्वाहा साठी धावपळ करणे व उपजीविकेची अनुकूलता लाभणे कदापिही शक्य झाले नसते. उपजीविकेच्या या अनुकूलतेच्या आधारावरच माणूस ''उत्कृष्ट निर्मिती' म्हणून जीवन जगत आहे. आणि आर्थिक प्रगतीच्या अनेक वाटा त्याच्यासमोर मोकळ्या आहेत. काय हा अल्लाहच्या पालकत्वाचा चमत्कार नाही?

१०. म्हणजे अल्लाहने निर्माण केलेल्या विश्वाच्या विशालतेचा अंदाज यावरून केला जाऊ शकतो की दृष्टीस दिसणारे आकाश हे फक्त पहिले आकाश आहे. असे सात आकाश अल्लाहने निर्माण केलेले आहेत. आणि ग्रह नक्षत्रांना असे भक्कम बनविले आहे की ऐक प्रदीर्घ कलावधी लोटला असता देखील त्यांच्यामध्ये कसल्याही प्रकारच्या मोडतोडीचे, झीज व क्षयाचे लक्षण उद्‌भवलेले नाही. आणि त्यांच्या सौंदर्यात किंचितदेखील फरक पडलेला नाही. ईश्वरी नियमांची पकड इतकी मजबूत आहे की कोठेही कसलाही दोष निर्माण होऊ शकत नाही आकाशाची व्यवस्था जर मजबूत बनविली गेली नसती तर जमिनीची व्यवस्था कदापिही अस्तित्वात राहीली नसती. काय यामध्ये अल्लाहचे सामर्थ्य पालकत्व व त्याची बुद्धिमता यांच्या श्रेष्ठ निशाण्या अस्तित्वाता नाहीत?

११. सूर्याला असा प्रकाशमान बनविला गेला आहे की त्याचा प्रकाश फिका पडत नाही. प्रचलित विज्ञानाच्या प्रकाशात सूर्याला पाहीले की सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कौशल्याचे पैलू आणखीन स्पष्ट होऊन. समोर येतात. सूर्याचे तपमान ऐककोटी चाळीस लाख डिग्री सेंटीग्रेड आहे. तो पृथ्वीपेक्षा शंभरहून अधिक पटीने मोठा आहे. त्याला पृथ्वीपासून नऊ कोटी तीस लाख मैलाच्या अंतरावर ठेविले गेले आहे. आणि त्यामुळे जमिनीवर न अति उष्णता असते न अति थंडी. सजीव प्राण्यासाठी जे उष्णतामान आवश्यक आहे ठीक ते उष्णतामान पृथ्वीवर आहे. सूर्याच्या या उष्णतामानामुळे पाऊसही पडतो व पीकही तयार होते काय या प्रकाशमान दिव्यानेसुद्धा तुम्हाला अल्लाहच्या सामर्थ्य व पालकत्वाच्या बाबतीत काही प्रकाश लाभला नाही?

१२. ढगांच्याद्वारे मानवी वस्त्यांना मुबलक पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था आणि त्याच्या साह्याने अन्न धान्य व भाजीपाला यांचे पीक आणि घनदाट बागा--ज्यांच्याद्वारे माणसाच्या उदानिर्वाहाचे साहित्य अखंडपणे निर्माण होत असते काय हे सर्व माणसाचे डोळे उघडण्यास पुरेसे नाही? काय यामागे त्या शक्तीचे सामर्थ्य दिसून येत नाही जी त्यांच्या पालनपोषणाची पुरेपूर व्यवस्था करीत आहे?

१३. ही आहे ती गोष्ट जिच्याबाबतीत वरील मजकूरांमध्ये (आयत नं. ६ ते १६) युक्तिवाद केला गेला आहे युक्तिवादाचा खुलासा हा आहे की निर्णयाचा दिवस (Day of judgment) हे ऐक अटळ सत्य आहे. आणि त्याच्या प्रत्ययाची वेळसुद्धा अगदी ठरलेली आहे. मक्केचे अनेकेश्वरवादी लोक याला मानण्याबाबतीत या आधारावर इन्कार करीत होते की त्यामुळे माणसाचे पुन्हा जिवंत होणे आवश्यक आहे. आणि ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अगदी अशक्य होती. कारण ते म्हणत होते की माणूस मरून मातीत सडून गळून मिसळून गेल्या नंतर पुन्हा कसा काय जिवंत होऊ शकतो? ते आपल्याला संकुचित दृष्टीमुळे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्याची व बुद्धिमतेची योग्य कल्पना करु शकत नव्हते. आणि म्हणून त्याच्या बुद्धीस अपील करणारा अंदाज अवलंबिला गेला आणि निर्णयाच्या--निवाडयाच्या दिवसावर युक्तिवाद केला गेला आहे. त्याचा खुलासा असा की, ही जमीन हे आकाश आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या विपुल देणग्या ज्यांच्याशी तुमचे जीवन निगडीत आहे कोणत्या गोष्टीची साक्ष देत आहेत? ही सर्व काय या गोष्टीची साक्ष देत आहेत की त्यांचा निर्माता अत्यंत मर्यादीत सामर्थ्य बाळगणारा आहे आणि त्याच्या कार्यामध्ये उद्देशाचा मागमूसही आढळून येत नाही आणि या विश्वाचे घटक अगदी विसकळीत व अव्यवस्थित आहेत आणि हा सर्व कारभार अनागोदी आहे? किंवा हे की, काय ही चिन्हे या वस्तुस्थितीला स्पष्ट करीत आहेत की, मानवाचा निर्माता जबरदस्त सामर्थ्याचा धनी आहे आणि न केवळ जबरदस्त सामर्थ्याचा धनी आहे तर त्या बरोबरच तो पालकत्वाचे व बुद्धिमतेचे गुणविशेष ही बाळगून आहे. अल्लाहला या गुणविशेषांनी संपन्न मानल्यानंतर निर्णयाच्या दिवसाला मानण्यामध्ये काही अडचण राहत नाही. उलट या गुणविशेषांचा हा स्वभाविक असा अविष्कार आहे की निर्णयाचा दिवस प्रत्यास यावा. जेव्हा ही गोष्ट स्पष्ट झाली की अल्लाह जबरदस्त सामर्थ्याचा धणी आहे तर मग त्याच्या साठी मृताला जीवंत करणे ही अगदी सोपी गोष्ट आहे. हे अशक्य असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आणि जी शक्ती माणसाच्या पालनपोषणाची व्यवस्था करीत आहे व ज्या शक्ती आपल्या या अगणित देणग्यांनी अलंकृत केलेले आहे, ती शक्ती आपल्या या अगणित देणग्यांचा माणसाकडून हिशेब का घेणार नाही? आणि आपल्या ऐकनिष्ठ दासांना बक्षिसास पात्र व विद्रोही लोकांना शिक्षेस पात्र का ठरविणार नाही? त्याच्या बुद्धिमतेच्या प्रत्यय तर विश्वातील ऐक न ऐक गोष्टीने येत असतो. त्याचे प्रत्येक कार्य ज्ञानावर आधारीत व योजनाबद्ध आहे. तर मग काय हे मान्य केले जाऊ शकते की माणसाची निर्मिती विनाउद्देश अस्तित्वात आली आहे? आणि मृत्यूनंतर त्याला मातीत मिसळून जावयाचे व नष्ट व्हावयाचे आहे? आणि मृत्यूनंतर काही नाही? चांगल्या व वाईटात काही फरक नाही? अल्लाहला मानणारे व त्याचा इन्कार करणारे, त्याचे

आज्ञा धारक व त्याचे अवज्ञाकारी हे सर्व समान आहेत. ना कोणाला बक्षिस मिळणार आहे ना कोणाला शिक्षा मिळणार आहे अल्लाहचे न्यायालय हे असे न्यायालयच नव्हे की जेथे जाब देण्यासाठी उपस्थित राहण्याची आवश्यकता आहे? काय अशा गोष्टी तुमच्या बुद्धीला पटतात आणि अल्लाहच्या बुद्धिमताचा हा जो गुणविशेष आहे काय त्याच्याशी यांचा मेळ बसतो? वस्तुस्थिती ही आहे की माणूस आपल्या अवती भोवती जगामध्ये अल्लाहच्या बुद्धिमतेच्या ज्या गोष्टी पाहतो त्यावरून ही निकड अगदी स्पष्ट होते की निवाडयाचा दिवस आस्तित्वात आला पाहिजे आणि पवित्र कुरआनच्या या वार्तेचे पूर्ण पणे समर्थन होते की निवाडयाचा ऐक दिवस निश्चित आहे. त्या दिवशी साऱ्या मानवांना पुन्हा जीवंत करून विश्वशासकाच्या न्यायालयात हजर केले जाईल.

१४. म्हणजे कियामतीच्या दिवशी बिगूल होताच सूर फूंकला जाताच सारी मृत माणसे जीवंत होऊन सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात हजर होण्यासाठी निघतील.

१५. आलमे बाला आकाशावरील जगाची हकीकत माणासापासून अदृश्य आहे. पण कियामतीच्या दिवशी आकाश उघडल्यानंतर ती त्याच्या दृष्टीस पडेल.

१६. इशारा या गोष्टीकडे आहे की कियामतीच्या दिवशी या जगाची व्यवस्था बदलली जाईल. ही जमीन ऐक सपाट मैदान बनेल ज्यावर साऱ्या माणसांना ऐकत्र करुन न्यायालय भरविले जाईल. मोठमोठे पर्वत वातावरणात उडत राहतील आणि त्यांच्या जागी वाळूचे मैदान होईल. (शेवटच्या दिवसाच्या) मैदानात त्यांचे अस्तित्व शिल्लक राहणार नाही. यावरून कियामतीच्या दिवसाची भयानकता, जमीनीच्या रचनेमध्ये महान असे बदल घडून येणे आणि हश्र जेथे (लोकांना गोळा केले जाईल ते मैदान) च्या मैदानाचा विस्तर यांचा अंदाज होऊ शकतो.

१७. अल्लाहचे विद्रोही दास जगामध्ये अल्लाहचे भय न बाळगता जीवन जगतात आणि असे समजतात की शिक्षा व धोक्याचा काही प्रश्न नाही. परंतु कियामतीच्या दिवशी जहन्नम त्यांच्यासाठी अशा प्रकारे प्रकट होईल की ती त्यांच्या पाळतीवरच होती आणि ते त्यामध्ये असे अडकून राहतील की पुन्हा त्यामधून बाहेर पडणे अशक्य होऊन जाईल.

१८. म्हणजे ऐका युगा नंतर दुसऱ्या युगामध्ये अशाप्रकारे ते अखंडपणे शिक्षा भोगतच राहतील. इतकी जबर शिक्षा यासाठी की अल्लाहच्या आज्ञा पालना ऐवजी त्यांनी अल्लाहबरोबर विद्रोहाचा मार्ग अवलंबिला आपल्या खऱ्या उपकारकर्त्याबद्दल ते कृतघ्न राहीले. आणि निर्णयाच्या दिवसावर ईमान आणून जबाबदारीचे जीवन जगण्यास ते तयार झाले नाहीत. आणि म्हणून त्यांनी ते बी पेरले आहे त्याचे ते पीक घेत राहतील.

**आणि समवयस्क नवयुवती.आणि काठोकाठ भरलेले प्याले. तेथे ते ना कोणतीही निरर्थक गोष्ट ऐकतील ना खोटी गोष्ट. हा तुमच्या पालनकर्त्याकडून मोबदला असेल आणि भरपूर बक्षिस.*(अल-क़ुर्आन)***

२४. तेथे त्यांना ना कोणत्याही प्रकारच्या शतिलतेची गोडी चाखावयास मिळेल ना पिण्याच्या पेयाची,

لَا يَذُوقُونَ فِيهَا بَرْدًا وَلَا شَرَابًا ﴿٢٤﴾

२५. शिवाय उकळते पाणी व पू ,

إِلَّا حَمِيمًا وَغَسَّاقًا ﴿٢٥﴾

२६. (त्यांच्या दुष्कृत्यांचा) पुरा पुरा बदला.

جَزَاءً وِفَاقًا ﴿٢٦﴾

२७. ते हिशेबाची आशाच बाळगीत नव्हते.

إِنَّهُمْ كَانُوا لَا يَرْجُونَ حِسَابًا ﴿٢٧﴾

२८. आणि आमच्या आयतींना (महावाक्यांना) अगदी खोटया म्हणत असत.

وَكَذَّبُوا بِآيَاتِنَا كِذَّابًا ﴿٢٨﴾

२९. वस्तुस्थिती ही आहे की आम्ही प्रत्येक गोष्टीला लिहून बंदिस्त करुन ठेविले होते.[१९]

وَكُلَّ شَيْءٍ أَحْصَيْنَاهُ كِتَابًا ﴿٢٩﴾

३०. तर मग मजा चाखा ! आता तर आम्ही तुमच्या शिक्षेतच वाढ करीत राहू .

فَذُوقُوا فَلَنْ نَزِيدَكُمْ إِلَّا عَذَابًا ﴿٣٠﴾

३१. नि:संशय ! ईशभय बाळगणाऱ्यासाठी [२०] सफलता आहे.

إِنَّ لِلْمُتَّقِينَ مَفَازًا ﴿٣١﴾

३२. बागा आणि द्राक्षे,

حَدَائِقَ وَأَعْنَابًا ﴿٣٢﴾

३३. आणि समवयस्क नवयुवती,

وَكَوَاعِبَ أَتْرَابًا ﴿٣٣﴾

३४. आणि काठोकाठ भरलेले प्याले. [२१]

وَكَأْسًا دِهَاقًا ﴿٣٤﴾

३५. तेथे ते ना कोणतीही निरर्थक गोष्ट ऐकतील ना खोटी गोष्ट.[२२]

لَا يَسْمَعُونَ فِيهَا لَغْوًا وَلَا كِذَّابًا ﴿٣٥﴾

३६. हा तुमच्या पालनकर्त्याकडून मोबदला असेल आणि भरपूर बक्षिस.[२३]

جَزَاءً مِنْ رَبِّكَ عَطَاءً حِسَابًا ﴿٣٦﴾

१९. म्हणजे त्यांच्या सर्व आचरणाचे रेकॉर्ड आम्ही तयार करीत होतो. जणू प्रत्येक माणसाच्या जीवनाचा संपूर्ण बोलपटच तयार केला जात होता, ज्यामध्ये फक्त उच्चार व आचारच नव्हे तर त्यामागील उद्देशांचीही नोंद केली जात होती. आणि हे लोक या भ्रामक समजूतीमध्ये अडकून पडले होते की ते मनमानेल तसे आचरण करण्यास अगदी स्वतंत्र आहेत. आणि त्यांच्या आचरणाचे कसलेही रेकॉर्ड तयार केले जात नाही. कारण त्यांना ना असा ऐखादा कॅमेरा दिसून येत होता जो त्यांच्या जीवनाचे चित्रीकरण करीत होता आणि ना त्यांना असा ऐखादा टेपरेकॉर्डर दिसत होता जो त्यांच्या तोडून निघणाऱ्या उद्‌गाराचे रेकॉर्डींग करीत होता.

२०. येथे ''मुत्तकीन'' हा शब्द ''तागीन'' (विद्रोही) च्या विरोधात वापरला गेला आहे. म्हणजे ते लोक जे अल्लाहवर आणि निर्णयाच्या दिवसावर ईमान ठेवितात. त्याच्या 'आयती' ना मानतात आणि अशा प्रकारे जीवन जगतात की त्यांना आपल्या आचरणाचा जाब द्यावयाचा आहे.

२१. अभिप्रेत पवित्र मद्याचे प्याले.

२२. म्हणजे जन्नतचे वातावरण अत्यंत पवित्र असेल समाजही पवित्र व खाण्यापिण्याच्या वस्तूपण शुद्ध इतकेच नव्हे तर येथील मद्य जगातील मद्यासारखे नसेल की जे प्याल्यावर माणूस वाह्यातपणा करू लागतो. याउलट ते मद्य अत्यंत शुद्ध असेल ज्याने मन:स्थिती संतोषजनक व समाधानकारक राहील व वाह्यातपणाचा मागमूसही असणार नाही. याचप्रमाणे तेथे इतर निरर्थक गोष्टी व दृश्ये असणार नाहीत. लबाडी व खोटया गोष्टी आढळणार नाहीत तर ते ऐक शांत व आनंददायक वातावरण असेल जेथे सर्वत्र नीती व सभ्यतेचे दर्शन घडत राहील.

२३. संयमी व सदाचारी लोकांना त्यांच्या सदाचाराचा फक्त मोबदलाच दिला जाणार नाही तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना आपल्या भरपूर देणग्यांनी अलंकृत करील.

३७. त्याच्या कडून---जो आकाशांचा व जमिनीचा व त्यांच्या दरम्यान असलेल्या वस्तूंचा स्वामी आहे. रहमान--ज्याच्याशी बोलण्याची कोणाची हिंमत नाही.[२४]

رَّبِّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا الرَّحْمٰنِ لَا يَمْلِكُوْنَ مِنْهُ خِطَابًا ﴿٣٧﴾

३८. ज्या दिवशी रूह (रुहुल अमीन) [२५] व ईशदूत (फिरिश्ते) ऐका रांगेत उभे असतील. कोणी बोलू शकणार नाही. शिवाय तो ज्याला रहमान परवानगी देईल आणि तो योग्य गोष्टच बोलेल.[२६]

يَوْمَ يَقُوْمُ الرُّوْحُ وَالْمَلٰٓئِكَةُ صَفًّا ۙ لَّا يَتَكَلَّمُوْنَ اِلَّا مَنْ اَذِنَ لَهُ الرَّحْمٰنُ وَقَالَ صَوَابًا ﴿٣٨﴾

३९. तो दिवस सत्य आहे [२७] आणि म्हणून ज्याची इच्छा असेल त्याने आपल्या पालनकर्त्या जवळ आपले ठिकाण बनवावे.

ذٰلِكَ الْيَوْمُ الْحَقُّ ۚ فَمَنْ شَآءَ اتَّخَذَ اِلٰى رَبِّهٖ مَاٰبًا ﴿٣٩﴾

४०. आम्ही तुम्हाला अशा ऐका शिक्षेपासून सावध केलेले आहे जी जवळ आलेली आहे.[२८] ज्या दिवशी माणसाला दिसेल की त्याच्या हातांनी पुढे काय पाठविले आहे [२९]आणि काफिर (इन्कार करणारा) म्हणेल अरेरे ! मी माती असतो तर (किती बरे झाले असते)![३०]

اِنَّآ اَنْذَرْنٰكُمْ عَذَابًا قَرِيْبًا ۚ ۖ يَّوْمَ يَنْظُرُ الْمَرْءُ مَا قَدَّمَتْ يَدٰهُ وَيَقُوْلُ الْكٰفِرُ يٰلَيْتَنِيْ كُنْتُ تُرٰبًا ﴿٤٠﴾

२४. कियामतीच्या दिवशी जेव्हा विश्वाचा अधिपती न्यायालय भरवील तेव्हा त्या न्यायालयाचा दरारा असा असेल की कोणी त्याच्यासमोर तोंड उघडण्याचे धाडस करू शकणार नाही. यावरून अनेकेश्वर वाद्यांच्या या विचाराचे खंडन होते की त्यांच्या देवीदेवता जे इच्छितील ते ईश्वराकडून मान्य करून घेतील.

२५. 'रूह' म्हणजे 'रूहुल अमीन' हजरत जिब्राईल ते फिरिशत्यांचे नेते असल्याने त्यांचा विशेष उल्लेख केला गेला आहे. आणि हे स्पष्ट केले जात आहे की कियामतीच्या दिवशी जेव्हा अल्लाह न्यायालय भरवील तेव्हा फिरिश्ते इतकेच नव्हे तर. हजरत जिब्राईल (अ) सुद्धा रांगोत उभे असतील सारे जण भयभीत झालेले असतील आणि कोणी तेथे बोलण्याचे धाडस करू शकणार नाही.

२६. येथे धर्मांना मानणाऱ्या लोकांमध्ये आढळून येणाऱ्या शिफारशी बद्दलच्या चुकीच्या कल्पनेचे खंडन अभिप्रेत आहे. अनेकेश्वरवादी लोकांच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास त्यांचा हा विचार आहे की कियामत झाली आणि आचरणाचा जाब देण्यासाठी अल्लाहच्या न्यायालयासमोर हजर व्हावे लागेल तर त्या देवीदेवता ज्यांची ते पूजा करीत असत त्यांची शिफारस करण्यासाठी अल्लाह समोर उभ्या राहतील आणि शिक्षेपासून सुटका करवून घेतील. परंतु पवित्र कुरआन स्पष्टपणे सांगत आहे की, प्रथम तर कोणत्याही देवीदेवतेचे आखिरतमध्ये अस्तित्वच असणार नाही. सर्वजण अल्लाहचे नम्र दास म्हणूनच हजर होतील आणि सारे ईशत्व अल्लाहच्याच स्वाधीन असेल. आणि अल्लाहच्या न्यायालयाच्या दराऱ्याचे स्वरुप असे असेल की अल्लाहच्या अत्यंत निकटचे फिरिश्ते देखील तोंड उघडण्याचे धाडस करू शकणार नाहीत. शिफारस करण्यासाठी फक्त तोच पुढे होऊ शकेल ज्याला अल्लाह परवानगी देईल. आणि तोपण योग्य अशीच गोष्ट करील. अनेकेश्वरवाद्यांबद्दल शिफारसीचा प्रश्न तर अगदी स्पष्ट आहे. त्यांच्याबद्दल कोणी शिफारस करूच शकणार नाही. कारण इतरांना अल्लाहबरोबर सहभागी करणे हा अक्षम्य असा गुन्हा आहे. आणि म्हणून हे योग्य होणार नाही की अशा लोकांच्याबद्दल शिफारस केली जावी.

अल्लाहच्या परवानगी नंतर एखाद्याची शिफारस करण्यासाठी कोणी तोंड उघडील तर ती शिफारस अशा अपराधी दासांचेबद्दल असेल जे ईमान बाळगतात आणि ज्यांच्याबाबतीत शिफारसीचा स्वीकार करणे अल्लाहला मान्य असेल आणि म्हणून या जगात कोणीही ही भ्रामक समजूत बाळगू नये की त्याने अनेकेश्वरवाद व इन्काराचा गुन्हा केलेला असताना आणि अवज्ञाकारी व विद्रोही माणसासारखे आचरण केले असतानासुद्धा कोणा ना कोणाच्या शिफारशीमुळे व वशिल्यामुळे तो आखिरतच्या जीवनात शिक्षेपासून वाचू शकेल.

२७. निर्णयाचा दिवस ही अनुमानाची व अंदाजाची गोष्ट नव्हे तर ती एक हकीकत व सत्य घटना आहे. आणि तिची खबर अत्यंत प्रामाणिकपणे तुम्हाला दिली जात आहे.

२८. 'जवळ' बहुतेक या दृष्टीने की या जगाचा पुष्कळसा काळ होऊन गेलेला आहे आणि कियामतीपर्यंतचा जो काळ शिल्लक आहे तो फार थोडा आहे. तसे पाहिले तर वेळ ही एक सापेक्ष गोष्ट आहे कियामतीच्या दिवशी जेव्हा स्थलकालाचे परिणाम बदलतील जो काळ या जगात घालविला होता तो फार थोडा होता असे वाटेल.

२९. माणूस या जगामध्ये जे चांगले वा वाईट काम करतो त्याचा ऐक परिणाम व त्याचा ऐक शेवट आहे, जो आखिरतच्या जीवनामध्ये दृगोचर होईल. या हकीकतीला مَا قَدَّمَتْ يَدَاهُ "मा कदद्मत यदाहु" (जे त्याच्या हातांनी पुढे पाठविले) या शब्दानी स्पष्ट केले गेले आहे. कारण माणसाचे प्रत्येक आचरण म्हणजे त्याने स्वत:च्या हाताने पेरलेल्या बी या सारखे आहे. ज्याचे पीक तो येणाऱ्या जीवनात घेईल.

३०. म्हणजे जे लोक निर्णयाच्या दिवसावर विश्वास ठेवून त्यानुसार जबाबदारीचे जीवन जगण्यास नकार देतात, त्यांनी हे चांगल्याप्रकारे जाणावे की जेव्हा निर्णयाचा दिवस अमंलात येईल आणि माणूस आपले आचरण आपल्यासमोर पाहील तेव्हा अशा लोकांच्या वाटयास निराशा दु:ख व पश्चाताप या शिवाय दुसरे काही येणार नाही. त्यावेळी आखिरतचा इन्कार करणाऱ्या प्रत्येक माणसाला ही जाणीव होईल की मरणानंतर मी मातीत मिसळून गेलो असतो तर ही हिशेब देण्याची पाळीच आली नसती.

# सूरह नाज़िआत

# ७९. सूरह नाज़िआत

**नावः** सूरतीची सुरवात 'वन्नाज़िआत' ने झालेली आहे. म्हणून या सूरतीचे नाव ''अन्नाज़िआत'' ठेवले गेले आहे. हा शब्द वाऱ्यांचा गुणधर्म निर्देशक म्हणून वापरला गेला आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्केमध्ये उतरली. आणि विषयावरून अंदाज होतो की सूरह 'नबा' नंतर लगेच ती उतरली असावी.

**विषयः** या सूरतीचा विषय कियामतीचे प्रकट होणे आणि आचरणाच्या मोबदल्यासाठी माणसाला पुन्हा जिवंत करणे हा आहे. पार्श्व भूमीमध्ये खास करून ते फिरऔन प्रवृत्तीचे व विद्रोही लोक आहेत जे भौतिक जीवन सम्पन्न करण्यामध्ये रंगलेले आहेत.

**ग्रंथ मांडणीः** आयत नं.१ते ५ मध्ये निर्णयाच्या दिवसावर साक्ष म्हणून वाऱ्यांचा उल्लेख केला गेला आहे.

आयत नं. ६ ते १४ मध्ये कियामतीच्या दुर्घटनेचे चित्र रेखाटताना इन्कार करणाऱ्यांच्या आक्षेपाचा उल्लेख केला गेला आहे.

आयत नं. १५ ते २६ मध्ये हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांचा संक्षिप्त उल्लेख केला गेला आहे की त्यांच्या आवाहनाला रोखल्यामुळे परिणामी फिरऔनचा दुर्दैवी शेवट झाला. हा जणू दुराचाराच्या प्रायश्चिताचा जो कायदा आहे, त्याचे एक उदाहरण.

आयत नं. २७ ते ३३ मध्ये माणसाला पुन्हा जिवंत करण्याच्या शक्यतेवर सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या 'सामर्थ्य' या गुणधर्माने युक्तीवाद केला गेला आहे.

आयत नं. ३४ ते ४१ मध्ये स्पष्ट केले गेले आहे की ज्या दिवशी कियामतीची घटना घडेल त्या दिवशी बंडखोर व भौतिकवादी लोकांचा शेवट किती वाईट होईल ! आणि अल्लाहचे भय बाळगून राहणाऱ्या लोकांचा शेवट किती चांगला होईल!

आयत नं. ४२ ते ४६ मध्ये कियामतीचा इन्कार करणाऱ्यांच्या शेवटी कियामत कधी येणार या प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे.

# ७९. सूरह अन्नाज़िआत

سُورَةُ النّٰزِعٰتِ

आयती - ४६

परम दयाळू व परमकृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे [१] त्या (वाऱ्यां)ची जे (ढगांना) जोराने वाहून नेतात.

وَالنّٰزِعٰتِ غَرْقًا ۙ﴿۱﴾

२. आणि त्यांची जे मंदमंद वाहतात.

وَّالنّٰشِطٰتِ نَشْطًا ۙ﴿۲﴾

३. आणि त्यांची जे वेगाने वाहतात.[२]

وَّالسّٰبِحٰتِ سَبْحًا ۙ﴿۳﴾

४. मग जे (आज्ञापालनात) बाजी मारतात.

فَالسّٰبِقٰتِ سَبْقًا ۙ﴿۴﴾

५. आणि एका कामाची (पावसाची) व्यवस्था करतात.[३]

فَالْمُدَبِّرٰتِ اَمْرًا ﴿۵﴾

६. ज्या दिवशी भूंकपाचा तीव्र धक्का बसेल.

يَوْمَ تَرْجُفُ الرَّاجِفَةُ ۙ﴿۶﴾

७. त्याच्या पाठोपाठ दुसरा धक्का बसेल.[४]

تَتْبَعُهَا الرَّادِفَةُ ؕ﴿۷﴾

८. त्या दिवशी किती जीव धडकत असतील?[५]

قُلُوْبٌ يَّوْمَئِذٍ وَّاجِفَةٌ ۙ﴿۸﴾

९. त्यांच्या नजरा झुकलेल्या असतील.

اَبْصَارُهَا خَاشِعَةٌ ﴿۹﴾

१०. म्हणतात, काय आम्ही पुन्हा पहिल्याच स्थितीत परतविले जाऊ? [६]

يَقُوْلُوْنَ ءَاِنَّا لَمَرْدُوْدُوْنَ فِى الْحَافِرَةِ ؕ﴿۱۰﴾

११. काय त्यावेळी जेव्हा आमची हाडे जीर्ण झालेली असतील.[७]

ءَاِذَا كُنَّا عِظَامًا نَّخِرَةً ؕ﴿۱۱﴾

१. सुरवातीच्या पाच आयतींमध्ये ज्या गोष्टींची शपथ घेतली गेली आहे, त्या गोष्टींचे फक्त गुणधर्म उल्लेखिलेले आहेत. स्पष्टपणे त्या गोष्टींचा उल्लेख झालेला नाही आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचेही यासंबंधी एखादे वचन उपलब्ध नाही. यासंबंधी विद्वानांची पुष्कळ भाष्ये आहेत. काहींनी याने अभिप्रेत फिरिश्ते आहेत असे म्हटले आहे तर काहींनी तारे काहींनी घोडयांचा उल्लेख केला आहे तर काहींनी ढगांचा यामध्ये अधिक प्रसिद्ध वचन ज्याला भाष्यकारांनी सर्व साधारणपणे ग्राह्य मानले आहे, ते हे की याने फिरिश्ते अभिप्रेत आहेत.

आम्ही खालील कारणामुळे याने 'वारे' अभिप्रेत घेतले आहेत.

(१) पवित्र कुरआनामध्ये जेथे अशाप्रकारच्या शपथा घेतल्या गेल्या आहेत तेथे त्यांचे स्वरूप युक्तीवादाचे वा पुराव्याचे आहे. येथे माणसाला पुन्हा जिवंत करण्यासंबंधी युक्तीवाद करणे अभिप्रेत आहे. जो जाणीव होणाऱ्या वस्तूनेच होऊ शकतो. आणि वाऱ्यांची जाणीव होते. परंतु फिरिश्त्यांची जाणीव होत नाही.

(२) येथे जे गुणधर्म निवेदन केले गेले आहेत ते फिरिश्ते आणि तारे यांच्यापेक्षा वाऱ्यांच्या बाबतीत अधिक अनुरूप आहेत.

(३) अरबीमध्ये 'नजाअे' खास प्रकारच्या वाऱ्यांना म्हणतात (लिसानुल अरब) नाजिआत याला मिळताजुळता असा शब्द आहे. पवित्र कुरआनमध्ये 'तुन्जिऊ' हा शब्द वाऱ्यासाठी वापरला गेला आहे.

تَنۡزِعُ النَّاسَ كَاَنَّهُمۡ اَعۡجَازُ نَخۡلٍ
مُّنۡقَعِرٍ (القمر آیت: ٢٠)

''तो वारा लोकांना अशाप्रकारे उपटून फेकत होता ज्याप्रमाणे मूळापासून उपटले गेलेले खजूरीचे खोड'' (सूरह कमर- २०)

(४) कुरआनमध्ये वाऱ्यांची शपथ कियामत व निर्णयाच्या दिवसाच्या समर्थनार्थ घेतली गेली आहे. (पहा सूरह जारियात व सूरह मुर्सलात) येथेही निर्णयाचा दिवस हाच विषय आहे म्हणून 'वारे' समजणे हे कुरआनशी अधिक सुसंगत आहे.

(५) येथे स्त्रीलिंगी गुणधर्म वर्णन केले गेले आहेत. आणि अरबीमध्ये वाऱ्यांचा स्त्रीलिंगी वापर होतो.

२. اَلسَّابِحَاتِ ''अस्साबिहाती'' (वेगाची चाल) हा वस्तुत: घोडयांचा गुणधर्म आहे. येथे वाऱ्यांना ते वेगवान असल्याने घोडयाच्या गुणधर्माची उपमा दिला गेली आहे. जणू ढग वाऱ्याच्या पाठीवर स्वार आहेत. आणि ते वेगाने आपल्या ठिकाणाकडे धावत आहेत.

३. या आयतींमध्ये वाऱ्यांची स्थिती आणि त्यांचे बद्दल निवेदन केले गेले आहेत, ज्यामुळे पावसाची व्यवस्था अस्तित्वांत येते. हे वारेच आहेत जे ढगांना हजारो मैलावरून वाहून आणतात आणि जेव्हा एखाद्या विभागात ढग जमा होतात तेव्हा वारे सौम्यपणे वाहतात, ज्याने वातावरण प्रसन्न होते.

हे वारे जे लाखो, कोटयावधी लिटर पाण्याचे वजन घेऊन वाहत असतात, तेव्हा असे वाटते की वेगवान घोडदळ एखाद्या मोहिमेवर वेगाने पळविले जात आहे. आणि ज्याप्रमाणे काही घोडे काही घोडयांच्यावर बाजी मारतात त्याचप्रमाणे काही वारे दुसऱ्या वाऱ्यांवर बाजी मारतात. वातावरणातील वाऱ्यांच्या या स्थितीला 'साबिकात' ची उपमा दिली गेली आहे. पावसाची ही व्यवस्था वाऱ्याद्वारेच अंमलात आणली जाते. आणि म्हणून त्यांना येथे लाक्षणिक अर्थाने فَالۡمُدَبِّرَاتِ اَمۡرًا 'फल्मुदब्बिराति अमरा' म्हटले गेले आहे. ज्याप्रमाणे सूरह मुर्सलातमध्ये त्यांना فَالۡمُقَسِّمَاتِ اَمۡرًا 'फलमुकस्सिमाति अमरा' (एक काम म्हणजे पावसाची विभागणी करणारे) ने स्पष्ट केले गेले आहे. या वाऱ्यांचा पुरावा सादर करून ज्या गोष्टीवर युक्तीवाद केला गेला आहे तो हा आहे की निर्णयाच्या दिवसाचे प्रकट होणे आणि लोकांना पुन्हा जिवंत केले जाणे हे सत्य आहे. युक्तीवादाचे स्वरूप हे आहे की वाऱ्यांची ही व्यवस्था सर्वश्रेष्ठ अल्लाहचे सामर्थ्य व त्याची विद्वता, त्याचे पालकत्तव आणि त्याचे श्रेष्ठत्तव व त्याच्या महत्ताच्या जबरदस्त निशाण्या सादर करीत आहे. आणि त्यांच्यावर चिंतन व मनन करण्याचे आवाहन करीत आहे. पावसाळी वारे जेव्हा वाहतात तेव्हा ते आपल्या निरनिराळ्या स्थितीनुरूप बेसावध माणसाला सावध करण्याचे काम करतात. उदा: ढगांना वाहून नेण्याची कृती ज्याबरोबर कडकडाट आणि वीज असते आणि वातावरणाला प्रसन्न बनवीत हळूहळू वारे वाहतात. तर कधी ते वेगाने वाहतात. अशाप्रकारे वाऱ्यांचे निरनिराळे गट जेव्हा वातावरणात आक्रमण करतात, तेव्हा ईश्वराच्या आज्ञेचे पालन व अंमलबजावणीमध्ये बाजी नेण्याचा त्यांचा गुणधर्म अगदी ठळक होतो. राहिला अल्लाहच्या आज्ञेला प्रत्यक्षात आणण्याच्या योजनेचा पैलू तर हे वारे एखाद्या प्रदेशाला पावसापासून वंचित ठेवून ढग पुढे निघून जातात. कोठे वादळ निर्माण होते आणि वृक्ष, घरे उन्मळून टाकली जातात तर कोठे प्रसन्न मंदगती. कधीकधी हे वारे उष्ण झळीचे स्वरूप अंगिकारतात तर कधी ते पहाटेच्या मंद, शीतल वाऱ्याच्या स्वरूपात प्रकट होतात. म्हणजे हे वारे तसेच वाहत नाहीत तर मनावर परिणाम करीत वाहत असतात. तर त्या प्रत्येक माणसासाठी जो मनन व चिंतन करतो आणि सत्याचा मोकळ्या मनाने स्वीकार करण्यास तयार असतो. त्या माणसामध्ये

हा विश्वास निर्माण करतात की या विश्वाचा निर्माता जबरदस्त सामर्थ्याचा स्वामी आहे आणि तो अत्यंत शहाणपणाने या विश्वाचे शासन करीत आहे. याची अवश्यमेव निकड ही आहे की या जगाचीसुद्धा काही आवश्यकता व काही उद्देश असावा आणि माणसाला त्याच्या आचरणाचा पुरा पुरा मोबदला मिळावा. जणू वाऱ्यांची ही व्यवस्था आचरणाच्या मोबदल्याचा पुरावा सादर करते. आणि माणसाच्या दुसऱ्यांदा जिवंत न फक्त शक्य समजते तर त्याला शहाणपणाची निकड ठरविते. जे या व्यवस्थेमध्ये कार्यरत आहे. तात्पर्य हे की वाऱ्यांच्या परिवर्तनामध्ये आणि त्यांच्या स्थितीमध्ये मोबदल्याच्या कायद्याच्या निशाण्या अगदी स्पष्ट आहेत. आणि त्यांच्या साक्षीचा एक पैलू हा पण आहे की जी शक्ती पाऊस आणणाऱ्या वाऱ्यांच्या साधनांनी मृतांना जिवंत करणारे वारे पण वाहवू शकते. आणि ज्याप्रकारे वारे समुद्राच्या पाण्याच्या थेंबांना वाफेच्या स्वरूपात आकाशामध्ये पसरवितात आणि मग त्या इतस्तत: पसरलेल्या वाफेला एकत्र करून पावसाच्या स्वरूपात वर्षाव करतात. त्याचप्रमाणे मृत माणसाच्या इतस्तत: पसरलेल्या अवयवांना एकत्र करून त्यांना पुन्हा जिवंत करण्याची क्रियासुद्धा शक्य आहे. आणि जेव्हा त्याची खबर स्वत: सर्वश्रेष्ठ अल्लाह देत आहे तर यामध्ये संशय कसला? वस्तुत: कियामतीचा इन्कार म्हणजे परमेश्वराच्या सामर्थ्य व ज्ञान या गुणांचा इन्कार करण्यासारखे आहे.

४. पहिला धक्का तो आहे जेव्हा जमिनीची सध्याची व्यवस्था कोलमडून पडेल. आणि सर्व माणसे मरतील. आणि दुसरा धक्का तो आहे. जेव्हा सगळे मृत जीव जिवंत होऊन जमीनीतून बाहेर येतील. त्यावेळी जमिनीचे स्वरूप व आकार बदललेला असेल आणि तिला एका नवीन व्यवस्थेसह कायम केले गेले असेल.

५. मने कियामतीच्या भयानकतेमुळे आणि उत्तरदायित्वाच्या भयाने धडकत असतील. ही स्थिती इन्कार करणाऱ्यांची व दुराचारी लोकांची असेल. राहिले सदाचारी मोमीन लोक, तर त्यांना कसल्याही प्रकारची काळजी राहणार नाही.

६. म्हणजे काय मेल्यानंतर देखील पुन्हा जिवंत केले ज़ाईल.

७. ही होती कियामतीचा इन्कार करणाऱ्यांची शंका की जेव्हा माणसाचे भौतिक अस्तित्वच राहणार नाही तर मग तो पुन्हा अस्तित्वात कसा येईल? आणि जेव्हा त्याचे अस्तित्वच कठीण आहे तर मग अंतिम निवाडयाचा दिवस आणि इनाम व शिक्षेचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यांच्या या शंकेचे निराकरण सहजपणे झाले असते जर त्यांनी शुद्ध सरळ मनाने (Un-prejudiced Mind) विश्वाच्या व्यवस्थेचा अभ्यास केला असता, ज्याचे आवाहन कुरआन करीत आहे. या अभ्यासाने त्यांना विश्वाच्या निर्मात्यासंबंधी योग्य ज्ञान प्राप्त झाले असते आणि त्यांना याची जाणीव झाली असती की जमिनीपासून आकाशापर्यंत आणि वाऱ्यांपासून पावसापर्यंत विश्वातील प्रत्येक गोष्ट कुरआनच्या निवेदनाचे समर्थन करीत आहे.

**म्हणतात. हे परत फिरणे तर मोठया नुकसानीचे होईल.ती तर एक धमकी असेल. आणि ते अचानक मैदानामध्ये येऊन उपस्थित होतील. काय तुम्हाला मूसाच्या घटनेची बातमी मिळाली? जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने त्याला तुवाच्या पवित्र दरीमध्ये पुकारले. *(अल-कुर्आन)***

१२. म्हणतात. हे परत फिरणे तर मोठया नुकसानीचे होईल. [८]

قَالُوا تِلْكَ إِذًا كَرَّةٌ خَاسِرَةٌ ﴿١٢﴾

१३. ती तर एक धमकी असेल. [९]

فَإِنَّمَا هِيَ زَجْرَةٌ وَاحِدَةٌ ﴿١٣﴾

१४. आणि ते अचानक मैदानमध्ये येऊन उपस्थित होतील. [१०]

فَإِذَا هُمْ بِالسَّاهِرَةِ ﴿١٤﴾

१५. काय तुम्हाला मूसाच्या घटनेची बातमी मिळाली? [११]

هَلْ أَتَاكَ حَدِيثُ مُوسَىٰ ﴿١٥﴾

१६. जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने त्याला तुवाच्या पवित्र दरीमध्ये पुकारले. [१२]

إِذْ نَادَاهُ رَبُّهُ بِالْوَادِ الْمُقَدَّسِ طُوًى ﴿١٦﴾

१७. फिरऔनकडे जा. तो विद्रोही झाला आहे. [१३]

اذْهَبْ إِلَىٰ فِرْعَوْنَ إِنَّهُ طَغَىٰ ﴿١٧﴾

१८. आणि त्याला विचार. काय तू इच्छितोस की शुद्धतेचा स्वीकार करावास ? [१४]

فَقُلْ هَلْ لَكَ إِلَىٰ أَنْ تَزَكَّىٰ ﴿١٨﴾

१९. आणि मी तूला तुझ्या पालनकर्त्याचा मार्ग दाखवू की तू त्याचे भय बाळगावेस. [१५]

وَأَهْدِيَكَ إِلَىٰ رَبِّكَ فَتَخْشَىٰ ﴿١٩﴾

२०. नंतर (मूसाने) त्याला मोठी निशाणी दाखविली. [१६]

فَأَرَاهُ الْآيَةَ الْكُبْرَىٰ ﴿٢٠﴾

२१. परंतु त्याने खोटे ठरविले व मानले नाही.

فَكَذَّبَ وَعَصَىٰ ﴿٢١﴾

२२. नंतर परत फिरला आणि जोराने विरोध करू लागला. [१७]

ثُمَّ أَدْبَرَ يَسْعَىٰ ﴿٢٢﴾

२३. आणि लोकांना जमा करून जाहीर केले.

فَحَشَرَ فَنَادَىٰ ﴿٢٣﴾

८. याप्रमाणे ते आखिरतची थट्टा उडवित असत की जर आम्हाला खरोखर दुसरे जीवन लाभेल ज्याची बातमी हे पैगंबर देत आहेत. तर ते जीवन आमच्यासाठी मोठे तोटयाचे राहिल कारण आम्ही त्याचा इन्कार करीत होतो आणि त्याच्यासाठी आम्ही काही तयारी केलेली नव्हती.

९. म्हणजे माणसांना पुन्हा जिवंत करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहला विशेष काही तयारी करावी लागणार नाही. तर त्याचा एक शब्द त्यासाठी पुरेसा होईल. आणि हा हुकूम धमकीच्या स्वरूपात असेल. त्याला साऱ्या जमिनीवर एकाच वेळी ध्वनिक्षेपित केला जाईल.

१०. म्हणजे याच हाडामासानिशी माणूस जमिनीवर अस्तित्वात येईल,. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास माणूस मेल्यानंतर ना जनावराचे रूप धारण करील ना दुसऱ्या एखाद्या निर्मितीचे याउलट कियामतीच्या दिवशी तो आपल्या पहिल्या स्थितीतच कबरीतून उठून बाहेर पडेल.

११. हा ऐतिहासिक पुरावा आहे की पैगंबरांना खोटे ठरविल्याने आणि विद्रोहाचा व बंडखोरीच्या मार्गाचा अंगिकार करणाऱ्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह या जगातसुद्धा शिक्षेचे फटके लगावीत आला आहे. याचे ठळक उदाहरण फिरऔन आणि त्याचे सैन्य आहे. ज्याची धूळधाण उडविली गेली. यामध्ये आचरणाच्या मोबदल्याचा कायद्याची एक झलक नजरेस पडते, जो कियामतीच्या दिवशी अंमलात येणार आहे.

१२. ''तुवा'' त्या दरीचे नाव आहे, जी सीनापर्वताच्या पायथ्याशी आहे. याला यासाठी पवित्र म्हणले गेले की अल्लाहचे तेज येथे प्रकट झाले होते. आणि हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांना पैगंबरपदाने सन्मानीत केले गेले होते.

१३. फिरऔन (Pharoah) ही इजिप्तच्या जुन्या बादशहांची पदवी आहे. आणि ज्या फिरऔनबरोबर हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांचा संबंध आला होता. तो इसवीसनापूर्वी अंदाजे चौदाशे वर्षे इजिप्तमध्ये सत्तेवर होता. फिरऔनचा द्रोह हा होता की तो स्वत:ला ईश्वराचा दास समजण्याऐवजी स्वतंत्र व अनियंत्रित समजत होता. स्वत:सर्वश्रेष्ठ ईश असल्याचा तो दावा करीत असे.आणि शासनाचे व राज्याचे सर्व काम अल्लाहचा इन्कार करून आणि त्याच्याशी द्रोह करून चालवीत असे. त्याने आपल्या उद्धटपणाच्या ज़ोरावर अल्लाहच्या सेवकांबरोबर जुलूमजबरदस्तीचे वर्तन अवलंबिले होते. आणि त्यावेळचा मुस्लिम समाज (बनी इस्राईल) वर फार अत्याचार करीत असे.

१४. शुद्धतेचा अंगीकार करण्याचा अर्थ इस्लामचा स्वीकार करणे हा आहे. इस्लाम माणसाला इन्कार व अनेकेश्वरवादाच्या मलीनतेपासून स्वच्छ करतो आणि ईमान व सदाचाराने अलंकृत करतो

१५.निष्ठा व आचरणाची शुद्धता परमेश्वराच्या भयावर अवलंबून आहे आणि परमेश्वराचे भय त्याचवेळी निर्माण होते जेव्हा माणसाला ईश्वराचे योग्य ज्ञान होते. पालनकर्त्याचा मार्ग दाखविणे याचा इशारा ईश्वराच्या ज्ञाना (ईशपरिचया) कडे आहे.

१६. मोठी निशाणीने अभिप्रेत लाठीचा साप बनण्याचा चमत्कार आहे. या चमत्काराचे सामर्थ्य परमेश्वराने हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) यांना दिले होते. आणि ही गोष्ट हज़रत मूसा (अलैहिस्सलाम) हे अल्लाहचे पैगंबर आहेत याची स्पष्ट खूण होती.

१७. या साठी की लोकांनी हजरत मूसा यांच्यावर श्रद्धा ठेवू नये आणि त्यांच्या आवाहनाचा स्वीकार करू नये.

२४. आणि म्हणाला की, मी आहे तुमचा सर्वश्रेष्ठ ईश (रब्बे आला). [१८]

فَقَالَ أَنَا رَبُّكُمُ الْأَعْلَىٰ ﴿٢٤﴾

२५. सरते शेवटी अल्लाहने त्याला आखिरतच्या व या जगाच्या शिक्षेने ग्रासले.

فَأَخَذَهُ اللَّهُ نَكَالَ الْآخِرَةِ وَالْأُولَىٰ ﴿٢٥﴾

२६. नि:संशय यामध्ये फार मोठा बोध आहे. त्या प्रत्येक माणसासाठी जो भय बाळगतो. [१९]

إِنَّ فِي ذَٰلِكَ لَعِبْرَةً لِّمَن يَخْشَىٰ ﴿٢٦﴾

२७. काय तुम्हा लोकांची निर्मिती अधिक कठीण आहे की आकाशाची ?त्यानेच त्याला बनविले. [२०]

أَأَنتُمْ أَشَدُّ خَلْقًا أَمِ السَّمَاءُ ۚ بَنَاهَا ﴿٢٧﴾

२८. त्याचे छत उंच केले [२१] व त्याला दुरूस्त आणि समतल केले. [२२]

رَفَعَ سَمْكَهَا فَسَوَّاهَا ﴿٢٨﴾

२९. त्याची रात्र आच्छादिली. आणि त्याचा दिवस प्रकट केला. [२३]

وَأَغْطَشَ لَيْلَهَا وَأَخْرَجَ ضُحَاهَا ﴿٢٩﴾

३०. त्यानंतर जीमनिला पसरविले. [२४]

وَالْأَرْضَ بَعْدَ ذَٰلِكَ دَحَاهَا ﴿٣٠﴾

३१. तीच्या मधून तिचे पाणी व चारा उत्पन्न केला.

أَخْرَجَ مِنْهَا مَاءَهَا وَمَرْعَاهَا ﴿٣١﴾

३२. आणि तिच्यावर पर्वत रोविले.

وَالْجِبَالَ أَرْسَاهَا ﴿٣٢﴾

३३. कारण त्यामुळे तुमच्या व तुमच्या जनावरांच्या जीवनाची सामुग्री उपलब्ध व्हावी. [२५]

مَتَاعًا لَّكُمْ وَلِأَنْعَامِكُمْ ﴿٣٣﴾

३४. नंतर जेव्हा तो महान कोलाहल माजेल. [२६]

فَإِذَا جَاءَتِ الطَّامَّةُ الْكُبْرَىٰ ﴿٣٤﴾

३५. ज्यादिवशी माणसाला आपल्या कर्मांची आठवण होईल. [२७]

يَوْمَ يَتَذَكَّرُ الْإِنسَانُ مَا سَعَىٰ ﴿٣٥﴾

३६. आणि जहन्नम प्रत्येक पाहणाऱ्यासाठी अनावृत (उघड) केली जाईल.

وَبُرِّزَتِ الْجَحِيمُ لِمَن يَرَىٰ ﴿٣٦﴾

१८. पुरातन काळचे राजे लोक फक्त सत्तेचेच दावेदार असता असे नव्हे. रयतेकडून स्वत:ची पूजाअर्चाही करून घेत. हेतू हा की लोकांना त्यांच्याबद्दल आपुलकी व प्रेम निर्माण व्हावे, शासन दृढ व्हावे आणि त्याने संपूर्ण ''ईशवैभवासह'' राज्य करावे. आपल्या या श्रेष्ठत्त्वाचा स्वीकार करविण्यासाठी ते आपले नाते देवीदेवतांशी व चंद्र ताऱ्यांशी जोडत असत. आणि आपण त्यांचे अवतार आहोत असा दावा करीत. फिरऔन देखील लोकांकडून आपली पूजा करून घेत असे. आणि या अर्थी तो स्वत: श्रेष्ठ ईश असल्याचा दावा करीत असे. त्याकाळी इजिप्तमध्ये मूर्तीपूजा रूढ होती आणि फिरऔनने आपल्याशिवाय इतर कोणत्याही मूर्तीच्या पूजेला कायद्याने निषिद्ध ठरविलेले नव्हते. यावरून स्पष्ट होते की त्याचा ईशत्त्वाचा आणि सर्वश्रेष्ठ स्वामी (रब्ब) असण्याचा दावा हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांच्या एकेश्वरवादाच्या आवाहनाच्या विरोधात होता. तो इतर देवतांचा जो इन्कार करीत होता तो केवळ हजरत मूसा यांना शह देण्यासाठी.

फिरऔनच्या या दाव्याचा हा अर्थ घेणे योग्य नाही की तो विश्वाचा निर्माता होण्याचा दावेदार होता. कारण असा दावा एखादा मूर्खच करू शकतो. त्याचप्रमाणे याचा हा अर्थ घेणेही योग्य होणार नाही की राजकीयदृष्टया तो स्वत:ला ईश व सर्वश्रेष्ट स्वामी (रब्ब) म्हणत होता. जर फिरऔनचा दावा केवळ राजकीय अर्थी असता तर तो लोकांना हे म्हणाला नसता.

''اِنِّیۤ اَخَافُ اَنۡ یُّبَدِّلَ دِیۡنَکُمۡ''(المؤمن:٢٦)

''मला शंका आहे की मूसा तुमचा धर्म न बदलो'' (मोमिन - २६) कारण निव्वळ राजकीय स्वामीत्त्वाचा दावा करणाऱ्या व्यक्तीला यापासून काय फायदा होणार की लोकांचा धर्म कायम राहतो अगर त्यामध्ये बदल होतो? त्याचप्रमाणे फिरऔन हजरत मूसांना असे देखील म्हणाला नसता की

اَجِئۡتَنَا لِتَلۡفِتَنَا عَمَّا وَجَدۡنَا عَلَیۡهِ اٰبَآءَنَا۔ (یونس: ٧٨)

''काय तू अशासाठी आलास की आम्हाला आमच्या वडीलार्जित धर्मापासून हटवावे?'' (युनूस - ७८)

१९. म्हणजे ज्या लोकांमध्ये ईश्वराचे काही भय आहे त्यांच्यासाठी या घटनेमध्ये मोठा धडा आहे. धडा हा की हे जग ही अंधेर नगरी नाही. तर अल्लाह आपल्या न्याय्य कायद्यासह यावर सत्ता गाजवीत आहे. फिरऔनसारख्या अत्याचारी बादशहावर देखील त्याचा अद्लीचा आसुड बसतो. म्हणून अवज्ञाकारी लोकांना या जगात जाहीरपणे जी ढिल मिळते त्यावरून हा निष्कर्ष काढणे योग्य नाही की माणसाला अल्लाहसमोर आपल्या आचरणाचा जाब द्यावयाचा नाही आणि आचरणाच्या मोबदल्याच्या कायद्याची काही हकीगत नाही.

२०. म्हणजे आकाशाची निर्मिती, ज्यामध्ये अगणित तारे, बद्धी गुंग करणारी आकाशगंगा, विशाल ग्रह आणि जबरदस्त सौर व्यवस्था वगैरेचा अंतर्भाव आहे. आणि ज्यांच्या दरम्यान कमाल दर्जाची सुव्यवस्था आढळून येते ही काही सोपी गोष्ट नाही. परंतु जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे भव्य व विशाल विश्व अगदी सहजपणे निर्माण केले तर मग माणसाला पुन्हा जिवंत करणे त्याला काय अशक्य? काय इतकी साधी गोष्टही तुम्हाला कळत नाही?

२१. आकाशाच्या उंचीची कल्पना यावरून केली जाऊ शकते की काही तारे इतक्या दूर अंतरावर आहेत की त्यांचा प्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास कितीतरी प्रकाशवर्षे लागतात.

२२. म्हणजे आकाशाचा नुसता आराखडा बनविला नाही तर तो आराखडा बनविल्यानंतर एका भव्य अशा विश्वाची रचना केली. त्यांना परस्परांशी सुसंगत केले आणि असे सजविले की वाटू लागते की आकाश एक सुरेख सजविलेली आणि उत्साहवर्धक अशी मैफल आहे जी प्रत्येक पाहणाऱ्याला चिंतन व मनन करण्याचे आवाहन देते.

२३. दिवसाचा आणि रात्रीचा आकाशाशी संबंध जोडणे या आधारे आहे की माणसाला दिवस व रात्रीच्या खाणाखुणा आकाशावरच प्रकट होताना दिसतात.

२४. याचा अर्थ हा नव्हे की प्रथम आकाशाला निर्माण केले व त्यानंतर पृथ्वीला कारण अर्थ हा आहे की आकाशाशिवाय जमिनीलाही निर्माण केले. आणि तिला पसरविले. आकाशाची वैशिष्टये आणि जमिनीची वैपुल्ये दोन्ही विचार करण्यालायक आहेत.

२५. जमिनीची ही समर्थ आणि रूबाबदार व्यवस्था एका थोर योजनेचा निर्देश करीत आहे. आणि कुरआन या योजनेचे स्पष्टीकरण करत आहे की ही व्यवस्था म्हणजे मृत्यूनंतर जीवन आणि आचरणाचे फल आहे.

२६. म्हणजे कियामत जो या विश्वाचा सर्वात मोठा कोलाहल आहे.

२७. माणूस या जगात जे काही करतो ते सर्व त्याच्या बुद्धीच्या पटलावर कोरले जाते. याच आधारावर तो आपल्या गतजीवनातील वर्षानुवर्षाच्या घटना आपल्या स्मरण शक्तीच्या साहय्याने आठवीत असतो. ही स्वत:हून या गोष्टीचा पुरावा आहे की माणसाच्या आचरणाची नोंदणी स्वत: त्या माणसाची बुद्धी तयार करीत असते. कियामतीच्या दिवशी त्याची स्मरणशक्ती इतकी तल्लख होईल की त्याच्या आचरणाच्या साऱ्या नोंदी त्याच्या स्मरणात येतील.

فَاَمَّا مَنْ طَغٰى ﴿۳۷﴾

३७. तर ज्याने द्रोह केला असेल. [२८]

وَاٰثَرَ الْحَيٰوةَ الدُّنْيَا ﴿۳۸﴾

३८. आणि या जगातील जीवनाला प्राधान्य दिले असेल. [२९]

فَاِنَّ الْجَحِيْمَ هِىَ الْمَاْوٰى ﴿۳۹﴾

३९. जहन्नमच त्याचा ठिकाणा असेल.

وَاَمَّا مَنْ خَافَ مَقَامَ رَبِّهٖ وَنَهَى النَّفْسَ عَنِ الْهَوٰى ﴿۴۰﴾

४०. अलबत, जो आपल्या पालनकर्त्याच्या समोर उभे राहण्यास भ्याला असेल [३०] आणि ज्याने आपल्या मनाला वाईट इच्छा पासून रोखले असेल.

فَاِنَّ الْجَنَّةَ هِىَ الْمَاْوٰى ﴿۴۱﴾

४१. जन्नत हे त्याचे ठिकाण असेल.

يَسْـَٔلُوْنَكَ عَنِ السَّاعَةِ اَيَّانَ مُرْسٰهَا ﴿۴۲﴾

४२. (हे पैगंबरा !) हे लोक तुम्हाला कियामतीबद्दल विचारीत आहेत की ती वेळ केव्हा येऊन ठेपेल.

فِيْمَ اَنْتَ مِنْ ذِكْرٰىهَا ﴿۴۳﴾

४३. त्याची वेळ दाखविण्याशी तुमचा काय संबंध? [३१]

اِلٰى رَبِّكَ مُنْتَهٰىهَا ﴿۴۴﴾

४४. याचे ज्ञान तर तुमच्या पालनकर्त्यालाच आहे.

اِنَّمَآ اَنْتَ مُنْذِرُ مَنْ يَّخْشٰىهَا ﴿۴۵﴾

४५. तुमचे काम तर फक्त त्या लोकांना सावध करणे हे आहे, जे तिचे भय बाळगतात.

كَاَنَّهُمْ يَوْمَ يَرَوْنَهَا لَمْ يَلْبَثُوْٓا اِلَّا عَشِيَّةً اَوْ ضُحٰىهَا ﴿۴۶﴾

४६. ज्या दिवशी ते तिला पाहतील तेव्हा त्यांना असे वाटेल की ते (जगामध्ये) एक संध्याकाळ किंवा एका सकाळी पेक्षा अधिक राहिले नव्हते. [३२]

२८. म्हणजे ईश्वराचा प्रामाणिक दास बनून राहण्याऐवजी इन्कार व द्रोहाचा मार्ग अवलंबिला असेल. वर फिरऔनच्या द्रोहाचे उदाहरण येऊन गेले आहे.

२९. म्हणजे आखिरतच्या मुकाबल्यात ऐहिक जीवनाला आपले ध्येय बनविले असेल. आणि त्याच्या फायद्याला प्राधान्य दिले असेल.

३०. म्हणजे जे या जगामध्ये या कल्पनेने कापू लागले की अल्लाहच्या दरबारी हजर होऊन आपल्या आचरणाचा जाब द्यावयाचा आहे. स्पष्ट आहे की ज्याच्या मनात जाब देण्याची जाणीव असेल, ते अल्लाहचे एकनिष्ठ दास म्हणून जीवन जगतील.

३१. म्हणजे पैगंबरांना कियामतीची वेळ दाखविण्यासाठी पाठविण्यात आलेले नाही त्यांना तर तुम्हाला सावध करण्यासाठी पाठविले आहे. माणसाला ज्याप्रमाणे मृत्यूची वेळ माहित नसली तरी तो आपल्या वेळेवर येतोच येतो. त्याचप्रमाणे कियामत ठरलेल्या वेळी प्रकट होईलच होईल.

३२. म्हणजे यावेळी ते कियामतीसाठी गोंधळ माजवीत आहे. परंतु ती जेव्हा येईल तेव्हा त्यांना वाटेल की ती फार लौकर आली. आणि त्यांना जगात जी संधी लाभली, ती फार थोडी होती. वेळ ही एक सापेक्ष गोष्ट आहे. तासांच्या मुकाबल्यात मिनिट हा वेळेचा अती लहान घटक जाणवतो याचप्रकारे दिवसांच्या मुकाबल्यात तास आणि महिने आणि वर्षांच्या मुकाबल्यात दिवस कियामतीच्या दिवशी जेव्हा स्थालकालात बद्दल होईल आणि कियामतीच्या एक दिवस एक हजार वर्षाचा होईल तेव्हा माणसाने या जगात जो काल घालविला तो तेथील कालाच्या तुलनेत फार लहान आढळून येईल. आणि त्यावेळी असे वाटू लागेल की हे मौल्यवान क्षण स्वत:ची आखिरत सफल बनविण्यासाठी खर्च झाले असते तर किती बरे झाले असते.

# सूरह अबस

# ८०. सूरह अबस

**नाव :** सूरतीची सुरवात अबस (आठया चढविल्या) ने झालेली आहे. हा शब्द एका विशिष्ट घटनेकडे इशारा करतो. याच औचित्याने या सूरतीचे नाव ''अबस'' ठेवले गेले आहे.

**अवतरण काळ :** ही सूरत मक्केमध्ये उतरली. आणि मजकूरावरून अंदाज होतो की ही सूरत त्यावेळी उतरली असेल जेव्हा इस्लामचे आवाहन मक्केच्या लोकांना केले गेले होते. आणि कुरेशच्या सरदारांनी त्याला नाकारले होते.

**मध्यवर्ती विषय:** 'इन्जार' म्हणजे मोबदल्याच्या दिवसाबद्दल माणसाला खबरदार करणे. हेतू हा की त्याने श्रद्धा व आचरणाचा योग्य मार्ग अंगिकारावा.

मागील सूरतीबरोबरचा या सूरतीचा संबंध अगदी स्पष्ट आहे. तिच्या शेवटी फर्माविले गेले होते की तुम्ही त्याच लोकांना कियामती संबंधी खबरदार करू शकता जे तिचे भय बाळगण्यास तयार असतात. या सूरतीमध्ये स्पष्ट केले गेले आहे की जे लोक कियामतीच्या इन्कार करण्याबाबतीत हटवादी आहेत - आणि ज्यांना आपल्या शेवटाबद्दल काही पर्वा नाही अशा लोकांच्या मागे लागून वेळ व्यर्थ दवडू नये.

**ग्रंथ मांडणी:** आयत नं. १ ते १० मध्ये एका विशिष्ट घटनेकडे इशारा करून पैगंबरांचे या गोष्टीकडे लक्ष वेधले गेले आहे की जे लोक मोठेपणा, गर्व व हटधर्मीपणा यामध्ये गुरफटलेले आहेत, त्यांच्या मागे लागण्याऐवजी त्या लोकांच्याकडे लक्ष पुरवावे जे सत्याच्या शोधात आहेत आणि आपली सुधारणा करू इच्छितात.

आयत नं. ११ ते १६ मध्ये पवित्र कुरआनचे श्रेष्ठत्व व त्याची महानता निवेदन केली गेली आहे. कारण हे स्पष्ट व्हावे की ज्या गोष्टीचा स्वीकार करण्याचे आवाहन अल्लाहचे पैगंबर करीत आहेत ती किती उच्च दर्जाची व महान गोष्ट आहे म्हणून जो कोणी त्याची कदर करणार नाही तो स्वत:ला फार मोठया भलाई पासून वंचित करील. या महान ग्रंथाला सादर करण्यासाठी प्रतिष्ठित पद्धतीचाच अवलंब केला पाहिजे.

आयत नं. १७ ते ३२ मध्ये कियामतीचा इन्कार करणाऱ्यांना तंबी दिली गेली आहे. आणि माणसाला पुन्हा उठविले जाण्यावर अल्लाहच्या ईशत्त्व व पालकत्त्वाच्या आधारे युक्तिवाद केला गेला आहे.

आयत नं. ३३ ते ४२ मध्ये कियामतीच्या भयानकतेचे चित्र रेखाटून सदाचरणी व दुराचारी लोकांचा वेगवेगळा शेवट निवेदन केला गेला आहे.

# ८०. सूरह अबस

سُوْرَةُ عَبَسَ

आयती - ४२

परमदयाळू व परमकृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. आठया चढविल्या [१] आणि तोंड फिरविले.

عَبَسَ وَتَوَلّٰٓى ①

२. या गोष्टीवर की त्याच्याजवळ आंधळा आला.[२]

اَنْ جَآءَهُ الْاَعْمٰى ②

३. (हे पैगंबरा) तुम्हाला काय माहित कदाचित त्याने शुद्धता अंगिकारली असती.

وَمَا يُدْرِيْكَ لَعَلَّهٗ يَزَّكّٰٓى ③

४. किंवा उपदेशावर लक्ष दिले असते आणि उपदेश त्याच्यासाठी फायदेशीर ठरला असता.

اَوْ يَذَّكَّرُ فَتَنْفَعَهُ الذِّكْرٰى ④

५. जो माणूस बेपर्वाई दाखवितो.

اَمَّا مَنِ اسْتَغْنٰى ⑤

६. त्याच्याकडे तर तुम्ही लक्ष देता.

فَاَنْتَ لَهٗ تَصَدّٰى ⑥

७. वस्तुतः त्याच्या सुधारणेचा स्वीकार न करण्याची काही जबाबदारी तुमच्यावर नाही.

وَمَا عَلَيْكَ اَلَّا يَزَّكّٰى ⑦

८. आणि जो तुमच्याकडे धावत येतो.

وَاَمَّا مَنْ جَآءَكَ يَسْعٰى ⑧

९. आणि तो अल्लाहचे भयदेखील बाळगतो.

وَهُوَ يَخْشٰى ⑨

१०. त्याच्या बरोबर तुम्ही बेपर्वाई दाखविता.[३]

فَاَنْتَ عَنْهُ تَلَهّٰى ⑩

११. कदापिही नाही.[४] हे तर एक स्मरण आहे.[५]

كَلَّآ اِنَّهَا تَذْكِرَةٌ ⑪

१२. तर ज्याची इच्छा असेल त्याने त्याचा स्वीकार करावा.

فَمَنْ شَآءَ ذَكَرَهٗ ⑫

१. पुढील मजकूरावरून स्पष्ट होते की आठया चढविण्याचे कृत्य, हजरत पैगंबरांच्याकडून घडले होते. परंतु येथे प्रत्यक्ष संबोधनाची पद्धत न अंगिकारता अप्रत्यक्ष पद्धतीचा वापर केला गेला आहे. लक्ष वेधण्याचा हा अंदाज कौशल्य पूर्ण आहे.

२. अभिप्रेत अब्दुल्लाह इब्ने उम्मे मकतूम आहेत. हे हजरत खदीजा (रजी.) यांचे आत्येभाऊ आणि पैगंबरांचे मेहूणे होते. पैगंबरांनी त्यांना सामान्य जाणून कपाळावर आठी चढविली नव्हती. कारण पैगंबर गरीब, नादार आणि दीनदुर्बल लोकांची सर्वात अधिक कदर करीत असत. त्यांचे येणे पैगंबरांना यासाठी नापसंत होते की त्यावेली त्यांच्या बैठकीत कुरेशचे मोठमोठे सरदार हजर होते. त्यांच्यासमोर पैगंबर मोठया एकाग्रेतेने इस्लामचे आवाहन सादर करीत होते. अशा वेळी अब्दुल्लाह इब्ने उम्मे मकतूम यांच्याकडे लक्ष दिल्याने कुरेशच्या सरदारांकडील एकाग्रेतेत कमी झाली असती. म्हणून पैगंबरांनी कुरेशच्या सरदारांबरोबरील संभाषण सुरू ठेवले. आणि अब्दुल्लाह इब्ने उम्मे मकतूम यांच्याकडे लक्ष दिले नाही. पैगंबरांच्याकडून ही चूक एखाद्या अनुचित भावनेने झाली नव्हती तर ती प्रचाराच्या उत्साहात झाली होती. परंतु ही एक अप्रिय गोष्ट असल्याने परमेश्वराने यावर पकड केली आहे.

३. या आयतीमध्ये ज्या घटनेकडे इशारा केला गेला आहे. ती थोडक्यात अशी आहे. पैगंबरांच्या बैठकीत अबू जहल, उम्य्या बिन खल्फ, उतबा वगैरे कुरेशचे सरदार उपस्थित होते त्यांना पैगंबर इस्लाम स्वीकाराचे आमंत्रण देत होते. त्यावेळी इब्ने उम्मे मकतूम, जे आंधळे होते आले. आपली सुधारणा व्हावी व आपल्यास उपदेश ऐकावयास मिळावा म्हणून ते आले होते. त्यांच्याकडे लक्ष देणयाऐवजी पैगंबरांनी कुरेशच्या सरदारांकडेच लक्ष दिले. ही सरदारमंडळी ईशउपदेश ऐकण्यास व त्याप्रमाणे आचरण करण्यास तयार नव्हती. ही गोष्ट पैगंबरांचे श्रेष्ठत्व आणि आमंत्रणाची प्रतिष्ठा यांचे विरूद्ध होती. आणि म्हणून या संबंधात तंबी देण्यात आली. उघडपणे तंबीचा रोख पैगंबरांच्याकडे आहे परंतु प्रत्यक्षात याचा आघात आमंत्रणाचा इन्कार करणाऱ्यावर होत आहे. आणि उद्देश हे स्पष्ट करण्याचा आहे की ज्या लोकांच्यावर सत्याचे आवाहन उघड झालेले आहे ते जाणूनबुजून हटवादी पणाने त्याच्या इन्कार करीत आहेत त्यांना त्यांच्या स्थितीवर सोडून द्या आणि आपले लक्ष अल्लाहच्या त्या दासांवर केंद्रित करा जे शिकवणीसाठी आतूर आहेत आणि जे पवित्र  कुरआनची कदर करीत आहेत आणि आपल्या जीवनात पावित्र्य यावे अशी ज्यांची इच्छा आहे. दुसरीकडे इन्कार करणाऱ्यांना तंबी दिली गेली आहे की तुमची सुधारणा करण्यसाठी पैगंबर करीत असलेल्या या अविरत प्रयत्नांनंतर देखील तुम्ही त्याकडे लक्ष देण्यास तयार नसाल तर ज्या ग्रंथाकडे तुम्हांला आवाहन केले जात आहे त्याची प्रतिष्ठा तुमच्या दुर्वर्तनाने कमी होणार नाही.तर अशा वर्तनाने तुमची स्वत:चीच प्रतिष्ठा नाहीशी होईल. हा ग्रंथ तर अत्यंत प्रतिष्ठित व उच्च दर्जाचा आहे. याची कदर न करणाऱ्यांच्या वाटयास निराशेशिवाय काही येत नाही.

४. म्हणजे अशा कदर न करणाऱ्यांच्या मागे लागण्याची काही गरज नाही.

५. अभिप्रेत कुरआन आहे.

१३. ते अशा पानांत आहे जी अत्यंत आदरणीय आहेत. [६]

فِي صُحُفٍ مُّكَرَّمَةٍ ﴿١٣﴾

१४. उच्च दर्जाचे आणि पवित्र आहेत, [७]

مَّرْفُوعَةٍ مُّطَهَّرَةٍ ﴿١٤﴾

१५. अशा लिहिणाऱ्यांच्या हातात आहेत, [८]

بِأَيْدِي سَفَرَةٍ ﴿١٥﴾

१६. जे सन्माननीय आणि निष्ठावान आहेत.[९]

كِرَامٍ بَرَرَةٍ ﴿١٦﴾

१७. नष्ट होवो माणूस ! किती कृतघ्न आहे. [१०]

قُتِلَ الْإِنسَانُ مَا أَكْفَرَهُ ﴿١٧﴾

१८. त्याला अल्लाहने कोणत्या वस्तूपासून बनविले ? [११]

مِنْ أَيِّ شَيْءٍ خَلَقَهُ ﴿١٨﴾

१९. एका थेंबापासून निर्माण केले आणि त्याचे नियोजन केले.[१२]

مِن نُّطْفَةٍ خَلَقَهُ فَقَدَّرَهُ ﴿١٩﴾

२०. मग त्यच्यासाठी मार्ग सोपा केला.[१३]

ثُمَّ السَّبِيلَ يَسَّرَهُ ﴿٢٠﴾

२१. नंतर त्याला मरण दिले [१४] आणि कबरीमध्ये दफन करविले. [१५]

ثُمَّ أَمَاتَهُ فَأَقْبَرَهُ ﴿٢١﴾

२२. मग जेव्हा तो इच्छिल तेव्हा त्याला उठवून उभा करील.[१६]

ثُمَّ إِذَا شَاءَ أَنشَرَهُ ﴿٢٢﴾

२३. कदापि नाही. त्याने या हुकूमाची अंमलबजावणी [१७] केली नाही जो अल्लाहने त्याला दिला होता.

كَلَّا لَمَّا يَقْضِ مَا أَمَرَهُ ﴿٢٣﴾

२४. माणसाने जरा आपल्या अन्नाकडे [१८] पाहावे.

فَلْيَنظُرِ الْإِنسَانُ إِلَىٰ طَعَامِهِ ﴿٢٤﴾

२५. की आम्ही भरपूर पाण्याचा वर्षाव केला.[१९]

أَنَّا صَبَبْنَا الْمَاءَ صَبًّا ﴿٢٥﴾

२६. नंतर जमिनीला चांगल्याप्रकारे फोडले.[२०]

ثُمَّ شَقَقْنَا الْأَرْضَ شَقًّا ﴿٢٦﴾

२७. मग तिच्यामध्ये अन्नधान्य उगविले.

فَأَنبَتْنَا فِيهَا حَبًّا ﴿٢٧﴾

६. येथे पवित्र कुरआनचे श्रेष्ठत्व निवेदन केले गेले आहे. उद्देश हे स्पष्ट करण्याचा आहे की जे लोक या ग्रंथाची कदर करीत नाहीत ते आपलीच प्रतिष्ठा घटवीत आहेत. नाहीपेक्षा याचे जे स्थान व श्रेष्ठत्त्व आकाशामध्ये आहे त्याचा जर या लोकांना अंदाज असता तर त्यांनी कधीही त्याच्याकडे दुर्लक्ष केले नसते.

७. पवित्र कुरआन शैतानच्या हस्तक्षेपापासून अगदी शुद्ध आहे. यामध्ये खोटयाचे मिश्रण शक्यच नाही. कारण शैतान या ग्रंथापर्यंत पोहोचूच शकत नाही. त्यांना यापासून फार दूर ठेविले गेले आहे. पवित्र कुरआन सुरवातीपासून शेवटपर्यंत शुद्ध अल्लाहचा ग्रंथ आहे आणि सर्वप्रकारच्या मिश्रणा पासून शुद्ध आहे.

८. अभिप्रेत फिरिश्ते आहेत जे पवित्र कुरआनला लिहित होते.

९. हे त्या फिरिश्त्यांचे गुण आहेत जे पवित्र कुरआनला आकाशावर लिहित होते. आणि त्याला सुरक्षितपणे हजरत मुहम्मद पैगंबर यांच्यापर्यंत पोहोचवित होते. यावरून हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की हे कुरआन ज्या फिरिश्त्या द्वारे हजरत मुहम्मद पैगंबर यांच्यापर्यंत पोहोचविले जात आहे ते इतके विवेकी, उच्च दर्जाचे आणि विश्वासपात्र आहेत की त्यांच्या कडून कसल्याही प्रकारचा अपहार होणेच शक्य नाही. आणि ते शैतानाला कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याची संधी देत नाहीत आणि म्हणून यामध्ये शंकेला थोडीसुद्धा जागा नाही. ते या ईश्वराच्या अमानतीला जशीच्या तशी पोहचवित आहेत.

१०. येथून ग्रंथाचा रोख इन्कार करणाऱ्यांच्याकडे वळत आहे.

११. म्हणजे माणसाने आपल्या हकीकतीवर विचार करावा की त्याच्या जीवनाची सुरवात पाण्याच्या एका क्षुल्लक बिंदूपासून झाली. तर मग त्याच्यामध्ये हा गर्व कोठून निर्माण होतो की तो अल्लाहसमोर आपण कोणीतरी आहोत असे समजू लागतो आणि अल्लाहने त्याला एका उत्कृष्ट निर्मितीचा दर्जा दिला आहे हे तो विसरतो?

येथे कियामतीच्या दिवशी माणसाला उठविला जाण्यावर युक्तिवाद आहे. म्हणजे ज्या शक्तीच्या चमत्काराची ही स्थिती आहे की ती पाण्याच्या एका क्षुल्लक बिंदूपासून माणसासारख्या थोर निर्मितीला उठून उभी करू शकते. तिच्यासाठी ही गोष्ट का अशक्य समजली जावी की कियामतीच्या दिवशी ती माणसाला पुन्हा उठवून उभे करील.

१२. म्हणजे प्रत्येक माणसाची निर्मिती एका योजनेनुसार झाली आहे. उदा.त्याचा चेहरामोहरा व बांधा, बौद्धिक पात्रता, कार्यक्षमता, कुवत व ताकद, जन्माचे ठिकाण व मृत्यूतची वेळ वगैरे. या ईश्वरी योजनेनुसारच माणूस आपले जीवन जगत असतो. आणि त्याविरूद्ध वागणे माणसास शक्य नाही. हा त्या गोष्टीचा पुरावा आहे की माणसाच्या निर्मितीमागे एक उद्देश आहे.

१३. अभिप्रेत जीवनाचा मार्ग आहे. ज्याचे चढउतार माणूस सहजपणे पार करतो. माणासाच्या अस्तित्वांला कायम ठेवण्यासाठी आणि त्याच्या विकासासाठी ज्या ज्या साधनांची आवश्यकता होती ती सर्व उपलब्ध करून देण्यात आली उदा. मूल स्वभाविकपणे आईची स्तन चोखते. आणि त्याच्यासाठी अन्नाचा प्रश्न सुलभ होतो. त्याचप्रमाणे श्वासोच्छवास ही एक कठीण गोष्ट आहे. परंतु माणूस मरेपर्यंत सातत्याने श्वास घेत व सोडत असतो. त्याला थोडेदेखील श्रम जाणवत नाहीत.

१४. म्हणजे मरण प्रत्येक माणसासाठी अटळ आहे. त्याबद्दल कोणासही शंका नाही. आणि जेव्हा माणसाच्या दुर्बलतेची ही स्थिती आहे की तो आपल्या मृत्यूला एक क्षणही टाळू शकत नाही. तर मग तो कोणत्या आधारावर आपल्या निर्मितीला नाकारतो?

१५. समजले की दफन करण्याची पद्धत स्वाभाविक आहे. याउलट दहन करण्याच्या पद्धतीला ना शास्त्राधार आहे ना ती ईश्वरी आज्ञेनुसार आहे. इस्लाम पाळण्यापासून कबरीपर्यंतचा धर्म आहे. आणि म्हणून त्याने जेथे जीवनाचा खरा मार्ग दाखविला आहे तेथे मरणाची योग्य पद्धत आणि मृत्यूनंतर मृतदेहाच्या व्यवस्थेची योग्य पद्धतही दाखवून दिली आहे.

१६. म्हणजे माणसाला पुन्हा जिवंत करणे हे ईश्वरी इच्छेवर अवलंबून आहे. हे कार्य त्याच्यासाठी अवघड नाही त्याचप्रमाणे त्याच्या अंमलबजावणीत कोणतीही गोष्ट आड येऊ शकत नाही.

१७. आज्ञेने अभिप्रेत ते सर्व आदेश आहेत जे सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाच्या स्वभावाशी निगडीत केले आहेत. उदा. एका ईश्वराची प्रार्थना करणे, खरे बोलणे व न्याय करणे अत्याचार न करणे वगैरे आणि ते आदेशसुद्धा जे त्याने आपल्या पैगंबरांच्या आणि ग्रंथांद्वारे उतरविले आहेत.

१८. म्हणजे जीवनोत्तर मृत्यूबद्दल पुष्कळसे पुरावे आहेत. माणूस दररोज ज्या अन्नापासून लाभ घेतो आणि त्याला सामान्य जाणतो; त्यावरच विचार केला की ते अन्न निर्माण कसे होते? परमेश्वराने जर ते निर्माण केले नसते तर माणसाला अन्न कोठून मिळाले असते? त्याच्या पालनपोषनाचे हे साहित्य आणि पालकत्त्वाची ही व्यवस्था या गोष्टीची मागणी करतो की माणसाकडून या देणग्यांबद्दल विचारणा व्हावी की त्याने आपल्या पालनकर्त्याच्या या देणग्या

लाभल्यानंतर कृतज्ञपणाचा मार्ग अवलंबिला की कृतघ्नतेचा?

१९. पावसाचा एखादा वेगळा देवता नाही. अल्लाहच आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो. त्याने माणसाला पिण्यासाठी ही पाण्याचा लाभ होतो आणि जमिनीला सुपिकही बनविले जाते. त्याने जर पावसाची व्यवस्था केली नसती तर काय माणसाला जिवंत राहणे शक्य होते?

२०. हा अल्लाह च्या सामर्थ्याचा चमत्कार आहे की तो पाऊस पाडतो आणि जमिनीला भेगा पाडून तिच्यामधून कोंब काढतो. आणि वनस्पती उगवितो. हे सर्व पाहून देखील हे लोक असे म्हणण्याचे धाडस करतात की कियामतीच्या दिवशी जमिनीला भेगा पाडून मृतांना पुन्हा जिवंत करणे त्याच्या सामर्थ्याधीन नाही.

आणि द्राक्षे व भाजीपाला,आणि जैतून व खजूर,आणि घनदाट बागा. आणि फळफळावळ व चारा तुमच्या व तुमच्या जनावरांच्या फायद्यासाठी. नंतर जेव्हा कानाला बहिरे करणारा आवाज गरजेल.*(अल-क़ुर्आन)*

२८. आणि द्राक्षे व भाजीपाला,

وَّعِنَبًا وَّقَضْبًا ﴿٢٨﴾

२९. आणि जैतून व खजूर,

وَّزَيْتُونًا وَّنَخْلًا ﴿٢٩﴾

३०. आणि घनदाट बागा.

وَّحَدَآئِقَ غُلْبًا ﴿٣٠﴾

३१. आणि फळफळावळ व चारा,

وَّفَاكِهَةً وَّاَبًّا ﴿٣١﴾

३२. तुमच्या व तुमच्या जनावरांच्या फायद्यासाठी.[२१]

مَّتَاعًا لَّكُمْ وَلِاَنْعَامِكُمْ ﴿٣٢﴾

३३. नंतर जेव्हा कानाला बहिरे करणारा आवाज गरजेल.[२२]

فَاِذَا جَآءَتِ الصَّآخَّةُ ﴿٣٣﴾

३४. त्यादिवशी माणूस आपल्या भावापासून पळेल.

يَوْمَ يَفِرُّ الْمَرْءُ مِنْ اَخِيْهِ ﴿٣٤﴾

३५. आपली आई आणि आपल्या बापापासून.

وَاُمِّهٖ وَاَبِيْهِ ﴿٣٥﴾

३६. आपली पत्नी व आपल्या संततीपासून.

وَصَاحِبَتِهٖ وَبَنِيْهِ ﴿٣٦﴾

३७. त्यादिवशी प्रत्येकाला आपापली (काळजी) लागली असेल.[२३]

لِكُلِّ امْرِئٍ مِّنْهُمْ يَوْمَئِذٍ شَاْنٌ يُّغْنِيْهِ ﴿٣٧﴾

३८. कितीतरी चेहेरे त्या दिवशी उजळलेले असतील.[२४]

وُجُوْهٌ يَّوْمَئِذٍ مُّسْفِرَةٌ ﴿٣٨﴾

३९. हसत व आंनदित.[२५]

ضَاحِكَةٌ مُّسْتَبْشِرَةٌ ﴿٣٩﴾

४०. आणि कितीतरी चेहरे त्या दिवशी धुळीने माखलेले (दुर्मुखलेले) असतील.

وَوُجُوْهٌ يَّوْمَئِذٍ عَلَيْهَا غَبَرَةٌ ﴿٤٠﴾

४१. त्यांच्यावर काळोखी पसरलेली असेल. [२६]

تَرْهَقُهَا قَتَرَةٌ ﴿٤١﴾

४२. हे असतील तेच काफिर (इन्कार करणारे) आणि दुराचारी लोक.

اُولٰٓئِكَ هُمُ الْكَفَرَةُ الْفَجَرَةُ ﴿٤٢﴾

२१. म्हणजे काय या देणग्या ज्यांचा तुम्ही रात्रंदिवस लाभ उठवित आहात, काय त्या काही जबाबदारीची कल्पना आपल्याबोरोबर घेऊन येतात की नाही? ज्या परमेश्वराने तुमच्यावर हे उपकार केलेले आहेत. काय तो तुमच्याकडून ही विचारणा करणार नाही की तुम्ही त्याचे आज्ञाधारक दास बनून राहिलात, की तुम्ही कृतघ्नतेने वागलात?

२२. अभिप्रेत कियामतीचा भयानक आवाज आहे. जेव्हा शेवटचा सूर फूंकला जाईल तेव्हा त्याच्या भयानक आवाजाने सर्वमृत झालेली माणसे उठून उभी राहतील.

२३. या गोष्टीकडे इशारा आहे की या जगात माणूस आपल्या जवळच्या नातेवाईकांसाठी सत्याचा स्वीकार करण्यापासून दूर राहतो. परंतु कियामतीच्या दिवसाची आपत्ती अशी असेल की ना तो त्यांच्या काही उपयोगी पडेल ना ते त्याच्या काही उपयोगी पडतील. प्रत्येक माणसाला आपल्या सुटकेची चिंता लागलेली असेल. आणि कोणाचे भान ठिकाणावर नसेल.

२४. हे एकनिष्ठ श्रद्धारकांचे चेहेरे असतील जे श्रद्धेच्या तेजाने उजळून निघालेले असतील.

२५. आनंद या गोष्टीचा की ते ऐहिक जीवनाच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले आणि त्यांचे श्रम फलदायी ठरले. चेहऱ्यावरील प्रफुल्लता हा त्यांच्या सदाचाराचा परिणाम. आणि जन्नतीच्या परवान्याचा लाभ झाल्यावर ते आनंदित व उत्साही होतील.

२६. हे नाकारणाऱ्यांचे (काफिरांचे) चेहेरे असतील ज्यावर नकाराची काळोखी पसरलेली असेल. आणि त्यांचा दुराचार त्यांच्या चेहऱ्यांना दु:ख व खिन्न करीत असेल.

# सूरह तकवीर

# ८१. सूरह तकवीर

**नावः** या सूरतीच्या पहिल्या आयतीमध्ये खबरदार केले गेले आहे की कियामतीच्या दिवशी सूर्याचा सारा विस्तार लपेटला जाईल. लपेटण्यासाठी ''कुव्विरत'' हा शब्द वापरला गेला आहे. याच संदर्भात या सूरतीचे नाव 'तकवीर' ठेवले गेले आहे. म्हणजे ती सूरत जिच्यामध्ये लपेटण्याचा उल्लेख आहे.

**अवतरण काळः** ही सूरत मक्केमध्ये उतरली आहे. आणि मजकूरावरून अंदाज होतो की ही सूरत मक्केतील जीवनाच्या सूरवातीच्या काळात उतरली असेल.

**मध्यवर्ती विषयः** निष्काळजी असलेल्या लोकांना निर्णयाच्या दिवसाबद्दल सावध करणे. आणि हे स्पष्ट करणे की पवित्र कुरआन व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची जी खबर देत आहेत ती सर्वप्रकारच्या शंकेपासून मुक्त आहे. मागच्या सूरतीमध्ये कियामतीच्या भयानकतेचा उल्लेख होता. या सूरतीमध्ये तिच्या भयानकतेचे असे चित्र रेखाटले गेले आहे की माणूस कियामतीला आपल्या समोर पाहू लागतो. जणू ही सूरत म्हणजे कियामतीचे जिवंत चित्रच आहे. हदीस मध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले जो माणूस कियामतीला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहू इच्छितो त्याने सूरह इनफितार आणि सूरह इनशिकाक यांचे पठण करावे.

(तफसीर इब्ने कसीर भा. ४ पा ४७४ हवाला अहमद व तिरमिजी)

**विषय मांडणीः** आयत नं. १ ते ६ मध्ये कियामतीच्या पहिल्या दुर्घटनेचे चित्र रेखाटले गेले आहे.

आणि आयत नं. ७ ते १४ मध्ये दुसऱ्या दुर्घटनेचे.

आयत नं. १५ ते २५ मध्ये पवित्र कुरआन आणि ते आणणाऱ्या पैगंबरांसंबंधी स्पष्ट केले गेले आहे की ते जे आवाहन करीत आहेत आणि लोकांना सावध करीत आहेत ते सर्व सत्यावर आधारीत आहे.

आयत नं. २६ ते २९ मध्ये नाकारणाऱ्यांना तंबी दिली गेली आहे की कुरआनच्या मार्गाला सोडणे म्हणजे सत्याच्या मार्गाला सोडणे होय. आणि म्हणून त्यांनी विचार करावा की सत्याला नाकारून ते कोणत्या खड्डयात पडू इच्छितात.

# ८१. सूरह तकवीर

سُوْرَةُ التَّكْوِيْرِ

आयती – २९

परमदयाळू व परमकृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. जेव्हा सूर्य गुंडाळला जाईल.[१]

إِذَا الشَّمْسُ كُوِّرَتْ ①

२. आणि तारे जेव्हा निस्तेज होतील. [२]

وَإِذَا النُّجُوْمُ انْكَدَرَتْ ②

३. आणि जेव्हा पर्वत चालविले जातील.[३]

وَإِذَا الْجِبَالُ سُيِّرَتْ ③

४. आणि जेव्हा दहा महिन्यांची गर्भार उंटीणी मोकळ्या सोडून दिल्या जातील.

وَإِذَا الْعِشَارُ عُطِّلَتْ ④

५. आणि जेव्हा रानटी जनावरांना एकत्र केले जाईल. [५]

وَإِذَا الْوُحُوْشُ حُشِرَتْ ⑤

६. आणि जेव्हा समुद्र भडकाविले जातील.[६]

وَإِذَا الْبِحَارُ سُجِّرَتْ ⑥

७. आणि जेव्हा लोकांना (निरनिराळया गटात) विभागले जाईल. [७]

وَإِذَا النُّفُوْسُ زُوِّجَتْ ⑦

८. आणि जेव्हा जिवंत गाडल्या गेलेल्या मुलीला विचारले जाईल.

وَإِذَا الْمَوْءٗدَةُ سُئِلَتْ ⑧

९. की ती कोणत्या गुन्ह्यापोटी मारली गेली.[८]

بِأَيِّ ذَنْۢبٍ قُتِلَتْ ⑨

१०. आणि जेव्हा कर्मनोंद वह्याया (आमालनामे) उघडल्या जातील.[९]

وَإِذَا الصُّحُفُ نُشِرَتْ ⑩

१. सूर्याला गुंडाळण्याचा अर्थ हा आहे की हा आकाश दिवा ज्याचा प्रकाश करोडो मैलांपर्यत पसरलेला आहे आणि ज्याने सारे विश्व चकमकत आहे. कियामतीचा स्फोट होताच विझून जाईल. आणि जेव्हा सूर्यच निस्तेज होईल तेव्हा हे जग ज्या भयानक आपत्तीने ग्रासले जाईल त्याची कल्पनाच करवत नाही.

सूर्य ही या जगातील सर्वात मोठी शक्ती आहे. आणि आधुनिक वैज्ञानिक शोधानुसार जमिनीचा पृष्ठभाग सूर्यापासून शक्तीचे जे प्रमाण प्राप्त करतो ते प्रत्येक चौरस मैलाला चाळीस लाख अश्वशक्ती इतके आहे. जणू सूर्य हे जमिनीसाठी विद्युत केंद्र आहे. कुरआन ही वार्ता देते की एक दिवस येईल जेव्हा सूर्य आपली ही महान शकती गमावून बसेल. आणि तो कियामतीचा दिवस असेल. ही खबर स्वत: अल्लाह देत आहे जो सूर्यासह या साऱ्या विश्वाचा निर्माता व स्वामी आहे. आणि म्हणून ही गोष्ट विश्वास ठेवण्यास पुरेशी आहे. विज्ञान ही गोष्ट मान्य करते की सरतेशेवटी सूर्य निस्तेज होणार आहे.

"And eventually, the sun will become a black dwarf, a very dense, nonluminous object of degenerate matter."

(The New Encyclopaedia Britanica Vol 17 P. 808)

एके काळी माणूस सूर्याला देवता समजून त्याची पूजा करीत असे आणि आजही आधुनिक वैज्ञानिक उलगडयानंतर सुद्धा सूर्य भकतांची वाण नाही. परंतु कुरआनचे हे निवेदन आहे की सूर्य हा ईश नाही तर परमेश्वराने निर्माण केलेल्या विश्वाचा तो एक घटक आहे आणि तो ईश्वराच्या आधीन आहे आणि जोपर्यंत अल्लाहची विश्वाचे पारडे पालटणारी आज्ञा येत नाही तोपर्यंत तो प्रकाश देत राहील. ज्यादिवशी ती आज्ञा येईल त्या दिवशी सूर्य आपले सर्व सामर्थ्य गमावून बसेल. आणि त्याच्या प्रकाशाचा पूर्णपणे अंत होईल.

२. जगाला प्रकाशित करणारा सूर्य आणि चमकणारे तारे पाहून माणूस हा विचार करू लागतो की हे जग सदाबहार आहे आणि याचे तेज कधीही न संपणारे आहे. परंतु कुरआन स्पष्टपणे माणसाला सावध करीत आहे की हा फसवा विचार आहे. प्रत्यक्षात अशी एक वेळ येणार आहे आणि ती फारच नजीक आहे, जेव्हा सर्व दिप मावळले जातील आणि हे जग अंधारमय होईल. हेतु हा की तोडफोडीच्या या कृत्याने एक नवे विश्व अस्तित्त्वांत आणले जाऊ शकेल, ज्यामध्ये आचरणाचे परिणाम उघड होतील.

३. कियामतीचा धक्का बसताच जमीन आपले आकर्षण गमावून बसेल. त्यामुळे अशी भयानक स्थिती उद्भवेल ज्याची अंधुकशी कल्पनाही माणसाला घाबरून सोडण्यास पुरेशी आहे. आणि म्हणूनच पर्वतांना उडविण्याचा उल्लेख कुरआनमध्ये अनेक ठिकाणी झाला आहे.

४. कुरआन ज्या काळात आणि परिस्थितीत उतरले तेव्हा दहा महिन्याची गर्भार उंटीण, जिच्या प्रसूतीची वेळ नजीक आली असेल, तिला सर्वात अधिक मूल्यवान समजले जात असे. आणि अरबवासियांच्या दृष्टीने ही त्यांची आवडती संपत्ती होय. या आवडत्या संपत्तीचा उल्लेख उदाहरणादाखल केला गेला आहे. यावरून हे स्पष्ट करण्याचा उद्देश आहे की, कियामतीचा स्फोट झाल्यबरोबर माणूस आपल्या अत्यंत आवडत्या संपत्तीला विसरून जाईल. दहा महिन्यांच्या गर्भार उंटीणी ज्या आज त्यच्या मालकाच्या जवळ मौल्यवान भांडवल म्हणून बाळगल्या गेल्या आहेत त्या कवडीमोल होऊन इतस्तत: भटकत असतील. त्यांची काळजी घेणारा कोणी नसेल. कारण कियामतीचा प्रारंभ होताच माणसाला कसलेही भान राहणार नाही.

गर्भार उंटीण म्हणजे त्या काळाच्या अरबांच्या जीवनातील एक अत्यंत किमती भांडवल. नेमके त्यावर बोट ठेवून ते भांडवल कवडीमोल होईल हे जाहीर केल्याने निवेदनामध्ये एक जबरदस्त सामर्थ्य निर्माण झाले आहे. या उदाहरणाने मुख्यत्त्वे हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की कियामतीचा बिगूल होताच धनदौलतीचे हे साठे, ज्याच्या प्राप्तीला माणसाने आपल्या जीवनाचे ध्येय बनविले आहे आणि या आधारावर जीवनाच्या वास्तव ध्येयाचा स्वीकार करण्यास तो तयार नाही, हे सर्व निरर्थक होतील व नाश पावतील. मग ते साठे गर्भार उंटीणीच्या स्वरूपातील असोत वा मूलवान मोटारींच्या स्वरूपात असोत. मोठमोठया कारखान्यांच्या स्वरूपात असोत वा प्रंचड व सुंदर इमारतींच्या स्वरूपात.

५. म्हणजे कियामतीचा प्रारंभ. होताच अशी भयानक स्थिती निर्माण होईल की तिचा माणसाने तर सोडूनच द्या रानटी जनावरांच्यावर देखील विलक्षण परिणाम घडून येईल आणि ती जंगलातून पळून इतर जनावरांच्या व मासांच्याबरोबर एकत्र येऊ लागतील.

६.उघडपणे ही गोष्ट चमत्कारीक भास्ते की समुद्राला आग लागेल. परंतु कियामतीची घटना हिच स्वत:हून एक अत्यंत विलक्षण घटना आहे. तिचा पहिला धक्काच सर्व विचित्र गोष्टींना नष्ट करून टाकील. कारण कियामतीचा अर्थच हा आहे की विश्वाच्या रचनेमध्ये जबरदस्त बदल होईल. आणि मग महान क्रांती घडेल. पाणी हे तर ऑक्सिजन व हैड्रोजन या वायूंचे मिश्रण आहे. आणि अल्लाहचा एक इशारा या रासायनिक मिश्रणास वेगळे करण्यास पुरेसा आहे. परिणामस्वरूप हे वायू भडकण्याचे व भडकाविण्याचे कार्य करतील. कुरआनच्या

निवेदनानुसार अंतिम निवाडयाच्या दिवसासाठी जमिनीला सपाट मैदानाचे स्वरूप दिले जाईल. यावरून स्पष्ट होते की समुद्रांना विभागले गेले असेल आणि त्यापूर्वी त्यांच्या पाण्याला भडकावून संपविले गेले असेल.

७. येथून पुढे कियामतीच्या दुसऱ्या टप्पयाचा उल्लेख सुरू होत आहे. जेव्हा सर्व मानवांना शरीरासह पुन्हा जिवंत केले जाईल.

गटामध्ये विभागणी करण्याने अभिप्रेत श्रद्धा व आचरणाच्या आधारावर लोकांची गटबंदी व पात्रतेनुसार विभागणी आहे. जगामध्ये तर श्रद्धाधारक व श्रद्धेला नाकारणारा, मुस्लिम व गुन्हेगार, सदाचारी व दुराचारी अत्याचारी व अत्याचारपीडित हे सर्व एकत्र राहतात. परंतु कियामतीचा झटका बसताच मानवी समाजाच्या सध्याच्या रुपरेषेचा चक्काचूर होईल. आणि अंतिम निवाडयाच्या मैदानावर ईमान व नीतीमत्तेच्या आधारावर लोकांचे निरनिराळे गट बनविले जातील. (तपशीलासाठी पाहा सूरे वाकिया आयत ७ ते ४४)

८. जिवंतपणी गाडण्याची पद्धत अरबांच्या काही जमातीमध्ये प्रचलित होती. याचे एक कारण दारिद्रयाचे भय आणि खाणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन आर्थिक स्थिती खराब होऊ नये हे दुसरे कारण. वंश नष्ट करणे आणि कुटुंब नियोजन करणे यासाठी रानटीपणाची जी अत्याचारी पद्धत त्यांनी अवलंबिली होती. ती मूल जन्माला येताच त्याला जिवंत गाडणे ही होती. याचे दुसरे कारण हे होते की मुलींच्या जन्माला ते आपल्यासाठी लाजिरवाणी गोष्ट समजत असत. आणि खोटी प्रतिष्ठा त्यांना या लज्जास्पद व निदर्य कृत्यास प्रवृत्त करीत असे. पवित्र कुरआनने त्यांच्या या कृत्याची गंभीर दखल घेतली आणि दाखवून दिले की कियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात हा गुन्हा करणाऱ्यांच्या विरूद्ध खटला चालविला जाईल.

जिवंतपणी गाडल्या गेलेल्या मुलीला ती कोणत्या अपराधापोटी मारली गेली, हा प्रश्न विचारणे म्हणजे ती निरपराध आहे आणि तिला मारणाऱ्याने गंभीर गुन्हा केला आहे हे स्पष्ट करणे होय.

स्पष्ट असो की कुरआनचे हे निवेदन सुधारणा घडवून आणण्याकामी इतके प्रभावी ठरले की ही अत्याचारी पद्धत कायमची बंद झाली.

९. जगामध्ये माणूस जे काही करतो मग ते चांगले असो वा वाईट आणि त्याचा संबंध श्रद्धेशी असो वा आचरणाशी, वैचारिक दृष्टिकोनाशी असो वा प्रत्यक्ष आंदोलनाशी वा चळवळीशी असो, भाषण असो वा लिखाण असो, इतकेच नव्हे तर हालचाल व स्तब्धता आणि चालढालीचेही रेकॉर्ड तयार केले जात आहे. हे रेकॉर्ड जगामध्ये गुप्त पद्धतीने अल्लाहचे फिरिश्ते तयार करीत आहेत, जे प्रत्येक व्यक्तीबरोबर असतात. या रेकॉर्डला कुरआनच्या भाषेत 'सहीफा' किंवा 'किताब' आणि उर्दू भाषेत 'नामे आमाल' (कर्मांची नोंद असणारे रजिस्टर) म्हणतात. माणसाच्या मृत्यूनंतर हे रेकॉर्ड सील करून सुरक्षित ठेवले जाते आणि कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या न्यायालयात खटल्याच्या वेळी ते उघडून प्रत्येक माणसाच्या समोर ठेवले जाईल की, त्याने ते आपल्या डोळ्यांनी पाहावे. माणसाचे साऱ्या जीवनाचे रेकॉर्ड एका कागदाच्या स्वरूपात सादर करणे ही गोष्ट कुरआनाच्या अवतरण काली सर्वसामान्य माणसासाठी आश्चर्यजनक गोष्ट होती. परंतु वैज्ञानिक प्रगतीच्या चालू जमान्यात जेव्हा ग्रंथांची (Micro Film) तयार केली जात आहेत. ही आश्चर्यजनक गोष्ट राहिलेली नाही.

**आणि जेव्हा आकाशाची चामडी (आवरण) खेचून घेतली जाईल.आणि जेव्हा जहन्नम भडकाविली जाईल.आणि जेव्हा जन्नत जवळ आणली जाईल. त्यावेळी प्रत्येकाला कळून चूकेल की तो काय घेऊन हजर झाला आहे.** ***(अल-क़ुर्आन)***

| | |
|---|---|
| ११. आणि जेव्हा आकाशाची चामडी (आवरण) खेचून घेतली जाईल.[१०] | وَإِذَا السَّمَاءُ كُشِطَتْ ﴿١١﴾ |
| १२. आणि जेव्हा जहन्नम भडकाविली जाईल. | وَإِذَا الْجَحِيمُ سُعِّرَتْ ﴿١٢﴾ |
| १३. आणि जेव्हा जन्नत जवळ आणली जाईल. [११] | وَإِذَا الْجَنَّةُ أُزْلِفَتْ ﴿١٣﴾ |
| १४. त्यावेळी प्रत्येकाला कळून चूकेल की तो काय घेऊन हजर झाला आहे. [१२] | عَلِمَتْ نَفْسٌ مَّا أَحْضَرَتْ ﴿١٤﴾ |
| १५. मग नाही,[१३] मी शपथ घेतो,[१४] मावळणाऱ्या[१५] | فَلَا أُقْسِمُ بِالْخُنَّسِ ﴿١٥﴾ |
| १६. फिरणाऱ्या [१६] आणि अदृश्य होणाऱ्या [१७] ताऱ्यांची [१८] | الْجَوَارِ الْكُنَّسِ ﴿١٦﴾ |
| १७. आणि रात्रीची जेव्हा ती निरोप घेते | وَاللَّيْلِ إِذَا عَسْعَسَ ﴿١٧﴾ |
| १८. आणि पहाटेची जेव्हा ती श्वास घेते [१९] | وَالصُّبْحِ إِذَا تَنَفَّسَ ﴿١٨﴾ |
| १९. की नि:संशय हा एक सन्माननीय संदेशवाहकांनी (आणलेली) वाणी आहे. [२०] | إِنَّهُ لَقَوْلُ رَسُولٍ كَرِيمٍ ﴿١٩﴾ |
| २०. जो सामर्थ्यवान आहे आणि सिंहासनाच्या मालकाजवळ उच्च दर्जाचा आहे.[२१] | ذِي قُوَّةٍ عِنْدَ ذِي الْعَرْشِ مَكِينٍ ﴿٢٠﴾ |
| २१. तेथे याचा हुकूम मानला जातो [२३] आणि तो विश्वासू आहे.[२४] | مُّطَاعٍ ثَمَّ أَمِينٍ ﴿٢١﴾ |
| २२. आणि तुमचा साथी वेडा नाही.[२५] | وَمَا صَاحِبُكُم بِمَجْنُونٍ ﴿٢٢﴾ |
| २३. त्यांनी या फिरिश्त्याला उघडया क्षितिजावर पाहिले आहे.[२६] | وَلَقَدْ رَآهُ بِالْأُفُقِ الْمُبِينِ ﴿٢٣﴾ |

१०. अभिप्रेत आकाशाच्यावर असलेल्या जगावरील आवरण दूर करणे आहे, आज तर आमची दृष्टी निळया आकाशापर्यंत जाऊन थांबते. परंतु कियामतीच्या दिवशी आम्ही त्या जगालाही पाहू शकू जे आकाशावर आहे. आणि त्या अदृश्य सत्यांनाही पाहू शकू जी आज आमच्या दृष्टीपासून दूर आहेत, परंतु ज्यांची खबर पवित्र कुरआन देत आहे. त्या दिवशी माणसाला ईश्वराच्या ईशत्त्वाचा आणि विश्वाच्या विस्ताराचा योग्य अंदाज होऊ शकेल. आज माणूस जगाच्या ज्या कप्प्यांत बंद आहे त्याच कप्प्याला तो सारे विश्व समजून बसला आहे. आणि यापुढील ज्या वास्तव्यांची खबर त्याला दिली जात आहे त्याचा स्वीकार करण्यास तो तयार नाही. जोपर्यंत कोंबडीचे पिल्लू अंडयाच्या कवचात बंद असते तोपर्यंत ते समजत असते की कवच हेच सारे जग आहे.

११. कियामतीच्या दिवशी स्थलकालाचे परिणाम अगदी बदललेले असतील. त्यादिवशी माणसाला समजेल की जन्नत न्यायालयाच्या मैदानापसून अगदी जवळ आहे. आणि जे लोक जन्नतीचे रहिवासी ठरतील त्यांना तेथे पोहचण्यासाठी ना प्रतिक्षा करावी लगेल ना प्रवासाच्या अडचणी सोसाव्या लागतील. तर जन्नत स्वत: सामोरी येऊन त्यांचे स्वागत करील. त्याचे तपशीलवार स्वरूप कियामतीच्या दिवशी स्पष्ट होईल. आज आम्ही आमच्या मर्यादित ज्ञानामुळे ते समजू शकत नाही.

१२. हा आहे त्या आयतींचा मध्यवर्ती विषय. अर्थ हा आहे की आपल्या सर्व भयानकतेसह कियामत जेव्हा प्रकट होईल-ज्यांचा उल्लेख वर झालेला आहे-तो दिवस अल्लाहच्या न्यायालयात हजर होण्याचा दिवस असेल. तो दिवस मोठा भयानक दिवस असेल. आणि तो समय अत्यंत कठिण असेल. त्या दिवशी माणूस आपल्या साऱ्या आयुष्याचा हिशोब घेऊन हजर होईल.

**यह घडी महशर की है तु अर्स-ऐ महशर में है**
**पेश कर ग़ाफ़िल अमल कोई अगर दफतर में है**

१३. इन्कार करणाऱ्यांच्या या विचाराचे हे खंडण आहे की हे कुरआन ज्या कियामतीची खबर देत आहे ती एका खुळ्याची बडबड किंवा शैतानी विकार आहे.

१४. या प्रकारच्या ज्या शपथा घेतल्या जातात त्यांचा अर्थ त्या गोष्टींची प्रतिष्ठा आणि थोरवी वर्णन करणे हा नसतो. त्यांना साक्ष व पुरावा म्हणून सादर केले जाते. ही अरबी भाषेची शैली आहे. ज्यामध्ये सामर्थ्यही आहे आणि सौंदर्यही. आरबी भाषा न जाणणारे लोक या शैलीशी अपरिचित असल्यामुळे पवित्र कुरआनमध्ये निरनिराळे ठिकाणी ज्या शपथा घेतल्या गेल्या आहेत त्याचे खरे प्रयोजन आणि त्यांचे इशारे व गर्भितअर्थ समजू शकत नाही.

१५. मूळात اَلْخُنَّس 'अल् खुन्नस' हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ मावळणारे तारे असा आहे. अर्थ हा आहे की ताऱ्यांच्या चकचकाटामूळे कोणी धोका खाऊ नये. ते मावळतात ही वस्तुस्थितीही दृष्टीसमोर ठेवली जावी. यावरून स्पष्ट होते की ते ईश्वरी न्यायासमोर पूर्णपणे असहाय आहेत. या पैलूकडे लक्ष वेधण्यासाठी ताऱ्यांच्या फिरत राहण्याच्या गुणधर्मापूर्वी त्यांच्या मावळण्याच्या गुणधर्माचा उल्लेख केला गेला आह.

१६. मूळात اَلْجَوَار'अल् जवार' हा शब्द वापरला गेला आहे. याने अभिप्रेत फिरत राहणारे तारे असा आहे. ताऱ्यांचे फिरत राहणे याअर्थी होऊ शकते की माणसाचा सर्वसाधारण अनुभव हाच आहे. खरोखर त्यापैकी कोणते तारे फिरतात आणि कोणते स्थिर आहेत हा प्रश्न वेगळा आणि आधुनिक विज्ञानाने तारे वातावरणात फिरत असतात हा जो शोध लावला त्याअर्थीही.

(The stars themselves are moving through space -Some at tremendous speeds-but so vast is our distance from them that their position do not appear to the naked eye to alter, even in a century.

(The Marvels & Mysteries of Science - P. 82.)

१७. मुळामध्ये اَلْكُنَّس 'अल् कुन्नस' हा शब्द वापरला गेला आहे.त्याने अभिप्रेत लपणारे आणि गायब होणारे तारे आहेत. दिवसात तारे गायब असतात. फिरत असतात नजरेपासून दूर होतात. या संदर्भात त्यांचा हा गुणधर्म निवेदन केला गेला आहे.

१८. येथे ताऱ्यांची गती आणि त्यांच्या उगवण्या व मावळण्याला या गोष्टीची साक्ष म्हणून सादर केले गेले की पवित्र कुरआन हा ईश्वरी ग्रंथ आहे, तो शैतानी विकार नाही. त्यांचे ठराविक वेळी उगवणे व मावळणे आणि त्यांचे पद्धतशीरपणे होत असलेले भ्रमण या गोष्टीकडे इशारा करते की ते ईश्वराच्या नियमाने बद्ध आहेत. आणि त्यापासून थोडेदेखील विचलीत होत नाहीत. कोटयावदी मैलाच्या वातावरणामध्ये ताऱ्यांचे अज्ञात कालापासून अधांतरी राहणे आणि आश्चर्यजनक अशा व्यवस्थेशी एकनिष्ट राहणे, हा या गोष्टीचा उघडउघड पुरावा आहे की या विश्वाची व्यवस्था ही एक कौशल्यपूर्ण व्यवस्था आहे. या व्यवस्थेमागे एका

सर्वज्ञ व जाणकार शक्तीची कौशल्यपूर्ण योजना कार्यरत आहे. कुरआन या योजनेचे स्पष्टीकरण करते. आणि विश्वाच्या निर्मात्याच्या ज्या गुणधर्मांकडे ताऱ्यांची ही व्यवस्था इशारा करीत आहे त्यांना स्पष्ट करून सादर करीत आहे. जणू पवित्र कुरआनचे प्रतिबिंब या विश्वाच्या आरशामध्ये पाहिले जाऊ शकते. आणि त्याच्या खरेपणाला विश्वाच्या खाणाखुणांच्या कसोटीवर पारखले जाऊ शकते.

ग्रह व तारे आपल्या आशर्च्यजनक स्वाभाविक परिस्थितीच्या आधारे माणसाला विचार करण्याचे आवाहन करीत असतात. परंतु माणसाच्या विचाराची दिशा ही राहीली आहे की त्यांना तो सजीव समजून त्यांची पूजाअर्चा करतो आणि त्यांच्याकडून शकून घेतो. यावरून ज्योतिषशास्त्र अस्तित्त्वांत आले आणि भविष्य सांगण्याचा धंदा सुरू झाला. अशाप्रकारे माणसाला मार्गभ्रष्ट करणारी साधने तयार होऊ लागली. किंवा माणूस त्यांची रचना व त्यांचे पृथ्वीपासूनचे अंतर वगैरे संबंधी माहितीचे ढीगच्या ढीग रचतो. या आधारे खगोलशास्त्र तयार झाले आणि विज्ञानाने पुष्कळ प्रगती केली. हे सर्व माणसाच्या माहितीत भर घालण्याइतपत फायदेशीर ठरले, परंतु यापासून माणूस आपल्या आणि विश्वाच्या अस्तित्त्वाचे खरे कारण जाणून घेण्याकामी काही मार्गदर्शन प्राप्त करू शकला नाही. पवित्र कुरआन विचाराची जी दिशा अवलंबिण्याचे आवाहन करतो ती ही आहे की ताऱ्यांच्या निरीक्षणाने त्यांच्या निर्मात्याला जाणून घ्यावे कारण हे तारे आपल्या निर्मात्याच्या महान गुणाला प्रकट करतात. ज्याप्रमाणे एक अत्यंत सुंदर चित्र पाहून चित्रकाराच्या कलेतील नैपुण्याचा अंदाजा होतो. त्याचप्रमाणे या चमकणाऱ्या ताऱ्यांची बनावट व त्यांच्या आश्चर्यजनक व्यवस्थेला पाहून विश्वाच्या निर्मात्याच्या सामर्थ्य, पालनपोषण, ज्ञान, सत्ता, न्याय, शासन या गुणधर्माची आणि अशाच प्रकारच्या इतर गुणधर्मांची प्रारंभिक माहिती माणसाला प्राप्त होते. दुसऱ्या शब्दात, तारे आपल्या निर्मात्याचा जो परिचय आपल्या मूकपणाने करून देतात तो कुरआनच्या निवेदनानुसार विश्वाच्या निर्मात्याचा जो संपूर्ण व तपशीलवार परीचय होतो त्याच्याशी अत्यंत सुसंगत आहे. आणि हा त्याच्या सत्येचा स्पष्ट असा पुरावा आहे. अत्यंत श्रेष्ठदर्जाच्या बुद्धियुक्त ग्रंथासंबंधी हे म्हणून की ते मानवी साहित्य आहे किंवा शैतानी विकारांचा परिणाम आहे किंवा तो कियामतीच्या येण्याची खबर देत आहे म्हणून त्याला ज्योतीषशास्त्र म्हणणे म्हणजे सत्यावर पडदा टाकण्याचा किती निंद्य प्रयत्न आणि किती मोठा अन्याय आहे !!!

१९. रात्रीचे गमन व पहाटेचे आगमन यांच्या वेळा याही ईशसामर्थ्याच्या आश्चर्यापैकी आहेत. त्यावेळी असे भासते की जणू रात्रीच्या आंधाराला चिरून पहाटेने जन्म घेतला आहे. आणि जेव्हा पहाटेचा मंद वारा वाहात असतो तेव्हा ही जाणीव डोलू लागते आणि वाटते की पहाट श्वास घेत आहे. येथे त्या अवस्थांना साक्षीच्या रूपाने सादर करण्याचा अर्थ हा आहे की ज्या शक्तींनी रात्र आणि दिवसाच्या येण्याजाण्याची ही आश्चर्यकारक व्यवस्था कायम केली आहे ती व्यवस्थेमधून एक अधिक आर्श्चयकारक नवीन व्यवस्थाही निर्माण करू शकते आणि त्याचे चातुर्याची निकड ही आहे की असे केले जावे आणि म्हणून पवित्र कुरआन कियामतीचे आगमन आणि एका नव्या व्यवस्थेची स्थापना यामध्ये आचरणाच्या मोबदल्याचा प्रश्न उपस्थित केला जाईल-याची जी खबर देत आहे ती बुद्धिशी विसंगत नाही. उलट ही गोष्ट सध्याच्या विश्वव्यवस्थेची एक स्वभाविक निकड आहे.

२०. ही ती गोष्ट आहे ज्याबाबतीत पवित्र कुरआन हा ईशग्रंथ आहे याबाबतीत वरील आयतींमध्ये पुरावा दिला गेला आहे. सन्माननीय संदेशवाहकने अभिप्रेत हजरत जिब्रईल (अलैहिस्सलाम) हे आहेत. ते परमेश्वराचे सन्माननीय संदेशवाहक आहेत. ते ईश्वराचा संदेश घेऊन हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर उतरतात. आणि ठीक ठीक त्याच शब्दांत तो संदेश आपल्याला पोहोचवितात.

हा ग्रंथ ईशदूतामार्फत उतरत होता, शैतानामार्फत नव्हे आणि म्हणून आयतीमध्ये याचा संबंध ईश्वराच्या दूताशी जोडला गेला आहे.

२१. वही-ग्रंथ आणणाऱ्या हजरत जिब्रईल (अलैहिस्सलाम) यांचा हा गुणधर्म आहे. त्यांना परमेश्वराने असाधारण सामर्थ्य दिले आहे. आणि म्हणून शैतान त्यांच्या कामात हस्तक्षेप करू शकत नाहीत. त्यांचे उडडाण आकाशापलीकडे आहे आणि अल्लाहचा संदेश त्याच्या पैगंबरापर्यंत सुखरूपपणे पोहोचविण्याचे कार्य ते सहजपणे करू शकतात.

२२. हा हज़रत जिब्रईल यांचा दुसरा गुणधर्म निवेदन केला गेला आहे. म्हणजे त्यांना विश्वाच्या शासकापर्यत बेधडकपणे जाता येते. आणि ते त्याच्या दरबारी अत्यंत निकटचे आणि उच्च दर्जाचे आहेत.

२३. म्हणजे जिब्रईल हे फिरिश्त्यांचे सरदार आहेत. ते त्यांच्या हुकूमाचे पालन करतात आणि म्हणून ज्यांच्या हाता खाली फिरिश्त्यांचे सैन्य आहे, आणि ज्यांच्या इशाराने ते हालचाल करतात त्यांच्या कार्यात शैतानी शक्तींनी हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२४. हज़रत जिब्रईल (अलैहिस्सलाम) यांची विश्वासपात्रता ही या गोष्टीची हमी आहे आहे की ते अल्लाहच्या ग्रंथाला जसाच्या तसा कोणत्याही प्रकारे कमीजास्त न करता पैगंबर

(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पर्यंत पोहोचवित आहेत. त्याच्याकडून त्या ग्रंथामध्ये काही कमीजास्त होण्याचा अगर फेरफार होण्याचा किंचितही संभव नाही.

पवित्र कुरआन आणणाऱ्या फिरिश्त्याचा जो परीचय येथे करून दिला गेला आहे त्याचा हेतू हा आहे की हा ग्रंथ शब्द-नू-शब्द अल्लाहचा बोल (Word of God) आहे. याला अत्यंत दक्षतेने आणि पवित्र व शुद्ध अशा साधनाने हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यापर्यंत पोहोचविला जात आहे. या मध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ शक्य नाही.

२५. साथी म्हणजे हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे आहेत आणि संबोधन मक्केच्या रहिवाशांना केले जात आहे, ज्यांच्यामध्ये त्यांनी सारे जीवन घालविले आणि एक बुद्धिमान माणूस म्हणून ते मक्केमध्ये सुपरिचित होते. अशा व्यक्तीला वेडा म्हणणे ही एक निरर्थक गोष्ट होती. परंतु कुरआनचा इन्कार करणारे लोक पैगंबरांच्या विरोधात इतके आंधळे झाले होते की अशाप्रकारच्या निरर्थक गोष्टी करण्यामध्ये त्यांना थोडा देखील संकोच वाटत नसे. आजही अशा लोकांची उणीव नाही, जे आपल्या पैगंबरीच्या दाव्याला वेडेपणा समजतात. परंतु या अक्कलवान लोकांना ही गोष्ट समजत नाही की पैगंबरांनी सादर केलेला ग्रंथ अशा बुद्धिप्रचूर गोष्टींनी भरलेला आहे, आणि त्यामध्ये इतकी पवित्र व शुद्ध शिकवण आहे की त्याच्यासारखे उदाहरण सादर करण्याबाबतीत जग विवश आहे. मग काय कोणी वेडा आजपावेतो बुद्धिप्रचूर गोष्टी सादर करू शकला आहे. किंवा कोणी वेडयाने लोकांची नीतीमत्ता सुधारली आहे?

**''ख़िरद का नाम जुनूँ रख दिया जुनूँ का खिरद''**

२६. म्हणजे ग्रंथ (वही) आणणाऱ्या फिरिश्त्याला त्याच्या खऱ्या स्वरूपात पैगंबरांनी आकाशाच्या उघडया किनाऱ्यावर पाहिले होते. आणि म्हणून यामध्ये कसल्याही संशयाला जागा नाही. हदीस मध्ये आले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जेव्हा हजरत जिब्रईल यांना त्यांच्या मूळ स्वरूपात पाहिले तेव्हा त्यांना सहाशे पंख होते. आणि त्यांच्या महान अस्तित्त्वाने जमीन व आकाश यामधील वातावरण भरलेले होते. (मुस्लिम किताबुल ईमान) यावरून त्यांच्या अफाट शक्तीचा अंदाज होतो.

२४. आणि ते अदृश्य गोष्टी सांगण्याबाबतीत कंजूष नाहीत.[२७]

وَمَا هُوَ عَلَى الْغَيْبِ بِضَنِينٍ ﴿٢٤﴾

२५. आणि हे कोणा नीच शैतानाचे वचन नव्हे. [२८]

وَمَا هُوَ بِقَوْلِ شَيْطٰنٍ رَّجِيمٍ ﴿٢٥﴾

२६. मग तुम्ही लोक कोठे जात आहात ?

فَأَيْنَ تَذْهَبُونَ ﴿٢٦﴾

२७. हे तर या जगातील लोकांच्यासाठी एक स्मरण आहे.

إِنْ هُوَ إِلَّا ذِكْرٌ لِّلْعٰلَمِينَ ﴿٢٧﴾

२८. तुमच्यापैकी त्या प्रत्येक माणसासाठी जो सरळमार्गाचा अवलंब करू इच्छील.[२९]

لِمَنْ شَآءَ مِنْكُمْ أَنْ يَّسْتَقِيمَ ﴿٢٨﴾

२९. आणि तुम्ही तोपर्यंत इच्छू शकत नाही जोपर्यंत साऱ्या विश्वाचा पालनकर्ता अल्लाह इच्छित नाही. [३०]

وَمَا تَشَآءُونَ إِلَّآ أَنْ يَّشَآءَ اللّٰهُ رَبُّ الْعٰلَمِينَ ﴿٢٩﴾

२७. म्हणजे जो ग्रंथ (वही) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर उतरविला आहे त्यामध्ये आकाशावरील वास्वतेचाही उलगडा आहे, आणि कियामतीच्या आगमनाची वार्ताही या गोष्टसंबंधी लोकांना परिचित करण्याबाबतीत पैगंबर कसलाही कंजूषपणा करीत नाहीत आणि कसलीही उणीव ठेवीत नाहीत. उलट आपले कर्तव्य चांगल्याप्रमाणे समजून ईश्वराची शिकवण जशीच्या तशी-त्यामध्ये कसलाही फेरफार न करता-लोकांपर्यंत पोहोचविण्याबाबतीत प्रयत्नशील आहेत. हेतू हा की लोकांनी सावध व्हावे आणि आपल्या पालनकर्त्याच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करावा.

जणू ईशग्रंथाचा हा क्रम आकाशापासून जमिनीपर्यंत एक सोनेरी साखळी आहे, ज्याची कोणतीही कडी ठिसूळ नाही. आणि शंकोस कसलीही जागा नाही.

२८. पवित्र कुरआनच्या अवतरण कालात भविष्य सांगण्याचा रिवाज होता. भविष्य सांगणारे (Sooth sayers)आपण दैवी गोष्टी जाणतो असा दावा करीत असत आणि शैतान, ज्यांच्याबाबतीत हा समज होता की ते अदृश्यातील बातम्या आणतात, खोटया बातम्या त्यांच्यावर पसरवित आणि त्यामध्ये अधिक खोटेपणाची भर घालून त्या गोष्टी हे भविष्य सांगणारे लोक लोकांना सांगत असत. ते भविष्य सांगण्याचा दावा करीत. त्यामुळे त्यांना लोकांपासून देणग्या व नजराणे वसूल करण्याची आणि आपला धंदा जोरात चालविण्याची संधी मिळत होती. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या तोंडून ईशग्रंथ आणि कियामतीच्या आगमनासंबंधीच्या गोष्टी ऐकून कुरआनचा इन्कार करणाऱ्या लोकांनी पैगंबरांच्यावर भविष्य सांगण्याचा आरोप लावला. ईशग्रंथासंबंधी हा समज देण्याचा ते प्रयत्न करीत की हा शैतानी विकाराचा परिणाम आहे. येथे त्यांच्या याच आरोपाचे खंडन केले गेले आहे आणि स्पष्ट आहे की शैतानाचा या पवित्र ग्रंथाशी काय संबंध?

काय एखाद्या शैतानी ग्रंथाचे हे वैशिष्टय होऊ शकते की ते माणसाचा ईश्वराशी संबंध प्रस्थापित करते, त्याच्यामध्ये अंतर्दृष्टीचे तेज निर्माण करते, त्याच्या नीतीला सुधारते, त्याच्या विचारात पवित्र्य निर्माण करते,त्याच्या चारित्र्याला उच्च करते आणि समाजामध्ये चांगल्या गोष्टींच्या वृद्धिसाठी त्याला तयार करते. जर शैतानी ग्रंथाची ही वैशिष्ये होऊ शकतात तर हे मान्य करावे लागेल की सर्वात अधिक सदगुणी आणि सुधारक शैतानच आहे. कोणी माणूस त्याला धूत्कारण्याशिवाय केव्हाही त्याचे नाव घेत नाही ! नाहीपेक्षा हे कबूल करावे लागेल की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचेवर शैतानी विकाराने प्रभावित असल्याचा आरोप लावणारे लोकच शैतानाच्या चालीची शिकार बनलेले आहेत. आणि म्हणून इतकी साधी गोष्टही त्यांना समजत नाही.

२९. म्हणजे पवित्र कुरआन जे साऱ्या मानवतेसाठी स्मरण आणि उपदेश आहेच आहे. परंतु यापापासून तेच लोक लाभ उठवू शकतात जे सरळमार्गाचा अवलंब करू इच्छितात. जो सत्याचा शोधक नाही तो या उपदेशापासून लाभ उठवू शकणार नाही.

३०. म्हणजे उपदेश संपादन करण्यासाठी आणि मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी माणसाची इच्छा ही जर पहिली अट असली तरी हे कार्य ईश्वराच्या इच्छेशिवाय होत नाही. अल्लाहची इच्छा माणसाच्या इच्छेपेक्षा श्रेष्ठ व प्रभावी आहे. आणि म्हणून माणसाने हा फुकटचा गर्व करू नये की तो जे इच्छितो ते करू शकतो.

# अल् अिन् फितार

# ८२. अल् अिन् फितार

**नावः** पहिल्याच आयतीमध्ये आकाशाच्या 'अिन् फितार' (फाटण्याची) ची खबर दिली गेली आहे. याच संदर्भात या सूरतीचे नाव 'अल् अिन् फितार' ठेवले गेले आहे.

**अवतरण काळः** सर्वानुमते ही सूरत 'मक्की' आहे. म्हणजे मक्केमध्ये उतरली आहे. आणि विषयावरून अंदाज होतो की या सूरतीचा आणि सूरे तकवीराचा अवतरण काळ जवळजवळ एकच असला पाहिजे. म्हणजे प्रेषित्वाचा सुरवातीचा काळ.

**मध्यवर्ती विषयः** या सूरतीचाही मध्यवर्ती विषय आचरणाचा मोबदला हा आहे. परंतु येथे युक्तिवाद एका दुसऱ्या पैलूने केला गेला आहे. आणि त्या व्यवस्थेबद्दल सावध केले गेले आहे, जी प्रत्येक माणसाच्या आचारिक जीवनाची नोंद करण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने तयार करून ठेवली आहे.

**ग्रंथ मांडणीः** आयत नां. १ ते ५ मध्ये कियामतीचा आराखडा रेखाटला गेला आहे. आणि दाखविले गेले आहे की जेव्हा ही भयंकर दुर्घटना प्रकट होईल. तेव्हा माणसाने जे काही केले आहे ते त्याच्यासमोर येईल.

आयत नं. ६ ते ८ मध्ये माणसाला ही जाणीव करून दिली गेली आहे की ज्या परमेश्वराने माणसाला उत्कृष्ट अशा साच्यामध्ये घडविले आहे आणि बहुमोल क्षमतेने त्याला भूषविले आहे, त्याने त्याला मन मानेल तसे आचरण करण्यास काय असेच सोडून दिलेले आहे? काय त्याच्या ईशनिष्ठेची आणि ईशद्रोहाची परीक्षा होणार नाही? आणि काय माणूस आपल्या आचरणाबाबतीत त्याच्यासमोर उत्तरदायी ठरणार नाही?

आयत नं. ९ ते १२ मध्ये त्या व्यवस्थेचा उल्लेख केला गेला आहे जी सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रत्येक व्यक्तीच्या आचरणाला लिपीबद्ध करण्यासाठी केलेली आहे.

आयत नं. १३ ते १९ मध्ये संक्षिप्तपणे सदाचारी व दुराचारी लोकांचा शेवट समोर आणला गेला आहे आणि सावध केले गेले आहे की सुनावणीच्या दिवशी कोणाच्या हाती काही नसेल. आणि सर्व अधिकार अल्लाहच्याच हाती असतील.

# ८२.सूरह अिन् फितार

سُوْرَةُ الْاِنْفِطَار

आयती - १९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. जेव्हा आकाश फाटले जाईल. [१]

إِذَا السَّمَاءُ انْفَطَرَتْ ۝١

२. आणि जेव्हा तारे विखुरले जातील. [२]

وَإِذَا الْكَوَاكِبُ انْتَثَرَتْ ۝٢

३. आणि जेव्हा समुद्र वाहाविले जातील. [३]

وَإِذَا الْبِحَارُ فُجِّرَتْ ۝٣

४. आणि जेव्हा कबरी उखडविल्या जातील. [४]

وَإِذَا الْقُبُورُ بُعْثِرَتْ ۝٤

५. त्यावेळी प्रत्येक माणसाला समजेल की त्याने आपल्या पुढे काय पाठविले आहे [५] आणि मागे काय सोडले आहे.

عَلِمَتْ نَفْسٌ مَا قَدَّمَتْ وَأَخَّرَتْ ۝٥

६. हे मानवा ! तुला कोणत्या गोष्टीने आपल्या कृपाळू पालनकर्त्याबाबतीत भ्रमांत टाकले आहे?[६]

يَا أَيُّهَا الْإِنْسَانُ مَا غَرَّكَ بِرَبِّكَ الْكَرِيمِ ۝٦

७. ज्याने तुला बनविले आणि ठीक ठीक (माणूस) बनविले आणि तुझ्या बनावटीमध्ये समतोल राखला.

الَّذِي خَلَقَكَ فَسَوَّاكَ فَعَدَلَكَ ۝٧

८. आणि ज्या चेहऱ्यामोहऱ्यात इच्छिले त्यानुसार घडविले. [७]

فِي أَيِّ صُورَةٍ مَا شَاءَ رَكَّبَكَ ۝٨

९. नाही, [८] तुम्ही मोबदल्याला व शिक्षेला खोटे ठरवित आहात. [९]

كَلَّا بَلْ تُكَذِّبُونَ بِالدِّينِ ۝٩

१. हे ऐहिक जीवन पाहून माणूस भूतकालात हा विचार करीत होता की या जगाचा क्रम सदा चालू राहील आणि यावर कधीही कोणतीही आपत्ती येणार नाही. आणि आधुनिक विज्ञानाने माणसाला हे मान्य करावयास भाग पाडले आहे की सूर्याची शक्तीदेखील नष्ट होऊ शकते आणि हे विश्व महान आपत्तीस बळी पडू शकते. अलबत, वैज्ञानिकांच्या अंदाजानुसार ही परिस्थिती अब्जो वर्षानंतर निर्माण होईल.

परंतु पवित्र कुरआन, जो ईशग्रंथ आहे, फक्त शक्यतेची गोष्ट करीत नाही तर ठामपणे व सुस्पष्ट अशा शब्दात ही खबर देतो की लवकरच हे विश्व एका महान आपत्तीला बळी पडेल. जमीन तर सोडून द्या आकाशाची व्यवस्था देखील कोलमडून पडेल आणि एक नवे जग एका नवीन व्यवस्थेसह निर्माण केले जाईल. स्पष्ट आहे की, नव्या उभारणीसाठी जुनी उभारणी नष्ट होणे आवश्यक आहे. आणि म्हणून नव्या जगाच्या उभारणीसाठी या जगाची धूळधाण होणे ही आश्चर्यजनक गोष्ट नव्हे.

कियामतीच्या दिवशी आकाश व जमीन अस्ताव्यस्त होण्याचा उल्लेख बायबल मध्येही आहे.

''त्या दिवशी आकाश मोठा नाद करीत नाहीसे होईल. सृष्टीतत्त्वे तप्त होून लयास जातील आणि पृथ्वी व तिच्या वरील गोष्टी भस्म होतील. (पेत्राचे दुसरे पत्र ३-९०)

हा या गोष्टीचा पुरावा आहे की कुरआन ज्या भयानक आपत्तीची खबर देत आहे ते पवित्र कुरआन सर्वप्रथम देत असलेली नवी खबर नव्हे. उलट मानवजातीला ईशग्रंथाच्याद्वारे नेहमी सावध करण्यांत आलेले आहे. अलबत, पवित्र कुरआन जितक्या परिणामकारकपणे आणि जितक्या तपशीलाने कियामतीचे चित्र रेखाटते, त्याचे उदाहरण फेरफार करण्यात आलेल्या ईशग्रंथापैकी कोणत्याही ग्रंथात मिळणे कठीण आहे. आणि ही वस्तुस्थिती आहे की पवित्र कुरआनच्या या निवेदनाने कियामतीबद्दल जबरदस्त विश्वास निर्माण होतो. आणि मनाला व बुद्धिला असा धक्का बसतो की माणसाच्या मनाला व बुद्धिला असा धक्का बसतो की माणसाच्या या जगाबद्दलच्या दृष्टीकोनात महान बदल घडून येतो.

२. तारे हे जगाच्या मैफलीचे सौंदर्य आहे. परंतु जेव्हा ही मैफलच समाप्त केली जाईल तेव्हा हे दिवे चालू ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ज्या गुरूत्वाकर्षणाने त्यांना वातावरणात संघटित करून टेवलेले आहे त्यामध्ये थोडासा अडथळादेखील त्यांना विघटीत करण्यांस पुरेसा आहे. तारे तुटण्याचा उल्लेख इंजीलमध्येही उपलब्ध आहे. ''सूर्य अंधारमय होईल आणि चंद्र आपला प्रकाश देणार नाही. आणि तारे आकाशामधून खाली पडतील आणि आकाशाच्या शक्तीचा ऱ्हास केला जाईल.'' (मत्तय २४-२९)

३. म्हणजे समुद्र खवळेल आणि आपल्या मर्यादा तोडून वाहू लागेल. आणि त्याबरोबरच- ''सूरह तक्वीर'' मध्ये निवेदन केल्याप्रमाणे-भडकेल.

४. कबरी उखडल्या जातील याचा अर्थ हा की कियामतीचा दुसरा सूर फुंकता क्षणीच जमिनीमधून प्रेते अशाप्रकारे बाहेर पडतील की जणू कबरी उखडून प्रेतांना बाहेर काढले गेले आहे. कियामतीपर्यंत जितकी माणसे जन्मली आणि मेली त्या सर्वांना जमिन ओकून टाकील. मग कोणी जमिनीमध्ये दफन केला गेलेला असो किंवा समुद्रात बुडाला असो किंवा एखाद्याचे प्रेत जाळलेले असो किंवा अंतरिक्षा मध्ये कोणाचे अवशेष विखुरलेले असोत.

५. पुढे पाठविण्याने (''मा कद्दमत'' مَاقَدَّمَتْ) अभिप्रेत माणसाचे चांगले व वाईट आचरण आहे जे त्याने मरणोत्तर जीवनासाठी केलेले असेल. जणू माणूस आपल्या आचरणाचा दस्ताऐवज नव्या जगाकडे पाठवित असतो जेथे कियामतीच्या दिवशी तो पोहोचणार आहे. कोणी जन्नतीची बहार लुटण्यासाठी सदाबहार फुलांचे गुच्छ पाठवीत असतो तर कोणी त्याला जाळण्यासाठी इंधन म्हणून ज्वालाग्रही पदार्थाचे पार्सल पाठवित असतो.

मागे सोडण्याने (''मा अख्खरत'' مَااَخَّرَتْ ) अभिप्रेत संयम व सदाचाराचे ते आचरण आहे जे माणसाने करावयास हवे होते परंत त्याने ते केले नाही. याप्रकारे कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाला त्याच्या हातून घडलेल्या कृत्याबद्दल व त्याने दाखविलेल्या हलगर्जीपणाबद्दल (Commission & Omission) कळून येईल.

६. येथे परमेश्वराच्या कृपाळूपणाचा हवाला देण्याचा उद्देश परमेश्वर उपकारकर्ता आहे-याची जाणीव करून देणे हा आहे- त्यामुळे मणसामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होऊ शकते. परमेश्वर उपकारकर्ता व मेहेरबान आहे याची निकड ही आहे की माणसाने त्याच्याकडे ओढ घ्यावी, त्याच्याशी कृतज्ञ असावे आणि त्याचा एकनिष्ठ दास म्हणून राहावे. परंतु माणूस बेपर्वाई दाखवितो आणि परमेश्वरासमोर आपण उत्तरदायी आहोत याचा स्वीकार करण्यास तो तयार नसतो. हा उघडउघड भ्रम आहे ज्यामध्ये माणूस गुरफटलेला असतो. परंतु या भ्रमात राहण्याचे योग्य असे काही कारण नाही. उलट हे निव्वळ मनोविकारांच्या अधीन होणे होय. त्यामुळे माणूस आपल्या महेरबान पालनकर्त्याशी द्रोह करण्यास तयार होतो.

७. माणूस ही जगातील अत्यंत वैशिष्टय पूर्ण अशी निर्मिती आहे.आणि त्याच्या निर्मितीत निर्मात्याचे कौशल्य पूर्णपणे दृग्गोचर होते.माणसाचा प्रथम लगदा तयार होतो, त्यानंतर त्याला ठीकठाक केले जाते व त्याला योग्य अशी अवयवे व स्वरूप दिले जाते नंतर त्याच्या शक्तीमध्ये असा समतोल राखला जातो की त्याचे

अस्तित्त्व म्हणजे माणूस हा जगातील सर्वात अधिक समतोल असणारा प्राणी आहे याचा पुरावा आहे. आणखीन विशेष म्हणजे मानव जातीचा प्रत्येक घटक दुसऱ्याहून भिन्न आहे- चेहरामोहरा व बांधा यांच्या दृष्टीकोनातून प्रत्येक मानव भिन्न असतो. जगामध्ये अब्जो लोक जन्मास येतात, परंतु प्रत्येकाची गडण एकसारखी नसते. प्रत्येकाची घडण वेगवेगळी असते. माणसाचे व्यक्तीत्त्व व वैशिष्ठय कायम राहावे म्हणून प्रत्येकाची घडण वेगवेगळी केली जाते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास माणसाची घडण, चेहरामोहरा व बांधा यांच्या अवलोकनाने त्याच्या निर्मात्याच्या सामर्थ्याचा आणि त्याच्या आशचर्यजनक कौशल्याचा अंदाज होतो. आणि ही जाणीवही निर्माण होते की माणसाच्या बाबतीत तो किती श्रेष्ठ उपकारकर्ता आहे. त्याने माणसाला अत्युत्तम निर्मिती बनवून उभे केले.

८. म्हणजे तुमचा हा समज बरोबर नाही की हे जग असेच चालत राहील. ना कियामत होईल ना परमेश्वरासमोर तुम्हाला हजर केले जाईल.

९. म्हणजे कियामतीच्या आगमनाची जी खबर कुरआन देत आहे ती खोटी आहे असे समजण्याचे मूळ कारण हे आहे की तुम्ही इनाम व शिक्षेच्या सत्याचा स्वीकार करू इच्छित नाही. कारण त्याचा स्वीकार केल्यानंतर माणसाला मनोविकारांचे संयम करून एक जबाबदारीचे जीवन जगावे लागेल.

आजही माणसाने इनाम व शिक्षेच्या धार्मिक कल्पनेपासून वाचण्यासाठी विश्वाचे असे शास्त्रीय स्पष्टीकरण केले आहे की माणसाचे लक्ष ना परमेश्वराकडे वेधले जाते ना कियामतीकडे.

यद्यापि तुमच्यावर पहारेकरी नियुक्त आहेत.सन्माननीय लेखनिक.जे तुमच्या प्रत्येक कृत्याला जाणतात. निःसंशय सदाचारी लोक ऐषारामात राहतील. आणि दुराचारी जहन्नममध्ये ते तेथे निर्णयाच्या दिवशी दाखल होतील.*(अल-कुर्आन)*

१०. यद्यापि तुमच्यावर पहारेकरी नियुक्त आहेत.[१०]

وَإِنَّ عَلَيْكُمْ لَحَافِظِينَ ﴿١٠﴾

११. सन्माननीय लेखनिक.[११]

كِرَامًا كَاتِبِينَ ﴿١١﴾

१२. जे तुमच्या प्रत्येक कृत्याला जाणतात.[१२]

يَعْلَمُونَ مَا تَفْعَلُونَ ﴿١٢﴾

१३. निःसंशय सदाचारी [१३] लोक ऐषारामात राहतील.

إِنَّ الْأَبْرَارَ لَفِي نَعِيمٍ ﴿١٣﴾

१४. आणि दुराचारी जहन्नममध्ये. [१४]

وَإِنَّ الْفُجَّارَ لَفِي جَحِيمٍ ﴿١٤﴾

१५. ते तेथे निर्णयाच्या दिवशी दाखल होतील.

يَصْلَوْنَهَا يَوْمَ الدِّينِ ﴿١٥﴾

१६. आणि तेथून ते गायब होऊ शकणार नाहीत.[१५]

وَمَا هُمْ عَنْهَا بِغَائِبِينَ ﴿١٦﴾

१७. आणि तुम्हाला काय माहित निर्णयाचा दिवस काय आहे ?

وَمَا أَدْرَاكَ مَا يَوْمُ الدِّينِ ﴿١٧﴾

१८. मग (ऐका) तुम्हाला काय खबर की निर्णयाचा दिवस काय आहे ?[१६]

ثُمَّ مَا أَدْرَاكَ مَا يَوْمُ الدِّينِ ﴿١٨﴾

१९. तो दिवस जेव्हा कोणीही कोणासाठी काहीही करू शकणार नाही. आणि सर्व व्यवहार फक्त अल्लाहच्याच अधिकारात असतील.[१७]

يَوْمَ لَا تَمْلِكُ نَفْسٌ لِنَفْسٍ
شَيْئًا ۖ وَالْأَمْرُ يَوْمَئِذٍ لِلَّهِ ﴿١٩﴾

१०. म्हणजे तुम्ही इनाम व शिक्षेला (मोबदला) खोटे ठरवू इच्छित असाल तर खोटे ठरवा. परंतु त्याने वस्तुस्थिती बदलत नाही. वस्तुस्थिती ही आहे की इनाम व शिक्षेचा प्रश्न अवश्य उपस्थित होणार आहे आणि यासाठी अल्लाहने ही व्यवस्था केली आहे की तुमच्या आचरणाची नोंद ठेवावी.

पहारेकरीने अभिप्रेत ते फिरिश्ते आहेत जे माणसाच्या उक्ती व कृतीची नोंद ठेवण्यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहकडून नियुक्त केले गेले आहेत. प्रत्येक माणसाबरोबर नेहमी दोन फिरिश्ते असतात. एक उजव्या बाजूस व दुसरा डाव्या बाजूस.

११. अभिप्रेत उक्ती व कृतीची नोंद ठेवणारे फिरिश्ते आहेत. त्यांचा गुणविशेष 'किरामन' (सन्माननीय, प्रतिष्ठित) निवेदन केला गेला आहे. यावरून हे स्पष्ट करण्याचा उद्देश्य आहे की ते अत्यंत जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडतात. त्यांच्याबाबतीत ना ही शक्यता आहे की कोणी सदाचार केला आणि त्यानी तो लिहिला नाही आणि ना ही शंका होऊ शकते की एकाचा दुराचार दुसऱ्याच्या हिशोबात लिहिला जाईल. हे गुप्तपणे पण प्रेतिष्ठितपणे आणि अत्यंत प्रामाणिकपणे आपले कर्तत्व पार पाडीत असतात. म्हणून त्यांची इहलोकातील देशामधील सी. आय. डी. खात्यावरून कल्पना करणे योग्य होणार नाही. या जगातील सी. आय. डी. खात्याच्या ज्ञानाचे क्षेत्र मर्यादित असते. आणि जे आपल्या अपुऱ्या माहितीचा पुरावा म्हणून उलटसुलट रिपोर्ट देत असतात. अलबत, हे सत्य आहे की या गुप्त पोलिसावर देखील अल्लाहचे ''गुप्त पोलीस'' नियुक्त आहेत. जे त्यांच्या साऱ्या हालचालींची नोंद ठेवित आहेत.

फिरिश्त्यांच्या लिहिण्याचे स्वरूप तर अल्लाहच जाणतो. अलबत, आजच्या शास्त्रीय व तांत्रिक काळात हे समजणे आमच्यासाठी कठीण राहिलेले नाही की माणसाच्या सर्व हालचाली व हरकतींना आणि त्याच्या तोंडातून निघालेल्या एकेक शब्दाला सुरक्षित केले जाऊ शकते. फिल्म, रेडिओ, फोटो, टेलिव्हिजन, टेपरेकॉर्डींग ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. आणि आता तर हे ही शक्य झाले आहे की जीमनीवर बसून आम्ही लाखो व करोडो मैल दूर असलेल्या चंद्र मंगळ आणि शनी सारखे ग्रह यांची छायाचित्रे मागवू शकतो. वस्तुत: आजच्या विज्ञानाने दोन महत्त्वाच्या नैसर्गिक कायद्यांचा शोध लावला आहे, ज्यामध्ये समजदार माणसासाठी मार्गदर्शन उपलब्ध आहे. एक हे की आमचे छायाचित्र वातावरणात प्रत्येक क्षणाला बनत असते. याच छायाचित्राला सुरक्षित करण्याचे तंत्र विज्ञानाने अवलंबीले आहे. त्याच प्रमाणे आमच्या आवाजाने हवेमध्ये लहरी निर्माण होतात. या लहरींना कॅसेटवर सुरक्षित करून याच आवाजाला नंतर ऐकले जाऊ शकते. हे सर्वकाही जेव्हा माणसासाठी शक्य झाले आहे आणि शक्यही असे की यावरच आजच्या संस्कृतीची इमारत उभी आहे महणून माणसासाठी हे समजणे काही अवघड नाही की ज्या परमेश्वराने निसर्गाचे कायदेकानून बनविले आहेत त्याने या गोष्टीचीही व्यवस्था केली आहे की प्रत्येक व्यक्तीच्या साऱ्या जीवनाचे चित्रीकरण केले जावे आणि कियामतीच्या दिवशी आमचा बोलका चित्रपट आमच्यासमोर प्रदर्शित करावा. त्या वेळी आपला बोलका चित्रपट पाहून माणसाचे भान ठिकाणावर राहणार नाही. माणसाने आजही याच्यावर विश्वास ठेवला की त्याच्या साऱ्या जीवनाचे चित्रीकरण होत आहे आणि त्याचा बोलका चित्रपट त्याला दाखविला जाणार आहे तर माणूस आपल्या आचरणात मोठा सावध राहील आणि तो जबाबदारीने वागेल. आणि कधीही असले काम करण्यास अगर अशी गोष्ट करण्यास तयार होणार नाही जी उद्या आखिरतच्या टेलिव्हिजनवर पाहणे व ऐकणे तो पसंत करीत नाही.

१२. येथे आचरणाचा उल्लेख आहे आणि सूरह ''काफ'' मध्ये स्पष्टीकरण आहे की जो शब्दही माणूस आपल्या तोंडातून काढतो त्याची नोंद करण्यासाठी एक फिरिश्ता उपलब्ध असतो आणि हा खुलासाही आहे की हे फिरिश्ते दोन असतात. जे उजवीकडे व डावीकडे बसून देखरेख करीत असतात.

اِذْ يَتَلَقَّى الْمُتَلَقِّيٰنِ عَنِ الْيَمِيْنِ وَعَنِ الشِّمَالِ قَعِيْدٌ۔
مَا يَلْفِظُ مِنْ قَوْلٍ اِلَّا لَدَيْهِ رَقِيْبٌ عَتِيْدٌ۔ (ق١٧-١٨)

''जेव्हा दोन नोंद करणारे उजव्या व डाव्या बाजूस बसून नोंद (रेकॉर्ड) करीत असतात.तो एखादा शब्द ही उच्चारत नाही, परंतु त्याच्या जवळ एक तत्पर निरीक्षक हजर असतो.''(सूरह क़ाफ़ १७,१८)

१३. सूरतीचा मजकूर या गोष्टीवर युक्तिवाद करतो की सदाचारी ते लोक आहेत ज्यांचा मूलभूत गुणविशेष कृपाळू अशा पालनकर्त्यासमोर उत्तरदायित्त्वाची जाणीव हा आहे.

१४. जे लोक कृपाळू पालनकर्त्यासमोर उत्तरदायित्त्व मान्य करीत नाहीत आणि आखिरतच्या इनाम व शिक्षेला खोटे समजतात ते कुरआनच्या परिभाषेत ''फाजीर'' (दुराचारी) आहेत. कारण जेथे परमेश्वरासमोर हजर होण्याची कल्पना नसेल तेथे सारे जीवन चूकीचे होऊन राहील.

१५. म्हणजे जे जहन्नम मध्ये अवश्य दाखल होतील आणि दाखल झाल्यानंतर त्यामधून पळून जाण्याची काही

शक्यता नाही. ते कायमपणे तिच्यामध्येच पडून राहतील.

१६. प्रश्नाची यासाठी पुनरूक्ती केली गेली आहे की मोबदल्याच्या दिवसाचे महत्त्व स्पष्ट व्हावे आणि परमेश्वराच्या न्यायासनासमोर हजर होण्याच्या कल्पनेने माणसाचा थरकाप व्हावा.

१७. म्हणजे जगामध्ये माणूस जो अधिकारसंपन्न नजरेस पडतो, कियामतीच्या दिवशी अगदी अधिकारशून्य होईल. मग तो जगामध्ये राजशासक राहिलेला असो किंवा भिकारी. त्यादिवशी माणसाच्या विवशतेची स्थिती ही असेल की तो स्वत:साठीदेखील काही करू शकणार नाही. मग दुसऱ्यासाठी काही करण्याचा प्रश्नच उद्धभवत नाही. अधिकार सत्ता सर्वकाही अल्लाहच्याच हाती राहील आणि प्रश्नांचा निवाडा अल्लाह स्वत: करील.

ही आहे परमेश्वराच्या न्यायासमोर हजर होण्याची कलप्ना जी कुरआन सादर करतो आणि आखिरतच्या निष्ठेचा हा एक अवश्यमेव भाग आहे. याउलट पुनर्जन्माची कल्पना हा एक फेरा आहे. यामध्ये प्रमेश्वराच्या न्यायासनासमोर हजर होण्याचा प्रसंग कधी येतच नाही. यावरून इस्लामची आखिरतवरील निष्ठा आणि अनेकेश्वरवाद्यांची पुनर्जन्मावरील निष्ठा यामधील मूलभूत फरक चांगल्याप्रकारे समजला जाऊ शकतो.

# ८३. सूरह अल् मुतफ्फिफीन

**नाव :** सूरतीच्या सुरवातीसच 'मुतफ्फिफीन' (वजन मापा मध्ये कमी करणाऱ्यां) ना शिक्षेची भिती ऐकविली गेली आहे. यावरून या सूरतीचे नांव 'मुतफ्फिफीन' हे आहे.

**अवतरण काळ**:ही सूरत मक्की आहे. म्हणजे ती मक्केमध्ये उतरली. आणि मजकूरावरून अंदाज होतो की ही सूरह जेव्हा उतरली तेव्हा कुरआनचे आवाहन मक्केच्या रहीवाश्यांना केले गेले होते. पण ते निर्णयाच्या दिवसाचा इन्कार करीत होते. आणि ईमानधारकांची थट्टा करीत होते.

**मध्यवर्ती विषय:** विश्वाच्या पालनकर्त्या समोरील हजेरी आणि आचरणाचा मोबदला हा आहे. याची जाणीव करून देण्यासाठी व्यवहारातील या बिघाडाची पकड केली गेली आहे ज्यामध्ये सर्व साधारणपणे आखिरतच्या जाबाची जाणीव न ठेवणारे लोक गुंतलेले असतात.

**ग्रंथ मांडणी :** सूरह ''इनफितार'' शी या सूरतीचा संबंध अगदी स्पष्ट आहे. तेथे खबरदार केले गेले होते की आचरणाला लिपिबद्ध करण्यासाठी फिरिश्ते नियुक्त केले गेले आहेत. या सूरतीमध्ये या वस्तुस्थितीला स्पष्ट केले गेले आहे की माणसाच्या आचरिक जीवनाचे रेकॉर्ड त्याच्या मरणानंतर ''आलमे बर्जख'' मध्ये सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था सर्वश्रेष्ठ अल्लाहने केली आहे.

आयत नं. १ ते ६ मध्ये व्यवहारामधील अप्रामणिकपणा आणि धोकेबाजी निर्देश करून परमेश्वरासमोर जाब देण्याबद्दची जाणीव करून दिली गेली आहे.

आयत नं. ७ ते १७ या वस्तुस्थितीचा परिचय करून दिला गेला आहे की दुराचारी लोकांची 'कर्मनोंद वही' (आमालनामा) त्यांच्या मरणानंतर ''आलमे बर्जख'' मध्ये एका विशिष्ट दफ्तरामध्ये जे गुन्हेगारांसाठी स्वतंत्र ठेवले गेले आहे-सुरक्षित ठेविली जात. आणि कियामतीच्या दिवशी या रेकॉर्डच्या आधारावर निवाडा केला जाईल. आणि त्यादिवशी त्यांचा शेवट अत्यंत दु:खपूर्ण होईल.

आयत नं. १८ ते २८ मध्ये सदाचारी लोकांना ही खूषखबर दिली गेली आहे की त्यांची कर्मनोंद वही त्यांच्या मरणानंतर ''आलमे बर्जख'' मध्ये उच्च प्रतीच्या दफ्तरामध्ये- जे खास सदाचारी लोकांच्यासाठी आहे-सुरक्षित ठेवली जाईल आणि कियामतीच्या दिवशी या रेकॉर्डच्या आधारावर निवाडा केला जाईल आणि त्यादिवशी ते सफल होतील.

आयत नं. २९ ते ३६ मध्ये ईमानधारकांना हे समाधान दिले गेले आहे की इन्कार करणाऱ्यांच्या टोमण्याने व उपहासाने त्यांनी दु:खी होऊ नये. आज ते तुम्हाला हसत आहेत पण उद्या तुम्ही त्यांना हसाल.

# ८३. सूरह मुतफ्फिफीन

سُورَةُ الْمُطَفِّفِينَ

आयती - ३६

परम दयाळू व परमकृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. नाश आहे वजनमापामध्ये कमी करणाऱ्यांसाठी,

وَيْلٌ لِّلْمُطَفِّفِيْنَ ﴿١﴾

२. जे लोकांकडून मोजून घेतात तेव्हा पुरेपुरे घेतात.

الَّذِيْنَ إِذَا اكْتَالُوْا عَلَى النَّاسِ يَسْتَوْفُوْنَ ﴿٢﴾

३. आणि जेव्हा त्यांना मोजून वा वजन करून देतात तेव्हा कमी करून देतात.

وَإِذَا كَالُوْهُمْ أَوْ وَّزَنُوْهُمْ يُخْسِرُوْنَ ﴿٣﴾

४. काय, हे लोक समजत नाहीत की त्यांना उठविले जाईल ?[1]

أَلَا يَظُنُّ أُولٰٓئِكَ أَنَّهُمْ مَّبْعُوْثُوْنَ ﴿٤﴾

५. एका मोठया दिवशी [2]

لِيَوْمٍ عَظِيْمٍ ﴿٥﴾

६. ज्या दिवशी सर्व लोक विश्वांच्या पालनकर्त्या समोर उभे असतील.[3]

يَّوْمَ يَقُوْمُ النَّاسُ لِرَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٦﴾

७. (त्यांचा समज खरा) नाही.[4] खात्री बाळगा दुराचारी लोकांची कर्मनोंद वही ''सिज्जीन'' मध्ये असेल.

كَلَّآ إِنَّ كِتٰبَ الْفُجَّارِ لَفِيْ سِجِّيْنٍ ﴿٧﴾

८. आणि तुम्हाला काय माहित ''सिज्जीन'' काय आहे ?

وَمَآ أَدْرٰىكَ مَا سِجِّيْنٌ ﴿٨﴾

९. ते एक रेकॉर्ड ऑफिस आहे.[5]

كِتٰبٌ مَّرْقُوْمٌ ﴿٩﴾

१०. नाश आहे त्या दिवशी इन्कार करणाऱ्यासाठी.

وَيْلٌ يَّوْمَئِذٍ لِّلْمُكَذِّبِيْنَ ﴿١٠﴾

११. जे निर्णयाच्या दिवसाचा इन्कार करतात.

الَّذِيْنَ يُكَذِّبُوْنَ بِيَوْمِ الدِّيْنِ ﴿١١﴾

१. या सूरवातीच्या आयतींमध्ये वजनमापामध्ये कमी करणाऱ्यांची गंभीर दखल घेतली गेली आहे. वजनामध्ये कमी करणाऱ्या आणि मापामध्ये कमी देणाऱ्यांना जरी ही दटावणी असली तरी याच्या अर्थामध्ये देवीघेवीच्या व्यवहारामधील प्रत्येक प्रकारचा अप्रामाणिकपणा आणि धोकेबाजीदेखील सामील आहे उदा. वस्तुमध्ये भेसळ (Adulteration) करण्याचाही यामध्ये समावेश होतो. कारण भेसळीच्या प्रकारात मुख्य वस्तुचे प्रमाण कमी केले जाते. दूधा मध्ये पाणी मिसळव्याचा अर्थ हा की, शुद्ध दूधाचे प्रमाण कमी करणे. आणि कमी करण्याची ही क्रिया गिऱ्हाई कापासून लपवून केली जाते म्हणून ही धोकेबाजीही आहे आणि कृपणताही.

या बिघाडाचे मूळ कारण पवित्र कुरआनने हे सांगितले आहे की अशाप्रकारच्या लोकांना परमेश्वरासमोर हजर होण्याच्या वस्तुस्थितीची काही जाणीव नसते. यद्यपि, त्यांची बुद्धि या गोष्टीची साक्ष देत असते की ते आपल्या पालनकर्त्या समोर उत्तरदायी आहेत. कारण ही गुन्हेगारीची पद्धत अवलंबिणारे लोक जेव्हा दुसऱ्याकडून घेतात तेव्हा माप पुरेपुर भरून घेतात. आणि कोणी माणूस ही गोष्ट पसंत करीत नाही की त्याच्या डोळ्यात धूळ फेकली जावी आणि त्याला प्रमाणापेक्षा कमी दिले जावे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे मानवी स्वभाव न्यायालाच पसंत करतो. आणि इच्छितो की प्रत्येकाबरोबर न्यायनितीचाच व्यवहार केला जावा. हा या गोष्टीचा पुरावा आहे की माणसाचा निर्माता न्यायालाच पसंत करतो. म्हणून जे लोक दुसऱ्याबरोबर व्यवहार करताना न्यायनीती विरूद्ध वर्तन करतात ते वस्तुत: आपल्या पालनकर्त्याच्या इच्छेविरूद्ध आणि त्यांच्या स्वभावात ठेवल्या गेलेल्या अल्लाहच्या हुकूमाविरूद्ध काम करतात. अशा स्थितीत त्यांचा पालनकर्ता त्यांच्या या अपराधपूर्ण हरकतींवर त्यांची पकड का करणार नाही? काय वजन कमी देणारे आणि न्यायाने वजन देणारे दोघे सारखे होऊ शकतात? आणि काय दोहोंचा शेवट एकसारखा होईल? माणसाचा स्वभाव आणि त्याची बुद्धियाला सारखे मानीत नाही. येथूनच पवित्र कुरआनच्या निवेदनाचे स्पष्टीकरण उघड होते की एकेदिवशी माणसाला पुन्हा जिंवत होऊन उठायचे आहे. आणि आपल्या पालनकर्त्यासमोर आपल्या आचरणासंबंधी जाब द्यावयाचा आहे. आणि त्यानुसार इनाम व शिक्षा प्राप्त करावयाची आहे.

यावरून स्पष्ट झाले की माणूस जेव्हा परमेश्वरासमोर उत्तरदायित्त्वाची कल्पना बाळगत नाही तेव्हा त्याचा देण्याचा हिशोब वेगळा असतो आणि घेण्याचा हिशोब वेगळा असतो. तो ना केवळ आपल्या हक्क पूरेपूर वसूल करू इच्छितो तर तो इच्छितो की दुसऱ्याच्या हक्कावरही दरोडा घातला जावा. या विचारसरणीच्या सुधारणेचा योग्य व परिणामकारक मार्ग परमेश्वरासमोर जाब देण्याची जाणीव असणे हाच आहे. आणि म्हणून सामाजिक बिघाडाला दूर करण्याचा प्रश्न असो वा आर्थिक बिघाडाला दूर करण्याचा प्रश्न असो, माणसामध्ये ही जाणीव जागृत केल्याशिवाय खरी सुधारणा होणे शक्य नाही.

२. अभिप्रेत कियामतीचा दिवस आहे जो अत्यंत कठीण असेल.

३. परमेश्वराच्या न्यायासनासमोर हजर होणे ही माणसाने वरवर विचार करण्यासारखी साधी गोष्ट नव्हे. ती तर अत्यंत गंभीर व कठीण अशी वेळ असेल जी प्रत्येक माणसावर अवश्य येणार आहे. आणि म्हणून या प्रसंगामधून सही सलामत सुटण्याची ज्याची इच्छा आहे त्याने आपल्या मनामध्ये व बुद्धिमध्ये हा विचार ठेवला पाहिजे आणि त्याच आधारावर आचरण केले पाहिजे.

थोडी कल्पना करा ईश्वरी न्यायालयाची, जेव्हा सारे मानव जिवंत होऊन हश्रच्या मैदानावर जमा झालेले असतील. विश्वाचा शासक न्यायालय भरविल. प्रत्येक व्यक्ती त्याच्या समोर हजर केली जाईल आणि तिला आपल्या साऱ्या जीवनाचा हिशेब द्यावा लागेल. ईश्वरी निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी म्हणून कोणाच्या बाबतीत काय निवाडा होतो याची फिरिश्ते प्रतीक्षा करीत असतील. त्यावेळी माणूस अगदी विवश असेल. माणूस जर आज त्या विवशतेची कल्पना करू शकेल तर अल्लाहच्या भयाने त्याचा थरकाप उडेल आणि त्याच्यामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. पैगंबरांच्या वचनामध्ये कियामतीचे चित्र अशाप्रकारे रेखाटले गेले आहे.

يَومَ يَقُوْمُ النَّاسُ لِرَبِّ الْعَالَمِيْنَ حَتّٰى يَغِيْبَ اَحَدُهُمْ فِىْ
رَشْحِهٖ اِلٰى أَنْصَافِ اُذُنَيْهِ۔ (مسلم كتابُ الجنة)

"ज्यादिवशी लोक विश्वाच्या पालनकर्त्या समोर हजर होण्यासाठी उभे असतील तेव्हा ते घामाने इतके नखशिखांत भिजून गेले असतील की काही लोकांच्या अर्ध्या कानापर्यंतचे शरीर घामामध्ये बुडालेले असेल." (मुस्लिम)

अल्लाहु अकबर ! किती भयंकर प्रसंग असेल तो ज्याच्या बद्दल अल्लाहच्या पैगंबरांनी माणसाला पूर्व सूचना दिली आहे! कियामतीच्या वस्तुस्थितीचा विचार करून माणसाने जर आपल्या विचासरणीवर फेरविचार केला तर किती बरे होईल !

४. म्हणजे त्यांचा हा समज चूकीचा आहे की ना पुन्हा जिवंत होणे आहे ना परमेश्वरासमोर जाब देणे आहे.

५. "सिज्जीन" हा शब्द 'सिजन' पासून बनला आहे. याचा अर्थ तुरूंग असा आहे. येथे हा शब्द कुरआनने आपल्या परिभाषेतच वापरला आहे. आणि त्याचा स्वत: हा खुलासा

केला आहे की ते ''किताबुम् मर्कूम''आहे.म्हणजे रेकॉर्ड ऑफिस,

हे आलमे बर्जख (ईहलोक व आखिरत दरम्यानचे एक विश्‍व) चे एक मोठे सत्य आहे ज्याच्याशी माणसाला परिचित केले गेले आहे. प्रत्येक माणसाच्या आचारिक जीवनाचे रेकॉर्ड तयार करण्यासाठी फिरिश्त्यांची जी नियुक्ती केली गेली आहे त्याचा क्रम त्या माणसाच्या मरणापर्यंत चालू असतो. मरणानंतर त्याची कर्मनोंद वही आलमे बर्जखमध्ये हलविली जाते. जर तो माणूस दुराचारी होता तर त्याच्या कर्मनोंद वहीची नोंद 'सिज्जीन'' नामक रेकॉर्ड ऑफिसमध्ये केली जाते आणि जर तो सदाचारी असेल तर पुढे निवेदन केल्या गेल्या प्रमाणे त्याच्या कर्मनोंद वहीची नोंद ''इल्लियीन'' मध्ये होते. यावरून मूलतः हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की प्रत्येक माणसाच्या कर्मनोंद वहीला त्याच्या मरणानंतर सुरक्षित ठेवण्याची सर्वश्रेष्ठ अल्लाहने व्यवस्था केली आहे आणि कियामतीच्या दिवशी तिला उघडले जाईल. आणि तिच्याच आधारावर परमेश्‍वराच्या न्यायालयात निवाडा केला जाईल.

जेथे अल्लाहच्या निकटवर्ती यांची (फिरिश्त्यांची अल्लाहच्या दरबारात) उपस्थिती होते. निःसंशय सदाचरणी आरामात असतील. रूबाबदार बैठकीवर बसून देखावा पाहात असतील. त्यांच्या चेहऱ्यावर तुम्ही पाहाल की सुस्थितीची प्रसन्नता दिसेल. *(अल-क़ुर्आन)*

१२. आणि त्याचा इन्कार तेच लोक करतात जे मर्यादाभंग करणारे [६] गुन्हेगार [७] असतात.

وَمَا يُكَذِّبُ بِهِۦٓ إِلَّا كُلُّ مُعْتَدٍ أَثِيمٍ ﴿١٢﴾

१३. अशा माणसाला जेव्हा आमच्या आयती ऐकविल्या जातात तेव्हा तो म्हणतो ह्या तर पूर्वीच्या लोकांच्या कथा आहेत.[८]

إِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِ ءَايَٰتُنَا قَالَ أَسَٰطِيرُ ٱلْأَوَّلِينَ ﴿١٣﴾

१४. नाही.[९] उलट वस्तुस्थिती ही आहे की त्यांच्या मनावर त्यांच्या (वाईट) आचरणाचा गंज चढला आहे.[१०]

كَلَّا ۖ بَلْ ۜ رَانَ عَلَىٰ قُلُوبِهِم مَّا كَانُوا۟ يَكْسِبُونَ ﴿١٤﴾

१५. कदापिही नाही.[११]त्यादिवशी ते त्यांच्या पालनकर्त्या पासून दूर ठेवले जातील.[१२]

كَلَّآ إِنَّهُمْ عَن رَّبِّهِمْ يَوْمَئِذٍ لَّمَحْجُوبُونَ ﴿١٥﴾

१६. नंतर ते जहन्नमध्ये दाखल होतील.

ثُمَّ إِنَّهُمْ لَصَالُوا۟ ٱلْجَحِيمِ ﴿١٦﴾

१७. त्यावेळी त्यांना सांगितले जाईल की ही तीच गोष्ट आहे जिचा तुम्ही इन्कार करत आलात.

ثُمَّ يُقَالُ هَٰذَا ٱلَّذِى كُنتُم بِهِۦ تُكَذِّبُونَ ﴿١٧﴾

१८. (त्यांचा दावा खरा) नाही.[१३] निःसंशय सदाचरणी लोकांची कर्म नोंद वही अिल्लियीन' मध्ये असेल.

كَلَّآ إِنَّ كِتَٰبَ ٱلْأَبْرَارِ لَفِى عِلِّيِّينَ ﴿١٨﴾

१९. आणि तुम्हाला काय माहित ''अिल्लियीन'' काय आहे ?

وَمَآ أَدْرَىٰكَ مَا عِلِّيُّونَ ﴿١٩﴾

२०. ते एक रेकॉर्ड ऑफिस आहे. [१४]

كِتَٰبٌ مَّرْقُومٌ ﴿٢٠﴾

२१. जेथे अल्लाहच्या निकटवर्ती यांची (फिरिश्त्यांची अल्लाहच्या दरबारात) उपस्थिती होते.[१५]

يَشْهَدُهُ ٱلْمُقَرَّبُونَ ﴿٢١﴾

२२. निःसंशय सदाचरणी आरामात असतील.

إِنَّ ٱلْأَبْرَارَ لَفِى نَعِيمٍ ﴿٢٢﴾

२३. रूबाबदार बैठकीवर बसून देखावा पाहात असतील. [१६]

عَلَى ٱلْأَرَآئِكِ يَنظُرُونَ ﴿٢٣﴾

२४. त्यांच्या चेहऱ्यावर तुम्ही पाहाल की सुस्थितीची प्रसन्नता दिसेल.[१७]

تَعْرِفُ فِى وُجُوهِهِمْ نَضْرَةَ ٱلنَّعِيمِ ﴿٢٤﴾

६. मर्यादेचे उल्लंघन अभिप्रेत भक्ती व आज्ञापालनाची अवज्ञा करणारे लोक आहेत. म्हणजे जे स्वत:ला अल्लाहचे दास समजत नाहीत. स्वत:ला स्वतंत्र समजून मन मानेल तसे वागणारे लोक.

७. गुन्हेगाराने अभिप्रेत गुन्ह्यामध्ये सामील असलेले लोक. जेव्हा माणूस अल्लाहचा दास बनून रहण्यास तयार होत नाही तेव्हा त्याचे पुरे जीवन गुन्हा, वाईट कृत्ये, अपराध आणि पापाचे जीवन बनते.असा माणूस निर्णयाच्या दिवसाला कसा काय मानेल?

८. म्हणजे पवित्र कुरआनमध्ये इन्कार करणाऱ्या समाजावरील ईश्वरी कोपाच्या ज्या ऐतिहासिक घटना नमूद आहेत त्यापासून धडा घेण्याऐवजी हे लोक त्यांना कथा व काल्पनिक गोष्टी ठरवितात. चालू काळातील इन्कार करणारे लोकसुद्धा अशाच प्रकारचे आक्षेप घेतात.त्यांच्या दृष्टीने या सर्व जुनाट, सनातनी व बुरसटलेल्या कल्पना आहेत.

९. हे इन्कार करणाऱ्यांच्या वर उल्लेख केलेल्या आरोपाचे खंडण आहे.

१०. म्हणजे ते पवित्र कुरआन संबंधी इतकी चूकीची गोष्ट म्हणण्याचे धाडस यासाठी करीत आहेत की त्यांच्या दुराचाराने त्यांना धीट बनविले आहे. नाहीपेक्षा एक सरळ स्वभावाचा माणूस पवित्र कुरआनसंबंधी असे अयोग्य उद्‌गार कधीही काढणार नाही.

اِنَّ الْعَبْدَ اِذَا اَخطأ خطِيْئَةً نُكِتَتْ فِى قَلْبِهٖ نُكْتَةٌ سَوْدَاءُ فَاِذَا هُوَ نَزَ عَ وَ اسْتَغْفَرَ وَ تَابَ صُقِلَ قَلْبُهٗ وَاِنْ عَادَ زِيْدَ فِيْهَا حَتّٰى تَعْلُوَ قَلْبَهٗ وَهُوَ الران ا لذى ذِكر الله كَلَّا بَل رَان عَلٰى قُلُوْبِهِمْ مَا كَانُو يَكْسِبُوْنَ۔ (ترمذی ابواب التفسیر)

''मनावर गंज चढण्याचा खुलासा हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशाप्रकारे केला आहे. दास जेव्हा एखादा गुन्हा करतो तेव्हा त्याच्या मनावर एक काळा डाग पडतो. तो त्यापासून परावृत्त झाला आणि त्याने पश्चात्ताप पावून क्षमा याचना केली की त्याच्या मनावरील तो डाग साफ होतो. परंतु जर त्याने पुन्हा गुन्हा केला तर हा डाग वाढतो, येथपावेतो की तो सर्व मनावर पसरतो, हाच तो गंज आहे ज्याचा उल्लेख सर्वश्रेष्ठ अल्लाहने या आयतीमध्ये

كَلَّا بَلْ رَانَ عَلٰى قُلُوْبِهِمْ مَا كَانُوْ يَكْسِبُوْن

केला आहे''

(तिर्मिज़ी अबवाबुत्तफ़सीर )

११. म्हणजे त्यांची ही इच्छा देखील खोटी आहे की जरी आखिरत अस्तित्त्वात आली तरीही आम्हांला ज्याप्रमाणे या जगात ''मानाचे स्थान'' प्राप्त झाले आहे त्याचप्रमाणे अल्लाह जवळ ही मान लाभेल

१२. म्हणजे हे लोक अल्लाहच्या जवळही मान कसा काय प्राप्त करतील? त्यादिवशी त्यांना तर त्यांच्या पालनकर्त्या पासून दूर ठेवले जाईल. ते त्याच्या कृपेपासूनही वंचित होतील आणि त्याच्या वैभवाच्या दर्शनापासूनही.

१३. म्हणजे त्यांचा हा दावा खरा नाही की अल्लाहजवळ चांगल्या व वाईटामध्ये फरक नाही. याउलट सर्वश्रेष्ठ अल्लाहने दुराचारी लोकांच्या कर्मनोंद वह्या वेगळ्या सुरक्षित ठेवण्यासाठी वेगवेगळी दफ्तरे कायम केली आहेत.

१४. ''अिल्लीयीन'' चा शब्दार्थ उच्च स्थाने हा आहे. येथे या शब्दाला पवित्र कुरआनने आपल्या खास परिभाषेत याचा वापर केला आहे आणि याचा खुलासा स्वत:च केला आहे की ते 'किताबुम मर्कूम' म्हणजे रेकॉर्ड ऑफिस' आहे जेथे सदाचारी लोकांच्या कर्मनोंद वह्यांची नोंद होते. ही नोंद त्यांच्या मरणानंतर होत असते आणि हे 'आलमे बर्जख' चे रेकॉर्ड ऑफिस आहे.

१५. अभिप्रेत निकटच्या फिरिश्त्यांची उपस्थिती आहे. सदाचारी लोकांच्या रेकॉर्ड ऑफिसवर निकटच्या फिरिश्त्यांची उपस्थिती म्हणजे निकटच्या फिरिश्त्याकडून सदाचारी लोकांना धन्यवाद देणे होय आणि हे फार मोठे भाग्य आहे आणि हा फार मोठा सन्मान आहे,जो सदाचारी लोकांना 'आलमे बर्जख' मध्ये लाभतो.

१६. म्हणजे सदाचारी लोक शाही रूबाबात शानदार बैठकीवर बसून जन्नतीच्या विस्तृत व बहारदार वातावरणात आपल्या पालनकर्त्याची कृपा आणि त्याच्या वैभवाचा अविष्कार पाहात असतील.

१७. सदाचारी लोकांना जन्नतमध्ये जे जीवन लाभेल ते इत्के ऐषआरामाचे असेल की त्यांचे चेहरे सदैव प्रफुल्लित व ताजेतवान असतील.

२५. त्यांना असे मद्य पाजले जाईल जे शुद्ध आणि सीलबंद असेल.

يُسْقَوْنَ مِنْ رَّحِيْقٍ مَّخْتُوْمٍ ﴿٢٥﴾

२६. हे सील कस्तुरीचे असेल.[१८]आणि इच्छा बाळगणाऱ्याने उत्कटतेने याची इच्छा करावी.[१९]

خِتٰمُهٗ مِسْكٌ ۚ وَفِيْ ذٰلِكَ
فَلْيَتَنَافَسِ الْمُتَنٰفِسُوْنَ ﴿٢٦﴾

२७. या मद्यामध्ये 'तस्नीम' चे पेय मिसळलेले असेल.[२०]

وَمِزَاجُهٗ مِنْ تَسْنِيْمٍ ﴿٢٧﴾

२८. हा एक झरा असेल ज्यामधून अल्लाहचे निकटवर्ती दास पीतील.[२१]

عَيْنًا يَّشْرَبُ بِهَا الْمُقَرَّبُوْنَ ﴿٢٨﴾

२९. जे लोक गुन्हेगार बनले होते ते ईमानधारकांची थट्टा उडवित असत.[२२]

اِنَّ الَّذِيْنَ اَجْرَمُوْا كَانُوْا مِنَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا يَضْحَكُوْنَ ﴿٢٩﴾

३०. आणि जेव्हा त्यांच्या जवळून जात तेव्हा डोळ्याने इशारा करीत असत.[२३]

وَاِذَا مَرُّوْا بِهِمْ يَتَغَامَزُوْنَ ﴿٣٠﴾

३१. आणि जेव्हा आपल्या घरच्या मंडळीकडे परत जात तेव्हा आनंदाने परत जात असत.[२४]

وَاِذَا انْقَلَبُوْٓا اِلٰٓى اَهْلِهِمُ انْقَلَبُوْا فَكِهِيْنَ ﴿٣١﴾

३२. आणि जेव्हा त्यांना पाहात तेव्हा म्हणत की हे बहकलेले लोक आहेत.[२५]

وَاِذَا رَاَوْهُمْ قَالُوْٓا اِنَّ هٰٓؤُلَاۤءِ لَضَاۤلُّوْنَ ﴿٣٢﴾

३३. यद्यपि त्या लोकांना यांच्यावर पहारेकरी बनवून पाठविलेले नव्हते. [२६]

وَمَآ اُرْسِلُوْا عَلَيْهِمْ حٰفِظِيْنَ ﴿٣٣﴾

३४. पण आज ईमानधारक काफिरांना (इन्कार करणाऱ्यांना) हसतील. [२७]

فَالْيَوْمَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا مِنَ الْكُفَّارِ يَضْحَكُوْنَ ﴿٣٤﴾

३५. उच्च आसनांवर बसून (त्यांची स्थिती) पाहात असतील.[२८]

عَلَى الْاَرَاۤىِٕكِ يَنْظُرُوْنَ ﴿٣٥﴾

३६. मिळाला ना काफिरांना त्यांच्या कर्माचा बदला !

هَلْ ثُوِّبَ الْكُفَّارُ مَا كَانُوْا يَفْعَلُوْنَ ﴿٣٦﴾

१८. जगामध्ये जी दारू असते ती घाणेरडी असते आणि झाकण उघडताच तिच्या वासाने डोके गरगरू लागेत. यावर हा टोमणा आहे. याऊलट जन्नतमध्ये मिळणाऱ्या दारूचे वैशिष्टय असे की ती सर्वप्रकारच्या भेसळीपासून शुद्ध असेल. आणि ती ज्या बाटल्यांमध्ये किंवा भांडयामध्ये बंद असेल त्यांच्यावर कस्तुरीची मोहर लागलेली असेल. आणि म्हणून याच्या सुवासाने मन उल्हासित होईल आणि ती मधूर असेल.

१९. 'याची इच्छा करावी' याने अभिप्रेत जन्नतच्या देणग्यांची इच्छा करावी, ज्यांचा उल्लेख वर आला आहे. अर्थ हा आहे की माणसाला नित्कृष्टच्या ऐवजी उत्कृष्ट गोष्टीचा आणि संपणाऱ्या गोष्टीच्या मुकाबल्यात कधीही न संपणाऱ्या गोष्टीची निवड केली पाहिजे. आणि या दृष्टीने माणसाने विचार केला तर जगातील ऐषआराम व सुखे आखिरतच्या जीवनामधील ऐषआराम व सुखांच्या मुकाबल्यात अगदीच तुच्छ व निरस आढळून येतील.आणि बुद्धिची निकड हिच असेल की माणसाने त्यांचा लोभी बनण्याऐवजी जडवादामध्ये गर्क होण्याऐवजी आखिरतच्या देणग्यांची इच्छा बाळगावी. आणि या क्षेत्रात एकदुसऱ्यावर बाजी मारण्याचा प्रयत्न करावा.

पवित्र कुरआनने माणसाला येथे जन्नतीच्या देणग्यांचे इच्छुक बनण्यासाठी जे उत्तेजन दिले आहे त्याने त्या लोकांच्या या विचाराचे खंडन होते जे 'कलेसाठी कला' च्या धर्तीवर 'सदाचारासाठी सदाचार' (Virtue for the sake of virtue) चा सिद्धांत मांडतात. त्यांच्या दृष्टीने जन्नत आणि तिच्या देणग्यांची इच्छा बाळगून सदाचार करणे ही एक नित्कृष्ट दर्जाची गोष्ट आहे. जाहीरपणे ही गोष्ट उच्च पातळीची भासते, परंतु वस्तुत: ही निव्वळ कल्पनेची भरारी आहे. ना हिचा माणसाच्या मानसशास्त्राशी संबंध आहे आणि ना ही एखादी आचरण करण्याजोगी गोष्ट आहे. याशिवाय ही गोष्ट पवित्र कुरआन व सुन्नत (पैगंबरीय पद्धत) च्या स्पष्ट आदेशा विरुद्ध आहे. इस्लामची शिकवण ना तत्त्वज्ञानाची आहे आणि ना कल्पनेच्या जगात भराऱ्या मारण्याची. या उलट त्याची शिकवण वस्तुस्थितीनिष्ठ आणि माणसाच्या मानसशास्त्राशी ठीक ठीक अनुरूप आणि त्याला कृतीशील बनविणारी आहे. तो शायरी करण्यासाठी आलेला नाही तर माणसाला जन्नतीचा रहिवासी बनविण्यासाठी आला आहे.

२०. 'तस्नीम' चा अर्थ उंच करण्याचा आहे. हे जन्नतमधील एका झऱ्याचे नाव आहे. आणि बहुतेक हे नाव त्याच्या या वैशिष्ठयामुळे दिले गेले आहे की त्यामधून प्राशन करणाऱ्यांच्या प्रतिष्ठेत अधिक भर पडेल.

२१. 'तस्नीम' हे जन्नतच्या रहिवाशांचे सर्वात उच्च प्रतीचे पेय असेल. सदाचारी लोकांना जे मद्य पाजविले जाईल त्यामध्ये हे उच्च प्रतीचे पेय मिसळलेले असेल. हेतू हा की त्यांच्या आनंदात भर पडावी. परंतु ज्या लोकांना अल्लाहच्या निकटतेचे भाग्य लाभलेले असेल ते प्रत्यक्षपणे या झऱ्याचे पेय प्राशन करतील. जणू आनंद लूटण्यामध्ये आणि कैफ व धुंदीमध्ये त्यांचा हिस्सा इतका अधिक असेल जितका अधिक त्यांचा हिस्सा ईमान, सदाचार आणि अल्लाहच्या मार्गात त्याग करण्याच्या बाबतीत होता.

२२. म्हणजे ते ईमानधारकांची थट्टा उडवित असत आणि त्यांना टोमणे मारीत असत.

ईमानधारकांची थट्टा उडविण्याचा क्रम आजच्या जमान्यामध्ये देखील चालू आहे. अलबत, काही नवे शब्दप्रयोग वापरले जात आहेत. आजचे 'आधुनिक' लोक इस्लामचे योग्य अनुकरण करणाऱ्या लोकांच्यावर ते 'सनातनी' व 'पुराणमतवादी' आहेत असा आक्षेप घेतात.

२३. म्हणजे त्यांनी ईमानधारकांचा अपमान व त्यांची मानहानी करण्याबाबतीत काही कसर बाकी ठेवलेली नव्हती. येथपावेतो की, जेव्हा ते ईमानधारकांचे जवळून जात तेव्हा ते आपसात डोळे मिचकावून इशारे करीत असत.

२४. या आयतींमध्ये विरोधकांच्या या वागणूकीचे चित्र रेखाटले गेले आहे जी त्यांनी ईमानधारकांच्या विरूद्ध अंगिकारली होती. जेव्हा ते आपल्या मनामधील रागाचे प्रदर्शन करून घरी परत जात तेव्हा आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजी त्यांना त्याबद्दल आनंद होत असे. आणि आपल्या घरच्या मंडळीसमोर ते याचा अभिमानाने उल्लेख करीत असत.

यावरून अंदाज होतो की जे लोक सत्याला ठोकरतात त्यांची मनोवृत्ती सत्यनिष्ठ लोकांबद्दल काय असते.

२५. चालू काळात जे लोक इस्लामचा इतर धर्म दृष्टीसमोर ठेवून विचार करून त्यालाही ''अफू'' ठरवितात, ते पवित्र कुरआनचे आवाहन घेऊन प्रयत्न करणाऱ्या लोकांसंबंधी 'या लोकांना बुद्धि नाही' असे भासविण्याचा प्रयत्न करतात.

२६. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना आपल्या आचरणाबद्दल जबाबदार ठरविले होते, दुसऱ्यांच्या आचरणाबद्दल नव्हे. परंतु हे लोक स्वत:ला विसरून ईमानधारकांच्या पाठी लागलेले आहेत. त्यांना दु:ख व त्रास देऊन जबरदस्तीने आपली गोष्ट त्यांनी मान्य करावी असा ते प्रयत्न करीत आहेत. जणू परमेश्वराने त्यांना जगामध्ये यासाठी पाठविलेले नव्हते की त्यांनी आपण सदाचारी आहोत हे सिद्ध करावे. याउलट त्यांना यासाठी पाठविले गेले होते की फौजदार बनून त्यांनी ईमानधारकांचा खरपूस समाचार घ्यावा.

२७. जगामध्ये इन्कार करणारे लोक ईमानधारकांचे हसे उडवित आले आहेत. परंतु आखिरतमध्ये ईमानधारक इन्कार करणाऱ्यांना हसतील. या प्रकारे त्यांना आपल्या या हरकतीचा ठीक ठीक बदला मिळेल आणि इन्कार करणाऱ्या लोकांवर जगामध्ये अल्लाहचा युक्तिवाद सिद्ध झाला असतांनदेखील त्यांनी सत्याच्याच स्विकाराचा मार्ग अंगिकारला नाही. उलट विद्रोही बनून ते सत्याचा विरोध करीत राहिले आणि ईमानधारकांचे शत्रू बनून राहिले. आणि म्हणून आखिरतमध्ये ते कोणत्याही सहानुभूतीस पात्र असणार नाहीत. जर ते काही सहानुभूतीस पात्र असते तर. सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत: त्यांच्यावर कृपा केली असती. या आधारावर ईमानधारकांनी त्यांच्या स्थितीवर हसणे अगदी योग्य व वाजवी आहे.

२८. म्हणजे जहन्नममध्ये इन्कार करणाऱ्या काफिर लोकांची ही दुर्दशा होत असेल की ईमानधारक जन्नतमधील आपल्या बैठकांवर बसून पाहात असतील.पवित्र कुरआनच्या या गोष्टीलाही आजच्या वैज्ञानिक कालात समजणे कठीण राहिलेले नाही. जेव्हा आम्ही आपल्या घरी बसून शेकडो मैल दूर असलेल्या गोष्टी टेलिव्हिजनवर पाहू शकतो.

# ८४. सूरह अल् इन्शिकाक

**नाव:** या सूरतीच्या सुरवातीला कियामतीच्या दिवशी आकाशाच्या फाटण्याची वार्ता दिली गेली आहे.या औचित्यानुसार या सूरतीचे नाव 'अल् इन्शिकाक' आहे म्हणजे ती सूरत जिच्यामध्ये आकाशाच्या फाटण्याचा उल्लेख आला आहे.

**अवतरण काळ:** ही सूरत मक्की आहे. आणि विषयावरून अंदाज होतो की ही सूरत प्रारंभीच्या काळातच उतरली असावी, जेव्हा ! अल्लाहचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आवाहनाची सुरवात केली होती आणि कियामतीबद्दल लोकांना ते खबरदार करीत होते.

**मध्यवर्ती विषय:** निर्णयाचा दिवस आणि चांगला व वाईट शेवट हा आहे. मागील सूरतीमध्ये निवेदन केले गेले होते की माणसाची कर्मनोंद वही त्याच्या मरणानंतर आलमे बर्जख मध्ये एका रेकॉर्ड ऑफिस मध्ये (सिज्जीन वा अिल्लियीन) मध्य सुरक्षित ठेविली जाते. या सूरतीमध्ये या गोष्टीबद्दल परिचित केले गेले आहे की कियामतीच्या दिवशी न्यायासना समोर हजर होण्यापूर्वी प्रत्येक माणसाला त्याची कर्मनोंद वही त्याच्या हातात दिली जाईल.

**ग्रंथ मांडणी:** आयत नं. १ ते ५ मध्ये त्या उत्पाताचा एकत्रितपणे उल्लेख केला आहे जो कियामत प्रकट होताच आकाश व जमिनीमध्ये घडून येईल.

आयत नं. ६ ते १५ मध्ये माणसाचे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयाकडे जाणे, कर्मनोंद वही त्याच्या हातात देणे आणि त्याचे आपल्या शेवटाला पोहोचणे या गोष्टींचा उल्लेख आहे.

आयत नं. १६ ते १९ मध्ये विश्वाच्या खाणाखुणांनी या गोष्टीवर युक्तिवाद केला आहे की माणसाला मृत्यूनंतर निरनिराळ्या अवस्थेतून जावे लागेल.

आयतनं. २० ते २५ मध्ये त्या लोकांना धमकी ऐकविली गेली आहे, जे लोक पवित्र कुरआनला ऐकून ईश्वरा समोर झुकत नाहीत, उलट त्याचे खंडन करतात. आणि त्या लोकांना कधीही न संपणाऱ्या मोबदल्याची खुशखबर ऐकविली गेली आहे जे ईमान ठेवून चांगले आचरण करतात.

# ८४.सूरह अल इन्शिकाक

سُوْرَةُ الْاِنْشِقَاقِ

आयती - २५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. जेव्हा आकाश फाटेल.[१]

إِذَا السَّمَاءُ انْشَقَّتْ ١

२. आणि आपल्या स्वामीच्या आज्ञेचे पालन करील आणि त्याला अवश्य पालन केले पाहिजे. [२]

وَأَذِنَتْ لِرَبِّهَا وَحُقَّتْ ٢

३. आणि जेव्हा जमीन पसरविली जाईल. [३]

وَإِذَا الْأَرْضُ مُدَّتْ ٣

४. आणि जे काही तिच्यामध्ये आहे ते ओकून ती रिकामी होईल.[४]

وَأَلْقَتْ مَا فِيهَا وَتَخَلَّتْ ٤

५. आणि आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेचे पालन करील आणि तिला अवश्य पालन केले पाहिजे.[५]

وَأَذِنَتْ لِرَبِّهَا وَحُقَّتْ ٥

६. हे मानवा ! तू हळू हळू आपल्या पालनकर्त्याकडेच जात आहेस. आणि त्याला तू भेटणार आहेस.[६]

يَا أَيُّهَا الْإِنْسَانُ إِنَّكَ كَادِحٌ إِلَىٰ رَبِّكَ كَدْحًا فَمُلَاقِيهِ ٦

७. मग ज्याचा कर्म लेख त्याच्या उजव्या हातात दिला गेला.[७]

فَأَمَّا مَنْ أُوتِيَ كِتَابَهُ بِيَمِينِهِ ٧

८. त्याच्याकडून सोपा हिशोब घेतला जाईल.[८]

فَسَوْفَ يُحَاسَبُ حِسَابًا يَسِيرًا ٨

९. आणि तो आपल्या संबंधितांच्याजवळ [९] आनंदाने परतेल.

وَيَنْقَلِبُ إِلَىٰ أَهْلِهِ مَسْرُورًا ٩

१०. आणि ज्याचा कर्म लेख त्याच्या पाठीमागे दिला जाईल,[१०]

وَأَمَّا مَنْ أُوتِيَ كِتَابَهُ وَرَاءَ ظَهْرِهِ ١٠

११. तो मरणाला पुकारेल.

فَسَوْفَ يَدْعُو ثُبُورًا ١١

१२. आणि भडकत असलेल्या आगीत दाखल होईल.

وَيَصْلَىٰ سَعِيرًا ١٢

१. हा विचार खरा नाही की आकाश फक्त दृष्टिसीमेचे नाव आहे, व त्याचे काही भौतिक अस्तित्त्व नाही. आणि जेव्हा त्याला भौतिक अस्तित्त्वच नाही तेव्हा ते फाटण्याचा प्रश्न कसा निर्माण होऊ शकतो? वस्तुस्थिती ही आहे की विज्ञानांच्या (Science) नावांवर ही गोष्ट मनावर छाप पाडण्यासाठी सांगितली जाते. ना हा एखादा शास्त्रीय शोध आहे आणि ना या विचारामागे भरीव असा आधार आहे. जेथपावेतो सांप्रतच्या विज्ञानाचा संबंध आहे. वस्तुस्थिती ही आहे की ते अद्यापपर्यंत आकाशापर्यंत पोहोचलेलेच नाही. ते तर अद्याप ताऱ्यांच्या जगातच चकरा मारीत आहे. विज्ञान विश्वाची लांबी रूंदी मोजण्याबाबतीत अगदी विवश आहे. खगोलशास्त्राच्या अभ्यासाने स्पष्ट होते की वैज्ञानिक अद्याप विश्वाच्या विस्ताराचा खरा अंदाज करू शकलेले नाहीत. खगोलशास्त्र (W. Bartky) हे आपल्या पुस्तकात विश्वाच्या विस्मयजनक विस्ताराबद्दल निवेदन केल्यानंतर स्पष्टपणे मान्य करतात की,

" What lies beyond no man knows, Whether the stars continue without end or whether the universe has a definite boundry remains, and perhaps will always remain, a topic for speculative argument."

(Highlights of Astronomy p.260)

आणि या विश्वाला काही सरहद्द आहे की नाही. हे सांगण्याबाबतीत विज्ञान (Science) असमर्थ आहे. हा या गोष्टीचा पुरावा आहे की विज्ञानाला अद्याप विश्वाच्या चतु:सीमेची माहिती झालेली नाही. अशा परिस्थितीत हा दावा कसा काय केला जाऊ शकतो की आकाशाला कसलेही भौतिक अस्तित्त्व नाही? खरी गोष्ट ही आहे की खगोलशास्त्राच्या (Astronomy) पुस्तकामध्ये फक्त त्या गोष्टीवर निवेदन करणे पुरेसे समजले जात नाही ज्या गोष्टी वैज्ञानिक प्रयोग व निरीक्षणाद्वारे ज्ञात होतात. याउलट त्यांच्याबरोबर अनुमानाच्या गोष्टीही जोडल्या जातात आणि लोक या साऱ्या 'मिश्रणाला' विज्ञानाच्या नावावर सादर करून चुकीच्या गोष्टींनाही त्या बरोबर आहेत असा समज पसरविण्याचा प्रयत्न करतात.

आकाशाच्या बाबतीत पवित्र कुरआनचे निवेदन अत्यंत स्पष्ट आहे, उदाहरणार्थ

وَالسَّمَاءَ بَنَيْنَاهَا بِاَيْدٍ ـ (الذاریات ـ ۴۷)

''हे की त्याने आकाशाला आपल्या हातानी बनविले'' (सूरह अज-जारियात: ४७)

وَالسَّمَاءَ رَفَعَهَا ـ (الرحمن:۷)

'' त्याला उंच केले''(सूरह अर-रहमान:७)

سَقْفاً مَحْفُوظاً ـ (انبیاء ـ ۳۲)

''त्याला सुरक्षित छत बनविले'' (सूरह अल-अंबिया: ३२)

وَزَيَّنَّا السَّمَاءَ الدُّنْيَا بِمَصَابِيحَ ـ (فصلت ـ ۱۲)

''त्याला ताऱ्यांनी सजविले'' (सूरह फुस्सिलत:१२)

त्याचबरोबर पवित्र कुरआन खबर देते की

اِذَا السَّمَاءُ انْشَقَّتْ ـ (انشقاق ـ ۱)

''कियामतीच्या दिवशी आकाश फाटेल''(सूरह इन्शिकाक:१) आणि

فَكَانَتْ اَبْوَاباً ـ (النباء ـ ۱۹)

''त्यामध्ये दारेच दारे होतील''(सूरह अन-नबा: १९)

कुरआनाच्या या निवेदनाने आकाश ही एक भौतिक वस्तू आहे ही कल्पना निर्माण होते. आणि म्हणून त्याचा असा खुलासा करणे योग्य होणार नाही जो त्याच्या उघड शब्दामधून स्पष्ट होणाऱ्या अर्थाच्या अगदी विरोधी असेल.

(अधिक खुलाशासाठी पाहा सूरह इनफितार टीप नं. १)

२. म्हणजे हा विचार करू नका की आकाश ईश्वराच्या आज्ञेविरूद्ध बंड करू शकते. नाही याउलट त्याला ईश्वराच्या आज्ञेचे अनिवार्यपणे पालन करावे लागेल. कारण तो त्याचा (आकाशाचा) निर्माता व स्वामी आहे. आणि त्याची सत्ता त्याच्यावर पूर्णपणे प्रस्थापित आहे. म्हणून कियामतीच्या दिवशी तो त्याला फाटण्याची आज्ञा देईल तेव्हा ती आज्ञा ऐकताच त्याचे तुकडे तुकडे होतील.

३. म्हणजे जमीन तिच्या आजच्या स्वरूपात कायम राहणार नाही. उलट तिला ताणून विस्तृत केले जाईल. म्हणजे तिने फार मोठया सपाट मैदानाचे स्वरूप अंगिकारावे, ज्यावर अल्लाह समोर सुनावणीसाठी हजर झालेल्या मानव जातीच्या साऱ्या लोकांना-जे पहिल्या दिवसापासून कियामतीपर्यंत जन्मास आले आहेतत्या सर्वाना जागा व्हावी.

४. इशारा या गोष्टीकडे आहे की जमीन मृतांना ओकून त्यांच्या भारापासून अशाप्रकारे रिकामी होईल ज्याप्रकारे गर्भवती स्त्री प्रसूत झाल्यानंतर भारापासून मोकळी होते. म्हणजे जमीन मृतांच्या भाराने दबलेली आहे आणि त्यांना ओकून टाकण्याच्याच अवस्थेत आहे.

५. म्हणजे जमीनसुद्धा तिला इशारा होताच आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेचे पालन करील. कियामत अस्तित्त्वात येण्यास कोणतीही गोष्ट आडकाठी निर्माण करू शकत नाही.

६. म्हणजे माणसाला आपल्या जीवन प्रवासाची जाणीव

असो वा नसो, तो आपल्या पालनकर्त्याकडे जात आहे. म्हणजे अल्लाहच्या न्यायासनासमोर तो उपस्थित होऊ शकेल. ज्याप्रमाणे पृथ्वी बरोबर आम्हीपण फिरत आहोत, मग आम्ही भ्रमण करणे इच्छित असलो वा नसलो आणि आम्हाला या भ्रमणाची कल्पना असो वा नसो; त्याचप्रमाणे जीवनाची ही नौका आम्हाला घेऊन विश्वाच्या निर्मात्याच्या न्यायालयकडे जात आहे. आणि आमचा शेवटचा टप्पा आखिरत आहे. परंतु नादान लोक या जगालाच आपले उद्दिष्ट समजत आहेत. आणि म्हणून त्यांना आखिरतची काही काळजी लागून राहात नाही.

अब्जावधी माणसे जगात जन्मास येत असतात आणि मरण पावतात. परंतु असे कितीजण आहेत ज्यांनी या महत्त्वाच्या प्रश्नावर गंभीरपणे विचार केला की आमच्या जीवनप्रवासाची सुरवात कोठून झाली आणि प्रवासाचा शेवटचा टप्पा कोणता आहे? आम्हांला रस्त्यामध्ये एखादी व्यक्ती भेटली आणि आम्ही तिला विचारले, तू कोठून येत आहेस आणि जर तिने उत्तर दिले की 'मला माहीत नाही' तर काय तिच्या या उत्तरावर आम्हाला आश्चर्य होणार नाही? काय आम्ही त्या व्यक्तीला नादान म्हणणार नाही? परंतु जगामध्ये अगणित लोक असे आहेत की ज्यांना जीवन प्रवासाबद्दल प्रश्न केल्यास हेच उत्तर मिळेल की आम्हाला ना या प्रवासाची सुरवात माहित आहे ना त्याचा शेवट ना सुरवातीची काही माहिती आम्हाला आहे ना शेवटाची. आपले उद्दिष्ट ठरविल्या शिवाय आम्ही आमचा जीवनप्रवास सुरू ठेवलेला आहे. किती नादान आहेत हे लोक जे परिणामाबाबतीत बेपर्वा होऊन अंधारात हातपाय मारीत आहेत. या बिचाऱ्यांना याची जाणीव असती की ते ईश्वरी न्यायालयाकडे त्याचप्रमाणे खेचले जात आहेत ज्याप्रमाणे सुई लोहचुंबकाकडे खेचली जाते !

७. सर्वश्रेष्ठ अल्लाहने उजव्या हाताला ही योग्यता प्रदान केली आहे की ते चांगल्याचे लक्षण समजले जाते. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जे शिष्टाचार शिकविले आहेत त्यामध्ये या गोष्टीचाही समावेश आहे की सर्व चांगली कामे. उदा. खाणे, पिणे, वुज़ू करणे, दानधर्म करणे वगैरे गोष्टी उजव्या हाताने केल्या जाव्यात. सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रदान केलेल्या या योग्यतेच्या आधारावर सदाचारी लोकांचा उजवा हात या गोष्टीस पात्र असेल की त्यांची कर्मनोंदवही त्यांच्या या हातात दिली जाईल.

८. सदाचारी लोकाकडून सोपा हिशोब घेतला जाईल. सोप्या हिशोबाने अभिप्रेत पैगंबरांनी खुलासा केल्याप्रमाणे अल्लाहच्या हुजूर जाब देण्यासाठी फक्त उपस्थित होणे आहे. या उपस्थितीच्या वेळी सक्त चौकशी होणार नाही तर सर्वश्रेष्ठ अल्लाह क्षमा करील. हदीसमध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले,

'कियामतीच्या दिवशी ज्याच्याकडून हिशोब घेतला गेला तो संकटात पडला (त्याला शिक्षा दिली जाईल.)'

हज़रत आयेशा (रजियल्लाहु अन्हु) यांनी विचारले, 'सर्वश्रेष्ठ अल्लाह तर फर्मावितो की فَسَوْفَ يُحَاسَبُ حِسَابًا يَسِيرًا यांच्याकडून सोपा हिशोब घेतला जाईल.' ''यावर पैगंबरांनी फर्माविले याचा अर्थ सक्त चौकशी करणे नव्हे तर फक्त उपस्थिती आहे. कियामतीच्या दिवशी ज्या कोणाची सक्त चौकशी केली जाईल तो संकटात पडेल.'' (मुस्लिम किताबुल जन्नह )

९. आपल्या संबंधितांनी अभिप्रेत त्याचे कुटुंबिय आहेत जे ईमानधारक असतील आणि त्यांच्या बाबतीतही सर्वश्रेष्ठ अल्लाहने क्षमेचा व्यवहार केला असेल. ते सर्व मिळून जन्नतमध्ये एकत्र येतील आणि त्यांना एकदुसऱ्याचा सहवास लाभेल आणि या उद्देशासाठी त्यांच्यापैकी कोणाचाही दर्जा कमी केला जाणार नाही. उलट तो वाढविला जाईल. (पहा सूरह तूर आयत नं.२१)

१०. हे त्या लोकांच्या शेवटाचे निवेदन होत आहे जे ईश्वरासमोर हजर होण्यावर विश्वास ठेवीत नाहीत. आणि त्याच्याशी द्रोहाच्या आधारावर जीवन जगतात. असे लोक सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात गुन्हेगाराच्या नात्याने हजर होतील आणि म्हणून त्यांची कर्मनोंद वही पाठीमागून त्यांच्या हातात दिली जाईल. त्यांनी अल्लाहच्या ग्रंथाला पाठीमागे टाकले होते आणि म्हणून ते उचितपणे यास पात्र असतील की त्यांची कर्मनोंद वही त्यांच्या पाठीमागून दिली जावी.

तो आपल्या घरच्या मंडळींमध्ये धुंद होता. तो असे समजून होता की त्याला कधी परतावयाचे नाही. का नाही ! त्याचा पालनकर्ता तर त्याला चांगल्याप्रकारे पाहत होता, नाही मी शपथ घेतो, शफकची (उषेची). आणि रात्रीची आणि ती जे काही आपल्यामध्ये समेटून घेते त्याची. *(अल-क़ुर्आन)*

१३. तो आपल्या घरच्या मंडळींमध्ये धुंद होता.[११]

إِنَّهُۥ كَانَ فِىٓ أَهْلِهِۦ مَسْرُورًا ﴿١٣﴾

१४. तो असे समजून होता की त्याला कधी परतावयाचे नाही.[१२]

إِنَّهُۥ ظَنَّ أَن لَّن يَحُورَ ﴿١٤﴾

१५. का नाही ! त्याचा पालनकर्ता तर त्याला चांगल्याप्रकारे पाहत होता.

بَلَىٰٓ ۚ إِنَّ رَبَّهُۥ كَانَ بِهِۦ بَصِيرًا ﴿١٥﴾

१६. नाही. [१३] मी शपथ घेतो.[१४] शफकची (उषेची).[१५]

فَلَآ أُقْسِمُ بِٱلشَّفَقِ ﴿١٦﴾

१७. आणि रात्रीची आणि ती जे काही आपल्यामध्ये समेटून घेते त्याची.[१६]

وَٱلَّيْلِ وَمَا وَسَقَ ﴿١٧﴾

१८. आणि चंद्राची जेव्हा तो पूर्ण होतो,

وَٱلْقَمَرِ إِذَا ٱتَّسَقَ ﴿١٨﴾

१९. की तुम्हाला अवश्य एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेमध्ये पोहोचावयाचे आहे.[१७]

لَتَرْكَبُنَّ طَبَقًا عَن طَبَقٍ ﴿١٩﴾

२०. मग, त्या लोकांना काय झाले आहे की ईमानाचा स्वीकार करीत नाहीत.[१८]

فَمَا لَهُمْ لَا يُؤْمِنُونَ ﴿٢٠﴾

२१. आणि जेव्हा त्यांच्यासमोर कुरआनचे पठण केले जाते तेव्हा ते नतमस्तक होत नाहीत.[१९]

وَإِذَا قُرِئَ عَلَيْهِمُ ٱلْقُرْءَانُ لَا يَسْجُدُونَ ۩ ﴿٢١﴾

२२. परंतु हे काफिर (इन्कार करणारे) उलट खोटे ठरवितात.

بَلِ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ يُكَذِّبُونَ ﴿٢٢﴾

२३. आणि हे लोक जे काही जमा करीत आहेत त्याला अल्लाह चांगल्याप्रकारे जाणतो.[२०]

وَٱللَّهُ أَعْلَمُ بِمَا يُوعُونَ ﴿٢٣﴾

२४. तर, तुम्ही त्यांना एका दुःखदायक शिक्षेची खुशखबर [२१] ऐकवा.

فَبَشِّرْهُم بِعَذَابٍ أَلِيمٍ ﴿٢٤﴾

२५. अलबत, ज्या लोकांनी ईमानाचा स्वीकार केला आणि ज्यांनी सदाचार केले त्यांच्यासाठी असा मोबदला आहे जो कधी संपणार नाही.[२२]

إِلَّا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ وَعَمِلُوا۟ ٱلصَّـٰلِحَـٰتِ لَهُمْ أَجْرٌ غَيْرُ مَمْنُونٍ ﴿٢٥﴾

११. म्हणजे आपल्या आणि आपल्या मुलाबाळांच्या मृत्यूनंतरच्या अवस्थेबद्दल बेपर्वा होऊन आपले आणि त्यांचे ऐहिक जीवनच समृद्ध करण्यामध्ये मग्न होता.

१२. म्हणजे जेव्हा ईश्वर त्याला पाहात होता तेव्हा तो आपल्या समोर हजर होण्याबद्दल का बोलाविणार नाही? अल्लाह सर्वकाही पाहतो. त्याच्या या गुणविशेषाची निकड ही आहे की त्याने आपल्या दासांना आपल्या समोर जाब देण्यासाठी बोलवावे आणि त्यासाठी हे अवश्य आहे की त्यांनी मरणानंतर पुन्हा उठवावे.

१३. हे इन्कार करणाऱ्यांच्या या विचाराचे खंडन आहे की मरणानंतर ना पुन्हा जिवंत होणे आहे आणि ना अल्लाहकडे परत जावयाचे आहे.

१४. शपथ घेण्याचा अर्थ हा आहे की ज्या वस्तूंची शपथ घेतली गेली आहे त्यांना साक्षीपुरावा म्हणून उपस्थित करणे आहे. (अधिक तपशीलासाठी पाहा सूरह तकवीर टीप नं. १४)

१५. ''शफक'' त्या लालीला म्हणतात जी सूर्य मावळल्यानंतर आकाशावर दिसू लागते.

१६. समेटण्याने अभिप्रेत रात्रीचे आपल्या पदरात ताऱ्यांना समेटून घेणे आहे.

१७. ही ती गोष्ट आहे जिच्या समर्थनार्थ विश्वातील काही खाणाखुणांचे अहवाल सादर केले गेले आहेत. दुसऱ्या शब्दात, माणसाला त्या अहवालावर या पैलूने विचार व चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे की त्यांच्या अवलोकानाने कुरआनच्या या निवेदनाचे समर्थन होते किंवा नाही की माणसाला अवश्य एका अशा अवस्थेमधून जावे लागते जेथे जाऊन त्याला आपल्या पालनकर्त्यासमोर आपल्या आचरण पद्धतीसंबंधी जाब द्यावा लागेल.

सूर्य मावळल्यानंतर आकाशावर लाली प्रकट होणे, दिवसाने निरोप घेतल्याबरोबर रात्रीने ताऱ्यांनी आपल्या मैफीलीला सजविणे आणि चंद्राचे चंद्रकोरीपासून क्रमाक्रमाने पूर्ण चंद्र होणे. हा सर्व या गोष्टीचा संपूर्ण पुरावा आहे की या विश्वामध्ये एक क्रम आढळून येतो आणि त्याच्या निर्मात्याने निरनिराळे टप्पे व अवस्था ठरविलेल्या आहेत, चंद्र टप्प्या टप्प्यानेच पूर्ण चंद्र बनतो; त्याने ज्याच्यासाठी या मैफीलीला सजविले आहे त्या माणसासाठी पुढील टप्पे का ठेवले नसतील आणि ऐहिक जीवनाच्या या एका टप्प्यानंतर त्याचा कसा शेवट केला जाईल? कुरआन ही जी वार्ता पैगंबरांच्या तोंडून ऐकवित आहे की माणसाला मरणानंतर पुन्हा दुसऱ्या जीवनाच्या टप्प्यात प्रवेश करण्याचा आहे, आणि नंतर आपल्या पालनकर्त्याच्या समोर सुनावणीच्या टप्प्यामधून त्याला अवश्य जावे लागणार आहे. आणि या टप्प्यामधून गेल्यानंतर आपले शेवटचे ठिकाण जन्नत वा जहन्नममध्ये प्रवेश करून तेथे राहणे आहे. याचे पूर्ण समर्थन विश्वाच्या खाणाखुणांच्या अहवालावरून होते, ज्यांचा उल्लेख वर झालेला आहे. माणसाने जर या पैलूने या अहवालाचे निरीक्षण केले तर त्याच्या विचाराची व अवलोकनाची दिशा बदलेल.

१८. म्हणजे लोकांची स्थिती अजब आहे की या स्पष्ट पुराव्यानंतरही हे मान्य करण्यास ते तयार नाहीत की माणसाला जाब देण्याच्या अवस्थेमधून जावयाचे आहे. उलट ते आपल्या या विचारावर आग्रही आहेत की जीवन या जगापर्यंतच आहे आणि मरणानंतर कोणतीही दुसरी अवस्था प्राप्त होणार नाही.

१९. म्हणजे हे व्हावयास हवे होते की कुरआनचे हे वस्तुस्थिती स्पष्ट करणारे निवेदन ऐकून त्यांनी या सत्याचा स्वीकार करावा आणि त्याच्या महानतेने प्रभावित होऊन अल्लाहसमोर नतमस्तक व्हावे. परंतु याउलट त्यांनी खोटे ठरविण्याची व अक्कडपणाची पद्धत अवलंबिली आहे.

या ठिकाणी ''सज्दा'' करणे हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यापासून सिद्ध आहे. हजरत अबू हुरैरह निवेदन करतात की,

'मी पैगंबरांच्या मागे नमाज अदा केली आणि आपण या ठिकाणी (ही आयत पठण करताना) सज्दा! केला आणि म्हणून मी शेवटपर्यंत हा सज्दा करीन.' (मुस्लिम)

२०. म्हणजे सत्याशी वैर आणि इस्लामाशी शत्रूत्त्वाच्या भावना आणि बंधनरहीत स्वार्थी जीवन जगण्याची इच्छा ज्यांना त्यांनी आपल्या मनात दडविलेली आहे, त्यांचे अल्लाहला चांगले ज्ञाने आहे.

२१. शिक्षेच्या खबरीला खुशखबर म्हणण्यामध्ये एक सूक्ष्म उपरोध आहे. तुम्ही जन्नतचीही खुशखबर ऐकण्यास आणि तिच्यासाठी स्वत:ला पात्र करण्यास तयार नाही, तर मग जहन्नमचीच खुशखबर ऐका.

२२. म्हणजे सदाचारी लोकांना आखिरतमध्ये जो मोबदला मिळेल तो तात्पुरता व क्षणीक नसेल. तो कायम स्वरूपाचा व चिरकालीन असेल. त्याचा क्रम कधीही खंडीत होणार नाही. जणू ही एक वाहती नदी आहे जी नेहमी वाहतच राहील.

# सूरह अल बुरूज

# ८५. अल बुरूज

**नाव:** पहिल्या आयती मध्ये बुरूजवाल्या आकाशाचा उल्लेख आला आहे. या संदर्भात या सूरतीचे नाव निशाणीदाखल ''अलबुरूज'' ठेवले गेले आहे.

**अवतरण काळ:** ही सूरत मक्केमध्ये उतरली आहे आणि विषयावरून अंदाज होतो की ही त्या वेळी उतरली असावी जेव्हा इन्कार करणारे काफिर लोक ईमानधारकांना त्यांनी आपल्या ईमानापासून परावृत्त व्हावे म्हणून जुलूम जबरदस्तीचे व अत्याचाराचे लक्ष्य बनवित होते.

**मध्यवर्ती विषय:** या सूरतीचा मध्यवर्ती विषयदेखील कियामत आणि इनाम व शिक्षा हाच आहे. अलबत, येथे याच्या या पैलूला खास करून स्पष्ट केले गेले आहे की तो दिवस अत्याचार पीडीत ईमानधारकांना न्याय देण्याचा दिवस असेल. जे लोक ईमानधारकांना निव्वळ त्यांनी ईमान ठेवले आहे म्हणून जुलूम व अत्याचाराचे लक्ष्य बनवितात, त्यांना कियामतीच्या दिवशी कडक शिक्षा दिली जाईल. आणि जे लोक ईमान धारण करून सदाचारण करतात ते यशस्वी व सफल होतील.

**ग्रंथ मांडणी:** आयत नं. १ ते ३ मध्ये निर्णयाचा दिवस निश्चितपणे प्रकट होणार असल्याबद्दलचा दावा एका नाकारता न येणाऱ्या वस्तुस्थितीच्या स्वरूपात सादर केला गेला आहे.

आयत नं. ४ ते ११ मध्ये त्या लोकांना कडक शिक्षेची धमकी ऐकविली गेली आहे जे मुसलमानांचेवर फक्त यासाठी अत्याचार करीत असतात की त्यांनी एका परमेश्वरावर ईमान ठेवलेले आहे. आणि त्या मुसलमानांना जे अत्याचार होत असतानादेखिल आपल्या ईमानावर निर्धाराने टिकून राहतील - जन्नतीची खुशखबर ऐकविली गेली आहे.

आयत नं. १२ ते १६ मध्ये अत्याचारी लोकांना खबरदार केले गेले आहे की अल्लाहची शिक्षा मोठी कडक शिक्षा आहे. या बरोबरच परमेश्वराच्या या गुणविशेषाचे ही निवेदन केले गेले आहे ज्याद्वारे त्याच्याबद्दल भयही निर्माण होते आणि तौबा (पश्चाताप) करण्याकडे प्रवृत्ती होते.

आयत नं. १७ ते २० मध्ये काही बंडखोर आणि अत्याचारी समाजाच्या बोधप्रद शेवटाकडे इशारा करून इन्कार करणाऱ्यांना तंबी दिली गेली आहे की अल्लाहने तुम्हाला चोहीकडून घेरलेले आहे.

आयत नं. २१ व २२ ह्या शेवटच्या आयती आहेत. यामध्ये स्पष्ट केले गेले आहे की हे पवित्र कुरआन जे निर्णयाच्या दिवसाच्या आगमनाची वार्ता देत आहे, हा एक उच्च कोटीतील ग्रंथ आहे. आणि याचा उगम किती पवित्र आणि सुरक्षित आहे. आणि म्हणून याची कोणतीही गोष्ट चूकीची होऊच शकत नाही. याची प्रत्येक गोष्ट नि:संशय अटळ आहे.

# ८५. सूरह बुरूज

سُوْرَةُ الْبُرُوْجِ

आयती २२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ [१] आहे बृरूजवाल्या [२] आकाशाची,

وَالسَّمَآءِ ذَاتِ الْبُرُوْجِ ۙ ﴿١﴾

२. आणि त्या दिवसाची ज्याचा वायदा केला गेला आहे.[३]

وَالْيَوْمِ الْمَوْعُوْدِ ۙ ﴿٢﴾

३. आणि हजर होणाऱ्याची [४] आणि त्या गोष्टीची जी हजर केली जाईल. [५]

وَشَاهِدٍ وَّمَشْهُوْدٍ ؕ ﴿٣﴾

४. नाश पावले खंदक वाले [६]

قُتِلَ اَصْحٰبُ الْاُخْدُوْدِ ۙ ﴿٤﴾

५. जी भरपूर इंधनाच्या आगीने भरलेली होती

النَّارِ ذَاتِ الْوَقُوْدِ ۙ ﴿٥﴾

६. जेव्हा ते या (आगी) जवळ बसून

اِذْ هُمْ عَلَيْهَا قُعُوْدٌ ۙ ﴿٦﴾

७. जे काही ईमानाचा स्वीकार केलेल्या लोकांबरोबर करीत होते, त्याच्या देखावा पाहात होते.[७]

وَّهُمْ عَلٰى مَا يَفْعَلُوْنَ بِالْمُؤْمِنِيْنَ شُهُوْدٌ ؕ ﴿٧﴾

८. आणि त्यांच्याबरोबर ही सक्ती केवळ यासाठी केली गेली की त्यांनी अल्लाहवर ईमान ठेविले होते,[८]जो शक्तीवान आणि स्तुतीस पात्र ही आहे.

وَمَا نَقَمُوْا مِنْهُمْ اِلَّآ اَنْ يُّؤْمِنُوْا بِاللّٰهِ الْعَزِيْزِ الْحَمِيْدِ ۙ ﴿٨﴾

९. ज्याचे राज्य (सार्वभौमत्व) आकाशावर व जमीनीवर आहे.[९] आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीला पाहात आहे.[१०]

الَّذِيْ لَهٗ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ وَاللّٰهُ عَلٰى كُلِّ شَيْءٍ شَهِيْدٌ ؕ ﴿٩﴾

१. शपथेच्या खुलाशासाठी पाहा सूरह तकविर नोट नं.१४

२. बरूजने अभिप्रेत ताऱ्यांच्या त्या बारा काल्पनिक खुणा किंवा सूर्याच्या बारा कक्षा नाहीत. ज्या जुन्या खगोलशास्त्राच्या विशिष्ट परिभाषा आहेत. अभिप्रेत तेजस्वी नक्षत्रपूंज (Constellations) आहेत जे आकाशाची शोभा बनले आहेत आणि ज्यांचे तेजोवलय माणसाला दृष्टिसुख देते.

बुर्जचा शब्दार्थ जाहिर होणे व देखावा आणि किल्ला व प्रासाद हा आहे.आकाशामधील नक्षत्रपुंज अशाप्रकारे प्रकाशमान दिसते की जणू ते सजीवलेले उंच प्रासाद आहेत. त्यांची अशाप्रकारे नाकेबंदी केली गेली आहे की जेव्हा शैतानी शक्ती आकाशाकडे उड्डाण करू लागते तेव्हा या बुरूजावरून त्यांच्यावर उल्कापात केला जातो. आणि म्हणून ताऱ्याच्या या पुजांना (Constellations) बुरूज संबोधिले गेले आहे.

येथे बुरूजवाल्या आकाशाची शपथ घेण्याचा अर्थ हा आहे की आकाशामध्ये प्रकाशमान दिसणाऱ्या ताऱ्यांचे हे पुंज या गोष्टीची स्पष्ट साक्ष देतात की ज्या ईश्वराने या विश्वाची ही मैफल सजविली आहे त्याच्याजवळ अंधेरनगरी नाही. याउलट ईश्वर आपल्या सौंदर्य व श्रेष्ठता या गुणासह या विश्वाचा कारभार चालवित आहे. आणि म्हणून जे लोक ईश्वराच्या एकनिष्ठ दासावर जुलूम व अत्याचार करतात त्यांना जाब न विचारणे ही गोष्ट अशक्य आहे आणि त्याचप्रमाणे जे एकनिष्ठ व अत्याचारपीडित दास निव्वळ त्याच्यासाठी सताविले जातात त्यांना आपल्या कृपेने व सन्मानाने तो न भूषविल हेही अशक्यच आहे.

शैतानी शक्तींच्या आकाशावरील उड्डाणाला रोखण्यासाठी ताऱ्यांच्या गोळयांचा वर्षाव केला जातो. यावरून स्पष्ट होते की मर्यादा अतिक्रमण करणाऱ्यासाठी ईश्वराजवळ शिक्षेचा कायदा आहे. असे असताना बंडखोरांना व विद्रोह्यांना काय तो शिक्षा देणार नाही? म्हणजे बुरूजवाल्या आकाशावर चिंतन व मनन केल्याने ईमान व शिक्षेची निकड स्पष्ट होते. आणि याने पवित्र कुरआन खबर देत असलेल्या निर्णयाच्या दिवसाचे समर्थन व पाठपुरावा होतो.

३. अभिप्रेत कियामतीचा दिवस आहे. आणि याचा वायदा सर्वश्रेष्ठ अल्लाहने यासाठी केला आहे की तो न्यायासन भरविल आणि ईमानाचा स्वीकार करणारे, सदाचारी व दुराचारी आणि अत्याचारी व अत्याचारपीडित लोकांमध्ये न्याय करील.

४. अभिप्रेत ती प्रत्येक व्यक्ती आहे जी कियामतीच्या दिवशी हजर होईल.

५. अभिप्रेत त्या गोष्टी आहेत ज्या कियामतीच्या दिवशी हजर केल्या जातील आणि ते भयानक देखावे आहेत जे प्रत्येक व्यक्ती पाहील.

येथे वायद्याचा दिवस ''यौमे मौऊद'' (ज्या दिवसाचा वायदा केला गेला आहे.) ''शाहिद'' (हजर होणारा) आणि ''मशहूद'' (ज्या गोष्टी हजर केल्या जातील किंवा जी दृश्ये नजरेसमोर आणली जातील.) यांच्या शपथा निवेदनाला वचनदृढ करण्यासाठी आणि या गोष्टीबद्दल खात्री निर्माण करण्यासाठी घेतल्या गेल्या आहेत.

६. ''असहाबुलउखदूद'' (खंदकवाले) चा इशारा एका विशिष्ट घटनेकडे आहे. त्याचा खुलासा हा आहे की ईमानधारकांना निव्वळ त्यांनी ईमानाचा स्वीकार केला म्हणून आगीने भरलेल्या खंदकामध्ये फेकून दिले गेले होते. आणि अत्याचारी लोक त्या खंदकाजवळ बसून ईमान धारक जळत असल्याचा देखावा पाहात होते. ही घटना केव्हा व कोठे घडली याचा तपशील कुरआनने दिलेला नाही. कारण बोध घेण्यासाठी ऐवढी गोष्ट पुरेशी आहे. राहीला ऐतिहासिक पुरावा. तर इतिहास ईमानधारकांना आगीचे भक्ष्य बनविणाऱ्या घटनांनी भरलेला आहे. याची सुरवात हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांना नमरूद बादशहाने आगीत फेकण्यापासून होते. आणि अत्याचारांचा हा क्रम आजपावेतो सुरू आहे. निव्वळ अमक्या अमक्या गटाचा धर्म इस्लाम आहे म्हणून त्या गटाच्या लोकांना आगीचे भक्ष बनविले जाते. किंवा त्यांना घरांमध्ये बंद करून आग लावली जाते.हा फरक अवश्य आहे की आता खंदक खोदण्याची गरज भासत नाही. तसेच लाकडाचे सरपणही गोळा करावे लागत नाही. पेट्रोल आणि तत्सम ज्वालाग्रही पदार्थही पुरेसे होतात.

जेथपावेतो निवेदनांचा (रिवायातचा) संबंध आहे एवढी गोष्ट तर सत्य वाटते की यमनचा यहुदी बादशहा ''जूनुवास'' ने बहुतेक इ. स. ५२३ मध्ये नजरानवर हल्ला करून तेथील लोकांना जे हजरत ईसा (अ.) यांच्यावर ईमान ठेवित होते आणि जे सच्चे निष्ठावान होते त्यांना यहुदी धर्माचा स्वीकार करण्याचा हुकूम दिला आणि त्यांनी इन्कार केल्याने खंदक खोदून त्यांना आगीत लोटले गेले. (सीरत इब्ने हिशाम भा. १ पा. ३५)(The standard Jewish Encyclopedia P. 554 मध्येदेखील संक्षिप्तपणे याचा उल्लेख आलेला आहे.

नजरान मक्केपासून जवळ असल्यामुळे ही घटना अरबांमध्ये मशहूर असेल. आणि हे आश्चर्य नव्हे की कुरआनने ''असहाबुल उखदूद'' चा उल्लेख करून या घटनेकडे खास इशारा केला असेल. परंतु निवेदनामध्ये (रिवायात) गुलाम आणि सन्यासी वगैरेंची जी गोष्ट निवेदन केली गेली आहे त्यामध्ये मोठा दोष आहे या गोष्टीमध्ये गुलामाच्या संबंधात अशा विचित्र गोष्टी कथन केल्या गेल्या आहेत की त्या एक पैगंबरांच्या चमत्कारापेक्षाही

वरचढ आहेत. या निवेदनाशी हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा जो संबंध जोडला जातो तो चूकीचा आहे. इब्ने कसीर लिहितात,

قال شیخنا الحافظ ابو الحجاج المزّی فیحتمل ان
یکون من کلام صهیب الرومی فانه کان عنده من
اخبار النصاریٰ۔

"आमचे शेख हाफिज अबूलहज्जाज मिज्जी फर्मावतात की, या निवेदनाबाबत ही शंका आहे की ही गोष्ट सुहेब रूमी यांच्या गोष्टीचा एक भाग आहे. कारण त्यांना खिस्ती लोकांच्या कथाकहाण्यांचे ज्ञान होते."

(तफसीर इब्ने कसीर भा. ४ पा. ४९४.)

आणि कफ्फाल लिहितात,

"असहाबुल उखदूद संबंधी भाष्यकारांनी वेगवेगळ्या गोष्टी निवेदन केल्या आहेत. परंतु त्यापैकी कोणतीही गोष्ट खरी नाही. फक्त या बाबतीत सर्वांचे एकमत आहे की ईमान धारक लोकांच्या एका गटाने आपल्या समाजाचा किंवा काफिर बादशहाचा जो त्यांच्यावर सत्ता गाजवीत होता. विरोध केला होता आणि म्हणून त्याने या ईमानधारक लोकांना खंदकात फेकले होते."

(तफसीर राजी भा. ३१ पा. ११७)

दुर्दैव हे की अशा पोकळ निवेदनांना मोठमोठया भाष्यांमध्ये स्थान मिळाले आहे.

७. म्हणजे धिटाईची व निर्दयतेची कमाल आहे की ईमानधारकांच्यावर असा हृदयाला पीळ पाडणारा जुलूम करतांना त्यांना थोडादेखील संकोच वाटला नाही. याउलट त्यांची नैतिक जाणीव इतकी मृतवत झाली होती की ते मोठया निर्लज्जपणे ईमान धारक जळत असल्याचे दृश्य पाहात राहीले.

८. म्हणजे ईमान धारकांचा काही गुन्हा होता तर तो फक्त हा की ते अल्लाहवर खऱ्या अर्थाने ईमान ठेवित होते. म्हणजे जे सर्वात मोठे सत्कृत्य होते तेच या अत्याचाऱ्यांच्या नजरेत गुन्हा ठरले.

९. या आयतींमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहचे जे गुणविशेष वर्णन केले गेले आहेत. याचा उद्देश हे स्पष्ट करणे आहे की तीच शक्ती या योग्य आहे की तिच्यावर ईमान ठेविले जावे आणि तिच्याशी संबंध स्थापित केला जावा.

१०. यामध्ये अत्याचारी लोकांना तंबी दिली आहे की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्वकाही पाहात आहे तेव्हा तुमचा जुलूम त्याच्या नजरेतून सुटू शकत नाही. एकेदिवशी तुमची पकड होणार आहे तुम्हांला ईश्वरी न्यायालयाच्या कठडयांत उभे रहावे लागणार आहे.

ज्या लोकांनी ईमानाचा स्वीकार केला आणि चांगले आचरण केले, निःसंशय त्यांच्यासाठी बागा आहेत ज्याखालून जलप्रवाह वाहात असतील. ही आहे महान सफलता. *(अल-क़ुर्आन)*

१०. ज्या लोकांनी मोमिन (ईमानाचा स्वीकार केलेल्या) पुरुषांचा आणि मोमिन (ईमानाचा स्वीकार केलेल्या) स्त्रियांचा छळ केला आणि नंतर तौबा (पश्चात्तापपूर्वक क्षमायाचना) केली नाही त्यांच्यासाठी अपरिहार्यपणे जहन्नमची शिक्षा आहे. आणि त्यांच्यासाठी जळण्याची शिक्षा आहे. [११]

إِنَّ الَّذِينَ فَتَنُوا الْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَاتِ ثُمَّ لَمْ يَتُوبُوا فَلَهُمْ عَذَابُ جَهَنَّمَ وَلَهُمْ عَذَابُ الْحَرِيقِ ﴿١٠﴾

११. ज्या लोकांनी ईमानाचा स्वीकार केला [१२] आणि चांगले आचरण केले, नि:संशय त्यांच्यासाठी बागा आहेत ज्याखालून जलप्रवाह वाहात असतील. ही आहे महान सफलता. [१३]

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ لَهُمْ جَنَّاتٌ تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ ۚ ذَٰلِكَ الْفَوْزُ الْكَبِيرُ ﴿١١﴾

१२. नि:संशय तुमच्या पालनकर्त्याची पकड मोठी सक्त आहे. [१४]

إِنَّ بَطْشَ رَبِّكَ لَشَدِيدٌ ﴿١٢﴾

१३. तोच प्रथम जन्मास घालतो आणि तोच दुसऱ्यांद जिवंत करील. [१५]

إِنَّهُ هُوَ يُبْدِئُ وَيُعِيدُ ﴿١٣﴾

१४. आणि तो क्षमा करणारा, [१६] प्रेम करणारा आहे. [१७]

وَهُوَ الْغَفُورُ الْوَدُودُ ﴿١٤﴾

१५. ‘अर्श’चा (सिंहासनाचा) स्वामी, [१८] साक्षात महानता. [१९]

ذُو الْعَرْشِ الْمَجِيدُ ﴿١٥﴾

१६. आणि जे इच्छिल ते करून टाकणारा. [२०]

فَعَّالٌ لِّمَا يُرِيدُ ﴿١٦﴾

१७. काय तुम्हाला सैन्यांची बातमी कळाली आहे ?

هَلْ أَتَاكَ حَدِيثُ الْجُنُودِ ﴿١٧﴾

१८. ‘‘फिरऔन’’ [२१] व ‘‘समूद’’ [२२] च्या सैन्यांची.

فِرْعَوْنَ وَثَمُودَ ﴿١٨﴾

१९. परंतु हे काफिर (इनकार करणारे) खोटे ठरविण्यातच गर्क आहेत.

بَلِ الَّذِينَ كَفَرُوا فِي تَكْذِيبٍ ﴿١٩﴾

११. ही कडक धमकी त्या लोकांना दिली गेली आहे ज्यांनी ईमानधारक स्त्री-पुरूषावर निव्वळ यासाठी अत्याचार केले की त्यांना इस्लामपासून परावृत्त करावे. जळण्याच्या शिक्षेचा उल्लेख खास करून करण्यांत आला आहे. कारण त्या अत्याचारी लोकांनी निष्ठावान ईमान धारकांना आगीत जिवंत जाळले होते. अशा लोकांना जहन्नम मध्ये दुसऱ्या शिक्षांबरोबर खास करून भयानक स्वरूपाच्या आगीमध्ये जळण्याच्या शिक्षेची मजा पण चाखावी लागेल.

या आयतीने दुय्यमपणे हे ही स्पष्ट झाले की एवढा मोठा गुन्हा करणारा गुन्हेगारही जर तौबा करून (पश्चाताप पावून) आपली सुधारणा करून घेतो, तर त्याच्यासाठी क्षमेची द्वारे खुली आहेत.

१२. म्हणजे जुलूमजबरदस्ती होत असतांनादेखील लोक आपल्या ईमानामध्ये अढळ राहीले.

१३. म्हणजे मोठी सफलता, ऐहिक संपन्नता प्राप्त करणे ही नव्हे, तर जन्नत प्राप्त करणे होय.

१४. म्हणजे अत्याचारी लोकांनी या भ्रमात राहू नये की ते अल्लाहच्या पकडीपासून वाचू शकतील.

१५. म्हणजे निवाडयासाठी माणसाला पुन्हा जिवंत केले जाईल आणि हे पुन्हा जिवंत करणे त्या शक्तीसाठी काही कठीण नाही ज्याने प्रथम जिवंत केले आहे.

१६. तो क्षमा करणारा आहे. म्हणून जर तुम्ही तौबा केली आणि आपल्या आचरणापद्धतीमध्ये सुधारणा केली तर तुम्ही क्षमेस पात्र होऊ शकता.

१७. म्हणजे तो आपल्या दासांबद्दल तिटकारा नव्हे तर प्रेम बाळगतो. अट ही की त्यांनी त्याचे निष्ठावान दास बनून राहावे.

१८. 'अर्श' चा अर्थ सिंहासन याने अभिप्रेत सर्वश्रेष्ठ अल्लाहचे सिंहासन आहे. ज्याचे स्वरूप आम्हाला माहित नाही.

येथे सिंहासनाचा स्वामी असा उल्लेख करून हे स्पष्ट करावयाचे आहे की साऱ्या विश्वावर त्याची सत्ता कायम आहे. आणि एकटा तोच शासन चालवीत आहे. म्हणून त्याच्याविरुद्ध द्रोह करणारे आणि त्याच्या निष्ठावान दासांवर अत्याचार करणारे लोक त्याच्या पकडीपासून कदापिही वाचू शकत नाहीत.

१९. म्हणजे श्रेष्ठता व भव्यता हे त्याचे गुणविशेष आहेत आणि या श्रेष्ठतेत व भव्यतेत त्याचा कोणी सहभागी नाही आणि म्हणून दासांचा त्याच्या भव्यतेच्या कल्पनेने थरकाप उडाला पाहिजे.

२०. म्हणजे जगातील कोणतीही शक्ती अशी नाही जी त्याच्या कार्यात व त्याच्या योजनेत हस्तक्षेप करू शकते.

२१. पाहा सूरे नाजियात नोट.नं.१३

२२. "समूद" हे एका जातीचे नाव आहे जी "हिज्र" (मदीना व तबूक दरम्यानचा भाग) मध्ये वसत होती. या जमातीचा काल हज़रत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांच्या कालापूर्वीचा आहे आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने या जमातीकडे हज़रत सालेह (अलैहिस्सलाम) यांना पैगंबर बनवून पाठविले होते. परंतु या जमातीने विद्रोह केला आणि परिणामी तिला कडक शिक्षा दिली गेली. या जमातीच्या नाशाचे अवशेष आजही हिज्रच्या भागात आढळून येतात आणि ते पुकारत आहेत की बोधप्रद नजरेने माझ्याकडे पाहा.

फिरऔन आणि समुदना या जगातील वैभव व सत्ता प्राप्त झाली होती. पण ते सत्तेच्या धुंदीत जुलूम, अत्याचार व द्रोह करू लागले होते. परंतु जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना पकडले तेव्हा त्यांना फार वाईट परिणामाला तोंड द्यावे लागले.या ऐतिहासिक घटनांकडे इशारा करीत पवित्र कुरआन आपल्या श्रोत्यांना सांगत आहे की काय तुम्हीपण त्यांच्यासारखेच वागून तसाच शेवट पाहू इच्छिता?

२०. आणि अल्लाहने त्यांना त्यांच्या मागून व पुढून वेढलेले आहे.[२३]

وَّاللّٰهُ مِنْ وَّرَآئِهِمْ مُّحِيْطٌ ﴿٢٠﴾

२१. (हा खोटा ग्रंथ नाही) तर हे महान कुरआन आहे.

بَلْ هُوَ قُرْاٰنٌ مَّجِيْدٌ ﴿٢١﴾

२२. जे लौहे महफूजमध्ये [२४] (सुरक्षित शिलेवर) लिहिलेले आहे.

فِىْ لَوْحٍ مَّحْفُوْظٍ ﴿٢٢﴾

२३. म्हणजे हे खोटे ठरवू इच्छितील तर ठरवोत, परंतु त्यामुळे वस्तुस्थितीत काही फरक पडत नाही. ते पूर्णपणे अल्लाहच्या पकडीत सापडलेले आहेत. यापासून सुटून ते कोठेही पळू शकत नाहीत.

२४. ''लौहे महफूज'' (सुरक्षित शिला) चा अर्थ सुरक्षित असा तक्ता आणि याने अभिप्रेत ती पवित्र शिला आहे ज्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपली वचने लिहिली आहेत. त्यावरील लिखाण अटळ आहे. आणि त्या शिलेपर्यंत कोणताही माणूस अगर जिन पोहचू शकत नाही. पवित्र कुरआन ही एखादी काल्पनिक व सिद्धांतिक गोष्ट नव्हे आणि ना तो एखाद्या तांत्रिकाचा ग्रंथ आहे. याउलट त्याचा उगम त्या स्वच्छ झाऱ्यामधून होतो ज्याला सुरक्षित शिला म्हटले जाते. आणि म्हणून यातील प्रत्येक गोष्ट सत्य आहे आणि ती घडणार आहे.

# सूरह अत-तारिक

# ८६. सूरह अत-तारिक

**नांव :** आयत नं. १ मध्ये ''अत्तारिक'' (रात्री प्रकट होणारे तारे) चा उल्लेख झाला आहे. या संदर्भात या सुरतीचे नांव 'अत्तारिक' ठेवले गेले आहे.

**अवतरण काळ:** ही सूरत मक्केमध्ये उतरली आहे आणि ही त्यावेळी उतरलेली आहे जेव्हा मक्केच्या रहिवाशांना हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)यांचे आवाहन पोहोचले होते परंतु ते यांची थट्टा उडवून त्याविरूद्ध डावपेच लढवीत होते.

**मध्यवर्ती विषय:** जाब विचारण्यासाठी माणसाला पुन्हा जिवंत करणे हा आहे.

**ग्रंथ मांडणी:** प्रत्येक माणसाचे निरीक्षण होत आहे आणि त्याला हिशेब देण्यासाठी ज्या दिवशी बोलावले जाणार आहे तो दिवस येणार आहे.

यावर आयत नं.१ ते ४ मध्ये आकाश व ताऱ्यांची साक्ष आहे.

आयत नं. ५ ते ८ मध्ये माणसाच्या निर्मितीपासून त्याला पुन्हा जिवंत केले जाणार आहे यावर युक्तीवाद.

आयत नं. ९ व १० मध्ये वस्तुस्थितीचे प्रकटीकरण की त्या दिवशी सारी रहस्ये पारखली जातील आणि माणूस अगदी विवश होईल. त्याला कोठूनही काहीही मदत मिळणार नाही.

आयत नं. ११ ते १४ मध्ये आकाश व जमिनीची साक्ष या गोष्टीबद्दल दिली गेली आहे की पवित्र कुरआन ''यौमे जजा'' मोबदल्याच्या दिवसाची जी खबर देत आहे ती ठरविण्यात आलेली एक अटळ गोष्ट आहे.

आयत नं. १५ ते १७ मध्ये समारोप आहे यामध्ये इन्कार करणाऱ्या काफिर लोकांना खबरदार करून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे सात्वन केले गेले आहे की त्या लोकांचे डावपेच त्यांच्यावरच उलटतील. अलबत, त्यांना थोडा अवधी द्या. त्यांचा शेवट समोर येणारच आहे.

# ८६. सूरह तारिक

سُورَةُ الطَّارِق

आयती - १७

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे [१] आकाशाची [२] आणि रात्री प्रकट होणाऱ्याची,

وَالسَّمَآءِ وَالطَّارِقِ ۞١

२. आणि तुम्हाला काय माहित की रात्री प्रकट होणारा काय आहे ? [३]

وَمَآ اَدْرٰىكَ مَا الطَّارِقُ ۞٢

३. चमकणारा तारा, [४]

النَّجْمُ الثَّاقِبُ ۞٣

४. असा कोणीही माणूस नाही ज्याच्यावर एक पहारेकरी नाही.[५]

اِنْ كُلُّ نَفْسٍ لَّمَّا عَلَيْهَا حَافِظٌ ۞٤

५. माणसाने थोडा विचार करावा की तो कोणत्या वस्तूपासून निर्माण केला गेला आहे.[६]

فَلْيَنْظُرِ الْاِنْسَانُ مِمَّ خُلِقَ ۞٥

६. उंचबळणाऱ्या पाण्यापासून. [७]

خُلِقَ مِنْ مَّآءٍ دَافِقٍ ۞٦

७. जे पाठीच्या मणका व फासळयांमधून निघते.[८]

يَّخْرُجُ مِنْ بَيْنِ الصُّلْبِ وَالتَّرَآئِبِ ۞٧

८. खात्रीने तो (अल्लाह) त्याला परतविण्यास समर्थ आहे.[९]

اِنَّهٗ عَلٰى رَجْعِهٖ لَقَادِرٌ ۞٨

९. ज्या दिवशी लपलेल्या गोष्टी पारखल्या जातील.[१०]

يَوْمَ تُبْلَى السَّرَآئِرُ ۞٩

१०. त्यावेळी त्याच्या जवळ ना काही शक्ती असेल आणि ना त्याचा कोणी सहाय्यक असेल.[११]

فَمَا لَهٗ مِنْ قُوَّةٍ وَّلَا نَاصِرٍ ۞١٠

१. शपथेच्या खुलाशासाठी पाहा सूरह तकवीर टीप नं. १४.

२. आकाशाच्या खुलाशासाठी पाहा सूरह इन्शिकाक टीप नं. १

३. हा प्रश्न ''रात्री प्रकट होणाऱ्याचे'' महत्त्व स्पष्ट करण्यासाठी आहे. म्हणजे रात्री प्रकट होणारी गोष्ट अशी नाही की तिच्याकडे दुर्लक्ष केले जावे. उलट ती तर तुम्हाला विचार करण्याचे आवाहन करीत आहे. म्हणून तिच्यावर शांतपणे विचार करा. आणि या विचाराचा निव्वळ ''माहितीत'' भर घालणे हा नसावा.

४. اَلنَّجۡمُ الثَّاقِبُ ''अन्नज्मुस्साकिब'' (चमकणारा तारा) ने अभिप्रेत एखादा विशिष्ट तारा नव्हे, ताऱ्यांच्या जातीच्या संबंधी हा शब्द आला आहे. म्हणजे ते सर्व तारे जे फार चमकदार व नयनरम्य दिसतात. आणि त्यांना प्रत्येक माणूस उघडया डोळयांनी पाहतो.

आकाशामध्ये विखुरलेले तारे इतके विपुल आहेत की त्यांची निश्चित संख्या जाणणे वैज्ञानिक प्रगती झाली असतानादेखील आजच्या खगोलशास्त्राला (Astronomy) शक्य झालेले नाही. आधुनिक खगोलशास्त्रांच्या अंदाजानुसार ज्या आकाशगंगेत आमची जमीन खरोखर आहे. त्यामध्ये सुमारे एक महापदम (One Billion) तारे असतील. (The Cambridge Ency. of Astronomy P. 313)

यावरून आकाशाच्या विशालतेचा अंदाज केला जाऊ शकतो, ज्याला पुरावा म्हणून या सूरतीत सादर केले गेले आहे.

अंगणित ताऱ्यांमधून चमकणाऱ्या ताऱ्यांना येथे पुरावा म्हणून सादर केले गेले आहे. कारण आपल्या झगमगाटामुळे प्रत्येक पाहाणाऱ्याचे लक्ष ते आपल्याकडे वेधून घेतात. आणि डोळ्यांना 'अंतिम ठिकाणा'चा पत्ता दाखवितात.

५. ही ती गोष्ट आहे जिच्याबाबतीत आकाश व चमकणाऱ्या ताऱ्यांचा पुरावा सादर केला गेला आहे. हा पुरावा या अर्थी आहे की आकाशावरील ताऱ्यांचा झगझगाट माणसाला फक्त अवलोकनाचे आवाहन करीत नसून तो माणसाला विचार करण्याचेही आवाहन करीत आहे. रात्र येताच आकाशाला दीपमाळांनी सजविले जाते आणि दीपमाला ही इतक्या प्रकाशमान की त्यांचा चमकदारपणा बुद्धीला आश्चर्यचकीत करून सोडतो. आणि सांप्रतच्या खगोलशास्त्राच्या प्रकटी करणाने- ज्यानुसार काही तारे तर इतक्या अंतरावर आहेत की त्यांचा प्रकाश जमिनीपर्यंत पोहोचण्यास कितीतरी प्रकाशवर्षे लागतात - माणसाला अधिक आश्चर्यचकीत करून सोडले आहे. काय हे दर्शन आपल्या निर्मात्याच्या कमाल सामर्थ्याचा आणि तो विश्वाच्या थोर साम्राज्याचा शासक असल्याचा पुरावा देत नाही? आणि काय ते माणसामध्ये ही जाणीव निर्माण करीत नाही की या श्रेष्ठ शासकाच्या राज्यात माणसाची ही योग्यता होऊच शकत नाही की तो मनमानेल ते करण्यास स्वतंत्र आहे आणि विश्वाच्या सम्राटासमोर त्याला जाब द्यावयाचा नाही? हे निरीक्षण – जर ते पूर्वग्रहदुषित नसेल व वस्तुनिष्ठ असेल तर ते – माणसामध्ये जबाबदारीची जाणीव अवश्य निर्माण करते. आणि येथूनच ईश्वरासमोर जाब देण्याची आणि शिक्षा ईनामाची कल्पना निर्माण होते. आणि हीच ती वस्तुस्थिती आहे जिच्याबद्दल पैगंबर माणसाला खबरदार करू इच्छितात. आणि हेच ते आवाहन आहे ज्याला पवित्र कुरआन जगाच्या लोकांसमोर सादर करीत आहे.

आणि जर या वस्तूस्थिचा इन्कार केला जाऊ शकत नाही की माणूस एक जबाबदार प्राणी आहे तर याची आवश्यक निकड ही आहे की त्याच्या आचारिक जीवनाचे रेकॉर्ड तयार केले जावे. म्हणजे ईश्वरासमोरील हजेरीच्या दिवशी त्या आधारावर शिक्षा वा इनामाचा निर्णय व्हावा. पवित्र कुरआन सांगत आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने याची पूरेपूर व्यवस्था केली आहे. प्रत्येक माणसाबरोबर निरीक्षक फिरिशत्ये ठेविले गेले आहेत जे त्याच्या प्रत्येक उक्तीची व प्रत्येक कृतीची नोंद ठेवितात आणि त्याच्या आचारिक जीवनाचे पुरे रेकॉर्ड तयार करीत असतात.

६. आखिरतचा इन्कार करणाऱ्याचा सर्वात मोठा आक्षेप हा होता की माणसाला पुन्हा जिवंत करणे शक्य नाही. त्यांच्या या आक्षेपाचे उत्तर कुरआनने हे दिले आहे की हे इन्कार करणारे अल्लाहला सर्वशक्तीमान समजत नाहीत व म्हणून त्यांच्या दृष्टीने माणसाला त्याच्या मृत्यूनंतर उठवून उभे करणे शक्य नाही. परंतु अल्लाहच्या सामर्थ्याची ही कल्पना पूर्णपणे निराधार आहे आणि तिचे खंडन विश्वाची प्रत्येक वस्तू करीत आहे. या बाबतीत माणसाने त्याच्या स्वत:च्या निर्मितीवरच विचार केल्यास सहजपणे त्याला ही गोष्ट कळेल की ज्या शक्तीने माणसाला प्रथम निर्माण केले ती त्याला दुसऱ्या वेळेसही निर्माण करू शकते.

७. अभिप्रेत वीर्य आहे.

८. पाठीचा मणका व फासळयांमधून निघण्याचा अर्थ हा नव्हे की वीर्य पाठीच्या मणका व फासळयांच्या आंतून बाहेर पडते. तर त्याचा अर्थ हा आहे की मानवी शरीराच्या या पोकळीत ज्याच्या एका बाजूला पाठीचा मणका आहे आणि दुसरीकडे फासळया आहेत. एक द्रव पदार्थ तयार होतो. आणि तेथून तो पिचकारी मारल्याप्रमाणे बाहेर पडतो. مِنۡۢ بَيۡنِ ''मिम्बैनि''

(मधून) हे शब्द याच अर्थाने पवित्र कुरआनमध्ये वापरले गेले आहेत. सूरह नहल आयत नं. ६६ मध्ये आहे.

نُسْقِيْكُمْ مِمَّا فِيْ بُطُوْنِهٖ مِنْۢ بَيْنِ فَرْثٍ وَّدَمٍ لَّبَنًا

خَالِصًا سَآئِغًا لِّلشّٰرِبِيْنَ۔

''नुस्कीकुम मिम्मा फी बुतुनिही मिम्बैनि फरसिव्व दमिल लबनन खालिसन साइगल-लिश्शारिबीन.''

''आम्ही याच्या पोटातून शेण व रक्त यामधून तुम्हाला शुद्ध दुध पाजतो जे पिणाऱ्यांसाठी अत्यंत स्वादिष्ट पेय आहे.''

स्पष्ट आहे की या आयतीमध्येही مِنْۢ بَيْنِ فَرْثٍ وَّدَمٍ ''मिम्बैनी फरसिन व दमिन'' (शेण व रक्त यामधून) चा अर्थ हा नव्हे की शुद्ध दूध शेण व रक्ताच्या आतून निघते. तर याचा अर्थ हा की, ज्या शरीरात शेण व रक्तासारख्या गलीच्छ वस्तू निर्माण होतात, त्याच शरीरात शुद्ध दूधासारखा रूचकर पदार्थ देखील तयार होतो. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्य नैपुण्याचा व त्याच्या श्रेष्ठ चातुर्याचा पुरावा आहे. याचप्रमाणे विचाराधीन आयतीमध्ये देखील सांगण्याचा हेतू हा आहे की मानवी बांध्यामधून फार विलक्षण पद्धतीने तो पदार्थ बाहेर पडतो, जो असतो क्षुल्लक पण त्याने माणसासारखा श्रेष्ठ प्राणी निर्माण होतो. काय ही गोष्ट सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या सामर्थ्य श्रेष्ठतेचा आणि त्याच्या उत्कृष्ट कलानैपुण्याचा पुरावा नाही? मग त्याच्या बाबतीत हे अनुमान करण्यास काय आधार राहतो की माणसाला जिवंत करणे अशक्य आहे?

स्पष्ट असो की पाठीचा मणका आणि फासळयांमधून वीर्य बाहेर पडण्याचा जो उल्लेख केला गेला आहे त्याने या गोष्टीचे खंडन होत नाही की वीर्य वीर्यपेशी (Seminal Vesicles) मधून बाहेर पडते. कारण वीर्यपिशवी पोटाच्या पोकळी (Abdominal) मध्ये असतो, जो शेवटीच्या फासळीच्या खालील भाग आहे. आणि ज्याच्या दुसऱ्या बाजूस पाठीचा कणा आहे. आणि म्हणून व्यापक अर्थाने या बांध्यामधूनच बाहेर पडते ज्याचा पुढील भाग फासळया आहे तर मागील भाग पाठीचा कणा आणि पवित्र कुरआन आठवण करून देण्यासाठी एखादी गोष्ट सांगते तेव्हा ती सामान्य व व्यापक अर्थी असते. ती तांत्रिक भाषेत नसते आणि म्हणून कुरआनने वीर्याच्या बाहेर पडण्यासंबंधी येथे जे काही निवेदन केले आहे त्याचा शरीरशास्त्राच्या (Anatomy) परिभाषेत विचार करणे योग्य होणार नाही. माणसाची निर्मिती ज्या वीर्याने होते त्यावर विचार करण्याचे आवाहन कुरआनने केले आहे. आणि जेव्हा आम्ही आधुनिक शोधांचा अभ्यास करतो तेव्हा आपल्या निर्मात्याच्या सामर्थ्याच्या चमत्कारांना पाहून थक्क होतो. आधुनिक शोधांनुसार एकावेळी जे वीर्य (Semen) पडते त्याचे प्रमाण २ ते ५ मिलीलीटर असते. आणि प्रत्येक मिलीलीटरमध्ये ४० ते १०० दशलक्ष (Spermatoza) शुक्रजंतु (40 to100 millions) असतात. (Text Book of Physiology by George Bell - Edinburgh P. 643) म्हणजे पुरूषाच्या एका वेळेच्या वीर्यस्खलनामध्ये इतकी शक्ती असते की तो पन्नास कोटी माणसे निर्माण करू शकतो. ही वेगळी गोष्ट की त्याच्या निर्मात्याने या जंतूच्या फलनाची (Fertilize) अशी व्यवस्था केली आहे की एकावेळी एक अगर दोन जंतूपेक्षा अधिक जंतू फलनक्षम होतच नाहीत. अशाप्रकारे माणसाच्या निर्मितीचे प्रमाण मर्यादेबाहेर जात नाही. अल्लाहच्या सामर्थ्याच्या या चमत्काराचे दर्शन काय माणसामध्ये त्याच्या अमर्याद सामर्थ्याचा विश्वास निर्माण करीत नाही? आणि काय ते त्याला हे मान्य करावयास भाग पाडीत नाही की मेलेल्या माणसाला पुन्हा उठविणे अल्लाहसाठी काही अवघड नाही?

९. परतविण्याने अभिप्रेत माणसाला शरीरासह दुसऱ्या वेळी जिवंत करणे आहे. आणि हे कियामतीच्या दिवशी घडेल.

१०. म्हणजे त्या दिवशी कोणतेही रहस्य, रहस्य रहाणार नाही. माणसाच्या अंतर्गत स्थितीचा समाचार स्पष्ट होऊन समोर येईल. त्याचा हेतू, त्याचा इरादा, त्याच्या आचरणाच्या प्रेरणा आणि त्या गरजा व उद्देश ज्या त्याच्या आचरणामागे होत्या – सर्व उघड होऊन समोर येतील. जणू त्याच्या मनाची चाचणी (Screen Test) बाहेर घेतली जाईल. आणि त्याच्या हेतूमध्ये जेथे दोष असेल तो ठळकपणे उघड होईल. त्यादिवशी माणसाला अंदाज होईल की तो सत्याला खोटे ठरविण्यासाठी जी सर्व शक्ती पणास लावीत होता, त्यामागे त्याच्या काय गरजा होत्या ज्या त्याने आपल्या मनामध्ये लपविल्या होत्या.

११. अर्थ हा की ना तो स्वत: आपले रक्षण करू शकेल ना दुसऱ्या कोणी त्याचा सहाय्यक बनून उभा राहील.

**शपथ आहे आकाशाची जे पावसाचा वर्षाव करते. आणि जमिनीची जी दुभंगते, की ही एक ठरलेली गोष्ट आहे,हास्यविनोद नव्हे.हे लोक एक डाव करीत आहेत,आणि मी देखील एक डाव करीत आहे. *(अल-कुर्आन)***

| | |
|---|---|
| ११. शपथ आहे आकाशाची जे पावसाचा वर्षाव करते.[१२] | وَالسَّمَآءِ ذَاتِ الرَّجْعِ ﴿١١﴾ |
| १२. आणि जमिनीची जी दुभंगते.[१३] | وَالْاَرْضِ ذَاتِ الصَّدْعِ ﴿١٢﴾ |
| १३. की ही एक ठरलेली गोष्ट आहे.[१४] | اِنَّهٗ لَقَوْلٌ فَصْلٌ ﴿١٣﴾ |
| १४. हास्यविनोद नव्हे.[१५] | وَّمَا هُوَ بِالْهَزْلِ ﴿١٤﴾ |
| १५. हे लोक एक डाव करीत आहेत.[१६] | اِنَّهُمْ يَكِيْدُوْنَ كَيْدًا ﴿١٥﴾ |
| १६. आणि मी देखील एक डाव करीत आहे.[१७] | وَّاَكِيْدُ كَيْدًا ﴿١٦﴾ |
| १७. तर काफिरांना ढील द्या. फक्त थोडी ढील. | فَمَهِّلِ الْكٰفِرِيْنَ اَمْهِلْهُمْ رُوَيْدًا ﴿١٧﴾ |

१२. ''आकाशामधून पावसाचा वर्षाव'' हा वरून पावसाचा वर्षाव होणे या अर्थी एक सामान्य वाक्‌प्रचार आहे.

१३. म्हणजे पावसाचा वर्षाव झाल्याबरोबर जमिनीतील छिद्रे उघडी होतात आणि त्यामध्ये फटी पडून जमीन वनस्पती उगविते. म्हणजे जी जमीन मृतवत पडली होती. ती पाऊस झाल्याबरोबर जिवंत होऊन टवटवीत होते. हे निरीक्षण माणूस रात्रदिवस करीत असतो. यालाच येथे मृत्यूनंतरच्या जीवनाच्या समर्थनार्थ सादर केले जात आहे. म्हणजे जो ईश्वर मृत जमिनीला जिवंत करू शकतो तो मृतांना का नाही उठवू शकत? काय या निरीक्षणाने हा विश्वास निर्माण होत नाही की जी जमीन पावसामुळे ईश्वराच्या आज्ञेने वनस्पीतींना ओकून टाकते ती त्याच्या आज्ञेने मृत व्यक्तींना का नाही ओकून टाकणार?

ओघाओघाने, येथे एकेश्वरवादाचा पैलूपण स्पष्टपणे समोर आला आहे. कारण आकाशाचे पावसाचा वर्षाव करणे आणि जमिनीने ते पाणी शोषून घेऊन वनस्पती उगविणे या गोष्टी याशिवाय होऊ शकत नाहीत की त्या दोघांची व्यवस्था एका ईश्वराच्या हाती असावी. यावरून सिद्ध झाले की जो जमिनीचा ईश्वर आहे तोच आकाशाचा ईश्वर आहे. नाहीपेक्षा आकाश व जमिनीमध्ये इतपत परस्पर अनुकूलता व सहकार्य झालेच नसते. यामुळे या अनेकेश्वरवादी कल्पनेचे मूळ नष्ट होते की आकाशाचा देव वेगळा आहे आणि जमिनीचा देव वेगळा आहे.

१४. म्हणजे कुरआन ज्या येणाऱ्या दिवसाची खबर देत आहे. ती एक ठरविण्यात आलेली निश्चित व अटळ अशी गोष्ट आहे.

१५. म्हणजे इतक्या महत्वाच्या खबरेला व इतक्या गंभीर गोष्टीला हास्यविनोद ठरविणे त्याच लोकांचे काम होऊ शकते. जे वस्तुनिष्ट बनू इच्छित नाहीत.

१६. म्हणजे हे इन्कार करणारे लोक पैगंबरांच्या आवाजाला दाबण्यासाठी आणि सत्याचा पराभव करण्यासाठी एक ना एक डाव रचितच असतात.

१७. म्हणजे इन्कार करणाऱ्यांच्या डावाची तोड मी पण करीत आहे. अर्थ हा की सर्वश्रेष्ठ अल्लाह इन्कार करणाऱ्याच्या डावांना अयशस्वी बनविण्यासाठी आणि त्यांना त्यांच्याच जाळयात फर्सावण्यासाठी अशा पद्धतीने उपाययोजना करीत आहे की त्यांना याचा काही अंदाज नाही.

आणि सत्य हे आहे की ज्या काफिर लोकांनी कुरआन आणि पैगंबरांच्याविरूद्ध डाव टाकले होते ते सर्व त्यांच्यावरच उलटले आणि ते वाईटरित्या पराभूत व अवमानित झाले. हा तर या जगात सत्याविरूद्ध डावपेंच करणाऱ्यांचा परिणाम आणि आखिरतमध्ये तर ते प्रत्यक्ष पाहतील. की त्यांनी जी कुऱ्हाड चालविली होती. ती स्वत:चाच पायांवर चालविली होती. आणि जी कबर खोदली होती तिच्यामध्ये त्यानांच दफन व्हावे लागणार आहे - दफनही आगीच्या कफनासह व्हावयाचे आहे.

१८. म्हणजे त्यांना आपले माप भरून घेऊ द्या, त्यांच्या परिणामाबाबत घाई करू नका. तर धीराने आपले कर्तव्य पार पाडीन जा - जी ढील या काफिरांना दिली जात आहे ती लवकरच समाप्त होईल आणि लवकरच त्यांची पकड होईल.

# सूरह
# अल-आअला

# ८७. सूरह अल आअला

**नाव:** पहिल्या आयतीमध्ये अल्लाहचा गुणविशेष ''अल आअला'' निवेदन झाला आहे. त्या संदर्भात या सूरतीचे नाव ''अल आला'' ठेविले गेले आहे.

**अवतरण काळ:** ही सूरत मक्केमध्ये उतरली आणि मजकूरावरून अंदाज होतो की ही त्यावेळी उतरली आहे जेव्हा संदेश (वही) उतरण्यास सुरूवात होऊन जास्त दिवस झाले नव्हते. आणि पैगंबरांना कुरआनचे ग्रहण करण्यासंबंधी ही शंका होती की कधी एखादी आयत विसरली जाईल. त्याचप्रमाणे आवाहनाचे व आठवण करून देण्याचे कार्य अगदी प्रथमावस्थेत होते.

**मध्यवर्ती विषय:** आखिरतचे कल्याण हा आहे. आणि त्याचा आधार अल्लाहचे मार्गदर्शन स्विकारणे हा आहे, जे कुरआनच्या स्वरूपात पैगंबरांच्यावर उतरत होते.

या सूरतीमध्ये संबोधन प्रत्यक्षपणे पैगंबरांना केले गेले आहे. आणि अप्रत्यक्षपणे ते कुरआनचे पठण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला. अलबत पुढे ऐहिकवाद लोकांनाही संबोधिले गेले आहे.

**ग्रंथ मांडणी:** आयत नं. १ ते ५ मध्ये अल्लाहचे पावित्र्य वर्णन करण्याची आदेश देऊन त्याचे गुणविशेष वर्णन केले गेले आहेत. म्हणजे माणसाने खऱ्या अर्थी अल्लाहला जाणणारा बनावे.

आयत नं.६ ते ८ मध्ये 'वही-अे-इलाही' अल्लाह च्या संदेशाला पैगंबरांच्या स्मरणात सुरक्षित केले जाण्याची खात्री दिली गेली आहे. यामध्ये अल्लाहचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचेसाठी समाधान व सत्याच्या प्रत्येक शोधकासाठी खात्री आहे.

आयत नं. ९ ते १५ मध्ये आठवण करण्याचा उपदेश करून दाखविले गेले आहे की यापासून कोण लोक फायदा उठवतील आणि कशा प्रकारचे लोक दूर राहतील आणि त्यांपैकी प्रत्येकाच्या वर्तनाचा निकाल आखिरतमध्ये काय लागेल.

आयत नं. १६ ते १९ हा सूरतीचा समारोप आहे. यामध्ये दाखविले गेले आहे की आखिरतच्या तुलनेत ऐहिक जीवनाला प्राधान्य देणे ही ती मूलभूत चूक आहे ज्यामुळे माणूस 'वही' (अल्लाहचा संदेश) च्या मार्गदर्शनापासून वंचित होतो. आणि त्याचा शेवट वाईट होतो. कुरआनमध्येच नव्हे तर त्यापूर्वीच्या 'सहीफे' मध्ये (ईश-पुस्तिकांमध्ये) देखील हीच गोष्ट सांगितली गेली आहे.

**श्रेष्ठत्व:** ही सूरत छोटी असूनही ''तौहीद'' (एकेश्वरवाद) ''रिसालत'' (प्रेषितत्व) व आखिरत (मृत्यूनंतरचे जीवन) या तिन्ही विषयांवर आधारलेली आहे. आणि आठवण करून देण्याचा व उपदेशाचा पैलू पण परिणामकारकपणे आलेला आहे. आणि म्हणून शुक्रवार व ईदच्या नमाजी मध्ये पठण करण्यासाठी ही सूरत अधिक योग्य ठरली आहे. हदीस मध्ये आहे की, अल्लाहचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) दोन्ही ईद आणि शुक्रवारच्या नमाजीमध्ये ''सूरे आला'' व ''सूरे गाशिया'' या सूरतीचे पठण करीत असत. (मुस्लिम)

# ८७. अल-आअला

سُوْرَةُ الْاَعْلٰى

आयती - १९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

सَبِّحِ اسْمَ رَبِّكَ الْاَعْلَى ۝١

१. आपल्या श्रेष्ठ [१] पालनकर्त्याच्या नावाचा जप करा आणि त्याची पवित्रता वर्णन करा.[२]

الَّذِىْ خَلَقَ فَسَوّٰى ۝٢

२. ज्याने निर्माण केले आणि प्रमाणशीर बनविले, [३]

وَالَّذِىْ قَدَّرَ فَهَدٰى ۝٣

३. ज्याने योजना बनविली [४] आणि मार्गदर्शन केले, [५]

وَالَّذِىْٓ اَخْرَجَ الْمَرْعٰى ۝٤

४. ज्याने चारा उगविला,

فَجَعَلَهٗ غُثَآءً اَحْوٰى ۝٥

५. नंतर त्याला काळा केरकचरा बनविला. [६]

سَنُقْرِئُكَ فَلَا تَنْسٰٓى ۝٦

६. (हे पैगंबरा !) आम्ही तुम्हाला शिकवू मग तुम्ही विसरणार नाही. [७]

اِلَّا مَا شَآءَ اللّٰهُ ۭ اِنَّهٗ يَعْلَمُ الْجَهْرَ وَمَا يَخْفٰى ۝٧

७. पण जे अल्लाह इच्छिल.[८] तो उघड गोष्टीलाही जाणतो आणि छुप्या गोष्टीलाही.[९]

وَنُيَسِّرُكَ لِلْيُسْرٰى ۝٨

८. आणि आम्ही तुमच्यासाठी सोपा मार्ग अनुकूल करून देऊ.[१०]

فَذَكِّرْ اِنْ نَّفَعَتِ الذِّكْرٰى ۝٩

९. म्हणून तुम्ही उपदेश करा, जर उपदेश करणे फायदेशीर असेल.[११]

१. 'रब' चे स्पष्टीकरण सूरह फातिहा टीप नं. ४ मध्ये आलेले आहे. येथे 'रब' चा गुणविशेष 'आअला' निवेदन केला गेला आहे. याचा अर्थ हा की तो ईश जो सर्व मानवांचा आणि साऱ्या निर्मितीचा पालनकर्ता, मालक व स्वामी आहे एक सर्वश्रेष्ठ व उच्चतम शक्ती आहे. तिचे वैभव व तिचा दर्जा फार उच्च आहे. माणूस स्वभावत: त्याला (अल्लाहला) जाणतो. आणि बुद्धि त्याला ओळखते. येथे ही गोष्ट समजून घेतली पाहिजे की या सर्वश्रेष्ठ उच्च शक्तीच्या मूळाची माहिती करून घेण्याचा आणि त्याला आपल्या बुद्धिच्या पकडीत घेण्याचा प्रयत्न अगदी निरर्थक आहे उर्दू कवी म्हणतो-

**''जो समझ में आ गया फिर वह ख़ुदा क्यों कर हुआ**
**अक़्ल से जो घिर गया ला इन्तिहा क्यों कर हुआ''**

**अनुवाद :-** झाले ज्ञान ज्याचे तो ईश कसा?
झाला जो बुद्धिने मर्यादित तो अमर्याद कसा?

जे लोक अल्लाहचा परीचय प्राप्त करण्याऐवजी त्याची वास्तविकता जाणून घेण्यामागे लागले ते तात्विक गोष्टींमध्ये गुरफटले जाऊन अगदी बहकले. उदा ज्यांनी त्याला ''आत्मा'' ठरविले ते साऱ्या वस्तूंमध्ये त्याचे अस्तित्व आहे असे मानू लागले.

"The sage sees all being in the Atman and the Atman in all beings."

(The Essence of principal upnishads p. 5)

ईश्वराबद्दल ही अत्यंत निकृष्ट अशी कल्पना आहे, जी 'शिर्क' चा-अनेकेश्वरवादाचा-पाया आहे. कुरआन या पायालाच उखडून टाकते. आणि ईश्वराच्या व्यक्तीत्वासंबंधी कयास करण्यास व तात्वीक वाद उभे करण्यास पूर्णपणे रोखते. तो त्याचे असे अध्यात्मिक ज्ञान प्रदान करते जे बुद्धीला तेज देणारे, मनाचे समाधान करणारे आणि माणसाला खऱ्या अर्थी ईश्वराचा परिचय घडविणारे आहे. हे अध्यात्मिक ज्ञान ईश्वराच्या गुणविशेषावर विचार केल्याने प्राप्त होते. आणि म्हणून पवित्र कुरआन ईश्वराच्या गुणविशेषाचा तपशीलवार व विपुल उल्लेख करते.

पालनकर्ता अल्लाह श्रेष्ठ आहे या गुणविशेषामुळे अनेकेश्वरवादी कल्पना खोटी ठरते. कारण त्या कल्पनेप्रमाणे ईश्वरामध्ये कोणी लहान आहे तर कोणी मोठा आहे. कोणी देव आहे तर कोणी महादेव याबरोबरच 'श्रेष्ठ' या गुणविशेषामुळे ही वस्तुस्थिती स्पष्ट होते की अल्लाह फक्त एक आहे. आणि तोच श्रेष्ठ व महान आहे. त्याच्याशिवाय कोणी ईश नाहीच. मग कोण मोठा असण्याचा काय प्रश्न? आणि मुळातच कोणी देव नाही. मग कोणी महादेव असण्याचा अर्थ काय?

२. या आज्ञेमध्ये तीन महत्वाचे आदेश सामावलेले आहेत.एक हा की सर्वश्रेष्ठ अल्लाहचे त्या नामानी स्मरण केले जावे. जी आपल्या अर्थ व संदर्भानी शुद्ध आणि त्याच्या वैभवास व त्याच्या प्रतिष्ठेस अगदी अनुरूप आहेत. ते अरबी भाषेतीलच शब्द हवेत असे नव्हे. ते कोणत्याही भाषेचे शब्द होऊ शकतात. फक्त अट ही की त्यामध्ये अनेकेश्वरवादाची कल्पना सामील नसावी. त्याचप्रमाणे त्यामध्ये एखाद्या दोषाचा व अप्रतष्ठेचा पैलू देखील नसावा. आणि म्हणून आम्ही उर्दू मध्ये अल्लाहला ''खुदा'' व ''परवरदिगार'' च्या नामानी स्मरण करतो. मराठी भाषेवर अनेकेश्वरवादी धर्माचा भरपूर प्रभाव आहे. यासाठी त्या भाषेत अल्लाहसाठी एखादे नाम ठरविताना मोठया सावधगिरीची आवश्यकता आहे. उदा 'राम' हे एका धार्मिक व्यक्तीचे नाव आहे. ज्यांना 'विष्णू' चा अवतार मानले जाते. (पाहा Moles Worth's Marathi English Dictionary Page 693) म्हणून या शब्दाला 'रहीम' च्या समानअर्थी समजून अल्लाहसाठी कदापिही वापरता येणार नाही. त्याचप्रमाणे 'शिव' अनेकेश्वरवादी धर्मामध्ये तीन देवापैकी (त्रिमूर्ती) एका देवाचे नाव आहे. त्याचबरोबर त्याचा अर्थ पुरूषाचे लिंग असाही होतो. (Students Sanskrit English Dictionary by Apte p. 556) शिवलिंगची पूजा ही केली जाते म्हणून यावरून कल्पना केली जाऊ शकते की अनेकेश्वरवादी लोकांनी आपल्या देवांची नावे ठेवण्यामध्ये कोणत्या बुद्धिचा पुरावा दिला आहे. نَعُوْذُبِاللّٰہِ مِنْ ذٰلِکَ (या पासून अल्लाह आमचे रक्षण करो)

दुसरा आदेश हा की त्याचे पावित्र्य वर्णन करा. म्हणजे त्याला सर्वप्रकारच्या वैगुण्य,दोष व अनेकेश्वरवादा पासून मुक्त ठरवा. आणि तिसरा आदेश हा आहे की त्याच्या पावित्र्याच्या कल्पनेसह त्याच्या नामाचा जप करीत राहा की त्याचेच नाम जपण्यालायक आहे.

हदीसमध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याच आयतीच्या आधारावर सज्दा करताना

سُبۡحَانَ رَبِّیَ الۡاَعۡلٰی

''सुबहान रब्बियल आअला'' (पवित्र आहे माझा पालनकर्ता श्रेष्ठ अल्लाह'')

हे म्हणण्याची आज्ञा केली आहे. सज्दामधील हा जप त्या आज्ञेचे पालन आहे जी या आयतीमध्ये दिली गेली आहे.

३. जर माणूस योगायोगाने अस्तित्वात आला असता तर त्याच्यामध्ये प्रमाणबद्धता, औचित्य व सौंदर्य निर्माण झाले

नसते. हा या गोष्टीचा उघड पुरावा आहे की त्याला सर्वश्रेष्ठ अल्लाहने निर्माण केले आहे.

४. म्हणजे माणसाची निर्मिती योजनेविना झालेली नाही. या उलट त्याच्या निर्मात्याने त्याची एक योजना बनविली. त्यानुसार त्याला या जगामध्ये ठराविक मुदतीपर्यंत कार्य करा वयाचे आहे. ही योजना थोडक्यात अशी. या जगातील हे जीवन कसोटीचे जीवन राहील. आणि प्रत्येक माणसाला कसोटीच्या निरनिराळया टप्प्यामधून जावे लागेल. आणि त्याला जी शक्ती व जी पात्रता दिली जाईल आणि जी साधने व ज्या व सवडी उपलब्ध करून दिल्या जातील त्या सर्व एका ठरविण्यात आलेल्या निर्णयानुसार असतात. आणि कुरआनच्या परिभाषेत याचे नाव ''तकदीर'' (भाग्य) आहे. म्हणजे अल्लाहची अगोदर तयार केलेली योजना.

५. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या या योजनेबद्दल माणसाला अंधारात ठेविलेले नाही, याउलट संक्षिप्तपणे याची जाणीव त्याच्या स्वभावातच ठेविली गेली आहे. ज्या आधारावर त्याचा विवेक त्याला वाईटाबद्दल टोचत असतो आणि चांग्यालावर तो समाधान पावतो. तो आपल्या जीवनाचा शेवट चांगला झाल्याचे पाहू इच्छितो. आणि आपल्या शेवट वाईट व्हावा असे तो इच्छित नाही. या दृष्टीने पाहिल्यास, माणूस स्वभावत: परीक्षागृहातच असल्याचे समजतो. या जाणीवेला जी गोष्ट जागी करते आणि अल्लाहच्या योजनेची चांगली माहिती देते ती अल्लाहची वही आहे-अल्लाहचा आदेश आहे; ज्याचा उल्लेख पुढील आयतींमध्ये येत आहे- जणू माणसाच्या निर्मात्याने त्याच्यासाठी गुप्त व उघड दोन्ही प्रकारच्या मार्गदर्शनाची व्यवस्था केलेली आहे. अंत:करणाचा आवाज हे गुप्त मार्गदर्शन आहे तर अल्लाहचा आदेश ग्रंथ हे उघड मार्गदर्शन. यानंतर माणूस जे काही करील त्यास तो जबाबदार आहे. आणि मग, माझ्या पालनकर्त्याने माझ्या मार्गदर्शनाची व्यवस्था केली नाही असे त्याला म्हणता येणार नाही.

६. म्हणजे जेव्हा गवत उगते ते हिरवेगार असते. परंतु एक वेळ अशी येते की ते काळा कचरा बनून जाते. हे एक उदाहरण आहे अल्लाहच्या योजनेचे जे या जगात अंमलात आहे. आणि यापासून हे मार्गदर्शन प्राप्त होते की साऱ्या जगासाठी सुद्धा अल्लाहची एक योजना आहे. आणि ती योजना ही आहे की हे जग अनिवार्यपणे नाश पावणार आहे, आणि त्यानंतर आखिरत प्रकट होणार आहे. आणि माणसाने या जगाची समृद्धी पाहून या खोटया विचाराला बळी पडू नये की हे जीवन सदा बहारदार राहील आणि कधी कोमेजणार नाही, नाश पावणार नाही.

७. या आयातीमध्ये हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधिले गेले आहे. आणि फर्माविले जात आहे की कुरआन स्वरूपात जो संदेश (वही) आम्ही उतरवीत आहोत त्याला तुमच्या मनात सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आम्ही पत्करली आहे. आणि म्हणून या गोष्टीची काही शंका नाही की याचा एखादा भाग तुम्ही विसराल. स्पष्ट असो की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) सुरवातीस या शंकेने की एखादी आयत वा शब्द विसरला जाईल,जेव्हा कुरआनचा एखादा भाग उतरत असे तेव्हा त्याचे ग्रहण करण्यात घाई करीत असत. सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे आश्वासन म्हणजे कुरआन आणि पैगंबरांच्या सत्यानिष्ठेचा पुरावा आहे. कारण संपूर्ण कुरआन हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अशाप्रकारे स्मरणात राहीले की ते त्यांचा एकही शब्द विसरले नाहीत. आणि त्यांनी अत्यंत निकोप स्थितीत संपूर्ण कुरआनला समाजाकडे सोपविले. आणि आज आमच्यासमोर त्याच्या लाखो, करोडो प्रती आपल्या मूळ स्वरूपात अशाप्रकारे उपलब्ध आहेत की कियामतीपर्यंत ते सुरक्षित राहण्याची व्यवस्था झाली आहे. जणू पवित्र कुरआन हा एक चिरस्थाई चमत्कार आहे. ज्याचे अवलोकन प्रत्येक काळातील लोक करू शकतात.

८. म्हणजे अल्लाहच जर विस्मरण घडवू इच्छिल तर गोष्ट वेगळी आहे.

९. इशारा आहे त्या गोष्टीकडे की, हे पैगंबरा ! कुरआनचे स्मरण करण्यासंबंधात तुमच्या मनात जी शंका आहे त्याचे सर्वश्रेष्ठ अल्लाहला ज्ञान आहे. परंतु तुम्ही बेचैन होऊ नका. कारण कुरआनचा धडा तुम्हांला ती शक्ती देत आहे जिचे ज्ञान सर्वव्यापी आहे. आणि तिने कुरआनला तुमच्या स्मरणात चांगल्या प्रकारे ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे.

१०. या आयतीद्वारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या समाधानाची अधिक व्यवस्था केली गेली आहे की, पवित्र कुरआनला जसेच्या तसे लोकांप्रत पहोचविणे कठीण आहे. तरीही सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्व अडचणींमधून तुमच्यासाठी सोपा मार्ग काढील.

कुरआनची ही भविष्यवाणी अक्षरश: पुरी झाली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे जरी निरक्षर होते तरी साऱ्या कुरआनचे पाठांतर करणे आपल्यासाठी सोपे झाले. त्याचबरोबर त्याला लोकांपर्यंत पोहोचविणे, त्याचा पाठ देणे, त्याच्या साह्याने आठवण करून देणे, त्याचे स्पष्टीकरण व खुलासा करणे त्यामधील गहन व चतुराईच्या गोष्टींना निवेदन करणे, त्यापासून अर्थ काढणे आणि त्याच्या आज्ञांची अंमलबजावणी करणे देखील सोपे झाले. आणि सर्वश्रेष्ठ

अल्लाहाने त्यांना थोडया अवधीत अशा सहकाऱ्यांचा लाभ करून दिला जे पवित्र कुरआनला चांगल्याप्रकारे व सुव्यवस्थितपणे लिहून ठेवू लागले. आणि त्यामुळे पुढे येणाऱ्या पिढयांसाठी व पवित्र कुरआन सुरक्षित राहण्याची व्यवस्था झाली. त्याचप्रमाणे आपल्याला असे कितीतरी सहकारी लाभले ज्यांनी आपल्या अंतकरणात पवित्र कुरआनला सुरक्षित करून ठेवले. यांना ''हुफ्फाज व कुर्रा'' म्हणतात. आणि त्यांचेकडून कुरआनच्या प्रसाराची बहुमोल सेवा घडली.

११. म्हणजे आवाहन व प्रचार आणि स्मरण व उपदेशाचे कार्य आंधळयापणे हात मारण्याचे काम नव्हे. स्थलकालाचा विचार करून चातुर्याने हात करण्याचे काम आहे. अनाठायी उपदेश केल्याने काही साध्य होत नाही. आणि आंधळया व बहिऱ्याला उपदेश करण्याचा काही फायदा नसतो. आणि म्हणून आवाहकाला जेव्हा असे वाटते की लोक ऐकायच्या मनस्थितीत नाहीत तेव्हा त्याने जबरदस्तीने त्यांना ऐकविण्याचा प्रयत्न करू नये.

याचा कदापिही हा अर्थ नव्हे की सर्वसामान्य बिघाडाला पाहून माणसाने अगोदरच हा निर्णय घेऊन गप्प बसावे की आवाहन व प्रचार आणि स्मरण व बोध करणे फायदेशीर नाही व म्हणून ते काम मूळापासून केलेच जाऊ नये. ही अशीच गोष्ट आहे, जसे एखाद्या डॉक्टरने लोकांच्या अपथ्याला पाहून आपला दावाखाना बंद करून घरी बसावे. किंवा आरोग्याच्या बाबतीत सामान्यपणे लोक बेपर्वा झाले आहेत आणि आरोग्यास नुकसानदायक वस्तूंचा वापर वाढलेला आहे, हे पाहून आरोग्य खात्याने जबाबदारीच सोडून द्यावी.

ज्या लोकांना पैगंबरांच्या प्रचार व आवाहनाच्या पद्धतीची माहिती आहे ते असा निर्णय कदापिही घेणार नाहीत. कारण पैगंबरांच्या आवाहनपद्धतीमध्ये चातुर्य व योग्य स्थळ व काळाचा विचार जरूर केलेला आढळून येईल. परंतु त्या पद्धतीमध्ये या गोष्टीचा काही पुरावा आढळून येणार नाही की सर्व सामान्य बिघाडला पाहून त्यांनी आपले कार्यच बंद व तहकुब केले. याउलट ते नेहमी विरोधकांच्या वादळाला तोंड देत राहिले. आणि सुधारणेचे जे कार्य होऊ शकले ते लाटांचा मारा सहन करीतच केले गेले आहे.

येथे निवेदन हे स्पष्ट होते की सार्वजनिक स्मरण तर पद्धती वरूनही घडवून आणलेच पाहिजे. अशाप्रकारे त्यांचा स्वीकार करणारे लोकही समोर येतील आणि त्यापासून दूर राहणारे लोकही.

१०. उपदेश कबूल करील तो जो भय बाळगत असेल, [१२]

سَيَذَّكَّرُ مَنْ يَّخْشٰى ﴿١٠﴾

११. आणि यापासून तोंड फिरवील तो जो मोठा दुर्भागी असेल.

وَيَتَجَنَّبُهَا الْاَشْقَى ﴿١١﴾

१२. तो मोठया आगीत दाखल होईल

الَّذِىْ يَصْلَى النَّارَ الْكُبْرٰى ﴿١٢﴾

१३. मग ना तो तिच्यामध्ये मरेल ना जगोल.[१३]

ثُمَّ لَا يَمُوْتُ فِيْهَا وَلَا يَحْيٰى ﴿١٣﴾

१४. यशस्वी झाला तो ज्याने शुद्धता अंगिकारली[१४]

قَدْ اَفْلَحَ مَنْ تَزَكّٰى ﴿١٤﴾

१५. आणि आपल्या पालनकर्त्याचे नाव घेतले [१५] आणि नमाज पढली.[१६]

وَذَكَرَ اسْمَ رَبِّهٖ فَصَلّٰى ﴿١٥﴾

१६. पण तुम्ही लोक जगाच्या जीवनाला प्राधान्य देत आहात.[१७]

بَلْ تُؤْثِرُوْنَ الْحَيٰوةَ الدُّنْيَا ﴿١٦﴾

१७. तथापि आखिरत फार उत्तम आणि कायम राहणारी आहे. [१८]

وَالْاٰخِرَةُ خَيْرٌ وَّاَبْقٰى ﴿١٧﴾

१८. ही (शिकवण) मागील बोध-पुस्तकांमध्येही (सहीफा) दिली गेली होती.

اِنَّ هٰذَا لَفِى الصُّحُفِ الْاُوْلٰى ﴿١٨﴾

१९. इब्राहीम आणि मूसा यांच्या बोध-पुस्तकांमध्ये.[१९]

صُحُفِ اِبْرٰهِيْمَ وَمُوْسٰى ﴿١٩﴾

१२. म्हणजे ज्या माणसाच्या मनात अल्लाहचे भय असेल तो पैगंबरांचे म्हणणे अवश्य लक्षपूर्वक ऐकेल. आणि त्या उपदेशाचा स्वीकार करील जो अल्लाहकडून कुरआनच्या स्वरूपाता पैगंबरांच्यावर उतरलेला आहे.

१३. म्हणजे जहन्नममध्ये ना तो जगण्याची मजा उपभोगू शकेल ना सर्व दु:ख संपविणारे मरण त्याला लाभेल. तो तर जीवनमरणाच्या संघर्षात गुरफटलेला असेल. माणसाने याची कल्पना केली तरी त्याचा थरकाप उडेल. व तो अल्लाहचा आश्रय मागू लागेल.

स्पष्ट असो की येथे त्या लोकांच्या शिक्षेच्या स्थितीचे वर्णन आहे जे पैगंबरांच्या उपदेशापासून दूर राहतात. आणि शेवटच्या वेळेपर्यंत या ''स्मरणाचा'' स्वीकार करीत नाहीत जे पैगंबरांच्यावर उतरलेले आहे.

१४. शुद्धता अंगिकारण्याशी अभिप्रेत बुद्धी व मनाची शुद्धता ही आहे. आणि आचार विचाराची शुद्धता ही आहे. बुद्धी व मनाची शुद्धता अंगिकारण्यासाठी आवश्यक आहे की माणसाने अनेकेश्वरवाद, नकार (कुफ्र) व नास्तिकतेच्या मलीनतेपासून स्वत:ला शुद्ध राखावे आणि अल्लाह व आखिरतवर ईमान बाळगावे. आणि आचार व विचाराचे पावित्र्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे की माणसाने वाईट-गोष्टींचा त्याग करून चांगले कार्य करीत रीहिले पाहिजे.

१५. आपल्या पालनकर्त्याचे नाव घेण्याने अभिप्रेत निव्वळ औपचारिकपणे नाव घेणे नव्हे. कारण अशाप्रकारे अनेकेश्वरवादीही आणि काफिरही (इन्कार करणारेही) ईश्वराचे नाव घेतात. नाव घेण्याने अभिप्रेत अल्लाहचे मनापासून व खऱ्या अर्थाने स्मरण करणे व तोंडाने खऱ्या नावाने त्याचा जप करणे.

१६. ''आपल्या पालनकर्त्याचे नाव घेतले व नमाज पढली'' याने या गोष्टीवर प्रकाश पडतो की नमाजची खरी प्रेरणा अल्लाहचे स्मरण ही आहे. हे स्मरणच दासाला त्यांच्या इबादतीसाठी प्रवृत्त करते. येथूनच खरी नमाज व औपचारीक नमाज मधील फरक स्पष्ट होतो. खरी नमाज हा अल्लाहच्या आठवणीचा परीणाम असतो. आणि तिच्यामध्ये आत्म्याप्रमाणे सामाविलेली असते. जणू आपल्या पालनकर्त्याचे स्मरण त्याला इबादतीसाठी बेचैन करीत असते. आणि त्याला नमाजमध्येच समाधान प्राप्त होते. याउलट औपचारीक नमाज म्हणजे ओझे उतारण्याचे काम आहे आणि म्हणून त्यामध्ये मन लागत नाही.

नमाजचा उल्लेख येथे ज्या अंदाजाने झाला आहे त्यावरून चांगल्याप्रकारे स्पष्ट होते की इस्लाममध्ये नमाजचे काय स्थान आहे. ही सूरह मक्केमधील वास्तव्याच्या पूर्व काळात उतरलेली सूरह आहे. आणि यामध्ये आखिरतच्या सफलतेसाठी जे गुण आवश्यक ठरविले गेले आहेत त्यामध्ये नमाजचा देखील समावेश आहे. आणि धर्मशास्त्राच्या आदेशांमध्ये तिला प्रथम स्थान प्राप्त आहे.

स्पष्ट असो की नमाजचा योगाशी (Yoga) काही संबंध नाही. कारण नमाज निर्भेळपणे अल्लाहची इबादत आहे. याउलट योगा म्हणजे अनेकेश्वरवाद पद्धतीची तपश्चर्या.

१७. म्हणजे आखिरतच्या सफलतेचा हा मार्ग, ज्यावर चालून माणूस बाह्य व अंतरंगात सुधारणा घडवून आणतो. तुम्ही यासाठी अंगिकारण्यास तयार नाही की तुमच्या दृष्टीने खरे महत्त्व या जीवनाचे आहे, आखिरतच्या जीवनाचे नव्हे. तुम्हाला काळजी आहे ती या जीवनाची आणि ऐषआराम इच्छिता तो याच जीवनात. या जीवनातील कोणत्याही फायद्याचा त्याग करण्यास तुम्ही तयार नाही. आणि हे समजता की येथे आज ''रोख'' फायदा प्राप्त करणेच शहाणपणाचे आहे.

१८. म्हणजे ऐहिक जीवनाच्या तुलनेत आखिरतचे जीवनाला यासाठी प्रधान्य आहे की तेथील जीवन प्रत्येक दृष्टीने अधिक चांगले आणि तेथील देणग्या या जगातील देणग्यापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहेत. याशिवाय आखिरतचे जीवन हे कायम राहणारे आणि ऐहिक जीवन नाश पावणारे आहे.

१९. म्हणजे एकेश्वरवाद व आखिरतची ही शिकवण जी पवित्र कुरआन सादर करीत आहे. ही एखादी नवी गोष्ट नव्हे, जी पहिल्याप्रथम सादर केली जात आहे. याउलट अल्लाहकडून नेहमी हिच शिकवण दिली जात आहे. आणि अत्यंत जुन्या ईश्वरी पुस्तिकांमध्येही कमी अधिक प्रमाणात हिच शिकवण उपलब्ध आहे. ही वेगळी गोष्ट की त्यांचे अनुयायी ती शिकवण विसरले किंवा त्यामध्ये त्यांनी मोठया प्रमाणात बद्‌ल केला. आणि म्हणून पवित्र कुरआनद्वारे त्या शिकवणीला पुन्हा जिवंत केले जात आहे.

ईश्वरी पुस्तिकांमध्ये (सहीफे) सर्वात जुनी पुस्तिका हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) यांची आहे. पण ती अस्तित्वात नाही. हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यांची पुस्तिका म्हणून तौरात उपलब्ध आहे. ती पण आपल्या मूळ स्वरूपात नाही. परंतु तिचा काही भाग (Old Testament) मधून जुना कराराची पाच पुस्तके जी (१) उत्पत्ती, (२) निर्गम, (३) लेवीय, (४) गणना व (५) अनुवाद या नावाने उपलब्ध आहेत पाहीली जाऊ शकतात. विशेषेकरून अनेकेश्वरवादाची शिकवण आजही त्यांच्यामध्ये स्पष्टपणे दिसून येते. उदा.

''माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत. आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नको'' (निर्गम २०:३, ४)

''परमेश्वर मोशेला (मूसा) म्हणाला, इस्राईलाच्या सर्व

मंडळीस सांग की तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे.... तुम्ही मूर्तीकडे वळू नये आणि आपल्यासाठी ओतींव देव करू नयेत.'' (लेवीय १९ : १ ते ४)

''आपला देव परमेश्वर त्याचे भय बाळग, त्याची सेवा कर, त्याला धरून राहा आणि त्याच्याच नावाने शपथ वाहा तोच तुझ्या स्तुतीस पात्र आहे, तोच तुझा देव आहे. ''

(अनुवाद १०: २०,२१)

आणि हजरत मूसा (अलैहिस्सलाम) यानी जगाचा निरोप घेताना बनी इस्राईल लोकांना गोळा करून जे गीत ऐकविले त्याचा एक उतारा असा:

''हे आकाशा लक्ष दे, मी बोलत आहे; पृथ्वी माझ्या तोंडाचे शब्द ऐको. पर्जन्याप्रमाणे माझ्या बोधाची वृष्टी होवो, माझे भाषण दहिंवराप्रमाणे ठिबको; कोवळ्या गवतावरं जशी पावसाची झिमजिम, हिरवळीवर जशा पावसाच्या सरी, तसे ते वर्षो; मी परमेश्वराच्या नावाची घोषणा करीन; आमच्या देवाची महति वर्णा. तो दुर्ग आहे; त्याची कृती परिपूर्ण आहे; त्याचे सर्व मार्ग न्यायाचे आहेत; तो विश्वसनीय देव आहे, त्याच्या ठायी अनीति नाही; तो न्यायी व सरळ आहे.''

(अनुवाद ३२:१ ते ४)

# ८८. सूरह अल्‌गाशिया
## (आच्छादित होणारी आपत्ती)

**नावः** या सूरतीच्या पहिल्या आयतीत कियामतच्या (प्रलय) सामान्य आणि विश्वव्यापक आपत्तीसाठी ' गाशिया' हा शब्द वापरण्यात आलेला आहे आणि या नुसार सुरतीचे नाव 'अल गाशिया' असे आहे.

**अवतरण काळः** ही सूरत मक्की आहे. यातील मजकुरावरून असे वाटते की ही सुरत इस्लामचा संदेश व प्रसारकार्य प्रारंभिक स्वरूपात असतातना अवतीणं झालेली आहे.

**मध्यवर्ती कल्पनाः** यातील मध्यवर्ती कल्पना इनाम आणि शिक्षा आहे. लहान लहान वाक्यातून जन्नत (स्वर्ग) आणि जहन्नम (नरक) ची प्रतिमा इतकी प्रभावीपणे रेखाटण्यात आली आहे की डोळे असणाऱ्या वाचकाला त्याची प्रचीती या जगात येईल.

ही सूरत मागील सूरतीला पुरक आहे. मागील सुरतीत स्वर्ग आणि नरकाचा उल्लेख संक्षिप्तपणे केलेला होता. मात्र या सुरतीत दोन्हींचे वर्णन तपशीलवार केलेले आहे. म्हणूनच नमाजमध्ये 'अल-आला' या सूरतीबरोबर 'अल-गाशिया' या सुरतीचेही पठण करण्यात येते. हदीसमध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शुक्रवारची नमाज आणि वार्षिक दोन्ही ईदच्या नमाजमध्ये पहिल्या रकातमध्ये 'अल-आला' या सुरतीचे पठण करीत व दुसऱ्या रकातमध्ये 'अल-गाशिया'चे पठण करीत असत. (मुस्लिम किताबुल जुमुआ).

**आयतक्रमः** पहिल्या आयतीत निष्काळजी व बेपर्वा लोकांना कियामतच्या विश्वावर आच्छादित होणाऱ्या संकटाबाबत सावधानतेचा इशारा दिलेला आहे.

आयत क्रमांक २ ते ७ मध्ये जे लोक कियामत संबंधी अविश्वास व्यक्त करतात आणि जीवनातल्या कृत्यांचा अल्लाह जवळ हिशेब द्यावा लागेल यावरही ज्यांचा विश्वास नाही अशांच्या मरणोत्तर होणाऱ्या अवस्थेचे वर्णन केलेले आहे.

आयत क्र. ८ ते १६ मध्ये कियामतीवर श्रद्धा ठेवून मृत्यूलोकात जीवन जगताना आपण केलेल्या कृत्यांचा अल्लाहसमोर हिशेब द्यायचा आहे असे गृहित धरून जीवन जगतात अशांच्या परिणतीचे वर्णन यामध्ये केलेले आहे.

आयत क्र. १७ ते २० मध्ये आपले लक्ष निसर्गातल्या काही सूचक खुणाकडे वेधलेले आहे की ज्यामुळे अल्लाह सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे हे सिद्ध होते. अल्लाह कियामत आणू शकतो तसेच स्वर्ग व नरकाची निर्मिती करू शकतो. एवढेच नव्हे तर इनाम आणि शिक्षा यांचीही व्यवस्था करू शकतो या कुरआनच्या विधानाला अशा खुणांमुळे पुष्ठी मिळते.

आयत क्र. २१ ते २६ मध्ये पैगंबराना संबोधून सांगितले गेले आहे की त्यांचे कार्य केवळ लोकांना स्मरण देण्यापर्यंत व उपदेश करण्यापर्यंतच मर्यादित आहे. सत्याचा जबरदस्तीने स्वीकार करावयास लावण्याची जबाबदारी पैगंबरांची नाही, आणि म्हणूनच जे पैगंबरांचा उपदेश ऐकायला तयार नाहीत त्यांचा प्रश्न पैगंबरांनी अल्लाहवर सोपवावा अंती त्या सर्वांना अल्लाहकडे परतायचे आहे त्यावेळी अल्लाह त्यांचा हिशेब घेईल.

# ८८.सूरह अल्गाशिया

سُوْرَةُ الْغَاشِيَةِ

आयत- २६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. आच्छादित होणाऱ्या आपत्तीची सूचना तुम्हा पर्यंत [१] पोहचली आहे काय?[२]

هَلْ اَتٰىكَ حَدِيْثُ الْغَاشِيَةِ ۝١

२. त्या दिवशी (पुष्कळ) चेहरे [३] कलंकित होतील.[४]

وُجُوْهٌ يَّوْمَئِذٍ خَاشِعَةٌ ۝٢

३. श्रमलेले व शिणलेले. [५]

عَامِلَةٌ نَّاصِبَةٌ ۝٣

४. भडकत्या अग्नीमध्ये ते दाखल होतील.[६]

تَصْلٰى نَارًا حَامِيَةً ۝٤

५. उकळत्या झऱ्यांचे उकळते पाणी त्यांना प्यायला दिले जाईल. [७]

تُسْقٰى مِنْ عَيْنٍ اٰنِيَةٍ ۝٥

६. काटेरी झुडुपा (जरी) व्यतिरिक्त त्यांना तेथे खाण्यासाठी काहीही असणार नाही. [८]

لَيْسَ لَهُمْ طَعَامٌ اِلَّا مِنْ ضَرِيْعٍ ۝٦

७. त्यामुळे त्यांचे भरण-पोषण तर होणार नाहीच पण भूकही शमणार नाही.[९]

لَّا يُسْمِنُ وَلَا يُغْنِيْ مِنْ جُوْعٍ ۝٧

८. पुष्कळ चेहरे त्या दिवशी प्रफुल्लीत असतील.[१०]

وُجُوْهٌ يَّوْمَئِذٍ نَّاعِمَةٌ ۝٨

९. स्वकर्तृत्वाने प्रसन्न झालेले, [११]

لِّسَعْيِهَا رَاضِيَةٌ ۝٩

१०. सर्वोच्च जन्नतमध्ये [१२] (स्वर्गामध्ये),

فِيْ جَنَّةٍ عَالِيَةٍ ۝١٠

११. जेथे निरर्थक गोष्टी कानावर पडणार नाहीत.[१३]

لَّا تَسْمَعُ فِيْهَا لَاغِيَةً ۝١١

१. हे जरी पैगंबरांना संबोधून असले तरी याचा हेतु लोकांना सूचित करणे आणि ताकीद देणे आहे.

२. ग्रासणारी आपत्ती (अल्‌गाशिया) म्हणजेच कियामत. याचा अर्थ असा की ग्रासणाऱ्या आपत्तीची घटना प्रत्येकावर व प्रत्येक गोष्टीवर परिणाम करील. येथे ही सूचना प्रश्नाच्या स्वरुपात दिलेली आहे. ती यासाठी की श्रोत्याना धक्का बसून पुढे त्यांनी कियामती संबंधी योग्य दक्षतेने श्रवण करावे.

३. येथे وَجُوْهٌ चेहरे व्यक्तींना सूचित करतात. व्यक्तिंचे अंतरंग चेहऱ्यावर प्रकट होते. तसेच त्याचे व्यक्तित्व चेहऱ्यावरून ठरवले जाते. وَجُوْهٌ चेहरे हा शब्द व्यक्तिना उद्देशूनच वापरलेला आहे.

४. हे वर्णन त्या व्यक्तिंचे आहे, ज्या व्यक्ती अंतिम मिळणारे इनाम आणि शिक्षा या श्रद्धेला नाकारतात आणि आपणाला अल्लाहच्या समोर जावे लागणार नाही तसेच आपल्या कृत्यांचा हिशेब द्यावा लागणार नाही या विचाराने ज्या व्यक्ती या जगात जीवन जगत असतात.

५. म्हणजे: कियामतीच्या वेळी अश्रद्ध लोकांना अतीव कष्टाचे काम करावे लागेल, ज्यामुळे ते थकून-भागून अर्धमेले होतील.उदा: कबरीतून उठवले गेल्याबरोबर अशा लोकांना ठराविक स्थानापर्यंत पळावे लागेल आणि अल्लाह समोर हजेरी देण्यासाठी वर्षोनवर्षे कडक उन्हात, भूकेलेल्या व तहानलेल्या अवस्थेत तिष्ठत उभे रहावे लागेल. तसेच मान आणि पायात मोठमोठे साखळदंड अडकवून फरफटत रहावे लागेल. वगैरे ज्या लोकांनी ऐहिक जीवनात शरियतीच्या बंधनातून स्वत:ला मुक्त ठेवलेले होते आणि ज्याना नमाज म्हणजे एक कष्टदायक काम वाटत होते. त्यांची सवलतीची आणि आणि शारिरीक आरामाचा योग्य मोबदला हाच ठरेल की त्यांनी कियामतच्या दिवशी परिश्रमाचे काम करावे आणि सक्तमजुरीची शिक्षा भोगावी.

६. म्हणजे अंतिम न्यायाच्या दिवशी अल्लाहच्या न्यायालयातून अश्रद्ध (काफीर) लोक बाहेर पडल्याबरोबर त्याना तसेच सरळ भडकती अग्नि असणाऱ्या नरकात पाठविले जाईल.

७. त्यानी अल्लाहच्या आज्ञांचा अवमान केला आणि त्या मरणोत्तर भविष्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही, आणि अल्लाहच्या इनाम प्राप्त करण्याची महत्वाकांक्षा ठेवली नाही म्हणून अशे लोक मरणोत्तर जगात उकळत्या पाण्याने स्वागत होण्यास पात्र ठरतील.

८. अशांना खाण्यासाठी पोषक किंवा स्वादिष्ट असे काहीही मिळणार नाही. तथापि त्याना काटेरी झुडपे आणि जक्कूम (कडूइंद्रावळ) सारखी अत्यंत कडू फळे खाण्यासाठी, आणि पू पिण्यासाठी मिळेल. वगैरे काहीही करुन त्याना हे खावे व प्यावे लागेल अर्थात हे उघडच आहे की या गोष्टींचा अन्न म्हणून उपयोग होऊ शकत नाही.

हा मोबदला त्यांच्या कर्माप्रमाणे असेल, कारण 'अल्लाहची भेट होणार' या श्रद्धेला त्यानी नाकारुन इहलोकीच्या जीवनात काटे पेरले होते. जे पेरले तेच उगवणार म्हणजे तेच त्याना प्राप्त होणार.

९. म्हणजे काटेरी फळे वगैरे जे त्याना खायला मिळेल त्याने त्यांचे पोषण होणार नाही किंवा त्यांच्या शरीराचे भरण-पोषण होणार नाही एवढेच नाही तर त्यामुळे त्यांची भूकही शमणार नाही.

आमच्या शारीरिक भरण-पोषणासाठी व क्षुधाशांतीसाठी अल्लाहने या इहलोकात विविध प्रकारचे स्वादिष्ट खाद्य प्रदान केले होते. परंतु अशा या वरदानरुपी देणग्या प्राप्त होऊन देखील अश्रद्ध लोकांनी अल्लाहशी कृतघ्नपणा केला यासाठी त्यांना काटेरी झुडपे व काटेरी फळे खावयास मिळणे, हीच त्यांची योग्यता होय.

हे लक्षात घ्यावयास हवे की कुरआनच्या पाठयात (Text) मध्य 'जरी' ضَرِيع हा जो शब्द योजण्यात आलेला आहे, ते एका काटेरी व विषारी झुडपाचे नाव आहे.

१०. एक दिवस आपणास अल्लाहच्यासमोर हजर व्हायचे आहे, अशा भावनेने जे या इहलोकात जबाबदारीचे जीवन जगले त्यांच्या मरणोत्तर जीवनातील स्थितीचे वर्णन येथे केलेले आहे.

११. म्हणजे आपल्या प्रयत्नांचे सुपरिणाम पाहून ते आनंदी होतील की चांगले झाले त्यांनी मरणोत्तर जीवनाला समोर ठेऊन ऐहिक जीवन जगले आणि ऐहिक मायाजाळात अडकले नाहीत.

१२. उंच स्थानी असणाऱ्या उच्च प्रतीच्या उद्यानात ते असतील.

१३. जन्नतमधील (स्वर्गातील) समाज पवित्र आणि सुसंस्कृत असेल. तेथील त्यांच्या भेटी-गांठी, बैठका शिस्तबद्ध असतील. अयोग्य शब्दांचा कोणी उच्चारही करणार नाही किंवा कोणासही निरर्थक संभाषण ऐकावे लागणार नाही. जन्नतमधील वातावरण उच्च नैतिक दर्जाचे असेल. सध्याच्या आधुनिक जगाच्या वातावरणात जेथे एखाद्यास अश्लील बोल आणि निरर्थक गाणी ऐकण्यापासून अलिप्त व सुरक्षित राहता येणे केवळ अशक्यप्राय असते यापेक्षा अगदी भिन्न वातावरण जन्नतमध्ये असेल. शुद्धात अंगिकारलेल्या लोकांना जन्नतचे जीवन हे अल्लाहकडून मिळाणारे फार मोठे वरदानच होय.

| | |
|---|---|
| १२. तेथे झरे वाहत असतील. [१४] | فِيهَا عَيْنٌ جَارِيَةٌ ﴿١٢﴾ |
| १३. त्यात उंचावर उभारलेली सिंहासने असतील, [१५] | فِيهَا سُرُرٌ مَّرْفُوعَةٌ ﴿١٣﴾ |
| १४. आणि प्याले व्यवस्थित मांडलेले असतील, [१६] | وَّأَكْوَابٌ مَّوْضُوعَةٌ ﴿١٤﴾ |
| १५. आणि लोड-गाद्या ओळीत ठेवलेल्या असतील, | وَّنَمَارِقُ مَصْفُوفَةٌ ﴿١٥﴾ |
| १६. आणि गालीचे अंथरलेले असतील, [१७] | وَّزَرَابِيُّ مَبْثُوثَةٌ ﴿١٦﴾ |
| १७. काय हे उंटाकडे पहात नाही की? त्यांना कसे निर्माण केले गेले आहे? | أَفَلَا يَنظُرُونَ إِلَى الْإِبِلِ كَيْفَ خُلِقَتْ ﴿١٧﴾ |
| १८. आणि आकाश ! कसे उंचावले गेले आहे? | وَإِلَى السَّمَاءِ كَيْفَ رُفِعَتْ ﴿١٨﴾ |
| १९. आणि पर्वतांना कसे उभे केले गेले आहे? | وَإِلَى الْجِبَالِ كَيْفَ نُصِبَتْ ﴿١٩﴾ |
| २०. आणि धरती ! ती कशी पसरवलेली आहे? [१८] | وَإِلَى الْأَرْضِ كَيْفَ سُطِحَتْ ﴿٢٠﴾ |
| २१. तर (हे पैगंबर!) तुम्ही त्यांना उपदेश करा, कारण उपदेश करणे हीच तुमची जबाबदारी आहे. | فَذَكِّرْ إِنَّمَا أَنتَ مُذَكِّرٌ ﴿٢١﴾ |
| २२. त्यांच्यावर जबरदस्ती करायची नाही. [१९] | لَّسْتَ عَلَيْهِم بِمُصَيْطِرٍ ﴿٢٢﴾ |
| २३. परंतु जो कोणी (यापासून) तोंड फिरवील [२०] आणि नाकारील, [२१] | إِلَّا مَن تَوَلَّىٰ وَكَفَرَ ﴿٢٣﴾ |
| २४. त्याला अल्लाह कडक शासन करील. [२२] | فَيُعَذِّبُهُ اللَّهُ الْعَذَابَ الْأَكْبَرَ ﴿٢٤﴾ |
| २५. निश्चितपणे त्यांना आमच्याकडेच परतावयाचे आहे. [२३] | إِنَّ إِلَيْنَا إِيَابَهُمْ ﴿٢٥﴾ |
| २६. मग त्यांच्याकडून हिशेब घेणे हे आमचेच काम आहे. [२४] | ثُمَّ إِنَّ عَلَيْنَا حِسَابَهُم ﴿٢٦﴾ |

१४. जन्नतमध्ये झाऱ्यांचे वाहणे एकतर या गोष्टीकडे इशारा आहे की त्याचा हिरवेपणा व ताजेपणा कधीही नष्ट होणार नाही आणि दुसऱ्या या गोष्टीकडे की पाणी आणि दुसरी उच्च दर्जाची पेये तेथे विपुल प्रमाणात उपलब्ध असतील.

१५. उंच आणि भव्य सिंहासने राजवैभवाची प्रतिक आहेत. जन्नतमधील लोक अशा प्रकारचे जीवन जगतील.

१६. पेयपात्रे सुंदर मांडणी करुन हाताशीच तयार ठेवलेली असतील म्हणजे स्वर्गीय पेये पिण्यात लोकांना जरासाही व्यत्यय येणार नाही.

१७. यावरुन जन्नतमधील लोकांचे जीवन कसे आरामाचे व चैनीचे असेल याची कल्पना येते. ऐषारामी जीवनाची किती उत्तम सोय तेथे उपलब्ध असेल.

वरील आयतीत सादर केलेला जन्नतच्या प्रतिमेच्या उल्लेखावरून जन्नतचे चित्र स्वच्छ व स्पष्ट होते. अशा गोष्टीबद्दल आमच्या हृदयात आकांक्षा निर्माण करण्यास हे पुरेशी आहे. त्याची खरी वस्तुस्थिती इहलोकांतील प्रमाणावरून आम्ही परलोकातील गोष्टीबाबत अंदाज बांधू शक्त नाही. आणि म्हणून या विषयावर वाद घालणे निरर्थक प्रयत्न होय.

१८. कियामत जन्नत आणि दोज़ख (नरक) या गोष्टी नाकारणाऱ्यांना वरील वर्णनाने विचार करण्याचे आवाहन केले आहे, आणि या संबंधात त्यांच्या सभोवती घडणाऱ्या गोष्टींकडे त्यांचे लक्ष वळविले आहे. अरबस्तानाच्या वाळवंटात प्रवास करताना नजरेस पडणारी पहिली गोष्ट म्हणजे उंट होय. यास्तव त्याना प्रथम त्यांचा प्राणी जो उंट त्याच्यासंबंधी चिंतन करावयास लावले आहे. हा प्राणी कोणत्या गुणविशेषांनी युक्त असा निर्माण करण्यात आलेला आहे हे ते पहात नाहीत काय? वाळवंटी जीवनातल्या अडी-अडचणींवर मात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणवैशिष्ठयांनी युक्त उंटाची निर्मिती झालेली आहे यावरून अल्लाहचे सामर्थ्य, स्वामित्व व ज्ञान सिद्ध होत नाही काय?

उंटावर आरुढ होऊन वाळवंटात प्रवास करताना लोकाना आकाश, पर्वत आणि जमीन दिसते, यास्तव अशा गोष्टीबाबत त्याना सखोल विचार करावयास लावण्यात आलेला आहे. या अति उंच आकाशावरून अल्लाहच्या महान सामर्थ्याची कल्पना येत नाही काय?आणि जमीनीवर भक्कमपणे उभे असलेले हे पर्वत अल्लाहच्या कौशल्याची सूचक प्रतिके नाहीत काय?आणि काय ही जमीन-जिला या तऱ्हेने अंथरविले आहे की ती अब्जावधी लोकांच्या वास्तव्यास योग्य झाली, ती त्याच्या पालनकर्तृत्वाची आणि कुशलतेची साक्ष नाही काय? जर हे सर्व खरे आहे आणि बुद्धिच्या मत फक्त हेच सत्य आहे-तर मग अशा अल्लाहला कियामत घडवून आणणे, लोकांना पुनरूज्जीवित करणे, जन्नत (स्वर्ग) आणि दोजख (नरक) असलेले जग निर्माण करणे काय कठिण आहे? आणि अशा त्या ईशत्वाच्या दृष्टीचे हे आवश्यक नाही काय की त्याने एक असा दिवस घडवून आणावा की त्याच्या दासांचा त्याने हिशेब घ्यावा, त्याची वरदाने आणि देणग्या यांचा फायदा घेऊनही ते त्याच्याशी कृतज्ञ बनले की कृतघ्न आहेत? आणि मानवासारख्या श्रेष्ठ प्राण्याच्या निर्मितीमागे त्याचा काही उद्देश नसावा किंवा या निर्मितीमागे त्याची कोणतीही योजना नसावी असे म्हणणे त्याच्या ज्ञानाविरुद्ध नाही काय?

१९. अल्लाहचा संदेश लोकांप्रत पोहचविणे,सूचना देणे, लोकांना सत्यमार्गावर येण्याचे आवाहन करणे, अल्लाहकडून मिळणाऱ्या शिक्षेची जाणीव करून दणे हे प्रेषिताचे कार्य आहे.अल्लाहच्या शिकवणीवर लोकांनी विश्वास ठेवावा म्हणून त्यांच्यावर जबरदस्ती करण्याचे काम प्रेषितावर सोपविलेले नाही.

२०. तोंड फिरवणे म्हणजे सादर केलेल्या सूचना नावडणे, अशास कुरआन-पठण असह्य वाटणे, जर त्याच्या जबाबदारीचे स्मरण त्याला करून देण्यासाठी एखादी गोष्ट नमूद केली तर तो त्यात विशेष रस घेत नाही किंवा तो ती गोष्ट पूर्णपणे टाळतो.

२१. कुफ्र म्हणजे कुरआनच्या सूचनांचा अस्विकार करणे आणि कुरआनचे मार्गदर्शन आणि त्यातली शिकवण यांचा स्वीकार करण्यास नाकारणे.

२२. बेइमान काफिरांना अर्थात अश्रद्ध लोकांना परलोकी इतकी कडक शिक्षा मिळेल की त्या शिक्षेशी इहलोकीची अत्यंत कडक शिक्षाही बरोबरी करू शकणार नाही. परंतु जे कुरआनची स्पष्ट ताकीद मिळूनही अश्रद्धेचा मार्ग पत्करतात अशांना त्यांचे जे काही दैव असेल तसे घडेल त्यापासून त्यांना कोण वाचवू शकणार?

२३. अल्लाहकडे परतणे म्हणजे एक दिवस सर्व व्यक्तींना त्याच्यासमोर हजर व्हावे लगेल, इतर कोणीही व्यक्तीसमोर नव्हे. न चुकता आपणास एक दिवस आपल्या निर्मात्यासमोर हजर व्हायचे आहे, या सत्याचा मनुष्याने पूर्णपणे अवमान करणे हे शहाणपणाचे आहे काय?

२४. जेव्हा अंतिम न्यायाच्या दिवशी सर्व लोकांना अल्लाहच्या समोर हजर व्हावे लागेल तेव्हा तो प्रत्येकाचा हिशेब घेईल. त्यावेळी ज्या कोणी पैगंबराच्या सूचनाकडे लक्ष दिले नाही आणि कुरआनच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करण्याचे नाकारले त्यांना अल्लाहसमोर सक्त जाब द्यावा लागेल.

**हूद समाजाचे वसतिस्थान**

**समूद समाजाचे वसतिस्थान** x x x x



# ८९. सूरह अल् फज्र (उष:काल)
## (उष:काल ची शपथ)

**नाव:** या सूरहचा प्रारंभ 'वल फज्र' وَالْفَجْرِ या शब्दाने होतो या अनुषंगाने याचे 'वल-फज्र' म्हणजे' (उष:कालची) शपथ असे आहे.

**अवतरण काळ:** ही सूरह मक्की आहे. यात चर्चिलेला विषय हे दर्षवितो की जेव्हा मक्केतील लोकांनी पैगंबराच्या आवाहनास प्रतिसाद देण्याऐवजी त्याना विरोध करण्याचे व शिरजोरीचे धोरण अवलंबित होते तेव्हा ही सुरह अवतरली.

**मध्यवर्ती कल्पना :** इनाम आणि शिक्षा ही यातली मध्यवर्ती कल्पना, खास करून शिक्षेच्या बाबीवर जोर दिला गेलेला आहे यासाठी की जे कोणी इहलोकीया सुखसोयींच्या शोधात गर्क आहेत त्यानी सावध व्हावे.

आयत क्र. १ ते ५ मध्ये न्यायाच्या दिनाची पुरावा म्हणून दिवस आणि रात्र यांची नैसर्गिक अवस्था सादर केली गेली आहे.

आयत क्र.६ते १४ मध्ये विश्वनियता सातत्याने आपले लक्ष प्रत्येक व्यक्तीवर तसेच राष्ट्रावर ठेवून आहे आणि एक दिवस तो खात्रीने सर्वांना हिशोबासाठी बोलावेल या मुद्याला आधार म्हणून इतिहासातील काही महान राष्ट्रांचे डोळे उघडविणाऱ्या दैवी घटनाचे उल्लेख केले गेलेले आहेत.

आयत क्र. १५ ते २० मानवाच्या दृष्कृत्यासंबंधी आहेत विशेषत: दुर्बळांचे हक्क बळकावण्यासंबंधी आहे; अशा कृत्यावर कडक टीका करण्यात आलेली आहे. आणि असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की अशा प्रकारचे आचरण हा आखिरतवर दाखविलेल्या अविश्वासाचा परिणाम होय.

आयत क्र. २१ ते ३० मध्ये अल्लाहच्या न्यायालयाची प्रतिमा सादर केलेली आहे आणि श्रद्धा (ईमान) ठेवणारे व श्रद्धा न ठेवणारे यांच्या मरणोत्तर दैवाचे वर्णन यात केलेले आहे.

# ८९.अल् फज्र (उषःकाल)

سُورَةُ الْفَجْرِ

आयती- ३०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नांवाने !

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. शपथ [१] आहे उषःकालची, [२]

وَالْفَجْرِ ①

२. आणि दहा रात्रींची, [३]

وَلَيَالٍ عَشْرٍ ②

३. आणि सम व विषम [४] (रात्री) ची,

وَالشَّفْعِ وَالْوَتْرِ ③

४. आणि रात्रीची जेव्हा ती निरोप घेते. [५]

وَاللَّيْلِ إِذَا يَسْرِ ④

५. या गोष्टी बुध्दीवंतासाठी [६] शपथ घेण्या योग्य नव्हेत काय?

هَلْ فِي ذَٰلِكَ قَسَمٌ لِّذِي حِجْرٍ ⑤

६. तुम्ही पाहिले नाही काय,[७] कि तुमच्या पालनकर्त्याने आद [८] बरोबर कसे वर्तन केले

أَلَمْ تَرَ كَيْفَ فَعَلَ رَبُّكَ بِعَادٍ ⑥

७. उंच ईमारती उभारणाऱ्या 'इरम'[९] बरोबर [१०]

إِرَمَ ذَاتِ الْعِمَادِ ⑦

८. ज्यांच्या सारखा समाज जगातील कोणत्याही देशात निर्माण केला गेला नव्हता.

الَّتِي لَمْ يُخْلَقْ مِثْلُهَا فِي الْبِلَادِ ⑧

९. आणि 'समूद' बरोबर,[१२] जे [१३] दरीत खडक कोरीत असत. [१४]

وَثَمُودَ الَّذِينَ جَابُوا الصَّخْرَ بِالْوَادِ ⑨

१०. आणि मेखावाल्या [१५] फिरऔन बरोबर!

وَفِرْعَوْنَ ذِي الْأَوْتَادِ ⑩

११. हे लोक देशात शिरजोर [१६] बनले होते.

الَّذِينَ طَغَوْا فِي الْبِلَادِ ⑪

१. 'शपथ' च्या स्पष्टीकरणासाठी 'सूरह तकवीर' वरील टीप क्र. १४ पहा.

२. 'फज्र' (उष:काल) म्हणजे ती वेळ जेव्हा रात्रीच्या अंध:कारातून पूर्व क्षितिजावर प्रकाशाची प्रभा फाकू लागते. याला दूसरे नांव 'सुबह सादिक' उर्दू मध्ये याला 'पौ फटना' असे म्हणतात. (यालाच मराठीमध्ये तांबडे फुटणे किंवा झुंजुमुंजुची वेळ होणे असे म्हणतात).

'फज्र' ची वेळ म्हणजे सूर्योदयापर्यंतची वेळ, पण 'सुबह' हा शब्द सूर्योदयाच्या अगोदरची व सूर्योदया नंतरची वेळ अशा दोन्ही अर्थाने वापरतात.

३. 'दहा रात्री' म्हणजे चांद्रमासातल्या दहा रात्री. 'फज्र' च्या संदर्भात ह्या रात्री म्हणजे महिन्याचा मध्यकाळ. उदा. ११वी रात्र ते २० वी रात्र. हाच अन्वयार्थ अचूक वाटतो कारण चंद्राच्या या काळातल्या कलेवरून तुलनात्मक दृष्टया या जास्त प्रकाशमान असतात.

४. जर यातील विषयवस्तूची संगती लक्षात घेतली तर येथे सम आणि विषम म्हणजे सम आणि विषम रात्री कारण रात्रींचा उल्लेख अगोदरच्या आयती प्रमाणे दुसऱ्याही आयतीत आलेला आहे. चंद्रवर्षातल्या काही महिन्यात सम आणि काही विषम रात्री असतात, म्हणजे काही महिन्यात ३० तर काही महिन्यात २९ रात्रीच असतात.

५. रात्र संपण्याची वेळ म्हणजे अशी वेळ जेव्हा रात्रीचा अंध:कार संपून सकाळचा प्रकाश दिसायला सुरवात होते.

६. म्हणजे: मार्गदर्शन प्राप्त करण्यासारखे या गोष्टीत काही नाही काय? आकाशात दिसणाऱ्या खुणावरुन विचारी माणसाला पवित्र कुरआनच्या विधानाची सत्याता निवेदन होऊ शकत नाही काय? हे प्रश्नार्थी वाक्य प्रभावी आणि निश्चित विधान सूचित करण्यासाठी आहे. येथे माणसाचे दिवस-रात्रीच्या व्यवस्थेवर चिंतन करावे असे त्याला आवाहन करण्यात आलेले आहे. ज्याचे दररोज तो दिवस-रात्रीचे निरिक्षण करीत असतो आणि ज्याची सुरवात पहाटेला होते आणि समाप्ती रात्र संपण्यात होते. रात्रीच्या अंधकाराला फाडून पहाट प्रकट होते. जेव्हा क्षितिजावर सकाळचा पांढरा प्रकाश दिसू लागतो तेव्हा एक स्तिमित करणारे सुंदर दृष्य सादर झालेले असते. तसेच प्रत्येक महिन्याच्या दश रात्रींचा मध्यकाळ चंद्रामुळे विशेष प्रकाशमान झालेला असतो त्याचा प्रभाव मानवी मन आणि अंत:करणावर पडतो. मग प्रत्येक महिन्याची समाप्ती ३० व्या किंवा २९ व्या रात्री होते. या नित्यक्रमात बदल होत नसतो. आणि जेव्हा रात्र समाप्तीची वेळ येते तेव्हा ती आपला गाशा गुंडाळून अशा तऱ्हेने संपते जणुकाय ती संपण्यासाठीच आलेली होती. तिच्या समाप्तीच्या वेळी तिने सजविलेली महिफिल किंवा मांडलेली आरासही संपुष्टात येते.

दिवसा आणि रात्री अवलोकनात येणाऱ्या ह्या खुणा एखाद्या कुशल प्रशासकाचा निर्देश करीत नाहीत काय? दिवस-रात्रीची आश्चर्यजनक व्यवस्था व तिचा परिपूर्ण नित्यक्रम प्रस्थापित करण्यामागे एखाद्या सर्वशक्तिमान अन् ज्ञानधारीच्या हात असल्याशिवाय हे कसे शक्य आहे? अशा तऱ्हेने ह्या निरिक्षणामुळे माणूस या एकाच निर्णयाप्रत पोहचतो की खात्रीने असा कोणी एक कुशल प्रशासक आहे की ज्याच्या हुकुमान्वये या विश्वाची व्यवस्था परिपूर्णतेने व नित्यक्रमाने चालू आहे, आणि जेव्हा तो कुशल प्रशासक आहे तर मग याच्याकडून निर्माण केलेले जग विनाहेतु कसे असू शकेल? आणि त्याच्याकडून निर्माण केलेला मानव ध्येयशून्यतेने भटकणारा कसा असू शकेल? हे अत्यावशक आहे की ह्या दुनियेच्या निर्मितीमागे काही उद्देश असावा आणि कुरआन या उद्देश्याचा संकेत करतो आणि अल्लाहची योजना स्पष्ट करुन सांगतो.

मानवनिर्मिती मागे काही योजना असावी त्याच्या विधानान्वये. जगाच्या निर्मितीचा उद्देश आखिरत आहे. मानवी जीवनासाठी अल्लाहची योजना अशी आहे की, त्याची परिक्षा घेतली जावी आणि जो कोणी ह्या परीक्षेत यशस्वी होईल त्याला अविनाशी देणग्यांनी पुरस्कार केले जावेत आणि जो कोणी अयशस्वी होईल त्याला नरकातल्या (दोज़ख) भडकाग्नीमध्ये फेकून दंडित केले जावे. कुरआनचे हे विधान खरोखर वास्तवतेचे स्पष्टीकरण आहे जे संपूर्ण विश्व आणि दिवस-रात्रीच्या व्यवस्थमध्ये दिसणाऱ्या निशाण्या आणि प्रतीकांच्या भागेत उधड होते. विश्वाच्या सत्यतेशी कुरआनच्या विधानाचे सत्यत्व इतके सुसंगत आहे की तो कुरआनच्या सत्यत्वाचा डोळस पुरावाच होय.

उष:कालाच्या शपथेचा आणखी एक पैलू आहे. उष:कालीन वेळ कियामतच्या घटनेचे स्मरण करुन देते. रात्रीच्या अंधकाराचा बुरखा फाडून जशी पहाट अवतरते अगदी तसेच जगाला ग्रासून टाकणाऱ्या अंध:काराचा बुरखा फाडून कियामतच्या दिवसाची पहाट होईल. माणूस जसा सकाळ झोपेतून जागा होतो तसाच तो कियामतच्या दिवसाची सकाळ होताच उठेल आणि त्याला वाटेल की जणुकाय तो अगदी आताच लागेल्या झोपेतून उठला आहे या सत्यतेचा संदर्भ एका दुआमध्ये आलेला आहे, जिचा उल्लेख हदीसमध्ये आलेला आहे, पहाटे उठल्यावर ती म्हणण्यास सांगितले गेले आहे.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ الَّذِیْ اَحْیَانَا بَعْدَمَا اَمَاتَنَا وَاِلَیْهِ
النَّشُوْرُ۔ (مسلم کتاب الذکر)

''आम्हाला मरणोत्तर पुनरुजीवित करणाऱ्या अल्लाह चे आभार आणि आम्हाला त्याच्या समोर असेच हजर व्हायचे

आहे. (मुस्लिम किताबुज जिक्र)

७. 'तुम्ही पहिले नाही काय? म्हणजे 'तुम्ही त्यावर विचार केला नाही काय?' अशाच तऱ्हेचा अर्थ कथित शब्दातून व्यक्त होतो, जेव्हा आपण म्हणतो : ''हिटलरचा शेवट कसा झाला तुम्ही पाहिले नाही काय?'' आपण प्रत्यक्ष हिटलरचा अंनत पाहिलेला नसतो परंतु केवळ एक ऐतिहासिक घटना म्हणून आपणाला ती माहीत असते. अशा प्रसंगी बोलणारास म्हणावयाचे असते की ऐतिहासिक घडलेली घटना ही माननीय असते आणि तिच्यापासून आपण काही बोध घेतला पाहीजे.

८. 'आद' एका समाजाचे नाव आहे. हा समाज दक्षिण अरेबियाच्या वाळवंटात 'रुब-अल-खाली' या अहकाफच्या विभागात यमन आणि हजरमौतच्या मधल्या प्रदेशात रहात होता. हा समाज पैगंबर नूहच्या नंतरच्या काळात आणि पैगंबर इब्राहिमच्या अगोदरच्या काळात म्हणजे सर्वसाधारणपणे ख्रिस्त पूर्व तीन हजार वर्षे या काळात अस्तित्वात होता.

९. त्याना 'जातुल इमाद' म्हटले आहे कारण ते उंच आणि भव्य अशा इमारती बांधीत असत. एखादी सामाजिक गरज म्हणून त्यानी या प्रथेचा स्वीकार केलेला नव्हता तर केवळ राष्ट्रीय स्मारके उभारणे किंवा प्रदर्शन करण्याच्या इच्छेच्या पूर्ततेसाठी, त्यांच्या या, कलेत उधळपट्टी आणि ऐहिक आकांक्षांचा पाया मजबूत करणे हा ही एक भाग होता.

१०. 'आद' ला इरम' शी यासाठी संबंधित केले गेले आहे की, ते सेमेटिक वंशाच्या एका शाखेचे, इरम (अराम) बिन सॅम (शेम) बिन नूह चे वंशज होते. बायबलमध्ये इरमचा उल्लेख आहे.

''शेमाचे, मुलगे: .....................व अराम.
अरामचे मुलगे: ऊस, हूल....................''

बायबलच्या या निवेदनात अराम हा शब्द इरमचाच उच्चार होय. (उत्पत्ति १०:२२)

११. म्हणजे शक्ति, सामर्थ्य आणि भव्यतेच्या दृष्टीने त्या काळात इतर कोणताही समाज त्यांच्या बरोबरीचा नव्हता, त्यापूर्वी देखील त्यांच्या इतका इतर कोणताही समाज वैभवशाली नव्हता.

अरेबियाच्या भूमीवरील 'आद' हा प्राचीनतम समाज (राष्ट्र) होय.'नूह' च्या महापूरानंतर त्या समाजाने प्रमुखत्व संपादन केले होते.आणि तो भव्य इमारती, सामर्थ्य आणि सत्ता याबाबतीत भौतिक प्रगतीच्या श्रेष्ठत्वामुळे तो समाज स्वावलंबी बनला होता.

१२. ऐहिक भव्यता आणि भौतिक प्रगतीत श्रेष्ठ ठरलेला 'आद' व्यतिरिक्त दुसरा समाज म्हणजे 'समुद' होय. हाही समाज प्रेषित इब्राहिम (अब्राहम) यांच्या पूर्वकालीन होय.

१३. दरीचा संदर्भ 'अल-कुरा' या दरीशी आहे ही दरी हिजाज आणि सिरिया यांच्यामध्ये आहे. या दरीतील 'हिज्र' ही अत्यंत महत्वाची जागा होती सध्या ती 'मदायन-सालेह' या नावाने ओळखली जाते. मदिने पासून जवळ-जवळ १८० मैल दूर उत्तरेला आहे. हे 'समूद' समाजाचे वसतिस्थान होते.

१४. खडक कोरुन गुंफेत राहणारे लोक म्हणून 'समूद समाज' ओळखला जात असे. खडकांच्या कोरीव-कामात हे तरबेज होते या कलेच्या इच्छपूर्तीत ते पूर्णतया डुंबून गेले होते. बांधकामच्या कलेत त्यानी नेत्रदीपक प्रगति केली होती त्यामुळे त्यांचा असा समज होता की त्यांच्या बांधकामाच्या कलेमुळे ते संर्वदृष्टीने सुरक्षित आहेत.

१५. मेखांवाला म्हणजे सैनिकी सामर्थ्य लाभलेला राजा. फिरऔन ने आपल्या राज्याच्या सुरक्षिततेसाठी स्थायी स्वरुपाचे सैन्य, उभारले होते. खरे म्हणजे त्या काळात कायमस्वरुपी सैन्य उभारणे किंवा सैन्य बाळगण्याची प्रथा नव्हती. याच्याऐवजी जेव्हा लढावयाचे असेल तेव्हाच तात्पुरते सैन्य उभारले जाई. सैन्याची छावणी तंबूत असे. जमीनीत मेखा गाडून तंबू उभारले जात. 'मेखा बाळगणारा' हा शब्द सैन्य बाळगणाऱ्या राजासाठी वापरला गेला आहे.

१६. या समाजानी भव्य सांस्कृतिक साधने आणि सत्ता यांच्या आधारे चुकीचे धोरण स्विकारले होते. ते ईश्वरला भीत नव्हते आणि आखिरतची त्याना चिंता नव्हती, आणि म्हणून ते गर्विष्ट बनले होते व त्यानी शिरजोरीचे धोरण स्विकारले होते, त्यांच्यात प्रत्येक प्रकारचा बिघाड निर्माण झाला.

आणि त्यानी तेथे खूप उत्पात माजवला होता. तेव्हा तुमच्या पालन कर्त्याने त्यांच्यावर अजाब (ईश-शिक्षे) चा आसूड वर्षाविला. खात्रीने तुमचा पालनकर्ता निरंतर लक्ष ठेवून आहे. परंतु माणसाची अशी तऱ्हा असते की जेव्हा त्याचा पालनकर्ता त्याला सन्मान व वरदाने बहाल करतो, तेव्हा तो म्हणतो की ''माझ्या पालनकर्त्याने मला सन्मानित केले. *(अल-क़ुर्आन)*

१२. आणि त्यानी तेथे खूप उत्पात माजवला होता.

فَأَكْثَرُوا فِيهَا الْفَسَادَ ﴿١٢﴾

१३. तेव्हा तुमच्या पालन कर्त्याने त्यांच्यावर अजाब (ईश-शिक्षे) चा आसूड वर्षाविला. [१७]

فَصَبَّ عَلَيْهِمْ رَبُّكَ سَوْطَ عَذَابٍ ﴿١٣﴾

१४. खात्रीने तुमचा पालनकर्ता निरंतर [१८] लक्ष ठेवून आहे.

إِنَّ رَبَّكَ لَبِالْمِرْصَادِ ﴿١٤﴾

१५. परंतु माणसाची अशी तऱ्हा असते की जेव्हा त्याचा पालनकर्ता त्याला सन्मान व वरदाने बहाल करतो, तेव्हा तो म्हणतो की ''माझ्या पालनकर्त्याने मला सन्मानित केले. [१९]

فَأَمَّا الْإِنْسَانُ إِذَا مَا ابْتَلَاهُ رَبُّهُ فَأَكْرَمَهُ وَنَعَّمَهُ فَيَقُولُ رَبِّي أَكْرَمَنِ ﴿١٥﴾

१६. आणि जेव्हा तो त्याला अशा तऱ्हेने अजमावतो की त्याची उपजीविका अत्यंत मर्यादित करतो तर तो म्हणतो: 'माझ्या पालनकर्त्याने मला अवमानित केले.[२०]

وَأَمَّا إِذَا مَا ابْتَلَاهُ فَقَدَرَ عَلَيْهِ رِزْقَهُ فَيَقُولُ رَبِّي أَهَانَنِ ﴿١٦﴾

१७. नाही ! [२१] परंतु तुम्ही अनाथांची [२२] कदर करीत नाही.

كَلَّا بَلْ لَا تُكْرِمُونَ الْيَتِيمَ ﴿١٧﴾

१८. आणि गोरगरीबाना अन्नदान [२३] करण्यास तुम्ही एक दुसऱ्यास उत्तेजन देत नाही.

وَلَا تَحَاضُّونَ عَلَىٰ طَعَامِ الْمِسْكِينِ ﴿١٨﴾

१९. आणि वारस मालमत्ता जमाकरून हडप [२४] करता.

وَتَأْكُلُونَ التُّرَاثَ أَكْلًا لَمًّا ﴿١٩﴾

२०. आणि संपत्तीच्या [२५] लोभात मस्त असता.

وَتُحِبُّونَ الْمَالَ حُبًّا جَمًّا ﴿٢٠﴾

२१. नाही ! [२६] जेव्हा जमीन विध्वंसून सपाट [२७] केली जाईल,

كَلَّا إِذَا دُكَّتِ الْأَرْضُ دَكًّا دَكًّا ﴿٢١﴾

२२. आणि तुमचा पालनकर्ता येईल, त्याच्या सोबत फरिशत्यांच्या (दूतांच्या) रांगा मागे रांगा [२८] असतील.

وَجَاءَ رَبُّكَ وَالْمَلَكُ صَفًّا صَفًّا ﴿٢٢﴾

१७. जेव्हा या समाजानी भ्रष्ट आणि विद्रोह मार्ग पत्कारला आणि प्रेषितांकडून तंबी मिळून देखील ते स्वत: सुधारणा करावयास तयार नव्हतो, मग अल्लाहचा कोप कार्यवाहीत आला आणि त्याची मगरमिठी अशातऱ्हेने बसली की त्यांची भौतिक प्रगती व भव्यता जमीनदोस्त झाली. त्यांच्या उंच व प्रचंड इमारती त्याना त्यांच्या लज्जास्पद मृत्यूतून वाचवू शकल्या नाहीत आणि खडकातल्या गुंफाही त्यांचे संरक्षण करू शकल्या नाहीत. तसेच प्रचंड सैन्य आणि साधनसामुग्री समुद्रात बुडणाऱ्या फिरऔनला वाचवू शकली नाही. आणि तो आपल्या संपूर्ण फौजेसहित समुद्रात बुडाला. एका कवीच्या शब्दात:

**''हम तो डूबे हैं सनम, तुझ को भी ले डूबेंगे''**

''मित्रा ! आम्ही तर बुडत आहोत. आमच्याबरोबर तुलाही बुडायला लावू !''

या समाजाना मिळालेल्या शिक्षेचा उल्लेख संपूर्ण तपशीलसह सूरह अअराफ, सूरह यूनुस, सूरह हूद, सूरह हिज्र आणि इतर सूरह मध्य उल्लेख झाला आहे.

१८. वर दर्शविलेल्या ऐतिहासिक घटना म्हणजे सत्याचा पुरावाच होय. हे जग ध्येय शून्य, अव्यवस्थित वस्ती नव्हे की मनुष्यास त्याच्या निर्मात्याने स्वैराचारास मुक्त सोडलेले आहे. उलटपक्षी तो प्रत्येक व्यक्ती आणि समाज यावर लक्ष ठेवून आहे आणि प्रत्येकाच्या नाड्या त्याने आपल्या हातात ठेवल्या आहेत. खोडसाळ आणि शिरजोर समाजाना तो थोडीशी मोकळीक देतो अशासाठी की जर त्याना सुधारावेसे वाटले तर त्यानी सुधारावे, परंतु ही मोकळीक फक्त ठराविक काळापुरतीच मर्यादित असते. नंतर मात्र अल्लाहच्या शिक्षेचा आसूड त्यांच्यावर ओढवतो आणि त्याना दुष्परिणतीस तोंड द्यावे लागते.

हा ऐतिहासिक आधार, या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की हे जग कांही खेळण्याचे मैदान नसून ते एक असे तपासणी मैदान आहे की जेथे लोक-व्यक्ती-समाज यांची तपासणी व कसोटी पाहिली जाते आणि त्यांचा पालनकर्ता त्यांच्याशी न्यायाने व ज्ञानाने व्यवहार करतो. दुष्कृत्ये करणाऱ्याना सजा करण्यास तो पूर्णपणे समर्थ व शक्तीशाली आहे. ज्याअर्थी हे जग परिक्षादालन ठरले त्याअर्थी एक दिवस असा असेल की जेव्हा मानवाची कृत्ये तपासली जातील आणि त्याप्रमाणे त्याला बक्षीस किंवा शिक्षा दिली जाईल, यास्तव एक दिवस कियामत येणार हा जो कुरआनचा दावा आहे, ते एक वादातीत सत्य असून ऐतिहासिक पुराव्यांनी तो नि:संदिग्धपणे सिद्ध झालेला आहे.

१९. माणसाच्या अवस्थेचे वर्णन या ठिकाणी अशा दृष्टीने केलेले आहे की ऐहिक जीवनाचा लोभ धारणाऱ्यांच्या गैरसमज दूर व्हावा. अशाना संपत्ती, संपदा, श्रीमंती, दर्जा आणि भौतिक प्रगती साध्य झाली की परमेश्वर आपल्यावर प्रसन्न आहे असे वाटते. आणि तो असे समजतो की तो अल्लाहच्या नजरेत चांगला आहे यासाठीच तो त्याचा मानसन्मान वृद्धींगत करण्यासाठी सर्व साधनसामुग्री उपलब्ध करुन देत आहे. ही चुकीची विचारसरणी अशा व्यक्तीला अल्लाह विरुद्ध बंडखोरी करण्यास प्रवृत्त करते. अल्लाह मनुष्याला या सर्व देणग्या देतो ते त्याची परीक्षा घेण्यासाठी की तो अल्लाहचा परम भक्त बनून आपली कर्तव्ये पार पाडतो की नाही व दुसऱ्याचे हक्क अबाधीत ठेवतो की नाही अथवा तो कृतघ्न,गर्विष्ठ आणि दुसऱ्यांचे हक्क हिरावणारा होतोय हे पाहण्यासाठी, खरा मान- सन्मान फक्त परीक्षेत यशस्वी झाल्यावरच मिळू शकतो.

२०. गरीबीच्या परिस्थितीत जीवन कंठणे भौतिकवादी लोकांना अवमानीत जीवन वाटते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याना असे वाटते की ज्यांच्याजवळ भरपूर संपत्ती नाही असे लोक अल्लाहच्या नजरेत कमी दर्जाचे लोक आहेत. जरी अल्लाह लोकांची परीक्षा घेण्यासाठी त्याना अशा परिस्थितीत ठेवतो की ते सहनशील आणि अल्लाहशी निष्ठावान आहेत की ते निराशेने अल्लाहविरुद्ध तक्रार करु लागतात. अडचणीची परिस्थिती माणसाला संघर्ष करायला शक्ति प्रदान करते व त्याचे चारित्र्य मजबूत बनवते. अशा अवस्थेतून पार पडल्यावर माणूस मानसन्मान मिळून शकतो अट हीच की त्याने सहनशील राहावे. या विशिष्ट अवस्थेच्या मागे अल्लाहचा महान हेतू असतो आणि तो हेतू उथळ दृष्टीच्या लोकांच्या डोळ्याआड लपलेला असतो. म्हणूनच ते चुकीच्या निष्कर्षाला बळी पडतात. या आयतीने हा निष्कर्ष दुरुस्त करण्याचा आधार केला आहे असे असून सुद्धा जर माणूस चुकीच्या निष्कर्षास घेऊन बसणार असेल तर तो परिक्षेत अयशस्वी होणार हे ठरलेले आहे.

२१. म्हणजे सन्मान आणि अवमान ह्या गोष्टींचे जे प्रमाण भौतिक वाद्यानी ठरविले आहे ते बरोबर नाही.

२२. येथे भौतिकवादी लोकाना विशेषत: श्रीमंत लोकाना सरळपणे उद्देशून म्हटलेले आहे. त्याना सूचित केले आहे की की त्याना जर काय आवश्यक असेल तर ते हे की या परीक्षेच्या जीवनात त्याना जी भरपूर संपत्ती मिळाली आहे त्यातून त्यांनी इतरांच्या हक्काचे जे योग्य असेल ते दिले पाहिजे. तसेच त्यांनी दीन आणि अनाथ बालकाना मदत केली पाहिजे. परंतु ते आपल्या संपत्तीने एवढे गर्विष्ठ बनले आहेत की अनाथाना मदत करण्याऐवजी ते त्यांचा अनादर

करतात आणि त्यांच्याकडे तिरस्काराने पाहतात.

अशातऱ्हेने हे स्पष्ट होते की अनाथाना मदत करण्याचीच आज्ञा कुरआन देतो असे नव्हे तर त्यांचा आदर करण्यासही सांगतो दुसऱ्या शब्दात असे की गरीब आणि दुर्बळाना समाजात मानाचे स्थान मिळावे असे कुरआनला अपेक्षित आहे. आणि खरा मुस्लिम समाज तोच ज्यात अशा लोकांकडे आदराने पाहिले जाते.

२३. गरीबाना अन्नदान करावे आणि तसे करण्यास एक-दुसऱ्यास प्रोत्साहन द्यावे ही मूलभूत नैतिकता आहे आणि नैसर्गिकरित्या ही माणसाची एक जबाबदारी बनते. शरियतने या बाबीवर जोर देऊन त्याबाबत सविस्तर आज्ञा दिलेल्या आहे.

येथे कुरआनने जाहिलि (अइस्लामिक) समाजावर कडवट टीका केली आहे. कारण या समाजात गरीबांना अन्नदान केले जात नव्हते. तसेच इतराबद्दलची योग्य कर्तव्ये पार पाडण्याची भावना मनावर बिंबवली जात नव्हते. यावरुन येथे असे दर्शविले जाते की कुरआनला समाजामध्ये अशातऱ्हेच्या चारित्र्याचे संवर्धन करावयाचे आहे की ज्यामध्ये गरीबाला मदत करावी आणि तसे करण्यास दुसऱ्यांना ही प्रवृत्त करावे यासाठी प्रत्येक व्यक्तिचे मन वळविले जावे. या प्रथेने कंजुसपणा आणि धनलोभाची प्रवृत्ती नष्ट होऊन सहानुभूति आणि उदारवृत्तीची भावना वाढीत लागले.

हे चारित्र्य आणि असा गुण असणे ही उपासमार आणि गरीबी नष्ट करण्यासाठी मूलभूत गरज आहे.

२४. इस्लाम-पूर्व काळात स्त्रीया आणि मूलाना त्यांच्या वारसा हक्काला वंचित व्हावे लागे आणि समाजातील समर्थ व्यक्ती वारसाने मिळणारा सर्वभाग स्वत:च घेत असत. परिणामस्वरुप अनाथ मुळे आणि मुली यांचा वारसा हक्काने मिळणारा त्यांचा वाटा बळकावला जात असे. या आयतींत इस्लामपूर्व कालीन लोकांचा ह्य रिवाज चुकिचा आणि आक्षेपार्ह आहे असे जाहीर केले गेले आहे. (आणखी सविस्तर माहितीसाठी कृपया टीपा क्रमांक १९ - सूरह निसा-पहा)

येथे प्रश्न असा निर्माण होतो की वारस -मालमत्तेच्या वितरणाचा कुरआनचा कायदा हिजरी सन ३ मध्ये मदिना येथे अवतीर्ण झाला ज्याचा समावेश सूरह निसा मध्ये आहे. सूरह 'अल् फज्र' जो मक्की आहे, या सुरहमधून जाहिरपणे वारस-मालमत्ता लुबाडण्याचा निषेध केलेला आहे. तर मग वारसाच्या मालमत्तेचा कायदा नसताना हा जाहीर निषेध कशासाठी? याचे उत्तर हे की जरी वारसाच्या मालमत्तेचा कायदा नंतर अवतरला असला तरी याचा अर्थ असा नव्हे की हा कायदा अवतरण्यापूर्वी लोकांना मालमत्तेचे खरे वारसदार कोण हे माहित नव्हते. कमीत कमी हे तरी स्पष्ट आहे की माणसाचे खरे वारसदार म्हणजे त्याची मुले होत. आणि जर मुले अनाथ असतील तर मग त्यांचा वारसहक्क जास्त पवित्र होतो. ही बाब अशी आहे की जी माणूस सर्वसामान्य ज्ञानानेही पूर्णपणे समजू शकतो तर मग वारस मालमत्तेच्या खऱ्या हक्कदाराकडून समर्थ लोकानी वारसमालमत्ता बळकावणे आक्षेपार्ह नाही का? मग हेही एक सत्य आहे की मक्केचे अरब दैवी शरियत बाबत पूर्णपणे अज्ञानी नव्हते, प्रेषित इब्राहिमच्या शरियतचे ते वारसदार होते, जरी त्यांच्याजवळ शरियतचा थोडासाच भाग होता. उदा: हज्जचे संस्कार वगैरे. तर मग माणसाचे खरे वारसदार म्हणजे त्याची मुले हे ही त्याना ठाऊक नव्हते असा विचार करणे बरोबर ठरणार नाही. तथापी प्रथा अशी होती की अनाथ लहान मुलामुलींना त्यांच्या खऱ्या हक्कापासून वंचित करून त्यांची वारस मालमत्ता त्यांचा चुलता बळकावीत असे. असे स्पष्ट हक्क छिनावणे कसे समर्थनीय ठरत होते? आणि जो पर्यंत तोरात चा संबंध आहे त्यांत वारसाचा कायदा सिद्ध होता. बायबल मध्ये उल्लेख आहे :

''तू इस्राईल लोकांना असे सांगा, कोणी मनुष्य निपुत्रिक मेला तर त्यांचे वतन त्याच्या मुलीला द्यावे, त्याला मुलगी नसली तर त्याचे वतन त्याच्या भावना द्यावे.'' (गणना २७:८,९)

२५. ज्यामुळे त्यांचे नैतिक अध:पतन झाले, त्या संपत्ती-लोभावर ही कडक टीका होय.

माणसाच्या आर्थिक गरजेच्या पूर्ततेसाठी एक साधन म्हणून अल्लाहने संपत्ती बनवली तसेच माणसाची परीक्षा घेण्याचेही एक साधन बनवले आहे. या परिक्षेचा एक पैलू असा की माणूस आखिरतला ध्येय बनवितो की एहलोकी मालमत्तेला, दुसरा पैलू असाकी तो उचित मार्गाने संपत्ती प्राप्त करतो अथवा अउचीत मार्गाने, आणि ही संपत्ती तो सत्कार्यासाठी खर्च करतो की दुषकृत्ये करण्यासाठी तिसरा पैलू असा की तो आपली संपत्ती अल्लाहच्या मार्गात खर्च करतो आणि बलिदाने देतो तसेच इतरांचे हक्का देतो की-इतरांच्या हक्कांची लुबाडणूक करतो.

२६. म्हणजे तुम्हाला जाब विचारला जाणार नाही आणि शिक्षा होणार नाही हा तुमचा विचार चुकीचा आहे.

२७. कियामतीच्या दिवशी जे धरणींकप होतील आणि त्यापाठोपाठ जे स्फोट होतील त्यामुळे जमीन पूर्णपणे अस्तव्यस्त होईल. फक्त इमारतीच आणि महलच नव्हे तर पर्वतदेखील जमीन दोस्त होतील आणि जमीन पूर्णपणे कुठे काहीही न राहता सपाट मैदान होईल, जेथे आम लोकांना आपल्या

कृत्यांचा हिशेब देण्यासाठी अल्लाहसमोर हजर व्हावे लागेल.

२८. याचा अर्थ अल्लाह स्वत: अंतीम न्यायदिनी न्यायालय निर्माण करील आणि तो स्वत: प्रश्न विचारील व निर्णयपण देईल. त्याच्या हकुमाची अमजबजावणी व त्याच्या निर्णय लागू करण्या साठी फरिश्ते उपस्थित राहतील.

यावरून अल्लाहच्या न्यायालयाचे भयानक चित्र आपल्या डोळयासमोर उभे राहते आणि असा विश्वास निर्माण होतो की आज अल्लाह पडद्याआडून मानवाची परीक्षा घेत आहे. परंतु अंतीम न्यायदिनी हा पडदा सरकवला जाऊन त्याच्या डोळयासमोर सत्य उभे राहील.

२३. आणि त्या दिवशी जहन्नम [२९] हजर केला जाईल,
त्या दिवशी मानव शुद्धीवर येईल, परंतु त्या
वेळी त्याच्या शुद्धीवर येण्याचा काय फायदा?[३०]

وَجِايْٓءَ يَوْمَئِذٍۭ بِجَهَنَّمَ ۙ يَوْمَئِذٍ
يَّتَذَكَّرُ الْاِنْسَانُ وَاَنّٰى لَهُ الذِّكْرٰى ﴿٢٣﴾

२४. तो म्हणेल की, अरेरे ! मी माझ्या जीवनासाठी
पूर्वीच काही करून ठेवले असते तर ! [३१]

يَقُوْلُ يٰلَيْتَنِيْ قَدَّمْتُ لِحَيَاتِيْ ۚ ﴿٢٤﴾

२५. त्या दिवशी त्याची शिक्षा अशी असेल की
तशी शिक्षा दुसरा कोणीही देऊ शकणार नाही.[३२]

فَيَوْمَئِذٍ لَّا يُعَذِّبُ عَذَابَهٗٓ اَحَدٌ ۙ ﴿٢٥﴾

२६. आणि त्याच्या जखडून टाकण्यासारखे कोणी
जखडणारा असणार नाही.

وَّلَا يُوْثِقُ وَثَاقَهٗٓ اَحَدٌ ۗ ﴿٢٦﴾

२७. हे संतुष्ट आत्म्या ! [३३]

يٰٓاَيَّتُهَا النَّفْسُ الْمُطْمَئِنَّةُ ۙ ﴿٢٧﴾

२८. चल, आपल्या पालनकर्त्याकडे, तू त्याच्याशी
राजी तो तुझ्याशी राजी, [३४]

ارْجِعِيْٓ اِلٰى رَبِّكِ رَاضِيَةً مَّرْضِيَّةً ۚ ﴿٢٨﴾

२९. सम्मिलित हो माझ्या दासात [३५]

فَادْخُلِيْ فِيْ عِبٰدِيْ ۙ ﴿٢٩﴾

३०. आणि दाखल हो माझ्या जन्नतमध्ये [३६] (स्वर्गात).

وَادْخُلِيْ جَنَّتِيْ ۧ ﴿٣٠﴾

२९. म्हणजे जेव्हा अल्लाहचा न्यायालयाचे कामकाज सुरु होईल तेव्हा समोरच जहन्नम (नरक) असेल आणि त्याचे अस्तित्व जाणवेल.

३०. स्वत:ला अल्लाहच्या कोर्टात कैद झालेले आणि समोरच जहन्नम (नरक) पाहून माणसाला जाणीव होऊन लक्षात येईल की आखेरतवर (मारणोत्तर भविष्यावर) विश्वास न ठेवल्याने आपले खूपच नुकसान झालेले आहे. त्या दिवशी त्याला आठवेल की पैगंबरांची या दिवशी बद्दल तंबी बरोबर होती. आणि जो मार्ग ते दाखवीत होते तो अगदी योग्य होता. त्यांचा उपदेश न ऐकूण त्याने फार मोठी चूक केलेली आहे. परंतु त्या दिवशी जाणीव होऊन काही उपयोग नाही. कारण परिक्षेची वेळ आणि सुधारण्याची संधी निघून गेलेली असेल. अंतीम न्यायाचा दिवस निकाल जाहीर होण्याचा दिवस असेल त्यादिवशी जाणीव होणे आणि सुधारण्याचे ठरविणे हे एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे आहे जो परिक्षादालनात प्रश्नपत्रिका सोडविण्या ऐवजी हास्यविनोदात वेळ घालवितो आणि परिक्षेच्या निकालाच्या दिवशी चुका लक्षात घेतो. हे स्पष्ट आहे की त्याच्या चुकांची उशिरा आलेली ही समज नापासाची पासात बदलू शकत नाही. जरी ती त्याला जास्तच निराश करते.

३१. त्या दिवशी माणसाला वाटेल की आखिरत चे जीवन हेच खरे जीवन आहे. आणि इहलोकातील जीवन म्हणजेच सर्वस्व असे जे त्याला वाटत होते ते चुकीचे होते, अरेरे! परलोक साठी इहलोकामध्येच मी काहीतरी केले असते तर !

३२. म्हणजे इहलोकात शासना कडून अपराध्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेच्या दर्जावरून परलोकात मिळणाऱ्या शिक्षेचे मोजमाप करू नका. परलोकात अल्लाहकडून मिळणारी शिक्षा इतकी कडक असेल की इहलोकात अशी कडक शिक्षा कोणी दिलेली नसेल आणि कोणी अशी शिक्षा देऊ शकणार नाही.

या शिक्षेची समज दिल्यानंतरही जर लोक सावध होणार नसतील व तसेच गुन्हेगार म्हणून राहणार असतील तर त्याना अशी शिक्षा मिळेल जी त्यांच्यासाठी वाट पहात असेल. जेव्हा शिक्षा भोगावी लागेल तेव्हाच त्यांना समजून चुकेल. गुन्हयाच्या प्रकारावर शिक्षेचा कडकपणा अवलंबून असेल. विश्वनियंत्याच्या विरुद्ध जे लोक आज्ञाभंग करण्याचे व शिरजोरीचे वर्तन अवलंबतात ते जबर शिक्षा भोगण्यास पात्र ठरतात.

३३. नफसे मुतमईन्ना (संतुष्ट आत्मा) म्हणजे तो माणूस ज्याने अल्लाहच्या एकत्वावर (एकेश्वर) खात्रीने आणि हृदयाच्या पूर्ण समाधानीवृत्तीने श्रद्धा ठेवली होती, ज्याने आखिरत (परलोकावर) विश्वास ठेवला होता, सुस्थितीत आणि दु:स्थितीत ही जो त्याच्या निर्मात्यावर खुष आणि समाधानी होता आणि त्याला वाटत होते की त्याची कोणतीही कृती अयोग्य नव्हती. इहलोकात जो कोणी याप्रकारची समाधानीवृत्ती हृदयात वृद्धिंगत करतो तो ईश्वाराच्या येथे सदैव आराम आनंद आणि समाधान मिळण्यास पात्र ठरतो.

३४. प्रेम आणि कृपेने भरलेले हे शब्द, ज्यात अंतिम न्यायादिनी यशस्वी ठरलेल्या संतुष्ट आत्म्याला सफलतेची खुशखबर दिली जाईल. आणि सफलता देखील अशी की ती माणूस अल्लाहला प्राप्त करील यापेक्षा दुसरी कोणती चांगली गोष्ट मिळविण्याची बाकी राहते? दास अल्लाहवर खुष आणि अल्लाह दासावर खुष ! गौरव आणि सन्मानाच्या या स्थानावर पोहचल्यानंतर आणखी याहून श्रेष्ठ अशा कोणत्या ठिकाणी पोहचण्याची माणूस कल्पना करू शकेल ?

३५. 'माझे दास' म्हणजे अल्लाहचे खरे दास. स्वर्गातील (जन्नतमधील) समाज हा अल्लाहच्या खऱ्या दासानी तयार झालेला समाज असेल. सदाचारी दासांत आपला समावेश केला जाणे हेच अल्लाहचे सर्वश्रेष्ठ वरदान होय. या वरदानाचे ज्याना महत्व कळले आहे तेच ते प्राप्त करतील, ज्याना सदाचारी लोक आवडतात आणि त्यांच्याबरोबर राहण्यात ज्याना धन्यता वाटते. याविरुद्ध इहलोकात ज्याना सदाचारी लोक आवडत नाहीत आणि जे त्यांच्या पासून स्वत:ला दूर ठेवतात. आणि जे कोणी इहलोकात नास्तिक लोकांच्याकडे आकर्षिले जातात अंतिम न्यायदिनी नास्तिकांची जी दैवगती होईल तीच दैवगती त्यांची देखील होईल.

३६. अल्लाहने जन्नतला (स्वर्ग)'माझी जन्नत' असे संबोधले आहे. हा संदर्भ हे दर्शावितो की उच्चपदस्थ जन्नत अल्लाहचा मर्जीचे प्रतिक आहे.

# सूरह अल-बलद

# ९०. सूरह अल-बलद

**नाव :** पहिल्या आयतीत अल-बलद (शहर) हा शब्द आलेला आहे. हया शब्दास अभिप्रेत मक्का शहर असून, त्यावरून या सूरतीस अल-बलद हे नाव योजिले आहे.

**अवतरण काळ :** ही सूरह मक्की आहे. तिच्या मजकूरा असा अंदाज येतो की ही सूरह मक्केच्या प्रारंभिक काळात अवतीर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पना (विषय):** ही सूरह मागील सूरतीस पूरक आहे, ज्यात असे स्पष्ट केले आहे की मानव सद्सद विवेक बुद्धि व नितीमत्ता असणारा प्राणी आहे,ज्याला परिक्षागृहात (जग) उभे करण्यात आले आहे. जर तो समजत असेल की मी येथे स्वत:च्या मनाप्रमाणे वाटेल तसे वागण्यास स्वतंत्र आहे. आणि मला अल्लाह समोर जाब देण्यास हजर व्हावयाचे नाही. तर त्याची ही समजूत मूळत: चुकीची आहे. आणि मानवाचे असे समजणेच त्याला मार्गभ्रष्ट करते. व त्याच्यात कर्तव्याची भावना व दुसऱ्याच्या हक्काची जाण रहात नाही. परिणामत: मानव नरकाच्या (जहन्नमच्या) खड्डयात पडतो.

**ग्रंथ मांडणी:** आयत क्र. १ ते ४ मध्ये जे पुरावे (साक्ष) दिले आहेत त्यावरून हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की हे जग मनोरंजन किंवा ऐष-आरामाकरीता नसून व मानवाला येथे मौजमजा करण्याकरीता पाठविलेले नसून उलट त्याची निर्मिति एका विशिष्ठ ध्येयापोटी करण्यात आली आहे. म्हणूनच त्याला निर्माण यातनामय परिस्थितीत करण्यात आले आहे.

आयत क्र. ५ ते ७ मध्ये मानवाच्या बेजबाबदार व बेताल वर्तनावर अंकुश ठेवताना त्याच्या सद्सद्विवेक बुद्धिला जागृत केले आहे. काय त्याने असा गैरसमज करुन घेतले आहे की त्याच्यावर कोणत्याच सर्वोच्च शक्तिने नजर ठेवलेली नाही.

आयत क्र. ८ ते १७ मध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की मानवासाठी उच्चनिती व कृतीचा मार्ग म्हणजेच पुण्य आणि उत्तम आचरणाचा मार्ग खुला ठेवण्यात आलेला आहे, त्याच बोरबर अधोगतीकडे (पापाकडे) नेणारा मार्गही खुला ठेवलेला आहे. नैतिकतेचा मार्ग बिकट जरूर आहे मात्र हे चढण पार केल्यास मानव प्रगतीच्या व नैतिकतेच्या उच्च शिखरी पोहोचतो.

आयत क्र. १८ ते २० मध्ये -इमानाबरोबरच (श्रद्धा) नैतिकतेचा मार्ग अनुसरण्याचा परिणाम असा आहे की मानव कल्याणाचा व भाग्याचा धनी होतो. याउलट कृतघ्नतेचा (कुफ्र) मार्ग पत्करणाऱ्या लोकांना नरकाच्या (जहन्नम) खड्डयात पडावे लागणार व जेथून बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग उरणार नाही.

# ९०.सूरतुल बलद

سُورَةُ الْبَلَدِ

आयती - २०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने.

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. नाही [१] मी शपथ [२] घेतो हया शहराची. [३]

لَا أُقْسِمُ بِهَٰذَا الْبَلَدِ ۝١

२. -----आणि तुम्ही, हया शहराचे रहिवाशी आहात [४]----

وَأَنتَ حِلٌّ بِهَٰذَا الْبَلَدِ ۝٢

३. आणि जन्म देणाऱ्याची [५] व त्याची ज्याला त्याने जन्म दिला.[६]

وَوَالِدٍ وَمَا وَلَدَ ۝٣

४. नि:संशय आम्ही मानवास मोठया यातनामय परिस्थितीत निर्माण केले आहे. [७]

لَقَدْ خَلَقْنَا الْإِنسَانَ فِي كَبَدٍ ۝٤

५. काय तो असे समजतो की त्याच्यावर कोणाची सत्ता चालणार नाही ?[८]

أَيَحْسَبُ أَن لَّن يَقْدِرَ عَلَيْهِ أَحَدٌ ۝٥

६. म्हणतो, मी प्रचंड मालमत्ता उधळून टाकली. [९]

يَقُولُ أَهْلَكْتُ مَالًا لُّبَدًا ۝٦

७. काय तो असे समजतो, त्याला कोणीच पाहिले नाही ?[१०]

أَيَحْسَبُ أَن لَّمْ يَرَهُ أَحَدٌ ۝٧

८. काय आम्ही त्याला दोन डोळे दिले नाहीत ?[११]

أَلَمْ نَجْعَل لَّهُ عَيْنَيْنِ ۝٨

९. आणि जीभ व दोन ओठ.[१२]

وَلِسَانًا وَشَفَتَيْنِ ۝٩

१०. आणि त्याला दोन्ही मार्ग दाखविले नाहीत?[१३]

وَهَدَيْنَاهُ النَّجْدَيْنِ ۝١٠

११. परंतु त्याने घाटातील बिकट मार्ग ओलांडला नाही. [१४]

فَلَا اقْتَحَمَ الْعَقَبَةَ ۝١١

१. तुमचे असे समजणे चुकीचे आहे की इहलोकांतील जीवन मौजमजेसाठी असून येथे कसलीही कसोटी नाही व कोणत्याच प्रकारचा मोबदला (पुरस्कार) किंवा शिक्षा कधीच मिळणार नाही.

२. शपथेच्या खुलाशाकरिता पहा सूरह तकवीर टीप क्र. १४.

३. येथे मक्का शहर अभिप्रेत आहे जेथे ही सूरह अवतीर्ण झाली.

४. येथे मक्केच्या रहिवाश्यांना संबोधिले आहे ज्याना सर्वप्रथम उद्देशून या सूरतीत संभाषण केलेले आहे. याची रचना द्वितीय पुरुष एक वचनेत (اَنْتَ तू) केले असून मक्केच्या वैयक्तिक प्रत्येकाला परिस्थितीचे चिंतन करण्याचे व्यक्तीश: आवाहन (निमंत्रण) करण्यात आले आहे.

५. येथे अभिप्रेत आई आहे, जी मुलाला मोठ्या कष्टात व यातनेत जन्म देते. 'वालीद' हा शब्द पुल्लींगी आहे, परंतु हा शब्द वडीलांप्रमाणे आईकरीताही वापरला जातो (पहा अरबी शब्दकोष लिसानुल अरब शब्द वलद). याचे दूसरे उदाहरण म्हणजे हामील शब्द, जो हामेला (गर्भवती) करीता वापरतात. अशा पुल्लींगी शब्दांचा उपयोग स्त्रिलींगीच्या संदर्भात तेंव्हाच करतात, जेव्हा संदिग्धतेने बोलावयाचे असते व स्त्री किंवा पुरुषासंबंधी स्पष्टपणे बोलणे अथवा खुलासेवार बोलणे अयोग्य असते.

येथे ज्या संदर्भात हा शब्द वापरला गेला आहे, त्यानुसार आई हाच अर्थ घेणे संयुक्तिक ठरेल कारण नंतरच्या वचनात (आयतीत) मानवास यातनामय परिस्थितीत निर्माण करण्याचा उल्लेख आहे. आणि हे उघड आहे की मातेलाच जन्म देण्याच्या यातना सोसाव्या लागतात. पित्याला नाही.

६. अभिप्रेत प्रत्येक मूल आहे, जे आईच्या उदरातून (पोटातून) जन्म घेते. आणि मुलाचे जन्मणे कष्टदायक व यातनामय असते.

७. हा तोच दावा आहे जिच्या खरेपणाकरीता वर नमूद केलेल्या शपथा साक्षीच्या स्वरूपात घेण्यात आलेल्या आहेत. मानवाचे यातनामय परिस्थितीत जन्मास येणे, नाकारता न येणारे (अपरीहार्य)सत्य आहे. या हकीकतीच्या (सत्य) समर्थनार्थ आणखी काही गोष्टींचा हवाला देऊन ते अधिक बळकट केले आहे. मक्केची भूमी खडक व डोंगरांनी वेढलेली असून जेथे गवत-पाण्याचा अभाव आहे व जमीन नापीक वाळवेट असल्याने येथील ऋतु फारच सक्त असते. कुरआन अवतीर्ण होत असतानाच्या काळात सामान्यत: येथील जीवन कष्टप्रद होते. कुरआन ने मक्केच्या रहिवाश्यांचे तेथील नैसर्गीक परिस्थितीकडे लक्ष वेधून विचारले की, 'मक्केचा प्रदेश इतका खडकाळ व वातावरण इतके कठोर का आहे?'' याचा तुम्ही विचार केला आहे का? जर हे जग ऐष-आरामाचे असते तर, ज्या शहरास उम्मुल कुरा (शहरांची माता) ठरविण्यात आले, त्या शहरास वाळवेट करण्याचे काहीच कारण नव्हते. तुम्ही ह्या वातावरणाशी फक्त निगडीतच नसून, या शहराच्या ऐतिहासीक परिस्थितशी चांगले परिचीत आहात, की कोणत्या कठीण परिस्थितीत हजरत इब्राहीम (अलैहिस्सलाम) व हजरत इस्माईल (अलैहिस्सलाम) यांनी काब्याचे (बैतुल्लाह –परमेश्वराचे घर) निर्मीतीचे ऐतिहासीक कार्य पूर्ण केले. थोडक्यात या शहराची भौगोलीक व ऐतिहासीक परिस्थिती या गोष्टीची साक्ष देते की हे जग मनोरंजन किंवा ऐष-आरामाचे ठिकाण नसून उलट काबाडकष्ट व यातना सहन करण्याचे हे ठिकाण आहे आणि यात मानवाची कसोटी आहे. या प्रमाणे मानवाचे जन्मास येणे याच सत्याचा भक्कम पुरावा आहे. मूल जेव्हा आईच्या पोटी जन्म घेते ती घटना व ती वेळ आईकरीता किती कठीण व यातनामय असते आणि जेव्हाते या जगात प्रवेश करते तेव्हा ते रडत व अडचणींनी वेढलेले असते. यावरूनच स्पष्ट होते की मानव जगात ऐष आराम करणेस आलेला नाही. परंतु अडचणी व कष्टांना घेऊन कठीण परिक्षेच्या अग्निदिव्यातून पार पडण्यासाठी आलेला आहे. म्हणूनच मानवाचे कष्टप्रद व यातनामय जन्मण्याचे सत्य एका दुसऱ्या मोठ्या सत्याकडे इशारा करते आणि ते म्हणजे पुरस्कार, इनाम व शिक्षेचे प्रकरण ज्याला मानवास अवश्य तोंड द्यावे लागणार आहे. ज्याअर्थी हे जीवन म्हणजे कसोटी व परीक्षा आहे, त्या अर्थी ह्याच्या निकालाचा दिवस असणे आणि यांत यश व अपयश मिळणे हे अपरिहार्य आहे.

कुरआनाच्या या आयतीत हाच युक्तिवाद लपलेला आहे. त्याचबरोबर येथे एका महत्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले आहे, की कष्टात व यातनामय परिस्थितीतच मानवाचे कर्तृत्व व मोठेपण कसाला लागते. ज्या माणसाने मक्का शहर वसविण्याचे कार्य पूर्ण केले त्याला कितीतरी कष्टांना व अडचणींना तोंड द्यावे लागले असेल. आणि त्याचे जीवन सहनशीलतेची कसोटीच होती. परंतु हया सर्व बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागले असेल. आणि त्याचे जीवन सहनशीलतेची कसोटीच होतो. परंतु ह्या सर्व बिकट परिस्थितीला तोंड दिल्यानंतरच त्याच्या हातून काब्याचे उभारणीचे मोठे व ऐतेहासीक कार्य घडू शकले, आणि त्यानंतरच तो इमाम (नेता) या पदास पात्र ठरला यावरूनच हे सिद्ध होते की, या जगात कष्ट व यातना मानवास सहन कराव्या लागतात. त्या मागे त्याला त्रास देण्याचा हेतू नसून तर त्याचे स्थान उंचावण्यासाठी असतात. मानवाने जर आपले धैर्य खचू दिले नाही व

ईश्वरीय मार्ग दर्शनाचा स्विकार करून समोर येणाऱ्या संकटांना तोंड दिले तर त्याच्यात लपलेले (मानवतेचे) सद्‌गुण बहरू लागतात. आणि तो उच्च शिखरी पोहोचतो.

ह्या ठिकाणी एका उर्दू शायराच्या कवितेतील दोन ओळी येथे दिल्यास अनुचित ठरणार नाही.

**''रंग लाती है हिना पत्थरपे पिस जाने के बाद।**
**आदमी बनता हे इन्साँ ठोकरे खाने के बाद''।।**

(ज्याप्रमाणे दगडावर वाटण्याच्या दळण्याच्या यातना सहन केल्यानंतरच मेंहदीचा रंग खुलतो त्याच प्रमाणे मानव संकटातून तावुन सुलाखुन निघालयावरच श्रेष्ठ गणला जातो)

अल्लाहने आपल्या घराचे (काबा) उभारणीकरीता बागबगीच्यांनी फुललेला प्रदेश निवडला नाही. उलट पर्वतांनी वेढलेल्या वाळवंटाची निवड केली. या निवडीमागे महान हिकमत (चातुर्य) कार्यशिल आहे. कि त्या घराचे दर्शन घेणाऱ्यांनी बाह्य आकर्षणाने प्रेरित न होऊन आंतरिक ओढीने त्याचे दर्शन घेण्यास आले पाहिजे. आणि यावरून मानवास असे मार्गगर्शन मिळावे की ईश्वरापर्यंत पोहचण्याचा मार्ग सुलभ नसून उलट बिकट व अडचणींचा आहे.

ह्या स्पष्ट वास्तविकतेनंतर आणि इतका उघड पुरावा उपलब्ध असतांना (मानव) संकटात सापडल्यानंतर तक्रारीचा सूर का काढतो? व धैर्य सोडून का वागतो? त्याचे मूल कारण हेच आहे की, मानव सत्यस्थिती व या जगाविषयी योग्य दृष्टिकोन अवलंबित नाही. जगाला तो विश्राम-धाम समजतो. आणि जगाकडून मौजमजा मिळणेची अपेक्षा बाळगतो. परंतु जेव्हा त्याच्या या भावना दुखावतात. अडचणी व संकटांशी सामना करावा लागतो, तेव्हा तो आकंदन करू लागतो आणि कर्तव्य परामूख होऊन धैर्याने काय करण्याच्या बाबतीत असफल ठरतो. याप्रमाणे मानवाचे संपूर्ण जीवन अयशस्वी ठरते. आणि परिक्षेत अयशस्वी झाल्याने तो शिक्षेस पात्र ठरतो.

८. म्हणजे मानव जो यातनेत गुरफटलेल्या परिस्थितीत जन्मास येतो आणि त्यानंतर त्याला जीवनाच्या खडतर मार्गाने वाटचाल करावी लागते, अशा स्थितीत न जाणो कोणत्या वेळेस, कोणत्या दुर्घटनेस त्याला तोंड द्यावे लागेल आणि कोणते संकट त्याच्यावर कोसळेल, तेव्हा तो ह्या गर्विष्ठ भ्रमात का राहतो की, कोणतीच सर्वोच्च शक्ती त्यास अटकाव करणार नाही. आणि मनात येईल त्याप्रमाणे वागल्यास त्याच्यावर कोणाचा ताबा राहणार नाही मानव संकटांनी घेरलेला आहे, हि वस्तुस्थिती सिद्ध करते की मानव दुर्बल आहे. आणि या गोष्टीचा हा पुरावा आहे की त्याच्यावर एक सर्वोच्च शक्ति आपले वर्चस्व ठेवून आहे. जिचे निर्णय त्याच्यावर लागू होत असतात.

९. हे एक अशा गोष्टीचे उदाहरण आहे की जगाला चैनीचे स्थळ समजणे, याच्या परिणामी मानवाचे वर्तन कितीतरी बेजबावदार बनते हे उदाहरण अशा श्रीमंतांचे आहे जे आपल्या संपत्तीची अधळपट्टी करतात आणि ह्या आपल्या अवास्तव खर्चाचे प्रदर्शन करणे अभिमानास्पद मानतात. वास्तविक पहाता अल्लाहने संपत्ती याकरीता दिली होती की त्यांनी तीला उचीत व भलाईच्या कार्यात खर्च करावी आणि आपल्या योग्य गरजाही भागवांव्यात व अल्लाहच्या इतर दासांचे हक्कही द्यावेत. परंतु तिला (संपत्तीला) त्यांनी प्रदर्शन व अवाजवी खर्चाचे साधन बनविले. अशा तऱ्हेने या परिक्षेच्या ह्या महत्वपूर्ण प्रश्नपत्रिकेस सोडविण्यात ते पुर्णत:अयशस्वी ठरले.

पैशाची अधळपट्टी, मग ती अनेकेश्वरवाद्याची धार्मिक विधी पुर्ण करणे करीता असो किंवा अडाणी रूढीवर असो, मेजवान्या व दिखाऊ समारंभाची शान वाढविणेकरीता असो किंवा कला व कौशल्याच्या प्रदर्शनाच्या नावाखाली स्मारके उभारणेवर असो, किर्ती वाढविणेसाठी असो किंवा वैभव प्रकट करणे साठी असो. अशी कुत्ये फक्त पापच नसून गरीब व गरजूंच्या हक्काची पायमल्ली देखील यामूळे होते.

१०. म्हणजे उघळपट्टी करण्यात अभिमान बाळगणारा काय असे समजतो की कोणतीच शक्ति त्याच्यावर नजर ठेवीत नाही? आणि त्याला संपत्ती याकरीता मिळालेली आहे की, त्याने मौजमजा करावी किंवा आपल्यासाठी ऐष आरामाचे साधन करावे? असे जर असेल तर हा सर्वात मोठा मूर्खपणा आहे. अल्लाह तर मानवाच्या प्रत्येक कृतीवर नजर ठेवून आहे आणि ज्याअर्थी तो पहात आहे. त्याअर्थी तो त्याचा जाब ही विचारणार.

११. अल्लाहने त्याला पहाण्याची क्षमता (दृष्टी) प्रदान केली होती, याकरीता की त्याने सृष्टीच्या सर्वात मोठ्या सर्वात अधिक परिपूर्ण वास्तवतेचे निरीक्षण करावे. परंतु त्याने या वस्तुस्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष केले (डोळेझाक केली.) तो सर्व काही पहात होता परंतु त्याला त्या सर्वश्रेष्ठ शक्तिमानाचे हात कोठेच दिसले नाहीत.

१२. अल्लाहने मानवाला जीभ व दोन ओठ देऊन त्याला बोलण्याची शक्ति प्रदान केली. आणि ही क्षमता याकरीताच प्रदान केली आहे, की त्याने आपल्या पालनकर्त्याचे गुनगान गावे; सत्य व न्यायाच्या गोष्टी बोलाव्यात. परंतु मानवाची जातच विचित्र आहे. ह्या अमूल्य देणग्या मिळाल्या असतांना देखील त्याच्या मनात कृतज्ञतेची भावना निर्माण होत नाही. तो बोलण्यांत फार पटाईत आहे परंतु आपल्या पालनकर्त्याचे गुनगाण गाण्यासाठी त्याचे तोंड उघडत नाही.

तो अस्खलित बोलतो. शाब्दिक चमत्कार दाखवितो परंतु सत्य व न्यायाच्या बाबतीत त्याची वाचा बंद होते.

१३. म्हणजे चांगला व दुष्ट, सत्कर्म व दुष्कर्म, पुण्य व पापाचा असे दोन्ही मार्ग त्याला दाखवलेत. हे प्राकृतिक मार्गदर्शन आहे, जे माणसाला देण्यात आले आहे. म्हणूनच मानव स्वभावत: चांगल्या व वाईटात तारतम्य बाळगतो.

(याचे अधिक स्पष्टीकरण सूरह शम्स मध्ये देत आहोत)

चंगाले व वाईट असे दोन्ही मार्ग याकरीता दाखविले की मानवाने स्वत:च्या जबाबदारीवर ज्या मार्गाचा अवलंब करावासा वटेल त्या मार्गाचा अवलंब करावा.

१४. मूळ ग्रंथात 'अकबाह' शब्द वापरण्यात आलेला आहे. ज्याचा अर्थ 'घाटमार्ग' असा होतो. म्हणजे असा बिकट मार्ग जो डोंगरांच्या मधून विधतो. आणि जे ओलांडण्याकरीता माणसाला चढण चढण्याचे कष्ट घ्यावे लागतात. अभिप्रेत सत्कार्याचा मार्ग जो बिकट व अडचणींचा आहे. परंतु हे चढण ओलांडल्यानंतरच मानव उच्च शिखरी पोहचतो.

सत्कर्माच्या कामात रूची वाटत नाही. आणि इच्छा अभिलाषे च्या विरूद्ध हे कार्य पूर्ण करावे लागते. याकरीता ते मनास जड वाटते. याऊलट दुष्कर्म पापाचे काम रुचिपूर्ण असते. आणि इच्छा देखील अशा कामास उत्तेजन देते. म्हणूनच मन याच्याकडे सहज आकर्षित होते. या सत्यतेचे पैगंबरांनी अशा तऱ्हेने वर्णन केले आहे.

حُجِبَتِ النَّارُ بِالشَّهَوَاتِ وَ حُجِبَتِ الْجَنَّةُ بِالْمَكَارِهِ۔

''नरक, मन इच्छा व वासना यांनी झाकून टाकण्यात आला आहे. आणि स्वर्ग (जन्नत) अशा गोष्टींनी ज्या मनाला आवडत नाहीत.'' (बुखारी किताबुर रिकाक)

आणि हजरत ईसा अलैहिस्सलाम यांनी देखील उदाहरण स्वरूप याविषयी असे कथन केले आहे.

''अरुंद दरवाजाने आंत जा: कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रुंद व मार्ग पसरट आहे आणि त्यातून आंत जाणारे पुष्कळ आहेत; जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग संकोचित आहे आणि ज्यांना तो सांपडतो ते थोडके आहेत.''

(मत्तय ७:१३,१४)

وَمَآ اَدْرٰىكَ مَا الْعَقَبَةُ ؕ ﴿١٢﴾

१२. आणि तुम्हाला काय माहीत की तो घाटमार्ग काय आहे.[१५]

فَكُّ رَقَبَةٍ ۙ ﴿١٣﴾

१३. मान सोडविणे [१६] (सुटका करणे)

اَوْ اِطْعٰمٌ فِيْ يَوْمٍ ذِيْ مَسْغَبَةٍ ۙ ﴿١٤﴾

१४. किंवा उपासमाराच्या दिवशी जेवू घालणे [१७]

يَّتِيْمًا ذَا مَقْرَبَةٍ ۙ ﴿١٥﴾

१५. नातेवाईतक अनाथास [१८]

اَوْ مِسْكِيْنًا ذَا مَتْرَبَةٍ ؕ ﴿١٦﴾

१६. किंवा दरिद्रेतेने गांजलेल्या गरजवंतास [१९]

ثُمَّ كَانَ مِنَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَتَوَاصَوْا بِالصَّبْرِ وَتَوَاصَوْا بِالْمَرْحَمَةِ ؕ ﴿١٧﴾

१७. मग तो अशा लोकांत सामील झाला असता ज्यांनी इमान [२०] आणले आणि ज्यांनी एकमेकांना धीर व सहानुभूतीचा उपदेश केला.[२१]

اُولٰٓئِكَ اَصْحٰبُ الْمَيْمَنَةِ ؕ ﴿١٨﴾

१८. हेच लोक भाग्यवान [२२] आहेत.

وَالَّذِيْنَ كَفَرُوْا بِاٰيٰتِنَا هُمْ اَصْحٰبُ الْمَشْئَمَةِ ؕ ﴿١٩﴾

१९. आणि ज्यानी आमच्या वचनांना (अयातींना) नकार दिला ते दुर्दैवी आहेत.

عَلَيْهِمْ نَارٌ مُّؤْصَدَةٌ ﴿٢٠﴾ ع

२०. अशे लोक अग्निने वेढलेले असतील व तिच्यातून सुटकेचे मार्ग बंद केले जातील.[२३]

१५. हा प्रश्न घाटमार्गाचे महत्व स्पष्ट करण्यासाठी आहे. अर्थ हा आहे की मानवाने हे चांगल्या तऱ्हेने लक्षात घेतले पाहिजे की सत्कार्याचा मार्ग कठीण आहे. जो पार केल्याशिवाय मनुष्य यशाच्या शिखरावर पोहचू शकत नाही या मार्गात संपत्तीचा त्याग करावा लागतो. परंतु ज्या माणसांनी संपत्तीस ऐष आराम मिळविण्याचे साधन बनविले असेल ते ह्या मार्गावर काय पाऊल टाकू शकतील.

१६. म्हणजे गुलामाला मुक्त करणे किंवा त्याच्या मुक्ततेकरीता आर्थिक सहाय्य करणे, ह्या सूरतीत, जी एक मक्की सूरह आहे व प्रारंभिक काळात अवतीर्ण झालेली आहे गुलामाला मुक्त करण्यास दिलेल्या ताकीदीस इतके महत्व दिले आहे की सत्कार्याचे बिकट वाटेतील पहिलेच पाऊल ठरते. हे कार्य फक्त त्याचे महत्वच स्पष्ट करण्यासाठी पुरेसे आहे असे नव्हे तर यावरून गुलामगिरीच्या समस्येवरील कुरआनाचा खरा (अस्सल) दृष्टिकोनही स्पष्ट रितीने समोर येतो. जेव्हा गुलामांना मुक्त करणे सर्वात महान सत्कार्य ठरते तेव्हा एकाद्या स्वतंत्र व्यक्तिस गुलाम बनविणे याकरिता इस्लाम मध्ये जागाच कोठे शिल्लक रहाते. याबाबतीत हदीसमध्ये असे फर्माविले आहे:-

رَجُلٌ بَاعَ حُرًّا ثُمَّ اَكَلَ ثَمَنَهٗ۔ (بخاری)

‘कियामतच्या दिवशी, अल्लाह त्या माणसाला कठोर जाब विचारील, ज्याने एखाद्या स्वतंत्र माणसाची विक्री करून त्याची किंमत खाल्ली ’ ! (बुखारी)

(अधिक तपशिलाकरीता सुरह -निसाची टीप नं. ६४ पहाणे)

१७. गरजवंतांना जेवण देणे प्रत्येक परिस्थितीत पुण्याचे कार्य आहे परंतु भुकेल्या अवस्थेत व दुष्काळात ह्याची आवश्यकता व महत्व वाढते.

१८. प्रत्येक अनाथ मदतीस पात्र आहे. परंतु तो जेव्हा नातेवाईक असेल. तर तो अधिक पात्र ठरतो.

१९. गरीब देखील प्रत्येक परिस्थितीत मदतीस पात्र आहे. परंतु जेव्हा तो दारिद्रयतेने मातीत मिळाला असेळ किंवा गरीबी व वाईट परिस्थितींने जमिनिवर पडला असेल (आजच्या भाषेत-फुटपाथवर जीवन जगण्यास विवश (मजबूर) झाला असेल) तर तो मदतीस अधीक पात्र आहे.

या आयतीत सत्कार्याची काही उदाहरणे दिली आहेत. उद्देश हे स्पष्ट करावयाचे आहे की संपत्तीचा योग्य व उत्तम उपयोग (वर उल्लेख केल्याप्रमाणे) हा आहे. आणि अशा प्रकारची कामे करूनच मानव चारीत्र्य व नितीने उच्चतम शिखर गाठू शकतो. आता उरले ते लोक, जे प्रसिद्धीकरीता उधळपट्टी करतात. तर त्यांच्या वाटयास नाउमेदीशिवाय काहीच येत नाही.

२०. म्हणजे सत्कार्याच्या कार्यास पार पाडण्याबरोबर हे ही जरूरीचे आहे,की माणसाने ईमान (श्रद्धा) धारण करून निष्ठावंताच्या (मोमीन) गटात सामिल व्हावे. कारण ईमानाशिवाय कोणतेच सत्कार्य अल्लाहजवळ स्विकारले जाणार नाही. कुरआनने इतर ठिकाणीही त्याचे स्पष्टीकरण केले आहे. आणि ईमान विश्वासार्ह नाही जोपर्यंत मानवाने कुरआनवर व हजरत मोहम्मद पैगंबरांच्या प्रेषित्वावर ईमान आणले नाही.

२१. येथे ईमान धारकांच्या दोन महत्वपूर्ण गुणांचा उल्लेख केलेला आहे. एक हा की, ते एकमेकांना धीर ठेवण्याचा सल्ला देतात. व दुसरा हा की, एकमेकाविषयी सहानुभुती बाळगण्याचा सदुपदेश करतात. तात्पर्य ये की एक मोमीनाने (निष्ठावंताचा) आपल्या पुरते धैर्य ठेवणे व दुसऱ्यांना सहानुभुती दाखवणे हे पुरेसे नाही तर आवश्यक आहे की या दोन्ही गोष्टींचा उपदेश इतरांना करावा. हा संकेत आहे निष्ठावंताना या गोष्टीकडे कि त्यांनी आपसात बरोबरीचे संबंध ठेवून एकमेकांशी सहानुभुती ठेवावई आणि सदिच्छ व्यक्त करावी. हे लक्षात घेतले पाहिजे कि निष्ठावंताच्या गटात सामील झाल्यानंतर त्यांच्यावर सामुदायिक व सामाजिक जबाबदाऱ्याही लागू होतात.

२२. म्हणजे हे यशस्वी लोक आहेत कारण हे कसोटीस पूर्ण उतरले आहेत आणि त्यांनी आपल्यात असे गुण बाळगले आहेत जे यशाची हमी देणारे होते. हे पवित्र व भाग्यवान आत्मे आहेत जे अनादीकालपर्यंत सुभाग्याचा उपभोग घेतील.

२३. म्हणजे, त्यांना अग्नीत टाकल्यानंतर वरून दरवाजे बंद करून घेतले जातील आणि ते अग्नीत अशा तऱ्हेने वेढलेले असतील की, त्यांना त्यातून बाहेर निघण्याचा मार्ग मिळू शकणार नाही.

# सूरह
# अश-शम्स

# ९१. सूरह अश-शम्स

**नावः** पहिल्या आयतीत अश-शम्स (सूर्य) ची शपथ घेण्यात आली आहे. यावरून या सूरतीचे नाव 'अश-शम्स' असे आहे.

**अवतरण काळ :** ही सूरह मक्की आहे. आणि तिच्या विषयावरून अंदाज येतो की ही सूरह त्यावेळेस अवतीर्ण झाली जेव्हा पैगंबरांना खोटे ठरविण्यास व त्यांना विरोध करण्यास नुकतीच सुरुवात झालेली होती.

**मध्यवर्ती कल्पनाः** मानवाला आज्ञेचे उल्लंघन (अवज्ञा) केल्यास होणाऱ्या वाईट परिणामाची पूर्वसूचना व परिचय करून देणे. आणि ही वस्तूस्थिती स्पष्ट करणे आहे की आत्मशुद्धि व तिची योग्य जोपासना सफलतेची हमी आहे. या उलट आत्मयाला दुष्कृत्यात गुरफटविणे; असफलता व निराशेस कारणीभूत ठरते व आज्ञाभंग करण्याचा परिणाम नाश आहे.

**ग्रंथ मांडणीः** आयत नं. १ ते १० मध्ये सूर्य, चंद्र, रात्र व दिवस आणि जमीन व आकाश या महान निशाण्याकडे लक्ष वेधण्यात आलेले आहे; ज्या, या सृष्टीच्या निर्मात्याच्या अदभूत सामर्थ्याचा व कौशल्याचा बोलका पुरावा आहे. त्या बरोबरच मानवी आत्म्याच्या साक्षीला समर्थनार्थ सादर केल्या गेल्या आहेत.

आयत नं. ११ ते १५ मध्ये ऐतिहासीक पुरावा सादर करण्यात आलेला आहे. याबाबतीत 'समूद' या समाजाच्या घटनेचे थोडक्यात वर्णन केले आहे याकरीता की त्यांनी केलेल्या आज्ञाभंगाचा जो परिणाम झाला, त्यापासून लोकांनी धडा घ्यावा आणि कुरआन व इस्लामच्या पैगंबराबरोबर विरोधी वर्तन ठेवण्या पासून अलिप्त रहावे.

# ९१.सूरह अश्-शम्स

سُوْرَةُ الشَّمْسِ

आयती - १५

परम दयाळू व परम कृपाळू आल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. सूर्याची व त्याच्या प्रकाशा ची शपथ. [१,२]

وَالشَّمْسِ وَضُحٰهَا ۝١

२. आणि चंद्राची, जेव्हा तो सूर्याच्या मागे येतो,[३]

وَالْقَمَرِ اِذَا تَلٰهَا ۝٢

३. आणि दिवसाची, जेव्हा त्याला (सूर्याला) प्रकट करतो. [४]

وَالنَّهَارِ اِذَا جَلّٰهَا ۝٣

४. अनु रात्रीची, जेव्हा त्याला (सूर्याला) आच्छादून टाकते. [५]

وَالَّيْلِ اِذَا يَغْشٰهَا ۝٤

५. आणि आकाशाची व त्या (सामर्थ्यवाना) ची ज्याने त्याला बनविले. [६]

وَالسَّمَآءِ وَمَا بَنٰهَا ۝٥

६. आणि जमिनीची व त्याची ज्याने तिला पसरविले

وَالْاَرْضِ وَمَا طَحٰهَا ۝٦

७. आणि आत्म्याची व त्याची ज्याने त्याला योग्य बनविले. [७]

وَنَفْسٍ وَّمَا سَوّٰىهَا ۝٧

८. नंतर त्याच्या दुष्टतेची व संयमतेची त्याला ज्ञान दिले. [८]

فَاَلْهَمَهَا فُجُوْرَهَا وَتَقْوٰىهَا ۝٨

९. नि:संशय सफल झाला तो ज्याने त्याचे शुद्धिकरण केले. [९]

قَدْ اَفْلَحَ مَنْ زَكّٰىهَا ۝٩

१०. आणि असफल झाला तो ज्याने त्याला अशुद्ध केले .[१०]

وَقَدْ خَابَ مَنْ دَسّٰىهَا ۝١٠

१. शपथेच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरेह तकवीर टिप क्र. १४.

२. जेव्हा सूर्योदय होतो तेव्हा पृथ्वीच्या चारही दिशा प्रकाशमान होतात. व जसजसा सूर्य वर चढत असतो तसतशीत त्याची उष्णता अधिक तिव्र होत जाते. ही स्थिती या गोष्टीचा उघड पुरावा आहे की सूर्याची लगाम त्याच्या निर्मात्याच्या हाती आहे. कारण निर्मात्याने निश्चित्याने निश्चित केलेल्या वेळेवरच सूर्य उगवतो व वर चढत जातो.

३.सूर्याचा प्रकाश दिवसा असतो तर चंद्रप्रकाश रात्री असतो. सूर्य दिवसाचा राजा आहे तर चंद्र रात्रीची राणी जो आपली मौफिल रात्रीच सजवतो. या वस्तुस्थितीस दृष्टि समोर ठेवून चंद्र सूर्याच्या मागे येतो असा उल्लेख आला आहे. हे स्पष्टीकरण या दृष्टीनेही बरोबर आहे की चंद्र सूर्याकडूनच प्रकाश मिळवतो. अशा तऱ्हेने चंद्र सूर्याच्या ताब्यात असणे या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की सूर्याप्रमाणे चंद्राची लगाम देखील त्यांच्या निर्मात्याच्या हाती आहे.

४. सूर्याची सर्व चमकदमक दिवसाच्या वेळी असते तो दिवसच जणू काही आहे जो सूर्याला प्रकट करतो आणि सूर्याची वेळेपूर्वी उगवण्याची हिम्मत नाही.

जरी सूर्याचे उगवणे पृथ्वीच्या गतीवर अवलंबून असते, परंतु येथे भौगोलीक किंवा अंतरिक्ष वैज्ञानिक पैलूवर चर्चा करण्याचा उद्देश नसून उलट या महत्वाच्या वस्तुस्थिती कडे लक्ष वेधणे आहे की जी कैफियत जगाला व्यापून टाकते त्या नियमित व उत्तम योजनेनुसार घडते. निसर्गाच्या या व्यवस्थेत प्रत्येक गोष्ट इतकेच काय सूर्यदेखील ज्यामुळे हे जग प्रकाशमान होते अशा तऱ्हेने बंदिस्त आहे की कोणाला ही सूतभर विद्रोहाची जागा शिल्लक नाही. नाहीतर या जगाची संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली असती.

५. जमिनीच्या ज्या भागावर रात्रीचा अंमल असतो तेथे सूर्यप्रकाश पोहोचू शकत नाही. म्हणून असे वाटते की जणू रात्रीने सूर्याला झाकून टाकले आहे. ही भाषाशैली निरिक्षणाच्या दृष्टीने स्विकारण्यात येते. येथे सांगण्याचा हेतू असा आहे की जगाच्या ज्या भागावर रात्र पसरलेली असते तेथे सूर्य उदयास येऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दात रात्रीच्या वेळी तो आपला चेहरा लपविण्यास विवश आहे. आणि त्याची ही विवशता याचा पुरावा आहे की तो या नियमाच्या बंधनातून जे त्याच्या निर्मात्याने त्याच्यासाठी निश्चित केले आहे थोडी देखील सुटका करून घेऊ शकत नाही. यावरून नास्तिक कवादाचेही खंडन होते व अनेकेश्वरवादाचेही खंडन होते. कारण सूर्य जर योगायोगाने अस्तित्वात आला असता तर तो एक दृढ व्यवस्थेने बांधला गेला नसता. आणि जर तो देव असता तर निसर्गाच्या नियमात जखडून राहीला नसता. आणि त्याच्या चेहऱ्याला लपविणे हे रात्रीच्या आवाक्यात नसते. उलट तो आपल्या बळावर रात्री देखील उदयास आला असता परंतु सूर्यग्रहमालेत जी बंधने आढळतात त्यावरून सूर्य देवते विषयी अनेकेश्वर वाद्याचे कल्पनेचे पूर्णतः खंडन होते.

६. आकाशाची शपथ घेणाचा अर्थ असा आहे की त्याची वैभवपुर्ण बनावट व त्याची भव्यता मानवाचे लक्ष या गोष्टीकडे वेधते की त्याचे नियंत्रण देखील त्याच्या निर्मात्याच्या हाती आहे.

'त्या (सामर्थ्यवाना) ची शपथ ज्याने त्याला बनविले' यावरून हे स्पष्ट करण्याचा हेतू आहे की आकाशाचा निर्माता एक सामर्थ्यवान शक्ति आहे आणि त्याचे अस्तित्व हे असे सत्य आहे जे संशयाच्या पलिकडे आहे. शपथ एकीकडे साक्षीच्या स्वरूपात येते व दुसरीकडे एखादी गोष्ट संशोधनपूर्ण व निश्चित होण्याच्या पैलूला स्पष्ट करण्याकरीता ही येते. म्हणून येथे आणि नंतरच्या दोन आयतीत ज्या 'सामर्थ्यवानाची शपथ' घेणेत आली आहे ती याच अर्थात आहे म्हणजे ही शपथ भर देणेच्या स्वरूपात आली आहे.

७. आत्म्यास ठीक व योग्य स्वरूप किंवा पूर्णत्व देण्याचा अर्थ असा की अल्लाहने मानवी आत्म्यास सरळ प्रकृतीवर निर्माण केले आणि त्यात उच्च प्रकारचे गुणही ठेवलेत. त्याला जन्मतः गुन्हेगार बनविले नाही. व त्याला स्वभावतः भ्रष्ट व खोडसाळही बनविले नाही की त्याने ईश्वराविरूद्ध विद्रोही करावा आणि सैतानी सवयी स्विकारण्यास विवश व्हावे.त्याने मानवाला सरळ स्वभावाचा बनवून त्यात बिघाडाचा असा कोणताही अंश ठेवलेला नाही की त्याच्या मनात सरळ मार्ग पत्करण्याची इच्छा तर आहे परंतु तसे तो करू शकत नाही. व मार्गभ्रष्टता स्विकारण्यास विवश आहे. या वस्तुस्थितीचे कुरआनने इतर ठिकाणीही स्पष्टीकरण केलेले आहे.

فِطْرَةَ اللّٰهِ الَّتِىْ فَطَرَ النَّاسَ عَلَيْهَا۔ (سورہٗ روم:٣٠)

'अल्लाहची ती प्रकृती (फितरत) जिच्यानुसार त्याने मानवांना निर्माण केले' (सूरे-रूम ३०)

आणि हजरत मुहम्मद पैगंबर यांनी त्याचे स्पष्टीकरण अशा रितीने केले आहे.

مامن مولودٍ الّا يولد على الفطرة۔ فاَبَواہ يهودانه وينصّرانه ويشّركانِهٖ۔ (مسلم کتاب القدر)

'' कोणतेही मुल असे नाही जे प्रकृतीवर निर्माण होत नाही नंतर त्याचे मातापिता त्याला यहूदी, ख्रिश्चन किंवा अनेकेश्वरवादी बनवितात' (मुस्लिम-कितीबुल कद्र).

८. म्हणजे अल्लाहने मानवाला सत्कर्म व दुष्कर्म जाणण्याची बुध्दी प्रदान केली जिच्या आधारावर तो चांगल्या वाईटात फरक करू शकतो आणि त्याला समजू लागते की हे काम चांगले आहे, ते काम वाईट आहे. म्हणूनच खोटेपणा अप्रामाणिकता,जुलूम, जबरदस्ती व निर्लज्जपणाला स्वभावत:वाईट समजतो व अशा तऱ्हेच्या कृत्याचा व अशा चरित्र्याचा तिरस्कार करतो आणि प्रामाणिकता, सत्यता, न्याय, सहानुभूति, लज्जा-संकोच या सारख्या गुणांना चांगले समजतो व अशा स्वरूपाच्या कृत्यांना व चारित्र्याला तो पसंत करतो, हा सुज्ञता वास्तविक पहाता प्राकृतिक मार्गदर्शनच आहे आणि हे मार्गदर्शन अल्लाहने प्रत्येक जिवात निर्माण केले आहे. जिला येथे ईश्वरा कडून प्रेरित (अंत:स्फूति) असे संबोधण्यात आले आहे.

ही सुज्ञता मानवाच्या आत्माची साक्ष आहे कि तो नीतिपूर्ण अस्तित्व बाळगणारा, जबाबदारी असलेला निर्मिती प्राणी आहे. आणि म्हणून त्याची आवश्यक निकड हीच आहे की त्याने आपल्या कृत्याचा आपल्या पालनकर्त्यासमोर जाब देण्यास तयार असावे आणि त्याच्या कृत्यांचा निकाल त्याच्या समोर यावा. आत्म्याची ही साक्ष मान्य न करण्याचा अर्थ असा होईल की प्रकृति चूकीची आहे. त्याची सुज्ञता खोटी व त्याचे अस्थित्व व्यर्थ आहे. परंतु कोणतीच व्यक्ति असे सांगण्यास तयार नाही. जरी कोटयावधी लोक आपल्या आत्म्याच्या साक्षीविरूद्ध जीवन जगतात आणि अशा खोटया कल्पनांच्या आहारी पडतात की ते मनात येईल त्याप्रमाणे वागण्यास स्वतंत्र आहेत. आणि त्याच्या परिणामाला त्यांना कधीच सामोरे जावे लागणार नाही. ईश्वराकडून मिळालेले दुराचारी व संयमशीलतेचे ज्ञान एका स्वरूपात ईश्वराचे मार्गदर्शनच होय. आता राहिला पुर्ण मार्गदर्शनाचा प्रश्न तर त्याची व्यवस्था अल्लाहने आकाशी शिकवण (आसमानी हिदायत) च्या स्वरूपात केली आहे. ही आकाशी शिकवण कुरआनच्या स्वरूपात अस्तित्वात आहे-या प्राकृतीक विवेकाला जे मानवाच्या आत्म्याला प्रदान केले आहे. आकाशी मार्गदर्शन त्याला बलकट करते व सुसंस्कृत करते. आणि येथूनच ही वस्तुस्थिती स्पष्ट होते की ज्या लोकांपर्यंत आकाशी मार्गदर्शन पोहोचले नाही तेसुद्धा आपल्या प्राकृतीक बुद्धिच्या मर्यादेपर्यंत आपल्या चांगल्या व वाईट कृत्यात अवश्य जबाबदार आहेत. आणि याबाबतीत अल्लाहकडे जाब द्यावा लागेल.

९. मूळ ग्रंथात शब्द 'जक्काहा' زَكّٰهَا वापरला आहे; जो 'तझकियाह' (शुद्धिकरण) पासून बनला आहे. ज्याचा अर्थ शुद्ध करणे, जोपासना करणे असा आहे. वरील आयतीत आत्म्याला दुष्कर्म व सत्कर्माचे जे ईशज्ञान दिल्याचा उल्लेख आहे त्यावरून आत्मशुद्धिचा अर्थही स्पष्ट होते. म्हणजे आत्म्याला दुराचारापासून शुद्ध करणे ईशभीती बाळगून सदाचार संयमशीलता या गोष्टींनी त्याची जोपासना करणे. दुसऱ्या शब्दात त्याचे अशातऱ्हेने संगोपन किंवा जोपासना करावी की त्याच्यातून सद्‌गुण निर्माण व्हावेत व नेक (नीति) वृत्तीची वाढ व्हावी.

आत्म्याची वास्तव उन्नती व मनाचा विकास हेच गुण निर्माण करण्यात आहे. या वस्तुस्थितीस हया उदाहरणावरुन समजून घेता येईल की एक रोपटे जेव्हा त्याला पोषक वातावरण व पाणी मिळत रहाते तेंव्हाच ते वाढीस लागते. नाहीतर सुसाट वाऱ्याचा एक धक्का त्याला मातीत मिळविण्यास पुरेसा आहे या सूरतीत ज्या विषयाचा उल्लेख आला आहे त्यावरून आत्मशुद्धिचा जो महत्वपूर्ण पैलू नजरेस भरतो तो हा आहे की माणसाने सर्वप्रथम स्वत:ला कुफ्र (ईश्वराला नकार देणे नास्तीकता) व (सरकशी) विद्रोही-आज्ञा उल्लंघन पासून शुद्ध करावे आणि ईश्वरी मार्गदर्शन स्विकारुन आज्ञापालनाच्या मार्गावर स्वत:स झोकून द्यावे आज्ञापालनाचा मार्ग हा शरीयतचा मार्ग आहे. त्याची वाटचाल करुन माणूस सदगुणीव व सदाचारी बनतो.

हा आहे आत्मशुद्धिचा स्वच्छ, सरळ-साधा व कुरआनी अर्थ यात काही क्लिष्टता अडचण किंवा स्पष्टता नाही आणि याकरीता कोणेत्याही तात्वीक चर्चेची गरज नाही. व अनावश्यक गोष्टीत गुरफटण्याची गरज नाही. कुरआनाने आत्मशुद्धिकरीता जो उत्तम व अत्यंत प्रभावी औषधे सांगीतले आहे ती आहे अल्लाहची उच्च व परिपूर्ण शरीयत, जिच्यात इतर कोणत्याही सूफी मार्गाची (तरीकत) वाढ करण्याची गरज नाही किंवा यातनामय व कठोर समाधी लावून बसण्याची गरच नाही, तसेच तपस्या करण्याची किंवा आध्यात्मीक मार्गाने तथाकथीत मजल गाठण्याची ही गरज नाही. उलट इमान (श्रद्धा) विश्वास (यकीन) नि:स्वार्थीपणा व फक्त अल्लाहची मर्जी संपादन करण्याबरोबर शरीयतीचे पालन करणे पुरेसे आहे. आत्मशुद्धिच्या या योग्य पद्धतीकडे मार्गदर्शन करून कुरआनाने मानवाला सर्व कृत्रिम व अवजड पद्धतीतून मुक्त केले आहे ज्या धर्मांच्या भक्तांनी मन आणि आत्मशुद्धिसाठी शोधून काढल्या आहेत. उदा.-योगासने, तपस्या, शरीरास व मनास यातना देणाऱ्या कृती, सन्यास वगैरे.

आणि याबाबतीत शेवटचा मुद्दा असा आहे की अल्लाहच्या कृपेशिवाय आत्मशुद्धिचे कार्य होऊ शकत नाही या करीता पैगंबरांनी ही प्रार्थना (दुआ) करण्याचे शिक्षण दिले आहे.

اَللّٰھُمَّ! آتِ نَفْسِیْ تَقْوَاھَا وَزَکّٰھَا اَنْتَ خَیْرُ مَنْ زَکّٰھَا۔
اَنْتَ وَلِیُّھَا وَمَوْلَاھَا۔ (مسلم کتاب الذکر)

"हे अल्लाह ! माझ्या मनाला ईशभीति व संयमी वृत्ती प्रदान कर आणि त्याचे शुद्धिकरण कर कारण तु सर्वोत्तम

शुद्धिकरण करणारा आहे. त्याचे पालन करणारा व मदत करणारा आहे. (मुस्लिम-किताबुज जिक्र)

१०. म्हणजे ईशभीति व सदाचारी वृत्ती स्विकारुन आत्मशुद्धि करण्याऐवजी त्याने दुष्कर्माचा मार्ग पत्त्करुन आत्म्याला वाईट व पापाच्या कृत्यात गुरफटले अशातऱ्हेने नेकवृत्तीवर दडपण आणून दुष्कर्माच्या वृत्तीला स्वत:वर वर्चस्व घेऊ दिले. याचा परिणाम असा झाला की आत्म्याची कळी जिचे रूपांतर फुलात झाले असते व ज्याचा सुगंध त्याच्या संपुर्ण अस्तित्वाला सुवासिक करू शकला असता दडपणाने आतल्या आत कोमेजून गेली. एका उर्दू कवीच्या पंक्तीत दिल्या प्रमाणे-

**''हसरत उन गुन्चोपे है जो बिनखिले मुरझा गये''**

(दु:ख आहे त्या कळयांविषयी ज्या न उमलताच कोमेजून गेल्या)

आयत नं. १ ते ७ मध्ये ज्या शपथा घेण्यात आलेल्या आहेत व नंतर जो दावा करण्यात आलेला आहे त्याचे स्पष्टीकरण असे आहे की सूर्यापासून मानवी आत्म्या पर्यंत सर्वांची लगाम अल्लाहच्या हातात आहे. आणि या सर्व वस्तूंचे अस्तित्व व त्यातून निर्माण होणारी स्थिती या गोष्टीची साक्ष देते की त्याचा निर्माता प्रचंड शक्तीचा मालक व मोठा हिकमती जाणणारा आहे. आणि जेव्हा त्याच्या शक्तिपुढे कोणास काही बोलण्याचे किंवा काही करण्याचे धाडस नाही व त्याच्या हिकमतीने मानवास एक विवेकी, समजूतदार व बऱ्यावाईटात फरक करणाऱ्या प्राण्याचे स्वरूप दिले आहे तेव्हा मानवाचे योग्य वर्तन हेच होऊ शकते की त्याने त्याच्या आज्ञापालनाचा व दास्यत्वाचा मार्ग स्विकारावा आणि या भावनेबरोबर जबाबदारीचे जीवन जगावे की त्याला आपल्या पालनकर्त्यासमोर जाब देण्यास हजर व्हावयाचे आहे आणि त्यानंतर त्याला आपल्या कृत्यापोटी इनाम किंवा शिक्षा भोगावयाची आहे. कुरआन याच वास्तवतेवर मानवाचे लक्ष केंद्रीत करू इच्छितो. अशासाठी की मानवाने कुरआनच्या शिकवणीनुसार आपले जीवन सुधारावे आणि जेव्हा या जगाच्या परिक्षागृहातून परत येईल तेव्हा सफलतेचे ठिकाण त्याच्यासमोर असावे.

या वस्तुस्थितीचे समर्थन जमिनीपासून आकाशापर्यंतच्या प्रत्येक वस्तुकडून होत आहे. व स्वत: मानवी आत्म्याची साक्ष हीच आहे तरी देखील मानव ही वस्तुस्थिती मान्य करण्यास क्वचितच तयार होतो व ईश्वरीय शिकवणीपासून बेपर्वा होऊ इच्छितो. याकरिताच तो आज्ञभंग व विद्रोहाचे 'वर्तन स्विकारतो. ज्याच्या परिणामी त्याच्या अंगात बेजबाबदारीच्या भावना निर्माण होतात. नंतर तो सत्कर्म व दुष्कर्मात काहीच फरक करू शकत नाही.

हा अतिशय महत्वपूर्ण व विशाल विषय आहे. जो वरील आयतीत नमूद केला आहे.

११. समूद (या समाज) ने आपल्या अवज्ञेने खोटे ठरविले. [११]

كَذَّبَتْ ثَمُوْدُ بِطَغْوٰىهَآ ﴿١١﴾

१२. जेव्हा त्यांच्यापैकी सर्वात अधिक दुर्भागी उठून उभा राहिला. [१२]

اِذِ انْۢبَعَثَ اَشْقٰىهَا ﴿١٢﴾

१३. तेव्हा अल्लाहच्या पैगंबराने [१३] या लोकांना सांगितले की खबरदार अल्लाहच्या सांडणीला (हात लावू नका) व तिच्या पाणी पिण्याच्या पाळीत (अडथळा आणू नका).[१४]

فَقَالَ لَهُمْ رَسُوْلُ اللّٰهِ نَاقَةَ اللّٰهِ وَسُقْيٰهَا ﴿١٣﴾

१४. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले आणि सांडणीच्या धोंडाशीरा कापून टाकल्या. [१५] त्यांच्या या अपराधापायी अल्लाहने त्यांच्यावर आपत्ती आणली व त्यांना भूईसपाट केले.[१६]

فَكَذَّبُوْهُ فَعَقَرُوْهَا فَدَمْدَمَ عَلَيْهِمْ رَبُّهُمْ بِذَنْۢبِهِمْ فَسَوّٰىهَا ﴿١٤﴾

१५. आणि त्याला त्यांच्या या परिणामाची मुळीच चिंता वाटत नाही.[१७]

وَلَا يَخَافُ عُقْبٰهَا ﴿١٥﴾

११. वर जो दावा मांडण्यात आला आहे त्याच्या समर्थनार्थ ही ऐतिहासीक साक्ष सादर करण्यात येत आहे की विद्रोही करण्याचा किती भयंकर परिणाम जगासमोर येत राहिला आहे.

'समूद' समाजाच्या घटनेचे कुरआन मध्ये अनेक ठिकाणी तपशिलवार वर्णन आढळते. या सूरतीत तिचा उल्लेख संक्षिप्त आढळतो. खोटे ठरविणेला अभिप्रेत पैगंबर हजरत सालेह अलैहिस सलाम यांना खोटे ठरविणे आहे. ज्यांना त्यांच्या मार्गदर्शनाकरीता पाठविण्यात आले होते. समूद समाजाच्या वास्तवयाचे ठिकाण वगैरे साठी सूरह-फज्रची टिप नं.१३ पहा.

१२. हा पापी समूद समाजाचा सरदार होता. त्याचे नाव किदार होते. त्याचा उल्लेख अरबांच्या अज्ञान काळातीळ (इस्लामपूर्व काळ) काव्यात आढळतो.

त्याला सर्वात मोठा दुभांगी याकरीता संबोधण्यात आले आहे की तो अतिशय विद्रोही वृत्तिचा होता. आणि त्याने आपल्या समाजाला मार्गभ्रष्ट करून विद्रोहाचे एक मोठे उदाहरण घालून दिले आणि परिणामस्वरूप स्वत:चाही नाश ओढवून घेतला व आपल्या समाजाच्या नाशासही कारणीभूत ठरला.

१३. अभिप्रेत हजरत सालेह अलैहिस्सलाम होत ज्यांना पैगंबर म्हणून या (समूद) समाजाकडे पाठविण्यात आले होते.

१४. समूद समाजाने हजरत सालेह अलैहिस्सलाम यांना अशी मागणी केली होती की जर खरोखरच तुम्ही अल्लाहचे पैगंबर आहात तर काही चमत्कार (निशाणी) दाखवा. त्यांच्या या मागणी वरून अल्लाहने सांडणीला चमत्कार म्हणून निर्माण केले. ही सांडणी चमत्कारच्या स्वरूपात निर्माण करण्यात आली होती म्हणून तिला अल्लाहची सांडणी ( نَاقَةَاللهِ नाकतल्लाह) संबोधण्यात आले आहे.

या चमत्काराने त्यांची मागणी पूर्ण केली त्याचप्रमाणे त्यांना परिक्षेतही (कसोटीत) टाकले. आणि त्याचे स्वरूप असे की हजरत सालेह यांनी सांगितले की तिच्या पाणी पिण्याकरीता एक दिवस निश्चित करण्यात येईल व दुसरा दिवस तुमच्याकरीता व तुमच्या जनावरांकरीता असेल. आणि ताकीद देण्यात आली की सांडणीला हानी पोहचवू नका. नाहीतर अल्लाह कडून तुमच्यावर आपत्ती कोसळेल परंतु समाजाने आपल्या विद्रोही सरदाराला उत्तेजन दिले की त्याने सांडणीला मारून टाकावे.

१५. उंटाला जेव्हा मारावयाचे असते तेव्हा त्याची धोंडाशीरा कापून टाकण्यात येत असे व त्यानंतर त्याचा मृत्यू होत असे हिच पद्धत समूदच्या लोकांनी अल्लाहच्या सांडणीला मारण्यासाठी अवलंबिली होती. या उद्देशानेच सर्वांनी मिळून आपल्या दुष्ट सरदाराला पुढे केले होते याकरिताच संपूर्ण समाजाला दोषी ठरविण्यात आले.

१६. म्हणजे त्यांना अशा तऱ्हेने बरबाद केले की ते धुळीस मिळाले व मातिमोल झाले.

१७. म्हणजे अल्लाहला जगातल्या राज्यकर्त्याप्रमाणे समजू नका. जे एखाद्या अपराधी टोळीस शिक्षा देताना अशी चिंता बाळगतात की त्याचा काय परिणाम होईल व त्यामुळे त्यांच्या सत्तेला धोका तर पोहचणार नाही ना? अल्लाहची सत्ता सर्वोच्च आहे आणि त्याचे वर्चस्व सर्वांवर आहे. म्हणून जेव्हा तो एखाद्या समाजाला शिक्षा देऊ इच्छितो तेव्हा त्याला काहीच भिती असत नाही.

# सूरह अल् लैल

# ९२. सूरह अल् लैल

**नाव :** पहिल्या आयतीत लैल (रात्रची शपथ घेण्यात आली आहे यावरून या सूरतीचे नाव अल लैल योजिले आहे.

**अवतरण काळ:** ही सूरह मक्की आहे आणि मजकुरावरून अंदाज येतो की इस्लामच्या आवाहनाच्या प्रारंभिक काळात अवतीर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पना:** हे स्पष्ट करावयाचे आहे की मानवाच्या प्रयत्नांचे दोन भिन्न पैलू आहेत. त्यांची निकड अशी आहे की दोहोंचे परिणाम व फळ विभिन्न असावेत व त्यांची उद्दिष्ठयेही वेगवेगळी असावीत. या सूरतीच्या विषयात व सूरह अश-शम्स याच्या विषयात निकटचे साम्य आहे. त्यात आत्म्याला शुद्ध करणे व भ्रष्ट करून टाकणे व त्यांच्या परिणामांचा उल्लेख आलेला आहे. या सूरतीत ह्या मुद्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे की आत्म्याला शुद्ध करणाऱ्या गोष्टी कोणत्या व भ्रष्ट करून टाकणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत.

**ग्रंथ-मांडणी:** आयत नं. १ते ४ मध्ये काही पुरावे सादर करून या गोष्टीवर युविकतवाद केला आहे की मानवाची कृत्ये व प्रयत्न जेव्हा भिन्न आहेत तेव्हा त्यांचे परिणामही भिन्न असले पाहिजेत.

आयत नं. ५ ते ११ मध्ये -भल्या वाईट आचरणांची काही वैशिष्टये सादर करून स्पष्ट केले आहे की चांगले गुण सत्कर्मांचा (नेकीचा) मार्ग सुलभ करतात. व वाईट गुण दुष्कर्मांचा मार्ग मोकळा करतात.

आयत नं. १२ ते १४ मध्ये स्पष्ट केले आहे की अल्लाहचे कार्य मार्ग दाखविणे आहे. आणि त्याने तो मार्ग तुम्हाला दाखविला आहे. जगाचा व मरणोत्तर जीवनाचा स्वामी तोच आहे म्हणून त्याने तुम्हाला सावध केले आहे. की मरणोत्तर जीवनात काय काय समोर येणार आहे.

आयत नं. १५ ते २१ मध्ये दाखविले आहे की दुष्कर्मी लोक कशा तऱ्हेने वाईट परिणामाला सामोरे जातील व सद्‌गुणी लोकांचा शेवट किती सुखकारक असेल.

# ९२. सूरतुल लैल

سُوْرَةُ اللَّيْلِ

आयती - २१

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे [१] रात्रीची जेव्हा ती पसरते, [२]

وَالَّيْلِ إِذَا يَغْشٰى ﴿١﴾

२. आणि दिवसाची जेव्हा तो प्रकाशमान होतो.[३]

وَالنَّهَارِ إِذَا تَجَلّٰى ﴿٢﴾

३. आणि त्याची [४] ज्याने नर व मादी निर्माण [५] केले.

وَمَا خَلَقَ الذَّكَرَ وَالْأُنْثٰىٓ ﴿٣﴾

४. नि:संशय तुमचे प्रयत्न भिन्न भिन्न आहेत.[६]

إِنَّ سَعْيَكُمْ لَشَتّٰى ﴿٤﴾

५. तर [७] ज्याने (अल्लाहच्या मार्गात धन दिले [८] व पापभीरुता स्विकारली.[९]

فَأَمَّا مَنْ أَعْطٰى وَاتَّقٰى ﴿٥﴾

६. आणि उत्तम गोष्टीला खरे मानले.[१०]

وَصَدَّقَ بِالْحُسْنٰى ﴿٦﴾

७. त्याच्याकरीता आम्ही सुलभतेचा मार्ग मोकळा करू [११]

فَسَنُيَسِّرُهٗ لِلْيُسْرٰى ﴿٧﴾

८. आणि ज्याने कंजूसपणा [१२] केला व बेपर्वाई दाखविली.[१३]

وَأَمَّا مَنْۢ بَخِلَ وَاسْتَغْنٰى ﴿٨﴾

९. आणि उत्तम गोष्टीला खोटे ठरविले.[१४]

وَكَذَّبَ بِالْحُسْنٰى ﴿٩﴾

१०. त्याच्याकरीता आम्ही कष्टप्रद मार्ग [१५] मोकळा करू ,

فَسَنُيَسِّرُهٗ لِلْعُسْرٰى ﴿١٠﴾

१. शपथेच्या स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह तकवीर टीप. १४.

२. ह्या गोष्टीकडे निर्देश करण्यात आला आहे की रात्रीचे वैशिष्ठय अधार आहे. जेव्हा ती येते तेव्हा सर्वांवर काळोख पसरलेला असतो.

३. म्हणजे रात्रीच्या तुलनेत दिवसाचे वैशिष्टय उजळणे (प्रकाशित) आहे. जेव्हा तो उजाडतो तेव्हा सर्व वस्तू प्रकाशमान होतात.

४. अभिप्रेत निर्मात्याची शपथ आहे व निर्मात्याची शपथ येथे मुद्दा ठासून सांगणेकरीता व दावा जोरदार पणे मांडणे करीता आहे.

५. नर व मादी जनावरात निर्माण केले व मानवातही निर्माण केले आहेत. हा लिंगभेद स्वत:चे वैशिष्ठये बाळगतो. जी वैशिष्ठये पुरुषाची आहेत ती स्त्रीयांची असत नाहीत व जे स्त्रीयांची आहेत ती पुरुषांची नाहीत.

६. ही आहे ती हकीकत (वस्तुस्थिती) जिच्याविषयी वर नमूद केलेल्या शपथा घेण्यात आल्या आहेत. अर्थ असा आहे की या सृष्टीची निर्मिती अशा रितीने झाली आहे की यातील वस्तू एकमेकापासून भिन्न आहेत व वेगवेगळी वैशिष्टये धारण करणारी आहेत. उदा. रात्र व दिवस यांच्यात परस्परात फरक आहे. आणि जर एकाचे वैशिष्ठये काळोख पसरविणे आहे तर दुसऱ्याचे प्रकाश फैलाविणेचे आहे. पुरुष व स्त्री देखील लैंगिक दृष्ट्या भिन्न आहेत. आणि जर एकात कर्त्याचे वैशिष्ठय आढळते तर दुसऱ्यात कर्माचे वैशिष्टय आढळते. जर एका लिंगात पिता होण्याची लक्षणे आढळतात तर दुसऱ्यात माता होण्याची लक्षणे आढळतात. हिच स्थिती मानवांच्या प्रयत्नांची आहे की कोणी नेकी (पुण्य) व भलाई वृत्ती स्विकारतो तर कोणी दुष्कृत्य व दुष्टतेची वृत्ती स्विकारतो. कोणी अल्लाहचा निष्ठावंत सेवक म्हणून राहतो तर कोणी विद्रोह व आज्ञाभंग करणारा असतो. कोणी एकच सच्चा ईश्वराला मानतो तर कोणी हजारो खोटे देव बनविले आहे. कोणाची धावपळ भलाईच्या मार्गाकरीता असते तर कोणाची दुष्कर्माच्या मार्गाकरीता असते. कोणी दुष्ट अत्त्याचारी बनतो तर कोणी सुधारक बनून न्याय कायम करतो. कोणी दुनियेत मौजमजा करतो तर कोणी कर्तव्य परायण असलेचा पुरावा सादर करतो कार्यक्षेत्रात मानवी प्रयत्नांची हि तफावत आपल्यात वेगवेगळी वैशिष्ठये ठेवते व वेगवेगळया परीणामास कारणीभूत ठरते. आणि ही परिस्थिती या गोष्टीची मागणी करते. की त्याची वेगवेगळी उद्दिष्टये प्रकट व्हावीत आणि जेव्हा जगाचे स्वरुप एक कृतिगृह व परिक्षागृह ठरते तेव्हा कर्माच्या फळाची आवश्यकता समोर येते. म्हणूनच कुरआनचा हा दावा मरणोत्तर जीवन (अखिरत) हे फळ मिळण्याचे ठिकाण आहे व येथे सत्कर्म व दुष्कर्माचे परिणाम वेगवेगळे होतील आणि मानव आपले प्रयत्न व कृत्यानुसार इनाम किंवा शिक्षा भोगेल हे या सत्यतेनुंसारच आहे. जे सृष्टीच्या प्रतिकांवर विचार केल्याने डोळयासमोर येते.

ये लोक अशा महान सत्याला मान्य करीत नाहीत ते फक्त आपल्या मुर्खपणाचे प्रदर्शन करतात. कारण त्यांच्या मते प्रत्येक गोष्ट एक वैशिष्टय बाळगते. परंतु जर कोणती गोष्ट आपले वैशिष्ठय बाळगत नसेल तर ती नैतीक व अनैतिकतेचे आचरण आहे. ते असे समजतात की प्रत्येक वस्तू स्वत:चा परिणाम ठेवते. तर एखादी गोष्ट आपला परिणाम ठेवत नसेल तर ती आहे सत्कर्म व दुष्कृत्य. ते ही गोष्ट स्वीकार करतात की प्रत्येक कामाचे फळ आहे परंतु त्याच्याजवळ जर एखादे काम निष्फळ असेल तर ते अल्लाहचे आज्ञापालन व आज्ञाउल्लंघन करण्याचे काम आहे. की हे दोन्ही आकारचे आचरण सारखेच आहे. व त्याचा बरावाईट काहीच परिणाम होणार नाही. मानवाने अल्लाहवर ईमान आणले किंवा त्याला नकार दिला, त्याची शिकवण स्विकारली किंवा नाकारली, परिणामाच्या दृष्टिने काहीच फरक पडत नाही. सांगा ! या पेक्षा अधिक मुर्खपणाची गोष्ट काय असू शकते.

७. येथे सत्कर्म व दुष्कर्म (सदाचार व दुराचार) या आचरणाचा फरक स्पष्ट करण्यात येत आहे. या विषयी आधी काही गुणांचा उल्लेख करण्यात आलेला आहे जे मानवाच्या चारीत्र्याची बांधणी करतात व त्यांची नैतिकता सुधारतात त्याच्यानंतर अशा वर्तनाचा उल्लेख करण्यात आला आहे जो मानवास बिघडवतो व चारित्र्यहिन बनवतो.

८. अभिप्रेत सत्कर्मात खर्च करणे आहे.

९. म्हणजे अल्लाहची भिती बाळगत जीवन जगावे. जी कामे ह्याला नाराज करतात ती टाळावीत त्या पासून अलिप्त राहावे.

१०. उत्तम गोष्टीने (اَلْحُسنٰى अल-हुसना) अभिप्रेत अशी गोष्ट आहे की ज्याच्याकडे कुरआन आमंत्रण देत आहे म्हणजे एकेश्वरवाद मान्य करणे व मरणोत्तर जीवनावर श्रद्धा (ईमान) ठेवण्याचे आमंत्रण

११. म्हणजे नेकीच्या (सदाचाराच्या) मार्गावर चालणे त्याच्या करीता सुलभ होईल आणि त्याच्यावर वाटचाल करून तो त्या ठिकाणावर पोहचेल जेथे अधिकच सुलभता आहे व आरामच आराम आहे. नेकीचा मार्ग अत्यंत बिकट मार्ग आहे परंतु त्याच्यावर वाटचाल करणे त्या लोकांच्या करीता सुलभ होते जे अल्लाह व मरणोत्तर जीवना (आखिरत) वर ईमान धारण करून संयमशिलता स्विकारतात आणि अल्लाहची मर्जी संपादन करणे करीता आपली संपत्ती खर्च करतात. जणू ही

कृपा अल्लाह अशा लोकांना प्रदान करतो जे सन्मार्गावर वाटचाल करण्याचे धैर्य, दाखवतात आणि त्याच्या मुलभूत अटी पूर्ण करतात.

१२. कंजूषी (बुख्ल) शी अभिप्रेत सत्कर्मात व भलाईच्या कार्यात संपत्ती खर्च न करणे असे आहे. आणि या दृष्टीने अशी व्यक्ती कंजूष आहे जी आपल्या ऐषआरामावर व वैभवप्रदर्शन करण्यावर पुष्कळ खर्च करते. परंतु अल्लाह व सेवकांचे हक्क देणे त्यांच्या जिवावर येते.

संभाषण प्रसंगाच्या दृष्टिने ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की कंजूषी व धनपूजा हे नैतिक दुर्गुण आहेत जे आत्म्याला गुरफटून टाकतात (अशुद्ध करतात) आणि शुद्धत्ता प्राप्त करण्या करीता मानवाने अल्लाहच्या मार्गात खर्च करणे आवश्यक आहे.

१३. बेपर्वा (बेनियाज) होणेचा अर्थ असा की मानव अल्लाह आणि त्याच्या शिकवणीपासून निर्लीप्त असणे. व त्याला या गोष्टीची परवा नसते की कोणती कामे केल्याने अल्लाहची मर्जी मिळवता येते व कोणती कामे केल्याने त्याचा कोप ओढवतो.

शब्द اِسْتِغْنَاء **इस्तिग्ना** (बेपरवा होणे) हा इशभिती, संयमशिलता यांच्याविरूद्ध वापरला आहे. म्हणून जर संयमशिलता (तकवा) इशभिती बाळगून जबाबदारीचे जीवन जगणेचे व कर्तव्यदक्षतेचा पुरावा देण्याचे नाव आहे तर बेपर्वा होणे (इस्तिग्ना) हेच आहे की मानवाने बेजबाबदारीचे जगणे व कर्तव्य परामूख असणेचा पुरावा देणे.

१४. उत्तम गोष्टीचे स्पष्टीकरण वर असलेल्या टिप नं. १० मध्ये आहे.

१५. म्हणजे अनीति व पापा च्या मार्गावर वाटचाल करणे त्याच्याकरीता सुलभ होईल. आणि त्याच्यावर वाटचाल करून तो अशा ठिकाणावर पोहचेल जेथे दु:ख कष्टच आहेत. दुष्कर्माचा (बदी) मार्ग या दृष्टिने सुलभ आहे की याची वाटचाल करणारा आपल्या वासना व इच्छेचे अनुसरण करतो व याच्यात त्याला भौतिक व ऐहिक फायदेही मिळतात. जी व्यक्ती या त्वरीत मिळणाऱ्या लाभांना बली पडून ह्या चुकीच्या मार्गाची निवड करते अल्लाह त्यावर वाटचाल करणे करीता त्याला सवलती देतो. आणि त्याला अशी साधने पुरवितो ज्यामुळे त्याला दुष्कर्म करणे सहज व सोपे होते. शेवटी त्याला ही सुलभता फारच कठिण ठिकाणावर पोहचवते.

**जो आपली संपत्ती शुद्धता प्राप्त करणेकरीता देतो. आणि त्याच्या जवळ कोणावर काही उपकार परतफेड व्हावी या करीता नाहीत. उलट फक्त तो आपल्या सर्वोच्च पालनकर्त्याची मर्जी संपादन करण्याकरीताच देतो आणि तो अवश्य प्रसन्न होईल.*(अल-कुर्आन)***

११. आणि जेव्हा तो खडुयात पडेल तेव्हा त्याच्या या संपत्तीचा काहीच उपयोग होणारा नाही. [१६]

وَمَا يُغْنِيْ عَنْهُ مَالُهٗٓ اِذَا تَرَدّٰى ۝١١

१२. नि:संशय, मार्ग दाखविणे आमची जबाबदारी आहे.[१७]

اِنَّ عَلَيْنَا لَلْهُدٰى ۝١٢

१३. आणि आखिरतचे जग व हे जग आमच्याच अधिकारात आहेत.[१८]

وَاِنَّ لَنَا لَلْاٰخِرَةَ وَالْاُوْلٰى ۝١٣

१४. तर मी तुम्हाला भडकत्या अग्नीपासून सावध केले आहे.

فَاَنْذَرْتُكُمْ نَارًا تَلَظّٰى ۝١٤

१५. तिच्यात तोच पडेल, जो अत्यंत अभागी [१९] असेल.

لَا يَصْلٰىهَآ اِلَّا الْاَشْقَى ۝١٥

१६. ज्याने खोटे ठरविले व तोंड फिरविले.

الَّذِيْ كَذَّبَ وَتَوَلّٰى ۝١٦

१७. आणि तिच्यापासून अशा व्यक्तीला वाचवण्यात येईल जो अत्यंत संयमशील (ईश-भय बाळगणारा) आहे. [२०]

وَسَيُجَنَّبُهَا الْاَتْقَى ۝١٧

१८. जो आपली संपत्ती शुद्धता प्राप्त [२१] करणेकरीता देतो.

الَّذِيْ يُؤْتِيْ مَالَهٗ يَتَزَكّٰى ۝١٨

१९. आणि त्याच्या जवळ कोणावर काही उपकार परतफेड व्हावी या करीता नाहीत.[२२]

وَمَا لِاَحَدٍ عِنْدَهٗ مِنْ نِّعْمَةٍ تُجْزٰٓى ۝١٩

२०. उलट फक्त तो आपल्या सर्वोच्च पालनकर्त्याची मर्जी संपादन करण्याकरीताच देतो. [२३]

اِلَّا ابْتِغَاۗءَ وَجْهِ رَبِّهِ الْاَعْلٰى ۝٢٠

२१. आणि तो अवश्य प्रसन्न होईल.[२४]

وَلَسَوْفَ يَرْضٰى ۝٢١

१६. खड्ड्यात पडण्याशी अभिप्रेत विनाशाच्या खड्ड्यात पडणे असा आहे. अर्थ असा की हि संपत्ती, जी माणूस गोळा करतो व सत्कर्मात खर्च करीत नाही त्याच्याकरीता काहीच लाभदायक ठरणार नाही. उलट नाशास करणीभूत होईल. जर त्याने अल्लाहकरीता सत्मार्गात (भलाईच्या) खर्च केला असता तर त्याच्या मरणोत्तर जीवना (आखिरत) करीता सुरक्षीत भांडवल ठरले असते.

१७. म्हणजे जोपर्यंत मानवाला योग्य मार्ग दाखविणेचा संबंध आहे अल्लाहने हि जबाबदारी अवश्य स्विकारली आहे आणि हे कार्य त्याने आपले पैगंबर पाठवून आणि आपला ग्रंथ अवतीर्ण करून पूर्ण केले आहे. राहीला योग्य मार्ग अवलंबिण्याचा प्रश्न तर ही मानवाची जबाबदारी आहे. केल्यास सफल होईल न केल्यास दुर्भागी ठरेल.

१८. म्हणजे जग व मरणोत्तर जीवन दोहोंचे स्वामी आम्हीच आहोत व दोघांचा नफातोटा आमचेच हाती आहे. तेव्हा जी व्यक्ती जगाच्या ऐहिक सुखा करीता (अल्लाहचा) योग्य मार्ग स्विकारीत नाही. त्याने लक्षात घेतले पाहिजे की जगात तो मार्गभ्रष्ट होऊन सुद्धा तितकांच फायदा मिळवू शकतो जितका त्याचा अल्लाह त्याला पोहचवू इच्छितो. त्यपेक्षा अधिक तो जगात काहीच प्राप्त करू शकणार नाही. आता राहिले मरणोत्तर जीवन तर तेथे नाउमेद होण्या शिवाय काहीच होणार नाही.

१९. याचा अर्थ असा नाही की जो कनिष्ठ प्रतीचा (दर्जाचा) दुर्भागी असेल तो अग्नीत पडणार नाही उलट अर्थ असा आहे की या सूरतीच्या अवतीर्ण होणेच्या काळी दोन भिन्न चारित्र्याचे लोक होते. एक ते जे पैगंबराना खोटे ठरवित होते व ते जी शिकवण घेऊन आले तिच्यापासून तोंड फिरवत होते. आणि दूसरे ते जे पैगंबराचे समर्थन करीत होते व त्याने आणलेली शिकवण स्वीकारून आपली संपत्ती अल्लाहच्या मार्गात खर्च करीत होते. यापैकी पहिल्या चारित्र्याचे लोकच म्हणजे पैगंबराना खोटे ठरविणारे, भडकलेल्या ज्वालाग्नीतपडतील दुसऱ्या चारित्र्याचे जे पैगंबराचे समर्थन करीत होते ते पडणार नाहीत.त्या खोटे ठरविणाऱ्या लोकांना अत्यंत दुर्भागी ( اَشْقٰى अशका ) याकरीता संबोधिले आहे की जेव्हा पैगंबराने प्रत्यक्ष या लोकांपर्यंत अल्लाहचा संदेश पोहचविला ज्याद्वारे अल्लाहचा संदेश त्यांच्यावर पूर्ण लागू झाला तरीदेखील ते नकार देत राहीले तेव्हा त्यांच्यापेक्षा अधिक दुर्भागी आणखी कोण असू शकेल.

कुरआनी आयतीचा अर्थ निश्चित करतांना प्रसंग काळवेळ व ती परिस्थिती ज्या परिस्थितीत ती आयत अवतीर्ण झाली नजरे समोर ठेवणे आवश्यक आहे व कोणत्याही आयतीचा असा अर्थ घेणे बरोबर नाही जो कुरआनच्या इतर आयतींशी सुसंगत नाही.

२०. येथे सांगण्याचा उद्देश हा नाही की फक्त असामान्य सदाचारी लोकच अग्नीतून वाचविले जातील व सामान्य सदाचारी लोकांना वाचविण्यात येणार नाही. उलट अर्थ असा आहे की ज्या दोन चारित्र्याचे लोक समोर येतील व या सूरतीच्या अवतरण काली, पैगंबराच्या उपस्थितीत समोर आले होते त्यापैकी फक्त दुसऱ्या चारित्र्याचे लोकानांच अग्नीतून वाचविण्यात येईल. ज्यांनी फक्त आपल्या सदाचाराचे व संयमशिळतेचे पुरावे दिलेलेच नव्हते, तर اَتْقٰى अतिसदाचारी होण्याचा पुरावा दिला आहे. आता राहिले اَشْقٰى अतिदुष्कर्मी तर ते खरोखरच अग्नीत पडतील ज्याप्रमाणे वर वर्णन दिले आहे. स्पष्ट व्हावे की ज्या लोकांनी सुरवातीसच पैगंबराचे आमंत्रण स्विकारले होते व अल्लाहची भिती बाळगून आपल्यात शुद्धता निर्माण करीत होते. त्यांनी मोठया धैर्याचा पुरावा दिला होता. म्हणून त्यांचा दर्जा फार श्रेष्ठ आहे आणि संयमशीलतेच्या उच्च श्रेणीत असल्यामुळे ते सर्व अती संयमशील लोक आहेत.

२१. यावरून स्पष्ट झाले की अल्लाहच्या मार्गात खर्च करणे आत्मशुद्धीचे फार मोठे साधन आहे. कारण त्यामुळे धनपूजा व भौतिकपूजेची मुळे नष्ट होतात. आणि ईशभक्ती व मरणोत्तर जीवनाच्या भावनेची जोपासना होऊ लागते.

२२. म्हणजे तो जे काही देतो तो परतफेड होण्याच्या हेतूने देत नाही. त्याच्यामते एखादयाला मदत करणे उपकार करण्याकरीता नसून की ज्यास्तव त्याच्याकडून परतफेड व्हावी उलट' तो निस्वार्थीपणे व कोणताही संदेह न बालगता मदत करतो.

२३. अल्लाहला असा खर्च प्रीय आहे जो त्याची मर्जी संपादन्या करीता केला जातो. आणि अशाच तऱ्हेच्या खर्चाने आत्म्याचे शुद्धिकरण होते. उलट जो खर्च एखादयावर उपकार करणे करीता मानमरातब मिळविणेसाठी किंवा प्रसिद्धीकरीता केला जातो त्यामुळे अल्लाहची मर्जी संपादन होत नाही. व आत्मशुद्धिही होत नाही.

२४. म्हणजे ज्या इसमाची नीती अशी आहे त्याला त्याचा पालनकर्ता अशी कृपा देईल कि तो संतुष्ट होऊन जाईल. ही आयत फक्त दोन शब्दात आहे परंतु तिच्यात वर नमूद केलेले गुण बाळगणाऱ्यासाठी अदभूत शुभ-संदेशाचे विश्व लपलेले आहे.

# सूरह अझ्-झुहा

# ९३. अझ्-झुहा

**नाव :** प्रारंभीच झुहा (उजळलेला दिवस) ची शपथ घेण्यात आली आहे. यावरूनच या सूरतीचे नाव ''अझ-झुहा'' असे आहे.

**अवतरण काळ:** हि सूरत मक्की आहे व तिच्या विषयावरून अंदाज येतो की प्रेषितत्वाच्या सुरवातीच्या थोडयाचे काळांतराने ही अवतीर्ण झाली होती. त्यावेळी पैगंबरासमोर सत्याचे आमंत्रण देणेच्या मार्गात संकटांचा डोंगर उभा होता. व प्रेषित्वास नकार देणाऱ्यांकडून होणाऱ्या निंदेने व त्यांच्या टोमण्यामुळे पैगंबर दुखी होत होते.

**मध्यवर्ती कल्पना:** (विषय) प्रत्यक्ष पैगंबरांना उद्देशून संबोधन करण्यात आले आहे व पैगंबरांना वैभवपूर्ण भवितव्य व महान कृपा असण्याचा शूभ-संदेश देतांना पैगंबरांचे पूर्ण समाधान करणेची व्यवस्था केली आहे. हा आहे या सूरतीचा विशेष पैलू. परंतु या विशेष पैलूबरोबरच दुसरा एक साधारण पैलू आहे जो संभाषणाच्या रचनेवरून स्पष्ट होतो, तो हा आहे की जीवनाच्या कार्यक्षेत्रात मानवाला ज्या संकटांचा व अडचणींचा सामना करावा लागतो किंवा अल्लाहच्या मार्गात ज्या बिकट परिस्थितीतून पार पडावे लागते त्यांना अल्लाहच्या नाराजीचे कारण समजणे योग्य नाही. उलट ह्या अडचणी मानवांची परिक्षा घेणेकरीता असतात. व ही मानवाकरीता खरी प्रगती साधण्याची साधने आहेत. हीच या सूरतीची मध्यवर्ती कल्पना (विषय) आहे.

**ग्रंथ-मांडणी:** आयत नं. १ व २ मध्ये दिवस व रात्रीची साक्ष सादर करून या वस्तुस्थितीकडे निर्देश करण्यात आले आहे. की येथे प्रकाशही आहे व अंधारही आहे. याचप्रमाणे. दुखेही आहेत व सुखेही आहेत. आणि या दोन्ही अवस्था परिक्षेकरीता आवश्यक आहेत.

आयत नं. ३ मध्ये: वरिल वस्तुस्थिती लक्षात घेऊन हे स्पष्ट केले आहे की पैगंबरांना अल्लाहच्या मार्गात ज्या अडचणींना सामोरे जावे लागले आहे त्याचा असा अर्थ घेणे बिलकूल बरोबर नाही की अल्लाहने पैगंबरांवरील आपली कृपानजर फिरविली आहे. व तो त्यांच्यावर नाराज आहे.

आयत नं. ४ व ५ मध्ये पैगंबराना अपूर्व सफलतेचा शुभसंदेश देण्यात आला आहे.

आयत नं. ६ ते ८ मध्ये अशा संकटांचा उल्लेख केला गेला आहे की त्यांना पैगंबरानी इस्लामच्या उदयापूर्वी व प्रेषित्वापूर्वी तोंड दिले होते. व अल्लाहच्या अशा कृपेचाही उल्लेख आहे ज्यांच्या परिणाम स्वरूप पैगंबरा करीता मार्ग मोकळा झाला.

आयत ९ ते ११ मध्ये दाखविले गेले आहे की या उपकारांची निकड काय आहे. म्हणजेच त्याच्या परिणामत: तुमची वागणूक दीन दुबळया व लाचार लोकांशी सहानुभूतीची असली पाहिजे. आणि अल्लाहच्या देणगीची कबुली देऊन आभार मानले पाहिजेत.

# ९३.सूरह अझ्-झुहा

سُوۡرَةُ الضُّحٰى

आयती ११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

१. शपथ आहे उजळलेल्या दिवसाची.[१]

وَالضُّحٰى ۙ ﴿۱﴾

२. आणि रात्रीची जेव्हा ती पसरते.[२]

وَالَّيۡلِ اِذَا سَجٰى ۙ ﴿۲﴾

३. (हे पैगंबरा !) तुमच्या पालनकर्त्याने (रबने) तुम्हाला सोडून दिले नाही व तो तुमच्याशी नाराज झाला नाही. [३]

مَا وَدَّعَكَ رَبُّكَ وَمَا قَلٰى ؕ ﴿۳﴾

४. आणि आखिरत (मरणोत्तर जीवन) तुमच्याकरीता ह्या जगापेक्षा आधिक चांगली आहे.[४]

وَلَلۡاٰخِرَةُ خَيۡرٌ لَّكَ مِنَ الۡاُوۡلٰى ؕ ﴿۴﴾

५. लवकरच तुमचा पालनकर्ता (रब) तुम्हाला इतके काही देईल की तुम्ही खुष होऊन जाल.[५]

وَلَسَوۡفَ يُعۡطِيۡكَ رَبُّكَ فَتَرۡضٰى ؕ ﴿۵﴾

६. काय ही वस्तुस्थिती नाही की त्याने तुम्हाला अनाथ जाणले तेव्हा आश्रय दिला.[६]

اَلَمۡ يَجِدۡكَ يَتِيۡمًا فَاٰوٰى ۖ ﴿۶﴾

७. आणि मार्गाशी अपरिचित जाणले [७] तर मार्गदर्शन केले.[८]

وَوَجَدَكَ ضَآلًّا فَهَدٰى ۖ ﴿۷﴾

८. आणि निर्धन जाणले तेव्हा श्रीमंत केले. [९]

وَوَجَدَكَ عَآئِلًا فَاَغۡنٰى ؕ ﴿۸﴾

९. म्हणून तुम्ही अनाथावर सक्ती करू नका.[१०]

فَاَمَّا الۡيَتِيۡمَ فَلَا تَقۡهَرۡ ؕ ﴿۹﴾

१०. आणि याचकाला झिडकारू नका.[११]

وَاَمَّا السَّآئِلَ فَلَا تَنۡهَرۡ ؕ ﴿۱۰﴾

११. आणि आपल्या पालनकर्त्याच्या कृपेचे वर्णन करा. [१२]

وَاَمَّا بِنِعۡمَةِ رَبِّكَ فَحَدِّثۡ ۧ ﴿۱۱﴾

१. शपथेच्या स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह तकवीरची टीप नं. १४.

२. येथे ज्या शपथ घेण्यात आल्या आहेत त्याचा उद्देश मुलभूत वस्तुस्थिती लक्षात आणून देणे आहे की अल्लाहने या जगाची व्यवस्था अशी केली आहे की येथे सदैव एकच स्थिती व एकच दशा स्थिर रहात नाही. येथे दिवसाचा उजेड व रात्रीचा काळोख ही आहे.

ومهما استطال الليل فالصبح واصل

''आणि रात्र कितीही मोठी असेना सकाळ उजाडणारच'' म्हणून ज्याप्रमाणे रात्रीचा काळोख पाहून एखादयाचे प्रकाशा बाबत निराश होणे योग्य नाही. त्याचप्रमाणे अडचणीचे ढग घिरटया घालीत आहेत हे पाहून असा विचार करणे देखील चूकीचे आहे की हे ढग कधीच पांगणार नाहीत. व त्यावरून असा निष्कर्ष काढणे योग्य नाही की जगातील दुख व कष्ट अल्लाहच्या नाराजीचा परिणाम आहे. उलट ज्याप्रमाणे परिक्षेकरीता रात्र व दिवसाचे अस्तित्व जरूरीचे आहे त्याच प्रमाणे सुख व दुखे दोन्ही कसोटी करीता आवश्यक आहेत व संकटे मानवाचे प्रशिक्षण व त्याच्यातील सुप्तावस्थेत असलेल्या गुणांना प्रकट करण्याची महत्वपूर्ण साधने आहेत.

३. पैगंबरांनी जेव्हा इस्लामचे आमंत्रण देण्यास सुरवात केली तेव्हा त्यांच्या मार्गात अडचणी व संकटे डोंगर बनून उभी राहीली. पैगंबरांच्या या दाव्यावर म्हणजे ईश्वरी संदेश माझ्याकडे आकाशातून येतात, विरोधकांचे एक वादळ उठले व नकार देणारे लोक पैगंबरांची कुचेष्ठा करून त्यांना टोमणे मारू लागले. एका पैगंबराला अशा परिस्थितीत वेढलेला पाहून असा प्रश्न निर्माण होत होता की जर पैगंबर खरोखरच अल्लाहला प्रिय आहेत तर त्यांच्या मार्गात हया अडचणी कशा? आणि जेव्हा काही दिवसाकरीता आसमानी संदेश पाठविणे थांबविले जाते तेव्हा विरोधक शंका घेत व टोमणे मारीत असत की अल्लाहने आपणास सोडून दिले आहे का? व तो आपणवर नाराज आहे? हया शंकेचे निरसन करताना पैगंबरांना समाधान व धैर्य देण्यात येते की ज्या परिस्थितीत पैगंबर स्वत:स वेढलेले पहात आहेत ती परिस्थिती प्रेषित्वाच्या कार्याची मागणी आहे. व अल्लाहच्या या महान हिकमतीनुसार आहे जिच्यानुसार ह्या जगाची व्यवस्था राबवली जाते. व ती हिकमत ही आहे की मानवाची कसोटी व्हावी जिला पैगंबरही अपवाद नाहीत. व त्याची मागणी हिच आहे की सुखदुखाच्या प्रत्येक परिस्थितीस सामोरे जावे लागेल व एक पैगंबर जेव्हा अल्लाहच्या मार्गात अडचणीतून व विरोधाच्या वादळातून जाऊ लागतो तेव्हा अत्युत्तम फायदे प्राप्त होतात. उदा: पैगंबरांचे नैतिक गुण प्रकट होतात आणि त्यांच्या उत्तम सदाचारांची उंची आकाशाला जाऊन भिडते ज्या हृदयात मानवता जागृत असते त्या लोकांच्या मनात पैगंबरा बद्दल प्रेम व श्रद्धा निर्माण होते व ते पैगंबराकरीता आपल्या प्राणांची आहूती देण्यास तयार असतात याच प्रमाणे पैगंबरांची हिम्मत व धैर्य पाहून त्यांच्या अनुयायीतही दृढतेचे व चिकाटीचे गुण निर्माण होतात, आता राहीली आसमानी संदेशांच्या अवतीर्ण होण्यातील दिरंगाई ती हया कारणामुळे नाही की अल्लाह पैगंबरावर नाराज झाला आहे उलट आकाशी संदेशाचे बाब तात्विक अल्लाहच्या हिकमत व धोरणांवर अवलंबून असते त्याची हिकमत ज्यावेळी व जितकी आकाशी संदेशाची जरूरी असते तितकीच तो अवतीर्ण करतो.

४. हा शुभ-संदेश अल्लाहने पैगंबराला अशा वेळी ऐकविला जेव्हा पैगंबरांना अत्यंत बिकट परिस्थितीतून जावे लागत होते. व त्यांच्या मार्गात कठीण अडचणी आड होत्या. अशा परिस्थितीत पैगंबरांना अंतिम दिवसाच्या यशाचा शुभसंदेश केवल समाधान देणेकरीता नव्हता तर धैर्य निर्माण करण्याकरीताही होता. तात्पर्य जर माणसाने मरणोत्तर जीवनाच्या सफलतेवर नजर ठेवली तर त्याच्या अंगी दृढता व धैर्य निमार्ण होते व सत्मार्गातील अडचणी शुलभ होतात. हे स्पष्ट झाले पाहिजे की मूळ मजकुरात 'अल-आखेरत: व اَلْاٰخِرَةُ 'अलऊला' اَلْاُوْلٰى हे शब्द वापरले आहेत. जे आखिरत म्हणजे परलोक किंवा मरणोत्तर जीवन व जगाकरीता कुरआनचे शब्द प्रयोग आहेत आणि कुरआन मध्ये जेथे जेथे ही हे शब्द प्रयोग आले आहेत ते हयाच अर्थाने आले आहेत. या आधीच्या सुरतूल लैल आयत नं. १३ मध्ये याच शब्दांचा प्रयोग करण्यात आला आहे.

وَاِنَّ لَنَا لَلْاٰخِرَةَ وَالْاُوْلٰى

(निसंशय ! मरणोत्तर जीवन व जग हे आमच्याच अधिकारात आहेत.)

येथे ही हे शब्द 'अल-अखिरत:' व 'अल-ऊला' याच अर्थाने वापरले आहेत.

५. इशारा (निर्देश) आहे मरणोत्तर जीवनाच्या अशा पुरस्कारांकडे ज्यांनी पैगंबराला विभूषित करण्यात येईल येथे पैगंबर सन्मान व श्रेष्ठतेच्या ज्या उच्च स्थानावर असतील आणि ईशकृपा व बक्षीसांचा जो वर्षाव पैगंबरावर करण्यात येईल त्याची एक झलक त्या आयतीत व हदीस वचनात पहावयास मिळणे शक्य आहे ज्यात पैगंबराच्या पालनकर्त्याकडून त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या कृपेचा उल्लेख करण्यात आला आहे. नाहीतर अल्लाहने ह्या आयतीत आपल्या प्रेषिताला जे काही देण्याचे वचन दिले आहे तिच्या विशालतेची व थोरवीची कल्पनाही करणे शक्य नाही.

६. पैगंबर अनाथ जन्मले होते पैगंबर आईच्या उदरात असतांना त्यांचे वडील अब्दुल्लाह यांचे निधन झाले व सहा वर्षाचे झाले तेव्हा त्यांची आई आमिनाने या जगाचा निरोप घेतला. पैगंबरांचे आजोबा अब्दुल मुत्तलिब यांनी आपले पालनपोषण केले. पैगंबर आठ वर्षाचेच होते तेव्हा आजोबांचे निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे चुलते अबू तालिब यांनी आपले संगोपण केले व पैगंबरांशी चांगली वागणूक ठेवली येथपावेतो की त्यांचे प्रेम पैगंबरावर प्रेषित्वा नंतरही कायम राहीले. (सिरतुन नबी-इब्ने -हिशाम खंड -१ पान १७१,१७९,१८० व १९३)

पैगंबरांच्या अशा संगोपनाची हि उत्तम व्यवस्था व ती सुद्धा अशा वातावरणात जेथे अनाथांचा अनादर होत असे, अल्लाहच्या कृपेचाच परिणाम होता.

येथे हा मुद्दा विचारात घेणेसारखा आहे की अनाथाच्या परिस्थितीत असतांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो परंतु वडीलांचा आधार तुटल्यामुळे माणसात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होत असतो व त्याच्यापेक्षा अधिक अल्लाहवर विश्वास ठेवण्याची भावना वाढू लागते. विचार करा अनाथाच्या अवस्थेत गूरफटून अल्लाह कशा प्रकारे प्रशिक्षणाची व्यवस्था करतो.

७. मुळ ग्रंथात शब्द 'दाल्लन' ضَالاً वापरला आहे. जो दलालत वरून आला आहे. हा शब्द हिदायत म्हणजे मार्ग दर्शनाच्या विरोधात अनेक अर्थात वापरला जातो. याचा एक अर्थ अपरिचीत असणेचेही आहे. अरबी भाषेच्या सर्वात मोठा व अधिकृत शब्दकोश 'लिस्सानुल अरब' मध्ये आहे.

وضَللت المسجد والدار اذا لم تعرف موضعهما

म्हणजे जर तुम्ही मस्जीद व घराच्या ठिकाणाशी परिचित नसाल तर तुम्ही असे म्हणाल की मी मस्जीद व घरच्या ठिकाणाशी अपरिचित (दलालतमध्ये) राहीलो (लिस्सानुल अरब मध्ये शब्द दलल पहा) येथे हा शब्द याच अर्थाने वापरला आहे.

इस्लामचा उदय होण्यापूर्वी व प्रेषित्वाची जबाबदारी पडण्यापूर्वी पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) व विवेकशील विचाराचे होते. इतर सर्व पैगंबराची देखील प्रेषित्वांची जबाबदारी येण्यापूर्वी हिच स्थिती होती की ते विवेकशील विचारांना कधीच सोडत नाहीत. आणि मानवाचा समतोल स्वभाव आपल्या पालनकर्त्याला ओळखतो व त्यालाच भक्तीस पात्र ठरवतो आणि भल्या-बुऱ्यात फरकही करतो. आणि हे दोन्ही गुण पैगंबरांच्या अंगी बसत होते. प्रेषित्वाच्या पूर्वी पैगंबराचे हिरा नावाच्या गुफेत एकाग्र होऊन अल्लाहची भक्ती करणेत मग्न होणे ह्या गोष्टीचा पुरावा आहे की पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) एकेश्वरवादावर अटळ होते. याच तऱ्हेने पैगंबरांचे जीवन शुद्ध होते. इथपर्यंत की पैगंबर आपल्या समाजाच्या नजरेत विश्वास पात्र ठरले होते.व त्यांना 'विश्वासपात्र' (अमीन) या नावाने संबोधले जात. हा त्यांच्या नैतिक श्रेष्ठतेचा तेजस्वी पुरावा आहे. आणि हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी प्रस्थापित केलेल्या धर्माचे (दीने हनीफचे) काही अंश ह्या वेळेपर्यंत होते उदा. बैतुल्लाह' म्हणजे काब्याचा आदर व हज्ज वैगेरे यावर हजरत मोहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अमल करीत असत. आणि या घटना इतिहासावरून सिद्ध झाल्या आहेत. (सिरतुन -नबी इब्ने हिशाम खंड १ पान १९७ व २२१)

ज्या मर्यादेपर्यंत प्रकृती व हजरत इब्राहीम यांच्या धर्मातीळ काही शिल्लक राहिलेल्या तत्वांचा प्रकाश हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या समोर होते. पैगंबर ह्या प्रकाशाच्या उजेडात वाटचाल करीत होते. परंतु पैगंबरसमोर सन्मार्गाचा प्रकाश पूर्ण पडलेला नव्हता. म्हणून हजरत मोहम्मद पैगंबर यांना ईमान (श्रद्धा) ची हकीकत ज्ञात नव्हती व शरीयतीच्या तपशिलाचेही ज्ञान नव्हते. म्हणून कुरआनने याचे स्पष्टीकरण केले आहे.

مَا كُنتَ تَدْرِىْ مَا الْكِتَابُ وَلَا الْاِيْمَانُ (سورة الشورىٰ-٥٢)

'तुम्हाला माहीत नव्हते की ग्रंथ काय असतो व ईमान काय आहे.'(सूरतूल-शूरा:५२)

याच परिस्थितीला येथे 'दाल' (जो मार्गाशी अपरिचित आहे) बरोबर जोडण्यात आले आहे. दुसऱ्या शब्दात असे आहे की सत्याचा शोध घेणेची व मार्ग शोधण्याची परिस्थिती होती म्हणून याला दलालत म्हणजे मार्गभ्रष्टता असे मूळीच म्हणता येणार नाही. विशेषत: अशा परिस्थितीत जेव्हा पैगंबरांविषयी माहीत आहे की त्यांनी कधी अल्लाहचा इन्कार केला नाही. मूर्तिपूजाही स्विकारली नाही. दुष्कृत्यांशी त्यांचा संबंध नव्हता त्याचप्रमाणे पैगंबरांनी लोकांना असत्याचे आमंत्रण दिले नाही. बुखारी या ग्रंथात इस्लामचा उदय होण्यापूर्वी व प्रेषित्वाची जबाबदारी येण्यापूर्वीची एक घटना नमूद केली आहे की पैगंबरासमोर जेवण वाढण्यात आले जे मूर्तिचे नाव घेऊन कापलेल्या जनावराचे होते. पैगंबरनी जेवणास नकार दिला आणि हे पाहून जैद बिन अम्र बिन नुफैल यानी सुद्धा नकार दिला. (बुखारी- किताबुल मनाकिब)

जोपर्यंत हजरत इब्राहीम यांच्या धर्माची काही तत्वे कायम असणेचा संबंध आहे. अल्लामा इब्ने हजर शरहे बुखारीत लिहतात:-

انما كان عند اهل الجاهلية بقايا من دين ابراهيم

''अज्ञान काळातील काही लोकांकडे हजरत इब्राहीम यांच्या

धर्माचे काही अंश शिल्लक राहीले होते'' (फतहूल बारी खंड ७ पान ११३)

८. हिदायतशी अभिप्रेत ईश-संदेश आहे ज्याने पैगंबराकरीता सत्य सरळ मार्ग पूर्णत: स्पष्ट केला.

९. पैगंबराचे बाळपण अनाथावस्थेत गेले व जेव्हा ते तारूण्यात आले तेव्हा गरीबीची स्थिती होती. इथपर्यंत की कुरेशमधील सर्वात श्रीमंत स्त्रीने पैगंबरांबरोबर स्वत:च्या व्यापारात भागिदारीचा करार केला. पैगंबरांना सिरीया देशाच्या व्यपारी दौऱ्यात पुष्कळ फायदा झाला. हजरत खतीजा (रदी) यांनी पैगंबरांचा प्रामाणिकपणा, सज्जनता व उच्च नैतिक गुणानी प्रभावित होऊन त्यांच्याबरोबर लग्न केले तद्नंतर त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली. (सीरतून नबी इब्ने हिशाम खंड १ - पान २०२ ते २०६)

जे काही घडले त्याची उघड कारणे काही ही असली तरी वस्तूत: हा ईश्वरी कृपेचाच परिणाम होता की ज्यामूळे पैगंबराची दैन्यावस्था श्रीमंतीत बदलली.

१०. वरील आयतीत अल्लाहने आपल्या उपकारांचा उल्लेख केला होता. येथे थोडकयात त्या उपकारांच्या मागण्याचे वर्णन करण्यात येत आहे. या विषयी पैगंबरांना असे फर्माविले गेले ज्याप्रमाणे अल्लाहने तुमच्या अनाथावस्थेत तुम्हाला आश्रय दिला. त्याप्रमाणे तुम्हीही अनाथाच्या हक्काचे रक्षणकर्ते बना. कोणत्याही अनाथास सक्तीची वागणूक देऊ नका. ही शिकवण प्रत्यक्ष पैगंबरांना उद्देशून संबोधली आहे. परंतु पैगंबरांच्या साक्षीने हि शिकवण कुरआनच्या प्रत्येक वाचकासाठी आहे. आणि यात धनपूजा करणाऱ्यांच्या वर्तनांचा धिक्कार केला. आहे जे अनाथ व दिनदुळयाबरोबर ठेवतात. म्हणजे त्यांना तुच्छ लेखून त्यांच्याशी मानाची वागणूक ठेवीत नाही. व त्यांच्यावर सक्ती करून त्यांचे हक्क हिरावून घेतले जातात.

११. ही त्या उपकारांची मागणी आहे जीचा वर आयत ८ मध्ये उल्लेख आला आहे. म्हणजे निर्धन (नादार) पाहिले तेव्हा श्रीमंत बनविले.

या उपकाराची निकड ही आहे की गरजवंता बरोबर सऱ्हदयतेने वागावे व जर एखाद्या माणसाची मदत करणे शक्य नसेल तर त्याला सौम्यतेने माफ करणेस सांगावे. आणि त्या लोकांची पद्धत कधीच अनुसरू नये जे घमेंडीत गरीबांकडे तुच्छतेच्या नजरेने पहातात. मागणाऱ्यांना रागावतात व झिकडारतात.

या आज्ञेची अंमलबजावणी पैगंबरानी इतकया सक्तीने व पाप भिरुतेने केली की त्यांनी कधीही कोणत्याही मागणाऱ्याला रागावले नाहीत उलट 'नाही' म्हणून त्याला रिकाम्या हाती परतावणे, कधीच पसंत करीत नसत. याकरीता हजरत जाबिर यांचे निवेदन आहे.

مَا سُئِلَ رسولُ الله صلى الله عليه وآله وسلم شَيْئًا قَطُّ فَقَالَ لَا ـ (بخاری کتاب الادب)

'कधीच असे घडले नाही की पैगंबराकडून काही वस्तू मागितली गेली असेल व पैगंबरांनी नाही म्हणून फर्माविले असेल.' (बुखारी-किताबूल अदब).

आणि पैगंबरांच्या हदीसीत अशी शिकवण मिळते

اِتَّقُوا لنّارَ وَلَوْ بِشِقِّ تَمَرَةٍ فَمَنْ لَمْ يَجِدْ
فَبِكَلِمَةٍ طَيِّبَةٍ ـ (مسلم کتاب الزکوٰۃ)

''जहन्नम (नरका) पासून स्वत:स वाचवा जरी एकाद्या खजूराच्या तुकडयाचे दान करून वाचणेयाची सोय होत असेल आणि हे जरी शक्य नसेल तर सौम्य शब्दात सांगा.''( मुस्लिम किताबूज जकात)

म्हणजे मागणाऱ्याला उद्धटपणे सांगण्याऐवजी सभ्य शब्दात माफी मागा.

१२. देणगी (नेमत) ने अभिप्रेत साधारण देणग्या व विशेष देणगी म्हणजे मार्गदर्शनही आहे.

वर आयत नं. ७ मध्ये विभुषित करण्याचा जो उल्लेख आला आहे. त्याच्या हक्काचेही वर्णन करण्यात आले आहे. रचनेच्या दृष्टीने (त्या आयतीचे) त्याचे स्थान एका आयतीपूर्वी होते परंतु मुद्दा बळकट करणेकरीता त्याचा शेवटी उल्लेख करण्यात आला आहे कारण तिचे महत्व चांगल्या तऱ्हेने स्पष्ट व्हावे व त्याच्यावर लक्ष केंद्रित व्हावे. अल्लाहने पैगंबरला ज्या देणग्यांनी विभूषित केले त्यांसर्वात विशेष त्याचे मार्गदर्शन आहे. पैगंबरांना हे मार्गदर्शन कुरआनच्या रूपात मिळाले. त्यांना प्रेषितपद देऊन सन्मान केला गेला. येथे ह्या देणगीचे जाहीर करणेवर भर दिला आहे. अर्थ असा आहे की अल्लाहच्या या महान कृपेचा की त्याने तुम्हाला पैगंबर बनविले व कुरआनसारखा महान व ज्ञानाने भरलेला ग्रंथ प्रदान केला लोकात भरपूर चर्चा करा,हा संदेश त्यांच्या पर्यंत पोहचवा आणि त्याना त्या मार्गाकडे अल्लाहने जो आपल्या ग्रंथाद्वारे तुमच्याकरीता मोकळा केला आहे त्या मार्गाकडे येण्याचे आमंत्रण द्या. ही शिकवण जर पैगंबरानी उद्देश दिली असली तरी पैगंबराचेमार्फत याचे संबोधित इस्लामचे अनुयायीही आहेत. त्यांना कुरआनची देणगी जी पैगंबरामार्फत मिळाली आहे ती लपवून ठेवणेकरीता नसून उलट ती प्रकट करणेकरीता व इतरांना याचा संदेश देणेकरीता आहे म्हणजे त्याचा लाभ सर्वांना मिळावा.

# सूरह
# अलम नशरह

# ९४. अलम् नशरह

**नावः** या सूरतीचा आरंभ ''अलम नशरह'' या शब्दांनी झाला आहे. आणि औचित्याने हे शब्द या सूरतीचे नावाकरीता ठरविले गेले आहेत.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे आणि त्यातील मजकूरावरून अंदाज येतो की ही त्या वेळेस अवतीर्ण झाली असावी जेव्हा पैगंबरांच्या अंगी प्रेषित्वाची जबाबदारी पार पाडण्याचे धैर्य निर्माण झाले होते. ज्याच्या परिणामी विरोधांच्या वादळातून निघणे त्यांना सुलभ झाले होते. प्रेषित्वाची चर्चाही सर्वत्र झाली होती व पैगंबरांच्या आमंत्रणास तत्परतेने स्विकारणाऱ्यांची एक चांगलीच संख्या पैगंबराभोवती जमा झाली होती.

**मध्यवर्ती कल्पनाः** हि सूरह मागील सूरह अद-दोहास पूरक आहे. मागील सूरतीत पैगंबरांची मानसिक चिंता दूर करणेकरीता अल्लाहने त्या उपकारांचा हवाला दिला आहे. ज्यांनी त्याने पैगंबरांना विभूषित केले. या सूरतीत छाती (हृदय) उघडणे यासारख्या मोठया देणगीने विभूषित करण्यात आलेचा उल्लेख करतांना पैगंबरांचे समाधान करण्यात आले आहे की प्रत्येक संकटानंतर सुख आहे. आणि हाच या सूरतीचा मध्यवर्ती बिंदू आहे. म्हणजे प्रत्येक संकटानंतर सुलभताचा मार्गे मिळतो संकटाबरोबर सुलभता जोडली आहे. याकरीता एका निमंत्रकाने (दाई) सत्मार्गातील अडचणींना पाहून धैर्य खचू देऊ नये.

**ग्रंथ मांडणीः** आयत नं. १ ते ३ मध्ये अल्लाहच्या या उपकारांचा उल्लेख आहे की त्याने पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना छाती उघडणे या देणगींने विभूषित केले व ती ओझी कमी केली जी कंबर मोडीत होती.

आयत नं. ४ मध्ये पैगंबरांना हा शूभ संदेश देणेत आला आहे की त्यांचा स्वर उंचाविण्यात आला आहे.

आयत नं. ५ व ६ मध्ये समाधान करणेत आले आहे की सन्मार्गातील प्रत्येक अडचण म्हणजे सुलभतेची पर्वसुचनाच होय.

आयत नं. ७ व ८ मध्ये अतिशय महत्त्वाचा आदेश देण्यात आला आहे की जेव्हा आपण आपल्या कर्तव्यातुन मोकळे व्हाल तेव्हा अल्लाहच्या उपासनेत तल्लीन व्हा व त्याचेच ध्यान करा कारण सर्व उद्दिष्ठांचे उद्दिष्ठ हेच होय.

# ९४.सूरह अलम् नशरह

سُورَةُ الشَّرْح

आयती ८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने.

بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. (हे पैगंबर !) काय आम्ही तुमची छाती (हृदय) उघडली नाही. ?[१]

اَلَمْ نَشْرَحْ لَكَ صَدْرَكَ ①

२. आणि, तुमच्यावरील ते ओझे उतरविले नाही ?

وَوَضَعْنَا عَنْكَ وِزْرَكَ ②

३. जे तुमची कंबर मोडीत होते. [२]

الَّذِيْٓ اَنْقَضَ ظَهْرَكَ ③

४. आणि तुमचा लौकीक उंचाविला नाही ? [३]

وَرَفَعْنَا لَكَ ذِكْرَكَ ④

५. तेव्हा (पहा) संकटाबरोबर सुलभता ही आहे.

فَاِنَّ مَعَ الْعُسْرِ يُسْرًا ⑤

६. निःसंशय ! संकटाबरोबर सुलभता ही आहे.

اِنَّ مَعَ الْعُسْرِ يُسْرًا ⑥

७. म्हणून जेव्हा तुम्ही मोकळे व्हाल तेव्हा उपासनेत तल्लीन व्हा.[५]

فَاِذَا فَرَغْتَ فَانْصَبْ ⑦

८. आणि आपल्या पालनकर्त्याच्या ध्यानात मग्न रहा. [६]

وَاِلٰى رَبِّكَ فَارْغَبْ ⑧

१. शरहे सद्र (छाती उघडणे) ला अभिप्रेत मनाची संतुष्टता व धैर्याची व निश्चयाची ती स्थिती आहे जी श्रद्धा, (ईमान) अंतदृष्टी च्या परिणामत: निर्माण होते. ही स्थिती सामर्थ्य व बळाचे उगमस्थान आहे. जिच्या प्राप्तीनंतर सन्मार्गातील संकटे सहन करणे विरोधांशी सामना करणे व प्रतिकार करणाऱ्या शक्तीशी संघर्ष करणे सुलभ होते.

فَمَنْ يُرِدِ اللّٰهُ اَنْ يَّهْدِيَهٗ يَشْرَحْ صَدْرَهٗ لِلْاِسْلَامِ

''ज्या व्यक्तीला अल्लाह शिकवण देण्याचा निश्चय करतो त्याची छाती (मन) इस्लामकरीता उघडून टाकतो.'' (अल अन-आम : १२५)

म्हणून छाती उघडणे हि अल्लाहची कृपाच आहे. येथे पैगंबरांना शरहे सद्र (छाती उघडणे) या देणगीने विभुषित करणेचा जो उल्लेख आला आहे त्याचा अर्थ असा आहे की अल्लाहने पैगंबरांच्या सर्व मानसिक चिंता दूर केल्या आणि त्याना असा दृढनिश्चय, विशाल धैर्य व तेजस्वी दुरदृष्टी असे गुण प्रदान केले जे प्रेषित्वाची जबाबदारी पेळण्याकरीता आवश्यक होते.

२. सूरह-दोहाच्या शेवटच्या आयतीत प्रेषित्त्वाच्या देणगीच्या घोषणेचा जो आदेश पैगंबरांना दिला गेला आहे ती एक भारदस्त कंबर मोडणारी जबाबदारी होती कारण एक अशा वातावरणात जेथे लोक अज्ञानतेचे जीवन जगत होते आणि मूर्तिपूजा व अनेकेश्वरवाद त्यांना बाळकडूतच पाजले गेले होते तेथे एकेश्वरवाद व मरणोत्तर जीवन (अखिरत) चे आमंत्रण देणे व विशेषत: असे सांगणे की अल्लाहने मला पैगंबर (प्रेषित) बनवून पाठविले आहे हे काही सोपे काम नव्हते. उलट अतिशय जिवावर बेतणारे काम होते. म्हणून पैगंबरांनी जसे आमंत्रण देण्याचे काम सुरू केले तसे चोहोंबाजूनी विरोधांचे एक वादळ उठले आणि पैगंबराच्या प्रेषित्वाला लोकांनी फक्त नाकारलेच नाही तर त्यांची कुचेष्ठा करू लागले.सत्त्याचे आमंत्रण देणे व त्याचा प्रसार करणे, सत्त्याला प्रकट करणे, प्रेषित्त्वाची कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी ही कंबर मोडणारी जबाबदारी होती जी पूर्ण करण्याच्या चिंतेत पैगंबर असे मग्न होत जणू दुखाचा डोंगरच कोसळला आहे. नंतरच्या काळात ही स्थिती राहीली नव्हती. कारण शरहे सद्र (छाती उघडणे) मुळे मोठे सामर्थ्य मिळाले होते तद्वत धैर्याशीळते ने बिकट कार्यासही सुलभ बनविले. तसेच निस्वार्थी साथीदार लाभल्याने मनाला समाधान व शांती मिळाली. हिच समाधान व शांतीची स्थिती जी नंतरच्या टप्प्यांत निर्माण झाली तिला 'ओझे उतरविणे' असे संबोधण्यात आले आहे आणि वास्तविकतेचे (स्थितीचे) ज्ञान अल्लाहलाच आहे.

३. हे सर्वात मोठा सन्मान आहे जो पैगंबरांना या जगात प्रदान करण्यात आला. लौकीक उंचावण्याचा अर्थ फक्त किती प्रसिद्धी नसून त्याच्यात खोल अर्थ आहे. व शुभसंदेशाचे एक जग लपलेले आहे. त्याचे काही पैलू असे आहेत की पैगंबराचा उल्लेख उंच स्तरावर होईल, प्रेषित्वाची चर्चा सर्वत्र होईल. त्यांचे नाव आदराने व सन्मानाने सर्वत्र घेतले जाईल, पैगंबरांच्या प्रेषित्वाची साक्ष दिल्याखेरीज कोणतीही व्यक्ती इस्लाम मध्ये दाखल होऊ शकणार नाही. अजानमध्ये पैगंबरांचे नाव सतत निनादत राहील. कोणतीही नमाज पैगंबरांचे नाव घेतले शिवाय पूर्ण होणार नाही पैगंबर मानवतेच्या जगात मुक्तीदाता म्हणून संबोधले जातील, कोणी त्यांना अनाथाचा वाली म्हणेल तर कोणी गुलामांचा त्राता त्यांचा उल्लेख कोठे नैतिकतेचा शिक्षक म्हणून तर कोठे आतम्याचे शुद्धीकरण करणारा म्हणून होईल, कोठे त्याना इतिहास घडविणारे क्रांतीकारक व्यक्तीमत्व म्हणून संबोधले जाईल तर कोठे विश्वनेता (सर्वरे आलम) हया पदवीने त्यांचा उल्लेख केला जाईल. आणि कोठे विश्वा करीता कृपा (रहमतूल लिल आलमीन) या पदवीने ते ओळखले जातील. कित्येक समाजात थोर मार्गदर्शक (हदीये आजम) म्हणून त्यांचे स्मरण केले जाईल. विद्वान व धर्मपंडीत तेजस्वी काया (नूरे-मुजस्सम) या नावाने त्यांचा उल्लेख करतील. पैगंबरांचे जीवनाचरण मनावर कोरले जाईल आणि त्यांच्या पवित्र जीवनांच्या स्मृतीच्या सुगंधाने मैफीली दखळून निघतील. पैगंबरांच्या सन्मानार्थ स्तुतिकाव्ये (नआत) करणे अभिमानाचे असेल.

بَلَغَ الْعُلٰى بِكَمَالِهٖ

**बलगलउला बिकमालीही** यासारखी रचने लोकांच्या जिभेवर असतील. निष्ठावंताच्या मनात (अहले ईमान) पैगंबराबद्दल दृढ प्रेम असेल व ते रात्रदिवस त्यांच्या सेवेत -दरूद व सलाम चे नजराणे अर्पण करीत राहतील (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) या आयतीच्या अवतीर्ण काळी रफअे जिक्र (लौकीक उंचावणे) ची एक चुणूक पहाता येत होती. नंतर जेव्हा उजळलेल्या सूर्याप्रमाणे पैगंबरांच्या सत्यतेने तेजस्वी स्वरूप धारण केले तेव्हा कोणातही नकार देण्याची हिम्मत उरली नाही. एकाद्याने आपले डोळेच बंद केले असतील तर ती गोष्ट निराळी. प्रसंगान्वये पैगंबरांचे समाधान करून देण्याचा उद्देश आहे की, हे पैगंबर! तुमचे विरोधक तुम्हाला कितीही खोटे ठरवोत, व तुमची कितीही थट्टा मस्करी करोत अल्लाहने तुमची शान उंचावली आहे. आणि आपल्या पुण्यवान दासांमध्ये तुमच्या साठी आदर आणि स्वीकार ठेवला आहे. म्हणूनच तुमच्या नावाने वातावरण दुमदुमत आहे. तेव्हा तुम्ही विरोधकांची पर्वा करू नका. व खात्री ठेवा की ते तुम्हाला काहीच हानी पोहचवू

शकणार नाहीत.

४. ही ती महत्वपूर्ण वस्तुस्थिती आहे मूळ उद्देश जिच्याकडे लक्ष वेधणे आहे. या सूरतीत व मागील सूरतीत (अद्-दोहा) पैगंबरांच्या जिवनाशी निगडीत ज्या घटनांचा हवाला देण्यात आला आहे तो ह्या गोष्टीचा स्पष्ट पुरावा आहे की अल्लाह अडचणी नंतर संपन्नता, दु:खानंतर सुख, संकटानंतर सुलभतेचा मार्ग मोकळा करतो. या वस्तुस्थितीस सादर करून पैगंबरांना खात्री देण्यात आली आहे की संकटे पुढेही येऊ शकतील परंतु तुम्ही चिंता करू नका कारण प्रत्येक संकट येणाऱ्या सुलभतेची पूर्वसुचना आहे व प्रत्येक अडचण सवलतीची हमी आहे. या कसोटीयाच्या टप्प्यातून पार पडूनच पैगंबर त्या ठिकाणी पोहोचू शकतील जेथे सुलभताच नांदत असेल.

त्यावरून हि मूळ वस्तुस्थिती स्पष्ट होते की माणसाने सत्मार्गात येणाऱ्या संकटांनी चिंताग्रस्त व दुखी होऊ नये उलट खात्री ठेवावी की अडचणीनंतर सुलभतेचा काळ देखील येईल व तो काळ इतक्या जवळ आहे की जणू सोबतच येत आहे.

'संकटा बरोबर सुलभताही आहे ' हि गोष्ट दोनदा पुनरुच्चारली आहे. कारण स्पष्ट व्हावे की सन्मानगर्ात अडचणी नेहमीच येत राहतील. परंतु अट हि की प्रत्येक अडचणीनंतर माणसाने धैर्य सोडून दिलेले नसावे. सुलभतेचा मार्ग निश्चितच उघडेल. अशाच परिस्थितीतून पार पडल्यानंतर निष्ठावंत (अहले-ईमान) आपल्या उद्दिष्ठीत स्थानावर पोहचू शकतील. म्हणजे या स्थानावर जेथे संकटांना आसरा नाही. ज्याचे कुरआनी नाव जन्नत आहे.

५. मोकळे होणे (फारिग होने) च्या अर्थात सर्व प्रकारच्या कामातून मोकळे होणे होय. परंतु येथे विशेष करून इस्लामचे आमंत्रण देणेच्या कामातून मुक्त होणे असे आहे.कारम पूर्वीच्या सूरतीची शेवटची आयत.

وَاَمَّابِنِعۡمَةِرَبِّکَ فَحَدِّثۡ۔

''व अम्मा बिनिअमति रब्बिका फहद्दीस.''

यामध्ये, आमंत्रण व प्रचार प्रसार करणेच्या जबाबदाऱ्या पार पाडंणेचा आदेश देणेत आला होता. आणि येथे याच संदर्भात फर्माविलेले आहे की जेव्हा तुम्ही मोकळे व्हाल तेव्हा आराधनेत तल्लीन व्हा. अर्थ हा आहे की जेव्हा काही कामे नसतील तेव्हा अल्लाहच्या आराधनेत मग्न व्हा. कारण सर्वात मोठी एकाग्रता अल्लाहची आराधनाच आहे. म्हणूनच या आदेशाचे पालन करणेत पैगंबरांची तल्लीनता इतकी वाढली होती की रात्री उशिरापर्यंत नमाज पढणेकरीता उभे रहावे लागत असल्याने त्यांचे पाय सुजून जात असत.

عن عائشه رضی الله عنها قالت : كان النبی ﷺ يقوم من الليل حتى تتفطر قدماه، فقلت له: لم تصنع هذا يا رسول الله وقدغفرلک ماتقدم من ذنبک وماتاخر؟ قال: افلااكون عبداًشكوراً۔ (بخاری مسلم)

''हजरत आयेशा (रजिअल्लाहु अनहा) फर्मावितात की पैगंबर रात्री इतक्या दिर्घवेळेपर्यंत नमाज साठी उभे रहतात असत की त्यांचे पाय सूजन जात त्यांना मी सांगितले, हे अल्लाहचे पैगंबर ! आपण नमाजकरीता इतका दीर्घवेळ का उभे असता, जेव्हा आपले मागचे पुढचे सर्व पाप माफ केले गेले आहेत त्यांनी फर्माविले की काय मी आभार मानणारा दास बनू नये? (बुखारी, मुस्लिम)

यावरून हि गोष्ट चांगल्या तऱ्हेने स्पष्ट होत की इस्लाम मध्ये आराधनेचे (इबादत) स्थान काय आहे. जरी इस्लामी शरीयतीचे सर्व आदेश आपले विशिष्ट स्थान ठेवतात परंतु जी गोष्ट सर्व आदेशावर आपले वेगळे महत्व ठेवते ती आराधनाच आहे. म्हणजे नमाज, अल्लाहचे नामस्मरण, दुआ या सारख्या गोष्टी कीही आराधना कायम केलेल्या वेळेवर करणे आवश्यक आहे. व त्यावेळेसही जेव्हा इतर कामातून माणसास सवड मिळेल. दुसऱ्या शब्दात निष्ठावंताना ज्या कामाची आवड असली पाहिजे व जे कार्य नियमित केले पाहिजे ते अल्लाहचीच उपासना आहे. जर अन्न व पाणी माणसाच्या जीवनाकरीता आवश्यक आहे तर त्यापेक्षाही कितीतरी आधिक श्वोसाच्छावासाची गरज आहे. एक मिनिट जरी माणसाने श्वास घेतला नाही तर तो जीवंत राहु शकणार नाही. याचप्रमाणे शरीयतीचे आदेश मग ते अदेश आमंत्रण व प्रचााशी संबंधीत असोत. किंवा शिक्षण प्रशिक्षणाची असोत, वैयक्तीक जीवनाबद्दल असोत किंवा सामूहिक जीवाना बद्दल असोत,जर इस्लामी जीवन जगण्यासाठी त्यांचे पालन करणे आवश्यक आहे तर अल्लाहची आराधना व भक्ति त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक आवश्यक आहे. हेच कारण आहे की इतर आदेशाचे पालन करण्याविषयी परिस्थितीनुरुप जबाबदाऱ्या कमी अधीक होतात. परंतु नमाज मोमिन याच्या जीवनाचा एक अतूट भाग आहे आणि तो जितक्या काटेकोरपणे त्याचे पालन करतो तितका अल्लाहशी त्याचा संबंध दृढ होतो. इथपर्यत की नमाज त्याच्या डोळयांचा थंडारा बनते.

६. म्हणजे आपल्या पालनकर्त्याकडेच लक्ष केंद्रीत करा. त्याचे अधिक अधिक स्मरण करा. त्याच्या नावाचा जप व त्याची स्तुती करा. त्याच्या ग्रंथाचे पठण करा.त्याच्याकडे माफीची याचना करा. व नम्रतेने व लिनतेने त्याच्याजवळ दुआ करा.

हे आदेश जरी पैगंबरांना संबोधून देण्यात आले असले तरी हे सर्वांकरीता आहेत. आणि यावरून जी महत्वपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट होते ती अशी की सर्व उद्देशाचे उद्दिष्ठ अल्लाहकडे मन लावणे किंवा दुसऱ्या शब्दात अल्लाहशी संबंध दृढ करणे होय.

# ९५. सूरह अत्-तीन

**नावः** पहिल्या आयतीत 'तीन' (अंजीर)ची शपथ घेणेत आली आहे. यावरून या सूरतीचे नाव अत् तीन आहे.

**अवतरण काळः** हि सुरह मक्की आहे. आयत नं. ३ मध्ये हि मक्की असणेचा पुरावा आहे. यामध्ये या शांतीमय शहराची शपथ घेणेत आली आहे ज्याला अभिप्रेत मक्का शहरच आहे. हे उघड आहे. यातील विषयाचा विचार केलेनंतर अंदाज येतो की ही सूरत इस्लामी-आमंत्रणाच्या प्रारंभिक काळात अवतीर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती-कल्पनाः** कर्माचे फळ आहे. ज्याची योग्यता अतिशय आकर्षक स्वरूपात स्पष्ट करणेत आली आहे.

**ग्रंथ-मांडणीः** आयत १ ते ३ मध्ये अशा स्थळांना साक्षीच्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे जे महान पैगंबरांची आठवण करून देतात व जेथून मार्गदर्शनाचा प्रकाश पसरला.

आयत ४ ते ६ मध्ये हि वस्तुस्थिती वर्णिली आहे की अल्लाहने मानवास उत्तम रचनेवर निर्माण केले आहे. याकरीता त्याने स्वत:स त्या उच्चस्थानीस पात्र असलेचे सिद्ध करावे. जेथे त्याचा पालनकर्ता त्याला पोहचवू इच्छितो. परंतु त्याने अधोगतीच्या मार्ग स्विकारला. म्हणूनच अल्लाहने त्याला अधोगतीच्या खोल खड्डयात फेकून दिले मात्र ज्या लोकांनी स्वत:स या उच्चस्थानी पात्र असल्याचे सिद्ध केले, ते आपल्या उद्देशात सफल झाले त्यांच्याकरीता अल्लाहकडून 'निरंतर फळ (दाईमी अज्र) मिळण्याचे वचन आहे.

आयत ७ ते ८ मध्ये या मुद्यावर विचार करणेचे आमंत्रण दिले आहे की जेव्हा मानवात अशी दोन विभिन्न व विसंगत प्रकारची वर्णने आढळतात तेव्हा त्या दोन वेगळया गोष्टींचा शेवट समान कसा होईल? किंवा ही गोष्ट कशी बरोबर होऊ शकते कि त्यांचा काहीही शेवट मुळीच होणार नाही. याचा अर्थ असा होतो की अल्लाहजवळ न्यायाचे नावच नाही. परंतु ही चुकीची गोष्ट आहे. कारण बुद्धी व निसर्ग या दोहोंची साक्ष अशी आहे की अल्लाह सर्व सत्ताधाऱ्यापेक्षा श्रेष्ठ सत्ताधारी आहे. तेव्हा तो न्याय कसा करणार नाही?

# ९५. सूरह अत्-तीन

سُوْرَةُ التِّيْنِ

आयती ८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे अंजिर [१] व जैतूनची, [२]

وَالتِّيْنِ وَالزَّيْتُوْنِ ۝١

२. आणि सीना पर्वताची, [३]

وَطُوْرِ سِيْنِيْنَ ۝٢

३. आणि या शांतीमय शहराची.[४]

وَهٰذَا الْبَلَدِ الْاَمِيْنِ ۝٣

४. नि:संशय आम्ही मानवाला उत्कृष्ठ जडण घडणीवर निर्माण केले आहे. [५]

لَقَدْ خَلَقْنَا الْاِنْسَانَ فِيْٓ اَحْسَنِ تَقْوِيْمٍ ۝٤

५. मग त्याला अधोगतीच्या निकृष्टतम अवस्थेकडे परत फिरविले.[६]

ثُمَّ رَدَدْنٰهُ اَسْفَلَ سٰفِلِيْنَ ۝٥

६. मात्र ज्या लोकांनी ईमान धारण केले व सत्कर्म करीत राहीले त्यांच्यासाठी असा मोबदला आहे जो कधीच समाप्त होणार नाही. [७]

اِلَّا الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ فَلَهُمْ اَجْرٌ غَيْرُ مَمْنُوْنٍ ۝٦

७. तर (हे पैगंबर !) यानंतर कोण आहे जो मोबदला व शिक्षेबाबत तुम्हाला खोटे ठरवित आहे ?[८]

فَمَا يُكَذِّبُكَ بَعْدُ بِالدِّيْنِ ۝٧

८. काय अल्लाह सर्व शासकापेक्षा मोठा शासक नाही ?[९]

اَلَيْسَ اللّٰهُ بِاَحْكَمِ الْحٰكِمِيْنَ ۝٨

१. शपथेच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तकवीर टिप न. १४.

२. येथे अंजिर व जैतूनचा उल्लेख रुपकात्मक त्या प्रदेशाकरीता झाला आहे जेथे हि दोन्ही फळे भरपूर होतात. म्हणजेच बैतूल मुकद्दसची भूमी याचे समर्थन या गोष्टीवरूनही होते की त्याच्यानंतर तूरे-सीनीन (सीना पर्वत) ची व शांततामय शहराची शपथ घेणेत आली आहे. यावरून अंजिर व जैतून यांना अभिप्रेत तो प्रदेश आहे. जेथे हि फळे उत्पन्न होतात.

पॅलेस्टाईनची जमीन अंजीर व जैतून फळांच्या उत्पन्नाकरीता प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. बायबलमध्ये आले आहे:-

''कारण तुझा देव परमेश्वर तुला एका उत्तम देशांत घेऊन जात आहे....गहूं, जव, द्राक्षवेली, अंजीर व डाळिंबे ह्यांचा तो देश आहे. जैतूनच्या झाडांचा व मधाचा देश.'' (अनुवाद ८: ७,८)

आणि बायबलच्या नव्या करारा नुसार हजरत ईसा अलैहिस्सलाम यांचा अंजिरच्या झाडाजवळून जाणेचा व त्यांच्या उदाहरणांचा उल्लेख अनेक ठिकाणी आलेला आहे. उदाहरणार्थ मार्कच्या बायबलमध्ये अध्याय ११:१२, १३:१४ मध्ये व लूकच्या बायबल मधील २१: २९ ते ३३ मध्ये आणि जैतून पर्वताचा उल्लेख तर सध्याच्या बायबलमध्ये इतक्या वेळेस झाला आहे की हे ठिकाण प्रख्यात असलेल्या शंकेला थोडीशीही जागा शिल्लक रहात नाही. हा प्रसिद्ध पर्वत जेरूशलेमच्या पूर्व दिशेस आहे.

(Mt. of Olives -------- A hill which is before Jerusalem on the east. (A Dictionary of the Bible P. 554)

या पर्वतावर हजरत ईसा अलैहस्सलाम जात असत व आपल्या शिष्यांना शिकवत असत या संदर्भात त्यांनी अतिशय प्रभावी प्रवचन दिलेले आहेत ज्यांचा उल्लेख सध्याच्या बायबलमध्ये आलेला आहे. व ही प्रवचने जैतून पर्वताच्या शिखरावर देण्यात आली होती.

म्हणून अंजीरच्या प्रदेशात हजरत ईसा अलैहिस्सलाम यांनी जे आमंत्रण दिले व जैतूनच्या पर्वतावर त्यांनी जे धडे दिले त्यात मरणोत्तर जीवनाच्या मोबदला व शिक्षेची स्पष्ट कल्पना देण्यात आली होती. उदाहरणार्थ काही उतारे पहा.

''तेव्हा त्याने आपल्या शिष्यांकडे दृष्टि लावुन म्हटले, अहो दीनांनो, तुम्ही धन्य; कारण देवाचें राज्य तुमचे आहे. अहो जे तुम्ही आता भुकेले आहा ते तुम्ही धन्य; कारण तुम्ही तृप्त व्हाल. अहो जे तुम्ही आता रडतां ते तुम्ही धन्य; कारण तुम्ही हसाल......कारण पाहा, स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे आहे, परंतु तुम्हां धनवानांची केवढी दुर्दशा होणार ! कारण तुम्ही आपले सांत्वन भरून पावलांच आहां. अहो जे तुम्ही आता तृप्त झाला आहा त्या तुमची केवढी दुर्दशा होणार ! कारण तुम्हाला भूक लागेल. अहो जे तुम्ही आता हसता त्या तुमची केवढी दुर्दशा होणार ! कारण तुम्ही शोक कराल व रडाल.... कारण ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हाला परत मापून देण्यात येईल..... ज्याला वाईट फळ येईल असे कोणतेही चांगले झाड नाहीं, तसेच ज्याला चांगले फळ येईल असे कोणतेही वाईट झाड नाहीं, प्रत्येक झाड त्याच्या फळावरून ओळखूं येते. काटेरी झाडांवरून कोणी अंजीर काढीत नाहींत.'' (लूक ६: २० ते ४४)

''नंतर तो मंदिरा समोर जैतूनांच्या डोंगरावर बसला असता पेत्र, याकोब, योहान व अंद्रिया ह्यांनी त्याला एकांती विचारले,ह्या गोष्टी कधी घडतील?........परंतु ही संकटे येऊन गेल्यावर त्या दिवसांत सूर्य अंधकारमय होईल, आणि चंद्र प्रकाश देणार नाही; आकाशातून तारे गळून पडतील व आकांशातील बळे उळमळतील...... आता अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या; त्याची डहाळी कोमल झाली ओणि तिला पानें फुटूं लागली. म्हणजे उन्हाळा जवळच आला आहे हे तुम्हाला कळते; त्या प्रमाणेच ह्या गोष्टी घडत असलेल्या तुम्हाला दिसतील तेव्हां तो जवळ, अगदी दाराशी येऊन ठेपला आहे असे समजा मी तुम्हास खात्रीपूर्वक सांगतो की, हे सर्व पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहींशी होणार नाहीं. आकाश व पृथ्वी ही नष्ट होतील परंतु माझी वचने नष्ट होणार नाहींत. आणखी त्या दिवसाविषयी व त्या घटके विषयी कोणाला ठाऊक नाही.'' (मार्क १३:३ ते ३२)

''ते तर सार्वकालिक शिक्षा भोगावयास जातील, आणि नीतिमान सार्वकालिक जीवन उपभोगावयास जातील. '' (मत्तय २५:४६)

बायबल मध्ये फक्त अंजीर व जैतून या दोघांचाच उल्लेख नसून त्याचबरोबर कियामत (अंतिम निर्णयाचा दिवस) आणि शिक्षा व मोबदला यांचाही उल्लेख आहे. कुरआनचा इशारा अंजीर व जैतूनच्या शपथे वरून हजरत ईसा अलैहिस्सलाम यांच्या त्याच उपदेश व त्याच शिक्षणाकडे आहे आणि हे शब्द सांकेतीक स्वरूपात याकरिता वापरले आहेत की ते वातावरण पुर्णपणे डोळयासमोर यावे ज्यात इनाम व शिक्षेची स्पष्ट कल्पना दिली होती व जेथे बायबल ग्रंथ अवतीर्ण झाले होते. ही अलंकारीक भाषा याकरीता वापरणेत आली आहे की मुद्दा स्पष्टपणे लक्षात उतरावा व समजण्यास सहज सोपा असावा.

३. तूरे सीनीन याचे दुसरे नाव तूरै-सीना (सीना पर्वत ) असे आहे जेथे हजरत मूसा अलैहिस्सलाम यांना शरियत (धर्म शास्त्र) प्रदान करणेत आली होती. ते सिना नावाच्या बेटात आहे. इजिप्त सोडल्यानंतर बनी इस्राईल सीना पर्वताच्या पायक्ष्याशी येऊन राहीले होते. 'सीना पर्वत' या शब्दाचा इशारा तौरात या

ग्रंथा कडे आहे. ज्याच्यात स्पष्टरितीने सांगितले गेले होते की कियामती (अंतिम निर्णया) च्या दिवशी निश्चितच मोबदला व शिक्षा यांच्या घटना घडणार आहेत.

४.अभिप्रेत मक्का शहर आहे ज्याला इब्राहीम अलैहिस्सलाम यांच्या प्रार्थनेच्या (दुआ) फलस्वरूप शांततामय शहर ठरविण्यात आले व त्याचे हे वैशिष्ठय सदासर्वकाळाकरीता कायम ठेवण्यात आले आहे इथपर्यंत की अज्ञानकाळात देखील येथे लढायांची मनाई होती. त्याचे हे शांतीमय असणेचे वैशिष्ठय या गोष्टीकडे मार्गदर्शन करते की मानवी घोडपणाचे रहस्य अल्लाहच्या निश्चित केलेल्या पवित्र बंधनाचे पालन करण्यात आहे. व त्याच्याविरोधी कृत्य, मानवाकरीता पाप आहे. बलदे-अमीन (शांततामय शहर) या गोष्टीचा ऐतिहासिक पुरावा आहे की येथूनच मार्गदर्शनाचा प्रकाश पसरला आहे व या मार्गदर्शनाचा एक महत्वपूर्ण पैलू मरणोत्तर जीवनाचा मोबदला व शिक्षा यावर श्रद्दा ठेवायचे होते आणि जो ग्रंथ हजरत इब्राहीम अलैहिस्सलामवर अवतिर्ण झाला होता त्यात मोबदला व शिक्षेची कल्पना होती- (पहा सुरे-आला टिप न. १९)

५. उत्तम जडणघडणीवर निर्माण करणेचा अर्थ असा आहे की ज्या उद्देशाकरीता मानवाची निर्मिती झाली आहे. त्या दृष्टीने त्याला फारच योग्य स्वरूप दिले आहे. शरीर रचनाही उत्तम दर्जाची देण्यात आली आहे. व त्या शरिरात ताकत व कार्य क्षमतेचे गुणही उत्कृष्ठ दर्जाचे ठेविले गेले आहेत. त्यानंतर बुद्धी व समज ज्ञान व चातुर्थाचे गुणांनी त्याच्या डोक्यावर निर्मित प्राण्यातीळ श्रेष्ठत्वाचा मुगूटच ठेवला आहे. तो जन्मत: गुन्हेगार नाही किंवा त्याच्या स्वभावातही खोडसाळ पणा व दृष्टता नाही. उलट वस्तुस्थिती ही आहे की त्याला सरळ प्रकृतीवर (नैसर्गिक) निर्माण करण्यात आले आहे व बऱ्या वाईटात फरक करणारी गुणे त्याच्या अंगी निर्मिले आहेत. भल्याबऱ्याची ओढ त्याच्याजवळ आढळते. परंतु जेव्हा त्याच्या मूळ स्वभावाचा संबंध येतो तेव्हा तो भलाईची आवड असलेलाच आहे.

मानवाला जी हि उत्तम रचना मिळालेली आहे ती एक अल्लाहच्या निर्माण शक्तीचा व त्याच्या कृपेचा हा परिणाम आहे. व उद्देश असा की मानवाने ह्या कार्यक्षमतेची मदत घेऊन त्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात ज्या अल्लाहने त्याच्यावर सोपविल्या आहेत. व ते गुण आपल्यात निर्माण करावेत जे मानवतेची श्रेष्ठ वैशिष्टये आहेत. याकरीता की तो पुढील जीवनात आपल्या पालनकर्त्याकडून निरंतर मिळणाऱ्या मोबदल्यास पात्र ठरावा. हे स्पष्ट आहे की मरणोत्तर जीवनातील मोबदला व शिक्षा मानवास उत्कृष्ट रचनेवर निर्माण करणेची आवश्यक मागणी आहे. म्हणून कुरआनचा हा दावा की मोबदला व शिक्षा अवश्य घडणार आहेत त्याच्या सत्यतेचा पुरावा आहे व त्याचे हे आमंत्रण की या कल्पनेच्या आधारावर आपले जीवन सुधारावे, हे काही नवीन आमंत्रण नाही जे प्रथमच देण्यात येत आहे उलट याच्यापुर्विही हेच आमंत्रण इतर पैगंबरही देत आले आहेत म्हणून त्या महान पैगंबरांनी ज्यांच्याकडे मोठमोठे पंथ अनुयायी होते. म्हणजे हजरत ईसा अलैहिस्सलाम, हजरत मूसा अलैहिस्सलाम व हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी आपल्या अनुयायीना हेच शिक्षण दिले होते. अंजीर व जैतूनची जमीन (बेतूल-मुकद्दस) साक्ष देत आहे की हजरत ईसा अलैहिस्सलाम यांनी अल्लाहच्या न्यायालयाची कल्पना मांडली होती व जैतून च्या पर्वतावर आपल्या अनुयायीना हे पाठ दिले होते की तुमच्या प्रयत्नांचा हेतू व उद्दीष्ठ मरणोत्तर जीवनातील प्राप्ती व सफलताच असली पाहिजे. मोबदला व शिक्षेच्या हकीकतीचा उल्लेख बायबलमध्ये फार प्रभावीपणे झालेला होता.

याचतऱ्हेने सीना पर्वत साक्षीदार आहे की हजरत मूसा अलैहिस्सलाम यांच्याकडे जो ग्रंथ तौरात अवतिर्ण झाला होता त्याच्यात देखील या हकीकतीचे पुर्णपणे वर्णन केले होते व हजरत मुसा अलैहिस्सलाम यांनी बनी इस्राईलना जो पाठ दिला होता व त्यांच्याकडून जे शरिअत (धर्म शास्त्र) पालनाचे जे वचन घेतले होते त्याच्यात मरणोत्तर जीवनाचा मोबदला व शिक्षा याची मूळ कल्पना समाविष्ठ होती. व मक्का शहराचा इतिहास साक्षीस आहे की त्या शहराची उभारणी करणारे हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी मोबदला व शिक्षेच्या कल्पनेच्या आधारावर एक नव्या शहर व समाजाच्या बांधणीचे काम केले होते, हजरत इब्राहीम यांच्या ग्रंथात मरणोत्तर जीवनावर (आखिरतवर) श्रद्धा ठेवणेच्या आमंत्रणाचा स्पष्टपणे उल्लेख होता व त्यांनी जो आवाज दिला होता तो मरणोत्तर जीवनातील सफलतेच्या कडेच येण्याकरीता होता. या ऐतिहासीक वस्तुस्थिवरून सिद्ध होते की :-

**सर्वप्रथम** ज्याप्रमाणे सर्व पैगंबरांनी एकेश्वरवादाचे आमंत्रण दिले होते त्याप्रमाणे मोबदला व शिक्षा या हकीगतीवर विश्वास ठेवण्याचे आमंत्रण होते. हजरत ईसा अलैहिस्सलाम, हजरत मूसा अलैहिस्सलाम व हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांनी शिक्षण व उपदेशाची जी केंद्रे स्थापली होती त्यात या ऐतीहासिक शिक्षणाची साक्ष आढळते.

**दुसरे** असे की कर्मफळाचा इन्कार करणे म्हणजे पैगंबरांना खोटे ठरविणे व त्यांच्या आमंत्रणास नकार देणे होय.

**तिसरे,** प्रत्येक अशी कल्पना जी मोबदला व शिक्षा याच्या विरोधाची असेल मग ती या जगाला उद्दीष्ठ बनवणारी कल्पना असो किंवा मेल्यानंतर मानवाचे इतर निर्मितीत (पुनर्जन्म) रूपांतर होण्याची कल्पना असो उदा. पशू किंवा वृक्ष बनण्याची कल्पना किंवा मेल्यानंतर माणसाचे जीवन संपुष्टात येते किंवा मानव मेल्यानंतर ईश्वरासमान होतो (आम्ही अल्लाहच्या आश्रयाची

याचना करतो) असे समजणे म्हणजे मार्गभ्रष्टता आहे जे मानवाच्या श्रेष्ठत्वासा धुळीस मिळवते व त्याच्या जीवनाला असफल करून त्याला विनाशा च्या खड्ड्यात फेकून देते.

**चौथी** गोष्ट मोबदला व शिक्षा याची कल्पना मानवास जबाबदार व चारित्र्यवान बनविते आणि त्याच्या कार्यक्षमतेच्या गुणांची जोपासना करून त्याला खऱ्या प्रगतीच्या मार्गावर आणून सोडते.

**पाचवी** गोष्ट ही की ऐतिहासीक स्थळे जेथे महान पैगंबर पाठविले गेले. या गोष्टीचे साक्षिदार आहेत की हे पवित्र आत्मे चारित्र्य व नितिच्या उच्चपदी आरूढ होते व त्यांच्या महानतेने आकाशाला गाठले होते व ज्या लोकांनी त्यांच्या आमंत्रणाचा स्विकार करून कर्माच्या मोबदल्याच्या आधारावर आपल्या चारित्र्याची उभारणी केली होती, ते प्रगतीच्या उच्यस्थळी पोहचले. हा तर न नाकारता येईल असा पुरावा आहे आणि तो एकेश्वरवाद (तौहीद) व मरणोत्तर जीवनाच्या आधारावर जीवन जगून त्या कार्यक्षमतेच्या गुणांची जोपासना करू शकतो व तो स्वत:ला इतक्या उंच्च पदी आणू शकतो की कृत्तिका नक्षत्राचा पुंणका देखील त्याचा हेवा करू लागेल.

**उरूजे आदमे खाकी से अंजूम सहमे जाते हैं !**
**के ये टुटा हुआ तारा महे कामील न बन जाये !!**

(मातीपासून जन्मलेल्या मानवाने इतका उच्च बिंदू गाठला की त्याला पाहून आकाशातील ताऱ्यांना चिंता वाटू लागली की त्याचे रूपांतर पुर्णिमेच्या चंद्रात तर होणार नाही ना?)

आयत १ ते ३ मध्ये ज्या शपथा घेतल्या आहेत व आयत ४ मध्ये जी गोष्ट सांगितली गेली आहे त्यांच्या संकेत व गर्भात त्या सर्व गोष्टींचा समावेश आहे ज्यांचा संक्षिप्त उल्लेख आम्ही वर केला आहे.

६. अधोगतीच्या अवस्थेस अभिप्रेत नौतिकतेच्या ऱ्हास व अधोगतीच्या ह्या अवस्था, अर्थ हा की मानवाने आपल्या रचनेची किंमत जाणली नाही व त्या कार्यक्षम गुणांचा योग्य वापर करून घेतला नाही जे त्याच्यात निर्माण केले गेले होते. आणि वर येण्याऐवजी त्याने खड्डयात जाणेची इच्छा केली तेव्हा अल्लाहने त्याला अधोगतीच्या शेवटच्या पातळीस पोहचविले परिणाम हा झाला की तो नरकाच्या (जहन्नमाच्या)खडडयात जाऊन पडला.

यावरून हे माहित होते की मानव जेव्हा या उद्देशाला आपल्या जीवनाचे ध्येय बनवीत नाही ज्याच्याकरीता त्याला सर्वश्रेष्ठ त्वाचे कार्यक्षम गुण प्रदान केले गेले आहेत तेव्हा तो मानवतेच्या सुगंधाला पारखा होतो व पशुपेक्षाही निच सिद्ध होतो. म्हणून मानवी ऱ्हासाच्या वाईट उदाहरणांनी इतिहासाची पाने माखली आहेत आणि आज ही अशा नीच व क्षुद्र घटना अनुभवास व पहाण्यास मिळतात की मानवता शोक करू लगते. आराधनेच्या (इबादत) पवित्र भावनेचा हा अपमान की मानव विट दगडांना पुज्य बनवितो इथपर्यंत की पुरुषाच्या लिंगाची पूजा करू लागतो मानवी रक्त इतके स्वस्त कि जनावराची किमत मानवी जीबापेक्षाही अधीक आहे. स्रीयांवर हा जुलूम की पुरुषाने त्यांना आपल्या शारिरीक वासनाचे भक्ष्य करावे. दीनदुबळयाचे हक्क असे पायदली तुडवले जातात की अनाथाची संपत्ती सहजपणे गिलकृत केली जाते. ,स्वार्थाचा हा अतिरेक, की गरिबांचे रक्त शोषले जाते. मानवाचा असा अनादर की त्यांना त्रास देण्याकरीता मांतनमय पद्धती स्विकारल्या जातात. व मानवी समाजाची अशी बेइज्जती केली जाते व त्यांच्याशी असे वैर केले जाते की विज्ञान व तंत्रशास्त्राचा त्याच्या नाशाकरीता वापर केला जातो इथपर्यंत की एका बाँबस्फोटाने लाखो लोकांना मृत्युच्या खाईत लोटले जाते. हे आणि अशा तऱ्हेची इतर दुष्कृत्ये मानवी अधोगतीचा भक्कम पुरावा आहे.

७. म्हणजे ज्या लोकांनी आपल्या उत्तम जडणघडणीवर निर्माण होण्याच्या गोष्टीची किंमत जाणली व स्वत:स श्रद्धा (ईमान) व सत्कार्याने सावरले ते अधोगतीच्या खड्डयातून बचावले त्यांनी आपल्या गुणांचा वापर योग्य व चांगल्या उद्देशाकरीता केला व मणोत्तर जीवनाच्या ठिकाणास समोर ठेवून उच्चस्थली चढण्याचे धैर्य केले म्हणून ते आखिरत (मरणोत्तर जीवन) मध्ये नियमित मिळणाऱ्या फळास पात्र ठरतील व सदासर्वकालीन मोबदल्याने विभुषित केले जातील.

८. अर्थात हा दृढ व स्पष्ट पुरावा समोर असतांना अंतिम निर्णयाच्या (कियामत) दिवसाच्या कर्मफळा बाबतीत पैगंबरांना खोटे ठरविण्यात कोणता शहाणपणा आहे? व जे लोक यानंतरही पैगंबरांना खोटे ठरविण्याच्या खटपटीत आहेत ते स्वत:च आपल्या नालायकीचा पुरावा देत आहेत.

९. म्हणजे अल्लाह सर्व शासकापेक्षा महान शासक आहे हि नाकारता न येणारी वस्तुस्थिती आहे कारण आकाश, जमीन मानव फरिश्ते (देवदूत) जिन (अगिपासून निर्माण झालेले) या सर्वांवर त्याचे राज्य प्रस्थापित आहे. तेव्हा काय तुम्ही असे समजता की, तो भल्याबुऱ्या माणसात फरक करणार नाही? त्याच्याजवळ न्याय नावाची चिजच नाही? आणि तो कधीच न्यायालय भरवणार नाही, तो अपराध्यांना शिक्षा करणार नाही? किंवा सत्कर्मी लोकांना मोबदला देणार नाही? जेव्हा तुम्ही या दुनियेच्या न्यायाधिशाकडून न्यायाची अपेक्षा करता तर अल्लाह जो सर्व न्यायाधिशांचा न्यायाधिश आहे त्याच्याबद्दल असा विचार करणे कसा योग्य ठरेल कि तो न्याय करणार नाहीं आणि मोबदला व शिक्षेचे काहीच अस्तित्व नाही.

# सूरह अल-अलक

# ९६. सूरह अल-अलक

**नावः** आयत नं. २ मध्ये माणसाचे 'अलक' (रक्ताची गाठ) पासून निर्माण केल्याचा उल्लेख आला आहे. या संदर्भात या सूरतीचे नाव 'अल अलक' आहे. आणि तिचे दुसरे नाव 'इकरा' (पढा) सुद्धा आहे. कारण सूरतीची सुरवात याच शब्दाने झाली आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्केमध्ये उतरली आणि अल्लाहच्या पैगंबरांवर सर्वप्रथम जी वही (संदेश) उतरली ती म्हणजे या सूरतीच्या सुरवातीच्या पाच आयती होती. बाकीच्या आयती नंतर त्यावेळी उतरल्या जेव्हा अबू जहलने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना मसजिदे हराममध्ये नमाज पढण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. आणि त्याने उघड विरोधास सुरूवात केली.

**मध्यवर्ती विषयः** मध्यवर्ती विषय हा आहे की हा ग्रंथ म्हणजे विश्वाच्या निर्मात्याची फर्मान आहे, जी माणसाच्या मार्गदर्शनासाठी पैगंबरांवर उतरली आहे. त्यांनी याच्या प्रकाशात आपल्या पालनकर्त्याची भक्ती व आज्ञापालन करावे आणि त्याची निकटता प्राप्त करावी. परंतु माणसाची स्थिती अजब आहे. हे भाग्य प्राप्त करण्याऐवजी तो आपल्या पालनकर्त्याशी द्रोह करू लागतो आणि पैगंबरांना विरोध करू लागतो. अशाप्रकारे तो आपले मरणोत्तर जीवन खराब करून ठेवतो.

**विषय मांडणीः** आयत नं. १ ते ५ मध्ये कुरआनचे पठण करण्याची शिकवण दिली गेली आहे. आणि याच संदर्भात माणसाच्या निर्मात्याच्या निर्मितीमध्ये ठळकपणे आढळून येणाऱ्या अद्भूत शक्तींचा उल्लेख करून वास्तव ज्ञानाच्या दौलतीने त्याला समृद्ध केले जाण्याची खुषखबर ऐकविली गेली आहे.

आयत नं. ६ ते ८ मध्ये माणसाला या गोष्टिबद्दल धमकी दिली गेली आहे की तो अल्लाहच्या या देणग्यांची कदर करण्याऐवजी उलट आपल्या पालनकर्त्याशी द्रोह करतो. वस्तुस्थिती ही आहे की त्याला आपल्या पालनकर्त्याजवळच पोहोचवयाचे आहे.

आयत नं. ९ ते १४ मध्ये त्या लोकांची निर्भर्त्सना केली गेली आहे जे पैगंबरांच्या विरोधासाठी उभे राहिलेले आहेत.

आयत नं. १५ ते १८ मध्ये बंडखोरांना वाईट परिणामाबद्दल सावध केले गेले आहे.

आयत नं. १९ मध्ये पैगंबरांना आणि त्यांच्या हवाल्याने ईमानधारकांना ही शिकवण दिली गेली आहे की त्यांनी बंडखोरांची गोष्ट मानू नये आणि अल्लाहचे आज्ञापालन करीत रहावे.



हिरा गुंफा The Cave of Hira. હિરા ગુંફા

# ९६. सूरह अल-अलक

سُورَةُ العَلَق

आयती १९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाह नावाने

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

१. (Read)[१] आपल्या पालनकर्त्याच्या नावाने, [२] ज्याने निर्माण केले.[३]

اِقۡرَاۡ بِاسۡمِ رَبِّكَ الَّذِىۡ خَلَقَ ۚ‏ ﴿۱﴾

२. निर्माण केले माणसाला जमलेल्या रक्ताने [४]

خَلَقَ الۡاِنۡسَانَ مِنۡ عَلَقٍ ۚ‏ ﴿۲﴾

३. पढा [५] आणि तुमचा पालनकर्ता मोठा उदार आहे.[६]

اِقۡرَاۡ وَرَبُّكَ الۡاَكۡرَمُ ۙ‏ ﴿۳﴾

४. ज्याने लेखणीद्वारे ज्ञान शिकविले, [७]

الَّذِىۡ عَلَّمَ بِالۡقَلَمِ ۙ‏ ﴿۴﴾

५. माणसाला ते ज्ञान दिले जे त्याला अवगत नव्हते. [८]

عَلَّمَ الۡاِنۡسَانَ مَا لَمۡ يَعۡلَمۡ ؕ‏ ﴿۵﴾

६. पण माणसा ची दशा ही आहे की तो द्रोह करतो. [९]

كَلَّاۤ اِنَّ الۡاِنۡسَانَ لَيَطۡغٰٓى ۙ‏ ﴿۶﴾

७. या आधारावर की तो स्वतःला निःस्प्रह समजतो.[१०]

اَنۡ رَّاٰهُ اسۡتَغۡنٰى ؕ‏ ﴿۷﴾

८. (जेव्हा) ही गोष्ट खात्रीपूर्ण आहे की तुमच्या पालनकर्त्या कडेच परत जायचे आहे. [११]

اِنَّ اِلٰى رَبِّكَ الرُّجۡعٰى ؕ‏ ﴿۸﴾

९. तुम्ही त्या माणसाला पाहिले जो रोखत आहे.

اَرَءَيۡتَ الَّذِىۡ يَنۡهٰى ۙ‏ ﴿۹﴾

१०. एका दासाला जेव्हा तो नमाज पढतो ?[१२]

عَبۡدًا اِذَا صَلّٰى ؕ‏ ﴿۱۰﴾

१. या सुरवातीच्या पाच आयती म्हणजे पहिली वही आहे. सर्वप्रथमचा ईश्वरी संदेश ही वही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर तेव्हा उतरली जेव्हा ते मक्केपासून दोन-तीन मैल अंतरावर हिरा नामक गुहेमध्ये ईश्वराच्या इबादतीसाठी उपासनेसाठी-एकान्तवासात बसले होते ही रमजान महिन्याची एक रात्र होती. त्यावेळी आपले वय चालीस वर्षाचे होते. इ. सन ६१० ची ही घटना आहे. 'बुखारी शरीफ' या ग्रंथामध्ये ही घटना तपशीलासह नमूद आहे. त्याचा खुलासा असा की, हिरा गुहेत अचानक एक फिरिश्ता पैगंबरांच्यासमोर प्रकट झाला आणि तो म्हणाला اِقْرَا ''इक्रा'' (पढा-Read) आपण सांगितले, مَاأَنَابِقَارِئٍ ''मी शिकलेलो नाही 'त्याने दुसऱ्यावेळेस मला दाबले आणि ते सहन करणे माझ्या सहनशक्तीपलीकडे झाले. नंतर त्याने मला सोडले आणि म्हणाला ''पढा'' मी म्हणालो, ''मी शिकलेलो नाही'' त्याने तिसऱ्यांदा मला दाबले. येथपावेतो की ते सहन करणे मला कठीण झाले. नंतर त्याने मला सोडून दिले. आणि म्हणाला, اِقْرَأْ بِاسْمِ رَبِّكَ الَّذِىْ خَلَقَ ''इक्रा बिस्मि रब्बिकल्लजी खलक'' (पढा आपल्या पालनकर्त्याच्या नावाने, ज्याने निर्माण केले) पासून त्याने مَالَمْ يَعْلَمْ ''मा लम् यालम'' पर्यंतच्या आयती पढल्या. (बुखारी बदउल वही व किताबुत्तफसीर)

अशाप्रकारे पवित्र कुरआनच्या अवतरणाची सुरूवात झाली. आणि हज़रत मुहम्मद यांना पैगंबर पदाने भूषविले गेले. ही घटना अचानक घडली होती. यापूर्वी पैगंबरांना कसलीही कल्पना देखील नव्हती की त्यांना पैगंबर नियुक्त केले जाणार आहे. अलबत, पैगंबरी प्राप्त होण्यापूर्वी देखील ते फक्त सर्वश्रेष्ठ अल्लाहची इबादत करत होते. आणि इबादतीच्या आवडीनेच त्यांना हिरा गुहेत खेचून आणले होते. कारण त्यांनी एकाग्र होऊन इबादतीमध्ये मग्न व्हावे. ज्या फिरिश्त्याला आपण पाहिले ते जिब्रईल आहेत, जे सर्वश्रेष्ठ अल्लाहचा ग्रंथ घेऊन आले होते. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे निरीक्षर होते. म्हणजे ते लिहावयास व वाचावयास शिकले नव्हते. आणि म्हणून अल्लाहच्या ग्रंथाला वाचण्याबाबतीत त्यांना आपली असमर्थता जाणवली. परंतु जेव्हा फिरिश्त्याने त्यांना तीनवेळा दाबले तेव्हा आपली असमर्थता दूर झाली. आणि त्यांच्यामध्ये अल्लाहच्या ग्रंथाला ग्रहण करण्याची आणि पढण्याची असामान्य पात्रता निर्माण झाली.

यावरून ही गोष्ट चांगल्याप्रकारे स्पष्ट होते की येथे पढण्याची जी आज्ञा केली गेली आहे त्याने अभिप्रेत कुरआनचे पढणे (वाचन) आहे, जो मार्गदर्शक ग्रंथ आहे. जे लोक कुरआनने प्रथम संबोधित केले गेले होते त्यांची भाषा अरबी होती. आणि कुरआन अरबी भाषेतच उतरत होते. आणि म्हणून पढण्याची जी आज्ञा दिली गेली त्याचा अर्थ त्यांच्यासाठी या हुकूमाची अनिवार्य निकड ही आहे की त्यांनी कुरआनच्या मूळ अरबी वचनांना पढून (वाचून) त्यांचा अर्थ व आशय समजावून घेण्याचा प्रयत्न करावा. जो ग्रंथ मानवाच्या मार्गदर्शनासाठी उतराविला गेला आहे, त्याला माणूस जोपर्यंत समजून उमजून पढत नाही. तोपर्यंत तो त्या पासून मार्गदर्शन व लाभवृद्धीचा फायदा कसा काय उठवू शकेल?

स्पष्ट असो की कुरआन पढण्याची ही आज्ञा अरबांसाठी किंवा मुसलमानांसाठी खास नाही. तर या आज्ञेचे संबोधन त्या प्रत्येक माणसासाठी आहे ज्याच्यापर्यंत हा ग्रंथ पोहोचेल. कारण हा ग्रंथ माणसाच्या निर्मात्याने माणसाच्या मार्गदर्शनासाठी उतरविला आहे; एखाद्या गटाच्या मार्गदर्शनासाठी नव्हे, आणि कियामतीपर्यंत हे मार्गदर्शन असल्यामुळे कियामतीपर्यंत जन्मास येणाऱ्या साऱ्या लोकांच्यासाठी ही आज्ञा आहे. एखाद्या मित्राने एखाद्या परक्या भाषेत पत्र लिहिले की त्यातील मजकूर जाणून घेण्यासाठी माणसामध्ये बेचैनी निर्माण होते आणि माणसामध्ये माणुसकी जिवंत असेल तर त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने बेचैनी आपल्या निर्मात्याची शिकवण काय आहे हे जाणून घेण्यासाठी त्याच्यामध्ये होईल. ही शिकवण जरी त्याच्या स्वभाषेत नसली तरी ती समजावून घेण्याची साधने उपलब्ध केली गेली आहेत.

२. म्हणजे आपल्या निर्मात्याचे नाव घेऊन कुरआन पढा, 'बिस्म' मधील बे साह्यासाठी आहे, जे या गोष्टीकडे इशारा करीत आहे की कुरआन वाचणे ही गोष्ट अल्लाहच्या कृपेवर आहे. म्हणून याची सुरवात करताना अल्लाहच्या सहाय्याची याचना केली जावी. या आज्ञेचे पालन करण्याची पद्धतसुद्धा सर्वश्रेष्ठ अल्लाहने दाखविली आहे. आणि ती ही की بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ 'बिस्मिल्ला हिर्रमा निर्रहीम' पढणे. 'सूरह फातिहाची सुरवात जी कुरआनची प्रस्तावना आहे तसेच 'सूरह तौबा' सोडून इतर सर्व सूरतींची सुरवात

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

''बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम'' (परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने) होते.

पवित्र कुरआनला अल्लाहच्या नावाने सादर केले गेले आहे. याचा अर्थ वस्तुत: ही हकीकत प्रकट करणे आहे की हा ग्रंथ शब्दन् शब्द अल्लाहचा ग्रंथ आहे. पैगंबरांचा स्वत:चा ग्रंथ नाही. आणि तो सर्व प्रकारच्या भेसळीपासून शुद्ध आहे. (अधिक खुलाशासाठी पाहा सूरे फातिहा नोट नं. १)

३. म्हणजे त्याने साऱ्या विश्वाला निर्माण केले.

४. जमलेल्या रक्ताने अभिप्रेत गर्भधारणा (Fertilization of ovam) झाल्यानंतरची ती स्थिती आहे जेव्हा माणूस निर्मितीच्या सुरवातीच्या स्थितीत असतो.

येथे याचा उल्लेख करण्याचा उद्देश या हकीगतीकडे लक्ष वेधण्याचा आहे की इतक्या क्षुद्र गोष्टीने माणसासारख्या श्रेष्ठ निर्मितीला बनवून उभे करणे ही गोष्ट निर्मात्याचे थोर सामर्थ्य, कमाल दर्जाची बुद्धिमत्ता, त्याची अद्‌भूत शक्ती आणि अमर्याद कृपा यांचा पुरावा सादर करते.

५. ''इक्रा'' اِقْرَاْ म्हणजे ''पढा'' ही आज्ञा येथे पुन्हा दिली गेली आहे. याने अभिप्रेत ताकीद ही आहे आणि कुरआनचे महत्त्व स्पष्ट करणेही आहे की हा आपल्या पद्धतीचा एकमेव ग्रंथ आहे. जो वरचेवर पढण्यालायक आहे. आणि तुम्हाला ही सक्त आज्ञा दिली गेली आहे की याला एक वेळ नव्हे तर पुन: पढत (वाचीत) जा.

६. सर्वश्रेष्ठ अल्लाहचा गुणविशेष 'अकरम' निवेदन झाला आहे. याचा अर्थ हा आहे की ती मोठी श्रेष्ठ व महान शक्ती आहे. आणि ती आपल्या दासांच्या बाबतीत अत्यंत उदार आहे येथे या गुणविशेषाचा उल्लेख करण्याचा उद्देश या सत्याला जाहीर करणे आहे की आपल्या व्यक्तीत्वाच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ अल्लाहच प्रतिष्ठित व सन्माननीय आहे. माणसाची निर्मिती तर अत्यंत क्षुद्र अशा वस्तूपासून झाली आहे. आणि म्हणून माणसाने गर्व व घमेंड करू नये. अशाप्रकारे माणसाला ही जाणीव करून देणेही अभिप्रेत आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याच्यावर हा किती मोठा उपकार केला आहे की माणसाला त्याने सर्वोत्कृष्ट निर्मिती बनवून त्याच्या अन्नपाण्याची आणि त्याच्या मार्गदर्शनाची साहित्यसामुग्री बनविली आहे.

७. म्हणजे ''लेखणी'' हे ज्ञानाच्या प्रसाराचे सुरक्षित व अत्यंत महत्वाचे साधन आहे. हे साधन म्हणजे अल्लाह तआलाची फार मोठी देणगी आहे आणि या साधनाचा उत्कृष्ट उपयोग म्हणजे पवित्र कुरआनला लेखनबद्ध केले जावे. कारण पवित्र कुरआन हे एका अशा समाजामध्ये उतरविले जात होते जो निरीक्षर होता. आणि म्हणून लेखणीचे महत्व स्पष्ट केले गेले. त्या समाजाला कुरआनच्या प्रसाराचे जे सेवाकार्य करावयाचे आहे त्या कार्यात लिखाणाला व लिखावटीला जे स्थान आहे त्याची त्यांना जाणीव व्हावी आणि त्यासाठी त्यांनी तयार व्हावे. या समाजाने पुढे शैक्षणिक क्षेत्रात जी प्रगती केली आणि पवित्र कुरआनाला लेखनबद्ध करून त्याच्या प्रसाराचे जे प्रशंसनीय काम केले ते परमेश्वराच्या या मार्गदर्शनाचे फळच होय.

८. म्हणजे ही सर्वश्रेष्ठ अल्लाहची उदारताच आहे. त्याने एका अत्यंत क्षुद्र अशा वस्तूपासून उच्चतम गुणविशेषाचे मानव निर्माण केले. आणि या प्राणीमात्राचा एक विशेष गुण म्हणजे तो 'ज्ञानी' आहे.

''ते ज्ञान दिले जे त्याला अवगत नव्हते'' ने अभिप्रेत अदृश्य सत्याचे ते ज्ञान जे वहीच्या (Revelation) द्वारे माणसाला दिले गेले. हे वास्तव आणि मूलभूत ज्ञान आहे, जे पवित्र कुरआनच्या स्वरूपात माणसाला दिले गेले आहे. आणि यावरच त्याचा उत्कर्ष आणि त्यांचे चिरकालीन यश अवलंबून आहे. जणू कुरआनचे अवतरण ही माणसावरील सर्वश्रेष्ठ अल्लाहची सर्वात मोठी कृपा आहे. सूर रहमानमध्ये परमेश्वराने याला आपल्या कृपेचा सर्वात मोठा लाभ ठरविले आहे.

اَلرَّحْمٰنُ عَلَّمَ الْقُرْاٰنَ ''रहमानने कुरआन शिकविले''

आणि याचा उल्लेख माणसाच्या जन्माच्या उल्लेखापूर्वी केला गेला आहे. خَلَقَ الْاِنْسَانَ (माणसाला निर्माण केले.) यावरून स्पष्ट व्हावे की माणसाच्या निर्मितीचा उद्देश मार्गदर्शन प्राप्त करणे हा आहे, ज्याचे उगमस्थान पवित्र कुरआन आहे.

९. म्हणजे अल्लाहच्या या देणगीची कदर करण्या ऐवजी माणूस अल्लाहशी द्रोह करू लागतो.

१०. म्हणजे या द्रोहाचे कारण हे आहे की तो स्वत:ला अल्लाहपासून बेपर्वा समजू लागतो. माणूस इच्छितो की मन मानेल त्या प्रमाणे आचरण करण्यास तो स्वतंत्र असावा. आणि म्हणून ना त्याला अल्लाहची पर्वा असते ना त्याच्या शिकवणीची. आणि त्याला जर धनदौलत मानमरातब मिळाला तर त्याच्यामध्ये गर्विष्ठपणाची भावना मोठया वेगाने निर्माण होते. आणि ते ईश्वराविरूद्ध द्रोह करण्यास सुरूवात करतो.

११. म्हणजे अल्लाहशी बेपर्वा होऊन कोणताही माणूस ईश्वरी न्यायासनासमोर हजर होण्यापासून स्वत:ला वाचवू शकत नाही. तेथे त्याला कळून चुकेल की त्याच्या बंडखोरीचा काय परिणाम निघाला.

१२. इशारा त्या घटनेकडे आहे जी हदीसमध्ये निवेदन केली गेली आहे. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची पैगंबरपदी नियुक्ती झाल्यानंतर जेव्हा मसजिदे हराममध्ये ते नमाज पढू लागले. अबू जहल जो मोठा द्रोही होता, त्याने आपल्याला नमाज पढण्यापासून रोखण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यामध्ये तो यशस्वी होऊ शकला नाही.

या विशिष्ट घटनेकडे इशाऱ्याखेरीज आयतीचा सर्वसाधारण पैलू हा आहे की जो कोणीही अल्लाहच्या कोणाही दासाला नमाजपासून, जी पालनकर्त्याच्या भक्ती व आज्ञापालनाचे सर्वप्रथम प्रतीक आहे, रोखील तो वाह्यात कृत्य करतो, जे सर्व दृष्टीने निषेधास पात्र आहे.

*तुम्ही विचार केला जर तो (दास) सरळमार्गावर असेल. किंवा अल्लाहचे भय बाळगून राहण्याची आज्ञा देत असेल. तुम्ही विचार केला जर हा (रोखणारा माणूस) खोटे ठरवित आणि तोंड फिरवीत असेल ! काय त्याला माहित नाही की अल्लाह पाहात आहे ?(अल-क़ुर्आन)*

११. तुम्ही विचार केला जर तो (दास) सरळमार्गावर असेल.

أَرَءَيْتَ إِن كَانَ عَلَى ٱلْهُدَىٰٓ ﴿١١﴾

१२. किंवा अल्लाहचे भय बाळगून राहण्याची आज्ञा देत असेल.

أَوْ أَمَرَ بِٱلتَّقْوَىٰٓ ﴿١٢﴾

१३. तुम्ही विचार केला जर हा (रोखणारा माणूस) खोटे ठरवित आणि तोंड फिरवीत असेल ! [१३]

أَرَءَيْتَ إِن كَذَّبَ وَتَوَلَّىٰٓ ﴿١٣﴾

१४. काय त्याला माहित नाही की अल्लाह पाहात आहे ?[१४]

أَلَمْ يَعْلَم بِأَنَّ ٱللَّهَ يَرَىٰ ﴿١٤﴾

१५. खबरदार ! जर तो परावृत्त झाला नाही तर आम्ही त्याच्या कपाळावरचे केस धरून फरफटत नेऊ, [१५]

كَلَّا لَئِن لَّمْ يَنتَهِ لَنَسْفَعًۢا بِٱلنَّاصِيَةِ ﴿١٥﴾

१६. खोटे व दोषी कपाळ, [१६]

نَاصِيَةٍ كَٰذِبَةٍ خَاطِئَةٍ ﴿١٦﴾

१७. त्याने आपल्या टोळीला बोलावून घ्यावे, [१७]

فَلْيَدْعُ نَادِيَهُۥ ﴿١٧﴾

१८. आम्ही पण बोलावितो शिक्षा देणाऱ्या फिरिश्त्यांना. [१८]

سَنَدْعُ ٱلزَّبَانِيَةَ ﴿١٨﴾

१९. खबरदार ! त्याची गोष्ट मान्य करू नका [१९] आणि सजदा करा [२०] आणि निकटता प्राप्त करा.[२१]

كَلَّا لَا تُطِعْهُ وَٱسْجُدْ وَٱقْتَرِب ۩ ﴿١٩﴾

१३. या आयतीमध्ये कुरआन संबोधन करीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला यावर विचार करण्याचे आवाहन केले गेले आहे की एकीकडे अल्लाहचा तो दास आहे जो स्वत: सरळमार्गावर आहे आणि दुसऱ्यांना अल्लाहचे भय बाळगण्याचा आणि त्याच्या अवज्ञेपासून वाचण्याचा उपदेश करतो. आणि दुसरीकडे तो माणूस आहे ज्याचे काम सत्याला खोटे ठरविणे आणि त्यापासून विन्मुख होणे हे आहे. तर मग या दोहोपैकी कोणाची वागणूक योग्य आहे? हे ठरवा आणि मग जर हा खोटे ठरविणारा माणूस इस्लामच्या शत्रूत्त्वात आंधळा होऊन त्या सदाचारी दासावर बळजबरी करीत असेल आणि त्याच्या मार्गात अडचणी निर्माण करीत असेल तर त्याचे हे कृत्य कसे आहे?

पार्श्वभूमीच्या दृष्टीने या आयतींचा इशारा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि अबू जहलकडे आहे. परंतु अर्थाच्या दृष्टीने हे सर्वसाधारण विधान आहे. जो माणूसही इस्लामच्या शत्रूत्वात एखाद्या सदाचारी दासाला सत्यमार्गापासून रोखील तर त्याचे हे कृत्य त्याचप्रमाणे निषेधास पात्र आहे ज्याप्रमाणे अबू जहलचे कृत्य निषेधास पात्र होते.

१४. म्हणजे काय ही अत्याचारी कृत्ये करणारी व्यक्ती ह्या गोष्टीपासून बेसावध आहे की अल्लाह हे सर्व काही पाहात आहे. आणि जेव्हा तो अत्याचारी व अत्याचार पीडीत आणि सदाचारी-दुराचारी सर्वांना पाहात आहे तर मग तो अत्याचारी माणसाला शिक्षा का नाही देणार? आणि अत्याचारपीडिताचे गाऱ्हाणे का नाही ऐकणार? काय ज्या शक्तीची नजर त्याच्या दासांवर आणि त्यांच्या सर्व कृत्यांवर व हालचालींवर आहे त्याच्याजवल त्याची बंदगी करणारे आणि त्याच्या बंदगीपासून रोखणारे दोघे बरोबर होऊ शकतील? जर असे नाही आणि खात्रीने असे नाही तर त्याची आवश्यक निकड ही आहे की निर्णयाचा एक दिवस अस्तित्त्वात यावा.

१५. म्हणजे हा द्रोही आपल्या त्या कृत्यांपासून परत फिरला नाही तर तो दिवस येतो जेव्हा फिरिश्ते त्याच्या कपाळाचे केस धरून त्याला फरफ्टत नेतात. सूरह रहमानमध्ये गुन्हेगारांच्या बाबतीत फर्माविले गेले आहे की,

فَيُؤْخَذُ بِالنَّوَاصِى وَالْاَقْدَامِ ـ (الرحمٰن: ۴۱)

''त्यांच्या कपाळाचे केस आणि त्यांच्या पाय धरून त्यांना फरफटत नेले जाईल.''

(सूरह रहमान - ४१)

द्रोही माणसे गर्विष्ठ असतात आणि त्यांच्या डोक्यांत हे वारे शिरलेले असते की ते मोठे लोक आहेत आणि म्हणून त्यांना कियामतीच्या दिवस ही दु:खदायक शिक्षा दिली जाईल की फिरिश्ते त्यांच्या कपाळाचे केस धरून त्यांना फरफटत नेतील आणि त्यांना जहन्नममध्ये दाखल केले जाईल.

१६. खोटे आणि गुन्हेगार कपाळ यासाठी म्हटले गेले आहे की जे कपाळ आपल्या निर्मात्यासमोर झुकले नाही आणि इतरांनाही त्याच्यासमोर झुकू दिले नाही ते कपाळ खोटे व गुन्हेगार कपाळ आहे यामध्ये काय शंका असू शकते?

१७. इशारा अबू जहलच्या त्या (धमकीकडे) आहे की या दरीमध्ये माझ्या टोळीची माणसे अधिक आहेत.

१८. म्हणजे एखाद्यास जर त्याच्या टोळीच्या लोकांवर अभिमान असेल तर त्याने आपल्या मदतीसाठी त्यांना बोलवावे. आम्ही देखील आमच्या पोलिसांना म्हणजे दोजखच्या फिरिश्त्यांना बोलावितो. मग त्याने पाहावे की त्याची शक्ती कीती आहे?

१९. म्हणजे या द्रोही लोकांच्या गोष्टींना फसू नका जे तुम्हाला एका परमेश्वराच्या आज्ञापालनापासून रोखू इच्छितात.

२०. 'सज्दा' चा अर्थ झुकणे असाही आहे आणि कपाळ जीमनिवर टेकविणे असाही आहे. येथे सज्दा करण्याची जी आज्ञा दिली गेली आहे याचा अर्थ हा आहे की एका परमेश्वरासमोरच झुका. त्याच्यासमोर कपाळ टेकवा आणि त्याच्याच साठी नमाज पढा.

२१. म्हणजे आपल्या पालनकर्त्याचे सानिध्य प्राप्त करा. हदीस मध्ये आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) नी फर्माविले,

أَقْرَبُ مَا يَكُوْنُ الْعَبْدُ مِنْ رَبِّهٖ وَهُوَ سَاجِدٌ ـ (مسلم كتاب الصلوٰة)

''दास आपल्या पालनकर्त्याच्या सर्वात अधिक जवळ सज्दा' करीत असताना असतो.''

स्पष्ट असो की 'सज्दा' जो नमाजमधील एक महत्वाचा विधी आहे सर्वश्रेष्ठ अल्लाहची जवळीक प्राप्त करण्याचा अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. कारण सज्दामध्ये माणूस आपल्या कपाळाला जो शरीराचा अत्यंत श्रेष्ठ भाग आहे, जमिनीवर ठेवितो आणि अल्लाहचे श्रेष्ठत्व मान्य करून त्याचे पावित्र्य निवेदन करतो. سُبْحَانَ رَبِّىَ الْاَعْلٰى

(सुबहान रब्बि यल अअला)

या पूर्वीच्या आयतीतमध्ये गुन्हेगार कपाळाचा उल्लेख होता ज्याला जहन्नममध्ये पोहचविले जाईल. त्याच्या विरोधात या आयतीमध्ये अल्लाहच्या निष्ठावान दासाच्या (मोमीन) कपाळाकडे इशारा आहे जो अल्लाहच्या हुजूर नतमस्तक झाल्याने सन्माननीय ठरेल.

सूरतीची सुरवात कुरआन पढण्याच्या आज्ञेने झाली होती आणि शेवट अल्लाहची जवळीक प्राप्त करण्याच्या आज्ञेने झाला आहे. यावरून स्पष्ट झाले की कुरआनचे पठण करण्याचे फळ अल्लाहंची जवळीक हे आहे. यापेक्षा उच्च असे कोणतेच स्थान नाही. ज्याची माणूस कल्पना करू शकतो. आणि यापेक्षा अधिक थोर असा शेवट नाही जो प्राप्त केला जाऊ शकतो.

या आयतीवर सज्दा करणे हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यापासून सिद्ध आहे. (मुस्लिम किताबुल मसाजिद)

# ९७. सूरह अल् -कद्र

**नावः** पहिल्या आयतीमध्ये कुरआन ''शबे कद्र'' मध्ये उतरल्याचा उल्लेख झाला आहे. या औचित्यावरून या सूरतीचे नाव 'अल कद्र' आहे.

**अवतरण काळः** इमाम सीवतीनी ने 'अल इअत्कान' या आपल्या पुस्तकात स्पष्टीकरण केल्याप्रमाणे (अल अित्कान खं.१ पान २२) ही सूरत मक्केमध्ये उतरली या शिवाय मजकूरावरूनही ही ''मक्की'' असल्याचा-मक्केमध्ये उतरल्याचा-अंदाज होतो.

**मध्यवर्ती विषयः** पवित्र कुरआनचे महत्त्व आणि त्याची थोरवी स्पष्ट करणे हा आहे.

पवित्र कुरआनच्या उतरण्याची सुरवात ''सूरह अलक'' च्या सुरवातीच्या आयतींनी झाली होती या सूरतीमध्ये दाखविले गेले आहे की ती वेळ अत्यंत शुभ होती, जेव्हा कुरआनच्या अवतरणास सुरवात झाली.

**ग्रंथ मांडणीः** सर्वप्रथम या महान ऐतिहासिक घटनेची सूचना दिली गेली आहे की कुरआनच्या अवतरणाची सुरवात अत्यंत वैभवशाली पद्धतीने एका महान रात्री केली गेली.कारण कुरआनचे अवतरण ही काही साधारण गोष्ट नव्हे. हा अल्लाहचा वैभवशाली निर्णय आहे, जो समाजाचे भाग्य बदलणारा आणि मानवी जगाची काया पलटणारा आहे.

त्यानंतर दाखविले आहे की या रात्री मध्ये काय काय समृद्धी आहे आणि ही रात्र पहाटेपर्यंत पूर्णपणे शांततेची रात्र कशी असते.

यावरून हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे की जो ग्रंथ या वैभवासह उतरला आहे त्याची उपेक्षा करणारे आणि त्याला तुच्छ समजणारे तेच लोक होऊ शकतात जे इतक्या महान चांगुलपणापासून स्वत:ला वंचित करू इच्छितात.

# ९७.सूरह अल् -कद्र

سُورَةُ الْقَدْرِ

आयती - ५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहचे नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. आम्ही त्याला [१] कद्रच्या रात्री उतरविले.[२]

اِنَّآ اَنْزَلْنٰهُ فِيْ لَيْلَةِ الْقَدْرِ ۝١

२. आणि तुम्हाला काय माहित की कद्रची रात्र काय आहे?[३]

وَمَآ اَدْرٰىكَ مَا لَيْلَةُ الْقَدْرِ ۝٢

३. कद्रची रात्र हजार महिन्यापेक्षा अधिक उत्तम आहे .[४]

لَيْلَةُ الْقَدْرِ ۙ خَيْرٌ مِّنْ اَلْفِ شَهْرٍ ۝٣

४. यामध्ये फिरिश्ते व रूह [५] (अलअमीन) आपल्या पालन कर्त्याच्या परवानगीने प्रत्येक आज्ञा घेऊन उतरतात.[६]

تَنَزَّلُ الْمَلٰٓئِكَةُ وَالرُّوْحُ فِيْهَا بِاِذْنِ رَبِّهِمْ ۚ مِنْ كُلِّ اَمْرٍ ۝٤

५. संपूर्ण शांती आहे ती रात्र पहाटेच्या उदयापर्यंत.[७]

سَلٰمٌ ۛ هِيَ حَتّٰى مَطْلَعِ الْفَجْرِ ۝٥

१. म्हणजे कुरआनला.

२. कद्रचा अर्थ प्रतिष्ठा व आदर असा आहे. आणि लैलतुल कद्र (कद्रची रात्र) चा अर्थ प्रतिष्ठित व सन्माननीय रात्र असा आहे. ही ती रात्र आहे ज्यामध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर पहिली वही (संदेश) उतरली, जेव्हा आपण ''हिरा'' नावाच्या गुहेत ध्यानमग्न होता. या रात्रीला हा मान प्राप्त असल्यामुळे या रात्रीला पवित्र कुरआनच्या अवतरणाची सुरवात झाली-हिला ليلةالقدر लैलतुल कद्र-प्रतिष्ठेची व सन्माननीय रात्र- असे संबोधिले जाते. आणि सूरह ''दुख्खान'' मध्ये हिला لیلةمبارکة ''मुबारक रात्र'' असेही संबोधिले गेले आहे. ही त्याच प्रकारची गोष्ट आहे जसे त्या कालाला ''अमंगल काल'' म्हणून संबोधिले गेले, जेव्हा आद समाजावर ईश्वराचा कोप प्रकट झाला.

فَارْسَلْنَا عَلَيْهِمْ رِيْحًا صَرْصَرًا فِىٓ اَيَّامٍ نَّحِسَاتٍ۔ (حٰمٓ السجدہ۔١٦)

''तेव्हा आम्ही त्यांच्यावर अमंगल दिवसात अत्यंत प्रचंड वारे पाठविले.'' (हामीम सजदा-१६)

स्पष्ट आहे की या आयतीमधील अमंगल दिवसाचा अर्थ हा नाही आहे की ते दिवस स्वत:हून अमंगल होते. याचा अर्थ असा की या काळात आद समाजावर अल्लाहचा कोप प्रकट झाला, म्हणून ते दिवस त्या समाजासाठी अमंगल ठरले. याचे दुसरे उदाहरण रमजानचा महिना आहे. याची श्रेष्ठता व समृद्धी या आधारावर आहे की त्यामध्ये पवित्र कुरआन उतरले. त्याचप्रकारे लैलतुल कद्रची श्रेष्ठता व समृद्धी या आधारावर आहे की या रात्री कुरआनच्या अवतरणाचा क्रम सुरू झाला.

ही रात्र रमजानची होती. कुरआनमध्ये निवेदन केले गेले आहे की.

شَهْرُ رَمَضَانَ الَّذِىٓ اُنْزِلَ فِيْهِ الْقُرْاٰنُ

''रमजानचा महिना ज्यामध्ये कुरआन उतरविले गेले.'' (सूरह बकरा.१८५)

प्रमाणित हदीसनुसार ही रात्र रमजान महिन्याच्या शेवटच्या दशकातील एक रात्र होती. स्पष्ट असो की ''लैलतुल कद्र'' मध्ये कुरआन उतरले याचा अर्थ हा नव्हे की संपूर्ण कुरआन त्या रात्री उतरले. परंतु त्याचा अर्थ हा आहे की या पवित्र ग्रंथाच्या उतरण्याची सुरवात याच रात्री झाली. जणू अल्लाह तआलाच्या कृपेला याच रात्री उधान आले. आणि मार्गदर्शनाचे झरे वाहू लागले.

कुरआनच्या अवतरणासाठी दिवसाच्या ऐवजी रात्रीची निवड विना हिकमत नाही. रात्रीची वेळ शांततेची व समाधानाची असते. ईशभीरू लोकांच्या मनाचा कल ईश्वराकडे असतो. ही शांततेची वेळ आत्म्याच्या विकासासाठी फार उपयुक्त असते. आणि विशेषत: रात्रीचा शेवटचा भाग तर ईश्वरी प्रार्थनेसाठी आणि अल्लाहसमोर अश्रू गाळण्यासाठी अत्यंत उचित अशी वेळ आहे आणि म्हणून पवित्र कुरआन आणि पैगंबरांच्या वचनामध्ये रात्रीच्या शेवटच्या भागात नमाज अदा करणे व प्रार्थना करणे याचे मोठे माहात्म्य आले आहे. आणि अजब नाही की कुरआनचे उतरणे सुदधा ''लैलतुल कद्र'' च्या शेवटच्या भागात झाले असेल.

३. हा प्रश्न ''लैलतुल कद्र'' ची थोरवी व तिची समृद्धी स्पष्ट करण्यासाठी आहे. त्याचबरोबर त्याचा इशारा या गोष्टीकडेही आहे की या रात्रीचा प्रश्न अदृश्याच्या रहस्याशीही निगडीत आहे आणि म्हणून यासंबंधी अल्लाहकडून जे काही सांगितले गेले आहे त्याहून अधिक तपशील माहिती करून घेण्याचा माणसाजवळ कोणताही मार्ग नाही. ही रात्र कोणती हे अचूकपणे ठरविणे ही गोष्ट माणसाच्या आवाक्याबाहेरील आहे. हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी रमजानच्या शेवटच्या दशकातील विषम रात्रीमध्ये हिचा शोध करण्याची जी आज्ञा दिली आहे त्यावरच समाधान मानले पाहिजे.

४. हजार महिन्याचा उल्लेख कल्याण व समृद्धीची विपुलता स्पष्ट करण्यासाठी आहे. या रात्री माणसाला मार्गदर्शनाने उपकृत करण्याचा चातुर्याचा निर्णय झाला. पवित्र कुरआनच्या उतरण्याची सुरवात झाली आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रेषितपदाने भुषविण्यात आले. या श्रेष्ठत्वाच्या आधारावर ही रात्र दुसऱ्या हजारो रात्री नव्हे तर हजारो महिन्यापेक्षा अधिक मोठी आहे. आणि वेष्टनच जर इतके मौल्वान आहे तर आतील वस्तू त्याच्या किती पट मौल्यवान असेल!

या रात्रीने आपल्या समृद्धीची भांडारे तर त्यावेळे उघडली होती जेव्हा फिरिश्ता 'हिरा गुहेत पहिली वही (संदेश) घेऊन आला होता. परंतु तिची समृद्धी कायमपणे शिल्लक राहिली आहे. प्रत्येक वर्षी रमजान महिन्यामध्ये कुरआनच्या अवतरणाचे स्मरण म्हणून ही रात्र साजरी केली जाते आणि ती साजरी करण्याचे स्वरूप हे असते की त्या रात्री नमाज, कुरआनचे पठण आणि अल्लाहचे स्मरण, त्याच्या नावाचा जप व प्रार्थना यांचा अधिकाधिक अंगिकार केला जातो. हदीसमध्ये आहे की हजरत. मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले,

مَنْ قَامَ لَيْلَةَ الْقَدْرِ اِيْمَانًا وَّ احْتِسَابًا غُفِرَ لَهٗ مَا تَقَدَّمَ مِنْ ذَنْبِهٖ۔ (بخاری کتاب صلاۃ التراویح)

''ज्या व्यक्तीने ईमानपूर्वक आणि अल्लाहकडून मोबदला मिळावा या आशेवर ''लैलतुल कद्र'' (शबे कद्र) मध्ये इबादत

केली त्याचे सर्व गुन्हे माफ केले जातील.'' (बुखारी)

ज्या प्रमाणे पावसाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी फार मोलाचा असतो त्याचप्रमाणे अल्लाहची निकटता प्राप्त करण्यासाठी शरीअतीने ठरविलेल्या खास वेळा, खास दिवस आणि खास रात्री अत्यंत मोलाच्या असतात. उदा. तहज्जुदची वेळ, शुक्रवारचा दिवस, रमजानाचा महिना, अरफातचा दिरस वगैरे, त्याच प्रमाणे 'कद्रची' रात्र अल्लाहची निकटता प्राप्त करण्यासाठी अत्यंत योग्य व अनुकूल अशी रात्र आहे. आणि म्हणूनच रमजान महिन्याच्या शेवटच्या दहा रात्रींमध्ये तिचा शोध घेण्यास फर्माविले गेले आहे :

**عن عائشة رضى الله عنها ان رسول الله صلى الله عليه وآله وسلم قال : تَحَرَّوْ لَيْلَةَ الْقَدْرِ فِي الْوِتْرِ مِنَ العَشْرِ الْاَوَاخِرِ مِنْ رَمَضَانَ۔** ( بخاری۔کتاب صلاۃ التراویح )

''हज़रत आयेशा (रजि.) या निवेदन करतात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, ''शबे कद्र'' चा रमजान महिन्याच्या शेवटच्या दहा दिवसात विषम रात्रीमध्ये शोध घ्या.''(बुखारी)

विषम रात्री म्हणजे रमजान महिन्याची एकविसावी, तेवीसावी, पंचविसावी, सत्ताविसावी, एकोणत्तीसावी या रात्री होत. ठराविक रात्र यासाठी दर्शविली गेली नाही की तिच्या शोधाची आवड निर्माण व्हावी. आणि लोकांनी काही रात्री अल्लाहच्या इबादतीत घालवाव्यात या पैलूने 'ऐतिकाफ' मागील हिकमत ही स्पष्ट होते. जो रमजानच्या शेवटच्या दशकामध्ये केला जातो.

आता प्रश्न हा की, जगाच्या एका भागात रात्र असते आणि दुसऱ्या भागात दिवस असतो. मक्केमध्ये जेव्हा 'शबे कद्र' असेल तेव्हा दूरच्या भागातील लोकांना ती कशी काय लाभेल? याचे उत्तर हे की शरीअतीने (इस्लामी धर्मशास्त्र) ज्यावेळेला लाभदायक (बरकतीचा) ठरवून इबादतीसाठी निश्चित केले आहे त्याबाबतीत स्थानिक वेळाला प्रमाण मानली जाईल.

उदा. रात्रीचा शेवटचा भाग जो प्रार्थनेच्या स्वीकारासाठी खास ठरविला गेला आहे. किंवा शुक्रवारची वेळ. याबाबतीत तर स्थानिक वेळच प्रमाण मानली जाते. आणि त्यानुसार नमाज वगैरे अदा केली जाते. यामुळे तो लाभ (बरकत) नाहीसा होत नाही जो विशिष्ट वेळ अगर विशिष्ट वेळेबरोबर निगडीत असतो. याचप्रमाणे शबे कद्रचा लाभही (बरकत) स्थानिक वेळ प्रमाणित मानल्यानेही शिल्लक राहतो. आणि सर्व भागातील लोकांना तो मिळू शकतो.

५. 'रूह' ने अभिप्रेत 'रूहूल अमीन' आहे. ही हजरत जिब्राईल (अलैहिस्सलाम) यांची पदवी आहे. त्यांचा उल्लेख विशेषकरून यासाठी केला गेला आहे की ते फिरिश्त्यांचे सरदार आहेत.

६. तनज्जुल (उतरत आहे) चा काळ वर्तमान आहे. यासाठी की त्यावेळची परिस्थिती नजरेसमोर यावी जेव्हा फिरिश्त्ये अल्लाहचा संदेश घेऊन उतरत होते. अर्थ हा की ज्याप्रमाणे एखाद्या बादशहाचे शिपाई शाही फर्मान घेऊन एखाद्या मोहिमेवर धावत जातात, त्याचप्रमाणे जिब्राईल फिरिश्त्यांच्या फौजेसह ईश्वराचे फर्मान घेऊन उतरले होते. आणि या वैभवाने उतरले होते की जणू अध्यात्मिक विश्वात ही कुरआनच्या उत्सवाची रात्र होती.

प्रत्येक आज्ञा घेऊन उतरतात याचा अर्थ हा आहे की 'शबे कद्र 'मध्ये फिरिश्त्ये अकारण उतरले नव्हते. उदा. कुरआनच्या पाच आयतींना ज्या सूरह 'अलक' च्या सुरवातीच्या आयती आहेत. उतरविणे, मक्केमधील 'हिरा' गुहेत उतरणे, हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अल्लाहची वही (संदेश) उतरवून त्यांना पैगंबर पदाची वस्त्रे देणे, त्यांच्यामध्ये वही ग्रहण करण्याची व तिला योग्य प्रकारे वाचण्याची पात्रता निर्माण व्हावी म्हणून त्यांना आपल्या हृदयाशी धरून कवटाळणे, वगैरे याशिवाय कल्याण व समृद्धी उतरविण्यासंबंधी फिरिश्त्यांना जे आदेश दिले गेले होते त्यापैकी प्रत्येक आज्ञेचे त्यांनी योग्यप्रकारे पालन केले. आणि म्हणून पवित्र कुरआनचे उतरविणे आणि पैगंबर पदाने भूषविणे या ज्या गोष्टी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत घडल्या, त्या संशयातीत आहेत.

स्पष्ट असो की, वहीच्या सुरवातीच्या प्रसंगी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना फक्त जिब्राईल (अलैहिस्सलाम) दिसले होते.परंतु या आयतीच्या स्पष्टीकरणानुसार या रात्री इतर फिरिश्तेही उतरले होते. हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची फिरिश्त्यांना पाहाण्याची ही पहिलीच वेळ होती. हे दृश्य सहन करणे ही साधी गोष्ट नव्हती. आणि म्हणून आपल्या समोर फक्त हजरत जिब्राईल (अलैहिस्सलाम) यांना प्रकट केले गेले.

७. कुरआन उतरविण्याच्या समयी आकाशावर कडक पहारे बसविण्यात आले होते. शैतानांनी कुरआन मध्ये व्यत्यय आणू नये आणि त्यांना आकाशात काही ऐकण्याची संधी मिळू नये म्हणून असे पहारे बसविले होते. कारण वेळेपूर्वी पैगंबरांच्या नियुक्तीची खबर झाली किवा जे आदेश पैगंबरांच्याकडे पाठविले जात होते, त्याचा त्यांना सुगावा लागला तर शैतान तांत्रिकांच्या कानी उलटसुलट गोष्टी घालून जमिनीवर उपद्रव माजवतील. आणि हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या असाधारण व्यवस्थेचा परिणाम होता की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची नियुक्ती

होण्यापूर्वी कोणालाही याचा काही मागमूस  लागला नाही की हजरत मुहम्मद हे अल्लाहचे नबी (पैगंबर) बनविले जात आहेत. आणि कुरआनच्या उतरण्यापूर्वी कोणालाही ही खबर नव्हती की अमूक अमूक रात्री अमूक अमूक संदेश उतरणार आहे.

अशा प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने या रात्री कुरआन उतरविले तिला सर्वप्रकारच्या संकटापासून सुरक्षित राखण्याची व्यवस्था केली होती आणि त्या रात्रीला पूर्णपणे, शांततेची रात्र बनविले होते. आणि ही परिस्थिती थोडया वेळेसाठी नव्हे तर पहाटेच्या उदयापर्यंत कायम होती कारण ही मंगल रात्र पवित्र कुरआनच्या उदघाटनाची रात्र होती आणि आता जी रात्र कुरआनच्या सुरवातीची रात्र म्हणून 'शबे कद्र' म्हणून साजरी केली जाते. त्या रात्रीपण पहाटेच्या उदयापर्यंत शांततेचा व समृद्धीचा वर्षाव होत असतो. आणि म्हणून ही संपूर्ण रात्र इबादतीस पात्र आहे.

''लैलतुल कद्र''(शबे कद्र) ही संपूर्णपणे शांततेची रात्र होती आणि या रात्री जो ग्रंथ उतरला तोही पूर्णपणे शांततेचाच संदेश आहे. हा मानव जातीस शांततेचा संदेश आहे. याचा स्वीकार करणारे लोक या जगातही शांततेचे जीवन जगतील. आणि या नंतरच्या जीवनात त्यांना चिरस्थायी शांतता लाभेल.

पहिली वही (ईश-संदेश) जी शबे कद्र मध्ये अवतिर्ण झाली.

بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

اقْرَأْ بِاسْمِ رَبِّكَ الَّذِي خَلَقَ

خَلَقَ الْإِنْسَانَ مِنْ عَلَقٍ

اقْرَأْ وَرَبُّكَ الْأَكْرَمُ الَّذِي عَلَّمَ بِالْقَلَمِ

عَلَّمَ الْإِنْسَانَ مَا لَمْ يَعْلَمْ

العلق ١-٥

# ९८. सूरह अल-बय्यिनह

**नावः** पहिल्या आयतीत ''अल बय्यिनह'' (उघड पुरावा) चा उल्लेख आला आहे. यावरून ह्या सूरतीचे नाव अलबय्यिनह योजीले गेले आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे व मजकूरा वरून अंदाज येतो की हि इस्लामी आमंत्रणाच्या त्या काळात अवतीर्ण झाली जेव्हा ग्रंथधारक व अनेकश्वरवादी यांच्यावर ही गोष्ट स्पष्ट झाली होती की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे अल्लाहचे प्रेषीत आहेत. तरीसुद्धा लोकांनी नकाराचा मार्ग पत्करला होता.

**मध्यवर्ती कल्पनाः** या सूरतीत हे स्पष्ट केले गेले आहे की हजरत मुहम्मद यांना प्रेषीत म्हणून पाठविण्याची व त्यांच्याकडे ग्रंथ अवतीर्ण करणेची काय गरज होती.

**ग्रंथ मांडणीः** आयत १ ते ३ मध्ये वर्णन केले गेले आहे की लोकांना कुफ्र (इश्वरास नकार देणे) च्या अवस्थेतून बाहेर काढण्या करीता अवश्य होते की ग्रंथाबरोबर एक प्रेषित पठविण्यात यावा म्हणजे तो अल्लाहच्या धर्माला योग्य स्वरूपात सादर करील.

आयत ४ व ५ मध्ये स्पष्ट केले आहे की ग्रंथ धारकांकडे अल्लाहकडून पूर्वीच तेजस्वी ग्रंथ पाठविण्यात आले होते. परंतु असे असतांनाही ते वादाच्या आहारी पडले व धर्माच्या खऱ्या शिकवणीला विसरून गेले. आयत ६ ते ८ मध्ये वर्णन केले आहे की प्रेषितास नकार देणारे कसे यातनामय शेवटास तोंड देतील व या उलट प्रेषीतावर श्रद्धा (इमान) ठेवणारे अल्लाहची भिती बाळगून जीवन जगणारे कशातऱ्हेने यशस्वी व प्रफुल्लित होतील.

**पैगंबरांचे फर्मानः** हदीस मध्ये उल्लेख आहे की पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत उबै बिन कअब यांना फर्माविले की, अल्लाहने हुकूम दिला आहे की मी तुम्हास सूरह لَمْ يَكُنِ الَّذِينَ كَفَرُوا 'लमयकु निल लजीना कफरू' ऐकवावे हजरत उबै बिन कअबनी विचारले. 'काय अल्लाहने माजे नाव घेऊन हा हुकूम दिला आहे? हजरत मुहम्मद पैगंबर यानी फर्माविले,'होय' हे ऐकून हजरत उबै बिन कअब यांचे डोळे पाणावले. (बुखारी-किताबुत तफसीर)

हजरत उबै बिन कआब ग्रंथ धारकापैकी होते. ज्यांनी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान (श्रद्धा) आणले होते. आणि या सूरतीत अशा ईमान धारकाकरीता खुशखबर आहे म्हणून अल्लाहने त्यांची कदर करून त्यांना ही सूरह ऐकवण्याचा आदेश आपल्या पैगंबराना दिला. व अल्लाहने केलेली कदर पाहून हजरत कअबचे डोळे पाणावले हे ईमानचे एक वैशिष्ठय आहे.

# ९८. सूरह अल-बय्यिनह

سُورَةُ الْبَيِّنَةِ

आयती -८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने.

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. ग्रंथधारक [१] व अनेकेश्वरवादी [२] यामधील ज्या लोकांनी कुफ्र [३] (नकार दिला) केले ते परावृत्त होणारे नव्हते जोपर्यंत त्यांच्याकडे स्पष्ट प्रमाण पोहचले नसते.[४]

لَمْ يَكُنِ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ أَهْلِ الْكِتَابِ وَالْمُشْرِكِينَ مُنفَكِّينَ حَتَّىٰ تَأْتِيَهُمُ الْبَيِّنَةُ ﴿١﴾

२. म्हणजे अल्लाहकडून एक रसूल (प्रेषित) जो पवित्र ग्रंथाची पाने (सहीफे) वाचून दाखवील.[५]

رَسُولٌ مِّنَ اللَّهِ يَتْلُو صُحُفًا مُّطَهَّرَةً ﴿٢﴾

३. ज्यामध्ये अगदी सरळ व स्पष्ट आदेश लिहलेले असतील.[६]

فِيهَا كُتُبٌ قَيِّمَةٌ ﴿٣﴾

४. पूर्वी ज्या लोकांना ग्रंथ दिला गेला होता, त्यांच्यात स्पष्ट आदेश आल्यानंतरच फाटा फूट पडली. [७]

وَمَا تَفَرَّقَ الَّذِينَ أُوتُوا الْكِتَابَ إِلَّا مِن بَعْدِ مَا جَاءَتْهُمُ الْبَيِّنَةُ ﴿٤﴾

५. खरे पहाता त्यांना हिच आज्ञा दीली गेली होती की त्यांनी फक्त अल्लाहचीच इबादत (आराधना) करावी,[८] दीन (आज्ञापालन) ला त्याच्या करीताच शुद्ध ठेवून [९] व सरळ मार्ग अवलंबून [१०] आणि नमाजचे पालन करावे व जकात द्यावी [११] हाच खरा धर्म आहे.[१२]

وَمَا أُمِرُوا إِلَّا لِيَعْبُدُوا اللَّهَ مُخْلِصِينَ لَهُ الدِّينَ حُنَفَاءَ وَيُقِيمُوا الصَّلَاةَ وَيُؤْتُوا الزَّكَاةَ ۚ وَذَٰلِكَ دِينُ الْقَيِّمَةِ ﴿٥﴾

६. ग्रंथधारक व अनेकेश्वरवादी लोकांपैकी ज्यांनी कुफ्र (नकार) केला [१३] ते नरकाच्या (जहन्नमच्या) अग्नीत पडतीत आणि त्यांत सदैव राहतील. हे लोक सर्वात निकृष्ठतम निर्मिती आहेत.[१४]

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ أَهْلِ الْكِتَابِ وَالْمُشْرِكِينَ فِي نَارِ جَهَنَّمَ خَالِدِينَ فِيهَا ۚ أُولَٰئِكَ هُمْ شَرُّ الْبَرِيَّةِ ﴿٦﴾

१. ग्रंथधारक या शब्दास अभिप्रेत यहूदी व ख्रिश्चन आहेत ज्यांच्याकडे अल्लाहचा ग्रंथ ---------फेरबदल्या स्वरूपात का असेना पण जवळे होता ----------व जेथ पर्यंत इस्लामचे मूल तत्व तौहीद (एकेश्वरवादा) चा संबंध आहे आजही तौरात जबूर व बायबलमध्ये याचा ठळकपणे उल्लेख आहे. हि वेगळी गोष्ट की फेरबदल केल्याने त्यांच्यात अनेकेश्वरवादाची (शिर्कची) मिसळ झाली आहे. परंतु जरी ग्रंथाचा चूकीचा अर्थ घेतल्यामुळे त्यांच्यात शिर्क (अनेकेश्वरवाद) निर्माण झाला होता तरीही यहूदी व ख्रिश्चन मूलत: एकेश्वरवादावर विश्वास ठेवित असत. व ते लोक आखिरत व प्रेषित्वाला मानीत असत, म्हणून कुरआनने या गटाकरीता 'अहले किताब' (ग्रंथ धारक) हि संज्ञा वापरली आहे व त्यांच्याशी व्यवहार करणे बद्दल काही आदेशही दिले आहेत. उदा. त्यांच्या स्त्रीयांशी विवाह करता येतो. त्यांनी शरियतीचे अटीनुसार जर जनावर कापले असेल तर त्याचे मांस खाण्याची परवानगी दिली आहे.

राहिला इतर धर्मीयांचा प्रश्न तर त्या मूलभूत श्रद्धेच्या विषयी त्यांच्या कल्पना विभिन्न होत्या. आणि त्यांच्याजवळ तौरात व इंजील सारखा कोणताही ईशग्रंथ नव्हता. म्हणून कुरआनने यहूदी व ख्रिश्चन या दोन गटा व्यतिरीक्त इतर कोणत्याही धर्मियांना ग्रंथधारक (अहले किताब) म्हणून संबोधिले नाही. इथपर्यंत की बनी इस्माईल मक्केच्या कुरेशानाही - जे इब्राहिम अलैहिस्सलाम यांच्या वशांचे होते. व ज्यांच्याकडे हजरत इब्राहीम अलैहिस्सलाम यांच्या धर्माचे काही अंश होते. उदाहरणार्थ काबाचा तवाफ करणे हज्ज करणे वगैरे गोष्टी होत्या ग्रंथ धारकामध्ये सामिल केले नाही. व उघड मुर्तिपूजेत गुंतलेले असल्या कारणाने त्यांचेकरीता अनेकेश्वरवादी ही संज्ञा वापरण्यात आली. याच तऱ्हेने मजूसी (अग्नी पूजक-पारसी) लोक जरी त्यांच्याकडे धार्मिक ग्रंथ होता तरी त्यांना ग्रंथधारक ठरविणेत आले नाही. यावरून स्पष्ट होते की ग्रंथधारक हि संज्ञा यहूदी व ख्रिश्चन यांचेकरीता विशेष आहे. आणि हा आदेश इतर धर्मियाकरीता लागू होत नाही. मग त्यांच्याकडे एखादे धार्मीक ग्रंथ का असेना.

२. मूशरिकीन म्हणजे अल्लाहबरोबर इतरांना सामील करणारे येथे हा शब्द अरबमधील मुर्तीपूजा करणाया करीता संज्ञा म्हणून वापरण्यात आला आहे.

३. येथे कुफ्र (नकार देणे) शी अभिप्रेत तो नकार आहे ज्याबरोबर हट्टीपणाही असतो. हा अर्थ ''सोडून देणारे नव्हते'' या मागच्या शब्दावरून स्पष्ट आहे. असे हट्टी नकार देणारे (काफिर) ग्रंथधारकांतही होते व अनेकेश्वरवादी यामध्येही होते. अनेकेश्वरवाद्यांचा नकार स्पष्ट आहे की त्यांनी एकेश्वरवादास सोडून मुर्तीपूजा स्विकारली होती. ते मरणोत्तर जीवनास तसेच प्रेषित्वाला मानीत नव्हते. राहिले ग्रंथ धारक तर त्यांच्या नकाराचे विभिन्न स्वरूप होते. उदाहरणार्थ कोणी हजरत उजेर यांना अल्लाहचा पुत्र ठरवीत. कोणी हजरत ईसा यांना तर प्रेषितच मानीत नव्हते व कोणाच्या मते हजरत ईसा पाप धुणारे म्हणजे ख्रिश्चनाकरीता. पाप माफ करण्याचे साधन बनले होते.

४. उघड पुरावा ने अभिप्रेत एक नव्या पैगंबराचे आगमन आहे ज्याप्रमाणे नंतरच्या आयतीत उल्लेख आहे. अर्थ हा की ग्रंथधारक व अनेकेश्वरवादीपैकी जे लोक आपल्या नकारात कठोर होते त्यांच्या नकाराचा कणा मोडणे अशाच प्रकारे शक्य होते की एका नव्या प्रेषिताचे आगमन व्हावे जणू एका नव्या प्रेषिताचे आगमन त्या परिस्थितीची निकड होती. व ती निकड हजरत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाठविण्यामुले पूर्ण झाली यानंतरही जर कोणी हट्टीपणा करतो तर त्याच्या गुन्हयाची तिव्रता अधिकाधीक वाढत जाते.

५. सहीफे म्हणजे लिहलेली पाने. पवित्र सहीफेला अभिप्रेत अल्लाहच्या ग्रंथाची पाने आहेत जी अल्लाहच्या संभाषणांनी भरलेली असावीत व कसल्याही प्रकारचा फेरफार खोटया श्रद्धा व नैतिक दुर्गूणाच्या भेसलीपासून शुद्ध असली पाहीजेत.

आज जे लोक धर्मापासून वैतागले आहेत ते जेव्हा बायबल व इतर धार्मिक ग्रंथाचा अभ्यास करतील तेव्हा त्याच्यात आढळणारी मार्गभ्रष्टता, अल्लाह बद्दल नीच पातळीच्या कल्पना, प्रेषितांशी संबोधित करणेत आलेल्या अनैतिक गोष्टी, निराधार भाकडकथा, निरर्थक गोष्टी, व जखडून टाकणारी रितिरिवाज पाहून त्यांच्या धर्मवैतागात निश्चितच वाढहोईल या धर्मवैतागाता जर एखादा धर्मग्रंथ नष्ट करू शकत असेल तर तो कुरआनच होय. जो फक्त या सर्व दुर्गूणापासून शुद्धच आहे असे नव्हे तर त्याचबरोबर उत्तम व उच्च प्रकारच्या व अतिशय हिकमतीच्या शिक्षणावर आधारीत आहे.

६. आपल्यातर्फे गोष्टी घडवून अल्लाहकडे समर्पण करणे व पवित्र ग्रंथांत त्या समाविष्ठ करणे ही धर्माची पिळवणूक करणाऱ्यांची नेहमीचीच पद्धत आहे. व त्याची उदाहरणे बायबल व इतर दुसऱ्या ग्रंथात पहावयास मिळतात. या पवित्र ग्रंथांची ही दुर्दशा पाहून एका अशा ग्रंथाची गरज भासत होती ज्याच्यात अल्लाहच्या आदेशाचे खरे स्वरूप असले पाहिजे आणि अशा दृढ व भक्कम गोष्टी असाव्यात ज्या मानवी जीवनाची खरी मजल निश्चित करतील व तिला योग्य मार्गावर आणू शकतील. कुरआनच एक असा ग्रंथ आहे जो या कसोटीवर पूर्ण उतरतो व मानवाची हिच गरज भागविण्यासाठी तो अवतिर्ण झालेला आहे.

७. म्हणजे ग्रंथ धारकाचे अनेक जमातीत विभाग पडण्याचे कारण हे नाही की त्यांच्याजवळ अल्लाहची शिकवण स्पष्ट

स्वरूपात आली नव्हती उलट त्याचे कारण अल्लाहच्या शिकवणीबद्दल निष्काळाजीपणा, इच्छेच्या मागे लागणे आणि एक वेगळी मनोवृती (स्वार्थपरायणता) आहे. नाही तर त्यांना जो ग्रंथ देण्यात आला होता त्यामध्ये अल्लाहची स्पष्ट शिकवण उपलब्ध होती. अशा स्थितीत त्यांचे मार्गभ्रष्ट व्हायाचे व वेगवेगळ्या जमातीत विभागले जावयाचे काहीच कारण नव्हते.

स्पष्ट असावे की ग्रंथधारक दोन मोठया जमातीत विभागले गेले-याहुदी व ख्रिश्चन आणि या दोघांनी वेगवेगळया धर्माचे स्वरूप स्विकारले व त्यांच्यात पुष्कळ पोटजातीही निर्माण झाल्या. उदा. कॅथॉलीक प्रोटेस्टंट इत्यादी.

८. म्हणजे त्यांना एका ईश्वराची भक्ती व त्याची आराधना करणेचा व त्याचे दास बनून राहण्याचा हुकूम देण्यात आला होता. परंतु त्यांनी या पहिल्याच आज्ञेचा भंग केला.यहुदीना मुर्तीपुजेत काहीच संकोच वाटला नाही. व त्यानी हजरत उजेर याना अल्लाहचा पुत्र बनविले व ख्रिश्चनांनी एका ऐवजी तीन ईश्वर बनविले. आणखी असे की दोन्ही पंथांनी आपल्या धर्मनेत्त्यांना व पंडितांना ईशबनविले कारण त्यांच्या आदेशानुसार कोणतीही वस्तू हराम किंवा हलाल ठरविली जात असे.

९. येथे 'दीन' या अरबी शब्दाचा अर्थ असे आज्ञापालन आहे. ज्याबरोबर व्याकूलता व एकाग्रता असते. व ती शुद्ध मनाने व विनाअट असावी. निर्माता व स्वामी असणेच्या नात्याने आज्ञापालनास पात्र फक्त तो अल्लाहच आहे. म्हणून ही आज्ञापालन फक्त अल्लाह साठीच असावी. हा आदेश पूर्वीच्या ग्रंथातही देण्यात आला होता व कुरआनमध्येही देण्यात आला आहे.

एकच अल्लाहची आराधना करणेचा जो आदेश देण्यात आला आहे त्या बरोबर 'दीन' म्हणजे आज्ञापालन त्याचीच करण्याचा आदेश. इस्लाम मधील आराधनेच्या कल्पनेला स्पष्ट करते. व ते म्हणजे आराधानेबरोबर आज्ञापालनाची सुसंगीत दुसऱ्याच शब्दात हे की इस्लाममध्ये एक अल्लाहची भक्ती अशा प्रकारे आवश्यक आहे की माणसाने विना अट त्याची आज्ञापालन मनापासून केली पाहिजे. आणि ही कायमची केवळ अल्लाहसाठीच असावी. या आज्ञापालनात अल्लाहची शरीयत व त्याचा संपूर्ण धर्म समाविष्ठ आहे.

१०. सरळ मार्गाचा स्वीकार करून अल्लाहची आराधना करण्याचा अर्थ असा की मन कोणत्याही प्रकारे इतरांच्या भक्तीकडे वळलेले नसावे. किंवा त्याच्या भक्तीत एखाद्या नविन पद्धतीची भर नसावी. उलट एकाग्रतेने अल्लाहचीच आराधना अशा पद्धतीने करावी जी पद्धत अल्लाहने आराधनेकरीता निश्चीत केली आहे. इब्राहीम अलैहिस्सलाम यांची पद्धत हिच होती. म्हणून हनफियत (सरळ मार्गाचा स्वीकार करणे) इब्राहीम अलैहिस्सलाम यांच्या पद्धतीचे दुसरे नाव आहे.

११. नमाज कायम करणे व जकात देणेचा आदेश ग्रंथधारकांना देण्यात आला होता. परंतु त्यांनी नमाजला वाया घालविले. इथपर्यंत की तौरातमधून हा आदेशच नष्ट करून टाकला आहे. मात्र बायबलमध्ये जकातचे आदेश कोणते ना कोणते स्वरूपात आजही आढळतात.

१२. म्हणजे अल्लाहच्या धर्माचे ही मूलभूत शिकवण आहे. हाच धर्म ग्रंथधारकांना देण्यात आला होता. परंतु ते त्या मूलभूत शिकवणाला विसरून गेले. आणि पोकळ धर्माचरणाच्या मागे लागले. इतर धर्माची याच कसोटीवर पारख केली जाऊ शकते.

१३. येथे कुफ्रला अभिप्रेत हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहचा प्रेषित (पैगंबर) मानणेस व अल्लाहचा अवतिर्ण झालेला ग्रंथ मानणेस नकार देणे.

१४. जो निर्मित प्राणी आपल्या निर्मात्याविरूद्ध विद्रोह करतो व नकाराचे (कुफ्रचे) धोरण स्विकारतो. त्याच्या निच असणेबद्दल काही संशय रहात नाही. यावरून स्पष्ट झाले की कुफ्रच्या परिणामी मानव आपले मानव वैशिष्ठय गमावून बसतो. आणि प्रगती ऐवजी अद्योगतीचा अंत गाठतो.

७. नि:संशय ज्या लोकांनी इमान आणले [१५] व चांगले आचरण केले ते सर्वात उत्तम निर्मिती आहेत. [१६]

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ أُولَٰئِكَ هُمْ خَيْرُ الْبَرِيَّةِ ۞ ٧

८. त्यांचा मोबदला त्यांच्या पालनकर्त्याजवळ निरंतर बागा आहेत ज्यांच्या खालून जलप्रवाह वहात असतील. ते तेथे सदैव राहतील. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न व ते अल्लाहशी प्रसन्न. [१७] हा मोबदला आहे त्याच्याकरीता जो आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगतो. [१८]

جَزَاؤُهُمْ عِندَ رَبِّهِمْ جَنَّاتُ عَدْنٍ تَجْرِي مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ
فِيهَا أَبَدًا ۖ رَّضِيَ اللَّهُ عَنْهُمْ وَرَضُوا عَنْهُ ۚ ذَٰلِكَ لِمَنْ خَشِيَ رَبَّهُ ۞ ٨

१५. इमान धारण करणेच्या अर्थात एकेश्वरवादा (तौहीद) शिवाय हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना अल्लाहचा प्रेषित मानणे व कुरआनला अल्लाहकडून अवतिर्ण झालेला ग्रंथ मानणेही सामील आहे.

१६. स्पष्ट झाले की ईमान (श्रद्धा) व शुद्ध आचरणाच्या परिणाम स्वरूप मानवतेचे वैशिष्ठय उमलते व तो खऱ्या प्रगतीचे उत्तम टप्पे पार करतो.

जो निर्मित प्राणी कोणत्याही प्रकारच्या सैतानी प्रोत्साहनातून व प्रत्येक प्रकारच्या कसोटीतून पार पडल्यानंतर अल्लाहच्या आज्ञापालनावर सदैव कायम राहील व त्याच्यावर निष्ठा बाळगील त्याचे उत्तम निर्मित प्राणी होणेत मुलीच शंका नाही.

१७. अल्लाहची मर्जी सर्वात मोठे इनाम आहे ज्याने श्रद्धावान (इमान धारक) विभुषित केले जातील. जन्नत (स्वर्ग) अल्लाहच्या कृपेची प्रतिक ठरेल. व तेथे ह्या देणग्या बरोबर आंतरीक देणग्या देखील इमानधारकांना मिळतील.

१८. आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगणे धर्माचा खरा आत्मा आहे. ज्या लोकांत हा आत्मा असतो त्यांच्यात सच्चे धर्मआचरण गुण अढळतात. या कारणास्तव ते इनामास पात्र ठरतात. हयाच गोष्टीचे वर्णन या आयतीत झाले आहे.

## पवित्र क़ुर्आन

صُحُفًا مُّطَهَّرَةً





▲ صورة لمصحف عثمان بن عفان رضي الله عنه

**खलीफ़ा उस्मान यानी लिहलेल्या क़ुर्आनाची प्रत**

# ९९. अज जिल जाल

**नावः** पहिल्या आयतीत कियामत च्या दिवशी जमिनीला हदरविले जाईल याचा उल्लेख आहे. आणि याविषयी 'जिलजाल' हा शब्द आला आहे. यावरूनच या सूरहचे नाव अज-जिल जाल योजीले गेले आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे व तिच्या विषयावरून अंदाज येतो की इस्लामी आमंत्रणाच्या प्रारंभिक काळात अवतिर्ण झाली असेल.

**मध्यवर्ती कल्पनाः** कियामतच्या दिवशी मनुष्य परत उठविला जाणार आहे कारण त्याच्या कर्माचा संपूर्ण हिशोब त्या दिवशी त्याच्या समोर ठेवण्यात येणार आहे.

**ग्रंथ-मांडणीः** आयत १ ते ३ मध्ये जमिनीच्या त्या अवस्थेचा उल्लेख आहे जी कियामतच्या दिवशी जमिनीची होईल व त्या अवस्थेला पाहून मानव आश्चर्यचकीत होईल.

आयत ४ व ५ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की त्या दिवशी जमीनीस वाचा मिळेल व ती आपली हकीकत ऐकवील अशाकरीता की मानव तिच्या पाठीवर जे काही करीत राहीला होता त्याची ऐतिहासीक साक्ष समोर यावी.

आयत ६ ते ८ मध्ये फर्माविले आहे की त्या दिवशी लोक विभिन्न जमातीच्या स्वरूपात कर्मांचा हिशेब देणेकरीता बाहेर पडतील व लहानातले लहान पाप किंवा पुण्य असे नसेल जे त्याच्यासमोर येणार नाही.

# ९९. सूरह अज़-ज़िल ज़ाल

سورة الزلزلة

आयती -८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. जेव्हा पृथ्वी आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी हदरविली जाईल.[१]

إذا زلزلت الأرض زلزالها ①

२. आणि पृथ्वी आपले ओझे बाहेर फेकून देईल.[२]

وأخرجت الأرض أثقالها ②

३. व मानव म्हणेल कि हिला काय झाले आहे?[३]

وقال الإنسان ما لها ③

४. त्या दिवशी ती आपल्या वार्ता ऐकविल.[४]

يومئذ تحدث أخبارها ④

५. कारण तुमच्या पालनकर्त्याने तिला आज्ञा दिली असेल.[५]

بأن ربك أوحى لها ⑤

६. त्या दिवशी लोक विभिन्न जमातीच्या स्वरूपात बाहेर पडतील. यास्तव की त्यांची कर्मे त्यांना दाखविली जावीत.[६]

يومئذ يصدر الناس أشتاتا ليروا أعمالهم ⑥

७. तर ज्याने तिळमात्रही सुकर्म केले असेल तो त्याला पाहील.

فمن يعمل مثقال ذرة خيرا يره ⑦

८. व ज्याने तिळमात्रही दुष्कर्म केले असेल तो त्यालाही पाहील.[७]

ومن يعمل مثقال ذرة شرا يره ⑧

१. हा कियामतीच्या दुसऱ्या टप्प्याचा उल्लेख आहे. जेव्हा सर्व मृत झालेली माणसे जीवंत होऊन बाहेर पडतील पुढच्या मजकूरातून असेच स्पष्ट होते.

त्या दिवशी संपूर्ण पृथ्वी अशा सामर्थ्यानिशी हदरविली जाईल की त्याची हदरविली जाणेची नीट कल्पनासुद्धा करणे शक्य नाही. पृथ्वीवर कितीतरी भूकंप झाले असतील परंतु कियामतीच्या दिवशी होणारा भूकंप इतका तीव्र असेल की मोठयातला मोठा भूकंपही त्याच्यासमोर काहीच नसेल.

२. अभिप्रेत मृत आहेत. ज्यांना कियामतच्या दिवशी जमीन आपल्या पोटातून बाहेर ओकून टाकील. जणू मृत जमिनीकरीता ओझी आहेत ज्यांच्या पासून ती मोकळी होऊ इच्छिते. यावरून हे स्पष्ट करण्याचा हेतू आहे की मेल्यानंतर मानवाचे शरीर जे मातीत मिसळते ते नष्ट होत नाही. उलट ही अमानत म्हणून जमीनीजवळ असते. जरी रासायनिक प्रक्रीयेच्या दृष्टीने त्या शरीराने कोणतेही स्वरूप घेतलेले असो.आणि कियामतच्या दिवशी ही अमानत त्याच्या मुळ स्वरूपात जमीन हजर करील. म्हणजेच मानवी शरीराचे अवयव रासायनिक प्रक्रियेतून पार पडल्यानंतर आपल्या मूळ स्वरूपात परत जाहीर होतील.

ओझी बाहेर टाकणेच्या अर्थात त्या साक्षीही आहेत ज्या जमिनीत गाडल्या गेल्या आहेत. (अधिक स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह इन्शिकाक टिप नं.४)

३. म्हणजे मानव कबरीतून बाहेर पडल्यानंतर हतबद्ध अवस्थेत ओरडीत असेल की,जमिनीला काय झाले आहे? कीती झटकयावर झटके घेत आहे व एका जबरदस्त आघाताशी सामना करीत आहे. जमिनीची ही दुर्दशा पाहून मानव पहिल्यांदा हैरान व चिंताग्रस्त होईल यानंतर त्याच्यावर हि गोष्ट जाहीर होईल की हा कियामतीचा दिवस आहे (अंतिम निवाडयाचा दिवस) मात्र जे लोक आपल्या ईमानाशी प्रामाणिक राहीले त्यांना कियामतीची काहीच भिती वाटणार नाही. व ते घाबरूनही जाणार नाहीत.

४. म्हणजे जमीन आपल्यावर घडलेली सर्व हकीगत ऐकवील. ती हकीगत ही की कशा तऱ्हेने मानवाने, ज्यास प्रतिनीधी (खलीफा) म्हणून पाठविले होते, जमिनीवर काम केले. कोण जमिनीच्या निर्मात्यासमोर नतमस्तक झाला आणि कोणी भूमिपूजा केली कोणी जमीनीवर मस्जीद बांधली आणि कोणी मंदीर बनविले कोणी जनकल्याणाच्या संस्था बांधल्या आणि कोणी सिनेमा थियेटर बांधले, कोणी धार्मिक सभा घेतल्या आणि कोणी नाचगाण्याच्या मैफिली सजविल्या, कोण वस्त्या जमीन दोस्त करण्याकरीता बाँबचा वर्षाव करीत होता आणि कोण सुधारणेचे कार्य करीत राहीला, कोण दंगली व बिघाड निर्माण करीत होते आणि कोणत्या लोकांनी युद्धे केली. व ती कोणत्या उद्देशाने केव्हा आणि कोणत्या मैदानावर लढली गेली. सारांश हा की जमीन घडलेल्या सर्व घटना अशी ऐकवेल जणू प्रत्यक्षात प्रत्येक घटना टेप करण्यात आली होती असे वाटेल व हे केलेले टेपरेकार्डींग कियामतच्या दिवशी एकवले जाईल याकरीता की तो जे काही जमिनीवर करीत राहीला त्याचा पुरावा असावा. आणि न्यायाची मागणीही पूर्ण व्हावी हदीस वचनात उल्लेख आहे की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या आयतीचे पठण केले व विचारले माहीत आहे काय जमीन ऐकवील? लोकांनी सांगितले, ‘अल्लाह व त्याच्या प्रेषितालाच चांगले माहीत आहे’ पैगंबरांनी फर्माविले जमीन प्रत्येक दास व दासीची साक्ष देईल की तिने काय काय कार्य कोणकोणत्या दिवशी तिच्या पाठीवर केले होते. (तिर्मिजी अबवाब तफसिरूल कुरआन)

हा प्रश्न मनात येईल की जमीन तर निर्जिव व जड पदार्थापैकी आहे. मग ती मानवी कर्माची हकीगत कशी ऐकवील. ह्याचे उत्तर या आयतीत दिले गेले आहे, की ती अल्लाहच्या आज्ञेनुसार बोलू लागेल. कुरआनात इतर ठिकाणीही हा खुलासा आहे की कियामतच्या दिवशी पापी लोकांची त्वचा देखील साक्ष देईल व जेव्हा ते आश्चर्याने विचारतील की तुम्ही आमच्या विरूद्ध साक्ष का दिली? तेव्हा त्वाचा उत्तर देईल की, ज्या अल्लाहने प्रत्येक वस्तुला वाचा प्रदान केली त्यानेच आम्हालाही संभाषणाची शक्ती दिली. (हा मीम सजदा -२१)

दुसऱ्या शब्दात आमच्या वाचा माहितीनुसार ज्या वस्तू मुक्या आहेत त्यांना वाचा मिळाल्याचे प्रदर्शन आम्ही कियामतच्या दिवशी पाहू. जे सामर्थ्य मातीतील मानव परत तयार करून उभे करू शकते त्याच्याकरीता जमीनीला (मातीला) वाचा देणे काय अवघड आहे. जेव्हा या जगातच आम्ही आमचा प्रतिध्वनी घुमटात ऐकू शकतो. तर कियामतच्या दिवशी जेव्हा एक नवीन व्यवस्था प्रस्थापित केली गेली असेल तेव्हा जगात करीत राहिलेल्या कर्माचा प्रतिध्वनी ऐकू येणे का अशक्य असेल. आणि टेलीव्हिजन, टेपरेकॉर्ड व फोटोग्राफी या सारख्या शोधाच्या युगात अशा गोष्टींना पुराव्याची गरज राहीली नाही. मानवाच्या सर्व हरकती व क्रिया यांचे प्रतिबिंब कणाकणावर उमटले जात आहे.

६. म्हणजे कियामतच्या दिवशी लोक जमिनीच्या भिन्न भिन्न भागातून निरनिराळया अवस्थेत टोळयांच्या स्वरूपात बाहेर पडतील यास्तव की हश्रच्या मैदानावर जमा व्हावे व तेथे त्यांना त्यांची कर्मे दाखविली जावीत. कियामतपर्यंत जितके मानव जन्मले व मेले असतील. जमिनीत कोणी दफन केले गेले असोत किंवा कोणी समुद्रात बुडालेले असोत, कोणाचे देह

जाळण्यात आलेले असोत किंवा कोणी वातावरणात विलीन झालेले असोत, कियामतच्या दिवशी हे सर्व लोक जमिनीतून बाहेर पडतील यास्तव की ते जे काी करीत राहीले त्याचा परिणाम त्यांच्या समोर यावा, त्यांना त्यांची कार्ये दाखविली जावीत. यावरून हे स्पष्ट होते की मानवाच्या समोर त्याने प्रत्यक्ष जगलेले जीवन याची दृष्ये त्याला दाखविली जातील.

७. म्हणजे कियामतच्या दिवशी प्रत्येक माणसाला त्याच्या उक्ती व कृतीच्या जीवनाची दृष्ये दाखविली जातील तेव्हा तो आपल्या लहानातल्या लहान सत्कर्म व दुष्कर्माला पाहील. राहीला मोबदला व शिक्षेचा प्रश्न तर तो न्यायपूर्ण त्या कायद्यानुसार असेल ज्याचा खुलासा कुरआनने इतर ठिकाणी केला आहे. उदा ज्यांच्या तराजुचे पारडे जड असेल ते लोक यशस्वी होतील किंवा काफिरांच्या कर्मांना काहीच वजन नसेल किंवा असे की अनेकेश्वरवाद हा गुन्हा (हे पाप) माफ केला जाणार नाही आणि काफिरांकरीता अनंत काळासाठी जहन्नमची शिक्षा असेल.

# १००. सूरह अल -आदियात

**नावः** पहिल्या आयतीत अल-आदियात (धावणारे घोडे) याची शपथ घेणेत आली आहे. यावरून या सुरतीचे नाव 'अल–आदियात' असे आहे.

**अवतरण काळः** हि सूरह मक्की आहे व तिच्या मजकूरावरून अंदाच येतो की इस्लामी आमंत्रणाच्या पहिल्या टप्प्यात अवतिर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पनाः** अल्लाहजवळ जवाब देणयापासून कुचराई दाखविणेच्या परिणामी निर्माण होणारे बेजबाबदारीचे वर्तन आहे. जे मानवाला अल्लाहचा कृतघ्न बनविते व त्याने प्रदान केलेल्या देणग्याचा व शक्तीचा गैरवापर करण्यास त्याला प्रवृत्त करते.

**ग्रंथ मांडणीः** आयत १ ते ५ मध्ये लढाऊ घोडयाना साक्षीकरीता घेतले आहे. याकरीता की मानव अल्लाहने प्रदान केलेल्या शक्तीचा कसा दुरुपयोग करतो.

आयत ६ ते ८ मध्ये मानवाची निर्भत्सना केली आहे की तो अल्लाहचा कृतघ्न बनतो व मालमत्तेच्या प्रेमात मग्न होतो.

आयत ९ ते ११ मध्ये–मानवास सावधान केले आहे की त्याला कियामतच्या दिवशी कबरीतून उठून उभे केले जाईल व त्याला अल्लाह समोर हजर व्हावे लागेल त्या दिवशी मानवाच्या सर्व लपलेल्या अंतर्गत गोष्टी उघड होऊन समोर येतील व त्याला जाणीव होईल की कोणतीही गोष्ट तसेच त्याचे ते हेतू आणि ते विचारही ईश्वरापासून लपलेले नाहीत जे जगात निरनिराळी कामे करतांना त्याने आपल्या मनात लपवून ठेवले होते.

# १००. सूरह अल-आदियात्

سُورَةُ العَادِيَاتِ

आयती : ११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहचे नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ [१] आहे धावणाऱ्या घोडयांची [२] जे धापा टाकू लागतात.[३]

وَالْعٰدِيٰتِ ضَبْحًا ﴿١﴾

२. जे टापा मारून ठिणग्या उडवितात, [४]

فَالْمُوْرِيٰتِ قَدْحًا ﴿٢﴾

३. जे भल्या पहाटे हल्ला करतात, [५]

فَالْمُغِيْرٰتِ صُبْحًا ﴿٣﴾

४. आणि हया धावपळीत [६] धूळ उडवितात.

فَاَثَرْنَ بِهٖ نَقْعًا ﴿٤﴾

५. आणि या स्थितीत जमावात घुसतात. [७]

فَوَسَطْنَ بِهٖ جَمْعًا ﴿٥﴾

६. वस्तुस्थिती अशी की मानव आपल्या पालनकर्त्याचा मोठा कृतघ्न आहे.[८]

اِنَّ الْاِنْسَانَ لِرَبِّهٖ لَكَنُوْدٌ ﴿٦﴾

७. आणि तो स्वतः याचा साक्षिदार आहे.[९]

وَاِنَّهٗ عَلٰى ذٰلِكَ لَشَهِيْدٌ ﴿٧﴾

८. आणि तो धनाच्या मोहात फारच सक्त आहे[१०]

وَاِنَّهٗ لِحُبِّ الْخَيْرِ لَشَدِيْدٌ ﴿٨﴾

९. मग काय त्याला त्या वेळेची जाणीव नाही जेव्हा कबरीत जे काही आहे ते सर्व बाहेर काढून घेतले जाईल.[११]

اَفَلَا يَعْلَمُ اِذَا بُعْثِرَ مَا فِى الْقُبُوْرِ ﴿٩﴾

१०. आणि हृदयात जे काही दडलेले आहे, त्याला काढून त्याची पारख केली जाईल.[१२]

وَحُصِّلَ مَا فِى الصُّدُوْرِ ﴿١٠﴾

११. निःसंशय त्या दिवशी त्यांचा पालनकर्ता त्यांना चांगल्या प्रकारे जाणून असेल.[१३]

اِنَّ رَبَّهُمْ بِهِمْ يَوْمَئِذٍ لَّخَبِيْرٌ ﴿١١﴾

१. शपथेच्या स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह तकवीर टिप नं. १४.

२. अभिप्रेत लढाऊ घोडे आहेत जे विद्युत वेगाने धावतात. कुरआनाच्या अवतिर्णकाळी घोड्यांना युद्धा संबंधी फार महत्व असे.

३. घोड्यांचे धापा टाकणे व तशाच स्थितीत आपली धाव कायम ठेवणे. ही गोष्ट स्पष्ट करते की अल्लाहने त्यांच्यात विलक्षण शक्ती निर्माण केली आहे.

४. म्हणजे जेव्हा युद्ध किंवा हल्ला (लुटमार) करणेसाठी घोडयांना पळविले जाते तेव्हा ते अशी चपलाई दाखवितात की त्यांच्या टापांनी ठिणग्या उडू लागत. घोडयांच्या टापांचे खडकाल जमिनीवर वेगाने घर्षण झाल्याने या ठिणग्या उडतात व अंधाऱ्या रात्री त्या दिसू लागतात.

घोडयांचे ठिणग्या उडवित धावणे हया गोष्टीचा पुरावा आहे की अल्लाहने मानवाच्या हाती एक विलक्षण शक्ती दिली आहे.

५. अरब लोकांचा असा दंडक होता की जेव्हा एखाद्या टोळीवर किंवा वस्तीवर हल्ला करावयाचा असे तेव्हा रात्रीच घोड्यावर बसून निघत व घोड्यांना पळवीत भल्या पहाटे हल्ला करीत. रात्री याकरीता हल्ला करीत नसत की काळोख्यात लढणे कठीण जात असे व पहाटे याकरीता हल्ला करीत की त्यांना शत्रूवर अचानक हल्ला करणेची संधी मिळत असे.

६. म्हणजे हे घोडे अशा विद्युतगतीने धावत की धूळीचे एक मोठे बादळ उठत असे व जेव्हा हल्ला करीत असत तेव्हा आपल्या बरोबर धुळीचे एक वादळ घेऊन जात असत.

हे स्पष्ट असावे की अरबस्थानचा प्रदेश वाळवंटी आहे. आणि कुरआन अवतीर्ण होणेच्या काळी पक्के रस्ते देखील नव्हते. तेव्हा घोडयांच्या धावण्यामुले जे धुळीचे लोट उठत ते पाहून लोक लांबूनच अंदाज करीत असतील की हे हल्ला करणेकरीता पुढे येत आहेत.

७. म्हणजे टोळीत घुसून विध्वंस करीत आहेत.

ह्या आयतींत अरबांच्या त्या हल्ल्यांचे चित्र रेखाटले गेले आहे जे लुटमार करणेकरीता व वस्त्या बरबाद करण्या करीता केले जात असत. एक टोळी जेव्हा दुसऱ्या टोळीवर हल्ला करीत होती तेव्हा घोडयांचा वापर केला जात होता हे घोडे रात्रीच्या अंधारात ठिणग्या उडवीत निघत असत. आणि भल्या पहाटे धुळीचे वादळ उठवीत वस्त्यावर हल्ला करीत. आणि प्रतीकार करणांऱ्या जमावात जाऊन घुसत असत. व त्यानंतर लूटमारीला उत येत असे. आणि स्त्री पुरुषांना पकडून त्यांना दासी व गुलाम बनविले जाई.या गोष्टीने अरब प्रदेशात अशांतता व अव्यवस्थेचे वातावरण पसरविले होते. व वस्त्यांना हा धोका सतत वाहत असे की न जाणे कोणती टोळी कोणत्या टोळीवर केव्हा हल्ला करील.

कुरआनने या जुलूम व अत्याचाराची जाणीव देण्याकरीता लूटमारीच्या या मोहिमचे चित्र रेखाटले आहे ज्यात विद्युतवेगाने धावणाऱ्या घोडयांचा उपयोग केला जात असे. ही गोष्ट अशीच आहे जसे आजच्या आधुनिक युगात खोटया उद्देशाने लढल्या जाणाऱ्या युद्धात जी वेगवान विमाने वापरली जातात आणि त्यांच्याद्वारे (विमानाद्वारे) जो बॉबचा वर्षाव केला जातो व शहरेंच्या शहरे, संपूर्ण वस्त्या ज्या प्रकारे उध्वस्त करून टाकल्या जातात, त्याचे चित्रण शब्दात रेखाटले जावे ह्याकरीता की अशा अत्त्याचारी कार्या विरूद्ध मानवतेला झटका बसून त्याची सदबुद्धी जागृत व्हावी.

८. ही ती गोष्ट आहे जिची जाणीव देण्याकरीता विद्युतवेगाने धावणाऱ्या घोडयांची शपथ घेणेत आली आहे. अर्थ असा की वेगवान घोडे हे अल्लाहची मोठी देणगी आहे. व युद्धा संबंधी ह्या घोडयांना फार महत्व आहे. परंतु त्यांचा दुरुपयोग करणे व अत्याचारांच्या कामी वापरणे म्हणजे ह्या देणगीचा अनादर करणे व आपल्या पालनकर्त्याचा कृतघ्न होणे होय.

सध्याच्या युगात अणूशक्तीचा शोध हा मानवाकरीता अल्लाहची फार मोठी देणगी आहे. आणि ह्या देणगीबद्दल कृतज्ञता तो अशाच स्थितीत व्यक्त करू शकतो जेव्हा तो ह्या शक्तीचा उपयोग रचनात्मक कार्याकरीता करील. परंतु जर तो याचा उपयोग विध्वंसक कार्याकरीता उदा. ऑटम बॉब बनविणे आणि मोठमोठया शहरांना नेस्तनाबूद करणे व मानवतेवर अत्याचार करणेकरीता त्याचा उपयोग करतो. तर हे ह्या देणगीचा उघडउघड अनादर व तिला प्रदान करणाऱ्या विषयी कृतघ्नता व्यक्त करण्यासारखे ठरेल.

९. म्हणजे मानवाचे ह्याकृघ्नतेच्या वर्तनास कोणत्याही वेगळया पुराव्याची गरज नाही. त्याची विवेकबुद्धी स्वत:च या गोष्टीस साक्षीदार आहे. अल्लाहने प्रदान केलेल्या देणग्याच्या दुरुपयोगाबद्दल तो कितीही कारणे पुढे करो, त्याचे मन आतून निश्‍चित बोलू लागेल की त्याने हे काम चुकीचे केले आहे. कितीतरी माणसे आपल्या पालनकर्त्या विरुद्ध उघड कृतघ्नता दाखवितात. ते आपल्या कृतघ्नतेचा स्वत:च पुरावा आहेत.

१०. म्हणजे मानवास धन ईश्‍वरापेक्षा अधीक प्रिय आहे. तो ईश-भक्त होण्याऐवजी धनभक्त बनतो. म्हणूनच तो धनप्राप्ती करणेकरीता लुटमार व रक्तपात करणेसही मागे पुढे पहात नाही.

स्पष्ट असावे की कुरआन धनाच्या प्रेमाचा निषेध करतो. तेव्हा त्याचा अर्थ असा की मानवास अल्लाहपेक्षा अधीक

प्रिय धन वाटावे. आखिरत (मरणोत्तर जीवन) ला उद्दीष्ठ बनविण्या ऐवजी जगाच्या संपत्तीस उद्दिष्ठ बनवावे. धनप्राप्तीकरीता चांगल्यावाईट मार्गाचा व विहीत निषीद्ध (हलाल व हराम) मार्गामध्ये तारतम्य न ठेवणे आणि अल्लाहच्या दासांच्या हक्काची पायमल्ली करणे व त्यांच्या मालमत्तेवर बेकायदेशीर रित्या कब्जा करण्यासही त्याला काही न वाटणे हि धनपुजा प्रत्येक काळात आढळते. आणि याचे नवे रूप म्हणजे या काळातील भांडवलशाही होय.

११. म्हणजे सर्व मेलेल्या माणसांना पुन्हा जीवंत उभे करण्यात येईल (पहा सूरे – जिल जाल टिप नं. २ व ६). येथे प्रश्न ताकीदीच्या स्वरूपात आहे कि मानव लुटमार याकरीता करतो व धनभक्तीत याकरीता गुरफटलेला असतो कि त्याला पुन्हा जीवंत करण्यात येईल याच्यावर त्याचा विश्वास नाही व तसेच अल्लाहसमोर त्याला आपल्या कर्माचा हिशेब द्यावा लागेल याची त्याला जाणीव ही नाही जेव्हा निश्चितच ती वेळ समोर येणार आहे.

१२. म्हणजे कियामतच्या दिवशी मानवाच्या बाह्यदर्शनीच कर्मांनाच पाहीले जाईल असे नव्हे तर त्यांच्या मागील भावना हेतू निश्चय, उद्देश व चालना देणाऱ्या गोष्टींनाही पाहीले जाईल व पारखण्यात येईल. याकरीता की न्यायपूर्ण व्हावा ह्यानंतरच इनाम किंवा शिक्षेचा निर्णय ऐकवला जाईल.

या संदर्भात सर्वप्रथम अंत:करणातील ज्या गुपिताला जाहीर करण्यात येईल ते ईमान किंवा कुफ्र असेल. म्हणजे कोणाच्या मनात ईमान होते व कोणाच्या मनात कुफ्र जे लोक स्वत:स मुसलमान जाहीर करीत होते परंतू मनात कुफ्रला लपवलेले होते. त्यांच्या हृदयातून त्या दिवशी कुफ्रलाच हस्तगत केले जाईल. त्याच प्रमाणे ज्या लोकांनी सत्कर्म एखाद्या वाईट उद्देशाने किंवा अनुचित उत्तेजन देण्यापोटी केलेली असतील त्यांचेही खरे स्वरूप उघडकीस येईल. आणि जे लोक दुष्कर्मे करून त्याना उचित सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात या उद्देशाने की इतरांनी समजावे की त्यांनी काहीच वाईट कृत्य केलेले नाही त्यांचा उद्देश व हेतू देखील त्या दिवशी उघडकीस येईल.

१३. अल्लाह आजही प्रत्येकाचे बाह्य व आंतरीक स्वरूपाला चांगल्या प्रकारे जाणून आहे. परंतु कियामतच्या दिवशी प्रत्येक व्यक्तीसमोर ही हकीगत उघड होईल व ती हकीगत स्विकारण्यास त्याला गत्यंतर असणार नाही कि अल्लाहला प्रत्येक व्यक्तीचे उघड व आंतरिक स्वरूपाचे पूर्ण ज्ञान होते. आणि आज कियामतच्या दिवशी अल्लाह जो निर्णय घेईल तो पूर्णपणे जाणूनच घेतला (ज्ञानाधारीतच) असेल.

# १०१. सूरह अल-कारेआह

**नावः** आयत १ मध्ये कियामतीच्या जबरदस्त व विलक्षण प्रसंगाला अल-कारेआह (खडखडणारी–भयंकर विपत्ती) ने संबोधीले आहे. या शब्द प्रयोगावरून या सूरहचे नाव अल-कारेआह असे आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे व तिच्यातील मजकुरावरून हे स्पष्ट होते की इस्लामी निमंत्रणाच्या सूरवातीच्या काळात अवतीर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पनाः** कियामतीच्या विलक्षण घटनेपासून सावध करणे आहे. व ह्या गोष्टीची जाणीव करून द्यावयाची आहे की त्यादिवशी यश व अपयशाचे प्रमाण सत्कृत्यच असेल.

**ग्रंथ मांडणीः** आयत १ ते ५ मध्ये कियामतचे विपत्तीकारक स्वरूप व त्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती यापासून सावध करण्यात आले आहे.

आयत ६ व ७ मध्ये त्या लोकांच्या चांगल्या शेवटाचा उल्लेख केला गेला आहे. ज्यांची कृत्ये न्यायाच्या तराजूत वजनदार असतील.

आयत ८ ते ११ मध्ये अशा लोकांच्या वाईट शेवटाचे वर्णन केले गेले आहे. ज्यांची कृत्ये न्यायाच्या तराजूत हलकी असतील.

# १०१. सूरह अल-कारेआह

سُوْرَةُ الْقَارِعَةِ

आयती ११

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. ती खडखडणारी आपत्ती, [१]

اَلْقَارِعَةُ ۙ﴿١﴾

२. काय आहे ती खडखडणारी आपत्ती ! [२]

مَا الْقَارِعَةُ ۚ﴿٢﴾

३. आणि तुम्हाला काय माहीत की ती खडखडणारी आपत्ती काय आहे ? [३]

وَمَآ اَدْرٰىكَ مَا الْقَارِعَةُ ۭ﴿٣﴾

४. तो दिवस जेव्हा लोक विखरलेल्या किटक पतंगा प्रमाणे झाले असतील. [४]

يَوْمَ يَكُوْنُ النَّاسُ كَالْفَرَاشِ الْمَبْثُوْثِ ۙ﴿٤﴾

५. आणि पर्वत पिंजलेल्या लोकरीसमान होतील. [५]

وَتَكُوْنُ الْجِبَالُ كَالْعِهْنِ الْمَنْفُوْشِ ۭ﴿٥﴾

६. तर ज्याचे तराजू (चे पारेड) वजनदार असेल. [६]

فَاَمَّا مَنْ ثَقُلَتْ مَوَازِيْنُهٗ ۙ﴿٦﴾

७. तो मनपसंत ऐषारामात राहील.

فَهُوَ فِيْ عِيْشَةٍ رَّاضِيَةٍ ۭ﴿٧﴾

८. आणि ज्याचे तराजू (चे पारेड) हलके असेल. [७]

وَاَمَّا مَنْ خَفَّتْ مَوَازِيْنُهٗ ۙ﴿٨﴾

९. त्याचे ठिकाण 'हाविया' असेल. [८]

فَاُمُّهٗ هَاوِيَةٌ ۭ﴿٩﴾

१०. आणि तुम्हाला काय माहीत की ती काय आहे?

وَمَآ اَدْرٰىكَ مَا هِيَهْ ۭ﴿١٠﴾

११. धगधगणारी असलेली आग ! [९]

نَارٌ حَامِيَةٌ ﴿١١﴾

१. मुळ ग्रंथात 'शब्द' अल–कारेआह' आला आहे जो कियामतीकरीता वापरणेत येणाऱ्या अनेक शब्दांपैकी एक शब्द आहे. ह्याचा शाब्दिक अर्थ ठोकणारी खटखट व खडखड करणारी मोठी विपत्ती असा आहे. कियामतीला ह्या नावाने संबोधण्याचे कारण असे आहे की कियामत एका मोठ्या विपत्तीच्या स्वरूपात प्रकट होईल आणि ज्याप्रमाणे रात्री येणारी व्यक्ती दाराला खडखड करते आणि झोपेत असणारे खडबडून उठतात त्याचप्रमाणे हे संकट अचानक कोसळेल ज्याला पाहून लोक घाबरून जातील.

२. हा प्रश्न याकरीता आहे की लोकांनी गफलतीच्या स्थितीतून सावध व्हावे.

३. हा प्रश्न कियामतीची हकीगत व तिच्या भयंकर स्वरूपाची कल्पना देणेकरीता आहे. म्हणजे या विपत्तीस साधारण घटना समजू नका.

कुरआन कियामतीचा उल्लेख ज्या दृढतेने करतो आणि त्याच्या तपशिलाचा जो उल्लेख करतो तो त्याच्या सत्यतेचा तेजस्वी पुरावाच आहे. आज आकाशातून उतरलेल्या ग्रंथांपैकी एक ही ग्रंथ असे नाही जे कियामतीविषयी इतके स्पष्ट चित्रण एवढया तपशिलासह सादर करीत असेल.

४. म्हणजे कियामतीच्या दिवशी लोक कबरीतून वेगवेगळया स्वरूपात व विखूरलेल्या स्थितीत बाहेर पडतील आणि त्यांच्या विखरण्याची अशी अवस्था असेल जसे विखरलेले पतंग ह्या अवस्थेचे चित्रण सूरह अल–कमर मध्ये असे केले गेले आहे-

خُشَّعاً اَبْصَارهُمْ يَخْرُجُوْنَ مِنَ الْاَجْدَاثِ
كَاَنَّهُمْ جَرَادٌ مُّنْتَشِرٌ۔ (القمر۔٧)

''खचलेल्या ओढलेल्या नजरेने लोक कबरीतून अशा अवस्थेत बाहेर पडतील जणू ते विखूरलेली टोळच आहेत.'' (अल-कमर - ७)

माणूस जेव्हा कबरीतून उठेल तेव्हा त्याच्याबरोबर त्याचे कुटूंबातील लोक किंवा त्याच्या जाती बिरादरीचे लोकही नसतील उलट तो स्वत:ला एका विखूरलेल्या जमावात व एका नवीन वातावरणात पाहील आणि जमीन व आकाशाचे बदलते स्वरूप पाहून तो भितीने घेरला जाईल.

५. म्हणजे ज्याप्रमाणे पिंजलेल्या लोकारीचे बारीक बारीक सूत हवेत उडत असते त्याचप्रमाणे हे मोठेमोठे पर्वत कियामतच्या दिवशी भुकटी होऊन हवेत तरंगत असतील आणि जेव्हा हिमालयासारखे पर्वत हवेत उढत असतील तेव्हा कोणता किल्ला कोणता महाल व कोणती इमारत अशी असेल जी जमिनीवर शिल्लक राहील.

कियामतीचा इन्कार करणाऱ्याना या गोष्टीचे आश्चर्य वाटत होते की पर्वतासारख्या मजबूत वस्तूला कसे उपटून फेकले जाऊ शकते? त्यांचे हे आश्चर्य अल्लाहच्या सामर्थ्याचा योग्य अंदाज न घेतल्याने होता. ही गोष्ट उघड आहे जो पर्वताला निर्माण करण्यास आणि त्यांना जमीनीत गाढण्यात समर्थ आहे.त्याच्याकरीता ह्या पर्वतांचा चुरा चुरा करून त्यांना हवेत उडवणे अशकय असेल? आजच्या आधुनिक शास्त्रिय संशोधन काळात ह्या गोष्टीचे आकलन होणे फारच सोपे आहे. जर एका कणात इतकी शक्ती असू शकते की त्याला फोडण्याच्या (Splitting) परिणामी भयंकर स्फोट होऊ शकतो तर पर्वताच्या कणांना फोडल्याच्या परिणामी कियामतीची भयंकर विपत्ती का घडवू शकणार नाही?

६. कियामतीच्या दिवशी कर्मे तोलली जातील व त्यांच्या तोलमापाकरीता तराजू कायम करण्यात येईल.

ह्या तराजूत तीच कर्मे वजनदार ठरतील जी सत्याच्या (हक्कच्या) आधारावर केलेली असतील. कारण कियामतच्या दिवशी सत्यालाच वजन असेल. ज्याप्रमाणे सूरह अअराफ मध्ये फर्मावीले आहे.

وَالْوَزْنُ يَوْمَئِذِ الْحَقُّ ط (الاعراف۔٨)

''वजन त्या दिवशी सत्यालाच (हक्क) असेल.'' (अल अअराफ- ८)

व सफलतेकरीता हि अट असेल कि हे पारडे वजनदार व्हावे आणि कोणत्याही व्यक्तीचे पारडे तेव्हाच वजनदार होईल जेव्हा त्याचे जीवन सत्याच्या आधारावर व्यतीत झाले असेल आणि ज्या व्यक्तीचे सत्कार्याचे प्रमाण जेवढे अधीक असेल तेवढे हे पारडे जड होईल.

ह्या न्यायाच्या तराजू चा संबंध आखिरत (मरणोत्तर जीवन) च्या स्थितीशी आहे. आणि आखिरतमधील परिस्थिती, काळवेळ व प्रमाण, सर्वकाही या जगापेक्षा पूर्ण वेगळे असतील म्हणूनच आम्ही आखिरतच्या न्यायाचे तराजू च्या वैशिष्ठाची पूर्ण कल्पना ह्या जगात करू शकत नाही. म्हणून आम्हाला कुरआनच्या या संक्षिप्त निवेदनावरच समाधान मानले पाहिजे.

कर्माच्या तोलमापात आश्चर्य कारक कोणती गोष्ट होती तर ती शास्त्रीय शोधांनी संपुष्टात आणली आहे. कारण स्थितीचे (कैफियती) मोजमाप करण्याकरीता नवनवीन यंत्रांचा शोध लावण्यात आला आहे. अशाच प्रकारे शरिराचे तपमान जी एक स्थितीच आहे ज्याचे मोजमाप करणेसाठी थर्मामिटर वापरण्यात येतो. याच तऱ्हेने हवेच्या दाबाची माहीती करीता वायू भारमापक यंत्र (Barometer) वापरण्यात येते. आणि जेव्हा मानवास स्थितीचे मोजमाप करणे शक्य झाले आहे तेव्हा त्याच्यासाठी

जो जमीन व आकाशाचा निर्माता आहे इमानाचे मोजमाप करणारे तराजू कायम करणे काय अवघड आहे?

७. हलके पारडे त्या लोकांचे असेल ज्यांनी असत्याच्या आधारावर जीवन व्यतीत केले होते. त्यांची कर्मे बाह्यांगी कितीही चांगली का दिसत असेनात. अखिरतच्या न्यायातराजूत अगदी वजनहीन ठरतील. कारण मुळातच असत्याला कधीच वजन असत नाही. याप्रमाणे दुष्कृत्यां करीताही आखिरतच्या जगात वजनहिनतेची स्थिती असेल. आज जेव्हा हि गोष्ट निरीक्षणात येत आहे की जी वस्तू जमीनीवर वजनदार असते ती अवकाशात अगदी वजनहीन ठरते. तेव्हा असा विश्वास करणे काय कठीण आहे की असत्याची पूजा करणाऱ्या लोकांचे जीवनातील कामगीरी लोकांच्या नजरेत कितीही वजनी व भव्य असेना आखिरतच्या (परलोकाच्या) जीवनातील वातावरणात ती अगदीच वजनहिन ठरेल.

८. 'हावीया' चा अर्थ खोल खड्डा आहे हे एक जहन्नम (नरक) चे नाव आहे. आणि याला ह्या नावाने संबोधण्याचे कारण असे की ती (जहन्नम) फार खोल असेल व त्या मध्ये पापी (दोजखी) लोकांना वरून फेकून देण्यात येईल.

९. म्हणजे जहन्नमचा हा खोल खड्डा भडकत्या अग्नीने भरलेला असेल, जहन्नमची विस्तृत: तिची खोली व तिची असामान्य अग्नी याचे वर्णन ऐकूने कितीतरी लोक याला अविश्वासार्ह समजत आले आहेत व आज देखील असेच समजत आहेत. परंतु हि वस्तुत: असे समजणे त्याची संकुचीत दृष्टी व अदूरदर्शीपणाच्य आहे उलट जहन्नमचे अस्तित्व बिलकूल आश्चर्याची गोष्ट नाही सूर्याचे उदाहरण आमच्या समोरच आहे. त्याचे तापमान २,७०,००,००० (२ कोटी ७० लाख) डिग्री फॅरन्हैट, त्याचा परिध पृथ्वीच्या परिधाच्या १०९ पट, व त्याचा विस्तर जमिनीच्या विस्ताराहून ३ लाख ३३ हजार पट मोठा आहे. सूर्य मूळत: अतीउष्ण वायू चे एकत्रीकरण आहे. ज्यामध्ये भयंकर (लोह) चुंबकीय वादळ निर्माण होत असतात. शास्त्र्याने पुरविलेल्या या माहितीवरून सूर्याच्या ह्या महान विशालतेचा, त्याची अंदाज न करता येणारी खोली व त्याच्या भयंकर तापमानाची कल्पना होते जणू सूर्य जगात जहन्नमचा एक जीवंत नमूनाच आहे आणि त्याला पहाता आखिरतची जहन्नम फक्त शक्यप्रदच वाटत नाही तर त्याबद्दल विश्वास देखील वाटतो.

# १०२. सूरह अत-तकासूर

**नाव:** पहिल्या आयतीत तकासूर (धनसंपत्ती जास्तीतजास्त प्राप्त करण्याची हाव) ला जीवनाच्या खऱ्या ध्येयापासून निष्काळजी दाखविण्यास कारणीभूत ठरविले आहे. यावरून या सुरतीचे नाव ''अत–तकासूर'' असे आहे.

**अवतरण काळ:** ही सूरत मक्की आहे व तिच्या मजकूरावरून अंदाज येतो की ही इस्लामी आमंत्रणाच्या सुरवातीच्या काळात अवतिर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पना:** लोकांना या वस्तुस्थितीची जाणीव करून देणे आहे की धनसंपत्ती व इतर ऐहीक लाभ प्राप्त करण्यात असे मग्न होणे की यात संपूर्ण आयुष्य संपून जावे व अंतिम दिवशी होणाऱ्या विचारणेसंबंधी काहीच काळजी नसावी. फारच अदुरदर्शीपणाची गोष्ट व मोठा तोटा देणारा व्यापार आहे.

**ग्रंथ मांडणी:** आयत १ व २ मध्ये अशा लोकांना सावध करणे करीता इशारा दिला आहे जे या जगातील धनसंपत्तीला आपले सर्वस्व समजतात व तिला अधिकाधिक मिळवणेचा नाद त्यांच्यावर इतके वर्चस्व गाजवत आहे की मृत्यूच्या पलीकडे जे काही समोर येणारा आहे त्याची त्यांना काहीच चिंता वाटत नाही.

आयत ३ ते ५ मध्ये बजावण्यात आले आहे की मृत्यूच्या पलीकडे जे काय आहे ते तुम्हास डोळे बंद होताच माहीत होईल. जर आज तुम्हाला त्याचा विश्वास असता तर आपल्या भवितव्याबद्दल बेसावध राहिला नसता व या जगाच्या धनाचा नाद तुमच्यावर आरूढ झाला नसता.

आयत ६ ते ८ मध्ये खबरदार करण्यात आले आहे की जहन्नमच्या आस्तित्वाचा तुम्ही विश्वास करा वा करू नका तो दिवस येईल हे मात्र निश्चित जेव्हा तिला तुम्ही स्वत:च्या डोळयांनी पहाल, त्यावेळी तुम्हास त्याच्या अस्तित्वाची पूर्णपणे खात्री होईल. परंतु ती वेळ कार्याची नसून हिशेब देण्याची असेल आणि तुम्हाला प्रत्येक देणगी विषयी अल्लाहसमोर जाब द्यावा लागेल.

# १०२. सूरह अत-तकासूर

سُورَةُ التَّكَاثُرِ

**आयती- ८**

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. धनसंपत्ती अधिकाधिक प्राप्त करण्याच्या लालसेने तुम्हाला गफलतीत टाकले.[१]

أَلْهٰكُمُ التَّكَاثُرُ ١

२. इथपर्यंत की तुम्ही कबरीत जाऊन पोहचलात,[२]

حَتّٰى زُرْتُمُ الْمَقَابِرَ ٢

३. परंतु नाही ! लवकरच तुम्हास माहीत होईल,[३]

كَلَّا سَوْفَ تَعْلَمُوْنَ ٣

४. परत ऐका ! ही धुंद योग्य नव्हे. लवकरच तुम्हास कळूनयेईल.[४]

ثُمَّ كَلَّا سَوْفَ تَعْلَمُوْنَ ٤

५. मुळीच नाही ! जर तुम्ही निश्चित पणे जाणले असते [५] (तर जगाच्या मागे लागला नसता.)

كَلَّا لَوْ تَعْلَمُوْنَ عِلْمَ الْيَقِيْنِ ٥

६. तुम्ही जहन्नमला अवश्य पहाल, [६]

لَتَرَوُنَّ الْجَحِيْمَ ٦

७. मग तुम्ही तिला अगदी खात्रीपूर्वक पहाल, [७]

ثُمَّ لَتَرَوُنَّهَا عَيْنَ الْيَقِيْنِ ٧

८. मग त्या दिवशी तुम्हास देणग्या विषयी अवश्य विचारले जाईल.[८]

ثُمَّ لَتُسْـَٔلُنَّ يَوْمَئِذٍ عَنِ النَّعِيْمِ ٨

१. म्हणजे तुम्ही धनसंपत्ती गोळा करण्यात जगातील लाभ मिळवणेत व ऐषआरामची सामग्रीस प्राप्त करण्यात असे मग्न आहात की जीवनाचे मूळ ध्येय व तुमचे खरे अंतिम ठिकाण तुमच्या डोळयासमोरून लुप्त झाले. तुमची सर्व धावपळ पैसा, प्रतिष्ठा आणि सत्ता मिळविणेसाठी असते. याव्यतिरिक्त वरच्या पातळीवर विचार करणेस तुम्ही मुळीच तयार नाही.

धनसंपत्ती व मालमत्तेच्या हव्यासात व ऐहीक लाभांची प्राप्ती करणेत मानवाचे मर्यादेपेक्षा अधीक गुंतणे हे त्याचे कमकुवतपणाचे लक्षणच होय ज्यात तो नेहमीच गुरफटलेला असतो.मात्र या प्रगतीशील युगात त्याने काही आधुनीक स्वरूपे स्विकारली आहेत.म्हणजेच धनपूजेचे भांडवलपूजेत झालेले रूपांतर व जगाच्या ऐहिक सुखांच्या पुजेचे भौतिक पुजेत झालेले रूपांतर. मनुष्य पुर्वी आखिरत (मरणोत्तर जीवन) ला नाकारीत होता तर आता तो ईश्वराच्या अस्तित्वास मुळातच मान्य करीत नाही. अगोदर तो नैतिक मूल्यांना डोळया आड करून ऐहीक फायदे प्राप्त करीत असे तर आता ऐहीक लाभाकरीता नैतिक मुल्यांनाच पायदळी तुडवत आहे. तसेच सध्याच्या प्रगत संस्कृतीच्या प्रंभावाखाली प्रत्येक व्यक्तीस जीवनराहणीमान उंचावण्याची चिंता वाटत आहे. आणि रोजगारी व आर्थिक क्षेत्रात व्यक्ती व राष्ट्रे यांची एक दुसऱ्याच्या पुढे जाण्याची धडपड चालू आहे. परंतु नैतिक पातळी उंचावण्याची कोणालाच चिंता नाही. व हा विचार करणेचा त्रास कोणी घेत नाही की काय हे जगच जीवनातील शेवटचा टप्पा आहे किंव त्याच्यापुढेही काही टप्पे पार करावयाची आहेत?अशा महत्वपूर्ण प्रश्नाकडे मानव दुर्लक्ष करून आपल्या जीवन ध्येयापासून फारच लांब जाऊन पडला आहे व अशा गफलतीत गुरफटला गेला आहे की त्याला मागे पुढे काय आहे याची काहीच जाणिव नाही.

२. अर्थ असा की अधिकाधीक धनसंपत्ती गोळा करण्याच्या व ऐहीक लाभ मिळवणेच्या प्रयत्नात तुम्ही आपले सर्व आयुष्य खर्च करून टाकले आणि मृत्यूच्या अंतिम क्षणापर्यंत ही गोष्ट तुमच्या नशिबी नव्हती की मृत्यूनंतर काय समोर येणार आहे त्याबद्दल विचार केला असता.

मानवाची अधिकाधिक संपत्ती मिळवणेची इच्छा व कधीच न संपणारी लालसा याबद्दल हदीस मध्येही अतिशय प्रभावी रित्या बजावण्यात आले आहे- इब्ने अब्बास कथन करतात की पैगंबर यांनी फर्माविले :

لَو كَانَ لِابْنِ آدَمَ وَادِيَانِ مِنْ مَالٍ لَابْتَغٰى ثَالِثاً وَ لَا يَمْلَأُ جَوْفَ ابْنِ آدَمَ اِلَّا التُّرَابُ۔ (بخاری کتاب الرقاق)

''जर माणसाजवळ मालमत्ते नी भरलेल्या दोन खिंड असतील तरी तो तिस्या खिंडीची इच्छा करील. माणसाचे पोट तर मातीच भरू शकेल.''(बुखारी किताबूर रिकाक)

मातीच माणसाचे पोट भरू शकेल याचा अर्थ असा की माणसाची लालसा मातीत गेल्यानंतरच (मेल्यानंतरच) संपते.

३. म्हणजे लवकरच हे सत्य तुमच्यापुढे उघडकीस येईल की मालमत्तेची विपुलता व जगातील सुखाची साधन सामग्री भरपूर प्रमाणात प्राप्त करणे खरी सफलता नव्हे. उलट खरी सफलता आखिरतच्या देणग्या प्राप्त करणे होय. त्यावेळेस तुम्हास आपल्या चुकीची तिव्रतेने जाणीव होईल की, अखिरतकडे दुर्लक्ष केल्याने तुम्ही किती वाईट शेवटाला आमंत्रण केले आहे.

४.पुन: पुन्हा हा मजकूर देणेचा हेतू माणसास ताकीद देणेचा आहे व ह्या गोष्टीकडे त्याचे लक्ष वेधणे आहे की अधिकाधिक प्राप्तीच्या लालसेची वस्तुस्थिती तर मरण होताक्षणी पहिलयांदा समोर येईल व दुसऱ्यांदा कियामतीच्या दिवशी तिचा प्रत्यय येईल.

५. म्हणजे कुरआन ज्या दिवसाची सुचना देत आहे. त्यावर जर तुम्हाला विश्वास असता तर ऐहीक-सामग्रीच्या मागे लागून गफलतीचे जीवन व्यतीत केले नसते उलट या दिवसाची तयारी करून ठेवली असती.

६. म्हणजे तुम्ही जहन्नमच्या अस्तित्वावर विश्वास ठेवू इच्छित नसाल तर नका ठेऊ वस्तुत: त्याचे अस्तित्व हे एक सत्य आहे आणि तो दिवस निश्चितच येणार आहे जेव्हा ती तुम्हा समोर प्रत्यक्षात येईल व तुम्ही तिला आपल्या डोळयांनी पहाल.

७. अर्थ असा, तुमचे जहन्नमला पहाणे हे स्वप्न सृष्टीत नसेल उलट वास्तविकतेच्या जगात असेल. आज ज्या गोष्टीस विश्वासस अपात्र समजत आहात ती जेव्हा उद्या तुमच्यासमोर येईल तेव्हा तिच्या अस्तिवाबद्दल तुम्हास पुर्ण विश्वास वाटेल.

८. देणग्यात अल्लाहने प्रदान केलेल्या सर्व देणग्याचा समावेश आहे. उदाहरणार्थ उपजिविकेंची साधने, मालमत्ता, धनसंपत्ती, मुले, सामर्थ्य, कार्यक्षमता, साधन सामग्री, प्रतिष्ठा व अधिकार आणि सत्ता इत्यादी. जगात मानवाला जी देणगीही मिळते ती आपल्या बरोबर जबाबदारीही आणते आणि ती जबाबदारी ही आहे की माणसाने या देणगीबद्दल अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करावी व ही देणगी त्या अल्लाहला पसंत असलेल्या कामाकरीता वापरावी. याप्रमाणे जर मानवाने अल्लाहची कृतज्ञता व्यक्त केली तर कियामतच्या दिवशी त्याच्याकरीता जाब देण्याचा प्रश्न सोपा होईल. आणि आपल्या पालनकर्त्याच्या चिरकालीन देणग्यास तो पात्र ठरेल. परंतु जर तो सुरवातीपासूनच अल्लाहच्या अस्तित्वास मानीत नसेल किंवा तो मान्य करूनही असे समजत असेल की या देणग्यांना प्रदान करणारे अनेक ईशवर आहेत किंवा अमूक देणगी अमकया देवी किंवा देवाने

प्रदान केलेली आहे आणि ह्या विकृत श्रद्धेच्या आधारावर तो ह्या देणग्यांचा वापर अशा तऱ्हेन करतो की अल्लाहला पसंत काय आहे आणि नापसंत काय त्याची काळजी त्याला मुळीच भासत नाही तर कियामतीच्या दिवशी त्याची सख्त विचारणा होईल आणि ह्या कृतघ्नता व अपराधी वर्तनाच्या आधारामुळे तो कडक शिक्षेस पात्र ठरेल.

संभाषणसंदर्भाच्या दृष्टीने ह्या आयतीचा संकेत विशेषत: मालमत्ताच्या देणगीकडे आहे. म्हणजे मालमत्ता मिळवणेची काळजी तुम्हाला जरूर आहे परंतू याविषयी तुम्हाला जो जाब द्यावा लागेल त्याचा विचारही तुमच्या मनात येत नाही. जर अल्लाहच्या समोर जाब द्यवयाचा आहे याची जाणिव तुम्हाला असती तर धनाचे लोभी बनण्याएवजी तुम्ही अल्पसंतुष्ट असता कारण धनसंपत्ती जितक्या प्रचंड प्रमाणात प्राप्त होईल हिशेबाचे प्रकरण तितकेच वाढेल आणि जाब देणे अवघड होईल. हे स्पष्ट व्हावे की कियामच्या दिवशी प्रत्येकाला जाब द्यावा लागेल. मग तो मुसलमान असो वा कफिर असो. हदीस मध्ये उल्लेख आहे कि पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले:

لَاتَزُوْلُ قَدَمَاعَبْدٍحَتّٰى يُسْأَ لَ عَنْ عُمرِهٖ فِيْمَا اَفْنَاهُ وَعَنْ عِلْمِهٖ فِيْمَا فَعَلَ وَعَنْ مَالِهٖ مِنْ اَيْنِ اِكتسَبَهٗ وَفِيْمَا اَنْفَقَهٗ وَعَنْ جِسمِهٖ فِيْمَا اَبْلَاهُ۔ (ترمذی ابواب الزہد)

''(कियामतच्या दिवशी) दासाचे पाय उचलले जाऊ शकणार नाहीत जोपर्यंत त्याला ह्या गोष्टीविषयी विचारले जाणार नाही. त्यांच्या आयुष्याविषयी की कोणत्या गोष्टीत व्यतीत केले त्याच्या ज्ञानाविषयी की त्याप्रमाणे कोठपर्यंत आचरण केले त्याच्या मालमत्ते विषयी की कोणत्या मार्गाने ती कमावली व कोठे खर्च केली. आणि त्याच्या शरीर यष्ठीबद्दल की त्याने कोणत्या गोष्टीत ते झिजविले.'' (तिर्मिजी अबवाबुज-जुहद)

एक प्रसंगी पैगंबर व त्यांच्याबरोबरचे इतर साथिदार हजरत अबु बकर व हजरत उमर भुकेने व्याकुळ असतांना ती मिटवणेकरीता एका अन्सारीच्या घरी गेले. अन्सारी यांनी त्यांचे आदरातिथ्य खजूर व मांसाने केले. ते सर्व तृप्त झाले तेव्हा पैगंबर यांनी आपल्या साथीदारांना फर्माविले:

وَالَّذِیْ نَفْسِیْ بِیَدِهٖ لَتُسْأَلُنَّ عَنْ هٰذَا النَّعِیْمِ یَوْمَ الْقِیَامَةِ۔

(فتح القدیر للشوکانی ج ۵ ص ۴۹۰ بروایۃ مسلم)

''शपथ आहे त्याची ज्याच्या हातात माझे प्राण आहेत कियामतच्या दिवशी तुम्हास हया देणगीविषयी अवश्य विचारले जाईल''.

(फतहूल कदीर शौकानी खंड-५ पान ४९० संदर्भ मुस्लीम)

# १०३. सूरह अल -अस्र

**नावः** पहिल्या आयतीत अस्र (काळ) ची शपथ घेण्यात आली आहे. यानुसार या सुरतीचे नाव ''अल-अस्र'' आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे आणि मजकुरावरून अंदाज येतो की इस्लामी आमंत्रणाच्या सुरवातीच्या काळात अवतिर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पनाः** ह्या गोष्टीची पूर्वकल्पना द्यावयाची आहे की मानवाचा तोंडा वेगाने अनंतकालीन विनाशाकडे वाटचाल करीत आहे. ह्या विनाशापासून तेच लोक सुरक्षीत राहतील जे ईमान (निष्ठा) व सदाचाराचा मार्ग पत्करतील व त्याच्या निकडी पुर्ण करतील.

**ग्रंथ-मांडणीः** ही सुरह तीन संक्षिप्त आयतीने साम्मिलीत आहे. परंतु अर्थाच्या दृष्टीने इतकी संपन्न आहे की फक्त मानवतेच्या उत्कर्ष व पतनाचा संपूर्ण इतिहास यात समाविष्ठच नाही तर ही सुरह मार्गदर्शनाचा प्रकाशमान स्तंभ बनून व्यक्ती, राष्ट्र, समाज आणि पंथाना योग्य दिशा दाखवीत आहे याकरीता की त्यांनी उद्दिष्ठाची मजल गाठावी व चुकीच्या मार्गाचा अवलंब करून विनाशाच्या खड्डयात पडण्यापासून सुरक्षीत रहावे.

काळाची साक्ष या गोष्टीच्या समर्थनाथ सादर केली गेली आहे की जर त्याने आपल्यामध्ये इमानाचे गुण निर्माण केले नाही तर तो विनाशापासून वाचू शकत नाही.

# १०३. सूरह अल अस्र

سُورَةُ الْعَصْرِ

आयती - ३

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. काळाची शपथ [१]

وَالْعَصْرِ ۙ﴿۱﴾

२. मानव तोटयात आहे [२]

اِنَّ الْاِنْسَانَ لَفِیْ خُسْرٍ ۙ﴿۲﴾

३. व्यतिरिक्त या लोकांच्या ज्यांनी ईमान (श्रद्धा) धारण केले [३] आणि सत्कृत्ये केली. [४] आणि एकमेकांना सत्याचा आदेश दिला [५] व सहनशिलतेचा उपदेश केला. [६]

اِلَّا الَّذِیْنَ اٰمَنُوْا وَ عَمِلُوا الصّٰلِحٰتِ وَتَوَاصَوْا بِالْحَقِّ ۙ۬ وَتَوَاصَوْا بِالصَّبْرِ ﴿۳﴾

१. या पूर्वी आम्ही स्पष्ट केले आहे की कुरआनमध्ये विविध वस्तूंच्या ज्या शपथा घेण्यात आल्या आहेत त्या या अर्थाने नाही की त्या वस्तू पवित्र किंवा महान आहेत. उलट त्या वस्तू साक्ष व पुरावा सादर करीत आहेत या दृष्टीने या शपथा घेण्यात आल्या आहेत.येथे काळाची शपथ ही देखील याच अर्थाने घेण्यात आली आहे.

मूळ मजकूरात 'अस्र' हा शब्द वापरणेत आला आहे ज्याचा अर्थ 'काळ' आहे हा शब्द विशेषत: वेळेच्या तिव्र वेगाकडे व विद्युतगतीकडे निर्देश करीत आहे.

२. ही आहे ती गोष्ट ज्यावर काळाची साक्ष सादर करण्यात आली आहे. हि साक्ष खाली नमूद केलेल्या पैलूंशी निगडीत आहे:-

**(अ )** मानवाजवळ सर्वात मौल्यवान वस्तू वेळेचे भांडवल आहे जे जात असलेल्या काळाचा एक भागच होय हे वेळ फारच मर्यादित आहे व शिघ्रगतीने निघून जाते. ज्याप्रमाणे बर्फ प्रत्येक क्षणाक्षणाला विरघळत जात असते आणि जर एखाद्या व्यापाऱ्याने लवकरात लवकर विकून त्याची किंमत वसूल केली नाही तर बर्फ विरघळून संपून जाईल व त्याच्या पदरात काहीच पडणार नाही. त्याचप्रमाणे मनुष्यास जी काही आयुष्याची वेळ मिळाली आहे त्याचा जर त्याने लाभ घेतला नाही व त्याने आपल्या मरणोत्तर जीवनाकरीता सामान केली नाही तर तो नि:संशय तोटयात राहील कारण जो क्षण संपत चालला आहे तसे त्याचे भांडवल कमी होत जात आहे. जणू सेकंदाचा काटा ज्या तीव्रगतीने पळत आहे त्याच गतीने तो आमच्या आयुष्यास कमी करून आमचे नुकसान वाढवीत आहे. ह्या नूकसानातून तेव्हांच वाचू जेव्हा आम्ही वेळेची किंमत जाणून त्याला अशा कामांत व्यतीत करू जी फायद्याचे परिणाम देणारी व आमच्या मरणोत्तर जीवनास सावरणारी असतील.

**(ब)** त्या ऐहितासीक घटना ज्या अल्लाहच्या कोपाची प्रतिके होती ह्या गोष्टीचे पुरावे आहेत की ज्या समाजाने नकार (कुफ्र) विद्रोह (सरकशी) सत्याचा विरोध, अत्याचार व बिघाडाचा मार्ग अवलंबिला ते विनाशात गुरफटले. जणू काळ इतिहासाच्या आरशात ह्याच सत्त्याचे प्रतिबिंब दाखवित आहे की विनाश व आपत्तीत गुरफटणारे कोण आहेत व त्या पासून सुरक्षित रहाणारे कोण?

**(क)** हे जग परिक्षागृह आहे भ्रमंती किंवा मौजमजा करण्याचे ठिकाण नव्हे. ह्या परिक्षागृंहात मानवास भिन्न भिन्न विषयाच्या प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता देण्यात अल्या आहेत आणि याकरीता वेळेचे बंधनही घातले गेले आहे. तेव्हा जो मनुष्य प्रश्नपत्रिका सोडविण्याऐवजी मौजमजा करणेकरीता वेळ घालवित आहे तो निश्चितच आपले नुकसान करीत आहे. आणि वेळचा अपव्यय करणाऱ्यासाठी अपयश नशिबी आहे.

ह्या पैलू व्यतिरीक्त काळाच्या (अस्र) शपथेत हा इशारा लपलेला आहे की जगाच्या अंताची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. जणू शेवटच्या प्रेषिताचे पाठविणेच्या व कियामतच्या दरम्यान इतकेच अंतर उरले आहे जेवढे अंतर अस्रच्या प्रार्थनेपासून मगरीबच्या प्रार्थने पर्यंत आहे. जेव्हा सर्व मानवजातीचे आयुष्य एक दिवसाचे गृहीत धरले जाईल. पैगंबर यांच्या हदीस मध्ये आहे की :

اِنَّمَا بَقَاءُكُم فِيمَنْ سَلَفَ قَبْلَكُمْ مِنَ الْاُمَمِ
كَمَا بَيْنَ صَلَاةِ الْعَصْرِ اِلٰى غُرُوْبِ الشَّمْسِ۔

(روح المعانی ج ۱۰ ص ۲۹۲ بحوالہ بخاری)

'जे जनसमूह (उम्मते) होऊन गेले. त्यांच्या तुलनेत तुमचे जगातील वास्तव्य इतक्या वेळेपर्यंतच आहे जेवढी वेळ अस्रची नमाज व सूर्यास्ताच्या दरम्यान असते'. (रूहुल मआनी खंड १० पान २९२ बुखारीच्या आधारे)

तोट्याला अभिप्रेत संपूर्ण आयुष्यभरचे नुकसान म्हणजे कायमचा विनाश व विध्वंस आहे जे निर्णयाच्या दिवशी भोगावे लागणार आहे.

३. म्हणजे आखिरत (मरणोत्तेर जीवन) च्या चिरकालीन विनाशापासून तीच माणसे सुरक्षीत राहतील जे ईमान धारण करून सदाचारी जीवनाचा अवलंब करतील.

ईमान धारण करणे याचा अर्थ सूरह-बकराची टीप नं. ६ मध्ये स्पष्ट केला गेला आहे.

४. माहीत झाले की आखिरतच्या नुकसानपासून वाचण्या करीता फक्त ईमान धारण करणे एवढेच पुरेसे नाही तर त्याच्या बरोबर सत्कृत्यो आवश्यक आहेत. आणि वस्तुस्थिती अशी आहे की जेथे ईमान प्रत्यक्षात असेल तेथे त्याच्या प्रकाशाने जीवनाचरणसुद्धा तेजस्वी होईल व मानव चरित्र्यवान व सदाचारी होईल. परंतु जेथे ईमान फक्त चैतन्यरहीत श्रद्धेच्या स्वरूपात असेल ज्याने बुद्धीस जागृत केले नसेल तर जीवनाचरण सुद्धा चांगला होऊ शकणार नाही. उत्तम व चांगल्या बी बियाणापासून चांगलया झाडाचा जन्म होतो व निकृष्ठ बियाणा पासून वाईट झाडाचा जन्म होतो. म्हणून हे होऊ शकत नाही की ईमान तर मनात विद्यमान रहावे आणि प्रत्यक्ष जीवन दुराचार व दुषक्रमांनी भरपूर असावे, प्रत्यक्ष जीवनातील बिघाड या गोष्टीचा पुरावा आहे की ईमान योग्य अवस्थेत नाही.

सदाचाराच्या हकीगतीचे विद्वान अल्लामा फर्राही यांनी फारच सुबक स्वरूपात वर्णन केले आहे. ते लिहीतात :-

अल्लाहने सत्कृत्यांना सदाचाराने (सालेहातने) संबोधीले आहे. या शब्दप्रयोगाने या महान हिकमतीचे मार्गदर्शन होते की मानवाचे सर्व छुप्या व उघड, इहलोकी व परलोकी, व्यक्तीगत व सामुदायीक, शारिरीक व बौद्धीक चांगुलपणा व प्रगतीचे साधन सत्कृत्येच आहेत. अर्थात सदाचार ते आचरण आहे जे मानवाकरीता जीवन व प्रगतीचे साधन बंनते. आणि ज्यान्वये मानव प्रगतीच्या त्या उच पायऱ्या चढून उन्नती करू शकेल. जे त्याच्या मूल स्वभावात अध्यारूत आहे. (मजमूअये तफासीर फर्राही पान ३५२)

५. सत्य व सहनशिलता जरी सदाचारांमध्ये समाविष्ठ असले तरी हे गुण मुलभूत सत्कृत्यातील (नेकी) आहेत त्याकरीता त्यांचा उल्लेख विशेषत: केलेला आहे.

हक्क त्या गोष्टीस म्हणतात जी सत्य न्यायाधारीत व वस्तुस्थितीस धरून असते याच्या विरोधी शब्द बातिल म्हणजे असत्य किंवा खोटा असा आहे. हक्काला अभिप्रेत दीने हक्क म्हणजे सत्य धर्म ही असतो. आणि या शब्दाचा वापर सत्यधर्माच्या शिकवणीकरीताही केला जातो तसेच सत्याच्या त्या बोलालाही हक्क म्हटले जाते जे न्यायाच्या व योग्यतेच्या मागणीनुसार क्रुर सत्ताधारी किंवा खोटा मार्ग स्वीकारणाऱ्या समोर सादर केले जाते. याशिवाय या शब्दाचा वापर त्याकरीताही होतो जे कर्तव्य पार पाडणे नैतिक वा धार्मिक दृष्टीने मानवासाठी आवश्यक आहे. उदा. अल्लाहचा हक्क, मातापित्यांचा हक्क, नातेवाईकांचा हक्क, शेजाऱ्यांचा हक्क, गरीब व लाचारांचा हक्क इत्यादी.

निष्ठावतांच्या या गुणाचा जो उल्लेख केलेला आहे की ते एकमेकांना सत्याचे उपदेश करतात यावरून ही गोष्ट सहज स्पष्ट होते की निष्ठावंत सत्यावर स्वत:च्या पुरतेच अढळ रहातात इतकेच नव्हे तर ते दुसऱ्यानाही याचा उपदेश व शिकवण देतात दुसऱ्या शब्दात निष्ठावंत असे भावनाहीन रहात नाहीत की असत्य फैलावत जात राहील किंवा समाजात सत्याविरोधी व अल्लाहस नकार देणाऱ्या वाईट गोष्टी सर्वत्र घडत असतील व ते शांतपणे बघ्याची भूमिका बजावत राहतील. उलट ते आपली सामाजिक व सामुदायीक जबाबदारीची जाणीव ठेवून सत्याचा आवाज उंचावीत असतात आणि एकमेकाची सुधारणा करणेकरीता प्रयत्नशिल रहातात.

अप्रत्यक्षपणे यावरून हे तत्वही सिद्ध होते की सत्य व्यक्त करणे हा ईमान धारकांचा हक्क आहे. आणि त्याचे स्वातंत्र्य कोणत्याही परिस्थितीत त्यांना असले पाहिजे.

६. सत्य स्विकार करणे, त्याला पाठिंबा देणे,सत्यवचन बोलणे, आणि सन्मार्गावर वाटचाल करणेच्या परिणामी निरनिराळया प्रकारची संकटे उभी रहातात. अडचणी दु:ख व कष्टांना तोंड द्यावे लागते आणि विरोधांच्या वादळातून जावे लागते. तोटेही सहन करावे लागतात व त्यागही करावे लागतात म्हणूनच सत्याबरोबर सहनशिलता, दृढता, धैर्य, संयम व निर्धार असणेही आवश्यक आहे. सहनशिलतेच्या अर्थात या सर्व गोष्टी सामिल आहेत. यामुळेच सहनशिलतेच्या उपदेशास आवश्यक ठरविले आहे.

# १०४. सूरह अल हुमजह

**नावः** पहिल्या आयतीत 'हुमजह' म्हणजे निष्ठावंतांकडे बोट दाखविणाऱ्यांना ताकीद करण्यात आली आहे की त्यांचे हे कृत्य त्यांच्या विनाशास कारणीभूत ठरेल. यावरून या सूरतीचे नाव अल-हुमजह असे आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मक्की आहे. आणि तिच्या मजकूरावरून अंनदाज येतो की सूरह अस्र नंतर अवतिर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पनाः** धनपूजा करणाऱ्याना हालवून जागृत करणे ज्यांचे चारित्र्य असे असेल त्यांना निश्चितच दुष्परिणामाला तोंड द्यावे लागेल.

**ग्रंथ मांडणीः** आयत १ ते ३ मध्ये धनलोभ्यांचे चारीत्र्य रेखाटले गेले आहे. आणि त्यांना ताकीद करण्यात आली आहे की हे कृत्य खात्रीने विनाशास कारणीभूत ठरेल.

आयत ४ ते ९ मध्ये धनपूजा करणाऱ्यांच्या परिणामाचे वर्णन करण्यात आले आहे. ही सूरत मागील सूरतीशी इतकी सुसंगत आहे की जणू ही तिचा शेवटचा भागच होय. यशाची हमी देणाऱ्या गुणांच्या वर्णनावर मागिल सूरतीचा शेवट झाला होता तर या सुरतीची सुरवात त्या दुर्गूणांच्या वर्णनाने झाली आहे जे विनाशास कारणीभूत ठरतात.

# १०४. सूरह अल-हुमजह

سُورَةُ الْهُمَزَةِ

आयती - ९

परम कृपाळू व परम दयाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. विनाश आहे त्या प्रत्येक मनुष्यासाठी जो (ईमान धारकांकडे ) बोट दाखवितो आणि टोमणे मारतो. [१]

وَيْلٌ لِّكُلِّ هُمَزَةٍ لُّمَزَةٍ ۙ ﴿١﴾

२. ज्याने धन गोळा केले आणि त्याला वारंवार मोजून ठेवले.[२]

الَّذِي جَمَعَ مَالًا وَعَدَّدَهُ ۙ ﴿٢﴾

३. तो असे समजतो की त्याच्या संपत्तीने त्याला कायमचे जीवन प्रदान केले आहे.[३]

يَحْسَبُ أَنَّ مَالَهُ أَخْلَدَهُ ۚ ﴿٣﴾

४. मुळीच नाही ! [४] तो 'हुतमह' [५] (चुराडा करून टाकणाऱ्या अग्नी) मध्ये फेकून देण्यात येईल.[६]

كَلَّا ۖ لَيُنبَذَنَّ فِي الْحُطَمَةِ ﴿٤﴾

५. आणि तुम्हाला काय माहीत की 'हुतमह' काय आहे ? [७]

وَمَا أَدْرَاكَ مَا الْحُطَمَةُ ﴿٥﴾

६. अल्लाहची भडकवलेली आग, [८]

نَارُ اللَّهِ الْمُوقَدَةُ ۙ ﴿٦﴾

७. जी हृदयापर्यंत जाऊन पोहचेल. [९]

الَّتِي تَطَّلِعُ عَلَى الْأَفْئِدَةِ ﴿٧﴾

८. त्यामध्ये त्यांना बंद केले जाईल.

إِنَّهَا عَلَيْهِم مُّؤْصَدَةٌ ۙ ﴿٨﴾

९. उंचउच स्तंभात. [१०]

فِي عَمَدٍ مُّمَدَّدَةٍ ﴿٩﴾

१. मागील सूरतीच्या शेवटच्या आयतीमध्ये या गुणांचे वर्णन करण्यात आले होते. जे अखिरतमध्ये होणाऱ्या तोटयापासून वाचवणारे व यशाची हमी देणारे आहेत. हे गुण निष्ठावंताच्या चारित्र्याची वैशिष्ठये आहेत. परंतू संसारात रमलेल्या लोकांच्या नजरेत हयांची काही किमंत नाही. आणि विशेष करून जे लोक धनसंपत्तीचे पूजारी असतात ते अशा चरित्र्यवान लोकांना क्षुद्रच समजतात असे नव्हे तर त्यांचा अपमान व घृणा करण्याइतपत खालची पातळी गाठतात. संपत्तीचा गर्व त्यांच्यात नीचपणा निर्माण करतो आणि ते त्यांच्याकडे बोट दाखवितात (त्यांना नावे ठेवतात) की यांना फक्त आखिरतचाच ध्यास लागला आहे. व ते त्यांच्या धार्मिकवृत्तीची चेष्ठाकुचेष्ठा करतात. व जेथे संधी मिळते तेथे त्यांना टोमणे मारतात.

या सूरतीच्या अवतरणकाली कुरेश सरदारांची हिच स्थिती होती. ते संपत्तीच्या गर्वात गुरफटले होते. आणि जे लोक संपत्तीच्या मागे लागण्याऐवजी आखिरतची दौलत गोळ करीत होते त्यांच्याकडे बोट दाखवित असत की ही कोणत्या मानास पात्र आहेत. प्रतिष्ठीत लोक तेच आहेत ज्यांच्याजवळ धनसंपत्ती आहे,. ह्यांच्या धार्मिकतेची आणि संयमी व सदाचारी जीवनाची ते निरनिराळया प्रकारे थट्टा उडवित व खोचवू टोमणे मारीत येथे त्यांच्या या कृत्यांवर पकड केली आहे.

या संदर्भात ईमान धारकांना दोष देणे व टोमणे मारणे या वाईट कृत्यांना कंजूस भांडवलदारांची रीत असे संबोधिण्यात आले आहे. ती गोष्ट पुढील आयतीवरून स्पष्ट आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की अशी वृत्ती फक्त धनलोभी माणसातच दिसून येते. असे नव्हे तर आयतीचा मूळ उद्देश हा आहे की जो कोणी असे कृत्य करील तो स्वत: आपल्या विनाशास कारणीभूत ठरेल. सूरह-तौबा मध्ये जी मदनी सूरह आहे दांभिक लोकांकडून ईमान धारकांवर त्यांच्या दानधर्माबाबत टोमणे मारणेचा उल्लेख आलेला आहे. गरीब निष्ठावंत लोक मोलमजुरी करून जे काही कमावीत असत त्यातूनच अल्लाहच्या मार्गात ते खर्च करीत असत. भरपूर खर्च करण्यासारखे त्यांच्याजवळ काही नसे. परंतु दांभीक लोक त्यांची निंदा करीत असत.

اَلَّذِيْنَ يَلْمِزُوْنَ الْمُطَّوِّعِيْنَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ فِى الصَّدَقَاتِ وَا لَّذِيْنَ لَا يَجِدُوْنَ اِلَّا جُهْدَ هُمْ فَيَسْخَرُوْنَ مِنهُم۔ (التوبۃ۔۷۹)

"जे स्वेच्छेने दानधर्म करणाऱ्या ईमानधारकांवर त्यांच्या दानधर्माविषयी टोमणे मारतात व त्या लोकांची कुचेष्ठा करतात ज्यांना दानधर्माकरीता स्वत:च्या मोलमजूरीशिवाय काहीच आढळत नाही.'' (अत-तौबा. ७९)

जोपर्यंत आयतीच्या विशेष पैलूचा संबंध आहे म्हणजे संदर्भानुषंगाने याचा जो अर्थ आहे त्याचे स्पष्टीकरण वर केले गेले आता राहीला याचा सर्वसाधारण पैलू तर तो असा की शरीयतने ज्यालोकांचा आदर करणेची आज्ञा केली आहे. त्यांचा आदर करण्याऐवजी त्यांची मानहानी करणे त्यांच्यात दोष काढणे त्यांच्याविरूद्ध मनाला टोचतील अशा गोष्टी करणे. ह्या सर्व तिरस्करणीय वाईट सवयी आहेत. ज्याचा परिणाम आखिरत मध्ये फार वाईट होईल. मग ह्याचाकर्ता एखादा मुसलमानही का असेना.

येथे ही गोष्टदेखील स्पष्ट झाली पाहीजे की जून्या काळी दोष काढणे व टोमणे मारणेचे जे प्रकार प्रचलीत होते उदा. रस्त्याने जाताजाता डोळयाने इशारा करणे, बोट दाखविणे, आवाज काढणे, कोट्या करणे, वाईट नावे ठेवणे, टोचून बोलणे, आणि विशेषत: अपमानस्पद वाटतील अशा विडंबनात्मक कविता करणे इत्यादी. तर सध्याच्या काळात याशिवाय काही नव्या प्रकारांचीही भर पडली आहे. उदा. व्यंगचित्र, उपरोधकि लिखाण, विनोदी नाटके, टिकात्मक लेक खोडसाळ लेख जे आजच्या वर्तमानपत्राच्या सौंदर्यात भर घालणारे महत्वाचे अंग बनले आहेत व ज्याला आज कला मानली जाते ते सर्व

هَمَزْ وَلَمَزْ

"हम्ज व लमज'' (दोष काढणे व टोमणे देणे) याचीच आधूनीक प्रगतीशिल युगातील स्वरूपे आहेत. जर याद्वारे अशा लोकांची मानहानी करण्यात येत असेल ज्यांना शरीअतने प्रतिष्ठीत ठरविले आहे.

२. म्हणजे ही संपत्तीची घमेंड आहे जिने त्यांच्यात अशी मनोवृत्ती निर्माण केली की त्यांनी त्या गरीब लोकांना तुच्छ लेखावे आणि त्यांची चेष्टा करावी ज्यांनी आपल्या पालनकर्त्याशी योग्य संबंध निर्माण केला आहे. व आपल्या जीवनास सत्कृत्याने सुशोभित केले आहे.

धनाची पूजा करणाऱ्यांना नेहमीच पैशाची काळजी लागू राहीलेली असते. व लोभी भांडवलदार सदैव भंडवलाची हेरफेर करण्यात मग्न असतात. त्यांचे मन व्यवसायातच अडकून पडलेले असते. व त्यांची बुद्धी हिशोबातच लागलेली असते. त्यांचे सर्व ध्यान एकाच गोष्टीवर केंद्रित झालेले असते. त्यांच्या भांडवलात कोणत्या मार्गाने वाढ होईल आणि त्यांच्या बँकेची शिल्लक कशातऱ्हेने वाढली जाईल ही चिंता त्यांच्या मनास अशा रितीने हैराण करीत असते की यांना न अल्लाह व आखिरत विषयी विचार करणेस वेळ असतो ना मानसिक रित्या ते उपदेशपर केलेल्या गोष्टी ऐकण्यास तयार होतात. त्यांचे वाढते लोभ त्यांना अशा गोष्टीची परवानगी देखील देत नाही

की अल्लाहने प्रदान केलेल्या संपत्तीत अल्लाहच्या इतर दासांचा जो वाटा आहे तो त्यांनी द्यावा. उलट ते आपल्या संपत्तीवर साप होऊन बसतात.

धनाची पूजा करणाऱ्यांचा निषेध बायबलमध्येही फारच प्रभावीपणे केला गेला आहे. उदाहरणार्थ:

''पृथ्वीवर आपल्यासाठी संपत्ति साठिव नका: तेथे कसर व जंग खाऊन नाश करीतात. आणि चोर घर फोडून चोरी करीतात: तर स्वर्गात आपल्यासाठी संपत्ती साठवा. तेथे कसर व जंग खाऊन नाश करीत नाहीत व चोर घरफोडी करीत नाहीत व चोरीही करीत नाहीत; कारण जेथे तुझे घर आहे तेथे तुझे मनहि लागेल.''

(मत्तय ६:१९ ते २१)

''तुम्ही देवाची आणि धनाची चाकरी करू शकत नाही.'' (मत्तय ६: २४)

३. हे भांडवलपूजाऱ्यांच्या मानसिक वृत्तीचे चित्रण आहे. तो आपल्या मालमत्तेस जीवनाचे भांडवल समजतो. व ज्या जीवन पद्धतीचा स्विकार करतो त्यावरून हे स्पष्ट होते की त्याला या जगातच वास्तव्य करावयाचे आहे व कधीच मृत्य येणार नाही.

जेव्हा धन जगातील ऐषआराम ऐश्वर्य मिळविण्याचे एक साधन आहे म्हणून धनसंचय करणारे लोक हया भ्रमात गूरफटतात की संपत्ती त्यांच्याकरीता जणू जीवनप्रदान करणारी व त्यांच्या अस्तित्वास कारणीभुत आहे. तथापी संपत्तीत जीवन प्रदान करण्याची शक्ती नाही व अस्तित्व देण्याचीही शक्ती नाही. जर त्याच्यात जीवन प्रदान करण्याची शक्ति असती तर निश्चितय तिने माणसाला मानसिक समाधान मिळवून दिली असती. धनवान माणसाच्या नशिबी ही गोष्ट नसते आणि प्रत्येक क्षणी त्यांचे जीवन चिंतेने घेरलेले असते मात्र संयमी जीवन (ईशभय) स्विकारून मानव मानसिक शांती प्राप्त करतो स्पष्ट व्हावे की माणसास निरंतर जीवन प्रदान करणारी गोष्ट संयम (तकवा) आहे. संपत्ती नव्हे. कुरआनमध्ये निरनिराळया ठिकाणी ही हकीगत वर्णिली आहे आणि बायबल मध्ये त्याचे वर्णन अशाप्रकारे आहे की 'मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर ईश्वराच्या वचनाने जगतो.' (मत्तय- ४:४)

आणि सत्य असे की माणसाचे धन त्याच्या कबरीपर्यंतही साथ देत नाही. मग त्याला अमरत्व कसे प्रदान करील? परंतु आजही संपत्तीविषयी मानवाचे मत तेच आहे जे पुर्वी होते. म्हणजे तो संपत्तीस ऐहीक जीवनाचे साधन समजण्या व भलाईच्या कामात खर्च करण्याऐवजी तिच्याशी आपल्या अस्तित्वाची इच्छा बाळगतो व तिला गोळा करीत रहातो. मग गोळा करण्याचीही काही मर्यादा रहात नाही. लक्षाधीश झाल्यानंतर कोटयाधीश होण्याची अभिलाषा असते. व कोटयाधीश झालेनंतर अब्जाधीश. जेव्हा समाजात किती तरी लोक आपल्या मूल गरजा भागविणेस असमर्थ असतात. आणि पैशाची कमतरता असलेने भलाईची किती तरी कामे पूर्ण होत नाहीत.

थोडक्यात असे की कुरआनने संपत्ती गोळा करण्याच्या ह्या वृत्तीस निषेधार्ह ठरविले आहे. मात्र मानवाने आपल्या व संबंधीत असलेल्यांच्या योग्य गरजा पूर्ण करण्यास संपत्ती रोखून ठेवली तर ती गोष्ट वेगळी.

४. ह्या भांडवलपुजकांच्या अशा विचारांचे खंडन करण्यात आले आहे ज्याचे वर्णन वर देण्यात आले आहे.

५. मूळ ग्रंथात 'हुतमह' हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा अर्थ चुराडा करणारी व चेंदा करणारी असा आहे. हे जहन्नमचे नाव आहे. व तीचे ह्या वैशिष्ठये 'हम्ज व लम्ज' च्या निषेधहि सवयीच्या संदर्भात वर्णन करण्यात आले आहे. ज्याचा उल्लेख आयत १ मध्ये आला आहेस. यावरून हे स्पष्ट करण्याचा हेतू आहे की जी व्यक्ती अल्लाहच्या निस्वार्थ दासांचा अपमान करते, जहन्नम त्या व्यक्तीच्या इज्जतीची धूळधान करील व ईमान धारकांचा तिरस्कार केल्या मुळे त्याला चेंगरून टाकील.

विचार करा 'हुमजह व लुमजह' च्या संदर्भात 'हुतमह' या शब्दाने फक्त शब्दाचेच साम्य झाले नसून अर्थाच्या दृष्टीनेही औचित्य साधले आहे. आणि कुरआनच्या अलंकारीक शैलीचे व त्याच्याच चमत्कारचे हे एक लहानसे उदाहरण आहे.

६. फेकून देणे यात ह्या गोष्टीकडे इशारा आहे की तो धनसंपत्तीमूळे जी गर्विष्ठता दाखवित होता. त्याचे भान त्याला त्या वेळेस होईल जेव्हा जहन्नममध्ये तिरस्काराने फेकून दिले जाईल.

७. हा प्रश्न जहन्नमच्या भयंकर विनाशकारी स्थितीची जाणिव करून देण्याकरीता आहे.

८. हे 'हुतमहंचे' स्पष्टीकरण आहे. जे स्वत:अल्लाहने केले आहे.

९. इशारा या गोष्टी कडे आहे की ज्या हृदयात अल्लाहचे प्रेम असण्याऐवजी संपत्तीचे प्रेम होते त्या हृदायांवर ही आग चढून जाईल व हृदयात आग घुसण्याच्या परिणामी ज्या वेदना व दुख होतील त्या कैफियतीची कल्पना हृदय विकाराच्या रूग्णाच्या वेदनेवरून देखील करणे शक्य नाही.

१०. म्हणजे ते अग्निच्या उंचउंच स्तंभात वेढलेले असतील.

# १०५. सूरह अल-फील

**नाव:** पहिल्या आयतीत 'असहाबुल फील' (हत्ती वाले) चा उल्लेख झाला आहे. यावरून या सूरतीचे नाव 'अल-फील' असे आहे.

**अवतरण-काळ:** ही सूरह मक्की आहे व प्रेषित्वाच्या सुरवातीच्या काळी अवतिर्ण झालेल्या सूरतींपैकी आहे.

**मध्यवर्ती कल्पना:** अशा लोकांच्या परिणामाचे ऐतिहासीक व अद्दल घडविणारे उदाहरण जे संपत्ती व सत्तेच्या नशेत पवित्र काबागृहास जमीन दोस्त करण्याच्या हेतुने निघाले होते.

**ग्रंथ मांडणी:** ही संपूर्ण सूरह त्या ऐतिहासीक घटनेच्या अद्दल घडविणाऱ्या पैलूशी संबंधित आहे जी फीलची घटना या नावाने प्रसिद्ध होती.

आयत १ मध्ये या गोष्टीवर विचार करावयाचे आमंत्रण दिले आहे की ज्या सेनेने पवित्र काबागृहाला नेस्तनाबूत करण्याकरीता आगे कूच केली होती त्यांकरीता अल्लाहने त्यांच्याशी कसा व्यवहार केला.

आयत २ मध्ये त्या लोकांची चाल कशी उलटी पडली त्याचे वर्णन आहे.

आयत ३ व ४ मध्ये अल्लाहच्या सामर्थ्याच्या चमत्कारीचा उल्लेख आहे जो त्याच्या घराचे खंरक्षणाकरीता करणेत आला. आयत ५ मध्ये आक्रमण करणाऱ्यांच्या अद्दल घडविणारे परिणामाचे वर्णन केले गेले आहे. ज्याला इतिहासाने आपल्या पानात नेहमीकरीता सांभाळून ठेवले आहे.

# १०५. सूरह अल-फील

سُورَةُ الْفِيلِ

आयती - ५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. तुम्ही पाहीले नाही [१] की तुमच्या पालनकर्त्याने हत्तीवाल्यां बरोबर काय केले ?[२]

اَلَمْ تَرَ كَيْفَ فَعَلَ رَبُّكَ بِاَصْحٰبِ الْفِيْلِ ﴿١﴾

२. काय त्यांची युक्ती निष्फळ केली नाही?[३]

اَلَمْ يَجْعَلْ كَيْدَهُمْ فِيْ تَضْلِيْلٍ ﴿٢﴾

३. आणि त्यांच्यावर पक्ष्यांचे थवेच्या थवे.[४] पाठविले नाहीत?

وَّاَرْسَلَ عَلَيْهِمْ طَيْرًا اَبَابِيْلَ ﴿٣﴾

४. जे त्यांच्यावर पक्कया मातीचे [५] दगड फेकीत होते.[६]

تَرْمِيْهِمْ بِحِجَارَةٍ مِّنْ سِجِّيْلٍ ﴿٤﴾

५. मग त्यांना असे करून टाकले जसे खाऊन टाकलेला कुटारा. [७]

فَجَعَلَهُمْ كَعَصْفٍ مَّاْكُوْلٍ ﴿٥﴾

१. संबोधन पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना केले असले तरी खरा उद्देश कुरेश व अरब रहिवाश्यांना संबोधण्याचा आहे जे या घटनेशी चांगलेच परिचित होते.

२. हत्तीवाले (असहाबुल-फील) शी अभिप्रेत अब्रहा व त्याची सेना आहे. ज्याने आपल्या हत्तीना घेऊन अल्लाहच्या पवित्र घरावर चढाई केली होती. ह्या घटनेच्या तपशिलाच कुरआनने वर्णन नाही दिले कारण या घटनेशी अरब मधील मुलेसुद्धा परिचित होती. या सूरतीचे अवतीर्ण होणेच्या वेळी या घटनेची माहीती असणारे लोकही जीवंत होते. म्हणूनच कुरआनने त्याचा तपशील न देता फक्त त्याच्या अद्दल घडविणाऱ्या पैलूकडे इशारा केला व अल्लाहच्या त्या उपकाराचा उल्लेख केला की त्याने असामान्य मार्गाने आपल्या घराचे कसे संरक्षण केले. हदीसमध्ये देखील हजरत मुहम्मद पैगंबर यांचेकडून या घटनेचा काही तपशिल मिळत नाही. मात्र रिवायत (कथन) च्या काही पुस्तकात त्याचा तपशिल आढळते. विशेषत: सिरत इब्ने इसहाक मध्ये या घटनेचा तपाशीलवार उल्लेख आहे. परंतु यात काही अतिशयोक्तीही आहे. इतर कथनाबद्दलही कमीजास्त प्रमाणात हिच स्थिती आहे. याकरीता आम्ही त्या रिवायातना डोळया समोर ठेवून फक्त तेच तपशिल देऊ ज्याचे समर्थन कुरआनमध्ये होते किंवा ज्याच्या स्विकृती बद्दल काहीच वाद नाही. ही घटना इ. स. ५७० किंवा ५७१ ची आहे. त्यावेळी यमन देशात अब्रहा नामी ख्रिश्चन राजा राज्य करीत होता. जो अबिसिनीयाचा मांडलीक होता. अरबांचे श्रद्धास्थानाचे स्वरूप काबागृह घेत आहे, व दरवर्षी तेथे हज्जकरीता मोठा मेळावा होत आहे हे पाहून त्याच्या मनात द्वेष निर्माण झाला. आणि ह्या भावनेच्या परिणामी सनआ येथे एक मोठा भव्य असा चर्च बांधला. यास्तव की अरबांच्या हज्ज करणेची दिशा या चर्चकडे असावी. व याच कारणापोटी त्याने काबागृहास पाडून टाकण्याचा बेत रचला होता. व साठ हजार सैन्याची तुकडी घेऊन याकरीताच तो मक्केस निघाला. या सेनेच्या पुडे हत्ती होते. व यामुळेच हे लोक 'हत्तीवाले' (असहाबुल फील) या नावाने ओळखले जातात.

हे सैन्य जेव्हा यमनहून मक्केकडे निघाले तेव्हा वाटेत काही अरब टोळयांनी यांचा प्रतिकार केला परंतु त्या अरबांना यांना रोखण्यात यश लाभले नाही व हे सैन्य मिना येथील मुहस्सिर दरात पोहचले. ही जागा मक्कापासून काही मैल अंतरावरच होती.

इकडे कुरेशना जेव्हा या सैन्याबद्दल बातमी कळली तेव्हा त्यांचा सरदार अब्दूल मुत्तलीब (जे हजरत मुहम्मद पैगंबर यांचे आजोबा होते) यानी काबागृहाच्या दारास धरून अल्लाहजवळ प्रार्थना केली.त्या प्रार्थनेत कुरेशचे इतर लोकही सामील होते. यावेळेस सरदार अब्दूल मुत्तलीब यांनी जी वचने पठन केली ती अशी-

لَاهُمَّ اِنَّ الْعَبْدَ يَمْنَعُ رَحْلَهٗ فَامْنَعْ رِحَالَكَ

हे अल्लाह ! दास आपल्या घरातील लोकांचे रक्षण करतो. तु देखील तुझ्या लोकांचे रक्षण कर,

لَا يَغْلِبَنَّ صَلِيْبُهُمْ وَمَحَالُهُمْ غَدْوًا مِحَالَكَ

उद्य उसें होऊ नये कीं त्यांच्या क्रॉसने व शक्तीने तुझ्या शक्तीवर विजय मिळवावा.

اِنْ كُنْتَ تَارِكَهُمْ وَقِبْلَتَنَا فَاَمْرٌ مَا بَدَا لَكَ

जर तू त्यांना व आमच्या किबल्यास असेच सोडून देऊ इच्छित असेल तर मग तुझी इच्छा. (सिरत इब्ने हिशाम खंड १ पा. ५१)

कुरेश जे संख्येने फारच कमी होते त्यांच्या करीता साठ हजार सेनेबरोबर लढणे फारच कठीण होते. जरी त्यांच्यात लढाई झाली असती तरी त्यांना यश मिळेलच याबद्दल विश्वास नव्हता. आणि हा तर अल्लाहच्या घराचा प्रश्न होता.

ह्या घराचे रक्षण, हे पहिले घर जे जगात अल्लाहच्या इबादतीकरीता उभारण्यात आले. त्याच्या असामान्य मुल्य व श्रेष्ठत्वाची हिच निकड की त्याचे रक्षण देखील असामान्य पद्धतीने झाले पाहिजे. आणि म्हणूनच ईश-कोप आवेगात आला व त्याने त्या सैन्यास पुढे येऊ दिले नाही. अब्रहाचा खास हत्ती जो सर्वात पुढे पुढे होता. तो मुहस्सिर घाटात अचानक बसून राहीला. त्याला मारमारून जखमी करण्यात आले परंतु तो उभा राहू शकला नाही.त्याला यमन सिरीया किंवा पूर्वेकडे वळवण्याचा प्रयत्न केला तर तो उठून पळू लागे परंतु जेव्हा मक्केकडे वळविण्यात येत असे तेव्हा लगेच बसून जाई.एवढ्यात पक्षांचे थवेच्या थवे आले. ज्यांच्या चोचीत व पायात खडे होते. ज्यांचा वर्षाव त्यांनी सैन्यावर केला. या खड्यांचे वैशिष्ट्य असे होते की ते ज्यांना लागत त्यांच्या शरीराच्या त्या भागावर फोड येत असत आणि पिप व रक्त वहात राही. व काही वेळेतच संपूर्ण शरीर विरघळू लागे. इतर कथनाने खुलासा होतो त्याप्रमाणे हा माताच्या रोगासारखा प्राणघातक रोग असावा जो अचानक आला होता. खडे, जे भाजलेल्या मातीपासून तयार झाले होते, इतके विषारी होते की ज्याला खडा लागला त्याचे शरीर सडण्या गळण्यास सुरू होत असे ह्या साथीच्या रोगाने सैन्यास अशा प्रकारे वेढून

टाकले की त्यांच्यात जबरदस्त धावपळ झाली. व मृतावर मृत पडून ढिग जमू लागले. अब्रहाची स्थिती तर फारच वाईट झाली होती. त्याच्या शरीरातून रक्त व पिप वाहू लागले. व शरीरातून मास गळू लागले होते. शेवटी त्याची छाती फाटली व तो वाईट रित्या मेला.

हि घटना मुहर्रमच्या महिन्यात घडली होती. आणि त्याच वर्षी हजरत मुहम्मद पैगंबर यांचा शूभ जन्म झाला. (अल बिदायह वन निहायह खंड १ पा. १७५)

ह्या घटनेचा सर्वात महत्वाचा पैलू हा आहे की अल्लाहने आपल्या घराच्या रक्षणाकरीता असामान्य पद्धत स्विकारली होती. पक्षांकडून खडयांचा वर्षाव जो बंदुकीच्या गोळीचे काम करी अल्लाहच्या चमत्काराची एक निशाणी होती. जी प्रकट झाली. आणि अशा प्रकारच्या निशाण्या महत्वाच्या व विशेष प्रसंगी अल्लाहकडून प्रकट केल्या जातात.

जर याकरीता ऐतिहासीक पुराव्याची गरज असेल तर इतर पुराव्याऐवजी कुरआन स्वत:च एक मोठा ऐतिहासीक पुरावा आहे. कारण जर कुरआनचे निवेदन चुकीचे असते. व ही गोष्ट त्याच लोकांच्या मनात येऊ शकते ज्यांच्या मनात कुरआनच्या सत्यतेविषयी संदेह आहे. तर मक्केच्या रहिवाशांनी जरूर यांचे खंडन केले असते. परंतु ह्या घटनेस प्रत्यक्ष डोळयांनी पहाणारे काही त्यांच्यात होते आणि घटनेच्या प्रसिद्धीमुळे ते ह्या घटनेशी चांगलेच परिचित होते. याकरीता कुरआनच्या निवेदनास चुकीचे ठरविण्याचे कोणातच धाडस नव्हते. या व्यतिरिक्त इस्लामपूर्व अरब कबींनीन ह्या घटनेचा आपल्या काव्यात उल्लेख केला आहे. उदाहरणार्थ नुफैल आपल्या काव्यात म्हणतो: (नुफैल हा ह्या घटनेस प्रत्यक्ष पहाणाऱ्यापैकी एक आहे.)

حَمِدْتُ اللهَ اِذَا اَبْصَرْتُ طَيْرًا

मी अल्लाहचे आभार मानले जेव्हा पक्षांना पाहिले.

وَخِفْتُ حِجَارَةً تُلْقَىٰ عَلَيْنَا

आणि घाबरलो की एखादा दगड न लागो ज्याचा वर्षाव आम्हांवर होत होता.

आणि अब्राहाच्या पराभवाविषयी उल्लेख तो असा करतो

اَيْنَ الْمَفَرُّ وَالْاِلٰهُ الطَّالِبُ

आता पळून कोठे जावे जेव्हा अल्लाहच पाठलाग करीत आहे.

وَالْاَشْرَمُ الْمَغْلُوْبُ لَيْسَ الْغَالِبُ

आणि नकटा (अब्रहा) पराभूत आहे विजयी नाही. (सिरते इब्ने-हिशाम खंड १ पान ५३ व ५४)

३. म्हणजे अब्रहा व त्याच्या सैन्याने काबागृहास पाडण्याच्या हेतुने जी चाल केली होती त्याला अल्लाहने अयशस्वी केले. आणि ते आपल्या दृष्ट निश्चयात कधीच यशस्वी होऊ शकले नाही.

हत्तीवाल्यांच्या चालींना अयश्स्वी करण्यात मुर्ती किंवा देवी देवतांचा काहीच हात नव्हता उलट हा अल्लाहच्या सामर्थ्यांचा चमत्कार होता. जो त्यांच्यावर आपत्तीच्या स्वरूपात प्रकट झाला होता व अरब रहिवाशी देखील हे मान्य करीत होते. म्हणून अरब कविंनी त्यास अल्लाहच्या सामर्थ्यांचा चमत्कार मानला आहे आणि कुरेशनी सुद्धा अब्दुल मुत्तलिब बरोबर काबागृहाच्या दारावर जी प्रार्थना केली होती ती अल्लाहकडेच प्रार्थना होती. मुर्तीजवळ नव्हे. हा त्या गोष्टीचा पुरावा आहे की एकेश्वरवाद हे सत्य आहे. ज्याचे आमंत्रण हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) देत आहेत. व मुर्तीपूजा खोटी आहे.

४. हा तपशिल या गोष्टीचा की हत्तीवाल्यांच्या युक्त्या अल्लाहने कशा असफल केल्या त्याचे स्वरूप असे की अल्लाहने त्यांना बरबाद करण्याकरीता पक्षांचे थवेच्या थवे पाठवले. दुसऱ्या शब्दात हत्तीवाल्या सैन्यांचा मुकाबला पक्षांच्या लषकराने केला.

कथनकारांनी असे वर्णन केले आहे की हे पक्षी वेगळया प्रकारचे होते व समुद्राकडून आले होते.

५. मूळग्रंथात सिज्जील हा शब्द वापरण्यात आला आहे. जो फारशीचे दोन शब्द संग व गील यांच्या एकत्रीकरणावरून तयार झाला आहे. अभिप्रेत ते खडे आहेत जे भाजलेल्या मातीपासून तयार झालेत. (ज्याला मराठीत खंगर शब्द आहे). ज्वालामुखी डोंगराळ भागात लाव्हारसा मुळे जी माती दगड बनते. कदाचीत या दगडांना सिज्जिल म्हटले गेले असेल. व यात काही आश्चर्य नाही की पक्ष्यांनी हे दगड आपल्या चोचीतून व पायात पकडून जवळच्या एकाद्या ज्वालामुखी भागातून आणले असावेत. आणि त्यांच्यात काही विषारी पदार्थ असतील. किंवा त्यांच्यात काही विषारी जंतू असण्याचीही शक्यता असावी. ज्याच्यामुळे प्राणघातक साथीच्या रोगाचे स्वरूप निर्माण झाले असावे काहीही असो हे दगड इतर दगडाप्रमाणे साधारण नव्हते. उलट ते विशेष प्रकारचे दगड होते. याकरीता कुरआनने ह्या विशेषणासह त्याचा उल्लेख केला की ''सिज्जीलच्या प्रकारचे गदड''

६. पक्षांचा हा खंगर वर्षाव जणू आकाशाचा बॉबवर्षाव होता ज्याने हत्तीचा विध्यवंस केला व हत्तीवाल्यांचाही.

पक्षांच्या दगड खाली टाकण्यास दगडांचा वर्षाव (تَرْمِيْهِمْ

तर्मिहीम ) संबोधण्याचे कारण त्यांनी सैन्यांवर दगडांचा असा वर्षाव केला की ते संपूर्णत: त्याच्या घेऱ्यांत सापडले जणू बाण होते जे बरोबर निशाण्यावर बसले. ही परिस्थिती होण्यास वाऱ्याचाही काही हात असेल म्हणजे त्यावेळेस असा सोसाट्याचा वारा सुटला असेल म्हणूनच यामुळे अरब कवींनी पक्ष्यांच्या ह्या दगड वर्षावास 'हासीब' (दगडांचा वर्षाव करणारे तुफान) याने संबोधले आहे.

हत्तीवाल्यांवर पक्षांचे जे थवेच्या थवे धाडण्यात आले होते त्याचे एक कारण असे सांगण्यात येते की हे पक्षी हत्तीचे मृतदेह खाण्याकरीता आले होते. दगडांचा वर्षाव करण्याकरीता नव्हे. परंतु वाक्यार्थाच्या संदर्भावरून हे स्विकारहि नाही. व पंक्षांनी हत्तीचे मृतदेह खाण्यास येणे हे इतके महत्वाचे नाही की ज्याचे कुरआनने इतक्या तपशिलासह वर्णन करावे. म्हणून स्पष्टीकरण करणाऱ्या विद्वानांनी या आयतींचा जो अर्थ सांगितला आहे तोच बरोबर आहे. व त्यावरूनच असे समजते की हे पक्षी मृतदेह खाणेकरीता आलेले नव्हते उलट त्यांना मारण्याकरीता आले होते.

राहीला हा प्रश्न की कुरेश जे काबागृहाचे विश्वस्त होते त्यानी सैन्याचा मुकाबला केला किंवा नाही? तर सत्य हे आहे की त्यांची सेनेबरोबर झडप झालीच नाही. ते मक्केत होते व सैन्य मिना व मुझदलिफाच्या दरम्यान होते. म्हणूनच ते भिऊन डोंगरात लपले होते हे चुकीचे आहे. ज्याप्रमाणे काही कथनात त्याचा उल्लेख आहे. व हे ही समजणे बरोबर नाही. की त्यांनी डोंगरावरून सैन्यावर दगडांचा वर्षाव केला होता. डोंगरात लपण्याच्या गोष्टीस याकरीता मान्य करता येत नाही. कारण कुरेश भ्याड नव्हते व जेव्हा वाटेत अरबांच्या इतर काफल्यांनी या सैन्याचा मुकाबला केला होता ज्यांच्या उल्लेख त्याच कथनामध्ये आला आहे. तेव्हा कुरेशांनी सैन्याला का रोखले नसते. त्यांचा स्वाभिमान व हिम्मत ही गोष्ट कशी सहन करू शकली असती की काबागृहाला सोडून सर्वांनीच पलायन करावे?व अल्लाहच्या घरावर कुरबान होण्यास एकही जण शिल्लक राहू नये? अब्दुल मुत्तलिबने केलेल्या प्रर्थनेच्या वचनावरून ज्यांचा उल्लेख वर आला आहे. डरपोक असणेचा थोडादेखील संशय येत नाही. तथापि कुरेश संख्याबळाच्या प्रभावी जे एवढया मोठ्या सैन्याचा मुकाबला करू शकत नव्हते. म्हणून अल्लाहने आपल्या घराच्या रक्षणाची असामान्य व्यवस्था केली. राहीला हा दावा की त्यांनी डोंगरावरून दगडांचा वर्षाव केला पक्षांनी नव्हे. तर ह्या दाव्यास काहीही पुरावा नाही. जेव्हा कुरेश या सैन्याजवळ येऊन ठेपले हे सिद्ध होत नाही तेव्हा त्यांच्या दगडांचे वर्षाव करण्याचा प्रश्नच उरत नाही.

७. म्हणजे त्या हत्तीवाल्यांना अल्लाहने अशी भयंकर धडा देणारी शिक्षा केली की ते सर्व कुजलेल्या गळलेल्या मृतदेहांचे ढिगे झाले.खाऊन चोथा झालेला कुटाऱ्याची उपमा देणेचा अर्थ हा आहे की ज्याप्रमाणे कुटारा एक टाकाऊ वस्तू आहे आणि त्याला काहीच किंमत नाही त्याप्रमाणे ते शक्तीशाली सैन्य पायदळी तुडवले गेले. एखादे जनावर ज्यावेळी कोंडा खाते तेव्हा त्याचे स्वरूप एकदमच विद्रुप होते. हत्तीवाल्यांच्या मृतदेहांचे असेच स्वरूप झाले म्हणून त्यांची खाऊन टाकलेल्या कुटाऱ्याशी (भूस) तुलना करण्यात आली आहे.

## काबागृहावर अब्रहाचा लष्करी हल्ला दर्शविणारा नकाशा



# १०६. सूरह कुरैश

**नाव:** पहिल्या आयतीत कुरैशाचा उल्लेख करण्यात आला आहे यावरून या सूरतीचे नाव कुरैश असे आहे.

**अवतरण काळ:** या सूरतीत رَبَّ هٰذَا الْبَيْتِ 'रब्ब हाज़ल बैत' (या घराचा पालनकर्ता) हे शब्द आले आहेत जे ह्या गोष्टीचा पुरावा आहेत की ही सूरत मक्की आहे कारण 'या' काबागृहाकरीता 'हाजा' हा संकेतवाचक शब्द मक्केत अवतिर्ण होण्याच्या स्थितीतच प्रसंगानरूप ठरला असता मजकूरावरून अंदाज होतो की ही सूरह,सूरह-फील नंतर अवतिर्ण झाली असावी.

**मध्यवर्ती कल्पना:** कुरैशवर अल्लाहचा हा हक्क आहे की त्यांनी अल्लाहचीच इबादत (उपासना) करावी.

**ग्रंथ मांडणी:** आयत १ व २ मध्ये कुरेशांच्या त्या आसक्तिस त्यांना त्यांच्या व्यपारिक सफरीबाबत होती, ती आश्चर्य कारक ठरविण्यात आली. कारण त्यांना ही देणगी अल्लाहच्या घरामुळे प्राप्त झाली होती. परंतु ते अल्लाहशी कृतन्घता दाखवीत होते.

आयत ३ मध्ये अल्लाहच्या ह्या देणगीच्या मागणीचे वर्णन करणेत आले आहे की त्यांनी फक्त अल्लाहची इबादत करावी.

आयत ४ मध्ये सांगितले आहे की उदरनिर्वाहाचे साधन व शांती अल्लाहनेच प्रदान केलेल्या देण्ग्या आहेत. तेव्हा याचा स्वीकार करून अल्लाहचीच इबादत केली पाहीजे.



فَلْيَعْبُدُوا رَبَّ هٰذَا الْبَيْتِ

# १०६. सूरह कुरैश

سُورَةُ قُرَيْشٍ

आयती - ४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. केवढी [१] आसक्ति आहे कुरेशांना ! [२]

لِإِيلَافِ قُرَيْشٍ ①

२. ती आसक्ति जी त्यांना हिवाळा व उन्हाळयातील प्रवासासंबंध आहे. [३]

إِيلَافِهِمْ رِحْلَةَ الشِّتَاءِ وَالصَّيْفِ ②

३. म्हणून त्यांचे हे कर्तव्य आहे की या घराच्या [४] पालनकर्त्याची इबादत (उपासना) करावी. [५]

فَلْيَعْبُدُوا رَبَّ هَٰذَا الْبَيْتِ ③

४. ज्याने त्यांना भूके पासून वाचवून खावयास दिले आणि भिती पासून वाचवून शांती प्रदान केली. [६]

الَّذِي أَطْعَمَهُم مِّن جُوعٍ وَآمَنَهُم مِّنْ خَوْفٍ ④

१. लि (लाम मजरूर) हा शब्द येथे आशचर्याच्या संदर्भात आहे ज्याला अरबीमध्ये लामे तअज्जूब (आश्चर्य व्यक्त करणारा) म्हणतात इब्ने जरीर तबरी यांनी देखील या अर्थालाच प्राधान्य दिले आहे. याकरीता आम्ही 'लि ईलाफि' चे भाषांतर केवढी आसक्ति आहे असे केले आहे.

२. कुरैश एका कबील्याचे नाव आहे. ज्यांच्या हातात काबागृहाची व्यवस्था पाहण्याचे काम होते. हजरत इब्राहीम यांनी आपले पुत्र हजरत इस्माईल यांना मक्केच्या भूमिवर स्थायिक केले होते. कुरैश त्यांच्याच वंशातून होते. या कबील्याच्या एका शाखेस बनी हाशिम संबोधण्यात आले. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा संबंध याच घराण्याशी आहे.

३. मक्केची जमीन शेतीस उपयुक्त नव्हती. याकरीता कुरैशानी व्यापारास आपला व्यवसाय केले होते. तेव्हा त्यांचे व्यापारी काफीले हिवाळयात यमनच्या वाटेने निघत असत आणि उन्हाळयात सिरीया व पॅलेस्टाईनकडे जात. हे व्यपारी सफर त्यांच्या उपजिविकेचे फार मोठे साधन होते. व त्यांच्या संपत्तीत भर टाकणारे होते. व ते ज्या मार्गाने जात तो मार्ग जरी आंतरराष्ट्रीय राजमार्ग समजला जाई तरी सामान्यत: अशांतता व लूटमारीमुळे सुरक्षित नव्हता. तरी देखील कुरैशांच्या व्यापारी काफीले बिनधोकपणे ये जा करीत असत.कारण काबाचे विश्वस्त व व्यवस्थापक होण्याच्या नात्याने लोक त्यांना मान देत व त्यांचा आदर करीत. या व्यतिरिक्त त्यांनी त्या राज्यातील राज्यकत्याकडून व्यापारी सवलती मिळवल्या होत्या कि त्यांनी विना अडथळा त्यांच्या राज्यात येजा करावी तेव्हा हाशमनी जे हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) पैगंबर यांचे पणजोबा होत सिरीया रोम व गस्सानच्या राजांकडून, अबदे शम्स यांनी नज्जाशी कडून नुफैल यांनी सायरस कडून व मुत्तलीब यांनी हिमयर (यमन) च्या राजाकडून अशा सवलती प्राप्त केल्या होत्या. (अल बिदायह वन-निहायह खंड ११ पा. २५३)

या प्रकारे अल्लाहच्या घरामूळे त्यांच्या उपजिविकेचे मार्गही मोकळे झाले होते. व सर्वत्र अशांतता असतांना देखील त्यांचा प्रवासही शांततेत पार पडत असे.या फायद्यामुळे त्यांना त्यांच्या व्यापारी सफरी विषयी आसक्ति वाटत असे. म्हणून ते नियमितपणे हिवाळयात यमन देशी व उन्हाळयात सिरीया व पॅलेस्टाईनचा प्रवास करीत. यमनचा प्रदेश उष्ण असल्याकारणाने हिंवाळयात त्याठिकाणी जात आणि सिरीया व पॅलस्टीनचा भाग थंड असल्या कारणाने उन्हाळयात त्या ठिकाणावर जाणे पसंत करीत.

ह्या आयतीत त्यांच्या त्या व्यापारी सफरीच्या आसक्ति व आपुलकीस या आधारावर आश्चर्यकारक ठरविण्यात आले कि ते आपल्या वागणुकीने कृतघ्नतेचा पुरावा देत आहेत. कारण या देणग्या अल्लाहच्या घरामुळे त्यांना प्राप्त होत आहेत. परंतु ते अल्लाहच्याच हक्कास विसरून गेले. ते अल्लाहने दिलेले खात आहेत परंतु गुनगान करीत आहेत मुर्तीची.

४. ह्या घरास अभिप्रेत काबागृह आहे.

५. कुरेशांना निर्देश करण्यात आले आहे की जेव्हा तुम्ही या घरास अल्लाहचे घर मानता तर तुम्हास त्याचा हक्क अदा करणे भाग आहे. व तो हक्क हा की तुम्ही फक्त अल्लाहचीच इबादत (उपासना) करावीव त्याच्या उपासने बरोबर इतरांची उपासना करून नये. याप्रमाणे या घरामुळे तुम्हाला जे व्यापारी फायदे होत आहेत व जी सुखे तुम्हास मिळत आहेत. त्यांची मागणी हीच आहे की त्या घराच्या पालनकर्त्याचे कृतज्ञ दास होऊन रहा. व कृतघ्नतेचे वर्तन स्विकारू नका.

काबागृहाची उभारणी अल्लाहची इबादत करण्या करीता झाली होती मग त्या घराच्या विश्वस्तांकरीता अल्लाहची इबादत करण्याऐवजी मुर्तीपूजा करण्यास कोणते निमित्त घडले?

६. या काळात अरबांची आर्थिक स्थिती दयनीय होती. व या ठिकाणची भौगोलीक परिस्थिती अशी होती की अन्नधान्याचा तीव्र तुटवडा पडत असे. जणू हा दारिद्रय उपासमारीचा व दुष्काळी प्रदेश होता. यावर ताण अशी की टोळी संप्रदाय असल्यामुळे व कोणाचेच मजबूत शासन नसल्याने फारच अशांतता माजली होती. हत्या, लुटमार व रक्तपात अशा घटनांनी त्यांच्या जीवनाची शांतता हिरावून घेतली होती. परंतु कुरेशाची स्थिती आर्थिक दृष्ट्याही उत्तम होती व त्याचबरोबर त्यांचे जीवन शांत व सुरळीत होते. आर्थिक दृष्ट्या स्थिती उत्तम असण्याचे कारण तर त्यांच्या यशस्वी व्यापारी सफरी होत्या राहीला शांतता व सुरक्षित्ताचा प्रश्न तर त्यांना ही सुखे मक्का शहरातही लाभली होती व त्याच्या बाहेरही. मक्केत काबागृह (हरम) असल्याने व बाहेर पडल्यानंतर कोणतीच व्यक्ती किंवा काफिला वा राजा त्यांच्यावर हात टाकण्याचे धाडस करीत नसत,कारण ते काबागृहाचे संरक्षक व हज्ज करीता येणाऱ्यांचे सेवक संमजले जात होते थोडकयात असे की कुरेशांना या दोन्ही देण्ग्या म्हणजे उपजिविका व शांततमय जीवन ज्या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. अल्लाहच्याच कृपेमुळे लाभल्या होत्या. याकरीता अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करणे व त्याचा हक्क अदा करणे त्यांचे कर्तव्य होते. मुर्तीचा त्यांच्यावर काहीच हक्क नव्हता कारण मुत्यांना भुक शमवित होत्या ना भीतीची स्थिती दूर करण्यामध्ये त्यांचा काही भाग होता.

या सूरतीत एक अल्लाहची इबादत (उपासना) करणेचा आदेश जरी कुरेशना संबोधून दिला गेला आहे तरी वस्तूत: हे सर्व मानवा करीताच होय. कारण सर्व मानवांचा पालनकर्ता तोच आहे जो काबागृहाचा पालनकर्ता आहे.

## कुरैश आणि हज़रत मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम )यांची संक्षिप्त वंशावळ




(तपशीलासीठी पाहा 'सीरत इब्ने हिशाम' खंड १ पान १, २, ११८,११९,१२० आणि पाहा
''अलबिदायह-वन-निहायह खंड २ पान १९३,२००,२५९)

# १०७. सूरह अल् -माऊन

**नाव :** शेवटच्या आयतीत 'माऊन' (सम्पत्तिचा हक्क) अदा न केल्यास शिक्षेची धमकी आली आहे. तद्नुसार या सूरहचे नाव 'अल् माऊन' आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे. आणि मजकूरावरून असे दिसून येते की ही सूरह आरंभ-काळात अवतरीत झाली असावी.

**मध्यवर्ति कल्पना :** त्या चारित्र्यास डोळयासमोर आणणे जे मोबदला व शिक्षेचा नकार दर्शविल्याने निर्माण होते. अशासाठी की लोकांनी अशा चारित्र्याच्या दुष्परिणिती पासून सावध व्हावे.

**आयत रचना :** आयत क्र. १ मध्ये त्या व्यक्तिच्या चारित्र्य संबंधी विचार चिंतन करण्याचे आवाहन दिले गेले आहे, जी मोबदला व शिक्षेचा इन्कार करते.

आयत क्र. २ व ३ मध्ये हे दर्शविले गेले आहे की अशाच प्रकारचे लोक समाजाच्या कमजोर व दुर्दशाग्रस्त लोकांशी अपर्यादपणे व कठोर हृदयी होऊन वर्तन करतात.

आयत क्र. ४ ते ६ मध्ये यांच्या परंपरागत नमाज (प्रार्थने) ला निरर्थक ठरविले गेले आहे.

आणि आयत क्र. ७ मध्ये त्यांच्या कृपण स्वभावं धर्माबाबत त्यांची पकड केली गेली आहे.

**पार्श्वभूमी :** पार्श्वभूमीत कुरेश चे ते सरदार (टोळी प्रमुख) होत ज्यांना आपल्या धार्मिकते संबंधी व काबागृहाचे विश्वस्त असण्याबाबत मोठा अभिमान होता परंतु नितिमत्ता व आचरणाच्या दृष्टीने अत्याधिक अधोगतीस बळी पडले होते. ज्या विषयी काही उदाहरणे या सूरह मध्ये सादर केली गेली आहेत.

# १०७.सूरह अल् -माऊन

سُورَةُ الْمَاعُون

आयती - ७

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. तुम्ही त्या माणसाला पाहिले जो कर्मफळास खोटे ठरवितो.[१]

أَرَءَيْتَ الَّذِي يُكَذِّبُ بِالدِّينِ ۝١

२. तोच [२] की जो अनाथास धक्के देतो. [३]

فَذٰلِكَ الَّذِي يَدُعُّ الْيَتِيمَ ۝٢

३. आणि दीन दुबळयास जेऊ घालण्या संबंधी प्रोत्साहन देत नाही.[४]

وَلَا يَحُضُّ عَلٰى طَعَامِ الْمِسْكِينِ ۝٣

४. तर, अशी नमाज पडणाऱ्यांकरिता सर्वनाश आहे .[५]

فَوَيْلٌ لِّلْمُصَلِّينَ ۝٤

५. जे आपल्या नमाज बाबत गाफील आहेत. [६]

الَّذِينَ هُمْ عَنْ صَلَاتِهِمْ سَاهُونَ ۝٥

६. जे दिखाव्याची कृत्ये करतात. [७]

الَّذِينَ هُمْ يُرَاءُونَ ۝٦

७. आणि सम्पत्तिचा हक्क अदा करीत नाही.[८]

وَيَمْنَعُونَ الْمَاعُونَ ۝٧

१. अर्थात तुम्ही त्या माणसाच्या स्थिती संबंधी विचार केला जो आचरणाच्या मोबदल्याविषयी नकार दर्शवितो. त्याचे चारित्र्य किती अवनत व त्याची धार्मिक आचार संहिता किती अवास्तव आहे! कोणीही अशा माणसाच्या स्थिती संबंधी विचार करील. तर त्याच्या अंतर्यामी ही जाणीव निश्चितपणे उद्भवेल की चरीत्र्यशुद्धी व खऱ्या धर्मनिष्ठे करीता आखिरत व ईमान आणणे अत्यावश्यक आहे.

२. याचा अर्थ 'आखिरत' चा इन्कार करणाऱ्यामध्ये जे नैतिक व आचरणा संबंधीचे दोष निर्माण होतात त्यांचे प्रतिबिंब या चरित्र्यात दाखविले जाऊ शकते.

३. अनाथास धक्के देणे म्हणजे त्याचा माल (धनसम्पत्ति गिळंकृत करणे, त्याचा हक्क मारणे, त्याला झिडकारणे, त्याला तुच्छ लेखणे व त्याचा अपमान करणे तसेच त्याला धक्के देऊन आपल दारावरून हाकलून लावणे हे ही अभिप्रेत आहे.

कुरआनने केवळ अनाथांचे हक्क अदा करण्याचीच ताकीद केली नाही, तर त्यांची कदर करण्याचाहि आदेश दिला आहे यास्तव 'सूरह फज्र' मध्ये फर्माविले गेले आहे.

كَلَّا بَلْ لَّا تُكْرِمُوْنَ الْيَتِيْمَ (الفجر-١٧)

"नव्हे, किंबहुना तुम्ही अनाथांची कदर करीत नाही. अर्थात अनाथांची हेळसांड करणे ह्या लोकांचा परिपाट आहे. त्याची ईश्वरासमोरील उत्तर दायित्वविषयी कल्पनाच नाही."

४. याचे स्पष्टीकरण 'सूरह फज्र' टिप क्र. २३ मध्ये आले आहे. हे स्पष्ट व्हावे की दीनदुबळयास जेऊ घालणे हे आपल्या परीनेच एक सत्कर्म होय. मग तो दीनदुबळा मुस्लिम असो किंवा मुस्लिमेतर आणि अनाथास धक्के देणे सर्वथा दुष्कर्म होय. मग त्या अनाथाचा संबंध कोणत्याही धर्माशी व जातीशी असो.

ज्या वेळी ही सूरह अवतरली त्यावेळी मक्केत मुसलमानांची संख्या फार अल्प प्रमाणात होती अगदी बोटांवर मोजता येण्याजोगी. परंतु जेव्हा यांना दीन दुबळयास जेऊ घालण्याचा व तत्संबंधी प्रोत्सहन देण्याचा आदेश दिला गेला तेव्हा हा या गोष्टीचा पुरावा होता की इस्लाम आपल्या अनुयायीं मध्ये मनुष्य सहानुभूतिची अशी भावना निर्माण करू इच्छितो ज्याचे प्रभाव-क्षेत्र समस्त मानवजाती करीता व्यापक व्हावे व ज्या आधारे प्रत्येक गरजवंताची मदत केली जाऊ शकावी.

५. येथे नमाजशी अभिप्रेत ईश्वरोपासनेचे ते स्वरूप होय जे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी धारण केले होते. कुरआनने अन्य एका स्थानी यांच्या नमाजचे स्वरूप व तिची वास्तविकता पुढील शब्दात वर्णन केली आहे.

وَمَا كَانَ صَلَاتُهُمْ عِنْدَ الْبَيْتِ اِلَّا مُكَآءً وَّتَصْدِيَةً (الانفال-٣٥)

"अल्लाहच्या घराजवळ यांची नमाज, शिट्यामारणे आणि टाळया वाजविणे या व्यतिरिक्त आणखी काहीच नाही." (अल अनफाल-३५)

ही त्यांची परंपरागत नमाज होती आणि तीही अशी की जिचे मूळ स्वरूपच विद्रुप केले गेले होते. नमाजच्या वास्तवते संबंधाने हजरत इब्राहीम यांनी नमाजला तिच्या खऱ्या स्वरूपात कायम केले होते आणि आपल्या संततीस अल्लाहच्या घरांशेजारी या हेतुने वसविले होते की त्यांनी नमाज कायम करावी.'

رَبَّنَا لِيُقِيْمُوا الصَّلٰوةَ

"हे आमच्या पालनकर्त्या ! अशासाठी की त्यांनी नमाज कायम करावी." (सूरह इब्राहीम-३७)

तसेच हजरत इस्माईल आपल्या कुटुंबियांना याची ताकीद करीत राहिले.

وَكَانَ يَاْمُرُ اَهْلَهٗ بِالصَّلٰوةِ وَالزَّكٰوةِ

"आणि तो आपल्या कुटुंबियांना नमाज व जकात संबंधी आज्ञा देत असे." (सूरह-मरीयम-५५)

परंतु नंतरच्या काळात धर्मात फेरफार करणाऱ्यांनी नमाजचे सत्यस्वरूप बिघडविले येथपावेतो की कुरआन अवतरणाच्या कालात नमाज केवळ शिट्या मारणे व टाळया वाजविण्याचे नार होते. याचे उदाहरण आज देखील पूजा स्थानामध्ये आढळून येते जेथे मूर्तिपूजक भजने गाऊन आणि झांज व टाळया वाजवून नाचत नाचत पूजापाठ करतात. आणि असे समजतात की अशाने ईश्वर देखील प्रसन्न होतो व मूर्ति देखील. येथे अनेकेश्वरवाद्यांच्या या नमाज ला त्यांच्या सर्वनाशाचे कारण ठरविले गेले आहे. कारण ही ती नमाज नव्हे जिचा आदेश सर्वश्रेष्ठ अल्लाहने दिला होता. लोकांनी जर अयोग्य हरकतींचे नाव नमाज व ईश्वरोपासना ठेवून घेतले असेल तर याचा खऱ्या नमाज व उपासनेशी संबंध तरी कोणता?

ही तर खरीखुरी ईश्वरोपासना नव्हे किंबहुना तिची कुचेष्टा आहे. काही भाष्यकारांनी या सूरह ला मदनी ठरविले आहे आणि 'नमाज' चा अर्थ दांभिक (मुनाफीक) लोकांची नमाज असा घेतला आहे. परंतु ज्या (Context) संदर्भात नमाजचा उल्लेख आला आहे त्याचा संबंध 'आखिरत' चा इन्कार करणाऱ्यांशी आहे. त्यांच्या नैतिक दोषांचे स्पष्ट उदाहरणे सादर केली गेली आहेत. याशिवाय मागील सूरह मध्ये 'कुरैश' ला एकच ईश्वराची उपासना करण्याचा आदेश दिला गेला आहे व

त्या पाठोपाठ सूरह माऊन ची मांडणी करणे या गोष्टीस प्रकट करते की याच्या पार्श्वभूमी वर कुरेशचे सरदार आहेत जे अनेकेश्वरवादी तर होतेच पण आखिरतचा इन्कारकरणारे सुद्धा होते. यास्तव या आयतीत ज्या नमाजचा उल्लेख आला आहे ती मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांची, प्रामुख्याने काबागृहाच्या विश्वस्तमंडळीची नमाज होती. तथापि याच्या व्यापक आशयात दांभिक लोकांची नमाज देखील सामील आहे कारण त्यांची नमाज सुद्धा नाममात्र नमाज होती. खऱ्या व वास्तव नमाज पासून ते सुद्धा गाफील होते. आणि ही गोष्ट केवळ त्याच काळातील दांभिक लोकांना लागू पडत नाही किंबहुना प्रत्येक काळातील दांभिकांना लागू पडते.

६. अर्थात हे लोक आपल्या खऱ्या नमाज संबंधाने गाफील आहेत. खरी नमाज ही आहे की माणसाने शिर्क पासून स्वत:ला वाचवित केवळ एक अल्लाह करीता नमाज अदा करावी. त्याच्या कडे आपले सर्व लक्ष केंद्रित करावे व त्याच्या समक्ष आपले उत्तरदायित्व असल्याची दृढ धारणा बाळगावी तसेच या उपासनेचे सर्वश्रेष्ठ अल्लाहने जे स्वरूप निर्धारित केले आहे त्या स्वरूपानुसार ती पार पाडावी. हज़रत इब्राहीम यांनी आपल्या पश्चात जी नमाज़ सोडली होती तिची ही वैशिष्टये होती व तिच्यात कियाम,रुकुअ व सजदा या सारखे विधी होते. परंतु अनेकेश्वरवादी तिच्या बाह्य व आंतिरिक दोन्ही वैशिष्टयांना मुकले. आणि तिला खेळ तमाशा बनविले आता ज्या अर्थी हा प्रेषित इब्राहीमच्या नमाजचे पुनरूज्जीवन करू इच्छितो तरी हे लोक या दिशेने कान द्यायला तयार नाहीत व आपल्या नाममात्र नमाजलाच कवटाळून बसलेत

हे स्पष्ट व्हावे की, आयतीत

عَنْ صَلَاتِهِمْ سَاهُوْنَ

''ते आपल्या नमाजसंबंधाने गाफिल आहेत असे फर्माविले गेले आहे.''

فِيْ صَلَاتِهِمْ سَاهُوْنَ

'ते आपल्या नमाजीत विसरतात' असे फर्माविले गेले नाही. कारण नमाजमध्ये विस्मरण (सहव) तर ईमान-धारकाकडूनहि होऊ शकते परंतु नमाज बाबत गाफील होणे त्याच लोकांचा परिपाट आहे जे आखिरत ची काळजी ठेवित नाही.

७. याचा अर्थ त्याची नमाज दिखाव्याची असते. विशुद्ध श्रद्धा भाव विरहित केवळ दिखाव्याची नमाज असते ज्यायोगे लोकांनी त्यांना ''धार्मिके समजावे.''

अल्लाहची उपासना दास्यत्वाचा हक्क समजून त्याची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुने केली गेली पाहिजे परंतु दिखावा करणाऱ्या लोकांची उपासना केवळ 'प्रदर्शन' असते आणि ते अशासाठी असते की लोकांकडून 'वाहवा! मिळवावी म्हणून अशी उपासना करणारे आखिरत मध्ये कोणत्याहि प्रतिफळास पात्र असणार नाहीत किंबहुना आपल्या या गुन्हयामुळे अत्यंत कठोर शिक्षेस पात्र ठरतील दिखाव्याची कृत्ये करणाऱ्यांच्या संदर्भात हजरत ईसा (येशू ख्रिस्त) यांची वक्तव्ये देखील प्रभावी आहेत जी बायबल मध्ये उल्लिखित आहेत. तद्नुसार मत्तय च्या इंजील मध्ये आहे :-

''माणसानी पाहावे ह्या हेतुने तुम्ही आपले धर्माचरण त्याच्या समोर न करण्र्यावर विषयी ------------ ह्यास्तव जेव्हा जेव्हा तू दान धर्म करीतोस तेव्हा तेव्हा लोकांनी आपला गौरव करावा म्हणून ढोंगी जसे स्भास्थानांत व रस्त्यांत आपणां पुढे शिंग वाजवितात तसे करू नका. मी तुम्हास खचित संगतो की ते आपले प्रतिफळ भरून पावले आहेत. तूं तर दान धर्म करीतोस तेव्हा तुझा उजवा हात काय करीतोहो तुझ्या डाव्या हाताला कळू नये------------ तसेच जेव्हां जेव्हां तुम्ही प्रार्थना करीता तेव्हां तेव्हां ढोंग्या सारखे असूं नका, कारण लोकांनी आपणांस पाहावे म्हणून स्भास्थानांत व चवठ्यांवर उभे राहून प्रार्थना करणे त्यांस आवडते. मी तुम्हास खचित सांगतो की ते आपले प्रतिफळ भरून पावले आहेत.''

(मत्तय अध्याय: ६)

''अहो शास्त्रयांने, अहो परुश्यांनो, ढोंग्यांनो तुमची केवढी दुर्दशा होणार ! कारण तुम्ही विधवांची घरे खाऊन टाकता व ढोंगाने लांब लांब प्रार्थना करीतां, ह्यामुळे तुम्हाला अधिक शिक्षा होईल......... अहो शास्त्र्यांनो, अहो पुरुश्यांनो,ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! तुम्ही ताटवाटी बाहेरुन साफ करीतां, पण ती आतून जुलूम व असंयम ह्यांनी भरलेले आहेत.

........अहो शास्त्र्यांनो, अहो परुश्यांनो, ढोंग्यानो, तुमची केवढी दुर्दशा होणार ! कारण तुम्ही चुनालावलेल्या कबरांसारखे आहा, त्या बाहेरून खरोखर सुंदर दिसतात, परंतु आंत मेलेल्यांच्या हाडांनी व सर्व प्रकारच्या घाणीने भरलेल्या आहेत. तसे तुम्ही बाहेरून लोकांना नितीमान दिसता, परंतु आंत ढोंग्याने व अनीतीने भरलेले आहा.'' (मत्तय अध्याय: २३)

८. अर्थात हे लोक अतिशय कृपण आहेत. गोर गरीबांच्या व दीन दुबळयांच्या सहाय्यार्थ जो माल खर्च व्हायला हवा त्यावर ते प्रतिबंध घालतात. वस्तुत: यांना ईश्वराविषयी प्रेम नाही व त्याच्या दासांबद्दल मनात सहानुभूतिहि नाही, किंबहुना त्याना फक्त आपल्या धनसम्पत्तिचे प्रेम आहे व ऐहिक लालसेचीच काळजी आहे. ते धर्माचे आवरण ओढून स्वत:ला ईश्वरोपासक म्हणून मिरवतात. परंतु गरीबांशी व दीन दुबळयांशी त्यांची सहानुभूति शून्य व्यवहार या गोष्टीचे प्रमाण आहे की ते आपल्या ईश्वरापासनेच्या दाव्यात खरे नाहीत. कारण खरी ईश्वरोपासना माणसाला चारित्र्यशील.दयाळू व उदार बनवते.

मूळ ग्रंथात 'माऊन' हा शब्द वापरला गेला आहे. ज्याचा शब्दिक अर्थ लाभप्रद वस्तु असा आहे. हा अर्थ दैनंदिन व्यवहारात वापराण्यात येणाऱ्या वस्तूंना देखील लागू पडतो आणि धनसम्पत्तिला देखील लागू पडतो. भाष्यकारांनी सर्व साधारण पणे मामुली व सर्व सामान्य गरजेच्या वस्तू ज्या एक शेजारी दुसऱ्या शेजाऱ्यास देतो. व त्या न देणे अधमता समजली जाते. असा अर्थ घेतला आहे. यात संशय नाही की या प्रकारच्या वस्तू देण्यास इन्कार करणे अपमानजन्य निती होय. परंतु येथे जे शिक्षेचे भय दिले गेले आहे ते स्पष्टत: एखाद्या फार मोठ्या हक्कास अदा न केल्याबद्दल किंवा एखादा मोठाया गुन्हा हातून घडल्याबद्दलच आहे. तसेच या सूरह चा मजकूर देखील गोरगरीब व दीन दुबळयांच्या हक्कांशी संबंधित आहे. म्हणून 'माऊन' चा अर्थ सम्पत्तिचा हक्क असा घेणेचा प्रसंगानुरूप वाटतो याचे समर्थन जुहरीच्या या कथनान्वये होते की, 'माऊन कुरेशाच्या भाषेत माल (धनसम्पत्ति) ला म्हणतात.

(तफसीर इब्ने कसीर-खंड-४ पृ. ५५६)

आणि काहीनी याचा अर्थ 'जकात' असा घेतला आहे. परंतु हजरत इब्ने उमर यांचे कथन या शब्दाचे उत्कृष्ट भाष्य होय. त्यांना जेव्हा माऊन संबंधी विचारले गेले तेव्हा त्यांनी सांगितले. المال الذی لا یؤدی حقه ''अशी सम्पत्ति जिचा हक्क अदा न केला जावा.'' प्रश्नकर्ता म्हणाला. इब्ने मसऊद तर असे म्हणतात की. याचा अर्थ वापरण्याच्या त्या वस्तू होत ज्या लोक एकमेकांना देत असतात. तर प्रत्युत्तरात त्यांनी सांगितले, माऊन चा अर्थ तोच होय जो मी तुम्हाला सांगत आहे. (फतहुल बारी खंड-८ पृ. ५९४ तबरीच्या संदर्भानुसार)

म्हणून आम्ही يَمْنَعُوْنَ الْمَاعُوْنَ चा अनुवाद 'सम्पत्तिचा हक्क अदा करीत नाही' असा केला आहे. हीच गोष्ट कुरआनात दुसऱ्या पद्धतीने सांगितली गेली आहे. مَنَّاعٍ لِّلْخَيْرِ (سورة قلم-١٢) ''सम्पत्तिला रोखून ठेवणारे'' (सूरह कलम-१२) अर्थात कृपण हे स्पष्ट व्हावे की خير **खैर** (चांगल्या व कल्याणदायी गोष्टी) हा शब्द अरबी भाषेत सम्पत्तिच्या अर्थानेही येतो तसेच मनअ शब्द प्रतिबंध आणि कृपणतेच्या अर्थानेहि येतो.

# सूरह अल्-कौसर

# १०८. सूरह अल्-कौसर

**नाव:** पहिल्याच आयतीत कौसर (विपुल मंगल वस्तु) प्रदान केले जाण्याची शुभवार्ता दिली गेली आहे या संबंधान्वये या सूरह चे नाव 'अल कौसर' आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे. आणि मजकूरांवरून हे अनुमान निघते की ही सूरह मक्केच्या शेवटच्या काळात अवतरली असावी ज्यावेळी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) विरोधाच्या वादळातून मार्गाक्रमण करीत होते. व पैगंबरांचे शत्रू पैगंबरांना बदनाम करण्याकरीता सर्व शक्ति एकवटून जोर लावत होते.

**मध्यवर्ति कल्पना:** ही सूरह पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकरीता महान शुभसंदेश व त्यांच्या संबंधी विशेष कृपेची घोषणा होय.

**आयत रचना:** आयत क्र. १ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विपुल भलाई प्रदान करण्यात आल्याची शुभ वार्ता दिली गेली आहे.

आयत क्र. २ मध्ये या विशेष कृपे बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतुने नमाज व कुर्बानी बाबत प्रयत्नशील राहण्याचा आदेश दिला गेला आहे.

आयत क्र. ३ मध्ये पैगंबरांना अशी सांत्वना दिली गेली आहे की जे लोक पैगंबराशी शत्रूत्व पतकरण्यास प्रवृत्त झाले आहेत ते त्यांचे काहीही नुकसान करू शकणार नाही. तथापि स्वत:ला फार मोठ्या मंगलगोष्टी पासून निश्चितपणे वंचित ठेवतील.

# १०८. सूरह अल्-कौसर

سُورَةُ الْكَوْثَرِ

आयती - ३

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. आम्ही [१] तुम्हाला [२] 'कौसर' प्रदान केले.[३]

إِنَّآ أَعْطَيْنٰكَ الْكَوْثَرَ ۝١

२. तेव्हा, तुम्ही आपल्या पालनकर्त्या साठी नमाज पढा आणि कुर्बानी करा. [४]

فَصَلِّ لِرَبِّكَ وَانْحَرْ ۝٢

३. निःसंशय, तुमचा शत्रूच मांगल्या पासून वंचित आहे . [५]

إِنَّ شَانِئَكَ هُوَ الْأَبْتَرُ ۝٣ ع

१. ही बोलण्याची राजेशाही पद्धत होय. ज्यात एक वचना ऐवजी अनेकवचनी, सर्वनाम 'आम्ही' वापरले गेले आहे. आणि यात ते वैभव अभिप्रेत आहे की ज्यासह पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना कौसरचे समृद्धशील दान ईश-दरबारातून प्रदान केले गेले.

२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सरळ सरळ संबोधिले आहे.

३. कौसरचा अर्थ विपुल भलाई असा आहे (अन्निहायाह खंड ४ पृ. ३७- लीसानुल अरब खंड. ५ पृ. १३३) आणि याच संदर्भान्वये हे नाव जन्नतच्या त्या जल प्रवाहाचे आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आखिरत मध्ये प्रदान केला जाईल. कुरआनाचे भाष्यकार हजरत अब्दुल्लाह इब्ने अब्बास यांनी कौसर चा अर्थ 'विपुल भलाई' असा घेतला आहे. ज्यात जन्नतचा तो जल प्रवाह देखील सामील आहे. तदनुसार बुखारीचे कथन आहे की:

عن سعيد بن جُبير عن ابن عبآس رضي الله عنه انه قال فی الكوثر هُو الخيرُ الذی اعطاهُ الله اِيَاه۔ قال ابو بشر قُلتُ لِسعيد بن جُبير فَاِنّ النَاس يَزْعَمُوْنَ اَنَه نَهرٌ فِی الجَنَةِ ۔ فَقَالَ سَعِيدٌ اَلنَهرِ الذِیْ فِی ا لْجَنَّةِ مِنَ الْخَيرِ الّذِی اَعْطَاهُ الله اِيَاه۔ (بخاری کتاب التفسیر)

''सईद बिन जुबैर इब्ने अब्बास द्वारे उल्लिखित करतात की त्यांनी असे फर्माविले. कौसर अशा मंगलवस्तू ज्या सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रदान केल्या अबु बिश्र (निवेदक) असे म्हणतात की मी सईद बिन जुबैर यांना सांगितले, लोकांची अशी कल्पना आहे की तो जन्नतचा एक जलप्रवाह आहे, सईद त्यावर म्हणाले की, जन्नतचा तो जलप्रवाह त्या मंगल वस्तुंपैकीच होय ज्या अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रदान केल्या आहेत.'' (बुखारी- किताबुत्तफसीर)

तव्द्तच याच्या आशयात तो हौद देखील अंतर्भूत आहे जो कियामतीच्या दिवशी पैगंबराना हश्‍रच्या मैदानात प्रदान केला जाईल. त्याचे पाणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या नि:स्वार्थ अनुयायींना पाजतील हदीस मध्ये या हौदला देखील 'कौसर' चाच अर्थ लागू केला गेला आहे. सही मुस्लिम मध्ये हजरत अनस यांचे कथन आहे की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी 'कौसर' चे स्पष्टीकरण करतांना फर्माविले.

هُوَ حوضٌ تَرِدُ عَلَيْهِ اُمَّتِی يَوْمَ القيامةِ۔

''तो एक हौद आहे ज्यावर कियामतीच्या दिवशी माझी उम्मत (पैगंबरांचे अनुयायी) पोहचेल.'' (मुस्लिम किताबुस्सलात)

तात्पर्य, ज्या विपुल भलाई द्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबराना उपकृत केले आहे त्यात प्रामुख्याने या दोन देण्ग्या उल्लेखनीय आहेत. कारण ते भव्य व बहुमूल्य असण्याव्यतिरिक्त पैगंबरांच्या विशेष प्रतिष्ठेत सामील आहे. आणि आयतीचा निर्देश पैगंबरांच्या हदीस ने उलगडलेल्या याच दोन ईश्वरीय देणग्यांकडे प्रामुख्याने आहे. आणि ज्या बक्षिसा संबंधी सर्वश्रेष्ठ अल्लाहने वचन द्यावे त्याची लाभ होणे हमखास आहे. यास्तव प्रदान करणे या क्रियापदास भूतकाळांत اَعْطَيْنَا वापरले आहे. जे त्याची निर्धारीतता व अटळता व्यक्त करते.

हा फार मोठा शुभसंदेश आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना त्या वेळी दिला गेला ज्यावेळी मक्केचे अनेकेश्वरवादी त्यांचे शत्रू बनले होते. आणि पैगंबराना त्रास देण्यात त्यांनी कसलीच कसर बाकी ठेवली नव्हती या प्रसंगी हा शुभसंदेश पैगंबरासाठी सात्वन-कारक ठरला. तसेच याद्वारे विरोधकांना हे स्पष्ट करणे उद्दिष्ट होते की तुम्ही ज्या विभूतिस दु:ख यातना पोहचविता तो ईश्वराजवळ अत्यंत उच्च-पदस्थ विभूति आहे. जिच्यावर शुभ मांगल्याचा व बरकतींचा सतत वर्षाव होत आहे आणि या शुभ मांगल्याचे व बरकतीचे प्रकटीकरण कशा प्रकारे 'हौज-कौसर' व 'नहर-कौसर' च्या रूपाने होणार आहे. एवढे असूनहि जर तूम्ही पैगंबरांच्या प्रतिष्ठा संबंधाने अशिष्टता दर्शक इच्छिता तर तसे करा परंतु तुम्ही आकाशास पैगंबरावर पुष्प-वर्षाव करण्यापासून रोखू शकत नाही!

नहरे कौसर व हौद कौसर च्या संदर्भात ज्या अगणित अधिकृत व स्पष्ट हदीस-वचने उल्लेखिली गेली आहेत. अर्थात त्या सर्वांचे वर्णन करणे दीर्घतेस कारक ठरेल म्हणून आम्ही फक्त काही हदीस-वचनांचा खालील प्रमाणे उल्लेख करीत आहोत.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना नहरे कौसर मेराज च्या प्रसंगी दाखविली गेली होती. हजरत अनस यांचे कथन आहे की

''لَمَا عُرِجَ بِالنَّبِیِّ صلى الله عليه وسلم اِلَی السَّمَاءِ قَالَ اَتَيْتُ عَلی نَهْرٍ حَافَتَاهُ قِبَابُ اللؤْلُو مُجَوَّف، فَقُلْتُ ماهٰذَا يَا جِبْرِيْلُ؟ قَالَ هٰذَا الْكَوثَرُ۔'' (بخاری کتاب التفسیر)

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा मेअराज करीता आकाशात गेले तेव्हा तेथे जे काही अवलोकन केले त्याचा उल्लेख करीत त्यांनी फर्माविले, मी एका प्रवाहाजवळ आलो ज्याच्या दोन्ही किनाऱ्यांवर आतून पोकळ अशा मोत्यांचे

कळस बनलेले होते. मी विचारले, जिब्रील, हे काय आहे? फर्माविले, हे 'कौसर' आहे.'' (बुखारी-किताबुत्तफसीर)

आणि बुखारीच्याच दुसऱ्या कथनात हे शब्द आहेत.

هٰذاالکوثر الذی اعطاک ربّک

'' हे ते कौसर होय जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना त्यांच्या पालनकर्त्याने प्रदान केले आहे.''(बुखारी कित्ताबुर्रिकाक)

हजरत अब्दुल्लाह बिन उमर द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले,

اَلْكَوْثَرُ نَهَرٌ فِي الْجَنَّةِ حَافَتَاهُ مِنْ ذَهَبٍ وَمَجْرَاهُ عَلَى الدُّرِّ وَالْيَاقُوتِ تُربَتُهُ اَطْيَبُ مِنَ الْمِسْكِ وَمَاؤُهُ اَحْلٰى مِنَ الْعَسَلِ وَاَبْيَضُ مِنَ الثَّلَجِ۔

''कौसर जन्नत मधील एक प्रवाह आहे ज्याचे किनारे सोन्याचे आहेत आणि तो मोती व रत्न माणकांवरून वाहतो. त्याची माती कस्तुरीपेक्षा अधिक सुगंधित आहे व त्याचे पाणी मधापेक्षाहि जास्त गोड आणि बर्फाहून अधिक शुभ्र आहे.'' (तिरमिजी-अबवाबुत्तफसीर)

तव्द्तच हौद संदर्भात हजरत सहल बिन सईद चे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांनी फर्माविले:

اِنّی فَرَطُکُمْ عَلیٰ الحَوْضِ مِنْ مَرَّ عَلَیَّ شَرِبَ وَمِنْ شَرِبَ لَمْ یَظْمَاْ اَبَداً۔ (بخاری کتاب الرقاق)

'मी तुमच्या आधी हौदावर पोहचेन. जो माझ्याजवळ येईल ते या हौदाचे पाणी पील. आणि जो कोणी याचे पाणी पील त्याला मग कधीहि तहान लागणार नाही.

(बुखारी किताबुर्रिकाक)

हजरत अब्दुल्लाह इब्न उमर (रजि.) चे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले.

حَوضِی مَسِیرۃُ شَهْرٍ مَاؤُهٗ اَبْیَضُ مِنَ اللَّبَنِ وَرِیْحُهٗ اَطْیَبُ مِنَ الْمِسْکِ وَکِیزَانُهٗ کَنُجُوْمِ السَّمَاءِ مَنْ شَرِبَ مِنْهَا فَلَا یَظْمَاُ اَبَداً۔ (بخاری کتاب الرقاق)

''माझ्या हौदाची लांबी (अथवा रूंद) एक महिन्याच्या प्रवासाच्या अंतरा इतकी असेल. याचे पाणी दूधापेक्षा जास्त सफेद व याचा गंध कस्तुरी पेक्षाहि अधिक चांगला आणि याचे प्याले आकाशातील ताऱ्यांप्रमाणे अगणित असतील. जा याचे पाणी पील. त्याला पुन्हा कधीही तहान लागणार नाही.'' (बुखारी किताबुर्रिकाक)

उकबा बिन आमिर असे कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एके दिवशी मेंबर (प्रवचन करण्याच्या उंच स्थाना) वर चढून फर्माविले,

اِنّی فَرَطٌ لَکُمْ وَ اَنَا شَهِیْدٌ عَلَیْکُمْ وَاِنّی وَاللهِ لَاَنْظُرُ اِلیٰ حَوْضِی الآنَ۔

''मी तुमच्या आधी (हौदावर) पोहचणार आहे आणि तुमच्यावर साक्षी राहीन. अल्लाह ची शपथ मी या क्षणी आपल्या हौदाला पहात आहे.'' (मुस्लिम किताबुल फजाइल)

अनस बिन मालिक चे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले,

لَیَرِدَنَّ عَلَیَّ الْحَوْضَ رِجَالٌ مِمَّنْ صَاحَبَنِی حَتّٰی اِذَا رَأَیْتُهُمْ وَرُفِعُوا اِلَیَّ اخْتُلِجُوْا دُونِی فَلَاَقُولَنَّ اَیْ رَبِّ اُصَیْحَابِیْ اُصَیْحَابِیْ فَلَیُقَالَنَّ لِی اِنَّکَ لَا تَدْرِیْ مَا اَحْدَثُوا بَعْدَکَ۔ (مسلم کتاب الفضائل)

''माझ्या हौदावर काही असे लोक देखील येतील जे माझे सहकारी राहिले आहेत, मी जेव्हा त्यांना पाहीन व त्यांना माझ्याजवळ आणले जाईल तेव्हा त्यांना माझ्याजवळून दूर सारले जाईल. मी म्हणेन, हे माझ्या पालनकर्त्या, हे माझे सहकारी आहेत परंतु मला सांगितले, जाईल, 'आपणास हे माहित नाही की आपल्या पश्चात यांनी काय केले.'' (मुस्लिम किताबुल फजाईल)

अशा स्वरूपाची अनेक हदीस-वचने जी हौदच्या संदर्भात वर्णिली गेली आहेत ती सर्व वचने असे स्पष्ट करतात की पैगंबरांच्या या हौदावर त्यांची उम्मत (त्यांचे अनुसरण करणारा जाति समूह) येईल. तथापि हौदाच्या पाण्याने तृप्त होण्याची संधी केवळ त्याच लोकांना दिली जाईल ज्यांनी निस्वार्थ पणे व विशुद्ध मनाने पैगंबरांचे अनुसरण केले असेल व ज्यांनी पैगंबरांच्या सुन्नाह मध्ये (आचरण संहितेत) एखादे परिवर्तन केले नसेल.

४. अर्थात अशा बहुमूल्य नजराणा ने उपकृत केले गेल्याबद्दल तुम्ही आपल्या पालनकर्त्याशी कृतज्ञता व्यक्त करा. आणि त्यास कृतज्ञता व्यक्त करण्याचा मार्ग नमाज व कुर्बानी आहे. जणू हे उपासना प्रकार कृतज्ञशीलतेचे द्योतक आहेत आणि ईश्वराचे सानिध्या प्राप्त करण्याचा सर्वोत्कृष्ट साधन देखील

आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना नमाज ची किती आवड होती याची कल्पना यावरून येईल की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) रात्री उठून बराच वेळ नमाज पढण्यात मग्न रहात. येथपावेतो की त्यांच्या पायांना सूज आली. सहवासात असलेल्या काही अनुयायींनी या गोष्टीकडे त्यांचे लक्ष वेधले असता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले की काय मी अल्लाहचा कृतज्ञ दास बनू नये? (बुखारी, मुस्लिम)

तव्द्तच कुर्बानी संबंधीच्या आदेशाचे पालन हि पैगंबर मोठ्या अभिलाषेने करीत राहीले. मदीनेत ईदुल अजहा (बकरा-ईद) प्रसंगी कुर्बानी करणे हा त्यांचा नित्यक्रम होता. आणि शेवटच्या हज्ज याच्या प्रसंगी तर त्यांनी आपल्या हस्ते ६३ उंटांची कुर्बानी केली.

मूळ ग्रंथात وَانْحَرْ 'वनहर' हा शब्द प्रयोगात आला आहे जो खरे पाहता उंटाच्या कुर्बानी साठी वापरला जातो आणि येथे इब्राहीमी समुदायाकडे निर्देश करणे अभिप्रेत आहे ज्यात उंटाची कुर्बानी ईश्वरोपासनेची पद्धती होती.याऊलट यहूदी लोक उंटाच्या बलीदानास योग्य समजत नसत,या पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्याचा आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला गेला, परंतु याचा अर्थ हा नव्हे की फक्त उंटाचीच कुर्बानी केली जावी अन्यथा कुर्बानी होणार नाही किंबहुना ज्याप्रमाणे पैगंबरांच्या कथंन व कृतिने सिद्ध आहे की कुर्बानी इतर पशूंची देखील केली जाऊ शकते. म्हणून इथे आदेशाचे मूळ उद्दिष्ट कुर्बानी वर जोर देणे होय. मग ती त्या पशूंपैकी कोणत्याही पशूची असो ज्याची कुर्बानी शरीयत-संमत आहे.

हदीस मध्ये 'नहर' हा शब्द गाईच्या कुर्बानी करीताहि वापरला गेला आहे.

عَنْ جَابِرٍ قَالَ نَحَرْنَا مَعَ رسولِ اللهِ صلی اللہ علیہ وآلہ وسلم عامَ الحُدَيْبِيَةِ البَقَرَةَ عَن سبعةٍ و البدنة عن سبعةٍ۔ (ترمذی ابواب الحج)

''जाबीर कथन करतात की आम्ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यासह हुदैबिया च्या साली कुर्बानी दिली गाय सात व्यक्तिंच्या कडून आणि उंट सात व्यक्तिंच्या कडून.

नमाज आणि कुर्बानीचा जो आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला गेला आहे तो त्यांच्या माध्यमाने समस्त उम्मत करीता आहे. ज्याप्रमाणे हा समस्त जाती समूह 'कौसर' च्या पुरस्कारात पैगंबरांशी सहभागी आहे की कियामतीच्या दिवशी हौद-कौसर द्वारे कृपा-लाभ घेईल. तव्द्तच तो नमाज व कुर्बानीच्या आदेशात देखील पैगंबरांशी सहभागी आहे.

प्रसंगानुरोधाने या आदेशाचा हा पैलू देखील दृगोचर होत आहे सूरह माऊन मध्ये अनेकेश्वर वाद्यांच्या ज्या 'नमाजला निरर्थक ठरविले गेले आहे. त्याच्या तुलनेने तुमची नमाज केवळ मात्र अल्लाह करीता असली पाहिजे. जसे की इतर ठिकाणी अधिक विवरणासह फर्माविले गेले आहे.

قُلْ اِنَّ صَلَاتِيْ وَنُسُكِيْ وَ مَحْيَايَ وَمَمَاتِيْ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ لَاشَرِيْكَ لَهٗ۔ (الانعام ـ ١٦٢)

''सांगा, माझी नमाज, माझी कुर्बानी, माझे जगणे व माझे मरणे, सर्व विश्वांचा पालनकर्ता अल्लाह करीता आहे की ज्याचा कोणीहि सहभागी नाही.'' (अल अनआम-१६२)

५. हे अनेकेश्वर वाद्यांच्या त्या अशिष्टतेच्या उत्तरादाखल आहेत जी ते पैगंबरांच्या प्रतिष्ठे संबधात करीत होते. ते अपमान जनक वचनांद्वारे पैगंबराविरूद्ध प्रचार करीत होते. तो असा की, पैगंबरांचा संबंध शिर्क व मूर्तिपूजेच्या विरोधामुळे जातिशी पूर्णपणे तुटला आहे. कुरैश वंशास जगात जे सामर्थ्य व अधिकार व प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त आहे त्यापासून पैगंबर अगदीच वंचित झाले आहेत. आणि आता पैगंबरांची पात्रता एकाद्या असहाय्य व अगतिक माणसासारखी झाली आहे. प्रत्युत्तरात फर्माविले गेले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने तर 'विपुल कल्याण प्रदान केले आहे किंबहुना पैगंबरांचे विरोधक प्रत्येक प्रकारच्या मंगल गोष्टीस पारखे झाले आणि निरंतर त्यांच्या माथी 'वंचितता' लिहीली गेली आहे.

वस्तुत: हे एक भाकित होते जे अगदी सत्य सिद्ध झाले प्रेषित-शत्रू अशा प्रकारे अपमानित व बरबाद झालेत की आज त्यांचे नावहि शिल्लक राहिले नाही. आणि अल्लाहच्या प्रेषितास अशी प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त झाली की कोटयावधी लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर दरुद व सलाम पाठवितात, आणि कियामती पर्यंत पाठवत राहतील.

स्पष्ट व्हावे की, या भाकिताच संबंध केवळ तत्कालीन प्रेषित-शत्रूंशीच नव्हता किंबहुना प्रत्येक युगात निर्माण होण्याऱ्या प्रेषित-शत्रूंशी आहे. जो कोणी पैगंबराच्या प्रातिष्ठा संदर्भात अशिष्टतता करील किंवा त्यांचा विरोध करील त्याच्या नशीबी भल्या व कल्याण दायी गोष्टी कदापि नसतील. आणि निश्चितपणे तो अपमानित होऊन राहील.

# सूरह
# अल-काफिरून

# १०९. सूरह अल-काफिरून

**नाव:** पहिल्या आयतीत 'अल-काफिरून' (काफिरांनो !) हा शब्द आला आहे. या संबंधानुसार या सूरह चे नाव 'अल्-काफिरून' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे. आणि सूरह मधील मजकूरा वरून असे दिसून येते की हे मक्केच्या शेवटच्या कालातील अवतरण होय.

**मध्यवर्ति कल्पना:** अल्लाहखेरीज उपास्यांच्या उपासनेने विमनस्कता आणि काफिरांच्या धर्मापासून अगदी विभक्त असल्याचे प्रकटीकरण व घोषणा आहे.

**आयत रचना:** आयत क्र.१ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आदेश दिला गेला आहे की काफीरांना संबोधून सरळ शब्दात घोषणा करावी.

आयत क्र.२ व ३ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने ही घोषणा केली गेली आहे की उपासनेच्या संदर्भात माझी भूमिका कोणती आहे व तुमची भूमिका कोणती आहे.

आयत क्र.४ व ५ मध्ये ही घोषणा की उपासनेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची सहिष्णुता बाळगण्याचा किंवा कोणताहि समन्वयाचा फार्म्युला अंगिकारण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

आयत क्र. ६ मध्ये काफिरांच्या धर्मासंबंधी अलिप्तता व्यक्त करण्याचा आदेश आहे.

**हदीस:** पैगंबर आचरणानुसार हे सिद्ध आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फज्रच्या (प्रात : काळच्या फर्ज नमाज पूर्वीच्या दोन रकअतीत तसेच शेवटच्या हज्ज यात्रेच्या प्रसंगी तवाफच्या दोन रकअतीमध्ये सूरह

قُلْ يَـٰٓأَيُّهَا ٱلْكَـٰفِرُونَ

'कुल या आय्युहल काफिरून' व सूरह قُلْ هُوَ ٱللَّهُ أَحَدٌ 'कुल हुवल्लाहु अहद' चे पठण केले होते.(मुस्लिम किताबुस्सलातिल मुसाफिरीन, रिवायत अबु हुरैरा व किताबुल हज्ज रिवायत जाबिर बिन अब्दुल्लाह)

# १०९. सूरह अल-काफिरून

سُوْرَةُ الْكٰفِرُوْنَ

आयती -६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. सांगा [१] हे काफिरांनो ![२]

قُلْ يٰٓاَيُّهَا الْكٰفِرُوْنَ ۙ ①

२. मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही करता. [३]

لَآ اَعْبُدُ مَا تَعْبُدُوْنَ ۙ ②

३. आणि ना तुम्ही त्यांची उपासना करता ज्याची उपासना मी करतो. [४]

وَلَآ اَنْتُمْ عٰبِدُوْنَ مَآ اَعْبُدُ ۚ ③

४. आणि ना मी त्यांची उपासना करणारे आहे ज्यांची उपासना तुम्ही केली.[५]

وَلَآ اَنَا عَابِدٌ مَّا عَبَدْتُّمْ ۙ ④

५. आणि ना तुम्ही त्याची उपासना करणारा आहात ज्याची उपासना मी करतो. [६]

وَلَآ اَنْتُمْ عٰبِدُوْنَ مَآ اَعْبُدُ ۗ ⑤

६. तुमच्या कुरिता तुमचा धर्म व माझ्याकरिता माझा धर्म.[७]

لَكُمْ دِيْنُكُمْ وَلِيَ دِيْنِ ۧ ⑥

१. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देश्यून आहे.

२. हे ह्या लोकांना संबोधून आहे ज्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याद्वारे सत्याचे चांगल्या रीतिने आकलन झाले होते. पण तरीहि कुफ्र (सत्य विरोधा) वर अटळ राहिले.

काफिरचा शाब्दिक अर्थ 'नकार दर्शविणारा' असा आहे आणि कुरआनाच्या परिभाषेत कुफ्र ईमानाच्या प्रतिकुल असलेला शब्द आहे. आणि काफिर म्हणजे अशी व्यक्ति जी हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आणलेल्या धर्मास मान्य करण्याबद्दल नकार दर्शीवते. या धर्माची मूलभूत शिकवण ही आहे की अल्लाह खेरीज कोणीहि उपासनीय नाही म्हणून मानवाने केवळ त्याचीच उपासना करावी व त्याच्या उपासनेत कोणालाहि सहभागी करू नये. जी व्यक्ति अल्लाह खेरीज अन्य उपास्या ची उपासना करते मग ती मूर्तिपूजेच्या स्वरूपात असो वा भूमी पूजनाच्या स्वरूपात असो. अथवा तो देवी देवतांना सहाय्याकरिता पुकारीत असो, किंवा एखाद्या काल्पनिक ईश्वराचे भजन गात असो अगदी उघड असे शिर्क आहे. आणि जो जो धर्म या शिर्कची अनुज्ञा देतो तो अनेकेश्वरवादी धर्म आहे. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याकरीता पैगंबर बनवून पाठविले गेले होते की या शिर्कची मूळ उपटून काढावे व मानवांना एकच ईश्वराचा उपासक बनण्याचे आवाहन द्यावे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हे आवाहन युक्तिवाद व पुराव्यांसह सादर केले आणि आकलन होण्यासाठी अधिकाधिक उत्कृष्ट पद्धतिचा अवलंब केला. आवाहनाची ही धडपड एक काळापर्यंत चालू राहिली. येथपावेतो की सत्य चांगल्या प्रकारे स्पष्ट झाले आणि अल्लाहचे प्रमाण त्याच्या दासांवर प्रस्थापित झाले. आवाहनाच्या या अवस्थेत दाखल झाल्यानंतर जे लोक 'कुफ्रनितीवर' अटळ राहिले आणि प्रेषितांशी विरोध व शत्रूत्व पत्करण्यास प्रवृत्त झाले त्यांना हे काफिरांनो! या शब्दाने संबोधिले गेले जो अगदी प्रसंगानुरूप होता परंतु याद्वारे विरोधकांना बरेवाईट म्हणणे हे अभिप्रेत नव्हते. किंबहुना त्यांच्या सत्य-विरोधक असण्यासंबंधीचा स्पष्टरित्या उल्लेख करणे हे होते. अशासाठी की, ईश्वराचे प्रमाण त्यांच्यावर प्रस्थापित झाले आहे हे स्पष्ट व्हावे आणि हेहि की, त्यांच्या कुफ्र नितीच्या परिणामानुसार अल्लाहचा प्रकोप त्यांच्यावर ओढवणार आहे ही गोष्ट मक्केच्या काफिरांना पूर्णत:लागू पडत असली तरी, खरे तर ज्यांना संबोधले गेले आहे असे सर्वप्रथम तेच होत पण तरी देखील तत्वत: ही गोष्ट त्या लोकांनाहि लागू पडते जे-मक्केच्या त्या काफिरांसारखी हट्टीपणा पत्करतात. तात्पर्य हे की, कियामती पर्यंत निर्माण होणाऱ्या काफिरांवर अल्लाहचे प्रमाण सदैव प्रस्थापित व्हावे. तसेच याद्वारे मुसलमानांनाहि हा धडा देणे अभिप्रेत आहे की काफिरांचा मार्ग वेगळा व ईमान बाळगणाऱ्याचा मार्ग वगळा आहे. आणि दोघांच्या दरम्यान एवढा मोठा सागर आहे की ते काही घ्या व काही द्या च्या तत्वानुसार समन्वय साधू शकत नाही.

३. अर्थात त्या मूर्त्या ज्यांची पूजा मक्केचे अनेकेश्वरवादी करत होते. तसेच ती सर्व उपास्ये देखील ज्यांची ते अल्लाहला सोडून उपासना करीत होते.

उपासना संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या भूमिकेस स्पष्ट करण्याचा आदेश इतर सूरतींमध्येहि दिला गेला आहे उदा. 'सूरह यूनुस' मध्ये फर्माविले गेले :-

قُلْ يٰاَيُّهَاالنَّاسُ اِنْ كُنْتُمْ فِىْ شَكٍّ مِّنْ دِيْنِىْ فَلَاۤ
اَعْبُدُ الَّذِيْنَ تَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ وَ لٰكِنْ اَعْبُدُ اللّٰهَ
الَّذِىْ يَتَوَفّٰىكُمْ۔ (یونس۔۱۰۴)

"सांगा, लोकहो ! जर तुम्ही माझ्या धर्मा बाबतीत साशंक असाल तर (ऐका ) की मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही अल्लाहला सोडून करता, किंबहुना मी अल्लाहची उपासना करतो जो तुम्हाला मरण देतो." (सूरह युनूस -१०४)

४. मक्केचे अनेकेश्वरवादींना ईश्वर कल्पना मान्य होती आणि त्याच्या उपासनेचाहि त्यांना इन्कार नव्हता परंतु ते हे मान्य करण्यास तयार नव्हते की देवतांना सोडून एकाच ईश्वराची उपासना केली जावी. त्यांची ईश्वरोपासूना शिर्क सहीत असे म्हणून त्यांना ही स्पष्ट जाणीव दिली गेली की हे ईश्वरोपासना नाही किंवा तुम्ही ईश्वराचे उपासक नाहीत. ईश्वरोपासनेसह अन्य कोणतीही उपासना सम्मिलीत होऊ शकत नाही यास्तव जर तुमची अशी धारणा असेल की तुम्ही सुद्धा ईश्वरोपासक आहात तर तुमची ही चुकीची कल्पना आहे. हिचा वस्तुस्थितीशी सुतराम संबंध नाही.

५. अनेकेश्वर वादी हे इच्छित होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांच्या मूर्तींची उपासना करावी, अशा साठी की, सहिष्णुतेचा एखादा मार्ग निर्माण व्हावा 'सूरह जुमर' मध्ये यांच्या या मागणीचे उत्तर कठोर रितीने दिले गेले आहे फर्माविले :

قُلْ اَفَغَيْرَ اللّٰهِ تَاْمُرُوْنِّىْ اَعْبُدُ اَيُّهَا الْجٰهِلُوْنَ ط (الزمر۔۶۴)

सांगा 'हे अडाण्यांनो! मग काय तुम्ही मला अशी आज्ञा करता की मी अल्लाह ऐवजी कोणा इतराची उपासना करावी?"
(अल् जुमर-६४)

आणि इथेहि त्याना अत्यंत निराशाजनक उत्तर दिले गेले आहे. अशासाठी की या संबंधात समन्वयाची त्यानी किंचितही आशा बाळगू नये.

आयत क्र. २ व आयत क्र. ४ मध्ये पुनरावृत्ति नाही किंबहुना या दृष्टीने फरक आहे की आयत क्र. २ मध्ये वर्तमान काळसंबंधात पैगंबरांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आणि आयत क्र.४ मध्ये भविष्याकरिता आपली भूमिका व दृढ निश्चय व्यक्त केला आहे. मतितार्थ हा आहे की ना मी तुमच्या उपास्यांची उपासना करतो आणि ना भविष्यात माझ्याकडून ही अपेक्षा केली जाऊ शकते की मी या बाबतीत एखादी नरमी व लवचिकता दाखवील मी अगदी निश्चितपणे व नेहमी करीता तुमच्या उपास्यांबाबत आपल्या विमनकतेची घोषणा करतो.

६. अर्थात तुमच्या हटवादी पणामुळे तुमच्या कडून ही अपेक्षा केली जाऊ शकत नाही की तुम्ही आपल्या उपास्यांना सोडून माझ्या एकमेव उपास्याची उपासना करणारे व्हाल.

अर्थात याचा अर्थ असा नव्हे की या काफिरांपैकी भविष्यात एकाही व्यक्तिकडून ईमान आणण्याची किंचितहि संभावना बाकी राहिली नाही. कारण त्यांच्यात काही असेहि होते ज्यांनी नंतर इस्लाम धर्म अंगिकारला, किंबहुना अर्थ हा की ज्याअर्थी तुमच्या अंतरी माझ्या एकमेव उपास्याच्या उपासने करीता कसलीच तयारी दिसून येत नाही आणि तुम्ही फक्त आपल्या दैवतांचेच पुजारी बनून राहू इच्छिता म्हणून जोपर्यंत तुम्ही आपल्या या कुफ्रदर्शक व अनेकेश्वरवादी वर्तनापासून परावृत्त न व्हाल तो पर्यंत. मी तुमच्या पासून विरक्ततेंची घोषणा करतो.

७. अर्थात जेव्हा उपासना संदर्भात जी ईश्वरा संबंधाचे मूळ आहे. ज्याअर्थी माझ्या आणि तुमच्या दरम्यान कसलीच समानता नाही आम्हा दोघांचा धर्म एक कसा असू शकतो? तेव्हा समन्वयाचा व सहिष्णुतेचा प्रश्नच कोठे निर्माण होतो? जर तुम्ही माझे आवाहन कबूल करू इच्छित नाही तर तुम्ही आपल्या स्थानावर रहा आणि मी आपल्या स्थानावर कायम आहे. येथपावेतो की सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपल्या निर्णय सादर करावा. ही त्याच स्वरूपाची गोष्ट आहे जी 'सूरह यूनुस' मध्ये फर्माविली गेली आहे :

وَاِنْ كَذَّبُوْكَ فَقُلْ لِّيْ عَمَلِيْ وَلَكُمْ عَمَلُكُمْ اَنْتُمْ
بَرِيْئُوْنَ مِمَّآ اَعْمَلُ وَاَنَا بَرِيْٓءٌ مِّمَّا تَعْمَلُوْنَ۔ (يونس۔٤١)

''आणि जर हे तुम्हाला खोटे ठरवितात तर सांगा, की माझे आचरण माझ्याकरीता आहे व तुमचे आचरण तुमच्याकरीता. मी जे काही करता या बाबत तुम्ही बंधमुक्त आहात आणि तुम्ही जे काही करता त्या बाबत मी बंधमुक्त आहे.'' (यूनुस-४१)

हजरत इब्राहीम यांनी मोठया निर्भय पणे आपल्या जाती समूहाशी विरकत होण्याची घोषणा केली होती ज्यास कुरआनाने ईमान बाळगणाऱ्यांकरीता 'उत्कृष्ट आदर्श' ठरविले आहे :

قَدْ كَانَتْ لَكُمْ اُسْوَةٌ حَسَنَةٌ فِيْٓ اِبْرَاهِيْمَ وَالَّذِيْنَ مَعَهٗ ۔
اِذْ قَالُوْا لِقَوْمِهِمْ اِنَّا بُرَءٰٓؤُا مِنْكُمْ وَمِمَّا تَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ
كَفَرْنَا بِكُمْ وَبَدَا بَيْنَنَا وَبَيْنَكُمُ الْعَدَاوَةُ وَالْبَغْضَآءُ اَبَدًا
حَتّٰى تُؤْمِنُوْا بِاللّٰهِ وَحْدَهٗ۔ (الممتحنہ۔٤)

''तुमच्याकरीता इब्राहीम व त्याच्या सहकाऱ्यांमध्ये एक उत्कृष्ट नमुना आहे.जेव्हा त्यांनी आपल्या जाती समूहास सांगितले आम्ही तुमच्या पासून व ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून उपासना करता त्यांच्यापासून अगदी विभक्त आहोत. आम्ही तुमच्याशी 'कुफ्र' केले आणि आमच्या व तुमच्या दरम्यान नेहमीकरीता शत्रूत्व व तिरस्कार निर्माण झाला. जो पर्यंत की तुम्ही एकाच अल्लाहवर ईमान आणीत नाही. (अल मुम्तहिना -४)

तात्पर्य ही आयत काफिरांच्या वर्तनामुळे विमानस्कता व त्यांच्या धर्मा शी असलेल्या अलिप्ततेचे ऐलान आहे. म्हणून हिला समन्वयाच्या अर्थाने घेणे व तिच्याशी युक्तिवाद करत अनेकेश्वरवादी धर्मांकरीता सौम्यभाव निर्माण करणे अगदी असे आहे की काळया रगांस पांढरा समजणे किंवा रात्रीला दिवस सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे.

अलिकडे धर्म समन्वयाच्या नावावर सर्व धर्म समभावाच्या सत्या व असत्यामध्ये कसलाच भेद ना पाळणाऱ्या दृष्टीकोनास मोठया मनमोहक शैलीत सादर केले जात आहे. याचा प्रचार करणारे असे इच्छितात की एकमेव ईश्वराला दैवतांच्या रांगेत बसवावे (त्यांच्या या शिर्क पासून अल्लाह मुक्त आहे). आणि शिर्क व तौहीद चे मिश्रण एकत्र तयार करावे. हे लोक आपला छंद तर पूर्ण करू शकतात परंतु ते सत्याला असत्या सह मुळीच जोडू शकत नाहा. ज्याप्रमाणे दिवस आणि रात्र एकाच वेळी एकत्र येऊ शकत नाही तव्दतच सत्य आणि असत्यास एकत्र करण्याचा प्रयत्न देखील व्यर्थ आहे. आणि कुरआनच्या संबंधानव्ये ही सूरह या दृष्टीकोनास मिथ्या ठरविण्या करीता पुरेशी आहे. म्हणून जे लोक इस्लाम व कुफ्र चे मिश्रण तयार करू इच्छितात त्यांनी तिळमात्र अशी अपेक्षा बाळगू नये की त्याना कुरआनाचे समर्थन लाभू शकेल.

# ११०. सूरह अन् नस्र

**नावः** पहिल्या आयतीत 'नस्र' (अल्लाहची मदत) येण्याचा उल्लेख आला आहे. त्या संबंधाने या सूरह चे नाव 'अन् नस्र' असे आहे.

**अवतरण काळः** मदनी (अर्थात मदीना येथे अवतरलेली) आहे. हजरत इब्ने अब्बास यांच्या निवेदनानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरणारी ही 'अंतिम सूरह आहे. (तफसीर इब्ने कसीर खंड-४ पृ. ५६१-ससंदर्भ नसाई) सूरहच्या मजकूरावरून या गोष्टीस पुष्टि मिळते. तसेच इब्ने अब्बासच्या कथनानुसार या सूरह मध्ये हा संकेत आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जगातून निरोप घेण्याची वेळ जवळ आली आहे. बुखारी चे कथन आहे की हजरत उमर इब्ने अब्बासला म्हणाले की तुम्ही ह्या إِذَا جَاءَ نَصْرُ اللَّهِ وَالْفَتْحُ सूरह बद्दल काय म्हणता, त्यांनी सांगितले की यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना खबर दिली गेली आहे की जेव्हा अल्लाहची मदत व विजय आला तेव्हा पैगंबरांच्या रवानगीचीही वेळ येऊन ठेपली. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अल्लाहची स्तुती व गुणगान आणि क्षमायाचना करावी. त्यावर हजरत उमर यांनी फर्माविले, मी देखील हेच समजतो' (बुखारी किताबुत्तफसीर)

तेव्हा हे ज्ञात झाले की ही सूरह अशा वेळी अवतरली, जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा अंत-समय अगदी जवळ येऊन ठेपला होता.

**मध्यवर्ति कल्पनाः** ईश्वराची मदत व धर्म-वर्चस्वाच्या प्रकटीकरणावर ईश्वराच्या दरबारात कृतज्ञतेचा नजराणा सादर करणे.अर्थात ईश्स्तुति व पावित्र्य-वर्णन आणि क्षमायाचना करणे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ मध्ये अल्लाहची मदत व त्याचाकडून प्रकट होणारा विजय ------ मक्का-------- विजयाचा उल्लेख आहे.

आयत क्र.२ मध्ये लोकांचे सामूहीक स्वरूपात इस्लाम अंगीकार करू लागल्याचा उल्लेख आहे.

आयत क्र. ३ मध्ये ही कृपा लाभली म्हणून अधिक ईश स्तुति गुणगान आणि क्षमायाचना करण्याची ताकीद केली गेली आहे.

# ११०. सूरह अन् नस्र

سُورَةُ النَّصرِ

आयती - ३

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. जेव्हा अल्लाहची मदत व विजय येऊन पोहचला.[१]

إِذَا جَآءَ نَصْرُ اللّٰهِ وَالْفَتْحُ ۝١

२. आणि तुम्ही पाहिले की लोक अल्लाहच्या दीन मध्ये (धर्मात) समूहासमूहाने दाखल होत आहेत. [२]

وَرَاَيْتَ النَّاسَ يَدْخُلُوْنَ فِيْ دِيْنِ اللّٰهِ اَفْوَاجًا ۝٢

३. तर आपल्या पालनकर्त्याचे प्रशंसेसह [३] पवित्रता वर्णन करा आणि त्याच्याकडे क्षमा याचना करा.[४] नि:संशय, तो मोठा तौबा (क्षमायाचना) कबूल करणारा आहे.[५]

فَسَبِّحْ بِحَمْدِ رَبِّكَ وَاسْتَغْفِرْهُ ۚ اِنَّهٗ كَانَ تَوَّابًا ۝٣

१. नस्र (मदत) शी अभिप्रेत ती सहाय्यता जी सत्याच्या वर्चस्व रुपात प्रकट झाली. सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या प्रेषिताना वचन दिले आहे की तो अनिवार्यपणे त्यांच्या विरोधकांच्या विरोधात त्यांची मदत फर्मावािल:

اِنَّا لَنَنۡصُرُ رُسُلَنَا وَالَّذِيۡنَ اٰمَنُوۡا فِى الۡحَيٰوةِ الدُّنۡيَا وَيَوۡمَ يَقُوۡمُ الۡاَشۡهَادُ۔ (المؤمن۔۵۱)

"निश्चितच आम्ही आपल्या प्रेषितांची व ईमान-धारकांची (श्रद्धा बाळगणाऱ्यांची) या जगातहि मदत करतो आणि त्या दिवशी देखील करू जेव्हा साक्षी उभे राहतील." (अल मोमिन-५१)

या मदतीचे प्रकटीकरण पूर्णत: अशा वेळी होते जेव्हा सत्य व असत्याचा संघर्ष अंतिम अवस्थेत प्रविष्ट होते. आणि हीच ती मदत जिची प्रतिक्षा प्रेषितांच्या सहकाऱ्यांना असते.

مَتٰى نَصۡرُ اللّٰهِ اَلَاۤ اِنَّ نَصۡرَ اللّٰهِ قَرِيۡبٌ۔ (البقرہ ۔۲۱۴)

"केव्हा येईल अल्लाहची मदत? विश्वास बाळगा, अल्लाहची मदत निकट आहे." (अल बकरा -२१४)

याच मदतीला सूरह 'फतह' मध्ये نَصۡرًا عَزِيۡزًا 'जबरदस्त सहाय्य' असे संबोधिले आहे. 'फतह'चा अर्थ मक्का विजय होय. जो एक निर्णायक विजय होता. व त्या नंतर अनेकेश्वरवाद्यांचे सामर्थ्य खचले आणि अरबस्तानात इस्लामला परिपूर्ण वर्चस्व प्राप्त झाले. मक्का विजयाची घटना रमजान हिजरी सन ८ (जानेवारी इ. स. ६३०) ची आहे ज्यावेळी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जीवावर उदार अशा आपल्या दहा हजार सहकाऱ्यांना घेऊन मदीने पासून रवाना झाले होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) कोणत्याही उल्लेखनीय हस्तक्षेपाविना दाखल झाले. आणि घोषणा केली की जो जो माणूस शस्त्र टाकील त्याला सरक्षण दिले जाईल. जे लोक इस्लाम शी वैर ठेवण्यात पुढाकार घेत असत त्यांना सुद्धा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सर्वसामान्यपणे माफ केले. या प्रसंगी कित्येक लोकांनी पैगंबरांच्या सेवेत हजर होऊन इस्लाम धर्म अंगिकारला. काबागृह की ज्यास एक मूर्तिभुजक प्रेषित हजरत इब्राहीम यांनी बांधले होते त्यात कुरेश कबिल्याच्या लोकांनी ३६० मूर्त्या बसविल्या होत्या पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या घ्राणी पासून काबागृहाला शुद्ध केले. त्यावेळी ते काठीने मूर्त्या पाडत जात व मुखाने या आयतीचे पठण करीत जात.

جَآءَ الۡحَقُّ وَزَهَقَ الۡبَاطِلُ اِنَّ الۡبَاطِلَ كَانَ زَهُوۡقًا۔ (بنی اسرائیل : ۸۱)

'सत्य आले आणि असत्य लोप पावले' आणि असत्य लोप पावण्या करीताच होते.' (बनी इस्राईल-८९)

त्या मूर्त्यांपैकी सर्वात मोठी मूर्ति 'हुबल' होती मूर्तिपूजक युद्ध-प्रसंगी याचा जयजयकार करीत. परंतु आज ती स्वत:च गलित गाम झाला होता. पराभवला तोंड देणाऱ्यांचे तो कसले सहाय्य करणार होता ?त्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या विजयप्राप्ती बद्दल कृतज्ञता दर्शक नमाज अदा केली आणि अल्लाहच्या श्रेष्ठत्वाचा ध्वनि (अल्लाहु अकबर) उंचावित ही वास्तवजन्य घोषणा केली :

لَاۤ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَحۡدَهٗ صَدَقَ وَعۡدَهٗ وَنَصَرَ عَبۡدَهٗ وَهَزَمَ الۡاَحۡزَابَ وَحۡدَهٗ۔ (ابوداؤد کتاب الدیات)

'अल्लाह खेरीज कोणहि उपास्य नाही त्याने आपले वचन सिद्ध केले. आपल्या दासाची मदत केली व समस्त समूहांना एकाकी पराजय दिला.'-(अबु दाऊद-किताबुद्दीयात)

येथे हे लक्षात घेतले पाहिजे की اِذَا 'इज़ा' शब्द अरबी भाषेत सर्वसाधारणपणे भविष्यकाळाकरीता येतो. परंतु कधी कधी भूतकाळा करीताहि येतो. येथे संदर्भ तसेच हजरत इब्ने अब्बास उल्लिखित निवेदन या गोष्टीचा पुरावा होय की हा शब्द भूतकाळाच्या अर्थाने आहे. म्हणून आम्ही आयतीचा अनुवाद जेव्हा अल्लाहची मदत व विजय आला असा केला आहे. जेव्हा सर्वसामान्यत:याचा अनुवाद 'जेव्हा अल्लाहची मदत व त्याचा विजय यावा किंवा येईल' असा केला जातो.

२. मक्का विजयाचा प्रभाव केवळ कुरैश पुरता मर्यादित नव्हता किंबहुना अरबच्या विविध प्रांतात जे कबिले वस्ता करून राहत होते त्यांच्यावरहि याचा जबरदस्त प्रभाव पडला या कबिल्यांचे प्रतिनिधि शिष्ट-मंडळाच्या रुपात मदीना येऊ लागले. आणि हिजरी सन ९ व १० मध्ये असंख्या शिष्टमंडळांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर होऊन इस्लाम स्विकृति ची घोषणा केली. आणि सामूहीक स्वरूपात लोक इस्लामचा अंगीकार करू लागले. ज्या धर्माच्या मार्गात कुरैश २१ वर्षापर्यंत अडसर निर्माण करीत राहिले, तो दोन वर्षाच्या आंतच अरबस्तानच्या कोना कोपऱ्यात पसरला. येथपावेतो की त्या भूमीवर एकही मुशरिक (अनेकेश्वरवादी) शिल्लक राहिला नाही. जणू 'मक्का-विजय' हे या महान क्रान्तीचे पूर्वचिन्हच होते!

३. अर्थात धर्म-वर्चस्व व लोकांच्या इस्लाम स्विकृति चे जे उत्साहदायी दृश्य पैगंबरांनी पाहिले व मनात जाणले की हा अल्लाहच्या मदतीच्या परिणाम होय. म्हणून या कृपेचा लाभ घडल्यानंतर हे पैगंबर, आपण अल्लाहजवळ कृतज्ञता व्यक्त

केली पाहिजे, अर्थात आपणास ईश्वरातर्फे पाठविण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे म्हणून आपण ईश-स्तुति व पावित्र्य-वर्णन करण्यात अधिकाधिक व्यस्त होऊन गेले पाहिजे.

यावरून एक महत्वपूर्ण वस्तुस्थितीचे आकलन होते. ती ही की ईमान बाळगणाऱ्या व्यक्तिचे खरे ध्येय म्हणजे ईश-प्राप्ती होय. या करीता तिने जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत सतत आचरण करीत रहायचे आहे. इस्लामला वर्चस्व प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांच्या वेळाहि प्राप्ती नंतराहि करीत रहायचे आहे.

४. अर्थात तुम्ही ईश्वराजवळ ही प्रार्थना केली पाहिजे की या सेवेस पार पाडण्यात जी कमतरता झाली असावी आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात जी भूल चूक झाली असेल त्या बद्दल अल्लाहने क्षमा करावी.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हा आदेश देऊन इमान बाळगणाऱ्यांचे मार्गदर्शन त्या दिशेने केले गेले आहे की त्यांनी कोणत्या ही सेवेस पार पाडल्यानंतर किंवा कोणता ही विजय व यश संपादन केल्यानंतर ऐहिक वृत्तीच्या लोकांप्रमाणे डोलण्या व गर्व करण्या ऐवजी तो अल्लाहची कृपा व त्याने दिलेल्या सुबुद्धिचा परिणाम समजावा व कृतज्ञशील होऊन त्याचा स्तुतिसह पावित्र्य वर्णन करावे. कारण प्रशंसा करण्या योग्य केवळ तोच आहे. तसेच या जाणीवेसह की न जाणे ही सेवा पार पाडत असतांना कस कशी कमतरता झाली असेल. आपल्या पालनकर्त्याशी अत्यंत विनम्रतेने क्षमेचे याचक असावे. अशा प्रसंगी ईमान बाळगणाऱ्यांनी हीच निती पत्करली पाहिजे. त्यांनी त्या मार्ग-पद्धतीबाबत संयम पाळला पाहिजे ज्या त्यांच्या अंतरी दास्यत्वाच्या जाणीवे ऐवजी, अहंमन्यता निर्माण करणाऱ्या असाव्यात एवढा महान विजय व एवढे जबरदस्त वर्चस्व प्राप्त झाल्यानंतर कुरआनाने 'आंनदोत्सव' साजरा करण्याचा आदेश दिला नाही किंबहुना ईश्वराच्या दरबारात कृतज्ञता व दास्यत्वाचा नजराणा सादर करण्याचा आदेश दिला आहे जो या गोष्टीचा उघड पुरावा आहे की ही उच्च शिकवण मनुष्यजन्य नसून अल्लाह तर्फे आहे. अर्थात या शिकवणीस सादर करणारे व्यक्तिमत्व केवळ अल्लाहच्या पैगंबराचेच व्यक्तिमत्व असू शकते.

हदीस वचनात असा उल्लेख आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) दिवस भरात शंभर वेळा इस्तिगफार (क्षमा याचना) करीत.- (मुस्लिम-किताबुज जिक्र)

तसेच बुखारीच्या हदीस वचनात आहे की ही सूरह अवतरीत झाल्यानंतर रुकू व सजदयामध्ये (नमाजच्या अवस्थांमध्ये) पैगंबर मोठया प्रमाणात याचे पठण करीत

سُبْحَانَكَ اللّٰهُمَّ رَبَّنَا وَ بِحَمْدِكَ

اَللّٰهُمَّ اغْفِرْلِیْ۔( بخاری کتاب التفسیر)

'पावित्र्य तुझ्याच करीता आहे. हे अल्लाह, आमच्या पालनकर्त्या,मी तुझ्या स्तुति प्रशंसेसह तुझे पावित्र्य वर्णन करतो. हे अल्लाह,मला मोक्षप्राप्ती दे'.

(बुखारी-किताबुत्तफसीर)

५. सर्वश्रेष्ठ अल्लाहचे गुणवैशिष्टय 'तव्वाब' (फार मोठा तौबा म्हणजे क्षमायाचना कबूल करणारा) वर्णन केले गेले आहे. जे होकारात्मक व नकारात्मक या दोन्ही पैलूंनी युक्त आहे. नकारात्मक पैलूच्या दृष्टीने अर्थ असा की जर दासाने त्याच्याकडे क्षमा याचना केल्यास व तौबा केल्यास तो याला माफ करतो. व त्याची तौबा (पुन्हा कधीही तो अपराध न करण्याची प्रतिज्ञा) मान्य करतो आणि होकारात्मक पैलूच्या दृष्टीने त्याचा अर्थ असा की दास जेव्हा स्वत:ला त्याच्याकडे रुजू करतो तेव्हा तो त्या दासाकडे आपल्या कृपेनिशी प्रवृत्त होतो. येथे या गुणवैशिष्टयाचा उल्लेख या अर्थाने आहे की तुम्ही आशा बाळगा की तो केवळ तुमच्या क्षमायाचनेची प्रार्थनाच कबूल करीत नाही, किंबहुना तुमच्याकडे आपली कृपादृष्टी देखील वळवील व आपल्या मेहरबानींसह तुमच्या कडे प्रवृत्त होईल.

# १११. सूरह अल्-लहब

**नावः** आयत क्र.३ मध्ये 'लहब' हा शब्द आला आहे. ज्याचा अर्थ ज्वाला असा आहे. या औचित्यान्वये या 'सूरह' चे नाव अल-लहब असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. आणि मजकूरावरून असे दिसून येते की मक्केच्या शेवटच्या काळात अवतरीत झाली असावी कारण यात अबू लहब च्या नावाचा उल्लेख करून त्याचे वाईट शेवट वर्णिले गेले आहे. अल्लाहचे पैगंबर एखाद्याची दुष्परिणती त्याचे प्रमाण प्रस्थापित केल्यानंतरच वर्णन करतात. म्हणून ही सूरह, 'सूरह काफेरून'च्या नंतरच अवतरीत झाली असावी ज्यात काफिरांशी जबाबदारीतून मुक्त होण्याची घोषणा केली गेली आहे.

**मध्यवर्ति कल्पनाः** पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सर्वात वाईट अशा शत्रूच्या दुष्परिणतीसंबंधी लोकांना सचेत करणे होय.अशासाठी की कियामती पर्यंत निर्माण होणाऱ्या प्रेषित-शत्रू व इस्लाम विरोधकांनी या सूरह च्या दर्पणात आपले प्रतिबिंब पहावे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ३ मध्ये प्रेषित-शत्रू अबू लहब ची करुणाजनक परिणिती वर्णन केली गेली आहे आयत क्र.४ व ५ मध्ये त्याच्या त्या पत्नीचा धडा घेण्यायोग्य परिणती चे दृश्य सादर केले गेले आहे जी या शत्रूत्वात पतीशी सहमत खांद्याला खांदा लावून सहभागी होती.

# १११. सूरह अल्-लहब

سُوْرَةُ اللَّهَبِ

आयती -५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अबू लहब [१] चे दोन्ही हात [२] तुटून गेले आणि त्याचा सर्वनाश झाला.[३]

تَبَّتْ يَدَآ اَبِيْ لَهَبٍ وَّتَبَّ ۝١

२. त्याची धनसंपत्ति व त्याची कमाई त्याच्या काहीहि कामी आली नाही. [४]

مَآ اَغْنٰى عَنْهُ مَالُهٗ وَمَا كَسَبَ ۝٢

३. लवकरच तो ज्वालामय अग्नित दाखल होईल.[५]

سَيَصْلٰى نَارًا ذَاتَ لَهَبٍ ۝٣

४. आणि त्याची पत्नी देखील, जी इंधन उचलून धरलेली असेल. [६]

وَّامْرَاَتُهٗ حَمَّالَةَ الْحَطَبِ ۝٤

५. तिच्या गळयात मजबूत दोर असेल. [७]

فِيْ جِيْدِهَا حَبْلٌ مِّنْ مَّسَدٍ ۝٥

१. अबू लहब कुन्नियत (संकेत शब्द) आहे. त्याचे मूळ नाव 'अब्दुल उज्जा' होते अर्थात उज्जा देवीचा दास आणि हे अनेकेश्वरवादी नाव असल्या मुळे कुरआनाने त्याचा उल्लेख त्याच्या किळसावण्या नावाने न करता त्याच्या संज्ञे ने केला आहे. अबू लहब हा कुरैश जमातीच्या बनी हाशीम वंशाचा प्रख्यात सदस्य, अब्दुल मुत्तलीब चा पुत्र आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा काका होता. ज्या कारणान्वये त्याच्या जीवनातच त्याचा भाग्य-निर्णय केला गेला व त्याच्या परिणितीशी सचेत करण्याकरिता एक सूरह अवतरीत केली गेली ती कारणे थोडक्यात खालील प्रमाणे होत.

**प्रथम :-** अबू लहब काबागृहाचा विश्वस्त होता आणि ईश मुर्तिपुजेत त्याची तन्मयता त्याचा सर्वात मोठा व भयंकर अपराध होता.

**द्वितीय :-** जी मान प्रतिष्ठा त्याला लाभली होती तिने त्याच्या अंगी अहंकार निर्माण केला होता आणि अवज्ञा व बंडखोरीची निती आत्मसात करून तो फिरऔनच्या स्थानावर बसला होता.

**तृतीयः-** इस्लामच्या आवाहनाच्या प्रतिकाराचा आरंभ त्यानेच केला होता म्हणून कुफ्रचे (श्रद्धाहीनतेचे) नेतृत्व त्याचे भाग्य बनले.

**चतुर्थ :-** तो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा कट्टर वैरी होता. आणि या शत्रूत्वात नितिमत्तेच्या समस्त मर्यादांचे त्याने उल्लंघन केले होते. येथपावेतो की नाते संबंध तोडण्यातहि तो सर्वांच्या पुढे गेला. याचे स्पष्ट उदाहरण त्याचे ते वर्तन होय जे त्याने पैगंबरांच्या सामाजिक व चरितार्थ बहिष्कारा संबंधी स्वीकारले होते. कुरैश जमातीने बहिष्कार टाकल्यावर जेव्हा पैगंबरांनी अबि तालीबच्या दरीत आश्रय घेतला तेव्हा अबु लहब ने कुरैश जमातीच्या काफीरांची साथ दिली आणि त्याला आपल्या पूतण्यावर त्यावेळी देखील दया आली नाही जेव्हा तो उपाशी पोटी दिवस कंठीत होतो. (इब्ने हिशाम- खंड- १- पृ. ३७२)

**पंचम :-** जीवनभर तो इस्लामच्या मार्गात काटा बनून राहिला आणि तौहीद (एकेश्वरवादा) च्या विरोधात सर्वाधिक व्यस्त राहिला यास्तव जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अरबच्या सर्वसामान्य कबिल्यासमोर आपला संदेश सादर केला तेव्हा अबुलहब लोकांना त्या संदेशाबाबत घृणा देत राहिला. रबिआ बिन अबादचे कथन आहे की मी जुल मजाज च्या बाजारात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ना पाहिले ते म्हणत होते 'लोकहो !

لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ

**ला इलाहा इल्लल्लाहु** (खेरीज कोणीही उपासनीय नाही) म्हणा सफलता प्राप्त कराल आणि त्यांच्या पाठोपाठ एक व्यक्ति सांगत जात होती की, 'हा माणूस खोटरडा आहे. याचे म्हणणे मान्य करू नका' मी लोकांना विचारले. हा कोण आहे? ते म्हणाले, 'हा त्यांचा काका अबु लहब आहे. (इब्ने कसीर-खंड-१ पृ. ५१४, ससंदर्भ 'अहमद')

**षष्ठयम :-** कृपणाता व धन हव्यासा बाबत तो तत्कालीन 'कारून' होता.

**सप्तम :-** त्याला आपल्या देवांबद्दल मोठा अभिमान होता. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वरील बहिष्कारात कुरेश जमातीस सहयोग देतांना तो हिंद बिन उतबा ला म्हणाला, ज्या व्यक्तिने 'लात' व 'उज्जा' मूर्तीना सोडून दिले आहे, त्याचा त्याग करून काय मी ह्या ईश्वरांची मदत केली नाही? हिंद म्हणाला, होय ईश्वर तुला चांगला मोबदला प्रदान करो.' (इब्ने हिशाम-खंड -१ पृ. ३७२)

अबु लहबच्या परिणतीची ही वार्ता वस्तुत:या गोष्टीचे प्रकटीकरण आहे की जर पैगंबराचा काका देखील कुफ्र करील तर तो ईश्वराच्या तावडीतून सुटू शकत नाही. त्याची न्याय निती निर्बंध व गोत्र वंशांच्या प्रभावापासून मुक्त आहे.

२. हात तुटण्याचा अर्थ त्याचे शारिरिक हातांचा नाश होणे असाहिं आहे. आपल्या हातांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरोधात उंचावित असे तसेच दुसऱ्या अर्थाने त्याची शक्ति खचणे व त्याचा वैभव लोप पावणे हे ही होय. याने अल्लाहच्या वचनास पस्त करण्याकरीता सर्व शक्तिनिशी जोर लावला होता परंतु आपल्या उद्दिष्टात तो वाईटरित्या अयशस्वी झाला. बदर च्या युद्धात त्याचे सामर्थ्य खचले. त्याचे समर्थक व सहाय्यक वाईट रित्या मारले गेले आणि त्याच्या ऐश्वर्य वैभवाचा सर्वनाश झाला. अशा प्रकारे ते भाकित पूर्ण झाले जे या आयतीत केले गेले होते इब्ने अब्बास च्या कथनानुसार जेव्हा आयत

وَاَنْذِرْ عَشِيْرَتَكَ الْاَقْرَبِيْنَ

''आपल्या अत्यंत निकटच्या नातेवाईकांना भय दाखवा''

अवतरीत झाली तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी 'सफा' पर्वतावर चढून संबोधिले ياصباحاه'सकाळच्या धोक्यापासून सावधान ! लोक म्हणाले, हा कोण पुकारित आहे? मग ते पैगंबरांजवळ एकत्रित झाले. पैगंबरांनी फर्माविले,'जर मी तुम्हाला असे सांगितले की या पर्वतामागून एक सैन्य तुमच्यावर हल्ला चडविण्याकरीता येत आहे तर काय तुम्ही माझे म्हणणे सत्य मानाल?' लोक म्हणाले, आम्ही तुम्हाला खोटे बोलताना कधीच पाहिले नाही. पैगंबरांनी

फर्माविले, तर पहा मी तुम्हाला येणाऱ्या महान यातनेपासून सावध करतो. हे ऐकून अब लहब म्हणाला

تبا لك ما جمعتنا الا لهذا

''नाश असो तुझा काय तू एवढया करीताच आम्हाला एकत्रित केले होते?'' त्यावर

تبت يدا ابي لهب وتب

'अबु लहबचे दोन्ही हात तुटून गेले व त्याचा सर्वनाश झाला' ही आयत अवतरली. (बुखारी किताबूत्तफसीर)

याचा अर्थ नाही असा की सूरह लहब त्याच प्रसंगी अवतरीत झाली. कारण या आधीच्या स्पष्टीकरणानुसार एखाद्या व्यक्तिच्या संबंधात शिक्षेचा निर्णय अशाच वेळी ऐकविला जातो की त्याला अंतिम मर्यादे पर्यंत सवड दिली गेली असावी व त्यानंतर तो आपल्या श्रद्धाहीनतेत व बंडखोरीत अटळ रहावा किंबहुना याचा अर्थ हा की अबू लहबच्या ह्याच त्या हरकती होत की ज्यांच्यामुळे सरतेशेवटी त्यावर ईश-कोप उतरला. आणि ही सूरह त्याच्या हरकतींचे यथायोग्य उत्तर आहे.

३. बदरच्या युद्धात त्याच्या समर्थकांच्या पराजयाचे त्याला मोठे दु:ख झाले आणि यानंतर तो स्वत:देखील नाश पावला, तेव्हा त्याचा मृत्यु सर्वनाशाच्या स्वरूपात झाला आणि आखिरतची करूणाजनक शिक्षा सुद्धा त्याच्या करीता 'भाग्य' ठरली. बदरच्या युद्धात तो सहभागी झाला नाही. आणि हे युद्ध संपून एक आठवडाच लोटला होता की माता रोगात ग्रस्त झाल्या कारणाने त्याचा मृत्यु घडला. इतर कथनांन्वये असे माहित होते की त्याचे प्रेत तीन दिवसा पर्यंत त्याच्या घरात सडत कूजत राहिले. पण कोणीहि त्याची विल्हेवाट लावणारा नव्हता. कारण कुरैश कबिल्याचे लोक माता रोगास संसर्गजन्य रोग समजत शेवटी त्याच्या मुलांनी त्याचे प्रेत एका भिंतीआड अशा तऱ्हेने दफन केले की लांबूनच त्याच्या कबरीवर दगड फेकत राहिले.

(अल् बिदायह वन्निहायाह-खंड -३ पृ. ३०९)

आज अबुलहब चे नाव घेणारा कोणीहि राहिला नाही तथापि त्याचा धिक्कार करण्या करीता एक संपूर्ण उम्मत (जाति-समूह) अस्तित्वात आहे. जी आपल्या नमाजमध्ये 'सूरह लहब' चे पठण करून या प्रेषित-शत्रूवर निर्भत्सनेचा निरंतर वर्षाव करीत राहते तव्द्तच कुरआनाचे हे भाकित की पैगंबराना वर्चस्व प्राप्त होईल व प्रेषित शत्रू नाश पावेल' शब्दश: खरे ठरले. पवित्र कुरआनाच्या सत्यतेचा हा असा पुरावा आहे जो कियामतीपर्यंत बाकी राहील.

४. अर्थात ज्या धनसंपत्तिवर त्याला मोठा अभिमान होता, ती अल्लाहच्या तावडीतून त्याला सोडवू शकली नाही आणि मिथ्या धर्म पालनाच्या आधारे जी कर्मे त्याने पार पाडली होती तीहि त्याच्या उपयोगी पडू शकली नाहीत. कुरआनात 'कर्मा' करीता कसब (कमविलेले) हा शब्द मोठ्या संख्येने वापरला गेला आहे. येथे सुद्धा त्याचा हाच अर्थ आहे.

५. हा त्याचा अंतिम शेवट होय जो कियामतीच्या दिवशी त्याच्या समक्ष येईल.

अबु लहब आणि نارا ذات لهب ''नारन जाता लहब'' (भडकणारी आग) या दोघात मोठी साम्यता निर्माण झाली आहे. त्याच्या मनात द्वेष व मत्सराची जी आग होती ती कियामतीच्या दिवशी प्रज्वलीत होईल. मोबदला, वस्तुत: मानवाच्या कर्माचाच परिणाम होय.

६. अबु लहबच्या पत्नीचे नाव 'उम्मे जमील' असे होते. ही अबु सुफियान ची बहीण होती आणि इस्लाम शी वैर व प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी द्वेष व तिरस्कार बाळगण्यात आपल्या पतीस सहाय्यक आणि विरोधी कारवायंमध्ये सहभागी होती म्हणून तिचा देखील शेवट वर्णिला गेला आहे.

'जहन्नम' मध्ये ती आपल्या पती करीता इंधन वाहून नेण्याचे काम करील कारण तिने शत्रूत्वाची आग भडकाविली होती

حمالة الحطب

'इंधन उचलणारी' याचा अर्थ सईद बिन जुबैरने 'अपराधांचे ओझे उंचलणारी असा केला आहे (फतहुल् कदीर लिश शोकानी खंड ५ पृ. ५१२) कियामतीच्या दिवशी अपराध्यांची जी अवस्था असेल ती पवित्र कुरआनात पुढील शब्दात वर्णन केली गेली आहे.

وهم يحملون اوزارهم على ظهورهم

''ते आपले ओझे आपल्या पाठीवर लादून घेतलेल्या स्थितीत असतील.'' (अल् अनआम-३१)

७. अर्थात जहन्नम मध्ये तिच्या गळयाभोवती एक मजबूत दोर टाकलेला असेल. तिची अवस्था जणू त्या दासी सारखी असेल,जी डोक्यावर लाकडे (इंधन) उचलून धरलेल्या स्थितीत असावी व जिच्या गळयाभोवती पिळलेला दोर पडला असावा. कियामतीच्या दिवशी अवहेलनेची जी शिक्षा तिला चाखावी लागेल, तयाचे हे चित्र होय.

सईद बिन मुसैय्यब म्हणतात की तिच्या गळयात रत्नांचा एक मूल्यवान हार होता आणि ती म्हणत असे की, लात व उज्जा (देवता) ची शपथ मी हे मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि

वसल्लम) च्या शत्रूत्वात खर्च करीन. म्हणून कियामतीच्या दिवशी तोच हार तिच्या शरीरावर शिक्षा स्वरूप असेल. (फतहुल कदीर लिश-शौकानी - खंड - ५ पृ. ५१३)

आयतीचा अर्थ असा की, ज्या हाराविषयी तिला मोठा अभिमान आहे व जो ती प्रेषित विरोधी कारवायांमध्ये खर्च करू इच्छिते तो कियामतीच्या दिवशी खरोखर तिच्या कंठाभोवती असल्याचे सिद्ध होईल. आणि तिचे हे सौंदर्य साधन तिच्या अवहेलनेचे कारण ठरेल.

अबु लहबच्या पत्नीच्या या दुष्परिणतीत स्त्रीयांनी मोठा धडा घेण्यासारखे आहे आणि पुरुषांकरिताहि, स्त्रीयांना बोधप्रद हे की एक स्त्री कुफ्र, आणि विद्रोहाची निती पत्करुन केवढया वाईट दुर्गतीस पोहचते आणि पुरुषांना अभिप्रेत असलेला बोध हा की, स्त्रीया कशा प्रकारे पाप कर्मात पुरुषाची सहाय्यक बनून त्यांना सर्वनाशा कडे लोटत राहतात.

# सूरह
# अल् इखलास

# ११२. सूरह अल् इखलास

**नावः** या सूरह चे एक नाव तर पहिली आयत قُلْ هُوَ اللّٰهُ اَحَدٌ **कुल हु वल्लाहु अहद** लाच ठरविले गेले आहे. आणि दुसरे नाव हिच्या मजकुरानुषंगाने 'इखलास' हे आहे. कारण या सूरह मध्ये खालीस तौहीद म्हणजे एकेश्वरवादाच्या शुद्ध श्रद्धे याचे वर्णन केले गेले आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. आणि मजकूर तसेच आयत शैली वरून हे अनुमान निघते की ही सूरह आवाहनाच्या प्रारंभ काळात अवतरली असावी. कारण या काळात संक्षिप्त वाक्यांद्वारे धर्माच्या मूलभूत बाबी सादर केल्या गेल्या आहेत व त्यांचे स्पष्टीकरण नंतरच्या सूरतींमध्ये केले गेले आहे.

प्रारंभ काळात अवतरीत होण्याचा एक क्रम हजरत बिलाल ची ही घटना आहे. जेव्हा त्यांना उमय्या बिन खलफ कडक उन्हात झोपवून उताणे पाडून त्यांच्या छातीवर भारी भरकम दगड ठेवून हे म्हणत असे की याच स्थितीत तुला मरावे लागेल अन्यथा तू मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा इन्कार करून लात व उज्जा ची पूजा करावी तेव्हा प्रत्युत्तरात हजरत बिलाल **احد احد** 'अहद' 'अहद' असे म्हणत.(अल् बिदायह वल निहायह खंड- ३ पृ. ५८)

तेव्हा असे दिसून येते की या वेळेपर्यंत सूरह इखलास अवतरीत झाली होती. आणि 'अहद' हा शब्द याच 'सूरह' मधील होता. जो मुखोद्गत झाला होता.

**मध्यवर्ति कल्पना :** एकेश्वरवाद होय. आणि विशेषतः सर्वश्रेष्ठ अल्लाह विषयीची खरी कल्पना सादर करणे हा पैलू होय ज्यायोगे अनेकेश्वरवादीय कल्पनांचे उच्चाटन व्हावे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ व २ मध्ये होकारात्मक पैलूने सर्वश्रेष्ठ अल्लाहची गुण वैशिष्ट्ये वर्णिली आहेत आणि आयत क्र. ३ व ४ मध्ये नकारात्मक पैलूने अशा साठी की राष्ट्रे आणि जाति समूहा मध्ये ज्या मार्गान्वये शिर्कदाखल झाले आहे तो बंद व्हावा.

**महत्व आणि श्रेष्ठत्वः** खरे पाहिले असता सूरह इखलास पवित्र कुरआनाची अंतिम सूरह होय कारण यानंतरच्या दोन सूरती याच एकेश्वरवादाच्या कल्पनेने प्रेरित आहेत. आणि ही एकेश्वरवादा (तौहीद)ची कल्पना संपूर्ण कुरआनाच्या संरक्षणाचे साधन होय पवित्र कुरआनाचा आरंभ एकेश्वरवादाने झाला होता व समाप्ति देखील एकेश्वरवादावरच झाली आहे. यावरून एकेश्वरवादाचे महत्व तसेच या सूरहचे श्रेष्ठत्व चांगल्याप्रकारे स्पष्ट होते. अल्लामा फराही फर्मावितात:

''जरी ही सूह आपल्या बाहय पद्धतिच्या दृष्टीने समस्त सूरतींमध्ये इतकी लहान आहे. जसा संपूर्ण शरीरात नेत्रबिंदू. परंतु संपूर्ण मार्गदर्शन विश्व हिच्याच द्वारे प्रकाशमय दिसते. (मजमुआ तफसीर फर्राही - पृ. ५२५)

सूरह इखलास चे श्रेष्ठत्व सहीह हदीस वचनांद्वारे सिद्ध आहे. 'बुखारी' मधील उल्लेखानुसार प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) नी फर्मावले.

وَالَّذِىْ نَفْسِىْ بِيَدِهٖ اِنَّهَا لَتَعْدِلُ ثُلُثَ الْقُرْاٰنِ

''शपथ आहे त्या अस्तित्वाची ज्याच्या हाती माझा प्राण आहे. ही सूरह قُلْ هُوَ اللّٰهُ اَحَدٌ

**(कुल हू अल्लाहु अहद)** कुरआनाच्या एक तृतियांश हिश्शयाबरोबर आहे'' (बुखारी किताबु फजाइलिल कुरआन) त्याचे हे श्रेष्ठत्वा कुरआनच्या अर्थाच्या संबधात आहे कारण पवित्र कुरआनात तौहीद विषय इतक्या विपुलतेने वर्णिला गेला आहे की जणू त्याचा एक तृतियांशा हिस्सा यावरच आधारित आहे. वस्तुतः सूरह इखलास मध्ये या महत्वपूर्ण व विस्तिर्ण विषयास चार संक्षिप्त वाक्यात अशा प्रकारे गुंफले आहे, जणू जलाशयाला एका पात्रात बंद केले असावे. म्हणूनच या सूरह ला कुरआनाच्या एक तृतियांश भागासमान गणले गेले आहे. राहीलीत हिच्या पठणाच्या बरकती तर त्यांचा तेच लोक लाभ घेऊ शकतात जे निव्वळ एकेश्वरवादावर ईमान ठेवतात. व आल्या श्रद्धेत 'शिर्क' चा तिळमात्र लवलेश येऊ देत नाहीत.

# ११२. सूरह अल् इखलास

سُورَةُ الإخْلَاصِ

आयती: ४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. सांगा [१] तो [२] अल्लाह एकच आहे. [३]

قُلْ هُوَ اللّٰهُ اَحَدٌ ①

२. अल्लाह ते सर्वोच्च अस्तित्व आहे जो सार्वांच्या गरजा भागविणारा व सर्वांचा आश्रय होय. [४]

اَللّٰهُ الصَّمَدُ ②

३. त्याची कोणतीहि संतति [५] नाही की तो कोणाचीहि संतति नाही. [६]

لَمْ يَلِدْ ۙ وَلَمْ يُوْلَدْ ③

४. आणि कोणीहि त्याच्या समान नाही. [७]

وَلَمْ يَكُنْ لَّهٗ كُفُوًا اَحَدٌ ④

१. हे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देश्यून आहे. व आपल्या द्वारे कुरआनाविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला आहे. قُلْ 'सांगा' या शब्दाशी अभिप्रेत व्यक्ता व घोषणा होय.

२. या आयतीतील सर्वनाम هُوَ 'हुव' (तो) अरबी भाष्येच्या व्याकरणानुसार 'जमीरुश्शान ' होय जे एखाद्या गोष्टीचे महत्व स्पष्ट करण्याकरिता व त्यावर लक्ष केंद्रित करण्याकरिता वाक्याच्या सुरवातीस येते आणि यामुळे वाक्यात मोठी फसाहत (लेखन शैली) निर्माण होते. उदा هُوالزمان غدار **हुवज जमानु गद्दार** (तो काळ आहे जो निष्ठा द्रोह करतो). قُلْ هُوَ اللّٰهُ اَحَدٌ **कुल हू वल्लाहु अहद** (सांगा तो अल्लाह एकच आहे) या आयतीत 'हुव' هُوَ (तो) हे सर्वनाम विधानाची महत्वपूर्णता दर्शवित आहे की हे कान लावून ऐका व याकडे आपले लक्ष केंद्रित करा.

३. अल्लाह एकच आहे, अर्थात तो आपल्या स्वत्वात व गुणवैशिष्टयांत अगदी अद्वितीय आहे. वाहीद (एक) या शब्दाच्या तुलनेने अहद (एकच) हा शब्द हे स्पष्ट करतो की त्याच्या एकमेवतेत अनेकवचनाचा कोणताही पैलू नाही आणि त्याची एकमेवता इतकी परिपूर्ण आहे की तिचे पृथक्करण केले जाऊ शकत नाही किंवा विभागणीहि केली जाऊ शकत नाही. त्याचे अस्तित्व चिरस्थायी आहे आणि ईश निर्मिती पासून अगदी विभक्त आहे. ईश्वरांची कोणतीहि जाती वा वर्ग नाही किंबहुना तो एकच ईश्वर आहे. जो नेहमीपासून आहे व नेहमी राहील.

मानव-स्वभाव ईश्वराच्या या कल्पनेशी परिचित आहे. आणि त्याच्या अंतर्मनाची देखील हीच पुकार आहे. आणि त्याची बुद्धिदेखील याचीच साक्ष देते. तसेच सृष्टीचा कणन्कण व तिची संपूर्ण व्यवस्था देखील याचाच पुरावा देते.

وَفِى كُلِّ شَىْءٍ لَهُ آيَةٌ تَدُلُّ عَلَىٰ اَنَّهُ وَاحِد

" प्रत्येक गोष्टीत त्याचे एक चिन्ह आहे जे त्याच्या एकमेवतेची साक्ष देते."

त्याचे अहद احد (एकमात्र) असणे सृष्टीची सर्वात मोठी, सर्वाधिक स्पष्ट व सर्वात जास्त मूलभूत वस्तुस्थिती आहे या वस्तुस्थितीला दृष्टि आड करून ज्या लोकांनी ईश्वराविषयी विचार चिंतन केले त्यांना अशी जबरदस्त ठोकर लागली की पुन्हा ते तोल सावरू शकले नाहीत. या संदर्भात मूलभूत चूक म्हणजे ईश निर्मितीवरून ईश्वराची कल्पना करणे होय. वस्तुत: हे उघड आहे की विश्व-निर्माता व त्याच्या निर्मिती दरम्यान कोणत्याही प्रकारची समानता शक्य नाही. आणि आमची मर्यादित बुद्धि सुद्धा त्याच्या स्वत्वा संबंधी विचार चिंतन व संशोधन करण्यास पात्र असू शकत नाही. म्हणून त्याच्या एकमेव व अद्वितीच असण्याच्या साध्या सरळ कल्पनेला सोडून विभिन्न धर्माच्या लोकांनी ईश अस्तित्वा संबंधी जेवढे तत्वज्ञान संशोधिले आहे ते सर्व अवास्तव व अगदी असत्य ठरतात. अर्थात उघड आहे की जर पाया शिलाच वाकडी ठेवली गेली तर कितीही उंच इमारत बांधली जावा ती तिरकीच राहील.

राहिलेत भौतिकता वादी लोक जे ईश्वराच्या अस्तित्वासच मान्य करीत नाही. तर त्यांचा हा नकार मनुष्य स्वभावा विरुद्ध युद्धाची घोषणा होय. आणि जी व्यक्ति आपल्या स्वभावाशीच युद्ध करण्यास प्रवृत व्हावी त्याला कोणतीही गोष्ट प्रमाण देऊन पटविली जाऊ शकत नाही. मनुष्य आपले डोळे फोडल्यानंतर कोणत्याही गोष्टीच्या अस्तित्वास नकार दर्शऊ शकतो. अशा व्यक्तिला कोणतीही वस्तू दाखविली जाऊ शकत नाही.

पैगंबरीय मार्गदर्शनाच्या संबंधात समस्त पैगंबरांनी एकेश्वर वादाचीच शिकवण दिली होती. याला एकही पैगंबर अपवाद नाही. यास्वत 'बायबल' मध्ये बरेच परिवर्तन व फेरफार झाली असली तरी एकेश्वर वादाची कल्पना मूलत: विद्यमान आहे उदाहरणार्थ 'तौरात' मध्ये आहे.

"हे इस्राईला श्रवणकर, आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे" (अनुवाद ६:४)

"परमेश्वरा शिवाय दुसऱ्या देवतांना बली अर्पण करणाऱ्याचा अगदी संहार करावा." (निर्गम २२:२०)

आणि जबूर (Psalms) मध्ये आहे:

"तूच केवळ देव आहेस." (स्तोप्रसंहिता - ८६:१०)

परंतु पैगंबरांच्या या मूलभूत शिकवणीकडे जाती समूहांनी व राष्ट्रांनी पाठफिरविली. व मार्गभ्रष्टतेत पडले. या विमुखतेचे एक उदाहरण तर ख्रिश्चन धर्माची श्रद्धा. 'त्रैत' (Trinity) होय.जे पिता, पुत्र व पवित्र आत्मा या तीन ईश्वरांच्या मिश्रणाचे नाव आहे. आणि याचे दुसरे उदाहरण आमच्या देशाच्या मूर्तिपुजकांची 'त्रिमूर्ति' श्रद्धा होय. जे ब्रहमा, विष्णू व शिव या तीन देवतांचे संमिश्र नाव आहे. यांचे धार्मिक चिन्ह '**ॐ**' (ओम) तीन्ही ईश्वरांचा प्रतिनिधित्व करते.

"In later times, Om is the mystic name for the Hindu triad, and represents the union of three gods, Viz. a (Vishnu), u (Shiva). m (Brahma)."-(A Sanskrit -English Dictionary by Sir Monier Oxford, Page 235).

आणि वेदाचा परिचय करून देतांना प्रोफेसर सी. के. राजा या वस्तुस्थितीचा स्विकार करतात की भारतात एकेश्वरवादाच्या कल्पनेशी आम्ही सदैव अनभिज्ञ राहिलो. ते लिहितात की

"The difficulty is that in India we never had a Monotheism till very recent

times. If one reads the Mahabharata, it will be found that every divinity is in his turn a Supreme God head. This is exactly what is found in the Vedas too.........and there never came a stage when there was only one God." -(The Quintessence of the Rigveda page 11 ).

४. मूळ ग्रंथात 'अस्समद' हा शब्द प्रयोग झाला आहे. याचा मोठा व्यापक अर्थ आहे म्हणून एखाद्या विशिष्ट शब्दात याचे रूपांतर करणे कठीण आहे.

शब्दकोशानुसार 'समद' चा अर्थ तो ज्याच्या कडे रुजू केले जावे हे त्या सरदारा करीता जो सर्वोच्च आहे ज्याहून उच्चतम अन्य कोणीही नसावे व ज्याच्याकडे लोक आपल्या गरजा व व्यवहारांच्या संबंधात वळतात. तन्द्‌तच 'समद' अशा खडकालाहि म्हटले जाते ज्याचा शत्रूचा हल्लया प्रसंगी आश्रय घेतला जातो. तसेच त्या भरीव गोष्टीलाहि म्हटले जाते जिच्यात पोकळी नसते.

या शाब्दिक अर्थाना लक्षात घेता आयतीत सर्वश्रेष्ठ अल्लाह करीता 'अस्समद' चे जे वैशिष्ट वर्णिले गेले आहे त्याचा अर्थ असा की सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्वोच्च आहे. त्याची सर्वोच्चता सर्वांग परिपूर्ण आहे. केवळ तोच ध्येय आकांक्षा आश्रय आहे. तोच पाठीराखा आहे. तो निरपेक्ष व नि:स्पृह आहे. त्याला कसलीच गरज नाही वस्तुत: सर्वजण त्याचे गरजवंत आहेत. आणि तो एकटा सर्वांची गरजपूर्ति करणारा आहे जबूर च्या निवेदनानुसार तो शरण घेण्याजोगी शिळा आहे.

''परमेश्वर माझा दुर्ग, माझा गड, मला सोडविणारा'' (स्तोत्र संहिता ८:२)

''हे परमेश्वरा, मी तुझा आश्रय धरिला आहे.'' (स्तोत्र संहिता ७१:१)

तो 'समद' असण्याच्या अर्थात ही गोष्टहि सामील आहे की कोणतीही गोष्ट त्याच्यात अंतर्भूत होत नाही किंवा कोणतीही गोष्ट त्याच्यातून बाहेर पडत नाही. म्हणून त्याची संतति असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आणि तो याबाबतहि पवित्र आहे की त्यासह मनुष्य युति व्हावी. ज्या प्रमाणे आमच्या देशातील अनेकेश्वर वाद्यांची श्रद्धा आहे.

५. येथे मानवाने पुन्हा ठोकर खाल्ली की स्वत:वरून ईश्वराची कल्पना करून त्याला अपत्य असल्याचेहि कल्पिले. वस्तुत: ही गोष्ट बौद्धिक दृष्टयाहि चूकीची आहे व ईश-ग्रंथान्वये देखील. बौद्धिक दृष्टया चुकीची या कारणास्तव की एखाद्याला ईश पुत्र मानण्याच्या स्थितीत हे ही मान्य करावे लागेल की तो ईश्वराचाच अंश आहे कारण पुत्र पित्याचाच अंश असतो, तसेच हे देखील मान्य करावे लागेल की 'ईश्वरत्व' पृथ्यक्करण व विभागणी करण्याजोगे आहे, तसेच पर्यायाने हे देखील की त्याची एखादी पत्नी असावी व एखाद्याची पत्नी त्याच्याच वर्गा पैकी असू शकते यास्तव हे मान्य करावे लागेल की ईश्वराचा देखील जाती वा वर्ग प्रकार आहे. उघड आहे की ईश्वरासंबंधी अधिक तुच्छ व व्यर्थ कल्पना आणखी कोणती असू शकते?

परंतु या स्पष्ट बुद्धिविरोधी कल्पनेला धर्मानुयायींनी केवळ भावनाच्या आहारी जाऊन व अतिशयोक्तिस बळी पडून मान्य केले व ईश्वराला मुले व मुली आहेत अशी श्रद्धा बाळगली. ग्रंथान्वये ही गोष्ट चुकीची अशी की ईश्वराने दासांच्या मार्गदर्शनाकरीता जो जो ग्रंथ अवतरीत केला त्यात एकेश्वरवादाचीच शिकवण दिली गेली होती. या ग्रंथांचे जे अंश आमच्यासमोर विद्यमान आहेत त्यात सर्व जोर तौहीद (एकेश्वरवादा) वरच दिला गेला आहे. राहिला बायबलचा तो भाग की ज्यात हजरत मसीह (येशू ख्रिस्त) यांना ईश-पुत्र म्हटले गेले आहे तर प्रथमत: ही गोष्ट तौरात जबूर व बायबलच्या स्पष्ट आणि मूल भूत शिकवणीविरुद्ध आहे.

तौरात, बायबल संग्रहात सर्वात पाहिला व सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. म्हणून याच्या शिकवणीविरुद्ध चार इंजीलांच्या शिकवणीची पात्रता फेरफाराचीच ठरते.

दुसरे असे की चार इंजील मध्ये हजरत मसीह करीता जेथे 'पुत्र' हा शब्द वापरण्यात आला आहे तेथे सर्वसाधारणपणे ईश्वराच्या पुण्यशील दासांकरीता 'ईश-पुत्र हा शब्द प्रयोग झाला आहे.' उदा. '' जे शांति करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाची मुले म्हणतील.'' (मत्तय ५:९)

प्रथमदर्शनी असा भास होतो की ही गोष्ट मिथ्यार्थाने म्हटली गेली आहे, सत्यार्थाने नव्हे परंतु जर तौहीदच्या त्या शिकवणीस समोर ठेवले जावे जी तौरात जबूर व इंजीलच्या पृष्ठांमध्ये पसरलेली आहे तर स्पष्टत: ज्ञात होते की 'अब्द' (दास) या शब्दास इब्न (पुत्र) या शब्दाने बदलले गेले आहे. तव्द्‌तच 'रब' (पालनकर्ता, स्वामी) या शब्दाच्या जागी'अब' (पिता) हा शब्द प्रयोजिला गेला आहे. मत्यच्या इंजील मधील उल्लेखानुसार:

''ह्यास्तव तुम्ही ह्या प्रकारे प्रार्थना करा, हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानिले जावे.'' (मत्तय ६:९)

ही उघड फेरफार आहे जी बहुधा (यांच्या ग्रंथांचे) संपादन करणाऱ्यांनी केली आहे अथवा त्यांच्या अनुवादकांनी, कारण इंजील मध्येच स्पष्टत: हे म्हटले गेले आहे की:

''येशूने उत्तर दिले पहिली ही की, हे इस्राइला, ऐक, आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे, आणि तू आपला देव परमेश्वर त्याच्यावर संपूर्ण मनाने आणि संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीति कर.'' (मार्क १२:२९,३०)

ईश्वराला अपत्ये आहेत ही श्रद्धा बाळगण्यात केवळ ख्रिश्चनच होत असे नाही तर अन्य जाती समूह देखील या मार्ग भ्रष्टतेत सहभागी आहेत. यहुदी लोक हजरत उजैर ना ईश-पुत्र ठरविततात तसेच मक्केच्या अनेकेश्वर वाधांनी फिररिश्त्यांना ईश-कन्या ठरविले होते. आणि भारतातील मूर्तिपूजक तर या बाबतीत यांच्याहून दोन पावले पुढेच आहेत. जे केवळ अगणित देवांचीच श्रद्धा बाळगत नाहीत तर त्यांच्या अपत्यांचीहि श्रद्धा बाळगतात उदा. "The Maruts are the sons of Rudra, another great god in the Rigveda." -(The Quintessence of the Rigveda, P. 45).

त्यांच्या मते 'महदब्रहमा' ते उदर होय ज्यात भगवान 'पिता' या नात्याने आपले बीज टाकतो ज्यामुळे प्राणी जन्माला येतात तव्द्तच भगवद् गीतेत आहे की

"Mahad-Brahma is the womb wherein I cast My Primal seedling whence are born all creatures. Whatever beings are born from any womb Mahad - Brahma is their Primal Mother and I Their Primal Father who inseminate her."

(The Bhagvad Geeta 14 - 3 - 4 - English Transl. by Dilip Kumar Roy P.160).

परंतु कुरआनाने ईश्वराचा परिचय अशा स्वच्छ शुद्ध सत्यात्वेषी व हृदयस्पर्शी शैलीत सादर केले आहे की या प्रकाशासमोर समस्त अंध:कार लोप पावला आहे.

६.ज्याला एखाद्याने जन्म दिला असावा तो 'ईश्वर' तरी कसा? परंतु अनेकेश्वरवादीय धर्मामध्ये ईश्वरांच्या जन्मास येण्याची कल्पना आढळून येते. उदा. ऋग्वेदात ईश्वरांच्या जन्माचा उल्लेख अंकित आहे.

"There is a song about the birth of the gods (X-72). The gods are spoken of generally as having been born from the heaven and the earth and in various other ways." (Quintessence of the Rigveda, page 100).

याच अनेकेश्वरवादीय कल्पनेचे येथे खंडन केले गेले आहे की ज्याप्रमाणे अल्लाहचे एखादे अपत्य नाही त्याचप्रमाणे त्याचा कोणी जन्मदाताहि नाही. जन्म घेतलेले ईश्वर तर केवल काल्पनिक ईश्वर असू शकतात. खरा ईश्वर तर सर्वांचा निर्माण कर्ता आहे. तो 'निर्मित' कसा असू शकतो? ते केवल एकट्या अल्लाहचेच अस्तित्व आहे की ज्याच्यापासून कोणतीही गोष्ट जन्म घेत नाही व कोणीहि त्याला जन्म दिला नाही तौहीद (एकेश्वरवादा) ची कुरआनाची ही कल्पना अल्लाह ला किती साजेल अशी आहे!

७. अर्थात अल्लाहच्या स्वत्वात त्याच्या समान व त्याच्या तुलनेचा कोणीहि नाही व त्याच्या गुणवैशिष्टयातहि त्याच्याखेरीज इतर सर्व 'निर्मिती' होय व तोच एकटा 'निर्माण'-कर्ता होय. त्याच्याखेरीज सर्व गरजवंत आहेत, फक्त तोच एकटा निरपेक्ष व नि:स्पृह आहे. सर्व दास व सेवक आहेत मात्र तोच एक उपास्य व स्वामी आहे. त्याच्या समान व त्याच्या तुलनेचा कधीही कोणी झाला नाही व होणार नाही.

या स्पष्ट वस्तुस्थिती नंतरहि अनेकेश्वरवाद्यांनी ईश्वराचे समतुल्य ठरवले. या बाबतीत या देशातील अनेकेश्वरवादी सर्वात पुढे आहेत. त्यांनी निर्माण कर्ता व निर्मिती दोघांनाहि समसमान लेखले आहे. त्यांच्या उपनिषद या धर्मिक ग्रंथान 'शिर्क'ला तत्वज्ञानाच्या रुपाने सादर केले गेले आहे.

"All that exists, says the Upanishad, is He, He is that All and the All is He."

(The Upanishads by M.P.Pandit - p.154).

"The Self or Soul of everyone is Brahman."

-(Upanishads by Swami Sivananda p. 16).

त्यांच्या अन्य धार्मिक ग्रंथांमध्ये देखील ईश्वराविषयीची कल्पना मोठी गुंतागुंतीची आहे.

"There is no Personal Supreme God in the religion of Vedas".

(The Quintessence of the Rigveda, P.7).

"He is in all and all are in Him .........He descence as the Avatar."

(The Bhagvad Geeta -A Revelation by D. K. Roy p. 33)

"Lord, I behold in Your body all gods." (The Bhagavad Gita -Ch XI:15)

जे लोक या अनेकेश्वरवादीय तत्वज्ञानात गुरफटून गहन अंध:कारात भटकत आहेत त्यांनी दृषित. पूर्वग्रहाचा परित्याग करुन पवित्र कुरआनाची तेजस्विता मान्य करावी याखेरीज त्यांच्या मक्तिचा कोणताही मार्ग नाही.

# सूरह अल् फलक
## (प्रातःकाळ)

# ११३. अल् फलक (प्रात:काळ)

**नाव:** पहिल्या आयतीत 'फलक' हा शब्द आला आहे, ज्याचा अर्थ 'प्रात:काळ' असा आहे. तंद्नुसार या सूरह चे नाव 'फलक' आहे. सूरह फलक व सूरह नास दोन्हीहि शरण मागण्याविषयी च्या सूरती आहेत म्हणून यांचे समाईक नाव 'मुअव्विजतै' (शरणागतिच्या सूरती) असेहि आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे. आणि मजकूरावरून हे अनुमान निघते की ही सूरह अशा वेळी अवतरीत झाली असावी जेव्हा सैतानी सामर्थ्ये पैगंबरांना अपाय पोहचविण्या करीता सज्ज झाली होती आणि त्यांचे विरोधक मत्सराग्नित जळत होते.

**मध्यवर्ति कल्पना:** दासांना या गोष्टीची शिकवण देणे होय की त्यांनी प्रत्येक प्रकारच्या आपाया विरुद्ध अल्लाहचाच आश्रय घ्यावा कारण तोच एकमेव आश्रय दाता आहे. या संदर्भात अशा प्रार्थना व वचने शिकविली गेलीत जे शरणागति पत्कारण्या साठी योग्यतम होत.

**आयत रचना:** आयत क्र. १ मध्ये या गोष्टीची शिकवण दिली गेली आहे की दासाने शरणागति पत्करण्याकरीता त्या अस्तित्वाकडे वळावे ज्याच्या पालकत्वाच्या चमत्कृतिचा त्याला अहोरात्र साक्षात्कार घडतो.

आयत क्र. २ ते ५ मध्ये हे दर्शविले गेले आहे की कोणकोणत्या गोष्टींच्या अपायापासून ईश्वराचे शरण मागत राहिले पाहिजे.

**श्रेष्ठता:** या सूरह मध्ये तसेच या नंतरच्या सूरह मध्ये शरणागति पत्करण्याच्या दृष्टीने जी सर्वकष वचने व ज्या प्रभावी प्रार्थना सांगितल्या गेल्या आहेत त्यांची महत्ता व श्रेष्ठता हदीस मध्ये अशा प्रकारे वर्णन केली गेली आहे. उकबा बिन आमिर म्हणतात की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मला फर्माविले,

أُنْزِلَتْ عَلَيَّ آيَاتٌ لَمْ يُرَ مِثْلُهُنَّ قَطُّ: اَلْمُعَوِّذَتَيْن

''मझकर अशा आयती अवतरल्या आहेत ज्या अगदी अनुपमेय होत. अर्थात 'मुअव्विजतैन (मुस्लिम किताब सलातिल मुसाफिरीन)

عَنْ عَائِشَةَ رضی اللّٰهُ عنها قَالَتْ كَانَ رسول الله صلی اللہ علیہ وآلہ وسلم
اذا آوٰى اِلَى فِرَاشِهٖ نَفَثَ فِیْ كَفَّيْهِ بِقُلْ هُوَ اللّٰهُ اَحَدٌ
وَبِالْمُعَوِّذَتَيْنِ جَمِيْعًا ثُمَّا يَمْسَحُ بِهِمَا وَجْهَهٗ وَمَا
بَلَغَتْ يَدَاهُ مِنْ جَسَدِهٖ۔ (بخاری کتاب الطب)

**बरकती:** हदीस मध्ये आले आहे: ''हजरत आयशा (रजियल्लाहु अन्हा) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा बिछान्यावर जात तेव्हा आपल्या दोन्ही हातांमध्ये 'कुलहुवल्लाहु अहद' व 'मुअव्विजतैन' चे पठण करुन फूंकीत मग यांना आपल्या चेहऱ्यावर व शरीरावर, हात पोहचेल तेथपर्यंत फिरवीत. (बुखारी, किताबुत्तिब)

गंडा ताईत न करता या सूरतींच्या बरकतींचा लाभ व रोगमुक्ति प्राप्तीचा हा उचित व प्रेषित-आचरणानुकुल मार्ग होय. परंतु हे लक्षात असावे की सूरह चे मूळ उद्दिष्ट एकेश्वर वादाशी निष्ठा ठेवणे, तत्संबंधी निकडींची पूर्तता करणे आणि या गोष्टीकडे विशेष लक्ष देणे की श्रद्धा तत्वात 'शिर्क' (अनेकेश्वरवादा)चा लवलेशहि आढळता कामा नये. जे लोक या महान उद्दिष्टास दृष्टी आड करून ईश-ग्रंथाच्या केवळ बांह्य बरकतींना प्राप्त करण्याची इच्छा बाळगतात. त्यांचे उदाहरण त्या तहानलेल्या व्यक्ति सारखे आहे जी नदी किनारी बसून आपले हात पाय धुते परंतु पाणी पिण्याचे कष्ट त्याला सोसवत नाही. अर्थात हे उघड आहे की या कृतिद्वारे हात पाय तर धुतले जातात पण त्याची तहान कधीहि शमणार नाही.

# ११३. सूरह अल् फलक

سُورَةُ الْفَلَقِ

आयती ५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. म्हणा [१] ,मी शरण मागतो, [२] प्रात:काळ च्या स्वामी चे, [३]

قُلْ أَعُوذُ بِرَبِّ الْفَلَقِ ۝١

२. त्याने जे काही निर्मिले आहे त्याच्या अपायापासून, [४]

مِنْ شَرِّ مَا خَلَقَ ۝٢

३. आणि अंध:कारमय रात्रीच्या अपाया पासून जेव्हा ती पसरते, [५]

وَمِنْ شَرِّ غَاسِقٍ إِذَا وَقَبَ ۝٣

४. आणि गांठित फुंकणाऱ्यांच्या अपायापासून. [६]

وَمِنْ شَرِّ النَّفّٰثٰتِ فِي الْعُقَدِ ۝٤

५. आणि मत्सर करणाऱ्याच्या अपायापासून जेव्हा तो मत्सर करतो.[७]

وَمِنْ شَرِّ حَاسِدٍ إِذَا حَسَدَ ۝٥

१.अर्थात अल्लाहला ही प्रार्थना करत जा व त्याचे शरण या वचनांद्वारे मागत जा. हे पैगंबरांना (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) संबोधिले गेले आहे आणि त्यांच्या माध्यमाने त्या प्रत्येक व्यक्तिला जिने 'कुरआन' वर ईमान आणले आहे.

२. शरण याचा अर्थ संरक्षण. बचाव आश्रय आहे. आणि शरण मागणे याचा अर्थ स्वसंरक्षणार्थ शरणदात्याला प्रार्थना करणे. त्याच्याकडे वळणे, त्याचे कृपा-छत्र शोधणे व त्याच्या आश्रयाला मजबूतपणे धरणे. तेव्हा इथे 'अवुजु' (मी शरण मागतो) स्वत:ला त्याच्या संरक्षणात सोपवितो. तोच प्रत्येक प्रकारच्या अपायापासून वाचविणारा आहे. आणि मी त्याच्याशीच आपले दास्यत्व नाते जोडतो.

हे स्पष्ट व्हावे की कोणालाहि खरोखरच शरणदाता समजणे म्हणजेच त्याला ईश ठरविणे. म्हणून अल्लाह खेरीज इतरांचे शरणमागणे ज्याप्रमाणे अनेकेश्वरवादी देवी देवतांचे शरण मागतात उघड शिर्क आहे.

३. अर्थात जो रात्रीच्या अंध:कारचा पडदा फाडून प्रात:काळाचा उदय करतो. अन्य एका ठिकाणी फर्माविल्या प्रमाणे

فَالِقُ الْاِصْبَاحِ

रात्रीच्या काळोखास फाडून सकाळ प्रकट करणारा (अल अनआम-९६) येथे अल्लाहच्या ईश्वरत्व गुणा बरोबर त्याच्या या सामर्थ्य-चमत्करणाचा उल्लेख या अर्थाने होय की जणू शरणगति पत्करमारा आपला तो विश्वास व समाधान व्यक्त करीत आहे की जी शक्ति अंध:काराला फाडून प्रात:काळचा उदया घडवून आणते ती निराशाजनक स्थितीत आशेचा किरण देखील निर्माण करील आणि उपद्रवाचे वावटळ शमवून शांती सुरक्षेचा मार्ग देखील उघडील.

४. या आयतीवर विचार चिंतन केल्यास खालील गोष्टी स्पष्ट होतात :-

१) सर्व गोष्टी अल्लाह द्वारेच निर्मित होत. निर्माण-कर्ता केवळ तोच एकटा आणि मालक देखील तोच. म्हणूनच कोणतीही गोष्ट वस्तू विश्व-निर्मात्या पेक्षा अधिक शक्तिशाली असू शकत नाही. यास्तव ईश-निर्मितीच्या अपाया पासून सुरक्षित राहण्याकरीता निर्माण-कर्त्याचा आश्रय शोधणे हीच खरी कर्म-निती होय. या उलट ईश-निर्मतीच्या अपायापासून सुरक्षित राहण्याकरिता ईश-निर्मितीलाच आर्जव करणे, मग या करीता माणसाने एखाद्या देवी देवतेला साद घालणे किंवा एखाद्या 'गौस' वा 'वली' ला पुकारणे हा निव्वळ मूर्खता व असत्य होय.

२) 'जे काही त्याने निर्मिले त्याच्या अपाया पासून याचा अर्थ असा नव्हे की त्याने निर्माण केलेल्या वस्तूंमध्ये अपायाचा पैलू असणे आवश्यक आहे. किंबहुना अर्थ हा की त्याने निर्माण केलेल्या वस्तूंपैकी ज्या वस्तू आपल्या अंगी अपायाचा एखादा पैलू बाळगतात त्या सर्वांच्या अपायापासून ईश्वराचे शरण मागतो.

३) कोणतीही गोष्ट आपल्या परीने प्रभावशाली नाही आणि कोणताही अपाय स्वत:हून एखाद्याला होत नाही किंबहुना प्रत्येक गोष्ट अल्लाहच्याच आज्ञेनुसार परिणाम कारक होते आणि एखाद्याला जो काही परिणाम होतो तो त्याच्याच (अल्लाहच्या) आज्ञेने होतो. म्हणून अपायापासून सुरक्षित राहण्याकरीता त्यालाच प्रार्थना केली पाहिजे व त्यावरच भरवसा ठेवला पाहिजे.

४) अपाय म्हणजे जाणवणाऱ्या आपत्त्या व संकटे हे ही होत व अंतरिक व मार्गभ्रष्टता देखील होय. पहिल्या बाबीचे उदाहरण रोग व यातना होत आणि दुसऱ्या बाबीचे उदाहरण पाप, कुफ्र व शिर्क इ. होत संदर्भान्वये अपाया चा हा दुसरा पैलू प्रामुख्याने अपेक्षित आहे. आणि याचे समर्थन याहि गोष्टीने होते की مَعُوَّذَتَيْنِ 'मुआव्विजतैन' (शरणा गतिच्या सूरह) ला कुरआनाच्या अगदी शेवटी ठेवले गेले आहे. हा जणू या गोष्टीकडे संकेत होय की कुरआनाद्वारे ज्या मार्गदर्शनाने उपकृत केले गेले आहे त्याच्या सरक्षणार्थ सावध असण्याची गरज आहे, ज्या योगे उपद्रवप्रिय शक्ति प्रभावशाली होऊ नये. व सन्मार्गापासून बहकाविण्यात यशस्वी होऊ नये.

५. मागील आयतीत ईश-निर्मितीच्या अपायापासून शरण मागण्याचा उल्लेख सर्वसाधारणपणे आला आहे. अता काही खास गोष्टींच्या अपाया पासून विशेषत: शरण मागण्याची ताकीद पूर्ववत आहे.

रात्र येते तेव्हा अंध:कार पसरतो आणि या अंध:कारात कलह प्रिय व सैतानी सामर्थ्यांना डोके वर काढण्याची संधी लाभते. बाह्य आणि शारिरिक आपत्त्यांच्या दृष्टीने अनेकविध रोग रात्री बळावतात आणि उपद्रवी प्राणी रात्री बाहेर पडतात तात्पर्य रात्र-काळात भिती व दहशतीचे वातावरण असते. राहिल्यात सुप्त व नैतिक आपत्त्या तर रात्री निरनिराळे अपराध फार मोठया प्रमाणात होतात. बहुधा कट-कारस्थाने रात्रीतच रचली जातात आणि सैतान आपल्या सैन्यासह रात्रीच्या अंध:कारातच हल्ला चढवितो. म्हणून रात्रीचा बाह्य अंधकार, सुप्त अंध:काराचे कारण असू शकते. यास्तव या अपाया पासून सावध राहण्याची व यापासून ईश्वराचे शरण मागण्याची ताकीद केली गेली आहे.

अर्थात हे लक्षात घ्यावे की रात्रीच्या दिशेने आपाया संबंध जोडण्याचा अर्थ हा नव्हे की रात्री मांगल्याचे अवतरण होत नाही किंवा शुभ कार्ये पार पडत नाही किंबहुना अर्थ हा की रात्रीची वेळ सैतानी-सामर्थ्यांकरीता अपाय व उपद्रव पसरविण्या बाबत मोठी सहाय्यभूत ठरते.

६. عُقَدْ ''उकद'' म्हणजे गाठी. अर्थात त्या गाठी ज्या

सैतानी सामर्थ्ये माणसाच्या सूज्ञतेवर व त्याच्या चैतन्यावर बांधून त्याला गाफिल व बेसावध बनवितात. यास्तव बुखारी व मुस्लिम ची हदीस आहे की पैगंबरांनी (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) फर्माविले,

يَعْقِدُ الشَّيْطَانُ عَلىٰ قَافِيَةِ رَأسِ اَحَدِكُمْ ثَلَاثَ عُقَدٍ اِذَا نَامَ۔بِكُلِّ عُقْدَةٍ يَضْرِبُ عَلَيْكَ لَيْلاً طَوِيلاً۔ فَاِذَااسْتَيْقَظَ فَذَكَرَاللهَ اِنْحَلَّتْ عُقْدَةٌ وَاِذَا تَوَضَّأَاِنْحَلَّتْ عَنْهُ عُقْدَتَانِ ۔ فَاِذَاصَلّىٰ اِنْحَلَّتِ الْعُقَدُفَاَصْبَحَ نَشِيْطًا طَيِّبَ النَّفَسِ وَاِلَّا اَصْبَحَ خَبِيْثَ النَّفْسِ كَسْلَانَ۔ (مسلم کتاب صلاۃ المسافرین)

''जेव्हा तुमच्या पैकी एखादा इसम झोपतो तेव्हा त्याच्या डोक्याच्या मागील भागावर सैतान-समूह गाठी बांधतो आणि प्रत्येक गाठी सोबतच ही गोष्ट देखील चिकटवितो की अजून रात्र बरीच आहे मग जेव्हा तो इसम जागा होतो आणि अल्लाहचे नाम-स्मरण करतो तेव्हा एक गाठ सुटते आणि जेव्हा तो वजू करतो तेव्हा दुसरी गाठ देखील सुटते आणि जेव्हा नमाज अदा करतो तेव्हा तीसरी गाठ सुद्धा सुटते आणि सकाळी तो आनंदीत व मनाच्या शुद्ध स्थितीत असतो अन्यथा तो सकाळी सुस्त व मनाच्या अशुद्ध स्थितीत असतो.'' (मुस्लिम किताबू सलातिल मुसफिरीन)

हे झाले सैतानाद्वारे असावध व गाफील करण्याचे एक उदाहरण जे हदीस मध्ये सादर केले गेले आहे यावरून सैतानाची प्रेरकता, त्याच्या हरकती व त्याच्या हल्ल्याविषयी सहजगत्या कल्पना केली जाऊ शकते. نَفّاثَاتْ 'नफ्फासात' हा शब्द मूळ शब्द نَفَثٌ 'नफ्स' वरून झाला आहे ज्याला त्याचे 'फूंकणे' म्हणून संबोधिले गेले आहे: نَفَثٌ

اَعُوْذُبِاللّٰهِ مِنَ الشَّيْطَانِ مِنْ نَفْخِهٖ و نَفْثِهٖ و هَمْزِهٖ۔

''मी अल्लाहचे शरण मागतो सैतानाचे 'नफ्ख', त्याचे 'नफ्स' व त्याचे, 'हम्ज' पासून.''

या हदीसचे रावी (कथन-कर्ता) इब्ने मुर्रा यानी या तिन्ही शब्दांचे विवरण अशा प्रकारे केले आहे की सैतानाचे ''नफ्स'' चा अर्थ काव्य ! नफ्ख म्हणजे गर्व आणि त्याच्या हम्ज चा अर्थ वेडेपण होय. (अबु दाऊद, किताबुस्सलात पृ. ७५०)

यात नफ्स चा 'काव्य' असा जो अर्थ घेतला गेला आहे तो वस्तुत: सैतानाच्या प्रेरित करण्याच्या एक प्रकार आहे याचा दुसरा प्रकार जादू देखील आहे.

نَفّاثَاتْ **नफ्फासात** हा शब्द स्त्रीलिंग अनेकवचनी व अतिशयोक्तिच्या स्वरूपात हे 'नुफूस' चे विशेषण होय. म्हणून अरबी भाषेच्या व्याकरणानुसार स्त्रीलिंगी आहे. अर्थात त्या वाईट व्यक्ति ज्यांना फूंकण्याची सवय आहे. अर्थात ह्या सैतानी व्यक्त्या ज्या प्रेरकतेद्वारे मानव प्रज्ञा व त्याच्या जागृतावस्थेस प्रभावित करतात. उल्लिखित हदीस मध्ये सैतानाच्या गाठी बांधण्याचा जो उल्लेख आला आहे यात यामुळेच ही गोष्ट वर्णिली आहे की तो प्रत्यक गाठी बरोबरच ही गोष्ट देखील चिकटवितो की अजून रात्र बरीच आहे. हे खरे पाहता सैतानाचे त्या गाठीत 'नफ्स' (फूंकणे) च होय.

या हदीस वचनाच्या प्रकाशात आयतीचा अर्थ असा आहे की, सैतान समूह आपल्या उत्तेजन कार्याद्वारे माणसाच्या सूज्ञतेस, त्याच्या शुद्धि व त्याच्या मानसिक स्थितीत प्रभावित करून त्याला असावधता, बेशुद्धता गुंगी व मानसिक रोगांचा शिकार बनवितात. आणि वाईट व मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टींची त्याला अंत:स्फूर्ति देतात. यांच्या या अपायापासून ईश्वराचे शरण मागितले गेले आहे.अर्थात सैतानाचे हे उत्तेजित करणे काव्यस्वरूपातहि असू शकते व जादूच्या रूपानेहि तसेच चित्ताकर्षक गोष्टींच्या स्वरूपात अथवा गाण्याच्या स्वरूपातहि असू शकते. यास्तव त्याची उत्तेजना एकाच स्वरूपात असते असे समजण्याचे काही कारण नाही.

सिफली अमल (काळा जादू) करणाऱ्यांजवळ तर गंडयांमध्ये फूंक मारण्याची पद्धत पहिल्यापासूनच चालत आली आहे. जादू टोणा करणारे सैतान-समूहच्या मदतीने हे अमंगल कर्म पार पाडतात. आणि लोकांकरीता मार्गभ्रष्टतेचा उपाय योजतात. तसेच सध्या हिप्नाटीझम (Hypnotism)द्वारेहि माणसाची शुद्धी व त्याच्या मानसिक स्थितीस प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जातो. हे सर्व सैतानी कर्माचे विविध प्रकार होत. या स्वरूपाच्या समस्त कष्ट यातनांपासून सुरक्षित राहण्याचा खरा मार्ग हाच की अल्लाहचे शरण घेतले जावे आणि या गोष्टीवर दृढ विश्वास ठेवला जावा की अल्लाहच्या आज्ञेखेरीज कोणतीही गोष्ट हानी पोहचवू शकत नाही.

सर्वसामान्यत: भाष्यकार या आयती संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर जादू टोणा केला गेल्याचे कथन उल्लेखितात त्याचा खुलासा असा की मदीना शहरात ऐका यहूदी ने वा एका दांभिकाने ने जो यहूद्यांचा मित्र होता व ज्याचे नाव लबीद बिन आसीम असे होते त्याने पैगंबरांच्या फणीच्या केसांमध्ये जादूटोणा करून ते एका विहीरीत दगडाखाली दाबले होते. या जादूच्या प्रभावाने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आजारी पडले आणि स्थिती अशी झाली की एखाद्या कामासंबंधी कल्पना करीत की ते केले आहे वस्तुत: ते केलेले नसे--------------- काही कथनांनुसार या जादूचा प्रेषितांवर सहा महिन्या पर्यंत प्रभाव राहिला----------- यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ईश-आदेशाद्वारे सुचित

केले गेले व **मुआव्विजतैनचे** पठण करण्याचा आदेश दिला गेला. ज्यायोगे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व्याधिमुक्त झाले.

उपरोक्त कथनाचा बुखारी, मुस्लिम व अन्य हदीस संग्रहात उल्लेख आला आहे परंतु काही सबळ कारणामुळे मान्य करण्याजोगे नाही.

**सर्वप्रथम** हे कथन पवित्र कुरआनाच्या विरोधात आहे. कारण कुरआनाने काफीरांच्या, पैगंबर एक जादूग्रस्त इसम आहे. या आक्षेपाचे खंडन केले आहे.

يَقُولُ الظّٰلِمُوْنَ اِنْ تَتَّبِعُوْنَ اِلَّا رَجُلًا مَّسْحُوْرًا

''अत्याचारी असे म्हणतात की तुम्ही लोक तर जादूग्रस्त माणसाचे अनुसरण करीत आहात. (बनी इस्राईल-४७) तेव्हा, कुरआन ज्या गोष्टीचे खंडन करीत आहे, हे कथन त्याच गोष्टीचे समर्थन करीत आहे. याचे प्रत्युत्तर या कथनावर विश्वास ठेवणारे विद्वान असे देतात की प्रेषितावर जादूचा प्रभाव होऊ शकतो ज्याप्रमाणे हजरत मुसाना जादूगरांचे दोर व लाठयांविषयी ते सापाप्रमाणे पळत आहेत अशी कल्पना झाली होती. (सूरह ताहा -६६) राहिला काफिरांचा हा आक्षेप की प्रेषित एक जादू-ग्रस्त इसम आहे तर तो या अर्थाने होता की एखाद्या जादूगराने त्यांना वेडसर केले आहे. अर्थात या आक्षेपाचे कुरआनने खंडन केले आहे. तसेच ते हे म्हणतात की, जादूचा प्रभाव फक्त मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर व्यक्तिश: होता. मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे प्रेषितत्व त्यापासून पूर्णत:अप्रभावित होते परंतु हे उत्तर म्हणजे केवळ शब्दांचा खेळ होय. कारण कथनात जादूचा हा प्रभाव वर्णिला गेला आहे की प्रेषित एखाद्या कामासंबंधी अशी कल्पना करीत की ते केले आहे परंतु ते कैलेले नसे अर्थात जादूचा प्रभाव (अल्लाहचे यापासून शरण) प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बुद्धिवर झाला होता आणि तोहि कित्येक महीने कायम राहिला तसेच त्यांना हे अशा वेळी कळले जेव्हा ईश्वरी संदेशाने त्यांना सुचित केले. वस्तुत: हजरत मूसा नी जादूगरांचे दोर व लाठयांना सापाच्या स्वरूपात केवळ तात्पुरतेच पाहिले होते आणि त्यांना हे माहित होते की हे दोर व लाठ्या खरे पाहता साप नाहीत किंबहुना तशा रुपात दिसून येत आहेत म्हणून ते पाहून त्यांना धोका झाला नाही बरे हा काही रोग नव्हता की ज्यात हजरत मुसा ग्रस्त झाले असावेत. यास्तव वर्णन केल्या गेलेल्या जादूच्या घटनेचे हजरत मूसा च्या घटनेवरून अनुमान काढणे तर्क विसंगत होय.

**दुसरे** असे की जादूच्या या घटनेस मान्य केल्याने प्रेषितांच्या इस्मतीस (म्हणजे त्यांचे पावित्र्य व सैतानाच्या प्रभावापासून मुक्त असल्याच्या श्रद्धेस) आघात पोहचतो कारण कथनामध्ये जादूचा प्रभाव केवळ शारीरिकच नव्हे तर बौद्धिक स्थिती वर ही दर्शविला गेला आहे. अर्थात हे उघड आहे की ही गोष्ट प्रेषित-पदाच्या विपरीत आहे. आणि महणूनच हे उदाहरण निरर्थक आहे, की जर प्रेषित जखमी होऊ शकत होते आणि आजारी पडू शकत होते तद्वतच तयांच्यावर जादूचा प्रभावहि होऊ शकत होता.

عصمتِ انبیاء प्रेषितांच्या इस्मतीची बाब सर्वमान्य आहे आणि कुरआन व सुन्नाह याबाबत अटळ आहेत यास्तव प्रेषित पदाच्या विपरीत जाणारे कथन कोणत्याहि स्थितीत विश्वासाह ठरू शकत नाही. मग ते कथन 'बुखारी चे असो किंवा मुस्लिम' चे.

**तिसरे** असे की कथन-क्रमाच्या संदर्भानुसार एक कथन-कर्ता हिशाम आहे, जे विश्वास पात्र आहेत तरीहि अल्लामा इब्न हजर यांनी 'तहजीबुत्तहजीब' मध्ये यांच्या या गोष्टीचाहि उल्लेख केला आहे की इराक येथे गेल्यानंतर त्यांनी त्या अनेक कथनांचा उल्लेख केला. जी त्यांनी आपल्या पित्या कडून ऐकली होती. ज्या बाबत इराक-वासीयांनी नापसंती व्यक्त केली होती. तव्दतच इमाम मालीक यांनी त्यांच्या त्या कथनांना स्विकृत केले नाही जी त्यांनी इराक वासीयांना सांगितली होती. ते तीनदा 'कूफा' येथे गेले, पहिल्यांदा त्यांनी असे कथन केले.

حَدَّثَنِی اَبِی قَالَ سَمِعْتُ عَائِشَةَ

''माझ्या पित्याने मला कथन केले की त्यांनी हजरत आयशास फर्मावित असताना ऐकले. जेव्हा ते दुसऱ्यांदा गेले तेव्हा अशा प्रकारे कथन करू लागले. की اخبرنی ابی عن عائشه 'माझ्या पित्याने मला हे कळवले की हजरत आयशाद्वारे कथन आहे आणि तिसऱ्यांदा तर या शब्दात कथन करू लागले

ابی عن عائشه

'माझ्या पित्याने हज़रत आयशा पासून कथन केले आहे. (तहजीबुत्तहजीब, भाग-११ पृ. ५०)

यावरून हे अनुमान निघते की हिशाम जरी एक विश्वासाह कथनकर्ता होते परंतु कथन करण्यात काही असावधता त्यांच्या कडून होऊ लागली होती. या स्थितीत त्यांच्या प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वरील जादू विषयीच्या कथनास जी एक मोठी महत्वपूर्ण बाब होय त्यांच्या असावधतेचा परिणाम का मानू नये?

**चोथे** कथन-क्रम संदर्भात एक कथन-कर्ता सुफ़यान बिन उयय्ना हे होत. ते हे मान्य करतात की मी हे कथन इब्ने जुरैज द्वारे पहिल्यांदा ऐकले यावर मौलाना अमीन अहसन इस्लाहींची ही टिका अगदी यथार्थ आहे.

''जणू प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मृत्यूनंतर

शंभर वर्षांनी ही घटना प्रसिद्ध झाली. याच्या आधी या घटनेचे ज्ञान फक्त काही व्यक्ति पर्यंतच मर्यादित राहिले. प्रत्येक व्यक्ति हे समजू शकते की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) सहा महिन्यापर्यंत जादू ग्रस्त राहिले असते (आम्ही अल्लाहच्या शरणी येतो) तर ही घटना एवढी असाधारण होती की आरंभ-काळातच घटनेचा गवगवा झाला असता आणि हे कथन एक सातत्यशील (मुतवातिर) कथनाच्या रूपाने आमच्या पर्यंत पोहचले असते.'' (तदब्बुर-ए-कुरआन खंड ७ पृ.६६६)

प्रदीर्घ चर्चा विवादास टाळून आम्ही येथे फक्त काही कारणांना नमूद करण्यात समाधान बाळगतो. तथापि या संदर्भात आम्ही त्या भाष्यकारांच्या काही परिच्छेदांचा उल्लेख करू, ज्यांनी तीव्रतेसह प्रेषितांवर जादू दर्शविणाऱ्या कथनाचे खंडन केले आहे.

सुप्रसिद्ध भाष्यकार अल्लामा अबु बकर जस्सास हे आपल्या 'अहकामुल कुरआन' या तफसीर (भाष्य) मध्ये फर्मावितात.

''आणि लोकांनी जादू टोण्या पेक्षाहि अधिक मोठी व भयावह गोष्ट योग्य ठरविली आहे. त्यांच्या मतानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर जादू प्रयोग झाला होता. आणि त्याचा प्रभावहि त्यांच्यावर झाला होता. येथपावेतो की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ने फर्माविले होते की, मला असे वाटते की मी एखादी गोष्ट सांगत आहे आणि करीत आहे वस्तुत: ती गोष्ट सांगितलेली नसते वा केलेलीहि नसते. आणि एका यहूदी स्त्री ने प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर खजुरांच्या सालीत फणी आणि केसांमध्ये जादू टोणा केला होता. येथपावेतो की ईशदूत जिबरील (अलैहिस्सलाम) प्रेषिताजवळ आले व त्यांनी सूचना दिली की या स्त्रीने खजुराच्या सालीत जादू टोणा केला आहे आणि ते विहीरीत दगडाखाली आहे. तेव्हा पैगंबरांनी ते काढवून घेतले, मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वरील त्या जादूचा प्रभाव नाहीसा झाला. वस्तुत: सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी काफीरांच्या दाव्यास खोटे ठरवितांना फर्माविले,

وَقَالَ الظّٰلِمُوْنَ اِنْ تَتَّبِعُوْنَ اِلَّا رَجُلًا مَّسْحُوْرًا

''आणि अत्याचारी म्हणतात की तुम्ही एका अशा माणसाचे अनुसरण करीत आहात ज्यावर जादू केली गेली आहे. या स्वरूपाची हदीस वचने खरे पाहीले असता नास्तिकांची घडवलेली होय.'' (अहकामल कुरआन-खंड-१ पृष्ठ ५५)

सैयद कुतूब आपल्या 'फी जिलालिल कुरआन' या भाष्यात लिहितात :

''परंतु वस्तुत: ही कथने आचरण व प्रसार संबंधात प्रेषित-इस्मती विरुद्ध आहेत आणि या श्रद्धेनिशी की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची प्रत्येक कृति व प्रेत्येक कथन सुन्नाह व शरीयत आहे हे उचित ठरत नाही. तसेच हे कथन कुरआनाच्या या निवेदना विरुद्ध आहे. ज्यात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जादूग्रस्त असण्याचे खंडन केले गेले आहे आणि अनेकेश्वराद्यांच्या या खोट्या दाव्याला असत्य ठरविले गेले आहे. या आधारे ही कथने म्हणजे परी-कथाच होत तव्द्तच एकमात्र कथन कृत्यांच्या (खबर आहाद) निवेदनास श्रद्धासंदर्भात मान्य केले जाऊ शकत नाही. याकरिता पवित्र कुरआन हेच विश्वासार्ह आहे. आणि श्रद्धा नियमाच्या संदर्भात अहादीस (हदीस वचने) मान्य करण्याकरीता सातत्याशीलतेची अट आहे. तदनुसार ही कथने सातत्यशील नाहीत तसेच या दोन्ही सूरतींचे अवतरण प्रचलीत कथनानुसार मक्केत झाले होते. (फी जिलालिल कुरआन खंड-६ पृ . ५००८)

आणि मौलाना अमीन अहसन इस्लाही लिहितात.

''जरी असा दावा केला जातो की,या जादूचा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याच्या प्रेषित-कर्तव्यांवर काहीच प्रभाव पडला नाही पण त्यासोबतच साळ सुदपणे हेहि मान्य केले गेले आहे की याचा प्रभाव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वर असा पडला की ते वृश होत चालले होते एखाद्या कामासंबंधी कल्पना करीत ते केले आहे पण वस्तुत: केलेले नसे--------माझ्या दृष्टीने या कथेचे खंडन करण्याकरीता हे प्रमाण प्रयाप्त आहे की त्या स्विकृत श्रद्धा तत्वाच्या अगदी विपरीत आहे. ज्याचे पवित्र कुरआनाने पैगंबरांविषयी आम्हाला शिक्षण दिले आहे.

इस्मत प्रेषितांच्या त्या गुणवैशिष्टयांपैकी होय जे कोणत्याही क्षण त्यांच्यापासून विभक्त होऊ शकत नाही. प्रेषितांची निरागसत कोणत्याही घटनेने दुषित होत नाही मग ती घटना प्रेषितांचा शुभ-दंत शहीद होण्याची असो वा त्याचे जखमी झाल्याची असो अथवा त्यांचा वध केला गेला असो. यातीली अशी एकहि गोष्ट त्याच्या प्रेषितत्वास बाधक ठरत नाही की जिला प्रमाण ठरवुन हे प्रतिपादन केले जारे की ज्या अर्थी प्रेषित असल्या प्रकारात ग्रस्त होऊ शकतो तर तो जादू ग्रस्त देखील होऊ शकतो. येथपावेतो की त्याला केलेले वा न केलेले आणि दृश्य व अदृश्य मध्ये तारतम्यच रहात नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाहने या स्वरूपाच्या सैतानी हस्तक्षेपा पासून आपल्या पैगंबरांना सुरक्षित ठेवले आहे. आणि त्यांची ही सुरक्षितता धर्म-रक्षणाकरीता अनिवार्य आहे. हीच सुरक्षितता प्रेषिताच्या प्रत्येक कथन व वृतिस प्रमाण बनविते. संपूर्ण कुरआन प्रेषितांच्या निरागसतेविषयी साक्ष देते. आणि प्रत्येक मुसलमानाचे हे कर्तव्य ठरते की त्याने प्रेषितांच्या निष्पाप व निरागस असण्याबद्दल दृढ-श्रद्धा बाळगावी (तदब्बुरे कुरआन खंड ८ पृ. ६६५ ते ६६६)

या भाष्यकारांच्या उल्लिखित निवेदनांन्वये जादू-प्रभावाच्या घटनेची व कथनाची हकीगत सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट होते. परंतु मोठे आश्चर्य आहे की लोकांनी या कथनास खरे सिद्ध करण्याची जेवढी कळबळ वाटते तेवढी कळबळ या गोष्टी विषयी वाटत नाही की याचा प्रेषितांच्या निरागसतेवर काय परिणाम होतो. खरे म्हणजे ही कथन-पूजा नव्हे तर आणखी काय आहे.

७. 'हस्द' (मत्सर) चा अर्थ हा की जर सर्वश्रेष्ठ अल्लाहने एखाद्या व्यक्तिस आपल्या एखाद्या देणगी वा कृपेने उपकृत केले आहे तेव्हा अन्य व्यक्तिच्या मनात जलन भाव निर्माण व्हावा व तिने अशी इच्छा बाळगावी की ती देणगी वा कृपा त्याच्यापासून हिणारावली जावी.

''आणि मत्सर करणारा जेरव्हा मत्सर करतो'' याचा अर्थ हा की मत्सर करणारा दृष्ट बुद्धिने प्रेरित होऊन मत्सर पूर्ण कृति करू लागतो व मत्सराच्या आवेशात तसे पाऊल उचलतो. अशा प्रसंगी त्याच्या अपायापासून, यातनांपासून व त्याच्या त्रासापासून सुरक्षित रहाण्याकरीता अल्लाहचे शरण मागितले पाहिजे.

'मत्सरी (मत्सर करणारा) हा शब्द सर्व सामान्य वापरला गेला असला तरीदेखील ही सर्वपरिचित वस्तुस्थिती होय की मत्सराचा आरंभ सैताना द्वारेच झाला आहे वस्तुत: सर्वश्रेष्ठ अल्लाहने आदम ना निर्माण करून जमीनीच्या खिलाफतीचा मुकुट त्याच्या शिखरवर ठेवला होता. याच श्रेष्ठत्वाच्या आधारे सैतान मानवाचा शत्रु बनला. आणि हे इच्छितो की मानव मार्गभ्रष्ट व्हावा.

पवित्र कुरआनात यहूद्याच्या मत्सरा विषयीहि विशेषणपणे उल्लेख आला आहे.

وَدَّ كَثِيْرٌ مِنْ اَهْلِ الْكِتَابِ لَوْيَرُدُّوْنَكُمْ مِنْ بَعْدِاِيْمَانِكُمْ كُفَّارًا
حَسَدًا مِنْ عِنْدِ اَنْفُسِهِمْ۔( البقرہ ۔ ۱۰۹)

''अधिकांश ग्रंथ-धारक असे इच्छितात की तुम्ही ईमान आणल्यानंतर त्यांनी तुम्हाला पुन:श्च कुफ्रकडे परत न्यावे (अर्थात) हे केवळ आपल्या मत्सर वृत्तीच्या मुळे.'' (अल्-बकरा-१०९)

मक्केचे काफीर देखील पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या या कारणास्तव मत्सर करीत की मक्का आणि तायफच्या सरदारांना सोडून केवळ यांनाच का पैगंबर म्हणून निवडले गेले, ते म्हणत:

لَوْلَا نُزِّلَ هٰذَا الْقُرْآنُ عَلٰى رَجُلٍ مِنَ
الْقَرْيَتَيْنِ عَظِيْمٍ۔(الزخرف : ۳۱)

'' हे कुरआन दोन्ही शहरांच्या (प्रमुखांपैकी) एखाद्या लब्ध प्रतिष्ठित माणसावर का नाही अवतरित केले गेले?'' (अजजुखरुफ-३१)

अर्थात ही मत्सराचीच आग होती जिने त्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे शत्रु बनविले आणि ते हे इच्छित नव्हते की ईमान बाळगणाऱ्यांवर त्यांच्या पालन कर्त्याकडून एखादी मंगल गोष्ट अवतरीत व्हावी.

مَايَوَدُّ الَّذِيْنَ كَفَرُوْا مِنَ اَهْلِ الْكِتَابِ وَلَاالْمُشْرِكِيْنَ اَنْ
يُّنَزَّلَ عَلَيْكُمْ مِنْ خَيْرٍ مِنْ رَّبِّكُمْ۔(البقرہ:۱۰۵)

''ज्या लोकांनी कुफ्र केले मग ग्रंथ-धारक असोत वा अनेकेश्वरवादी. ते हे इच्छीत नव्हते की तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर एखादे मंगल गोष्ट अवतरीत व्हावी.'' (अल् बकरा-१०५)

तात्पर्य आयतीचा उद्देश्य हा आहे की मोमीन व्यक्तिस जेव्हा एखाद्या मत्सरी इसमाशी प्रसंग पडल्यास त्याने याच्या उपद्रवापासून सुरक्षित राहण्यासाठी ईश्वराचे शरण मागावे. अशा प्रकारे तो आपल्या क्रोधावरहि नियंत्रण राखू शकेल व ईश्वर-सहाय्यास देखील पात्र ठरेल.

कुरआनाच्या समाप्तीवर मत्सर करणाऱ्याच्या अपायापासून शरण मागण्याचा जो आदेश दिला गेला आहे. त्याद्वारे एका महत्वपूर्ण गोष्टीकडे निर्देश होतो, तो हा की ईमान धारकांनी हे चांगले लक्षात घ्यावे की या मार्गदर्शक ग्रंथाच्या लाभान्वये त्यांना महान देणगी व फार उच्च सन्मान प्राप्त झाला आहे. त्यामुळे त्यांच्या शत्रूंना त्यांना जळजळीत नजरेने पहाणे व मार्गदर्शनाचा मूलाधार असलेल्या एकेश्वरवादा पासून त्यांना विमुख करणे यात अशक्यते काय? म्हणून ईमान बाळगणाऱ्यांनी आपल्या मत्सर करणाऱ्यांच्या कारवायांपासून सावध राहिले पाहिजे आणि त्याच्या उपद्रवापासून सुरक्षित रहाण्या करीता सर्वश्रेष्ठ अल्लाहचा आश्रय घेतला पाहिजे.

# सूरह अन् नास

# ११४. अन् नास
## (मानव जात)

**नावः** या सूरह मध्ये اَلنَّاسِ'अन नास' हा शब्द पाच वेळा आला आहे. तद्नुसार 'अन् नास' اَلنَّاسِ हे शिर्षक दिले गेले आहे.

**अवतरण काळः** 'मक्की' अर्थात मक्केत अवतरली आहे आणि मजकूरावरून असे अनुमान निघते की ही सूरह अशा वेळी अवतरीत झाली असावी जेव्हा कुरआना विरुद्ध माणसातल्या व जिन्नांमधल्या सैतानांनी लोकांच्या मनात शंका संशय निर्माण करण्याची मोहीम सुरु केली होती.

**मध्यवर्ति कल्पनाः** सूरह फलक प्रमाणेच हिचा मध्यवर्ति विषय देखील 'शरणमागणे' हाच होय. किंबहुना यात शंका आशंका वृत्तीस सर्वात मोठा प्रभाव ठरवून त्यापासून (अल्लाहचे) शरण मागण्याची शिकवण दिली गेली आहे.

**आयात-रचनाः** आयत क्र. १ ते ३ मध्ये शरण दात्याची गुण वैशिष्टये वर्णन केली गेली आहेत.

आयत क्र. ४ मध्ये ज्याच्या आपायापासून शरण मागितले गेले आहे तो एक धोकादायक व धूर्त शत्रू असल्याने सावध केले गेले आहे.

आयत क्र. ५ मध्ये हे दर्शविले गेले आहे की त्याच्या हल्लयांचा खरा केंद्रबिंदू माणसाचे हृदय होय.

आयत क्र. ६ मध्ये याबाबत सचेत केले गेले आहे की हा शत्रू जसा जिन्नांपैकी असतो तव्दतच मानवांपैकीहि असतो.

**महत्वः** उक्ति रचनेच्या दृष्टीने पवित्र कुरआनाची ही अंतिम सूरह होय आणि एका दृष्टीने ती एकेश्वरवादाची संरक्षक आहे तर दुसऱ्या दृष्टीने संपूर्ण कुरआनाची एकेश्वरवादाची संरक्षक अशी की यात एकेश्वरवादाचा खरा शत्रू असलेल्या सैतानाच्या धूर्त चाली पासून सावध राहण्याकरीता व त्याच्या अपायापासून सुरक्षित राहण्या करीता एकमेव अल्लाह चा आश्रय घेण्याचा व त्याचे शरण पत्करण्याचा उपदेश केला गेला आहे. आता रीहीला ही सूरह संपूर्ण कुरआनची संरक्षक व निरीक्षक असण्याचा मतितार्थ तर पवित्र कुरआनने फर्माविल्यानुसार,

لَا يَاْتِيْهِ الْبَاطِلُ مِنْۢ بَيْنِ يَدَيْهِ وَلَا مِنْ خَلْفِهٖ تَنْزِيْلٌ مِّنْ حَكِيْمٍ حَمِيْدٍ۔

अर्थः "असत्या याच्या पुढून येऊ शकत नाही की याच्या मागूनहि, याचे अवतरण अशा सामर्थ्यशील (अल्लाह) कडून झाले आहे जो बुद्धिमत्ता व सदगुणांनी युक्त आहे. (हा मीम अस्सजदा-४२)

مَعُوْذَتَيْن मुआव्विजतैन दोन सूरह ची कुरआनच्या शेवटी मांडणी करून सैतानाचे समस्त प्रवेश मार्ग बंद केले आहेत. म्हणून ईश-वाणीत सैतानी वचने मिश्र होण्याची व असत्याची भेसळ होण्याची संभावना राहिली नाही, दुसऱ्या शब्दात ही सूरह या गोष्टीची हमी होय की, हा ग्रंथ (अर्थात पवित्र कुरआन) सैतान व तत्सम लोकांच्या हस्तक्षेपापासून कियामती पर्यंत सुरक्षित राहील. यात कसल्याहि प्रकारच्या परिवर्तनाची वा फेरफार होण्याची तिळमात्र शक्यता नाही. नि:संशय तो सदैव आपल्या मुळ स्वरूपात कायम राहणारा ग्रंथ आहे.

# ११४. सूरह अन-नास
## (मानव जाति)

سُوْرَةُ النَّاسِ

आयती ६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने.

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. म्हणा,[१] मी शरण मागतो मानवांच्या पालनकर्त्याचे. [२]

قُلْ اَعُوْذُ بِرَبِّ النَّاسِ ۙ ﴿١﴾

२. मानवांच्या बादशहाचे .[३]

مَلِكِ النَّاسِ ۙ ﴿٢﴾

३. मानवांच्या उपास्याचे.[४]

اِلٰهِ النَّاسِ ۙ ﴿٣﴾

४. दृष्ट विचार उद्‌भविणाऱ्या खन्नास (लपणाऱ्या) च्या अपायापासून. [५]

مِنْ شَرِّ الْوَسْوَاسِ ۙ الْخَنَّاسِ ۙ ﴿٤﴾

५. जो लोकांच्या छाती (मना) त दृष्टविचार उदभवितो [६]

الَّذِيْ يُوَسْوِسُ فِيْ صُدُوْرِ النَّاسِ ۙ ﴿٥﴾

६. जो जिन्नापैकीहि असतो व मानवापैकीहि. [७]

مِنَ الْجِنَّةِ وَالنَّاسِ ﴿٦﴾

१. या सूरह मध्ये सर्वप्रथम संबोधित म्हणजे प्रेषित सल्लल्लाहु अलैहि वसल्लम होय आणि قُلْ 'कुल' (सांगा) या शब्दाने सूरहचा आरंभ हा या गोष्टीचा पुरावा होय की ही वाणी अल्लाह तर्फे होय. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ना ज्या शब्दात संदेश पोहचविण्याचा आदेश दिला होता तंतोतंत त्याच शब्दात त्यांनी तो संदेश लोकांपर्यंत पोहचविला. त्यात एकही शब्द अर्थात قُلْ 'कुल' (सांगा) हा देखील त्यांनी गाळला नाही. आणि हे कुरआनाचा शब्द न शब्द ईश-वाणी असल्याचे स्पष्ट प्रमाण होय.

२. मानवांचा स्वामी अर्थात सर्व जनांचा पालनकर्ता व खरा मालक आयतीचा अर्थ हा की जो ईश्वर माणसांचा स्वामी आहे तोच शरण दाता देखील आहे. त्याखेरीज अन्य कोणीहि शरणदाता नाही. म्हणूनच मी शरणार्थ त्याच्याच दिशेने वळतो.

जबूर या ग्रंथातहि या स्वरूपाचा आशय आढळतो.

''हे देवा माझे रक्षण कर, कारण मी तुझा आश्रय धरिला आहे. मी परमेश्वराला म्हटले, तूच माझा प्रभू आहेस, तुझ्या परते मला सुख नाही.'' (स्तोत्र संहिता - १६: १,२)

اَعُوْذُ 'अऊजु' याचा शब्दिक अर्थ शरण घेणे असा आहे हे लक्षात घ्यावे. ज्यावरून ही गोष्ट उघड होते की दास आपल्या ईश्वराकडून केवळ शरण मागत नाही किंबहुना त्याने स्वत:ला कृतीशीलतेने ईश्वराच्या संरक्षणात दिले व त्याचा आश्रय घेतला. परंतु सूरह फलक व सूरह अन-नास या दोन्ही प्रार्थना रूप सूरह आहेत आणि सर्वसाधारणपणे अशा प्रसंगी 'शरण मागणे' असा शब्द प्रयोग केला जातो म्हणून 'अऊजु' या शब्दाचा अनुवाद आम्ही 'शरण मागतो' असा केला आहे.

३. अर्थात खरे पाहिले असता अल्लाह माणसांचा खराखुरा बादशहा आहे म्हणून तो दोसांचे संरक्षण करण्यास पुर्णत: समर्थ आहे आणि म्हणूनच मी त्या सर्व शक्तिमान अल्लाहचेच शरण मागतो.

यावरून हे स्पष्ट होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहचा उच्चाधिकार जसा जमीन व आकाशांवर कायम आहे तव्दत्च तो संपूर्ण मनुष्य-जातिवर हि कायम आहे. मानव-समूहांपैकी असा एकहि समूह नाही की ज्यावर तयाचे आधिपत्य कायम नसावे. म्हणून, 'आपण त्याच्या आधिपत्यतून मुक्त आहो असा जर एखाद्या समूहाचा समज असेल तर ते घटनाबाह्य होय. एवढे म्हटल्याने वस्तुस्थिती बदलत नाही, तथापि माणसाची कार्यपद्धति दोषपूर्ण होते. अर्थात तो आपल्या कार्य-क्षेत्रात बंडखोर व अवज्ञाकारी बनतो.

४. अर्थात, खऱ्या अर्थाने समस्त मानवांचे 'उपास्य' केवळ सर्वश्रेष्ठ अल्लाह आहे. आणि ही त्याच्या स्वामी व सर्व सत्ताधिकारी असण्याची निकड आहे. आता ही गोष्ट वेगळी की लोकांनी या वस्तुस्थितीशी बंड करून अल्लाहखेरीज इंतरांना उपास्य बनविले असावे. वस्तुत: उपासनेस योग्य अशी केवळ अल्लाहचीच जात आहे. आणि या सृष्टीत ज्याची आराधना केली जावी असे 'उपास्य' असण्याची पात्रता केवळ अल्लाह बाळगतो. आणि असा तोच की ज्याची उपासना आकाशातहि केली जाते व जमीनीवर ही यास्तव, माणसांचे 'आराध्य उपास्य' त्याच्या व्यतिरिक्त अन्य कोणीहि नाही.

सर्वश्रेष्ठ अल्लाहला पालनकर्ता बादशहा, व उपास्य मानून जेव्हा दास त्याकडे शरण-याचना करतो तेव्हा तो कबूल करतो. दुसऱ्या शब्दात शरणागतिच्या प्रार्थना स्विकृत होण्याकरिता अल्लाहच्या एकमेवतेत पूरेपूर श्रद्धा असणे अत्यावश्यक आहे.

५. 'वसवसा' म्हणजे वाईट गोष्ट व वाईट विचार जो अनभावितपणे एकाद्याच्या मनात टाकला जावा आणि वसवास चा अर्थ दृष्टविचार मनात उद्भविणारा अर्थात हा सैतानाचा गुणधर्म होय. आणि त्याचे दूसरे वैशिष्टय 'खन्नास' होय जे 'खूनूस' पासून बनले आहे ज्याचा अर्थ लपणे अदृश्य होणे व परावृत्त होणे असा आहे. तसेच याचा आणखी एक अर्थ संकुचित होणे हा आहे.

सैतान जेव्हा माणसाला एखाद्या दुष्कृत्यास प्रवृत्त करू इच्छितो तेव्हा तो त्या दुष्कृत्यास सुंदर स्वरूपात सादर करतो आणि आनंददायक परिणितीची आशा देतो. नेमकी हीच गोष्ट 'वसवसा' च्या रूपाने माणसाच्या मनात दाखल होते आणि जेव्हा तो यामुळे प्रभावित होतो तेव्हा तो विचार प्रबळ होऊन निश्चय व कृतिचे रूप धारण करतो, कुविचारांचे थैमान मनात उद्भविण्याचे काम सैतानाने सर्वप्रथम आदम व हव्वावर केले होत :

فَوَسْوَسَ لَهُمَا الشَّيْطٰنُ لِيُبْدِىَ لَهُمَا مَا وُرِىَ عَنْهُمَا مِنْ
سَوْاٰتِهِمَا وَقَالَ مَا نَهٰكُمَا رَبُّكُمَا عَنْ هٰذِهِ الشَّجَرَةِ اِلَّآ
اَنْ تَكُوْنَا مَلَكَيْنِ اَوْتَكُوْنَا مِنَ الْخَالِدِيْنَ ــــــ وَقَا
سَمَهُمَآ اِنِّىْ لَكُمَا لَمِنَ النّٰصِحِيْنَ۔ ( الاعراف ٢٠، ٢١)

'' मग सैतानाने त्यांच्या मनात वाईट विचार घोळले ज्यायोगे त्यांची लज्जा स्थाने जी त्यांच्यापासून लपवून ठेवलेली होती त्यांना त्यांच्यासमोर उघड करावे. आणि सांगितले की तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला या वृक्षापासून यासाठी रोखून ठेवले आहे की तुम्ही कदाचित फिरिश्ते न व्हावे किंवा तुम्हाला अमर्त्य जीवन न लाभावे. त्याने शपथपूर्वक त्यांना सांगितले की मी तुमचा हितचिंतक आहे.''(सूरह- आअराफ २०, २१)

सैतानाद्वारे मनात कुविचार घोळविण्याचे हे स्पष्ट उदाहरण आहे की कशा प्रकारे तो हितचिंतक बनून येतो व कसा धोक्याने

दुष्कृत्याची प्रेरणा देतो. आदम व हव्वा समोर तो प्रकट झाला होता परंतु जगात त्याची कुनिती लपून बसलेल्या शत्रूच्या हल्ल्याप्रमाणे असते. म्हणून माणसाला तो केव्हा मनात कुविचाराचे बीज पेरतो हे कळत सुद्धा नाही तथापि मनात उद्‌भवणाऱ्या वाईट विचाराची जाणीव त्याला होऊ लागते. परंतु या कुविचारांना आत्मसात करणे वा न करणे हे माणसाच्या आपल्या निर्णयावर अवलंबून असते. जर तो जागृत व आपल्या शत्रूकडून सावध असेल तर सैतानी 'वसवसा' चा तिळमात्र प्रभाव तो आपल्यावर होऊ देत नाही मात्र असावध असेल तर प्रभावित होतो. जोपर्यंत अल्लाहचे स्मरण मनात स्थान मांडून बसले असेल तो पर्यंत मनुष्य हृदय जागृत असते. अल्लाहचे नामस्मरण माणसाच्या संरक्षणाचे सर्वात मोठे शस्त्र होय. या शस्त्राचा वापर करून जेव्हा तो मनात उद्‌भवणाऱ्या वाईट विचारांपासून अल्लाहचे शरण मागतो तेव्हा कुविचारांचा उन्माद परिणाम शून्य ठरतो. आणि मग सैतानाला अपयशी होऊन परत जावे लागते. मनुष्या विरूद्ध सैतान लपून छपून ज्या कारवाया करतो त्याविषयी सावध करणे हाच आहे या आयतीचा उद्देश ज्यायोगे मनुष्याने आपल्या शत्रूकडून सावध रहावे व स्वसरंरक्षणाचा मार्ग योजावा.

हा झाला आयतीच्या अर्थानुषंगाने सर्व साधारण पैलू राहिला विशेष पैलू तर त्या संदर्भात या गोष्टीकडे निर्देश करणे आवश्यक आहे की ईमान बाळगणाऱ्यांना पवित्र कुरआन च्या स्वरूपात जे मार्गदर्शन लाभले आहे याला सर्वात मोठा धोका जर कोणता असेल तर तो सैतानतर्फे वसवसा होय. अर्थात तो अशा गोष्टी उद्‌भवू शकतो ज्या पवित्र कुरआनाबाबत शंका संशय निर्माण करणाऱ्या व सन्मार्गापासून परावृत्त करणाऱ्या असाव्यात विशेषत: तौहीद (एकेश्वरवादा) ची श्रद्धा जी धर्माचा मूलभूत आधार व पवित्र कुरआनाचे मूल सूत्र आहे. सैतानाच्या गुप्त कारवाया याच्या विरुद्ध होऊ शकतात. म्हणून या शत्रूच्या धूर्त चालीपासून सचेत राहण्याची व आपल्या धर्म आणि श्रद्धेच्या संरक्षणार्थ उपाय योजना करण्याची गरज आहे.

६.मनात कुविचार निर्माण करणे हा सर्वसामान्य बोली भाषेतील प्रकार होय वस्तुत: मूळ शब्द ''सुदूर'' वापरला गेला आहे. जो ''सदर'' या शब्दाचे अनेक वचन होय. याचा अर्थ ''छाती'' असा आहे. सैतानाच्या कुविचार निर्मितीचे केंद्र स्थळ माणसाचे अंतरंग अर्थात छाती. छाती हृदयाकरीता उंबरण्यासारखी होय.या द्वारेच कुविचार हृदयात प्रवेश करतात. अल्लामा इब्ने कय्यिम यांनी याचे फार चांगले स्पष्टीकरण केले आहे.

'हा मुद्दा चिंतनीय आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने

يُوَسْوِسُ فِىْ صُدُوْرِ النَّاس

(जो माणसांच्या छातीमध्ये वसवसे अर्थात कुविचार टाकतो फर्माविले, उलट यांच्या हृदयांत वसवसे टाकतो' असे नाही फर्माविले. कारण छाती हृदयाचे कुंपण व त्याचे घर आहे जेथून भावना व विचार प्रविष्ट होऊन अंतरंगात एकत्रित होतात त्यानंतर हृदयात दाखल होतात. म्हणून छाती हृदयाकरीता उंबरठयासारखी आहे. आणि समस्त आदेश व निश्चय हृदयातून बाहेर पडून छातीत येतात आणि मग तेथून त्यांची विभागणी त्याच्या सैन्यांना केली जाते.'' (तफसीरूल मुअव्विजतैन इब्ने कय्यिम पृ. ६६)

याचाच अर्थ कुविचार मनात सरळ सरळ प्रवेश करीत नाहीत किंबहुना छातीच्या मार्गाने प्रवेश करतात. जणू सैतानाचे बाण छातीत रोवून बसतात व त्यांचा विषारी परिणाम. हृदय गाफील स्थितीत निद्रिस्त असते अशा वेळी होतो. अन्यथा जूर हृदय अल्लाहच्या नामस्मरणाने जागृह असेल तर संरक्षण होत व त्याच्या परिणामापासून सुरक्षित राहते.

७. अर्थात मनात कुविचार उत्पन्न करणारा सैतान केवळ इबलीस नव्हे किंबहुना जिन्न व मनुष्य या दोन्ही वर्गात असे सैतान विपुल संख्येने आहेत, जे हे कार्य करीत राहतात

وَكَذَالِكَ جَعَلْنَا لِكُلِّ نَبِيٍّ عَدُوًّا شَيٰطِيْنَ الْاِنْسِ وَالْجِنِّ يُوْحِىْ بَعْضُهُمْ اِلٰى بَعْضٍ زُخْرُفَ الْقَوْلِ غُرُوْرًا۔ (الانعام : ١١٢)

'' आणि आम्ही अशा प्रकारे प्रत्येक पैगंबराकरीता माणसांच्या व जिन्नांच्या सैतानांना शत्रू बनविले आहे जे एकमेकांवर तिखट मीठ लावलेल्या गोष्टी धोका देण्याकरीता मनात निर्माण करतात.'' (अल-अनआम-११२)

जिन्न-सैतानांच्या कुविचार निर्मित संदर्भात यांचे लपून हल्लेखोर असणे स्पष्ट होते. राहिलेत मनुष्य-सैतान तर ते देखील जेव्हा मनात कुविचार उत्पन्न करतात तेव्हा आपल्या मूळ सैतानी स्वरूपास लपवून काम करतात. यासाठी ते माणसाचे हितचिंतक बनून प्रकट होतात. कारण त्यांना हे माहित असते की जो पर्यंत ते हितचिंतक या नात्याने पुढे येत नाही तोपर्यंत त्यांचा कोणताही विचार अथवा सल्ला कोणत्याही व्यक्तिकरीता मान्य करण्याजोगा होऊ शकत नाही. जर ते आपल्या खऱ्या स्वरूपात म्हणजे विध्वसक व उपद्रवी या नात्याने प्रकट होतील तर कोणीही त्यांच्याकडे लक्ष देण्यास तयार होणार नाही.

इथे ही गोष्ट देखील समजून घेतली पाहिजे की उपद्रव पसरविण्याच्या संदर्भात खरी भूमिका जिन्न-सैतानांची आहे त्यांचा प्रमुख इबलीस होय. राहिलेत मनुष्य-सैतान तर ते यांच्याच आधिपत्याखाली होत.